मुंबई विद्यापीठाने ... मंजूर केलेले ...

इंग्रजांचें स्वराज्य

भाग] अथवा [पहिला

इंग्लंडचा संपूर्ण इतिहास

ज. स. ... अवटे

नवीन धर्तीवर लिहिलेलें, अनेक विद्वानांनीं नांवाजलेलें, इतकें उपयुक्त व स्वस्त पुस्तक दुसरें नाहीं.

इंग्रजांचें स्वराज्य
अथवा
इंग्लंडचा संपूर्ण इतिहास
प्रथम खंड
(भाग १ ते ४)

लेखकः—अनंत वासुदेव मराठे

प्रस्तावना लेखक

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए. [रियासतकार]

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई.

१९३१

किंमत ३।। रुपया

लेखकः—
अनंत वासुदेव मराठे
मुंबई.

प्रकाशकः—
केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई

मुद्रकः—
एस्. व्ही. परुळेकर
मुंबई वैभव प्रेस, सँड्हर्स्ट रोड,
गिरगांव, मुंबई.

प्रस्तावना.

गेल्या शें दीडशें वर्षांत हिंदी शाळांच्या अभ्यासक्रमांत इंग्लंडचा इतिहास शिकविला जात आहे, परंतु हल्लींपर्यंत तो बहुधा इंग्रजींतूनच शिकविण्याचा असल्यामुळें सामान्य जनतेस त्याची ओळख नव्हती. अलीकडे दहा पांच वर्षांपासून दुय्यम शाळांत या विषयाचें मातृभाषेंतून शिक्षण देण्याची पद्धति अंमलांत आल्यानंतर त्यासाठीं मराठी पुस्तकांची अवश्यकता भासूं लागली. तरी परीक्षेपलीकडे व्यवहारास त्याची जरूर फारशी नव्हती. परंतु आतां हा मनु पालटला आहे. हिंदुस्थानची भावी राज्यसंघटना हल्लीं तयार होत असून ती बहुंशीं इंग्लंडच्या धर्तीवरच जाणार हें ठरल्यासारखें आहे. इंग्लंडांत प्रजासत्ताक व्यवस्था 'पार्लमेंटा'चे द्वारें अंमलांत असून, त्याच्या दोन शाखा उच्च व सामान्य सभा येथेंही स्थापन होत आहेत. मतदानपद्धति देखील परिस्थित्यनुरूप फेरफार करून इंग्लंडपासूनच आपण उचलणार आहों. अर्थात् पुढील घडामोडींत आपणास आतां इंग्लंडच्या इतिहासाची घडोघडी जरूर पडणार आहे. ब्रिटिश पार्लमेंटाची पहिली निर्मिति स. १२६५त **सायमन ड मॉंट**फर्डकडून झाली. तेव्हांपासून नुकतेच दिवंगत झालेल्या **ग्लॅडस्टन**पावेतों अनेक इंग्रज राष्ट्रपुरुषांनीं आपली राज्यघटना बनविण्यांत शेंकडों वर्षें कसकसे कष्ट केले, स्वातंत्र्यप्राप्ति व राष्ट्रोत्कर्ष यांजकरितां त्यांस कसे व किती झगडे करावे लागले, त्यांत त्यांनीं इष्टानिष्ट प्रकार कोणते केले, त्यांच्या उद्योगावर बाह्य स्थितीचा परिणाम काय होत गेला, इत्यादि बाबती केवळ परीक्षेसाठीं नव्हे, तर राष्ट्रीय जबाबदारी पार पाडण्यासाठींदेखील प्रत्येक हिंदी नागरिकास आतां अवगत पाहिजेत. राजकीय व्यवहारांबरोबरच सामाजिक, धार्मिक, आर्थिक वगैरे बाबतींचा अभ्यासही आपणांस इंग्लंडच्या व युरोपच्या अनुभवावरून शिकावयाचा आहे.

मराठींत इंग्लंडच्या इतिहासावर विस्तृत व विवेचक ग्रंथ अद्यापि झालेला नव्हता. हल्लीं उपलब्ध असलेलीं पुस्तकें बरींचशीं केवळ परीक्षेपुरतीं किंवा एकदेशीय आहेत. त्यांतून इंग्लंडचा इतिहास देखील एकंदर जगाच्या इतिहासापासून अलग सांगतां येण्यासारखा नाहीं. जगाच्या घडामोडींत इंग्लंडनें आपली प्रगति कशी करून घेतली, याची सुसंगत उपपत्ति दाखविणारें परिपूर्ण पुस्तक आज आपणांस पाहिजे आहे. या विषयावर इंग्रजींत कितीतरी नामांकित ग्रंथ उपलब्ध असतां, आतांपर्यंत त्यांतलें हृद्गत अल्प किंमतींत मराठी वाचकांस मिळण्याची सोय नव्हती. तेव्हां ही अडचण दूर करण्याचें श्रेय रा. **अ. वा. मराठे** यांनीं प्रथमच घेतल्याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन

करितों. त्यांनीं अत्यंत परिश्रमानें असा इतिहास तयार करून गेल्या जुलई महिन्यांत मला दाखविला, त्या वेळीं त्यांतले बरेच भाग वाचून त्यांची मांडणी व संगति मीं तपासून पाहिली, व ती मला विशेष मार्मिक व उपयुक्त वाटली. सुदैवानें **रा. केशव भिकाजी ढवळे** यांच्यासारख्या प्रकाशकांनीं हें काम अंगावर घेतलें म्हणून इतकें परिपूर्ण पुस्तक बाहेर पडण्याचा योग जमून आला.

या पुस्तकाचे दोन तीन मुख्य गुण मला आढळले ते असे कीं, तें कोणत्याही एकाच पुस्तकावरून उतरून घेतलेलें नाहीं. 'रॉयल हिस्टरी' किंवा 'एंपायर हिस्टरी' यांच्या धर्तीवर ग्रंथकर्त्यांनीं आपली रचना कल्पून त्यांत निरनिराळ्या ग्रंथांतील अनेक मौल्यवान मुद्यांची भर घातली आहे. जगाच्या इतिहासाचा ओघ सारखा दृष्टीसमोर ठेवून रा. मराठे यांनीं विषयपरिपोष केल्यामुळें आणि भाषाही सुलभ व चित्ताकर्षक वापरल्यामुळें पुस्तक उद्बोधक झालें आहे. नाना प्रकारचा तपशील गच्च भरूनही पुस्तक कंटाळवाणें वाटत नाहीं. विवेचन करितांना हिंदी इतिहासाचे व परिस्थितीचे दाखले ठिकठिकाणीं अंतर्भूत केल्यामुळें विषय चटकन मनांत भरतो. प्रत्येक भागाचे अखेरीस लोकांची राहणी, बौद्धिक प्रगति, नवीन शोध, व्यापाराच्या व आर्थिक घडामोडी, वगैरे अनेक बाबतींचें विवेचन व प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें देऊन इतिहासाचें प्रयोजन व्यवहारास किती जरूर आहे तें सर्वत्र दाखवून दिलें आहे. लेखकाची मनोभूमिका निर्विकारी परंतु सर्वव्यापी व सर्वग्राही असल्यामुळें अमुक एक विषय प्रतिपादनांतून सुटला असें बहुधा झालेलें नाहीं. इंग्रज राष्ट्राचे अनुभवावरून हिंदी विद्यार्थ्यांस येथें कोणत्या गोष्टींची जरूर आहे हें धोरण त्यांनीं सदैव दृष्टीसमोर ठेविलें आहे. त्यामुळें मॅट्रिक, स्कूल लीव्हिंग, किंवा पुढील उच्च परीक्षा या सर्वांसाठीं, तसेंच सामान्य संदर्भग्रंथ म्हणूनही हें पुस्तक विशेष संग्राह्य असें झालें आहे. कार्यकारणभाव, मार्मिक तुलना, समकालीन जागतिक घडामोडी, ऐतिहासिक व्यक्तींचीं चरित्रें व चित्रें, आणि सूचक प्रश्न, इत्यादिकांनीं पुस्तक परिपूर्ण करण्यांत रा. मराठे यांनीं यत्किंचितही हयगय केलेली नाहीं. पारिभाषिक शब्द त्यांनीं बरेच नवीन बनविले असून त्यांची समज पटण्यासाठीं मूळचे इंग्रजी पर्याय कंसांत दिले आहेत. तथापि हे शब्द रूढ होण्यासाठीं एकंदर पारिभाषिक शब्दांची स्वतंत्र यादीच पुस्तकांत दिल्यास चांगलें असें मला वाटतें.

एवढ्या प्रस्तावनेनें हें पुस्तक मी वाचकांस सादर करितों, आणि ते लेखकाच्या या परिश्रमांचें चीज करून त्यांना याच विषयावरील आपला व्यासंग वाढवून त्याचें फल प्रसिद्ध करण्याला अधिकाधिक उत्तेजन देतील, अशी आशा व्यक्त करितों.

गो. स. सरदेसाई.

ग्रंथकर्त्यांचे दोन शब्द.

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बेकन यानें इतिहासज्ञानाची अवश्यकता प्रदिपादन करितांना 'इतिहास हा मनुष्याला पूर्ण बनवितो' असें म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं, ज्ञानाच्या इतर शाखा मानवी मनाच्या एकेका अंगाचा विकास करण्याला समर्थ असल्या, तरी इतिहास हा विषय असा आहे कीं, त्याचा अभ्यास मानवी मनाची सर्वांगीण वाढ करूं शकतो. शिवाय इतिहास—मग तो व्यक्तीचा असो कीं राष्ट्राचा असो—अनुभवाच्या पायावर अधिष्ठित असल्यामुळें मागचा अनुभव 'पुढिलां'ना मार्गदर्शक व्हावा म्हणूनच राष्ट्रांतील विद्वान लोक तो संग्रहीत करून ठेवीत असतात, आणि कोणत्याही राष्ट्राच्या शिक्षणक्रमांत इतिहासविषयाला महत्त्वाचें स्थान दिलेलें असतें.

मुंबई विश्वविद्यालयानें कॉलेजांतून इतिहास विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ब्रिटिशांच्या सनदशीर राज्यपद्धतींचा व राजकीय संस्थांचा इतिहास नेमलेला असून मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना इंग्लंडच्या इतिहासापैकीं (१) टयूडर कालांतील धर्मसुधारणा, राजसत्तेची वाढ, व इंग्लंडच्या नाविक वर्चस्वाचा आरंभ, (२) स्टुअर्ट कालीन राजांच्या अनियंत्रित सत्तेला आळा घालण्याचे पार्लमेंटनें केलेले प्रयत्न, इ. स. १६८८ मधील राज्यक्रांति, आणि या राज्यक्रांतीनंतर इंग्लंडच्या राज्यघटनेला आलेलें स्थिर स्वरूप, (३) हॅनोव्हर कालीं पार्लमेंटरी संस्थांचा झालेला उत्कर्ष, व इंग्लंडचा परराष्ट्रांशीं आलेला संबंध, तसेंच (४) ब्रिटिश राज्यघटनेची उत्क्रान्ति, तिचें आजचें स्वरूप, राजाचे अधिकार, लोकसभा व सरदारसभा यांची घटना व परस्परसंबंध, मंत्रिमंडळ व त्याची उत्क्रान्ति वगैरे बाबींची विशेष माहिती असावी असें ठरविलें आहे.

दुय्यम शाळांतील शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना हा इतिहास शिकवितांना महत्त्वाचे तेवढेच प्रश्न, काल, व घडामोडी विचारांत घ्याव्या; युद्ध आणि तह यांची तपशीलवार माहिती पाहिजेच असें नाहीं; पण इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांतील महत्त्वाच्या सनांचे 'सांगाडे' तयार करतां येणें मात्र अवश्य आहे; पहिल्या पहिल्यानें चरित्रात्मक इतिहासाकडेच ज्यास्त लक्ष द्यावें; आणि मराठी माध्यम खुशाल स्वीकारावें वगैरे सूचनाही शाळाखात्यानें देऊन ठेवल्या आहेत.

भारतीय महिला विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेसाठीं इंग्लंडच्या इतिहासांतील ट्यूडर कालापासूनचा पुढचा भाग, आणि 'दुसऱ्या वर्षा' च्या परीक्षेसाठीं ब्रिटिश साम्राज्य आणि ब्रिटिश राज्यघटना यांचा इतिहास नेमलेला आहे.

इंग्रजी भाषेंत या विषयावर अर्थातच अनेक ग्रंथ आहेत. पण त्यांतले कांहीं ग्रंथ आपापल्यापरी सरस असूनही ग्रंथकारांच्या पूर्वग्रहामुळें अनेक स्थळीं विपरीत विचारसरणी व तर्कपद्धति यांनीं भरलेले दिसून येतात. तसेंच त्या ग्रंथांतून वर्णिलेल्या कित्येक गोष्टी तद्देशीयांना महत्त्वाच्या वाटत असल्या व त्या तिकडच्या वाचकांना सहज समजण्यासारख्या असल्या, तरी इतरांना–विशेषतः भिन्न संस्कृतीच्या हिंदी लोकांना–त्यांचें तादृश महत्त्व वाटण्याजोगें नसतें. त्यामुळें त्यांचें वर्णन वाचतांना कंटाळा येतो. तेव्हां हे दोष शक्य तितके टाळून आणि साध्या कथालेखकाची भूमिका घेऊन लिहिलेला इंग्लंडचा मराठी इतिहास महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना व सामान्य वाचकांनाही जास्त उपयुक्त होईल असें वाटल्यामुळें त्या दृष्टीनें हें पुस्तक लिहिलें आहे. यांतील निरनिराळ्या प्रकरणांतून इंग्लंडच्या राज्यघटनेची उत्क्रान्ति क्रमशः कशी होत गेली, ब्रिटिश साम्राज्याची वाढ व उत्कर्ष कसा झाला, आणि या कामीं इंग्रजांना कसकसे कष्ट सोसावे लागले, याची शक्य तितकी संगतवार हकीकत दिलेली असून, 'स्व-राज्य' हें या एकंदर इतिहासाचें मुख्य सूत्र कसें आहे हेंही ठिकठिकाणीं दाखविलें आहे.

इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासाचा आरंभ ट्यूडर कालापासूनच होत असला, तरी या कालचा इतिहास शिकवितांना अनेक वेळां प्रस्तावनेदाखल मागील कालच्या गोष्टींची माहिती करून देणें अवश्य असतें. शिवाय त्या हजार दीडहजार वर्षांच्या कालांतही इंग्लंडांत बऱ्याच महत्त्वाच्या घडामोडी झाल्या असून त्या आकर्षक स्वरूपांत वाचकांसमोर मांडल्यास करमणूक व ज्ञान या दोन्ही दृष्टींनीं त्या कालचा इतिहास उपयुक्त होईल असें वाटल्यामुळें तो पहिल्या दोन भागांत देण्यांत आला आहे, आणि त्याचा विद्यार्थी व शिक्षक या दोघांनाही उपयोग होईल अशी आशा आहे.

या पुस्तकाचा 'हायस्कुलांत' उपयोग करतांना तिसऱ्या इयत्तेंतच 'द्वितीयार्ध कालां'त (टर्म) या पुस्तकाचे पहिले दोन भाग मधून मधून विद्यार्थ्यांकडून वाचून घेतल्यास पुढें चौथ्या इयत्तेंत ट्यूडर कालच्या इतिहासाला आरंभ करितांना मागच्या इतिहासाची माहिती करून देण्यांत जो वेळ मोडतो तो वांचेल. त्यानंतरही चौथ्या इयत्तेंत ट्यूडर काल (भाग ३), पांचव्या इयत्तेंत स्टुअर्ट व हॅनोव्हर काल, (भाग ४ व ५) आणि सहाव्या इयत्तेंत त्यापुढील व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीतील हकीकत

आणि ब्रिटिश राज्यघटनेची माहिती (भाग ६) घेऊन हा इतिहास पुरा करावा, आणि सातवें वर्ष परीक्षेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या भागाची उजळणी करण्यांत घालवावें. म्हणजे विद्यार्थ्यांच्या मेंदूवर केव्हांही ज्यास्त बोजा न पडतां या इतिहासाचें परीक्षेपुरतेंच नव्हे तर शक्य तितकें परिपूर्ण ज्ञान त्यांना प्राप्त होईल.

'हायस्कूल'च्या वरच्या इयत्तांना इंग्लंडचा इतिहास शिकविण्याच्या पंधरा सोळा वर्षांच्या अनुभवानें या बाबतींत शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणी येतात, त्यांची प्रस्तुत लेखकाला स्वानुभवावरून माहिती असल्यामुळें विषयप्रतिपादनांत शक्य तितकी सुलभता व मनोरंजकता यावी, आणि विद्यार्थ्यांना व सामान्य वाचकांना वाचतांना कंटाळा न येतां त्यांनीं या विषयाचें आवडीनें अध्ययन करावें म्हणून आकर्षक शीर्षकें, तुलनात्मक विवेचन, प्रसंगानुरूप भाषासरणी, वगैरे गोष्टींचा हें पुस्तक लिहितांना अवलंब करण्यांत आला आहे, आणि कित्येक इंग्रजी ग्रंथांप्रमाणें या पुस्तकाचा इतिहास व भाषा या दोनही दृष्टींनीं विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा अशी याची मांडणी केली आहे.

या ग्रंथांत आलेल्या युरोपीय विशेषनामांच्या उच्चारांसंबंधानें प्रथमच एक गोष्ट सांगून ठेवणें अवश्य वाटतें ती ही कीं, या बाबतींत सध्यां (१) खुद्द इंग्रज लोक त्या नांवांचे जे उच्चार करितात तसेच ते मराठींतून देणें, (२) इंग्रजी वर्णांच्या जोडणीला (spelling) अनुसरून त्यांचे मराठी उच्चार बनविणें, आणि शेवटीं (३) केवळ उच्चारसौलभ्य, असे प्रकार निरनिराळ्या ग्रंथकारांनीं अवलंबिलेले दिसून येतात. उ. Salisbury हा शब्द घेतला तर त्याचा इंग्लंडांतला 'शुद्ध' उच्चार 'सॉल्झबरी', वर्णानुक्रमानुसार उच्चार 'सॅलिस्‌बरी', आणि केवळ उच्चारसौलभ्याच्या दृष्टीनें केलेला उच्चार सालिसबरी, किंवा ज्याच्या जिव्हेला जो बसेल तो!. William, Derby, Disraeli, Louis वगैरे विशेषनामांचाही तोच प्रकार आहे. Gloucester, Leicester; वगैरे शब्दांचे खास इंग्रजी उच्चार आणि वर्णानुसारी उच्चार यांत कितीतरी तफावत दिसून येते. या बाबतींत अशा शब्दांचे ज्या त्या देशांतील सर्वसामान्य लोक जसे उच्चार करतात, तसेच ते इतरांनीं स्वीकारणें हा उत्तम व सरळ मार्ग असला तरी इतर देशांतील सर्वसामान्य लोकांना भाषा व लिपिभिन्नत्वामुळें ते जसेच्या तसे उच्चारणें कठिण जातें हेंही तितकेंच खरें आहे. मीं या पुस्तकांत बहुतेक ठिकाणीं वर्णानुसारित्व आणि उच्चारसौलभ्य हाच मार्ग पत्करला आहे, आणि तिकडचे 'शुद्ध' उच्चार कसे असतात याची थोडीशी कल्पना येण्यासाठीं शेवटीं एका परिशिष्टांत

कित्येक शब्दांचे तद्देशीय उच्चारही दिले आहेत. तरी शिक्षकांनीं व सामान्य वाचकांनीं या बाबतींतलीं आपलीं मतें व अनुभव अवश्य कळवावे, म्हणजे पुढील आवृत्तीच्या वेळीं या बाबतींत ज्यास्त निश्चितपणा आणतां येईल.

पुस्तक लिहून तयार झालें तरी तें वाचकांच्या हातीं पडण्याला छपाईच्या खर्चाची व्यवस्था होणें अवश्य होतें. सुदैवानें मुंबईचे पुस्तकप्रकाशक रा. **केशव भिकाजी ढवळे** यांचें या कामीं वेळींच साहाय्य झाल्यामुळें ती काळजी दूर झाली, आणि जवळ जवळ १००० पृष्ठांचें सुंदर छपाई आणि सुबक बांधणीचें पुस्तक अवघ्या २॥ रुपयांत वाचकांच्या हातीं देण्याचा आज सुयोग प्राप्त झाला, याबद्दल प्रस्तुत लेखकाप्रमाणेंच महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणचे विद्यार्थी आणि सामान्य वाचक सदरहू प्रकाशकांचे आभार मानतील अशी खात्री आहे.

हें पुस्तक तयार करतांना ज्या इंग्रजी मराठी ग्रंथकारांची मदत झाली, त्यांत **ग्रीन, वॉकर, हॅलम, मॉटगॉमरी, टाउट, मेकॉले, मास्टरमन, मॉरिस, मॅरिअट, जेन्स, जाइल्स, बर्नेट, रॅझम,** वगैरे इंग्रज व अमेरिकन ग्रंथकार, आणि **ओक, बापट, फडके, सरदेसाई, मोडक, बर्वे,** वगैरे मराठी ग्रंथकार प्रमुख होत. **थॉमस नेल्सनच्या** 'रॉयल हिस्टरी ऑफ इंग्लंड' या पुस्तकाचा तर हरघडी उपयोग झाला आहे. त्याबद्दल या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहें.

या पुस्तकाच्या हस्तलिखित प्रतीचा कांहीं भाग माजी समर्थविद्यालयांतील शिक्षक श्री. **राजाराम दामोदर देसाई** बी. ए. यांनीं काळजीपूर्वक तपासून पाहिला आहे. तसेंच सुप्रसिद्ध रियासतकार **रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई** बी. ए. यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचून पाहून हा इतिहास सर्वांगसुंदर व्हावा म्हणून अनेक उपयुक्त सूचना केल्या, आणि आपल्या अधिकारयुक्त प्रस्तावनेची या पुस्तकाला जोड दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. याशिवाय प्रो. **दत्तो वामन पोतदार** बी. ए., रा. **विठ्ठल कृष्ण नेरुरकर** बी. ए., प्रो. **उमाकांत माधवराव भेंडे** बी. ए., रा. **प. न. घांटे**, वगैरे अनेक विद्वानांनीं आणि कित्येक शाळांतील इतिहासाध्यापकांनीं अनेक तऱ्हांनीं मदत केली, आणि रा. **पुरुषोत्तम नारायण केळकर** यांनीं मुद्रितें तपासण्याच्या कामीं बहुमोल साहाय्य केलें, त्याबद्दल त्यांचेही आभार मानिले पाहिजेत.

यजमान स्वयंपाकाचें साहित्य तयार करून सहस्र किंवा लक्षभोजनही घालावयाला तयार झाला, तरी पाकनिष्पत्ति होऊन पक्वान्नें पानांवर पडण्याला कुशल पाकाचार्यांची व खटपट्यांची गरज लागतेच. ग्रंथकारानें कितीही परिश्रम करून एकादा ग्रंथ तयार

केला, आणि प्रकाशक छपाईचा खर्च सोसण्याला तयार झाला तरी, तो ग्रंथ जगासमोर यावयाला आधुनिक सर्व साहित्यानें युक्त व आस्थेनें काम करणाऱ्या छापखान्याची मदत मिळणें अवश्य असतें. ही मदत करण्याचें काम 'मुंबई वैभव' छापखान्याचे व्यवस्थापक रा. **भास्कर महादेव सिद्धये** यांनीं अंगावर घेतलें, आणि त्या छापखान्यांतील मंडळींनीं अगदीं थोड्या मुदतींत ग्रंथ छापून दिला, याबद्दल त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे.

शेवटीं, प्रस्तुत पुस्तकलेखनाच्या सुरवातीचा दिवस आणि तें छापखान्यांतून बाहेर पडण्याचा दिवस यांच्या दरम्यान लोटलेल्या दहा बारा वर्षांच्या काळांत, ज्या अनेक प्रकारच्या आपत्ति व अडचणी समोर उभ्या राहून माझें मन अस्वस्थ करीत होत्या, त्यांचा निरास केवळ ज्याच्या कृपेमुळेंच होऊन हें पुस्तक प्रसिद्ध झाल्याचा आनंद मला अनुभवितां आला, त्या जगच्चालक परमेश्वराला कृतज्ञतापूर्वक वंदन करून, आणि या पुस्तकांत ज्यांना जे दोष आढळतील ते त्यांनीं स्मरणपूर्वक कळवावे अशी सर्व वाचकवर्गाला विनंति करून हे दोन म्हणतां म्हणतां बरेच वाढलेले शब्द पुरे करितों.

सर्वांचा नम्र,

अनंत वासुदेव मराठे.

मुंबई,
मार्च, १९३२.

अनुक्रमणिका.

भाग १ ला.

खि. पू. ५५] (रोमन-सॅक्सन-नॉर्मन काल) [इ. स. ११५४

भाग २ रा.

इ. स. ११५४] (प्लँटॅजेनेट-लँकॅस्टर-यॉर्क काल) [इ. स. १४८५

भाग ३ रा.

इ. स. १४८५] (ट्यूडर काल) [इ. स. १६०३

भाग ४ था.


इ. स. १६०३] (स्टुअर्ट काल) [इ. स. १७१४

भाग ५ वा.

इ. स. १७१४] (हॅनोव्हर काल) [इ. स. १८३७

भाग ६ वा.

इ. स. १८३७] (व्हिक्टोरिया काल–वर्तमान काल) [इ. स. १९३१



श्रीसिद्ध लिथो वर्क्स, गिरगांव, मुंबई ४

इंग्रजांचें स्वराज्य

अथवा

इंग्लंडचा संपूर्ण इतिहास

भाग १ ला.

विषयप्रवेश

[१ स्थलनिर्देश—२ इंग्रजांचें महत्व—३ त्यांच्या राज्यपद्धतीची योग्यता—४ या ग्रंथाचा उद्देश.]

१ **स्थलनिर्देश-युरोप** खंडाचा (Europe) नकाशा समोर धरला असतां पश्चिमेच्या बाजूला **अटलांटिक** महासागरांत दोन बेटें ठळकपणें दृष्टीस पडतात. त्यांपैकीं अलीकडील बेटाला **बृहद्ब्रिटन** (Great Britain) व त्याच्या पश्चिमेकडील बेटाला **आयर्लंड** अशीं नांवें आहेत. **बृहद्ब्रिटनमध्यें इंग्लंड** (England), **वेल्स** (Wales) व **स्काटलंड** (Scotland) या तीन प्रांतांचा समावेश होतो. व **आयर्लंड** (Ireland) मध्यें **अल्स्टर** (Ulster), **लीन्स्टर** (Leinster), **मन्स्टर** (Munster) व **कनॉट** (Connought) असे चार प्रांत आहेत. युरोप खंड व **बृहद्ब्रिटन** यांचे दरम्यान '**उत्तर समुद्र**' (North Sea) आहे. व **बृहद्ब्रिटन** व **आयर्लंड** यांचेमधील समुद्राला **आयरिश समुद्र** (Irish Sea) असें नांव आहे. **इंग्लंड** हा **बृहद्ब्रिटनचा** दक्षिणेकडील भाग असून **वेल्स व स्काटलंड** हे अनुक्रमें **इंग्लंडच्या** पश्चिमेला व उत्तरेला लागून आहेत. नकाशाकडे जरा बारकाईनें पाहिल्यास **बृहद्ब्रिटन** हें बेट स्थूलमानानें उत्तर दक्षिण लंब रेषेंत असून युरोपखंडाचा भूभाग ईशान्येकडून नैऋत्येकडे निमुळता होत गेला आहे असें दिसून येईल. अशा रीतीनें युरोपचा जो भाग इंग्लंडच्या दक्षिणेस आला आहे तो **फ्रान्स** (France) देश असून **फ्रान्स** व **इंग्लंड** यांचे दरम्यान जी खाडी आहे तिला **इंग्लिश खाडी** (English Channel) असें म्हणतात. **आयर्लंड** हें बेटहि ईशान्य-नैऋत्य रेषेंत तिरकस असल्यामुळें त्या बेटाचा उत्तरेकडील भाग दक्षिणेकडील भागापेक्षां ब्रिटनच्या

अधिक जवळ आलेला आहे. **बृहद्ब्रिटनची** उत्तर दक्षिण लांबी सुमारें ६०० मैल व **आयर्लंडची** सुमारें ३०० मैल आहे.

२ इंग्रजांचें महत्वः—इंग्लंडांत '**इंग्लिश**' लोकांची, वेल्स मध्यें '**वेल्श**' लोकांची, स्काटलंडमध्यें '**स्कॉच**' लोकांची व आयर्लंडमध्यें '**आयरिश**' लोकांची जरी प्राधान्येंकरून वस्ती आहे, तरी या सर्व लोकांत निरनिराळ्या वंशांची भेसळ झालेली आहे. आणि दोन्ही बेटांतील लोकसंख्या एकत्र केली असतां त्यांत **इंग्लिश** अथवा **इंग्रजच** जास्त भरतील हें एक कारण, व दुसरें या अनेक प्रांतांपैकीं इंग्लंडचेंच महत्व सर्वांत जास्त असून इंग्लिश लोकांनींच इतर प्रांत जिंकून अगर अन्य तऱ्हेनें आपल्या प्रांतास जोडून सर्वांना समान अशा राज्यपद्धतींत समाविष्ट केल्यामुळें बाहेरील जग या दोन्ही बेटांतील लोकांना इंग्रज या सामान्य नांवानेंच जास्त ओळखतें.

३ इंग्रजांच्या राज्यपद्धतीची योग्यता—या लोकांनीं पुष्कळ कष्ट व हाल अपेष्टा सोसून आणि अनेक वेळां चुका करून व त्या त्या वेळच्या कायद्यांप्रमाणे गुन्हे करूनहि आपल्या देशांत जी राज्यपद्धति स्थापित केली आहे ती जगांतील सर्व राज्यपद्धतींत उत्कृष्ट समजली जाते. किंबहुना या लोकांचा इतिहास म्हणजे ही राज्यपद्धति स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा इतिहास होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय आज आपल्या हिंदुस्तान देशांतही याच लोकांचें राज्य चालू असून त्यांची तिकडची राज्यपद्धति व इतर प्रातिनिधिक संस्था यांचा इकडे थोड्याबहुत फरकानें पूर्वींच प्रवेश झाला आहे. आणि त्यांचा विकास अगर उत्क्रांति कोणत्या दिशेनें व्हावी याबद्दल सध्यां सर्वत्र चर्चा व वादविवाद चालू आहे. 'इंग्लंडची राज्यघटना' हा विषय आपल्या इकडच्या दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांना तर आतां आवश्यकच झाला आहे.

४ ग्रंथोद्देश—तेव्हां एवढें ज्या लोकांच्या इतिहासाचें महत्व ते लोक मूळचे कोण, त्यांचा युरोपांतल्या या बेटांत प्रवेश कसा झाला, त्यांनीं आपलें राज्य तेथें कसें स्थापन केलें, त्यांना वेळोवेळीं अंतस्थ व बाह्य शत्रूंकडून कसा कसा त्रास झाला, सर्व जगांत उत्कृष्ट म्हणून समजल्या जाणाऱ्या त्यांच्या राज्यपद्धतीच्या घटनेचा उगम कोठून कसा झाला, तिची उत्तरोत्तर वाढ कशी होत गेली, व तिची आजची स्थिती काय आहे वगैरे गोष्टींचें थोडक्यांत वर्णन करून इंग्रजांच्या इतिहासाची महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना व सामान्य वाचकांना माहिती करून द्यावी हा या पुस्तकाचा उद्देश आहे. तेव्हां प्रथमतः इंग्रज लोक या बेटांत येण्यापूर्वीं तेथील स्थिती कशी होती तें पाहूंया.

प्रकरण १ लें.

दोन हजार वर्षांपूर्वी

(...खि. पू. ५५)

[१ जुन्याकाळच्या इतिहासाचीं साधनें—२ ग्रेटब्रिटनचें जुनें नांव—आल्बियन—ब्रिटानिया—३ फार जुन्या लोकांची राहणी—त्यांचा गांव—४ हत्यारें जमीन—श्वापदें—५ धर्म—ड्रुइड—नरमेध—याज्ञिकी—मिसल्टो—६ व्यापार—७ रोमन लोकांशीं गांठ.]

१ जुन्याकाळच्या इतिहासाचीं साधनें--आज अस्तित्वांत असलेल्या जगांतील कोणत्याहि राष्ट्राचा प्राचीन इतिहास लिहिण्याच्या कामीं मुख्य अडचण म्हणजे विश्वसनीय माहितीचा अभाव ही होय. **इंग्रजां**सारख्या सुधारलेल्या लोकांसही आपल्या देशाचा जुन्या काळचा इतिहास लिहितांना ही अडचण जाणवत नाहीं असें नाहीं. पूर्वींच्या काळीं लिहिण्याची कला अस्तित्वांत नसल्यामुळें व क्वचित् अस्तित्वांत असली तरी त्यावेळीं ' साक्षर ' लोक आतांच्यासारखे शेंकड्यांनीं किंबहुना लाखांनीं मोजतां येण्यासारखे नसल्यामुळें कोणत्याहि देशाच्या प्राचीन इतिहासाच्या कामीं दंतकथा, शिलालेख, नाणीं, बखरी, पोवाडे, जुन्या लोकांच्या आठवणी व समजुती, त्यांचीं गाणीं, वगैरेंवर भिस्त ठेवल्यावांचून गत्यंतर नसतें. क्वचित् जुन्या काळच्या सुधारलेल्या देशांतील एखाद्या प्रवाशानें आपलें प्रवासवृत्त लिहून ठेवलें असल्यास अशा उपलब्ध प्रवासवृत्तावरूनहि केव्हां केव्हां प्राचीन इतिहास समजण्यास मदत होते. अशा प्रकारच्या माहितीवरून अनुमानें काढून, पौराणिक वर्णनें व अतिशयोक्ति बाजूला ठेवून व परस्पर विरोधी हकिकतींची संगति लावून महत्प्रयासानें जुन्या काळचा इतिहास तयार करावयाचा असतो. आजपर्यंतच्या संशोधनावरून दोन हजार वर्षांपूर्वीची **ब्रिटन** (Briton) बेटांतील स्थिती बऱ्याच निश्चित रीतीनें सांगतां येण्यासारखी झाली आहे ती अशी:—

२ जुनें नांव—ज्याला आज **'ग्रेट ब्रिटन'** म्हणजे बृहद्ब्रिटन असें म्हणतात त्या बेटाचा चोवीसशें वर्षांपूर्वींच्या **ग्रीस** देशांतील एका ग्रंथकारानें **' आल्बिअन '** (Albion) या नांवानें उल्लेख केला आहे. ' आल्बियन ' याचा अर्थ ' श्वेतद्वीप '

असा आहे. ' ब्रूटस् ' (Brutus) नांवाच्या एका पराक्रमी पुरुषावरून या बेटाला ' ब्रिटानिया ' (Britania) असें नांव पडलें असेंही म्हणतात व हें नांव अद्यापही प्रचारांत आहे.

३ जुन्या लोकांची राहणी—त्या काळीं या बेटांत ज्या लोकांची वस्ती होती त्यांच्या निरनिराळ्या स्वतंत्र्य टोळ्या होत्या. प्रत्येक टोळीचा एकेक ' नायक ' असे. या टोळ्यांची आपसांत नेहमीं युद्धें चालू असत. दक्षिण प्रदेशांतील म्हणजे आजच्या **इंग्लंड**च्या दक्षिण भागांतील लोक इतरांपेक्षां जरा सुधारलेले होते. ते जमिनीची मशागत करीत व शरीराच्छादनार्थ वस्त्रांचा उपयोग करीत. पण मध्य व उत्तर भागांतील लोक शुद्ध रानटी होते. रानांत शिकार करून मिळविलेल्या मांसावर उदरनिर्वाह करावा आणि मारलेल्या जनावरांच्या कातड्यांचा शरीराच्छादनाच्या कामीं उपयोग करावा, अंगावर ठिकठिकाणीं गोंदून घेऊन व एकप्रकारचा निळसर रंग फांसून शरीरें ' सुशोभित ' करावीं अशी त्यांची पद्धत असे.—(ही गोंदण्याची चाल आजही गोऱ्या शिपायांत दिसून येते)—अरण्यांतच एकादी सोईवार जागा पाहून, सभोंवतीं खंदक खणून व तोडलेल्या झाडांचा ' कोट ' करून मध्यें दहा पांच झोंपड्या बांधल्या कीं त्यांचा गांव वसला !

४ हत्यारें, जमीन वगैरे—कोणत्याहि देशांतील प्राचीन काळच्या लोकांप्रमाणेंच हे लोक शूर व काटक होते. ढाल, तरवार, बरची वगैरे हत्यारांचा उपयोग करण्यास ते पुढें पुढें शिकले होते. त्यांच्यांत युद्धरथही होते. व त्या रथांच्या कण्यांना कोयत्या बसविलेल्या असत. सर्व प्रदेशभर जिकडे तिकडे मोठमोठीं जंगलें असून अस्वल, लांडगे, रानडुकर वगैरे श्वापदांचीं तीं निवासस्थानें होतीं. दुसरे कित्येक भाग नेहमीं दलदलीनें आच्छादिलेले असत.

५ धर्म—धर्मसंबंधानें पाहिलें असतां हे ' ब्रिटन ' लोक मूर्तिपूजकच होते. ' ओक ' (Oak) नांवाच्या वृक्षाला ते फार पूज्य मानीत. या ओक वृक्षांच्या राईतच त्यांचे धर्मविधि होत असत. ' आत्मा अमर आहे व मरण म्हणजे आत्म्याची देहांतर प्राप्ति ' असें ते मानीत. त्यांच्यांतील ब्राह्मण वर्गाला ' ड्रुइड ' (Druid) असें नांव होतें. त्यांच्याकडे याज्ञिकीचा व न्यायाधिशाचाहि अधिकार असे. देवांची भक्ति करावी, माणसांवर दया करावी असा उपदेश ते करीत. आपल्या देवतांना संतुष्ट करण्यासाठीं ते पशूंना बळी देत. नरमेध म्हणजे माणसांना बळी देण्याचीही त्यांच्यांत रूढि होती.

लढाईंत धरून आणलेल्या कैद्यांना अगर गुन्हेगार ठरलेल्या आपल्याच टोळींतील इसमांना ते मोठ्या समारंभानें बळी देत. ' ओक ' वृक्ष व त्यावर उगवणारें ' **मिसलटो** ' (mistletoe) नांवाचें बांडगूळ यांना ते फार पवित्र मानीत. एकाद्या ओक वृक्षावर हें बांडगूळ उगवलेलें दिसलें कीं त्यांच्या टोळींत जो प्रमुख ' **ड्रुइड** ' असे तो आपल्या टोळींतील सर्व लोकांना वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर (त्यांची ही वर्षप्रतिपदा हिंदू लोकांच्या वर्षप्रतिपदेच्या सुमारालाच येत असे.) एकत्र जमवून मोठ्या समारंभानें तें बांडगुळ विधिपूर्वक तोडीत असे. नंतर दोन पांढऱ्या बैलांचा बळी देऊन आपल्या टोळींतल्या लोकांच्या आरोग्यप्राप्तीबद्दल परमेश्वर-प्रार्थना होत असे. नाताळांत ' हरितपर्णां'नीं (Green Leaves) घरेंदारें सुशोभित करण्याच्या ख्रिश्चन लोकांच्या हल्लींच्या चालीचा उगम या जुन्या काळांतील जुन्या विधींतच आहे असें म्हणतात.

६ **व्यापार**—वर सांगितलेंच आहे कीं या **ब्रिटन** लोकांपैकीं दक्षिणेकडील लोक जरा सुधारलेले होते. त्यांचा त्यावेळच्या इतर देशांतील, मुख्यत्वेंकरून त्यांना जवळ असलेल्या ' **गाल** ' (Gaul) म्हणजे ' हल्लींच्या ' **फ्रान्स** ' देशांतील ' **गाल** ' लोकांशीं थोडा व्यापारहि चालत असे. लोखंड, कथील, तांबें, कुत्रे व कातडीं हे जिन्नस ते बाहेर देशीं पाठवीत व मीठ, पितळ व मातीचीं भांडीं हे जिन्नस बाहेरून ते आपल्या देशांत आणीत. गुलाम विकण्याचीहि पद्धति त्यांच्यांत चालू होती.

७ **रोमन लोकांशीं गांठ**—अशा रीतीनें या ' **ब्रिटानिया** ' च्या ' **ब्रिटन** ' लोकांची कालक्रमणा चालली असतां इ० स० च्या पूर्वी ५५ व्या वर्षी दैवयोगानें या लोकांची **युरोप** खंडांतील त्यावेळच्या अति बलाढ्य व सुधारलेल्या **रोमन** (Roman) लोकांशीं गांठ पडली. **रोमन** लोकांशीं आलेल्या या संबंधामुळें **ब्रिटन** देशांत कोण कोणत्या इष्टानिष्ट गोष्टी घडून आल्या त्या पुढील प्रकरणांत सांगूं.

प्रकरण २ रें

रोमन लोकांचा अंमल.

(ख्रि. पू. ५५—इ. स. ४२६)

[१ रोमन राष्ट्राचा उदय—त्यांचें साम्राज्य—जगत्स्वामिनी—ख्रि. पू. पहिलें शतक—२ ज्यूलियस—सीझर—गॉल व ब्रिटन—सीझरची पहिली स्वारी—३ सीझरची दुसरी स्वारी—ब्रिटनांचा पराभव—सीझरचें प्रयाण—४ इ. स. ४३—रोमन लोकांच्या पुन्हां स्वाऱ्या—त्यांचे विजय—५ आग्रिकोला—त्याचा पराक्रम—६ त्याच्या कारकीर्दीतील विशेष—७ब्रिटनांचीं बंडें—८ रोमन बादशहा हेड्रियन—त्याचा तट—९ लोलियस अरबिकस—१० सेव्हरस—त्याची कामगिरी व मृत्यु—११ साक्सन लोक—१२ काराशियसचें बंड—त्याचा अंमल—१३ कान्स्टंटानियस—हेलिना—१४ स्काटलोक—त्यांच्या स्वाऱ्या—१५ माक्झिमस—त्याची महत्वाकांक्षा—१६ स्टिलिको—१७—१८ रोमन अंमलाचें सिंहावलोकन—त्यांची राज्यपद्धति—लष्कर—१९ रोमन लोकांचें प्रयाण—२० ब्रिटन लोकांची दुर्बलता—२१ अखेरचा निरोप—२२ नंतर.]

१ रोमन राष्ट्राचा उदय—प्राचीनकाळीं **युरोप** खंडांत अत्यंत उत्कर्षास चढलेल्या परन्तु आज नामशेष झालेल्या राष्ट्रांत '**रोम**' (Rome) ची प्रामुख्यानें गणना होते. युरोपखंडाच्या दक्षिणेस जीं तीन द्वीपकल्पें दिसतात त्यांपैकीं मधल्या द्वीपकल्पाचें नांव '**इटली**' (Italy) असें असून त्याची राजधानी '**रोम**' नामक शहर आहे. या रोम शहराच्या आसपासच्या प्रदेशांतच प्राचीन काळीं रोमन राष्ट्राचा उदय होऊन कालें करून रोमन लोकांचें बलाढ्य राष्ट्र बनलें, व त्यांनीं त्यावेळीं माहित असलेल्या सर्व युरोपखंडभर व जवळच्या **आफ्रिका** खंडाच्याहि कित्येक प्रांतांत दिग्विजय मिळवून आपलें साम्राज्य स्थापिलें. रोम नगरीला त्यावेळीं 'जगत्स्वामिनी' (Mistress of the world) असें नांव प्राप्त झालें होतें. चौदा विद्या, चौसष्ट कलांचें रोम अधिष्ठान होतें. रोमन सरदार दूरदूरच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून अगणित संपत्ति आपल्या देशांत आणीत असत. आणि जिंकलेल्या प्रांतांवर राज्य करण्याकरितां '**रोमन बादशहा**' (Emperor) **गव्हर्नरांची** (Governor) नेमणूक करीत असत. इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत पूर्वेस काळा समुद्र (Black

sea) व पश्चिमेस **अटलांटिक** (Atlantic) महासागर यांमधील ‘ सागरान्त ’ पृथ्वीचें राज्य रोमन लोकांच्या हातीं होतें.

२ ज्यूलियस सीझर—अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील ‘ **गाल** ’ म्हणजे हल्लींच्या ‘ **फ्रान्स** ’ या देशावर ख्रिस्ती शकापूर्वी ५५।५६ या वर्षी ‘ **ज्यूलियस सीझर** ’ (Julius Caesar) या नांवाचा महत्वाकांक्षी व पराक्रमी पुरुष ‘ गव्हर्नर ’ च्या जागेवर होता. तो उत्तम सेनानी असून त्या बाजूच्या सर्व रोमन सेनेचें आधिपत्यहि त्याच्याचकडे होतें. ‘ **गाल** ’ देश ब्रिटनच्या जवळ असल्यामुळें त्या देशांतील लोकांचें **ब्रिटन** लोकांशीं दळणवळण होतें हें मागें सांगितलेंच आहे शिवाय ‘ **गाल** ’ लोक व ‘ **ब्रिटन** ’ लोक हे मूळचे एकाच वंशांतले असल्यामुळें त्यांचा परस्परांकडे ओढा असणेंहि साहजिक होतें. यामुळें ‘ **सीझर** ’चें ‘ **गाल** ’ लोकांशीं युद्ध सुरू असतां **ब्रिटन** लोकांनीं आपल्या भाऊबंदांना शक्य तितकी मदत केली होती. पुढें **गाल** लोकांचा पराभव होऊन सर्व **गाल** देश **सीझर**च्या ताब्यांत आल्यावर ‘ **गाल** ’ चे ‘ दोस्त ’ (allies) जे ‘ **ब्रिटन** ’ त्यांच्यावर स्वारी करून त्यांना चांगली जरब बसविण्याचा **सीझर**नें निश्चय केला व इ. स. पूर्वी ५५ व्या वर्षाच्या आगष्ट महिन्यांत तो बाराहजार सैन्यानिशीं गलबतांतून **ब्रिटन**च्या किनाऱ्यावर ‘ **डील** ’ (Deal) नामक बंदरीं येऊन दाखल झाला. ब्रिटन लोकांनींहि आपलें सैन्य जमवून किनाऱ्यावरच **रोमन** लोकांशीं निकराची लढाई केली; परंतु रोमन लोकांचा पराक्रम व विशेषेंकरून त्यांची शिस्त यांच्यापुढें त्यांचा टिकाव लागेना, व लवकरच त्यांना **सीझर**ला शरण जाणें भाग पडलें. पुढें थोडे दिवस **ब्रिटन**मध्यें राहून ब्रिटन देश आपला ‘ अंकित ’ झाल्याचें त्या लोकांकडून कबूल करून घेतल्यावर ब्रिटनांचे थोडेसे लोक ओलीस घेऊन **सीझर** गाल देशाला परत गेला.

३ सीझरची दुसरी स्वारी—पण **सीझर**ची पाठ फिरल्याबरोबर **ब्रिटन** लोकांनीं पुन्हां उचल खाल्ली. तेव्हां पुढल्या म्हणजे इ. स. पूर्वी ५४ व्या वर्षी सीझरनें ८०० गलबतांतून तीस हजार पायदळ व दोन हजार घोडेस्वार पुन्हां **ब्रिटन**च्या किनाऱ्यावर उतरले. यावेळीं **ब्रिटन** लोकांच्या अनेक टोळ्या एकत्र होऊन ‘ **कासिव्हेलानस** ’ (Cassivelanus) नामक सरदाराच्या आधिपत्याखालीं त्यांनीं सीझरच्या लोकांशीं निकरानें सामना केला; परंतु **सीझर**नें त्यांचा पराभव करून त्यांना ‘ **तेम्स** ’ (Thames) नदीपलीकडे हांकून लाविलें, व ‘ **वेरुलामियम** ’

(Verulamium) नांवाचा त्यांचा मुख्य किल्ला जमीनदोस्त करून टाकला. किनाऱ्यावरील आरमारी सैन्याशींही **ब्रिटनां**नीं झटापट करून पाहिली, परंतु कोठेंच निभाव लागेना. म्हणून अखेरीस त्यांनीं **सीझरशीं** तहाचें बोलणें लाविलें, व **सीझरला**हि तेथें रहाण्यास फुरसत नसल्यामुळें त्यानें मोठी खंडणी व प्रमुख प्रमुख लोक ओलीस घेऊन सर्व सैन्यानिशीं परत **गाल**चा रस्ता सुधारला.

४ इ. स. ४३—यानंतर सुमारें ९० वर्षें पर्यंत **ब्रिटन** लोकांना **रोमन** लोकांकडून उपसर्ग झाला नाहीं. पुढें इ० स० च्या ४३ व्या वर्षापासून **रोमन** सेनापति पुन्हां **ब्रिटन**वर हल्ले करूं लागले. प्रत्येक खेपेला **ब्रिटन** लोकांतील कोणीतरी वीर पुढे होऊन त्याच्या आधिपत्याखालीं ते लोक **रोमन** लोकांशीं टक्कर देत. परंतु त्यांच्या वांटचाला यश असें क्वचितच येत असे. दर खेपेला थोडीशी चकमक झडे; पण **रोमन** सैन्याच्या शिस्तीपुढें **ब्रिटनां**च्या नुसत्या शौर्याचा निभाव न लागून त्यांना हळू हळू मागें हटावें लागे. अशा रीतीनें जिंकलेल्या प्रांतावर आपल्यापैकीं कोणीतरी अधिकारी नेमून व त्याच्या संरक्षणासाठीं कांहीं सैन्य ठेवून **रोमन** सेनापति परत जात. हे अधिकारी चांगले असले तर कांहीं काळ शांतता राही; पण एखादा अधिकारी विजयमदानें धुंद होऊन जुलूम करूं लागला व **रोमन** लोकांचें संख्याबल कमीसें दिसलें, म्हणजे **ब्रिटन** लोक पुन्हां आपली जमवाजमव करून त्यांच्यावर हल्ले करीत. इतक्यांत **रोम**मधून पुन्हां कोणीतरी 'गव्हर्नर' येऊन त्यांचा पराभव करी, त्यांना अरण्यांत पिटाळून लावी, व आणखी थोडासा प्रांत **रोमन** अमलाखालीं आणी.

५ ॲग्रिकोला—अशा रीतीनें जे **रोमन** गव्हर्नर अगर सुभेदार ब्रिटनवर सत्ता गाजवून गेले त्यांत '**जूलियस आग्रिकोला**, (Julius Agricola) हा फार पराक्रमी व शहाणा होता. इ. स. ७८ या वर्षीं त्याची नेमणूक होऊन राज्याधिकार त्याच्या हातीं आल्यावर पहिल्या दोन वर्षांत त्यानें उत्तरेस '**ट्वीड**' (Tweed) नदीपर्यंतचा मुलूख आपल्या सत्तेखालीं आणिला. सन ८१ या वर्षीं त्यानें त्याच्याहि पुढें जाऊन पूर्वपश्चिम '**फोर्थ**'(Forth)च्या आखातापासून '**क्लाइड**'(Clyde)च्या आखातापर्यंत मजल मारिली. व त्या ठिकाणीं मोठमोठे किल्ले बांधले. पुढें हळू हळू '**ग्रांपियन** (Grampian) पर्वताच्या पायथ्यापर्यंत प्रवेश करून इ. स. ८४ या वर्षीं **स्काटलंडांतील** रानटी लोकांचा पुढारी '**गालग्याकस**' (Galgacus) याचा त्यानें '**आरडॉक**' (Ardoc)-

च्या लढाईत पराभव केला. याच सुमारास '**रोमन**' जहाजांनीं समुद्रांतून '**ब्रिटन**'च्या सभोंवार प्रदक्षिणा घातली व '**ब्रिटन**' हें 'बेट' आहे असा शोध लावला ! असो.

६ ॲग्रिकोलाच्या कारकीर्दींतील विशेष गोष्टी—आग्रिकोला हा गव्हर्नर जसा शूर होता तसाच तो चांगला राजकारस्थानीहि होता. त्यानें 'रोमन ब्रिटन' (म्हणजे ब्रिटनचा जेवढा मुलूख रोमन लोकांच्या अमलाखालीं आला होता तेवढा भाग) मध्यें चांगल्या चांगल्या **रोमन** कायद्यांचा अंमल चालू केला, लोकांना न्यायानें वागविलें, मोठमोठीं देवळें व वाडे बांधिले, **ब्रिटन** लोकांना **रोमन** भाषा शिकवून त्यांच्यांत ज्ञानाचा प्रसार केला, शेतकी व कलाकौशल्याला उत्तेजन दिलें, व एकंदरींत **ब्रिटन** लोकांना स्वातंत्र्यनाशाचे विस्मरण पाडून रोमन अंमलच आपल्यावर असावा अशी भावना त्यांच्यांत उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. पुष्कळ **ब्रिटन** लोक **रोमन** भाषा शिकले व रोमन लोकांच्या चालीरीती व त्यांचा पोषाख हींही त्यांनीं लौकरच उचलली.

७ ब्रिटनांचीं बंडें—ॲग्रिकोलाच्या मागून एक दोन 'गव्हर्नर' येऊन गेले; परंतु त्यांच्या कारकीर्दींत विशेष सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. उत्तरेकडील '**स्काटलंड**' मधले रानटी लोक व आपल्या मुलखांत हे 'परकी रोमन' लोक घुसून त्यांनीं आपलें स्वातंत्र्य हरण केलें म्हणून रागावलेले पण नाइलाजानें अरण्याचा आश्रय करून राहिलेले कांहीं **ब्रिटन** लोक हे मधून मधून 'रोमन ब्रिटन' वर स्वाऱ्या करीत; पण शांततेंत कालक्रमणा करणाऱ्या **ब्रिटनांना** व त्यांच्यावर अधिकार चालविणाऱ्या **रोमन** अधिकाऱ्यांना थोडावेळ त्रास देण्यापलीकडे त्यांच्या हातून जास्त कांहीं होत नसे.

८ हेड्रियन—इ० स० १२० या वर्षीं रोमन बादशाहा '**हेड्रियन**' (Hadrian) यानें **ब्रिटनला** 'भेट' दिली. त्यावेळीं त्यानें **स्काटलंड**च्या रानटी '**कालेडोनियन**' (Caledonian) लोकांना मागें हटवून '**सालवे**' (Salway) चें आखात व '**टाइन**' (Tyne) नदी यांचे दरम्यान एक मजबूत तट बांधला व त्याला '**हेड्रियनचा तट**' (Hadrian's Wall) असें नांव दिलें.

९ लोलियस अरबिकस—इ० स० १३९ या वर्षीं '**लोलियस अरबिकस**' (Lollius Urbicus) या नांवाचा 'गव्हर्नर' **ब्रिटनवर** अंमल

गाजवीत होता. त्यानें '**आग्रिकोला**' यानें बांधलेले किल्ले दुरुस्त केले. व त्या किल्ल्याच्या रांगांस त्यावेळचा रोमन बादशहा '**आंटोनियस**' (Antonius) म्हणून होता त्याचें नांव दिलें.

१० सेव्हरस—इ. सन २०८ या वर्षी '**सेव्हरस**' (Severus) या नांवाचा वृद्ध रोमन बादशहा **ब्रिटन**मध्यें आला. त्यानें उत्तेरकडील '**कालेडोनियन**' लोक **ब्रिटन**ला वारंवार त्रास देतात म्हणून उत्तेरकडील घोर अरण्यांतून त्यांच्या प्रदेशावर स्वारी केली, व पुष्कळ लढायांत त्यांचा पराजय करून परत येतांना 'हेड्रियन' चा तट त्यानें दुरुस्त करविला व नवे किल्ले बांधिले. पुढें लौकरच हा बादशहा इ० स० २११ या वर्षी ब्रिटनमध्येंच '**यार्क**' (York) जिल्ह्यांत मरण पावला. पुढें बरींच वर्षेपर्यंत ब्रिटन लोकांना उत्तेरकडील रानटी लोकांकडून उपद्रव झाला नाहीं.

११ साक्सन लोक—पण पूर्व किनाऱ्यावरच्या **ब्रिटन** लोकांना आतां एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला होता. मागें सांगितलेंच आहे कीं, **ब्रिटन** व **युरोप** खंड यांच्यामध्यें 'उत्तर समुद्र' या नांवाचा समुद्र आहे. या समुद्राच्या दुसऱ्या बाजूस म्हणजे इंग्लंडच्या समोरील युरोपखंडाच्या भागीं हालंड, (Holland) बेल्जम, (Belgium) जर्मनी, (Germany) डेन्मार्क (Denmark) वगैरे देश येतात. या प्रदेशांतून त्यावेळीं '**साक्सन**' (Saxon) नांवाच्या जातीचे लोक रहात असत. हे लोक त्यावेळीं नाविक विद्येंत बरेच प्रवीण होते. त्यांनीं आतां ब्रिटनच्या पूर्व किनाऱ्यावर हल्ले करण्यास सुरवात केली. तेव्हां या '**साक्सन**' चांचे लोकांचा बंदोबस्त करण्यासाठीं ब्रिटनच्या रोमन राज्यकर्त्यांना स्वतंत्र अधिकाऱ्याची योजना करावी लागली.

१२ काराशिअसचें बंड—या जागेवर ज्याची पहिल्यानें नेमणूक झाली त्या रोमन अधिकाऱ्याचें नांव '**काराशिअस**' (Caracius) असें होतें; पण त्यानें चांच्यांचा बंदोबस्त करण्याचें एकीकडे ठेवून त्यांजकडून लांच घेऊन त्यांना खुशाल धुडगूस घालूं दिला. हें त्याचें कृत्य पुढें उघडकीस येऊन त्याजबद्दल जाब देण्यासाठीं रोमन गव्हर्नरनें त्याला आपल्यासमोर बोलाविलें. परंतु आपल्यावर आरोप शाबीत होऊन शिक्षा होणार अशी त्याची खात्री असल्यामुळें त्यानें उलट बंड करून रोमन गव्हर्नराचा अधिकार झुगारून दिला व आपणच ब्रिटनचा बादशहा बनला ! त्यानें आपल्या मुलुखांतील प्रजेला चांगल्या रीतीनें वागविलें. पुढें इ०

स० २९३ या वर्षीं त्याचा प्रधान ' **आलेक्टस** ' (Alectus) यानेंच त्याचा खून केला व आपण गादी बळकावली.

१३ कान्स्टंटानियस—इ. स. २९६ या वर्षीं रोमचा बादशाहा '**कान्स्टंटानियस**' (Constantanius) हा स्वतः ब्रिटनमध्यें आला. त्याची व '**आलेक्टस**' याची लढाई होऊन '**आलेक्टस**' लढाईंत मारला गेला व ' ब्रिटन ' देश पुन्हां रोमन साम्राज्याचा भाग बनला. या '**कान्स्टंटानियस**' बादशहानें **ब्रिटनमधील** एका सरदाराची मुलगी '**हेलिना**' (Helina) इच्याशीं लग्न केलें. पुढें इ. स. ३०६ या वर्षीं तो **ब्रिटनमध्येंच यार्क** जिल्ह्यांत मरण पावला. त्याच्यामागून त्याचा मुलगा '**कान्स्टंटाइन**' (Constantine) हा रोमचा बादशहा झाला.

१४ स्काट लोक—या सुमारास आयर्लंडच्या उत्तरेकडील भागांत '**स्काट**' (Scot) या नांवांचे लोक होते. त्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या ब्रिटनच्या उत्तरेकडील भागांत म्हणजे '**कालेडोनियन**' लोकांच्या प्रांतांत येऊन वसाहती करूं लागल्या आणि हे लोक व तेथले मूळचे लोक मिळून पुन्हां ब्रिटनवर स्वाऱ्या करूं लागले. त्यांनीं पुष्कळ वर्षेंपर्यंत ब्रिटन लोकांना बराच त्रास दिला. एकदां तर ते खुद्द **लंडन** (London) शहरापर्यंत आले होते. पण पुढें '**माक्झिमस**' (Maximus) नांवाच्या रोमन सरदारानें मोठ्या शौर्यानें त्यांच्याशीं लढून त्यांना परत आपल्या प्रांतांत हांकून लाविलें.

१५ माक्झिमस—हा **माक्झिमस** सरदार मोठा महत्वाकांक्षी होता. त्याला ब्रिटनचा नुसता ' गव्हर्नर ' होऊन राहण्यापेक्षां साधल्यास आपण स्वतंत्र राज्य स्थापून बादशहा व्हावें असें वाटून **ब्रिटन** लोकांच्या मदतीनें त्यानें **गाल** प्रांतावर स्वारी केली; परंतु तेथल्या रोमन सैन्यापुढें त्याचा टिकाव न लागून त्याचा पराभव झाला, व **गाल**च्या गव्हर्नरानें त्याला देहान्त प्रायश्चित्त दिलें !

१६ स्टिलिको—इकडे **माक्झिमस** ब्रिटन सोडून बाहेर गेला ही संधि साधून उत्तरेकडील '**स्काट**' व '**पिक्ट**' (Pict) लोक पुन्हां ब्रिटनवर हल्ले करूं लागले. परंतु इ० स० ३९६ या वर्षीं '**होनोरियस**' (Honorius) बादशाहानें '**स्टिलिको**' (Stilico) नांवाच्या सरदाराला ब्रिटनमध्यें पाठवून त्यांचा बंदो-

ध्वस्त केला. ' **स्टिलिको** 'नें उत्तम प्रकारचा बंदोबस्त ठेवून ब्रिटनमध्यें 'सुराज्य' (Good Government) स्थापित केलें.

१७ रोमन अंमलाचें सिंहावलोकन—ब्रिटनवर रोमन लोकांचा अंमल सुरू होऊन आतां सुमारें ४०० वर्षे होत आलीं होतीं. **रोमन** लोक हे त्या काळीं चांगले सुधारलेले म्हणून गणले जात असत. व ते जातील तेथें तेथें त्यांनीं आपली सुधारणा बरोबर नेली होती. ब्रिटनमधील त्यांचीं पहिलीं कांहीं वर्षें साहजिकच स्थिर-स्थावर करण्यांत गेलीं. पण पुढें ' जित ' (The conquered) लोकांची सुधारणा करण्याकडे त्यांनीं आपलें लक्ष लाविलें. त्यांनीं मोठमोठीं शहरें वसविलीं, व्यापार व कलाकौशल्य यांना उत्तेजन दिलें, एका शहरापासून दुसऱ्या शहरीं जाण्याला चांगले प्रशस्त रस्ते केले, जंगलें तोडून जमीन लागवडीस आणली, शहरांतून न्यायमंदिरें, सार्वजनिक प्रार्थनेच्या जागा, नाटकगृहें व स्नानगृहें बांधिलीं आणि उत्कृष्ट प्रकारचें सैन्य ठेवून लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण करण्याची त्यांनीं तजवीज केली. एकंदरींत ' **ब्रिटन** 'चें परशत्रूपासून रक्षण होऊन शांततेच्या काळांत वाढणाऱ्या धंद्यांना उत्तेजन मिळत गेल्यामुळें स्वातंत्र्यनाशामुळें उत्पन्न झालेला उद्वेग व संताप कमी कमी होत जाऊन रोमन लोकांचें राज्य म्हणजे अगदीं ' रामराज्य ' नसलें तरी एकंदरींत सुख व शांति यांचें राज्य आहे असें **ब्रिटन** लोकांना वाटूं लागलें.

१८ यावेळीं **ब्रिटन** लोकांचा जो मुलूख रोमन लोकांच्या अंमलाखालीं आला होता त्याचे सहा भाग केलेले असून प्रत्येक भागावर एकएक छोटा ' गव्हर्नर ' नेमलेला असे. व या सर्वांवर मिळून ' **व्हिकारियस** ' (Vicarius) या पदवीचा एक मुख्य अंमलदार असून हे बडे लाट साहेब गालमधील ' राजप्रतिनिधी '-(Viceroy) चे अंकित असत. कारण त्यावेळीं **रोमन** साम्राज्याच्या बादशहाचें मुख्य ठाणें जरी **रोम**मध्यें असे, तरी साम्राज्याच्या पश्चिमेकडील मुलुखांत **गाल**-मध्येंहि त्यांची दुय्यम राजधानी असून तेथें बादशहाचा प्रतिनिधी रहात असे. **ब्रिटन**च्या बंदोबस्तासाठीं वीस हजार लष्कर नेहमीं तयार असे. व हे शिपाई तीन निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं वांटून दिलेले असत.

१९ रोमन लोकांचें प्रयाण—अशा रीतीनें **ब्रिटन**चा राज्यकारभार **रोमन** अंमलदारांकडून सुरळीत चालला असतां तिकडे खुद्द **रोम**चें सरकार मात्र कालवशात् दुबळें होत चाललें होतें. साम्राज्याचा पसारा फार वाढल्यामुळें सर्व प्रांतां-वर सारखें लक्ष ठेवतां येत नसे. व युरोपच्या मध्य भागांतील ' **गॉथ** ' (Goth)

वगैरे रानटी लोक प्रबळ होऊन जिकडून तिकडून रोमन प्रांतावर स्वाऱ्या करूं लागले होते. शेवटीं त्यांची धाड खुद्द राजधानीवर येऊन ठेपली, तेव्हां 'शीर सलामत तर पगडी पचास' या म्हणीप्रमाणें आपलें घर राखण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांतील **रोमन** सरदारांना रोममध्यें बोलावून आणणें जरूर पडलें. त्याप्रमाणें इ० स० ४१० या वर्षीं रोमन बादशहा 'होनोरियस' (Honorius) यानें **ब्रिटन**मधील सर्व रोमन सैन्याला रोममध्यें परत बोलाविलें. आणि 'तुम्ही आतां स्वतंत्र आहां, आपला राज्यकारभार वाटेल तसा चालवा' असा ब्रिटन लोकांना निरोप पाठविला.

२० ब्रिटन लोकांची दुर्बलता—परंतु रोमन लोकांच्या शांततेच्या अंमलाखालीं ब्रिटन लोकांचे इतर कितीहि फायदे झाले असले तरी दोन तीनशें वर्षांत हातांत शस्त्र धरण्याचे प्रसंग क्वचितच आल्यामुळें ब्रिटन लोकांचें क्षात्रतेज मावळलें होतें. तेव्हां **रोमन** सैन्य अशा अचानक रीतीनें निघून गेल्यामुळें उत्तरेकडील **पिक्ट** व **स्काट** या त्यांच्या शत्रूंच्या हल्ल्यापुढें ते अगदीं मेटाकुटीस आले व रोमच्या बादशहाला 'तुम्ही येऊन आमचें संरक्षण करा' अशी त्यांना याचना करावी लागली.

२१ अखेरचा निरोप—पण रोमच्या बादशहाला या वेळीं पुरेसें सैन्य पाठविण्यास सवड कोठें होती? त्यानें मोठ्या शिकस्तीनें सहा हजार सैन्य पाठवून दिलें. या लोकांनीं येऊन ब्रिटनांच्या उत्तरेकडील शत्रूंस परत पिटाळून लाविलें, सरहद्दीवरील तटबंदी दुरुस्त करविली, व ब्रिटन लोकांना थोडेंसें लष्करी शिक्षण देऊन सन ४२६ यावर्षीं ब्रिटन बेटाचा अखेरचा निरोप घेतला!

२२ नंतर—**रोमन** लोक या बेटाला कायमचा रामराम ठोकून निघून गेल्यानंतर **पिक्ट** व **स्काट** लोकांचें चांगलेंच फावलें. त्यांतच **ब्रिटन**लोक आपापसांत भांडूं लागले. याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. 'दोघांचें भांडण व तिसऱ्याचा फायदा' या म्हणीप्रमाणें तिसऱ्याच एका लोकांचा ब्रिटनमध्यें प्रवेश होऊन मूळचे **ब्रिटन** लोक देशोधडीस लागले!

प्रकरण ३ रें.

इंग्रजांचा प्रवेश.

(इ. स. ४२६–इ. स. ४५०)

[१ आर्यलोक—त्यांच्या वसाहती—२ जूट आंग्ल व साक्सन—३ ब्रिटनमधील बंडाळी—४ इ. स ४२९—५ दोनपक्ष—६–७ आंब्रायसस आणि व्हार्टिजर्न—रोमन अधिकाऱ्याला निमंत्रण व त्याचा नकार—८ आंग्ल–साक्सनांचें वर्णन—९ हेंजिस्ट आणि होर्सा—१० त्यांचें आगमन—११ साक्सनांची पहिली वसाहत—अँग्लो-साक्सन—इंग्रज.]

१ आर्यलोक—अर्वाचीन इतिहाससंशोधकांच्या शोधावरून असें सिद्ध झालें आहे कीं, फार प्राचीन काळीं अगदीं उत्तर ध्रुवा (North Pole) च्या आसपास '**आर्य**' लोकांची वस्ती होती. त्या ठिकाणीं पुढें हिमप्रलय होऊन हे लोक दक्षिणेकडे खालीं उतरले ते **मध्य आशियांत** (Middle Asia) आले. पुढें हळू हळू त्यांच्या निरनिराळ्या शाखा पूर्वेकडे व पश्चिमेकडे पसरत चालल्या. पूर्वेकडील शाखा इराणांतून अफगाणिस्थानच्या मार्गानें हिंदुस्थानांत आली. व पश्चिमेकडील शाखेचे लोक तसेच पुढें जात जात **युरोप**खंडांतून **अटलांटिक** महासागराच्या किनाऱ्यापर्यंत पोहोंचले. त्यांची ज्या ज्या ठिकाणीं वस्ती झाली त्या त्या ठिकाणच्या मूळच्या लोकांशीं त्यांचें मिश्रण होऊन आधुनिक राष्ट्रें बनलीं आहेत.

२ जूट–आंग्ल–साक्सन—आम्ही ज्या काळची हकीकत सांगत आहों त्या काळीं या आर्य लोकांच्या पश्चिमेकडे गेलेल्या टोळ्या अटलांटिक महासागरापर्यंत पोंचल्या असून हल्लीं **स्वीडन** (Sweden), **नार्वे** (Norway), **डेन्मार्क, जर्मनी, हालंड, बेल्जम, फ्रान्स** वगैरे राष्ट्रें ज्या भूभागावर वसलीं आहेत, त्या प्रदेशांतून त्यांच्या वसाहती झालेल्या होत्या. पैकीं **जर्मन** प्रांतांत '**ज्यूट**' (Jute) '**आंग्ल**' (Angle) **व** '**साक्सन**' (Saxon) या तीन जातींची वसाहत होती. हे लोक चांगले दर्यावर्दी असून त्यांनीं **ब्रिटनच्या** पूर्व व दक्षिण किनाऱ्यांवर हल्ले करण्यास आरंभ केला होता, व त्यांचा बंदोबस्त

करण्यासाठीं रोमन राज्यकर्त्यांना एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी लागली होती हें मागें सांगितलेंच आहे. असो.

३ **ब्रिटनमधील बंडाळी**—मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **रोमन** लोक **ब्रिटन**मधून अचानक निघून गेल्यानंतर **ब्रिटनम**ध्यें बंडाळी माजून ज्याच्या मनगटांत जितका जोर असेल तितका तो आपलें स्वतंत्र राज्य स्थापूं लागला. निरनिराळ्या शहरांचीं छोटीं संस्थानें बनलीं. उत्तरेकडील **पिक्ट** व **स्काट** लोकांच्या स्वाऱ्या होत होत्या, त्यांचा बंदोबस्त करण्याचें एकीकडे राहून हे छोटे राजे आपापसांत भांडूं लागले. त्यामुळें शत्रूंना आयतीच संधी सांपडली व ते वाटेल तशी लुटालूट करूं लागले.

४ **इ. स. ४२९**—इ० स० ४२९ या वर्षी **गाल** देशांतील '**जर्मानस**' (Germanus) या नांवाचा एक धर्माधिकारी **ब्रिटन**मध्यें आला होता. त्याच्या उपदेशानें एकदां **ब्रिटन** लोकांनीं आपसांत जूट करून **पिक्ट** लोकांना पिटाळून लाविलें व थोडे दिवस शांतता उपभोगिली. पण ही स्थिती फार वेळ टिकली नाहीं. लवकरच पुन्हां स्पर्धा सुरू झाली, मतभेद बळावले, व भांडणाला सुरवात झाली.

५ **दोन पक्ष**—यावेळीं दक्षिणेकडील **ब्रिटनां**मध्यें मुख्य दोन पक्ष उत्पन्न झाले होते. **रोमन** लोकांच्या अमदानींत कित्येक गरीब **रोमन** कुटुंबें **ब्रिटन**मध्यें कायमची वस्ती करून राहिलीं होतीं. हे लोक राज्यकर्त्यांच्या जातीचे म्हणून त्यांना साहजिकच देशांत मान मिळत असे. तसेंच ज्या कित्येक श्रीमंत **ब्रिटन** लोकांनीं **रोमन** चालीरीती उचलल्या होत्या त्यांचें सरकारदरबारीं इतरांपेक्षां जास्त वजन असून ते आपल्या गरीब देशबंधूंना ते ' बिन सुधारलेले ' म्हणून तुच्छ मानीत असत. उलटपक्षीं रोमन हे कितीही झालें तरी ' परकी लोक ' (Foreigners) त्यांनीं आपलें स्वातंत्र्य हिरावून घेतलें व आपणांस गुलामांच्या पंक्तीस बसविलें म्हणून मनांत जळफळणाऱ्या लोकांचा एक वर्ग होता. या वर्गातील लोकांच्या मनांतून साधल्यास ब्रिटन देश पुन्हां ' निरोमन ' करण्याचा विचार होता !

६ **आम्ब्रायसस—व्हार्टिजर्न**—पहिल्या पक्षाचें आधिपत्य '**आम्ब्रायसस**' (Ambroisus) नांवाच्या रोमन गृहस्थाकडे होतें व दुसऱ्या पक्षाचा पुढारी ' **व्हार्टिजर्न** ' (Vortigern) नामक **ब्रिटन** होता. या दोन्ही पक्षांची बरेच दिवस आपसांत लठ्ठालठ्ठी चालली होती. परंतु या आपसांतील भांडणामुळें आपण आयतेच **पिक्ट** लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडतों ही गोष्ट पुढें त्यांच्या नजरेस येऊन आधीं पिक्ट

लोकांचा बंदोबस्त करूं व मग आपलीं भांडणें भांडूं असा शहाणपणाचा विचार करून दोन्ही पक्ष कांहीं काळ एक झाले, व **गाल**मधील रोमन अधिकाऱ्याकडे त्यांनीं मदतीबद्दल बोलणें लाविलें. ब्रिटनांच्या हालांचें वर्णन करणारें एक पत्र या रोमन अधिकाऱ्याकडे पाठविण्यांत आलें. त्या पत्रांत म्हटलें होतें कीं "रानटी लोक आम्हांला समुद्रांत ढकलून देत आहेत व समुद्राच्या लाटा आम्हांला परत रानटी लोकांच्या अंगावर फेंकून देत आहेत. समुद्रांत बुडून मरावें किंवा रानटी लोकांच्या तरवारींना बळी पडावें याशिवाय आम्हांला दुसरा मार्ग राहिलेला नाहीं!" पण या पत्राचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. कारण **गाल**मधील रोमन अधिकाऱ्याला आपल्या मांडीखालील घोडें सांभाळण्याचीच पंचाईत पडत होती. तो दुसऱ्यांना मदत कशी करणार ?

७ अशा रीतीनें रोमन लोकांकडून मदत मिळण्याची आशा नष्ट झाली, उत्तरेकडून पिक्ट व पूर्वेकडून '**ज्यूट**' '**आंग्ल**' '**साक्सन**' वगैरे लोकांचे हल्ले चालू होतेच, स्वतःला तर एकाही शत्रूचा बंदोबस्त करतां येत नाहीं, अशा स्थितींत कोणत्या तरी एका शत्रूशीं सख्य करून दुसऱ्याचा पाडाव करावा अशी मसलत योजून **ब्रिटन** लोकांनीं रानटी 'पिक्ट' लोकांपेक्षां उत्तर समुद्रापलीकडील चांचे लोकांशीं सख्य जोडणें अधिक बरें असें ठरविलें.

८ अँग्लो-साक्सन वर्णन—मागें सांगितलेंच आहे कीं इंग्लंडच्या समोर पूर्वेस **जर्मन**प्रांतांत किनाऱ्याकिनाऱ्यानें **आंग्ल** प्रभृति तीन जातींची वसाहत झालेली होती. हे लोक शूर, धाडसी व कसलाहि प्रसंग आला तरी न डगमगणारे असे होते. आणि त्यावेळचा त्यांचा धर्म 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' अशाच तऱ्हेची शिकवण त्यांना देत असे. त्यांचीं धिप्पाड शरीरें, निळे डोळे, पिवळे केस, उग्र चेहरे आणि लांबच लांब तरवारी, भाले, परशु, व हातोडे हीं त्यांचीं हत्यारें पाहून जेथें जेथें त्यांची धाड पडे तेथले लोक गांगरून जात !

९ हेंजिस्ट-होर्सा—'**हेंजिस्ट**' (Hengest) व '**होर्सा**' (Horsa) या नांवाचे दोघे बंधु या वेळीं त्या लोकांचे पुढारी होते, व लुटारू **साक्सन** लोकांनीं भरलेल्या तीन गलबतांच्या जोरावर **ब्रिटनच्या** किनाऱ्यापासून जवळच समुद्रांत त्यांचा स्वैर संचार चालू होता. ब्रिटन लोकांचा पुढारी 'व्हार्टिजर्न' यानें 'पिक्ट' लोकांचा बंदोबस्त करण्यासाठीं या साक्सन लोकांची मदत मागितली व त्यांनींही आनंदानें मदत करण्याचें कबूल केलें.

१० इ. स. ४४९ या वर्षीं '**केंट**' (Kent) च्या किनाऱ्याजवळ आपलीं गलबतें नांगरून या लोकांनीं ब्रिटनमध्यें पाय ठेविला. व 'व्हार्टिजर्न' च्या शत्रूंचा पराभव करून त्यांना उत्तरेकडे पिटाळून लाविलें. या मदतीबद्दल ब्रिटनांनीं किनाऱ्याजवळचें '**थानेट**' (Thanet) नांवाचें बेट त्यांना बक्षिस दिलें.

११ साक्सनांची पहिली वसाहत--ब्रिटनमध्यें **साक्सन** लोकांची पहिली वसाहत कशी झाली याबद्दल दोन भिन्न मतें आहेत. कोणी म्हणतात ब्रिटिश पुढारी '**व्हार्टिजर्न**' व **हेंजिस्टाची** मुलगी '**रोवेना**' (Rowena) हीं प्रेमबद्ध होऊन आपल्याला मुलगी द्याल तर केंट प्रांत तुम्हांला देतों असें व्हार्टिजर्ननें हेंजिस्टाशीं कबूल केलें तर दुसऱ्या कित्येकांचें असें मत आहे कीं साक्सन लोकांनीं ब्रिटनचें 'सौंदर्य' पाहिलें तेव्हां ते मोहित होऊन त्यांनीं आपण होऊनच तेथें कायमची वस्ती करण्याचा बेत केला. व ज्यांनीं त्यांना मदतीला म्हणून बोलाविलें होतें त्या ब्रिटनांवरच उलटून त्यांनीं **केंट** प्रांत काबीज केला आणि तेथें पहिली वसाहत स्थापिली. पण तें कसेंहि असलें तरी एवढी गोष्ट खरी कीं, साक्सन लोकांचा एकदा जो पाय या भूमीला लागला तो कायमचा होऊन यापुढील १०० वर्षांत जर्मन किनाऱ्यावरून '**जूट**' '**आंगल**' व '**साक्सन**' या लोकांच्या शेंकडों टोळ्या **ब्रिटनच्या** पूर्व व दक्षिण किनाऱ्यावर उतरल्या व हळू हळू पुढें प्रवेश करून आणि तद्देशीय **ब्रिटन** लोकांना मागें रेटून अगर आपल्यांत सामील करून घेऊन त्यांनीं तेथें निरनिराळीं लहान लहान राज्यें स्थापिलीं. आणि कांहीं कालानें या लोकांना सामान्येंकरून '**आंग्लोसाक्सन**' (Anglo-saxon) व पुढें इंग्लिश (English) अथवा 'इंग्रज' असें नांव प्राप्त झालें.

प्रकरण ४ थें.

नवे शत्रू !

(इ. स. ४५०–इ. स. ९०१)

[१ प्रास्ताविक—२ आर्थर—३ दोन मार्ग—४ इंग्रजांचीं सात संस्थानें–५त्यांचीं भांडणें—६ एकछत्री राज्य—७ इंग्लंड हें नांव—८ डेन लोक—सागरराज—९ डेनांची पहिली स्वारी—व त्यांच्याशीं इंग्रजांच्या झटापटी—१० एगबर्ट—एथलवुल्फ—आल्फ्रेड—११ आल्फ्रेडचा पराक्रम—डेन्स लोकांशीं तह—१२ पुन्हा लढाई—आल्फ्रेडचा वनवास—धनगराच्या झोंपडींत—१३ सैन्याची जमवाजमव—लढाई व तह—१४।१५ आलफ्रेडची कारकीर्द–आरमाराचा प्रारंभ—आल्फ्रेडची योग्यता—त्याची राज्यव्यवस्था व देहावसान]

१ प्रास्ताविक—एका शत्रूचें पारिपत्य करण्यासाठीं दुसऱ्या शत्रूशीं सख्य करून ब्रिटन लोकांनीं 'मशालीनें वाघ घरांत कसा आणिला ' आणि त्या वाघानें बलहीन मेंढरांचा संहार कसा चालविला हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें. यानंतर या वाघाचा उपद्रव थांबविण्यासाठीं ब्रिटनांनीं दुसऱ्या एका वाघाला आश्रय दिल्यामुळें या दोन वाघांची झोंबी लागून दोन तीनशें वर्षेंपर्यंत **ब्रिटनम**ध्यें कसा गोंधळ माजला होता हें या प्रकरणांत सांगावयाचें आहे.

२ आर्थर—साक्सन व **ब्रिटन** लोकांची झटापट लागल्यावर साक्सनांकडून पराभूत झालेले पण स्वातंत्र्याची आवड असलेले कित्येक **ब्रिटन** लोक **साक्सन** लोकांना शरण जाऊन त्यांचे अंकित न होतां मागें मागें हटत गेले व पश्चिमेकडे **वेलस** प्रांतांत त्यांनीं आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. त्या ठिकाणीं कित्येक वर्षेंपर्यंत त्यांनीं स्वातंत्र्यसुखाचा उपभोग घेतला. त्यांच्यांत '**आर्थर**' (Arthur) या नांवाचा पराक्रमी पुरुष होऊन त्यानें चोवीस वर्षेंपर्यंत आपल्या शूर अनुयायांच्या मदतीनें **साक्सन** लोकांशीं टक्कर दिली व बारा लढायांत साक्सन लोकांचा पराभव केला. पुढें त्याच्या पुतण्यानें बंड केलें तें मोडीत असतां त्याला जखम होऊन तो मरण पावला.

३ दोन मार्ग—पण अशा रीतीनें एखादा **ब्रिटन** सरदार पराक्रमी निघून कांहीं काळ कित्येक **ब्रिटनांना** स्वातंत्र्य लाभलें असलें तरी एकंदरींत **आंग्लो-साक्सन** लोकांपुढें **ब्रिटन** लोकांचा सदैव टिकाव लागणें कठीण होतें. व **आंग्लो-साक्सन** लोक **ब्रिटनमध्यें** आले ते कायमची वसाहत करून राहण्यासाठीं आलेले असल्यामुळें ते **रोमन** लोकांप्रमाणें पुढें मागें निघून जाण्याचाहि संभव नव्हता. आतां स्वातंत्र्य पाहिजे तर आपलीं घरेंदारें टाकून अरण्यांत निघून जावें हा एक, नाहींतर इंग्रजांचे अंकित म्हणून राहून कालांतरानें त्यांच्यांतच मिसळून जावें हा दुसरा, असे दोन मार्ग ब्रिटन लोकांपुढें होते व या दोन्ही मार्गांचा त्यांनीं अवलंब केला असें दिसून येतें.

४ इंग्रजांचीं सात संस्थानें—सहाव्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांचीं एकंदर सात लहान लहान राज्यें **इंग्लंडमध्यें** स्थापन झालीं होतीं. पूर्वेकडे ‘ **पूर्व आंग्लिया** ’ (East Anglia) ‘ **इसेक्स** ’ (Essex) व ‘ **केंट** ’ (Kent) अशीं तीन, दक्षिणेस ‘ **वेसेक्स** ’ (Wessex) व ‘ **ससेक्स** ’ (Sussex) अशीं दोन, उत्तरेला ‘ **नार्दंब्रिया** ’ (Northumbria) व मध्यभागीं ‘ **मर्शिया** ’ (Mercia).

५ भांडणें—पुढें या छोट्या राज्यांतहि आपापसांत तंटे सुरू झाले. ‘ राजे ’-पणा प्राप्त झाल्यावर पुढची पायरी ‘ महाराज ’ होण्याची, व अशी एखाद्या संस्थानिकाला महत्वाकांक्षा उत्पन्न झाली म्हणजे शेजारच्या राजांशीं कांहींतरी कुरापत काढून लढाई करण्यास तो प्रवृत्त होत असे. पुढें त्यालाहि कोणी शेरास सवाशेर भेटून त्याला त्या दुसऱ्याचें अंकित व्हावें लागे.

६ एकछत्री राज्य—वर सांगितलेल्या सात राज्यांपैकीं ‘ **इसेक्स** ’ शिवाय करून बाकी सहाही राज्यांतील राजांची ही ‘ महाराज ’ होण्याची इच्छा परमेश्वरानें पुरी केली. **केंटमधील** राजांना हें वैभव दोनदां प्राप्त झालें. ‘ **पूर्व आंग्लिया** ’ च्या राजाला एकदां व ‘ **नार्दंब्रिया** ’ च्या राजांना तीनदां हा मान उपभोगावयास मिळाला. आणि **वेसेक्समधील** राजांना अखेर विजयश्रीनें माळ घातल्यावर सर्व देशावर ‘ एकछत्री ’ राज्य सुरू झालें, व इ० स० ८२७ या वर्षी ‘ **एगबर्ट** ’ (Egbert) नांवाचा राजकारणकुशल व पराक्रमी राजा दक्षिणेकडे पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत व उत्तरेकडे **ट्वीड** नदीपर्यंत सर्व मुलखाचा स्वामी झाला.

७ **इंग्लंड**—याच सुमाराला ' **आंग्ल** ' (Angle) लोकांची जी भूमि म्हणजे ' **लँड** ' (Land) ती ' **आंग्ललँड** ' (Angle-land) यावरून पुढें अपभ्रष्ट होतां होतां ' **इंग्लंड** ' हें नांव या देशास प्राप्त झालें.

८ **डेनलोक**—वर सांगितल्याप्रमाणें तीनशें साडेतिनशें वर्षें आपापसांत लढाल्ढी चालून अखेर सर्व इंग्लंडदेश एका राजाच्या अमलाखालीं आला खरा; पण त्यालाही फार दिवस सुखानें राज्य करावयास मिळालें नाहीं. इंग्लंडच्या ईशान्येस **नार्वे** (Norway) व **स्वीडन** (Sweden) हे देश आहेत. या देशांत त्यावेळीं **डेन** (Dane) नामक लोकांची वसाहत झालेली होती. हे लोक व इंग्लिश लोक हे मूळचे एकाच वंशातील असून त्यांच्या चालीरीती व स्वभाव हीं जवळ जवळ एकसारखींच होतीं. हे **डेन** लोकही चांगले दर्यावर्दी असून त्यांच्या राजांना ' **सागरराज** ' (Sea-kings) असें म्हणत असत. त्यांचीं गलबतें इंग्रजांच्या गलबतांपेक्षां श्रेष्ठ दर्जाचीं असून त्यांच्या निशाणावर कावळ्याचें चित्र काढलेलें असे. तिरकमठे, परशु, हातोडे वगैरे हत्यारांचा ते उपयोग करीत.

९ **डेनांची पहिली स्वारी**—या लोकांची इंग्लंडवर पहिली स्वारी सन ७८७ या वर्षीं झाली. साक्सन लोकांच्या अमलाखालीं रहाणें न आवडून ज्या ब्रिटन लोकांनीं वेल्समध्यें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें होतें त्यांनीं या वेळीं या लोकांचें स्वागत करून त्यांना इंग्रजांविरुद्ध हरएकप्रकारें चांगली मदत केली. पुढें त्यांच्या वारंवार स्वाऱ्या होऊं लागून लोकांची कत्तल करणें, घरांना आग लावणें आणि सर्व प्रदेश उध्वस्त करून टाकणें असले प्रकार बरेच दिवस चालू होते. पण पुढें इ० स० ८३५ यावर्षीं **एगबर्ट**राजानें **कार्नवाल** (Cornwall) जिल्ह्यांत '**हेंगस्टन**' (Hengston)-च्या लढाईत त्यांचा पराभव केला व त्यांचे बहुतेक लोक कापून काढले.

१० **एगबर्ट**—पुढील वर्षीं **एगबर्ट** राजा मरण पावला व त्याचा मुलगा '**एथलवुल्फ** ' (Ethelwolf) हा गादीवर आला. ' **एथलवुल्फ** 'चें राजकारणांत विशेष लक्ष नसे. त्याचा ओढा पारमार्थिक विषयांकडे अधिक होता. त्याच्या कारकिर्दीत **डेन** लोकांपासून प्रजेला फारच पीडा झाली. **डेन** लोकांचा पहिल्या पहिल्यानें केवळ लूट मिळवावी एवढाच उद्देश होता; पण पुढें पुढें त्यांना ही भूमि आवडून आपणहि येथें वसाहत करून रहावें असें वाटूं लागलें. '**एथलवुल्फ**'च्या मरणानंतर त्याचे चार मुलगे क्रमानें गादीवर बसले; पण शेवटचा मुलगा जो ' **आल्फ्रेड** ' (Alfred) त्याच्याशिवाय बाकीच्यांत कांहींच राम नव्हता.

११ आल्फ्रेडचा पराक्रम--**आल्फ्रेड** सन ८७१ यावर्षी गादीवर बसला.

पुण्यश्लोक आल्फ्रेड



Alfred the Great.

या एका वर्षांत इंग्रजांच्या डेन्स लोकांबरोबर मोठमोठ्या नऊ लढाया झाल्या. शिवाय ठिकठिकाणीं लहान लहान चकमकी झडत होत्या त्या निराळ्याच. शेवटीं निरुपाय होऊन इंग्रजांनीं सन ८७२ या वर्षी **डेन्स** लोकांशीं तह केला व **डेन्स** लोक '**टेम्स**' नदीच्या उत्तरेकडे निघून गेले. यावेळीं फक्त '**वेसेक्स**' चें राज्य कायतें इंग्रजांच्या हातीं होतें. बाकी सर्व मुलुखावर **डेन्स** लोकांचा ताबा बसला होता.

१२ पुनः लढाई—इ.स. ८७८ यावर्षी **डेन्स** लोकांनीं पुन्हां **वेसेक्स**वर चाल केली. त्यावेळीं **आल्फ्रेड**चा निरुपाय होऊन त्याला पळून जावें लागलें. तो बरेच दिवसपर्यंत एका धनगराच्या घरीं मेंढरें राखण्याचें काम करीत होता. एके दिवशीं त्या धनगराची बायको **आल्फ्रेड**ला चुलीवर भाकऱ्या भाजत होत्या तिकडे लक्ष देण्यास सांगून कांहीं कामासाठीं बाहेर गेली. **आल्फ्रेड** हा आपल्याच विचारांत इतका गर्क होऊन गेला होता कीं, त्या भाकऱ्या परतण्याचें त्यास भानही राहिलें नाहीं. धनगराची बायको परत येऊन पहाते तों भाकऱ्यांची राख झाली होती ! तेव्हां 'तुला भाकऱ्या खायला पाहिजेत, पण भाजल्या कीं नाहीं तें पहायला नको !' असें म्हणून ती त्यास पुष्कळ बोलली. **आल्फ्रेडला** अर्थातच तें सर्व निमूटपणें ऐकून घेणें भाग होतें. असो.

१३ सैन्याची जमवाजमव—अशा रीतीनें **आल्फ्रेडनें** अज्ञातवासांत बरेच दिवस घालविले. त्या ठिकाणीं त्याचे विश्वासू लोक गुप्तपणें येऊन त्याला भेटत

असत, व त्यांचीं खलबतें चालत असत. शेवटीं एक दिवस तुतारीवाल्याचें सोंग घेऊन **आल्फ्रेड** डेन लोकांच्या छावणींत गेला व आपणांस पाहिजे होती ती सर्व बातमी काढून घेतल्यावर त्यानें आपल्या लोकांची जमवाजमव केली व '**एथांडन**' (Ethandon) येथें शत्रूंवर एकाएकीं हल्ला केला. डेन लोक आपणांस आतां कोणी शत्रु उरलेला नाहीं असें समजून बेसावध होते. ते हा अचानक झालेला हल्ला पाहून गडबडले. त्यांनीं घाईघाईनें आपल्या छावण्यांचा आश्रय केला. परंतु १४ दिवसपर्यंत **आल्फ्रेडनें** त्यांना वेढ्यांत कोंडून धरलें. शेवटीं तह होऊन **वेसेक्सचें** राज्य व त्याच्या आसपासचा मुलूख **डेन** लोकांनीं सोडून द्यावा व बाकीचें राज्य **वेसेक्सच्या** राजाचे मांडलिक म्हणून डेन लोकांकडे असावें असें ठरलें. ही गोष्ट इ. सन ८७८ या वर्षी घडली.

१४ आल्फ्रेडची कारकीर्द—पुढील बरींच वर्षें स्वस्थतेंत गेलीं. या अवधींत '**आल्फ्रेड**'नें आपल्या सैन्याची सुधारणा केली व आरमारावांचून आपला तरणोपाय नाहीं हें जाणून डेन लोकांच्या गलबताशीं टक्कर देण्याच्या योग्यतेचीं गलबतें बांधविलीं. आजपर्यंत जगांत जे उत्तम राज्यकर्ते होऊन गेले त्यांत **आल्फ्रेडची** गणना करतात. त्याचें सर्व लक्ष आपल्या प्रजेच्या कल्याणाकडे असे. त्यानें युद्धें केलीं तीं फक्त स्वसंरक्षणासाठीं केलीं. दुसऱ्याचे देश पादाक्रांत करावे असा त्याचा उद्देश केव्हांही नव्हता. विजयमदानें उन्मत्त होऊन त्यानें कधींहि क्रूरपणाचीं कृत्यें केलीं नाहींत. त्याला विद्येची मोठी आवड असे. त्यानें आपल्या राज्यांत शाळा स्थापन केल्या. व विद्वानांना आपल्या दरबारांत आश्रय दिला. 'इसापनीति' (Æsop's Fables) 'स्तोत्र–संग्रह' वगैरे ग्रीक भाषेंतील ग्रंथांचें त्यानें स्वतः इंग्रजी भाषेंत भाषांतर केलें होतें. राज्याचे जिल्हे (Shire), तालुके (Hundred) व गांव (Townmoor) असे भाग व पोटभाग करून त्यांवर चांगले चांगले अधिकारी त्यानें नेमून दिले होते. आपल्या वाडवडिलांच्या कारकीर्दींतील चांगले चांगले कायदे एकत्र करून त्यांचें त्यानें एक 'कोड' (code) बनविलें होतें. या कायद्यांची अंमलबजावणीही त्यानें इतक्या उत्तम रीतीनें केली कीं, लवकरच त्याच्या राज्यांत गुन्हा होत नाहींसा झाला.

१५ त्याच्या आरमाराची व सैन्याची तयारी पाहून डेन्स लोकांनीं त्याच्या राज्यावर हल्ले करण्याचें सोडून दिलें. एकदां इ. स. ८९३ सालीं मात्र '**हेस्टिंग्ज**' (Hastings) नांवाच्या **डेन** सरदारानें ३३० गलबतें घेऊन इंग्लंडच्या किना-

त्यावर पाय ठेवण्याचा प्रयत्न केला व पुढें तीन वर्षेपर्यंत दक्षिणेकडे बराच धुमाकूळ मांडला. परंतु शेवटीं **आल्फ्रेडनें** मोठ्या शौर्यानें त्याला मागें हटवून हांकून लाविलें. अशा रीतीनें बरींच वर्षेपर्यंत इंग्लंडला स्वातंत्र्य व शांततासुखाचा लाभ देऊन व आपल्या प्रजेकडून 'धन्य' म्हणवून घेऊन इ. स. ९०१ या वर्षीं **आल्फ्रेडनें** आपला देह ठेविला; परंतु इंग्लंडच्या 'पुण्यश्लोक-नृपावळींत' (The Great) त्याला पहिला मान असल्यामुळें कीर्तिरूपानें तो चिरंजीवच आहे यांत शंका नाहीं.

प्रकरण ५ वें.

इंग्लंडमधील ख्रिस्ती धर्म.

[१ जीजस–त्याचीं पहिलीं वर्षें–साक्षात्कार व मतें—२ देहांत शिक्षा व मत-प्रसार—३ ख्रिस्ती धर्मांतील आचार भेद–रोममध्यें प्रवेश–ख्रिस्ती धर्माध्यक्षाची गादी—४ ख्रिस्ती धर्माचा प्रसार—५ ड्रुइड भटजींचा शेवट—६।७ ब्रिटनमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश–मिशनरी ख्रिस्तदास—८ इंग्रजांचा मूळचा धर्म—९ त्यांच्या देवता—१० बर्था व लुइधर्ड—११ एथलबर्ड राजाचें धर्मांतर—१२ रोमन ख्रिस्ती व आयरिश ख्रिस्ती—१३।१४ पोपची सत्ता—१५ आगस्टाइन–त्याचें इंग्लंडमध्यें आगमन–दहा हजार इंग्रज ख्रिस्ती झाले !—१६ पुढच्या शंभर वर्षांत–स्वाभिमान आणि धर्माभिमान].

१ जीजस—आशिया खंडाच्या पश्चिम भागीं **आशिया मायनर** (Asia minor) प्रांतांत **पॅलेस्टाइन** (Palestine) येथें '**जीजस**' (Jesus) या नांवाच्या एका सत्पुरुषाचा जन्म होऊन १९३० वर्षें होऊन गेलीं. [आधुनिक शोधाप्रमाणें **जीजस**चा जन्म त्याच्या नांवाच्या शकापूर्वीं ५ वर्षें झाला होता असें समजतात.] त्या काळीं त्या प्रांतांत धर्माच्या नांवानें पशुयज्ञ व नरमेधांसारखे क्रूर प्रकार चालू होते. '**जीजस**'चें अंतःकरण जात्याच कोमल असून हे हिंसेचे प्रकार पाहून त्याला अत्यंत वाईट वाटत असे. दुसऱ्याचा जीव घेऊन निरनिराळ्या देवांना संतुष्ट करण्याचा मार्ग खुद्द त्या देवांना कसा पसंत पडतो व हे देव आहेत

तरी कोठें याचें त्याला मोठें कोडें पडलें. त्या प्रांतांतील प्रचलित धर्ममतांवरून हळू हळू त्याचा विश्वास उडाला व त्या वेळच्या तेथल्या जुन्या धर्माभिमान्यांच्या दृष्टीनें तो 'नास्तिक' बनत चालला. परमेश्वर स्वरूपाची ओळख करून घेण्यासाठीं त्यानें एकांतांत बराच काळ घालविला. व शेवटीं त्याला साक्षात्कार होऊन 'परमेश्वर एकच आहे, सर्व माणसें त्याचीं मुलें होत, त्याला संतुष्ट करण्यासाठीं मूर्तींच्या पूजेची, यज्ञकर्मांची व नाना तऱ्हेच्या कर्मकांडांची जरूरी नाहीं, तो सर्व जगाचा स्वामी आहे, त्याच्या राज्यांत भेदभाव नाहीं, मरणोत्तर ज्याच्या त्याच्या पापपुण्याप्रमाणें ज्याला त्याला गती मिळत असते, या जगांत सर्वांनीं बंधुभावानें वागावें, अपकारांची फेड उपकारांनीं करावी' वगैरे मतें त्यानें प्रतिपादण्यास सुरवात केली.

२ देहांत शिक्षा—त्या वेळच्या धर्माधिकाऱ्यांकडून अर्थातच या त्याच्या 'धर्मलंडपणा'बद्दल त्याचा फार छळ झाला; पण हळू हळू त्याचे अनुयायीही वाढत चालले. अखेरीस त्या वेळच्या तेथल्या राज्यकर्त्यांचा क्रोध अनावर होऊन या सत्पुरुषाला त्यांनीं देहांत प्रायश्चित्त देण्याचें ठरवून त्याच्या डोक्यावर कांट्यांचा मुकुट घालून त्याला सुळावर चढविलें! अशा क्रूर रीतीनें जरी त्याचा अंत झाला तरी त्यानें प्रतिपादिलेलीं मतें मागें राहिलींच; आणि त्यांचा प्रसार हळू हळू वाढत जाऊन आज जवळ जवळ ६० कोटींपेक्षां जास्त लोक नांवानें तरी आपल्याला **जीजसखिस्ताचे** अनुयायी म्हणवीत आहेत.

३ खिस्ती धर्मांतील आचार भेद—खिस्तानें प्रतिपादिलेली मतें जरी अयोग्य नव्हतीं, तरी कालांतरानें त्या मतांच्या प्रचारकांच्या अज्ञानामुळें, व कांहीं अंशीं कोणत्याही धर्मांत झालें तरी 'शुद्ध तत्त्वा' पेक्षां आचाराकडेच लोकांचें अधिक लक्ष असतें यामुळें, पुढें पुढें खिस्ती धर्मांतही धर्मवैशिष्ट्य दाखविण्यासाठीं निरनिराळे आचार सुरू झाले. व त्यांतच राजकीय कारणांचीही भर पडून आपलाच धर्म खरा असें म्हणणाऱ्या खिस्ती धर्मानुयायांनीं अगर त्यांतील विशिष्ट पंथीयांनीं भिन्न धर्मीयांचा अगर भिन्न पंथीयांचा छळ कांहीं कमी केला नाहीं. पूर्वेकडे हिंदुस्थानच्या बाजूला त्यावेळीं बौद्ध धर्माचा बराच पगडा होता. त्यामुळें या नव्या धर्माच्या प्रसाराची गति पूर्वगामी न होतां पश्चिमाभिमुख झाली व त्याकाळीं अत्यंत बलाढ्य असलेल्या 'रोमन साम्राज्यां'त त्याचा प्रवेश होऊन रोमच्या राजांनीं या धर्माचा स्वीकार केला. पुढें 'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें जेथें जेथें

रोमच्या राजांचा अंमल चालू होता, त्या त्या प्रांतांत ख्रिस्ती धर्माचा साहजिकच रिघाव झाला. आणि रोम येथें **ख्रिस्ती धर्माध्यक्षाची** (Pope) गादी स्थापिली गेली.

४ ख्रिस्ती धर्माचा प्रसार—प्राचीन **ब्रिटन** लोकांचा धर्म कशा प्रकारचा होता याचें दिग्दर्शन मागें पहिल्या प्रकरणांत केलेंच आहे. **रोमन** लोक ख्रिस्ती झाल्यावर त्यांना स्वाभाविकपणेंच आपल्या धर्माचा अभिमान उत्पन्न झाला व 'रानटी' लोकांचीं राज्यें काबीज करूनच न थांबतां, त्यांचा 'रानटी धर्म' नाहींसा करून आपल्या 'दिव्य' धर्माची जिंकलेल्या लोकांना दीक्षा देण्याचा त्यांनीं उपक्रम केला यांत कांहीं नवल नाहीं.

५ ड्रुइड भटजींचा शेवट—इ० स० ६१ या वर्षी '**पालिनस**' (Polinus) या नांवाचा रोमन गव्हर्नर **ब्रिटनवर** अंमल चालविण्यासाठीं आला होता. त्या वेळीं ज्या **ब्रिटन** लोकांनीं रोमन लोकांना शरण जावयाचें नाहीं असें ठरविलें, त्यांनीं '**मोना**' (Mona) नांवाच्या बेटांत आपला जमाव करून त्या बेटाचा चांगला बंदोवस्त केला होता. रोमन लोकांनीं या बेटावर स्वारी केली तेव्हां तेथल्या ब्रिटनांच्या **ड्रुइड** भटजींना आपल्याला यश येईल याबद्दल इतकी खात्री होती कीं रोमन लोकांना कैद केल्यावर त्यांना आपल्या देवतांना बळी द्यायला वेळ लागूं नये म्हणून त्यांनीं वेताचे पिंजरे तयार करून ठेवले होते. व या एकेका पिंजऱ्यांत दहा पांच रोमन लोक भरून त्यांना 'अग्नये स्वाहा' करण्याचा त्यांचा बेत होता. पण दैवगती उलटलेली असल्यामुळें रोमन लोकांचा जय झाला व त्यांनीं या सर्व **ड्रुइडांना** त्यांनींच तयार केलेल्या पिंजऱ्यांत भरून जिवंत जाळून टाकलें ! यापुढें ब्रिटनांचें कधींहि डोकें वर न निघाल्यामुळें या अघोरी **ड्रुइडांचें** नांवही पुढें ऐकूं येईनासें झालें !

६ ब्रिटनमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश—**ब्रिटन**मध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश कसा झाला व तो कोणीं केला याबद्दल निश्चयात्मक माहिती उपलब्ध नाहीं. पण येवढी गोष्ट खरी कीं पश्चिमेच्या **आयर्लंड** बेटांत या धर्माचा प्रवेश ब्रिटनच्या अगोदर झाला व **आयर्लंडांतून पिक्ट** लोक उत्तरेकडे **स्काटलंडांत** आल्यानंतर ख्रिस्ती उपदेशक इंग्लंडमध्यें संचार करूं लागले. रोम येथें ख्रिस्ती धर्माध्यक्षाची गादी स्थापन झाल्यानंतर ख्रिस्तदास पद्धतशीर रीतीनें निरनिराळ्या प्रांतांतून उपदेशासाठीं फिरूं लागले. या उपदेशकांना जातील तेथें त्या त्या प्रांतांतील

जुन्या धर्मांच्या अभिमान्यांकडून त्रास सोसावा लागला, हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या, पण त्यांनीं आपलें काम दृढ निश्चयानें व ' मिशनरी ' (Missionary) चिकाटीनें चालू ठेविलें. व शेवटीं सर्व रोमन साम्राज्य ख्रिस्ती झालें.

७ त्यावेळीं ब्रिटन हा रोमन साम्राज्याचा एक भाग बनलेला असल्यामुळें एकीकडून रोमन ख्रिस्तोपदेशकांचा ससेमिरा व दुसरीकडून उत्तरेकडच्या पिक्ट ख्रिस्तदासांच्या मतांचा पगडा अशा दोन्ही बाजूंनीं ब्रिटनच्या जुन्या धर्मावर प्रहार होऊन लवकरच सर्व ब्रिटन लोक ख्रिस्ती झाले.

८ **इंग्रजांचा मूळचा धर्म**--पण **आंग्लो-साक्सन** किंवा इंग्रज लोकांची गोष्ट तशी नव्हती. ते रोमन लोकांचे अंकित नव्हते व त्यांची मूळची वस्ती रोमन साम्राज्याच्या हद्दीपासून दूर असल्यामुळें ख्रिस्ती उपदेशकही तेथपर्यंत पोहोंचलेले नव्हते. इंग्रज व त्यांच्याच वंशांतले डेन्स वगैरे इतर लोक हे आपल्या मूळच्या प्रदेशांत असेपर्यंतच्या त्यांच्या धर्मकल्पना म्हणजे ' आत्मा अमर असून या लोकीं केलेल्या पुण्य कृत्यांबद्दल पुढील जन्मीं पारितोषिक मिळतें व दुष्कृत्यांबद्दल शिक्षा भोगावी लागते; युद्धांत मरण आल्यास स्वर्ग लोक प्राप्त होऊन त्या ठिकाणीं नाना तऱ्हेचे विलास भोगावयास सांपडतात; युद्धांतून पलायन करणारांस नरकवास प्राप्त होतो ' वगैरे प्रकारच्या असत.

९ **त्यांच्या देवता**—त्यांच्यांत पुष्कळ देवता कल्पिलेल्या होत्या. त्यांत '**वोडन**' (Woden) देव श्रेष्ठ असे. हल्लींचीं इंग्रजी भाषेंतील सात वारांचीं नांवें इंग्रजांच्या त्यावेळच्या सात देवतांच्या नांवावरूनच पडलेलीं आहेत. त्यांशिवाय आणखीही पुष्कळ देव होते. व त्यांपैकीं कित्येकांचे वार्षिक उत्सवही होत असत. इंग्रजांचा ब्रिटनमध्यें अंमल चालू झाला त्यावेळीं ते ब्रिटनांच्या ख्रिस्ती धर्माचा फार द्वेष करीत असत. व बरींच वर्षेपर्यंत त्यांनीं स्वतः आपला जुना मूर्तिपूजेचा धर्म कायम ठेविला होता.

१० **बर्था व लुइधर्ड**—इ० स० ५९७ ह्या वर्षीं '**केंट**' राज्याचा राजा '**एथलबर्ट**' याजकडे सर्व इंग्लिश वसाहतींचें स्वामित्व होतें. त्याची बायको '**बर्था**' (Bertha) ही **गाल**(फ्रान्स)च्या राजाची मुलगी असून **गालचा** राजा त्यावेळीं पक्का ख्रिस्ती बनलेला होता. या '**बर्था**' राणीनें आपल्या माहेरचा '**लुइधर्ड**' (Louisdhard) नांवाचा उपाध्या आपल्याबरोबर इंग्लंडमध्यें आणला होता. तो '**कांटरबेरी**' (Canterbury) येथील देवळांत

ख्रिस्ती धर्माप्रमाणें उपासना चालवी. ती पहाण्यास **केंट**मधील लोक प्रथम प्रथम मौजेनें म्हणून येत असत.

११ राजाचें धर्मांतर—राणीनें जरी आपल्या सोईसाठीं ख्रिस्ती उपाध्या बाळगिला होता, तरी राजानें लग्न झाल्यापासून ३० वर्षेपर्यंत आपल्या जुन्या देवांना कांहीं सोडलें नव्हतें. पण ख्रिस्ती राणीच्या सान्निध्यानें तिच्या मतांचा कांहींतरी परिणाम राजाच्या मनावर झाल्यावांचून कसा राहील ? हळू हळू त्याच्या मनांत शंका उत्पन्न होऊं लागल्या. त्या शंकांचें निरसन करण्यास व राजाची समजूत घालण्यास त्यावेळीं राणीच्या ‘ **लुइधर्ड** ’ या ख्रिस्ती उपाध्यापेक्षां जास्त विद्वान् कोण मिळणार ? झालें, हळू हळू मतांतर होऊं लागलें, व कांहीं दिवसांनीं ‘ **एथलबर्ट** ’ राजानें ‘ **लुइधर्ड** ’ मार्फत रोम येथील त्या वेळचा धर्माध्यक्ष ‘ **ग्रेगरी** ’ याजकडे ब्रिटनमध्यें कांहीं ख्रिस्तोपदेशक **उपदेशार्थ** पाठवून देण्याविषयीं पत्र पाठविलें.

१२ रोमन ख्रिस्ती व आयरिश ख्रिस्ती—मागें सांगितलेंच आहे कीं, **ब्रिटन**मध्यें जसे रोमन उपदेशक ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न करीत त्याचप्रमाणें ‘ **आयरिश** ’ उपदेशकांचाहि **ब्रिटनां**ना ख्रिस्तदीक्षा देण्याचा प्रयत्न जोरानें चालू होता. या दोन उपदेशकांमध्यें या सुमारास मतभेद उत्पन्न होऊन ‘ रोमन ख्रिस्ती ’ व ‘ आयरिश ख्रिस्ती ’ असे दोन पक्ष उत्पन्न झाले होते, व जो तो आपापल्या पक्षाचें वर्चस्व स्थापण्याच्या उद्योगांत होता. बाब क्षुल्लकच, पण एकदा मतभेदावरून तट उत्पन्न झाले म्हणजे वाद कसे माजतात व एक पक्ष दुसऱ्या पक्षाला कसा पाण्यांत पाहूं लागतो हें हिंदु धर्मातील शैव व वैष्णव या पंथांच्या वादाचा इतिहास ज्यास थोडाबहुत माहीत आहे त्यास सांगण्याची जरुरी नाहींच ! असो.

१३ पोप ग्रेगरीचा आनंद—वर सांगितल्याप्रमाणें **एथलबर्ट** राजाचें पत्र ‘ **ग्रेगरी** ’कडे गेलें तेव्हां त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला. आपले मिशनरी **ब्रिटन**मध्यें पाठवून इंग्रजांना आपल्या पंथाचे ख्रिस्ती करावें व अशा रीतीनें सर्व इंग्लंडवर आध्यात्मिक वर्चस्व मिळवावें अशी त्यास इच्छा झाली.

१४ पोपची सत्ता—यावेळीं रोमच्या धर्माध्यक्षांची ख्रिस्ती लोकांवरील सत्ता फक्त धार्मिक बाबतींतच होती असें नाहीं. व्यावहारिक बाबतींतहि त्यांची सत्ता सर्वश्रेष्ठ मानली जाई. “ रोमचा ख्रिस्ती धर्माध्यक्ष-याला पोप असें म्हणतात-हा प्रत्यक्ष ईश्वरी अवतार असून परमेश्वराकडे जावयाचे मार्ग त्याच्या ताब्यांत आहेत, तो ‘ कर्तुं-

मकर्तुमन्यथाकर्तुं ’ समर्थ असून त्याचा ‘ पास ’ अथवा ‘ परवाना ’ (Permit) असल्याशिवाय कोणालाहि ख्रिस्ताच्या–देवाच्या–राज्यांत जातां येणार नाहीं, परमेश्वराचे खालोखाल सर्व जगताचा स्वामी हाच, म्हणून निरनिराळ्या राष्ट्रांतील राजांनीं त्याच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालवावा, त्याचा शब्द मोडील तो नरकांत जाईल, तसेंच तो ज्या ‘ प्रेषितां’ना (Apostles) संचारार्थ पाठवितो त्यांचाहि अधिकार त्याचे सारखाच असून ‘ पोप ’नें नेमलेले सर्व राज्यांतील धर्माधिकारी हे फक्त ‘ **पोप** ’ला जबाबदार असून त्यांचे देह फार पवित्र आहेत, त्यांच्यावर राजाचासुद्धां कोणत्याही बाबतींत अधिकार नाहीं ” अशा प्रकारच्या समजुती त्यावेळीं दृढ झालेल्या होत्या. आणि लोकांच्या या समजुतींच्या बळावर ‘ पोप महाराज ’ सर्व ख्रिस्ती प्रजेवर यथेच्छ अधिकार चालवीत असत, व राजे लोकही पोपचा शब्द झेलण्यास सदैव तयार असत. तेव्हां **एथलबर्ट** राजाकडून आदरानें आमंत्रण आल्यावर आपण लौकरच इंग्लंड देश आपल्या सर्वस्वीं अंकित करून टाकूं अशी पोपनें महत्वाकांक्षा धरल्यास नवल नाहीं.

१५ आगस्टाइन–त्यानें ‘**आगस्टाइन**’ (Augustine) नांवाच्या आपल्या एका मठबंधूच्या हाताखालीं ४० ख्रिस्तोपदेशक देऊन हें सर्व सैन्य इंग्लंडला पाठविण्याचें ठरविलें. हुकुमाप्रमाणें **आगस्टाइन** व त्याचे हे सहधर्मचारी इंग्लंडच्या किनाऱ्यासमोर **गाल**(फ्रान्स)देशांत आले. आणि तेथल्या कित्येक उपदेशकांना दुभाषे म्हणून बरोबर घेऊन ही सर्व मंडळी तेथून मोठ्या समारंभानें ‘ **केंट** ’ जिल्ह्यांत येऊन दाखल झाली. उघड्या मैदानांत **आगस्टाइन**चें व्याख्यान व्हावयाचें ठरलें. व्याख्यानास खुद्द राजा व राणी हजर होतीं. **आगस्टाइन**नें ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यापासून होणाऱ्या फायद्यांचें रसभरित वर्णन केलें. राजानेंही सावधगिरी ठेवून उत्तरादाखल थोडक्यांत चार शब्द सांगितले. राणीचा आनंद मात्र गगनांत मावेना. पुढें थोड्या दिवसांनीं **आगस्टाइन**नें **पोप ग्रेगरी**ला पत्र पाठविलें कीं, आपण नुकतीच ‘ **केंट**’च्या राजाला व त्याचेबरोबर १० हजार इंग्रज लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली !

१६ पुढच्या शंभर वर्षांत––झालें; एका राजानें ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याबरोबर हळू हळू त्याच्या नात्याच्या इतर राजघराण्यांतील मंडळींतहि या धर्माचा प्रवेश झाला, व शंभर वर्षांत बहुतेक इंग्लंड ख्रिस्ती झालें. मात्र इंग्रजांचा स्वाभिमान त्यांच्या धर्माभिमानापेक्षां जास्त प्रबल असल्यामुळें रोममधून आलेले धर्माधिकारी

कितीही झालें तरी परकी, ही त्यांची बुद्धि नेहमीं जागृत होती. व यामुळेंच पोपच्या अधिकाराखालीं असलेले धर्माधिकारी व खुद्द इंग्लंडचे लोक व राजे हे जरी एकाच धर्माचे असले तरी त्यांच्यांत पुष्कळ काळपर्यंत तंटे सुरू होते. या तंट्यांचा अखेर परिणाम इंग्लंडांतून पोपची सत्ता समूळ नष्ट होऊन खास इंग्लंडची अशी स्वतंत्र धर्मपद्धती व स्वतंत्र धर्मपीठ स्थापन होण्यांत कसा झाला हें पुढें यथास्थलीं सांगण्यांत येईल.

प्रकरण ६ वें.

इंग्रजांची राज्यव्यवस्था.

[१ रानटी लोकांची जीवनयात्रा—कुटुंब व समाजव्यवस्था—सत्ताधीश राजा—२ अँग्लोसॅक्सनांचे पुढारी—राजघराणीं—३ शिष्टमंडळें—४ त्यांचे सभासद, त्यांचीं कामें—व बैठकी—५ सरदार, त्यांचे अधिकार व कर्तव्यें—६ जमीनदार व धर्माधिकारी—७ गुलाम—त्यांची स्थिति—८ राज्यविभाग—कुटुंब, गांव, तालुका व जिल्हा—अधिकारी—९ लोकसभा व तिचें काम—१० शेरीफ—११ अपराध्यांची चौकशी—शपथ व तिची किंमत—१२ दिव्य व त्याचे प्रकार—१३ शिक्षा व तिचे प्रकार—माणसांची किंमत—१४ व्यसनें—१५ भाषा–अँग्लोसाक्सन व लाटिन—१६ विद्वत्ता—पुस्तकें—त्यावेळचे ग्रंथकार.]

१ रानटी लोकांची जीवनयात्रा–मनुष्यें रानटी स्थितींत असेतोंपर्यंत त्यांना राज्यव्यवस्था म्हणजे काय याचें ज्ञानही नसतें व जरुरीही नसते. मनाला वाटेल तिकडे जावें, मिळेल तें खावें, थंडीवाऱ्यापासून कसेंतरी संरक्षण करून दिवस काढावे, व एक दिवस मरून जावें, हीच त्यांची जीवनयात्रा ! जमीन मुबलक, व माणसें थोडीं, अशी स्थिति असली म्हणजे तंटाभांडणांचें प्रसंग तरी कशाला येणार ? पण लोकसंख्या वाढूं लागली म्हणजे मूळचा प्रांत पुरेनासा होतो. मग अमुक तुझें व अमुक माझें ही बुद्धि जागृत होते. पुढें स्वसंरक्षणासाठींच कांहीं मंडळींनीं तरी एकोप्यानें रहावें असें वाटूं लागतें, व या एकत्र रहाण्याच्या प्रवृत्तीनें हळू हळू कुटुंबें व समाज बनत जातात. पण त्याबरोबरच तंट्यांनाहि सुरवात होते. ज्याला त्याला आपलें-

तें खरें वाटत असल्यामुळें पुष्कळ वेळां हे तंटे न मिटतां हातघाईवर पाळी येते व कोणाचा तरी एकाचा पराभव होऊन दुसरा त्याचा अंकित होतो. याच रीतीनें निरनिराळीं कुटुंबें व समाज यांमध्यें तंटे सुरू झाले म्हणजे सगळेच शहाणे होऊन निभाव कसा लागणार ? याकरितां कोणातरी एका व्यक्तीला पुढारी करून त्याच्या सल्लामसलतीप्रमाणें बाकीच्यांना वागावें लागतें. पुढें या पुढाऱ्याच्या सल्लामसलतीला हुकमाचें स्वरूप येतें व पुढाऱ्याचें ‘ सत्ताधीशां ’त रूपांतर होतें. असो.

२ अँग्लो-साक्सनांचे पुढारी—आपल्या या ‘आंग्लो-साक्सन ’ लोकांच्या युरोपखंडांत अटलांतिक महासागराच्या किनाऱ्यावर जेव्हां वसाहती झाल्या त्या वेळीं ते बरेच सुधारलेले होते, व संकटकाळीं एकोप्यानें रहाण्यास शिकले होते. यामुळेंच त्यांना तिकडच्या मूळच्या रानटी लोकांना नाहींसे करून अगर आपल्या अंकित करून त्यांच्या मुलुखांत आपलें कायमचें बिऱ्हाड ठेवतां आलें. त्यांच्या एकेका टोळींत बरेच लोक सारखेच शूर व पराक्रमी असत; परंतु दुसऱ्याच्या मुलुखावर स्वारी करायची झाली अगर आपल्यावर कोणी चालून येतोसा दिसला म्हणजे ते आपल्यापैकीं एखाद्याला पुढारी करून त्याच्या तंत्रानें चालत. पुढें लढाईचे प्रसंग वारंवार येत गेल्यामुळें या पुढाऱ्याकडे पुढारीपण कायमचें राहूं लागलें. मग लढाईच्या वेळीं जर सर्वांच्यापुढें असलें पाहिजे तर शांततेच्या वेळीं तरी मागें कां ? असा विचार उत्पन्न होऊन सर्व काळीं पुढाऱ्यांचे हुकूम मानणें हें इतरांचें कर्तव्य आहे येथपर्यंत मजल पोंचली. बाकीचेहि असा विचार करीत कीं, कोणीतरी जर ‘लगामा’ला पुढें पाहिजे तर मग तो ‘तोबऱ्याला’हि पुढें होणारच. अशा रीतीनें एका पुरुषाकडे कायमचें पुढारीपण राहूं लागल्यावर राजसत्तेचा उगम झाला, व ही सत्ता पुढें आपल्या मुलांबाळांतही चालावी अशी इच्छा बळावत जाऊन राजघराणीं अस्तित्वांत आलीं.

३ शिष्टमंडळें—अँग्लो-साक्सन लोकांनीं इंग्लंडांत वसाहत केल्यावर प्रथम निरनिराळ्या ठिकाणीं सात राजघराणीं स्थापिलीं जाऊन अखेर ‘ **एगबर्ट** ’ च्या कारकीर्दींत सर्व इंग्लंडवर एका राजाचा अंमल कसा चालू झाला हें मागें सांगितलेंच आहे. पण एखाद्या घराण्यांत एकदोन पुरुष जरी पराक्रमी निपजले, तरी सर्वच पुरुष सारखे पराक्रमी निपजतील याचा काय नेम ? व राजघराणें म्हणून मानलेल्या कुटुंबांत जर कोणी पराक्रमी पुरुष नसला तर राज्याच्या सुरक्षिततेची वाट काय ? अशी स्थिति प्राप्त झाली असतां पुढाऱ्यांची वाण पडूं नये व शिवाय राजाच्या सत्ते-

वरही दाब राहून त्याला इतरांवर जुलूम करतां येऊं नये यासाठीं या **आंग्लो-साक्सन** टोळ्यांमध्यें 'शिष्टमंडळें' (Witan-a-gemot) नेमलेलीं असत. व महत्वाच्या प्रसंगीं राजाला या शिष्टमंडळांचा सल्ला घेऊन काय करावयाचें तें ठरवावें लागे.

४ सभासद—या मंडळांत बसण्याचा हक्क मुख्य मुख्य सरदार, धर्माधिकारी व मोठे जमीनदार यांस असे, व राजा हा या मंडळाचा अध्यक्ष असे. पुढें राजाला वंशपरंपरेचा हक्क प्राप्त झाल्यावर या मंडळाच्या सभासदांनाहि तो ओघानेंच प्राप्त झाला. नवीन कायदे करणें, कर बसविणें, लढाई अगर तह करणें, राजाची नेमणूक करणें, ग्रामोपाध्ये नेमणें, कोणाला जमिनी देणें, वगैरे प्रकारचीं कामें या मंडळाकडे असत. कसल्याहि न्यायाचा अखेर निकाल करणेंहि या सभेकडेच असे. या सभेच्या वर्षांतून तीन बैठकी नियमितपणें होत असत. पण एकाद्या विशेष महत्वाच्या प्रसंगीं राजा या मंडळाला मुद्दाम निमंत्रण करीत असे.

५ सरदार—महत्वाच्या मानानें राजाच्या खालोखाल सरदारांचा वर्ग असे. एकेका सरदाराकडे बहुधा एकेक जिल्हा नेमून दिलेला असे. या जिल्ह्यांतील राज्य-कारभार त्यानें पहावयाचा व लढाईच्या वेळीं त्या जिल्ह्यांतील लोकांची सेना घेऊन त्यानें समरांगणीं हजर व्हावयाचें.

६ जमीनदार—यांच्या खालचा वर्ग जमीनदारांचा. ज्याची निदान ६०० एकर जमीन स्वतःच्या मालकीची असे तो वरिष्ठ जमीनदार समजला जाई, व ६०० एकरांपेक्षां कमी जमीन असलेले व जमिनीची स्वतः मशागत करून तिजवर निर्वाह करणारे सुखवस्तु शेतकरी हे कनिष्ठ जमीनदारांत मोडत. धर्माधिकाऱ्याचा दर्जा सरदाराच्या बरोबरीचा असे. सरदार, धर्माधिकारी व वरिष्ठ जमीनदार यांना 'शिष्ट मंडळांत' बसण्याचा हक्क असे.

७ गुलाम—अगदीं खालचा वर्ग म्हणजे गुलामांचा. जिंकलेल्या ब्रिटन लोकांचे वंशज, लढाईत धरून आणलेले कैदी, कर्ज फेडण्याचें अगर दंड देण्याचें सामर्थ्य नसलेले लोक, व ज्यांना स्वतंत्र निर्वाहाचें साधन नसल्यामुळें निवळ मोल मजुरी करून पोट भरावें लागे असले लोक या वर्गांत मोडत. धन्याला आपल्या जामिनी अगर गुरें-ढोरें याप्रमाणें हे गुलामही विकतां येत. एका गुलामाची किंमत बहुधा चार बैलांइतकी धरीत! व त्यांचे धनीही त्यांना बैलाप्रमाणेंच वागवीत! गुलामांना आपलें स्वातंत्र्य विकत घेण्याची मात्र मोकळीक असे. पुढें पुढें कित्येक उदार **धर्माधिकाऱ्यांनीं** धन्यांना पैसे देऊन बऱ्याच गुलामांची मुक्तताहि केली होती.

८ राज्यविभाग—जिल्हे, तालुके व गांव असे राज्याचे पोटभाग असत. **साक्सन** लोकांची एकेक टोळी येऊन तिनें जसजसा मुलूख काबीज केला तसतशी तेथली जमीन आपल्यांत वांटून घेतली होती. एकेका कुटुंबाच्या वांट्याला अजमासें तीस पस्तीस एकर जमीन येत असे. अशा दहा बारा कुटुंबांचा एक गांव बने. दहा गांवांचा मिळून एक तालुका होई व असे अनेक तालुके मिळून जिल्हा होई. प्रत्येक गांवांत कांहीं जमीन सार्वजनिक म्हणून राखून ठेवलेली असे. सर्व जिल्ह्यावर अंमल ' सरदाराचा ' असे. तालुक्याच्या अधिकाऱ्याला '**आल्डरमन**' (Alderman) असें नांव होतें.

९ लोकसभा—प्रत्येक तालुक्यांत एकेक लोकसभा असे. प्रत्येक गांवांतले चार शिष्ट लोक व तालुक्यांतील मोठाले जमीनदार या सभेला येत. ही सभा महिन्यांतून एकदां भरे. जमिनीच्या मालकीबद्दलचे वाद, अगर खून दरोड्यासारखे महत्वाचे फौजदारी खटले, यांचा निकाल या सभेंत होत असे. मोठमोठ्या सरदारांना आपल्या जिल्ह्यांतील न्याय-मनसुबे करण्याचा अधिकार असे व किरकोळ दाव्यांचा निकाल तेच करीत असत.

१० शेरीफ—प्रत्येक जिल्ह्यात एक '**शायररीफ**' (Shire-reef) अगर ' **शेरीफ** ' (Sheriff) या नांवाचा अधिकारी असे. राजाचा अधिकार बरोबर चालला आहे कीं नाहीं हें पहाणें हें काम त्याच्याकडे असे. रोमन लोकांच्या कारकिर्दींत कलाकौशल्याला उत्तेजन मिळून जशीं कित्येक मोठीं शहरें वसलीं होतीं, तशीं **आंग्लो-साक्सन** लोकांच्या अमदानींतहि बरींच शहरें भरभराटीस आलीं. शहरच्या मोठ्या व्यापाऱ्यांचा मान बहुधा कनिष्ठ जमीनदारांइतका असे.

११ अपराधांची चौकशी—अपराधांची चौकशी शपथेवरून (Oath) अगर दिव्य (Ordeal) करावयास लावून करीत असत. एखाद्या मनुष्यावर फिर्याद झाली म्हणजे आरोपीनें आपल्या हातून गुन्हा झाला नाहीं हें शाबीत करण्यासाठीं साक्षीदार आणावयाचे, व त्या साक्षीदारांनीं शपथेवर आरोपी निरपराधी आहे असें सांगितलें म्हणजे तो मुक्त होई. प्रत्येकाच्या शपथेची किंमत त्याच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असे. वरिष्ठ प्रतीच्या जमीनदाराच्या शपथेची किंमत सहा कनिष्ठ जमीनदारांच्या शपथेबरोबर असे, व सरदाराची शपथ तर सगळ्या गांवाच्या शपथेहून भारी असे !

१२ दिव्य--पण असे साक्षीदार एकाद्याला मिळाले नाहींत तर त्याला दिव्य करून आपलें निरपराधित्व शाबीत करण्याची मोकळीक असे. दिव्य म्हणजे आधण आलेल्या पाण्यांतील दगड आरोपीला आपल्या हातानें बाहेर काढावयास सांगावयाचा, अगर तापलेलें लोखंड हातांत धरून त्यानें नऊ पावलें चालावयाचें. मग त्याच्या हाताला पट्टी बांधावयाची. तीन दिवसांनीं जर त्याचा हात बरा झालासें आढळून आलें तर तो निरपराधी ठरला, नाहीं तर अपराधी ! या दिव्याचा आणखी एक प्रकार असे. त्यांत आरोपीस मंतरलेली भाकर खावयास देत आणि ती जर त्याच्या गळ्याखालीं नीट उतरली तर तो निरपराधी व गिळतांना तो जर गडबडला तर तो अपराधी ठरला असें समजत !

१३ शिक्षा—अपराध शाबीत झाल्यावर शिक्षा करावयाची ती बहुधा दंडरूपानें होत असे. खून, दरोडे, राजद्रोह वगैरे मोठ्या अपराधांना बहुधा देहांत प्रायश्चित्त देत; परंतु यापेक्षां कमी प्रतीच्या गुन्ह्यांना दंडाची शिक्षा मिळे. प्रत्येक माणसाची त्याच्या दर्जाप्रमाणें कांहीं ठराविक किंमत मानीत. उदा० कुणब्याची किंमत २०० शिलिंग, कनिष्ठ जमीनदाराची ६०० शिलिंग, वरिष्ठ जमीनदाराची १२०० शिलिंग इत्यादि. तशीच माणसाच्या अवयवांचीहि किंमत ठरलेली असे. म्हणून जर एकाद्याच्या कोणत्याहि अवयवाला दुखापत झाली, अगर चुकून कोणी मारला गेला तर त्याला अगर त्याच्या वारसांना ठराविक रक्कम दिली म्हणजे गुन्हेगाराची मोकळीक होत असे. हा दंड जर देतां आला नाहीं तर गुन्हेगाराला गुलाम करीत. गुलामानें कोणताहि अपराध केल्यास त्याला त्याच्या धन्याच्या मर्जीप्रमाणें शिक्षा भोगावी लागे. याशिवाय नाक कान कापणें, डोळे काढणें, केंस कापून टाकणें, डागणें, चावकानें मारणें वगैरेहि शिक्षेचे प्रकार असत.

१४ व्यसनें व करमणुकी—त्यावेळच्या लोकांच्या नीतिमत्तेविषयीं व करमणुकीच्या प्रकारांविषयीं सांगावयाचें म्हणजे त्या काळचे अगदीं शिष्ट म्हणून समजले जाणारे गृहस्थसुद्धां दारूबाजी व तदनुषंगिक इतर व्यसनांत गढून गेलेले असत. सरदार लोकांना लढाईचें काम नसलें म्हणजे दिवसाचा वेळ शिकारींत जावयाचा, व रात्रीं सगळी मंडळी—अगदीं नोकराचाकरासुद्धां—एकत्र जमून त्यांनीं प्रथम मासे व डुकराच्या मांसावर ताव मारावयाचा, व मग '**मीड**' (Mead) दारू झोंकून झाल्यावर गायनवादन सुरू व्हावयाचें, तें सुराबाईचा पूर्ण अमल बसून सगळे अस्ताव्यस्त होऊन पडले म्हणजे आपोआप बंद होईपर्यंत चालावयाचें !

१५ **भाषा**—दर बारा कोसांवर भाषा बदलते अशी जी आपल्यांत म्हण आहे ती इंग्लंडांतही खरीच आहे. साक्सन लोकांच्या वेळीं निरनिराळ्या जिल्ह्यांत थोड्या फार फरकानें वेगवेगळ्या भाषा चालू होत्या. पुढें हळू हळू त्या भाषांचा मिलाफ होऊन ‘ **आंग्लो-साक्सन** ’ नामक भाषा बनली. (आजच्या इंग्लिश भाषेंतील तीन चतुर्थांश शब्द ‘ **आंग्लो-साक्सन** ’ आहेत.) पण ही भाषा ग्रंथ रचनेला हलक्या प्रतीची मानली जाई. विद्वान लोक ग्रंथरचना करावयाची ती ‘ लाटिन ’ भाषेंत करीत. धर्मविधीही ‘ लाटिन ’ भाषेंत होत असत.

१६ **विद्वत्ता**—त्या काळीं विद्येच्या नांवानें बहुधा जिकडे तिकडे पूज्यच ! काय विद्या होती ती धर्माधिकाऱ्यांच्या मठांत. सबंध गांवांत ‘लिहिणारा वाचणारा’ म्हणजे गावचा ‘ ग्रामोपाध्या ’ (Priest) हा एकटाच. पुस्तकाचें नांवच नाहीं. एखाद्या श्रीमान गृहस्थाजवळ दहा पुस्तकें दिसलीं तर लोक मोठें आश्चर्य करीत व त्याला ‘ विद्येचा मोठा भोक्ता व उदार आश्रयदाता ’ समजत.

‘ **गिल्डास** (Gildas) ‘ **नेनियस**’ (Nanius) ‘**बीड**’ (Bead) **सीडमन** (Seadman) हे त्यावेळचे प्रख्यात ग्रंथकार होत. **आल्फ्रेड** राजा विद्येचा मोठा भोक्ता असून त्यानें स्वतः कित्येक ग्रंथांचें भाषांतर केलें होतें हें मागें सांगितलेंच आहे.

प्रकरण ७ वें

न्याय कीं अन्याय ?

(इ. सन ९०१–इ. स. १०१६)

[१–२ आल्फ्रेडच्या मागून–एडवर्ड व एथलबाल्ड—३ अथेल्स्टन—४ एडमंड–त्याचा मृत्यु—५ एडरेड व एडवी—६ धर्माधिकाऱ्यांतील तट—७ डन्स्टन—८ ओडो–ओडोचा अत्याचार—९ एडगर—१० एडगरची कारकीर्द व त्याचें ऐश्वर्य—११ लांडग्यांचा कर–शांतता व सुराज्यव्यवस्था–एडगरचा मृत्यु—१२ एडवर्ड—१३ डन्स्टनचें प्रस्थ—१४ दुष्काळ व प्लेग–डेन्स लोकांचे हल्ले–एडवर्डचा खून—१५ एथलरेड—१६ ख्रिस्ती संन्याशी—१७ डेनजेल्ड व डेन्सलोकांची कत्तल—१८ स्वेनची स्वारी व एथलरेडचें पलायन—१९ कान्यूट—२०–२१ एडमंडचा पराक्रम–तह—२२ कान्यूट राजा झाला.]

१ **आल्फ्रेडच्या मागून—डेन्स** लोकांशीं मोठ्या शौर्यानें लढून **आल्फ्रेड** राजानें '**वेसेक्स**'चें राज्य व त्याच्या आसपासचा मुलूख आपल्या खास अंमलाखालीं ठेवून बाकीच्या इंग्लंडवर आपले ' मांडलिक ' म्हणून डेन्स लोकांनीं अंमल चालवावा असें ठरविलें होतें हें मागें ४ थ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

२ **आल्फ्रेड**च्या मरणानंतर त्याचा मुलगा **एडवर्ड** हा गादीवर आला. हाही बापासारखाच शूर व मुत्सद्दी होता. त्याचा व त्याचा चुलतभाऊ '**एथलबाल्ड**' (Ethelbald) म्हणून होता, त्याचा गादीविषयीं तंटा उत्पन्न होऊन **एथलबाल्ड** डेन्स लोकांना जाऊन मिळाला व पुन्हां **डेन्स** लोकांचें इंग्रजांशीं युद्ध सुरू झालें. पण त्या युद्धांत **एथलबाल्ड** मारला गेला व **एडवर्डनें** डेन्स लोकांपासून आणखी तीन प्रांत मिळविले. तसेंच **वेल्स** व **स्काटलंड** येथील त्या वेळच्या राजांनींहि त्याचें मांडलिकत्व कबूल केलें.

३ **अथेल्स्टन**—एडवर्ड इ. स. ९२५ या वर्षीं मरण पावला. त्याला संतति बरीच होती. त्याचे मागून **अथेल्स्टन** (Athelston) हा त्याचा मुलगा गादीवर आला. त्याला राज्याभिषेक झाला असेल नसेल तोंच '**नार्दंब्रिया**' (Northumbria) प्रांतांत बंड झालें. त्याचा मोड होतो न होतो तोंच पुढें **डेन्स,**

वेल्श व **स्कॉट** हे तिघे एक होऊन त्यांनीं **अथेल्स्टन**ची सत्ता झुगारून दिली. पण अखेर त्यांचा मोड होऊन त्यांना इंग्लंडच्या राजाला शरण येणें भाग पडलें.

४ एडमंड—अथेल्स्टनचे मागून त्याचा सावत्रभाऊ ' **एडमंड** ' (Edmund) गादीवर आला. त्याचे कारकीर्दीत **डेन्स** लोकांनीं पुन्हां उचल केली. पण **एडमंड**नें त्यांचा पराभव करून त्यांचे आणखी पांच प्रांत घेतले व त्यांतला थोडासा मुलूख **स्काटलंड**च्या राजाला देऊन त्याला आपल्या विरुद्ध झालेल्या गट्टींतून फोडलें. इ० स० ९४६ या वर्षी हा राजा जेवावयास बसला असतां त्याचा एका माथेफिरूनें खून केला !

५ एडरेड—एडमंडचा खून झाला तेव्हां त्याचे मुलगे लहान होते. म्हणून ' शिष्ट मंडळा ' नें एडमंडचा भाऊ ' **एडरेड** ' (Edred) यास गादीवर बसविलें. पण पुढें **एडरेड**च्या मरणानंतर **एडमंड**चा वडील मुलगा ' **एडवी** ' (Edwy) हा गादीवर आला.

६ धर्माधिकाऱ्यांतील तट—या सुमारास इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांत दोन तट उत्पन्न झाले होते. एका पक्षाचें म्हणणें धर्माधिकारासारखा पवित्र अधिकार ज्यांच्या हातीं असावयाचा त्यांनीं सामान्य लोकांपेक्षां निराळें आचरण ठेविलें पाहिजे. त्यांनीं संन्यस्त वृत्तीनें मठांतून रहावें व ब्रह्मचर्यव्रत पाळावें. दुसऱ्या पक्षाला प्रपंच हा परमार्थाला बाधक नसून पोषक आहे असें वाटे व या पक्षांत त्या वेळच्या ग्रामोपाध्यांचा बराच भरणा होता.

७ डन्स्टन—पहिल्या पक्षाचा पुढारी ' **डन्स्टन** ' (Dunston) नामक ' बिशप ' (Bishop) म्हणजे एक बडा धर्माधिकारी असून '**एडरेड**' राजाच्या कारकीर्दीत त्याचें राजदरबारांत चांगलें वजन असे व सामान्य लोकांवरही त्याच्या मताची बरीच छाप बसली होती; पण ' **एडवी** ' गादीवर आल्यावर पारडें फिरलें. **एडवी**नें आपल्या जवळच्याच नात्यांतली ' **एलजिव्हा** ' (Elgiva) म्हणून एक मुलगी होती तिजबरोबर लग्न केलें. राजाचा हा सापिंडय संबंध **डन्स्टन**ला आवडला नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं दोघांमध्यें उघड तंटा सुरू झाला.

८ ओडो—' **ओडो** ' (Odo) या नांवाचा दुसरा एक प्रमुख धर्माधिकारी राजाचा ' कुलोपाध्याय ' होता, तोहि ' **डन्स्टन** 'ला मिळाला. **एडवी**ला अजून शास्त्रोक्त अभिषेक व्हावयाचा होता. त्या राज्याभिषेकाच्या दिवशीं वाड्यांत भोजन समारंभ चालला असतांना **एडवी** राजा कांहीं वेळ आपल्या राणीच्या अंतःपुरांत

जाऊन बसला. **डन्स्टन** व **ओडो** हे त्या ठिकाणीं गेले व **ओडोनें** राणीची फार निर्भर्त्सना केली. पुढें **डन्स्टन**ला राजानें हद्दपार केलें. इकडे **ओडोनें** नाना प्रकारच्या युक्त्या योजून राजाची व राणीची ताटातूट केली. व तिनें पुन्हां राजाला मोहित करूं नये म्हणून तिचें तोंड जाळून टाकलें !

९ एडगर—डन्स्टन व **ओडो**च्या हस्तकांनीं कित्येक प्रांतांतील लोकांना चिथावून बंड करण्यास लाविलें. '**नार्दंब्रिया**' व '**मर्शिया**' (Mercia) येथील सरदारांनीं **एडवी**चा भाऊ '**एडगर**' (Edgar) याला आपला राजा करून **डन्स्टन**ला परत बोलविलें. पण पुढें आपसांत तडजोड होऊन **टेम्स** नदीच्या दक्षिणेकडील मुलूख **एडवी**कडे असावा व बाकीचें राज्य '**एडगर**' नें घ्यावें असें ठरलें. पुढें लौकरच **एडवी** मरण पावला आणि इ० स० ९५८ या वर्षी **एडगर** सर्व इंग्लंडचा अधिपति झाला.

१० त्याचें ऐश्वर्य—या राजाची कारकीर्द बहुतेक शांततेंत गेली. **डन्स्टन**-सारखा ' हुषार पुरोहित ' त्याला मंत्री मिळाला होता. '**ओडो**'च्या मरणानंतर **एडगरनें डन्स्टन**ला '**कांटरबरी**' (Canterbury) चा आचार्य करून आपला कुलोपाध्याय नेमिलें. या राजाच्या कारकिर्दींत इंग्लंडांतील इंग्रज सत्ता कळसास जाऊन पोंचली. **वेल्स** व **स्कॉटलंड** येथील लोकांनीं '**एडगर**'चें मांडलिकत्व कबूल केलें. **नार्दंब्रिया** प्रांतांत **डेन्स** लोकांचें राज्य होतें. त्या लोकांना आपले कायदे आपण करण्याचा हक्क राजानें देऊन टाकल्यामुळें त्यांनीं **एडगर**ला मुळींच त्रास दिला नाहीं. आपल्या राज्यांत न्यायाधिकारी न्याय बरोबर करतात कीं नाहीं हें पहाण्यासाठीं **एडगर** वर्षांतून एकदां सर्व प्रांतांतून प्रवास करीत असे. एकदां '**चेस्टर**' (Chester) प्रांताला जात असतां वाटेंत '**डी**' (Dee) नदी ओलांडतांना त्याची होडी वल्हविण्याला सहा मांडलिक राजे लागले होते !

११ लांडग्यांचा कर—वेल्स प्रांतांत लांडग्यांचा उपद्रव फार झाला तेव्हां तेथल्या लोकांकडून कांहीं वर्षेंपर्यंत वार्षिक खंडणीच्या ऐवजीं ३०० लांडग्यांचीं डोकीं घेण्याचें त्यानें ठरविलें. तसेंच कित्येक अपराध्यांची ठराविक लांडग्यांचीं डोकीं आणून देण्याच्या अटीवर त्यानें मुक्तता केली. आपल्या राज्यांत वजनांमापांचें एक प्रमाण त्यानें ठरवून टाकलें. परराष्ट्रांशीं स्नेहसंधि करून व व्यापाराला उत्तेजन देऊन त्यानें इंग्लंडची सांपत्तिक स्थिति फार सुधारली. हा राजा इ० स० ९७५ या

वर्षी मरण पावला. त्याला दोन बायका असून पहिल्या बायकोपासून '**एडवर्ड**' व दुसऱ्या बायकोपासून '**एथलरेड**' असे दोन मुलगे झाले होते.

१२ एडवर्ड—राजाला दोन व शेळीला तीन मुलें झालीं म्हणजे तंट्याला सुरवात होते अशी आपल्यांत जुनी म्हण आहे; तिचा प्रत्यय प्राचीन काळच्या इतिहासांत पुष्कळ वेळां आलेला दिसतो. '**एडगर**' च्या मरणानंतर राज्यांत पुन्हां दोन पक्ष झाले. पण '**डन्स्टन**'च्या वजनामुळें **एडगर**च्या पहिल्या बायकोचा मुलगा **एडवर्ड** याला गादी मिळाली.

१३ डन्स्टनचें प्रस्थ—याच्या कारकिर्दींत **डन्स्टन**चें महत्व फारच वाढलें. धर्माधिकाऱ्यांनीं लग्न करावें कीं नाहीं हा वादाचा मुद्दा पुन्हा उपस्थित होऊन त्याचा निकाल करण्यासाठीं 'शिष्टमंडळा'ची सभा भरली. धर्माधिकाऱ्यांनीं ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे असें म्हणणाऱ्या पक्षातर्फें **डन्स्टन** बोलावयास उभा राहिला. त्यानें आपल्या भाषणांत विरुद्ध पक्षाचा सत्यनाश करण्याबद्दल देवाचा धांवा केला, तों काय चमत्कार सांगावा ? विरुद्ध पक्षाची मंडळी खोलीच्या ज्या भागीं बसली होती तेथील तुळया एकाएकीं मोडून त्या मंडळीचे मुडदे धाड् धाड् जमिनीवर पडले ! **डन्स्टन**नें पूर्वींच गुप्त रीतीनें असा प्रकार घडावा अशी व्यवस्था करून ठेविली होती असेंहि म्हणतात !

१४ दुष्काळ व प्लेग-पुढें राज्यांत दुष्काळ व प्लेग जोरावला, डेन्स लोकांचे हल्ले पुन्हां सुरू झाले, व सर्व देशभर जिकडे तिकडे उद्विग्नता पसरली. एके दिवशीं राजा शिकारीस गेला असतां तो आपल्या सावत्र आईस भेटावयास म्हणून तिच्या वाड्यांत गेला. जेवणखाण होऊन निरोप घेतांना तो एक दारूचा पेला तोंडास लावीत आहे तोंच मारेकऱ्यांनीं त्याच्या पाठींत सुऱ्या भोंसकून त्याचा प्राण घेतला !

१५ एथलरेड—**एडवर्ड**ला मुलगा नसल्यामुळें त्याच्यामागून त्याचा सावत्र भाऊ '**एथलरेड**' हा राजा झाला. त्यानें ३७ वर्षें राज्य केलें. या राजाच्या मूर्ख-पणामुळें इंग्लंडवर जिकडून तिकडून संकटें येऊन सगळा देश अगदीं हीन स्थितीला जाऊन पोंचला !

१६ ख्रिस्ती संन्याशी—मागील राजाच्या कारकीर्दींत **डन्स्टन**च्या प्राबल्या-मुळें ख्रिस्ती 'संन्याशां'चे मठ बरेच वाढले होते. व या 'संन्याशां'च्या उपदेशानें लोकांमध्यें ऐहिक बाबतींत उदासीनता उत्पन्न झाली होती. त्याचप्रमाणें 'मठां'चें उत्पन्न वाढून राजाच्या खजिन्यांत तूट पडत चालली होती. त्यामुळें

'**डेन्मार्क**' व '**नार्वे**' या देशांतील डेन्स लाकांच्या जेव्हां पुन्हां स्वाऱ्या होऊं लागल्या तेव्हां त्यांच्याशीं टक्कर देण्याला राजाजवळ मनुष्यबळ व द्रव्यबळ फारच थोडें आहे असें आढळून आलें.

१७ **डेनजेल्ड**—या वेळीं कित्येक इंग्रज सरदारांच्या विश्वासघाताचीही या संकटांत भर पडली. त्यामुळें इ० स० ९९१ या वर्षी डेन्स लोकांची स्वारी झाली तेव्हां '**डेन-जेल्ड**' (Dane-geld) म्हणजे 'डेन्स लोकांसाठीं कर' या नांवाचा जमिनीवर स्वतंत्र कर बसवून ते पैसे डेन्स लोकांना देऊन राजानें त्यांना परत पाठविलें. परंतु अशा रीतीनें पैसे मिळतात असें पाहून डेन्स लोक अधिकाधिकच हल्ले करूं लागले, व त्यांतील कित्येकांनीं तर इंग्लंडमध्यें कायमचेंच बिऱ्हाड केलें! शेवटीं राजानें अशी युक्ति काढली कीं एकदां या सगळ्या डेन्स लोकांची कत्तल करून टाकावी! त्यावेळीं '**ब्राइस**' (Brice) नामक साधूच्या वार्षिक पुण्य-तिथीनिमित्त राज्यांत एक उत्सव होत असे. इ० स० १००२ या वर्षी या उत्सवाच्या दिवशीं सर्व डेन्स लोकांची कत्तल करण्यांत आली! त्यांत '**गनहिल्डा**' (Gunhilda) नांवाची **डेन्मार्क**च्या **स्वेन** राजाची बहीण **वेसेक्स** प्रांतांत होती तिचाहि खून झाला.

१८ **स्वेनची स्वारी**—या कृत्याचा सूड घेण्यासाठीं **डेन्मार्क**च्या राजानें पुष्कळ सैन्यानिशीं इंग्लंडवर स्वारी करून लुटालूट चालविली. स्वेनची स्वारी आली कीं **एथलरेड**नें त्याला पैसा देऊन त्याची संभावना करावी असा क्रम बरेच दिवस चालला. शेवटीं इ० स० १०१३ मध्यें **डेन्मार्कच्या** राजानें '**कान्यूट**' (Canute) नामक आपल्या मुलाला बरोबर घेऊन डेन्मार्कचें सर्व सैन्य बाहेर काढलें, आणि इंग्लंडच्या उत्तर प्रांतांतील उरल्या सुरल्या डेन्स लोकांच्या मदतीनें तो प्रांत काबीज केल्यावर त्याची स्वारी दक्षिणेकडे वळली. **ऑक्सफर्ड** (Oxford) व **विंचेस्टर** (Winchester) हीं प्रमुख शहरें विशेष श्रम न पडतां डेन्स लोकांच्या हातीं आलीं, व पुढें लौकरच '**बाथ**' (Bath) येथें इंग्रज सत्तेचा पुरा मोड झाला. **डेन्मार्क**चा राजा '**स्वेन**' हा इंग्लंडचा राजा झाला म्हणून इंग्लंडमध्यें द्वाही फिरली, व **एथलरेड** राजा आपल्या बायकोच्या माहेरीं गाल-(फ्रान्स)मध्यें पळून गेला!

१९ **कान्यूट**—पुढें कांहीं दिवसांनीं **स्वेन** राजा कालवश झाला. त्या वेळीं त्याचा मुलगा **कान्यूट** हा १९ वर्षांचा होता. डेन्स लोकांच्या आरमारानें लगेच

कान्यूटच्या नांवानें द्वाही फिरविली. पण तितक्यांत इंग्रजांच्या शिष्ट मंडळानें ही संधि साधून **एथलरेड**ला पुन्हां इंग्लंडमध्यें आणण्याचा प्रयत्न चालविला. **कान्यूट**च्या लोकांची जमवाजमव होण्यापूर्वीच **एथलरेड** इंग्लंडमध्यें येऊन दाखल झाला. त्यामुळें **कान्यूट**ला **डेन्मार्क**मध्यें परत जावें लागलें. त्याच्या बरोबर जे **साकसन** लोक ओलीस म्हणून होते त्यांचे नाक, कान व हात त्यानें रागानें तोडून टाकविले. **कान्यूट** हा बापाप्रमाणेंच शूर व महत्त्वाकांक्षी होता. त्यानें पुढल्याच वर्षी पुन्हां मोठें आरमार घेऊन इंग्लंडच्या दक्षिण भागावर हल्ला केला, व इंग्रजांच्या नेटाच्या प्रतिकाराला न जुमानतां त्यानें बहुतेक भाग आपल्या अंमलाखालीं आणला. पुढें डेन्स लोक **लंडन**वर चाल करून येऊं लागले. इतक्यांत **एथलरेड** राजा मरण पावला. तेव्हां लंडनच्या लोकांनीं राजा म्हणून त्याचा मुलगा **एडमंड** याच्या नांवची द्वाही फिरविली. परंतु **लंडन** खेरीज करून बहुतेक इंग्लंड देश कान्यूटच्या ताब्यांत आला होता, व **लंडन**हि केव्हां पडेल याचा नेम नव्हता. म्हणून शिष्टमंडळानें अखेर आपण होऊनच **कान्यूट**ला राज्यपद देऊं केलें.

२० **एडमंडचा पराक्रम**—इकडे **एडमंड**नेंहि आपल्या पूर्वजांच्या गादीकरितां मरेपर्यंत लढण्याचा निश्चय केला. सात महिन्यांत **कान्यूट**च्या व त्याच्या सहा लढाया झाल्या. व शेवटच्या लढाईंत **एडमंड**चा पराभव झाला तोहि त्याच्या मेव्हण्याच्या विश्वासघातामुळेंच. मुख्य मुख्य **साकसन** सरदार त्याच्याबरोबर धारातीर्थी देह ठेवण्यास तयार होते, व स्वतः **एडमंड**ही निधड्या छातीचा असल्यामुळें त्यानें अजूनहि धीर सोडला नव्हता. इंग्लंडच्या निशाणासभोंवतीं पुन्हां इंग्रजसेना एकत्र झाली. **कान्यूट** या सेनेवर चाल करून आला. पण पुढें लढाई न होतां '**सेव्हर्न**' (Severn) नदींत '**आल्ने**' (Alne) नांवाचें एक लहानसें बेट आहे त्यांत या दोघां राजपुत्रांची भेट होऊन तहनामा झाला.

२१ या तहानें टेम्स नदीच्या दक्षिणेकडील भाग **एडमंड**कडे असावा, व बाकीचें राज्य **कान्यूट**नें घ्यावें आणि '**डेन—जेल्ड**' नांवाचा कर दोघांच्याहि राज्यांत घेतला जाऊन त्याचा उपयोग कान्यूटनें आपल्या आरमाराच्या खर्चाकडे करावा असें ठरलें. अशा रीतीनें **एडमंड**नें आपल्या वाडवडिलांच्या राज्यापैकीं अर्धे राज्य स्वपराक्रमानें मिळविलें; पण त्याचा उपभोग घेण्यास तो फार दिवस वांचला नाहीं. सन १०१६ या वर्षी तो लंडनमध्यें मरण पावला. त्याच्यामागें **एडवर्ड** व **एडमंड** असे त्याचे दोन अज्ञान मुलगे होते.

२२ कान्यूट राजा झाला--**एडमंड** राजा मेल्याबरोबर **कान्यूट** लंडनला आला व आपण अन्यायानें राज्य घेतों आहों असें कोणाला वाटूं नये म्हणून त्यानें इंग्रजांच्या शिष्टमंडळाची सभा भरविली. या सभेंत **कान्यूट**नें शिष्टमंडळाला पूर्वींची आठवण देऊन आपला इंग्लंडच्या राजपदावर कसा हक्क आहे हें चांगलें 'समजावून' सांगितलें. कित्येक सभासदांना लांच देऊन वश करून घेण्यासही त्यानें कमी केलें नाहीं. शेवटीं या 'शिष्टां'नीं रीतसर **कान्यूट**ची राज्यपदावर नमणूक केली व अशा प्रकारें अगदीं 'कायदेशीर व सनदशीर' रीतीनें तो 'इंग्लंडचा राजा' झाला !

प्रकरण ८ वें.

इंग्रज राजांचें पुनरागमन !

(इ. स. १०१६–इ. स. १०६६)

[१ युरोपखंडांतील राज्यें—२ रोमचें महत्त्व—३ इंग्लंडचा युरोपशीं संबंध—४ कान्यूटचें कारस्थान—त्याचा पुनर्विवाह--५ कान्यूटची राज्यव्यवस्था–गाडविन–राज्यविस्तार—६–७ कान्यूटचें उत्तरवय व त्याची ईश्वरनिष्ठा--८ कान्यूटचा मृत्यु राज्यांतील दुफळी–राज्याचे दोन भाग व पुन्हां एकीकरण--९–१० हार्डीकान्यूट व हॅरोल्ड–कान्यूटचा निर्वंश—११ एडवर्ड इंग्रज—१२ त्याची मित्रमंडळी—नार्मन लोकांचें प्रस्थ--१३ इंग्रज व नार्मन--१४ सासऱ्याशीं भांडण—१५ वुइल्यम नार्मंडीकर—१६ सासऱ्याशीं समेट--१७ मेहुण्यांचें भांडण—१८–१९ भावी राजाची वाटाघाट--२० एडवर्डचा मृत्यु व त्याचा स्वभाव—एडवर्डचे कायदे--वेस्टमिन्स्टरचें देऊळ—२१ हॅरोल्डला राज्याभिषेक—२२ टॉस्टिगची स्वारी—२३–२४ या स्वारीचा शेवट—२५ नार्मन लोकांची स्वारी.]

१ युरोपांतील राज्यें—ज्या **ॲंग्लो–साक्सन** लोकांनीं **ब्रिटन**मध्यें येऊन वसाहती केल्या, त्यांच्याच दुसऱ्या भाऊबंदांनीं या सुमारास तिकडे खुद्द युरोप खंडामध्येंही तेथल्या मूळच्या रानटी लोकांना हुसकून लावून अगर आपल्यांत मिसळून घेऊन निरनिराळीं राज्यें स्थापिलीं होतीं. पश्चिम किनाऱ्याच्या बाजूला **स्वीडन, नार्वे, डेन्मार्क, फ्लँडर्स** (Flanders), **हॉलंड, बेल्ज्यम फ्रान्स, स्पेन,** व **पोर्तु-**

गाल (Portugal), मध्यभागीं **आस्ट्रिया-हंगेरी** (Austria-Hungary), व **स्वित्झर्लंड** (Switzerland), तसेंच उत्तरेकडे **रशिया** (Russia) वगैरे राज्यें या वेळेच्या सुमारास बरींच स्थिर झालीं होतीं. दक्षिणेकडे रोमन साम्राज्याचा अवशिष्ट भाग '**इटली**' हेंही एक स्वतंत्र राज्यच होतें. पण आतां या राज्याचें राजकीय महत्त्व कमी होऊन रोम येथें सर्व जगांतील ख्रिस्ती लोकांचें आचार्यपीठ स्थापन झालेलें असल्यामुळें त्याला धार्मिक महत्त्व मात्र अतिशय प्राप्त झालें होतें.

२ रोमचें महत्त्व—हिंदुस्तानांत हिंदु लोकांच्या दृष्टीनें काशी, रामेश्वर, पंढरपूर, बद्री-केदार वगैरे क्षेत्रांना जें महत्त्व आहे तशा प्रकारचें महत्त्व त्या काळीं तिकडे **रोम**ला होतें. भाविक ख्रिस्ती लोक रोमच्या पवित्र भूमीला पाय लागले, तेथल्या आचार्यांचें दर्शन झालें म्हणजे जन्मसाफल्य झालें असें मानीत. रोमच्या यात्रेनें सर्व पापांची निष्कृति होते अशी त्यांची दृढ समजूत झाली होती. असो.

३ इंग्लंडचा युरोपशीं संबंध—या सर्व राज्यांचें स्वरूप लहान लहान संस्थानासारखें असून त्यांत निरनिराळ्या राजवंशांच्या गाद्या स्थापन झाल्या होत्या. अलीकडे इंग्लंड व युरोपखंडस्थ इतर देश यांच्यामध्यें दळणवळण वाढून राजवंशांत परस्पर लग्नसंबंधही होऊं लागले होते. इंग्लंडचा माजी राजा **एथलरेड** याची बायको '**एमा**' (Emma) ही फ्रान्समधील '**नार्मंडी**' (Normandy) नांवाच्या एका लहानशा संस्थानच्या राजाची बहीण होती, व इ. स. १०१३ या वर्षी **स्वेन** राजानें इंग्लंड काबीज केल्यावर **एथलरेड** सहकुटुंब फ्रान्समध्यें निघून गेला होता हें मागें सांगितलेंच आहे.

४ कान्यूटचें कारस्थान—**कान्यूट**ला इंग्लंडची गादी मिळाल्यावर तो इंग्लंडच्या मुळच्या राजकुळांतला कोणी पुरुष आपल्याला त्रास देण्याला शिल्लक राहूं नये अशा तजविजीस लागला. माजी राजा **एडमंड** याचे '**एडवी**' '**एडवर्ड**' व '**आल्फ्रेड**' असे तीन भाऊ आणि '**एडवर्ड**' व '**एडमंड**' असे दोन अज्ञान मुलगे एवढे पुरुष गादीचा वारसा सांगण्यास पुढें येण्यासारखे होते. पैकीं **एडवी** हा फार लोकप्रिय होता. त्याला विश्वासघातानें ठार करण्यांत आलें. **एडवर्ड** व **आल्फ्रेड** यांना **नार्मंडी**मध्यें आजोळीं पाठवून देण्यांत आलें. त्यांची आई '**एमा**' ही जरी **कान्यूट**पेक्षां वयानें मोठी होती तरी 'माझ्यापासून तुला जीं मुलें होतील त्यांनाच इंग्लंडची गादी देऊं' असें तिला वचन देऊन **कान्यूट**नें तिजबरोबर पुनर्विवाह केला.

एडवर्ड व **एडमंड** या अज्ञान मुलांना **कान्यूट**चा सावत्र भाऊ **स्वीडन**मध्यें राज्य करीत होता त्याच्याकडे पाठवून देण्यांत आलें. पण तो थोडा पापभीरू असल्या-मुळें त्यानें या मुलांना कांहीं अपाय होऊं नये म्हणून '**हंगेरी**' देशांत '**स्टीफन**' (Stephen) नांवाचा एक धर्मशील राजा राज्य करीत होता त्याच्याकडे पाठवून दिलें. त्या ठिकाणीं **एडमंड** हा अल्पवयांतच मरण पावला. दुसरा **एडवर्ड** हा मोठा होऊन त्याचें **हंगेरी**च्या राणीच्या भाचीशीं लग्न झालें, व त्याला पुढें **एडगर अथेलिंग** (Edgar Atheling) या नांवाचा मुलगा व **ख्रिश्चियाना** (Christiana) व **मार्गरेट** ' (Margaret) अशा दोन मुली झाल्या.

५ **कान्यूटची राज्यव्यवस्था**--अशा रीतीनें कोणी शत्रु राहूं नये अशी व्यवस्था केल्यावर **कान्यूट**नें आपल्या इंग्रज प्रजेचें मन आपल्यावर बसावें असा प्रयत्न चालविला. त्यानें '**डॅनिश**' सैन्याला रजा दिली. फक्त तीन हजार **डेन्स** लोक स्वसंरक्षणासाठीं म्हणून ठेविले. राज्याचे चार भाग करून **वेसेक्स** प्रांत खास आपल्या देखरेखीखालीं ठेविला, व बाकीच्या तीन प्रांतांवर तीन बड्या सरदारांची नेमणूक केली. पैकीं एक सरदार '**गॉडविन**' [Godwin] हा जातीनें **साक्सन**च होता. या **गॉडविन**च्या सहाय्यानें त्यानें **डेन्स** व **साक्सन** लोकांचें सख्य घडवून आणलें. **साक्सन** लोकांचेच क़ायदे त्यानें चालू ठेविले. **इंग्रज** प्रजेवर विश्वास टाकून त्यांचेंच सैन्य त्यानें उभारलें व या सैन्याच्या मदतीनें **स्वीडन** व **नार्वे** हे देश काबीज केले. **स्काट-लंड**च्या **मालकम** (Malcolm) राजाकडूनहि त्यानें **स्काटलंड**वरील आपलें स्वामित्व कबूल करून घेतलें.

६ **कान्यूटचें उत्तर वय**—उत्तर वयांत हा राजा फार धर्मशील बनला होता. त्यानें **रोमची** यात्रा केली व रोममध्यें यात्रेकरूंकडून कर घेत असत त्याची इंग्रज प्रजेपुरती पोपकडून माफी मिळविली. त्यानें धर्माधिकाऱ्यांच्या मठांना मोठमोठ्या देणग्या दिल्या, देवळें बांधिलीं, व दानधर्मांत पुष्कळ पैसा खर्च केला. डेन्मार्कमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार जारीनें करविण्यास हाच कारण झाला असें म्हणतात. त्याच्या शहाणप-णाच्या व निरभिमानतेच्या पुष्कळ गोष्टी सांगतात. एकदां त्याच्या हातून रागाच्या आवेशांत एक शिपाई मारला गेला; तेव्हां त्यानें आपल्या 'रक्षकां' (Guard)समोर आपला मुकुट काढून एकीकडे ठेविला व, आपण गुन्हेगार आहों, मला काय ती शिक्षा सांगा, अशी आपल्या रक्षकांस विनंति केली. कोणी कांहींच बोलेना; तेव्हां असल्या

गुन्ह्याबद्दल जो वास्तविक दंड द्यावयाचा त्याच्या दसपट दंड त्यानें आपल्यास करून घेतला !

७ दुसऱ्या एका प्रसंगीं ' **साउदॅम्प्टन** ' (Southampton) नांवाच्या समुद्र किनाऱ्यावरील शहरीं असतांना जवळच्या दरबारी लोकांनीं त्याची फारच स्तुति केली व समुद्रसुद्धां आपला आज्ञाधारक आहे असें सांगितलें. या त्यांच्या मूर्खपणाबद्दल त्यांची कानउघाडणी करण्याकरितां त्यानें समुद्राच्या किनाऱ्यावर अपली खुर्ची नेऊन ठेवविली, व समुद्राच्या लाटा जवळ येऊं लागल्यावर त्यानें ' पुढें येऊं नका ' असा त्या लाटांना हुकूम केला ! लाटा थोड्याच पुढें यावयाच्या थांबणार ! तेंव्हां तो जवळच्या तोंडपुज्या मंडळीला उद्देशून म्हणाला. ' पाहिलेंत, आपलें मानवी सामर्थ्य किती अल्प आहे तें ? त्याची ईश्वरी सामर्थ्याशीं कधींतरी तुलना होईल काय ? ज्याच्या आज्ञा कोणालाही मोडतां येत नाहींत असा एक परमेश्वरच होय. '

८ कान्यूटचा मृत्यु—अठरा वर्षें इंग्लंडच्या राजपदाचा उपभोग घेऊन हा राजा इ० स० १०३५ या वर्षीं मरण पावला. पहिल्या बायकोपासून त्याला '**स्वेन**' (Sweyn) व ' **हॅरोल्ड** ' (Harold) असे दोन मुलगे होते. व दुसरी बायको ' **एमा** ' हिला त्याच्यापासून ' **हार्डी कान्यूट** ' (Hardy Canute) नांवाचा मुलगा व ' **गनाहिल्डा** ' (Gunhilda) नांवाची मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं होतीं. पहिल्या बायकोच्या मुलांपैकीं '**स्वेन**' हा **नार्वे**चा राजा झाला व '**हॅरोल्ड**' हा इंग्लंडच्या गादीवर हक्क सांगूं लागला. पण **कान्यूट**नें **एमा**शीं लग्न करतेवेळीं तुझ्या मुलाला इंग्लंडची गादी मिळेल असा करार केला होता. अर्थात् त्या कराराप्रमाणें ' **हार्डीकान्यूट** ' याचाच इंग्लंडच्या गादीवर खरा हक्क होता. पुन्हां राज्यांत दुफळी झाली. **डॅनिश** पुढाऱ्यांनीं **हॅरोल्ड**चा पक्ष उचलला व **एमा**, सरदार ' **गाडविन** ', व **वेसेक्स** प्रांतांतले इतर पुढारी यांनीं **हार्डी कान्यूट**चा पक्ष धरला. लढाई जुंपण्याचा रंग दिसूं लागला; पण शेवटीं ' शिष्टमंडळा'नें राज्याचे दोन भाग करून उत्तरेकडच्या मुलखावर **हॅरोल्ड**नें राज्य करावें व दक्षिणेकडील मुलुख **हार्डी कान्यूट**कडे असावा असें ठरविलें. त्यामुळें लढाईचा प्रसंग टळला.

९ हार्डी कान्यूट—यावेळीं **हार्डी कान्यूट डेन्मार्क**मध्यें होता. त्याच्या अंगांत इंग्लिश रक्त मुळीं नव्हतेंच; त्याला इंग्लंडचा अभिमान कुठून असणार? तो खुशाल **डेन्मार्क**मध्यें मजा मारीत राहिला. इकडे **एमा** व मुख्यतः **गाडविन** हीं मात्र

त्याच्या हक्कासाठीं भांडत होतीं. इतक्यांत इंग्लंडमध्यें दोन पक्ष झाले आहेत ही संधी साधून **एमा**चे पहिल्या इंग्रज नवऱ्यापासून झालेले मुलगे **एडवर्ड** व **आल्फ्रेड** हे **नार्मंडी**मध्यें होते त्यांनीं आपल्या बापाची गादी परत मिळविण्याचा उद्योग आरं-भिला. **एडवर्ड** हा थोडेंसें सैन्य घेऊन '**साउदॅम्टन**' येथें उतरला, पण आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून परत गेला. पुढें **एमा**च्या पत्रावरून **आल्फ्रेड** इंग्लंडला आला असतां **हॅरोल्ड**च्या लोकांनीं त्याचे डोळे काढून त्याला ठार मारिलें ! दरम्यान **हार्डी कान्यूट इंग्लंड**ला येत नाहीं असें पाहून 'शिष्टमंडळा'नें **हॅरोल्ड**लाच सर्व इंग्लंडचें राज्य देऊन टाकलें. पुढें **हॅरोल्ड**नें **एमा**ला हद्दपार केलें व ती **फ्लांडर्स**मध्यें निघून गेली.

१० **हॅरोल्ड राजा** इ. स. १०४० या वर्षीं मरण पावला. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. **हॅरोल्ड**च्या मरणाची बातमी ऐकून तिकडे **हार्डी कान्यूट** इंग्लंड-वर स्वारी करण्याची तयारी करीत होता तो ताबडतोब निघून आला व शिष्टमंडळानें त्याला 'राजा' म्हणून कबूल केलें. हा राजा फार जुलमी व दुष्ट निघाला. त्यानें **हॅरोल्ड**चें प्रेत उकरून काढून त्याचा शिरच्छेद करून तें टेम्स नदींत फेंकून दिलें. **गाडविन**चें **आल्फ्रेड**च्या मरणांत अंग आहे असा संशय आल्यामुळें त्याची चौकशी करण्यांत आली. पण त्याच्या बरोबरच्या सरदारांनीं त्याच्या निरप-राधीपणाबद्दल शपथा घेतल्यामुळें त्याची सुटका झाली. तरी पण तो राजाच्या मर्जी-तून उतरलाच. **हार्डी कान्यूट**नें प्रजेवर फारच जबर कर बसविल्यामुळें लोक खवळले व पुष्कळ प्रांतांतून बंडें झालीं. '**वुरसेस्टर**' (Worcester) शहरा-मध्यें कर जमा करणाऱ्या अधिकाऱ्यावर लोकांनीं हल्ला करून त्याला ठार मारलें. एक दिवस एका डॅनिश सरदाराच्या घरीं लग्नसमारंभ होता. तेथें **हार्डी कान्यूट** गेला होता. वधूच्या आयुरारोग्याप्रीत्यर्थ सुरापान चालू असतां त्याला एकदम घेरी येऊन तो खालीं पडला, व त्यांतच त्याचा अंत झाला. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. अशा रीतीनें **कान्यूट**चा निर्वंश झाल्यामुळें इंग्लंडमधील **डेन्स** राजांचें घराणें आपो-आपच नष्ट झालें.

११ **एडवर्ड इंग्रज-हार्डी कान्यूट** मरण पावला त्यावेळीं त्याचा सावत्र भाऊ म्हणजे त्याच्या आईला तिच्या पहिल्या इंग्रज नवऱ्यापासून झालेला मुलगा **एडवर्ड** हा इंग्लंडमध्यें होता. **एडवर्ड** हा इंग्रज रक्ताचा असल्यामुळें शिष्टमंडळानें मोठ्या आनंदानें त्याला इंग्लंडची गादी दिली. वास्तविक वारसाच्या हक्कानें पाहूं गेलें असतां

कान्यूटच्या पूर्वींचा इंग्रज राजा जो ' **एडमंड** ' त्याच्या मुलाचा गादीवर जास्त हक्क होता. पण त्या वेळीं तो परदेशांत होता व कोणीकडून तरी एकदां इंग्रज रक्ताचा राजा गादीवर येऊं दे अशी लोकांना उत्कंठा लागून राहिली असल्यामुळें व **एडवर्ड** हा आयता इंग्लंडमध्यें हाताशीं असल्यामुळें **एडमंड**च्या मुलाची कोणाला आठवणच झाली नाहीं व त्याचा हक्क मागें पडला.

१२ एडवर्डची मित्रमंडळी—एडवर्डला राज्यपद मिळालें तेव्हां त्याचें वय ४० वर्षांचें होतें. तो मध्यम उंचीचा पुरुष असून त्याचा चेहरा मोहक होता. लहानपणचीं २७ वर्षें **फ्रान्स** देशांत गेल्यामुळें सहाजिकच त्याला फ्रेंच रीतिभाती जडल्या होत्या. त्याचा बाप जरी इंग्रज रक्ताचा होता तरी आई **नार्मन** रक्ताची होती. बाळपण आजोळीं गेल्यामुळें त्याचे स्नेही सोबती सर्व **नार्मन**च होते. त्यामुळें आपल्या या बाळपणच्या मित्राला इंग्लंडची गादी मिळालीसें पाहून आपल्याला तिकडे मोठमोठ्या जागा मिळतील असें वाटून या मित्रांच्या झुंडीच्या झुंडी इंग्लंडमध्यें लोटल्या. व **एडवर्डनें**ही त्यांचा चांगलाच सत्कार केला. कित्येकांना मोठमोठ्या जमिनी देण्यांत आल्या, कित्येकांची मोठमोठ्या जबाबदारांच्या जागांवर नेमणूक करण्यांत आली. नार्मन 'भटजीं'ना इंग्लंडचे धर्माधिकारी नेमलें. **फ्रेंच** भाषेला महत्त्व येऊन ती दरबारी भाषा बनली, व फ्रेंचांचे शिष्ट संप्रदाय इंग्लंडांत रूढ होऊं लागले.

१३ इंग्रज व **नार्मन**—अशा रीतीनें राज्यांत **नार्मन** लोकांचें प्रस्थ बरेंच वाढलें. तेव्हां या नार्मन पाहुण्यांनीं आपल्या देशांत येऊन जिथें तिथें हातपाय पसरलेले इंग्रज लोकांना कसे पहावणार? **एडवर्ड**ला गादी मिळवून देण्यांत सरदार **गाडविन**चेच परिश्रम कारण झाले होते. पुढें **गाडविन**ची मुलगी ' **एडिथ** ' (Edith) इजबरोबर राजानें लग्न केलें, व **गाडविन**च्या मुलांना दोनचार मोठ्या जिल्ह्यांची सरदारी देऊन त्यांना फार उच्च पदाला चढविलें. किंबहुना **गाडविन** व त्याचे दोन मुलगे यांचाच यावेळीं इंग्लंडच्या जवळ जवळ निम्मे भागावर अंमल चालू होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे सरदार हाडाचे इंग्रज असल्यामुळें त्यांना राजा आपल्या **नार्मन** मित्रांचें प्रस्थ राज्यांत वाढवितो हें आवडेना. हळू हळू इंग्रज व नार्मन असे दोन विरोधी पक्ष राज्यांत उत्पन्न झाले, व त्यांच्यांत मोठी चुरस माजली.

१४ सासऱ्याशीं भांडण—एकदां राजाच्या बहिणीचा नवरा ' **युस्टेस** ' (Eustace) हा गाडविनच्या प्रांतांतून चालला असतां ' **डोव्हर** ' (Dover)

नामक शहरीं आला. त्या ठिकाणीं शहरच्या लोकांकडे त्याचे शिपाई शिधासामुग्री व दाणा वैरण मागूं लागले. शहरच्या लोकांनीं हत्यारें उचललीं, व दोन्ही पक्षांत मारामारी होऊन कित्येक लोक जखमी झाले ! '**युस्टेस**' राजदरबारीं आल्यावर त्यानें ती सर्व हकीकत तिखटमीठ लावून राजाला सांगितली व '**युस्टेस**'चा अशा रीतीनें अपमान केल्याबद्दल तुम्हीं ताबडतोब **डोव्हर**च्या रहिवाशांना शासन करा म्हणून **गाडविन**ला हुकूम सुटला ! गाडविन म्हणाला, '**युस्टेस**च्या वर्तनाबद्दल आधीं चौकशी झाली पाहिजे, त्याशिवाय **डोव्हर**च्या रहिवाशांना शासन करितां येत नाहीं. म्हणून युस्टेसला आधीं माझ्या हवाली करा'. असें न होईल तर राजाबरोबर युद्ध करण्याचीहि त्यानें धमकी दिली ! पण दुसरे **साक्सन** सरदार मध्यें पडून हा तंटा शिष्टमंडळाकडे सोंपवावा असें ठरलें. पुढें कांहीं कारणानें **गाडविन**च्या मित्रांनीं त्याच्या पक्षांतून आपलें अंग काढून घेतलें व शेवटीं **गाडविन**च्या घराण्यावर राजाची अवकृपा होऊन त्याला बंडखोर ठरविण्यांत आलें. त्यामुळें त्याला अखेर देशत्याग करावा लागला. त्याच्या मुलीला म्हणजे राजाच्या बायकोलाहि राजवाड्यांतून काढून एका संन्याशाच्या मठींत नेऊन ठेवलें. अशा रीतीनें या इंग्रजपक्षाच्या पुढाऱ्याचा पाडाव झाल्यामुळें नार्मन सरदारांना आनंद झाला, व पुन्हां नार्मन सरदारांवर पदव्यांचा व किफायतशीर अधिकारांच्या जागांचा वर्षाव होऊं लागला !

१५ वुइल्यम नार्मंडीकर—याच सुमारास एडवर्ड राजाच्या मामाचा मुलगा '**वुइल्यम**' (William) हा **नार्मंडी**हून (Normandy) राजाचा पाहुणा म्हणून इंग्लंडमध्यें आला होता. इंग्लंडमध्यें जिकडे तिकडे **नार्मन** लोकांचें प्राबल्य आहे व राजालाहि संतान नाहीं, तेव्हां पुढें मागें आपल्याला हें राज्य मिळून **नार्मंडी**मध्यें फ्रान्सच्या राजाचा '**मांडलिक**' म्हणून रहाण्यापेक्षां येथेंच स्वतंत्र राजा म्हणून रहातां आल्यास पहावें असें त्याच्या मनांत आलें. व एक दिवस संधि साधून त्यानें राजाकडे ही गोष्ट काढली. त्यावेळीं आपल्या पश्चात् इंग्लंडचें राज्य तुला मिळेल म्हणून राजानें त्याला वचन दिलें. असो.

१६ सासऱ्याशीं समेट—इंग्लंडमध्यें नार्मन लोकांचें बेताबाहेर प्रस्थ वाढत चाललें हें बरें नव्हे असें आतां लोकांना वाटूं लागलें. त्यांचा पुढारी **गाडविन** हा हद्दपार होऊन '**फ्लांडर्स**' मध्यें जाऊन राहिला होता. त्याला परत बोलावून आणावें असा लोकपक्षाच्या कित्येक पुढाऱ्यांनीं विचार केला. व त्याला परत येण्याविषयीं

निरोपावर निरोप जाऊं लागले. **गाडविन**नें राजाकडे आपल्याला इंग्लंडमध्यें परत येऊं देण्याविषयीं अर्ज केला, पण राजा ऐकेना. शेवटीं लोकांच्या सहानुभूतीवर विश्वास टाकून राजाच्या हुकुमाला न जुमानतां इ० स० १०५२ या वर्षी **गाडविन** इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर येऊन उतरला, व त्या ठिकाणीं हजारों लोक त्याला जाऊन मिळाले. युद्ध सुरू होणार असा रंग दिसूं लागला; पण राजा जात्या भित्रा व कांहींसा धर्मशील असल्यामुळें रक्तपात टाळण्यासाठीं शेवटीं त्यानें पड खाल्ली, व शिष्टमंडळाच्या सल्ल्यानें **गाडविन** व त्याचे मुलगे यांस त्यांच्या सरदाऱ्या परत देऊन राणीलाहि पुन्हां राजवाड्यांत येण्याची परवानगी दिली.

१७ **मेहुण्यांचें भांडण**—पुढल्या वर्षी गाडविन मरण पावला व त्याची सरदारी व मानमरातब त्याचा मुलगा '**हॅरोल्ड**' याला प्राप्त झाले. त्याचा दुसरा मुलगा '**टॉस्टिग**' (Tostig) याला सन १०५५ या वर्षी '**नार्दंब्रिया**'–(Northumbria)ची सरदारकी देण्यांत आली. **टॉस्टिग** हा फार जुलमी होता व त्याला आपल्या प्रांताचा बंदोबस्तही नीट ठेवतां येत नसे. तत्प्रांतस्थ लोकांना त्याचा जुलूम असह्य होऊन शेजारच्या '**मर्शिया**' (Mercia) प्रांतांतील लोकांची मदत मिळवून त्यांनीं राजाला असा निरोप पाठविला कीं, '**टॉस्टिग** हा आमच्या प्रांतावर अधिकारी नको; त्यास तुम्ही काढून टाकीत नसाल तर आम्ही तुमची सत्ता झुगारून देऊं !' राजानें **हॅरोल्ड**ला सल्ला विचारला; त्यानें लोकांचें म्हणणें कबूल करावें अशी मसलत दिली. तेव्हां अर्थातच '**टॉस्टिग**'ला राग येऊन त्यानें भावाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली, व तो **फ्लांडर्स**मध्यें निघून गेला.

१८ **भावी राजाची वाटाघाट**—राजाला संतान नसल्यामुळें पुढें राजा कोण होणार इकडे लोकांचे डोळे लागून राहिले होते. जुन्या इंग्रज राजघराण्यांतला '**एडवर्ड**' नांवाचा राजपुत्र '**हंगेरी**'मध्यें होता. त्याची आतां लोकांना आठवण झाली व त्यांनीं त्याला बोलावणें पाठविलें. तो आपली बायको व मुलें माणसें घेऊन इंग्लंडमध्यें आला. पण भवितव्यता बलीयसी ! थोड्याच दिवसांत तो एकाएकीं मरण पावला. त्याच्यामागें '**एडगर**' नांवाचा १० वर्षांचा त्याचा एक मुलगा होता.

१९ याच सुमारास **हॅरोल्ड** कोठें समुद्रांतून जात असतां त्याचें गलबत फुटलें व तो मागें सांगितलेला '**नार्मंडी**'चा सरदार '**वुइल्यम**' याच्या हातीं लागला. त्या वेळीं **वुइल्यम**नें हॅरोल्डकडून अशी शपथ घेवविली म्हणतात कीं, '**एडवर्ड**'च्या मागून इंग्लंडची गादी तुला मिळवून देण्याविषयीं मी खटपट करीन.

२० एडवर्डचा मृत्यु—इ. स. १०६५ च्या नाताळांत **एडवर्ड** राजा मरण पावला. हा एकंदरींत एक चांगला राजा होऊन गेला. तो शांततेचा भोक्ता होता. जुलूम-जबरदस्ती, लढाया, हीं त्याला आवडत नसत. पण तो कांहींसा धर्मभोळा व विरक्त (The Confessor) असल्यामुळें **इंग्रजां**सारख्या प्रवृत्तिप्रवण लोकांवर राज्य करण्यास लायक होता असें म्हणवत नाहीं. त्याच्या कारकीर्दींत **आल्फ्रेड**प्रभृति जुन्या इंग्रज राजांच्या वेळचे चांगले चांगले कायदे एकत्र करण्यांत आले होते. त्यांना पुढें बरींच वर्षेंपर्यंत 'एडवर्डचे कायदे' असें म्हणत असत. प्रसिद्ध **'वेस्टमिन्स्टर'**चें देऊळ (Westminster Abbey) हें त्यानेंच प्रथम बांधलें व त्याच ठिकाणीं त्याच्या शवाचा दफनविधि करण्यांत आला.

२१ हॅरोल्डला राज्याभिषेक—**एडवर्ड**च्या मरणानंतर आतां गादी कोणास द्यावी हा प्रश्न पुन्हां उपस्थित झाला. या वेळीं **हॅरोल्ड**चें सर्व राज्यांत फार वजन होतें, व तो शूरही तसाच होता. त्यानेंच एडवर्डच्या कारकीर्दींत **वेल्श** वगैरे लोकांनीं इंग्लंडवर स्वाऱ्या केल्या तेव्हां त्यांचा मोड करून तेथील राजांना पुन्हा करभार द्यावयास लाविलें होतें. जुन्या **इंग्रज** राजघराण्यांतला **'एडगर'** म्हणून १० वर्षांचा एक मुलगा काय तो शिल्लक राहिला होता. आणि तिकडे '**नार्मंडी**'चा सरदार '**वुइल्यम**' हा एडवर्डनें आपल्याला इंग्लंडच्या गादीचा वारस नेमलें आहे असें म्हणत होता. तेव्हां अशा या आणीबाणीच्या प्रसंगीं कोणीतरी शूर पुरुष गादी-वर असणें जरूर होतें. म्हणून **एडगर**ला एकीकडे ठेवून इंग्लंडची गादी **हॅरोल्ड**-लाच द्यावी असें शिष्टमंडळानें ठरवून त्याला राज्याभिषेकहि करण्यांत आला.

२२ टॉस्टिगची स्वारी--ही बातमी **वुइल्यम**ला समजली तेव्हां त्यानें प्रथम सामोपचारानें, पण तसें झालें नाहीं तर तरवारीच्या जोरावर, इंग्लंडची गादी मिळविण्याचा निश्चय केला व सर्व **नार्मंडी**भर इंग्लंडवर स्वारी करण्याची जोराची तयारी सुरू झाली. **हॅरोल्ड**चा भाऊ **टॉस्टिग** हा या वेळीं **फ्लांडर्स**मध्यें होता, तो भावाचा सूड घेण्याची वाट पहात होताच. शिवाय **वुइल्यम**ची बायको व **टॉस्टि-ग**ची बायको या वहिणीवहिणी होत्या. तेव्हां तिकडूनहि त्याचें **वुइल्यम**शीं नातें जडलें होतें. **वुइल्यम** इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी करीत आहे हें समजल्या-बरोबर तो लागलाच त्याला जाऊन मिळाला. आणि वुइल्यमनें त्याला पांच पंचवीस गलबतें देऊन इंग्लंडच्या किनाऱ्यावर धुमाकूळ घालण्यासाठीं त्याची रवानगी केली.

२३ या स्वारीचा शेवट—हें आरमार घेऊन '**नार्दंब्रिया**' जिल्ह्यांत उतरण्याचा **टॉस्टिगनें** प्रयत्न करून पाहिला; पण त्यांत अपयश आल्यामुळें **नार्वेचा** राजा '**हार्ड्राडा**' (Hardrada) याजकडे त्यानें मदत मागितली. तीनशें गलबतें घेऊन **टॉस्टिग** व **हार्ड्राडा** उत्तरेकडे '**यार्क**' मध्यें उतरले व तेथल्या सरदारांचा पराभव करून त्यांनीं **यार्क** काबीज केलें.

२४ यावेळीं **हॅरोल्ड** दक्षिणेकडे **वुइल्यम**च्या स्वारीचा बंदोबस्त करण्याची तजवीज करीत होता. त्याला ही बातमी समजल्यावर ढो उत्तरेकडे निघून गेला. '**स्टॅांफर्डब्रिज**' (Stamford Bridge) येथें उभय सैन्यांची गांठ पडली. **हॅरोल्ड** व **टॉस्टिग** यांची मध्यस्थामार्फत मुलाखत झाली. त्यांत **हॅरोल्डनें** लढाईला सुरवात होण्याच्या पूर्वी '**नार्दंब्रिया**'ची सरदारी **टॉस्टिग**ला देण्याचें कबूल केलें. पण नार्वेच्या राजाला काय देणार म्हणून विचारतां 'त्याला पुरण्यासाठीं इंग्लंडमधील ७ फूट—किंवा तो इतरांपेक्षां थोडा जास्त उंच असल्यामुळें थोडीशी जास्त—जमीन' असें हॅरोल्डनें उत्तर दिलें ! या उत्तरानें अर्थात्‌च तहाचें बोलणें मोडलें, आणि पुढें उभय पक्षांमध्यें लढाई होऊन तींत **टॉस्टिग, नार्वे**चा राजा **हार्ड्राडा**, व **नार्वेजियन** [Norwegian] सैन्यांतील अनेक उत्तमोत्तम सैनिक ठार मारले गेले, आणि ३०० गलबतांपैकीं अवघीं २३ गलबतें **नार्वे**ला माघारीं गेलीं !

२५ नार्मन लोकांची स्वारी—ही उत्तरेकडची लढाई आटपत आहे तोंच **नार्मन** लोक दक्षिणेकडे येऊन दाखल झाले अशी बातमी आली. **हॅरोल्ड** घाई-घाईनें दक्षिणेकडे निघून आला; पण ईश्वराच्या मनांत आतां इंग्रजांना यश द्यावयाचें नव्हतें. ५०० वर्षांपूर्वी उत्तर समुद्राच्या किनाऱ्यावर रहाणाऱ्या या **अँग्लोसा-क्सन** लोकांनीं इंग्लंडमधील ब्रिटन लोकांना जिंकून त्यांचें राज्य घेतलें व त्यांना गुलामांच्या स्थितीला आणलें; तर आतां या इंग्रजांचाहि त्यांच्याच दुसऱ्या एका शाखेच्या भाऊबंदाकडून पराभव करवून त्यांना पारतंत्र्याचीं दुःखें भोगावयास लावण्याचा ईश्वरी संकेत होता. ही गोष्ट कशी घडून आली व पुढें 'विषमप्यमृतं क्वचिद् भवेत्' या न्यायानें वाईटांतूनहि चांगलें निष्पन्न होऊन इंग्रज राष्ट्राचें एकीकरण कसें झालें तें पुढें पाहूं.

प्रकरण ९ वें

नॉर्मन लोकांची स्वारी

[१ नॉर्मंडी--२ दहाव्या शतकांतील राजनीति--३ वुइल्यमचा इंग्लंडच्या गादीवरील हक्क—४ वुइल्यमची तयारी--५ त्याची समयसूचकता--६ हॅरोल्डची तयारी--७ लढाईच्यापूर्वी—८।९ रणांगणावर—१०।११ लढाईचें वर्णन—१२ वुइल्यमचा लंडनमध्यें प्रवेश व राज्याभिषेक.]

१ नार्मंडी—फ्रान्स देशाच्या वायव्य कोपऱ्यांत पूर्वी **नार्मंडी** (Normandy) म्हणून एक लहानसें संस्थान असून तेथील संस्थानिक फ्रान्स देशच्या राजाला खंडणी देत असत. तेथील लोकांना सामान्यत्वें **नार्मन** लोक असें म्हणत. ते मूळचे **आंग्लो-साक्सन** वंशाच्याच एका शाखेंतले होते. परंतु कालांतरानें **इंग्लंड**मध्यें आलेले **आंग्लो-साक्सन** व हे **फ्रान्स**मधले **आंग्लो-साक्सन** यांच्या चालीरीति व भाषा यांमध्यें फरक पडत गेल्यामुळें आतां ते परस्परांस परके वाटूं लागले होते.

२ दहाव्या शतकांतील राजनीति—शिवाय अंतःकरणावर स्वार्थाचा पगडा बसलेला असला म्हणजे एकाच कुटुंबांतल्या सख्या भावांतसुद्धां जर वैर उत्पन्न होऊन ते एकमेकांस पाण्यांत पाहूं लागतात, तर भिन्नभिन्न राष्ट्रांतील लोक, मूळचे एकाच वंशाचे असले तरी पुढें परस्परांचे हितसंबंध भिन्न झाल्यावर त्यांच्यांत वैर उत्पन्न झाल्यास नवल नाहीं. दोन राजघराणीं शरीरसंबंधानें एकत्र निगडित झालीं असलीं तरी त्यामुळें त्यांच्या राजकीय हितसंबंधांत विरोध उत्पन्न झाला असतां भांडणें व्हावयाचीं थांबत नाहींत, हें जर आज विसाव्या शतकांतील सुधारलेल्या मनूंत सुद्धां आपल्या दृष्टीस पडतें, तर दहाव्या शतकांत, हल्लींच्या सुधारलेल्या राजनीतीचा जन्महीं होण्याचे पूर्वी, व 'बळी तो कान पिळी' हाच राष्ट्रांराष्ट्रांतील न्यायाचा कायदा असतांना, ज्याच्या मनगटांत जोर असेल त्यानें दुसऱ्या राजाचें राज्य हरण करण्यासाठीं नाना तऱ्हेच्या युक्त्या योजाव्या याबद्दल आश्चर्य वाटावयास नको.

३ वुइल्यमचा हक्क—नार्मंडीचा संस्थानिक **वुइल्यम** यानें इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क आहे हें दाखविण्यासाठीं दोन कारणें पुढें केलीं. पहिलें, माजी राजा

एडवर्ड यानें आपल्यामागें मला वारस म्हणून ठरविला आहे हें व दुसरें, जो **हॅरोल्ड** आपल्याला आतां राजा म्हणवितो त्यानेंच इंग्लंडची गादी आपल्याला मिळवून देण्याविषयीं शपथ घेतली होती हें. पण हीं दोन्ही कारणें पोकळ होतीं. कारण **एडवर्डनें वुइल्यमला** आपला वारस म्हणून ठरविलें हें जरी क्षणभर गृहीत धरलें तरी **एडवर्डला** वारस नेमण्याचा अधिकार दिला कोणी ? जुन्या परंपरेप्रमाणें राजाची नेमणूक करण्याचा अधिकार शिष्टमंडळाचा होता. त्याचप्रमाणें **हॅरोल्डच्या** शपथेची गोष्ट

विजयी वुइल्यम.



अगोदर खरी होती कीं नाहीं हीच शंका होती, व खरी असली तरी बोलून चालून अडचणीच्या वेळीं **हॅरोल्ड वुइल्यमच्या** तावडींत सांपडला असतां प्राणरक्षणासाठीं त्यानें शपथ दिली असली पाहिजे हें कोणालाही समजण्यासारखें होतें. शिवाय यावेळीं इंग्रज लोकांनीं **नार्मन** लोकांचा अगर राजांचा कोणताहि अपराध केला नव्हता. मिळून **वुइल्यमला इंग्लंडवर** स्वारी करण्याला कायदेशीर कारण फारच थोडें होतें. त्याची महत्वाकांक्षा व राज्यलोभ यामुळेंच तो स्वारी करण्यास प्रवृत्त झाला असें म्हटलें पाहिजे. असो.

४ **वुइल्यमची तयारी—वुइल्यम** जात्या फार शूर, धाडसी व समयसूचक होता. इंग्लंडवर स्वारी करण्याचा त्याचा बेत आहे हें ऐकून सर्व **नार्मंडी**मधून व **नार्मंडीच्या** बाहेरच्या प्रांतांतूनहि शूर शिपाई त्याच्या निशाणाभोंवतीं गोळा झाले. **इंग्लंड** जिंकल्यावर तुम्हांला तेथील मोठमोठ्या जमिनी मिळतील,

सुंदर सुंदर कन्या तुमच्या बायका होतील, वगैरे पुष्कळ प्रकारच्या आशा **वुइल्यमनें** त्यांना लाविल्या. हां हां म्हणतां सैन्याची संख्या साठ हजारांवर गेली. या सैन्याला **इंग्लंड**मध्यें पोंचविण्यासाठीं आठशें गलबतें तयार करण्यांत आलीं. **हॅरोल्डनें** आपली शपथ मोडून धार्मिक गुन्हा केला आहे, असें सर्व ख्रिस्ती लोकांच्या **रोम**मधील मुख्य आचार्याला–पोपला–सांगून इंग्लंडवर स्वारी करणें न्यायाचें आहे व या स्वारींत आपल्याला यश येवो असें त्याजकडून आशीर्वादपत्र आणण्यांत आलें. या आशीर्वादपत्रासोबत पोपनें आपली संमतिदर्शक मंतरलेली आंगठी व निशाणहि पाठवून दिलें!

५ त्याची समयसूचकता—सर्व लोकांचीं मनें उत्साहानें भरून गेलीं. इ० स० १०६६ च्या सप्टेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस **हॅरोल्ड** राजा उत्तरेकडे लढाईंत गुंतला असतां हें सर्व **नार्मन** सैन्य कांहींएक अडथळा न होतां **इंग्लंड**च्या दक्षिण किनाऱ्यावर उतरलें. **वुइल्यम** किनाऱ्यावर उतरत असतां तोल जाऊन पुढें पडला; तेव्हां हा अपशकुन झाला असें त्याच्या बरोबरची मंडळी कुजबुजूं लागली; तोंच **वुइल्यम** आपल्या नेहमींच्या समयसूचकतेनें म्हणाला ' हा पहा, मी आपल्या दोन्ही हातांनीं इंग्लंडचा ताबा घेतला ! "

६ हॅरोल्डची तयारी—वुइल्यमचें सैन्य इंग्लंडमध्यें उतरल्याची बातमी समजल्याबरोबर **हॅरोल्ड** त्वरेनें दक्षिणेकडे निघून आला. नुकत्याच **टॉस्टिग**-बरोबर झालेल्या लढाईंत त्याचे पुष्कळसे सैनिक कामास आले होते व उरलेले फार थकून गेले होते. त्याच्याबरोबरच्या सरदारांनीं कांहीं दिवस वाट पाहून इंग्लंडमधील सर्व सैन्य एकत्र जमवून मग लढाई द्यावी अशी सल्ला दिली. त्याचा भाऊ '**गिर्थ**' (Gyrth) यानें आपण थोडेंसें सैन्य घेऊन पुढें जाऊन नार्मन लोकांवर हल्ला करतों तोंपर्यंत तुम्हीं मागें सर्व सैन्याची नीट जमवाजमव करून मग एकदम चहूं बाजूंनीं लढाई करावी असें सुचविलें. पण **हॅरोल्ड** थोडासा उतावळा असल्यामुळें त्याला या दोन्ही गोष्टी पसंत पडल्या नाहींत. त्यानें अचानक एकदम शत्रूवर छापा घालून एकदां सोक्षमोक्ष करून घ्यावयाचा असें ठरविलें. पण अनुभवांतीं हें अशक्य आहे असें आढळून आल्यावर तो मागें फिरला व '**हेस्टिंग्ज**' (Hastings) येथें **वुइल्यम**चा तळ पडला होता तेथून सहासात मैलांवर असलेल्या '**सेनलाक**' (Senlac) नांवाच्या डोंगरावर त्यानें आपली मजबूत ठाणेबंदी केली.

७ लढाईच्या पूर्वी—वुइल्यम 'हेस्टिंग्ज' येथून आपला तळ हालवून थोडासा पुढें सरला; व एका ' जोग्या 'कडे त्यानें हॅरोल्डला निरोप सांगून

पाठविला. त्या निरोपांत ' **इंग्लंड**चीं गादी ताबडतोब आपल्या हवालीं करावी; या वादाचा निकाल पोपकडे सोंपवावा; नाहीं तर द्वंद्वयुद्ध करून वाद मिटवावा ' अशा तीन मागण्या वुइल्यमनें हॅरोल्डकडे केल्या होत्या. **हॅरोल्ड** स्वभावानें उतावळा असला तरी द्वंद्वयुद्धाचा परिणाम काय होईल अगर पोप काय निकाल देईल हें न समजण्याइतका कांहीं मूर्ख नव्हता. त्यानें या तीनहि मागण्या नाकबूल केल्या. पुन्हां **वुइल्यम**कडून निरोप आला कीं, **इंग्लंड**ची गादी ताबडतोब माझ्या हवालीं करीत असशील तर **हंबर** (Humber) नदीच्या उत्तरेकडील मुलूख तुला देईन व तुझ्या बापाची जहागीर तुझ्या भावाला मिळेल. हेंहि नाकबूल झाल्यावर पोपनें तुम्हांला बहिष्कार घातला आहे अशाबद्दलचें तयारच असलेलें पोपचें आज्ञापत्र (Papal bull) **हॅरोल्ड**कडे पाठवून देण्यांत आलें. पोपची ही अवकृपा पाहून त्यावेळच्या धर्मभोळ्या इंग्रज शिपायांच्या मनांत थोडा वेळ दहशत बसली; पण देशभक्तीच्या ज्योतीनें लौकरच पेट घेऊन पोपनें घातलेली भीति नाहींशी केली, व सर्व इंग्रज सेना प्राणांतापर्यंत लढण्याच्या निश्चयानें तयार झाली !

८ रणांगणावरः—' सेनलाक ' टेंकडीच्या समोरच्याच पण किंचित् सखल अशा एका टेंकडीवर **वुइल्यम**नें आपलें सैन्य जमविलें. इ. स. १०६६ च्या आक्टोबरच्या १३ तारखेला दोन्ही सैन्यांची कडेकोट तयारी झाली. त्या दिवशीं रात्रीं नार्मन सैन्यानें आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें उपास करून मनोभावानें परमेश्वराची प्रार्थना केली. इकडे इंग्लिश सैन्य त्यावेळीं दारूचे पेले झोंकून गाण्याबजावण्यांत गर्क झालें होतें. थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर आक्टोबरची १४ वी तारीख उजाडली आणि समोरासमोरच्या दोन टेंकड्यांवर उभय शत्रुसैन्यें शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज असलेलीं दिसूं लागलीं. इंग्रज सेनेंतील शिपायांकडे त्या वेळचें राष्ट्रीय हत्यार परशु हें होतें. त्यांच्यांत घोडेस्वार वगैरे नव्हते. छातीवर ढाली लटकावून हे शिपाई एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे होते. पुढच्या बाजूला लांकडांच्या ओंड्यांचा अभेद्य कोट रचलेला होता. मध्यभागीं वीरचिन्हांकित इंग्रजांचें निशाण फडकत होतें. लंडनचे नागरिक राजाचे रक्षक बनले होते. आघाडीला **केंट** (Kent) परगण्यांतील लोक होते. कारण कोणत्याहि इंग्लिश लढाईंत शत्रुसैन्यावर पहिला मारा करण्याचा मान त्यांजकडे असे. ठिकठिकाणीं इंग्रज शेतकऱ्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या आपल्या जन्मभूमीचें रक्षण करण्यासाठीं गोफणी व सुळके घेऊन मुख्य सैन्याला शक्य त्या रीतीनें मदत करण्यासाठीं जमा झाल्या होत्या.

९ तिकडे **नार्मन** सैन्यांत मुख्य सेनेचे तीन विभाग दिसत होते. सर्वांच्या पुढें तिरंदाजी लोक व त्यांच्यामागें चिलखत घातलेले घोडेस्वार उभे होते. या घोडेस्वारांचें सेनापतित्व खुद्द **वुइल्यम**कडे होतें. लढाईला सुरवात करण्यापूर्वी **वुइल्यम**नें प्रथम प्रसंगाला उचित असें भाषण करून इंग्रज लोकांच्या गलबतांनीं आपली **नार्मंडी**कडे परत जाण्याची वाट अडवून धरलेली असल्यामुळें आज जय मिळाला तरच तुमची धडगत आहे असा आपल्या सैन्याला इशारा दिला ! नंतर तो आपलें चिलखत अंगावर चढवूं लागला असतां घाईंत चुकून मागची बाजू पुढें झाली. हा दुसरा अपशकुन झाला म्हणून **नार्मन** सरदारांची मुद्रा गडबडल्यासारखी दिसूं लागली. आपली चूक वुइल्यमच्या लक्षांत येतांच तो चटकन् म्हणाला, ' पाहिलेंत ? आजपासून मी ' सरदारा'चा ' राजा ' झालों !

१० लढाईचें वर्णन—सकाळचे नऊ वाजतां नार्मन शिपाई आपली टेंकडी सोडून मधल्या दरींतून **सेनलाक** टेकडीवर चढूं लागले. इंग्रज सेनेशीं भिडतांच दोन्ही बाजूंला कापाकापी सुरू झाली व रणघोष ऐकूं येऊं लागले. इंग्रज सेना उंचावर असून नार्मन शिपायांना त्यांच्या रांगा फोडून पुढें घुसावयाचें होतें; परंतु इंग्रजांनीं आपल्या परशूंचा असा सपाटा चालविला कीं, हजारों **नार्मन** शिपायांचीं भिंतीवर डोकें आपटून घेतल्याप्रमाणें अवस्था होऊन ते भराभर खालच्या दरींत पडूं लागले. नार्मन घोडेस्वारांनीं निकराचा प्रयत्न करून पाहिला, पण व्यर्थ ! शेंकडों घोडेस्वार दरींत पडून त्यांच्या अंगावरच्या चिलखतांच्या ओझ्यानेंच चेंगरून मेले ! इतक्यांत **हॅरोल्ड**चा भाऊ **गिर्थ** याचा भाला **वुइल्यम**च्या घोड्यास लागून **वुइल्यम** बेशुद्ध होऊन खालीं पडला ! ' वुइल्यम पडला ! ' अशी नार्मन सैन्यांत हाकाटी झाली व नार्मन सैन्य पळ काढण्याच्या बेतांत आलें; पण तितक्यांत **वुइल्यम** वर उठला व दुसऱ्या घोड्यावर बसून आणि आपलें शिरस्त्राण काढून घेऊन तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, ' हा पहा मी येथें आहें ! ' तेव्हां पुन्हां नार्मन सैन्याच्या जिवांत जीव आला.

११ या सुमारास दुपारचे तीन वाजले होते. सहा तासपर्यंत **नार्मन** घोडेस्वारांनीं शिकस्त केली तरी इंग्रज सेना आपल्या जागेवरून तिळमात्र हालली नाहीं. तेव्हां **वुइल्यम**नें एक युक्ति योजली व ती साधली. त्यानें आपल्या घोडेस्वारांना आपण पळून जात आहों अशी बतावणी करण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें ते मागें सरूं लागले असतां इंग्रज शिपाई त्यांचा पाठलाग करण्यासाठीं आपली जागा सोडून खालीं उतरूं लागले. त्यांना बरेचसे खालीं उतरूं दिल्यावर **नार्मन** सैन्य एकदम परत

फिरलें व नार्मन तिरंदाज बाणांचा वर्षाव करूं लागले. एक तीर **हॅरोल्ड**च्या उजव्या डोळ्याला लागून अगदीं बुब्बुळापर्यंत जाऊन रुतला. तो जोरानें बाहेर काढून त्यानें आपलें रक्तबंबाळ झालेलें तोंड आपल्या ढालीवर टेकलें. त्याला भयंकर वेदना होत होत्या. चहूं बाजूनीं **नार्मन** सैन्याकडून इंग्रज सेनेचा संहार चालला होता. अभिमान व चिकाटी या गुणांत इंग्रज सेना कोणाला हार जाणारी नव्हती; परंतु नार्मन सैन्याची शिस्त, कवाईत, श्रेष्ठ प्रतीचीं हत्यारें व युद्धाचे डावपेंच यांच्यापुढें अखेर त्यांचा निभाव लागेना. हजारों इंग्रज शिपाई मारले गेले. **हॅरोल्डचे** दोघे बंधु रणांगणीं पडले. शेवटीं राजाचा बचाव करण्यासाठीं व निशाण सांभाळण्यासाठीं निवडक लोक **हॅरोल्ड**सभोंवतीं एकत्र जमा झाले. तिकडे **नार्मन** सरदारांपैकीं कित्येकांनीं इंग्लिश निशाणावर हल्ला करून तें काबीज करण्याचा विडा उचलला व ते जोरानें पुढें घुसले. त्यांतले दहा तर वाटेंत पडलेच, पण उरलेल्या दहांनीं अखेर निशाण काबीज केलें! हॅरोल्ड जवळच मरून पडलेला होता! झालें; राजा व बहुतेक मोठमोठे सरदार पडल्यामुळें इंग्रजांत कोणी सेनानीच राहिला नाहीं; व पळापळ सुरू झाली! **नार्मन** शिपाई मागें लागले. अखेर काळोख पडून दिसेनासें झाल्यावर त्यांनीं पाठलाग करण्याचें सोडून दिलें. ही लढाई इतिहासांत '**हेस्टिंग्ज**'ची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे.

१२ वुइल्यमचा लंडनमध्यें प्रवेश—दुसऱ्या दिवशीं उरलेसुरलेले इंग्रज सरदार लंडनमध्यें जमा झाले. 'शिष्टमंडळा'ची सभा भरली; व त्यांनीं जुन्या राजघराण्यांतील अवशिष्ट राजपुत्र '**एडगर अथेलिंग**' याला राजा निवडलें पण लवकरच मतभेद उत्पन्न होऊन एकीची बेकी झाली व सर्वांना दाबांत ठेवण्याला समर्थ असा कोणीच पुढारी नसल्यामुळें सगळेच शहाणे होऊन बारभाई माजली! '**एडविन**' (Edwin) आणि '**मॉरकर**' (Morcar) या नांवाचे उत्तरेकडील दोन प्रमुख सरदार होते. ते दक्षिणच्या सरदारांना तुम्ही वाटेल तें करा असें सांगून लंडनहून आपल्या प्रांतीं निघून गेले. '**वुइल्यम**'ला शिष्टमंडळाच्या ह्या कृत्याचा राग येऊन तो दक्षिणेकडील प्रांतांत जाळपोळ करीत **लंडन**पर्यंत येऊन ठेपला व **नार्मन** घोडेस्वारांनीं **लंडन**ची नाकेबंदी करून बाहेरून शिपाई अगर अन्नसामुग्री आंत जाण्याचें बंद करून टाकलें! अंगांत हुरूप नाहीं, कोणी पुढारी नाहीं, विजयी शत्रु दाराशीं येऊन ठेपलेला व अन्नसामुग्री संपल्यामुळें दुष्काळानें उपासमार होण्याची पाळी आलेली, अशा स्थितींत शूर इंग्रज झाले तरी काय करणार? **लंडन**चे **प्रमुख** रहिवासी व कांहीं इंग्रज सरदार '**एडगर अथेलिंग**'ला बरोबर घेऊन **वुइ-**

ल्यमला जाऊन भेटले व त्याला इंग्लंडची गादी देऊन टाकून ' आजपासून आम्ही तुमचे अंकित आहों, ' असें त्यांनीं **वुइल्यम**शीं कबूल केलें. उलटपक्षीं **वुइल्यमनें** ' आम्ही तुमच्या कायद्यांना मान देऊं व तुमचे जुने हक्क शाबूत राखूं ' असें वचन दिलें. पुढें डिसेंबरच्या २४ व्या तारखेस नाताळच्या सुमुहूर्तावर **वुइल्यमनें** आपल्यास विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला. अशा रीतीनें इंग्रजांचे जुनें राजघराणें नामशेष होऊन इंग्लंडमध्यें एका नवीन राजघराण्याची स्थापना झाली.

प्रकरण १० वें.

पारतंत्र्य !

(इ. स. १०६६–इ. स. १०८७)

[१।२ वुइल्यमचा मुत्सद्दीपणा—३ तो नार्मंडीला परत जातो—४ त्याच्या गैरहजिरींतील कारभार व इंग्रजांवरील जुलूम—५।६ बंडखोर इंग्रज—त्यांचें पारिपत्य व पुन्हा स्थिरस्थावर—७ इंग्रजांची दुर्दशा—८ हेरवर्ड—९ स्काटलंडचें मांडलिकत्व—वुइल्यमचें नार्मंडीस प्रयाण—१० राज्यविभागणीचा कट—११ फ्यूडल सिस्टिम ऊर्फ जहागिरीची पद्धति—१२।१३ जहागिरदारांची सांखळी—१४ श्रेष्ठ परिषद—१५ नोंदबुक—१६ करफ्यू बेल—१७ शिकारीचें अरण्य—१८ धर्मव्यवस्था—१९ न्यायाधीश—२० वुइल्यमचा मृत्यु व राज्याची वांटणी—२१ वुइल्यमचा दफनविधि—२२ वुइल्यमचा स्वभाव.]

१ वुइल्यमचा मुत्सद्दीपणा—वुइल्यमला ' इंग्लंडचा राजा ' म्हणून राज्याभिषेक झाला खरा, पण सर्व **इंग्लंड** देश खरोखर त्याच्या अंमलाखालीं याव-याला अजून बराच अवकाश होता. उत्तरेकडील सरदार अद्याप पूर्णपणें त्याचे 'अंकित' झाले नव्हते. शिवाय, **इंग्रजां**चा स्वदेशाभिमानहि लवकर मावळून जाण्यासारखा नव्हता. पण **वुइल्यम** जसा उत्तम सेनानी तसाच चांगला मुत्सद्दीहि असल्यामुळें प्रजेची संतुष्टताच आपल्या राज्याला बळकटी आणील हें ओळखून त्यानें आपल्या प्रजेच्या मनांत आपल्याविषयीं प्रीति उत्पन्न करण्याचा उपक्रम केला.

२—आपण इंग्लंडचें राज्य तरवारीच्या जोरावर मिळविलें नसून माजी राजा ' **एडवर्ड** ' याचा ' दत्तक ' वारस म्हणूनच मी राज्य करावयास आलों आहें असें

त्यानें सांगितलें. जुन्या इंग्रज कायद्यांचा व रूढींचाच अंमल त्यानें सुरू ठेवला व **नार्मन-इंग्रज** बेटी व्यवहाराला उत्तेजन दिलें. मात्र खरी सत्ता अशी इंग्रजांच्या हातांत त्यानें ठेविली नाहीं. सर्व मोठमोठ्या अधिकारांच्या जागांवर त्यानें आपल्या नार्मन मित्रांची योजना केली. **हॅरोल्ड**च्या व **इंग्रज** राजांच्या खास मालकीच्या म्हणून ज्या जमिनी होत्या त्या त्यानें आपल्याकडे ठेवून बाकीच्या आपल्या सरदारांस वांटून दिल्या. **लंडन, डोव्हर** वगैरे महत्त्वाच्या शहरांची तटबंदी करून त्यांत नार्मन सैन्य ठेविलें. **इंग्लंड**मधील सुंदर सुंदर वस्तु नेऊन त्यानें **नार्मंडीं**तील देवळें सुशोभित केलीं. **पोप**च्या आशीर्वादानें आपल्याला **इंग्लंड**ची गादी मिळाली म्हणून पोपलाही त्यानें बहुमोल नजराणा पाठवून दिला.

३ नार्मंडीला प्रयाण—राज्याभिषेक झाल्यावर तीन महिन्यांनीं सरासरी स्थिरस्थावर झालेसें पाहून प्रमुख प्रमुख इंग्रज सरदार—जे आपल्या-मागें कांहीं उपद्व्याप करतील असें त्याला वाटलें त्यांना—बरोबर घेऊन व व आपला सावत्र भाऊ '**ओडो**' (Odo) व '**वुइल्यम फिटझ्‍ आसबर्न**' (William Fitz-Osbern) नांवाचा दुसरा एक सरदार यांजवर **इंग्लंड**चा राज्यकारभार सोंपवून **विलियम** नार्मंडीला परत गेला.

४ गैरहजेरींतील कारभार—या राजप्रतिनिधींच्या अंगीं **वुइल्यम**चा दूरदर्शीपणा अगर मुत्सद्देगिरी मुळींच नव्हती. इंग्रज लोक हे 'जित' लोक म्हणून ते त्यांना तुच्छ लेखूं लागले. अर्थात् त्यांच्या हाताखालचे अधिकारी व **नार्मन** शिपाईहि इंग्रज लोकांशीं तसेच उद्धटपणानें वागूं लागले. **इंग्रज** लोकांचीं घरें लुटलीं जाऊं लागलीं. त्यांच्या स्त्रियांचा उपमर्द होऊं लागला. अखेर लोक अतिशय खवळून जिकडे तिकडे 'नार्मन लोकांचा निःपात करा' म्हणून ओरड सुरू झाली, व ठिकठिकाणीं दंगे-धोपे होऊं लागले. त्यावर नार्मन अधिकाऱ्यांनीं अधिकच जुलूम चालविला. पण एका ठिकाणीं बंडाचा थोडासा उपशम व्हावा तोंच दुसरीकडे वणवा पेटावा असें होऊं लागलें.

५ बंडखोर इंग्रज—**वुइल्यम**ला ही बातमी समजतांच तो **नार्मंडी**हून तावडतोब निघून आला व कडक उपाय योजून या 'बंडखोर इंग्रज' लोकांना चिरडून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. **आक्सफर्ड** (Oxford), **वॉर्विक** (Warwick), **डर्बी** (Derby), **लिंकन** (Lincoln) वगैरे ठिकाणचीं बंडें मोडून टाकून व त्या ठिकाणीं किल्ले बांधून त्यांत नार्मन शिबंदी ठेवण्यांत आली.

६ उत्तरेकडे ' **एडविन** ' (Edwin) व ' **मारकर** ' (Morcar) यांनींहि बंड केलें होतें. त्यांचा मोड करून **वुइल्यम**नें त्यांना शरण यावयास लावलें. तिकडचा सर्वांत मोठा **यार्क** जिल्हाहि **वुइल्यम**च्या स्वाधीन झाला. तेव्हां तेथले मुख्य मुख्य सरदार स्काटलंडचा राजा **मालकम** (Malcolm) याजकडे आश्रयार्थ गेले. **मालकम**नें त्यांना मदत करण्याचें कबूल केलें. शिवाय डेन्स लोकांकडूनहि त्यांनीं मदत मिळविली. त्यांचीं दोन अडीचशें गलबतें **हंबर** (Humber) नदींतून वर सरलीं व या एकत्र झालेल्या सैन्यानें ' **यार्क** 'ला वेढा घालून तें घेतलें आणि तेथल्या **नार्मन** शिबंदीला ठार मारिलें.

७ **इंग्रजांची दुर्दशा**—वुइल्यम पुन्हां उत्तरेकडे चाल करून गेला. त्यानें डेन्स लोकांशीं कांहीं करार करून त्यांना मागें परतवलें, आणि मग या **इंग्रज** ' बंडखोरां'चा त्यानें भयंकर रीतीनें सूड घेतला. त्यानें गांवचे गांव जाळून टाकले, शेतकऱ्यांची कत्तल केली, व पिकांचा नाश करून टाकला. उरलेसुरले लोक उपासानें मेले. सुमारें ६० मैलांचा प्रदेश ओस पडला. ज्या ज्या लोकांनीं **नार्मन राजा**विरुद्ध बंड केलें होतें त्यांची मिळकत जप्त करण्यांत येऊन ती **नार्मन** शिपायांना वांटून देण्यांत आली. कोणाहि इंग्रजाकडे कसलीच सत्ता असूं नये असें ठरविण्यांत आलें. त्यांचे मान मरातब व पदव्या काढून घेण्यांत आल्या. इंग्रज जोग्यांचे मठ लुटण्यांत आले. इंग्रज ग्रामोपाध्ये व धर्माधिकारी काढून टाकून त्यांच्या जागा **नार्मन** ' ब्राह्मणां'ना देण्यांत आल्या. इंग्लंडच्या मुख्य धर्मगुरूची गादी ' **कॅन्टरबरी**' (Canterbury) नामक शहरीं होती ती '**लांफ्रांक**' (Lanfranc) नांवाच्या ' **इटालियन** ' (Italian) धर्माधिकाऱ्याला देण्यांत आली. **इंग्रज** जमीनदार वर्ग लुप्त होत जाऊन त्यांच्या जागीं **नार्मन** जहागिरदार आले. अशा रीतीनें सर्व इंग्रज प्रजा जुलुमानें गांजली गेली. **नार्मन** लोकांच्या अंमलाखालीं रहाण्यापेक्षां अरण्यवास बरा असें इंजग्र लोकांना वाटूं लागलें, आणि ज्यांच्या हातच्या जमिनी गेल्या होत्या अशा कित्येक जमीनदारांनीं खरोखरच अरण्याचा आश्रयहि केला !

८ **हेरवर्ड**—अशा या ' हद्दपार ' झालेल्या जमीनदारांत ' **हेरवर्ड** ' (Hereward) नांवाचा एक शूर व मानी सरदार होऊन गेला. त्यानें '**इलाय**' (Ely) नांवाच्या सभोंवती दलदल असलेल्या एका बेटांत आपलें आश्रयस्थान स्थापन केलें. त्या ठिकाणीं '**मारकर**' वगैरे पुष्कळ स्वदेशाभिमानी व दुःखानें गांजलेले इंग्रज लोक त्याला येऊन मिळाले. त्यांच्या सहाय्यानें त्यानें पुष्कळ दिवसपर्यंत **नार्मन**

लोकांशीं गनिमी काव्याची लढाई चालवून **नार्मन** लोकांना सळो का पळो करून सोडलें. पण शेवटीं त्या बेटांतल्याच कित्येक जोगयांनीं विश्वासघात करून ती जागा **नार्मन** लोकांस दाखविली. **हेरवर्ड** पळून गेला, पण त्या आश्रयस्थानांतले पुष्कळ लोक **वुइल्यम**च्या हातीं लागले. त्यांस त्यानें जन्मभर कैदेंत ठेवलें.

९ स्काटलंडचें मांडलिकत्व—इंग्रज लोकांचा बंदोबस्त केल्यावर **स्काटलंड**च्या राजानें इंग्रजांना मदत केली होती त्याची खोड मोडण्यासाठीं **वुइल्यमनें** **स्काटलंड**वर स्वारी केली, व त्याजकडून आपलें स्वामित्व कबूल करून घेऊन तो परत आला. अशा रीतीनें **इंग्लंड**, **स्काटलंड** व **वेल्स** हे तीन्ही प्रांत पूर्णपणें ताब्यांत आल्यावर व आतां स्थानिक बंडाची भीति उरली नाहीं असें पाहून **वुइल्यम** इ० स० १०६९ त पुन्हां **नार्मंडी** येथें गेला.

१० राज्यविभागणीचा कट—वुइल्यम नार्मंडींत असतां इकडे त्याच्या नार्मन सरदारांनीं इंग्लंडचें राज्य आपसांत वांटून घेण्याचा कट केला. या कटाची बातमी ' **वालदाफ** ' (Waltheof) या नांवाचा एकच विश्वासू **इंग्रज** सरदार **वुइल्यम**च्या मर्जींतला होता; त्यानें **वुइल्यम**ला कळविल्यामुळें त्या कटवाल्यांना शिक्षा झाल्या. पुढें खुद्द ' **वालदाफ** ' हाच त्या कटांत सामील होता अशा आरोपावरून त्यास एक वर्ष कैदेंत ठेवून सन १०७५ या वर्षी फांशी देण्यांत आलें !

११ फ्यूडल सिस्टिम—वुइल्यम इंग्लंडचा राजा झाल्यावर बंडाच्या आरोपावरून अगर इतर कांहीं ना कांहीं कारणांमुळें मूळच्या इंग्रज सरदारांच्या व जमीनदारांच्या जमिनी जप्त होऊन त्या **नार्मन** लोकांना देण्यांत येत असत, हें वर सांगितलेंच आहे. **वुइल्यमनें** **इंग्लंड**मध्यें जमीन धारण करण्याचा एक नवीन प्रकार (Feudal System) सुरू केला. या पद्धतीप्रमाणें राजा हा राज्यांतील सर्व जमिनीचा मालक, त्याला वाटेल त्यास वाटेल ती जमीन तोडून देण्याचा अधिकार असे. अशा रीतीनें ज्याला राजा जमीन देई तो राजाचा '**जहागीरदार**' झाला. त्यानें आपल्या जहागिरीचा मोबदला म्हणून राजा बोलावील तेव्हां आपल्या हाताखालचे सैनिक घेऊन राजाबरोबर लढाईस जावयाचें व विशेष प्रसंगीं राजाला नजर नजराणा द्यावयाचा. हा जहागीरदार मयत झाल्यावर त्याच्या वारसाच्या नांवें जहागीर होण्यासाठींहि राजाला बराच नजराणा द्यावा लागे. कोणाला आपली जहागीर राजाच्या परवानगीशिवाय गहाण अगर खरेदी देतां येत नसे. एखादी जहागीर बेवारसी ठरल्यास अगर एखाद्या जहागीरदारानें राजद्रोह केल्यास त्याची जहागीर जप्त होऊन ती राजाकडे परत येत असे. एखादा जहा-

गीरदार अज्ञान असल्यास त्याच्या जहागिरीची व्यवस्था त्याच्या धन्यानें म्हणजे राजानें पहावयाची व त्याचें पालनहि त्यानेंच करावयाचें. जहागीरदारांचे लग्नसंबंध राजाच्या संमतीशिवाय होत नसत. व तशी परवानगी न घेतां कोणी लग्न केल्यास दंड द्यावा लागे. अशा तऱ्हेचे हे जहागिरीसंबंधाचे अधिकार व कर्तव्यें असत.

१२ जहागिरदारांची सांखळी—मोठ्या जहागिरदाराला वरील अटींवरच आपल्या जहागिरी **पोट जहागिरदारांना** देण्याचा अधिकार असे; व हे पोट जहागिरदार आपापले हिस्से त्याच अटींवर आपल्या 'कुळां'ना विभागून देत असत. अशा रीतीनें वर राजापासून खालीं प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळापर्यंत व गुलामांपर्यंत ही सांखळी लागून गेलेली असे. प्रत्येक जमीन धारण करणारानें जमीन कबजांत घेतांना आपल्या लगतच्या वरिष्ठ धन्यापुढें शिरस्त्राण काढून गुढघे टेकून हात जोडावयाचे व आपण बोलवाल त्या वेळीं नोकरीला हजर राहीन अशी शपथ घ्यावयाची, मग त्या धन्यानें जमीन आपल्या या ' कुळा 'च्या ताब्यांत द्यावयाची असा हा प्रकार असे.

१३ जहागिरीची ही पद्धति त्यावेळीं **फ्रान्स** देशांतही चालू होती. स्वतः **वुइल्यम**ही अशाच तऱ्हेचा **फ्रान्स**च्या राजाचा जहागीरदार होता. तेव्हां त्यानें तीच पद्धति थोड्या फरकानें इंग्लंडांत सुरू केली. फरक असा केला कीं, **फ्रान्स**मध्यें प्रत्येक 'कुळ' आपल्या लगतच्या वरिष्ठ धन्यालाच जबाबदार असे; पण **वुइल्यमनें** 'पोट कुळें' हीं लगतच्या वरिष्ठ धन्याला जबाबदार राहून शिवाय तीं राजालाहि जबाबदार आहेत असें ठरविलें. म्हणजे प्रत्येक कुळानें राजाचा हुकूम आधीं मानावयाचा व त्यांचे खालोखाल आपल्या लगतच्या वरिष्ठ धन्याचा. त्याचप्रमाणें कोणीहि जहागीरदार प्रबल होऊं नये म्हणून वुइल्यमनें या जहागिरी कोणालाही एकाच ठिकाणीं सलग अशा न देतां त्या निरनिराळ्या जिल्ह्यांत वांटून दिल्या होत्या. असो.

१४ श्रेष्ठ परिषद—इंग्लंडमध्यें ही जहागिरी पद्धति चालू झाल्यावर अर्थातच जुने इंग्रज जमीनदार नष्ट झाले. जे या नवीन राजाचें स्वामित्व पत्करून राहिले त्यांच्या जमिनी **वुइल्यमनें** त्यांना परत दिल्या. पण आतां त्यांचा मूळचा स्वतंत्र जमीनदार-पणा जाऊन ते राजाच्या मेहरबानीनें उत्पन्न झालेले व त्याचे 'अंकित' असे जहागी-रदार बनले. पूर्वीचें ' शिष्टमंडळ ' गेलें. त्याच्या जागीं जुनी पद्धत कायम ठेवण्या-साठीं म्हणून आपल्या नवीन जहागीरदारांचें एक मंडळ वुइल्यमनें निर्माण केलें व या मंडळाला ' श्रेष्ठ परिषद ' (The great council) असें नांव दिलें. ही परिषद राजाच्या हुकमानें बोलावली जाई व राजाच्या मर्जीबाहेर जाण्याचें धाष्टर्य तिच्या हातून क्वचितच होत असे.

१५ **नोंदबुक**—वुइल्यमनें आपल्या राज्यांतील सर्व जमिनींची पहाणी करवून व कोणती जमीन काय मगदुराची आहे, तिच्यांत उत्पन्न किती होतें, घरें किती आहेत, झाडें किती आहेत, कोणत्या इस्टेटींत स्वतंत्र कुळें किती आहेत, **गुलाम** किती आहेत या सर्वांची मोजदाद करून एक ' रजिस्टर ' (Domesday Book) तयार करविलें. या रजिस्टरवरून अमुक ठिकाणच्या अमुक मनुष्याची लायकी काय आहे हें राजाला घरबसल्या समजूं लागलें.

१६ **करफ्यू बेल**—उन्हाळ्यांत सूर्यास्ताबरोबर व हिंवाळ्यांत रात्रीं आठ वाजतां घंटा झाल्याबरोबर (Curfew Bell) सर्वांनीं आपापल्या घरचे दिवे मालवून टाकले पाहिजेत, असा एक कायदा करण्यांत आला.

१७ **शिकारीचें अरण्य**—**विंचेस्टर** (Winchester) जवळील तीस गांव ओसाड पाडून तीस मैल आवाराचें एक अरण्य (New Forest) **वुइल्यमनें** बनविलें. ही राजाची व त्याच्या आप्तांची शिकारीची जागा. यांत जर कोणी परवानगीवांचून शिकार केली तर त्याला जबर दंड द्यावा लागत असे.

१८ **धर्मव्यवस्था**—धर्मसंबंधी बाबतींतहि वुइल्यमनें जुने इंग्रज उपाध्ये (Prelates) काढून टाकून नवीन **नार्मन** उपाध्ये नेमले. या उपाध्यायांवर दाब रोमच्या 'पोप'चा असावयाचा कीं इंग्लंडच्या राजाचा असावयाचा असा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हां आजपर्यंत कोणत्याहि इंग्रज राजानें पोपचें प्रभुत्व मान्य केलेलें नाहीं हा जुना दाखला पाहून **वुइल्यमनें**हि तेंच धोरण ठेवलें व **पोपनें** ज्या कांहीं धर्मसुधारणा करावयाच्या म्हणून सुचविल्या होत्या त्या त्यानें आपल्या अधिकाराखालीं करविल्या.

१९ **न्यायाधीश वगैरे**—अशा रीतीनें मूळच्या इंग्रज लोकांचें कोणत्याच बाबतींत कांहीं चालेनासें होऊन ते सर्वस्वी पराधीन बनले. **नार्मन-फ्रेंच** भाषा दरबारी भाषा झाली; व **नार्मन** राज्यकर्ते व न्यायाधीश यांना लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेण्यासाठीं दुभाषे नेमावे लागले. असो.

२० **वुइल्यमचा मृत्यु**—वीस वर्षें इंग्लंडच्या गादीचा उपभोग घेऊन वुइल्यम आपल्या वयाच्या ६० व्या वर्षी **नार्मंडींतच** ' **रूवें** ' (Rouen) येथें मरण पावला. त्याच्या वृद्धापकाळीं त्याला त्याच्या मुलांनीं बराच त्रास दिला. थोरल्या मुलानें तर बापाविरुद्ध बंड करून पुष्कळ दिवस धुमाकूळ मांडला होता. **वुइल्यमनें** मरतेवेळीं **नार्मंडीचें** राज्य आपला थोरला मुलगा ' **राबर्ट** ' (Robert) यास दिलें, दुसरा मुलगा **वुइल्यम** यास इंग्लंडच्या गादीचा वारस नेमलें, तिसरा मुलगा **हेन्री** (Henry) यास ५००० पौंड रोख दिले,

व बाकीचा आपला खजिना अनाथांना व जोग्यांच्या मठांना देऊन टाकावा असें ठरविलें.

२१ वुइल्यमचा दफनविधि—वुइल्यमचें प्राणोत्क्रमण होण्याबरोबर राज्यांत अंदाधुंदीला सुरवात झाली. ती इतकी कीं त्याच्याबरोबरचे दरबारी लोक ताबडतोब उठून आपल्या किल्ल्यांची डागडुजी करण्यास निघून गेले. वाड्यांतील नोकर लोकांनीं तेथील सर्व चीजवस्त लांबविली, आणि वुइल्यमचें प्रेत त्या भयाण राजवाड्यांत उघडें पडलें ! शेवटीं एक **फ्रेंच** सद्गृहस्थ त्या वाटेनें चालला होता, त्याला वाईट वाटून त्यानें या राजाच्या शवाला मूठमाती दिली !

२२ वुइल्यमचा स्वभाव—वुइल्यम मोठा महत्वाकांक्षी, धाडसी व दृढनिश्चयी होता. आपल्याविरुद्ध त्याला कोणी बोललेलें खपत नसे; पण जे त्याची नोकरी इमानेंइतबारें करीत त्यांशीं तो मोठ्या उदार मनानें वागे.

प्रकरण ११ वें

केवळ स्वार्थासाठीं !

(इ. स. १०८७–इ. स. ११५४)

[१ वुइल्यमचे मुलगे—२ ओडो व लांफ्रांक–धाकट्या वुइल्यमचें धोरण—३ भावांभावांमधील भांडण व समेट—४ पीटर साधु–ख्रिस्तीधर्मयुद्धांचें मूळ—५ स्काटिश राजाची स्वारी—६।७ धाकट्या वुइल्यमचा स्वभाव–नार्मन कलुशा फ्लँबर्ड—८ धाकट्या वुइल्यमचा मृत्यु—९ हेन्रीचा राज्याभिषेक—१० त्याचें प्रजारावन—११ राबर्टची स्वारी व तह—१२ राबर्टचा स्वभाव–भावांभावांमधील युद्ध–रॉबर्टची अखेर—१३ नॉर्मंडींतील हकीगत—१४ राजाचा पुत्रशोक—१५ मॉड—हेन्रीचीं शेवटचीं वर्षें—१६ हेन्रीचा स्वभाव–त्याच्या कारकीर्दींतील विशेष गोष्टी—१७।१८ स्टीफन—१९ स्टीफन व मॉड यांचा लढा व लढाई—स्काटिश राजाची मदत—२० थर्स्टन–तह.—२१ पुन्हा लढाई–२२ भाडोत्री सैन्य—२३ स्टीफनचा पराभव व पुढील हकीगत—२४ मॉडची वागणूक—२५ स्टीफनची सुटका व राजपद—२६ पुढलीं बारा वर्षें—२७ अंदाधुंदीचा परिणाम–जहागिरदारांचें वर्चस्व—२८।२९ मॉडचा मुलगा हेन्री–त्याची इंग्लंडवर स्वारी व तह.

१ वुइल्यमचे मुलगे—वुइल्यमच्या मागून त्याच्या मुलांत तंटे सुरू झाले. थोरला मुलगा **रॉबर्ट** (Robert) हा मुळापासूनच निष्काळजी, कानपिसा

व व्यसनी होता. लहानपणींच त्यानें कित्येक सरदारांच्या नादाला लागून प्रत्यक्ष बापाबरोबर लढाई आरंभिली होती. पुढें आई व दुसरे कित्येक सरदार मध्यें पडून त्यांनीं दोघांची समजूत केली. दुसरा मुलगा '**वुइल्यम**' हा बापाप्रमाणेंच शूर होता. '**हेन्री**' हा महत्वाकांक्षी पण दुष्ट होता. क्षमा ही त्याच्या गांवींही नव्हती! पण एरवीं तो जात्या बुद्धिमान् होता. त्याला विद्येची बरीच आवड असून आपल्या मुलांबाळांवर त्याची फार प्रीति असे. **थोरल्या** वुइल्मनें आपल्या मागून आपल्या राज्यास **वारस** कोण हें ठरवून ठेवलेंच होतें. त्या व्यवस्थेप्रमाणें **इंग्लंड**ची गादी मधला मुलगा **वुइल्यम** (William II) याला दिलेली असल्यामुळें तो बाप मेल्याबरोबर तावडतोब **इंग्लंड**ला आला व **विंचेस्टर** (Winchester) येथें त्याला राज्याभिषेक करण्यांत आला.

२ ओडो व लांफ्रांकः—यावेळीं '**ओडो**' (Odo) व '**लांफ्रांक**' (Lanfranc) या नांवाचे दोन बडे धर्माधिकारी राजकारणपटु असून परस्परांचा फार हेवा करीत असत. पैकीं **लांफ्रांक**नें **वुइल्यम**चा पक्ष धरला, तेव्हां **ओडो**नें **इंग्लंड**ची गादी **रॉबर्टला** देऊं करून **वुइल्यम**ला पदच्युत करण्याचा बेत चालविला. मोठमोठ्या **नार्मन** जहागीरदारांपैकीं बरेचसे त्यानें वश करून घेतले. पण **वुइल्यम**नें पाहिलें कीं **नार्मन** जहागीरदार आपल्याला प्रतिकूल झाले तरी **इंग्रज** प्रजेची आपल्याला सहानुभूति व मदत मिळेल तर त्याचें कांहीं चालणार नाहीं. **इंग्रजां**नाहि पूर्वीं **थोरल्या वुइल्यम**च्या कारकीर्दींत '**ओडो**' च्या अमलाचा अनुभव आला होताच. तेव्हां 'तुमचे जुने हक्क आम्ही तुम्हांला परत देऊं' असें राजाकडून वचन घेऊन बरेचसे प्रमुख **इंग्रज** सरदार वुइल्यमच्या बाजूनें लढण्यास तयार झाले.

३ भावांभावांमधील भांडण—ओडो व त्याच्या बाजूचे **नार्मन** सरदार यांनीं बंड उभारून **रार्बटला नार्मंडी**हून बोलावलें. पण तो येण्यापूर्वींच **इंग्रज** सेनेच्या मदतीनें **वुइल्यम**नें हें बंड मोडून टाकलें व **ओडो**ला कैद केलें. पुढें राबर्टचा सूड उगविण्यासाठीं म्हणून **वुइल्यम**नें उलट **नार्मंडी**वर स्वारी केली व तेथील कित्येक **नार्मन** जहागीरदार व सरदार यांना भुलथापा देऊन अर्धी **नार्मंडी** काबीज केली. शेवटीं **राबर्ट**च्या पक्षाचे लोकही कंटाळले आणि दोघां भावांमध्यें तह होऊन **वुइल्यम**नें मिळविलेला मुलूख **वुइल्यम**कडेच असावा, **राबर्ट**च्या बाजूनें लढलेल्या जहागीरदारांची जहागीर जप्त होऊं नये, आणि दोघां भावांपैकीं

कोणी निपुत्रिक मरण पावल्यास **नार्मंडी** व **इंग्लंड** हे दोन्ही प्रांत मागें राहिलेल्या भावाला मिळावे असें ठरलें. तिसरा भाऊ **हेन्री** यानेंहि बंड केलें होतें तें या दोन भावांनीं मिळून मोडलें, व त्याची घर ना दार अशी स्थिति करून त्याला भीक मागत फिरायला लावून दिलें ! तो यांचा सूड घेण्याची वाट पहात कित्येक दिवस त्यांच्या नांवानें बोटें मोडीत भटकत होता !

४ पीटर साधु--इ० स० १०९६ च्या सुमारास **पीटर** (Peter) या नांवाचा एक यति (Hermit) 'ख्रिस्ता' (Christ) ची जन्मभूमि 'येरुशलेम' (Jerusalem) येथील **ख्रिस्ता**च्या थडग्याचें दर्शन घ्यावयास गेला होता. तो प्रांत त्यावेळीं **तुर्क** (Turk) लोकांच्या ताब्यांत असून **तुर्क** लोक **ख्रिस्ती** लोकांचा फार द्वेष करीत, व ख्रिस्ती यात्रेकरूंना फार त्रास देत. या '**पीटर**' यतीनें ख्रिस्ती लोकांच्या हालांचें वर्णन करून युरोप खंडांतील सर्व ख्रिस्ती देशांत मोठी खळबळ उडवून दिली, व ही ख्रिस्ताची जन्मभूमि हर प्रयत्न करून मुसलमानांच्या हातून काढून घेतलीच पाहिजे अशी सर्व ख्रिस्ती राजांची खात्री करून दिली. ख्रिस्त-भूमीसाठीं तुर्क लोकांशीं युद्ध करणें हें 'धर्मयुद्ध' (Crusade) आहे असें म्हणून जिकडून तिकडून ख्रिस्ती वीर पुढें सरसावले. **वुइल्यम**चा भाऊ **राबर्ट** याला आपण या धर्मयुद्धांत नांव गाजवावें असें वाटून सैन्याच्या खर्चासाठीं **नार्मंडी** प्रांत गहाण ठेवावा असें त्यानें ठरविलें, व **वुइल्यम**नें दहा हजार 'मार्क' देऊन पांच वर्षांच्या करारानें तो गहाण घेतला.

५ स्कॉटिश राजाची स्वारी—माजी इंग्रज राजघराण्यांतील अवशिष्ट राजपुत्र '**एडगर अथेलिंग**' (Edgar Atheling) याची बहीण स्कॉट-लंडचा राजा '**मालकम**' (Malcolm) यास दिलेली होती. तेव्हां **नार्मन** लोकांच्या जुलमानें गांजलेले पुष्कळ इंग्रज सरदार व राजाची अवकृपा झालेले कित्येक **नार्मन** सरदारहि स्काटलंडमध्यें जाऊन रहात असत. इ० स० १०९१ या वर्षी **वुइल्यम नार्मंडी**मध्यें आहे असें पाहून **मालकम**नें इंग्लंडवर स्वारी केली; पण तींत त्याला यश न येतां **इंग्लंड**च्या राजाचें मांडलिकत्व कबूल करून त्याला परत जावें लागलें. **वेल्स**मधील लोकही मधून मधून सरहद्दीच्या प्रांतांतून लुटालूट करीत; पण **वुइल्यम**ला त्यांचा पुरा मोड करतां आला नाहीं.

६ वुइल्यमचा स्वभाव—**वुइल्यम** (William II) राज्य करूं लागला तेव्हां धर्माधिकारी **लांफ्रांक** हा त्याचा मुख्य मंत्री होता. तो इ० स० १०८९

या वर्षी मरण पावल्यावर **वुइल्यम**ला ‘ हूं ’ म्हणणारा कोणी राहिला नाहीं. त्याचा लोभी व दुष्ट स्वभाव आतां उघडकीस येऊं लागला. ‘ **फ्लांबर्ड** ’ (Flambard) नांवाच्या एका कवडी किमतीच्या **नार्मन** पाद्र्याला त्यानें आपला मुख्य प्रधान नेमिलें. राजाच्या खजिन्यांत तूट पडली तेव्हां या ‘कलुशा’नें मक्त्यानें मामलती देण्याचा सल्ला दिला. व एकादी ग्रामोपाध्याची अगर इतर मानाची अगर महत्त्वाच्या अधिकाराची जागा रिकामी झाली तर ती बरींच वर्षें भरूंच नये व त्या जागेचें सर्व उत्पन्न सरकारी तिजोरींत जमा व्हावें असें होऊं लागलें. ‘ कांटरबेरी ’ (Canterbury) येथील मुख्य धर्माधिकाऱ्याची जागा चार वर्षें तशीच रिकामी होती; व शेवटीं ‘ **आनसेम** ’ (Anselm) नांवाच्या एका इटलींतील विद्वान गृहस्थाला ती देण्यांत आली तीही त्याच्याकडून बरीच रक्कम आपल्या खिशांत येऊन पडेल अशी राजाला आशा वाटत होती म्हणूनच !

७ **फ्लांबर्ड**नें इतरही नाना प्रकारच्या युक्त्या काढून राजाची तिजोरी भरण्यास मदत केली. गरीबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वजण त्याचा द्वेष करूं लागले. एकदां तर त्याला समुद्रांत नेऊन बुडविण्याचाहि कट झाला होता. पण मारेकऱ्यांना लांच देऊन त्यानें आपली सुटका करून घेतली !

८ **दुसऱ्या वुइल्यमचा मृत्यु**—सन ११०० च्या आगस्ट महिन्याच्या दुसऱ्या तारखेस नित्यापेक्षां जरा जास्ती दारू झोंकून **वुइल्यम** सरकारी अरण्यांत मृगयेकरितां गेला होता. संध्याकाळच्या वेळीं कांहीं कोळसेवाल्यांना त्याचें प्रेत अरण्यांत आढळलें. एक तीर त्याच्या छातींत रुतलेला होता. कोणी म्हणतात ‘ **टिरेल** ’ (Tirell) नांवाचा एक सरदार त्या अरण्यांत शिकार करीत होता, त्याचा तीर चुकून राजाला लागला; व कित्येकांच्या मतें राजाचा भाऊ **हेन्री** हा त्या दिवशीं त्या अरण्यांत आला होता, त्यानेंच राजाचा खून केला. कसेंहि असो, **वुइल्यम**चा अशा आकस्मिक रीतीनें अंत झाला खरा. पण त्याबद्दल कोणालाहि वाईट वाटलें नाहीं. त्याचें लग्न झालेलेंच नव्हतें.

९ **हेन्रीचा राज्याभिषेक**—**वुइल्यम** मरण पावल्याची बातमी बाहेर पडल्याबरोबर त्याचा भाऊ **हेन्री** हा **विंचेस्टर** येथें आला, व त्यानें आधीं सरकारी खजिना ताब्यांत घेतला. वडील भाऊ **रॉबर्ट** हा तिकडे धर्मयुद्धांत गुंतला होता. तेव्हां तो येण्याचे पूर्वी आपल्या नांवानें द्वाही फिरवावी म्हणून तो लगेच **लंडन**मध्यें आला व ‘ अर्थस्य पुरुषो दासः ’ या तत्त्वाचा अवलंब करून लंडनच्या धर्माधिकाऱ्यानें त्याला राज्याभिषेकहि केला !

१० **हेन्रीचें प्रजाराधनः**--अनधिकारानें किंवा बेकायदेशीरपणें गादी मिळालेली असली म्हणजे लोकांना खुष राखण्याचा राजे लोकांना पहिल्यानें प्रयत्न करावा लागतो. कारण लोक राजी असले म्हणजे जुलुमाला न्यायाचें स्वरूप सहज देतां येतें ! हेन्रीनें **वुइल्यम**च्या कारकीर्दीत मोकळ्या पडलेल्या उपाध्यांच्या जागांवर ताबडतोब दुसरे उपाध्ये नेमले. **नार्मन** सरदारांना लांच देऊन 'आपले' केले. आपण राज्यांत मोठमोठ्या सुधारणा करूं व जुने इंग्रज कायदे अमलांत आणूं अशीं वचनें देऊन त्यानें इंग्रज प्रजेचीं मनें खुष ठेवलीं. आपण तुम्हांला परकी मानीत नाहीं असें इंग्रज प्रजेला भासविण्यासाठीं त्यानें **स्काटलंड**च्या **मालकम** राजाची मुलगी म्हणजे '**एडगर अथेलिंग**'ची भाची '**मॅटिल्डा**' (Matilda) इच्याबरोबर लग्न केलें व ज्या युक्तीनें प्रजेचीं मनें संतुष्ट राहतील अशी कोणतीहि युक्ति योजण्याला त्यानें माघार घेतली नाहीं.

११ **रॉबर्टची स्वारी**–पुढल्या वर्षी रॉबर्ट धर्मयुद्ध आटोपून परत आला. तेव्हां आपला हक्क बुडवून **हेन्रीनें इंग्लंड** बळकाविलें हें पाहून त्यानें इंग्लंडवर स्वारी केली. या वेळीं पुष्कळ **नार्मन** सरदार त्याला अनुकूल होते. परंतु इंग्रज प्रजेला **हेन्री** हाच राजा असावा असें वाटूं लागलें होतें. बरेच दिवस दोघां भावांचीं सैन्यें एकमेकांसमोर तळ देऊन पडलीं होतीं; पण अखेर लढाई न होतां दोघांमध्यें तह होऊन असें ठरलें कीं, **इंग्लंड हेन्री**कडेच रहावें व **राबर्ट**ला सर्व **नार्मंडी** प्रांत देऊन शिवाय वर्षाचे तीन हजार 'मार्क' वर्षासन म्हणून **हेन्री**कडून त्याला मिळावे. तसेंच जे **नार्मन** सरदार **राबर्ट**ला मिळाले होते त्यांना माफी असावी.

१२ **राबर्टचा स्वभाव**—तह झाल्यावर **राबर्ट नार्मंडी**ला गेला. पण **हेन्रीनें** आपलें वचन मोडून **राबर्ट**ला मिळालेल्या सरदारांचा सूड घेण्याला सुरवात केली. **राबर्ट** हा इतका आळशी, दुर्व्यसनी व पोंचट होता कीं, **राबर्टशाही** व **बेबंदशाही** हे शब्द त्यावेळीं समानार्थक झाले होते. त्याचा स्वतःचा वाडा लोकांनीं लुटला व त्याची अन्नान्न दशा करून टाकली. शेवटीं **नार्मन** सरदारांनीं त्याच्या अंमलाला कंटाळून सन ११०६ या वर्षी **हेन्री**ला **नार्मंडी** येथें येण्याविषयीं निरोप पाठविला. **हेन्री** वाटच पहात होता. त्यानें भलें मोठें सैन्य **नार्मंडी**ला पाठवून दिलें व **राबर्ट**नें ठराविक वार्षिक नेमणूक घेऊन **नार्मंडी** प्रांत आपल्या हवालीं करावा म्हणून त्याला निरोप पाठविला. **राबर्ट** ऐकेना. शेवटीं लढाई होऊन 'टेंचिब्राय' (Tenchebrai) येथें **राबर्ट** हेन्रीच्या हातीं लागला, व त्यानें

त्याला इंग्लंडला आणून 'कार्डिफ' (Cardiff) किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. तेथें **हेन्रीनें** त्याचे डोळे काढविले असेंहि म्हणतात. तो इ० स० ११३५ या वर्षी कैदेंतच मरण पावला.

१३ नार्मंडींतील हकीगत—पण येवढ्यानें **नार्मंडींत** शांतता झाली नाहीं. राबर्टचा '**वुइल्यम**' याच नांवचा एक मुलगा होता. फ्रान्सचा राजा व इतर आजुबाजूचे सरदार यांनीं त्याचा पक्ष घेऊन नॉर्मंडीवर स्वारी केली. पण इंग्लंडच्या राजाचें नशीब अनुकूळ असल्यामुळें त्यांचा 'ब्रेनव्हिल' (Brenville) येथें पराभव होऊन **रॉबर्ट**चा मुलगा मोठ्या शिकस्तीनें पळून गेला. पुढील एक वर्ष **नार्मंडी**-मध्यें राहून जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यावर **हेन्री** इंग्लंडला परत आला.

१४ राजाचा पुत्रशोक—राजा हेन्रीलाही '**वुइल्यम**' याच नांवाचा एक मुलगा होता. तो यावेळीं सुमारें आठ वर्षांचा होता. आपल्यामागें **इंग्लंड** व **नार्मंडीचें** राज्य एक होऊन आपल्या मुलानें दोन्ही प्रांतांवर सुखानें राज्य करावें अशी सर्व व्यवस्था हेन्रीनें करून ठेविली होती, परंतु ईश्वरी इच्छा निराळी होती. हा मुलगा एक दिवस नार्मंडीहून इंग्लंडला येत असतां वाटेंत समुद्रांत बुडून मरण पावला. त्या दिवशीं अगोदर गलबत निघायलाच रात्र झाली होती. त्यांतून ती रात्र काळोखाची होती, आणि राजपुत्राच्या बरोबरची अल्लड स्नेही मंडळी त्याच्या-सारखीच उल्लू होती. गलबतांत बसण्यापूर्वी सर्वजण यथेच्छ दारू प्याले. खलाशीहि धुंद झाले. शहाणे होते त्यांनीं रागरंग पाहून त्या दिवशीं गलबतांत बसण्याचा बेत तहकूब केला. पण अखेर सुमारें तीनशें लोक गलबतावर चढलेच. वल्हेवाले दारूनें बेहोष झालेले, आणि सुकाणूदार होता तो गैर माहितगार, त्यामुळें काळोखांत गलबत एका खडकावर जाऊन आपटलें! राजपुत्र व दुसरे कित्येक लोक एका लहानशा होडींत उतरले; तिकडे जहाज बुडूं लागलें; जहाजावरील मंडळींत राजपुत्राची एक सावत्र बहीण होती, तिच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या; तेव्हां तिला वांचविण्यासाठीं म्हणून राजपुत्र परत त्या जहाजाकडे गेला. तोंच एकदम पांच पंचवीस मंडळींनीं जिवाच्या आशेनें त्याच्या होडींत उड्या टाकल्या. पण त्यामुळें होडी व गलबत दोन्हीं बुडालीं! तीनशें माणसांपैकीं फक्त दोन माणसें बचावलीं. एक त्या गलबतावरचा कप्तान व दुसरा नार्मंडीचा एक खाटीक. राजपुत्र बुडाला हें ऐकल्याबरोबर कप्तानानें आत्महत्या करून घेतली. राजाला ही बातमी समजली तेव्हां तो मूर्च्छा येऊन पडला! त्याची त्या मुलावर फार भिस्त होती

तेव्हां आपली भावी आशा अशा आकस्मिक रीतीनें नष्ट झाल्यामुळें त्याला इतकें दुःख झालें कीं, त्याला पुन्हां कोणीहि हंसतांना पाहिलें नाहीं असें म्हणतात.

१५ **मॉड—हेन्री**ला आतां आपल्यामागें गादीचा वारस कोणास करावयाचा याचा विचार येऊन पडला. **राबर्ट**चा मुलगा '**वुइल्यम**' यानें पुन्हां एकदां सलोख्याचा प्रयत्न करून पाहिला. पण चुलत्याला तो दृष्टीसमोर नको होता. '**मॉड**' (Maud) नांवाची हेन्रीची एक मुलगी होती. तिचें जर्मनीच्या बादशहाशीं लग्न झालें होतें. पण नवरा वारल्यामुळें ती बापाच्या घरीं 'मागें आली' होती. तिला मूलबाळ कांहींच नव्हतें. आतां आपल्यामागें हिलाच वारस करावें असें **हेन्री**नें ठरविलें, आणि सर्व जहागिरदारांना बोलावून आणून त्यानें त्यांच्याकडून तशी शपथ घेवविली. पुढल्या वर्षी फ्रान्समधील '**जाफ्रे**' (Geoffrey) नांवाच्या एका १६ वर्षांच्या सरदाराबरोबर **मॉड**नें पुनर्विवाह केला. पण ही गोष्ट **नार्मन** अगर **इंग्रज** यांपैकीं कोणालाच आवडली नाहीं. पुढें त्या नवराबायकोंतहि तंटे लागले, त्यामुळें **हेन्री**चीं शेवटचीं वर्षें मोठ्या त्रासांत गेलीं.

१६ **हेन्रीचा स्वभाव**—इ. स. ११३५ च्या नवंबर महिन्यांत एक दिवस शिकारीहून परत आल्यावर एक प्रकारचें माशांचें पक्वान्न केलेलें होतें तें **हेन्री**नें बेताबाहेर खाल्ल्यामुळें अजीर्ण होऊन त्याला ताप येऊं लागला आणि त्या तापांतच डिसेंबरच्या पहिल्या तारखेस त्याचा अंत झाला. त्याच्या अंगीं जरी बरेच दुर्गुण होते तरी तो मोठा मुत्सद्दी व एकंदरींत 'चांगला राजा' होऊन गेला. 'इसाब' (Æsop)च्या गोष्टींचें त्यानें इंग्रजींत भाषांतर केल्यामुळें त्याला 'पंडित हेन्री' (Scholar Henry) म्हणत असत. आपल्या राज्यांत वजनांमापांचें एक प्रमाण त्यानें ठरवून टाकलें होतें. कापडाचा 'वार' (Yard) हा त्याच्या बाहूच्या लांबीइतका ठरविण्यांत आला. तसेंच त्याच्या कारकीर्दींत लोकांनीं कर द्यावयाचे ते ऐनजिनसी न देतां पैशाच्या रूपानें द्यावे असें ठरविण्यांत आलें.

१७ **स्टीफन**—बऱ्याचशा **नार्मन** सरदारांनीं **हेन्री**च्या मागून त्याच्या मुलीला तक्तनशीन करूं अशी जरी शपथ घेतली होती तरी तिनें **जॉफ्रे**शीं पुनर्विवाह केला हें त्यांना पसंत पडलें नव्हतें. व इंग्रज प्रजेला आपल्यावर 'स्त्री-राज्य' नको होतें. **नार्मन** जहागिरदारांत **थोरल्या वुइल्यम**च्या मुलीचा मुलगा म्हणजे **मॉड**चा आतेभाऊ '**स्टीफन**' (Stephen) या नांवाचा एक लोकप्रिय व शूर सरदार होता. व तो एका अर्थी राजघराण्यांतील माणसांपैकींच असल्यामुळें

असंतुष्ट **नार्मन** सरदारांनीं त्याला राजपद द्यावें असें ठरविलें. त्याचा '**हेन्री**' या नांवाचा एक भाऊ '**विंचेस्टर**'चा धर्माधिकारी होता. त्यानें आपलें वजन खर्च करून पाद्री लोकांचीं मनें **स्टीफन**विषयीं अनुकूल करून घेतलीं.

१८ वास्तविक **स्टीफन**ला माजी राजा '**हेन्री**' यानेंच लहानाचा मोठा केला होता. व ज्या जहागिरदारांनीं हेन्रीसमोर 'आपल्यामागें मॉडला आम्हीं राजपद देऊं' अशी शपथ घेतली होती त्यांत **स्टीफनच** प्रमुख होता; पण आतां? आतां काय? चालत येत असलेल्या राज्यलक्ष्मीला तो झिडकारून लावतो? त्यानें **लंडन** येथें आपल्याला राज्याभिषेक करून घेतला, **नार्मन** सरदारांना आपापल्या जहागिरींत किल्ले बांधण्याला परवानगी दिली, कांहीं करांची सूट देण्याचें वचन दिलें, व धर्माधिकाऱ्यांना जास्त सवलती व अधिकार देण्याचें कबूल केलें. **नार्मंडी** प्रांतापुरता 'मी तुमचा मांडलिक आहें' असें **फ्रान्स**च्या राजाकडे कबूल केल्यामुळें तोही अनुकूल झाला. **पोप**नेंहि 'राष्ट्राच्या मता'ला आपली संमति दर्शविली.

१९ स्टीफन व मॉड यांचा लढा—पण एवढें झालें तरी **मॉड**च्या बाजूला कांहीं सरदार होतेच. तिच्या नवऱ्यानें **नार्मंडी**वर स्वारी केली पण त्याचा पराभव होऊन त्याला परत जावें लागलें. इकडे स्काटलंडमध्यें तिचा मामा '**डेव्हिड**' (David) राज्य करीत होता. त्यानें इंग्लंडच्या उत्तरेकडील जिल्ह्यांवर स्वारी करून लुटालूट मांडली. प्रथम **स्टीफन**नें उत्तरेकडील कांहीं मुलूख देऊन त्याला वश करून घेण्याची खटपट केली. पण पुढें इ० स० ११३८ सालीं **मॉड**नें विनंति केल्यावरून **डेव्हिड**नें आपल्या मुलखांतील डोंगरी लोकांचें मोठें सैन्य जमा केलें व पुन्हां इंग्लंडवर स्वारी करून तो '**यार्क**'पर्यंत येऊन पोहोंचला. या अर्धवट रानटी डोंगरी लोकांनीं त्या प्रांतांतील देवळांचा विध्वंस केला व बायका-मुलांची कत्तल करून सर्व प्रांत उजाड करून टाकला. पुढें **स्टीफन** त्यांच्यावर चाल करून गेला तेव्हां ते पळून गेले. वाटेंत अन्नसामुग्री मिळण्यासारखी नसल्यामुळें त्यांचा पाठलाग करतां येईना, म्हणून स्टीफनला परत मागें यावें लागलें. तो मागें वळून दक्षिणेकडे आल्यावर हे लोक पुन्हां खालीं उतरले. पण या वेळीं उत्तरेकडील **नार्मन** व **इंग्रज** सरदार एक होऊन त्यांनीं आपणच त्यांचा बंदोबस्त करण्याचें ठरविलें.

२० थर्स्टन—यावेळीं तिकडे '**थर्स्टन**' (Thurstan) नांवाचा '**यार्क**'चा एक म्हातारा धर्माधिकारी होता त्यानें जुन्या **साक्सन** साधूंचीं तीन निशाणें एकत्र करून

एका उंच काठीला बांधलीं व गांवोगांवच्या लोकांना आपल्या जन्मभूमीसाठीं लढण्याला या म्हणून निमंत्रण केलें. उभय पक्षांची '**नार्थलर्टन**' (Northallerton) येथें गांठ पडून दोन तास निकराची लढाई झाली. बारा हजार **स्काट** लोक मारले गेले पण **स्काट** लोकांनीं आपली चिकाटी सोडली नाहीं. पुढल्या वर्षीं तह होऊन '**नार्थंबर्लंड**' (Northumberland) प्रांत **डेव्हिड**चा मुलगा **हेन्री** यास द्यावा व **स्काट** लोकांनीं पुन्हां इंग्लंडला त्रास देऊं नये असें ठरलें.

२१ पुनः लढाई—इतक्यांत **मॉड** बऱ्याच सरदारांचें सैन्य एकत्र जमवून व शिवाय इतर राज्यांतील भाडोत्री सैन्य गोळा करून इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरली. **इंग्लडां**तील तिच्या पक्षाची मंडळी वाट पहात होतीच. पुन्हा राज्यांत दोन पक्ष झाले. **लंडन** व **इंग्लंड**च्या पूर्व भागांतील लोक **स्टीफन**च्या बाजूला झाले. पश्चिम बाजूकडील मंडळी **मॉड**ला अनुकूल होती. मोठमोठ्या जहागिरदारांनीं आपापल्या प्रांतांत आतां किल्ले बांधून आपली मजबुती केली होती. त्यांतले कित्येक प्रथम कोणत्याच पक्षाला न मिळतां तटस्थ राहिले. त्यामुळें स्टीफन-लाहि **मॉड**प्रमाणेंच परराज्यांतील भाडोत्री सैन्य आणून नोकरीस ठेवावें लागलें.

२२ भाडोत्री सैन्य—या भाडोत्री सैन्याला परराज्यांतील लोकांची दयामाया थोडीच असणार ! ते होईल त्या रीतीनें आपली तुंबडी भरण्याचा प्रयत्न करीत, व शत्रुपक्षाच्या लोकांचे अनन्वित हाल करीत. **मॉड**च्या बाजूच्या असल्या एका वीरानें एक किल्ला आपल्या ताब्यांत घेतला होता. त्या ठिकाणीं तो लढाईंत धरून आण-लेल्या कैद्यांच्या अंगाला मध सारवून त्यांना उन्हांत टांगून ठेवीत असे. हेतु हा कीं गांधील माशांनीं त्यांच्या अंगाला डसून त्यांचा प्राण घ्यावा ! असो.

२३ स्टीफनचा पराभव—दोन तीन वर्षें अशा रीतीनें युद्ध चालल्या-वर सन ११४१ या वर्षीं **लिंकन**च्या (Lincon) लढाईंत **स्टीफन** पकडला गेला. '**विंचेस्टर**' येथें बड्या लोकांचा एक दरबार भरून त्यांनीं **मॉडला** राजपद द्यावें असें ठरविलें. पण **केंट** येथील लोक व धर्माधिकारी या गोष्टीला कबूल झाले नाहींत. आणि मॉडला राज्याभिषेक असा कधींच झाला नाहीं.

२४ मॉडची वागणूक—मॉडची वर्तणूक नेहमींच उद्धटपणाची असे. ती वाटेल त्याला टाकून बोलत असे. त्यामुळें तिचे मित्र हळू हळू तिला सोडून जाऊं लागले. **लंडन**च्या लोकांनीं पूर्वीं **स्टीफन**ला मदत केली होती, या अपरा-धाबद्दल त्यांच्यावर तिनें जबर कर बसविला. त्यामुळें ते असंतुष्ट झाले. इतक्यांत

अशी बातमी आली कीं, **स्टीफन**ची बायको **लंडन**वर चाल करून येत आहे. **लंडन**चे लोक आधींच बिथरले होते. त्यांनीं ही संधि पाहून राजवाड्यावर हल्ला केला. तेव्हां **मॉड** घाईघाईनें '**आक्स्फर्ड**' येथें पळून गेली. जिकडे तिकडे तटच तट होऊन गेले. जो तो आपापला स्वार्थ साधण्यासाठीं वाटेल तें करूं लागला.

२५ स्टीफनची सुटका—मॉडनें आपल्या सावत्र भावाच्या मदतीनें '**विंचेस्टर**' च्या धर्माधिकाऱ्याच्या वाड्यावर हल्ला केला. हा धर्माधिकारी **स्टीफन**चा भाऊ असून त्यानें पूर्वीं **स्टीफन**ला पुष्कळ प्रकारें मदत केली होती. परंतु हल्लीं **स्टीफन**चें व त्याचें वांकडें आलें होतें, व तो वास्तविक **मॉड**च्या बाजूलाच वळला होता. परंतु **मॉड**ला त्याच्याबद्दल संशय येऊन तिनें हा हल्ला केला होता पहिल्या पहिल्यानें तिला यश आलें, पण अखेरीस तिच्या सैन्याचा पराभव होऊन तिचा सावत्र भाऊ **राबर्ट** हा शत्रूच्या हातीं लागला. पुढें **मॉडनें** **स्टीफन**ला सोडून द्यावें व **स्टीफन**च्या पक्षानें **राबर्ट**ला मोकळा करावा असें ठरून **स्टीफन** पुन्हां गादीवर आला.

२६ पुढलीं बारा वर्षें—यापुढें १२ वर्षेंपर्यंत जिकडे तिकडे किरकोळ लढाया व अंदाधुंदीच चालली होती. इंग्लंडच्या पश्चिम बाजूचे लोक **मॉड**ला अनुकूल असून तिकडे ती आपला अंमल गाजवीत असे. व पूर्व बाजूच्या मंडळीनें **स्टीफन**ला आपला राजा केला होता. पण पुढें **मॉड**च्या पक्षाचे कांहीं सरदार मरण पावले. व इतरांनाहि तिच्या बाजूला राहून कांहीं फायदा नाहीं असें आढळून आल्यावर तेही हळूहळू तिला सोडून जाऊं लागले. तेव्हां निरुपाय होऊन ती इ० स० ११४७ या वर्षीं **नार्मंडी**ला परत गेली.

२७ अंदाधुंदीचा परिणाम—या सर्व अंदाधुंदीच्या काळांत **नार्मन** जहागिरदारांचें वजन मात्र पुष्कळच वाढलें. त्यांनीं आपल्या जहागिरींत मोठमोठे किल्ले बांधून व पदरीं सैन्य बाळगून आसपासच्या मुलखांत लुटालूट आरंभिली होती. केव्हां स्टीफनच्या तर केव्हां मॉडच्या पक्षाला मिळून दोघांनाहि आपल्या कह्यांत ठेवण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें होतें. त्यांनीं फावल्या वेळांत शेजारच्या गांवांत जाऊन लुटालूट करावी, शहरांना आग लावून द्यावी, लोकांचे हालहाल करून त्यांचेकडून पैसा उकळावा असें चाललें होतें. जमिनीची लागवड कोणी करीना, त्यामुळें धान्याचा तुटवडा पडून अखेर दुष्काळामुळें लोकांची उपासमार होण्याची पाळी आली.

२८ मॉडचा मुलगा हेन्री—तिकडे मॉडचा मुलगा हेन्री म्हणून होता तो आतां मोठा होंत चालला होता. इ० स० ११५१ मध्यें **मॉडचा** दुसरा नवरा वारला. व त्याची तिकडची जहागीर या मुलाला मिळाली. पुढल्या वर्षी फ्रान्सच्या राजानें घटस्फोट करून घालवून दिलेल्या त्याच्या बायकोशीं या हेन्रीनें लग्न केलें. तिलाही तिच्या बापाकडून एक दोन जहागिरी वारशानें प्राप्त झाल्या होत्या. यामुळें **हेन्रीचें** सामर्थ्य अर्थातच वाढलें. इ० स० ११५३ या वर्षी त्यानें मोठें सैन्य जमा करून इंग्लंडवर स्वारी केली. '**वालिंगफर्ड**' (Wallingford) येथें उभय सैन्यांची गांठ पडली. पण बारा वर्षें भांडून भांडून दोन्ही पक्षांतले सरदार आतां अगदीं कंटाळून गेले होते.

२९ इतक्यांत **स्टीफनचा** मुलगा एकाएकीं वारला. तेव्हां **स्टीफनलाहि** पुढें कोणी वारस राहिला नाहीं. म्हणून दोन्ही पक्षांत तह होऊन असें ठरलें कीं, **स्टीफन** जिवंत असेपर्यंत त्यानें **इंग्लंडचें** राज्य करावें, व त्याचे मागून **मॉडचा** मुलगा **हेन्री** याला इंग्लंडची गादी मिळावी. त्याप्रमाणें सर्व सरदारांनीं हेन्रीला 'भावी राजा' म्हणून कबूल केल्यावर एकदांचा हा तंटा मिटला. **स्टीफन** पुढल्याच वर्षी मरण पावला. व **हेन्री** इंग्लंडच्या गादीवर येऊन इंग्लंडमध्यें एका नवीन राजघराण्याची कारकीर्द सुरू झाली.

प्रकरण १२ वें.

दुःखांत सुख !

[१ पाऊणशें वर्षांचें सिंहावलोकन—२ पारतंत्र्यांतील दुःखें—३ हाडाच्या इंग्रजांची आशा—नार्मन सरदारांचें स्थायिकत्व—४ नार्मन व इंग्रज यांचें एकीकरण—नवीन पिढी—नूतन इंग्रज राष्ट्र—५ इंग्लंडांतील सुधारणेला नार्मनांची मदत—लाटिन व फ्रेंच भाषा—हल्लींची इंग्रजी भाषा—६ एकछत्री राज्याचा परिणाम.]

१ सिंहावलोकन—थोरल्या वुइल्यमनें (William the Conqueror) इ० स० १०६६ या वर्षी इंग्लंडवर स्वारी करून व करडा अंमल बसवून इंग्लंडवर एकछत्री राज्य स्थापन केल्याला आतां जवळ जवळ पाऊणशें

वर्षे होत आलीं होतीं. या काळांत इंग्लंडच्या गादीसाठीं पुष्कळ लढाया झाल्या; पण त्या सर्व परकी नार्मन सरदारांमध्यें. 'दगडापेक्षां वीट मऊ' असें समजून **इंग्रजांनीं** या किंवा त्या सरदाराला मदत केली असेल; पण पूर्वीचा **इंग्रज** राजवंश अगर दुसरा एखादा **इंग्रज** राजवंश पुन्हां स्थापन करून **इंग्लंडचें** राज्य **इंग्रजांकडेच** रहावें असा प्रयत्न **इंग्रज** सरदार अगर जमीनदारांपैकीं कोणीहि केला नाहीं. कारण त्यांच्यांत आतां तितकें त्राणच राहिलें नव्हतें. पूर्वीचे मोठमोठे **इंग्रज** सरदार नष्ट होऊन त्यांच्या जमिनी **नार्मन** जहागिरदारांनीं व्यापल्या होत्या. मान खालीं घालून राहिलेल्या **इंग्रजांना** आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं **नार्मन** राजांनीं 'तुमचे जुने हक्क कायम राखूं' म्हणून गोड आश्वासनें द्यावीं, इंग्रजांनीं त्यांना मदत करावी, पण पुढें त्यांचें काम झाल्यावर त्यांना आपल्या पूर्वीच्या वचनांची विस्मृति पडावी, कोणीं आठवण केलीच तर त्याला त्या वचनाप्रमाणें वागणें 'अशक्य' आहे असें उत्तर मिळावें व फिरून इंग्रजांची स्थिति आहे तीच कायम राहावी असा प्रकार चाललेला होता.

२ पारतंत्र्यांतील दुःखें—या कालांत परतंत्र्याचीं सर्व दुःखें इंग्रजांना अनुभवावीं लागत होतीं. राजदरबारांत मान नाहीं, अधिकाराच्या जागा परक्यांच्या हातांत, आपलीं दुःखें कळवायला जावें तर अधिकाऱ्यांना आपली भाषाही समजत नाहीं, जुनें 'शिष्टमंडळ' नाहींसें झालेलें, एखाद्या पुढाऱ्याचा राजदरबारीं प्रवेश झाला व त्याचें जरा महत्त्व वाढलेंच तर तो लगेच आपल्या भाऊबंदांना तुच्छ मानून राजाचा व त्याच्या अधिकाऱ्यांचा तोंडपुजेपणा करायला लागायचा, अशी स्थिति झाली होती; पण अशा निकृशवस्थेंत सुद्धां हाडाच्या इंग्रजांनीं आपलें स्वत्व सोडलें नव्हतें, व आपल्या जुन्या चालीरीति शक्य तितक्या कायम राखल्या होत्या.

३ इंग्रजांची आशा—या 'कट्ट्या' इंग्रजांची अशी खात्री होती कीं इंग्लंडांत 'परकी नार्मन' लोक कितीहि आले तरी त्यांची लोकसंख्या कांहीं खास इंग्रज लोकांहून जास्त होणार नाहीं. दुसरें, जे नार्मन लोक इंग्लंडमध्यें कायमची वस्ती करून राहिले त्यांना आतां इंग्लंड हेंच आपलें घर असें वाटावयास लागून हळूहळू इंग्लंडचा अभिमानही वाटूं लागला होता. राजे प्रबल झाले तर पुढेंमागें आपलीही इंग्रज प्रजेप्रमाणेंच स्थिति होऊन आपल्यास कांहींच हक्क रहाणार नाहींत हें समजून आल्यामुळें **नार्मन** जहागीरदार संधि सांपडेल त्याप्रमाणें स्वतंत्र किल्ले वगैरे बांधून आपापल्या 'इष्टेटी' (Estates) सांभाळण्याची तजवीज करीत असत. या कामीं त्यांना इंग्रजांच्या

मदतीशिवाय यश येणें शक्य नव्हतें. अर्थात् स्वार्थासाठींच कां होईना त्यांना आपल्या **इंग्रज** 'कुळां' ना खूष राखणें जरूर होतें. शिवाय त्यांच्या तिकडे इकडील हिंदु लोकांसारखा जातिभेद नसल्यामुळें एकमेकांचा रोटीबेटी व्यवहार होण्याला अडचण नव्हतीच. **इंग्रज** युवतींच्या सौंदर्याला मोहित होऊन पुष्कळ **नार्मन** सरदारांनीं इंग्रज बायका केल्या होत्या. पहिल्या **हेन्रीनें इंग्रज** कुळांतीलच मुलगी आपली राणी केली होती हें मागें सांगितलेंच आहे.

४ नार्मन व इंग्रज यांचें एकीकरण—अशा रीतीनें **नार्मन** व **इंग्रज** रक्त एकमेकांत मिसळून नवीन पिढी निर्माण होत होती. हळू हळू पूर्वींचे रागद्वेष नष्ट होऊन एकमेकांत प्रेमसंबंध निर्माण होऊं लागले होते. व **नार्मन** लोकसंख्येनें कमी असल्यामुळें **इंग्रज नार्मनांच्या** आहारीं न जातां **नार्मनच इंग्रजांच्या** पोटांत गडप होत चालले होते. हा मिलाफ पूर्ण होऊन **नार्मन** व **इंग्रज** हा भेद अजिबात नष्ट होणें ही गोष्ट कांहीं पांचपंचवीस वर्षांत घडून येणारी नव्हे. पण मिलाफाला सुरवात होऊन 'नूतन इंग्रज राष्ट्र' (New English Nation) चा उदय होऊं लागला होता. जुन्या इंग्रज सरदारांचें बल कमी होऊन सर्वांवर **नार्मन** राजाचा व जहागीरदारांचा वरवंटा सारखाच फिरत असल्यामुळें त्यांच्या परस्परांतील चुरशी व भांडणेंहि आतां नाहींशीं होत चाललीं होतीं.

५ सुधारणेला नार्मनांची मदत—शिवाय **नार्मन** लोक कांहीं बाबतींत **इंग्रजांपेक्षां** सुधारलेले असल्यामुळें त्या बाबतींत **इंग्रजांची** सुधारणा होण्यास आयतीच मदत मिळाली. **नार्मन** धर्माधिकारी **इंग्रज** धर्माधिकाऱ्यांपेक्षां जास्त शिकलेले असत. आपल्या इकडील संस्कृत भाषेप्रमाणें '**लाटिन**' (Latin) ही भाषा त्यावेळीं **ख्रिस्ती** लोकांत पवित्र मानीत. सर्व धर्मग्रंथ लाटिन भाषेंत असावयाचे, व धार्मिक विधी लाटिन भाषेंतूनच व्हावयाचे. **इंग्रजांपेक्षां फ्रेंच** लोक जास्त सुधारलेले; त्यामुळें **फ्रेंच** भाषा ही **इंग्रजांच्या** जुन्या भाषेपेक्षां प्रौढ बनलेली होती. **नार्मन** लोक बहुतेक **फ्रेंच** भाषा बोलणारे, त्यामुळें फ्रेंच हीच **इंग्लंडची** राजमान्य भाषा झाली. पुष्कळ **इंग्रजांना** तिचा अभ्यास करावा लागला. **फ्रेंच** शब्द इंग्रजांच्या भाषेंत घुसून त्या भाषेला प्रौढपणा आला, आणि शेवटीं हळू हळू दोन्ही भाषांचें मिश्रण होऊन तिचें हल्लींच्या **इंग्रजी** भाषेंत रूपांतर झालें पण त्यांतही इंग्रजांच्या मूळच्या भाषेचा वरचढपणा कायम आहे.

६ **एकछत्री राज्याचा परिणाम**--**ना**र्मन लोकांच्या सान्निध्यानें इंग्रज लोकांच्या पोषाखांत व रहाणींतही फरक होत गेला. **ना**र्मन शिल्पकारांनीं मोठमोठे वाडे बांधले. त्यांचें अनुकरण पुष्कळ इंग्रजांनीं केलें. पूर्वी इंग्रजांना आडनांवें माहीत नव्हतीं तीं **ना**र्मन लोकांनीं प्रचारांत आणलीं कांहीं व्यक्तिविषयक गुणांवरून, कांहीं धंद्याच्या नांवावरून, तसेंच कांहीं मूळच्या पाळण्यांतल्या नांवाला एखाद्या विवक्षित अर्थी प्रत्यय लावून पुष्कळ आडनांवें प्रचारांत आलीं. एकंदरींत **ना**र्मन लोकांच्या स्वारीनें इंग्रजांचा स्वातंत्र्यनाश होऊन पहिल्या पहिल्यानें त्यांना जरी बरेच हाल भोगावे लागले, तरी **ना**र्मन लोक एकंदरींत शांततेचे व सुव्यवस्थेचे भोक्ते असल्या-मुळें व अनेक बाबतींत ते इंग्रजांपेक्षां जास्त सुधारलेले असल्यामुळें, तसेंच आतां एकछत्री राज्य होऊन सर्व प्रजेवर एकाच कायद्याचा अंमल होऊं लागल्यामुळें पुढें इंग्रज व **ना**र्मन हा भेद लुप्तप्राय होऊन या नार्मन स्वारीचा व अंमलाचा अंतिम परिणाम इंग्रजांचें एक राष्ट्र बनण्यांत झाला.

थोर लोकांचीं संक्षिप्त चरित्रें.

[प्र.=प्रकरण. प.=परिच्छेद]

जूलियस सीझर—(Julius Caesar) दोन अडीच हजार वर्षांपूर्वी युरोप खंडांत **रोमन** लोकांचें विस्तीर्ण साम्राज्य होतें. त्या साम्राज्याच्या भरभराटीला जे पुरुष कारणीभूत झाले त्यांत **जूलियस सीझर** या प्रख्यात वीर पुरुषाची गणना होते. त्याचा जन्म ख्रिस्तपूर्व १०० या वर्षी झाला. तो उत्तम सेनानी, उत्कृष्ट वक्ता, आणि चांगला ग्रंथकारही होता. **गॉल** (फ्रान्स), **ग्रीस** (Greece), **स्पेन** (Spain) वगैरे देश त्यानेंच पादाक्रांत केले. **गॉल** लोकांचा देश कबजांत आल्यावर त्यानें **ब्रिटन** देशावर स्वारी केली, आणि तोही प्रदेश रोमन सत्ते-



जूलियस सीझर.

खालीं आणला. (प्र. २ परिच्छेद २।३) रोमन लोकांचे साम्राज्य हें त्या वेळीं लोकसत्तात्मक होतें; तरी बहुतेक सत्ता 'डिक्टेटर' (Dictator) म्हणजे एक प्रकारच्या सर्वाधिकाऱ्याच्याच हातीं असे. इ. स. पू. ५८ या वर्षी **सीझर** गॉलचा सुभेदार झाला व त्यापुढील दहा बारा वर्षें त्याचीं अत्यंत भरभराटींत गेलीं. पण या वैभवाबरोबरच त्याला शत्रूहि बरेच उत्पन्न झाले. शेवटीं **सीझर** रोमचें लोकसत्ताक राज्य मोडून स्वतः 'राजा' किंवा 'बादशहा' होऊन बसेल कीं काय अशी त्याच्या कित्येक सहकाऱ्यांनाहि शंका येऊन त्यांनीं त्याच्याविरुद्ध गुप्त कट केला, आणि इ. स. पू. ४४ या वर्षी भर **सेनेट** सभेंत (The Senate House) त्याचा खून करण्यांत

आला ! तो अंगानें सडपातळ पण निकोप प्रकृतीचा व काटक होता. त्याचें सारें आयुष्य स्वाऱ्या व लढाया यांत गेलें. तथापि या लढायांतील नाना प्रकारचीं संकटें तो मोठ्या दक्षतेनें, शहाणपणानें, आणि युक्तीनें टाळीत असे. बुद्धिमत्तेंत सगळ्या रोमन राज्याच्या इतिहासांत त्याच्या बरोबरीचा पुरुष कोणी झाला नाहीं असें म्हणतात. काव्य, गणित, खगोलशास्त्र, आणि शिल्पशास्त्र यांची त्याला फार आवड असे. पुनर्जन्म अगर शकूनमुहूर्तादिकांवर त्याचा विश्वास नसे. तथापि '**व्हीनस**' या देवतेला तो मानीत असे. त्या काळच्या सगळ्याच रोमन लोकांप्रमाणें तो पराकाष्ठेचा स्त्रैण होता. इंग्रजींतील महिन्यांच्या नांवापैकीं '**जुलै**' हें नांव त्याच्याच नांवावरून पडलें आहे असें म्हणतात. एकंदरींत आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर जीं थोर म्हणून माणसें होऊन गेलीं त्यांत '**सीझर**' ची गणना होते ती योग्य आहे यांत संशय नाहीं.

आल्फ्रेड (Alfred the Great)—अकराव्या शतकांत **नार्मन** लोकांनीं इंग्लंड देश जिंकण्यापूर्वी **इंग्लंडांत** जे **इंग्रज** राज्यकर्ते होऊन गेले त्यांत **आलफ्रेड** हा फार पराक्रमी, शहाणा व दूरदर्शी होता. तो इ. स. ८४९ या वर्षी जन्मला. इ. ८७१ या वर्षी त्याला **वेसेक्स**ची गादी मिळाली. पण पुढें लवकरच **डेन्स** लोकांच्या स्वाऱ्यांपुढें इंग्रजांचा टिकाव न लागून, **आल्फ्रेड**लाही कित्येक दिवस अज्ञातवासांत घालवावे लागले (प्र ४. प० १२।१३). पण त्यानें धीर न सोडतां पुनः सैन्याची जमवाजमव केली, आणि डेन्स लोकांवर अचानक छापा घालून त्यांची दाणादाण करून टाकली (इ. स. ८७८). तो विद्येचा मोठा भोक्ता असून त्यानें आपल्या राज्यांत कितीतरी सुधारणा घडवून आणल्या होत्या. आरमारावांचून इंग्लंडचा तरणोपाय नाहीं हें त्यानेंच प्रथम ओळखून इंग्लंडच्या आरमाराचा पाया घातला असें म्हणतात. भरतखंडांतील नल–युधिष्ठिर किंवा महाराष्ट्रांतील श्रीशिवनृपतीप्रमाणें इंग्लंडच्या जुन्या राजांच्या नाममालिकेंत आल्फ्रेडचा ' पुण्यश्लोक ' किंवा ' धि ग्रेट (The great) या नांवानें उल्लेख केला जातो. तो इ. स. ९०१ या वर्षी मरण पावला.

कान्यूट (Canute)—इ. स. च्या दहाव्या शतकांत इंग्लंडवर डेन्स लोकांचे हल्ले चालू असतां त्यांच्या व इंग्रजांच्या नेहमीं कटकटी होत असत. **कान्यूट** हा मूळचा **डेन्मार्क**चा राजपुत्र; पण इ. स. १००२ या वर्षी इंग्लंडमधील '**एथलरेड**' नांवाच्या एका मूर्ख राजानें आपल्या प्रांतांतील सगळ्या डेन्स लोकांची कत्तल केल्यामुळें चिडून जाऊन **कान्यूट**चा बाप **स्वेन** यानें इंग्लंडवर स्वारी करून

एथलरेड राजाला पळवून लाविलें, आणि **कान्यूटनें** बापाच्याही पुढें मजल मारून इ. स. १०१६ या वर्षी इंग्लंडचें सगळेंच राज्य आपल्या सत्तेखालीं आणलें. नंतर **एथलरेड** राजाची विधवा राणी **एमा** हिच्याशीं स्वतः पुनर्विवाह लावून इंग्रज व डेन्स या दोघांचें सख्य घडवून आणण्याचे पुष्कळ प्रयत्न त्यानें केले. एकदां समुद्राच्या लाटांना 'पुढें याल तर खबरदार!' असा हुकूम करून आपल्या सभोवतालच्या तोंडपुज्या मंडळीचें 'कर्णोत्पाटन' केल्याची त्याची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. (प्र. ८ प. ७) हा राजा इ. स. १०३५ या वर्षी मरण पावला. त्यालाही पुष्कळ वेळां धि ग्रेट (The Great) ही पदवी लावलेली आढळते.

धर्मशील एडवर्ड (Edward the Confessor)—नॉर्मन लोकांच्या अंमलापूर्वी इंग्लंडमध्यें जे इंग्रज राजे होऊन गेले त्यांत बाप इंग्रज आणि आई नॉर्मन अशा मिश्र विवाहापासून झालेला पण पितृसावर्ण्यानें 'इंग्रज' गणला गेलेला एडवर्ड राजा हा त्याच्या धर्मशीलपणामुळें प्रसिद्ध होता. डेन्स राजा कान्यूट याचा निर्वंश झाल्यावर इंग्लंडांतील शिष्टमंडळानें इंग्लंडचें राजपद त्याला दिलें (इ. स. १०४२) आणि त्यानें २४ वर्षेंपर्यंत त्या राजपदाचा उपभोग घेतला. त्याच्या वयाचीं पहिलीं २७ वर्षें नॉर्मंडीमध्यें गेलेलीं असल्यामुळें त्याच्या मित्रमंडळींत नॉर्मन लोकांचाच ज्यास्त भरणा होता, व पुढें 'सरदार वुइल्यम' (William, Duke of Normandy) ची इंग्लंडवर दृष्टि वळण्यालाही इंग्रज दरबारांतील नॉर्मन लोकांचें वाढलेलें प्रस्थ हें बऱ्याच अंशीं कारण झालेलें होतें (प्र. ८ प० १२). तथापि हा राजा एकंदरींत शांततेचा भोक्ता असून जात्या निवृत्तिपर असल्यामुळें त्याला इतिहासकारांनीं धर्मशील (The Confessor) अशी पदवी दिलेली आहे. तो इ. स. १०६५ मध्यें मरण पावला. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध कबरस्थान 'वेस्टमिन्स्टर अबे' (Westminster Abbey) हें या एडवर्ड राजानें बांधलें.

विजयी वुइल्यम (William the Conqueror)—अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडवर केवळ विजिगीषेनें स्वारी करून ती यशस्वी झाल्यावर तेथें आपलें कायमचें राजपद स्थापणारा पहिला नार्मन सरदार (Duke) **वुइल्यम** हा होय. हा जसा शूर सेनापति, तसाच चतुर मुत्सद्दीहि होता. इ. स. १०६६ या वर्षी इंग्लंडचा राजा **हॅरोल्ड** याशीं युद्ध करून त्यानें इंग्लंड काबीज केलें. पण या देशावर कायमचें राज्य चालवावयाचें तर इंग्रज प्रजेच्या देहाप्रमाणेंच त्यांचीं अंतःकरणेंहि आपल्या ताब्यांत आलीं पाहिजेत हें ओळखून त्यानें पहिल्या पहिल्यानें इंग्रजांचे

जुने कायदे व चालीरीति यांत विशेषशी ढवळाढवळ केली नाहीं. त्याच्या विरुद्ध उठणाऱ्या बंडखोर इंग्रजांना त्यानें कडक शासन केलें; तथापि त्याच्याशीं नमून वागणाऱ्या इंग्रजांना आपल्या नॉर्मन जहागिरदारांप्रमाणेंच त्यानें महत्पदास चढविलें. मात्र कोणीही जहा-गीरदार–मग तो **नार्मन** असो कीं **इंग्रज** असो–आपल्या वरचढ होऊं नये अशी खबरदारी त्यानें घेतली. त्यानें इंग्लंडांत स्थापन केलेली जहागिरी पद्धति (Feudal System) पुढें कित्येक वर्षेपर्यंत तशीच चालू होती. (प्र० १० प० ११–१२–१३). त्यानें तयार करविलेल्या इंग्लंडच्या नोंदबुकावरून (Domesday Book) तत्कालीन इंग्लंडची स्थिति चांगली कळून येते. त्याच्या वृद्धापकाळीं त्याच्या मुलांकडून त्याला फार त्रास भोगावा लागला. आणि मृत्युसमयीं (इ. स. १०८७) तर त्याची इतकी दीनवाणी स्थिति झाली होती कीं त्याचें प्रेत तीन तास उघड्यावर पडून होतें, आणि अखेर त्याला मूठमाती मिळाली तीही एका फ्रेंच गृह-स्थाच्या औदार्यामुळेंच ! (प्र. १० प० २१). इंग्लंडच्या प्रस्तुत राजघराण्याची परंपरा थेट या **वुइल्यम**पर्यंत लागत असल्यामुळें व **वुइल्यम** नंतर कोणाही 'परकी' राजानें इंग्लंडवर कायमचें स्वामित्व न मिळविल्यामुळें इंग्लंडच्या इतिहासांत या **वुइल्यम** राजाचें एका कायमच्या स्थिर राजघराण्याचा संस्थापक म्हणून फार महत्त्व मानतात.

हेरवर्ड (Hereward the Wake) नार्मंडीचा सरदार विजयी **वुइल्यम** यानें इंग्लंड देश पादाक्रांत केल्यावर (इ. स. १०६६) त्याच्या अंमलाला विरोध करणारे इंग्रज अर्थातच ' बंडखोर ' (Outlaw) ठरले. **हेरवर्ड** हा असल्या बंडखोर इंग्रजांचा एक प्रमुख पुढारी होता. **नार्मन** लोकांच्या जाचाला कंटाळून ज्यांनीं अरण्यवास पत्करण्याचें ठरविलें होतें अशा सर्व इंग्रजांना एकत्र करून **'इलाय'** (Ely) नांवाच्या बेटांत त्यानें एक ' आश्रयस्थान ' (Camp of Refuge) स्थापन केलें. आणि जिवावर उदार झालेले बरेचसे शूर गडी (Desperate Spirits) या आश्रयस्थानांत वास्तव्य करून पुष्कळ दिवसपर्यंत गनिमी काव्यानें वुइल्यमशीं झुंज खेळले. पण शेवटीं त्यांचा निरुपाय होऊन हें ' आश्रयस्थान ' **नॉर्मन** लोकांच्या हातीं आलें (प्र १० प. ८) **हेरवर्ड** मात्र नॉर्मनांच्या हातीं लागला नाहीं. इंग्रजांच्या जुन्या कवनांतून या ' जागृत हेरवर्ड ' (Hereward the Wake) ची अनेक कवींनीं स्तुति गाइलेली आढळते.

प्रस्तुत भागांत आलेल्या महत्त्वाच्या गोष्टी

(१) अँग्लो-साक्सन लोक (प्र. ३ प. २।८।११).

(२) इंग्लड आणि ख्रिस्ती धर्म (प्र. ५ प. ६ ते १६; प्र. ७ प. १६)

(३) इंग्लंडवर रोमन अंमलाचा परिणाम (प्र. २ प. १७ ते २०)

(४) ख्रिस्ती धर्मयुद्धें (प्र. ११ प. ४।५।१२)

(५) जुन्या इंग्रजांची राज्यव्यवस्था (प्र. ६ संपूर्ण; प्र. ७ प. १७)

(६) डेन लोकांचा इंग्लंडवरील अंमल (प्र. ४. प. ८।९।१२; प्र ७ प. १७ ते २२

(७) ड्रुइड लोकांची माहिती प्र. १-प. ५; प्र. ५ प. ५)

(८) नॉर्मन लोकांची इंग्लंडवर स्वारी व तिचे परिणाम (प्र. ८ प. १५,२२ ते २५; प्र. ९ प. ४,७ ते ११; प्र. १२ संपूर्ण.

(९) सरंजामी पद्धति (प्र. १० प. ११ ते १३; प्र. ११ प. २७)

संस्मरणीय सन.

ख्रि. पू.	५५	जुलियस सीझरची ब्रिटनवर पाहिली स्वारी.
,,	५४	,, ,, ,, दुसरी ,,
इ. स.	७८	जुलियस ॲग्रिकोलाचा अंमल.
,,	१२०	हेड्रियन बादशहाची ब्रिटनला भेट.
,,	३९६	सरदार स्टिलिकोचा अंमल.
,,	४१०	रोमन लोकांचें ब्रिटनमधून प्रयाण.
,,	४४९	अँग्लो-साक्सन लोकांचा ब्रिटनमध्यें प्रवेश.
,,	६६७	इंग्रजांचें ख्रिस्तीकरण.
,,	८२७	एग्बर्टचें अधिराज्य.
,,	८७१	आल्फ्रेड राजाचें राज्यारोहण.

इ. स.	९०१	आल्फ्रेड राजाचा मृत्यु.
,,	९९१	डेन-जेल्ड कर.
,,	१००२	इंग्लंडमधील डेन्स लोकांची कत्तल.
,,	१०१६	कान्यूट राजाचें राज्यारोहण.
,,	१०३५	कान्यूट राजाचा मृत्यु.
,,	१०४२	एडवर्ड इंग्रज राजा झाला.
,,	१०६५	एडवर्डचा मृत्यु.
,,	१०६६	हेस्टिंग्जची लढाई; व वुइल्यम नार्मंडीकराचें राज्यारोहण.
,,	१०८७	पहिल्या वुइल्यमचा मृत्यु, व दुसऱ्या वुइल्यमचें राज्यारोहण.
,,	११००	दुसऱ्या वुइल्यमचा मृत्यु व पहिल्या हेन्रीचा राज्याभिषेक.
,,	११३५	पहिल्या हेन्रीचा मृत्यु स्टीफनचें राज्यारोहण.
,,	११५४	स्टीफनचा मृत्यु; नॉर्मन राजघराण्याचा शेवट व दुसऱ्या हेन्रीचें राज्यारोहण.

इंग्लंडांतील राजवंशमालिका.

इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत सर्व इंग्लंडवर एकाच राजाचा स्थिर असा अंमल कधींच नव्हता. इ. स. ८२७ या वर्षी '**एगबर्ट**' नांवाचा एक पराक्रमी राजा दक्षिणेकडे पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत व उत्तरेकडे ट्वीड नदीपर्यंतच्या मुलखाचा स्वामी झाला. यालाच साधारणपणें इंग्लंडचा पहिला सार्वभौम राजा असें म्हणतां येईल. त्याचा पुढील वंश येणेंप्रमाणें:—

(१) इंग्रज राजवंश.

एगबर्ट (इ. स. ८२७)
|
एथलवुल्फ (इ. स. ८३६)
|
आल्फ्रेड (इ. स. ८७१)
|
एडवर्ड (इ. स. ९०१)
|
अथेल्स्टन (इ.स.९२५) — **एडमंड** (इ.स ९३७) — **एडरेड** (इ.स.९४६)

एडमंड यांचे पुत्र:
एडवी (इ.स.९५५) — **एडगर** (इ स.९५८)

एडगर यांचे पुत्र:
एडवर्ड (इ स.९७५) — **एथलरेड** (इ.स.९७८) × **एमा.** हिने पुढें **कान्यूट** या डेन राजाशीं पुनर्विवाह केला.

एथलरेड यांचे पुत्र:
एडमंड (इ.स.१०१६) — **एडवर्ड** (इ.स.१०४२) (एमाचा मुलगा) — आल्फ्रेड

एडवर्ड (इ.स.१०४२) × एडिथ—हिचा भाऊ **हॅरोल्ड** (इ. स.१०६५)

एडमंड यांचे पुत्र:
एडवर्ड — एडमंड

एडवर्ड
|
एडगर अथेलिंग (इ. स. १०६६) हाच शेवटचा इंग्रजवंशीय राजा होय.

(२) डेन राजवंश.

इ. स. १०१६ पासून इ. स. १०४२ पर्यंत इंग्लंडवर डेन राजांचें स्वामित्व होतें. त्यांची वंशावळ येणेंप्रमाणें:—

स्वेन (डेन्मार्कचा राजा).
|
कान्यूट (इ. स. १०१६) × **एमा** (एथलरेडची विधवा)
|
हॅरोल्ड (इ. स. १०३५) — **हार्डी कान्यूट** (एमाचा मुलगा) (इ. स. १०४०)

(३) नॉर्मन राजवंश

इ. स. १०६६ मध्यें नॉर्मंडीचा सरदार वुइल्यम यानें हॅरोल्ड या इंग्रज राजाचा पराभव करून इंग्लंडचें राज्य मिळविलें. व तो इंग्लंडचा पहिला नॉर्मन राजा झाला. त्याचा जुन्या इंग्रजवंशीय राजांशीं संबंध दाखविणारी वंशावळ:—

रोल्फ (हा वुइल्यमचा एक पराक्रमी नॉर्मन पूर्वज होता.)
 |
वुइल्यम
 |
रिचर्ड
 |— रिचर्ड
 | |— रिचर्ड
 | |— रॉबर्ट
 | |
 | **वुइल्यम** (इ. स. १०६६) (हाच विजयी वुइल्यम होय.) त्याचा पुढील वंश येणेंप्रमाणें:—
 |— **एमा** × एथलरेड (इंग्लंडचा राजा) याच्याशीं लग्न.
      |
     एडवर्ड (धि कन्फेसर.)

वुइल्यम (इ. स. १०६६)
 |— अॅडेला (मुलगी) × **स्टीफन** (इ. स. ११३५)
 |— **वुइल्यम** (इ. स. १०८७)
 |— **हेन्री** (इ. स. ११००)
      |
     मॉड (मुलगी) × जॉफ्रे. (फ्रान्समधील एक संस्थानिक याशीं लग्न.) (इ. स. ११३५)
      |
     हेन्री (प्लँटॅजेनेट) (इ. स. ११५४)

☞ या तिन्ही राजवंशांचा एकत्र विचार केला असतां ' नॉर्मन कन्या ' **एमा** ही आपल्या दोन विवाहांनीं **इंग्रज** व **डेन** या राजवंशांचा संबंध जोडून शिवाय आपल्या पितृकुलांतील विजयी वंशज वुइल्यम याचाही इंग्रज राजवंशाशीं परंपरेनें संबंध जोडण्यास कारणीभूत झाली असें दिसून येईल.

प्रश्न.

(१) इंग्लंड हा देश कुठें आहे ? त्याचें जुनें नांव काय होतें ? तेथल्या लोकांना इंग्रज हें नांव कां व केव्हांपासून पडलें ?

(२) इंग्लंडच्या इतिहासाचें महत्त्व कशांत आहे ?

(३) इंग्लंडांतील जुने रहिवासी कोण होते ? त्यांच्या धर्मांचें व धर्मविधींचें वर्णन करा. 'ड्रुइड' लोकांची हकीकत सांगा.

(४) प्राचीन रोमन राष्ट्र कुठें होतें ? रोमन लोकांचा इंग्लंडमध्यें प्रवेश कसा झाला ?

(५) 'जुलियस सीझर'चें थोडक्यांत चरित्र सांगून त्याच्या इंग्लंडवरील स्वारीचें वर्णन करा.

(६) रोमन लोकांचा इंग्लंडमध्यें अंमल चालू असतां विशेष नामांकित असे कोणते रोमन अधिकारी इंग्लंडमध्यें येऊन गेले तें सांगून त्यांच्या कारकिर्दीतील विशेष गोष्टी सांगा.

(७) इंग्लंडवर रोमन अंमलाचा (Roman occupation) काय परिणाम झाला ?

(८) रोमन लोक इंग्लंडमधून केव्हां व कां निघून गेले ?

(९) जुन्या अँग्लो-साक्सन लोकांचें वर्णन करून त्यांच्या इंग्लंडमधील प्रथम प्रवेशाची हकीकत सांगा.

(१०) आर्थर व व्हार्टिजर्न या दोन ब्रिटन पुढाऱ्यांची तुलना करा.

(११) डेन लोक हे मूळचे कोण, कुठले, तें सांगून त्यांच्या इंग्लंडवरील स्वाऱ्यांचें वर्णन करा.

(१२) इंग्लंडवर एकछत्री राजाचा अंमल केव्हांपासून सुरू झाला तें सांगून त्या वेळीं त्या राज्याची व्याप्ति कोठपर्यंत होती तें सांगा.

(१३) आल्फ्रेड या राजाचें थोडक्यांत चरित्र देऊन त्याला 'The Great' असें नांव कां देण्यांत येतें तें सांगा.

(१४) इंग्लंडमध्यें इंग्रज लोकांचें आगमन होण्यापूर्वी तेथें कोणत्या धर्माचें प्राबल्य होतें व तें कां ?

(१५) इंग्रज लोकांचा जुना धर्म कोणता होता व त्यांनीं ख्रिस्ती धर्म केव्हां, कां व कसा स्वीकारला ?

(१६) 'येशू ख्रिस्त', 'पोप', 'लुईथर्ड', 'बर्था', 'आगस्टाइन', 'डन्स्टन' 'स्वेन', 'एडवर्ड धि कनफेसर', 'गॉडाविन', 'हेरबर्ड' 'फ्लँबर्ड', व 'थर्स्टन' यांच्यावर थोडक्यांत टीपा द्या.

(१७) इंग्रज लोकांच्या जुन्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप सांगून त्यांच्या 'शिष्ट-मंडळा' चें थोडक्यांत वर्णन करा.

(१८) 'शेरीफ' व 'आल्डरमन' या अधिकाऱ्यांचीं कामें काय होतीं ?

(१९) जुन्या इंग्रज राज्यव्यवस्थेंतील जमीनदार व गुलाम यांच्या स्थितींची तुलना करा.

(२०) इंग्रजांच्या जुन्या न्यायपद्धतीचें वर्णन करून 'दिव्य' व त्यांचे निर-निराळे प्रकार यांची माहिती द्या.

(२१) दहाव्या शतकांतील इंग्रजांचीं भाषा व वाङ्मय यांची माहिती सांगा.

(२२) आल्फ्रेडच्या मागाहूनच्या इंग्रज राजांत वैभवशाली असा कोण राजा झाला ? त्याच्या ऐश्वर्याचें वर्णन करा.

(२३) 'जगत्स्वामिनी', 'डेन जेल्ड', 'लांडग्याचा कर', 'करफ्यू बेल', 'डूम्सडे बुक' व 'क्रूसेड' यांवर थोडक्यांत टीपा द्या.

(२४) कान्यूटनें इंग्लंडचे राज्य कसें मिळविलें तें सांगून त्याच्या गुणावगुणांचें वर्णन करा.

(२५) डेन्स लोकांच्या अंमलाखालीं इंग्रज प्रजेची स्थिति कशी होती तें सांगा; आणि त्यांचा इंग्लंडवरील अंमल कधीं व कसा नष्ट झाला तें सांगा.

(२६) नॉर्मंडीचा सरदार वुइल्यम यानें इंग्लंडवर स्वारी केली ती कोणत्या हेतूनें ? त्याला यश येण्याला कारणें काय झालीं ? या स्वारीचा इंग्रजप्रजेवर काय परिणाम झाला ?

(२७) 'हेस्टिंग्ज'च्या लढाईचें थोडक्यांत वर्णन करा.

(२८) हॅरोल्ड व टॉस्टिग या भावांभावांमधील भांडणाचें कारण काय ? त्याचा अखेर परिणाम काय झाला ?

(२९) 'वुइल्यम धि कॉंकरर'च्या मुत्सद्दीपणाचीं व समयसूचकतेचीं उदाहरणें सांगा.

(३०) नॉर्मन लोकांच्या अमदानींत 'बंडखोर' इंग्रजांची काय दशा झाली ?

(३१) 'फ्यूडल सिस्टिम' म्हणजे काय ? ती इंग्लंडांत कोणीं स्थापन केली ? फ्रान्समधील ही पद्धति व इंग्लंडमधील पद्धति यांत फरक काय होता ?

(३२) थोरल्या वुइल्यमनें 'पोप'शीं कोणतें धोरण ठेविलें होतें ? त्याचा इंग्लंड-मधील ख्रिस्ती धर्मावर काय परिणाम झाला ?

(३३) आल्फ्रेड व पहिला वुइल्यम (William I) आणि कान्यूट व पहिला वुइल्यम (William I) यांची तुलना करून त्यांचे स्वभावविशेष सांगा.

(३४) वुइल्यम धि कॉंकररच्या मुलांमधील तंट्यांचे वर्णन करून हेन्रीनें (Henry I) राजपद कसें मिळविलें तें सांगा.

(३५) ख्रिस्ती धर्मयुद्धाचें (Crusade) कारण व स्वरूप कशा प्रकारचें होतें ? नॉर्मन राजांपैकीं या युद्धांत कोणीं कोणीं भाग घेतला होता ?

(३६) पहिल्या हेन्रीच्या कारकिर्दीचे थोडक्यांत वर्णन करा. त्याला 'पंडित हेन्री' असें कां म्हणत असत ?

(३७) पहिल्या हेन्रीच्या मुलाचें नांव काय ? तो कशानें मेला ? व त्याच्या मरणाचा हेन्रीच्या मनावर काय परिणाम झाला ?

(३८) मॉड व स्टीफन यांचें नातें काय होतें ? त्यांच्यांत कलह कशामुळें झाला ? व त्या कलहाचा अखेर परिणाम काय झाला ?

(३९) स्टीफन-मॉडच्या लढ्यांत नॉर्मन जहागिरदारांचें वजन पुष्कळ वाढलें असें म्हणतात त्याचें कारण काय ? या वेळीं सामान्य इंग्रज प्रजेची स्थिति कशी काय होती ?

(४०) 'इंग्लंडवरील नॉर्मन अंमलाचा अंतिम परिणाम इंग्रजांचें एक राष्ट्र बनण्यांत झाला' तो कसा हें सांगून या कालांतील इंग्लंडच्या सुधारणेला नॉर्मन लोकांची कशी मदत झाली तिचें वर्णन करा.

जगांतील समकालीन घडामोडी

[आधुनिक शास्त्रज्ञांच्या मतें या भूतलावर मनुष्यप्राणी उत्पन्न होऊन कमींत कमी बत्तीस हजार वर्षें झालीं असून पहिल्या वीस हजार वर्षांत या प्राण्याची फारशी उन्नति झाली नव्हती. पण पुढें हळूहळू जनावरें बाळगणें, जमीन नांगरणें, पेरणें, टोपल्या वगैरे विणणें, लांकडाच्या अगर कातड्याच्या होड्या बनविणें, देवदेवतांना संतुष्ट करण्यासाठीं पशूंचे अगर माणसांचे बळी देणें वगैरे 'सुधारणा' त्यांच्यांत दिसून येऊं लागल्या. यानंतर **पश्चिम आशिया** व **मिसर** देश यांत तटबंदी नगरांचा उपक्रम झाला. **तैग्रीस** व **युफ्रेतीस** या नद्यांमधील **सुमेरिया** प्रांतांत चित्र-रेखारूप संज्ञांचा उद्भव ख्रि. पू. ७००० वर्षांच्या सुमारास झाला असें मानतात. आर्यांचे अत्यंत प्राचीन ग्रंथ जे '**वेद**' त्यांचा रचनाकाल ख्रि. पू. पांच हजार वर्षांपेक्षां कमी नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. अयोध्यापति **श्रीरामचंद्रा**चा काल यानंतरचा असून **युधिष्ठिर** शक–कलियुगारंभ ख्रि. पू. ३१०१ वें वर्ष असें ठरविण्यांत आलें आहे. **कौरव-पांडवां**मधलें भारतीय युद्ध ख्रि. पू. ३००० ते २५०० या वर्षांच्या दरम्यानचें असून **उपनिषदें** व यहुदी धर्मसंस्थापक **मोझेस** यांचा काल ख्रि. पू. १५०० पासून १००० पर्यंतचा असावा असें समजतात. **इराणी** धर्म संस्थापक **झरदुष्ट्र** याचा काल ख्रि. पू. ८०० वर्षें हा असून **भारत-कार व्यास**, संस्कृत **व्याकरणकार पाणिनि**, वगैरे भारतीय ग्रंथकार ख्रि. पू. ८०० ते ७०० वर्षांतले आहेत. **चीन**चा धर्मशास्त्रकार **कान्फ्यूशस** हा ख्रि. पू. ५५०ते४७८ च्या दरम्यानचा असून जैनाचार्य **महावीर वर्धमान** हा ख्रि. पू. ५४७ ते ४६७ च्या दरम्यान होऊन गेला. प्रसिद्ध **गौतमबुद्धा**चा काल ख्रि. पू. ५६७ ते ४८७ हा ठरविण्यांत आला असून सांख्यकार **कपिल** ख्रि. पू ५०० ते ४०० या दरम्यान होऊन गेला असें समजतात. वाल्मिकी **रामायणा**ची रचनाही याच सुमारास झाली असें म्हणतात. ख्रि. पू. चौथें शतक हा **शिकंदर बादशहा**चा काल असून चक्रवर्ती **अशोक** ख्रि. पू. २७२ ते २३६ च्या सुमारास होऊन गेला. **चंद्रगुप्त मौर्य** व **आर्य चाणक्य** ख्रि. पू. तिसऱ्या शतकांतले असून 'महाभाष्यकार' **पतंजलि** व स्मृतिकार **मनु** ख्रि. पू. १५० च्या सुमाराला झाले.]

ख्रिस्तपूर्व पहिलें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

ब्रिटन नांवाच्या **केल्ट** (Celt) वंशाच्या लोकांची वसाहत--ख्रि. पू. ५५।५४ या वर्षीं त्यांच्यावर **रोमन** लोकांची पहिली स्वारी झाली. या स्वारीमुळें ब्रिटन लोकांची युरोपांतल्या इतर देशांतल्या लोकांना माहिती झाली, पण पुढें पन्नास पाऊणशें वर्षेपर्यंत त्यांना रोमन लोकांचा उपसर्ग झाला नाहीं.

युरोपखंड

रोमच्या लोकसत्ताक राज्यांत (Republic) पुढाऱ्यांमध्यें आत्म-वर्चस्वासाठीं नाना प्रकारचे डावपेंच व झगडे चालले होते. **जुलियस सीझर** हा ख्रि. पू. ५९ या वर्षीं **रोमचा कॉन्सल** (Consul) म्हणजे मुख्याधिकारी झाला. ख्रि, पू. ६० व्या वर्षीं त्यानें आपले प्रतिस्पर्धी **पांपे** (Pompey) आणि **क्रेशस** (Crassus) यांजबरोबर स्नेहसंधि करून रोममध्यें पहिलें **‘ त्रिमूर्ति मंडळ ’** (**Triumvirate**) स्थापलें. त्यानंतर **सीझर**चें व **पांपे**चें भांडण होऊन **पांपे** लढाईंत मारला गेला. **क्रेशस**ही एका लढाईत पडला. **सीझर**चा तर भर सेनेटसभेंतच खून झाला. ख्रि. पू ४३ या वर्षीं **रोम**मध्यें दुसरें ‘ **त्रिमूर्तिमंडळ** ’ स्थापन झालें. पण त्याच्यांतही पुढें फाटाफूट होऊन ख्रि. पू. २७ व्या वर्षीं या त्रिमूर्तींपैकीं एक **ऑक्टेव्हिअन** (Octavian) हा **ऑगस्टस** (Augustus) हें नांव घेऊन रोमचा सर्वसत्ताधारी ‘ बादशहा ’ झाला. सुप्रसिद्ध **येशू खिस्ताचा** (Jesus Christ) जन्म त्याच्या नांवचा शक सुरू होण्या-पूर्वीच्या ५ व्या वर्षीं झाला.

हिंदुस्थान व आशिया खंड

जुलियस सीझरनें इंग्लंड (ब्रिटन) जिंकलें त्याच सुमारास म्हणजे ख्रि. पू. ५६ व्या वर्षीं **हिंदुस्तानांत** पराक्रमी **विक्रम** राजाचा अंमल चालू असून त्याच्या नांवचा शकही त्याच वर्षापासून धरण्यांत आला आहे.

ख्रिस्ताभिधान (इ. स. चें) पहिलें शतक.

इंग्लंड (ब्रिटन)

इ. स. च्या ४३ व्या वर्षांपासून रोमन लोकांच्या इंग्लंडवर पुन्हा स्वाऱ्या होऊं लागल्या. **इ. स. ७८** या वर्षी आग्रिकोला या रोमन गव्हर्नरची इंग्लंड (ब्रिटन)-वर नेमणूक झाली व त्यानें 'रोमन ब्रिटन'चा चांगला बंदोबस्त ठेवून पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. ब्रिटनांच्या 'ड्रुइड' नांवाच्या धर्मगुरूंचा शेवटही याच शतकांत झाला.

युरोपखंड.

इ. स. ४८ या वर्षी प्रेषित **पॉल** (Apostle Paul) यानें बायबलांतील तत्त्वज्ञान लोकांना उपदेशण्याला सुरवात केली.

इ. स. ६४ या वर्षी रोम शहराला मोठी आग लागली. ही आग **नीरो** बादशहानें चेतविली व तो तिची गंमत पाहत राहिला होता अशी दंतकथा आहे ! ख्रिश्चन लोकांमुळेंच ही आग लागली असें म्हणून त्यानें नंतर त्या लोकांचा फार छळ केला असें म्हणतात.

हिंदुस्थान व आशियाखंड.

इ. स. २९ या वर्षी **जीजस ख्राइस्टला** येरुशलेम (Jerusalem) येथें सुळीं देण्यांत आलें.

इ. स. ७८ या वर्षी हिंदुस्तानांत शालिवाहन शकाला सुरवात झाली.

इ. स. चें दुसरें शतक.

इंग्लंड (ब्रिटन)

इ. स. १२० या वर्षी रोमचा हेड्रियन बादशहा ब्रिटनमध्यें येऊन त्यानें इंग्लंड व स्काटलंड यांचे दरम्यान एक मोठा तट बांधला.

युरोपखंड.

या शतकाच्या पहिल्या अर्धांत रोममध्यें हेड्रियन व अँटोनियो हे साधारण चांगले

बादशहा होऊन गेले. पण दुसऱ्या अर्थांत तेथल्या राज्यकर्त्यांची चैन आणि विलास यांचा कडेलोट होऊन रोमन साम्राज्याला उतरती कळा लागली.

हिंदुस्थान व आशियाखंड.

बुद्ध चरित्रकार अश्वघोष हा या कालांत होऊन गेला.

इ. स. चें तिसरें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

इ. स. २०८ यावर्षी रोमचा सेव्हरस बादशहा इंग्लंडमध्यें आला. त्यानें हेड्रियनचा तट दुरुस्त केला.

युरोपखंड

रोमन साम्राज्याच्या सीमांत प्रदेशांतील **गॉथ, फ्रँक** वगैरे रानटी (Barbarians) लोक रोमवर हल्ले करूं लागले, आणि रोमच्या बादशहांनीं त्या साम्राज्याचे विभाग पाडून ते आपसांत वांटून घेतले.

हिंदुस्थान व आशियाखंड.

कवि **भास**, आयुर्वेदाचार्य **सुश्रुत**, वगैरे ग्रंथकार या कालांत झाले. **भाजें, कार्लें, नाशिक, कान्हेरी** वगैरे ठिकाणचीं लेणीं याच कालांत कोरलेलीं असावीं असें मानतात.

इ. स. चें चौथें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

स्कॉट लोकांनीं इंग्लंडवर स्वाऱ्या करून ब्रिटन लोकांना फार त्रास दिला. पण पुढें **माक्झिमस** नांवाच्या रोमन सरदारानें त्यांचा पराभव करून त्यांना उत्तरेकडे पिटाळून लाविलें.

युरोपखंड

इ. स. ३०३ या वर्षी रोमच्या साम्राज्यांतील बहुतेक सर्व भागांतून खिस्ताच्या अनुयायांचा म्हणजे खिस्ती लोकांचा फार छळ झाला. पण हा छळच शेवटचा ठरून

गॅलेरियस (Galerius) नांवाच्या बादशहाला मरणसमयीं पश्चात्ताप होऊन त्यानें त्या धर्मीयांचा यापुढें छळ करूं नये असें फर्मान (Edict) काढलें.

इ. स. ३३० या वर्षी रोमच्या कॉन्स्टंटाइन (Constantine) बादशहानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला, आणि रोममधून राजधानी हालवून ती बिझांटियम (Byzantium) येथें नेली. त्या बादशहाच्या नांवावरूनच या नव्या राजधानीला पुढें कॉन्स्टँटिनोपल (Constantinople) असें नांव प्राप्त झालें. **गॉथ** वगैरे रानटी लोकांचे रोमन साम्राज्यावरील हल्ले वाढत गेले, आणि इ. स. ३६४ च्या सुमारास या साम्राज्याचीं पूर्व व पश्चिम अशीं दोन शकलें झालीं.

हिंदुस्थान व आशियाखंड

महाकवि **कालिदास**, मुद्राराक्षस नाटकाचा कर्ता **विशाखदत्त**, स्मृतिकार **याज्ञवल्क्य**, आणि सुप्रसिद्ध आर्यवैद्य **वाग्भट** हे या कालांत होऊन गेले. बौद्ध धर्माचा चीन देशांत प्रवेश झाला तोही याच शतकांत. **चंद्रगुप्त**, **विक्रमादित्य** वगैरे भारतवर्षाला ललामभूत झालेले कित्येक राजे याच शतकांतील होत. या कालांत भारतीय विद्याकलांचा परमोत्कर्ष झाला. **अजिंठा**, **सारनाथ**, **वेरूळ** वगैरे ठिकाणचीं लेणीं याच कालांतील होत.

इ. स. चें पांचवें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

इ. स. ४२६ या वर्षी रोमन लोकांनीं इंग्लंडचा कायमचा निरोप घेतला.

इ. स. ४४९ या वर्षी आंग्लो—साक्सन लोकांनीं ब्रिटनमध्यें कायमची वसाहत करण्याच्या दृष्टीनें पहिलें पाऊल रोवलें, आणि पुढल्या शंभर वर्षांत त्यांनीं तो सर्व प्रदेश आक्रमण केला.

युरोप खंड

रोमन साम्राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या सेनापतींनी आणि सुभेदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं, आणि गॉथ वगैरे रानटी लोकांच्या धुमाकुळामुळें खुद्द रोमची फारच दुर्दशा झाली. रोमचा शेवटचा बादशहा **रोम्युलस ऑगस्टुलस**

(Romulus Augustulus) याचा गॉथ लोकांपुढें टिकाव न लागून रोमन सेनेटच्या एका ठरावानेंच त्या साम्राज्याच्या पश्चिमेकडील शाखेचा अंत झाला !

हिंदुस्थान व आशियाखंड

मृच्छकटिक नाटकाचा कर्ता **शूद्रक**, पंचतंत्रकार **विष्णुशर्मा**, ज्योतिषी **वराहमिहिर** हे या कालांत होऊन गेले. **फाहैन** हा चिनी प्रवासी हिंदुस्थान पाहून गेला. इ. स. ४३६ मध्यें **आंध्र** राज्यकर्त्यांचा शेवट झाला.

इ. स. चें सहावें शतक

इग्लंड (ब्रिटन)

इंग्लंडमध्यें आंग्लो-साक्सन लोक स्थायिक होऊन त्यांचीं लहान लहान सात राज्यें स्थापन झालीं. व त्यांच्यांत आपसांत झगडे सुरू झाले.

युरोपखंड

अवशिष्ट रोमन साम्राज्याच्या पूर्व शाखेचा बादशहा जस्टिनियन (Justinian) यानें एक व्यापक मानव धर्मशास्त्र (System of Laws) तयार करून तें आपल्या राज्यांत जाहीर केलें.

हिंदुस्थान व आशियाखंड

अमरसिंहाचा ' अमरकोश ' आणि **भरता**चें ' नाट्यशास्त्र ' हे ग्रंथ या कालांत झाले. **भारवी**चें ' किरातार्जुनीय ' काव्यही या शतकांतलेंच होय. इ. स. ५६९ मध्यें मुसलमानी धर्मसंस्थापक **महंमद** याचा जन्म झाला.

इ. स. चें सातवें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

या शतकांत आंग्लो-साक्सनांच्या इंग्लंडमधील सात संस्थानांपैकीं बहुतेकांना आलटून पालटून एकमेकांवर सत्ता गाजविण्याची संधि मिळाली, आणि त्या संधीचा उपयोग करून घेऊन प्रत्येकानें कांहीं काल अधिराज पदाचा (Bretwalda) उपभोग घेतला.

युरोपखंड

फ्रान्स, स्पेन वगैरे देशांत स्थिर राजसत्ता प्रस्थापित झाल्या. या देशांच्या त्या वेळच्या मर्यादा अर्थातच भिन्न होत्या.

हिंदुस्थान व आशियाखंड

महंमद पैगंबराचा नवमत प्रचार, त्याचें मक्केहून मदीना येथें पलायन, (इ. स. ६३२) त्यावरच आधारलेला महंमदी शक, महंमदी धर्माचा व राज्याचा **अरबस्थान, इराण, इजिप्त** वगैरे देशांतील प्रसार या गोष्टी या शतकांत घडल्या.

भर्तृहरि, माघ, बाणभट्ट वगैरे कवि या कालांत झाले. चिनी प्रवासी **ह्यूएन्संग** याचा हिंदुस्तानांतील प्रवास व त्यानें लिहिलेलें प्रवासवृत्त याच कालचें आहे. हिंदुस्थानच्या उत्तरभागीं या कालीं निरनिराळीं रजपूत राज्यें असून दक्षिणेंत चालुक्यांचा अंमल होता.

इ. स. चें आठवें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

डेन्स लोकांची इंग्लंडवर पहिली स्वारी या शतकाच्या उत्तरार्धांत झाली.

युरोपखंड

स्पेन व पोर्तुगाल हे देश मुसलमानांनीं आक्रमण करणें, ख्रिस्ती धर्मपंथांत दोन तट पडून पूर्वपंथ (The Greek Church) आणि पश्चिमपंथ (The Roman Church) या नांवानीं त्यांचा प्रसार होणें, रोमच्या पोपला धार्मिक सत्तेप्रमाणेंच व्यावहारिक सत्ताही प्राप्त होणें, **शार्लमेन** (Charlemagne) नांवाच्या एका विख्यात राजाची युरोपखंडांतील सत्तावृद्धि, वगैरे गोष्टी या कालांतील मुख्य होत. दमास्कसचा खलीफा **वलीद** याची सत्ता तर एक वेळ चीनपासून स्पेनपर्यंतच्या सर्व भागावर पसरली होती.

हिंदुस्थान व आशियाखंड

आरब लोक सिंध प्रांतांत या शतकाच्या पूर्वार्धांत आले. ' अरेबियन नाइटस ' (Arabian Nights) या सुप्रसिद्ध कथांचा नायक खलीफा **हरून अल्‌रशीद** हा या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला. उत्तर हिंदुस्तानांतील कनोजचा राजा **यशोवर्मा,** आणि दक्षिण हिंदुस्तानांतील **मालखेडचे राष्ट्रकूट** राजे यांचा उदय याच शतकांतला होय. **कुमारिल भट्ट**ही याच शतकांत होऊन गेले.

इ. स. चें नववें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

इंग्लंडचा पुण्यश्लोक राजा **आल्फ्रेड** याचें राज्यारोहण (इ. स. ८७१) व डेन्स लोकांशीं चाललेल्या झगड्यांत त्यानें दाखविलेली चिकाटी, डेन्स लोकांचा पराभव झाल्यावर लाभलेल्या शांततेच्या काळांत त्यानें इंग्लंडमध्यें घडवून आणलेल्या सुधारणा, आणि इंग्लंडचें परशत्रूपासून रक्षण व्हावें म्हणून आरमार बांधण्याचा केलेला उपक्रम वगैरे गोष्टी या कालांतील इंग्रजांच्या प्रगतीच्या निदर्शक आहेत.

युरोपखंड

शार्लमेन राजाचे नातू **चार्लस** (Charles) आणि **लुई** (Louis) अनुक्रमें **फ्रान्स** आणि **जर्मनी** या दोन स्वतंत्र देशांचे राजे झाले. (इ. स. ८४३).

हिंदुस्थान व आशियाखंड

राष्ट्रकूट वंशांत **अमोघवर्ष** नांवाचा एक पराक्रमी व कीर्तिमान् राजा होऊन गेला. बंगालचा राजा **धर्मपाल** व त्याचा मुलगा **देवपाल** हे अमोघवर्षाचे समकालीन होते. जावा बेटांत एक प्रचंड बुद्ध देवालय बांधण्यांत आलें. **श्रीशंकराचार्य** व त्यांची मठस्थापना हीं या शतकांतील हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाची साक्ष देतात.)

इ. स. चें दहावें शतक.

इंग्लंड (ब्रिटन)

आल्फ्रेडच्या मागून इंग्लंडमध्यें जे इंग्रज वंशाचे राजे गादीवर आले त्यांतले बहुतेक अपराक्रमी प दुर्दैवीच निपजले. इ. स. ९९१ या वर्षी एका राजानें तर

डेन्स लोकांची बोळवण करण्यासाठीं प्रजेवर स्वतंत्र कर बसवून तो पैसा त्यांच्या पुढाऱ्यांना देऊन टाकला. त्यामुळें " म्हातारी मरावयाची ती मरून काळ सोकावल्यासारखा " झाला, आणि डेन्स लोकांचे अधिकाधिकच हल्ले होऊं लागले.

युरोपखंड.

इ. स. ९६२ मध्यें महात्मा ओटो (Otto the Great) या नांवाचा बादशहा जर्मनीमध्यें राज्य करीत होता. त्याचीच ख्रिस्ती धर्माच्या पश्चिम पंथाच्या अधिकारपदावर स्थापना करण्यांत आली. इ. स. ९९६ मध्यें फ्रान्समध्यें कॅपेशियन (Capetian) नांवाच्या एका नव्या राजघराण्याची पारिस येथें स्थापना झाली.

हिंदुस्थान व आशियाखंड.

अफगाणिस्थानांत '**गझनी**'ची स्थापना, आर्यज्योतिषी **मुंजाल** याचे ज्योतिषविषयक शोध वगैरे गोष्टी या कालांतील होत.

इ. स. चें अकरावें शतक

इंग्लंड (ब्रिटन)

इ. स. १००२ या वर्षीं **ब्राइस** नामक साधूच्या वार्षिक पुण्यतिथीच्या दिवशीं इंग्लंडचा राजा मूर्खशिरोमणी एथलरेड (Ethelred the Unready) यानें इंग्लंडमधील सगळ्या डेन्स लोकांची कत्तल करून टाकली. तेव्हां डेन्मार्कचा राजा **स्वेन** यानें इंग्लंडवर स्वारी करून 'इंग्लंडचा राजा' असा किताब धारण केला. त्याच्या मागून त्याचा मुलगा **कान्यूट** याला तर इंग्रजांच्या शिष्टमंडळानें खरोखरच इंग्लंडचें राजपद अर्पण केलें. पण कान्यूटच्या पश्चात् लवकरच त्याचा निर्वंश झाल्यामुळें इंग्रज राजा **एडवर्ड**-ज्याला त्याच्या साधुवृत्तीवरून धर्मशील (The confessor) अशी पदवी लोकांनीं दिली होती तो-गादीवर आला. त्याच्या पश्चात् पुनः राज्यांत अव्यवस्था माजली; आणि इ. स. १०६६ मध्यें ' हेस्टिंग्ज ' येथें फ्रान्समधील नॉर्मंडी संस्थानचा संस्थानिक वुइल्यम आणि इंग्रजांचा राजा हॅरोल्ड यांची लढाई होऊन हॅरोल्ड लढाईंत पडला, आणि विजयी वुइल्यम (William the Conqueror) इंग्लंडचा राजा होऊन इंग्लंडमध्यें एका नव्या राजवंशाची स्थापना झाली.


युरोपखंड

इ. स. १०७६ मध्यें तुर्क लोकांनीं **सिरिया** व **पॅलेस्टाइन** हे प्रांत जिंकून घेतल्यावर ' **येरुसलेम** 'ला जाणाऱ्या ख्रिस्ती यात्रेकरूंना मुसलमानांकडून त्रास होऊं लागला, व त्या निमित्तानें पुढें युरोपांतील ख्रिस्ती राजे व पॅलेस्टाइनमधले मुसलमान यांच्यामध्यें धर्मयुद्ध सुरू झालें. (इ स. १०९६). स्पेनमध्यें **सारासेन**, **ख्रिश्चियन** व **मूर** या तीन लोकांचा तिरंगी सामना होऊन **मूर** लोकांनीं **सारासेनां**चा पराभव करून **स्पेन**मध्यें आपलें राज्य स्थापिलें.


हिंदुस्थान व आशियाखंड

गझनीच्या महमुदाच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या—सोमनाथ येथील देवालयाची लूट (इ. स. १०२४) व मुसलमानांच्या जुलुमाला व जाचाला कंटाळलेल्या उत्तर हिंदुस्तानांतील आर्यांचें दक्षिणेकडे प्रयाण या गोष्टी या शतकांत घडल्या.

विक्रमादित्य चालुक्य, आणि त्याचा प्रधान **विज्ञानेश्वर**, तसेंच **धार**चा राजा **भोज** हे या शतकांत होऊन गेले.




एक हजार वर्षांपूर्वीचें पश्चिम युरोपखंड



प्राचीन आर्यांच्या पश्चिमेकडील वसाहती (प्र. ३)

सहाव्या शतकांतील इंग्लंड



जुन्या इंग्रजांचीं सात संस्थानें (पृ. १९)

इंग्रजांचें स्वराज्य
अथवा
इंग्लंडचा संपूर्ण इतिहास
भाग २ रा.

प्रकरण १३ वें.

जगद्गुरूंचा दर्जा !

(इ. स. ११५४–इ. स. ११७०)

[१ हेन्रीचें भाग्य—२ त्याचें पहिलें धोरण—३ ख्रिस्तीधर्माचा प्रसार—४ पोपची सत्ता—ब्राम्हतेज व क्षात्रतेज—५ पोपचें बहिष्कारास्त्र—६।७ ख्रिस्ती भूदेवांचे याज्ञिक-देवळें, देवस्थानें व मठ—८।९ संन्याशांचा प्रपंच व देवस्थानांची अवनति—धर्माधिकारी व राजे—१०।११ इंग्लंडांतील स्थिति—धर्माधिकाऱ्यांचें मांडलिकत्व—१२ इंग्रज प्रजेची वृत्ति—१३ थॉमस बेकेट—१४।१५ इंग्लंडांतले मुख्य आचार्य—बेकेटचें आचार्यपद व त्याच्या वर्तनांतील बदल-राजमैत्री तुटली—१६ पहिला खटका-१७ देवस्थानचे न्यायाधीश व कायदे-१८ क्लॅरेंडनची परिषद व तींतील ठराव-सोळा-कलमी यादी—१९ पोपचा विरोध व बेकेटचें पलायन—२० बेकेटचें पुनरागमन—पुन्हां तंटा—२१ हेन्रीचे उद्गार व बेकेटचा खून—२२ हेन्रीचा पश्चात्ताप व बेकेटचें साधुत्व—२३ धर्माधिकाऱ्यांची छाप.]

१ हेन्रीचें भाग्य—मागें अकराव्या प्रकरणांत **मॉडचा** मुलगा **हेन्री** हा इंग्लंडच्या गादीवर येऊन एका नवीन राजवंशाला सुरवात झाली हें सांगितलें. हा **हेन्री** मोठा भाग्यवान होता. त्याला **इंग्लंडची** गादी मिळाली तेव्हां त्याचें वय केवळ २१ वर्षांचें होतें. आईचा वारस म्हणून **नार्मंडी** प्रांत त्याचा होताच;

बापाला फ्रान्समधील दोन तीन संस्थानांची जहागीर होती तीही त्यालाच मिळाली. शिवाय त्याच्या सासुरवाडीकडूनही त्याला फ्रान्समधील बराच मुलूख मिळाला होता. पुढें त्याच्या मुलाचें फ्रान्समधील एका बड्या संस्थानिकाच्या एकुलत्या एका मुलीशीं लग्न झाल्यावर तेंही संस्थान त्याच्याचकडे आलें. असो.

२ पहिलें धोरण—इंग्लंडमध्यें त्याला राज्याभिषेक झाल्याबरोबर त्यानें प्रथम भाडोत्री सैन्याला रजा दिली, व स्वयंसैनिकांची पद्धति (Militia) सुरू केली. जहागिरदार लोक प्रबळ झालेले होते त्यांची सत्ता कमी करण्यासाठीं त्यानें त्यांचे किल्ले जमीनदोस्त करून टाकले, व त्यांच्याकडचें न्यायदानाचें काम काढून घेतलें. जहागिरीचा मोबदला म्हणून जहागिरदारांनीं लष्करी नोकरी करण्याची जुनी पद्धति रद्द करून त्यानें जहागिरदारांकडून रोख रक्कम घेण्याचा प्रघात चालू केला. लोकांना न्याय मिळण्यासाठीं त्यानें फिरते न्यायाधीश नेमले. व मोठमोठ्या शहरांना स्थानिक स्वराज्य म्हणजे आपला कारभार आपण पहाण्याची मोकळीक देऊन त्यानें लोकांची मनें खूष राखिलीं. पण या राजाच्या कारकिर्दीतील विशेष महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे धर्माधिकारी व राजा यांमधील भांडण ही होय.

३ ख्रिस्ती धर्माचा प्रसार—मागें ५ व्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **इंग्लंड**मध्यें ख्रिस्ती धर्माची सुरवात कोणीं केली हें जरी नक्की सांगतां येत नाहीं तरी **रोम**मधील जगद्गुरूंचे चेले (Apostles) येऊन त्यांनीं आपला उपदेश सुरू करण्याच्या पूर्वीच तेथें ख्रिस्ती धर्माचा चंचुप्रवेश झालेला होता ही गोष्ट निर्विवाद आहे. पुढें हळू हळू राजे लोकांनींच ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्यानंतर 'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें त्या धर्माचा जास्तच प्रसार झाला आणि नॉर्मन राजांच्या कारकिर्दींत तर अखेर सर्व इंग्रज राष्ट्र ख्रिस्ती झालें.

४ पोपची सत्ता—जुन्या **इंग्रज** राजांच्या कारकिर्दींत **रोम**मधील ख्रिस्ती धर्माच्या आचार्यांनीं ऐहिक कल्याणापेक्षां पारमार्थिक कल्याण श्रेष्ठ प्रतीचें आहे व तें करून देणें आपल्या हातीं आहे अशा समजुतीवर धार्मिक बाबतींतच नव्हे तर राजकीय बाबतींत सुद्धां सर्व राष्ट्रावर आपला अंमल बसविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु स्वातंत्र्यप्रिय **इंग्रज** लोकांनीं आपल्या राज्यांत धर्माधिकाऱ्यांचा हा प्रयत्न चालूं दिला नव्हता व ते कधींहि सर्वस्वीं **पोप**च्या आहारीं गेले नव्हते. **युरोप** खंडांतील **इंग्लंड** खेरीज बहुतेक सर्व ख्रिस्ती राष्ट्रांवर त्यावेळीं **पोप**चा अंमल बसला होता. व 'क्षात्र'तेजापेक्षां 'ब्राह्म'तेज श्रेष्ठ असें मानून सर्व

ख्रिस्ती राजांनीं ' सर्व राज्य तुमचेंच आहे. आम्ही फक्त तुमच्यातर्फे राज्यकारभार पहातों " असें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें सांगून " आपण ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ' समर्थ आहा ' अशी खरोखरच **पोप**ला कबुली दिली होती.

५ **बहिष्कार पत्र**—अशा रीतीनें **पोप** हा परमेश्वराचा या भूतलावरील प्रतिनिधि म्हणून सर्व ख्रिस्ती राष्ट्रांवर अंमल चालवीत असे. त्याचा शब्द मोडण्याची मोठमोठ्या बलाढ्य राजांचीहि प्राज्ञा नसे. परमेश्वराच्या दरबारांत जाण्याच्या दरवाजाच्या किल्ल्या त्याच्या स्वाधीन अशी सर्वत्र समजूत असल्यामुळें मी मी म्हणणाऱ्या राजांनाहि ' बहिष्कारा ' (Excommunication)च्या अस्त्रानें तो चीत करीत असे.

६ **ख्रिस्ती भूदेवांचे याज्ञिक—ख्रिस्ती** लोकांत **हिंदु** लोकांप्रमाणें 'ब्राह्मणां'नीं प्रत्येकाच्या घरीं जाऊन हव्यकव्य व इतर नित्य नैमित्तिक धर्मकृत्यें करण्याची चाल नाहीं. बहुधा प्रत्येक गांवांत एक देऊळ असावयाचें, व त्यांत धर्माधिकाऱ्यांनीं रहावयाचें. ठराविक दिवशीं अगर नैमित्तिक प्रसंगीं गांवच्या लोकांनीं देवळांत जमावयाचें, व देवळांतील ' भूदेवां ' (Priests)नीं पुराणाचा पाठ अगर कीर्तन (Sermon) करून सर्वांनीं मिळून परमेश्वरप्रार्थना करावयाची असा प्रकार चालतो. लग्नमुंजी (Baptism) सारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं कुटुंबांतील मंडळींनीं मित्रमंडळींसह देवळांत जमावयाचें, व त्या ठिकाणीं काय तो धर्मविधि व्हावयाचा. मृताची उत्तरक्रियाहि (Funeral) देवळाच्या पवित्र आवारांतच व्हावयाची अशी चाल असते. असो.

७ इंग्लंडमध्यें या वेळीं धर्माधिकाऱ्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था गांवच्या वसुलाचा ठराविक हिस्सा गांवच्या धर्माधिकाऱ्याला देऊन करीत असत. शिवाय कित्येक उदार धर्मात्मे देवस्थानांसाठीं मोठमोठ्या देणग्याहि देत. तसेंच कित्येक ठिकाणीं वैराग्यवृत्तीनें रहाणाऱ्या जोग्यां (monk)चे मठ (monastery) स्थापन झालेले होते. त्यांत रहाणारे जोगी व जोगिणी (nuns) परमेश्वरचिंतनांत आपला काळ घालवीत. त्यांच्याविषयीं भाविक ख्रिस्ती लोकांच्या मनांत फार पूज्यबुद्धि असून त्यांचें सर्व ख्रिस्ती लोकांवर फार वजन असे. या लोकांना हरतऱ्हेनें मदत करणें, त्यांचा योगक्षेम निर्वेध रीतीनें चालेल अशी व्यवस्था करणें हें मोठें पुण्यकृत्य समजलें जाई.

८ **संन्याशांचा प्रपंच**—अशा रीतीनें या संन्याशांचा ' प्रपंच ' वाढत चालला तसें देवस्थानचें एक स्वतंत्र खातेंच निर्माण झालें. हिंदुस्थानांत सरकारी कामकाजासाठीं जशी वर गव्हर्नरपासून खालीं गांवच्या पाटलापर्यंत अधिकाऱ्यांची

मालिका लागून गेलेली दिसते, तशीच त्यावेळीं युरोपांत धर्मकारणासाठीं वर **पोप**पासून खालीं एखाद्या वाडीच्या ग्रामोपाध्यापर्यंत या खात्याचे वरिष्ठ कनिष्ठ असे अधिकारी नेमण्यांत आलेले होते.

९ पण कोणत्याहि संस्थेंत झालें तरी केव्हांहि सर्व माणसें सारख्याच योग्यतेचीं असतात असें नाहीं; आणि कदाचित् प्रथम तशीं असलीं तरी कालांतरानें स्वार्थी माणसांचा त्या संस्थेंत प्रवेश झाल्यावर त्या संस्थेचें मूळचें स्वरूप पालटून तिला भलतेंच स्वरूप येण्याचा संभव असतोच. या 'देवस्थानां'चेंहि तसेंच झालें. थोड्याच दिवसांत या संस्थेचें शुद्ध धार्मिक स्वरूप जाऊन धर्माधिकारी राजकारणांत पडूं लागले. आणि राज्यांतला राजा हा आपला वरिष्ठ नसून आमच्या कृत्यांचा जाब द्यावयाचा तो आम्ही फक्त **पोप**च्या अधिकाऱ्यांनाच देऊं असें ते म्हणूं लागले.

१० **इंग्लंडांतील स्थिति**—अशा प्रकारचा त्यांचा हक्क खुद्द **युरोप** खंडांत अलीकडे मान्य होत चालला होता. इंग्लंडांत मात्र त्यांचें हें म्हणणें जुन्या इंग्रज राजांनीं सुद्धां मानलें नव्हतें. ते धर्माधिकाऱ्यांना मान देत नसत असें नाहीं; त्यांना शिष्टमंडळामध्यें बसण्याचा हक्क असून राजावर दाब ठेवण्याकडे ते आपल्या अधिकाराचा उपयोगहि करीत असत. परंतु धर्माधिकारी जर आपल्या राज्यांतल्या उत्पन्नावर पोसले जातात तर त्यांची नेमणूक करण्याचा अगर त्यांच्यापैकीं कोणी वाईट चालीचा निघाल्यास अगर कोणीं राजद्रोह केल्यास त्याला काढून टाकण्याचा अधिकार आपल्याला नसून तो शेंकडों कोसांवर राहाणाऱ्या **पोप**नें बजावावयाचा व त्याच्या ओंजळीनें आपण पाणी प्यावयाचें ही गोष्ट इंग्रज राजांनीं कधींहि कबूल केली नव्हती.

११ पुढें **नार्मन** लोक इंग्लंडांत येऊन **थोरल्या वुइल्यम**नें इंग्लंड पादाक्रांत केल्यावर **नार्मंडी**मधील पुष्कळ धर्माधिकारी इंग्लंडमध्यें येऊन वतनदार झाले. पण वुइल्यम हा महाधोरणी असल्यामुळें कोणाचेंही वर्चस्व वाढूं न देण्याकडे त्याचें लक्ष असे. तेव्हां इंग्लंडचे जुने राजे कधींहि धर्माधिकाऱ्यांचे सर्वस्वीं अंकित झालेले नाहींत हा जुना दाखला घेऊन **इंग्लंड**चा राजा या नात्यानें मी **पोप**चा अंकित नाहीं असें म्हणून धर्माधिकाऱ्यांना नेमण्याचा व काढण्याचा अधिकार त्यानें आपल्याकडेच ठेविला, व इतर जहागिरदारांप्रमाणेंच हे 'देवस्थानचे जहागीरदार'ही आपले 'मांडलिक' आहेत असें ठरविलें. **धाकट्या वुइल्यम**च्या (William II) कारकिर्दींत तर धर्माधिकाऱ्यांचीं देवस्थानें लुटलीं जाऊन सरकारी तिजोरींत कशी भर पडली हें आपण मागें पाहिलेंच आहे.

१२ इंग्रज प्रजेची वृत्ति--इतकें झालें तरी **नार्मन** धर्माधिकारी **नार्मन** राजांप्रमाणेंच ' अधिकाराकांक्षी ' असून संधि सांपडेल त्याप्रमाणें ते आपला अधिकार राजावरहि चालविण्यास कमी करीत नसत; व राजांची आपसांत लढाई सुरू असली म्हणजे त्यांनाहि कित्येक प्रसंगीं या धर्माधिकाऱ्यांच्या तंत्रानें चालण्याशिवाय गत्यंतर रहात नसे. ज्या ज्या वेळीं त्यांचे प्राबल्य होई त्या त्या वेळीं खुद्द **युरोप**खंडांत धर्माधिकाऱ्यांना जें वजन होतें, तें इंग्लंडांत आपल्याला प्राप्त करून घेण्याचा ते प्रयत्न करीत असत. पण सामान्य जनता धर्माधिकाऱ्यांना पूज्य मानून जरी मान देई, तरी आपल्या देशांतल्या धर्माधिकाऱ्यांनीं दूरच्या परकीय पोपच्या तंत्रानें चालून पोपचा अंमल परंपरेनें आपल्यावर लादावा ही गोष्ट त्यांनाही पसंत नसे. असो.

१३ थॉमस बेकेट—हेन्री इंग्लंडच्या गादीवर येण्यापूर्वी राज्यांत बरेच दिवस अंदाधुंदी चाललेली असल्यामुळें धर्माधिकाऱ्यांचें वजन फारच वाढत चाललें होतें इतर जहागिरदारांचे किल्ले वगैरे पाडून टाकून ज्याप्रमाणें हेन्रीनें त्यांचें सामर्थ्य संपुष्टांत आणिलें, तसेंच या बतनदार धर्माधिकाऱ्यांचेंहि करावें असें त्यानें योजलें. '**थॉमस बेकेट**' (Thomas Becket) या नांवाचा एक उद्योगी व बुद्धिमान् उपाध्याय अगर 'ब्राह्मण' या वेळीं राजाचा मुख्य सल्लागार होता. परराज्यांशीं तह करणें, कोणाला सनदा देणें, धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें, वगैरे सर्व महत्त्वाचीं कामें त्याच्या सल्ल्याशिवाय होत नसत. इतकेंच नव्हे तर राजाच्या अगदीं गुप्त व विश्वासाच्या मंत्र्यांपैकीं तो एक होता. तो शरिरानें उंच, देखणा, चांगला वक्ता, समयसूचक व दरबारांत कसें वागावें याचा पुरा माहितगार असल्यामुळें त्याच्या वाड्यांत लहानमोठ्या जमीनदारांची व जहागीरदारांची नेहमीं गर्दी असावयाची, व दररोज पांचपन्नास सरदार दरकदार पंक्तीला असावयाचे, अशा थाटानें तो रहात असे.

१४ इंग्लंडांतले मुख्य आचार्य--इंग्लंडांतील धर्माधिकाऱ्यांत '**यॉर्क**' व '**कांटरबरी**' येथील ' आचार्य ' (Bishop) मुख्य असून राज्यांतील सर्व देवस्थानच्या उपाध्यांनीं या बड्या आचार्यांच्या हुकुमाप्रमाणें चालावयाचें असा त्या वेळीं परिपाठ होता. कांटरबरीचे आचार्य (Arch bishop) हे राजाचे खास कुलोपाध्ये असून राज्याभिषेकासारखे महत्त्वाचे विधि त्यांच्याच हस्तें व्हावयाचे अशी पद्धत असे. इ० स० ११६२ सालीं '**थिओबाल्ड**' (Theobald) नामक त्या वेळचे **कांटरबरी**च्या गादीवरील आचार्य ख्रिस्तवासी झाले. तेव्हां हेन्रीनें **बेकेटला** ती जागा द्यावी असें ठरविलें. राजाच्या मुख्य मंत्र्याचें काम त्याच्याकडे होतेंच; तेव्हां धर्माधिकाऱ्यांची

सत्ता कमी करून त्यांना राजाचे पूर्ण अंकित करण्याचे कामीं **बेकेट**चा उपयोग करून घेतां येईल असें **हेन्रीला** वाटून त्या सालच्या जून महिन्याच्या तिसऱ्या तारखेस बेकेटला **कांटरबरी**च्या आचार्याचीं वस्त्रें देण्यांत आलीं.

१५ पण चमत्कार असा झाला कीं, आचार्यपदावर स्थापना होण्याबरोबर **बेकेट**चें सर्वच बदललें! पूर्वींचा तो थाटमाट त्यानें सोडून दिला, अंगांत 'कफनी' धारण केली, प्राणधारणापुरतेंच व तेंही 'कदान्न' तो खाऊं लागला. त्यानें नेमधर्म व व्रतें–वैकल्यें सुरू केलीं. व लौकरच लोक त्याला साधूंत गणूं लागले. त्यानें राजमंत्र्याची जागा सोडून दिली, व नवीन पत्करलेल्या आचार्यपदाचा मान व प्रतिष्ठा वाढविण्याचा निश्चय केला. **बेकेट**चें हें वर्तन पाहून **हेन्री**ची फार निराशा झाली. त्यांची मैत्री हळू हळू कमी होऊं लागली, व पूर्वींचे हे 'जीवश्च कंठश्च' मित्र थोड्याच वर्षांत परस्परांचे अगदीं हाडवैरी बनले!

१६ पहिला खटका—दोघांमध्यें पहिला खटका उडाला तो धर्माधिकाऱ्यांनीं गुन्हा केल्यास त्यांची चौकशी कोणीं करावी या मुद्द्यावर. त्यावेळचे सर्वच धर्माधिकारी कांहीं षड्रिपु जिंकलेले साधु नव्हते. तेव्हां एखाद्या धर्मगुरूच्या हातून जर राजाच्या प्रजेपैकीं एकाद्याचा घातपात झाला अगर दुसरें अनीतीचें वर्तन घडलें तर त्या अपराधाची चौकशी राजानें नेमलेल्या न्यायाधीशांकडून रीतसर होऊन गुन्हेगाराला शिक्षा व्हावी हें सरळ होतें. पण **बेकेट**चें म्हणणें पडलें कीं धर्माधिकारी हे 'भूदेव' असल्यामुळें त्यांजकडून अपराध घडला तरी त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार राजनिर्मित न्यायसभांना नाहीं. तो अधिकार 'देवस्थानच्या न्यायाधीशां'चा आहे. व देवस्थानच्या स्वतंत्र न्यायसभेंत अपराध्यांची चौकशी होऊन त्यांना योग्य ती शिक्षा केली जातच आहे; त्यांत राजाला हात घालण्याचा हक्क नाहीं.

१७ देवस्थानचे न्यायाधीश व कायदे—आतां देवस्थानच्या न्यायाधीशांकडून अपराध्यांची चौकशी होत असे ही गोष्ट खरी. पण हे न्यायाधीश धर्माधिकाऱ्यांपैकींच असल्यामुळें मानवी स्वभावाप्रमाणें साहाजिकच आपल्या जातभाईकडे त्यांचा ओढा असे. म्हणून एखाद्या 'भूदेवा'वर अपराध शाबीत झाला तरी थोडक्याशा शिक्षेवर त्याची सुटका होत असे. सामान्य प्रजेपैकीं कोणी दुसऱ्याचा खून केल्यास खुनी इसमाला देहांत शिक्षा भोगावी लागे. पण धर्माधिकाऱ्यानें एखाद्याचा खून केल्यास 'ब्राह्मणाला फांशीं देणें हें पाप आहे' असला कायदा देवस्थानच्या न्यायसभेंत चालू असल्यामुळें त्याची थोड्याशा दंडावर अगर कसल्या

तरी प्रायश्चित्तावर सुटका व्हावयाची ! पण यामुळें धर्माधिकाऱ्यांकडून घडणाऱ्या गुन्ह्याचें प्रमाण वाढूं लागलें.

१८ क्लारेंडनची परिषद्—शेवटीं राजानें या गोष्टीचा कायमचा निकाल लावून राजा व धर्माधिकारी यांचे परस्पर हक्क ठरवून टाकण्यासाठीं सन ११६४ च्या जानेवारी महिन्यांत क्लारेंडन (Clarendon) येथें सर्व अमीर उमराव, जहागीरदार व बडे धर्माधिकारी यांची परिषद भरविली. या 'श्रेष्ठ परिषदेंत' राजा व धर्माधिकारी यांचे हक्क ठरविणारी एक सोळा कलमी यादी (constitutions) तयार करण्यांत आली. तींतील मुख्य कलमें अशीं होतीं कीं, एखाद्या धर्माधिकाऱ्यावर गुन्हा केल्याचा आरोप आल्यास त्याची चौकशी राजनिर्मित न्यायकचेऱ्यांकडून व्हावी. व तो गुन्हेगार ठरल्यास इतर सामान्य इसमाप्रमाणें त्यासही शिक्षा व्हावी; राजाच्या परवानगीशिवाय कोणाही धर्माधिकाऱ्यानें इंग्लंडच्या बाहेर जाऊं नये; व मुख्य मुख्य धर्माधिकारी व त्यांच्या हाताखालचे उपाध्ये यांनीं त्यांची नेमणूक होण्याच्या वेळीं इतर सरदार जहागीरदारांप्रमाणेंच आपापल्या ताब्यांतील जमिनी-बद्दल राजाचें मांडलिकत्व कबूल करण्याचे सर्व विधि करावे.

१९ पोपचा विरोध—अशा रीतीनें या श्रेष्ठ परिषदेनें राजाच्या बाजूचा निकाल दिला. **बेकेट** पहिल्यानें या निकालाला कबूल होईना. पण राजाच्या इतर सरदारांनीं दम दिल्यावर त्याला कबूल होणें भाग पडलें; पण पुढें **पोप**कडे हें प्रकरण गेल्यावर **पोप**नें या श्रेष्ठपरिषदेच्या कायद्याला संमति देण्याचें नाकारलें व **बेकेट**ला राजाज्ञा मानण्याचें कारण नाहीं असें ठरविलें. पुन्हां तंट्याला सुरवात झाली. राजानें **बेकेट**ला चिरडून टाकण्यासाठीं श्रेष्ठपरिषदेची बैठक भरविली. तेव्हां आपल्या जिवाला दगा झाल्याशिवाय रहात नाहीं असें पाहून **बेकेट फ्रान्स**मध्यें पळून गेला, व **पोप**नें त्याला अभयवचन दिलें.

२० बेकेटचें पुनरागमन—अशा रीतीनें सहा वर्षें गेलीं. दरम्यान राजानें आपल्या मुलाला यौवराज्याभिषेक केला. त्या समयीं **कांटरबरी**च्या आचार्याची गादी रिकामी असल्यामुळें अभिषेकविधि '**यार्क**' च्या आचार्याकडून करून घेण्यांत आला. पुढें **फ्रान्स**च्या राजाच्या मध्यस्तीवरून **बेकेट**चें व हेन्रीचें कांहीं काळ सख्य होऊन बेकेट परत इंग्लंडला आला. वादाचा मुद्दा तसाच राहिला होता. आपल्या गैरहजेरींत **यार्क**च्या आचार्यानें यौवराज्याभिषेक केला हें **बेकेट**ला समज-

त्याबरोबर त्यानें त्या आचार्यावर व ज्यांनीं ज्यांनीं या अभिषेकाच्या कामीं मदत केली होती त्या सर्वांवर बहिष्काराचें अस्त्र सोडलें.

२१ हेन्रीचे उद्गार—यावेळीं हेन्री **नार्मंडी**मध्यें होता. त्याला **बेकेट**च्या या धाष्ट्याचा राग येऊन तो रागाच्या आवेशांत म्हणाला, 'या भटुड्याच्या (turbulent Priest) त्रासांतून मला सोडविणारा कोणीच नाहीं काय?' जवळ बरेच नार्मन सरदार उभे होते; त्यांनीं राजाचे हे उद्गार ऐकले, व त्यांपैकीं चौघे (ज्यांचा बेकेटवर पूर्वींपासून दांत होता) राजाला खूष करण्याकरितां म्हणून तावडतोब **नार्मंडी**हून **इंग्लंड**ला आले. इंग्लंडला आल्यावर ते लगेच कँटरबरीच्या देवळांत गेले व **बेकेट**ला त्याच्या मठींतून ओढून काढून त्यांनीं निर्दयपणानें त्याला ठार मारलें! **बेकेट**नें शांतपणें प्राण सोडला.

२२ हेन्रीचा पश्चात्ताप—हेन्रीला ही बातमी समजली तेव्हां त्याला फार पश्चात्ताप झाला. बेकेटला लोक साधुपुरुष समजत असत. व त्याच्या पवित्र आचरणानें लोकांची त्याच्यावर पराकाष्ठेची भक्ति बसली होती. या साधुपुरुषाची हत्या हेन्री राजानेंच करविली असा त्याच्यावर आरोप येऊन लोक बेदिल झाले. तेव्हां **हेन्री**नें खरी हकीकत **पोप**ला कळविली. व स्वतः **कांटरबरी** येथें जाऊन **बेकेट**च्या थडग्यासमोर त्यानें गुडघे टेकले, आणि आपल्या वाणीकडून झालेल्या पापाची निष्कृति करण्यासाठीं तेथल्या जोग्यांकडून त्यानें आपल्या पाठीवर कोरडे मारवून घेतले! तसेंच ज्या सरदारांनीं **बेकेट**ला प्रत्यक्ष मारलें होतें, त्यांना **रोम**ची यात्रा करण्यासाठीं पाठवून दिलें. तेथें ते चौघेहि मरण पावले. **बेकेट**ची धर्मासाठीं प्राण देणारा सत्पुरुष (Martyr) अशी ख्याति होऊन शेंकडों वर्षें त्याचें थडगें फार पवित्र मानलें जाई, आणि दरवर्षीं हजारों यात्रेकरू त्याचें दर्शन घेऊन स्वतःला पुनीत झालों असें समजत.

२३ धर्माधिकाऱ्यांची छाप—**बेकेट**च्या उज्ज्वल स्वार्थत्यागानें व **हेन्री**च्या आवेशाच्या भरांत झालेल्या चुकीमुळें इंग्लंडांत धर्माधिकाऱ्यांची छाप मात्र पुन्हां बसूं लागली. पुढें कैक वर्षेंपर्यंत राजा व धर्माधिकारी यांचीं भांडणें निरनिराळ्या स्वरूपांत उपस्थित होऊन कधीं राजपक्षाचा तर कधीं धर्माधिकाऱ्यांच्या पक्षाचा वरचष्मा होत असे. आणि या भांडणांतूनच अखेर खास इंग्लंडचें असें स्वतंत्र देवस्थान व स्वतंत्र मतांचा पंथ (English Church) १६ व्या शतकांत निर्माण होऊन तो आज तागायत चालत आहे. त्याची हकीकत पुढें प्रसंगानुसार सांगण्यांत येईल.

प्रकरण १४ वें

आयर्लंडमध्यें प्रवेश !

(इ. स. ११७० ते इ. स. ११७२)

[१।२ थोडा पूर्वोतिहास-सेंट पॅट्रिक—संतभूमि—३ मूळचे रहिवासी—४ थोरल्या व धाकट्या वुइल्यमच्या कारकिर्दींत—पोपचें अधिकारपत्र—५ आयर्लंडचे पांच प्रांत—डरमांटची हकालपट्टी—६ हेन्री व डरमांट-पेंब्रोकचा सरदार धनुर्धर—डरमांटला गादी मिळाली—७ आयरिश व नार्मन यांची लढाई—नार्मनांचा जय—८ हेन्री आयर्लंडमध्यें गेला--आयर्लंडमध्यें इंग्रजांची वसाहत व आयर्लंडचें मांडलिकत्व]

१ **थोडा पूर्वेतिहास**—मागील कित्येक प्रकरणांतून **इंग्लंड**च्या राजांचे खुद्द **इंग्लंड**मधील लहान मोठ्या सरदारांशीं व शेजारच्या **वेल्स** व **स्काटलंड** येथील बड्या संस्थानिकांशीं कसकसे तंटे बखेडे झाले हें आपण पाहिलेंच आहे. **हेन्री**च्या कारकिर्दींत इंग्लंडच्या नजीकच्या पण इंग्लंडपासून अलग अशा **आयर्लंड** या स्वतंत्र बेटांतील सरदारांशीं व जमीनदारांशीं इंग्रजांचा तंटा सुरू झाला. व कालांतरानें **आयर्लंड** हें बेट ' ब्रिटिश ' राजसत्तेखालीं येऊन ब्रिटिश राज्याचा तें एक भाग बनलें. **इंग्लंड**च्या राजांचा आयर्लंडमध्यें ' प्रथम प्रवेश ' कसा झाला त्याची हकीकत फार मनोरंजक आहे ती या प्रकरणांत सांगूं.

२ **आयर्लंड** हें बेट प्राचीन **रोमन** लोकांना ' हिबर्निया ' या नांवानें माहीत होतें. पण त्यांनीं तें जिंकण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं. तेथील मूळचे लोक **इंग्लंड**मधील प्राचीन **ब्रिटन** लोकांप्रमाणेंच मूर्तिपूजक होते. व **ब्रिटन**मधून ' ड्रुइड ' भटजींचें उच्चाटन झाल्यावर कित्येक वर्षेपर्यंत त्यांना त्या बेटांत थारा मिळाला होता असें दिसतें. इ० स० च्या पांचव्या शतकांत **पॅट्रिक** या नांवाच्या एका साधूनें त्या बेटांत ख्रिस्ती धर्मोपदेश करण्याला सुरवात केली. व हळू हळू तेथला जुना मूर्तिपुजेचा धर्म नष्ट होऊन तेथें **ख्रिस्ती** धर्माचा पगडा बसला. जुन्या **इंग्रज** राजांचा **इंग्लंड**मध्यें अंमल सुरू असतां **आयर्लंड**ची तेथील विद्याविषयीं फार प्रसिद्धि होती. व 'संतभूमि' म्हणून त्या बेटाचा वारंवार उल्लेख होत असे. पुढें **डेन्स** लोकांनीं या बेटावर स्वारी करून तेथल्या लोकांना पुष्कळ उपद्रव दिला. परंतु त्यामुळें **आयर्लंड**च्या सर्वसाधारण स्थितींत म्हणण्यासारखा फरक पडला नाहीं.

३ **मूळचे रहिवासी**—तेथील मूळचे रहिवासी फार रानटी असून लांबच लांब केंस राखीत व खोपटांतून रहात. त्यांनीं **ख्रिस्ती** धर्म स्वीकारल्यावरही बरींच वर्षेपर्यंत त्यांचा रानटीपणा कायम होता. परशु हें त्यांचें मुख्य हत्यार असून थोडेंसें कांहीं निमित्त झालें कीं त्यांच्यांत लगेच मारामारीला सुरवात होई. पुढें **डेन्स** लोकांनीं या प्रांतांत कायमची वस्ती करून राहण्याला सुरवात केल्यावर त्यांच्यांत थोडथोडी सुधारणा होऊं लागली.

४ **थोरल्या व धाकट्या वुइल्यमच्या कारकिर्दींत**—**थोरल्या वुइल्यम**च्या मनांत एकदां आयर्लंडवर स्वारी करून तें बेट आपल्या सत्तेखालीं आणावें असें आलें होतें. परंतु त्यानंतर लवकरच तो मृत्यु पावला. पुढें **आयरिश** चांचे लोक इंग्लंडच्या पश्चिम किनाऱ्याला उपद्रव देऊं लागले. ते किनाऱ्यावर उतरून लोकांना धरून नेत व त्यांना **आयर्लंड**मध्यें गुलाम म्हणून विकीत. **धाकटा वुइल्यम** एकदां वेल्सच्या किनाऱ्यावर उभा असतां 'मी गलबतांचा पूल बांधून आयर्लंडमध्यें उतरेन,' असें म्हणाला होता. पण पुढें इंग्लंडच्या राजांतच आपसांत तंटे लागल्यामुळें **आयर्लं-ड**च्या वाटेस जाण्याचें कोणाच्या मनांत आलें नाहीं. हेन्रीनें इ० स० ११५४ या वर्षीं आयर्लंड हें इंग्लंडच्या राज्यास जोडावें अशाबद्दल पोपचें अधिकारपत्र आणून ठेवलें होतें. पण तो प्रांत जिंकणें ही कांहीं तितकी सोपी गोष्ट नव्हती. म्हणून तो अनुकूल संधीची वाट पहात होता. इतक्यांत परमेश्वरानें त्याला नामी संधि आणून दिली, ती अशीः—

५ **पांच प्रांत**—या वेळीं **आयर्लंड**मध्यें 'अल्स्टर', 'लीनूस्टर', 'कनाट', 'मनस्टर' व 'मीथा' अशीं पांच निरनिराळीं स्वतंत्र संस्थानें स्थापन झालीं होतीं प्रत्येक संस्थानावर एक एक संस्थानिक अंमल चालवीत असे. आपसांत भांडणें हीं चाललेलींच होतीं. 'लीनूस्टर'चा राजा **डरमांट** यानें एकदां दुसऱ्या एका संस्था-निकाची बायको पळवून नेली. तेव्हां या अपराधाबद्दल त्याला शिक्षा करण्यासाठीं **कनाट**च्या राजानें त्याच्यावर स्वारी करून त्याला त्याच्या राज्यांतून हाकून लाविलें. तो तेथून निघून इंग्लंडला आला. व त्यानें हेन्रीशीं असें बोलणें लावलें कीं तुम्ही जर मला माझें राज्य परत मिळविण्याच्या कामीं मदत कराल, तर मी तुमचा मांडलिक म्हणून तेथें राज्य करीन.

६ **हेन्री व डरमांट**—हेन्रीनें आपल्या सरदारांना कोणी आयर्लंडमध्यें जाण्यास कबूल आहे काय म्हणून विचारलें. '**पेंब्रोक**' (Pembroke) चा सरदार 'धनुर्धर' (Strongbow) त्या कामाला तयार झाला. पण त्यानें अशी अट घातली कीं, **डरमांट**नें आपली मुलगी '**इव्हा**' (Eva) ही आपल्याला द्यावी, व हुंडा म्हणून

लीनस्टरचें राज्य **डरमॉट**च्या मागून आपल्याला मिळेल अशी व्यवस्था करावी. आणखींही एक दोन रणोत्सुक सरदार या स्वारीवर जाण्यास तयार झाले. आणि इ० स० ११६९ च्या मे महिन्यांत एक नार्मन सरदार ४६० लोक बरोबर घेऊन आयर्लंडच्या किनाऱ्यावर उतरला. आणि डरमॉटच्या बाजूचे ५०० लोक व हें नार्मन सैन्य एक होऊन त्यांनीं लौकरच डरमॉटची गादी त्याला मिळवून दिली.

७ आयरिश व नार्मन यांची लढाई—पुढल्या वर्षी ' धनुर्धर ' सरदार १२०० लोकांनिशीं तिकडे गेला. व त्यानें ' वाटरफर्ड ' (Waterford) व डब्लिन ' (Dublin) हीं मुख्य शहरें काबीज केलीं. कनाटच्या राजानें इतर सर्व संस्थानिकांना एकत्र करून व **नार्वे**च्या राजाकडून आरमाराचीहि मदत घेऊन या ' परकी ' लोकांना डब्लिनमधून हांकून लावण्याचा प्रयत्न करण्याचें ठरविलें. परंतु **नार्मन** लोकांच्या चिलखती सैन्यापुढें आयरिश लोकांच्या जुन्या पुराण्या हत्यारांचा टिकाव लागण्यासारखा नव्हता. त्यामुळें नार्मनांच्या ६०० लोकांनीं ३० हजार आयरिश लोकांना हां हां म्हणतां पळवून लावलें.

८ हेन्री आयर्लंडमध्यें गेला—पुढें ' पेंब्रोक 'चा सरदार ' लीनस्टर 'चा राजा झाला. पण त्यानें हेन्रीची रीतसर परवानगी घेतलेली नव्हती व शिवाय त्याला आयरिश लोकांचा बंदोबस्त करण्याचेंहि काम नीट झेपेना; म्हणून तो पुन्हां इंग्लंडला आला व हेन्रीचा मांडलिक म्हणून **लीनस्टर**वर राज्य करण्याची परवानगी त्यानें **हेन्री**कडून घेतली. हेन्री व हा सरदार असे इतर ५०० सरदारांचें सैन्य व ४०० गलबतांचें आरमार घेऊन इ० स० ११७१ च्या आक्टोबर महिन्यांत आयर्लंडमध्यें **वाटरफर्ड** बंदरीं उतरले. व मोठ्या समारंभानें त्यांनीं **डब्लिन**मध्यें प्रवेश केला. आयर्लंडमधील बहुतेक बडे व छोटे संस्थानिक डब्लिनमध्यें येऊन त्यांनीं हेन्रीचें मांडलिकत्व कबूल केलें. व त्यांचे शपथविधीहि झाले. फक्त ' अल्स्टर 'चा जुना संस्थानिक मात्र हेन्रीचें मांडलिकत्व पत्करण्यास कबूल झाला नाहीं. पुढें इंग्लंडमधील पुष्कळ कुटुंबें तिकडे वस्ती करावयास गेलीं. त्यांची वस्ती ज्या जिल्ह्यांत झाली त्यांचे सभोंवार किल्ले बांधून मजबूत तटबंदी करण्यांत आली. हेन्री त्या सालचा हिंवाळा **आयर्लंड**मध्यें घालवून व इ० स० ११७२ च्या एप्रिल महिन्यांत ' आयर्लंडचा अधिपति ' असा किताब धारण करून **इंग्लंड**ला परत आला. अशा रीतीनें आयरिश राजांच्या आपसांतील भांडणामुळें व त्यांपैकीं एकाच्या नीतिभ्रष्टतेमुळें इंग्रजांचा आयर्लंडमध्यें चंचुप्रवेश होऊन पुढें कांहीं वर्षांनीं ' मुसलप्रवेशा 'ला सुरवात झाली.

प्रकरण १५ वें.

सूर्यापोटीं शनैश्चर !

(इ० स० ११७२-इ० स० १२०८)

[१ हेन्रीचें कुटुंबसौख्य—२ त्याचीं मुलें-मुलांचें बंड-तह—३ पुन्हा तंटे-—४।५ पुन्हां तह-हेन्रीचा मृत्यु-न्यायपद्धति-ज्यूरीचा प्रारंभ-लंडन राजधानी—६ राजा रिचर्ड—७ ज्यू लोकांची स्थिति—८ रिचर्ड आणि धर्मयुद्ध-त्याची राज्याविषयीं बेफिकिरी—९।१० ख्रिस्तभूमींतील त्याचा पराक्रम—११।१२ रिचर्डचा परत प्रवास-त्याच्यावरील संकटें व हाल—१३ रिचर्डची सुटका—१४ फ्रान्समधील भांडणें व तह—१५ फिट्झ्ऑसबर्न—१६ रिचर्डचा मृत्यु—१७ त्याचा स्वभाव—१८ राजा जॉन—१९ पुन्हां भांडणें-पुतण्याचा खून—२० फ्रान्सशीं भांडण-नार्मंडी प्रांत हातचा गेला—२१ पोपशीं भांडण-स्टीफन लँगटन-पोपचें आज्ञापत्र-व त्याचा परिणाम—२२ पोपचें बहिष्कारास्त्र-जॉनची प्रतियोगिता—२३ पोपचा पुढचा उपाय—२४ जॉनच्या जुलमाचा परिणाम-फ्रान्सची तयारी व जॉनची शरणागति—२५ इंग्लंड देश पोपचा दास बनला-२६ स्टीफन लँगटनचें पुढारीपण.]

१ हेन्रीचें कुटुंबसौख्य—हेन्रीची सत्ता आतां **इंग्लंड, वेल्स, स्काटलंड, आयर्लंड** व **फ्रान्सचा** जवळ जवळ निंमे भाग एवढ्या प्रांतावर चालू झाली होती. व बाहेरून दिसण्यांत तो मोठा भाग्यशाली आहे असें वाटत असे. पण अंतस्थ स्थिति मात्र तशी नव्हती. त्याचे मुलगे फार द्वाड निपजले होते. व त्यांना त्यांच्या आईची बापाविरुद्ध नेहमीं फूस मिळत असे. फ्रान्सच्या राजाला या कुटुंबांत कलह लावून आपला डाव साधावयाचा होता, म्हणून त्यानेंही हेन्रीच्या मुलांना बापाकडे राज्याची वांटणी करून मागण्याविषयीं फूस भरली.

२ मुलांचें बंड—हेन्रीला '**वुइल्यम**' '**हेन्री**' '**रिचर्ड**' '**जॉफ्रे**' व '**जॉन**' असे पांच मुलगे व शिवाय **मॉड, जोन** वगैरे तीन मुली होत्या. **हेन्री, रिचर्ड** व **जॉफ्रे** यांनीं राज्याची वांटणी करून देण्याबद्दल बापाकडे निकड लाविली. बाप कबूल होईना; तेव्हां फ्रान्सच्या राजाच्या मदतीनें त्यांनीं बंड उभारलें. **स्काटलंडचा** राजाहि त्यांना मिळाला. **इंग्लंड** व **नार्मंडी** येथील पुष्कळ जहा-

गीरदारही त्यांना मिळून त्यांनीं राजावर शस्त्र उगारलें. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष **हेन्री**ची बायकोही मुलांचाच पक्ष धरून नवऱ्याशीं विरुद्ध झाली ! दोन्ही पक्षांची लढाई होऊन त्यांत **इंग्लंड** व **फ्रान्स** या दोन्ही ठिकाणीं **हेन्री**चा जय झाला. **स्काटलंड**चा राजाही शरण आला; पण हेन्रीला या आपल्या मुलांच्या वर्तनानें फार दुःख झालें. पुढें इ. स. ११७४ च्या सप्टेंबर महिन्यांत तह होऊन हेन्रीनें आपल्या मुलांना फ्रान्समधील कांहीं किल्ले देऊन टाकले. राणीला मात्र त्यानें बारा वर्षेंपर्यंत कैदेची शिक्षा दिली.

३ पुन्हां तंटे—इ. स. ११८३ त पुन्हां बापलेकांत तंटा सुरू होऊन लढाई जुंपली. लढाई चालू असतां एका मुलाला ताप येऊन तो मरण पावला. दुसऱ्यानें थोड्याच दिवसांत बापाशीं तह केला. पण पुढें तीन वर्षांनीं तोही मरण पावला. तिसरा मुलगा **रिचर्ड** यानें **फ्रान्स**च्या राजाच्या मदतीनें पुन्हां युद्ध सुरू केलें, व सन ११८९ या वर्षी **हेन्री**ला आपलें म्हणणें कबूल करावयास लावलें. तह झाल्यावर आपल्या जहागिरदारांपैकीं कोण कोण **रिचर्ड**ला मिळाले होते, त्यांची यादी राजानें मागितल्यावरून ती त्याला देण्यांत आली. त्या यादींत पहिलें नांव **जॉन**चें–**हेन्री**चा धाकटा मुलगा, ज्याच्यावर त्याचा बराच विश्वास होता व जो त्याच्या फार प्रीतींतला होता त्याचें—आढळलें ! तें पाहून राजाला अतोनात दुःख व विषाद उत्पन्न झाला. त्यानें अंथरूण धरलें व त्याच वर्षाच्या जुलैच्या सहाव्या तारखेस त्याचा अंत झाला.

४ न्यायपद्धति—हेन्रीच्या कारकिर्दींत इंग्लंडची पुष्कळ बाजूंनीं भरभराट झाली. विशेषतः प्रजेला न्याय मिळण्याच्या बाबतींत त्यानें पुष्कळ सुधारणा केली. पूर्वी **नार्मन** राजांच्या कारकिर्दींत ‘ राजाची न्यायसभा ’ म्हणून सर्वांत वरिष्ठ अशी एक न्यायसभा असून तींत राज्यांतले मुख्य जहागिरदार व धर्माधिकारी बसत असत व या सभेंत महत्त्वाच्या मुकदम्यांचा निकाल होत असे. तिच्या अंमलाखालीं प्रत्येक जिल्ह्यांतून व जिल्ह्यांच्या पोटभागांतून लहान लहान सभा असून सर्व न्यायाधीश राजाच्या हुकमानें नेमले जात असत.

५ इ० स० ११७६ या वर्षी **इंग्लंड**चे सहा भाग करून प्रत्येक भागांत तीन तीन फिरते न्यायाधीश (Itinerant judges) नेमण्यांत आले. व त्यांनीं आपल्या हद्दींत फिरून व लोकांच्या तक्रारी ऐकून त्यांचा निकाल करावा असें ठरविण्यांत आलें. या योजनेनें न्यायासाठीं वरिष्ठ न्यायसभेपर्यंत खेपा घालण्याचे लोकांचे श्रम व पैसे वांचले. सध्याच्या ‘ ज्यूरी ’ पद्धतीचा पायाही याच राजाच्या कारकिर्दींत घातला गेला.

पूर्वीच्या राजांच्या कारकिर्दींत ' विंचेस्टर ' (Winchester) ही राजधानीची जागा होती. तिचा मागील राजांच्या धुमाकुळींत उच्छेद झाल्यामुळें हेन्रीनें **लंडन** ही आपली राजधानीची जागा केली.

६ राजा रिचर्ड—हेन्री मरण पावला तेव्हां त्याचे दोन मुलगे **रिचर्ड** व **जॉन** हे ह्यात होते. व रिचर्डचा पाठचा भाऊ **जॉफ्रे** याचा **आर्थर** या नांवाचा एक मुलगा होता. रिचर्ड वडील असल्यामुळें त्याला राज्याभिषेक करण्यांत आला. बापाचें प्रेत पाहून त्याला आपल्या दुर्वर्तनाबद्दल वाईट वाटलें, व यापुढें आपलें वर्तन सुधारण्याचा त्यानें निश्चय केला असें म्हणतात.

७ ज्यू लोकांची स्थिति—रिचर्डच्या कारकिर्दींत इंग्लंडमधील ज्यू म्हणजे यहुदी लोकांना फार हाल भोगावे लागले. हे भिन्नधर्मी लोक व्याजबट्ट्याचा धंदा करीत असत. व ख्रिस्तीधर्मांत व्याजबट्टा करणें हें पाप मानलेलें असल्यामुळें ख्रिस्ती लोक त्यांचा फार तिटकारा करीत. ख्रिस्ती लोकांनीं त्यांच्यावर वारंवार हल्ले करावे, व राजानें व त्याच्या अधिकाऱ्यांनीं तिकडे काणाडोळा करावा, यामुळें या लोकांची फार केविलवाणी स्थिति झाली होती.

८ रिचर्ड आणि धर्मयुद्ध—**रिचर्डनें** एकंदर १० वर्षें राज्य केलें, पण त्यांपैकीं खुद्द **इंग्लंड**मध्यें असे त्याचे थोडेच दिवस गेले. त्याला लढाईचा फार शोक होता व त्या सुमारास **ख्रिस्ता**च्या पवित्र जन्मभूमीसाठीं **मुसलमानां**शीं सुरू असलेल्या युद्धाची (Crusade) लाट पुन्हां उसळल्यामुळें त्यानें मोठ्या हौसेनें त्या धर्मयुद्धांत सामील होण्याची तयारी चालविली. सैन्याच्या खर्चासाठीं पैसा पाहिजे म्हणून राजाच्या खास मालकीच्या ज्या जमिनी होत्या त्या त्यानें विकावयास काढल्या, आणि मोठ्या हुद्यांच्या जागा, तसेंच मान मरातब आणि पदव्या यांचेंहि लिलांव मांडले ! शहरच्या कोतवालासारखे जुने हुद्देदार होते त्यांना काढून टाकून त्यांच्या जागा त्यानें मक्त्यानें देऊं केल्या. **स्काटलंड**च्या राजाकडून दहा हजार ' मार्क ' किंमत घेऊन त्याला मांडलिकत्वांतून मुक्त केलें. इंग्लंडच्या मुख्य मंत्र्याची जागा ' **लांगचांप** ' (Longchamp) नांवाच्या एका धर्माधिकाऱ्याला तीन हजार मार्कांना दिली. एकदां, कोणी विकत घेणारा भेटेल तर मी लंडन राजधानीसुद्धां विकून टाकीन असे उद्गार काढण्यालाही त्याला लाज वाटली नाहीं असें म्हणतात. असो.

९ ख्रिस्तभूमींतील पराक्रम—अशा रीतीनें पुष्कळ पैसा जमा करून व **लांगचांप** याजवर इंग्लंडचा राज्यकारभार सोंपवून तो इंग्लंड सोडून निघाला.

फ्रान्स, **इटली**, **सिसिली** (Cicily), **जर्मनी**, **आस्ट्रिया** (Austria) वगैरे देशचे राजे या वेळीं मुसलमानांचें पारिपत्य करण्यासाठीं एकत्र झाले होते. पण पुढें त्यांच्यांत वाद उत्पन्न होऊन फाटाफूट झाली. फ्रान्सचा राजा ' **फिलिप** ' (Philip) व ' **रिचर्ड** ' यांचें पटेना. आस्ट्रियाच्या राजालाही रिचर्डच्या अहं-पणाचा व उद्धटपणाचा राग आला. पण रिचर्ड जात्या शूर, उदार मनाचा, धीट व विलक्षण चिकाटीचा असल्यामुळें त्यानें संकटांस न जुमानतां ख्रिस्ताच्या पवित्र भूमींत गेल्यावर तिकडे फार पराक्रम गाजविला.

१० मराठ्यांच्या अमदानींत उत्तर हिंदुस्तानांत **यशवंतराव होळकराचा** जसा दरारा बसला होता, तसा यावेळीं पालेस्टाइन (Palestine)मध्यें रिचर्डचा बसला होता. आया मुलांना उगी करण्याकरितां ' रिचर्ड आला हां ! ' म्हणून भीति घालीत. आणि एखादा घोडा बिचकून उभा राहिल्यास वरचा स्वार म्हणे 'कां ? तुला रिचर्ड दिसला कीं काय ?' असो.

११ **रिचर्डचा ' परत-प्रवास '--पालेस्टाइन**मध्यें पराक्रम गाजवून व त्या ठिकाणचा मुसलमानांचा पुढारी ' **सलादीन** (Saladin) याजकडून ख्रिस्ती यात्रेकरूंना इतःपर त्रास होणार नाहीं असें वचन घेऊन **रिचर्ड** माघारा फिरला. **फ्रान्स**चा राजा अगोदरच परत आला होता.

१२ दरम्यान इंग्लंडमध्यें ' **लाँगचांप** 'च्या जुलुमी अंमलामुळें फार अव्यवस्था माजली होती. रिचर्डचा भाऊ **जॉन** यानें फ्रान्सच्या राजाच्या मदतीनें **इंग्लंड**ची गादी बळकावण्याचीं कारस्थानें चालविलीं होतीं. **रिचर्ड** गलबतांतून इंग्लंडला येत असतां वाटेंत त्याचें गलबत खडकावर आपटून फुटलें. पण तो पोहून किनाऱ्याला लागला, तो **आस्ट्रिया**च्या राजाच्या हद्दींत आला. तो व त्याचा एक नोकर असे वेष पालटून खुष्कीच्या मार्गानें मार्गक्रमण करूं लागले. पण पुढें दैवयोगानें तो आस्ट्रियाच्या राजाच्या हातीं सांपडला. त्यानें साठ हजार पौंड घेऊन त्याला जर्मनीच्या राजाच्या स्वाधीन केलें. व जर्मनीच्या राजानें त्याला चौदा महिनेपर्यंत कैदेंत ठेविलें !

१३ **रिचर्डची सुटका**—रिचर्ड कैद झाला ही बातमी इंग्लंडमध्यें समजल्यावर ' **जॉन** 'ला फारच हर्ष झाला, व त्याला तसाच कैदेंत ठेवण्याबद्दल त्यानें फ्रान्सच्या राजाच्या मसलतीनें उद्योग चालविला ! पण इंग्लंडमधील सर्वच सरदार कांहीं **रिचर्ड**ला विरुद्ध नव्हते. त्यांनीं त्याला सोडवून आणण्याचा बेत केला आणि इ० स०

११९४ या वर्षी जर्मनीच्या राजानें त्यांना एकलाख मार्क देत असाल तर तुमचा राजा तुम्हांला देतों असें कबूल केलें! या सरदारांनीं नंतर इंग्लिश लोकांवर कर बसवून एक लाख 'मार्क' जमा केले आणि ते जर्मनीच्या राजाच्या हातावर पडल्यावर **रिचर्ड इंग्लंडला** परत आला. तो परत आल्यामुळें **जॉनचे** सर्व बेत फिसकटले. 'श्रेष्ठ परिषदेची' सभा होऊन **जॉनची** जहागीर जप्त करण्यांत आली. फक्त आई मध्यें पडल्यामुळें तो फांसावर लटकण्याचा तेवढा राहिला!

१४ फ्रान्समधील भांडणें—इंग्लंडमध्यें स्थिरस्थावर झाल्यावर रिचर्डनें फ्रान्सकडे आपला मोर्चा वळविला. रिचर्ड नसल्या मुदतींत **फ्रान्सच्या** राजानें **नार्मंडीमधील** बरेच किल्ले बळकाविले होते, ते परत घेण्यासाठीं रिचर्ड **नार्मंडीमध्यें** गेला. इ० स० ११९८ मध्यें दोघांत युद्ध सुरू झालें. पण दोघेहि पैशाच्या टंचाईत असल्यामुळें अखेर थोड्याच दिवसांत तह झाला.

१५ फिट्झ् आसबर्न—लढाईला पैसा पाहिजे म्हणून रिचर्डनें **इंग्लिश** लोकांवर जबर कर बसविले होते. त्यामुळें लोक असंतुष्ट होऊन '**फिट्झ् आसबर्न**' (Fitz–Osburn) नांवाच्या पुढाऱ्याच्या हाताखालीं पन्नास हजार लोक जमा झाले व त्यांनीं बंड करण्याची तयारी केली. पण पुढें '**फिट्झ् आसबर्न**' व त्याचे नऊ साथीदार यांस रिचर्डनें पकडून फांशीं दिलें.

१६ रिचर्डचा मृत्यु—पुढें तीन महिन्यांनीं **नार्मंडीमधील** '**विडोमोर**' नांवाच्या एका जहागीरदाराच्या जमिनींत कांहीं द्रव्य सांपडलें होतें, त्याबद्दल तंटा उपस्थित झाला. रिचर्ड म्हणाला तें सर्व मला मिळालें पाहिजे. '**विडोमोर**' कबूल होईना; म्हणून **रिचर्डनें** त्याच्या किल्ल्याला वेढा दिला. एक दिवस किल्ल्याच्या तटाभोंवतीं फिरत असतां तटावरून एक बाण येऊन **रिचर्डच्या** खांद्यांत जाऊन रुतला. व त्या जखमेचें निमित्त होऊन थोड्याच दिवसांत तो मरण पावला.

१७ त्याचा स्वभाव—रिचर्ड राजा जात्या शूर व सिंहाच्या काळजाचा (Coeur–de-Lion) होता. परंतु त्याच्या शौर्याचा **इंग्लंडला** कांहींच फायदा झाला नाहीं. उलट परप्रांतांशीं निष्कारण लढाया उपस्थित करून त्यानें इंग्लंडला भिकारी करून सोडलें. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. तो मरण पावला त्या वेळीं **जॉन नार्मंडीमध्यें** होता तो ताबडतोब इंग्लंडला आला. आणि रिचर्डनें आपल्यामागून मला वारस नेमलें आहे म्हणून सांगूं लागला.

१८ राजा जॉन—रिचर्डच्या पाठचा मयत भाऊ **जॉफ्रे** याचा मुलगा **आर्थर** हा या वेळीं बारा वर्षांचा होता. तोच वास्तविक कायदेशीरपणें गादीचा मालक व्हावयाचा; पण **कांटरबरी**चा आचार्य व इतर बरेच जहागिरदार **जॉन**ला अनुकूल झाल्यामुळें **जॉन**लाच इंग्लंडची गादी देण्यांत आली. नंतर **फ्रान्स**चा राजा व **नार्मंडी**मधील कित्येक सरदार यांनीं आर्थरचा पक्ष उचलून **जॉन**बरोबर भांडणाला सुरवात केली. **जॉन**ची बायको '**जोन**'ही एका बलाढ्य जहागिरदाराची मुलगी होती. तिच्याशीं काडी मोडून दुसऱ्या एका जहागीरदाराच्या वाग्दत्त वधूशीं **जॉन**नें लग्न लावलें. त्यामुळें आणखी दोन नवे शत्रु त्यानें उत्पन्न करून घेतले.

१९ पुन्हां भांडणें—आर्थर हा फ्रान्सच्या राजाच्या आश्रयास गेला. पण '**मिराबो**' (Mirabeau) नांवाचा किल्ला हस्तगत करीत असतां तो **जॉन**च्या हातीं सांपडला. त्यानें त्याला कैद करून मोठ्या बंदोबस्तानें **रुवे**च्या (Rouen) किल्ल्यांत ठेविलें. या मुलाचें पुढें काय झालें हें कोणालाही नक्की सांगतां येत नाहीं. कोणी म्हणतात त्याला **जॉन**नें आपल्या हातानें ठार मारलें; व कित्येकांच्या मतें जॉननें त्याला मारेकऱ्यांकडून मारवून त्याचें प्रेत समुद्रांत नेऊन टाकविलें. तें कसेंहि असो; हा मुलगा पुढें कोणाच्याहि दृष्टीस पडला नाहीं, व **फ्रान्स**च्या दरबारांत जॉननें त्याचा खून केला ही गोष्ट सर्वतोमुखीं झाली होती एवढी गोष्ट खरी.

२० फ्रान्सशीं भांडण—नार्मंडी प्रांतापुरता **जॉन** हा **फ्रान्स**च्या राजाचा मांडलिक असल्यामुळें या कृत्याचा जाब देण्यासाठीं फ्रान्सच्या राजानें त्याला ' बोलावणें ' केलें. हें ' बोलावणें ' जॉननें धाब्यावर बसविलें. तेव्हां **फ्रेंच** न्यायाधिशांनीं जॉन हा अपराधी आहे असें ठरविलें, व फ्रान्समधील त्याची सर्व जहागीर जप्त केली. त्यामुळें लढाईला सुरवात झाली; व अखेर फ्रान्सच्या सबळ पक्षाला जय मिळून इंग्लंडच्या राजाची फ्रान्समधील सर्व जहागीर कायमची जाऊन **नार्मंडी** प्रांतावर इ. स. १२०४ पासून फ्रान्सच्या राजाचा अंमल चालू झाला !

२१ पोपशीं भांडण—पुढें **जॉन**चें व **पोप**चें भांडण जुंपलें. **क्यांटरबरी**चा आचार्य ' **ह्यूबर्ट** ' (Hubert) हा मरण पावल्यावर त्या देवस्थानच्या यतींनीं (Monks) आपल्यांतीलच एका 'श्रेष्ठा'ला मुख्य आचार्यपद देऊन **पोप**ची संमति मिळविण्यासाठीं त्याला **रोम**ला पाठवून दिलें. या वेळीं रोमच्या जगद्गुरुपीठावर ' इनो-संट ' (Innocent III) या नांवाचा मोठा बुद्धिमान् व महत्त्वाकांक्षी पुरुष आरूढ

झाला होता. त्यानें या दोघांनाही एकीकडे ठेवून ' स्टीफन लँगटन ' (Stephen Langton) या नांवाचा एक इंग्रज गृहस्थ रोममध्यें त्याच्या हाताखालीं मोठ्या हुद्यावर होता त्याला कँटरबरीचें आचार्यपद देऊन त्याप्रमाणें **जॉन**ला कळविलें. **कँटरबरी**च्या यतींना ही नेमणूक पसंत पडली. पण राजा ऐकेना. **स्टीफन**ला मी माझ्या राज्यांत पाऊल ठेऊं देणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली. व हत्यारबंद शिपाई कँटरबरीच्या देवळांत पाठवून तेथल्या यतींना बाहेर हांकून लावलें. **पोप**ही हट्टाला पेटला. त्यानें **स्टीफन लांगटन**चीच नेमणूक झाली पाहिजे, असा आग्रह धरला, व जॉन ऐकत नाहींसें पाहून त्यानें इंग्लंड देश 'ख्रिस्त धर्मबाह्य'(Interdict) आहे असें ठरविलें. या वेळीं धर्माधिकाऱ्यांची सत्ता इंग्लंडमध्यें बरीच वाढली होती. व जॉनच्या दुष्कृत्यामुळेंहि त्याच्याविषयीं लोकांत असंतोष पसरत चालला होता. त्यांत पोपची अशी अवकृपा झाल्यामुळें भाविक ख्रिस्ती लोकांना फार दुःख झालें. **पोप**च्या आज्ञेनुसार सर्व देवळें बंद झालीं. देवालयांतील घंटा वाजेनाशा झाल्या. पुराण नाहीं, प्रार्थना नाहीं, लग्नविधि नाहीं, मृतांच्या आत्म्याला सद्गति मिळण्याचे संस्कार नाहींत, अशी स्थिति झाली. उलट जॉननें देवस्थानच्या जमिनी जप्त करून व धर्माधिकाऱ्यांना लुटून पैसा जमा केला. आणि तो **स्काटलंड**, **वेल्स** व **आयर्लंड** येथील लढायांत खर्च करून त्या प्रांतांत आपलें स्वामित्व स्थापिलें.

२२ पोपचा बहिष्कार—सहा वर्षेंपर्यंत अशी स्थिति चालली; तरीहि जॉन ऐकत नाहींसें पाहून **पोप**नें आपलें निर्वाणीचें अस्त्र सोडलें. त्यानें **जॉन**ला बहिष्कार (Excommunication) घातला; म्हणजे तो ख्रिस्ती नव्हे असें ठरविलें व त्याच्या प्रजेलाहि राजबंधनांतून मुक्त करून या ' पागला ' (impious) चा हुकूम मानण्याचें ख्रिस्ती प्रजेला कारण नाहीं असें जाहीर केलें. उलट **जॉन**नें एका धर्माधिकाऱ्यानें आपली जागा सोडली तेव्हां त्याला ठार मारिलें; तेव्हां धर्माधिकाऱ्यांचीहि कुचंबणा होऊं लागली. कित्येक धर्माधिकाऱ्यांनीं तर **जॉन**बरोबर भांडत बसण्यापेक्षां देशत्यागच पसंत केला.

२३ पोपचा पुढला उपाय—पुढें येवढ्यानेंही जॉन ऐकत नाहींसें पाहून पोपनें फ्रान्सच्या राजाला इंग्लंडवर स्वारी करण्याचें आज्ञापत्र दिलें. व सर्व ख्रिस्ती राजांनीं त्याला मदत करून ' पागल ' जॉनला **इंग्लंड**च्या गादीवरून काढून टाकावें म्हणून फर्मान काढलें ! **फ्रान्स**च्या राजानें जंगी तयारी केली.

२४ जुलुमाचा परिणाम—या वेळीं जॉनच्या जुलुमानें मोठमोठ्या जहागिरदारांपासून तों लहान सहान शेतकऱ्यांपर्यंत सर्वच इंग्रज प्रजा फार त्रासून गेली होती. **जॉन**ला कोणाचाच विश्वास वाटेना. त्याजपाशीं साठ हजार भाडोत्री सैन्य होतें. तरी त्याला लौकरच असें आढळून आलें कीं, **फ्रान्स**चा राजा इंग्लंडांत उतरल्यास आपल्या बाजूनें लढण्याला फारच थोडे सैनिक तयार होतील ! तिकडे **फ्रान्स**च्या राजाची तर कडेकोट तयारी झालेली. तेव्हां **जॉन** गडबडला व लगेच त्यानें **पोप**कडे मनुष्य पाठवून ' **स्टीफन लांगटन** 'ची नेमणूक मान्य केली, व आपण पोपला शरण आल्याचें कळविलें !

२५ पोपचा दास—पोपनें 'पांडल्फ' (Pandulph) नांवाचा आपला प्रतिनिधि इंग्लंडमध्यें पाठवून दिला. **'डोव्हर'** (Dover) जवळ एक भव्य मंडप उभारून राजानें पांडल्फचें स्वागत केलें, आपला राजमुकुट आपल्या हातानें आपल्या डोक्यावरून काढून **पांडल्फ**च्या पायांवर ठेवला, आणि इंग्लंड व आयर्लंडचें राज्य पोपला अर्पण केलें ! त्याचप्रमाणें दरसाल एक हजार मार्क पोपच्या तिजोरींत जमा करूं म्हणून कबूल केलें ! **पांडल्फ**नें नंतर राजमुकुट उचलून स्वहस्तें **जॉन**च्या मस्तकावर ठेवला, व अशा रीतीनें इंग्लंडच्या राजाला पोपचा अंकित करण्याचा हा विधि समाप्त झाला ! **पोप**नें आतां अर्थातच जॉनवरील बहिष्कार काढून घेऊन **फ्रान्स**च्या राजाला इंग्लंडवर स्वारी करण्याचें कारण नाहीं म्हणून कळविलें. आजपर्यंत इंग्लंडच्या कोणत्याहि राजानें अशा रीतीनें आपणाला पोपचा दास करून घेतलें नव्हतें. त्यामुळें सगळ्या इंग्लंडला या वेळीं लज्जेनें मान खालीं घालावी लागली !

२६ स्टीफन लँगटनचें पुढारीपण—जॉनचा अंमल पहिल्यापासूनच जुलुमी होता. तो मनाला वाटेल तेव्हां कायदा धाब्यावर बसवून प्रजेवर वाटेल तसा अंमल गाजवी. सरदार जहागिरदारांचे हक्क त्यानें केव्हांच संपुष्टांत आणून ठेवले होते, व नाना तऱ्हेच्या दुष्कृत्यांनीं त्यांच्या अब्रूचें मातेरें केलें होतें ! आतां तर त्यानें खुद्द इंग्लंडचें राज्यच पोपला देऊन टाकलें ! **स्टीफन लँगटन**ची नेमणूक जरी **पोप**नें केली होती तरी तो जातीचा **इंग्रज** असल्यामुळें **इंग्लंड**च्या राजानें आपल्या गादीसाठीं **पोप**चा दास व्हावें हें त्यालाहि आवडलें नाहीं. व त्यानेंच पुढें पुढाकार घेऊन सरदार, जहागिरदार, व रयत यांची एकी केली, व प्रजेच्या हक्कांची सनद तयार करून राजाला या सनदेप्रमाणें वागण्याचें वचन देण्याला भाग पाडलें.

प्रकरण १६ वें.

प्रजेच्या स्वातंत्र्याची सनद !

(इ. स. १२०८—इ. स. १२१६.)

[१ राष्ट्रीय भावनेचा उदय—इंग्रज व नॉर्मन यांच्या एकीचा परिणाम—२ फ्रान्सचा राजा फिलिप—त्याचा इंग्लंडवर स्वारी करण्याचा बेत—३ जॉनची तयारी—फ्रान्सच्या राजाला शह—४ स्टीफन लँगटनचें कारस्थान—लोकांच्या हक्कांची यादी—५।६ शिष्ट मंडळाचें डेप्युटेशन—फूट पाडण्याची युक्ति—७ सरदारांचें सैन्य व त्यांचा लंडनमध्यें प्रवेश—राजा नमला—८ रनीमीडच्या मैदानांत—९ प्रजेच्या स्वातंत्र्याची सनद—१० तींतील मुख्य कलमें—११ राजाचा पुढचा बेत—पोपची लुडबुड—भाडोत्री सैन्याची मदत. १२ इंग्रज जहागिरदारांवरील संकट—फ्रान्सला बोलावणें गेलें—१३ लुईचें आगमन—चुलींतून वैलांत—१४ जॉनवर ईश्वरी कोप—त्याचा मृत्यु—१५ जॉनचा स्वभाव—१६ बालराजा हेन्री—राजपालक—लुईची निराशा व प्रयाण.]

१ राष्ट्रीय भावनेचा उदय—परमेश्वराच्या घरचा 'चक्रनेमिक्रमन्याय' जसा व्यक्तीच्या आयुष्यांत दिसून येतो, तसाच तो राष्ट्राच्याहि आयुष्यांत अनेकवार पहावयास सांपडतो. **जॉन** राजानें सर्व कायदे गुंडाळून ठेवून व नाना तऱ्हा करून सर्व प्रजेला पिळून काढलें, पण त्याच्या जुलुमानें नार्मन सरदार, जहागिरदार, व इंग्रज लोक यांना सारखाच त्रास पोंचत असल्यामुळें समान-व्यसनाच्या आंचेनें त्यांच्यांत आतां राष्ट्रीय भावना उत्पन्न झाली होती. नार्मन जहागिरदारांना आतां **इंग्लंड** हाच आपला 'मायदेश' (Mother Country) असें वाटावयास लागलें होतें. व इंग्रज प्रजा संतुष्ट राहून आपल्याला अनुकूल असेल तरच या राजापासून आपला बचाव होईल हें त्यांनीं ओळखलें होतें. उलट पक्षीं इंग्रज शेतकऱ्यांनाहि नार्मन जहागिरदार आतां इंग्लंडमध्यें स्थाईक झाले, त्यांना परत घालवून देण्याची आशा करावयास नको, तेव्हां त्यांच्याच तंत्रानें चालून आपलें हित करून घ्यावें असें वाटूं लागलें होतें. शिवाय **नार्मनां**शीं शरीरसंबंध होऊन जीं नवीन कुटुंबें अस्तित्वांत येत होतीं, त्यांच्यांत जुन्या काळचा जेतृ-जित भाव कमी होऊन आपण सर्व एका राष्ट्राचे घटक

आहों हीच भावना उत्कटत्वानें वसत असे. धर्माधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचीहि त्यांतच भर पडत होती. कारण त्यांच्या प्रयत्नांनीं नार्मन व इंग्रज या दोघांनाहि विद्येची गोडी लागून पुष्कळ इंग्रज गृहस्थ **पारीस** व **रोम** येथील विद्यापीठांतून शिक्षण घेऊन येत असत व अशा सुशिक्षितांच्या नव्या पिढीला आपल्याला कांहीं हक्क म्हणून आहेत याची जाणीव उत्पन्न झाली होती. जहागिरदार व कुळें यांचे हक्कसंबंधही आतां बरेच निश्चित झाले होते. व्यापारी लोक आपापसांतल्या व्यवहारापुरते कां होईना, पण कांहीं नियम म्हणून ठरवून व्यापार करीत. तसेंच **रिचर्ड**च्या कारकिर्दीपासून राजाला पैशांची नेहमीं गरज लागत असल्यामुळें राजाला पैसा पुरवून लोक कांहीं हक्क विकतही घेऊं लागले होते. या हक्कांवर राजानें गदा आणली म्हणजे साहजिकच ते कसें संरक्षण करावें याच्या चिंतनांत समदुःखी मंडळी एकत्र होऊन त्यांच्यांत वादविवाद चाले. पण आतांपर्यंत कोणी खंबीर पुढारी नसल्यामुळें त्यांच्या या आपसांतल्या चर्चांचा व ठरावांचा कांहीं अंमल होत नसे. अशा स्थितींत **स्टीफन लँगटन** या विद्वान देशभक्त गृहस्थाची कांटरबरीच्या मुख्य आचार्यांच्या जागीं नेमणूक झाल्यामुळें इंग्रजांना चांगला पुढारी नव्हता तो आपोआपच मिळाल्यासारखा झाला !

२ फ्रान्सचा राजा फिलिप—पोपनें जॉनवरचा बहिष्कार काढून घेऊन **फ्रान्स**च्या राजाला आतां **इंग्लंड**वर स्वारी करण्याचें कारण नाहीं असें कळविलें हें वर सांगितलेंच आहे. पण **फ्रान्स**चा राजा ‘ **फिलिप** ’ ही आयती चालून आलेली संधि दवडण्याला फार नाखूष होता. **पोप**च्या इच्छेला अनुसरून त्यानें पुष्कळ पैसा खर्च करून मोठी तयारी केली होती. याचा मोबदला म्हणून कांहींतरी मिळालेंच पाहिजे असें म्हणून त्यानें **पोप**च्या आज्ञेकडे दुर्लक्ष केलें, व **इंग्लंड**वर स्वारी करण्याचा बेत कायम केला.


३ जॉनची तयारी—फिलिपला या कामीं पहिल्यापासून त्याचा शेजारी **फ्लांडर्स**चा जहागिरदार हा सहाय्य होता. पण आतां **पोप**च्या हुकुमाला मान देऊन त्यानें आपलें अंग काढून घेतलें. तेव्हां **फिलिप**ला राग येऊन त्यानें आपला मोर्चा आधीं या शेजाऱ्याकडेच फिरविला ! जॉननें त्या जहागिरदाराच्या मदतीला सैन्य पाठवून दिलें, व ‘ **डॅम** ’च्या लढाईंत **फिलिप**चा पराभव केला. हा जय मिळाल्यामुळें जॉनला उमेद येऊन त्यानें पुढें खुद्द **फ्रान्स**वरच हल्ला केला. पण त्यांत यश न आल्यामुळें त्याचा हिरमोड होऊन तो. इ० स० १२१४ या वर्षीं इंग्लंडला परत आला.

४ **स्टीफन लँगटनचें कारस्थान**—जॉन फ्रान्समधील या लढाईंत गुंतला असतां इकडे इंग्लंडमध्यें कित्येक मोठमोठे जहागिरदार व धर्माधिकारी एकत्र जमून त्यांनीं जॉनच्या जुलुमापासून आपलें संरक्षण कसें करावें याचा विचार चालविला. **स्टीफन लँगटन**नें ' **पहिल्या हेन्री** 'नें लोकांना ' आपण तुमचे जुने कायदे पाळूं ' म्हणून वचन देऊन एक प्रकारची सनदच दिली होती ती पुढें आणली; आणि या सनदेच्या आधारें आपल्या हक्कांची यादी तयार करून हे तुमचे हक्क मी पाळीन अशी जॉनकडून लेखी कबुली घ्यावी असें सर्वानुमतें ठरलें. इतकेंच नव्हे तर याच वेळीं राजानें अशी कबुली न दिल्यास त्याच्याशीं युद्ध करून त्याजकडून आपले हक्क मान्य करून घेऊं, त्याच वेळीं आम्ही आपल्या तरवारी पुन्हां म्यानांत घालूं अशीही कित्येक सरदारांनीं देवळांतल्या वेदीवर शपथ घेतली !

५ **शिष्टमंडळाचें डेप्युटेशन**—इतकी तयारी झाल्यावर सन **१२१५**च्या जानेवारी महिन्यांत कित्येक सशस्त्र सरदारांचें ' डेप्युटेशन ' ऊर्फ ' शिष्टमंडळ ' जॉनकडे जाऊन त्यांनीं आपल्या मागण्या राजापुढें मांडल्या. राजानें या सरदारांच्या तोंडावरील निश्चयाचें बळ पाहून विचार करण्यासाठीं एप्रिलपर्यंत मुदत मागून घेतली. व या दोन महिन्यांत प्रतिपक्षांत फूट पाडून आपलें बळ वाढविण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें धर्माधिकाऱ्यांना पाहिजे होते ते हक्क देऊन टाकून त्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न केला. व आपण ' धर्मवीर ' (Crusader) होऊन **पॅलेस्टाइन** प्रांतांत लढावयास जातों असाहि बहाणा केला. हेतु हा कीं धर्मासाठीं प्राण धोक्यांत घालण्याची ज्याची तयारी अशा ख्रिस्तभक्त राजावर प्रजेनें शस्त्र धरणें हें पाप आहे असा धर्माधिकारी लोकांनीं जनतेस उपदेश करून त्यांचीं मनें प्रतिपक्षाकडून वळवावीं.

६ एप्रिल महिना आला; जॉन **ऑक्सफर्ड** येथें होता. सरदारांनीं सैन्य गोळा केलें, व **लँगटन** व दुसरे दोन सरदार यांना राजाकडे काय विचार ठरला तो विचारण्यासाठीं पाठवून दिलें. **जॉन** व **पोप**कडून आलेला प्रतिनिधी (Envoy) **पांडल्फ** (Pandulph) हे जवळजवळ बसले होते. **स्टीफन लँगटन**नें प्रजेच्या हक्कांची यादी वाचून दाखविली. **जॉन** रागानें लाल झाला, व म्हणाला, ' तरी बरा त्यांनीं माझा मुकूट मागितला नाहीं ! हे हक्क देऊन टाकून मी त्यांचा गुलाम होऊन राहूं कीं काय ? तें कधींहि होणार नाहीं ! '

७ **सरदारांचें सैन्य**—पण गेल्या दोन महिन्यांत सरदारांनीं काय तयारी केली होती, याची जॉनला कल्पना नव्हती. त्यांनीं ' **फिट्झ्वाल्टर** ' (Fitz-



जॉन राजा स्वातंत्र्य–सनदे (Magna Charta)वर सही करीत आहे.

walte r नामक एका सरदाराला आपला पुढारी करून सैन्याचा अधिपति नेमलें. व मे महिन्याच्या चोविसाव्या तारखेस **लंडन**मध्यें ससैन्य प्रवेश केला. त्या वेळीं त्यांना कोणींही अडथळा केला नाहीं. राजाच्या खास विश्वासू सरदारांपैकींही एक एक या सैन्याला जाऊन मिळूं लागले. अखेर अवघे पांच सहा सरदार जॉनजवळ राहिले. तेव्हां आतां गत्यंतर नाहीं असें पाहून ‘ **पेंब्रोक** ’ (Pembroke) नामक सरदाराला त्यानें विरुद्ध पक्षांतील सरदारांकडे पाठवून आपण तुमच्या म्हणण्या-प्रमाणें वागण्याला कबूल आहों असें कळविलें.

८ रनिमीडच्या मैदानांत—पुढें जूनच्या १५ व्या तारखेस **टेम्स** नदीच्या कांठीं ‘ **रनिमीड** ’ (Runnymade) नामक मैदानांत ‘ **फिट्झ् वाल्टर** ’-च्या हाताखालील सर्व सरदार जमा झाले. तिकडून राजा, पोपचा प्रतिनिधि ‘**पांडल्फ**’, सरदार **पेंब्रोक**, व राजसैन्याचा अधिपति असे राजवाड्यांतून त्या मैदानांत येऊन दाखल झाले. व आपण अगदीं खुषीनें तुम्हीं मागितलेले हक्क तुम्हांला देत आहों असें बाह्यात्कारी दर्शवून जॉननें हातांत लेखणी घेऊन सरदारांनीं तयार केलेल्या सनदेवर सही केली !

९ प्रजेच्या स्वातंत्र्याची सनद—ही सनद म्हणजे इंग्लंडच्या प्रजाजनांच्या स्वातंत्र्याचा पाया होय असें समजण्यांत येतें. ही ‘ लॅटिन ’ भाषेंत लिहिलेली असून एकंदर ६३ कलमांत इंग्लंडचे सरदार, धर्माधिकारी, व्यापारी, व सामान्य रयत यांचे हक्क तींत नमूद केलेले आहेत. इंग्लंडच्या राजांनीं आजपर्यंत ४० वेळां या सनदेवर आपल्या मान्यतेचा शिक्का मारला आहे. व आज तारखेला लंडनमधील पदार्थसंग्र-हालयांत ती फार काळजीपूर्वक जपून ठेवली आहे. या सनदेकडे पाहिलें म्हणजे प्रत्येक इंग्रजाला पूर्व इतिहास आठवून सानंद अभिमान उत्पन्न होतो. या सनदेंतील मुख्य मुख्य कलमें खालीलप्रमाणें आहेत:—

१० मुख्य कलमें—(१) जहागिरदारांनीं ठराविक सरंजामी कर (Feudal aids) राजास द्यावे. युद्धाच्या किंवा इतर कोणत्याहि प्रसंगीं ‘श्रेष्ठ परिषदे’च्या संमतीशिवाय अधिक मागणी राजानें करूं नये.

(२) अज्ञान वारसांच्या जमिनी राजाच्या ताब्यांत असतांना त्यांत कांहीं अफ-रातफर होऊं देऊं नये.

(३) अज्ञान वारसदार मुलींचीं लग्में त्यांच्या बरोबरीच्या दर्जाच्या नवऱ्यांशीं लावण्यांत यावीं.

(४) धर्माधिकाऱ्यांना पूर्वी जे हक्क दिलेले आहेत ते कायम चालावे.

(५) श्रेष्ठ परिषदेच्या सभेस मोठमोठ्या जहागिरदारांना व धर्माधिकाऱ्यांना राजानें पत्रें पाठवून बोलावणें करावें व लहान सहान सरदारांना गांवच्या शेरिफामार्फत बोलावणें पाठवावें.

(६) विशेष प्रसंग खेरीज करून श्रेष्ठ परिषदेच्या संमतीशिवाय राजानें नवीन कर बसवूं नयेत.

(७) लंडन व इतर मोठमोठीं शहरें यांना पूर्वी मिळालेले हक्क कायम चालावे.

(८) राजानें कोणाहि स्वतंत्र मनुष्याला त्याच्या बरोबरीच्या लोकांनीं अपराधी ठरविल्याशिवाय अथवा कायद्याप्रमाणें चौकशी झाल्याशिवाय कैदेंत टाकूं नये अथवा दुसरी शिक्षा देऊं नये. अगर त्याची मालमत्ता जप्त करूं नये.

(९) राजानें न्यायाची विक्री, बंदी अगर चालढकल करूं नये. व कोणाचींहिं उदरनिर्वाहाचीं साधनें जप्त करूं नयेत.

(१०) इंग्लंडमधील रहिवाशांना पाहिजे तेव्हां देशाबाहेर जाण्याची अगर देशांत येण्याची मोकळीक असावी.

११ राजाचा पुढचा बेत—सनदेवर सही करून राजा आपल्या वाड्यांत परत गेला तो दुःखानें व संतापानें अगदीं व्याप्त होऊन त्यानें धाडकन् जमिनीवर अंग टाकलें, व तो दांत ओठ चावून त्या सनदेला शिव्या देऊं लागला ! पुढें राग शांत झाल्यावर ती सनद कशी रद्द करावी याच्या विचारास तो लागला. सरदार लोकांनाही जॉनचा स्वभाव माहीत होताच. त्यांनीं या सनदेप्रमाणें राजा वागतो कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आपल्यामधील २४ सरदारांची एक 'कमिटी' नेमिली व राजा सनदेविरुद्ध आचरण करतो असें दिसून आल्यास या कमिटीच्या सभासदांनीं योग्य ते उपाय योजण्याची तजवीज करावी असें ठरविलें. **जॉन**नें परदेशांतील भाडोत्री शिपाई आणून आपलें सैन्य वाढविलें. व **पोप**कडे वकील पाठवून त्याजकडून असा जाहिरनामा काढविला कीं, 'सर्व राज्य माझें असल्यामुळें माझ्या संमतीशिवाय **जॉन**ला कोणतीहि सनद देण्याचा अधिकार नाहीं. सबब **जॉन**नें सरदारांना दिलेली सनद बेकायदेशीर व रद्द आहे. !'

१२ जहागिरदारांवरील संकट—देशोदेशींचे युद्धप्रिय साहसी लोक जॉन राजाला मदत करण्यासाठीं इंग्लंडमध्यें जमा होऊं लागले. व त्यांच्या मदतीनें इंग्लंडच्या जहागिरदारांच्या जहागिरी **जॉन**नें जाळून पोळून उध्वस्त करण्याचा क्रम चाल-

विला. किल्ले, शहरें व खेडेगांव लुटण्यांत आले, व राजा आतां सरदार लोकांचा पुरा सूड उगाविणार असें दिसूं लागलें. सर्व सरदार जहागिरदार निराश झाले. व पुन्हां **जॉन**शीं सख्य करून अधिक हाल अपेष्टा करून घेण्यापेक्षां दुसऱ्या देशाच्या राजाला **इंग्लंड**वर स्वारी करण्याविषयीं विनंति करून त्याच्या अंमलाखालीं राहणेंच बरें असें ठरवून त्यांच्यापैकीं कित्येकांनीं फ्रान्सच्या राजाच्या वडील मुलाला इंग्लंडवर स्वारी करण्याविषयीं निरोप पाठविला.

१३ लुईचें आगमन—सहाशें ऐशीं गलबतें बरोबर घेऊन **फ्रान्स**चा राजपुत्र **लुई** (Louis) **इंग्लंड**मध्यें दाखल झाला. व **इंग्लंड**चा पूर्व व दक्षिण भाग त्यानें लौकरच हस्तगत केला. पण **लुई** इंग्लंडच्या लोकांच्या कल्याणासाठीं थोडाच आला होता! त्यानें जिंकलेले प्रांत व मिळालेली लूट आपल्याबरोबर आणलेल्या **फ्रेन्च** मित्रांना वांटून देण्याला सुरवात केली. त्यामुळें **इंग्लिश** सरदारांना चुलींतून निघून वैलांत गेल्यासारखेंच झालें ! व त्यांनीं हळूहळू माघारा पाय घेण्यास सुरवात केली.

१४ ईश्वरी कोप—इतक्यांत **जॉन**ही उत्तरेकडील सैन्य घेऊन आला. पण वाटेंत **वॉश** (Wash) नदी ओलांडून येत असतां पुरानें त्याच्या जवळचें सर्व सामान सुमान व खजिना वाहून गेला. डोक्यावर धारण करावयाचा मुकुटही राहिला नाहीं. तेव्हां निराशा व संताप उत्पन्न झाल्यामुळें त्याला ताप भरला, व पुढें थोड्याच दिवसांत म्हणजे इ० स० १२१६ च्या आक्टोबर महिन्याच्या १९ व्या तारखेस त्याचा अंत झाला.

१५ जॉनचा स्वभाव—जॉनच्या मरणानें सर्व इंग्लंडला हायसें वाटलें ! त्याच्या अंगीं चांगला असा एकही गुण नव्हता असें म्हटलें तरी चालेल. हलकटपणा, विश्वासघात, दुष्टपणा, निर्लज्जपणा, छंदीपणा, भागूबाईपणा, इत्यादि दुर्गुण त्याच्यांत एकत्र झाले होते. त्याचीं कित्येक कृत्यें तर त्यानें वेडाच्या भरांतच केलीं कीं काय असें वाटतें. मरणसमयीं त्याला दोन मुलगे व तीन मुली होत्या. वडील मुलगा '**हेन्री**' हा या वेळीं केवळ दहा वर्षांचा होता.

१६ बालराजा हेन्री—जॉन मरण पावला तेव्हां राजकुटुंबांतील मंडळी '**ग्लावसेस्टर**' नामक जिल्ह्यांत होती. जॉनची एक मुलगी **पेंब्रोक**च्या सरदाराला दिलेली होती. **फ्रान्स**चा राजपुत्र **लुई** दक्षिणेकडे लुटालूट करीत होता. पण कांहीं अंशीं त्याच्या अदूरदर्शीपणामुळें व कांहीं अंशीं **इंग्लिश** सरदारांच्या दुःखाचें कारण आतां संपल्यामुळें साहजिकच त्यांचीं मनें आतां या परकी राजपुत्राकडे ओढ घेईनाशीं

झालीं. छोट्या हेन्रीला **ग्लावसेस्टर** येथें राज्याभिषेक करण्यांत आला व त्याचा मेहुणा **पेंब्रोक** याला राजाचा पालक नेमण्यांत आलें. **पेंब्रोक**नें जे सरदार **लुई**च्या बाजूनें लढत होते त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतलें. नुकतीच **जॉन**नें दिलेली प्रजास्वातंत्र्याची सनद **ब्रिस्टल** (Bristol) येथें श्रेष्ठपरिषदेची सभा भरवून कायम करण्यांत आली. **लंडन** शहर व दक्षिणेकडील प्रांत **लुई**च्या ताब्यांत होता. पण **पेंब्रोक**च्या शहाणपणानें पुष्कळ इंग्लिश सरदार आतां **लुई**ला सोडून आपल्या बालराजाच्या पक्षाला येऊन मिळाले होते. तेव्हां **पेंब्रोक**नें **लिंकन** येथें लुईच्या सैन्यावर छापा घालून त्याची दाणादाण करून टाकली. पुढें आपला डाव साधत नाहीं असें दिसून आल्यावर **लुई**नें **पेंब्रोक**शीं तह केला व तो परत फ्रान्सला निघून गेला.

प्रकरण १७ वें.

पार्लमेंट सभेची प्राणप्रतिष्ठा !

(इ. स. १२१६—इ. स. १२७२)

[१ बरो व रोचिस—२।३ फ्रान्समधील मुलूख—स्टीफन लँगटनचा मृत्यु—बरोबर अवकृपा—४ राजमातेचें लग्न—फ्रान्सबरोबर युद्ध व तह—५ वेल्स व स्कॉटलंड—६ स्वातंत्र्य सनदेचें पुनरुच्चारण—७ राजाचें लग्न—परदेशी मित्र—नवे सरदार—८ सायमन मांटफर्ड—सरदारांची सभा—चोवीस सभासदांची कमिटी—९ कमिटीच्या सूचना—१० स्थायी समिति—फ्रान्सचा लवाद—११ सरदार व राजा यांची लढाई—राजाचा पराभव—१२।१३ राष्ट्रसभेची बैठक—लोकसभेचा पाया—' पार्लमेंट' शब्दाचा अर्थ—१४ राजपुत्राची सुटका—पुन्हां लढाई—सायमनचा मृत्यु—हेन्रीचें पुनरारोहण—१५ राजपुत्र एडवर्ड-धर्म युद्धाला जातो—हेन्रीचा मृत्यु—१६ हेन्रीचा स्वभाव—१७ त्याच्या कारकिर्दीतील सुधारणा—दगडी कोळसा—तागाचें कापड—मेणबत्त्या—कौलें—सोन्याचें नाणें—सूक्ष्मदर्शक कांच—जादचा कंदील—बंदुकीची दारू—दिव्यबंदी—१८ गोसाव्यांचे दोन पंथ—वेस्टमिन्स्टर मंदिराचा जीर्णोद्धार.]

१ बरो व रोचिस—इ० स० १२१९ त पेंब्रोक मरण पावला, तेव्हां राजपालकाची जागा '**ह्यूबर्ट बरो**' (Hubert de-Burgh) नांवाचा एक

न्यायाधीश व ‘ **पीटर रोचीस** ’ (Peter Roches) नांवाचा एक धर्माधिकारी यांना देण्यांत आली. पण या दोघांचें आपसांत वैमनस्य असल्यामुळें राज्यांत बरीच अव्यवस्था माजली. पुढें इ० स० १२२७ मध्यें राजा वयांत आल्यावर राजपालकाची गरज नाहींशी झाली, तेव्हां **पीटर रोचिस**ला काढून टाकून **ह्यूबर्ट बरो**ला राजानें आपला मुख्य सल्लागार नेमलें. **पीटर**ला आपलें वजन व आपल्या हातांतील सत्ता नाहींशी झाल्यामुळें विषाद वाटून तो **पालेस्टाइन**च्या यात्रेला निघून गेला.

२ फ्रान्समधील मुलूख—पूर्वी फ्रान्समध्यें इंग्लंडच्या राजाचा जो मुलूख होता तो जॉनच्या कारकिर्दींत फ्रान्सच्या राजानें कसा बळकावला होता हें मागें सांगितलेंच आहे. हा मुलूख परत मिळवून **फ्रान्स**मध्यें आपलें वजन वाढवावें असें म्हणणारा एक पक्ष आतां राजदरबारांत उत्पन्न होऊन **हेन्री**लाहि आपल्या पूर्वजांचा हा मुलूख आपण पुन्हां संपादन करावा असें वाटूं लागलें होतें. पण ‘ **ह्यूबर्ट बरो** ’ हा तिकडील राजकारणांत आपण पडूं नये अशा मताचा होता. हेन्रीनें बरोच्या मसलतीविरुद्ध एकदां फ्रान्सवर स्वारी करून पाहिली; पण तींत त्यास यश आलें नाहीं.

३ राजा फ्रान्समध्यें असतांना इकडे **ह्यूबर्ट**नें विरुद्ध पक्षाच्या सरदारांची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न चालविला. **जॉन**च्या कारकिर्दींत पोपचा प्रतिनिधि इंग्लंडला आला तो अजूनहि ठाणें देऊन बसला होता. त्याच्या या मुक्कामांत रोमच्या **पोप**चें स्वामित्व इंग्लंडवर अबाधित कसें राहील याची खटपट करणें हा त्याचा उद्देश होता. पण **स्टीफन लँगटन**च्या स्वदेशभक्तीपुढें त्याचें कांहीं चालेना. तेव्हां त्यानें लौकरच रोमचा रस्ता सुधारला. इतक्यांत इकडे लँगटनहि ख्रिस्तवासी झाला. व पुन्हां पोपच्या पक्षाचें प्राबल्य होऊं लागलें. सरदार व लोक दोघेहि क्रुद्ध झाले. राजानें **फ्रान्स**मधील अपशाचें खापर **बरो**च्या डोक्याबर फोडलें. जिकडे तिकडे गुप्त कट होऊन कित्येक ठिकाणीं दंग्यांनाही सुरवात झाली. या दंग्यांत ‘ **बरो** ’चें अंग आहे असा संशय आल्यामुळें त्याच्यावर सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग केल्याचा आरोप ठेवून त्याची चौकशी करण्यांत आली व त्याला तुरुंगांत टाकलें. आणि त्याचा जुना दोस्त **पीटर रोचिस** हा या वेळीं ख्रिस्तभूमीची यात्रा संपवून पुन्हां इंग्लंडला आला होता, त्याला राजमंत्र्याची जागा देण्यांत आली.

४ राजमातेचें लग्न-हेन्रीच्या आईनें जॉन मेल्यावर **फ्रान्स**मधील एका जहागिरदाराशीं पुनर्विवाह केला होता. त्यामुळें तिकडच्या बऱ्याच नव्या मित्रांनीं या वेळीं इंग्लंडच्या दरबारांत शिरकाव करून घेतला होता. पुढें राजमातेच्या या नव्या यजमानाचा

कांहीं कारणावरून **फ्रान्स**च्या राजाशीं लढा पडला. तेव्हां त्यानें हेन्रीला आपल्या मदतीला तिकडे बोलावलें. पण या वेळींहि **हेन्री**चा पराभव होऊन त्याला आतां फ्रान्सचा राजा झालेल्या '**लुई**'शीं तह करून परत फिरावें लागलें. या तहानें **फ्रान्स**मधील **नार्मंडी** वगैरे जे जुने प्रांत इंग्लंडच्या राजांच्या मालकीचे होते त्यांवरील आपलें स्वत्व हेन्रीनें सोडून दिलें. व त्याच्या मोबदला '**लिमोसिन**' (Limousin) व '**गिनी**' (Guienne) असे दोन प्रांत हेन्रीकडे असावे असें ठरलें.

५ वेल्स व स्कॉटलंड—इकडे **वेल्स** प्रांताशींही राजाचा पुष्कळ दिवस झगडा चालू होता. **स्काटलंड**च्या राजाबरोबरही स्वामित्वाबद्दलचें भांडण चालूच होतें. पण पुढें **स्काटलंड**चा राजा **अलेक्झांडर** (Alexander) यानें **हेन्री**ची बहीण '**जोन**' (Joan) हिच्याशीं लग्न केल्यामुळें हे राजे एकमेकांचे मित्र बनले.

६ स्वातंत्र्यसनदेचें पुनरुच्चारण – **हेन्री**ला लढाईची भारी हौस, व लढाईला तर पैसा पाहिजे, म्हणून त्याला वारंवार आपल्या जहागिरदारांची व सरदारांची पैशाबद्दल याचना करावी लागे; व अशा प्रत्येक वेळीं हे सरदार राजाकडून आपल्या 'स्वातंत्र्य सनदेची' उजळणी करून घेतल्याशिवाय पैसा देत नसत. पण पुढें पुढें राजाला ही सनद म्हणजे राजाच्या हक्कांवर विनाकारण घातलेलें एक दडपण आहे असें वाटूं लागलें; व तींतील कित्येक करार त्यानें उघडपणें धाब्यावर बसविले.

७ राजाचें लग्न—इ. स. १२३६ या वर्षीं **हेन्री**नें फ्रान्समधील एका संस्थानिकाच्या '**एलिनॉर**' (Eleanor) नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. त्यामुळें श्वशुर प्रांतांतली बरीच मंडळी इंग्लडच्या दरबारांत जमा होऊं लागली. इंग्लंडमधील सरदार आपली सत्ता कमी करून स्वतःच्या हातीं घेऊं पाहतात म्हणून राजा आपल्या परदेशी मित्रांना बोलावून त्यांच्यावर मानमरातब, पदव्या, व जहागिरी यांचा वर्षाव करूं लागला. त्यामुळें अर्थांतच इंग्लिश सरदारांचें महत्त्व कमी होऊं लागलें. शिवाय राजाच्या ताब्यांत ज्या अज्ञानांच्या इस्टेटी असत त्या अज्ञानांचे परदेशीय वधूंशीं अगर वरांशीं विवाह लावून देऊन नवीन नवीन सरदार निर्माण करण्यांत येऊं लागले. हे सरदार अर्थांतच राजकृपेनें सरदारपदाला पोंचलेले असल्यामुळें राजाचा शब्द झेलण्याला नेहमीं तयार असत. इंग्रजांची ती स्वातंत्र्यसनद म्हणजे अडचणीच्या वेळीं दिलेलें एक कागदाचें चिटोरें आहे अशा भावनेनें हे नवीन सरदार वागत आणि त्यांच्या विरुद्ध कोणीं फिर्याद मांडल्यास इंग्लिशांचे कायदे

आम्हांला लागू नाहींत असें चक्क सांगत ! आणि त्यांच्यावर राजाची मर्जी असल्यामुळें पुष्कळ वेळां हें त्यांचें म्हणणें खपूनही जाई ! शेवटीं गोष्टी इतक्या थराला गेल्या कीं, इंग्रज सरदारांना जॉनच्या कारकिर्दीची पुनरावृत्ति होऊन आपल्या वाडवडिलांनीं महाप्रयासानें मिळविलेली सनद फुकट जाते कीं काय अशी भीति वाटूं लागली.

८ यावेळीं '**सायमन मांटफर्ड**' (Simon Montford) या नांवाचा एक शूर सरदार पुढें झाला. **हेन्री**ची बहीण '**एलिनॉर**'–जिचें पूर्वीं **पेंब्रोक**बरोबर लग्न झालें होतें–तिनें पेंब्रोकच्या मरणानंतर **सायमन**शीं पुनर्विवाह केला होता. त्यामुळें राजाचें **सायमन**शीं मेहुण्याचें नातें लागत होतें. परंतु त्याला राजाचें दुर्वर्तन आवडत नसल्यामुळें त्यानें हेन्रीची बाजू न घेतां सरदारांची बाजू उचलली. '**वेस्टमिन्स्टर**' येथें सर्व सरदार हत्यारबंद होऊन जमा झाले, व त्यांनीं राष्ट्राच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणें जरूर आहे असें ठरविलें. नंतर लौकरच **ऑक्सफर्ड** येथें त्यांची दुसरी सभा भरली. या सभेंत कांहीं कारणांवरून कित्येक सभासदांमध्यें बोलाचाली होऊन बराच गोंधळ उडाला. पण अखेर चौवीस सरदारांची एक कमिटी नेमण्यांत येऊन त्या कमिटीनें राज्यव्यवस्थेंत कोणकोणत्या सुधारणा होणें अवश्य आहे तें सुचवावें असें ठरविण्यांत आलें.

९ **कमिटीच्या सूचना** (Provisions of Oxford)—या कमिटीनें पुढें लिहिल्याप्रमाणें सूचना केल्या:—पहिली सूचना अशी कीं, प्रत्येक जिल्ह्यांतून स्वतंत्र जमीनदारांचे चारचार प्रतिनिधि श्रेष्ठ परिषदेंत घेण्यांत यावे. दुसरी अशी कीं, जिल्ह्याच्या शेरिफाची निवड दरसाल त्या त्या जिल्ह्यांतील स्वतंत्र जमीनदारांकडून व्हावी. तिसरी गोष्ट, श्रेष्ठ परिषदेची बैठक वर्षांतून तीन वेळां भरविण्यांत यावी. तसेंच सार्वजनिक पैशाचा जमाखर्च वर्षांतून एक वेळ तपासण्यांत यावा. आणखीं असेंहि सुचविण्यांत आलें कीं, इंग्लंडमधील कोणाहि अज्ञानाची इस्टेट परक्या लोकांच्या ताब्यांत देण्यांत येऊं नये, व इंग्लंडमधील कोणताही किल्ला त्यांच्या ताब्यांत ठेवूं नये.

१० **स्थायी समिति**—पुढें श्रेष्ठपरिषदेची बठक भरवून या सर्व सूचना मंजूर करण्यांत आल्या. व त्याप्रमाणें अंमल होतो कीं नाहीं हें पहाण्यासाठीं बारा सभासदांची एक ' स्थायी समिति ' नेमण्यांत आली. पण या समितीच्या सभासदांनीं राजाच्या कृत्यांवर नुसतें लक्ष ठेवावयाचें तें सोडून राजाचे हक्क आपणच बजावण्यास सुरवात केली. त्यामुळें राजा व हे सभासद यांच्यामध्यें वांकडें येऊन आपसांत लढाई सुरू होण्याचा समय आला. पण इतक्यांत कित्येक शहाण्यांनीं मध्यें पडून फ्रान्सच्या

राजाला लवाद नेमून त्याच्याकडून हा वाद मिटवून घ्यावा असें ठरविलें. फ्रान्सच्या ' **लुई** ' नें हेन्रीसारखा निकाल दिला. त्यामुळें सरदार मंडळ रागावलें व लवादाचा निवाडा बाजूला राहून अखेर लढाईचीच सिद्धता झाली !

११ सरदार व राजा यांची लढाई—इ० स० १२६४ च्या मे महिन्यांत ' **लिविस** ' (Lewes) येथें उभय पक्षांची लढाई होऊन सरदार मंडळाचा जय झाला, व राजा व त्याचा भाऊ **रिचर्ड** (Richard) हे कैद केले गेले. पुढें लौकरच राजाचा मुलगा **एडवर्ड** (Edward) हाही सरदार मंडळाच्या स्वाधीन झाला. या वेळीं पुन्हां गैरवर्तन करणार नाहीं अशाबद्दल **हेन्री**च्या मुलांना ओलीस घेऊन त्याला पुन्हां गादीवर बसवावें असा पुष्कळ सरदारांचा बेत होता. पण **सायमन मॉटफर्ड** त्या बेताला कबूल होईना. त्यानें राजाच्या नांवानें आपणच कारभार करण्याचें ठरविलें. व सन १२६५ च्या जानेवारी महिन्याच्या २० व्या तारखेस **लंडन** येथें राजाच्या नांवानें राष्ट्रसभेची बैठक भरविली.

१२ राष्ट्रसभेची बैठक—आजपर्यंत 'श्रेष्ठ परिषद' म्हणून राजाला सल्ला मसलत देण्यासाठीं सभा भरत असे; तींत फक्त बडेबडे जमिनदार, सरदार व धर्माधिकारी यांनाच बसण्याचा हक्क असे. पण **सायमन**नें ही जी सभा बोलावली तींत बड्या जमिनदार व धर्माधिकाऱ्यांबरोबरच प्रत्येक जिल्ह्यांतील स्वतंत्र जमिनदारांचे दोन दोन प्रतिनिधि व मोठ्या शहरांतील व सनदी गांवांतील सामान्य प्रजेनें निवडून दिलेले दोन दोन प्रतिनिधि यांनाही निमंत्रण केलें. अशा रीतीनें बड्या लोकांच्या शेजारींच सामान्य जनतेचेही प्रतिनिधि बसून राष्ट्राच्या हिताहिताची चर्चा करण्याचा उपक्रम होणें ही गोष्ट इंग्लंडच्या इतिहासांत फार महत्त्वाची मानितात. हाच हल्लींच्या इंग्लंडच्या लोकसभेचा पाया होय.

१३ या वेळेपासून पुढें सुमारें तीनशें वर्षेपर्यंत सरदार–मंडळ व लोकप्रतिनिधि-मंडळ एकत्र बसून राष्ट्राच्या सुखदुःखाची चार्चा चाले. पुढें **तिसऱ्या एडवर्ड**च्या कारकिर्दीत सरदार मंडळाची स्वतंत्र **सरदार सभा** (House of Lords) व लोकप्रतिनिधि मंडळाची स्वतंत्र **लोक सभा** (House of Commons) भरूं लागली. राष्ट्रांतील शहाण्या लोकांच्या या सभेला '**पार्लमेंट**' (Parliament) हें नांव **हेन्री**च्या कारकिर्दीत प्रथम देण्यांत आलें. **पार्लमेंट** हा शब्द फ्रेंच भाषेंतील ' पार्लर ' म्हणजे बोलणें या शब्दापासून झालेला आहे. असो.

१४ **राजपुत्राची सुटका**—सायमननें अशा रीतीनें **पार्लमेंट सभेची** प्राणप्रतिष्ठा केली खरी, पण त्याला आपल्या पक्षाच्या लोकांत फार दिवस ऐक्यभाव राखतां आला नाहीं. त्याच्या हेकटपणामुळें हळू हळू त्याच्या पक्षांतील मंडळी कमी होऊं लागली. सामान्य लोकांतही **हेन्री**बद्दल सहानुभूति उत्पन्न होऊन आपला राजा सदैव कैद होऊन पडावा हें त्यांना वरें वाटेना. इतक्यांत राजपुत्र **एडवर्ड** हा एक दिवस पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला ! राजपक्षीय मंडळी लगेच त्याला जाऊन मिळाली, व सैन्याची बरीच जमवाजमव झालीसें पाहून तो **सायमन**वर चाल करून आला. ' **इव्हिशाम** ' (Evesham) येथें उभय पक्षांची लढाई झाली. **हेन्री** परस्पर त्याच्या मित्रांकडूनच मारला जावा म्हणून **सायमन**च्या सरदार मंडळानें त्याला आपल्या सैन्याच्या अगदीं पुढल्या रांगेंत ठेवलें ! राजपक्षीय सैन्य आवेशानें चाल करून आलें. या वेळीं राजा त्यांच्या हातून मारलाच जावयाचा; पण हेन्री प्रसंगावधान राखून आपल्यावर हल्ला करावयास आलेल्या लोकांना उद्देशून मोठ्यानें म्हणाला, ' अरे, हा पहा मी तुमचा राजा ! ' तेव्हां त्या लोकांनीं त्याला ओळखून आपल्या ताब्यांत घेतलें. या लढाईत सरदार मंडळाचा पराभव होऊन **सायमन** व त्याचा वडील मुलगा हे मारले गेले. व **हेन्री**चें राजपद त्याला पुन्हां प्राप्त झालें.

१५ **राजपुत्र एडवर्ड**—यापुढील पांच सहा वर्षें बरींच शांततेंत गेलीं. राजपुत्र **एडवर्ड** हा इंग्लंडमध्यें स्थिरस्थावर आहेसें पाहून **पालेस्टाइन** प्रांतांत धर्मयुद्ध पुन्हां चालू झालें होतें तिकडे निघून गेला. **एडवर्ड** तिकडे असतांनाच हेन्री आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षीं इ० स० १२७२ च्या नोव्हेंबर महिन्यांत मरण पावला. त्यानें एकंदर ५६ वर्षें राज्य केलें. इतका दीर्घकाल गादीचा उपभोग घेण्याचें भाग्य थोड्याच राजांच्या वांट्यास येतें.

१६ **हेन्रीचा स्वभाव**—हेन्री हा जात्या धार्मिक व सौम्य प्रवृत्तीचा माणूस होता. पण त्या गडबडीच्या काळांत राजाच्या अंगीं जो दूरदर्शीपणा व मनाचा खंबीरपणा पाहिजे होता, तो त्याच्या अंगीं नसल्यामुळें दरबारच्या आपस्वार्थी लोकांच्या नादाला लागून तो पुष्कळ वेळां फसे. त्याला **एडवर्ड** व **एडमंड** असे दोन मुलगे व **मार्गारेट** आणि **बीट्रीस** अशा दोन मुली होत्या. पैकीं **मार्गारेट**चें स्काटलंडच्या राजाच्या मुलाशीं लग्न लावून देऊन हेन्रीनें या दोन्ही राज्यांत सलोखा जोडला होता.

१७ सुधारणा—हेन्रीच्या कारकिर्दीच्या काळांत इंग्लंडमध्यें भौतिक बाबतींत मात्र अनेक बाजूंनीं पुष्कळ सुधारणा घडून आल्या. '**न्यू कॅसल**' मधील लोकांना दगडी कोळसा खणून काढण्याची परवानगी देण्यांत आली. तोंपर्यंत या खनिज पदार्थांचा उपयोग लोकांस माहीत नव्हता. सध्यां ज्याला '**बेल्जम**' असें नांव आहे, त्या प्रांतांत त्या वेळीं '**फ्लेमिंग**' नांवाच्या लोकांची वस्ती होती. त्या लोकांनीं **इंग्लंड**मध्यें येऊन तागाच्या कापडाचा धंदा सुरू केला. पूर्वींच्या लांकडी मशाली ऐवजीं मेणबत्त्यांचा उपयोग प्रचारांत आला. गवतानें घरें शाकारण्याची पूर्वींची पद्धति मोडून कौलांचा उपयोग होऊं लागला. सोन्याचें नाणें हेन्रीच्याच कारकिर्दींत पहिल्यानें पाडण्यांत आलें. '**रोजर बेकन**' नांवाच्या एका जोग्यानें सूक्ष्मदर्शक कांचेचा, जादूच्या कंदिलाचा, व बंदुकीच्या दारूचा शोध लावला. या **रोजर बेकन**ला प्रथम प्रथम लोक जादुगार समजत. म्हणून कित्येक वर्षेंपर्यंत त्याला कैदेंत ठेवून त्याच्या जवळचीं पुस्तकें व लेखनसाहित्याहि काढून घेण्यांत आलें होतें ! दिव्य करवून न्याय करण्याची पद्धत हेन्रीच्या कारकिर्दींत बंद करण्यांत आली.

१८ गोसाव्यांचे दोन पंथ—या सुमारास **रोम**मध्यें गोसाव्यांचा एक नवीन पंथ (Order) उत्पन्न झाला होता; या पंथाचे लोक दारिद्र्य हें आपलें भूषण मानून दारोदार भीक मागत फिरत. इ० स० १२२१ मध्यें या पंथाचे कित्येक लोक **इंग्लंड**मध्यें येऊन त्यांनीं प्रथम '**ऑक्सफर्ड**' येथें आपलें बिऱ्हाड ठोकलें. त्यांच्या पोषाखावरून व चालीरीतींवरून '**शुक्ल गोसावी**' '**कृष्ण गोसावी**' वगैरे भेदहि त्यांच्यांत पुढें उत्पन्न झाले. '**वेस्ट मिन्स्टर ॲबे**' म्हणून इंग्लंडमध्यें जें प्रख्यात देवालय किंवा कबरस्थान आहे त्याचा जीर्णोद्धार **हेन्री**च्याच कारकिर्दींत झाला.



वेस्टमिन्स्टर ॲबे–इंग्लंडमधील सुप्रसिद्ध देवालय (कबरस्थान).

प्रकरण १८ वें.

सद्दीचा जोर !

(इ. स. १२७२-इ. स. १३०६)

[१ एडवर्डचा राज्याभिषेक—२ त्याच्या कारकिर्दीचें महत्त्व—३ वेल्सची स्थिति—४ लीवेलिन—५ वेल्स लोकांशीं युद्ध—लीवेलिनचा पाडाव--डेव्हिडचा पराभव—६ वेल्समधील दडपशाही व बंदोबस्त—७ वेल्सचा राजपुत्र—८ स्काटलंडमधील परिस्थिति—९ अलेक्झांडर राजा—वारसांचा तंटा—१० बेलियल व ब्रूस-एडवर्डची मध्यस्थी—व वारसपणाचा निकाल—११ मांडलिकत्वाचीं दुःखें—१२ फ्रान्सबरोबर लढाई-आरमारी युद्ध-फ्रान्सचा पराभव—१३ समेट व पुन्हां तंटा-लोंकरीवरील कर—१४ स्काटलंडमधील कटकट-बेलियलचा पराभव-राज्याभिषेकाचा दगड—१५ स्वातंत्र्यसनदेला मान्यता—१६ फ्रान्समधील हकीगत-पोपची मध्यस्थी-तह व सोयरीक—१७ स्काटिश लोकांचे स्वातंत्र्यार्थ प्रयत्न-वालेस —त्याचा पराभव व पलायन-फांशी—१८ राबर्ट ब्रूस-ब्रूसचा राज्याभिषेक-एडवर्डचा राग-त्याची शेवटची इच्छा व मृत्यु—१९ एडवर्डचा स्वभाव—२० ज्यू लोकांचे हाल-दगडी कोळशांचा व्यापार—कॉक्स—२१ देवस्थानच्या जमिनी-जमिनी विकण्याला बंदी.]

१ एडवर्डचा राज्याभिषेक—हेन्री मरण पावला तेव्हां त्याचा मुलगा **एडवर्ड जेरुसलेम**च्या 'पवित्र भूमी'वर धर्मयुद्धांत गुंतला होता. तथापि **पार्लमेंट**ची बैठक भरून **एडवर्ड**च्या नांवानें राजा म्हणून द्वाही फिरविण्यांत आली. आणि मुख्य मुख्य सरदारांनीं तो जाग्यावर नसतांही त्याच्याशीं प्रजाधर्मानें वागण्याची शपथ घेतली. **एडवर्ड** धर्मयुद्धाहून परत येत असतां वाटेंत **सिसिली** बेटांत बापाच्या मरणाची वार्ता त्याला समजली. पण **फ्रान्स**मध्यें कांहीं गडबड चालली होती, तिचा बंदोबस्त करून इंग्लंडमध्यें यावयाचें असल्यामुळें त्याला इ०स० १२७४ पर्यंत इंग्लंडला येतां आलें नाहीं. त्यामुळें बाप मरण पावल्यावर दोन वर्षांनीं त्याला राज्याभिषेक झाला. या राज्याभिषेकाला **स्काटलंड**चा राजा **अलेक्झांडर** व **पार्लमेंटचे** सर्व सभासद हजर होते.

२ त्याच्या कारकिर्दीचें महत्त्व—एडवर्डची कारकीर्द इंग्लंडच्या इतिहासांत फार महत्त्वाची आहे. या राजानें पद्धतशीरपणें **पार्लमेंट**च्या सल्लयानें राज्यकारभार पहाण्याला प्रथम सुरवात केली. **वेल्स** व **स्काटलंड** हे देश पूर्णपणें इंग्लंडच्या राजाच्या अंकित झाले; आणि त्याच्या मुत्सद्दीपणामुळें **युरोप** खंडामध्येंही **इंग्लं-डच्या** शब्दाला मान मिळूं लागला.

३ वेल्सची स्थिति—**वेल्स** हा प्रांत पूर्वीं जरी नांवाला इंग्लंडच्या राजाच्या **मांडलिकत्वाखालीं** होता तरी तेथील संस्थानिक संधि सांपडेल तेव्हां आपल्या स्वातंत्र्याचा हक्क सांगण्यास व त्याप्रमाणें वागण्यास कमी करीत नसत. इंग्लंडच्या राजाबरोबर युद्ध सुरू नसेल तेव्हां तेथील संस्थानिक आपापसांत भांडत. मिळून दहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंतचा वेल्श लोकांचा इतिहास तंटेभांडणें व रक्तपाताचे प्रसंग यांनींच भरलेला आहे.

४ लीवेलिन (Llewelyn)—**एडवर्ड**च्या वेळीं वेल्समध्यें **'लीवेलिन'** नामक राजा राज्य करीत होता. वेल्सच्या राजाला लंडनमध्यें राज्याभिषेक होणार आहे अशी त्या वेळीं वेल्समध्यें एक वदंता उठली होती व हा योग आपल्यालाच लाधणार असें लीवेलिनला वाटत असे. **एडवर्ड** गादीवर आल्यावर लीवेलिननें आपलें मांडलिकत्व कबूल करावें म्हणून रीतीप्रमाणें एडवर्डनें त्याला बोलावणें केलें. तो अर्थातच ऐकेना. तेव्हां **एडवर्ड** मोठें सैन्य घेऊन **वेल्स**मध्यें गेला व एक दोन मोठे किल्ले हस्तगत करून घेऊन **स्नोडन**च्या पर्वतांत लीवेलिनला त्यानें अडवून धरलें. शेवटीं निरुपाय होऊन **लीवेलिन एडवर्ड**च्या म्हणण्यास कबूल झाला.

५ वेल्श लोकांशीं युद्ध—पण राजा कबूल झाला तरी वेल्श लोक इंग्लंडच्या अंमलाखालीं राहण्यास कबूल होईनात. इ० स० १२८२ मध्यें त्यांनीं पुन्हां बंड उभारलें. **एडवर्ड** पहिल्यापेक्षां जास्त सैन्य जमा करून आपल्या सर्व मांडलिक सरदारांसह पुन्हां वेल्समध्यें शिरला. **वेल्श** लोकांनीं आपले जुने किल्ले हस्तगत करून आसपासचा प्रांत उजाड करून टाकला होता. **लीवेलिन इंग्लिश** सैन्याला पुढें येण्याला अटकाव करीत असतां एकाएकीं **एडवर्डनें** त्याच्यावर हल्ला करून त्याचे दोन हजार लोक कापून काढले. **लीवेलिन** मारला गेला. त्याचें डोकें कापून आणून एडवर्डनें त्याच्यावर झाडाच्या टाळ्यांचा मुकूट चढविला व तें लंडनच्या बुरुजावर टांगून ठेवलें ! **लीवेलिन**चा भाऊ **डेव्हिड** (David) यानें पुढें कित्येक महिनेपर्यंत लढाई चालविली, पण अखेर तोही शत्रूंच्या हातीं सांपडला. **एडवर्डनें** त्याच्या

पायांत बिड्या ठोकून त्याला **इंग्लंड**ला पाठविलें. आणि त्याच्यावर राजद्रोहाबद्दल खटला होऊन त्याला पुढें फांशीं देण्यांत आलें !

६ वेल्समधील दडपशाही—यानंतर वेल्श लोकांचें क्षात्रतेज नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न करण्यांत आले. आतां वेल्समध्यें शत्रु असा कोणी राहिला नव्हता. तथापि वेल्श शाहीर आपल्या कवनांनीं पुन्हां स्वातंत्र्यस्फूर्ति उत्पन्न करतील म्हणून एडवर्डनें त्यांचीही कत्तल करून टाकली असें म्हणतात ! इंग्लिश कायदे व इंग्लिश पद्धतीचीं न्यायमंदिरें वेल्समध्यें स्थापन करण्यांत आलीं. आणि इंग्लंडांतल्याप्रमाणें वेल्सचे जिल्हे व तालुके पाडून व ठिकठिकाणीं मजबूत किल्ले बांधून वेल्सचा बंदोबस्त करण्यांत आला.

७ वेल्सचा राजपुत्र—**एडवर्ड**चा मुक्काम वेल्समध्यें असतां इ० स० १२८४ मध्यें त्याची बायको तेथें प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तेव्हां एडवर्डनें **वेल्श** लोकांना खुष करण्यासाठीं म्हणून तेथल्या मुख्य मुख्य सरदारांना बोलावून आणून त्यांना तो मुलगा दाखविला, आणि म्हटलें 'हा पहा तुमचा राजा. हा तुमच्याच प्रांतांत जन्मला असून त्याला इंग्लिश भाषेचा गंधही लागलेला नाहीं.' त्यानें नंतर या मुलाला ' वेल्सचा राजपुत्र ' अशी पदवी दिली. त्या वेळेपासून **इंग्लंड**च्या तक्ताधिपतीच्या वडील मुलाला ही पदवी लावण्यांत येत असते.

८ स्काटलंडमधील परिस्थिति—**स्काट**लंड हा देश इंग्लंडच्या राजाच्या मांडलिकत्वाखालीं मधून मधून असे खरा. तथापि स्वातंत्र्य हें कोणाला प्रिय नसतें ? **स्का**टलंडचे राजे वेळप्रसंग पाहून **इंग्लंड**च्या राजाला नमून वागत. पण **इंग्लंड**चे राजे अडचणींत असले म्हणजे ते आपलें स्वातंत्र्य पुन्हां जाहीर करण्यास कमी करीत नसत. तशांत इंग्लंडचा माजी राजा **रिचर्ड** याला पैशाची जरूरी लागली तेव्हां **स्काटिश** राजाकडून दहा हजार मार्क घेऊन आपला **स्का**टलंडवरील धनीपणाचा हक्क त्यानें विकून टाकला होता हें मागें एका ठिकाणीं सांगितलेंच आहे. अलीकडे **एडवर्ड**ची बहीण **स्काट**लंडच्या राजाला दिलेली असल्यामुळें त्या दोन्ही राष्ट्रांत बरेच दिवस सख्य होतें.

९ अलेक्झांडर राजा—हा स्काटिश राजा **अलेक्झांडर** इ० स० १२८६ या वर्षीं मरण पावला. त्याला वारस फक्त एक मुलगी असून ती **नार्वेच्या** राजाला दिलेली होती. या मुलीची **मार्गारेट** (Margaret) नांवाची तीन वर्षांची एक मुलगी होती. तिला **स्काटलंड**चें राज्य द्यावें अशी **अलेक्झांडर**ची इच्छा असून **स्काटलंड**मधील जहागिरदारांनीं तिला आम्ही **स्काट**लंडची गादी देऊं असें **आले**-

कञ्झांडरशीं कबूलही केलें होतें. पण ही मुलगी **नार्वेहून** येत असतां वाटेंत मरण पावली. तेव्हां **स्कॉटलंड**च्या गादीविषयीं पुन्हां गोंधळ माजला.

१० बेलियल व ब्रूस--एकंदर तेरा असामी गादीवर आपला हक्क आहे असें सांगण्याला पुढें आले. त्यांपैकीं '**जॉन बेलियल**' (John Baliol) व **रॉबर्ट ब्रूस** (Robert Bruce) या दोघांचा सर्वांत जास्त व तोही जवळ जवळ सारखा हक्क आहे असें दिसून आलें. स्कॉटलंडच्या जहागिरदारांच्या सभेनें--किंवा **स्कॉटलंड**च्या **पार्लमेंटनें** म्हणा--**एडवर्ड**ला मध्यस्थ नेमून हा तंटा मिटवावा असें ठरविलें. **एडवर्ड** बरेंच मोठें सैन्य बरोबर घेऊन **स्कॉटलंड**मध्यें गेला आणि त्यानें **बनारहॅम**च्या किल्ल्यांत तेथल्या पार्लमेंटच्या सभासदांना व स्कॉटलंडच्या गादीवर वारसा सांगणाऱ्या सर्व हक्कदारांना पाचारण केलें. मंडळी जमली; पण अशा रीतीनें स्कॉटलंडमधील सर्व प्रमुख मंडळी आयतीच आपल्या तावडींत सांपडली आहे असें पाहून त्यानें पहिल्यानें असें बोलणें काढलें कीं, 'तुम्हीं नेमलेला मध्यस्थ म्हणून नव्हे, तर **स्कॉटलंड**चा '**अधिराज**' या नात्यानें स्कॉटलंडच्या गादीवर कोणाला बसवावें याचा निवाडा करण्याचा मला अधिकार आहे असें पहिल्यानें कबूल करा!' स्कॉटिश पुढारी त्याच्या तावडींत सांपडलेले; त्यांना त्याचें म्हणणें नाकबूल करण्याचें धाष्टर्य होईना. तेव्हां **एडवर्डनें** ही कबुली घेऊन '**जॉन बेलियल**' तर्फे निकाल दिला. व इ० स० १२९२ मध्यें **बेलियलनें** प्रजाधर्माप्रमाणें वागण्याची शपथ घेतल्यावर **एडवर्डनें** त्याला स्कॉटलंडच्या गादीवर बसविलें!

११ मांडलिकत्वाचीं दुःखें--पण परकी राजाच्या मांडलिकत्वाखालीं राहण्यांत किती अपमान व त्रास सोसावा लागतो हें **बेलियल**ला लौकरच समजून आलें. त्याच्या प्रजेपैकीं कोणीं त्याच्याविरुद्ध **एडवर्ड**कडे कागाळी केली कीं, '**इंग्लिश पार्लमेंट**कडे जाब देण्यासाठीं ताबडतोब निघून या' म्हणून **बेलियल**ला हुकूम व्हावयाचा; आणि **एडवर्ड**च्या मनांतून झालें तरी **बेलियल**च्या हातून एकदां कांहीं तरी राजद्रोहाचें कृत्य घडावें व आपल्याला **स्कॉटलंड**वर स्वारी करण्याला संधि मिळावी, असें फार असल्यामुळें **बेलियल**ला 'ब्रिटिश पार्लमेंट'समोर हजर होण्याचे हुकूमही वारंवार होऊं लागले! या परावलंबी स्थितीचा अखेर **बेलियल**ला कंटाळा येऊन त्यानें इंग्लंडच्या राजाचा अंमल झुगारून देण्याचें ठरविलें.

१२ फ्रान्सबरोबर लढाई—इ. स. १२९३ मध्यें एका क्षुल्लक कारणावरून इंग्लंडची फ्रान्सबरोबर लढाई जुंपली. किनाऱ्यावरच्या **नार्मन** व इंग्लिश खलाशांमध्यें कांहीं भांडण होऊन त्यांत एक नॉर्मन खलाशी प्राणास मुकला. तेव्हां त्याच्या ज्ञातभाईनीं इंग्लिश गलबतांवरील कांहीं खलाशांना पकडून त्यांना व त्यांच्याबरोबरच त्यांच्या कित्येक कुत्र्यांना गलबतांच्या डोलकाठ्यांवरच फांशीं दिलें ! या त्यांच्या उद्दाम वर्तनानें चिडून जाऊन इंग्लिश खलाशांनीं ८० गलबतांचें आरमार तयार करून फ्रेंच खलाशांना उघड्या समुद्रावर आरमारी लढाईला आव्हान केलें. फ्रेंचांकडून २०० गलबतें आलीं; पण या आरमारी लढाईंत फ्रेंचांचा पराभव होऊन दोनशें गलबतांपैकीं एकानेंहि पुन्हां फ्रान्सचा किनारा पाहिला नाहीं !

१३ समेट व पुन्हा तंटा—फ्रान्सचा राजा फिलिप याला अर्थातच या गोष्टीचा राग येऊन त्यानें इंग्रज लोकांच्या या वर्तनाबद्दल **एडवर्ड**ला जबाबदार धरून त्याला चौकशीसाठीं फ्रान्समध्यें बोलावलें. **एडवर्डनें** आपला भाऊ **एडमंड** याला हा तंटा मिटविण्यासाठीं **फ्रान्स**मध्यें पाठविलें. त्यानें कांहीं गैरसमजुतीनें इंग्लंडच्या राजाचा फ्रान्समधील '**गिनी**' प्रांत **फिलिप**च्या हवालीं केला. पुढें **एडवर्ड** हा प्रांत परत मागूं लागला तेव्हां फिलिपनें 'तुम्ही आमच्या बोलावण्याप्रमाणें हजर झालां नाहीं, सबब तो प्रांत आम्हीं जप्त केला आहे' असें सांगितलें. **एडवर्डनें** लढाईची तयारी केली. लढाईच्या खर्चासाठीं म्हणून त्यानें धर्माधिकारी व इतर रयत यांच्याकडून पुष्कळ पैसा काढला, व पार्लमेंटच्या संमतीशिवायच लोंकरीवर जबर जकात बसविली. त्या वेळीं इंग्लंडमध्यें लोंकरीचा व्यापार पुष्कळ चाले. त्यामुळें या जकातीपासून राजाला बराच पैसा मिळाला. पण या जकातीमुळें लोंकर महाग झाली, आणि प्रजेची फारच अडचण होऊं लागली. असो.

१४ स्काटलंडमधील कटकट—सर्व तयारी झाल्यावर प्रथम थोडेंसें सैन्य **गिनीं**त पाठविण्यांत आलें, व स्वतः **एडवर्डनें** निघण्याची तयारी केली. इतक्यांत **बेलियलनें** फ्रान्सच्या राजाबरोबर गुप्त तह करून **स्काटलंड**मध्यें बंड उभारलें आहे अशी बातमी येऊन पोंचली. तेव्हां **फ्रान्स**मध्यें जाण्याचा बेत रहित करून **एडवर्ड** उत्तरेकडे **स्काटलंड**वर चाल करून गेला. '**बेरिक**' (Berwick), '**डनबार**' (Dunbar) वगैरे शहरें काबीज करून व **बेलियल**ला पकडून एडवर्डनें त्याला दोन वर्षेंपर्यंत लंडनमधील कारागृहांत ठेवलें. दोन वर्षांनंतर त्याला हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली. तेव्हां तो **नार्मंडी** प्रांतांत निघून गेला. स्काटलंडमध्यें

तेथील राजाला राज्याभिषेक करतांना त्याला एका यशस्वी म्हणून मानल्या गेलेल्या दगडावर बसवीत असत. तो दगड एडवर्डनें इंग्लंडला आणिला, आणि तो इंग्लंडच्या सिंहासनांत बसवून टाकिला.

१५ **स्वातंत्र्यसनदेला मान्यता**—स्काटलंडची राज्यव्यवस्था आतां **'सरे'** (Surrey) नामक एका जहागीरदाराकडे सोंपवून एडवर्ड इंग्लंडला परत आला, आणि लागलाच फ्रान्सच्या स्वारीवर निघाला. या वेळीं कांहीं इंग्लिश सरदारांनीं त्याच्याबरोबर फ्रान्समध्यें जाण्याचें नाकारलें. कारण त्यांचें असें म्हणणें होतें कीं, या स्वारीसाठीं राजानें इंग्लिश लोकांकडून पैसा वसूल केला तो पार्लमेंटच्या संमतीशिवाय केला असल्यामुळें हें त्याचें करणें गैरकायदेशीर आहे. तेव्हां जुन्या स्वातंत्र्यसनदेला राजानें पुन्हां एकदां मान्यता दिली, व पार्लमेंटच्या संमतीशिवाय लोकांवर नवीन कर बसवूं नये असें आणखी एक कलम या सनदेंत स्पष्टपणें घालण्यांत आलें. असो.

१६ **फ्रान्समधील हकीगत**—**एडवर्ड** मोठी तयारी करून फ्रान्समध्यें गेला खरा, परंतु या स्वारींत त्याला यश येण्याचें चिन्ह दिसेना. इतक्यांत इकडे **स्काट** लोकांनीं पुन्हां बंड उभारल्याची बातमी आली. तेव्हां **पोप**च्या मध्यस्थीनें फ्रान्सबरोबर तह करण्यांत आला. व हा स्नेहसंबंध दृढ करण्यासाठीं **एडवर्डनें** फ्रान्सचा राजा **फिलिप** याची बहीण **मार्गारेट** इजबरोबर लग्न केलें, आणि **फिलिप**च्या मुलीचें आपल्या मुलाशीं लग्न ठरवून टाकलें. फ्रान्समधील **गिनी** प्रांतही पुढें इ० स० १३०३ मध्यें इंग्लंडच्या राजाला परत मिळाला.

१७ **स्काटिश लोकांचे स्वातंत्र्यार्थ प्रयत्न**—मागें सांगितल्याप्रमाणें स्काटलंडचा राजा जरी हद्दपार झाला होता, तरी स्कॉट लोक निमूटपणें इंग्रजांच्या अंमलाला मान वांकविणारे नव्हते. इ० स० १२९७ ते १३०४ पर्यंत स्काटिश लोकांनीं स्वातंत्र्यसंपादनार्थ दीर्घ प्रयत्न केले. '**वुइल्यम वॉलेस**' (William Wallace) नांवाचा एक पुढारी त्यांच्यांत उत्पन्न होऊन त्यानें **एडवर्डनें** नेमलेल्या सरदार '**सरे**'चा पराभव केला. व त्याला परत इंग्लंडमध्यें पिटाळून लावलें. **फ्रान्स**मध्यें **एडवर्ड**ला ही बातमी समजली तेव्हां तो तिकडे मिटतें घेऊन तावडतोब **स्काट**लंडमध्यें आला व इ० स० १२९८ या वर्षीं **फालकर्क**च्या (Falkirk) लढाईंत त्यानें स्काट लोकांची दाणादाण करून टाकली, व त्यांचे तीस हजार लोक कापून काढले. **वॉलेस** रानांत पळून गेला. निसर्गनिर्मित पर्वतांच्या आश्रयानें त्यानें कित्येक दिवसपर्यंत इंग्रजांबरोबर गनिमी काव्याची लढाई चालू ठेविली होती. परंतु

अखेर फितुरीनें तो **एडवर्ड**च्या हातीं लागला. तेव्हां एडवर्डनें त्याला बेड्या घालून लंडनला पाठवून दिलें आणि इ० स० १३०५ मध्यें राजद्रोहाच्या आरोपावरून त्याला फांशी देण्यांत आलें.

१८ रॉबर्ट ब्रूस—वॉलेसच्या अंताबरोबर स्काटलंडचें हें युद्ध मिटेल असें वाटलें होतें. पण तसें झालें नाहीं. इ० स० १३०६ मध्यें पूर्वी **बालियल**चा प्रतिस्पर्धी **ब्रूस** या नांवाचा जो सरदार होता त्याचा नातू **रॉबर्ट ब्रूस** हा पराक्रमी निघाला. स्काटिश लोकांनीं त्याला राज्याभिषेक करून इंग्लिशांचा अंमल झुगारून दिला. **एड-वर्ड**ला ही बातमी समजतांच त्वेषानें त्याच्या अंगाची लाही झाली ! व सर्व **स्काटलंड** देशाला पुरें प्रायश्चित्त देण्याचा त्यानें संकल्प केला. सैन्याची जमवाजमव करून मजल दर मजल करीत तो उत्तरेकडे निघाला; पण ईश्वरी संकल्प निराळा होता. वाटेंत '**कार्लाईल**' (Carlisle) येथें त्याला आजार होऊन थोड्याच दिवसांत त्याचा अंत झाला. आपण मेलों तरी आपला देह **स्काटलंड**मध्यें घेऊन चला व स्काटलंड देश पूर्ण पादाक्रांत केल्याशिवाय राहूं नका अशी त्यानें आपली शेवटची इच्छा प्रदर्शित केली होती. पण त्याची ती इच्छा पूर्ण झाली नाहीं. त्याचें शव **लंडन**मध्यें आणून **वेस्ट मिन्स्टरच्या** देवळांत पुरण्यांत आलें.

१९ एडवर्डचा स्वभाव—एडवर्ड हा दिसण्यांत भव्य व उंच पुरुष होता. त्याचे पाय लांब असल्यामुळें त्याला '**लांबटांग्या**' म्हणत. तो मनाचा मोकळा होता. दूरदर्शीपणा, उत्साह, उद्योगप्रियता, आणि कर्तव्यदक्षता या गुणांमुळें तो चांगला मुत्सद्दी व विजयी योद्धा झाला होता.

२० ज्यू लोकांचे हाल—त्याच्या कारकीर्दीत इंग्लंडमधल्या ज्यू लोकांना फार हाल भोगावे लागले. इ० स० १२९० मध्यें त्यांना हद्दपार करण्यांत आलें. **न्यू कॅसल** (New Castle) व **लंडन** यांच्या दरम्यान प्रथम दगडी कोळशांचा व्यापार सुरू झाला तो एडवर्डच्याच कारकिर्दीत. पण पुढें लौकरच धुराचा त्रास होतो म्हणून हा व्यापार बंद करण्यांत आला. एका इंग्लिश धर्माधिकाऱ्यानें भिंतीला लावण्याच्या घड्याळांची (Clocks) कृति शोधून काढली. पण त्या वेळीं सगळ्या इंग्लंडमध्यें असलीं फक्त दोन घड्याळें होतीं.

२१ देवस्थानच्या जमिनीः—एडवर्डच्या कारकिर्दीत जे नवीन कायदे झाले त्यांत दोन कायदे फार महत्त्वाचे होते. त्या वेळीं देवस्थानांकडे ज्या जमिनी असत त्यांवर सरकारी कर माफ असे. त्यामुळें पुष्कळ लोक आपल्या जमिनी देवस्थानच्या नांवावर करून टाकीत. अशा रीतीनें देवस्थानें फार श्रीमंत होऊन सरकारी तिजोरी

खालावत चालली. म्हणून एडवर्डनें एक कायदा करून कोणींहि आपली स्थावर मिळकत राजाच्या परवानगीशिवाय देवस्थानच्या हवालीं करूं नये असें ठरविलें (Statute of Mortmain). तसेंच इ० स० १२८५ मध्यें आणखी एक कायदा करून कोणाही जमिनदाराला आपली जमीन मर्यादेबाहेर विभागून देण्याचा हक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. या कायद्यानें मोठमोठ्या जमिनी पिढ्यान् पिढ्या एका कुटुंबांत राहूं लागल्या. असो. एडवर्डच्या मागें त्याचे तीन मुलगे व पांच मुली होत्या.

प्रकरण १९ वें

दैवलीला !

(इ० स० १३०६-इ० स० १३३०)

[१ कारनार्व्हनचा एडवर्ड—२ गॅव्हेस्टन व त्याच्या लीला—३ गॅव्हेस्टनची हद्दपारी—अठ्ठावीस असामींची कमिटी—गॅव्हेस्टनचा शिरच्छेद—४ ब्रूसची प्रगति—५ बॅनॉकबर्नचा लढाई—६ स्कॉटलंड स्वतंत्र झालें—७ आयर्लंडांतील गडबड–अयशस्वी प्रयत्न—८ नवा स्नेही–त्याची हद्दपारी आणि पुनरागमन—९ लँकॅस्टरचा सरदार–बंड व मोड–अनपेक्षित संकट—१० फ्रान्समधील गिनी प्रांत—इसाबेला राणी—११ रोजर मॉर्टिमर—नवराबायकोंचा झगडा–नवरा पळाला—१२ स्पेन्सरचा शेवट–राजाची कैद–१३ पार्लमेंटची बैठक–एडवर्डची नालायकी व त्याचा राज्यत्याग—१४ नवऱ्याचा खून—१५ तिसरा एडवर्ड–कार्यकारी मंडळ—१६ स्कॉट लोकांचे हल्ले–अपमानास्पद तह—१७ मॉर्टिमरचा अधिकारमद—१८ त्याचें एडवर्डशीं भांडण व अंत.]

१ **कारनार्व्हनचा एडवर्ड—एडवर्ड** मरण पावला तेव्हां त्याचा मुलगा ‘ कारनार्व्हन ’ चा **एडवर्ड** * (Edward of Caernarvon) हा २३ वर्षांचा

* माजी राजा पहिला एडवर्ड यानें वेल्स प्रांतांत लीवेलिनचा पराभव केल्यावर इंग्लंड व वेल्स यांच्या सरहद्दीवर त्यानें किल्ल्यांची एक रांग बांधली. कारनार्व्हन हा या किल्ल्यांपैकीं एक किल्ला असून याच किल्ल्यांत एडवर्डची बायको प्रसूत होऊन झालेल्या मुलाला एडवर्डनें प्रथम ‘ प्रिन्स ऑफ वेल्स ’ ही पदवी दिली होती. हल्लींचे इंग्लंडचे राजे पांचवे जॉर्ज यांनीं सन १९११ मध्यें आपल्या मुलाला या कारनार्व्हन किल्ल्यांतच मोठा समारंभ करून ही पदवी दिली आहे.

होता. बापाची शेवटची इच्छा एकीकडे ठेवून त्यानें **स्काटलंड**शीं सुरू असलेलें युद्ध बंद केलें व तो ताबडतोब मजा मारण्यासाठीं दक्षिणेकडे निघून आला.

२ **गॅव्हेस्टन—पीअर्स गॅव्हेस्टन** (Piers Gaveston) या नांवाचा त्याचा एक बालपणचा स्नेही होता. तो फार दुर्व्यसनी व हलकट असल्यामुळें त्याच्या संगतीनें आपला मुलगा बिघडूं नये म्हणून माजी **एडवर्ड** राजानें त्याला हद्दपार केला होता; पण आतां चिरंजिवाला गादी मिळाल्याबरोबर त्यानें ताबडतोब **गॅव्हेस्टन**ला बोलावून आणलें, आणि त्याला मोठी जहागीर देऊन त्याचें आपल्या पुतणीशीं लग्न लावून दिलें ! नंतर कांहीं दिवसांनीं त्याला इंग्लंडचा कारभारी नेमून व सर्व राज्यव्यवस्था त्याच्यावर सोंपवून एडवर्डची स्वारी फ्रान्सच्या राजकन्येशीं लग्न लावण्यासाठीं फ्रान्समध्यें निघून गेली.

३ **गॅव्हेस्टनची हद्दपारी**—राजानें **गॅव्हेस्टन**वर मानमरातबांचा वर्षाव केल्यामुळें इंग्लिश लोक आधींच रागावले होते. आतां तर त्याला मुख्य कारभारी (Governor of the realm) नेमल्यामुळें इंग्रजांना फारच चीड आली. इंग्लिश सरदारांना कांहींतरी चेष्टेचीं नांवें ठेवून **गॅव्हेस्टन** त्यांची थट्टा करूं लागला; तेव्हां **पार्लमेंट**नें त्याला हद्दपार करा म्हणून राजाच्या मागें तगादा लाविला. राजानें त्याला घालवून देतों असें बाह्यात्कारीं दाखवून त्याला **आयर्लंड**ची सुभेदारी देऊन तिकडे पाठवून दिलें. कांहीं दिवसांनीं **गॅव्हेस्टन** पुन्हां इंग्लंडमध्यें आला, पण त्याच्या वर्तनांत कांहींएक फरक न पडतां तो दिवसेंदिवस अधिकच उद्दामपणा करूं लागला. तेव्हां **पार्लमेंट**ची बैठक भरून राजाच्या वर्तनावर देखरेख ठेवण्यासाठीं अठ्ठावीस सरदारांची एक 'कमिटी' नेमण्यांत आली. या 'कमिटी'नें (Lords Ordainers) ताबडतोब **गॅव्हेस्टन**ला इंग्लंड सोडून जाण्याचा हुकूम केला व त्याला अशी ताकीद दिली कीं, जर तुम्ही परत इंग्लंडमध्यें याल तर तुम्हांला राज्याचे शत्रु समजून योग्य ती तजवीज करण्यांत येईल ! पण पुढें थोड्या महिन्यांनींच राजानें निमंत्रण केल्यावरून तो इंग्लंडमध्यें परत आला. तेव्हां इंग्लिश सरदारांनीं 'लँकेस्टर'च्या जहागिरदाराला (Earl of Lancaster) पुढारी करून हातांत शस्त्र धारण केलें, आणि **गॅव्हेस्टन**ला पकडून इ० स० १३१२ या वर्षीं 'ब्लॅकलो' (Blacklow)च्या डोंगरावर त्याचा शिरच्छेद करण्यांत आला ! **एडवर्ड**ला फार राग आला पण सरदार मंडळाच्या नांवानें बोटें मोडण्यापलीकडे त्याला कांहीं एक करतां आलें नाहीं !

४ **ब्रूसची प्रगति**—थोरला **एडवर्ड** मरण पावला त्या वेळीं **स्कॉटलंडमध्यें** **ब्रूस**ला राज्याभिषेक होऊन बहुतेक स्काटलंड इंग्रजांच्या अंमलांतून मुक्त झालें होतें हें मागें सांगितलेंच आहे. दुसरा **एडवर्ड** राजा इंग्लंडमध्यें आपल्या हलकट संवगड्यांच्या तर्फेनें सरदार लोकांशीं भांडण्यांत आपला वेळ घालवीत होता, त्या मुदतींत **ब्रूस**नें उत्तरेकडे आपला अंमल बसविण्यास सुरवात केली होती. '**स्टर-लिंग**' (Sterling) नांवाचा एकच किल्ला आतां इंग्रजांच्या ताब्यांत राहिला होता. त्याला **ब्रूस**नें वेढा घातला; तेव्हां त्याच्या संरक्षणासाठीं एक लाख फौज बरोबर घेऊन **एडवर्ड** उत्तरेकडे निघाला.

५ **बॅनॉकबर्नची लढाई**—**ब्रूस**नें बॅनॉकबर्न (Bannockburn) येथें मजबूत ठाणेबंदी करून छावणीसभोंवतीं खोल खंदक खणून त्यावर काटक्या व पालापाचोरा पसरून ठेविला होता. लढाईच्या पूर्वीं मध्यभागीं 'क्रूस' (The cross) चिन्हांकित निशाण रोवून **स्कॉट** सैन्य गुडघे टेकून प्रार्थना करूं लागलें. तें पाहून **एडवर्ड** आपल्या सरदारांना म्हणाला, 'ते पहा गुडघे टेकून आमच्यावर दया करा म्हणवून विनवीत आहेत.' तेव्हां स्कॉट लोकांची चांगली माहिती असलेला जवळचा एक सरदार म्हणाला, "होय महाराज ! पण ते दया करण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करीत आहेत. आमची नव्हे ! महाराज ! हे लोक आज एक लढाई जिंकतील तरी; नाहींतर धारातीर्थीं आपले प्राण ठेवून मुक्त तरी होतील !" राजा म्हणाला, 'ठीक आहे !' आणि एकदम सैन्याला कूच करण्याविषयीं हुकूम सुटला !

६ **स्कॉटलंड स्वतंत्र झालें**:—इंग्लिश सैन्य मोठ्या आवेशानें पुढें सरसावलें. पण त्यांतलें वरेंचसें अचानक खंदकांत पडून मेलें ! तिकडून **स्कॉट** लोकांनीं ही संधि पाहून हल्ला चढविला इतक्यांत शेजारच्या डोंगरावर **स्कॉटलंडां**तील कांहीं डोंगरी लोक एकत्र झालेले दिसले; तेव्हां आणखीं सैन्य **स्कॉट** लोकांच्या मदतीला येत आहेसें वाटून **इंग्लिश** सैन्य गडबडलें व त्यानें पळ काढला ! या मोहिमेंत **इंग्रजांचे** तीस हजार लोक प्राणांस मुकले, व **ब्रूस**ला जय मिळाल्यामुळें स्कॉटलंड स्वतंत्र झालें.

७ **आयर्लंडांतील गडबड**:—**स्कॉटलंड**ला जय मिळाल्याचें ऐकून **आय-रिश** लोकांनाहि स्वतंत्र होण्याची इच्छा उत्पन्न झाली. **ब्रूस**चा भाऊ **एडवर्ड** म्हणून होता ता तिकडे जाऊन त्यानें आयरिश लोकांना चिथावलें. इ. स. १३१५ या वर्षी त्यानें 'अलस्टर' प्रांतांत आपल्याला राज्याभिषेक करून घेतला, आणि पुढें दोन वर्षेंपर्यंत इंग्लिशांना चांगलाच हात दाखविला ! पण इ० स० १३१८ या

वर्षीं ' फागर ' (Fagher) च्या लढाईंत तो मारला गेल्यामुळें ' अल्स्टर ' प्रांत पुन्हां इंग्रजांच्या अंकित झाला.

८ नवा स्नेही—गॅव्हेस्टनचा शिरच्छेद करून पार्लमेंटनें राजावर आपली छाप बसविली हें वर सांगितलेंच आहे. पण आतां राजाला दुसरा एक स्नेही मिळाला. त्याचें नांव ' स्पेन्सर ' (Spenser) असें असून तो जातीचा इंग्रजच होता. पण स्वभावानें ' **गॅव्हेस्टन** 'चा सख्खा भाऊ शोभण्यासारखा होता. त्यामुळें लौकरच तो सरदार मंडळाच्या डोळ्यांत खुपूं लागला. शेवटीं **पार्लमेंटनें** त्याच्यावर राजसत्ता बळकावण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप ठेवून त्याला हद्दपारीची शिक्षा सांगितली.

९ लँकेस्टरचा सरदार—या वेळीं **लँकेस्टर**चा जहागिरदार पार्लमेंटचा पुढारी होता. त्याच्या पक्षाची दिवसेंदिवस सरशी होत आहेसें पाहून राजाला चैन पडेना. त्यानें सैन्य जमा करून तीन महिन्यांनीं आपला मित्र जो **स्पेन्सर** त्याला पुन्हां इंग्लंडमध्यें आणलें. आणि ' बरोब्रिज ' (Borough Bridge) येथें विरुद्ध पक्षाच्या एकत्र झालेल्या सैन्याचा पराभव करून **लँकेस्टर**ला पकडून इ० स० १३२२ या वर्षीं **पाँटिफ्राक्ट**च्या (Pontefract) किल्ल्यांत त्याचा शिरच्छेद करविला. अशा रीतीनें विरुद्ध पक्षाचा पाडाव करून राजानें सर्व सत्ता आपल्या हातांत घेतली, व **स्पेन्सरचें** वजन पूर्वीपेक्षां फारच वाढल्यामुळें लँके-स्टरच्या पक्षाच्या मंडळीनें देशत्याग करून **फ्रान्स**च्या दरबारचा आश्रय केला. पण **एडवर्डचें** दैव त्याला फार दिवस सुखांत राहूं देण्याइतकें अनुकूल नव्हतें. अनपेक्षित बाजूनें त्याच्यावर एक नवीनच संकट उत्पन्न झालें, व त्यांत त्याची दुर्दशा व विटंबना झाली !

१० गिनीप्रांत—फ्रान्समधील **गिनी** (Guinne) हा प्रांत इंग्रज राजाच्या मालकीचा असून तेवढ्या प्रांतापुरता इंग्रज राजा हा फ्रान्सच्या राजाचा मांडलिक असे. **एडवर्ड**ची बायको ' **इसाबेला** ' (Isabella) ही **फ्रान्स**ची राजकन्या असून या वेळीं तिचा भाऊ **चार्लस** हा फ्रान्सवर राज्य करीत होता. **गिनी** प्रांताच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं भानगड उपस्थित झाल्यामुळें **एडवर्डनें** आपल्या बायकोला तिच्या भावाबरोबर शिष्टाई करण्यासाठीं पाठवून दिलें. तिनें तडजोड करून **गिनी**ची जहागिरी आपल्या वडील मुलाला देऊन त्याला फ्रान्सच्या दरबारांत जहागिरीचीं वस्त्रें घेण्यासाठीं पाठवून द्यावा असें ठरविलें, व त्याप्रमाणें व्यवस्था झाली.

११ रोजर मॉर्टिमर—पण येवढ्यानेंच झालें नाहीं. **इसाबेला** जेव्हां **फ्रान्स**च्या दरबारांत गेली, तेव्हां त्या ठिकाणीं **एडवर्ड**च्या जुलुमानें त्रासून पळून आलेली लँकॅस्टरच्या पक्षांतील बरीच मंडळी तिला आढळली. या मंडळींत '**रोजर मॉर्टिमर**' (Roger Mortimer) या नांवाचा एक सुस्वरूप तरुण सरदार होता. त्याच्यावर या राणीचें प्रेम बसलें. इंग्लंडमध्यें असतांना **स्पेन्सर**च्या वर्तनाचा राणीलाही वीटच आला होता. तेव्हां **स्पेन्सर**चा व त्याच्या बरोबरच आपल्या नवऱ्याचाही नाश करण्याच्या कटांत ती सामील झाली. पुढें दोन हजार सैनिकांचें लहानसें सैन्य जमा करून ती इंग्लंडमध्यें आली आणि **स्पेन्सर**च्या जुलुमानें गांजलेले पुष्कळ सरदार ताबडतोब तिला येऊन मिळाले. आपले लोक आपल्याला सोडून गेले असें पाहून **एडवर्ड** राजा **वेल्स**मध्यें पळून गेला !

१२ स्पेन्सरचा शेवट.—'**मॉर्टिमर**'नें **स्पेन्सर**ला पकडून व चौकशीचा फार्स करवून त्याला पन्नास फूट उंचीच्या सुळावर चढविलें; जिकडून तिकडून लोक येऊन मॉर्टिमरला मिळाले; राजाच्या बाजूला कोणीच येईना; तेव्हां त्यानें **वेल्श** लोक तरी आपल्या बाजूला येतात कीं काय म्हणून प्रयत्न करून पाहिला. पण तोही प्रयत्न फुकट गेला. नंतर तो **आयर्लंड**ला जाण्यासाठीं गलबतांतून निघाला. पण येथेंही दुर्दैव आडवें येऊन वारा प्रतिकूल वाहूं लागल्यामुळें त्याचें गलबत **वेल्स**च्या किनाऱ्याला परत आलें ! तेथें लौकरच त्याच्या शत्रूंनीं त्याला हुडकून काढलें, आणि कैद करून '**केनिलवर्थ**' (Kenilworth Castle)च्या किल्ल्यांत त्याची रवानगी केली.

१३ पार्लमेंटची बैठक—इकडे राणीनें आपल्या नवऱ्याच्या नांवानें **पार्लमेंट**ची सभा बोलावली. या सभेनें **एडवर्ड** हा राज्य करण्याला ' नालायक ' असल्यामुळें त्याला गादीवरून काढून टाकावा असा ठराव केला. **पार्लमेंट**च्या सभासदांचें एक 'डेप्युटेशन' (Deputation) **केनिलवर्थ**च्या किल्ल्यांत राजाकडे गेलें व त्याच्याकडून ' मी आपला गादीवरचा हक्क सोडून दिला आहे, माझ्या मुलाला तुम्हीं गादीवर बसवावें ' अशी लेखी कबुली घेऊन परत आलें !

१४ नवऱ्याचा खून—या दुर्दैवी राजाला यानंतर एका किल्ल्यांतून दुसऱ्या किल्ल्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत, अशा रीतीनें निरनिराळ्या ठिकाणीं ठेवण्यांत येऊन त्याचा वारंवार फार अपमान करण्यांत येत असे. पण कितीही हाल केले व दुःख दिलें तरी त्याचा प्राण कांहीं जात नाहीं असें पाहून **इसाबेला** कंटाळली, व अखेर

तिनें मॉर्टिमरच्या सहाय्यानें राजाचा खून करण्याचा बेत केला ! 'बर्कले'-(Berkley) च्या किल्ल्यांत असतांना एके दिवशीं रात्रीं त्याच्या खोलींतून भयंकर आरोळ्या ऐकूं आल्या. सकाळीं उठून पहातात तों राजा मेलेला ! ही गोष्ट इ० स० १३२७ च्या सप्तेंबर महिन्याच्या २१ व्या तारखेस घडून आली.

१५ तिसरा एडवर्ड—या वेळीं **एडवर्ड**चा मुलगा १४ वर्षांचा असून बापाला पदच्युत केल्यावर पार्लमेंटनें त्याला राज्याभिषेक करविला होता. आतां '**तिसरा एडवर्ड**' म्हणून त्याची कारकीर्द सुरू झाली. पण राजा अल्पवयी असल्यामुळें प्रत्यक्ष राज्यकारभार सरदार मंडळींतून निवडलेल्या कारभारी मंडळामार्फत (A Council of Regency) सुरू झाला. तरी खरी सत्ता **मॉर्टिमर** व **इसाबेला** यांच्याच हातीं होती.

१६ स्कॉट लोकांचे हल्ले—**इंग्लंड**मध्यें ही गडबड चाललेली ऐकून **स्कॉट** लोकांनीं **इंग्लंड**च्या उत्तर भागावर हल्ले करण्याला सुरवात केली. **इंग्लिश** सैन्य त्यांना तोंड देण्यास पुढें गेलें, पण अपेश पदरीं घेऊन माघारें आलें. पुढें **इंग्लंड**च्या राजानें **स्काट**लंडवरील आपला सर्व हक्क सोडून द्यावा व सर्व स्कॉट कैदी मुक्त करावे अशा **इंग्लंड**ला अपमानकारक अटींवर तह होऊन अखेर **स्कॉट** लोक आपल्या राज्यांत निघून गेले.

१७ मॉर्टिमरचा अधिकारमद—हा तह **मॉर्टिमर**नें घडवून आणला होता. त्यामुळें **इंग्लिश** सरदारांच्या मनांत त्याच्याविषयीं असंतोष उत्पन्न झाला. तोहि अधिकारमदानें धुंद होऊन उन्मत्तपणें वागूं लागला. इ० स० १३३० मध्यें बालराजाच्या चुलत्याला (Earl of Kent) तो **मॉर्टिमर**चा पाडाव करण्याच्या कटांत सामील आहे अशा आरोपावरून फांशीं देण्यांत आलें. कारभारी मंडळापैकींहि कित्येक या कटांत सामील होते अशा संशयावरून कित्येकांना फांसावर चढविण्यांत आलें, अगर कारागृहांत टाकण्यांत आलें. अशा रीतीनें **मॉर्टिमर**ची सत्ता फारच वाढून तो एखाद्या राजासारखा वागूं लागला.

१८ एडवर्डशीं भांडण—पुढें बालराजा एडवर्ड मोठा होतां होतां त्याच्यामध्यें व **मार्टिमर**मध्यें वितुष्ट येऊं लागलें. शेवटीं राजा वयांत आल्यावर राज्यांतील **मार्टिमर**चें बेताबाहेर वाढलेलें वजन कायमचें नाहींसें करून टाकावयाचें असा त्यानें निश्चय केला, व हा आपला बेत त्यानें कित्येक सरदारांना कळविला. **मार्टिमर** या वेळीं 'नाटिंगहॅम' (Nottingham Castle)

किल्ल्यांत रहात असे. या किल्ल्याच्या दरवाजावर नेहमीं खडा पहारा असे. तेव्हां किल्ल्यांत प्रवेश करावयाचा तर उघडपणें करतां येण्यासारखा नव्हता. म्हणून किल्ल्याच्या खालून भुयार खणून वाट करण्यांत आली, आणि इ० स० १३३० या वर्षी एक दिवस निवडक सरदार बरोबर घेऊन राजा या गुप्त मार्गानें किल्ल्यांत शिरला, आणि मॉर्टिमरला पकडून व राजसत्ता बळकावण्याचा प्रयत्न करण्याचा त्याच्यावर आरोप ठेवून त्याला ताबडतोब 'टायबर्न' (Tyburn) येथें फांशीं देण्यांत आलें!

प्रकरण २० वें

राज्यतृष्णा!

(इ. स. १३३०-इ. स. १३७७)

[१।२ स्कॉटलंडमधील कारस्थान—एडवर्ड बेलियल-३ डेव्हिड ब्रूसला पुनः गादी मिळाली.-४ फ्रान्समधील परिस्थिति-गादीविषयीं तंटा-फ्रान्सचा कायदा-५ फिलिपची स्कॉटलंडला मदत-एडवर्डचा हक्क-शतवार्षिक युद्धाचें कारण-या युद्धापासून इंग्लंडचें हिताहित-६ इ स. १३३९-क्रेसीची लढाई-कालपुरुषाचा पराक्रम-७ कॅलेचा वेढा व स्कॉटलंडची चढाई-८ कॅले हस्तगत झालें.-९ मुदतीचा तह-१० काळरोग-११।१२ फ्रान्सबरोबर पुन्हां युद्ध-पायटर्सची लढाई व तह-१३ पुन्हां युद्ध व पुन्हां तह -फ्रान्सच्या राजाची कैद व मृत्यु.-१४।१५ फ्रान्सशीं पुन्हा कटकट-कालपुरुषाचा व एडवर्ड राजाचा मृत्यु-१६ एडवर्डचे गुणावगुण-पार्लमेंटचें महत्त्व वाढलें-१७ पोपची सत्ता कमी झाली-१८ राजद्रोहाची व्याप्ति-१९ पार्लमेंटच्या दोन शाखा-चौकशी-लोंकरीच्या व्यापाराची वाढ-२० एडवर्डचीं मुलें-२१ रिचर्डचा राज्याभिषेक]

१ स्कॉटलंडमधील कारस्थान.—स्कॉटलंडमधील पराक्रमी राजा **ब्रूस** हा या वेळीं मरण पावून त्याचा सात वर्षांचा मुलगा **डेव्हिड** (David) हा गादीवर आला होता. ब्रूसच्या मरणापूर्वी इंग्लंडचा **स्काट** लोकांशीं जो तह झाला होता त्यांत एक कलम असें होतें कीं, **स्का**टलंडमध्यें जे इंग्लिश सरदार असतील त्यांच्या जमिनी त्यांना परत मिळाव्या. पण **स्का**टिश 'पार्लमेंट'नें हें वचन पाळलें नव्हतें. त्यामुळें तिकडील इंग्लिश सरदार फार नाखुष झाले होते. त्यांनीं **बलि-**

यल (Baliol) च्या घराण्यांतील **एडवर्ड** नामक पुरुषाला चिथावून **स्कॉटलंडची** गादी मिळविण्याबद्दल प्रयत्न करण्यास लाविलें. तीन हजार लोकांचें सैन्य उभारून **एडवर्डनें** एका महिन्याच्या आंत गादी तर मिळविली, पण आपलें काम झाल्याबरोबर त्यानें इंग्रज सरदारांनाही घालवून दिलें ! त्यामुळें दुसऱ्या महिन्यांत ब्रूसतर्फेच्या पक्षाकडून त्याचा पुन्हां पराभव होऊन त्याला इंग्लंडमध्यें पळून यावें लागलें !

२ इंग्लंडला आल्यावर **बेलियलनें** इंग्लंडच्या राजाकडे संधान बांधून ' तुमचा मांडलिक म्हणून मी स्कॉटलंडमध्यें राज्य करतों ' असें सांगून तिसऱ्या **एडवर्डची** मदत मिळविली. आणि इ० स० १३३३ या वर्षी **हालिडन**-(Halidon Hill) च्या डोंगरावर **स्कॉट** लोकांचा पराभव होऊन बेलियलला पुन्हां स्काटलंडची गादी मिळाली, व स्काटलंडच्या आग्नेयीकडील कित्येक जिल्हे इंग्लंडला जोडण्यांत आले.

३ डेव्हिड ब्रूसला पुनः गादी मिळाली.—हा मुलूख इंग्लंडला देऊन टाकल्यामुळें **स्कॉट** लोकांचा बेलियलबद्दलचा द्वेष अधिकच तीव्र झाला व इ० स० १३४१ या वर्षी त्याला गादीवरून काढून टाकून **स्कॉटिश** ' पार्लमेंट'नें **डेव्हिडला** पुन्हां गादीवर बसविलें. यावेळीं **एडवर्डचें** लक्ष **फ्रान्समधील** कारस्थानांत गुंतलें असल्यामुळें **स्कॉटिश** लोकांकडे लक्ष देण्यास त्याला वेळ नव्हता.

४ फ्रान्समधील परिस्थिति.—इ० स० १३२८ मध्यें **फ्रान्सचा** राजा ' **चार्लस** 'हा निपुत्रिक मरण पावला. त्याची बहीण ती **एडवर्डची** आई. तेव्हां **फ्रान्सची** गादी मयत राजाच्या भाच्याला म्हणजे आपल्याला मिळावी असा **एडवर्ड** हक्क सांगूं लागला. पण फ्रान्सच्या कायद्याप्रमाणें (Salic Law) स्त्रियांचा गादीवर हक्क नव्हता. त्यामुळें **फ्रान्समधील** सरदार लोक **एडवर्डचें** म्हणणें कबूल करीनात. **एडवर्डचें** म्हणणें ' जरी आपल्या आईला गादीवर बसण्याचा हक्क नसला तरी तो हक्क तिला आपल्या मुलाला देतां येतो; म्हणून मी गादीचा कायदेशीर वारस आहें,' ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ होता असें मानलें तरीहि **एडवर्डच्या** आईच्या वडील भावाच्या मुलीचा एक मुलगा होता त्याचा हक्क **एडवर्डपेक्षां** खात्रीनें जास्त होता. पण **फ्रान्समधील** सरदार मंडळानें त्या प्रांतांत चालू असलेल्या कायद्याला अनुसरून मृत राजाचा चुलत भाऊ फिलिप (Philip) म्हणून

होता त्याला **फ्रान्स**ची गादी दिली. व **एडवर्डनें**ही शेवटीं फिलिपला ‘ राजा ’ म्हणून कबूल करून **फ्रान्स**मधील गिनी (Guinne) प्रांतापुरतें त्याचें मांडलिकत्व कबूल केलें.

५ फिलिपची स्कॉटलंडला मदत—परंतु पुढें इ० स० १३३७ या वर्षी **फिलिपनें स्कॉट**लंडचा राजा **डेव्हिड** याला मदत केल्यामुळें **एडवर्डनें** फ्रान्सच्या गादीवरील आपल्या हक्काचा प्रश्न फिरून उपस्थित केला, व **युरोप**मधील इतर राष्ट्रांबरोबर स्नेहसंधि करून व ‘ फ्रान्सचा राजा ’ असा किताब धारण करून **फिलिप**बरोबर युद्ध करण्याची तयारी केली. **फ्रान्स**च्या गादीच्या हक्काबद्दलचें हें भांडण अशा रीतीनें उपस्थित होऊन पुढें १०० वर्षेपर्यंत **फ्रान्स**बरोबर **इंग्लंड**चें युद्ध चाललें होतें. या ‘ शतवार्षिक युद्धांत ’ (Hundred Years' War) दोन्ही राष्ट्रांतील लोकांना अनेक प्रकारच्या विपत्ति भोगाव्या लागून अखेर निष्पन्न असें कांहींच झालें नाहीं. नाहीं म्हणावयास **इंग्लंड**चा एवढाच फायदा झाला कीं, **इंग्लंड**मध्यें ज्या लोकांना लढाईची हौस होती, त्यांना कायमचा असा एक शत्रु मिळाल्यामुळें संधि सांपडेल तेव्हां तिकडे पराक्रम गाजवितां येत असे; व या लढाईंत **नार्मन** व इंग्रज खांद्याला खांदा लावून लढत असल्यामुळें या दोन जातींतील उच्चनीच भाव कायमचा नष्ट होऊन **इंग्लंड**चें राष्ट्रीकरण दृढ होण्याला मदत झाली. शिवाय उपद्व्यापी लोक बाहेर लढाईंत गुंतल्यामुळें **इंग्लंड**मधील सामान्य प्रजेचे हाल जरा कमी होऊन त्यांना मधून मधून पूर्ण शांततेचा उपभोग घेण्यास मिळाला ! असो.

६ इ. स. १३३९—इ० स० १३३९ मध्यें या युद्धांतील पहिल्या लढाईचें शिंग फुंकण्यांत आलें. पण इ० स० १३४६ पर्यंत एडवर्डला मोठासा जय मिळाला नाहीं. त्या वर्षी मात्र ‘ क्रेसी ’ (Crecy) येथील लढाईंत **एडवर्ड**चा मुलगा-ज्याला **फ्रेंच** लोक त्याच्या चिलखताच्या रंगावरून ‘ काळ पुरुष ’ (Black Prince) असें म्हणत असत-**एडवर्ड** यानें मोठा पराक्रम गाजवून **फ्रेंच** लोकांचा पराभव केला. या लढाईंत फ्रेंचांचे ११ राजघराण्यांतील पुरुष, १२०० सरदार, व तीस हजार शिपाई प्राणास मुकले! इंग्लंडचा हा युवराज या वेळीं केवळ १६ वर्षांचा होता. लढाई आटोपून तो परत आपल्या तळावर आला तेव्हां बापानें त्याला मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें! त्याच्या डोळ्यांतून खरोखरच अश्रुधारांचा प्रवाह वाहूं लागला; तो म्हणाला, ‘ शाबास मुला! असेंच शौर्य गाजव! खरोखर राजमुकुट धारण करण्यास तूं अगदीं योग्य आहेस ! ’

७ कॅलेचा वेढा—क्रेसीची लढाई आटोपल्यावर **एडवर्डनें 'कॅले'**-(Calais) ला समुद्रांतून व जमिनीवरून असा दोन्ही बाजूंनीं वेढा दिला. दरम्यान इकडे **स्काटलंडचा** राजा **डेव्हिड** यानें फ्रान्सचा दोस्त म्हणून **इंग्लंडवर** स्वारी केली. परंतु 'फिलिपा' (Philippa) राणीनें स्वतः त्याच्यावर चाल करून **स्कॉट** लोकांना पिटाळून लाविलें, व **डेव्हिडला** कैद करून आणलें !

८ कॅले हस्तगत झालें—तिकडे '**कॅले**' ला ११ महिनेपर्यंत वेढा पडला होता; **कॅलेच्या** रहिवाशांनीं मोठ्या शौर्यानें किल्ला लढविला; पण अखेर शहरांत दुष्काळ पडल्यामुळें त्यांनीं इ० स० १३४७ मध्यें किल्ल्याचे दरवाजे उघडून इंग्रजांना आंत घेतलें. एडवर्डला किल्ला हस्तगत व्हावयाला इतके दिवस लागले म्हणून फार राग आला होता. त्यानें किल्ल्यांतील सहा पुढाऱ्यांना अनवाणी गळ्याला दोर बांधून घेऊन आपल्या समोर येण्याचा हुकूम केला ! व ते कॅलेच्या किल्ल्या घेऊन आले तेव्हां दांत ओंठ चावून त्यांचा शिरच्छेद करण्याची त्यानें आपल्या जवळच्या मांगांना आज्ञा केली. पण इतक्यांत राणीनें मध्यस्थी करून त्यांना जीवदान देण्याबद्दल राजाची विनवणी केली; तेव्हां नाहीं होय म्हणतां म्हणतां राजा एकदांचा त्यांना मुक्त करण्याला कबूल झाला. पुढें किल्ल्यामधील **फ्रेंच** प्रजेला हुसकावून लावून **इंग्लिश** लोकांनीं तो सर्व किल्ला व्यापून टाकला, व इंग्लिशांची **फ्रान्समधील** ही 'वसाहत' व्यापाराचें एक मोठें ठाणें होऊन राहिली.

९ मुदतीचा तह—**कॅलेचा** किल्ला पडल्यानंतर इंग्लंड व **फ्रान्स** यांचे दरम्यान थोड्या मुदतीचा तह (Truce) झाला. हा तह इ. स. १३५५ पर्यंत टिकला.

१० काळरोग—दरम्यान **आशिया** खंडाच्या उत्तरेकडील भागांत 'काळरोग' (Black Plague) म्हणून एका भयंकर रोगाची सांथ उद्भवून तिनें युरोप खंडांतून इंग्लंडमध्येंहि प्रवेश केला, व एकट्या **लंडनमध्यें**च ५० हजार लोकांचे बळी घेतले. या सांथीनें युरोप खंडांतील $\frac{1}{3}$ लोकवस्ती कमी झाली.

११ फ्रान्सबरोबर पुनः युद्ध—इ स. १३५५च्या सुमारास **फ्रान्सला** अगदींच उतरती कळा लागली होती. **फिलिप** राजा मरण पावून त्याचा मुलगा '**जॉन**' (John) गादीवर आला होता. पण 'चार्लस नावरेकर' (Charles of Navarre) म्हणून राजाचा दुसरा एक दूरचा वारस होता, त्यानें दरबारांत फाटाफूट पाडून परक्याला **फ्रान्समध्यें** शिरण्यास रस्ता मोकळा करून दिला. **एडवर्ड** व

युवराज कॅले येथून निघून पुढें घुसले व पुष्कळ लूट मिळवून परत आले. पुढल्या वर्षीं युवराज १२ हजार सैन्य घेऊन फ्रान्सच्या मध्यभागापर्यंत गेला. पुढें 'पॉयटर्स' (Poitiers) येथें त्याची व 'जॉन'ची गांठ पडली. या वेळीं जॉनजवळ साठ हजार सैन्य होतें. पण इंग्लंडच्या या 'काळपुरुषा'नें न डगमगतां मोठ्या चातुर्यानें असें एक ठिकाण शोधून काढलें कीं, त्या ठिकाणीं एका अरुंद गल्लीशिवाय पुढें येण्याला दुसरी वाटच नव्हती. या गल्लीच्या तोंडावर इंग्लिश तिरंदाज उभे राहून त्यांनीं येतील त्या फ्रेंच लोकांवर बाणांचा वर्षाव चालविला. अखेरीस फ्रेंच शिपायांच्या प्रेतांनीं सगळी वाट भरून गेली, व या प्रेतांच्या राशीवरून फ्रेंच सेनेला पळ काढावा लागला !

१२ ही इ० स० १३५६ च्या सप्टेंबर महिन्याच्या १९ व्या तारखेस झालेली 'पॉयटर्स'ची लढाई इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. या लढाईत फ्रेंचांचा राजा '**जॉन**' इंग्लिशांच्या हातीं लागला. त्याला एडवर्डनें लंडनमध्यें आणून मोठ्या सन्मानानें वागविलें. पुढें त्याचा व एडवर्डचा तह ठरून पूर्वी दुसऱ्या **हेन्री**च्या कारकिर्दींत **फ्रा**न्समधील ज्या ज्या प्रांतांवर इंग्लंडच्या राजाची मालकी होती, ते सर्व प्रांत बिनशर्त व पूर्णपणें इंग्लंडच्या ताब्यांत रहावे असें ठरलें.

१३ पुनः युद्ध व पुनः तह--पण या अपमानास्पद तहाला फ्रेंच सरदारमंडळ कबूल होईना. म्हणून **एडवर्डनें** पुन्हां फ्रान्सवर स्वारी करून थेट **पारिस** राजधानीपर्यंत पल्ला गांठला. तेव्हां फ्रेंच सरदार ताळयावर येऊन त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. व इ० स० १३६० च्या मे महिन्याच्या ८ व्या तारखेस उभयपक्षांमध्यें एक 'महासंधि' (The Great Peace) होऊन असें ठरलें कीं, **एडवर्डनें** फ्रान्सच्या गादीवरील आपला हक्क सोडून द्यावा. तसेंच **नॉर्मंडी, मेन, टुरेन** व **आंजू** हे प्रांत फ्रान्सला देऊन त्याच्या मोबदला **गिनी, पायटू** (Poitou) वगैरे प्रांत व **कॅले**चा किल्ला हे बिनशर्त-फ्रेंच राजाच्या मांडलिकत्वाखालचे प्रांत म्हणून नव्हे-इंग्लंडकडे असावे. व तीस लाख 'क्राऊन' घेऊन 'जॉन'ला एडवर्डनें सोडून द्यावा. ही रक्कम जॉनला जमवितां आली नाहीं; तेव्हां तीन वर्षांनीं तो पुन्हा इंग्लंडमध्यें आला, व 'सॅव्हॉय' (Savoy) च्या वाड्यांत आजारी पडून थोड्या दिवसांनीं मरण पावला.

१४ पुनः कटकट—आतां फ्रान्समधील इंग्लंडच्या ताब्यांतल्या मुलखावर राज्य करण्यासाठीं इंग्लंडच्या युवराजाची नेमणूक झाली, व तो तिकडे निघून गेला.

इ० स० १३६७ मध्यें शेजारच्या एका संस्थानिकाला (Pedro the cruel) एका लढाईत त्यानें मदत केली; पण तो संस्थानिक याच्या सैन्याचा खर्च देईना. युवराजाच्या अंगांतील धमकही आतां कमी होत चालली होती. तेव्हां हा सैन्याचा खर्च भागविण्यासाठीं त्यानें आपल्याच प्रांतांतील **फ्रेंच** प्रजेवर कर बसविला. **फ्रेंच** प्रजेनें **फ्रान्स**च्या राजाकडे अपील केलें. तेव्हां फ्रान्सच्या राजानें या ' काळपुरुषा'ला जाब देण्यासाठीं **पारिस**ला बोलाविलें.

१५ वास्तविक फ्रान्समधील इंग्लिशांच्या या मुलखावरील फ्रान्सच्या राजाची सत्ता इ० स० १३६० च्या तहानें नष्ट झाली होती व त्याला अशा रीतीनें या युवराजाला आपल्या दरबारीं बोलावण्याचा हक्क नव्हता. युवराजानें उत्तर पाठविलें कीं, ' मी **पारिस**ला येईन तो साठ हजार लोक घेऊन येईन ' ! अशा रीतीनें पुन्हां भांडण सुरू झालें. पण तितक्यांत युवराजाला दुखणें येऊन त्याला सेनापतित्व सोडून इंग्लंडला यावें लागलें. त्यामुळें इंग्रज सेना योग्य सेनानायकाच्या अभावीं दुर्बल होऊन फ्रेंचांना एकामागून एक जय मिळत गेले; व अखेर **बोर्डो** (Bordeaux), **बेयोन** (Bayonne), व **कॅले** एवढेच प्रांत इंग्रजांच्या हातीं राहिले ! युवराज लौकरच इ० स० १३७६ मध्यें मरण पावला, व पुढल्या वर्षी एडवर्ड राजाहि हें जग सोडून गेला.

१६ एडवर्डच्या अंगचे गुणावगुण—या **एडवर्ड** राजाच्या राज्यतृष्णेमुळें जरी इंग्लंडला नेहमीं कोणत्या ना कोणत्या तरी लढाईत गुंतून रहावें लागे, तरी त्याच्या कारकिर्दीत खुद्द इंग्लंडमध्यें एकंदरींत बरीच शांतता नांदत होती. सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर तो **पार्लमेंट**चें मत घेत असे. त्यामुळें या 'राष्ट्रसभे'चें महत्त्व व सत्ताहि वाढत चालली.

१७ पोपची सत्ता कमी झाली—इ० स० १३४४ मध्यें इंग्लंडमधील पोपची सत्ता कमी करणारा एक कायदा करण्यांत आला. या कायद्यानें इंग्लंडमधील देवस्थानांवर परकी लोकांची नेमणूक करण्याचा पोपचा हक्क काढून घेण्यांत आला, व पूर्वी राजाच्या हुकुमावर पोपकडे अपील चालत असे तेंही बंद करण्यांत आलें.

१८ राजद्रोहाची व्याप्ति—इ० स० १३५२ मध्यें राजद्रोहाची व्याप्ति मर्यादित करणारा कायदा होऊन ' राजाला ठार मारण्याचा कट करणें, राजाविरुद्ध लढाई करणें व राजाच्या परकी शत्रूंना मदत करणें ' येवढ्याच गोष्टींचा राजद्रोहांत अंतर्भाव होतो असें ठरविण्यांत आलें.

१९ **पार्लमेंटच्या दोन शाखा**—या **एडवर्ड**च्या कारकिर्दींत **पार्लमेंट** सभेच्या '**सरदार सभा**' (House of Lords) व '**लोक सभा**' (House of Commons) अशा दोन शाखा होऊन त्यांच्या बैठकी वेगवेगळ्या ठिकाणीं भरूं लागल्या. व लोकसभेनें आपला अध्यक्ष निवडण्याची पद्धत सुरू केली. इ. स. १३७६ मध्यें भरलेल्या पार्लमेंटला 'गुड पार्लमेंट' (Good Parliament) म्हणजे 'सुलोकसभा' असें नांव इतिहासकारांनीं दिलें आहे. या 'पार्लमेंट'नें दोन राजमंत्र्यांची 'चौकशी' (impeachment) केली. व राजमंत्र्यां-(King's Councillors) वर वचक बसविण्याचा एक नवा अधिकार मिळविला. ही चौकशी म्हणजे एखाद्या सरकारी अधिकाऱ्यानें प्रजेवर जुलूम केल्याचा पुरावा मिळाला म्हणजे पार्लमेंटच्या लोकसभेनें फिर्यादी होऊन त्या अधिकाऱ्याला सरदारसभेच्या न्यायासनापुढें आरोपी म्हणून उभें करावयाचें व सरदारसभेनें त्या खटल्याचा निकाल करावयाचा. मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार होण्याच्या पूर्वीच्या काळांत या 'चौकशी'ची सरकारी अधिकाऱ्यांना बरीच धास्ती वाटत असे. **बेकन, स्ट्रॉफर्ड, वॉरन हेस्टिंग्ज** वगैरेंच्या झालेल्या असल्या चौकशा प्रसिद्ध आहेत. या राजाच्या कारकिर्दींत व्यापारालाही उत्तेजन मिळून '**फ्लेमिंग**' (Fleming) कोष्टी इंग्लंडमध्यें येऊन राहिले. व त्यांनीं लोकरीचा व्यापार फार वाढविला.

२० **एडवर्डचीं मुलें**—**एडवर्ड**ला **फिलिपा** राणीपासून सहा मुलगे व पांच मुली झाल्या होत्या. **फिलिपा** राणी एडवर्डच्या अगोदरच मरण पावली होती. थोरला मुलगा **एडवर्ड**, आणि '**लायनेल**' (Lionel) नांवाचा दुसरा एक मुलगा हे एडवर्डच्या हयातींतच मरण पावले होते. थोरल्या मुलाला **रिचर्ड** (Richard) या नांवाचा एक ११ वर्षांचा मुलगा होता. त्याला **एडवर्ड**च्या मागून गादी देण्यांत येऊन प्रत्यक्ष राज्यकारभार चालविण्यासाठीं एक कारभारी मंडळ नेमण्यांत आलें. या मंडळांत **रिचर्ड**च्या चुलत्यांचा समावेश करण्यांत आला नव्हता. तथापि त्यांचें वजन राज्यांत कमी होतें असें नाहीं.

२१ **रिचर्डचा राज्याभिषेक**—**रिचर्ड**चा राज्याभिषेक मोठ्या थाटानें झाला. या प्रसंगीं **लंडन**मधील सर्व रस्ते तोरणांनीं व पताकांनीं शृंगारले होते. रिचर्ड लहानपणीं मोठा चलाख व हुषार दिसे, पण पुढें मोठा झाल्यावर त्याची बुद्धि फिरली; त्यानें काय काय पराक्रम गाजविले व त्यांचा परिणाम त्याला स्वतःला व एकंदर राष्ट्राला कसकसा भोगावा लागला हें पुढील प्रकरणांत पाहूं.

प्रकरण २१ वें.

पणतू शोभला !

(इ. स. १३७७-इ. स. १३९९)

[१ राजाचे चुलते—२ डोईपट्टी—३ सरदारसभेचें वर्चस्व—४ असंतोष—५ वॅट टायलर—६ बंडाचा वणवा—७ श्रीमान विरुद्ध गरीब–बंडवाल्यांचा लंडनमध्यें प्रवेश—८ वट टायलरचा अंत व राजाचें प्रसंगावधान—९ वचनभंग १० नादान मित्रमंडळ—११ स्काटलंडच्या राजाची स्वारी—आटरबोर्नची लढाई—१२।१३ राजपितृव्यांचे बेत—ग्लावसेस्टर-अरुंडेल—१४ आयर्लंडचें मांडलिकत्व—फ्रान्सशीं युद्ध तहकूब—रिचर्डचें लग्न—पार्लमेंटची दुर्बलता—१५ राजमित्रांचें वर्तन—पोरवडा माजला—१६ हेन्री व नॉर्फक—१७ द्वंद्वयुद्ध—दोघांनाही शिक्षा—लोकांमधील असंतोष—१८।१९ हेन्रीची तयारी व लोकप्रियता—२० नार्दंबर्लंड—पार्लमेंटची बैठक—रिचर्डची नालायकी—हेन्रीचा हक्क—रिचर्डचा राजीनामा व हेन्रीचें राज्यारोहण—२१ रिचर्डचा अंत—२२ त्याचा स्वभाव—२३ जॉन विक्लिफ—बायबलचें भाषांतर—लोलर्ड—चॉसर कवि]

१ राजाचे चुलते—पूर्वी इंग्लंडमध्यें राजाला एकापेक्षां अधिक मुलगे असले म्हणजे वडील मुलाला गादी मिळून इतरांना राज्यांतील मोठमोठ्या जहागिरी मिळत असत. त्याप्रमाणें **रिचर्ड** हा माजी राजाच्या वडील मुलाचा मुलगा म्हणून राजपदाधिष्ठित झाला, तरी त्याच्या चुलत्यांकडे मोठमोठ्या जहागिरी असून त्यांचें राज्यांत वजनही बरेंच होतें राजमातेच्या आग्रहावरून त्यांचा कारभारी मंडळांत समावेश झाला नव्हता येवढेंच.

२ डोईपट्टी—फ्रान्सबरोबर चालू असलेली लढाई युद्धप्रिय नॉर्मन सरदारांकडून चालूच होती. या लढाईचा खर्च भागविण्यासाटीं इंग्लंडच्या रहिवाश्यांवर एक कर बसविण्यांत आला. पंधरा वर्षांवर वय असलेल्या प्रत्येक मनुष्याकडून तीन 'ग्रोट' घ्यावयाचे असें ठरविण्यांत आलें.

३ सरदार सभेचें वर्चस्व—या ठिकाणीं येवढें सांगणें जरूर आहे कीं त्या वेळीं कायदे करण्याचा अधिकार जरी नांवाला **पार्लमेंट**कडे असे व जरी खुद्द

पार्लमेंटमध्येंच सरदारसभा व लोकसभा असे भेद उत्पन्न होऊन लोकसभेचे सभासद निराळ्या 'चेंबर' (Chamber)मध्यें बसून राष्ट्रीय प्रश्नांची स्वतंत्रपणें चर्चा करीत, तरी सरदारसभेचे सभासद हे धनवान् व मानवान् असल्यामुळें वास्तविक राजसत्तेवर जो कांहीं दाब रहावयाचा तो त्यांच्या मार्फतच ठेवावा लागे; व हेच सभासद जर राजाला अनुकूल झाले तर लोकसभेच्या म्हणण्याला कांहींच किंमत रहात नसे.

४ असंतोष—वर सांगितलेली 'डोईपट्टी' गरीब व श्रीमंत हा भेद न ठेवितां सरसकट सर्वांकडून सक्तीनें वसूल करण्यांत येऊं लागली. श्रीमंतांना हा कर देणें फारसें जड नव्हतें; पण हातावर पोट भरणाऱ्या मजुरांना व शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्यांना हा कर फारच जाचक होत असे. त्यामुळें हळू हळू त्या लोकांमध्यें असंतोष माजत चालला. शिवाय हा कर वसूल करण्याला जे अंमलदार नेमले होते तेहि लोकांशीं निष्ठुरपणें व उद्दामपणें वागत. त्यामुळें मूळच्या लहानशा असंतोषाची पुढें लवकरच बंडांत परिणति झाली !

५ वॅट टायलर—केंट (Kent) जिल्ह्यांत 'वॅट टायलर' (Wat Tyler) म्हणून एक कुंभार होता. त्याच्या घरीं एक अधिकारी करवसुलीसाठीं गेला असतां त्यानें '**टायलर**' च्या मुलीची भलतीच थट्टा केली. त्यामुळें बापाला राग येऊन त्यानें तेथल्या तेथें त्या अधिकाऱ्याला ठार मारिलें. शेजारी पाजारी जमा झाले. त्यांनीं 'टायलर'ची 'शाबास' म्हणून स्तुति केली, आणि पुढें मिळालीं तसलीं हत्यारें घेऊन, आपल्यावर जुलूम करणाऱ्यांचा सूड घेऊन स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचें अशा निश्चयानें ते बाहेर पडले !

६ बंडाचा वणवा—हा बंडाचा वणवा हळू हळू सर्व **केंट** जिल्ह्यांत व पूर्वेकडच्या इतर जिल्ह्यांतही भडकला; '**वॅट टायलर,**' '**जॅक स्ट्रॉ**' (Jack Straw), **जॉन बॉल** (John Ball), वगैरेंच्या नेतृत्वाखालीं एक लाख दंगेखोर जमा झाले, व त्यांनीं **लंडन**चा रोंख धरून जाळपोळ करण्याला सुरवात केली.

७ श्रीमान विरुद्ध गरीब—हें भांडण म्हणजे निर्धन व धनवान् यांच्यामधील झगडा होता. दंगेखोर लोक गरिबांना उपद्रव देत नसत; पण पैसेवाला म्हटला कीं त्यांना शत्रूसा वाटे ! व जो धनिक त्यांच्या हातांत सांपडे त्याच्या हालांना सीमा रहात नसे. इ० स० १३८१ च्या जूनच्या १२ व्या तारखेस या बंडवाल्यांनीं **लंडन**मध्यें प्रवेश केला, व श्रीमंतांच्या वाड्यांवर हल्ले करून लुटालूट मांडली.

यावेळीं **रिचर्डनें** धीर करून त्यांच्या मुख्य पुढाऱ्यांची गांठ घेतली, व त्यांच्या सर्व मागण्या कबूल करून त्यांना वाटेस लावलें.

८ वॅट टायलरचा अंत—परंतु दुसऱ्या दिवशीं वॅट टायलरची व राजाची गांठ पडली असतां वॅट टायलरनें कांहीं फाजीलपणा केला. त्यामुळें **लंडनचा** मेयर ऊर्फ कोतवाल जवळच होता, त्यानें राजाचा अपमान केल्याबद्दल वॅट टायलरला तरवारीनें तेथल्या तेथें छाटून टाकलें. आपल्या पुढाऱ्याला मारल्यामुळें बंडवाले पुन्हां एकत्र झाले. तेव्हां **रिचर्ड** आणखीं एकदां मोठें प्रसंगावधान राखून त्यांच्याकडे गेला, आणि म्हणाला, 'बाबांनो! तुम्ही हा गोंधळ कशाकरितां मांडला आहे? तुमचा पुढारी नाहींसा झाला म्हणून तुम्हांला वाईट वाटतें काय? मी तुमचा राजा आहें. मीच तुमचा पुढारी होतों!' या भाषणानें बंडवाले शांत झाले, व राजाकडून आपल्या मागण्या कबूल केल्याचें वचन घेऊन ते घरोघर निघून गेले.

९ वचनभंग—पण वचन देणें ही गोष्ट राजाच्या हातची, असली तरी त्याप्रमाणें अंमल करण्याचा अधिकार होता कारभारी मंडळाकडे. या कारभाऱ्यांनीं आपल्या संमतीशिवाय राजाला कसलेंच वचन देण्याचा अधिकार नाहीं असें ठरवून राजानें दिलेलीं वचनें गुंडाळून ठेवून पंधराशें बंडखोरांना फांसावर चढविलें!

१० नादान मित्रमंडळ—**रिचर्डच्या** लहानपणच्या वर्तनावरून तो पुढें चांगला राजा निपजेल अशी लोकांना आशा वाटत होती. पण तो जसजसा मोठा होऊं लागला तसतसा **आळशी** बनत चालला व त्याच्यासभोंवतीं नादान मित्रमंडळ जमून त्यांनीं त्याला कुचकामी करून सोडलें!

११ स्कॉटलंडच्या राजाची स्वारी—**फ्रान्सचा** स्नेही म्हणून **स्कॉटलंडच्या** राजानें इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलुखावर चाल केली. त्याला तोंड देण्यासाठीं **रिचर्ड** साठ हजार सैन्य घेऊन **स्कॉटलंडमध्यें** गेला. व **एडिंबरो** (Edinburgh) वगैरे शहरें जाळून पोळून त्यानें **स्कॉट** लोकांना बरीच दहशत बसविली. पण पुढें ही मोहीम तशीच टाकून देऊन मौज मारण्यासाठीं तो **इंग्लंडला** परत आला, व **स्काट** लोकांचे हल्ले पुन्हां होऊं लागले. या वेळच्या लढायांत इ. स. १३८८ या वर्षी ऑटरबोर्न (Otterbourne) येथें जी लढाई झाली ती फार प्रसिद्ध असून तिचें शाहिरांनीं मोठें रसभरित वर्णन केलें आहे.

१२ राजपितृव्यांचे बेत—पहिल्यापासून राजाच्या चुलत्यांचें राज्यांत वजन बसलेंच होतें. त्यांत आतां राजाच्या अंगीं राज्य करण्याला अवश्य असणाऱ्या गुणांचा

अभाव आहे असें दिसून येतांच त्यांनीं सर्व सत्ता आपल्या हातांत आणण्याचा प्रयत्न आरंभिला. इ. स. १३८८ या वर्षीं '**ग्लावसेस्टर**' (Gloucester) च्या जहागिरदारानें पार्लमेंटच्या संमतीनें (The wonderful Parliament) राजाच्या कांहीं दोस्तांवर (Favorites) राजद्रोहाचा आरोप आणून त्यांना फांशीं देवविलें.

१३ पुढल्या वर्षीं राजा वयांत आल्यामुळें त्यानें सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. आणि कारभारी मंडळांपैकीं ज्यांनीं ज्यांनीं पूर्वीं त्याच्या स्वैर कृत्यांस विरोध केला होता त्यांचा सूड घेण्याला आरंभ केला. त्यानें **ग्लावसेस्टर**ला पकडून फ्रान्समध्यें **कॅले** येथें पाठवून दिलें. तसेंच इतर पुढारी मंडळीपैकींहि कोणाला दंड, कोणाला कैद, तर कोणाला फांशीची शिक्षा देण्यांत आली. **अरुंडेल** (Arundale) नांवाचा कांटरबरीचा मुख्य आचार्य होता, त्याला हद्दपार करण्यांत आलें.

१४ आयर्लंडचें मांडलिकत्व—इ. स. १३९४ या वर्षीं **रिचर्ड आयर्लंड**मध्यें गेला व तेथील प्रजेकडून त्यानें आपलें अधिराजत्व कबूल करून घेतलें. फ्रान्सबरोबर चालू असलेली लढाई तहकूब करून पंचवीस वर्षांच्या मुदतीचा तह करण्यांत आला. इ० स० १३९६ या वर्षीं **रिचर्ड**नें **फ्रान्स**च्या राजाच्या मुलीशीं लग्न केलें. **पार्लमेंट**च्या पुढाऱ्यांवर नाना तऱ्हेचे आरोप ठेवून त्यांची उचलबांगडी करण्यांत आली. शेवटीं **पार्लमेंट**मध्यें वजनदार असा पुढारीच नाहींसा होऊन रिचर्ड सांगेल त्या गोष्टी पार्लमेंट सभा कबूल करूं लागली.

१५ राजमित्रांचें वर्तन—याप्रमाणें अनिर्बंध राजसत्तेचा उपभोग घेण्याला रिचर्डनें सुरवात केली खरी, पण त्यामुळें त्याच्यावर कोणाचा दाब न राहून त्याच्या स्वैर व स्वच्छंदी मित्रांचें चांगलेंच फावलें. त्यांनीं लोकांवर जबर कर बसविले; न्यायाच्या कामीं ढवळाढवळ चालविली; व प्रजेशीं बेमुर्वतखोरपणाचें वर्तन चालू केलें. वास्तविक **रिचर्ड**चीं सगळींच कृत्यें म्हणजे अन्यायाचीं होतीं असें नाहीं; पण न्यायाच्या गोष्टी करतांना सुद्धां जर कोणी 'मीच काय तो शहाणा, तुम्ही सर्व मूर्ख आहां' असें लोकांस स्पष्टपणें जाणवून करूं लागला तर त्याच्या अहंपणाचा राग येऊन चांगल्या गोष्टींबद्दल सुद्धां लोकांत असंतोष माजतो. **रिचर्ड** आतां **पार्लमेंट**ला धाब्यावर बसवून मन मानेल तसें वर्तन करूं लागला, आणि जुने पुढारी नाहींसे होऊन राष्ट्रांत सर्व पोरवडा माजला.

१६ हेन्री व नॉर्फक—या वेळीं त्याचा एक चुलत भाऊ **हेन्री**, व **सरदार नॉर्फक** (Duke of Norfolk) असे दोघे त्याच्या जुलमी अंमलांत

टिकाव धरून राहिले होते. हेन्री हा सुस्वभावी असून त्याचें लोकांत फार वजन असे. व तो काळप्रसंग पाहून राजाबरोबर मित्रभावानें वागत असे. परंतु **रिचर्ड**ला मनांतून हा एकदां नाहींसा होईल तर बरा असें वाटत असल्यामुळें तो तशी कांहीं तरी संधि पहात होता.

१७ **द्वंद्वयुद्ध**—इ.स.१३९८ या वर्षी **नॉर्फक** व **हेन्री** यांच्यामध्यें कांहीं भांडण उपस्थित होऊन त्यांनीं आपलें भांडण द्वंद्वयुद्ध करून मिटविण्याचें ठरविलें. **रिचर्ड** म्हणाला 'तुम्हीं रास्तपणें युद्ध करितां कीं नाहीं हें पहाण्यासाठीं युद्धाच्या जागीं मी हजर राहतों.' जागा ठरली; **नॉर्फक व हेन्री** दोघेही आखाड्यांत दंड थोपटून उभे राहिले; व आतां युद्धाला सुरवात होणार, इतक्यांत रिचर्डनें आपला बेत फिरवून हें द्वंद्व युद्ध बंद केलें, व **नार्फक**ला जन्मठेप हद्दपारी व **हेन्री**ला सहावर्षें हद्दपारी अशी शिक्षा सुनावली ! **पार्लमेंट**मध्यें रीतसर चौकशी झाल्याशिवाय राजाला अशी शिक्षा देण्याचा कायद्याप्रमाणें हक्क नव्हता. पण **पार्लमेंट**च जर जाग्यावर नाहीं तर **रिचर्ड**चा हात धरतो कोण? अशा रीतीनें राजा म्हणेल ती पूर्व दिशा असा प्रकार होऊन राज्यांत अव्यवस्था माजली, व लोकांत तीव्र असंतोष पसरत चालला.

१८ **हेन्रीची तयारी—हेन्री**ला हद्दपारीची शिक्षा देतांना **रिचर्ड**नें आपल्या चुलत्याची म्हणजे हेन्रीच्या बापाची (John of Gaunt) जहागीर त्याच्या मागून तुला मिळेल असें **हेन्री**शीं कबूल केलें होतें, परंतु इ० स. १३९९ या वर्षी **हेन्री**चा बाप मरण पावला तेव्हां त्याची जहागीर मुलाला न देतां **रिचर्ड**नें ती आपणच बळकावली. आतां आपण निर्भय झालों असें वाटून **रिचर्ड** पुन्हां **आयर्लंड**मध्यें गेला. इकडे **हेन्री फ्रान्स**मध्यें हद्दपारीची शिक्षा भोगीत होता, त्यानें हर प्रयत्नानें आपल्या बापाची जहागीर मिळविण्याचा निश्चय केला, व बरोबर ६० सरदार घेऊन तो **यार्क**शायरमध्यें येऊन दाखल झाला.

१९ प्रथम आपण फक्त आपली वडिलार्जित जहागीर मिळविण्यासाठीं आलों आहों असेंच त्यानें सांगितलें. पण हळू हळू इंग्लंडमधील रिचर्डच्या जुलमाला त्रासलेले सरदार त्याला जाऊन मिळाले आणि दिवसेंदिवस त्याच्या पक्षाचें सैन्य वाढत जाऊन **लंडन**ला पोंचेपर्यंत साठ हजार सैनिक त्याच्याभोंवतीं जमा झाले. **रिचर्ड आयर्लंड**मध्यें मजा मारीत होता. त्याला इकडे काय चाललें आहे याची वार्ताहि नव्हती. त्यानें आपल्या दुसऱ्या एका चुलत्याला आपल्या मागें इंग्लंडचा राज्यकारभार पहाण्यासाठीं नेमिलें होतें; पण तो सुद्धां **हेन्री**लाच मिळाला.

रिचर्डला ही बातमी समजतांच तो आयर्लंडमधून वेल्समध्यें आला. पण लौकरच त्याला असें आढळून आलें कीं, आपल्या बाजूला येण्याला कोणी तयार नसून सर्वांचा ओढा हेन्रीकडे आहे. दोन्ही पक्षांमध्यें कित्येक ठिकाणीं किरकोळ चकमकीहि सुरू झाल्या. पण मोठी अशी लढाई झाली नाहीं.

२० नॉर्दंबर्लंड—शेवटीं 'नॉर्दंबर्लंड' म्हणून रिचर्डचा एक 'विश्वासू' सरदार होता, त्याच्याच विश्वासघातानें रिचर्ड हेन्रीच्या हातीं सांपडला; पार्लमेंटची बैठक भरली; व जुलूम व राज्याची अव्यवस्था या दोन कारणांनीं रिचर्ड राज्य करण्यास नालायक आहे असें ठरवून त्याला पदच्युत करण्याचा ठराव झाला! हेन्री उठून उभा राहिला व म्हणाला, 'रिचर्ड ज्या एडवर्डचा नातू त्याच एडवर्डचा मीहि नातू आहें. शिवाय मातृवंशाकडून महासाधु राजा तिसरा हेन्री याच्याशींहि माझें नातें पोहोंचतें; तेव्हां 'पिता, पुत्र व पवित्र आत्मा' (The Father, the Son and the Holy Ghost) या त्रयीला स्मरून मी सांगतों कीं, इंग्लंडच्या गादीवर माझा हक्क आहे." सरदारसभा व लोकसभा या दोन्हीं सभांनीं त्याचा हक्क कबूल केला; व इ० स० १३९९ च्या सप्टेंबर महिन्याच्या २९ व्या तारखेस रिचर्डकडून इंग्लंडच्या गादीचा राजीनामा घेऊन पार्लमेंटनें मोठ्या उत्साहानें "राजा चौथा हेन्री" म्हणून हेन्रीच्या नांवानें द्वाही फिरविली.

२१ रिचर्डचा अंत—रिचर्डला 'पॉटिफ्राक्ट' (Pontefract)च्या किल्ल्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. पण त्याचें पुढें काय झालें याची कोणालाही नक्की हकीगत सांगतां येत नाहीं. कोणी म्हणतात इ० स० १४०० आरंभीं त्याचा खून झाला; कोणी म्हणतात तो पुढें स्काटलंडमध्यें पळून जाऊन व पुष्कळ वर्षें अज्ञातवासांत राहून शेवटीं मरण पावला.

२२ रिचर्डचा स्वभावः—रिचर्डचा स्वभाव त्याच्या पणजोबाच्या वळणावर गेला होता. जात्या चंचल बुद्धीचा असून तो फार खुनशी बनला होता. आपमतलबी मित्रांच्या सहवासानें एकतंत्रीपणें राज्यकारभार हांकण्याची त्याला दुर्बुद्धि होऊन त्यानें लोकांवर जुलूम केला, आणि दुसऱ्या एडवर्डप्रमाणेंच या जुलमाचें प्रायश्चित्त त्याला गादीवरून पदच्युत होऊन भोगावें लागलें.

२३ जॉन विक्लिफः—रिचर्डच्या कारकिर्दीत जॉन विक्लिफ (John Wycliffe) म्हणून एक सुधारक धर्माधिकारी होऊन गेला. त्यानें त्या वेळच्या

धर्माधिकाऱ्यांच्या गैरवर्तनावर कडक टीका करून परमेश्वराच्या घरीं लहानथोर, गरीब-श्रीमंत हा भेद नाहीं असें मत प्रतिपादन केलें. **बायबल** हा ग्रंथ पूर्वी 'लाटिन' भाषेंत लिहिलेला असून त्याचा अर्थ उपाध्याया(Priest)शिवाय कोणालाही कळत नसे. व दिवसें दिवस हे उपाध्यायही अज्ञानी होऊन बायबलमधील वाक्यांचा भलभलता अर्थ करूं लागले होते. **विक्लिफनें** बायबलचें इंग्लिश भाषेंत भाषांतर केलें, व त्याच्या हस्तलिखित प्रती देशभर पसरविल्या. छापण्याची कला अजून इंग्लंडांत आलेली नसल्यामुळें या बायबलच्या पोथीला फार किंमत पडे. विक्लिफच्या उपदेशानें **पोपच्या** अधिकारालाहि पुष्कळ आळा पडला. त्याला इंग्लंडमधील पहिला 'सुधारक' असें मानण्यांत येतें. त्याचे अनुयायी त्या वेळीं '**लोलर्ड**' (Lollard) या नांवानें प्रसिद्ध होते. धर्मोपदेशकांवर पोपचा अधिकार चालूं नये; एका धर्मोपदेशकाकडे एकच जागा असावी व त्यानें त्या जागींच रहावें; व कोणाहि धर्मोपदेशकानें मोठ्या उत्पन्नाच्या मिळकती विकत घेऊं नये अशीं मतें ते प्रतिपादन करीत असत. ख्रिस्ती धर्मांत 'प्रभु-भोजन' म्हणून एक धर्मविधि होत असतो. या विधीच्या वेळीं जें मद्य व भाकरी वापरण्यांत येते, त्याचें ख्रिस्ताच्या रक्तांत व मांसांत रूपांतर होतें (Transubstantiation) असें भाविक ख्रिस्ती लोक समजतात. **विक्लिफनें** बायबलच्या आधारें हें सर्व झूट आहे म्हणून सांगितलें. विक्लिफच्या या सुधारकी मताबद्दल वास्तविक त्या वेळच्या धर्माधिकाऱ्यांकडून त्याचा छळ व्हावयाचा; पण राजघराण्यांतील मंडळी त्याला अनुकूल असल्यामुळें व बायबलच्या इंग्रजी भाषांतरा-सारखें महत्त्वाचें काम त्याच्याहातून पुरें झाल्यामुळें तो छळनिर्मुक्त होता. पुढें चौथ्या हेन्रीच्या कारकिर्दींत मात्र या **लोलर्ड** लोकांना जिवंत जाळण्याच्या शिक्षा भोगाव्या लागून हा पंथ जवळ जवळ नामशेष झाला. इंग्लंडचा आद्यकवि '**चॉसर**' (Chaucer) हा विक्लिफचा एक अनुयायी होता.

प्रकरण २२ वें.

कलहाचें मूळ

(इ. स. १३९९-इ. स. १४२२)

[१ इंग्लंडमधील वारसाचा कायदा—यादवीचें कारण—२ हेन्रीविरुद्ध कट—३ इंग्लंड व स्काटलंड यांचें भांडण—डगलास व पर्सी—४ वेल्समधील गडबड—ओवेन ग्लेंडोअर—ग्रे—पर्सीचा मृत्यु—५ यार्कच्या धर्माधिकाऱ्याचें बंड—६ स्काटलंडचा राजपुत्र जेम्स—७ फ्रान्सशीं भांडण—किरकोळ कटकटी—फ्रान्सच्या राजाचें वेड—८ युवराज हेन्रीचें वर्तन—न्यायाधीश गास्कन—९ हेन्रीचा आजार व मृत्यु १० त्याच्या कारकिर्दींतील पार्लमेंटचें महत्त्व—लोकसभेनें मिळविलेले हक्क—११ लोलर्डांविरुद्ध कायदा—१२ पहिला सुधारक वीर—लोलर्डांचें शस्त्रधारण—१३ पांचवा हेन्री—१४ त्याच्या वागणुकींतील फरक—१५ लोलर्डांचा कट—जिवंत जाळण्याची शिक्षा—१६ फ्रान्समधील घोंटाळा व हेन्रीची महत्त्वाकांक्षा—१७ कटाचा मोड व फ्रान्समध्यें प्रयाण—१८ ॲगिनकोर्टची लढाई - इंग्रजांचा जय व आनंद—१९ फ्रान्सवरील दुसरी मोहीम—बर्गंडीचा सरदार—ट्रॉयचा तह व हेन्रीचें लग्न—२०फ्रान्समधील तिसरी मोहीम—हेन्रीचें वैभव—२१ वैभवाच्या शिखरावरचा मृत्यु—हेन्रीचें बुइल—२२ हेन्रीच्या अंगचे गुण—२३ राणीचा पुनर्विवाह.]

१ इंग्लंडमधील वारसाचा कायदा—पार्लमेंटनें रिचर्डला गादीवरून काढून टाकून **हेन्रीला** इंग्लंडची गादी दिली खरी, पण या कामीं त्या वेळचा इंग्लंडमधील वारसाचा कायदा पाळण्यांत आला नव्हता. **तिसऱ्या एडवर्डला** एकंदर पांच मुलगे असून **रिचर्डचा** बाप हा सर्वांत वडील, व **हेन्रीचा** बाप हा तिसरा मुलगा होता. यांच्या दरम्यान '**लायोनेल**' (Lionel) नांवाचा एक मुलगा **एडवर्डच्या** हयातींतच वारला होता. पण त्याच्या मुलीचा नातु **एडमंड** (Edmund) म्हणून 'मार्चचा जहागिरदार' (Earl of March) होता. तो या वेळीं ७ वर्षांचा असून **रिचर्ड** निपुत्रिक असल्यामुळें त्या वेळच्या इंग्लंडमधील वारसाच्या कायद्याप्रमाणें **रिचर्डच्या** मागून त्यालाच इंग्लंडची गादी

मिळावयास पाहिजे होती, परंतु **हेन्रीवर** लोकांची विशेष भक्ति असल्यामुळें या लहान मुलाचा हक्क एकीकडे ठेवून **पार्लमेंटनें हेन्रीलाच** राजपद दिलें. परंतु याचा परिणाम असा झाला कीं, यानंतर कित्येक वर्षें एकाद्या खऱ्या खोट्या वारसदाराचा पक्ष घेऊन व लढाई उपस्थित करून त्यांतच आपला स्वार्थ साधूं पहाणारे कोणी ना कोणी सरदार पुढें येत राहिल्यामुळें इंग्लंडमध्यें पुढचीं सुमारें ८० वर्षें आपसांतल्या युद्धामुळें फार अस्वस्थतेचीं गेलीं. या काळांत गादीवर एक पुरुष असतां तीवर आपला हक सांगणारा कोणी ना कोणी दुसरा पुरुष पुढें यावयाचा, व त्याच्या बाजूला कित्येक सरदार मिळून युद्ध सुरू व्हावयाचें, असा प्रकार फार वेळां घडून आला, आणि या युद्धांत इंग्लंडांतलीं बहुतेक प्राचीन सरदार घराणीं लयाला गेलीं.

२ **हेन्रीविरुद्ध कट**—**हेन्रीच्या** राज्यारोहणापासूनच या अस्वस्थतेच्या काळाला आरंभ झाला. **स्काटलंडचा** राजा, **वेल्समधील** संस्थानिक, व **ईंग्लंडमधलेही** बरेच सरदार **हेन्रीला** राजा म्हणून मान्य करण्याला कबूल नव्हते. पुढें खुद्द **इंग्लंडमधील** कित्येक सरदारांनीं गुप्त कट करून **हेन्रीला** गादी-वरून काढून टाकण्याचा प्रयत्न केला; पण हे सर्व कट उघडकीला येऊन कटवाल्यांना फांसावर जावें लागलें. पुढें **हेन्रीनें स्काटलंडवर** स्वारी केली, परंतु इंग्लिश सैन्याकडे अन्नाचा भरपूर पुरवठा नसल्यामुळें त्याला मागें फिरणें भाग पडलें.

३ **इंग्लंड व स्कॉटलंड यांचें भांडण**—या संधीचा फायदा घेऊन इंग्लंड व स्कॉटलंडमधील सरहद्दीवरचे सरदार आपापसांत भांडूं लागले. **स्काट** सरदार **डगलास** (Douglas) व इंग्लिश सरदार **पर्सी** (Percy) यांचें इ० स० १४०२ या वर्षी 'हॉमिल्डन' (Homildon) च्या टेंकडीवर युद्ध होऊन त्यांत **डगलास** व इतर कित्येक **स्कॉट** सरदार **पर्सीच्या** हातीं लागले. **हेन्री** राजानें **पर्सीला** हातीं लागलेल्या **स्कॉट** सरदारांना सोडून देऊं नका म्हणून हुकूम केला. त्या वेळच्या युद्धनीतीप्रमाणें पकडलेल्या सरदारांना सोडून देणें अगर न देणें ही गोष्ट पकडणाऱ्या सरदाराच्या मर्जीवर असे. त्यामुळें आपल्या या हक्कांत **हेन्रीनें** ढवळाढवळ केलेली न खपून **पर्सीला** हेन्रीचा फार राग आला.

४ **वेल्समधील गडबड**—वेल्समधील माजी राजाचा पणतू '**ओवन ग्लेनडोअर**' (Owen Glendower) हा **इंग्लंडचा** माजी राजा **रिचर्ड** याच्या दरबारांत एका मानाच्या जागेवर होता. **रिचर्ड** पदच्युत

झाल्यावर तो **वेलस**मध्यें निघून गेला. तिकडे त्याची जहागीर **ग्रे** (Grey) नांवाच्या **हेन्री**च्या मर्जींतील एका सरदारानें बळकाविली होती. त्यामुळें '**ग्लेन डोअर**'चा व त्याचा उघड तंटा सुरू झाला. **हेन्रीनें ग्रे**च्या मदतीला **इंग्लंड**मधून सैन्य रवाना केलें. या सैन्यावर मॉर्टिमर (Mortimer) या नांवाच्या सरदाराची नेमणूक झाली होती. **ग्लेनडोअरनें वेल्श** लोकांना चिथावून **वेलस**ला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आरंभिला. इंग्लिश सैन्याची व वेल्श लोकांची लढाई होऊन इ० स० १४०२ या वर्षीं **मार्टिमर** व **ग्रे** हे **ग्लेनडोअर**च्या हातीं लागले. **मार्टिमर** हा **पर्सी**चा नातलग होता. तेव्हां **वेल्श** लोकांना त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें पैसे देऊन **मार्टिमर**ला सोडवून आणावें म्हणून **पर्सीनें** राजाला सांगितलें. पण **हेन्री** ऐकेना. आधीं **डगलास**च्या बाबतींत राजानें आपल्या हक्कांत विनाकारण हात घातल्याबद्दल **पर्सी**ला राग आला होताच. त्यांत आपल्या नातलगाला सोडवून आणण्याची राजाच्या हातीं असलेली संधीहि फुकट जाते असें पाहून, व एवीं तेवीं राजा जर आपलें ऐकतच नाहीं तर आपण तरी त्याच्या बाजूला कशाला रहा असा विचार करून **पर्सीनें हेन्री**विरुद्ध **ग्लेनडोअर**लाच जाऊन मिळण्याचें ठरविलें. इतरही एकदोन सरदार या बेताला अनुकूल झाले. प्रथम **वेलस**मध्यें जाऊन **ग्लेनडोअर**ला मिळावें व मग तिकडून **हेन्री**वर स्वारी करावी असा बेत ठरला. पण **हेन्रीनें** चपळाई करून वाटेंतच **पर्सी**ला गांठलें व दोन्ही पक्षांत घनघोर युद्ध होऊन अखेर **पर्सी** धारातीर्थीं पतन पावल्यामुळें हेन्रीला जय मिळाला. या युद्धांत **हेन्री**च्या वडील मुलानें मोठा पराक्रम गाजविला. **पर्सी**च्या बाजूच्या सरदारांना पकडून ठार मारण्यांत आलें. **स्कॉ**टिश सरदार **डगलास** हा **पर्सी**बरोबर होता. त्याला मात्र **हेन्रीनें** कैदेंत ठेवून मानानें वागविलें.

५ यॉर्कच्या धर्माधिकाऱ्याचें बंड—इ. स. १४०५ या वर्षीं पुन्हां कित्येक सरदार व **यॉर्क**चा धर्माचार्य हे एक होऊन त्यांनीं बंड उभारलें. परंतु **हेन्रीनें** बंडवाल्यांचा पराभव करून त्यांच्या पुढाऱ्यांना पकडून फांसावर चढविलें. त्यांत **यॉर्क**चा धर्माधिकारीही फांसावर गेला. **वेलस** प्रांतांतील बंड चालूच होतें.

६ स्काटलंडचा राजपुत्र जेम्स—त्याच वर्षीं **स्काटलंड**च्या राजाचा मुलगा **जेम्स** हा फ्रान्समध्यें चालला होता. तो दैवयोगानें **हेन्री**च्या हातीं सांपडला; तेव्हां त्याला त्यानें **इंग्लंड**मध्यें कैद करून ठेवलें.

७ **फ्रान्सशीं भांडण**—माजी राजा **रिचर्ड** यानें **फ्रान्स**च्या राजाची मुलगी **इसाबेला** इच्या बरोबर लग्न केलें होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. तिचा बाप मरण पावल्यावर आतां **फ्रान्स**च्या गादीवर तिचा भाऊ **चार्लस** हा बसला होता. त्यानें आपल्या बहिणीच्या लग्नाच्या वेळीं **फ्रान्स**कडून **रिचर्ड**ला मिळालेला हुंडा व **इसाबेला**चे दागदागिने **हेन्रीनें** आपल्याला परत द्यावे म्हणून बोलणें लाविलें. **हेन्री** म्हणाला, 'फ्रान्सच्या माजी राजाकडे आमचें येणें आहे त्यांत ते वजा घालावे.' होतां होतां उघडपणें जरी लढाई सुरू झाली नाहीं, तरी एकमेकांच्या किनाऱ्यावर किरकोळ आरमारी हल्ले सुरू होऊन लुटालूट होऊं लागली. पुढें कांहीं दिवसांनीं **फ्रान्स**च्या राजाला वेड लागलें. व **फ्रान्स**च्या दरबारांत दुफळी होऊन आपसांत तंटे सुरू झाले. **हेन्रीनें** एकदां या पक्षाला व एकदां त्या पक्षाला हाताशीं धरून 'आक्विटेन,' (Aquitaine) 'पायटू' (Poitou) वगैरे प्रांत हस्तगत केले.

८ **युवराज हेन्रीचें वर्तन**—**हेन्री**चा वडील मुलगा **'युवराज हेन्री'** याच्या वर्तनानें मात्र बापाला बरीच चिंता उत्पन्न झाली होती. हलकट व उद्दाम संवगड्यांच्या संगतीनें त्याला वाईट गुण लागत चालले होते. एकदां त्याच्या एका मित्रानें कांहीं अपराध केल्यावरून त्याची न्यायकोर्टांत चौकशी चालली होती. युवराज त्या ठिकाणीं गेला आणि न्यायाधिशानें त्याच्या मित्राला शिक्षा सुनावण्याबरोबर तरवार उपसून तो त्या न्यायाधीशाच्या अंगावर चालून गेला. पण न्यायाधीश **'गास्कन'** (Gascoigne) हाही खंबीर होता. त्यानें या बेकायदेशीर वर्तनाबद्दल राजपुत्राचा मुलाहिजा न ठेवतां त्यालाहि तुरुंगाची शिक्षा दिली! राजपुत्राचे डोळे लौकरच उघडले, व न्यायाधिशाचा हुकूम त्यानें मान्य केला. पुढें हा राजपुत्र **गास्कन**च्या या चोख वर्तनाबद्दल त्याला फार मान देत असे. असो.

९ **हेन्रीचा आजार व मृत्यु**—**हेन्री** राजा जरी अद्यापि भर तारुण्यांत होता तरी त्याला आतां फेंपऱ्याचा विकार जडला. वारंवार झटके येऊन त्याची शीट जाऊं लागली. व अशा एका झटक्यांतच इ० स० १४१३ च्या मार्च महिन्यांत त्याचा अंत झाला. त्याच्यामागें त्याचे चार मुलगे व दोन मुली होत्या.

१० **त्याच्या कारकिर्दींतील पार्लमेंटचें महत्त्व**—**हेन्री**च्या कारकिर्दींत **पार्लमेंट**चें महत्त्व फारच वाढलें. **इंग्लंड**च्या गादीवर कायद्याप्रमाणें आपला हक्क नाहीं, तेव्हां कायदेशीरपणाची ही उणीव लोकांना संतुष्ट राखून भरून काढली पाहिजे

याची त्याला चांगली जाणीव होती. त्यामुळें पार्लमेंटच्या संमतीशिवाय तो कोणत्याहि मोठ्या गोष्टीला हात घालीत नसे. अर्थातच पार्लमेंट सभा जास्त जास्त धीट होत जाऊन तिनें अधिकाधिक हक्क संपादन केले. पैसा खर्च करण्याची प्रत्येक बाब 'लोक-सभेंत' प्रथम चर्चेसाठीं निघाली पाहिजे, सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करीत असतां राजानें मध्यें ढवळाढवळ करतां कामा नये, सभेंत हजर असेपर्यंत कोणाही सभासदाला पकडण्याचा राजाला अधिकार नाहीं, पार्लमेंटनें राजाकडे अर्ज करावयाचा तो लेखीच केला पाहिजे असें नाहीं, तोंडी केला तरी चालेल, वगैरे अनेक हक्क लोकसभेनें मिळविले.

११ लोलर्डांविरुद्ध कायदा—ख्रिस्तधर्मीयांत **लोलर्ड** नांवाचा एक धर्मसुधारकांचा पंथ निघाला होता हें मागें सांगितलेंच आहे. हे लोक प्रचलित धर्ममतांविरुद्ध उपदेश करीत, म्हणून त्यावेळच्या धर्माधिकाऱ्यांचा व पुराणमताभिमानी लोकांचा त्यांच्यावर दांत असे. 'सर्व माणसांचे हक्क सारखे आहेत' या त्यांच्या मतांमुळें सरदार मंडळालाहि हे लोक नकोसे वाटत. **हेन्री**ला सरदार मंडळाचें व धर्माधिकाऱ्यांचेंच पाठबळ मुख्यतः पाहिजे होतें. त्यामुळें इ० स० १४०१ या वर्षी या 'नास्तिक' **लोलर्डां**चा बींमोड करण्यासाठीं नवीन कायदा (Statue of Heretics) करण्यांत आला. व कोणी नास्तिक मतें धारण करील त्याची गांवच्या धर्माधिकाऱ्यानें चौकशी करावी, व त्यानें आपलीं मतें न सोडल्यास फौजदारानें त्याला जिवंत जाळावें असें ठरविण्यांत आलें.

१२ पहिला सुधारक वीर—'जॉन सॉट्रे' (John Sawtre) या नांवाच्या लंडनच्या एका धर्माधिकाऱ्याला त्याच्या 'लोलर्ड' मतांबद्दल इ० स० १४०१ या वर्षी अशा रीतीनें खांबाला बांधून जाळण्यांत आलें! धर्ममतांसाठीं पराकाष्ठेचा स्वार्थत्याग करणारा इंग्लंडमधील हा पहिला सुधारक वीर होय. या नास्तिकां(Heretics)चा बींमोड करण्याचा राजानें व धर्माधिकाऱ्यांनीं जरी शिकस्तीचा प्रयत्न केला, तरी त्यांचीं मतें अखेर बळावतच गेलीं, व हिंदुस्तानांत औरंगजेबाच्या कारकिर्दींत 'शीख' लोकांनीं आपल्या धर्मरक्षणासाठीं जसें शस्त्र धारण केलें, तसेंच या लोलर्ड लोकांनींही पुढें 'सत्यधर्मा' साठीं हातांत शस्त्र घेऊन त्याचा फैलाव करण्याला कमी केलें नाहीं. असो.

१३ पांचवा हेन्री—**हेन्री** मरण पावल्यावर त्याचा मुलगा **हेन्री** हा 'पांचवा हेन्री' म्हणून गादीवर आला. गादीचा खरा वारस **एडमंड** हा या वेळीं वीस वर्षांचा

होता. या **एडमंडला चौथ्या हेन्रीनें विंडसर**च्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. परंतु आतां या नवीन राजानें त्याच्याविषयीं मनांत अविश्वास अगर भीति न धरतां त्याला मोकळा करून त्याची जहागीर होती ती त्याला देऊन टाकली.

१४ त्याच्या वागणुकींतील फरक—'पांचवा हेन्री' गादीवर आल्यावर त्याच्या बालपणच्या वर्तनांत एकदम फरक पडलेला दिसूं लागला. त्यानें आपल्या जुन्या दोस्तांना राज्यांतून घालवून लावलें. सरदार **पर्सी**च्या कुटुंबाबरोबर कलह माजला होता तो मिटाविला. व बापाच्या वेळचे शहाणे शहाणे मुत्सद्दी एकत्र करून त्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार पहाण्याचें त्यानें ठरविलें. न्यायाधीश '**गास्कन**' यालाही त्याच्या मंत्रिमंडळांत जागा मिळाली.

१५ लोलर्डांचा कट—लोलर्ड लोकांचीं मतें लोकांत जास्त जास्त प्रसृत होत चाललीं होतीं. तेव्हां हें राष्ट्रावर एक मोठें अरिष्ट आहे असें वाटून त्यांचा पिच्छा पुरविण्याचा निश्चय झाला. '**कॉबहॅम**' (Cobham) या नांवाचा एक सरदारच या वेळीं त्यांचा पुढारी झाला होता. तो पार्लमेंटचाहि सभासद होता. त्याला पकडून जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यांत आली. शिक्षा अंमलांत आणण्यापूर्वी त्याला किल्ल्यांत कोंडून ठेवलें होतें. तेथून युक्तीनें निसटून त्यानें राजालाच पकडण्याचा कट केला. एक दिवस मध्यरात्रीं बरेच 'लोलर्ड' एका मैदानांत जमा झाले. पण ही बातमी कोणी **हेन्री**ला जाऊन सांगितली, तेव्हां त्यानें ताबडतोब तिकडे सैन्य रवाना केलें. या सैन्यानें त्या कटवाल्यांना पिटाळून लावून त्यांच्या तीस पुढाऱ्यांना पकडून जिवंत जाळलें ! **कॉबहॅम वेल्स**मध्यें पळून गेला. पण पुढें चार वर्षांनीं त्यालाहि पकडून आणलें आणि त्याच्या हातापायांत बिड्या ठोकून इ० स० १४१८ या वर्षीं त्याला 'मंदाग्नी'वर भाजून मारण्यांत आलें !

१६ फ्रान्समधील घोंटाळा—फ्रान्समध्यें या वेळीं फारच घोंटाळा माजला होता. राजा चार्लस वेडा झालेला; आर्लिन्स (Orleans) व बरगंडी (Burgundy) या दोन संस्थानिकांमधील चुरस विकोपास जाऊन राज्यांत कायमची दुफळी झालेली; दरबारामध्यें कोणी पुढारी नाहीं; अशा वेळीं फ्रान्सच्या गादीवरील इंग्लंडच्या राजाचा जुना हक्क पुन्हां उपस्थित करून साधल्यास फ्रान्सचें राज्य हस्तगत करावें अशी **हेन्री**सारख्या पराक्रमी पुरुषास इच्छा झाल्यास नवल नाहीं. त्यानें फ्रान्सच्या दरबाराला असा निरोप पाठविला कीं, मागें **जॉन** राजाच्या कारकिर्दींत फ्रान्समधील जो मुलुख इंग्लंडच्या ताब्यांत होता, तो सर्व सोडून

द्या; चार्लस राजाची मुलगी मला द्या; व २० लाख ' क्राऊन ' हुंड्यादाखल द्या. या मागणीला **फ्रान्स**च्या दरबारांतून धुडकावणीचें उत्तर आल्यावर **हेन्रीनें** सैन्याची जमवाजमव करून निघण्याची तयारी केली.

१७ कटाचा मोड व फ्रान्समध्यें प्रयाण—इतक्यांत आपल्याला गादी-वरून काढून टाकून **एडमंड**ला गादीवर बसविण्याचा कट झाला आहे अशी बातमी त्याला समजली. त्यानें लगेच त्या कटाच्या पुढाऱ्यांना पकडून फांशीं दिलें, पण **एडमंड**ला मात्र क्षमा केली. नंतर **बेडफर्ड** (Bedford) नामक सरदाराला **इंग्लंड**चा कारभारी नेमून ३० हजार सैन्यानिशीं **हेन्री** फ्रान्समध्यें उतरला. पुष्कळ युद्धप्रिय सरदार सैन्याच्या खर्चासाठीं दागदागिने व वतनवाडी हीं गहाण टाकून लूट मिळविण्याच्या आशेनें या मोहिमेंत सामील झाले होते.

१८ ॲगिनकोर्टची लढाई--तिकडे फ्रेंचांनींही **नार्मंडी**मध्यें जंगी तयारी केली. ' ॲगिनकोर्ट ' (Agincourt) येथें उभय सैन्यांची गांठ पडून निकराची लढाई झाली. आपल्या पूर्वजांच्या कीर्तीचें स्मरण होऊन इंग्रज लोक मोठ्या शौर्यानें लढले. फ्रेंच लोकांनींही पराक्रमाची शिकस्त केली. पण अखेर इ. स. १४१५ च्या आक्टोबरच्या २५ व्या तारखेस जयश्रीनें इंग्लिशांना माळ घातली. ' आर्लिन्स ' व ' बुर्बोन ' (Bourbone) असे दोघे बडे संस्थानिक व १४ हजार फ्रेंच शिपाई इंग्लिशांच्या हातीं लागले. शिवाय फ्रान्समधील लहान मोठ्या सरदारांपैकीं बहुतेक सरदार व १० हजार शिपाई रणांगणावर पडले. इंग्लिशांकडचेही बरेच लोक मेले होते. त्यामुळें पुढें जाण्याचा हिय्या न करितां हेन्री कॅले येथें आला, व तेथून इंग्लंडला परत आला. प्रसंग मोठ्या आनंदाचा व अभिमानाचा असल्यामुळें **इंग्लंड**च्या प्रजेनें गुढ्या तोरणें उभारून त्याचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. **पार्लमेंटनें** न मागतांच त्याला मोठमोठ्या देणग्या दिल्या. **हेन्रीनें** आपल्या पराक्रमानें सर्व प्रजेला अगदीं दिपवून टाकलें होतें. त्यामुळें त्यानें कसलीही मागणी करण्याचा अवकाश कीं **पार्लमेंट**नें ताबडतोब ती पुरविलीच असा प्रकार चालू झाला. व पुन्हां पूर्वीपेक्षांही मोठ्या प्रमाणावर **फ्रान्स**च्या मोहिमेची तयारी झाली. या गडबडींत **पार्लमेंट**च्या 'लोकसभेनें मात्र कोणत्याही कायद्याला आपली संमति असल्याशिवाय त्याचा अंमल होऊं नये ' असा महत्त्वाचा हक्क राजाकडून संपादन करून घेतला.

१९ फ्रान्सवरील दुसरी मोहीम—इ. स. १४१७ या वर्षी **हेन्री** पुन्हां **फ्रान्स**मध्यें गेला. लहानसहान शहरें ताबडतोब त्याच्या हस्तगत झालीं. **फ्रान्स**च्या

दरबारांतील पक्षभेद कांहीं काळ लुप्त होऊन सर्वांनीं एकदिलानें झटून आधीं शत्रूला हांकून लावावें असें ठरविलें. इतक्यांत **बर्गंडी**च्या संस्थानिकाचा कोणीं खून केला. त्यामुळें त्या पक्षाची मंडळी चिडून जाऊन विरुद्ध पक्षाचा सूड घेण्यासाठीं म्हणून **हेन्री**ला येऊन मिळाली. व ट्रॉय (Troyes) येथें तह होऊन राजकन्या **कॅथेराईन** (Princess Catherine) इजबरोबर **हेन्री**नें लग्न करावें, **चार्लस** जिवंत असेपर्यंत 'फ्रान्सचा राजा' हा किताब त्याजकडे असावा; परंतु राज्यकारभार **हेन्री**नें त्याच्या नांवानें चालवावा; व **चार्लस**च्या मरणानंतर **हेन्री**ला फ्रान्सचें राज्यपद मिळावें असें ठरलें. थोड्या दिवसांनीं **हेन्रीचें कॅथेराईन**शीं लग्न होऊन **हेन्री पारिस**ला गेला, व **ट्रॉय**च्या तहाला **फ्रान्स**च्या दरबाराची मान्यता मिळविण्यांत आली.

२० फ्रान्समधील तिसरी मोहीम—चार्लसच्या वडील मुलानें मात्र अजून शस्त्र खालीं ठेवलें नव्हतें. **हेन्री** आपल्या नवपरिणीत वधूला घेऊन इंग्लंडमध्यें आला, तेव्हां **फ्रान्स**च्या युवराजानें **स्कॉट** लोकांची मदत घेऊन फ्रान्समधील **हेन्री**च्या सैन्यावर छापा घातला. व क्लारेन्स (Clarence) नामक सरदारला ठार मारिलें. ही बातमी समजतांच **हेन्री** पुन्हां **फ्रान्स**मध्यें गेला. आणि इंग्रज सैन्य व **बर्गंडी**च्या बाजूचें फ्रेंच सैन्य यांनीं शत्रुसैन्याचा पाठलाग करून त्याचा धुव्वा उडविला ! विजयोत्साहानें सर्वत्र आनंदी आनंद चालला आहे तोंच **कॅथराईन** राणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. **लंडन व पारीस** या दोन्ही ठिकाणीं मोठा उत्सव होऊन **हेन्री**च्या वैभवाला सीमा राहिली नाहीं.

२१ वैभवाच्या शिखरावरचा मृत्युः—पण सर्वभक्षक काळाला हें त्याचें वैभव सहन झालें नाहींसें दिसतें. सुखाच्या व ऐश्वर्याच्या शिखरावर बसलेल्या हेन्रीवर त्यानें अचानक झडप घातली, व एका क्षणांत त्यानें त्याला उचलून नेलें ! एकाएकीं भगंदराचा विकार उत्पन्न होऊन वैद्यांच्या औषधांचा कांहीं एक उपयोग न होतां **पारीस**जवळ 'व्हिन्सेनस' (Vincenas) येथें इ. स. १४२२ च्या आगस्टच्या २१ व्या तारखेस हेन्रीला मृत्यूनें गांठलें. मरणसमयीं त्याचें वय अवघें ३५ वर्षांचें होतें. त्याचें शव इंग्लंडमध्यें आणून **वेस्टमिन्स्टर**च्या देवळांत पुरण्यांत आलें. '**फ्रान्स**मध्यें आपला एक भाऊ **बेडफर्ड** यानें व इंग्लंडांत दुसरा भाऊ **ग्लावसेस्टर** यानें कारभार पहावा व आपल्या तान्ह्या मुलाचें संगोपन '**वॉरविक**' (Warwick) च्या सरदारानें करावें' असें त्यानें मरतांना सांगून ठेवलें होतें.

२२ हेन्रीच्या अंगचे गुण—हेन्री हा चांगला योद्धा असून मुत्सद्दीही होता. फाजील महत्त्वाकांक्षा हाच त्याच्या अंगचा म्हटला तर मुख्य दुर्गुण होय; परंतु या महत्त्वाकांक्षेनें एकंदरींत इंग्लंडच्या राज्यविस्ताराच्या बाबतींत तरी फायदाच झाला. स्वभावानें तो फार मनमिळाऊ असून मित्र कसे करावे व ते कसे राखावे ही कला त्याला चांगली साधली होती. त्याचे शत्रूसुद्धां त्याला मान देत.

२३ राणीचा पुनर्विवाह—त्याची बायको **कॅथराईन** इनें पुढें वेल्समधील '**ओवेन ट्यूडर**' (Owen Tudor) नांवाच्या गृहस्थाशीं पुनर्विवाह केला. त्याच्यापासून तिला दोन मुलगे झाले. व त्यांपैकीं वडील मुलगा **एडमंड** याच्या वंशाला पुढें कांहीं वर्षांनंतर **इंग्लंड**ची गादी मिळाली. हा कथाभाग मनोरंजक आहे; तो पुढें यथाक्रम सांगण्यांत येईलच. तत्पूर्वी **हेन्रीनें** महत्प्रयासानें **फ्रान्सचें** राज्य इंग्लंडच्या राज्याला जवल जवळ जोडून टाकण्याचा योग आणला होता, तो त्याच्या मरणानंतर कसा फिसकटला व इंग्लंड-फ्रान्समधील या सुप्रसिद्ध शतवार्षिक युद्धाची एकदांची समाप्ति होऊन फ्रान्स देश पुन्हां कसा स्वतंत्र झाला हें पुढील प्रकरणांत पाहूं.

प्रकरण २३ वें.

अबलेचा पराक्रम !

(इ. स. १४२२-इ. स. १४५५)

[१ सहावा हेन्री-२ फ्रान्सबरोबर लढाई-३ ऑरलिन्स-४।५ जोन ऑफ आर्क ६ वेढा उठला-७ चार्लसचा राज्याभिषेक-जोनचा अंत-८।९ बर्गंडी आणि बेडफर्ड १० इंग्रजांची पिछेहाट.-११ हेन्रीचें लग्न-१२ शतवार्षिक युद्धाचा शेवट-१३ हेन्रीची लायकी-मार्गारेटचें कारस्थान-१४ सफक-१५।१६ जॅक केड-केडचा लंडन-मध्यें प्रवेश व निर्गमन-केडचा अंत-१७ समरसेट-१८ पुढील वारस-१९ रिचर्ड, ड्यूक ऑफ यॉर्क-२० मार्गारेटला मुलगा झाला-समरसेटचा पाडाव-२१ यॉर्कचे डावपेंच-२२ यॉर्क आणि लँकेस्टर पक्ष-२३ 'गुलाबी युद्धें.']

१ सहावा हेन्री—'पांचव्या हेन्री'चा मुलगा '**हेन्री**' याला '**सहावा हेन्री**' या नांवानें राज्याभिषेक करून **पार्लमेंटनें** वीस असामींचें एक कौन्सिल

नेमून त्याच्याकडे राज्यकारभार सोंपविला. मृत राजाच्या इच्छेप्रमाणें '**बेडफर्ड**'ला कारभारी (Regent) नेमून **फ्रान्स**बरोबर चाललेल्या लढाईचें काम त्याच्याच-कडे सोंपविण्यांत आलें. **ग्लावसेस्टर**ला 'इंग्लंडचा पालक' (Protector) नेमण्यांत आला. व '**वॉरविक**'च्या जोडीला **बोफर्ट** (Beaufort) नांवाच्या धर्माधिकाऱ्याची नेमणूक करून बालराजाच्या संगोपनाचें काम त्यांच्यावर सोंपविण्यांत आलें.

२ फ्रान्सबरोबर लढाई—'पांचवा हेन्री' मरण पावल्यावर थोड्याच दिवसांनीं **फ्रान्स**चा वेडा झालेला राजा **चार्लस** हाही मरण पावला. तेव्हां पूर्वी ठरलेल्या तहाप्रमाणें **इंग्लंड**चा बालराजा आतां फ्रान्सचाहि राजा झाला म्हणून द्वाही फिरविण्यांत आली. पण फ्रान्समध्यें **चार्लस**चा मुलगा कांहीं स्वस्थ बसला नव्हता. त्यानें '**सातवा चार्लस राजा**' (Charles VII) असा किताब धारण करून फ्रान्सच्या गादीवर आपला हक्क सांगण्यास सुरवात केली. **बेडफर्ड**ची व त्याची झटापट लागून '**क्रेसी**' (Crecy) व '**व्हेरनेल**' (Verneuil) येथील लढायांत चार्लसचा पराभव होऊन त्याला मागें फिरावें लागलें.

३ ऑरलीन्स--**फ्रान्स**च्या दाक्षिणेकडील प्रांत **चार्लस**ला अनुकूल होते; सबब दक्षिण दिशा काबीज केल्याखेरीज **चार्लस**चा पुरा मोड होत नाहीं हें जाणून **बेडफर्ड**नें तिकडे चाल करून जाण्याचा निश्चय केला. '**ऑरलीन्स**' (Orleans) नामक किल्ला हा दक्षिण प्रांताच्या नाक्यावर होता; तो आधीं हस्तगत करावयाचा म्हणून सरदार '**सालिसबरी**' (Salisbury) नामक त्या वेळच्या विख्यात सेनापतीची त्या कामीं नेमणूक झाली. त्यानें **आर्लिन्स**ला वेढा दिला; पण दुर्दैवानें वेढा घालीत असतांच तो मारला गेला. तेव्हां 'सफक' (Suffolk) च्या सरदाराची त्याच्या जागीं नेमणूक झाली. **आर्लिन्स** खास पडणार असें दिसूं लागलें, तेव्हां **फ्रेंच** सेनेच्या तोंडचें पाणी पळालें. व **चार्लस**नें फ्रान्सच्या गादीवरील आपला हक्क सोडून देऊन **फ्रान्स**ला कायमचा रामराम ठोकण्याची तयारी केली ! इतक्यांत अकल्पित रीतीनें एका शेतकऱ्याच्या मुलीकडून मोठा पराक्रम घडून येऊन **चार्लस**ची दैवरेषा उमटली, व अखेर फ्रान्सचें राज्य त्याला प्राप्त झालें !

४ जोन ऑफ आर्क—**फ्रान्स**मधील 'लोरेन' (Lorraine) नांवाच्या प्रांतांत 'डोमरेमी' नांवाचें खेडें आहे. त्यांत एक शेतकरी रहात असे. त्याची १८।१९ वर्षांची एक मुलगी होती. तिचें नांव जोन (Joan). ती त्या

खेड्यांतल्याच एका खाणावळींत नोकरीला होती. इंग्रज लोक **फ्रान्स**मध्यें येऊन आपल्या देशांतील लोकांना व राजाला त्रास देत आहेत व **फ्रेंच** सैन्याचा प्रत्येक लढाईंत पराभव होत आहे अशी बातमी रोजच्या रोज तिच्या कानावर येत असे. एके दिवशीं रात्रीं तिला कांहीं ईश्वरी साक्षात्कार होऊन दुसऱ्या दिवशीं तिनें गांवांत असा पुकारा केला कीं, 'इंग्रजांना फ्रान्समधून हांकून देऊन आपल्या राजाला तूं राज्याभिषेक कर' असा मला ईश्वराचा हुकूम (Mission from Heaven) झाला आहे. पहिल्यानें अर्थातच गांवचे लोक तिची थट्टा करूं लागले; पण त्यांच्या थट्टेला न जुमानतां तिनें दृढ निश्चयानें व खऱ्या कळकळीनें **चार्लस**पर्यंत प्रवेश करून आपलें म्हणणें त्याच्या कानावर घातलें. ती म्हणाली, ' इंग्लिश लोकांना **आर्लिन्स**मधून हांकून लावून आपल्याला ' ऱ्हीम्स ' (Rheims) येथें नेऊन राज्याभिषेक करावा असा मला परमेश्वराचा हुकूम झाला आहे. '

५ या वेळीं **चार्लस** राजा अगदीं टेंकीस येऊन त्याचा सर्व धीर खचून गेला होता. **जोन**चें बोलणें ऐकून एक अंधुक आशेचा किरण त्याच्या अंतःकरणांत शिरून त्याला थोडीशी उमेद आली, व पुन्हां प्रयत्न करून पहावा असें त्यानें ठरविलें. **जोन**चें बोलणें आपल्याला खरें वाटतें असें बाह्यात्कारीं दाखवून त्यानें तिला मोठा मान दिला. व ही कोणी स्वर्गांतील देवता फ्रान्सच्या उद्धारार्थ अवतार घेऊन आली आहे असें सांगून तिच्याविषयीं अद्भुत गोष्टी लोकांत प्रसृत केल्या. फ्रेंच सैन्याला आपल्याला ईश्वराचा पाठिंबा आहे असें वाटून त्यांच्या अंगीं नवीन जोम उत्पन्न झाला व तिला पुढारी करून फ्रेंच सैन्य तिच्या हुकुमाप्रमाणें वागण्यास तयार झालें.

६ **वेढा उठला—आर्लिन्स**च्या किल्ल्याला वेढा पडल्यामुळें आंतील लोकांची उपासमार होण्याची वेळ आली होती. त्यांना अन्नसामुग्री पोंचविण्याचें काम तिनें प्रथम हातीं घेतलें. वेढा घालून बसलेल्या **इंग्रज** फौजेच्याहि कानांवर तिच्या अद्भुत गोष्टी येऊन पोंचल्या होत्याच. ते तिला ही कोणीतरी चेटकीण (Witch) आहे असें समजत असत; व ती केव्हां काय करील याचा नेम नाहीं असें वाटून त्यांचेंहि धैर्य खचत चाललें होतें. अंगांत चिलखत चढवून व करड्या रंगाच्या घोड्यावर स्वार होऊन ती जेव्हां इंग्लिश सैन्यासमोर आली, तेव्हां तिच्यावर हात टाकल्यास काय अनर्थ गुजरेल कोण जाणे, असें मनांत येऊन इंग्लिश सैन्य स्वस्थ बसलें, आणि जोन व तिच्याबरोबरचें फ्रेंच सैन्य दाणागोटा घेऊन खुशाल किल्ल्यांत जाऊन पोंचलें !

ऑर्लिन्स शहरच्या लोकांना फार आनंद व अभिमान वाटून त्यांच्या अंगीं नवीन स्फुरण आलें; बाहेर वेढा घालून बसलेल्या इंग्लिश सैन्यावर किल्ल्यांतून हल्ले होऊं लागले; व इंग्रज सेना भयभीत होऊन वेढा उठवून निघून गेली.

७ **चार्लसचा राज्याभिषेक**—अशा रीतीनें आर्लिन्सचा वेढा उठविण्याचें एक काम तर या 'पोरी' नें बजावलेंच. पुढलें काम चार्लसला राज्याभिषेक करण्याचें. तेंही या 'आर्लिन्स–कन्ये' (Maid of Orleans)नें **ऑर्लिन्स**चा वेढा उठल्यावर दोन महिन्यांनीं **र्‍हीम्स** (Rheims) येथें पार पाडलें. **चार्लस**ला राज्याभिषेक करून झाल्यावर जोन आपलें काम संपलें, आपल्याला आतां रजा द्या म्हणून राजाला सांगूं लागली; पण **चार्लस**नें फारच आग्रह करून तिला आपल्या सैन्यांत राहून घेतलें. पण याचा परिणाम चांगला झाला नाहीं. फ्रान्समधील **बर्गंडी** पक्षाचे लोक **इंग्लिशां**ना मिळून त्यांच्या बाजूनें लढत होते हें मागें सांगितलेंच आहे. त्या मंडळींपैकीं एकानें या मुलीला पकडून **इंग्लिश** सरदार **बेडफर्ड** याच्या स्वाधीन केली. चेटुक अगर जादुटोणा करणें हा त्या वेळीं मोठा गुन्हा मानला जाई, व **जोन** ही चेटकीण आहे असा सर्वांचा समज असल्यामुळें धर्माधिकार्‍यांच्या न्यायसभेपुढें तिची चौकशी होऊन तिला जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यांत आली. आणि 'रुवें' (Rouen) येथील बाजारांत इ० स० १४३१ च्या जून महिन्याच्या १४ व्या तारखेस तिला उघड्यावर जाळून मारण्यांत आलें !

८ **बर्गंडी आणि बेडफर्ड**—पण अशा रीतीनें त्या निरपराधी स्त्रीचा जीव घेतल्यामुळेंच कीं काय पुढें फ्रान्समधील इंग्लिशांचे सर्व डाव उलटत चालले. **चार्लसला र्‍हीम्स** येथें राज्याभिषेक झाल्यावर तोडीस तोड म्हणून **इंग्लिशां**नीं आपल्या बालराजाला **पारिस** येथें नेऊन राज्याभिषेक करविला. उभय पक्षांमध्यें राहून राहून लढाया चालल्याच होत्या. दरम्यान **फ्रान्स**मधील इंग्लंडच्या बाजूला मिळालेला प्रबल सरदार **बर्गंडी** व इंग्रज कारभारी **बेडफर्ड** यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न झाला. व **बर्गंडीनें** पुन्हां आपल्या चार्लस राजाला जाऊन मिळण्याचें ठरविलें.

९ इ० स. १४३५ सालीं आरास (Arras) येथें **बर्गंडी** व **चार्लस** यांच्यामध्यें तह झाला. हा त्यांचा समेट होत आहे तोंच इंग्रज कारभारी **बेडफर्ड** **रुवें** येथें मरण पावला. व इंग्लंडमधून नवा कारभारी येण्यापूर्वीच **पारिस** शहर फ्रेंचांच्या हातीं लागलें.

१० इंग्रजांची पिछेहाट—इकडे इंग्लंडमध्येंही '**ग्लावसेस्टर**' व **विंचेस्टर**चा धर्माधिकारी यांच्यामध्यें भांडण लागून फ्रान्समध्यें **इंग्लिश** सैन्याला कुमक जावयाची ती जाईना. तेव्हां अखेर इ० स० १४४४ या वर्षीं दोन वर्षांपुरता तात्पुरता तह (Truce) करून इंग्लिश सैन्य माघारें आलें.

११ हेन्रीचें लग्न--बालराजा **हेन्री** हा आतां मोठा होत चालला होता. **फ्रान्स**मधील 'आंजु' (Anjou) व 'मेन' (Maine) या दोन संस्थानांचा अधिपति 'रेणे' (Rene) म्हणून होता. त्याची सुस्वरूप मुलगी **मार्गारेट** (Margaret) इजबरोबर त्याचा विवाह होण्याचें ठरलें. **फ्रान्स**मधील हे प्रांत म्हणजे **नार्मंडी** प्रांताचें नाक असें समजत असत. या लग्नांत मध्यस्थ **सफक** नांवाचा इंग्लिश सरदार होता. त्यानें गुप्तपणें हे प्रांत वधूच्या बापाला कायमचे तोडून देण्याचा ठराव केला. आणि हा उलटा हुंडा देऊन **मार्गारेटचें हेन्रीशीं** लग्न लागलें.

१२ शतवार्षिक युद्धाचा शेवट--पण **रेणे** हा कांहीं झालें तरी जातीनें फ्रेंच व फ्रान्सच्या राजाचा मांडलिक होता. त्याचा ओढा **फ्रान्स**च्या कल्याणाकडे असणें साहजिकच होतें. दोन वर्षांच्या तहाची मुदत संपल्याबरोबर फ्रेंच सैन्य **आंजू** व **मेन**च्या मार्गानें **नार्मंडी**मध्यें घुसलें व त्यांनीं **नार्मंडी** प्रांत सहज काबीज करून घेतला. नंतर **चार्लस** राजा दक्षिणेकडे '**गिनी**' वगैरे प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत होते तिकडे वळला. एकामागून एक सर्व महत्त्वाचीं ठाणीं फ्रेंचांच्या हस्तगत झालीं. अखेर इ० स० १४५१ त **कॅले**व्यतिरिक्त एकहि ठाणें इंग्लिशांच्या हातीं राहिलें नाहीं. **तिसऱ्या एडवर्ड**च्या कारकिर्दींत **फ्रान्स**शीं सुरू झालेल्या 'शतवार्षिक युद्धा'ची अशा रीतीनें समाप्ति होऊन इंग्लंडच्या राजांची फ्रान्सचा बादशहा होण्याची आशा समूळ नष्ट झाली !

१३ हेन्रीची लायकी--**हेन्री** जसजसा मोठा होऊं लागला तसतसे त्याच्या अंगचे बरेवाईट गुणही वृद्धि पावूं लागले. तो शरिरानें व मनानें दुर्बल असून राज्यकारभार हातीं घेण्याला लायक नाहीं असें वाटल्यामुळें सगळा राज्यकारभार **ग्लावसेस्टर** व **बोफर्ट** या दोन मुत्सद्यांच्या हातीं देण्यांत आला. पण **हेन्री**ची बायको **मार्गारेट** ही फार हुषार, तीव्र बुद्धीची, व उत्साही असल्यामुळें तिनें राज्यकारभारांत लौकरच बदल घडवून आणला. **ग्लावसेस्टर** व **बोफर्ट** यांच्यामध्यें पुढें कांहीं कारणानें बेबनाव झालासें पाहून तिनें आपल्या सर्व वजनाचा **बोफर्ट**च्या बाजूनें उपयोग

केला. आणि त्याचा परिणाम **ग्लावसेस्टर**ला राजद्रोहाबद्दल प्रथम तुरुंगवास भोगावयास लावून नंतर ठार मारण्यांत झाला.

१४ **सफक—ग्लावसेस्टर**ला मारून महिना दीड महिना झाला नाहीं तोंच **बोफर्ट**वरही तोच आरोप ठेवून त्यालाही यमसदनास पाठविण्यांत आलें; आणि **'सफक'** चा सरदार–ज्यानें हेन्री व मार्गारेट यांचा विवाह घडवून आणला होता तो—आतां राजाचा मुख्य मंत्री बनला ! परंतु इंग्रजांचीं फ्रान्समधील महत्त्वाचीं ठाणीं **मार्गारेट**च्या बापाला देऊन टाकून ज्यानें पर्यायानें **फ्रान्स**मधील सगळी मोहीम फुकट घालविली त्या **'सफक'**ला लोक विसरले नव्हते. त्याच्याबद्दल सर्वत्र असंतोष पसरत चालला होता. शेवटीं **पार्लमेंट**नेंही इ.स.१४५० या वर्षी देशद्रोह केल्याचा त्याच्यावर आरोप ठेविला. राजा मध्यें पडून आपल्या दोस्ताचा जीव बचावावा म्हणून त्यानें त्याला आपण होऊनच पांच वर्षांच्या हद्दपारीची शिक्षा दिली; पण त्याचे शत्रु त्याला जिवानिशीं सोडण्याला तयार नव्हते. ज्या गलबतांतून तो फ्रान्समध्यें **कॅले** येथें जाण्यास निघाला होता त्या गलबतावर कांहीं इंग्रज खलाशी चढले व ' रामराम देशद्रोही साहेब !' (Welcome ! traitor !) म्हणून त्यांनीं त्याला सलामी दिली ! नंतर त्यांनीं त्याला आपल्या होडीवर ओढून घेतलें व एका गंजलेल्या तरवारीनें त्याचें डोकें छाटून त्याचें प्रेत समुद्रांत फेंकून दिलें ! हे खलाशी केंट जिल्ह्यांतील रहिवाशी असून मागें **वॅट टायलर**च्या बंडांत जे लोक सामील झाले होते त्यांचेच वंशज होते.

१५ **जॅक केड**—लौकरच अशी बातमी उठली कीं, **हेन्री** राजा आपल्या स्नेह्याचा जीव घेतल्याबद्दल **केंट** जिल्ह्यांतील लोकांचा भयंकर सूड घेणार आहे. तेव्हां **' जॅक केड '** (Jack Cade) नांवाचा एक पुढारी उत्पन्न होऊन त्यानें बंड करण्याची तयारी केली. हां हां म्हणतां वीस हजार लोक त्याला येऊन मिळाले. ही सर्व मंडळी ' ब्लॅकहीथ ' (Blackheath) येथें येऊन त्यांनीं राजाच्या मंत्रिमंडळाकडे एक अर्ज सादर केला. त्या अर्जांत ' हल्लींचें मंत्रिमंडळ काढून टाकून त्याच्या जागीं लोकप्रिय अशा नवीन प्रधानांची नेमणूक करावी; सार्वजनिक पैशाची उधळपट्टी करूं नये; व **पार्लमेंट**मधील लोकांचे प्रतिनिधि निवडण्याच्या पद्धतीवर कोणताहि दाब असूं नये ' असें मागणें केलें होतें. राजाच्या ' कौन्सिलनें ' हा अर्ज धुडकावून दिला, तेव्हां बंडवाल्यांनीं सशस्त्र होऊन राजाच्या सैन्याचा ' सेव्हनओक्स (Seven oaks) कडे पराभव केला, व विजयोत्साहानें ते लंडनमध्यें शिरले.

१६—**जॅक केडनें** प्रथम आपल्या अनुयायांना चांगली शिस्त लावली होती. पण तिसऱ्या दिवशीं कित्येक बंडवाल्यांनीं **लंडन**मधील कांहीं सावकारांचीं घरें लुटल्यामुळें **लंडन**चे रहिवासी खवळले, व त्यांनीं लौकरच कित्येक बंडवाल्यांची कत्तल करून उरलेल्यांना **लंडन**मधून हांकून लावलें ! **विंचेस्टर**चा धर्माधिकारी मध्यें पडून त्यानें ' तुम्ही आपापल्या घरीं निघून जाल तर तुम्हांस क्षमा मिळेल ' असें आश्वासन दिल्यावर बंडवाले निघून गेले. पण हें क्षमेचें आश्वासन बाजूस ठेवून राजसैन्यानें पुढें बंडवाल्यांचा पाठलाग करून त्यांच्या पुढाऱ्यांना पकडून ठार मारिलें ! **जॅक केड** पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता, पण तो फसला. त्यालाही ' लिवीस ' (Lewes)-जवळच्या एका बागेंत पकडून ठार करण्यांत आलें !

१७ समरसेट—' **केड** 'च्या बंडाचा मोड झाल्यावर ' **समरसेट** ' (Somerset) नांवाच्या सरदाराची मुख्य मंत्र्याच्या जागीं नेमणूक झाली. हा सरदार पूर्वीं **नार्मंडी**चा गव्हर्नर होता. पण त्यानें **नार्मंडी** हातची घालविल्यामुळें इंग्लिशांना या वेळीं तो फार अप्रिय झाला होता. शिवाय **हेन्री**चा दुबळेपणा दिवसें-दिवस वाढत जाऊन त्याला अद्यापि मूलबाळही कांहीं झालें नव्हतें. तेव्हां त्याच्या मागून गादी कोणाला द्यावी याचीहि चर्चा बऱ्या लोकांत चालू होती.

१८ पुढील वारस—सहावा हेन्री हा **तिसऱ्या एडवर्ड**च्या तिसऱ्या मुलाचा वंशज होता. **तिसऱ्या एडवर्ड**च्या दुसऱ्या मुलाच्या वंशजांना एकीकडे ठेवून तिसऱ्याच्याच वंशजाला आतांपर्यंत गादी मिळत आली होती; पण त्याचा जर आतां नष्टांश होण्याचा समय आला, तर वडील मुलाच्या शाखेकडे पुनः गादीचा वारसा जाणें हें रास्तच होतें.

१९ रिचर्ड, ड्यूक ऑफ यॉर्क—या शाखेंतील पुरुषांत **रिचर्ड** नांवाचा ' **यॉर्क** 'चा सरदार प्रमुख असून या वेळीं तो आयर्लंडचा राज्यकारभार पहात असे. पुढें आपल्याला गादी मिळवावयाची तर आपण एव्हांपासून सावध असलें पाहिजे व **हेन्री** राजा दुर्बळ असल्यामुळें इंग्लंडचा मुख्य कारभार आतांच आपल्या हातीं येईल तर फार बरें असें त्यास वाटणेंहि साहजिक होतें. तेव्हां **समरसेट** हा मुख्य कारभारी झाल्याचें ऐकून तो दहा हजार लोकांनिशीं **लंडन**वर चालून आला. व **समरसेट**ला ताबडतोब कमी करा म्हणून त्यानें राजाकडे मागणी केली. पण या प्रयत्नांत त्यास यश आलें नाहीं. तेव्हां तो इ० स० १४५२ या वर्षीं वेल्सच्या हद्दीवरील ' विगमूर ' (Wigmore) नामक आपल्या किल्ल्यांत निघून गेला.

२० मार्गारेटला मुलगा झाला--पुढल्या वर्षी **मार्गारेट** राणीला मुलगा झाला. त्याचें नांव **एडवर्ड** असें ठेविलें. त्याच्या पुढल्या वर्षी राजाला वेडाची लहर आली. आधींच मनाचा दुबळा, त्यांत आणखी या वेडाची भर पडली. **समरसेट** मुख्य कारभाऱ्याच्या जागीं होता, पण त्याच्याविषयीं लोकांची मनें शुद्ध नव्हतीं, व दिवसेंदिवस '**यॉर्क**' चा सरदार **रिचर्ड** याच्याविषयीं लोकमत अनुकूल बनत चाललेलें, तेव्हां '**यॉर्क**' च्या पक्षाचा वरचढपणा सर्वत्र दिसून येऊं लागलेला पाहून इ० स० १४५४ या वर्षी **पार्लमेंटनें समरसेटला** अधिकारपदावरून काढून टाकून **यॉर्कच्या** रिचर्डलाच राज्याचा पालक (Protector) नेमिलें.

२१ सरदार यॉर्कचे डावपेंच—पुढल्या वर्षी राजा **हेन्री** बरा झाला, व **मार्गारेट** राणीचें वजन पुन्हां वाढूं लागलें. तिला **यॉर्क** हा दरबारी मंडळांत नको होता. तेव्हां त्याला घरीं बसवून **समरसेटची** त्याच्या पहिल्या हुद्यावर पुन्हां नेमणूक करण्यांत आली. वारसाच्या कायद्यानें **इंग्लंडच्या** गादीवर आपला हक्क असतां गादी नाहीं तर नाहीं निदान **हेन्रीच्या** नांवानेंच कां होईना राज्याचीं मुख्य सूत्रें आपल्या हातीं होतीं, तींही नाहींशीं झाल्यामुळें '**यॉर्क**' ला फार चीड येऊन **समरसेटला** काढून टाकून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेण्याचा निश्चय करून त्यानें सैन्याची जमवाजमव केली. '**सालिसबरी**' (Salisbury) व '**वारविक**' (Warwick) असे दोन प्रमुख सरदार त्याला मिळाले; व युद्धाला सुरवात झाली.

२२ यॉर्क आणि लँकेस्टर पक्ष—राजा **हेन्रीचा** 'मूळ पुरुष' जो **तिसऱ्या एडवर्डचा तिसरा मुलगा,** तो पूर्वी लँकेस्टरचा जहागिरदार होता, म्हणून त्याच्या वंशाला 'लॅकेस्टरचें घराणें' म्हणत. आतां राज्यांत दोन पक्ष होऊन रिचर्ड हा '**यार्क**'चा सरदार असल्यामुळें त्याच्या पक्षाच्या लोकांना 'यॉर्क पक्षी' व हेन्रीच्या पक्षाच्या लोकांना 'लँकेस्टर पक्षी' अशी नांवें प्रचारांत आलीं. शिवाय 'यॉर्क पक्षा'च्या लोकांच्या निशाणावर पांढरें गुलाबाचें फूल व 'लँकेस्टर पक्षा' च्या निशाणावर तांबडें गुलाबाचें फूल अशा निशाण्या असल्यामुळें या दोन पक्षांत पुढें ज्या लढाया झाल्या त्यांना इतिहासांत '**गुलाबी युद्धें**' असें नांव पडलेलें आहे.

२३ या तंट्यांत वास्तविक सामान्य इंग्लिश जनतेचें नफा-नुकसान कांहींच नव्हतें. हा सरदारांसरदारांमधील झगडा होता. पण या युद्धांत पुढें मोठमोठ्या सरदारांचा सत्यनाश होऊन त्यांचीं घराणीं धुळीस मिळाल्यामुळें आणि राजा व सामान्य रयत

यांच्यामध्यें सरदारांचा जो बलाढ्य वर्ग होता त्याचें वजन कमी झाल्यामुळें, पूर्वी राजाविरुद्ध भांडण सुरू झालें असतां सामान्य रयतेला मधून मधून जो सरदारांचा पाठिंबा मिळत असे तो नाहींसा झाला. राजसत्तेची अमर्याद वाढ होऊन राजे लोकांनीं प्रजेला कस्पटासमान लेखण्याची प्रवृत्ति वाढत जाणें हा या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम होय. हा बनाव कसा घडून आला ती हकीकत पुढें क्रमानें वाचकांस वाचावयास मिळेलच. पुढील प्रकरणांत या गुलाबी युद्धांतील लढायांचें थोडक्यांत वर्णन देऊं.

प्रकरण २४ वें

यादवी !

(इ० स० १४५५–इ० स० १४८५)

[१ पहिला खटका–रिचर्ड राजपालक झाला–२ रिचर्डचें पलायन–३ हेन्रीला पकडलें–४ यॉर्कचा पराभव–रिचर्डचा अंत–५ लँकॅस्टरचा पराभव–चवथा एडवर्ड–६ हेन्रीची योग्यता–७।८ पुनः लढाई–मार्गारेटचें पलायन–हेन्रीचें दैव–९ वॉरविक–एडवर्डचा विवाह–१० एडवर्ड व वॉरविक यांचें भांडण–११ एडवर्ड राजाचें पलायन–सहावा हेन्री पुनः गादीवर आला–हेन्रीचें वेड–१२ बर्गंडी–एडवर्डचे बेत–वॉरविकचा पराभव व शेवट–१३ मार्गारेटला पकडलें–दोन एडवर्ड–बाणेदार उत्तर–अर्भकांचा प्राण–हेन्रीचा मृत्यु–१४ फ्रान्सवरें स्वारी–खुषीची सक्ति–१५ तह–१६ भावाशीं वाद-१७ एडवर्डचा अंत-१८ त्याच्या अंगचे गुणदोष-१९।२० एडवर्डच्या कारकिर्दीतील विशेष गोष्टी–छापण्याची कला–टपालाची सोय–२१।२२ ग्लावसेस्टरचीं कारस्थानें–२३।२४ भावाच्या मुलांची अडचण–२५ तिसरा रिचर्ड २६ नव्या राजाचीं आश्वासनें–२७ राजपुत्रांचा वध–२८ लँकॅस्टर पक्षाची जमवाजमव आणि यादवीचा शेवट.]

१ पहिला खटका—दोन्ही पक्षाच्या लोकांमध्यें पहिला खटका उडाला तो इ० स० १४५५ च्या मे महिन्याच्या २३ व्या तारखेस **सेंट आल्बन्स** (St. Albans) नांवाच्या गांवाजवळ. त्या ठिकाणीं **समरसेट** लढाईंत मारला गेला.

आणि राजा **हेन्री यॉर्क**पक्षीय मंडळींच्या हातीं लागला. **रिचर्ड**चा पहिला व मुख्य उद्देश **समरसेट**चा पाडाव करण्याचा होता. तो त्याच्या मरणानें साध्य झाल्यामुळें पुढें दोन तीन वर्षें बाहेरून दिसण्यांत तरी शांततेंत गेलीं. **समरसेट**च्या जागीं **रिचर्ड**ची ' राज-पालक ' म्हणून नेमणूक झाली.

२ रिचर्डचें पलायन—पुढें एक दिवस **यॉर्क**पक्षीय सरदार ' **वॉरविक** ' याच्या हाताखालील एका सरदाराचें राजाच्या खास दिमतींतल्या एका सरदाराशीं भांडण होऊन दोन्ही पक्ष पुन्हां हत्यार घेऊन उठले. व ' **ब्लोरहिथ** ' (Bloreheath)-च्या लढाईत राजपक्षाचा पुढारी ' **आडले** ' (Adley) हा मरण पावून यॉर्क-पक्षाला जय मिळाला. पण लगेच ' **लडलो** ' (Ludlow) येथें पुन्हां राजपक्षाची सरशी झाली, आणि **रिचर्ड** जिवाच्या भीतीनें आयर्लंडमध्यें पळून गेला.

३ हेन्रीला पकडलें--इ० स० १४६० या वर्षी **यॉर्क**पक्षानें पुन्हां कंबर बांधली व सरदार ' **वॉरविक** ' यानें ' **नॉर्दम्टन** ' (Northampton) येथें राजपक्षीय मंडळीचा पराभव करून राजा **हेन्री**ला पकडलें. तेव्हां राणी आपल्या लहान मुलाला घेऊन **स्कॉटलंड**मध्यें पळून गेली. **रिचर्ड**नें उघडपणें आतां आपला गादीवरील हक्क जाहीर केला, आणि **पार्लमेंट**नेंहि त्याचा हक्क कबूल करून **हेन्री**च्या मागून **रिचर्ड**ला गादी देण्याचा ठराव केला.

४ यॉर्कचा पराभव—मार्गारेट राणी **स्काटलंड**मध्यें होती; तिला आपल्या मुलाचा हक्क पार्लमेंटनें बुडविल्याबद्दल संताप येऊन तिनें लँकेस्टर पक्षाची पुन्हां घडी बसविली, व मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेकडे चालून येऊन ' **वेकफील्ड** '-(Wakefield) च्या लढाईत यॉर्कपक्षाचा पराभव केला. दुर्दैवानें या लढाईत **रिचर्ड** मारला गेला. तेव्हां त्याच्या डोक्यावर कागदाचा मुकूट चढवून तें यॉर्कच्या वेशीवर नेऊन टांगण्यांत आलें ! **रिचर्ड**चा धाकटा मुलगा व इतर एकदोन प्रमुख सरदारही या लढाईत प्राणास मुकले, आणि कित्येकांना कैदी होऊन शिरच्छेदाची शिक्षा भोगावी लागली.

५ लँकेस्टरचा पराभव—पण एवढ्यानें **यॉर्क**पक्षीय मंडळीचा धीर खचला नाहीं. **रिचर्ड**चा पक्ष सत्पक्ष आहे असें वाटून त्याचा वडील मुलगा **एडवर्ड** याच्याभोंवतीं पुष्कळ सरदार पुन्हां एकत्र झाले. व इ० स० १४६१ या वर्षी त्यांनीं लँकेस्टर पक्षाचा ' **मार्टिमरक्रास** ' (Mortimer's Cross) च्या लढाईत पुरा मोड केला. या लढाईत राजमातेचा पुनर्विवाहित नवरा ' **ओवेन**

ट्यूडर ' हा **यॉर्क** पक्षीय मंडळीच्या हातीं लागला. त्याला त्यांनीं ठार मारलें. पुढल्या वर्षी **मार्गारेट** राणीनें ' **सेंट आल्बन्स** 'च्या दुसऱ्या लढाईत ' **वॉरविक** ' चा पराभव केला, व ती **लंडन** येथें यावयास निघाली. पण लंडनच्या नागरिकांनीं तिला आंत घेण्याचें नाकारलें. इतक्यांत **रिचर्ड**चा मुलगा **एडवर्ड** पश्चिमेकडून मोठें सैन्य घेऊन येत आहे अशी बातमी आल्यामुळें **मार्गारेट** उत्तरेकडे निघून गेली. **एडवर्ड** लंडनमध्यें येऊन पोहोंचला, **पार्लमेंट**ची सभा भरली व सरदार, धर्माधिकारी, व लंडनचे नागरिक यांनीं एकमतानें त्याला राजपद देऊन ' **चवथा एडवर्ड**' (Edward IV) म्हणून त्याच्या नांवानें द्वाही फिरविली. अशा रीतीनें लँकॅस्टरच्या घराण्याचा इंग्लंडच्या गादीवरील हक्कसंबंध नाहींसा करण्यांत आला.

६ हेन्रीची योग्यता—हेन्री राजा शरिरानें व मनानें अशक्त असून त्या अस्वस्थतेच्या काळांत राज्यसूत्रें हातीं वागविण्यास अगदींच नालायक होता. त्याच्या कारकिर्दींत विद्येला मात्र बरेंच उत्तेजन मिळालें. राणी **मार्गारेट** ही फार हुषार व कारस्थानी होती. तिला **एडवर्ड** नांवाचा एक मुलगा होता हें मागें सांगितलेंच आहे.

७ पुन्हां लढाई—**रिचर्ड**चा मुलगा **एडवर्ड** हा ' **चवथा एडवर्ड** ' म्हणून गादीवर आला तेव्हां त्याचें वय फक्त १९ वर्षांचें होतें. तो नांवानें इंग्लंडचा राजा झाला खरा, पण सर्व इंग्लंड कांहीं पूर्णपणें त्याच्या ताब्यांत आलें नव्हतें. **मार्गारेट** राणी नवऱ्याला घेऊन उत्तरेकडे गेली होती. तिकडचे सरदार तिला अनुकूल होते. तेव्हां सरदार ' **वॉरविक** ' पन्नास हजार सैन्य घेऊन तिच्यावर चाल करून गेला. **मार्गारेट**कडेही या वेळीं ६० हजार सैन्य जमा झालें होतें. '**टावटन**' (Towton) येथें उभय पक्षांची गांठ पडली. व निकराची लढाई होऊन अखेर लँकॅस्टर पक्षाचा पुरा मोड झाला. **मार्गारेट** नवऱ्याला घेऊन **स्काटलंड**मध्यें पळून गेली. व राजा **एडवर्ड** लंडनमध्यें येऊन त्यानें **पार्लमेंट**ची रीतसर सभा बोलाविली. या सभेनें **हेन्री, मार्गारेट,** व तिचा मुलगा **एडवर्ड** या तिघांवरही अनधिकारित्वाचा शिक्का मारला!

८ मार्गारेट राणी पुढें **स्काटलंड**मधून फ्रान्समध्यें गेली आणि तिकडून थोडेंसें सैन्य घेऊन पुन्हां इंग्लंडमध्यें आली. अवशिष्ट लँकॅस्टरपक्षीय सरदार तिच्याभोंवतीं जमा झाले; पण ' **हेजले मूर** ' (Hedgeley Moor) व '**हेक्झाम** ' (Hexham) येथील लढायांत त्यांचा पराभव होऊन **मार्गारेट** व तिचा मुलगा रानांत पळून गेलीं. पुढें रानांतल्या एका दरवडेखोराच्या मेहरबानीनें व मदतीनें

त्यांनीं किनारा गांठला व तेथून **फ्लांडर्स** येथें पलायन केलें ! **हेन्रीचें** दैव इतकें अनुकूल नव्हतें. तो शत्रूच्या हातीं लागला, व **लंडन**च्या किल्ल्यांत (The Tower) ' सरकारी पाहुणचार ' खात पडला !

९ वॉरविक—' चवथ्या एडवर्ड'ला राजपद मिळण्याला मुख्य मदत '**वॉरविक**' या प्रबळ सरदाराची होती, हें मागील हकीकतीवरून दिसून आलेंच असेल. या '**वॉरविक**'चें व '**एडवर्ड**'चें आतां वांकडें आलें. **फ्रान्स**मध्यें '**सॅव्हॉय**' (Savoy) नामक संस्थानिकाची एक सुस्वरूप मुलगी होती. तिज-बद्दल मागणी करण्यासाठीं **एडवर्डनें वॉरविक**ला पाठविलें. तो तिकडे असल्या मुदतींत **एडवर्ड** एक दिवस सहज शिकारीहून परत येत असतां '**रिचर्ड वुडव्हिल**' (Richard Woodville) नांवाच्या एका छोट्या जमिनदाराच्या घरीं आला. या जमिनदाराची मुलगी **इलिझाबेथ** (Elizabeth) ही फार सुस्वरूप असून ती लँकेस्टर पक्षाच्या एका सरदाराला दिलेली होती. परंतु तिचा नवरा **सेंट आल्बन्स**च्या दुसऱ्या लढाईत पडल्यामुळें ती विधवा होऊन परत बापाच्या घरीं आली होती. या तरुण विधवेच्या सौंदर्यानें **एडवर्ड** मोहित होऊन त्यानें तिला आपली राणी करण्याचें कबूल केलें, व लवकरच दोघांचा विवाह झाला. तिचा बाप व भाऊ यांना राजदरबारांतील मोठमोठ्या जागा देण्यांत आल्या.

१० एडवर्ड व वॉरविक यांचें भांडण—' वॉरविक ' फ्रान्समधून परत आला तेव्हां विरुद्ध पक्षाच्या मंडळीचा राजदरबारांत प्रवेश झालेला त्याच्यानें पाहवेना. अखेर भांडण विकोपास जाऊन **वॉरविक**नें उघडपणें राजाविरुद्ध बंड पुकारलें. '**वुडव्हिल**'च्या कुटुंबाचा राजदरबारीं प्रवेश झाल्यामुळें रागावलेले इतरहि अनेक सरदार त्याला येऊन मिळाले. **एडवर्ड**चा भाऊ **क्लारेन्स** (Clarence) याला **वॉरविक**ची वडील मुलगी दिलेली होती. तोही **वॉर-विक**ला जाऊन मिळाला. '**यॉर्क**' व '**लिंकन**' या दोन जिल्ह्यांत बंडाला सुरवात झाली. व '**एजकूट**' (Edgecoot) येथें इ० स० १४६९ या वर्षी **एडवर्ड**च्या सैन्याचा पराभव होऊन त्याचा सासरा व मेहुणा **वॉरविक**च्या हातीं लागले. त्यांना **वॉरविक**नें ठार मारिलें. पुढल्या वर्षी **वॉरविक** व **एडवर्ड**चा भाऊ **क्लारेन्स** हे देशद्रोही आहेत असें पुकारण्यांत आलें ! तेव्हां ते फ्रान्समध्यें पळून गेले.

११ एडवर्ड राजाचें पलायन—या वेळीं **फ्रान्स**मध्यें '**अकरावा लुई**' (Louis XI) राज्य करीत असून **मार्गारेट** राणीही तेथें होती. **मार्गारेट**,

वॉरविक व क्लारेन्स अशीं एक झालीं. मार्गारेटचा मुलगा एडवर्ड याला वॉरविकनें आपली दुसरी मुलगी देऊन हा स्नेहसंबंध अधिक दृढ केला. दरम्यान इकडे इंग्लंडमध्यें वॉरविकविषयीं लोकांची सहानुभूति वाढत जाऊन त्याचाच पक्ष खरा आहे असें पुष्कळांना वाटूं लागलें. पांच महिन्यांनीं फ्रान्सच्या राजाची मदत घेऊन 'वॉरविक' इंग्लंडमध्यें आला. त्या वेळीं तो इतका लोकप्रिय झाला होता कीं, तो इंग्लंडमध्यें आला ही बातमी समजल्याबरोबर इंग्लिश सरदार भराभर त्याला येऊन मिळूं लागले. व थोड्याच दिवसांत साठ हजार सैन्य त्याच्याभोंवतीं जमा झालें. 'राजा एडवर्ड' वॉरविकची ही तयारी पाहून भीतीनें फ्लांडर्स (Flanders) मध्यें पळून गेला. वॉरविकनें 'सहाव्या हेन्री'ला किल्ल्यांतून बाहेर काढून इ०स० १४७० च्या आक्टोबर महिन्यांत त्याच्या नांवानें द्वाही फिरविली. पण या वेळीं तो फारच अशक्त व वेडा झाला असल्यामुळें पुढील वर्षीं पार्लमेंटची सभा भरून हेन्रीचा मुलगा 'एडवर्ड' हा वयांत येईपर्यंत 'वॉरविक' व 'क्लारेन्स' यांनीं राज्य-कारभार पाहावा व एडवर्डचें मध्येंच कांहीं बरें वाईट झाल्यास 'क्लारेन्स'ला राज्यपद द्यावें असें ठरविण्यांत आलें.

१२ बर्गंडी—यॉर्कपक्षीय राजा एडवर्ड फ्लांडर्समध्यें होता. तिकडे फ्रान्स-मधील एक प्रबल सरदार 'बर्गंडी' (Burgundy) याच्याशीं आपल्या बहिणीचें लग्न लावून देऊन त्यानें 'बर्गंडी'ची मैत्री जोडली. व त्याच्याकडून दोन हजार सैन्य घेऊन सहा महिन्यांच्या आंतच तो पुन्हां इंग्लंडमध्यें आला. 'शुभ्र गुलाबपुष्पा'—(The White Rose)चा अभिमान धरणारे सर्व सरदार त्याला येऊन मिळाले. आणि हें सर्व सैन्य लंडनमध्यें येऊन दाखल झालें. 'सहाव्या हेन्री'ला पुन्हां उचलून किल्ल्यांत नेऊन टाकण्यांत आलें. वॉरविकनें 'बारनेट' (Barnet) नांवाचें ठाणें मजबूत करून तो एडवर्डच्या हल्ल्याची वाट पहात बसला. पण लढाईच्या आदल्याच दिवशीं रात्रीं एडवर्डचा भाऊ क्लारेन्स सासऱ्याला सोडून बारा हजार सैन्यानिशीं एडवर्डला जाऊन मिळाला. दुसऱ्या दिवशीं लढाई होऊन वॉरविकच्या सैन्याचा पराभव झाला. स्वतः वॉरविक तर या लढाईत पडलाच, पण त्याच्या पक्षाचा एकही सरदार मागें जिवंत राहिला नाहीं !

१३ मार्गारेटला पकडलें—मार्गारेट राणी त्याच दिवशीं फ्रान्समधून येऊन इंग्लंडमध्यें उतरली; पण बारनेटच्या लढाईची हकीकत ऐकल्याबरोबर तिचा धीर खचला, आणि ती वेल्सकडे जाण्यास निघाली. एडवर्डच्या सैन्यानें

तिला 'ट्यूक्सबेरी' (Tewkesbury) येथें गांठलें, व तिच्या सैन्याचा पराभव करून इ० स० १४७१ च्या मे महिन्याच्या चौथ्या तारखेस तिला व तिच्या मुलाला कैद करून 'राजा एडवर्ड'च्या तंबूंत आणलें. त्या ठिकाणीं **यॉर्क**-पक्षीय सर्व सरदार जमा झाले होते. **मार्गारेट**च्या मुलाला **एडवर्ड**समोर आणून उभें केलें, तेव्हां **एडवर्ड** उर्मटपणें म्हणाला, "पोरा ! माझ्या राज्यांत तूं काय म्हणून आलास ?" **मार्गारेट**च्या मुलानें उत्तर केलें, "मी माझा कायदेशीर मुलूख संपादन करण्यासाठीं आलों !" हें उत्तर ऐकून राजा त्वेषानें उठला आणि हातांत चिलखती मोजा घातलेला होता त्याच हातानें त्यानें त्या मुलाच्या तोंडांत मारलें ! राजाचे दोघे भाऊ **ग्लावसेस्टर** व **क्लारेन्स** जवळच उभे होते; त्यांनीं नंतर नीचपणानें त्या लहान अर्भकाच्या पोटांत खंजीर खुपसून त्याचा प्राण घेतला. नंतर **एडवर्ड**नें मोठ्या समारंभानें **लंडन**मध्यें प्रवेश केला. **मार्गारेट** राणीला किल्ल्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. ती सुमारें चार वर्षें तेथें होती. **ट्यूक्सबेरी**च्या लढाईनंतर लवकरच तिचा नवरा **हेन्री** मरण पावला. कोणी म्हणतात, **एडवर्ड**चा भाऊ **ग्लावसेस्टर** यानें त्याचा खून केला.

१४ फ्रान्सवर स्वारी—आतां **लँकेस्टर** पक्षाचा एकही प्रमुख सरदार अगर त्या घराण्यांतील कोणीहि राजपुत्र जिवंत राहिला नाहीं. तेव्हां आपल्या गादीला आतां भय नाहीं अशी खात्री झाल्यामुळें **एडवर्ड**नें **फ्रान्स**वर स्वारी करण्याचा बेत केला. **पार्लमेंट**नेंहि राजा आपले जुने प्रांत मिळविण्यास जात आहे असें पाहून खर्चाची मंजुरी दिली. पण तेवढ्या पैशानें सैन्याचा खर्च भागण्यासारखा नव्हता. म्हणून **एडवर्ड**नें एक नवीन युक्ति काढली. शहरांतील श्रीमंत व्यापाऱ्यांना बोलावून आणावयाचें, व तुमच्याकडून अमुक रकम पाहिजे आहे ती खुषीनें द्या, नाहीं दिलीत तर सांभाळून रहा म्हणून त्यांना तंबी द्यावयाची; राजाचा कडक स्वभाव व क्रूरपणा त्यांना माहीत होताच; तेव्हां तेही मुकाट्यानें कबूल होत. अशा प्रकारच्या 'खुषीच्या सक्ती'नें (Benevolence) त्यानें बराच पैसा जमा केला.

१५ तह—फ्रान्समधील **बर्गंडी** या प्रमुख सरदाराशीं त्याचें सख्य होतेंच. सर्व तयारी झाल्यावर इ० स० १४७५ या वर्षी त्यानें **फ्रान्स**वर स्वारी केली. पण तेथें जातो तों **बर्गंडी** आतां याला मदत करण्यास कबूल होईना. **फ्रान्स**च्या राजानेंही युद्ध टाळावें म्हणून तह करण्याचा विचार केला होता. तेव्हां विशेष आढेवेढे न घेतां उभय पक्षीं तह होऊन **एडवर्ड** **इंग्लंड**ला परत आला. या तहानें असें

ठरलें कीं, **फ्रान्स**च्या राजानें पाऊण लाख ' क्राउन ' **एडवर्ड**ला द्यावे व पुढें दरसाल पन्नास हजार ' क्राउन ' देत जावे; **फ्रान्स**च्या युवराजाचें **एडवर्ड**ची मुलगी **इलिझाबेथ** इजशीं लग्न व्हावें; व पन्नास हजार क्राऊन घेऊन **एडवर्डनें मार्गारेट** राणीला सोडून द्यावें. त्याप्रमाणें **फ्रान्स**च्या राजाकडून रक्कम आल्यावर **मार्गारेट** फ्रान्समध्यें निघून गेली. व तिकडे तिनें आपलें राहिलेलें आयुष्य देव देव करण्यांत घालविलें.

१६ भावांशीं वाद—**फ्रान्स**मधून परत आल्यावर **एडवर्ड**चा व त्याच्या भावांचा तंटा लागला. **क्लारेन्स** हा पूर्वी एकदां राजाविरुद्ध ' **वॉरविक** 'ला जाऊन मिळाला होता हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. ही गोष्ट **एडवर्ड** विसरला नव्हता. शिवाय ' **क्लारेन्स** ' व दुसरा भाऊ ' **ग्लावसेस्टर** ' यांच्यामध्येंहि कांहीं कारणामुळें वाद माजला होता. **क्लारेन्स**च्या मित्रांवर **एडवर्डनें** कांहीं तरी आरोप ठेवून त्यांना हळुहळू वाटेस लावलें. एक दिवस राजाच्या ह्या सूड घेण्याच्या बुद्धी-बद्दल **क्लारेन्स**नें त्याला उघडपणें दोष दिला. तेव्हां राजद्रोहाच्या आरोपाबद्दल **क्लारेन्स**ची सरदार मंडळापुढें चौकशी करवून त्याला **एडवर्डनें** तुरुंगांत टाकलें. पुढें आठ दिवसांच्या आंतच तो मरण पावला म्हणून बातमी उठली. **एडवर्डनें** त्याला दारूच्या पिंपांत बुडवून मारलें असेंहि म्हणतात.

१७ एडवर्डचा अंत—फ्रान्सबरोबर झालेल्या तहाप्रमाणें **एडवर्ड**च्या मुलीचें **फ्रान्स**च्या युवराजाशीं लग्न व्हावयाचें; पण फ्रान्सचा राजा तहाप्रमाणें न वागतां त्यानें आपल्या मुलाचें **बर्गंडीच्या** नातीशीं लग्न लाविलें. त्यामुळें **एडवर्ड**ला राग येऊन त्यानें पुन्हां स्वारी करण्याची तयारी केली. पण जिकडे तिकडे युद्धाची तयारी चालली आहे इतक्यांत मध्येंच राजाला दुखणें येऊन इ० स० १४८३ या वर्षी त्याचा अंत झाला.

१८ त्याच्या अंगचे गुणदोष—या राजाच्या अंगीं कांहीं चांगले गुण होते; पण पुढें पुढें त्याला दुर्बुद्धि आठवून तो दुर्व्यसनांच्या आधीन झाला होता. ' **वुडव्हिल** ' (Woodville) च्या मुलीबरोबर झालेल्या प्रेमसंबंधापासून त्याला ' **एडवर्ड** ' व ' **रिचमंड** ' असे दोन मुलगे व शिवाय पांच मुली झाल्या होत्या.

१९ एडवर्डच्या कारकिर्दीतील विशेष गोष्टी—या राजाच्या कारकि-र्दीत ' **कॅक्स्टन** ' (Caxton) नांवाच्या एका व्यापाऱ्यानें छापण्याची कला

इंग्लंडमध्यें आणली.† **कॅक्स्टन** ही विद्या हॉलंडमध्यें शिकला होता. **वेस्ट मिन्स्टर** येथें राजाचा मेहुणा '**रिव्हर्स**' याच्या आश्रयानें त्यानें छापखाना स्थापन करून सुमारें साठ ग्रंथ इंग्रजी भाषेंत छापून काढले. इंग्लंडमध्यें छापलेला पहिला ग्रंथ 'बुद्धिबळांचा खेळ' हा इ० स० १४७४ या वर्षी बाहेर पडला. या छापण्याच्या कलेनें **स्काटलंड**मध्यें इ० स० १५०८ या वर्षी व **आयर्लंड**मध्यें इ० स० १५५१ या वर्षी प्रवेश केला.

२० खिशांतलीं घड्याळें व बाजाच्या पेट्या हीं 'यंत्रें' **एडवर्ड**च्याच कारकिर्दींत तयार झालीं. **लंडन** व **स्काटलंड** यांच्या दरम्यान टपालाची व्यवस्था याच्याच कारकिर्दींत प्रथम सुरू झाली. इ० स० १४८१ या वर्षी राजाचा भाऊ **ग्लावसेस्टर स्काटलंड**मध्यें लढाईंत गुंतला असतां इंग्लंडला वेळच्या वेळीं बातमी पोंचवावी म्हणून वीस वीस मैलांवर घोडेस्वार उभे करून त्यांच्या द्वारें दर दिवशीं शंभर मैलांच्या गतीनें टपालाची ने-आण सुरू करण्यांत आली.

२१ ग्लावसेस्टरचीं कारस्थानें--एडवर्ड मरण पावला तेव्हां त्याचा वडील मुलगा बारा वर्षांचा होता. व तो आपल्या मामाच्या '**लडलो**' (Ludlow) नांवाच्या किल्ल्यांत त्याच्याच देखरेखीखालीं रहात असे. **एडवर्ड**चा भाऊ **ग्लावसेस्टर** हा कपटी व कारस्थानी असून **एडवर्ड**च्या मागून इंग्लंडची गादी आपण बळकवावी असा त्यानें विचार केला. आणि बाह्यात्कारीं **एडवर्ड**च्या मुलाबद्दल मोठा प्रेमभाव दाखवून त्यानें आंतून गुप्त कारस्थानें आरंभिलीं. **एडवर्ड**नें आपल्याला इंग्लंडचा कारभारी नेमला आहे असें सांगून त्यानें त्याच्या मुलाला आपल्या ताब्यांत घेतलें. आणि त्याचा मामा **रिव्हर्स** व **वुडव्हिल**च्या बाजूची इतर मंडळी यांस त्यांजवर कांहीं ना कांहीं आरोप ठेवून तुरुंगांत टाकलें !

२२ एडवर्डच्या बायकोला ही बातमी समजतांच तिनें दुसऱ्या मुलाला व मुलींना घेऊन **वेस्ट मिन्स्टर**च्या जोगयांच्या मठींत आपलें बिऱ्हाड ठेवलें. **ग्लावसेस्टर** बालराजाला घेऊन **लंडन**मध्यें आला, आणि थोड्याच दिवसांत त्यानें त्याला सुरक्षिततेसाठीं म्हणून किल्ल्यांत (The tower) नेऊन ठेविलें. त्याचा धाकटा भाऊ **रिचमंड** यालाही आईकडून मागून घेऊन थोड्याच दिवसांत थोरल्या भावाबरोबरच बंदोबस्तानें किल्ल्यांत ठेवण्यांत आलें. **ग्लावसेस्टर**नें गोड गोड बोलून

† या कलेचा मूळ शोध जॉन गटेनबर्ग नांवाच्या जर्मनानें इ० स० १४५० च्या सुमारास लावला होता.

पार्लमेंटच्या सभासदांच्या डोळ्यांत धूळ फेंकली. आणि त्यांच्याकडून प्रथम आपल्याला 'राज्याचा पालक' (Protector of the Realm) नेमून घेतलें.

२३ **भावाच्या मुलांची अडचण**--पुढें आपल्या भावाच्या मुलांची कशी वाट लावावी याच्या तजविजीस तो लागला. या कार्यासाठीं त्यानें प्रथम सरदार मंडळां-(House of Lords) तील सभासदांना अनुकूल करून घेण्याची खटपट केली. सरदार '**बकिंमहॅम**' (Buckingham) त्याला मदत करण्यास तयार झाला. पण '**हेस्टिंग्ज**' (Hastings) नांवाचा दुसरा एक प्रमुख सरदार अनुकूल होईना; म्हणून त्याच्यावर उलट राजपालकाचा प्राण घेण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप ठेवण्यांत आला, आणि चौकशीचा फार्स होऊन त्याच्या वाड्याच्या आंगणांतच एका लांकडाच्या ओंड्यावर त्याचा शिरच्छेद करण्यांत आला! इतर जे जे सरदार अनुकूल होईनात, त्यांचीही तुरुंगांत रवानगी करण्यांत आली.

२४ अशा रीतीनें सरदारमंडळावर दहशत बसविल्यावर **ग्लावसेस्टर** सामान्य लोकांत आपल्याविषयीं अनुकूल मत बनविण्याच्या खटपटीस लागला. डॉक्टर '**शॉ**' (Dr. Shaw) या नांवाचा एक लोकप्रिय विद्वान मनुष्य धर्मोपदेशकाचें काम करीत असे. त्याला अनुकूल करून घेऊन **ग्लावसेस्टर**नें त्याला लंडनच्या लोकांना असें सांगावयास लावलें कीं, माजी राजा एडवर्ड यानें जेव्हां '**वुडव्हिल**' च्या मुलीशीं लग्न केलें, तेव्हां तो विवाहित असल्यामुळें ख्रिस्ती धर्मशास्त्राप्रमाणें या नवीन बायकोपासून **एडवर्ड**ला झालेली संतती कायदेशीर नाहीं. दोन दिवसांनीं **ग्लावसेस्टर**चा मित्र **बकिंगहॅम** यानेंही **गिल्डहाल** (Guildhall) च्या सभेंत जमलेल्या लोकांना तेंच सांगितलें. त्या वेळीं **ग्लावसेस्टर**नें पूर्वीच शिकवून ठेवल्याप्रमाणें कांहीं लोकांनीं 'ग्लावसेस्टर राजा चिरायु होवो!' म्हणून टाळ्या पिटल्या! बाकीचे लोक स्तब्ध होते.

२५ **तिसरा रिचर्ड**—दुसऱ्या दिवशीं **बकिंगहॅम**, शहरचा कोतवाल, व आणखी थोडीशी भाडोत्री मंडळी **ग्लावसेस्टर**ला भेटायला म्हणून आली. आणि त्यांनीं सर्व राष्ट्राच्या नांवानें इंग्लंडची गादी स्वीकारण्याविषयीं **ग्लावसेस्टर**ला विनंति केली! व त्यानेंही 'कशाला? कशाला? हें काय? मला कशाला गादी पाहिजे?' म्हणून नाटकी आविर्भाव (feigned reluctance) आणून जणूं काय आपल्याला लोकांनीं राजा होण्याला भाग पाडलें असें दाखवून इंग्लंडच्या गादीचा स्वीकार केला! ही गोष्ट इ० स० १४८३ च्या जून महिन्याच्या सव्विसाव्या तारखेस घडली.

पुढें सुमारें एका पंधरवड्यानें **ग्लावसेस्टरला ' तिसरा रिचर्ड '** म्हणून वेस्ट-मिन्स्टर येथें राज्याभिषेक करण्यांत आला.

२६ नव्या राजाचीं आश्वासनें—अन्यायानें राज्य मिळविणारांना तें कसें टिकेल याची नेहमींच काळजी असते. **रिचर्डनें**, ज्यांनीं ज्यांनीं त्याला या कामीं मदत केली होती, त्यांना पुष्कळ द्रव्य व मोठमोठे किताब देऊन कायमचे आपल्या बाजूचे करून टाकले. व पार्लमेंटची सभा बोलावून माजी राजा **एडवर्ड** यानें अन्यायानें लोकांकडून पैसा काढला तसें आपण करणार नाहीं म्हणून आश्वासनें दिलीं. नंतर दरबारी मंडळी व लवाजमा बरोबर घेऊन तो प्रवासास निघाला. वाटेंत ठिकठिकाणीं लोकांवर न्यायानें राज्य चाललें आहे कीं नाहीं याची पूसतपास करीत व गोड गोड आश्वासनें देत ही स्वारी उत्तरेकडे **यॉर्क** येथें येऊन पोहोंचली. यॉर्क येथें त्याला पुन्हां राज्याभिषेक करण्यांत आला.

२७ राजपुत्रांचा वध--**एडवर्डचे** मुलगे **लंडन** येथें जिवंत आहेत ही मोठी अडचण आहे हें त्याला पक्कें माहीत होतें. तेव्हां त्यांना परभारें तिसऱ्याकडून मारविण्याचा बेत करून त्यानें आपला सेनापती **' टिरेल '** (Tyrrel) याच्याकडे किल्ल्याच्या रखवालदाराच्या नांवानें पत्र देऊन किल्ल्याच्या किल्ल्या एक दिवस **टिरेलकडे** द्याव्या असें फर्माविलें. त्याप्रमाणें **टिरेलला** किल्ल्या मिळाल्या. मध्यरात्रीच्या सुमारास **टिरेल** व त्याचे दुसरे साथीदार राजपुत्रांच्या निजण्याच्या खोलींत शिरले, आणि त्यांनीं बिछान्यांतच बुकलून बुकलून त्यांचा प्राण घेतला ! त्यांचीं प्रेतेंही तेथेंच जिन्याच्या खालीं खोल खड्डा खणून त्यांत पुरण्यांत आलीं असें म्हणतात. ही गोष्ट खरी असो कीं खोटी असो, पण त्या वेळीं ती जेव्हां लोकांत पसरली, तेव्हां लोकांचीं मनें **रिचर्डविषयीं** विटून जाऊन त्याच्याविरुद्ध कट होण्याला सुरवात झाली.

२८ लँकॅस्टरपक्षाची जमवाजमव आणि यादवीचा शेवट—लँकॅस्टर पक्षाचे जे थोडेसे सरदार जिवंत होते त्यांना आतां थोडासा जोर आला. **रिचर्डच्या** दुष्कृत्यांनीं विटून गेलेली कित्येक **यॉर्कपक्षीय** मंडळीही त्यांना जाऊन मिळाली. आणि त्यांनीं या दुष्ट घातकी राजाला गादीवरून काढून टाकण्याबद्दल हर प्रयत्न करण्याच्या शपथा घेतल्या. शेवटीं दोन्ही पक्षांतील प्रमुख सरदार एक होऊन त्यांनीं **लँकॅस्टरच्या** घराण्याशीं संबंध असलेल्या एका पुरुषास गादीवर बसविलें व त्याचें **यॉर्कपक्षीय** राजकन्येशीं लग्न होऊन ही आत्मघातकी यादवी एकदांची थांबली. हा समेट कसा घडून आला तें पुढील प्रकरणांत सांगूं.

प्रकरण २५ वें.

समेट !

[१ रिचर्डच्या वागणुकीचा परिणाम—२ हेन्री टयूडर—बकिंगहॅमचा शेवट—३ रिचर्डचे बेत—४ हेन्री टयूडर इंग्लंडमध्यें आला—५ बॉसवर्थची लढाई—गुलाबी युद्धांचा शेवट—६ या युद्धांचा परिणाम—७ मध्ययुगीन स्थितीचें सिंहावलोकन—८ अँजेव्हिन घराण्यांतील प्रसिद्ध राजे ९—त्यांचा पॅलेस्टाइनमधील पराक्रम—१० शतवार्षिक युद्ध आणि यादवी—११ इंग्लंड एकराष्ट्र बनलें—१२ आणखी कांहीं गोष्टी—१३ मध्ययुगांतील शिक्षण—१४ शेती आणि मजुरी—१५ विद्या—१६ घरें—१७ जेवणाच्या वेळा.]

१ **रिचर्डच्या वागणुकीचा परिणाम**—**रिचर्ड**च्या दुष्ट व घातकी वागणुकीमुळें त्याचे मित्र त्याला सोडून शत्रुपक्षाला जाऊन मिळाले. त्याचा जिवलग मित्र **बकिंगहॅम** (Buckingham) हा सुद्धां त्याला सोडून त्याच्याविरुद्ध कटांत सामील झाला. लँकॅस्टर पक्षांत गादीला जवळचा असा वारस कोणी नव्हता. पण '**पांचव्या हेन्री**'ची बायको **कॅथराइन** हिनें ज्या **ओवेन टयूडर** नांवाच्या **वेल्श** गृहस्थाशीं लग्न लावलें होतें, त्याचा **हेन्री** या नांवाचा एक नातू असून ह्या **हेन्री टयूडरला** गादीवर बसवून, त्याचें माजी राजा **एडवर्ड** याची मुलगी **इलिझाबेथ** (Elizabeth)—जिचें फ्रान्सच्या राजपुत्राशीं लग्न लावण्याचें मागें तह्यानें ठरलें होतें–तिच्याबरोबर लग्न लावून देऊन, या दोन्ही घराण्यांची एकी करावी असा कित्येक सरदारांचा बेत ठरला. व दोन्ही घराण्यांच्या मुख्य मुख्य अभिमान्यांना हा बेत गुप्तपणें कळवून त्यांची संमति घेण्यांत आली.

२ **हेन्री टयूडर**—**हेन्री टयूडर** या वेळीं फ्रान्समध्यें '**ब्रिटनी**' (Brittany) च्या दरबारांत होता. त्याला इंग्लिश सरदारांनीं पैशाचा पुरवठा करून सैन्य जमविण्याविषयीं निरोप पाठविला. तो लौकरच सैन्य घेऊन येईल असें वाटून '**बकिंगहॅम**' यानें **वेल्स**मध्यें बंडाचा बावटा उभारला. पण इतक्यांत मोठा पाऊस पडून '**सेव्हर्न**' (Severn) नदीला पूर आला. आणि त्याला नदी ओलांडून अलीकडे येतां येईना–**बकिंगहॅम**च्या अनुयायांना नदीला

पूर आला हा 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' झाला असें वाटून त्यांचा धीर गळाला. व पुढें चिन्ह ठीक नाहीं असें पाहून एकेकानें हळूच पाय माघारा घेण्याला सुरवात केली. तेव्हां बकिंगहॅमचाही नाइलाज होऊन त्याला आपल्याच एका नोकराच्या घरीं स्वस्थ पडून रहाणें भाग पडलें. पुढें हा नोकर निमकहराम होऊन त्यानें आपल्या धन्याला पकडून दिलें, आणि **रिचर्ड**नें त्याला ताबडतोब फांशीं दिलें. ही गोष्ट इ० स० १४७३ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २३ व्या तारखेस घडली. दरम्यान **हेन्री** पांच हजार लोकांनिशीं इंग्लंडला यावयास निघाला होता. पण मध्यें वादळ झाल्यामुळें त्याला वेळेवर येतां आलें नाहीं. व मागाहून येण्यांत कांहीं फायदा नाहीं असें दिसून आल्यामुळें तो परत **ब्रिटनी**ला निघून गेला.

३ रिचर्डचा बेत—अशा रीतीनें हा पहिला बेत फसला. धूर्त **रिचर्ड** यामुळें सावध झाला. त्यानें **पार्लमेंट**ची सभा बोलावून त्या सभेकडून आपला गादीवर हक्क आहे असें कबूल करून घेतलें, व लोकांस संतुष्ट करण्यासाठीं कांहीं लोकप्रिय काय-देही केले. त्यानें खुषीची सक्ती करून पैसा काढण्याचा अनिष्ट प्रकार कायद्यानेंच बंद केला, व इलिझाबेथचें आपल्या मुलाशीं लग्न लावून देण्याचें ठरविलें. पण दुर्दैव त्याचें ! त्याचा हा मुलगाच एकाएकीं वारला. त्यामुळें हा बेत सिद्धीस गेला नाहीं. पुढें या आपल्या पुतणीशीं आपणच लग्न लावावें असें ठरवून आपली पहिली बायको 'ॲन' (Anne) हिला विषप्रयोग करण्याचाहि बेत त्यानें योजला. पण 'रॅटक्लिफ' (Ratcliffe) व 'कॅट्सबी' (Catsby) हे त्याचे मुख्य मंत्री या बेताला कबूल होईनात. त्यांनीं त्याला स्वस्थ राहून काय काय होतें तें पहाण्याचा सल्ला दिला.

४ हेन्री ट्यूडर इंग्लंडमध्यें आला—रिचर्ड इलिझाबेथशीं लग्न कर-णार ही बातमी ऐकल्याबरोबर तिकडे **हेन्री ट्यूडर**नें घाईघाईनें पुन्हां सैन्याची जमवाजमव केली. व तीन हजारांचें लहानसें सैन्य घेऊन तो इ० स० १४८५ च्या आगष्टच्या ७ व्या तारखेस **वेल्स**मध्यें उतरला. **रिचर्ड**ला या वेळीं कोणाचाच विश्वास वाटेनासा आला होता. आपल्या सरदारांपैकीं कोण केव्हां फिरेल याचा नेम नाहीं असें वाटत असल्यामुळें तो नेहमीं अस्वस्थ असे, व त्याला रात्रीची झोंपही येत नसे.

५ बॉसवर्थची लढाई—पुढें 'लीसेस्टर' (Leicester) जिल्ह्यांत बॉसवर्थ (Bosworth) नांवाच्या गांवीं उभय सैन्यांची गांठ पडली. या वेळीं **हेन्री**जवळ सुमारें सहा हजार सैन्य जमा झालें असून **रिचर्ड**चें सैन्य सुमारें बारा हजार होतें. लढाईला सुरवात झाली, तोंच रिचर्डच्या सरदारांपैकीं एक प्रमुख सरदार '**स्टॅनले**'

(Stanley) हा सात हजार सैन्यानिशीं **हेन्री**ला जाऊन मिळाला. **रिचर्ड**ला कळून चुकलें कीं, आतां आपला निभाव लागणें कठीण; तेव्हां तो जिवावर उदार होऊन रागाच्या आवेशांत समोर येईल त्याला कापीत **स्टॅनले**च्या आंगावर धांवून गेला ! पण तो **स्टॅनले**च्या आंगावर हात टाकणार, तोंच त्याजवर **स्टॅनले**च्या लोकांनीं एकदम हल्ला केल्यामुळें हातांत तरवार असतांनाच त्याचा देह जमिनीवर पडला. त्याचा मुकूट पलीकडे एका झाडींत पडला होता. तो **स्टॅनले**नें उचलून **हेन्री**च्या मस्तकावर ठेविला. आणि 'हेन्री राजा चिरायु होवो !' असा त्याच्या सैन्यानें मोठ्यानें जयघोष केला ! अशा रीतीनें **बॉसवर्थ**च्या लढाईनें इंग्लंडमधील या 'गुलाबी युद्धां'ची समाप्ति होऊन **ट्यूडर** घराण्यांतील एका राजाला इंग्लंडचें राजपद प्राप्त झालें.

६ या युद्धांचा परिणाम--तीस पस्तीस वर्षें एकसारख्या चाललेल्या या यादवींत इंग्लंडमधील सरदार वर्गांतील बहुतेक पुरुष रणांगणावर अगर फांसावर चढून मृत्यु पावल्यामुळें आतां राजावर दाव ठेवणारा सरदारवर्गांतील कोणी पुढारी राहिला नाहीं. पण उलटपक्षीं **नॉर्मन** राजांच्या अंमलांत सुरू झालेली इंग्लंडमधील सरंजामी पद्धति याच कालांत पुरी नष्ट होऊन सामान्य प्रजा सरदारांच्या जाचांतून सुटल्यामुळें स्वतंत्र नागरिकांचा वर्ग वाढत गेला आणि नॉर्मन व इंग्रज यांच्यामधील जेतृजितभाव समूळ नष्ट होऊन इंग्लंड हें एक राष्ट्र या नांवाला पात्र झालें. **बॉसवर्थ**ची लढाई झाल्यानंतर दीडशें वर्षांनंतरच्या इंग्लंडच्या इतिहासाकडे नजर दिली असतां आपल्याला असें दिसून येईल कीं, या कालांत सामान्य लोकांचा वर्ग प्रबल होऊन पूर्वी सरदारमंडळाचा राजावर जो दाव असे तो दाब आतां पार्लमेंटचे लोकप्रतिनिधी राजावर ठेवूं लागले आहेत व राजाला लोकप्रतिनिधींपुढें मान वांकविणें भाग पडूं लागलें आहे. पण हा इतिहास पुढें विस्तृत रीतीनें यावयाचा असल्यामुळें आपण या ठिकाणीं पुनः एकदां मागच्या तीनशें वर्षांच्या कालाकडे नजर टाकून इंग्लंडच्या मध्ययुगीन स्थितीचें निरीक्षण करूं.

७ मध्ययुगीन स्थितीचें सिंहावलोकन—नॉर्मन सरदार 'विजयी वुइल्यम' (William the conqueror) यानें इ. स. १०६६ या वर्षी इंग्लंड देश जिंकून तेथें एकछत्री अंमल स्थापन केला, आणि त्याच्या पुढील वंशजांनीं इंग्लंड ही आपली मातृभूमि,–निदान भोगभूमि–असें मानून तेथें कायमचें वास्तव्य केलें. नॉर्मन लोक इंग्लंडमध्यें आले ते केवळ लूट करण्यासाठीं आलेले नसून इंग्लंडांत

कायम राहण्यासाठीं आलेले होते. त्यामुळें अर्थातच त्यांना मूळच्या इंग्रजांशीं फार काळ फटकून वागतां येण्यासारखें नव्हतें. आणि रोटीबेटी व्यवहारानें इंग्रज-नॉर्मनांचें एकीकरण होण्याला कोणतीच आडकाठी नसल्यामुळें कालाच्या ओघाबरोबर जन्मास आलेलें ' नूतन इंग्रज राष्ट्र ' हें केवळ नॉर्मन किंवा केवळ इंग्रज न राहतां त्याच्यांत दोघांच्या अंगचे मिश्र गुणावगुण उतरले; आणि विद्या, कला, चालीरीति, पोषाख, धर्म, भाषा, वगैरे प्रत्येक बाबतींत या मिश्रणाचा इष्ट परिणाम दिसून येऊं लागला. इ. स. ११५४ मध्यें नॉर्मन राजवंशाचा पुरुषसंततीच्या दृष्टीनें नष्टांश होऊन ' पहिल्या हेन्री'चा दौहित्र ' दुसरा हेन्री ' हा पुत्रिका-पुत्र म्हणून इंग्लंडच्या गादीवर आल्यावर 'प्लँटॅजेनेट ' किंवा 'अँजेव्हिन' (Plantagenet or Angevin) नामक नव्या राजवंशाची इंग्लंडमध्यें स्थापना झाली. या राजवंशानें इ० स० ११५४ पासून इ० स० १४८५ पर्यंत राज्य केलें, आणि बरे वाईट एकंदर बारा तेरा राजे इंग्लंडला पुरविले.

८ **अँजेव्हिन घराण्यांतील प्रसिद्ध राजे**—या राजांपैकीं ' दुसरा **हेन्री**' '**जॉन**', 'पहिला **एडवर्ड**,' 'तिसरा **एडवर्ड**' आणि 'पांचवा **हेन्री**' यांच्या कारकिर्दी कोणाच्या राष्ट्रसंवर्धक म्हणून तर कोणाच्या प्रजापीडक म्हणून लोकांच्या स्मरणांत राहण्यासारख्या झाल्या. प्रजेच्या हक्कसंपादनाच्या दृष्टीनें जॉन आणि पहिला एडवर्ड यांच्या कारकिर्दी विशेष स्मरणीय आहेत. कारण जॉनच्या कारकिर्दींत इंग्लंडांतील सरदार, धर्माधिकारी व सामान्य प्रजाजन यांनीं एक होऊन राजाला कैचींत धरून त्याच्याकडून सुप्रसिद्ध **मॅग्नाचार्टा** ऊर्फ बडी सनद ही प्रजेच्या स्वातंत्र्याची पहिली सनद संपादन केली, आणि पहिल्या एडवर्डनें आपण होऊनच पार्लमेंटच्या लोकसभेचा पाया दृढ केला.

९ **पॅलेस्टाइनमधील पराक्रम**—अँजेव्हिन ऊर्फ ' प्लँटॅजनेट ' राजांच्या कारकिर्दींतील दुसरी सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्यापैकीं रिचर्ड व पहिला एडवर्ड यांनीं ख्रिस्ती धर्मयुद्धांत घेतलेला भाग ही होय. हीं युद्धें दोनशें वर्षें चाललीं होतीं. पण इंग्लंडच्या राजांपैकीं वरील दोघे अँजेव्हिन, आणि त्यांच्यापूर्वीं एकदां रॉबर्ट नॉर्मन, यांच्याशिवाय दुसऱ्या कोणीं त्यांत विशेषसा भाग घेतलेला दिसत नाहीं. मात्र वरील दोघांही राजांनीं पॅलेस्टाइनमध्यें गेल्यावर तिकडे शूर वीर म्हणून चांगलें नांव कमावलें, आणि आपल्या पराक्रमानें शत्रूंच्या अंतःकरणांत चांगलीच दहशत बसविली.

१० शतवार्षिक युद्ध आणि यादवी—तिसऱ्या एडवर्डच्या कारकिर्दीत सुरू झालेलें आणि मध्यें कांहीं काल खंड पडला तरी सहाव्या हेन्रीच्या कारकिर्दीपर्यंत १०० वर्षें चाललेलें अँग्लो-फ्रेंच युद्ध हेंही या वंशाच्या कारकिर्दीतील इंग्लंडच्या बाहुबलाच्या प्रदर्शनाचें म्हणून स्मरणीय आहे. त्यानंतर अँजेव्हिन घराण्याच्याच यॉर्क व लँकेस्टर या दोन शाखांमध्यें तीस वर्षें चाललेली यादवी ही इंग्लंडांतील सरदार घराण्यांच्या पडत्या कालाची निदर्शक आहे. दुसऱ्या हेन्रीनें इंग्लंडांतील सरदारांचें बल कमी करण्याचा केलेला उपक्रम या युद्धांनीं आयताच तडीला नेला. पण याचा एक अनिष्ट परिणाम असा झाला कीं, पूर्वी राजावर दाब ठेवणारा असा जो सरदारांचा एक प्रबल पक्ष होता तो नाहींसा झाल्यामुळें अँजेव्हिन घराण्यानंतर इंग्लंडच्या गादीवर आलेले 'ट्यूडर' व 'स्टुअर्ट' (Stuart) राजे प्रबल होऊन प्रजेला जुमानीनातसे झाले. आणि पुढें क्रॉमवेलसारखे सामान्य प्रजेंतले शूर लोक पुढें येईपर्यंत त्यांना मन मानेल तसा कारभार करण्याला आणि प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजविण्याला मुभा मिळाल्यासारखी झाली.

११ इंग्लंड एकराष्ट्र बनलें—या तीनशें वर्षांच्या कालांत देशांतील व देशाबाहेरील लढायांमुळें असो, शांततेच्या कालांत एकमेकांची एकमेकांना अधिकाधिक गरज वाटूं लागल्यामुळें असो, धर्मयुद्धाच्या निमित्तानें झालेली जगाची जास्त माहिती व त्यामुळें प्राप्त झालेली विस्तृत दृष्टि व धर्मबंधनाची वाढ यामुळें असो, किंवा या सर्व कारणांचा समुच्चय म्हणून असो, नॉर्मन राजांच्या अमदानींत सुरू झालेलें इंग्रज-नॉर्मन एकीकरण प्लँटॅजेनेट राजांच्या कारकिर्दीत पूर्णावस्थेला पोंचलें आणि यापुढें नॉर्मन-इंग्रज हीं नांवें पृथक्पणें उपयोगांत न येतां इंग्लंडच्या प्रजेचा येथून तेथून इंग्रज या सामान्य नांवानेंच उल्लेख होऊं लागला आणि इंग्लंड हें एक राष्ट्र या नांवाला पात्र झालें.

१२ आणखी कांहीं गोष्टी—वेल्स व स्कॉटलंड हे देश इंग्रज राजांच्या अंमलाखालीं येणें, इंग्लंडमधील पोपच्या सत्तेचा चढउतार, छापण्याच्या कलेचा प्रवेश झाल्यामुळें विद्येला मिळालेलें उत्तेजन, व धार्मिक बाबतींत झालेला सुधारणेचा उपक्रम वगैरे गोष्टीहि या कालाच्या विशेष निदर्शक म्हणून सांगण्यासारख्या आहेत.

१३ मध्ययुगांतील शिक्षण.—या मध्ययुगांतील शिक्षणासंबंधानें सांगावयाचें म्हणजे त्या वेळच्या ज्या कांहीं शाळा होत्या त्या सगळ्या धर्माधिकाऱ्यांनीं (priests) किंवा जोग्यांनीं (monks) चालविलेल्या असत. त्यांत शिक्षण मिळे तें फक्त लॅटिन

भाषेचें. आणि त्यांत शिकून तयार झालेले ‘ स्नातक ’ पुढें धंदा करीत तेंही बहुधा धर्माधिकाऱ्यांचाच. सरदारांचीं मुलें बहुधा शाळेंत जात नसत. त्यांचें शिक्षण व्हावयाचें तें इतर तत्सम सरदारांच्या किल्ल्यांतून होई. कारण सरदारांच्या मुलांचीं लहानपणचीं कांहीं वर्षें दूरच्या एकाद्या किल्ल्यांत गेलीं म्हणजे त्यांच्या अंगीं ज्यास्त कणखरपणा येतो, अशी त्यांच्या पालकांची कल्पना असे. त्यांना थोडेसें लिहिणेंवाचणें आणि बरेंचसें शस्त्रें वापरण्याचें शिक्षण मिळे. शिष्टाचार (good manners) म्हणजे काय व ते कसे पाळावे यांचेंही शिक्षण त्यांना प्रत्यक्ष प्रयोगानें मिळे. शिक्षणासाठीं दुसऱ्या सरदारांच्या घरीं राहिलेल्या अशा सरदार–बटूला प्रथम त्या सरदाराचा चेला (Page) व जरा मोठा झाला म्हणजे हस्तक (Squire) म्हणत. या हस्तकानें आपल्या सरदाराबरोबर (Knight) लढाईस जावयाचें व त्याच्या हाताखालीं काम करून त्याला मदत करावयाची असा शिरस्ता असे. अशा रीतीनें कांहीं वर्षें गेल्यावर व तो स्वतः सरदारपदाला लायक झाला असें दिसून आल्यावर त्याला सरदारी (Knighthood) देण्यांत येत असे.

१४ शेती आणि मजुरी—इंग्लंडमध्यें उद्योगधंद्यांची व कारखान्यांची वाढ होण्यापूर्वीं तेथील सांपत्तिक स्थिति कशी होती व लोकांच्या आवडीचे धंदे कोणते होते हेंही पाहण्यासारखें आहे. पूर्वीच्या काळीं शेती ही सर्वच देशांत ‘ उत्तम ’ समजली जात असे, तशी ती इंग्लंडांतही प्रतिष्ठित गणली जाई. त्या काळच्या बहुतेक धर्माधिकाऱ्यांचा (clergy) शेती हा आवडीचा धंदा असे, आणि मठांतून राहणारे जोगी मठांसभोंवतीं उत्कृष्ट बागा तयार करीत. मजुरांच्या बाबतींत चढाओढ होऊं नये म्हणून विशिष्ट धंद्यांतील मजुरांना ते ज्या जिल्ह्यांत राहत असतील, त्या जिल्ह्याच्या बाहेर जाऊन मजुरी करण्याला परवानगी मिळत नसे. त्या काळच्या मजुरांच्या वेतनावरून त्या वेळच्या पैशाची किंमतही अजमावतां येण्यासारखी आहे. लांकूडफोडे व गवतकापे यांना त्या वेळीं दिवसाला एक पेनी म्हणजे हिंदुस्थानांतला सध्यांचा एक आणा मजुरी मिळे. इतर सामान्य मजुरांना दीड पेनी, सुतारांना दोन पेनी, आणि गवंड्यांना तीन पेनी मिळत. कारकुनांचा वर्ग त्या वेळीं बहुधा अस्तित्वांतच नसावा; म्हणून त्यांच्या ‘ पगारा ’चा कोठें उल्लेख आढळत नाहीं.

१५ विद्या—विद्येच्या नांवानें बहुधा जिकडे तिकडे शून्याकार होता. धर्माधिकारी हेच त्यावेळचे विद्येचे भोक्ते व संग्रहीते होते. वकील, वैद्य, आणि शिक्षक

हे तिन्ही धंदे बहुधा त्यांच्याच हातीं असत; व ते या बाबतींत लोकांना काय मदत करावयाची ती बहुधा निरपेक्ष अशीच करीत. 'बळी तो कान पिळी' हाच त्या वेळचा न्याय असल्यामुळें शारिरिक बल आणि शस्त्रकौशल्य (personal strength and skill in arms) यांचीच त्या वेळीं प्रतिष्ठा असे. तथापि ठिकठिकाणचे मठ आणि देवस्थानें यांतून 'लेखनगृह' म्हणून एक स्वतंत्र जागा केलेली असून मठवासी जोगी आणि देवळांतले उपाध्ये त्यांत बसून मोठ्या सुंदर अक्षरांच्या पोथ्या लिहून काढीत. पुढें छापण्याच्या कलेचा इंग्लंडांत प्रवेश झाल्यावर या स्थितींत थोडथोडा फरक पडत गेला, आणि पूर्वी ज्या बायबलच्या पोथीला ४० पौंड पडत असत ती पुढें ४ पौंडाला मिळूं लागली!

१६ घरें—नॉर्मन राजांच्या अमदानींत नॉर्मन सरदार आपापल्या मुलुखांत किल्ले बांधून त्यांत राहत असत. व या सरदारांवर अवलंबून असणाऱ्या कुळांचीं घरें बहुधा त्या किल्ल्यांच्या बाहेरच्या अंगाला असत. दुसऱ्या हेन्रीच्या कारकिर्दीपासून त्यांचे हे किल्लेकोट कमी होऊन मोठे जमिनदार आणि जहागिरदार आपापल्या इस्टेटीवर लांकडी वाडे (Manor-houses) बांधून राहूं लागले. सामान्य लोकांचीं घरें बहुधा लांकडी व एकमजली असत. शहरांतून मात्र कोठें कोठें दुमजली घरें दिसत; पण त्यांत उजेड आणि हवा यांच्या नांवानें शून्यच.

१७ जेवणाच्या वेळा—चौदाव्या पंधराव्या शतकांतल्या लोकांच्या जेवणाच्या वेळा एका ठिकाणीं नमूद केल्या आहेत त्या अशाः—बडे लोक बहुधा सकाळीं पांच वाजतां उठत, ७ वाजतां न्याहारी (Breakfast) करीत, १० वाजतां मुख्य जेवण (Dinner) घेत, संध्याकाळीं ४ वाजतां 'नक्त' भोजन (Supper) करीत, आणि रात्रौ नऊ वाजतां पुनः थोडीशी पोळी (Cake) आणि दारू (wine) घेऊन झोंपी जात. सामान्य मजुरांची मुख्य जेवणाची वेळ दुपार हीच असे.

थोर लोकांचीं संक्षिप्त चरित्रें.

[प्र.=प्रकरण. प.=परिच्छेद.]

दुसरा हेन्री—(Henry II) हा अँजेव्हिन (Angevin) घराण्यांतील पहिला राजा. नॉर्मन घराण्यांतील शेवटचा राजा 'पहिला हेन्री' याच्या मुलीचा हा मुलगा. म्हणजे याला इंग्लंडची गादी मिळाली ती आजोळाकडून मिळाली (इ. स. ११५४). पण या आजोळच्या राज्याशिवाय बापाचा वारस म्हणून फ्रान्समधील दोन तीन संस्थानें आणि सासुरवाडीकडूनही बराचसा मुलूख त्याला मिळालेला असल्यामुळें तो तत्कालीन राजांत मोठा भाग्यवान समजला जाई (प्र. १३ प. १). त्यानें इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांना राजसत्तेच्या अंकित करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. या बाबतींत त्याचा पहिल्यानें अगदीं जीवश्च कंठश्च असलेला मित्र **थॉमस बेकेट** याच्याशींही त्याला झगडावें लागलें (प्र. १३ प. १६). त्याचप्रमाणें नॉर्मन राजांच्या कारकिर्दींत सरंजामी सरदारांची (Feudal Lords) सत्ता व सामर्थ्य फार वाढलें होतें, तें कमी करण्याचे यानें अनेक उपाय योजले (प्र. १३ प. २). आयर्लंड हें बेट प्रथम इंग्लंडच्या राजाच्या आधिपत्याखालीं आलें तेंही याच्याच कारकिर्दींत (प्र. १४ प. ८). फिरते न्यायाधीश नेमून न्यायदान सुलभ करणें, पंचायत पद्धतीचा (Jury System) पाया घालून न्यायदान चोख करणें, लंडन शहर राजधानी करणें, वगैरे लोकसुधारणेच्या बऱ्याच गोष्टी त्याच्या कारकिर्दींत घडून आल्या. हेन्रीचे अखेरचे दिवस मात्र मानसिक अस्वस्थतेंत गेले. कारण प्रत्यक्ष त्याच्या मुलांनींच राज्याच्या वांटणीसाठीं बंड केलें. आणि त्याची बायकोही त्याला विरुद्ध झाली (प्र. १५ प० २). तो इ० स० ११८९ या वर्षीं या मानसिक अस्वस्थतेंतच मरण पावला. अँजेव्हिन घराण्यांतील पहिला राजा आणि इंग्लंडच्या चिमुकल्या बेटाबाहेरचा बराचसा मुलूख कांहीं वारशानें तर कांहीं लढाई करून संपादणारा इंग्लंडचा एक भाग्यवान् राजा म्हणून त्याचें इंग्लंडच्या इतिहासांत महत्त्व मानतात. त्यानें केलेल्या सुधारणा वर सांगितल्याच आहेत.

थॉमस बेकेट (Thomas Becket)—हा 'लंडन' च्या एका व्यापाऱ्याचा मुलगा असून 'दुसऱ्या हेन्रीच्या' कारकिर्दींत प्रथम राजाचा अगदीं जीवश्च कंठश्च दोस्त होता (प्र. १३ प. १३). दुसऱ्या हेन्रीला इंग्लंडमध्यें पोपचें वाढलेलें प्रस्थ कमी करावयाचें होतें. तेव्हां त्या कामीं या आपल्या मित्राचा आपल्याला उपयोग होईल अशा आशेनें त्यानें इ. स. ११६२ मध्यें कँटरबरीच्या मुख्य आचार्याची गादी त्याला दिली (प्र. १३ प. १४). पण बेकेटनें हा नवा आश्रम स्वीकारतांच त्या आश्रमाचें महत्त्व व वर्चस्व कसें वाढेल याचीच चिंता अधिक वाहण्याला सुरवात केली, आणि आपल्या पूर्वाश्रमींचा सर्व डामडौल टाकून देऊन तो एकाद्या संन्याशाप्रमाणें विरक्त वृत्तीनें राहूं लागला. पोपचें इंग्लंडमधील वर्चस्व कमी करण्याला बेकेटची मदत होईल ही हेन्रीची आशा नष्ट झाली, इतकेंच नव्हे तर उलट पोपची इंग्लंडवरील पकड अधिक घट्ट करण्याकडेच बेकेटची दृष्टि वळली. 'इंग्लंडमधल्या सरकारी न्यायालयांचीं देवस्थानच्या अधिकाऱ्यांवर सत्ता चालावयाची कीं नाहीं' या मुद्यावर हेन्री व बेकेट यांचें भांडण जुंपलें. तेव्हां हेन्रीनें इ. स. ११६४ मध्यें क्लॅरेंडन येथें सरदार, जहागिरदार, व धर्माधिकारी यांची एक परिषद भरवून इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांनीं राजनिर्मित न्यायसभांपुढें मान वांकविलीच पाहिजे असा ठराव करून घेतला (प्र. १३ प. १८). पण हा ठराव बेकेट मानीना. तेव्हां दोघांमध्यें उघड वैर माजलें. पुढें हेन्री फ्रान्समध्यें असतांना एकदां सहज 'या भटुर्ड्याच्या त्रासांतून मला मुक्त करणारा कोणीच नाहीं काय?' असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. जवळच्या कित्येक सरदारांनीं 'हेन्रीच्या मनांतून बेकेटला एकदां जगांतून नाहींसा करावा असें आहे' असा त्याचा अर्थ केला, आणि त्यांनीं हेन्रीच्या नकळतच इंग्लंडला येऊन बेकेटला त्याच्या मठींतून ओढून काढून त्याचा प्राण घेतला! (इ. स. ११७०) बेकेटची साधु पुरुष म्हणून अगोदरच प्रसिद्धि झालेली; तशांत आतां तो धर्मरक्षणासाठीं राजाबरोबर भांडत असतां राजाच्या लोकांकडून मारला गेल्याबरोबर धर्मवीर (Martyr) म्हणून त्याची अधिकच प्रसिद्धि झाली; आणि त्याच्या थडग्याचें दर्शन म्हणजे आपल्या पापनिष्कृतीचें व पुण्यप्राप्तीचें एक साधन अशा भावनेनें हजारों भाविक लोक त्याच्या दर्शनाला जाऊं लागले. आपल्या राज्यांतील एका सत्पुरुषाची हत्या केल्याबद्दल हेन्री राजावरही लोक खवळले. ते इतके कीं त्यालाही पुढें बेकेटच्या थडग्याजवळ जाऊन गुडघे टेंकून आपल्या जिव्हेकडून झालेल्या अपराधाबद्दल क्षमेची याचना करावी लागली! (प्र. १३ प. २२).

धर्मासाठीं प्राणार्पण करणारा एक वीर म्हणून तो कित्येक शतकें लोकांच्या स्मरणांत कायम होता.

जॉन (John)—हा 'अँजेव्हिन' घराण्यांतील पहिला राजा 'दुसरा हेन्री' याचा सर्वांत धाकटा मुलगा. तो इ. स. ११९९ मध्यें इंग्लंडच्या गादीवर आला. त्याची कारकीर्द जितकी भांडखोरपणाविषयीं प्रसिद्ध आहे, तितकीच प्रजेच्या हक्कसंपादनाच्या दृष्टीनेंही महत्त्वाची आहे. किंबहुना जॉन राजा जुलमी, दुर्व्यसनी व अपेशी निघाला, म्हणूनच इंग्लंडच्या लोकांना आपले हक्क त्याच्याकडून बळजबरीनें संपादन करतां आले असेंही म्हटल्यास चालेल. त्यानें फ्रान्सच्या राजाशीं भांडण करून नॉर्मंडी प्रांत हातचा गमावला (प्र० १५. प. २०), आणि पोपशीं भांडण करून शेवटीं इंग्लंडचें राज्यच पोपला अर्पण केलें (प्र. १५ प. २५). यानंतर त्याचें इंग्लंडच्या प्रजेशीं भांडण जुंपलें. पण त्यांतही त्याला अपयश येऊन इ. स. १२१५ मध्यें त्याला प्रजेनें मागितलेले हक्क निमूटपणें देऊन टाकणें भाग पडलें (प्र० १६ प. ८।९). पण इतकें झालें तरी त्याचा दुष्ट व घातकी स्वभाव त्याला स्वस्थ बसूं देईना. त्यानें इतर देशांतून भाडोत्री सैन्य आणून त्या सैन्याच्या जोरावर आपल्या प्रजेला त्रास देण्याचा क्रम चालविला. पण पुढें ईश्वरालाच करुणा येऊन जॉन मोठ्या सैन्यानिशीं आपल्या प्रजेशीं लढावयास निघाला असतां वाटेंत महापुरानें त्याचा नाश केला, आणि इ० स० १२१६ मध्यें निराशा व संताप यांतच त्याचा अंत झाला (प्र. १६ प० १४). कोणत्याही देशाच्या इतिहासांत कित्येक राजे आपल्या अंगच्या पराक्रम, प्रजावात्सल्यादि, गुणांनीं सुप्रसिद्ध होतात तर दुसरे कित्येक भेकड अगर प्रजापीडक म्हणून कुप्रसिद्ध होऊन राहतात. जॉन हा या दुसऱ्या वर्गांत पडतो. पण इंग्लंडच्या आजच्या राज्यघटनेचा पाया म्हणजे प्रजेनें राजाकडून मिळविलेली स्वातंत्र्याची **बडी सनद** (Magna Charta) ही या जॉन राजाकडूनच मिळविलेली असल्यामुळें त्याचें नांव या राज्यघटनेच्या इतिहासाशीं कायमचें निगडित होऊन राहिलें आहे.

स्टीफन लँगटन (Stephen Langton)—जॉन राजा इंग्लंडमधील आपल्या प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजवून सरदारापासून शेतकऱ्यापर्यंत सर्वांना 'त्राहि भगवन्' करून सोडीत असतां ज्यानें सरदारांचें व लोकांचें पुढारीपण पत्करून राजाकडून प्रजेच्या स्वातंत्र्याची सनद मान्य करून घेतली असा हा एक

' शापादपि शरादपि ब्राह्मण ' (Bishop) होता. तो जातीचा इंग्रजच असून त्याचें त्या वेळच्या पद्धतीचें उच्च धार्मिक शिक्षण पारिस व रोम येथें झालें होतें. व जॉन राजा पोपबरोबर भांडत असतांना तो रोम येथें पोपच्या हाताखालीं एक बडा हुद्देदार होता. इ. स. १२०५ मध्यें इंग्लंडमधील कँटरबरीच्या मुख्य आचार्यपदा-(Archbishop of Canterbury)संबंधानें जॉनचें व पोपचें भांडण जुंपलें, तेव्हां पोपनें लँगटनची त्या जागीं नेमणूक करून त्याला इंग्लंडमध्यें पाठविलें (प्र. १५ प. २१). पण जॉन त्याला त्या जागीं रुजू करून घेईना. त्यावरून पुढें पोपनें जॉनवर बहिष्कार घालण्यापर्यंत (Excommunication) मजल आली, आणि शेवटीं जॉन पोपला शरण जाऊन ' प्रथम गहूं देण्याला तयार नव्हता तो पुढें कणीक तिंबून देण्याला तयार झाला, ' म्हणजे त्यानें लँगटनची पोपनियुक्त नेमणूक मान्य केली, इतकेंच नव्हे तर इंग्लंडची गादीही पोपच्या कृपेमुळेंच आपण वहिवाटतों असें म्हणून पोपला वार्षिक खंडणीही देण्याचें कबूल केलें (प्र. १५ प. २५). पण जॉनची ही शरणागति इंग्लंडमध्यें कोणालाच पसंत होण्यासारखी नव्हती. त्यामुळें **लँगटन** जरी प्रथम पोपनियुक्त म्हणून इंग्लंडला आला होता तरी त्यानेंच पुढें लोकांचें पुढारीपण पत्करून नॉर्मन राजांपैकीं पहिल्या हेन्रीनें इंग्रजांना दिलेली एक जुनी सनद–जिची गेल्या कित्येक वर्षांच्या धामधुमींत लोकांना आठवणही राहिली नव्हती ती–पुढें आणली, आणि त्या सनदेच्या आधारें इंग्लंडांतील सर्व दर्जांच्या प्रजाजनांचे हक्क नमूद करणारी दुसरी एक ' **बडी सनद** ' (Magna Charta) तयार केली. या सनदेवर जॉन राजाची सही घ्यावयाची असें सर्वानुमतें ठरलें (प्र. १६ प. ४). पुढें जॉन राजा फ्रान्समध्यें लढाईंत गुंतला असतां इकडे इंग्लंडमध्यें बहुतेक मोठमोठे सरदार शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज होऊन जॉनची मार्गप्रतीक्षा करीत राहिले; आणि तो फ्रान्समधून परत आल्यावर त्यांनीं आपल्या मागण्या त्याच्यापुढें मांडल्या. जॉन अर्थातच प्रथम कबूल होईना. पण पुढें त्या सरदारांचें निश्चयाचें बळ पाहून तो गडबडला, आणि त्यानें मुकाट्यानें सही करून तो कागद सरदारांच्या हातीं दिला (प्र. १६ प. ८।९). अशा रीतीनें लँगटन हा या सनद–प्रकरणीं जो एकदां सरदारांच्या बाजूला झाला तो तसाच मरेपर्यंत (इ. स. १२२८) इंग्लंडच्या ' राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पोशिंदा ' (Supporter of National Liberty) म्हणून लोकपक्षालाच चिकटून राहिला.

सायमन मांटफर्ड (Simon Montford).—तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्रजांनीं आपल्या राजाकडून प्रजेच्या हक्कांना लेखी मान्यता मिळविली, व बड्या कौन्सिल (The Great Council)च्या संमतीशिवाय राजानें प्रजेवर कर बसवूं नये असें त्याच्याकडून कबूल करून घेतलें. या बड्या कौन्सिलांत त्या वेळीं फक्त मोठमोठे सरदार व जहागिरदार यांचाच समावेश होत असे. सामान्य प्रजेच्या प्रतिनिधींना त्यांत बसण्याचा हक्क मिळाला नव्हता. हा हक्क इंग्रज प्रजेला ज्यानें प्रथम मिळवून दिला त्याचें नांव '**सायमन डी मांटफर्ड**' (Simonde Montford) असें असून त्याचा बाप एक प्रसिद्ध फ्रेंच सैनिक होता. पण सायमनची आई व बायको (तिसऱ्या हेन्रीची बहीण) ही इंग्लिशच असल्यामुळें सायमनला इंग्लंडचाच ज्यास्त अभिमान असे. तिसऱ्या हेन्रीनें प्रजास्वातंत्र्याची सनद (Magna Charta) धाब्यावर बसवून आपल्या परदेशी नातलगांच्या व मित्रांच्या सहाय्यानें इंग्रज प्रजेवर जुलूम चालविला, तेव्हां सायमननें हेन्रीची बाजू न घेतां इंग्लिश सरदारांचाच पक्ष उचलून धरला, आणि हेन्रीशीं युद्ध करून त्याला कैद केलें (प्र.१७ प. ११). पुढें त्यानें राजाच्या नांवानें एक 'राष्ट्रसभा' बोलावली. या सभेला इंग्लंडांतले सगळे सरदार, जहागिरदार, व धर्माधिकारी यांना तर निमंत्रण होतेंच, पण त्यांच्याबरोबर प्रत्येक जिल्ह्यांतील स्वतंत्र जमिनदारांच्या व मोठ्या शहरांतील व सनदी गांवांतील सामान्य लोकांच्या प्रतिनिधींनाही सायमननें या सभेला येण्याविषयीं निमंत्रण केलें. आणि अशा रीतीनें आपल्या राष्ट्राच्या सुखदुःखाच्या चर्चेच्या वेळीं सरदार, धर्माधिकारी, व सामान्य प्रजा यांचे प्रतिनिधि एकत्र जमून विचारविनिमय करण्याच्या पद्धतीचा पाया घातला गेला (प्र. १७प. १२). सायमनला हल्लींच्या पार्लमेंटांतील लोकसभेचा (House of Commons) जनक म्हणतात तें याच कारणामुळें. तिसऱ्या हेन्रीच्या कारकिर्दींत इंग्लंडमध्यें कित्येक वर्षेंपर्यंत सायमनपेक्षां जास्त तर राहोच, पण त्याच्या इतकाही सत्तावान (powerful) पुरुष कोणी नव्हता. पण पुढें **हेन्री**चा मुलगा **एडवर्ड** हा पराक्रमी निघून त्याची व सायमनची इव्हिशाम (Evesham) येथें लढाई झाली (प्र. १७ प. १४) व तींत सायमन व त्याचा मुलगा हे मारले गेले (इ. स.१२६५).

पहिला एडवर्ड (Edward I)—इंग्लंडच्या राजघराण्यांपैकीं अँजेव्हिन घराण्यांत जे पराक्रमी व भाग्यवान राजे होऊन गेले त्यांत 'पहिल्या **एडवर्ड**'चा क्रमांक बराच वर लागण्यासारखा आहे. हा 'दुसऱ्या हेन्रीचा' पणतू. दुसऱ्या

हेन्रीच्या मागून त्याचे मुलगे ' रिचर्ड ' आणि ' जॉन ' हे क्रमानें गादीवर आले. पण रिचर्डचें आयुष्य धर्मयुद्धांत आणि जॉनचें आपल्या प्रजेशीं आणि पोपशीं भांडण्यांतच गेल्यामुळें त्यांच्या कारकिर्दीत इंग्लंडची सुधारणा अशी कोणतीच घडून आली नाहीं. विषाचें अमृत व्हावें त्याप्रमाणें जॉनचा जुलूम मात्र प्रजेला आपली स्वातंत्र्य-सनद संपादन करण्याला उपयोगी पडला. जॉनचा मुलगा ' हेन्री ' हा बापाइतका नसला तरी एकंदरींत जुलमी व इंग्रजांपेक्षां आपल्या बायकोच्या माहेराकडील म्हणजे फ्रान्समधील मित्रांकडेच ज्यास्त ओढा असणारा निघाला (प्र० १७ प० ७) आणि सरदारांशीं युद्धाचा प्रसंग आला तेव्हां तर त्याचा पराभव होऊन तो आपल्या शत्रूच्या हातीं लागला (प्र १७ प० ११). त्या वेळीं त्याचा मुलगा ' एडवर्ड ' त्याच्याबरोबर होता. पण पुढें एडवर्डनें आपली सुटका करून घेऊन सरदारांशीं युद्ध केलें, आणि बापाची सुटका करून त्याला राजपद प्राप्त करून दिलें (प्र १७ प. १४). यानंतर एडवर्ड पॅलेस्टाइन प्रांतांत धर्मयुद्ध चाललें होतें तिकडे निघून गेला. तिकडून परत येतांना वाटेंतच बापाच्या निधनाची वार्ता त्याला समजली. पुढें इंग्लंडला आल्यावर त्याला राज्याभिषेक झाला. बापाच्या व आजोबाच्या कारकिर्दींत प्रजा जुलुमानें गांजल्यामुळेंच ती राजाच्या विरुद्ध होऊन तिनें प्रथम **'मॅग्नाचार्टा'** व मागाहून **'पार्लमेंट'** सभेंत सामान्य लोकांच्या प्रतिनिधींनींही बसून राष्ट्राच्या सुखदुःखाची चर्चा करण्याचा हक्क राजाबरोबर युद्ध करून मिळवून घेतला, हें एडवर्डला माहीत असल्यामुळें व तो जात्याच दूरदर्शी व समंजस असल्यामुळें त्यानें प्रथमपासूनच पार्लमेंटच्या सल्ल्यानें राज्यकारभार पाहण्याची पद्धति चालू केली. त्यामुळें पार्लमेंटचें महत्त्व वाढत चाललें (प्र० १८ प० २।१५). वेल्स व स्कॉटलंड हे शेजारचे प्रांतही एडवर्डनें पूर्णपणें आपल्या अंमलाखालीं आणले (प्र० १८ प० ५।१०). फ्रान्सबरोबर झालेल्या झगड्यांतही त्याला बरेंच यश मिळालें. अशा रीतीनें स्वतःच्या राज्यांत शांतता राखून इंग्लंडचा बाहेर देशीं लौकिक वाढविणाऱ्या राजांत त्याची गणना होते ती योग्य आहे. तो इ० स० १३०६ या वर्षी स्कॉटलंडवर स्वारी करण्यास जात असतां वाटेंतच मरण पावला (प्र० १८ प० १८).

तिसरा एडवर्ड (Edward III)—' पहिल्या एडवर्ड'च्या मागून इंग्लंडच्या राजघराण्यांत बरीच बजबजपुरी माजली. हलकट लोकांची संगत, पार्लमेंटचें वाढतें

बळ, आणि बायकोचें चंचल पातिव्रत्य यांनीं 'दुसऱ्या एडवर्डचे' स्वतःचे दिवस तर दुःखांत व कष्टांत गेलेच, पण त्याच्या कारकिर्दीत इंग्लंडचा बाहेरदेशांतील दबदबाही कमी झाला. स्कॉटलंड तर स्वतंत्रच झालें (प्र. १९ प. ५।६). शेवटीं पार्लमेंटनें राजाला पदच्युत करून त्याचा मुलगा **तिसरा एडवर्ड** याला गादीवर बसविलें (प्र. १९ प. १३). हा मुलगा मात्र पुढें आपल्या आजोबासारखा (पहिला एडवर्ड) पराक्रमी निघाला. त्यानें स्काटलंड देश पुन्हां आपल्या सत्तेखालीं आणिला (प्र. २० प. २), आणि फ्रान्समध्यें तर खुद्द फ्रान्सच्या गादीवरच आपला हक्क आहे असें सांगून इ. स. १३३७ मध्यें सुप्रसिद्ध शतवार्षिक युद्धाला सुरवात केली (प्र २० प. ५) व स्वतःच्या अंगांत धमक असेपर्यंत इंग्लंडच्या बाहुबलाचा फ्रान्सला चांगलाच प्रत्यय आणून दिला. खुद्द इंग्लंडमध्यें राजद्रोहाची व्याप्ति मर्यादित करणें, राजमंत्र्यांची गैरवर्तनाबद्दल चौकशी करण्याचा हक्क पार्लमेंटच्या लोकसभेला देणें, पोपची इंग्लंडमधील देवस्थानांवरील सत्ता कमी करणें, वगैरे गोष्टी करून त्यानें आपल्या प्रजेला संतुष्ट राखलें होतें (प्र. २० प० १७।१८।१९). त्याच्या कारकिर्दीत इंग्लंडमधील लोंकरीच्या व्यापाराचीही बरीच भरभराट झाली. हा राजा प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर पार्लमेंटचें मत घेत असल्यामुळें त्याच्या कारकिर्दीत पार्लमेंटचें महत्त्व व सत्ता यांची बरीच वाढ झाली.

जॉन विक्लिफ (John Wycliffe)—हा मध्य युगांतील इंग्लंडमधला पहिला धर्मसुधारक होय. त्याचा जन्म इ. स. १३२४ मध्यें झाला. इ. स. १३६५ मध्यें त्याला 'ऑक्सफर्ड' येथें एका देवस्थानचें अधिकारपद (Warden of Canterbury Hall) देण्यांत आलें. पण त्याचें तेथल्या 'यतीं'शीं (Monks) पटेनासें झाल्यामुळें त्याला पुढें त्या स्थानावरून काढून टाकण्यांत आलें. त्यानें बायबलाचें इंग्रजींत भाषांतर करून त्या वेळचे धर्माधिकारी सांगत असत, तो बायबलाचा अर्थ कसा चुकीचा आहे हें लोकनिदर्शनास आणून दिलें (प्र. २१ प. २३). त्यामुळें अर्थातच त्याची नास्तिकांत गणना होऊं लागली, आणि लंडनच्या बिशपनें त्याची चौकशी करण्यासाठीं त्याला आपल्यासमोर हजर राहण्याचा हुकूम केला (इ. स. १३७७). त्याप्रमाणें तो हजर झाला; पण त्याच वेळीं राजघराण्यांतील प्रसिद्ध सरदार **जॉन ऑफ गॉंट** (John of Gaunt) हाही त्याच्याबरोबरच असल्यामुळें, नास्तिक मतांबद्दल (heretic views) त्याला शिक्षा व्हावयाची ती

झाली नाहीं. धर्माधिकाऱ्यांनीं विलासीपणा सोडून देऊन धर्मोपदेश हेंच आपलें ध्येय मानावें, इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांवर पोपची सत्ता असूं नये, राजसत्ता धर्मसत्तेपेक्षां श्रेष्ठ आहे, उपाध्यायांनीं (Priests) प्रभुभोजनादि विधींतील वेडगळ आचार कमी करून लोकांना खऱ्या धर्मतत्त्वांचें ज्ञान द्यावें, अशीं मतें विक्लिफ प्रतिपादन करीत असे. इंग्लंडमधील ख्रिस्ती धर्मसुधारणेच्या इतिहासांत विक्लिफचा 'सुधारणेचा



इंग्लंडमधील आद्यधर्मसुधारक व गद्य ग्रंथकार विक्लिफ.

उदयतारा' (The Morning Star of the Reformation) या नांवानें उल्लेख करतात. तो इ. स. १३८४ या वर्षीं मरण पावला. त्याच्या अनुयायांना लोलर्ड (Lollards) म्हणजे बडबडे (Babblers) असें म्हणत असत !

चॉसर (Chaucer)—इंग्रजी भाषेंत 'कँटरबरी टेल्स' (Canterbury Tales) या नांवाचें एक फार जुनें काव्य आहे. या काव्यांत कँटरबरी येथील

साधु 'थॉमस बेकेट' याच्या समाधीचें (थडग्याचें) दर्शन घेण्यासाठीं कांहीं यात्रेकरू निघाले आहेत, व ते वाटेंत एकमेकांना गोष्टी सांगून प्रवासाचा श्रम हलका करीत आहेत अशी कल्पना करून, त्या गोष्टींतून इंग्लंडच्या तत्कालीन परिस्थितीचें, व इंग्रजांच्या त्या वेळच्या रीतिरिवाजांचें, आचारविचारांचें, व समजुतीचें चित्र रेखाटलें आहे. या प्रवासी मंडळींत सरदार, धर्मोपदेशक, व्यापारी, जमिनदार,



इंग्लंडचा आद्य कवि चॉसर.

शेतकरी, स्वयंपाकी, गुलाम वगैरे प्रत्येक वर्गाचा कोणी ना कोणी पुरुष अगर स्त्री आहे असें दाखविलें असून त्यांचीं त्या वेळचीं संभाषणें म्हणजे तत्कालीन इतिहास समजून घेण्याचें एक उत्कृष्ट साधन असें समजण्यांत येतें. हें काव्य इ. स. च्या १४ व्या शतकांतलें असून तें ज्यानें लिहिलें त्या कवीचें नांव **जॉफ्रे चॉसर** (Geoffrey Chaucer) असें होतें. तो 'जॉन विक्लिफ'चा समकालीन

असून धार्मिक बाबतींत त्याचाच अनुयायी होता. विक्लिफ हा जसा इंग्लंडांतील आद्य गद्य ग्रंथकार (Father of English Prose), तसा चॉसर हा इंग्लंडांतील आद्य कवि (Father of English Verse) असें समजतात. आणि बुद्धिमत्ता आणि कल्पकता या गुणांतही त्याचा क्रमांक शेक्सपिअरच्या खालोखालचा लागतो असें इंग्लिश रसिकांचें मत आहे.

पांचवा हेन्री (Henry V)—चौदाव्या पंधराव्या शतकांत इंग्लंडच्या फ्रान्सबरोबर झालेल्या ‘ शतवार्षिक ’ युद्धांत इंग्लंडच्या ज्या राजांनीं पराक्रम गाजविला त्यांत ‘पांचव्या **हेन्री**’ची प्रामुख्यानें गणना होते. इ.स. १४१५ या वर्षीं अॅगिनकोर्ट येथें झालेलें घनघोर युद्ध, व त्यांत इंग्लंडनें मिळविलेला अपूर्व व शेवटचाच विजय (प्र. २२ पं १८) यांनीं हेन्रीचा स्वराज्यांत व परराज्यांतही चांगला लौकिक झाला, आणि पार्लमेंट सभा तर त्याच्यावर इतकी भाळून गेली कीं त्यानें कसलीही मागणी करण्याचा अवकाश कीं पार्लमेंटनें ती पुरविलीच असा प्रकार चालू झाला. पण त्याबरोबरच हेन्रीचें ‘ मागणें ’ आणि पार्लमेंटनें त्याला ‘ संमति ’ देणें ही जी प्रथा पडली, ती पार्लमेंटच्या अधिकारसंपादनाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची ठरली. हेन्रीच्या कारकिर्दींत शेवटीं शेवटीं फ्रान्स देश जवळ जवळ इंग्लंडला जोडल्यासारखाच झाला होता असें म्हणण्याला हरकत नाहीं (प्र. २२ प. १९). पण पुढें मात्र हें पारडें फिरलें. हेन्री स्वभावतः फार मनमिळाऊ असून मित्र कसे जोडावे आणि ते कसे राखावे ही कला त्याला चांगली साधली होती. लहानपणीं उनाड व स्वच्छंदी असून सुद्धां मोठेपणीं राज्यकारभाराची जबाबदारी अंगावर पडल्याबरोबर त्याचा पूर्व वयांतील स्वभाव अगदीं पालटल्यासारखा झाला होता. तो इ. स. १४२२ या वर्षीं एकाएकीं मरण पावला.

जोन ऑफ आर्क (Joan of Arc)—ही फ्रान्समधील एका शेतकऱ्याची मुलगी. इंग्रजांच्या फ्रान्सबरोबर चाललेल्या शतवार्षिक युद्धांत इ स. १४२५ च्या सुमाराला फ्रान्सचा राजा **चार्लस** याचा अगदीं नाइलाज होऊन फ्रान्सदेश इंग्लंडला कायमचा जोडला जातो कीं काय अशी परिस्थिति उत्पन्न झाली असतां (प्र. २३ प. ३)आयत्या वेळीं या मुलीच्या अंगीं एक प्रकारचें दैवी तेज संचरून ती घोड्यावर स्वार होऊन निघाली, आणि **ऑर्लीन्स** येथें फ्रेंच शिपाई वेढ्यांत अडकून पडले होते, त्यांना अन्नसामुग्री पोंचविण्याचें कार्य तिनें पहिल्यानें पार पाडलें (प्र. २३ प. ६). तिच्या धडाडीच्या कर्तृत्वानें शत्रुपक्षाच्या सैनिकांचेही डोळे दिपून गेले, आणि तिच्या वाटेस

जाणें म्हणजे भलतीच आपत्ति आपल्यावर ओढवून घेणें असा त्यांचा समज झाला. पुढें चार्लसला 'ऱ्हीम्स' येथें राज्याभिषेक करून (प्र. २३ प. ७) ही 'ऑर्लिन्सची कन्या' (Maid of Orleans) स्वस्थ बसणार होती. पण चार्लसनें आग्रह करून तिला आपल्या सैन्यांतच ठेवून घेतलें. पण याचा परिणाम विपरीत होऊन पुढें फ्रान्सच्याच एका हितशत्रूनें तिला पकडून इंग्लिशांच्या हवालीं केलें. या अबलेचा अद्भुत पराक्रम हा तिचा स्वतःचा नसून ती सैतानाच्या राज्यांतली एक 'चेटकीण' आहे असा तिच्याविषयीं इंग्लिश सैनिकांचा समज झाला होता, आणि चेटुक करणें हा ख्रिस्तीधर्माच्या दृष्टीनें गुन्हा असल्यामुळें तिची जेव्हां इंग्लिश धर्माधिकाऱ्यांच्या सभेंत 'चौकशी' झाली, तेव्हां या 'चेटुका'बद्दल तिला जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यांत आली (इ. स. १४३१) आणि ती ताबडतोब अंमलांत येऊन फ्रान्सचें ऐन वेळीं नांव राखणाऱ्या या 'लक्ष्मीबाई'ला शेवटीं धारातीर्थीं नसलें तरी अग्नितीर्थांवरच मरण आलें! (प्र. २३ प. ७)

वुइल्यम कॅक्स्टन (William Caxton)—हा इंग्लंडमधील एका शेतकऱ्याचा मुलगा इ. स. १४१२ मध्यें जन्मला. पुढें मोठा झाल्यावर त्यानें लंडनमधील एका व्यापाऱ्याकडे नोकरी पत्करली, आणि त्या व्यापाऱ्याचा एजंट म्हणून तो इ. स. १४६८ मध्यें जर्मन प्रांतांतील ब्रूजिस (Bruges) नांवाच्या शहरीं गेला. त्या प्रांतांत गटेनबर्ग (Guttenberg) यानें छापण्याच्या 'कलेचा' शोध पूर्वींच लावला होता. ही कला साध्य झाल्यापासून 'बायबल'च्या प्रती स्वस्त होऊन लोकांना या कलेच्या शोधकाचें मोठें आश्चर्य वाटत असे. कित्येक तर या शोधकांनीं सैतानाला वश करून घेतला आहे असेंही म्हणत असत! कॅक्स्टननें कलोन (Cologne) येथें लवकरच ही कला साध्य करून घेतली, आणि इ. स. १४७१ मध्यें इंग्लंडमध्यें येऊन आपल्या छापखान्याची स्थापना केली. वेस्टमिन्स्टर येथें रीडपेल (Redepale) नांवाच्या त्याच्या तिमजली घरांत त्याच्या छापखान्याचें काम चालू असतां प्रथम प्रथम ग्राहकांची व प्रेक्षकांची रीघ नाहीं अशी गर्दी जमत असे. त्यानें चौदा वर्षांत एकूण अडसष्ट 'ग्रंथ' छापून काढले. मुद्रणकलेप्रमाणेंच लेखनकलेंतही तो प्रवीण होता. त्यानें कित्येक लॅटिन व ग्रीक ग्रंथांचीं भाषांतरें केलीं असून 'ट्रॉयचा इतिहास' (Histories of Troy) 'आणि बुद्धिबळाचा खेळ' (Game of the Chess) हे त्याचे पहिले ग्रंथ होत. तो इ. स. १४९१मध्यें मरण पावला. मध्ययुगा (Middle Ages)च्या अखेरीस इंग्लंडमध्यें ज्ञानदीप पाजळण्याला ज्यांनीं सुरवात केली, त्यांत कॅक्स्टनचा क्रमांक पहिला धरतात. ज्ञानाच्या मागून प्रकाश

आणि प्रकाशाच्या मागून स्वातंत्र्य (With knowledge comes light, and light leads to freedom) हा क्रम केव्हांही अबाधितच असल्यामुळें ब्रिटिश वाङ्मय आणि ब्रिटिश स्वातंत्र्य यांचा अभिमान वाहणारा प्रत्येक इंग्रज पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील कॅक्स्टनच्या ओबडधोबड छापखान्याचें (Caxton's Clumsy Press) मोठें कौतुक करीत असतो यांत नवल नाहीं.

प्रस्तुत भागांत आलेल्या महत्त्वाच्या गोष्टी.

खिस्ती धर्मयुद्धें—(इ. स. १०९६–१२७३) युरोपखंडाच्या इतिहासांत '**क्रुसेड्स्**' (Crusades) म्हणजे खिस्ती धर्माचें चिन्ह जें 'क्रॉस', तें अभिमानानें छातीवर धारण करणाऱ्या खिस्ती लोकांचीं खिस्तधर्मरक्षणासाठीं मुसलमानांशीं झालेलीं युद्धें म्हणून कांहीं युद्धें प्रसिद्ध आहेत. आशिया खंडाच्या पश्चिम भागीं 'आशिया मायनर' (Asia Minor) नांवाचा एक लहानसा प्रांत आहे. त्यांतील 'पॅलेस्टाइन' नांवाच्या एका छोट्या भागांत जेरुसलेम (Jerusalem) नांवाचें शहर आहे. हें शहर येशू खिस्ताची जन्मभूमि व चरित्रस्थल म्हणून प्रसिद्ध असून हिंदुस्तानांत मथुरा किंवा गोकुळवृंदावनासारख्या स्थानाला श्रीकृष्णाचें क्रीडास्थान म्हणून जसा पवित्रपणा आलेला आहे, तसाच भाविक खिस्ती लोकांच्या दृष्टीनें जेरुसलेमच्या या भूमीलाही फार पवित्रपणा आलेला आहे. पूर्वीच्या काळीं या पवित्र स्थळाची यात्रा करण्यासाठीं युरोपखंडांतून हजारों खिस्ती लोक दरसाल तिकडे जात असत. खिस्ती लोकांप्रमाणें मुसलमान लोकांनाही ही भूमि पवित्र वाटते. कारण त्यांच्या दृष्टीनें पूज्य असे **महंमद पैगंबराच्या** पूर्वींचे प्रेषित **इब्राहिम, दाउद**, व **इसा** (जीजस) हे याच भूमींत होऊन गेले. 'महंमदाचें द्वार' 'उमरची मशीद' व 'सखरा' नांवाचा पवित्र खडक हीं मुसलमानांचीं पवित्र स्थानें याच भागांत आहेत. महंमदानें आपल्या 'बुराग' घोड्यावर बसून स्वर्गप्रयाण केलें, तें जेरुसलेममधूनच असें मुसलमान लोक समजतात. अर्थात हें स्थान खिस्ती व मुसलमान यांना सारखेंच पवित्र वाटत असल्यामुळें त्याच्यावर आपला अंमल असावा असें दोघांनाही वाटणें साहजिक आहे. पण खिस्तपूर्व प्रेषितांविषयीं या उभय धर्मांच्या लोकांना सारखाच आदर असला तरी खिस्ताबद्दल अगर खिस्तोत्तर प्रेषितांबद्दल त्यांचें मतैक्य नाहीं व या दोन्ही धर्मांतील धर्मविधि व आचारविचार यांत आतां जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे.

इ. स. १०७६ च्या सुमाराला पॅलेस्टाइन प्रांत मुसलमानांच्या ताब्यांत गेला. तेव्हांपासून ख्रिस्ती यात्रेकरू तिकडे गेले असतां त्यांना मुसलमानांकडून त्रास होऊं लागला. इ. स. १०९६ च्या सुमारास **पीटर** या नांवाचा एक ख्रिस्ती यति (Peter the Hermit) तिकडे गेला असतां त्यानें तेथील ख्रिस्तस्थानाची व ख्रिस्ती लोकांची दुःस्थिति प्रत्यक्ष अवलोकन केली, व त्याला स्वतःलाही मुसलमानांकडून फार त्रास भोगावा लागला. तेव्हां त्यानें युरोपांत येऊन देशोदेशींच्या ख्रिस्ती राजांना ही पवित्र भूमि (Holy Land) ख्रिस्ती राजांच्या अंमलाखालीं आणण्याबद्दल कळकळीची विनंति केली, व त्या वेळचा इटलींतील ख्रिस्ती धर्माध्यक्ष अर्बन (Urban II) यानें अखेर या कामीं लक्ष घालून फ्रान्सच्या दाक्षिण भागीं क्लर्मांट (Clermant) येथें एक जंगी सभा भरवून ख्रिस्तानुयायांना धर्मासाठीं प्राण देऊनही ही पवित्र भूमि आपल्या ताब्यांत आणण्याचा उपदेश केला.* त्यावरून पुढें सुमारें २०० वर्षेपर्यंत निरनिराळ्या वेळीं एकंदर

---

* पोप अर्बनचें त्या वेळचें आवेशाचें भाषण एका ठिकाणीं दिलें आहे तें असें:—
"If you must have blood, bathe your hands in the blood of infidels. I speak to you with harshness, because my ministry obliges me to do so; soldiers of Hell become soldiers of the living God! When Jesus Christ summons you to his defence, let no base affection detain you in your homes; see nothing but the shame and evils of the Christians; listen to nothing but the groans of Jerusalem, and remember well that the Lord has said to you: He who loves his father and his mother more than Me is not worthy of Me; whoever will abandon his house or his children or his inheritance, for the sake of My name shall be recompensed a hundredfold, and possess life eternal." याचें तात्पर्य असें कीं, "ख्रिस्तबंधूनों, जर तुम्हांला युद्धांतल्या रक्तपाताची हौसच असेल तर आपले हात निदान पाखंड्यांच्या रक्तांत तरी भिजवून घ्या ! मी ज्या गादीवर आरूढ झालों आहें, ती गादी असें कठोर भाषण करण्याला मला भाग पाडीत आहे ! आपसांत लढून नरकांतले वीर होण्या-

सात आठ खेपा युरोपांतील ख्रिस्ती राजांनीं ही भूमि मुसलमानांपासून हस्तगत करण्याचे प्रयत्न केले. पण ती कायमची अशी त्यांच्या हातीं केव्हांच आली नाहीं. इंग्लंडच्या राजांपैकीं '**रॉबर्ट**' नॉर्मन, '**रिचर्ड**' अँजेव्हिन, व **एडवर्ड** अँजेव्हिन हे तीन राजपुरुष या धर्मयुद्धांत भाग घेण्यासाठीं पॅलेस्टाइन प्रांतीं गेले होते (प्र. ११ प. ४।५।१२; प्र. १५ प. ९।१० व प्र. १७ प. १७). [गेल्या महायुद्धाच्या शेवटीं (इ० स० १९१८) झालेल्या तहानुसार हा प्रांत आतां इंग्रजांच्या संरक्षण-क्षेत्रांत (Mandate) आला आहे.] असो.

मध्ययुगांत झालेल्या या ख्रिस्ती–मुसलमानांच्या झटापटींत सुमारें २० लाख ख्रिस्ती लोक प्राणास मुकले, आणि शेवटीं ख्रिस्ती लोकांना जय मिळाला नाहीं तो नाहींच. तथापि या युद्धांमुळें आशिया व युरोप यांच्यामधील दळणवळण वाढून पाश्चात्यांचें पौर्वात्यांशीं विशेषतः अरब मुसलमानांशीं संघट्टण वाढत जाऊन ख्रिस्ती-लोकांचा अरब विद्वानांशीं परिचय झाला; व अंकगणित, बीजगणित, भूमिति, ज्योतिष, वैद्यक, वगैरे शास्त्रें ते लोक आरब गुरूंपाशीं शिकले, आणि पुढें युरोपखंडांत या शास्त्रांची प्रगति झपाट्यानें झाली. आशिया खंडांत विशेषतः हिंदुस्तानांत तयार होणारें तलम कापड व इतर व्यापाराचे पदार्थ युरोप खंडांत जाऊं लागण्याला या धर्मयुद्धामुळें झालेल्या परस्पर संघट्टनामुळेंच फार मदत झाली.

युरोपांतून ख्रिस्तभूमीचा ताबा घेण्यासाठीं पूर्वेकडे आलेले ख्रिस्ती लोक, ज्यांना ते पाखंडी व रानटी समजत असत, त्या मुसलमानांचें ऐश्वर्य पाहून आश्चर्यचकित होत असत; आणि ख्रिस्तभूमि हस्तगत करण्याचे त्यांचे प्रयत्न सफल झाले नाहींत तरी या कालांत त्यांचा व्यापाराच्या रुपानें जो फायदा झाला तो ख्रिस्तभूमीच्या किंमती-पेक्षां कितीतरी ज्यास्त मोलाचा होता. त्या वेळचा एक इतिहासकार सांगतोः—

पेक्षां पाखंड्यांशीं लढून जिवंत देवाचे वीर तरी व्हा! येशू ख्रिस्त तुम्हांला आपल्या रक्षणासाठीं पुढें या म्हणून सांगत असतांना आपल्या घरादारांची कसली ममता घेऊन बसला आहां? तिकडे ख्रिश्चन लोकांचे काय हाल चालले आहेत, त्यांच्यावर कसे लज्जास्पद प्रसंग ओढवत आहेत ते पहा. जेरुसलेमच्या किंकाळ्या तुमचे कान बधिर करूं द्या, आणि प्रभु येशूनें तुम्हांला काय उपदेश केला आहे तो लक्षांत घ्या. प्रभूनें सांगितलें आहे, 'ज्याला गृह-सुत-धन-दारा यांचा लोभ सुटत नाहीं, तो माझ्याकडे येण्याला पात्र नाहीं; पण जो त्यांचा त्याग करून माझें नांव घेतो, त्याला त्याच्या सहस्रपट ऐश्वर्य प्राप्त होऊन चिरंतन सुखाचा लाभ होतो.''

"During this period, Venice, Pisa and Genoa acquired great wealth and reputation through the fostering of their trade by the needs of the crusaders, and the opening up of the East. The Mediterranean was whitened with the sails of their transport ships, which were constantly plying between the various ports of Europe and the towns of the Syrian Coast."

म्हणजे "धर्मयुद्धाच्या या कालांत पूर्वेकडच्या 'द्वारा'ची पश्चिमेला ओळख होऊन ख्रिस्ती वीरांच्या गरजा भागविण्यासाठीं म्हणून जो व्यापार सुरू झाला, त्या योगानें व्हेनिस, पिसा आणि जिनोआसारखीं शहरें अत्यंत भरभराटीला येऊन तेथें सोन्याचा धूर निघूं लागला. आणि युरोप खंड आणि सिरियाचा किनारा यांच्या दरम्यानच्या अनेक बंदरामध्यें येरझाऱ्या करणाऱ्या गलबतांच्या शिडांनीं भूमध्यसमुद्राच्या काळ्या पाण्याला जणूं काय पांढरा रंग चढल्यासारखा झाला! शिवाय खुद्द युरोपखंडांतील निरनिराळ्या देशांतील बरेचसे सरदार या युद्धांत खांद्याला खांदा लावून लढत असल्यामुळें त्यांचें धार्मिक ऐक्य दृढ झालें, व सामाजिक बाबतींतही बरीच क्रांति होऊन युरोपांतल्या प्रत्येक देशांत स्वतंत्र नागरिकांचा वर्ग अस्तित्वांत आला. आणि त्याचा परिणाम पुढें सगळ्या देशांतील सरदार वर्गाची सत्ता नष्ट होऊन ती सामान्य लोकांच्या हातीं येण्यांत झाला.

शतवार्षिक युद्ध—इंग्लंडमध्यें 'तिसरा **एडवर्ड**' राजा राज्य करीत असतां इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें एका महायुद्धाला सुरवात झाली. तिसरा एडवर्ड हा फार महत्त्वाकांक्षी असून त्या वेळच्या फ्रान्सच्या बादशहाशीं त्याचें मामाभाच्याचें नातें लागत होतें. हा बादशहा (Charles) निपुत्रिक मरण पावला, तेव्हां एडवर्डनें फ्रान्सची गादी मिळविण्याची आपली महत्त्वाकांक्षा जाहीर करून त्या गादीवर आपला आईकडून वारसा आहे असें सांगण्याला सुरवात केली (प्र. २० प. ४). पण फ्रान्समधील 'वारसाचा कायदा' स्त्रियांकडे गादीचा वारसा जाण्याच्या विरुद्ध होता. त्यामुळें तिकडचें सरदारमंडळ एडवर्डचा हा हक्क मान्य करीना. त्यांनीं माजी बादशहाचा चुलतभाऊ फिलिप म्हणून होता त्याला फ्रान्सची गादी दिली व पुढें एडवर्डनेंही त्याला फ्रान्सचा बादशहा म्हणून मान्यता दिली (प्र. २० प. ४). तथापि फ्रान्सची गादी पुढें मागें मिळविण्याचा त्याचा बेत मात्र कायमच होता. याच सुमारास इंग्लंडचें स्काटलंडशीं युद्ध जुंपलें. तेव्हां फ्रान्सनें इंग्लंडविरुद्ध स्काटलंडला मदत केली. त्यामुळें एडवर्डच्या फ्रान्स-

विषयींच्या वैरांत भर पडली (प्र. २० प. ५). जॉन राजाच्या कारकिर्दीत फ्रान्स मधील इंग्लंडच्या मालकीचे बहुतेक प्रांत फ्रेंचांकडे गेलेच होते. पण ॲक्विटेन नांवाचा एक प्रांत अजून इंग्रजांकडे कायम होता. त्यावर फ्रेंचांचा डोळा असून तो प्रांत तरी हातचा जाऊं नये अशी इंग्लंडची इच्छा होती. शिवाय त्या वेळीं फ्लँडर्स (Flanders) म्हणजे हल्लींच्या बेलज्यम (Belgium) प्रांतांतील फ्लेमिंग नांवाच्या कोष्टयांचा लोंकरीच्या व्यापारांत हातखंडा असून त्या लोकांचा इंग्लंडकडे ओढा होता. तेव्हां त्यांना आपल्या कह्यांत ठेवून इंग्लंडच्या या व्यापारामुळें होणाऱ्या भरभराटीला आळा घालण्याची फ्रेंच मुत्सद्यांची खटपट चालली होती. तेव्हां ती हाणून पाडण्यासाठीं फ्रान्स बरोबर युद्ध करणें इंग्लंडला अवश्य वाटत असे. अशीं अनेकविध कारणें त्या वेळीं फ्रान्स-बरोबर युद्ध उपस्थित होण्याला निमित्त झालीं होतीं. या युद्धाला इ. स. १३४० मध्यें सुरवात झाली व तें मधून मधून खंड पडला तरी इ. स. १४५३ पर्यंत चालू होतें.

या युद्धाचे मुख्य दोन भाग पडतात. सन १३४० ते १३७५ पर्यंतचा पहिला काल; आणि सन १४१५ ते १४५३ पर्यंतचा दुसरा काल. या युद्धांत इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांतील सरदारांचा पुष्कळ नाश झाला; इंग्लंडच्या राजाची फ्रान्सचा बादशाहा होण्याची महत्त्वाकांक्षा कायमची अशी कधींच सफल झाली नाहीं, आणि अखेर युद्धसमाप्तीच्या वेळीं कोणाचाच विशेष फायदा न होतां जवळ जवळ मूळची स्थितीच कायम राहिली. नाहीं म्हणावयास इंग्लंडधील सामान्य लोकांना मात्र या कालांत सरदारांच्या जाचांतून सुटल्यामुळें हायसें वाटलें, व लढाईची हौस असणाऱ्या नार्मन सरदारांना फ्रान्समध्यें आपल्याबरोबर सैनिक म्हणून बऱ्याचशा इंग्रज लोकांना घेऊन जाणें भाग पडल्यामुळें व नार्मन सरदार व हे इंग्रज सैनिक खांद्याला खांदा लावून लढत असल्यामुळें इंग्रजांचा आत्मविश्वास वाढला, नार्मन व इंग्रज यांच्यामधील उच्चनीच भाव नष्ट झाला, आणि इंग्लंडचें एक राष्ट्र होण्याला तेवढी मदत झाली. असो.

इ. स. १३४० ते १३७५ च्या पहिल्या कालविभागांत क्रेसी (इ. स. १३४६), कॅले (१३४७) आणि पॉयटर्स (१३५६) अशा महत्त्वाच्या तीन लढाया झाल्या. त्यांत इंग्रजांना जय मिळून शेवटच्या लढाईत तर फ्रान्सचा राजा जॉन इंग्रजांच्या हातीं सांपडला (प्र २० प. ११ ते १५.). पण दुसऱ्या कालविभागांतील लढायांत पहिल्यानें इंग्रजांना जय मिळाला तरी शेवटीं इ. स. १३४० पासून हें पारडें फिरलें. इ. स. १४१५ मध्यें इंग्लंडचा राजा पांचवा हेन्री यानें फ्रान्सच्या गादीवरील आपल्या हक्काला ट्रॉइज (Troyes) च्या तहानें फ्रेंचांकडून मान्यताही मिळविली.

होती (प्र. २३ प. १९). पण पुढें पांचवा हेन्री मरण पावल्यावर त्याचा अल्पवयी मुलगा 'सहावा हेन्री' याच्या कारकिर्दींत फ्रान्समधील इंग्रजांच्या मुलुखावरचा कारभारी बेडफर्ड यानें ऑर्लीन्स नामक शहराला वेढा दिला असतां सुप्रसिद्ध 'जोन ऑफ आर्क' या तरुण पोरीनें तो वेढा उठवून फ्रेंच लोकांचें मुख उज्ज्वल केलें (प्र. २३ प. ६). व त्या वेळीं इंग्रजांची तिकडची घडी जी एकदां विसकटली, ती पुनः त्यांना सांवरतां न आल्यामुळें इ० स० १४५३ मध्यें या युद्धाची परिसमाप्ति झाली; त्या वेळीं एका कॅले बंदराशिवाय फ्रान्समधील इंग्रजांचा सगळा मुलूख कायमचा फ्रेंचांच्या हातीं गेला. या शतवार्षिक युद्धानंतर फ्रान्सच्या सरदारांमधील यादवी थांबून तें राष्ट्र भरभराटीस चढलें. पण इंग्लंडच्या सरदारांना मात्र बाहेर पराक्रम गाजविण्याचें एक क्षेत्र नाहींसें झाल्यामुळें खुद्द इंग्लंडमध्येंच आपसांत यादवी माजली. ही यादवी इंग्लंडच्या इतिहासांत 'गुलाबी युद्धें' या नांवानें प्रसिद्ध आहे.

गुलाबी युद्धें—इ. स. १४५५ पासून इ. स. १४८५ पर्यंत इंग्लंडमध्यें सरदारां-सरदारांमध्यें चाललेल्या यादवीला इंग्लंडच्या इतिहासांत 'गुलाबी युद्धें' असें नांव दिलेलें आहे. त्याचें कारण असें कीं, हीं युद्धें मुख्यतः ज्या दोन पक्षांमध्यें झालीं, त्यांनीं (यॉर्कपक्ष व लँकॅस्टर पक्ष) आपल्या पक्षाचें चिन्ह म्हणून एकानें पांढरें व दुसऱ्यानें तांबडें गुलाबाचें फूल धारण केलें होतें. या युद्धांत दोन्ही पक्षांकडून अनेक अत्याचार झाले. पण त्यांची झळ सामान्य इंग्लिश प्रजेला मात्र फारशी लागली नाहीं. इ. स. १४५५ मध्यें 'सेंट आल्बन्स' (St. Albans), इ. स. १४६० मध्यें वेकफील्ड ग्रीन (Wakefield Green), इ. स. १४७१ मध्यें बार्नेट (Barnet) आणि इ. स. १४८५ मध्यें बॉसवर्थफील्ड (Bosworth field) या लढाया या युद्धांतील मोठ्या आणीबाणीच्या म्हणून प्रसिद्ध आहेत. अखेर इ. स. १४८५ मध्यें लँकॅस्टर पक्षाची यॉर्कपक्षीयांवर सरशी होऊन हें युद्ध मिटलें, आणि त्याच्याबरोबर अँजेव्हिन घराण्याचाहि शेवट होऊन वेल्समधील 'ट्यूडर' नांवाच्या घराण्यांतील विजयी सरदार हेन्री हा 'सातवा हेन्री' म्हणून इंग्लंडचा राजा झाला (प्र० २२ प० १-२; प्र० २३ प० १८ ते २३; प्र० २४ प० १ ते ५, ७ ते १६, २१ ते २८; प्र० २५ प० १ ते ६.).

सरंजामी ऊर्फ जहागिरी पद्धति—इ. स. १०६६ या वर्षी फ्रान्समधील नॉर्मंडीचा सरदार वुइल्यम यानें इंग्लंड देश पादाक्रांत केल्यावर फ्रान्समध्यें चालू असलेली जमीनधारणाची सरंजामी ऊर्फ जहागिरी पद्धति (Feudal system) त्यानें थोड्या

फरकानें इंग्लंडमध्यें सुरू केली. या पद्धतीप्रमाणें राजा हा देशांतील सर्व जमिनीचा मालक गणला जाई; व तो हिंदुस्थानांतील एकादा जिल्हा किंवा तालुका यासारखे जमिनीचे मोठमोठे विभाग ज्या सरदारांना वांटून देई, ते सरदार त्याचे मांडलिक जहागिरदार होत. या जहागिरीचें उत्पन्न त्या त्या सरदारांनीं भोगावें, राजाला जहागिरीचा मोबदला म्हणून युद्धप्रसंगीं ससैन्य मदत करावी, व धनीपणाचा हक्क म्हणून नित्यनैमित्तिक प्रसंगीं ठराविक खंडणी द्यावी असा करार असे. एकादा जहागिरदार मरण पावून दुसरा वारस झाला म्हणजे त्या वारसाला राजाला नजराणा द्यावा लागे. वारस अज्ञान असला तर त्याचा कायदेशीर पालक राजा होई, व अज्ञानाच्या लग्नकार्यादि प्रसंगींहि राजाला बरीच प्राप्ति होई. राजा बंदींत पडला, त्याच्या मुलांचें कार्यप्रस्थ निघालें, किंवा राजघराण्यावर दुसरा एखादा बरा वाईट प्रसंग ओढवला, तर त्या वेळींहि या जहागिरदारांना राजाला हरएक प्रकारची मदत करावी लागे. एकाद्या जहागिरदारावर राजद्रोहाचा गुन्हा शाबीत झाला किंवा त्याचें निस्संतान झालें, तर त्याची जहागीर जप्त होई. राजाची स्वारी फिरती. वर निघाली कीं त्याची सरबराई ठेवण्याचा बोजा त्या बाजूच्या जहागिरदारावरच पडे-

मोठ्या जहागिरदारांना याच अटींवर आपल्या जहागिरींचे पोटभाग करून ते छोट्या जहागिरदारांना देतां येत; व हे छोटे जहागिरदार पुन्हां त्या पोटभागांची वांटणी करून लहान मोठ्या जमिनदारांना वांटून देत. अशा रीतीनें वर राजापासून खालीं प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळापर्यंत ही सांखळी जोडलेली असे.

वुइल्यमनें इंग्लंडांत या पद्धतींत फेरफार केला तो असा कीं, युरोपांत राजाचा प्रत्यक्ष संबंध जो फक्त त्याच्या लगतच्या मोठ्या जहागिरदाराशीं येत असे तो वुइल्यमनें छोट्या मोठ्या सर्व जमीन धारण करणारांपर्यंत आणून जोडला. म्हणजे युरोपांत प्रत्येक जमीन धारण करणारा फक्त आपल्या वरिष्ठ जमीन धारण करणाऱ्याला जबाबदार असे; तो प्रकार बदलून त्यानें इंग्लंडमधील लहान मोठ्या प्रत्येक जमीन धारण करणाऱ्याला आपल्या लगतच्या वरिष्ठ जमीन धारण करणाऱ्याप्रमाणेंच स्वतःशींही शपथेनें बांधून घेतलें. त्यामुळें राजा व मोठे जहागिरदार यांचें वैमनस्य आलें असतां पोट जहागिरदारांना आपल्या लगतच्या वरिष्ठापेक्षां राजाचा हुकूम मानणेंच अधिक बंधनकारक झालें. हे जहागिरदार आपापल्या जहागिरीच्या मुलुखांत पूर्ण मुखत्यार असत. प्रथम प्रथम जहागिरींतील न्यायमनसुब्याचें कामही त्यांच्याचकडे असे व ते आपल्या कुळांवर वाटेल तसा अंमल गाजवीत.

दुसऱ्या हेन्रीनें या जहागिरदारांची सत्ता बरीच कमी केली. त्यानें त्यांचे किल्ले पाडून टाकले, न्याय मनसुब्याची सत्ता काढून घेतली, आणि लष्करी नोकरीची अट

काढून टाकून त्याच्या मोबदला पैशाच्या रूपानें ठराविक कर घेण्याला सुरवात केली. त्या योगानें मोठ्या जहागिरदारांची सत्ता संपुष्टांत येऊन सामान्य प्रजेचा राजाशीं अधिक निकट संबंध आला, आणि राजसत्ता दृढ होऊन जहागिरदारां–जहागिरदारां-मधील तंट्यांना आळा बसला. फ्रान्सशीं झालेल्या शतवार्षिक युद्धांत आणि खुद्द इंग्लंडमध्यें 'गुलाबी युद्धें' म्हणून चाललेल्या यादवींत पुष्कळ जहागिरदार कामास आले; उरलेले कर्जबाजारी झाल्यामुळें त्यांनीं आपल्या जमिनी विकावयाला काढल्या, व व्यापाराच्या वाढीबरोबर संपन्न झालेल्या व्यापाऱ्यांनीं त्या खरेदी केल्या. कित्येक कुळेंही या जमिनी खरेदी करून किंवा कायम भाडेपट्यानें घेऊन स्वतंत्र नागरिकांच्या पंक्तीला येऊन बसलीं. अशा रीतीनें हळू हळू इंग्लंडांतून या जहागिरी पद्धतींतील दोष नाहींसे होऊन देशांत स्वतंत्र अशा मध्यम वर्गाचें प्राबल्य वाढत गेलें. तथापि इंग्लंडांतल्या वारसाच्या कायद्याप्रमाणें एकटा वडील मुलगाच बापाच्या स्थावर इस्टेटीचा मालक होत असल्यामुळें तिकडल्या जुन्या जहागिरींचे अवशेष म्हणजे आजच्या मोठमोठ्या जमिनदाऱ्या अनेक शतकें अविभक्त स्थितींत कायम राहिल्या आहेत; आणि त्यांचे आजचे धनी म्हणजे बडे लोक (Lords) इंग्लंडच्या राज्यघटनेची (English Constitution) स्थिरता राखण्याला आणि निरनिराळ्या पक्षांतील तोल (Balance) संभाळण्याला अजूनहि पुष्कळ अंशीं मदत करीत आहेत.

सरदार (Lords)—पूर्वी सरदार म्हणजे मोठमोठ्या जमिनींचे मालक बडे जमिनदार असत. त्यांच्या दर्जाची आंखणी केलेली नव्हती. पण अलीकडे त्यांचे 'बॅरन' (Baron), 'व्हायकाउंट' (Viscount), 'अर्ल' (Earl), 'मार्क्विस' (Marquis) व ड्यूक (Duke) असे पांच वर्ग केलेले आहेत. यांपैकीं शेवटची ' ड्यूक ' ही पदवी अँजेव्हिन घराण्यांतील तिसऱ्या एडवर्ड राजानें पहिल्यानें आपल्या मुलाला दिली. बाकीच्या पदव्या पुढील राजांनीं सनदा देऊन निर्माण केल्या आहेत, व ती परंपरा अजूनही चालू आहे. अलीकडे हिंदुस्तानांतही बंगाल्यांतील सुप्रसिद्ध **सत्येंद्र प्रसन्न सिंहां**च्या घराण्याला **लॉर्ड** ही पदवी बादशहाकडून देण्यांत आली आहे.

ज्यूरी (Jury)—दुसऱ्या हेन्रीनें लोकांना न्याय सुलभपणें मिळावा म्हणून फिरते न्यायाधीश (Itinerant judges) नेमले होते. हे न्यायाधीश फिरतीवर गेले म्हणजे ते ज्या गांवांत जातील, तेथल्या गुन्हेगारांना त्यांच्यापुढें आणून उभे करण्याचें काम गांवांतल्या सोळा स्वतंत्र व प्रतिष्ठित गृहस्थांकडे सोंपविलेलें असे. व त्यांनीं गुन्हेगार म्हणून ठरविला तरच कोणालाही शिक्षा होत असे. एकाद्या इसमावर

गुन्ह्याचा आरोप आला असतां त्याची चौकशी न्यायाधिशानें पंचांच्या सहाय्यानें करावयाची अशी जी हल्लींची पद्धति आहे, व जिला 'ज्यूरी' पद्धति असें म्हणतात तिचा उगम या जुन्या काळच्या जुन्या वहिवाटींत आहे. नॉर्मन राजांच्या पूर्वी इंग्रज राजांच्या अमदानींतही एकाद्यावर गुन्ह्याची आगळीक आली असतां त्याच्याबरोबरीच्या लोकांनीं त्याच्या निरपराधित्वाबद्दल शपथा घेतल्या असतां त्याची सुटका होत असे. फौजदारी दाव्याच्या इनसाफाप्रमाणेंच जमिनीसंबंधाच्या अगर देवघेवीच्या दिवाणी स्वरूपाच्या तंट्यांचा निकालही फिरत्या न्यायाधिशांनीं पंचामार्फत करावा असें हेन्रीनें ठरविलें होतें. या पंचपद्धतीचा न्यायदान लोकसंमत होण्याला चांगला उपयोग होतो.

इंग्लंडचा वेल्स प्रांतावरील अंमल (प्र. १८. प. ३ ते. ७).

इंग्लंडचा स्कॉटलंडवरील अंमल (प्र. १८ प. ८ ते ११, १४।१७।१८ प्र. १९ प. ४।५।६; व १६; प्र. २० प. १ ते ३; प्र. २१ प. ११).

इंग्रजांनीं आयर्लंड कसें जिंकलें ? (प्र. १४ प. ५ ते ८; प्र. १९ प. ७।८ प्र. २१ प. १४).

इंग्लंडचीं फ्रान्सबरोबरचीं किरकोळ युद्धें (प्र. १८ प. १२।१३; प्र. १९ प. १०).

इंग्लंड आणि खिस्ती धर्म (प्र. १३ प ३ व ६ ते १२; प्र. १५ पं० २१ ते २५; प्र १७ प. १८; प्र. २१ प० २३)

पार्लमेंट (प्र. १७ प. ८ ते १३; प्र. १९ प. १३; प्र. २० प. १६।१९; प्र. २१ प. ३।२०).

मॅग्नाचार्टा (प्र. १६ प. १,४ ते १०; प्र. १७, प. ६; प्र १८प. १५).

संस्मरणीय सन

इ. स. ११६४ 'क्लॅरेंडन'ची परिषद.
,, ११७० 'थॉमस बेकेट'चा वध.
,, ११७२ इंग्रजांनीं आयर्लंड जिंकलें.
,, ११८३ 'दुसऱ्या हेन्री'चा मृत्यु व 'रिचर्ड'चें राज्यारोहण.
,, ११८९ 'रिचर्ड'चें 'धर्मयुद्धा'साठीं प्रयाण.
,, ११९८ 'रिचर्ड'चा मृत्यु व 'जॉन'चें राज्यारोहण.
,, १२०४ 'नॉर्मंडी' प्रांत फ्रेंचांनीं घेतला.

इ. स. १२०८ 'जॉन' व पोप यांचा समेट.
,, १२१५ इंग्रजांनीं जॉन राजाकडून स्वातंत्र्यसनद मिळविली.
,, १२१६ 'जॉन'चा अंत व 'तिसऱ्या हेन्री'चें राज्यारोहण.
,, १२६५ इंग्लंडच्या पार्लमेंट सभेची प्राणप्रतिष्ठा.
,, १२७२ तिसऱ्या हेन्रीचा मृत्यु.
,, १२७४ 'पहिल्या एडवर्ड'चा राज्याभिषेक.
,, १२७९ 'मॉर्टमेन'चा कायदा (Statute of Mortmain).
,, १२८२ इंग्रजांचें वेल्श लोकांशीं युद्ध.
,, १२८४ 'प्रिन्स ऑफ वेल्स' पदवीचा उगम.
,, १२९५ 'नमुनेदार' पार्लमेंट. (Model Parliament).
,, १३०६ 'पहिल्या एडवर्ड'चा मृत्यु व 'दुसऱ्या एडवर्ड'चें राज्यारोहण.
,, १३१४ बॅनॉकबर्नची लढाई; स्कॉटलंड स्वतंत्र झालें.
,, १३२७ 'दुसऱ्या एडवर्ड'चा खून व 'तिसऱ्या एडवर्ड'च्या कारकिर्दीला सुरवात.
,, १३३७ इंग्लंड-फ्रान्समधील 'शतवार्षिक युद्धा'ची सुरवात.
,, १३४६ क्रेसीची लढाई.
,, १३७७ 'तिसऱ्या एडवर्ड'चा मृत्यु व 'दुसऱ्या रिचर्ड'चा राज्याभिषेक.
,, १३८१ 'वॅट टायलर'चें बंड.
,, १३९९ 'दुसऱ्या रिचर्ड'चा राजिनामा आणि 'चौथ्या हेन्री'च्या कारकिर्दीला सुरवात.
,, १४१३ 'चौथ्या हेन्री'चा मृत्यु आणि 'पांचव्या हेन्री'चें राज्यारोहण.
,, १४१५ ॲगिनकोर्टची लढाई.
,, १४२९ 'जोन ऑफ आर्क'चा पराक्रम.
,, १४३१ 'जोन ऑफ आर्क'चा मृत्यु.
,, १४५३ इंग्लंड-फ्रान्समधील शतवार्षिक युद्धाचा शेवट.
,, १४५५ इंग्लंडमधील 'गुलाबी युद्धां'ची सुरवात.
,, १४८५ 'गुलाबी युद्धां'चा शेवट (बॉसवर्थ फील्डची लढाई.) व 'टथूडर' राजघराण्याची स्थापना.

इंग्लंडांतील राजवंशमालिका

नॉर्मन राजवंशांतील 'पहिल्या हेन्री'च्या मुलीचा मुलगा 'दुसरा हेन्री' हा इ. स. ११५४ मध्यें इंग्लंडच्या गादीवर येऊन इंग्लंडमध्यें 'अँजेव्हिन' नांवाच्या नव्या राजघराण्याची स्थापना झाली. हा हेन्री इ. स. ११८९ मध्यें निवर्तला. त्याच्या मागून या वंशांतील जे राजे इंग्लंडच्या गादीवर आले, ते येणेंप्रमाणें:—

(४) अँजेव्हिन राजवंश.

हेन्री (दुसरा) (इ. स. ११५४).

रिचर्ड (इ. स. ११८९)

जॉन (इ. स. ११९९)

हेन्री (तिसरा) (इ. स. १२१६)

एडवर्ड (पहिला) (इ. स. १२७२)

एडवर्ड (दुसरा) (इ. स. १३०७)

एडवर्ड (तिसरा) (इ. स. १३२७)

लायोनेल

एडवर्ड—(ब्लॅक प्रिन्स ऊर्फ काळपुरुष)

जॉन (John of Gaunt)

रिचर्ड (दुसरा) (इ. स. १३७७)

हेन्री

इ० स० १३९९ मध्यें **पार्लमेंटनें** 'दुसऱ्या रिचर्ड' राजाला 'नालायक' ठरवून त्याचा चुलतभाऊ म्हणजे 'तिसऱ्या एडवर्ड'च्या **जॉन** नांवाच्या तिसऱ्या मुलाचा मुलगा 'हेन्री' याला गादीवर बसविलें. **जॉन** हा लँकॅस्टरचा जहागिरदार असल्यामुळें त्याच्या घराण्याला 'लँकॅस्टरचें घराणें' म्हणत असत. **हेन्री** हा **या लँकॅस्टर** घराण्यांतला पहिला राजा होय. त्याचा पुढील वंश येणेंप्रमाणें:—

(५) लँकॅस्टर राजवंश

हेन्री (चौथा)
(इ० स० १३९९)
|
हेन्री (पांचवा) ×**कॅथराइन** (हिनें हेन्रीच्या मृत्यूनंतर 'ओवेन
(इ०स०१४१३) टयूडर' नांवाच्या वेल्श गृहस्थाशीं पुनर्विवाह केला).
|
हेन्री (सहावा)
(इ० स० १४२२)

'सहाव्या हेन्रीला' इ० **स०** १४६१ पर्यंत राजपदाचा उपभोग घेतां आला. पण पुढें तो गादी संभाळण्याला 'नालायक' ठरल्यामुळें त्याचा चुलत चुलत पुतण्या '**एडवर्ड**' याला गादी देण्यांत आली. हा 'एडवर्ड' **लँकॅस्टर** घराण्याच्या प्रतिपक्षी **यॉर्क** घराण्यांतील असल्यामुळें त्याला व त्याच्या पुढील वंशजांना 'यॉर्क' घराण्यांतील राजे असें म्हणतात. त्यांची वंशावळ येणेंप्रमाणें:—

(६) यॉर्क राजवंश

रिचर्ड (तिसऱ्या एडवर्डच्या लायोनेल नांवाच्या दुसऱ्या मुलाचा वंशज. 'सहावा हेन्री' हा 'तिसऱ्या एडवर्ड'च्या तिसऱ्या मुलाचा वंशज होता.)
|

एडवर्ड (चौथा) (इ. स. १४६१)	सरदार क्लॅरेन्स	**रिचर्ड** (तिसरा) (इ. स. १४८५)

एडवर्ड (चौथा) यांचे पुत्र:

एडवर्ड (पांचवा) (इ. स. १४८३)	रिचर्ड

लँकॅस्टर व **यॉर्क** या दोन्ही **अँजेव्हिन** घराण्याच्याच पोटशाखा होत्या. इ० स० १४८५ मध्यें यॉर्क शाखेचा आणि त्याबरोबरच 'अँजेव्हिन' घराण्याचाही शेवट झाला. आणि लँकॅस्टर घराण्यांतील 'राजा पांचवा हेन्री' याची बायको **कॅथराइन** (जिनें 'ओवेन ट्यूडर' या वेल्श गृहस्थाशीं पुनर्विवाह केला होता), हिच्या मुलाचा मुलगा **हेन्री** † हा इंग्लंडच्या गादीवर आला. त्यानें **यॉर्क** घराण्यांतलि **एलिझाबेथ** या वधूशीं लग्न करून **यॉर्क-लँकॅस्टर** घराण्यांची एकी केली; पण तो स्वतः **ट्यूडर** घराण्यांतला असल्यामुळें पितृसावर्ण्यानें त्याला व त्याच्यापुढील वंशजांना **ट्यूडर राजे** असें नामाभिधान प्राप्त झालें.

प्रश्न

(१) 'दुसऱ्या हेन्री'नें इंग्लंडच्या गादीवर आल्यावर कोणत्या 'सुधारणा' घडवून आणल्या ? त्यानें न्यायदानाच्या बाबतींत केलेल्या सुधारणांचें विशेष वर्णन करा.

(२) 'इंटरडिक्ट' (Interdict), 'एक्सकॉम्युनिकेशन' (Excommunication), 'ट्रॅन्सबस्टॅंशिएशन' (Transubstantiation), 'मॅग्ना चार्टा' (Magna Charta) आणि 'पार्लमेंट' (Parliament) यांच्यावर थोडक्यांत टीपा द्या.

(३) 'हेन्री' (दुसरा) व 'बेकेट' यांचें भांडण होण्याला काय कारण झालें ? व 'बेकेट'च्या मृत्यूला हेन्री कितपत जबाबदार होता ? हेन्रीच्या या बाबतींतलि पश्चात्तापाचें वर्णन करा.

(४) 'नॉर्मन' राजांनीं 'पोप'च्या इंग्लंडमधील अधिकाराच्या बाबतींत कोणतें धोरण ठेवलें होतें ? व त्याचा अँजेव्हिन घराण्यांतील राजांना कितपत फायदा झाला ?

(५) 'थॉमस बेकेट', 'पहिला रिचर्ड', 'स्टीफन लँगटन', 'सायमन मॉंटफर्ड', 'वुइल्यम वॉलेस', 'ब्लॅक प्रिन्स', 'वॅट टायलर', 'जॉन विक्लिफ', आणि 'जोन ऑफ आर्क' यांचीं थोडक्यांत चरित्रें लिहा.

(६) इंग्रज राजांचा आयर्लंडमध्यें प्रवेश झाला तो 'आयरिश राजांच्या आपसांतील भांडणांमुळें व त्यांपैकीं एकाच्या नीतिभ्रष्टतेमुळें' हें विधान खरें असेल तर

---

† हा 'जॉन ऑफ गॉंट'च्या पणतीचा मुलगा होय.

त्या भांडणांचें व नीतिभ्रष्टतेचें उदाहरण सांगा. ' आयर्लंडचा अधिपति ' हा किताब प्रथम कोणत्या इंग्रज राजानें घेतला ?

(७) ' दुसऱ्या हेन्री ' च्या पूर्व आणि उत्तर वयांतील सुखदुःखांची तुलना करा.

(८) ' राजा जॉन ' चें ' पोप ' शीं भांडण कोणत्या मुद्यावर झालें ? व त्यांत त्याला अपेश येण्याला काय कारण झालें ?

(९) ' जॉन ' राजाची कारकीर्द इंग्लंडच्या इतिहासांत कोणत्या गोष्टींमुळें स्मरणीय झाली आहे ? त्याच्या स्वभावांतील कोणते दोष प्रजेच्या पथ्यावर पडले ? त्यानें प्रजेला दिलेलीं वचनें कितपत पाळलीं व त्याचा पुढें काय परिणाम झाला ?

(१०) ' मॅग्ना चार्टा ' मधील मुख्य कलमें सांगा. त्यांतील कोणतीं कलमें सामान्य लोकांच्या विशेष फायद्याचीं होतीं ?

(११) ' तिसऱ्या हेन्री ' चें सरदार लोकांशीं भांडण झालें त्याचें कारण काय ? व त्याचा परिणाम काय झाला ?

(१२) इंग्लंडच्या पार्लमेंट सभेची प्राणप्रतिष्ठा कोणीं, केव्हां व कशी केली ? या सभेचीं मुख्य अंगें कोणतीं ? व तीं केव्हांपासून अस्तित्वांत आलीं ?

(१३) ' पहिल्या एडवर्ड ' च्या कारकिर्दींत वेल्श व स्कॉटिश लोकांनीं स्वतंत्र होण्याचे जे प्रयत्न केले त्यांचें वर्णन करा.

(१४) ' अँजेव्हिन ' घराण्यांतील कोणत्या राजांच्या कारकिर्दी विशेष स्मरणीय झाल्या व त्या कां ?

(१५) ' पहिल्या एडवर्ड ' च्या कारकिर्दींत पार्लमेंटनें आपलें महत्त्व कोणत्या प्रसंगीं व कोणत्या मार्गानें वाढवून घेतलें ?

(१६) ' बॅनॉकबर्न ', ' क्रेसी ', ' पायटर्स ', ' कॅले ' (इ. स. १३४७), ' ॲगिनकोर्ट ' आणि ' बॉसवर्थ फील्ड ' येथील लढायांचें वर्णन करा.

(१७) ' दुसऱ्या एडवर्ड ' चे स्नेही कोण होते ? त्यांचीं नांवें सांगून त्यांना पार्लमेंटनें कशा रीतीनें वागविलें तें सांगा. एडवर्डच्या शेवटच्या दुर्दशेला हे स्नेही कितपत कारण झाले ?

(१८) ' तिसऱ्या एडवर्ड ' च्या कारकिर्दींत इंग्लंडचें स्कॉटलंडशीं भांडण झालें त्याचें कारण काय ?

(१९) कॉन्स्टिट्यूशन्स ऑफ क्लॅरेंडन (Constitutions of Clarendon),
प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड (Provisions of Oxford).
प्रिन्स ऑफ वेल्स (Prince of Wales)
स्टॅट्यूट ऑफ मॉर्टमेन (Statute of Mortmain)
इटिनरंट जजिस (Itinerant Judges)
कॅंटरबरी टेल्स (Canterbury Tales) आणि
फ्यूडल सिस्टिम (Feudal System)
यांवर थोडक्यांत टीपा द्या.

(२०) 'फिलिपा', 'इसाबेला' आणि 'कॅथराइन' या राण्यांची तुलना करा.

(२१) फ्रान्स व इंग्लंड यांच्यामधील शतवार्षिक युद्धाचीं कारणें सांगून त्यांत कोणत्या इंग्लिश राजांनीं विशेष पराक्रम गाजविले तें सांगा.

(२२) इ० स० १३६० मधील 'महासंधी' (Great Peace) चीं कलमें लिहा.

(२३) 'जोन ऑफ आर्क' ही कोण होती ? तिला 'ऑर्लिन्सची कन्या' असें नांव कां प्राप्त झालें ? तिच्या पराक्रमाचें इंगित कशांत होतें ?

(२४) 'इंपीचमेंट' (Impeachment) म्हणजे काय ? पार्लमेंटनें हा अधिकार केव्हां मिळविला व त्याचा उपयोग कसा केला ?

(२५) 'दुसरा एडवर्ड' आणि 'पहिला रिचर्ड' यांच्यांत कोणत्या बाबतींत साम्य होतें ?

(२६) 'दुसरा रिचर्ड' आणि 'चौथा हेन्री' यांच्यामधील पहिल्या झटापटीचें वर्णन करा.

२७) 'जुलुमी राजेच प्रजेच्या हक्कसंपादनाला हातभार लावतात' हें विधान कितपत खरें आहे ? अँजेव्हिन घराण्यांतील कोणत्या राजांना तें विशेष रीतीनें लागू पडण्यासारखें आहे व तें कसें ?

(२८) 'गुलाबी युद्धां'चें कारण सांगून त्यांतल्या मुख्य मुख्य लढायांचें वर्णन करा. या युद्धांचा इंग्लंडच्या सामान्य जनतेवर काय परिणाम झाला ?

(२९) 'चौथा हेन्री' आणि सरदार 'पर्सी' यांच्यामधील भांडणाचें वर्णन करा.

(३०) 'पांचव्या हेन्री'च्या अखेरच्या वैभवाचें वर्णन करून या बाबतींतील 'दुसरा हेन्री' व 'पांचवा हेन्री' यांच्या स्थितींची तुलना करा.

(३१) 'दुसऱ्या रिचर्ड'नें स्वतःच्या चुलत्यांशीं व चुलतभावांशीं कोणत्या प्रकारचें वर्तन केलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

(३२) 'चौथ्या हेन्री'च्या कारकिर्दीत पार्लमेंटनें कोणते नवीन हक्क मिळविले ?

(३३) 'लोलर्ड' हे कोण होते ? 'चौथ्या हेन्री'च्या कारकिर्दीतील त्यांच्या छळाचें वर्णन करा.

(३४) 'ख्रिस्ती धर्मयुद्धां'चें थोडक्यांत वर्णन करून या युद्धांनीं युरोप खंडांतील ख्रिश्चन राष्ट्रांना कोणता फायदा झाला तें सांगा.

(३५) 'सहाव्या हेन्री'च्या कारकिर्दीत लोक सरदार 'सफक'वर नाराज होण्याला कोणतीं कारणें झालीं ? 'सफक'चा अंत कसा झाला ?

(३६) 'जॅक केड'च्या बंडाचें वर्णन करा.

(३७) 'तिसऱ्या रिचर्ड'चा इंग्लंडच्या गादीशीं कसा संबंध पोंचत होता तें सांगून त्यानें ती मिळविण्यासाठीं काय खटपटी केल्या तें सांगा.

(३८) 'सरदार वॉरविक' हा 'किंग मेकर' कसा होता तें सांगून त्याचें व 'चौथ्या एडवर्ड'चें भांडण होण्याला काय कारण झालें तें सांगा. या भांडणाचा अखेर परिणाम काय झाला ?

(३९) 'मार्गारेट' राणीनें आपल्या नवऱ्यासाठीं व मुलांसाठीं इंग्लंडचें राजपद मिळविण्याच्या ज्या खटपटी केल्या त्यांचें थोडक्यांत वर्णन करा.

(४०) 'चौथ्या एडवर्ड'च्या कारकिर्दीत इंग्लंडमध्यें कोणत्या भौतिक सुधारणा झाल्या ?

(४१) 'वुइल्यम कॅक्स्टन'चें थोडक्यांत चरित्र सांगून त्यानें इंग्लंडमध्यें सुरू केलेल्या छापखान्याची इंग्लंडमधील धार्मिक व सामाजिक सुधारणेला कोणती मदत झाली तें सांगा.

(४२) 'तिसऱ्या रिचर्ड'च्या घातकी वागणुकीनेंच त्याचा अधःपात घडवून आणला असें म्हणतात तें कां ? त्याच्या कोणत्या कृत्यांनीं लोकांच्या मनांत त्याच्याविषयीं तिटकारा उत्पन्न झाला ?

(४३) अँजेव्हिन राजघराण्याच्या कारकिर्दीत इंग्लंडमधील सरदारमंडळाची स्थिति कशी होती तें सांगून गुलाबी युद्धांनीं या सरदारांना कसें धुळीस मिळविलें तें सांगा.

(४४) मध्ययुगांतील इंग्लंडमधील सरदार व सामान्य लोक यांची शिक्षण, शेती आणि उद्योगधंदे या बाबतींत काय स्थिति होती ?

(४५) ' फ्रान्सला पहिला हेन्री अजिंक्य वाटला, दुसरा भयंकर वाटला आणि तिसरा तिरस्करणीय वाटला " असें एका ठिकाणीं म्हटलें आहे. फ्रान्सला असें वाटण्याला काय कारणें झालीं असलीं पाहिजेत तीं सांगा.

(४६) ' दुसरा एडवर्ड–इसाबेला ' हा विवाह इंग्लंडच्या राजालाच बाधला, पण ' सहावा हेन्री–मार्गारेट ' हा विवाह इंग्लंडचा राजा आणि इंग्लंडचें राज्य या दोघांनाही बाधक झाला'. हें खरें काय ? खरें असेल तर कसें ?

(४७) अँजेव्हिन राजांत तुमच्या दृष्टीनें सर्वांत श्रेष्ठ राजा कोणता तें सांगून त्याबद्दलचीं कारणें लिहा.

(४८) 'स्वतंत्रता ही वाईट राजांची ऋणी असते, पण तिला त्यांचे आभार मानण्याचें मात्र कारण नाहीं !' (Liberty is indebted to bad kings, though to them she owes no thanks) असें एकानें म्हटलें आहे; तें अँजेव्हिन घराण्यापैकीं कोणत्या राजांला लागू पडण्यासारखें आहे व तें कसें ?

जगांतील समकालीन घडामोडी

इ. स. चें बारावें शतक

इंग्लंड

इंग्लंडच्या राजांचे आपल्या देशांत पोपची सत्ता चालू न देण्याचे प्रयत्न, फ्रान्स व इंग्लंड यांमधील भांडणें, इंग्लंडनें स्काटलंड व आयर्लंड या प्रांतांत आपलें वर्चस्व स्थापणें, आणि खुद्द इंग्लंडच्या राजांचे आपसांतील स्वार्थी कलह हे या काळच्या इंग्लंडच्या इतिहासाचे विशेष होत. दुसऱ्या हेन्रीनें न्यायपद्धतींत केलेल्या सुधारणा म्हणजे ' फिरते न्यायाधीश ' आणि ' ज्यूरी'नें न्यायनिवाडा देणें या गोष्टी इंग्लंडच्या ' न्याय कोर्टां'च्या इतिहासांत महत्त्वाच्या आहेत.

युरोपखंड

येरुशलेमच्या ताब्यासाठीं चाललेल्या **ख्रिस्ती–मुसलमान** युद्धांनीं या शतकांत चारदां वर डोकें काढलें (इ. स. ११४७, ११८७, ११९५ आणि ११९८).

इ. स. १२०० मध्यें फ्रान्स देशांत पारिस येथें युरोपांतील पहिलेंच विश्वविद्यालय (The University) स्थापण्यांत आलें.

हिंदुस्थान व आशिया खंड

'नैषध' काव्याचा कर्ता **श्रीहर्ष**, 'गीतगोविंद'कार **जयदेव**, सुप्रसिद्ध गणिती **भास्कराचार्य**, वैष्णवस्वामी **श्रीमध्वाचार्य**, **रामानुजाचार्य**, वीरशैव लिंगायत पंथाचा संस्थापक **श्रीबसवेश्वर** हे या शतकांत होऊन गेले. 'पृथ्वीराज चव्हाण,' 'महंमद घोरी' 'चेंगिझखान मोंगल' 'राणा भीमदेव,' वगैरे पराक्रमी पुरुष याच शतकांतील होत.

इ. स. चें तेरावें शतक

इंग्लंड

इ. स. १२१५ मध्यें इंग्लंडमधले सरदार, धर्माधिकारी, आणि रयत यांनीं एक होऊन राजाला कैचींत धरून त्याच्याकडून आपल्या स्वातंत्र्याचे हक्क कबूल करून घेणें, आणि या सनदेच्या जोरावर पुढें सरदार मंडळानें प्रत्यक्ष राजाशीं युद्ध करून त्याला कैद करणें, सरदार आणि सामान्य लोक हे पूर्वी परस्परांपासून फार दूर असत, तो त्यांचा दूरीभाव नष्ट होऊन राष्ट्राच्या सुखदुःखाच्या चर्चेच्या वेळीं त्यांनीं मांडीला मांडी लावून एकत्र बसणें, 'पार्लमेंट' शब्दाचा उपयोग, सामान्य नागरिकांचे व लोकांचे प्रतिनिधि सन्मानानें बोलावून त्यांचा राष्ट्रपरिषदेंत (Parliament) समावेश करून घेणें, आणि खुद्द राजानेंच अखेर या गोष्टीला सम्मति देऊन या स्वराज्यमंदिराचा पाया दृढ करणें, या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी या शतकांत घडून आल्या. वेल्श व स्कॉटिश लोकांनीं या शतकाच्या उत्तरार्धांत स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न केले पण ते निष्फळ ठरले.

युरोपखंड

इ. स. १२२९, १२४९ आणि १२७० हीं तीन वर्षें ख्रिस्ती धर्मयुद्धांच्या अनुक्रमें सहाव्या, सातव्या, व आठव्या मोहिमेचीं म्हणून प्रसिद्ध आहेत. पैकीं आठव्या मोहिमेंत **इंग्लंडचा** राजा (त्या वेळीं युवराज) **एडवर्ड** यानें फार पराक्रम गाजविला.

ऑस्ट्रियांतील हॅप्सबर्ग नांवाच्या राजघराण्याचा संस्थापक **रुडॉल्फ** (Rudolf I) हा इ. स. १२७३ या वर्षीं जर्मनीचा बादशहा झाला. इ. स. १२८२ मध्यें सिसिली बेटांत तेथल्या लोकांनीं आठ हजार फ्रेंच लोकांची कत्तल केली.

हिंदुस्थान व आशियाखंड

महानुभाव **चक्रधर**, **श्रीज्ञानेश्वरमहाराज**, आणि **हेमाद्रि** ऊर्फ **हेमाडपंत** हे प्रसिद्ध पुरुष या शतकांत झाले. इ. स. १२१० त दिल्लीच्या 'कुतुब मिनार'ची उभारणी झाली. **अल्लाउद्दीन खिलजी** आणि **सिंघण यादव** हे या शतकांतील पराक्रमी पुरुष होत. इ. स. १२१५ मध्यें 'मंगोलिया' च्या 'मोंगल' लोकांनीं तार्तरी देश काबीज करून चीन देशावरही हल्ला चढविला. आणि इ. स. १२७९ च्या सुमारास तर त्यांनीं सगळा चीन देश पादाक्रांत केला. इ. स. १२९९ मध्यें अमीर **उस्मान** यानें 'आशिया मायनर' प्रांतांत 'ऑटोमन साम्राज्य' (Ottoman Empire) स्थापन केलें.

इ. स. चें चवदावें शतक

इंग्लंड

या शतकाच्या पूर्वार्धांत **स्कॉटलंड** देश पुनः स्वतंत्र झाला; पण फ्रान्स देशांत इंग्लिशांच्या शस्त्रांना जय मिळाला. इंग्लंडच्या एका राणीनें आपल्या नवऱ्याचा खून केला, तर दुसरी स्वतः सेनाधिपत्य पत्करून **स्कॉट** लोकांवर चाल करून गेली. पार्लमेंट सभेचें महत्त्व या शतकांत प्रथम खालीं वर हेलकावे खात असलेलें दिसलें तरी एकंदरींत तें पुढें वाढतच गेलें. सरदारसभा व लोकसभा असे पार्लमेंटचे दोन भाग होऊन त्यांच्या स्वतंत्र बैठका भरण्याची पद्धति या शतकाच्या पूर्वार्धांतच पडली. तसेंच फ्रान्स-इंग्लंडमधील शतवार्षिक युद्ध या शतकाच्या पूर्वार्धांत सुरू झालें आणि उत्तरार्धांत त्याला उतरती कळा लागली. पहिला इंग्रज धर्मसुधारक आणि 'बायबल'चा भाषांतरकर्ता '**जॉन विक्लिफ**' हा या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला.

युरोपखंड

श्वार्त (Schwartz) या नांवाच्या एका जर्मन जोग्यानें इ. स. १३२० मध्यें बंदुकीच्या दारूचा शोध लावला. चीन वगैरे पौर्वात्य देशांत ही वस्तु या पूर्वींच माहीत झाली होती. इ. स. १३२७ मध्यें दोन लाख मूर लोक आफ्रिका खंडांतून स्पेन

देशांत आले, आणि तेथें त्यांची ख्रिश्चन लोकांशीं भयंकर लढाई झाली. इ. स. १३२८ मध्यें फ्रान्स देशांतील 'कॅपेशियन' राजघराण्याचा नष्टांश होऊन 'व्हॅलॉस' (Valois) नांवाचें नवें राजघराणें अस्तित्वांत आलें. या शतकाच्या उत्तरार्धांत जर्मन संस्थानांची संघटना होऊन जर्मन बादशाहांची सत्ता वाढूं लागली. याच्या उलट इटली देशांत राजे आणि पोप यांच्या उपद्व्यापांमुळें व भांडणांमुळें तें राष्ट्र खालावत चाललें. इ. स. १३८९ मध्यें **स्वित्झरलंड** देश स्वतंत्र (Independent) झाला. स्वीडन-नॉर्वे आणि डेन्मार्क हे देश इ. स. १३९७ मध्यें एकछत्री अंमलाखालीं आले.

हिंदुस्थान आणि आशियाखंड

महाराष्ट्रांत हिंदु-मुसलमानांच्या झटापटींत **रामदेवराव यादवाचा** मोड होऊन मुसलमानी अंमलाचीं स्थापना, तसेंच **विजयनगर** या हिंदु व **बहामनी** या मुसलमान बलाढ्य राजसत्तांचा उदय, दिल्लींत महमद तुघलघाचे वेडेचार, **तैमूरलंगाची** रशिया, हिंदुस्थान इत्यादि देशांवर धाड (इ. स. १३९५), वगैरे गोष्टी या शतकांत घडून आल्या. प्रसिद्ध विद्वान **माधवाचार्य** व **सायनाचार्य** आणि सुप्रसिद्ध साधु **नामदेव** हे या कालचे धार्मिक नेते होत.

इ. स. चें पंधरावें शतक

इंग्लंड

इ० स० १४०५ मधल्या एका लढाईच्या वर्णनांत तोफेच्या गोळयांचा उल्लेख पहिल्यानें झालेला आढळतो. अर्थात् त्यापूर्वीं इंग्रजांना तोफा माहीत नव्हत्या असें दिसतें. पांचव्या हेन्रीची यशस्वी कारकीर्द, फ्रान्सच्या शतवार्षिक युद्धाचा उत्तर-भाग व त्यांत प्रथम प्रथम इंग्रजांना मिळालेले जय, फ्रान्सची 'लक्ष्मीबाई' '**जोन ऑफ आर्क**' हिचा पराक्रम वगैरे गोष्टींनीं या शतकाचें पूर्वार्ध स्मरणीय केलें; उत्तरार्धांत इंग्लंडमधील सरदार लोकांचीं आपसांतील भांडणें, 'गुलाबी युद्धांनीं' लाल झालेली इंग्लंडची रणभूमि, आणि या यादवींत घडून आलेले अनेक प्रकारचे अत्याचार, याही लोकांच्या फार काळ स्मरणांत राहण्यासारख्या गोष्टी होत. **वुइल्यम कॅक्स्टन** हा इंग्लडांतील पाहिला छापखानेवाला या शतकाच्या उत्तरार्धांतच होऊन गेला. त्यानें आपल्या वृद्धापकाळांतही आपलें लेखन व मुद्रण-कार्य सतत चालू ठेविलें होतें.

युरोपखंड

प्रशियाच्या **होहेनझोलर्न** (Hohenzollern) राजघराण्याची स्थापना इ. स. १४१७ मधली आहे. ' कॉन्स्टँटिनोपल ' साठीं ख्रिस्ती-मुसलमानांचें झालेले झगडे या शतकाच्या पूर्वार्धांत फार जोरांत चालले होते. छापण्याच्या कलेची प्रगति या शतकांत बरीच झाली. इ. स. १४४२ मध्यें '**फॉस्ट**' लांकडाचे ठोकळे करून त्यांत अक्षरें कोरून छापीत असे. इ. स. १४४४ मध्यें **गटेनबर्ग** (Guttenberg) यानें धातूचे 'टाइप' तयार केले. इ. स. १४५० मध्यें 'रोलर प्रेस'चा शोध लागला आणि इ. स. १४५२ मध्यें **शूफर**नें (Schoeffer) अक्षरांचे सांचे (Moulds) तयार केले.

इ. स. १४५३ मध्यें तुर्क लोकांनीं कॉस्टँटिनोपल शहर घेऊन रोमन साम्राज्याचा पूर्वेकडचा अवशिष्ट भाग समूळ नाहींसा केला. तेव्हां तेथले जुने ग्रीक पंडित आपलीं पोथ्या-पुस्तकें बरोबर घेऊन पश्चिम युरोपांत निघून गेले.


इ. स. १४६२ मध्यें रशियांतील **इव्हान** (Ivan III) नामक राजानें रशियाचा **झार** (Czar of Russia) ही पदवी घेतली. त्याच्यापूर्वी तेथल्या राजांना मास्कोचे सरदार (Dukes of Moscow) असें म्हणत असत.

'**बार्थो लोमो डिआझ**'नें आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाला वळसा घालणें (इ. स. १४८८), **कोलंबसा**नें लावलेला अमेरिकेचा शोध (इ. स. १४९२), **वास्को द गामा**चें जलमार्गानें हिंदुस्थानांत आगमन (इ. स. १४९८), या जगांतील व्यापाऱ्याच्या व इतर बाबतींत क्रांति घडवून आणणाऱ्या गोष्टी या शतकाच्या अखेरीस घडून आल्या; आणि जगाच्या आधुनिक इतिहासालाही (Modern History) या कालापासूनच सुरवात झाली.

हिंदुस्थान आणि आशिया खंड

रामानंद, चैतन्य, श्रीनृसिंहसरस्वती, कबीर, हे या कालांतील मुख्य साधु पुरुष होत. 'दुर्गादेवीचा दुष्काळ' आणि '**दामाजीपंतांचें** औदार्य' या लोकांच्या सदैव स्मरणांत राहण्यासारख्या गोष्टी या शतकांत घडल्या. बहामनी राज्याचे तुकडे, **वास्को द गामा**चा जलमार्गानें हिंदुस्थानांत प्रवेश या राजकीय दृष्ट्या दूरपरिणामी गोष्टी या शतकाच्या अखेरीअखेरीस घडून आल्या.

मध्ययुगीन युरोपखंड



इंग्रजांचें स्वराज्य
अथवा
इंग्लंडचा संपूर्ण इतिहास

भाग ३ रा.

प्रकरण २६ वें.

अर्वाचीन इतिहासाचा प्रारंभ.
(इ. स. १४८५–इ. स. १४९१)

[१ अर्वाचीन काल–'सुधारणां' चीं आद्य कारणें.–२ इंग्लंडांतील स्थिति-समाजनेत्यांचें लक्ष.–३ इंग्लंडच्या वैभवाचें बीज.–४ सामान्य प्रजेची वृत्ति.–५ हेन्रीचा गादीवरील हक्क.–६ हेन्रीचा राज्याभिषेक व लग्न.–७ जुनी अढी.–८।९ लँबर्ट सिम्नेल-बंड-बंडाचा मोड.–१० राणीचा राज्याभिषेक.–११ हेन्रीचा द्रव्यलोभ.–१२ ब्रिटनी-फ्रान्सच्या राजाचे डाव.–१३ एस्टापल्सचा तह.]

१ अर्वाचीन काल–पंधराव्या शतकाची अखेर व सोळाव्या शतकाचा आरंभ हा इंग्लंडच्याच नव्हे तर सगळ्या युरोप खंडाच्या, किंबहुना सगळ्या जगाच्याच इतिहासाचा अर्वाचीन काल (Modern Times) असें समजतात. कारण सध्यां आपल्याला प्रत्येक देशांत ज्या भौतिक अगर धार्मिक 'सुधारणा' (Reforms) झालेल्या दिसून येतात त्यांचा आरंभ या पंधराव्या व सोळाव्या शतकाच्या संधिकालांत झालेला आहे. अमेरिका खंडाचा शोध, छापण्याच्या कलेचा प्रसार, बंदुकीच्या दारूच्या शोधानें युद्धसाहित्यांत घडवून आणलेली क्रांति, युरोपांतून हिंदुस्तानला येण्याला सांपडलेला

जलमार्ग, आशिया–युरोपच्या स्थलमार्गांवरच्या नाक्यावर असलेलें कॉन्स्टँटिनोपल शहर तुर्कांनीं काबीज केल्यामुळें तेथून जुन्या ग्रीक व लॅटिन विद्वानांची (scholars) झालेली उचलबांगडी, व त्यांनीं युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांत जाऊन लोकांना पाजलेलें ज्ञानामृत, या ज्ञानामृतामुळें मध्ययुगांतील नानाप्रकारच्या कलह–विषानें मृतप्राय झालेल्या समाजाला प्राप्त झालेलें नवचैतन्य, लोकांचें धर्माकडचें लक्ष कमी होऊन त्यांची व्यापार व उद्योगधंद्यांकडे झालेली प्रवृत्ति, सरदारांचें प्राबल्य कमी होऊन मध्यम वर्गांतील साहसी नाविक व व्यापारी यांना राष्ट्रांत मिळूं लागलेला मान, पोपचें धार्मिक साम्राज्य खिळखिळें होऊन लोकांचा पृथक् राष्ट्रीयत्वाकडे वळलेला कल, हीं या सगळ्या सुधारणांचीं आद्य कारणें आहेत. व तीं त्या वेळीं कमी अधिक प्रमाणांत युरोपखंडांत तरी सगळ्याच देशांत दृश्यमान होतीं.

२ इंग्लंडांतील स्थिति—इंग्लंडांत तर या वेळीं मध्ययुगांतील लढायांनीं उत्पन्न झालेल्या संकटपरंपरेनें सगळे लोक त्रस्त झाले होते. सरदारां-सरदारांमधील भांडणामुळें मध्यवर्ती राजसत्ता अगदींच कमकुवत झाली होती. तेव्हां ही सत्ता खंबीर झाल्याशिवाय समाजाला स्वास्थ्य लाभण्यासारखें नव्हतें. गेलीं कित्येक वर्षें इंग्लंडच्या पार्लमेंटनें राजसत्तेवर दाब ठेवून प्रजेसाठीं बरेच हक्क संपादन केले होते. पण हे हक्क उपभोगण्याला समाजांत जें स्वास्थ्य पाहिजे तेंच आतां संपुष्टांत आलें होतें. तेव्हां 'राजसत्ता अनियंत्रित (absolute) झाली तरी पुरवली, पण समाजांत माजलेली बजबजपुरी थांबून व आपल्या राष्ट्राचें वैभव वाढून त्याचा स्वदेशांत व परदेशांत मान कसा वाढेल इकडेच आपण प्रथम लक्ष दिलें पाहिजे' असें त्या वेळच्या समाजनेत्यांनीं ठरवून प्रजेच्या हक्कांकडे कांहीं काल दुर्लक्ष करून राजसत्तेला मन मानेल तसा अधिकार गाजविण्याला मुभा दिली असें दिसतें. ट्यूडरवंशीय राजांना बहुतेक वेळां पार्लमेंटला धाब्यावर बसवून किंवा आपल्या चतुर मुत्सद्यांकरवीं या राष्ट्रसभेचें तोंड बंद करून आपले हेतु तडीस नेतां आले ते याच कारणांमुळें होय.

३ इंग्लंडच्या वैभवाचें बीज—राजसत्तेची पार्लमेंटच्या दाबापासून सुटका होऊन तिला मिळालेलें स्वातंत्र्य व या स्वातंत्र्याचा तिनें स्वतः प्रबल होण्याकडे केलेला शहाणपणाचा उपयोग, नवीन जगाचा शोध व त्यामुळें झालेली व्यापाराची वाढ, समुद्रावरील सर्वमान्य वर्चस्व, इतर राष्ट्रांतल्याप्रमाणेंच विद्या कलादींचें पुनरुज्जीवन, धार्मिक बाबतींत एकंदरींत प्रॉटेस्टंट म्हणजे पोपची सत्ता न मानणाऱ्या सुधारक पंथाचेंच वर्चस्व, राजघराण्यांतील विवाहांनीं युरोपखंडांतील राष्ट्रांशीं जडलेला संबंध,

सरदार वर्गाचें प्राबल्य नष्ट होऊन मध्यम वर्गाचें वाढलेलें महत्त्व, नेहमीं भरलेली तिजोरी, आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे राष्ट्र या दृष्टीनें इंग्लंडचें वाढलेलें राष्ट्रीय (National) आणि आंतरराष्ट्रीय (International) महत्त्व व दरारा हे ट्यूडर राजांच्या कारकिर्दीचे विशेष असून त्यांतच इंग्लंडच्या अर्वाचीन कालांतील वैभवाचें व भरभराटीचें बीज सांठविलेलें होतें. असो.

४ सामान्य प्रजेची वृत्ति—इ. स. १४८५ मध्यें **बॉसवर्थ**च्या रणक्षेत्रावर '**हेन्री ट्यूडर**'च्या डोक्यावर इंग्लंडचा राजमुकूट ठेवण्यांत आला. तेव्हांपासूनच इंग्लंडच्या या अर्वाचीन कालाच्या इतिहासाला प्रारंभ झाला असें म्हणतात. या अर्वाचीन कालाच्या आरंभीं युरोपखंडांतल्या इतर देशांप्रमाणेंच इंग्लंडांतही छापण्याच्या कलेचा प्रसार होऊन राष्ट्राच्या वाङ्मयांत आणि लोकांच्या आचार–विचारांत क्रांति घडून आली; 'गुलाबी युद्धां'त झालेल्या सरदार वर्गाच्या -हासामुळें राजसत्तेवर दाब ठेवणारा राजाला प्रतिस्पर्धी असा वर्गच नाहींसा झाला होता; सामान्य प्रजेला आधीं स्वास्थ्य व शांतता पाहिजे होती; ती प्राप्त करून देतांना राजानें थोडा जुलूम केला तरी त्याची त्यांना पर्वा नव्हती. कोलंबस (Columbus), वास्को–द–गामा (Vasco-de Gama), वगैरे परदेशच्या लोकांनीं समुद्रावर सफरी करून स्पेन–पोर्तुगालादि राष्ट्रांना नव्या जगांतील संपत्ति आपापल्या राष्ट्रांत आणून भरण्याची संधि प्राप्त करून दिली; तेव्हां आपण या नूतन-भूमिशोधनांत मागें राहूं तर ती मोठी नामुष्कीची गोष्ट होईल असें वाटून **जॉन कॅबट** (John Cabot) प्रभृति इंग्लंडचे नाविक समुद्रावर सफरी करूं लागले व त्यांना **हेन्री**नें उत्तेजन देऊन व्यापाराच्या वाढीला मदत केली. आणि इंग्लंडांतील मध्यम वर्गाला (Middle Class) हाताशीं धरून आपल्या राजसत्तेचें आसन दृढ केलें.

५ हेन्रीचा गादीवरील हक्क—'**बॉसवर्थ**'च्या रणक्षेत्रावर **हेन्री**च्या नांवानें जयघोष झाला तेव्हां त्याचें वय ३० वर्षांचें होतें. वास्तविक पाहूं गेलें असतां "लँकॅस्टर" घराण्याच्या मूळ पुरुषाशीं **हेन्री**चें आईकडून जें नातें लागत होतें तें फार लांबचें होतें. इंग्लंडच्या गादीचा सशास्त्र व कायदेशीर वारस 'तिसऱ्या रिचर्ड'चा एक भाचा **एडवर्ड** म्हणून होता तोच होता. या **एडवर्ड**चें वय या वेळीं १५ वर्षांचें असून तो **यॉर्क** जिल्ह्यांत रहात असे. पण **हेन्री**नें ताबडतोब त्याला पकडून त्याची किल्ल्यांत रवानगी केली, आणि आपल्या राजमार्गांतील हा कांटा दूर करून टाकला.

आपण इंग्लंड देश जिंकल्यामुळें इंग्लंडची गादी माझी आहे असेंहि त्याला म्हणतां येण्यासारखें होतें. पण इंग्लिश सरदारांनीं मदत केली नसती तर काय परिणाम झाला असता हें लोकांना माहीत होतें. त्यामुळें जेतृभावानें राजा होण्याची गोष्ट बोलूं नका असें त्याला सांगण्यांत आलें. त्याचा तिसरा हक्क म्हणजे पूर्वीं ठरल्याप्रमाणें **यॉर्क**-पक्षीय राजकन्या **इलिझाबेथ** इच्याशीं लग्न करून **यॉर्क** व **लँकेस्टर** घराण्यांच्या ऐक्यामुळें प्राप्त होईल तो. आणि त्या वेळच्या परिस्थितींत ह्याच हक्क सर्वांत जास्त महत्त्वाचा असून जरी मनांतून **हेन्री**ला इलिझाबेथशीं लग्न करावयाचें नव्हतें तरी लोकांना संतुष्ट करण्याचा दुसरा मार्ग नसल्यामुळें त्याला या म्हणण्याला कबूल होणें भाग पडलें.

६ हेन्रीचा राज्याभिषेक व लग्न—इ० स० १४८५च्या आक्टोबरच्या ३० व्या तारखेस **हेन्री**ला राज्याभिषेक करण्यांत आला. त्यानें लगेच '**जॉन मॉर्टन**' (John Morton) व **रिचर्ड फॉक्स** (Richard Fox) अशा दोघां धर्माधिकाऱ्यांना आपले मुख्य सल्लागार नेमिलें. कारण त्यांनीं पूर्वीं संकटांच्या वेळीं त्याला फार मदत केली होती. पुढल्या वर्षाच्या आरंभींच **हेन्री**नें इलिझाबेथ बरोबर लग्न केलें. त्या प्रसंगीं लोकांनीं, **हेन्री**नें प्रथम विजयोत्साहानें नगरप्रवेश केला होता, त्या वेळेपेक्षांहि जास्त आनंद प्रदर्शित केला. पुढें **हेन्री**नें आपल्या हक्काला बळकटी आणण्यासाठीं त्या वेळचा पोप ' इनोसेंट ' याजकडूनही संमतिपत्र मिळविलें.

७ जुनी अढी—आपल्या राजपदाच्या बळकटीसाठीं **हेन्री**नें जरी **यॉर्क**पक्षीय इलिझाबेथशीं लग्न केलें, तरी मूळचा त्याच्या हाडींमासीं खिळलेला **यॉर्क**पक्षाचा द्वेष लवकर जाण्यासारखा नव्हता. त्यामुळें राणीची ज्या लोकांवर मर्जी ते राजाचे नावडते असा प्रकार बरेच दिवस चालू होता. राजाच्या मनांतला **यॉर्क**पक्षाविषयींचा हा द्वेष कधीं कधीं आकस्मिक रीतीनें बाहेरही पडत असे. आणि अशा वेळीं **यॉर्क**-पक्षीय लोकांना चीड येऊन बंड करण्याचें स्फुरण येई.

८ लँबर्ट सिम्नेल—एकदां राजा **यॉर्क** जिल्ह्यांत दौऱ्यावर असतां '**लोव्हेल**' (Lovel) नांवाच्या एका सरदारानें बंड करून पाहिलें, पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. पुढें **सायमन** (Simon) नांवाच्या एका धर्माधिकाऱ्यानें बंडाचा मोठाच डाव मांडला. ' तिसऱ्या रिचर्ड, 'चा भाचा '**एडवर्ड**' या यॉर्कपक्षीय कायदेशीर वारसाला हेन्रीनें किल्ल्यांत ठेवलें होतें हें वर सांगितलेंच आहे. **सायमनें ऑक्सफर्ड** (Oxford) शहरांत '**लँबर्ट सिम्नेल**' (Lambert Simnel) म्हणून एक रोटीवाल्याचा १५ वर्षांचा मुलगा होता

त्याला पुढें करून राजपुत्रानें कशी वागणूक ठेवावयाची याचें त्याला शिक्षण दिलें. व थोड्या दिवसांनीं तो त्याला आयर्लंडमध्यें घेऊन गेला. त्यानें तेथल्या अधिकाऱ्यांना असें सांगितलें कीं, 'हा पहा **एडवर्ड**', हा **हेन्री**च्या कैदेंतून सुटून आला आहे. तेव्हां त्याला मदत करणें तुमचें काम आहे. या वेळीं आयर्लंडमध्यें जे मुख्य अधिकारी होते ते **यॉर्क**-पक्षीय होते. त्यांना आपल्या पक्षाचा राजपुत्र सुटून आल्याचें ऐकून फार आनंद झाला, आणि त्यांनीं या **'तोतया'** (Pretender) **एडवर्ड**ला मोठ्या मानानें वागविलें.

९ आयर्लंडचे लोक आपल्या पक्षाला अनुकूल आहेत असें पाहून इ० स० १४८७च्या मे महिन्यांत ' एडवर्ड राजा ' (King Edward) म्हणून त्याच्या नांवानें द्वाही फिरविण्यांत आली. **हेन्री**ला ही बातमी समजतांच त्यानें खऱ्या **एडवर्ड**ला बाहेर काढून **लंडन**च्या रस्त्यांतून फिरविलें, आणि आपल्या सरदार मंडळीच्या (Peers) व धर्माधिकाऱ्यांच्या (Prelates) सांगण्यावरून बंडवाल्या लोकांना माफीचें आश्वासन दिलें. **इंग्लंड**मध्यें या युक्तीला यश येऊन तिकडे सामसूम झालें. पण आयर्लंडमधील लोकांची खात्री होईना. ' चौथ्या एडवर्ड 'च्या बहिणीचा मुलगा **' लिंकन '** (Lincoln) यानें **फ्रान्स**मध्यें जाऊन **बर्गंडी**च्या राणीकडून दोन हजार सैनिक **डब्लिन**ला आणले, आणि **लोव्हेल** वगैरे सरदारांना वश करून घेऊन इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी केली. त्याच वर्षाच्या जूनमध्यें हे सरदार त्या ' तोतया ' एडवर्डला घेऊन इंग्लंडमध्यें **' फरनेस '** (Furness) नामक बंदरीं उतरले. **' स्टोक '** (Stoke) येथें **हेन्री**च्या व त्यांच्या सैन्यांची गांठ पडून निकराची लढाई झाली, व **लिंकन** व त्याचे चार हजार सैनिक रणांगणीं पडून अखेर **हेन्री**ला जय मिळाला. **सिम्नेल** व त्यांचे गुरुजी **सायमन** (Simon) यांना पकडून आणलें. गुरुजींना किल्ल्यांत कोंडून ठेवलें आणि **सिम्नेल**ला राजाच्या मुदपाकखान्यांत (Royal kitchen) ' खटपट्या ' (Scullion) चें काम देण्यांत आलें !

१० राणीचा राज्याभिषेक—या बंडामुळें आपण **यॉर्क** पक्षाचा द्वेष करतां कामा नये एवढें मात्र **हेन्री**ला समजून आलें. इलिझाबेथशीं लग्न होऊन जरी दोन वर्षें झालीं होतीं तरी तिला अजून राज्याभिषेक झाला नव्हता. त्यामुळें लोक नाखूष होते. आतां तिला मोठ्या थाटानें राज्याभिषेक होऊन यापुढें दरबारप्रसंगीं तिला मानाची जागा मिळूं लागली.

११ हेन्रीचा द्रव्यलोभ—**हेन्री** पैशाचा फार लोभी असून मितव्ययीही होता. उगाच लढाया करून पैशाचा अपव्यय करणें त्याला आवडत नसे. ' द्रव्यं सर्वार्थ-

साधनम् ' हें मत हृदयाशीं बाळगून होईल त्या रीतीनें द्रव्य जमा करून ठेवण्याचा उद्योग त्यानें आतां आरंभिला.

१२ ब्रिटनी—या वेळीं फ्रान्समध्यें **ब्रिटनी**(Brittany) चें संस्थान हें एकच काय तें स्वतंत्र संस्थान या नांवाला पात्र राहिलें होतें. याच संस्थानांत **हेन्रीला** लहानपणीं आश्रय मिळाला होता. **फ्रान्स**चा राजा **आठवा चार्लस** (Charles VIII) याचा या संस्थानावर फार दिवस डोळा होता. इ० स० १४८८ या वर्षीं या संस्थानांतील अंतःकलहाची संधी साधून **चार्लस** राजानें ब्रिटनीवर स्वारी केली. ब्रिटनीच्या वृद्ध संस्थानिकानें **हेन्री**ची मदत मागितली. तेव्हां सहा हजार सैनिक **हेन्रीनें** तिकडे रवाना केले. पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इतक्यांत ब्रिटनीचा वृद्ध राजा मरण पावला. त्याला **अॅन** (Anne) या नांवाची १२ वर्षांची एकुलती एक मुलगी होती. या मुलीचें लग्न ' **मॅक्झिमिलियन** ' (Maximilian) नांवाच्या रोमन राजाशीं **हेन्री**च्या सल्ल्यानें ठरलें होतें. पण **फ्रान्स**चा राजा **चार्लस** यानें आतां मध्यें आडकाठी घातली. 'रेनिस' नांवाच्या शहरांत ही मुलगी रहात होती. त्या शहराला वेढा घालून **चार्लस**नें ' एक माझी बायको तरी हो, नाहींतर कैदी होऊन तुरुंगांत रहा' असें त्या मुलीला सांगून पाठविलें. तेव्हां **अॅन**नें **चार्लस**शीं लग्न करण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें इ० स० १४९१ या वर्षीं ब्रिटनी प्रांत **फ्रान्स**च्या राज्याला जोडण्यांत आला.

१३ एस्टापलसचा तह—**हेन्री**ला या गोष्टीचा अतिशय राग येऊन त्यानें फ्रान्सवर स्वारी करण्याचा विचार जाहीर केला. इंग्लिश प्रजेलाही **फ्रेंच** राजाच्या ह्या वर्तनाचा राग आला होता. **पार्लमेंट**नें लढाईच्या खर्चासाठीं म्हणून मोठमोठ्या रकमा राजाच्या हवालीं केल्या. पण **हेन्रीचें** लक्ष **फ्रान्स**वरच्या स्वारीपेक्षां आपला खिसा भरण्याकडेच जास्त असल्यामुळें तो पुढें या स्वारीची गोष्ट चालढकलीवर टाकूं लागला. अखेर प्रजेनें फारच आग्रह केल्यामुळें आणखी एकवार ' खुषीची सक्ती ' (Benevolences) करून त्यानें लोकांकडून पैसा काढला, आणि बरेंचसें सैन्य घेऊन **फ्रान्स**ला निघाला. **फ्रेंच** लोकांना **हेन्रीचें** वर्म माहीत होतें. मोठीशीं रक्कम देऊं केली म्हणजे **हेन्री**चा राग नाहींसा होणार हें माहीत असल्यामुळें **फ्रान्स**च्या राजानें तहाचें बोलणें लावलें, आणि इ० स० १४९२ या वर्षीं ' **एस्टापलस** ' (Estaples) येथें तह होऊन **फ्रेंच**ानीं **हेन्री**ला दीड लाख पौंड द्यावे व **हेन्रीनें** आपलें सैन्य माघारें न्यावें असें ठरलें.

प्रकरण २७ वें

तोतयाचें बंड !

(इ० स० १४९१-इ० स० १५०९)

[१ परकिन वॉरबेक.—२ बर्गंडीचीराणी मार्गारेट.—३ क्लिफर्ड.—४ स्टॅन्ले.—५ आयर्लंडमधील परिस्थिति.—६ पॉयनिंग्ज कायदा.—७ तोतयाच्या अडचणी.—८ स्कॉटलंडची मदत.—९ हेन्रीची संधि.—१० वॉरबेक आणि कॉर्नवॉल.—११ टाँटनची लढाई-वॉरबेकचा पराभव-कैद आणि शेवट.—१२ दुसरा तोतया-एडवर्डचा वध.—१३ राजाच्या मुलांची लग्नें-स्कॉटलंडशीं सख्य – स्पेनशीं सख्य – लग्नाचा बाजार.—१४ हेन्रीची द्रव्यतृष्णा-कायद्यांचा जुलूम-मध्यम वर्ग.—१५ ऑक्सफर्ड.—१६ मॉर्टनचा कांटा.—१७ हेन्रीची अखेर-त्याच्या कारकिर्दीचा समारोप.—१८ नवा मनु-अमेरिकेचा शोध-वास्को डी गामा-कॅबट.—१९ तुर्कांचा विजय-ग्रीक विद्वान-विद्येचें पुनरुज्जीवन-मूर्खस्तुति-युटोपिया.—२० भौतिक शोध-ज्योतिषांत प्रगति-नवी दृष्टि आणि नवी विचारसरणी.—२१ धर्माची पिछेहाट आणि राष्ट्रभावनेची प्रगति -नव्या जुन्या भांडणांतील भेद.]

१ परकिन वॉरबेक (Perkin Warbeck)-**फ्रान्स**बरोबर ही कटकट सुरू असतां इकडे इंग्लंडमध्यें एक नवीनच संकट उपस्थित झालें. 'तिसऱ्या रिचर्ड'नें आपल्या भावांच्या मुलांना मारेकरी घालून ठार मारविल्याची व त्यांचीं प्रेतें जिन्याखालीं पुरून टाकविल्याची हकीकत मागें एका प्रकरणांत सांगितलीच आहे. पण ही गोष्ट त्या वेळीं लोकांना माहीत नव्हती. किंबहुना **हेन्री**लाही माहीत होती कीं नाहीं याची वानवाच आहे. लोकांची समजूत ते दोघे भाऊ किल्ल्यांत तुरुंगवास भोगीत आहेत अशीच होती. त्या भावांपैकीं धाकटा भाऊ 'रिचर्ड' हा किल्ल्यांतून पळून गेला आहे अशी त्या वेळीं कोणीं हूल उठविली. **हेन्री**च्या शत्रूंनीं या हुलीचा फायदा घेऊन '**परकिन वॉरबेक**' या नांवाचा एक कलालाचा मुलगा पुढें केला आणि हाच '**रिचर्ड**' म्हणून सांगून कित्येक सरदारांनीं त्याला गादीवर बसविविण्याचा घाट घातला.

२ बर्गंडीची राणी मार्गारेट—या वेळीं **फ्रान्स** व **इंग्लंड** यांच्यामध्यें युद्ध सुरू होण्याचें घाटत असल्यामुळें **फ्रान्स**चा राजा '**चार्लस**' यानें या 'तोतया'

रिचर्डला फ्रान्समध्यें बोलावून त्याला मदत करण्याचें कबूल केलें. पण पुढें हेन्रीनें ‘ एस्टापल्स ’ चा तह कबूल केल्यामुळें या तोतयाला चार्लसचा आसरा नाहींसा झाला. तेव्हां तो बर्गंडीमध्यें गेला. बर्गंडीची विधवा राणी ‘ मार्गारेट ’ (Margaret) ही खऱ्या ‘ रिचर्ड ’ ची आत्या. तिला यॉर्क पक्षाचा सहाजिकच अभिमान. त्यामुळें कोणाही यॉर्कपक्षीयाचा छळ होऊं लागला म्हणजे तो बर्गंडीमध्यें तिच्या आश्रयाला जाऊन रहात असे. या वृद्ध आतेनें ‘ तोतया रिचर्ड ’ला तो खरोखरच आपला भाचा आहे अशा रीतीनें वागविलें. इंग्लंडमध्यें पुन्हां यॉर्क पक्ष उपस्थित होऊन त्या पक्षाच्या पुढारी मंडळाचा बर्गंडीच्या दरबाराशीं पत्रव्यवहार सुरू झाला. व हळूहळू ‘ रिचर्ड ’ खरोखरच पळून आला आहे असा समज लोकांमध्यें दृढ होत चालला.

३ क्लिफर्ड (Clifford)—**हेन्री**लाही आतां भीति वाटूं लागली. इंग्लंडमध्यें व बर्गंडीमध्येंहि त्याचे पुष्कळ गुप्त हेर होते. ते त्याला या कारस्थानाची इत्थंभूत बातमी पुरवीत असत. पण **हेन्री**ला स्वभावतः युद्धाची आवड नसल्यामुळें होतां होईतों हें प्रकरण सामोपचारानेंच मिटविण्याचें धोरण त्यानें पहिल्यानें पत्करलें. ‘ **क्लिफर्ड** ’ नांवाचा एक प्रमुख सरदार या कटांत सामील होता. त्याला युक्तीनें आपल्या बाजूला वळवून घेऊन जे त्याच्याप्रमाणें या कटांतून आपलें आंग काढून घेतील, त्यांना माफी मिळेल असें **हेन्री**नें जाहीर केलें. ‘**क्लिफर्ड**’च्या मदतीमुळें पुष्कळशा कटवाल्यांचीं नांवें उघडकीस येऊन कित्येकांना राजद्रोहाबद्दल देहांत प्रायश्चित्त भोगावें लागलें.

४ स्टॅनले (Stanley)—सरदार ‘ **स्टॅनले**’ ज्यानें बॉसवर्थच्या लढाईंत आयत्या वेळीं **हेन्री**ला मिळून त्याला राजपद मिळवून दिलें होतें, त्या स्टॅनलेचा भाऊ एकदां सहज ‘ क्लिफर्ड ’ला म्हणाला होता कीं, ‘बर्गंडीमधला हा तरुण पुरुष जर खरोखरच ‘ **चौथ्या एडवर्ड** ’चा मुलगा ‘ **रिचर्ड** ’ असेल तर आपण कांहीं त्याच्या विरुद्ध शस्त्र धारण करणार नाहीं ’. विश्वासघातकी ‘ क्लिफर्ड ’च्या तोंडून ही बातमी **हेन्री**ला समजतांच त्यानें **स्टॅनले**ला पकडून फांसावर चढविलें. **स्टॅनले** व त्याच्याचसारखे इतर पुष्कळ सरदार फांसावर गेल्यामुळें हा कट बराच मोडकळीस येऊं लागला. तेव्हां ताबडतोब कांहीं तजवीज केली नाहीं तर आपलें तोतयेपण उघडकीस येईल असें वाटून ‘ **वॉरबेक** ’नें इंग्लंडवर स्वारी करण्याचें ठरविलें.

५ आयर्लंडमधील परिस्थिति—इ० स० १४९५ मध्यें त्यानें इंग्लंडमध्यें येण्याचा प्रयत्न केला, पण तो साधला नाहीं. तेव्हां तो आयर्लंडमध्यें, तिकडे

कांहीं जमलें तर पहावें म्हणून निघून गेला. या वेळीं आयर्लंडमध्यें '**पॉयनिंग्ज**' (Poyning's) नांवाचा मुख्य अधिकारी होता. त्यानें आयर्लंडमधील राज्य-व्यवस्था उत्तम राखिली होती. त्यामुळें **वॉर**बेकला तिकडेही कोणाचें पाठबळ मिळेना.

६ **पॉयनिंग्ज कायदा** (Poyning's Law)—या '**पॉयनिंग्ज**' नें खुद्द आयरिश पार्लमेंटमध्येंच दोन कायदे पास करून घेऊन आयर्लंडमधील इंग्लंडची सत्ता दृढतर केली होती. यांपैकीं एका कायद्यानें असें ठरविलें होतें कीं, इंग्लिश राजाची व प्रधान मंडळाची (Council) संमती घेतल्याशिवाय कोणतेंही '**बिल**' आयर्लंडच्या पार्लमेंटमध्यें आणूं नये, इतकेंच नव्हे तर आयरिश पार्लमेंटची बैठकही भरूं नये. दुसऱ्या कायद्यानें इंग्लंडांत चालू असलेले सर्व कायदे आयर्लंडलाही लागू आहेत असें ठरविण्यांत आलें होतें. असो.

७ **तोतयाच्या अडचणी**—**वॉर**बेकला आयर्लंडमध्यें कोणी सहाय्यकर्ता मिळेना, म्हणून त्याला पुनः फ्लँडर्समधील बर्गंडीच्या दरबाराचा आश्रय करावा लागला. पण पुढें तेथूनही त्याची उचलबांगडी झाली. कारण तिकडच्या **फ्लेमिंग** कोष्टयांचा इंग्लंडमध्यें चांगला व्यापार चालत असे. **हेन्री**नें हा व्यापार बंद करून 'फ्लँडर्स'च्या व्यापाऱ्यांना इंग्लंडमधून हांकून लाविलें. तेव्हां व्यापाराची बंदी झाल्यामुळें बर्गंडीच्या '**मार्गारेट**' राणीचे डोळे उघडले व तिनें पाठीशीं घातलेल्या **तोतया रिचर्ड**ला आपल्या दरबारांतून घालवून देऊन **हेन्री**शीं पुन्हां सख्य जोडलें.

८ **स्कॉटलंडची मदत**—नंतर **वॉर**बेक **स्कॉटलंड**मध्यें गेला. तेथें 'चौथ्या **जेम्स**'नें त्याचें चांगलें आदरातिथ्य केलें. आपल्या दरबारच्या एका सरदाराच्या '**कॅथराईन गॉर्डन**' (Catherine Gordon) नांवाच्या कन्येशीं त्याचें लग्न लावून देऊन जेम्सनें त्याला आपला 'सखा' केलें. आणि त्याच्या तर्फेनें इ० स० १४९६ या वर्षी इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलुखावर स्वारी केली. इंग्रज प्रजेपैकीं कोणीहि या वेळीं त्याच्या बाजूला मिळेना, तेव्हां थोडीशी लुटालूट करून **स्कॉट** लोक स्वदेशीं परत गेले.

९ **हेन्रीची संधि**—**स्कॉट** लोकांनीं इंग्लंडवर स्वारी केली, हें **हेन्री**ला आपल्या प्रजेकडून पैसे गोळा करण्याला आयतेंच निमित्त सांपडलें. त्यानें पुन्हां **पार्लमेंट**-कडे पैशांची मागणी केली. आणि **स्कॉट** लोकांची खोड मोडण्यासाठीं राजा पैसा मागतो आहे तर तो दिला पाहिजे म्हणून पार्लमेंटनेंही खर्चाची मंजुरी दिली. एका

' **कॉर्नवॉल** ' (Cornwall) जिल्ह्यांतील लोक मात्र पैसा देण्यास कबूल होईनात. त्यांनीं सशस्त्र होऊन लंडनवर चाल केली. पण ' **ब्लॅकहीथ** ' येथें राजाच्या सैन्यानें मागून पुढून वेढून त्यांचा पराभव केला, आणि बंडाच्या पुढाऱ्यांना पकडून फांसावर चढविलें.

१० वॉरबेक आणि कॉर्नवॉल—इतक्यांत उत्तरेकडे स्कॉट लोकांनीं पुन्हां हल्ला केला. पण इंग्रज सेना चालून गेल्याबरोबर ते मागें हटले आणि त्यांनीं तहाचें बोलणें लावलें. वॉरबेकचा हाही आश्रय सुटला तेव्हां तो पुन्हां एकदां **आयर्लंडमध्यें** जाऊन तिकडून **वेल्समध्यें** आला, आणि **कॉर्नवॉलचे** लोक बिथरले होते त्यांची मदत घेऊन त्यानें ' **बॉडमिन** ' (Bodmin) येथें ' राजा चौथा रिचर्ड ' असा किताबही धारण केला.

११ टॉटनची लढाई--या वेळीं सुमारें ६ हजार सैन्य वॉरबेकच्या निशाणा-भोंवतीं जमा झालें होतें. अखेर ' **टॉटन** ' (Taunton) येथें राजसैन्याची व त्याची गांठ पडून आपला निभाव लागत नाहीं असें त्यास कळून आलें, तेव्हां तेथून पळून जाऊन हॅंप जिल्ह्यांतील (Hampshire) ' **बोलो** ' (Beaulieu) नांवाच्या मठीचा (Sanctuary) त्यानें आश्रय केला. त्याच्याभोंवतीं जमा झालेले लोक राजा काय करील तें करील म्हणून **हेन्रीला** शरण गेले. **हेन्रीनें** थोड्याशा बंडवाल्यांना फांसावर चढविलें, कित्येकांना दंड ठोठावला, व बाकीच्यांना घालवून दिलें. शेवटीं **हेन्रीकडून** जीवदान घेण्याचें वचन घेऊन **वॉरबेकही** शरण आला. आपण तोतया (Impostor) आहों अशी त्याच्याकडून कबुली घेऊन ती लंडनमध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. आणि राजानें त्याला बंदिवासांत ठेवून त्याच्या बायकोला राणीचें दासीपद (Attendant on the Queen) दिलें. कांहीं दिवसांनीं **वॉरबेकनें** इंग्लंडमधून पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण तो न साधल्यामुळें अखेर **हेन्रीनें** त्याच्या पायांत खोडा अडकवून त्यास किल्ल्यांत ठेवलें. त्या ठिकाणीं यॉर्कपक्षीय एकुलता एक राजपुत्र ' **एडवर्ड** ' कैदेंत होताच. त्याची आणि **वॉरबेकची** मैत्री जमली. त्या दोघांनीं संगनमत करून कैदेंतून सुटका करून घेण्याचा एकदां प्रयत्न केला; पण हा प्रयत्न उघडकीस आल्यावर **वॉरबेकला** ' **टायबर्न** ' (Tyburn) येथें फांशीं देण्यांत आलें.

१२ दुसरा तोतया—पुढें इ० स० १४९९ च्या नोव्हेंबर महिन्यांत ' **टॉवरहिल** ' वर खऱ्या **एडवर्डचाही** शिरच्छेद करण्यांत आला. या

शिरच्छेदाला दुसरें एक कारण असें झालें कीं, वॉरबेकला फांशीं दिल्यावर थोड्याच दिवसांनीं केंट (Kent) मधील एका उपाध्यायानें एका चांभाराच्या मुलाला हाताशीं धरून हाच 'एडवर्ड' म्हणून बंड करण्याचा उद्योग आरंभिला. **हेन्री**ला ही बातमी लागल्याबरोबर त्यानें त्या दोघांनाहि पकडून चांभाराच्या मुलाला देहांत प्रायश्चित्त दिलें आणि उपाध्येबोवांना जन्मठेपेची शिक्षा दिली. पुढें पुन्हां असा प्रयत्न करण्याचा मोह कोणाला होऊं नये म्हणून खऱ्या **एडवर्ड**चाच वध करून टाकावा असें ठरवून त्यानें हें घोर कृत्य केलें. पण यामुळें त्याच्या नांवाला कायमचा डाग लागल्यासारखा झाला.

१३ राजाच्या मुलांचीं लग्नें—बंडाचा वणवा विझवून त्यांचें कारणही नाहींसें करून टाकल्यावर **हेन्री** आपल्या मुलांच्या लग्नाच्या तजविजीस लागला. इंग्लंड व **स्कॉटलंड** यांच्या दरम्यान बरींच वर्षें धुसफुस चाललेली होती. ती मिटविण्यासाठीं त्यानें आपली वडील मुलगी '**मार्गारेट**' हिचें **स्कॉटलंड**चा राजा चवथा **जेम्स** (James IV) याजबरोबर इ० स० १५०३ मध्यें लग्न लावून दिलें. अशा रीतीनें **स्कॉटलंड**चा राजा इंग्लंडच्या राजाचा आप्त झाला. **युरोप** खंडांत त्या वेळीं **फ्रान्स** व **स्पेन** हीं दोन राष्ट्रें प्रबल झालीं होतीं. **फ्रान्स**बरोबर **हेन्री**चें सख्य नव्हतेंच. तेव्हां **स्पेन**ला आपल्या बाजूचें करून **फ्रान्स**वर आपलें वजन बसवावें म्हणून स्पेनच्या राजाची मुलगी '**कॅथराइन**' (Catherine) ही आपला वडील मुलगा आर्थर (Arthur) ला करून वरदक्षिणा (Dowry) म्हणून दोन लाख 'डकेट' त्यानें काढले. पण दुर्दैवानें लग्न झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंतच हा मुलगा मरण पावला. **हेन्री** हातची वरदक्षिणा सोडण्यास खुषी नव्हता. त्यानें पोपची संमति आणवून **कॅथराइन**चा आपल्या धाकट्या मुलाबरोबर पुनर्विवाह लावण्याचें ठरवून वाग्निश्चयहि करून टाकला. इ० स० १५०३ मध्यें **हेन्री**ची बायको मरण पावली; तेव्हां एखाद्या बड्या श्रीमंताची मुलगी मिळेल तर आपण दुसरें लग्न करावें असाही त्याचा बेत होता; पण तो सिद्धीस गेला नाहीं !

१४ हेन्रीची द्रव्यतृष्णा—राज्यांत शांतता, सुव्यवस्था, व भरभराट होऊं लागली, तसतशी **हेन्री**ची द्रव्यतृष्णाही वाढत चालली. एकादा क्षुल्लक कायदा जरीं कोणीं मोडला तरी त्याच्याकडून भयंकर दंड घ्यावयाचा असा क्रम त्यानें आरंभिला. या कामीं **एम्पसन** (Empson) व **डडले** (Dudley) असे दोन कायदेपंडित न्यायाधीश त्याला चांगले मदतनीस मिळाले होते. जुने पुराणे सांधीं कोपऱ्यांत पड-

लेले कायदे त्यांनीं उजेडांत आणले, आणि सर्व देशभर गुप्त हेर पसरून कोणीं हे कायदे मोडल्याचें आढळून आलें कीं त्याला धरून आणून त्याच्याकडून जबर दंड घ्यावा, त्याची गरिबी श्रीमंती कांहीं पहावयाची नाहीं असा प्रकार सुरू झाला. पूर्वींच्या कित्येक राजांच्या कारकिर्दीतून सरदार लोकांचें वजन व महत्त्व कमी करण्यासाठीं त्यांच्याविरुद्ध पुष्कळ कायदे झाले होते. **हेन्रीनें** आपल्या सोईप्रमाणें हे कायदे उपयोगांत आणले. पूर्वी जहागिरदाराला आपली जहागीर विकतां येत नसे; आतां एका कायद्यानें आपल्या जहागिरी विकण्याची त्यांना मोकळीक देण्यांत आली. व या वेळीं पुष्कळ सरदार कर्जबाजारी झाल्यामुळें त्यांनीं या कायद्याचा फायदा घेऊन आपल्या जमिनी विकून टाकल्या. व त्या श्रीमान् व्यापाऱ्यांनीं व छोट्या जमिनदारांनीं घेतल्यामुळें राज्यांत एक नवीन '**मध्यम वर्ग**' (Middle Class) उत्पन्न झाला.

१५ **ऑक्सफर्ड** (Oxford)–दुसऱ्या एका कायद्यानें सरदार लोकांना योग्य मर्यादेच्या बाहेर सशस्त्र लोक (Livery and Maintenance) आपल्या नोकरीला ठेवण्याची मनाई करण्यांत आली. एकदां **ऑक्सफर्ड** नामक **हेन्रीच्या** एका प्रीतींतल्या सरदारानें त्याला आपल्या किल्ल्यांत मेजवानीस बोलाविलें. राजाचा योग्य आदरसत्कार करण्यासाठीं त्यानें आपले सर्व नोकर (Retainers) या प्रसंगीं जमा केले. दोन्ही बाजूला दोन रांगांनीं उभे राहून या नोकरांनीं राजाला मुजरा केला. मेजवानी झाल्यावर राजा किल्ल्याच्या बाहेर आला तेव्हां तो हंसून म्हणतो, 'मित्रा, तुझ्या या राजनिष्ठेबद्दल मी तुझे फार आभार मानतों; पण माझे कायदे माझ्यासमक्ष मोडलेले माझ्यानें पहावत नाहीं याबद्दल वाईट वाटतें!'' दुसऱ्या दिवशीं कायद्यानें दिलेल्या मर्यादेबाहेर सशस्त्र लोक नोकरीस ठेवल्याबद्दल **ऑक्सफर्डला** दहा हजार पौंड राजाच्या तिजोरींत जमा करावे लागले!

१६ **मॉर्टनचा कांटा** (Morton's Fork)—या कामीं राजाला जे सल्लागार मिळाले होते तेही त्याच्यासारखेच युक्तिबाज होते. '**मॉर्टन**' (Morton) या नांवाच्या त्याच्या एका 'ब्राह्मण' (Bishop) मंत्र्याची अशी गोष्ट सांगतात कीं, त्याला एकाद्या इसमाकडून पैसा काढावयाचा झाला कीं तो त्याला बोलावून आणी, आणि त्याची राहणी श्रीमंतीची किंवा डामडौलाची दिसली म्हणजे त्याला सांगे कीं, 'तुम्हांला आपली चैन जरा कमी करून राजाला थोडी मदत केलीच पाहिजे'; उलट कोणाची राहणी गरिबीची दिसली कीं **मॉर्टन** त्याला सांगे, "तुम्ही फार काटकसरी आणि

मितव्ययी आहां; त्या अर्थीं तुमच्या जवळ बरीच ‘ माया ’ असली पाहिजे. तींतून थोडी देणगी म्हणून राजाला द्या म्हणजे झालें !” एकूण हा **‘ मॉर्टनचा कांटा ’** (Morton’s Fork) दुधारी असल्यामुळें तो कोणालाच बोंचल्याशिवाय म्हणून राहत नसे ! अशा रीतीनें **हेन्रीनें** १८ लाख पौंड जमा केले होते असें म्हणतात !

१७ हेन्रीची अखेर—हेन्रीला अखेरच्या दिवसांत क्षयाची भावना झाली. शेवटच्या दुखण्यांत त्याला आपल्या कृत्यांचा बराच पश्चात्ताप झाला. म्हणून ज्यांचें ज्यांचें त्याच्या हातून नुकसान झालें होतें, त्यांना कांहीं नुकसानभरपाई द्यावी म्हणून त्यानें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवलें होतें. तो इ० स० १५०९ च्या एप्रिलच्या २५ व्या तारखेस त्याच्या आवडत्या **‘ शेन ’** नांवाच्या वाड्यांत मरण पावला. त्याच्यामागें त्याला एक मुलगा व तीन मुली होत्या. **हेन्री** मोठा बुद्धिवान व छातीचा राजा होता. फाजील द्रव्यतृष्णा हाच त्याच्या अंगचा मुख्य दुर्गुण. पण त्याच्या कारकिर्दींत प्रजेला एकंदरीनें बरेंच स्वास्थ्य मिळालें, व्यापाराची भरभराट झाली, आणि परदेशी राजकारणांतही इंग्लंडच्या मताला थोडा बहुत मान मिळण्याला सुरवात झाली.

१८ नवा मनु—हेन्रीच्या राज्यारोहणाच्या कालापासून इंग्लंडांत किंबहुना सगळ्या युरोप खंडांतच ‘ नव्या मनू ’ ला प्रारंभ झाला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या नव्या मनूच्या सुरवातीलाच प्रख्यात स्पॅनिश नाविक **कोलंबस** (Columbus) यानें **अमेरिका** खंडाचा शोध लाविला (इ. स. १४९२). सुप्रसिद्ध पोर्तुगीझ (Portuguese) खलाशी **वास्को-डी-गामा** (Vasco-de-Gama) हा आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाला वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर **‘कालिकत’** बंदरीं येऊन उतरला (इ. स. १४९७). स्पॅनिश व पोर्तुगीझ खलाशांचें हें धाडस पाहून इंग्रज दर्यावर्दीसही स्फुरण आलें, व **कॅबट** (Cabot) नांवाच्या पितापुत्रांनीं सातव्या **हेन्रीचें** मन वळवून **अमेरिकेच्या** उत्तरेकडे जाऊन **न्यू फाउंडलंड** (New Foundland) नांवाचें बेट शोधून काढलें. हिंदुस्तानचा त्या वेळीं **‘सुवर्णभूमि’** म्हणून युरोपांत लौकिक होता, व अमेरिका खंडांत जमीन विपुल व वस्ती थोडी, अशी स्थिति होती. त्यामुळें युरोपांतल्या धाडसी लोकांना बाहेर देशीं जाऊन स्वतःचें व आपल्या देशाचें कल्याण करून घेण्याचें साधन प्राप्त झालें.

१९ **तुर्कांचा विजय**—इ. स. १४५३ सालीं तुर्क लोकांनीं युरोपच्या आग्नेय दिशेला '**कॉन्स्टँटिनोपल**' येथें आपली गादी स्थापिली. तेव्हां तेथले ग्रीक विद्वान् आपल्याकडचे जुने ग्रंथ व पोथ्या घेऊन पश्चिमेकडे पळाले. त्यांनीं युरोपांतल्या ज्या ज्या देशांत आपलें बिऱ्हाड थाटलें, तेथें तेथें जुन्या ग्रीक व लॅटिन विद्यांचें लोकांना अध्यापन करवून विद्येच्या पुनरुज्जीवनाची (Renaissance) लाट उसळून दिली. **इरॅस्मस** (Erasmus) या नांवाच्या एका ग्रंथकारानें '**मूर्खस्तुति**' (The Praise of Folly) म्हणून एक व्याजोक्तिपूर्ण ग्रंथ लिहून मठवासी जोग्यांच्या जुन्यापुराण्या विचारांची टर उडविली. **थॉमस मूर** (Thomas Moore) यानें '**युटोपिया**' (Utopia) नांवाचा ग्रंथ लिहिला; त्यांत उत्तम राज्यपद्धति कोणती याचा विचार करतांना आजच्या लोकशाहीच्या काळालाही लागू पडतील अशीं तत्त्वें त्यानें प्रतिपादन केलीं होतीं.

२० **भौतिक शोध**—याच वेळीं चित्रकला, शिल्पकला वगैरे कलांनाही जोराचें चालन मिळालें; बंदुकीची दारू, दुर्बीण, होकायंत्र वगैरे भौतिक शास्त्रीय शोधांनीं युद्धविषयक, भौगोलिक, व नाविक शास्त्रांतही क्रांति झाली. प्रशिया देशांत **कोपर्निकस** (इ.स.१४७३–१५४३) व इटलींत **ग्यालिलिओ** (इ. स. १५६४–१६४२) यांच्या सारख्यांनीं ज्योतिःशास्त्राचा अभ्यास करून नवीन प्रमेयें पुढें मांडलीं; त्यांनीं धर्मगुरूंचें आसन डळमळूं लागल्यामुळें ते पांखडी म्हणून त्यांचा अनान्वित छळ झाला. तरी पण अखेर त्यांचीं सत्य प्रमेयें जगानें उचलावयाचीं तीं उचललींच. एकंदरींत मध्ययुगांत सर्व साधारण जनतेच्या मनावर जी एक प्रकारची निराशेची कळा पसरलेली दिसत असे, ती नाहींशी होऊन हें जग नश्वर म्हणून त्याज्य नसून सुंदर व पवित्र आहे व माणसानें त्याचा उपभोग घ्यावा म्हणूनच परमेश्वरानें तें निर्माण केलें आहे अशा प्रकारची विचारसरणी रूढ झाली. हाच आजच्या पाश्चात्य भौतिक भरभराटीचा पाया होय.

२१ धर्माची पिछेहाट आणि राष्ट्रभावनेची प्रगति—मध्ययुगांत युरोपखंडांतील राष्ट्रांत धर्म हें राष्ट्रां-राष्ट्रांतील ऐक्यवृद्धीचें साधन होतें. नव्या युगांत ज्ञानाचा जो नवा मनु सुरू झाला त्यानें धर्माला मागें सारून राष्ट्रभावनेला पुढें आणलें. मध्य युगांत पॅलेस्टाइनच्या पवित्र भूमीसाठीं प्राण देण्याला पुढें येणारे निरनिराळ्या राष्ट्रांतले धर्मवीर नव्या युगांत आपल्या स्वतःच्या देशापुरतेच राष्ट्रवीर बनले आणि धर्मभावनेच्या जोरावर होणारी राष्ट्रां–राष्ट्रांतील एकी नाहींशी होऊन प्रत्येक राष्ट्र आपापल्या पायांपुरतें पहाणारें स्वतंत्र राष्ट्र बनलें. या

नव्या युगांत इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड स्पेन, पोर्तुगाल वगैरे राष्ट्रांत जीं भांडणें झालीं, तीं धर्मापेक्षां नुकत्याच शोध लागलेल्या नव्या जगाचें स्वामित्व कोणाकडे रहावें, आणि पूर्वेकडच्या हिंदुस्तानादि राष्ट्राशीं चालणारा व्यापार कोणाच्या हातांत असावा यासाठींच झालीं. आणि त्या त्या देशांतले राजे किंवा राण्या यांनीं आपसांत स्नेहसंधि केले ते धार्मिक भावनेपेक्षां त्या स्नेहसंधींनीं आपला आणि आपल्या देशाचा भौतिक दृष्ट्या फायदा काय होईल हें पाहूनच केले.

प्रकरण २८ वें.

आठव्या हेन्रीची कारकीर्द.

(इ. स. १५०९-इ. स. १५२७)

[१ आठवा हेन्री-त्याची लोकप्रियता.—२ एम्पसन आणि डडले-नॉरफोक आणि फॉक्स.—३ फ्रान्सशीं युद्ध.—४ डॉरसेटची फसगत.—५ फ्रेंचांचा पराभव. ६—स्कॉटलंडशीं लढाई.—७ फ्रान्सशीं तह.—८वुल्से.—९।१० त्याचें वैभव व मान.—११।१२ फ्रान्स आणि स्पेन यांची चुरस.—१३ वुल्सेची महत्त्वाकांक्षा. १४—हेन्रीची फ्रान्सला भेट-वुल्से व स्पेन.—१५ फ्रान्स व स्पेनची लढाई-इंग्लंडची स्पेनला मदत व फ्रान्सबरोबर युद्ध.—१६ स्कॉटलंडशीं लढाई —१७ पार्लमेंटची बैठक-खुषीची सक्ति.—१८ वुल्सेचा आशाभंग.—१९ इटलींतील कारस्थान-फ्रान्सशीं सख्य.—२० धार्मिक क्रांतीचा आरंभ.]

१ आठवा हेन्री—' सातवा हेन्री ' मरण पावला तेव्हां त्याचा दुसरा मुलगा '**हेन्री**' हा अठरा वर्षांचा होता. यॉर्कपक्षीय माता व लँकेस्टरपक्षीय पिता यांच्या रक्तरेतापासून याचा जन्म झालेला असल्यामुळें या दोन्ही घराण्यांच्या पक्षपाती मंडळीला तो आपलाच राजा असें वाटून दोघांनींही त्याच्या राज्यारोहणाच्या वेळीं मोठा आनंद प्रदर्शित केला. शिवाय हा बालराजा मोठा हौशी, मनमिळाऊ व दरबारी वागणुकींत पुरा वाकबगार असून अंगापिंडानें सशक्त व देखणा होता. त्यामुळेंही त्याच्या लोकप्रियतेंत भर पडली. बापानें नाना प्रकार करून द्रव्य जमवून ठेवलें होतेंच. त्यामुळें त्याची चैन चालण्याला पैशाचीहि अनुकूलता होती. '**आठवा**

हेन्री ' म्हणून राज्याभिषेक झाल्यावर लवकरच त्यानें बापानें ठरवून ठेवल्याप्रमाणें आपल्या विधवा भावजईशीं लग्न केलें; आणि नाच, तमाशे, शिकार वगैरे करमणुकींत पहिलीं दोन वर्षें घालवून बापानें मोठी जतन करून सांठवून ठेवलेला पैसा उधळून टाकला.

२ एम्पसन आणि डडले (Empson and Dudley)–बापाच्या कारकिर्दींत **एम्पसन** आणि **डडले** या दोन न्यायाधिशांनीं लोकांना छळून पैसा काढला होता; त्यामुळें त्यांच्यावर लोकांचा मोठा दांत होता. तेव्हां लोकांना खुष करण्यासाठीं **हेन्रीनें** या न्यायाधिशांना कामावरून दूर करून त्यांना किल्ल्यांत कोंडून ठेवलें. त्यांच्याबरोबर त्यांचे जे गुप्त हेर होते, त्यांनाही तुरुंगवास भोगावा लागला. पण या न्यायाधिशांच्या नुसत्या तुरुंगवासानें लोकांचें समाधान होईना. तेव्हां शेवटीं त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला उभा करून त्यांना फांशीं देण्यांत आलें, आणि राज्यकारभार ' **नॉरफोक** ' (Norfolk) व ' **फॉक्स** ' (Fox) या दोन मुख्य मंत्र्यांच्या हातीं सोंपविण्यांत आला.

३ फ्रान्सशीं युद्ध—**हेन्री**च्या कारकिर्दींचीं पहिलीं तीन चार वर्षें बरींच शांततेंत गेलीं. पण पुढें लौकरच **इंग्लंडला फ्रान्स**बरोबरच्या लढाईंत पडावें लागलें. **फ्रेंच** लोकांनीं या वेळीं **इटलीमध्यें** शिरून **पोप**च्या देवस्थानपैकीं कांहीं मुलूख बळकाविला होता. हा मुलूख पुन्हां हस्तगत करून **पोप**कडे चालू करण्यासाठीं **स्पेन**चा राजा **फर्डिनँड** (Ferdinand), **जर्मनी**चा राजा **मक्झिमिलियन** (Maximilian) आणि स्वतः **पोप जुलियस** (Julius II) यांनीं आपसांत संघ (Holy League) स्थापन करून त्या संघांत येऊन मिळण्याविषयीं **हेन्री**ला विनंति केली. फ्रेंचांचें व इंग्लिशांचें बरें नव्हतेंच. तेव्हां **हेन्रीनें** ही विनंति ताबडतोब मान्य केली.

४ डॉरसेटची फसगत—जुन्या 'गिनी' (Guienne) प्रांताबद्दलचा हक्क उपस्थित करून हा प्रांत फ्रान्सचा राजा **लुई** यानें सोडून द्यावा म्हणून त्याला इंग्लिशांचा निरोप गेला. आणि **लुईनें** हें म्हणणें नाकारल्याबरोबर **हेन्रीनें** फ्रान्सशीं युद्ध जाहीर केलें. ' डॉरसेट ' (Dorset) नांवाच्या सेनापतीकडे बरेंच सैन्य देऊन त्याला **स्पेन**मध्यें पाठवून **स्पेन**च्या राजाच्या मदतीनें **फ्रान्स**वर दक्षिणेकडून हल्ला करावा असें ठरलें. पण हें सैन्य **स्पेन**मध्यें गेल्यावर **स्पेन**चा राजा फ्रान्सवर स्वारी करण्याचें सोडून शेजारचा ' **नाव्हरे** ' (Navarre) प्रांत स्वतःसाठीं जिंकण्याकडेच या सैन्याचा उपयोग करूं लागला.

तेव्हां डॉरसेटला आपण फसलों असें वाटून तो आपलें उरलें सुरलें सर्व सैन्य घेऊन हात हालवीत इंग्लंडला परत आला.

५ फ्रेंचांचा पराभव—पुढल्या वर्षी **पार्लमेंट**कडून खर्चासाठीं बरीच मोठी रक्कम घेऊन **हेन्री** २५ हजार सैन्यानिशीं स्वतः **फ्रान्स**मध्यें गेला. जर्मनीचा बादशहा त्याला येऊन मिळाला. 'गिनीगेट' (Guinegate) येथें फ्रेंचांची व या संयुक्त सैन्याची झटापट होऊन दहा हजार फ्रेंच घोडेस्वार घोड्यांना टांचा मारून पळत सुटले (The Battle of the Spurs) आणि तिकडचे दोन तीन प्रांत काबीज करून इ० स० १५१३ या वर्षी हेन्री मोठ्या विजयोत्साहानें इंग्लंडला परत आला.

६ स्कॉटलंडशीं लढाई—फ्रान्समध्यें ही लढाई चालली असतां तिकडे **स्कॉटलंड**चा राजा '**चौथा जेम्स**' (James IV) याचें व फ्रेंच राजाचें सख्य असल्यामुळें त्यानें इंग्लंडवर स्वारी केली होती. परंतु '**फ्लॉडेन**' च्या मैदानांत (Flodden Field) '**नॉरफोक**' सरदारानें **स्कॉट** लोकांचा पराभव केला. 'चवथा **जेम्स**' व **स्कॉटलंडां**तील पुष्कळ सरदार या लढाईत ठार झाले.

७ फ्रान्सशीं तह—पुढें इ० स० १५१४ या वर्षी फ्रान्सच्या राजानें **हेन्रीशीं** तह करून त्याला एक लाख 'क्राउन' व **टोर्ने** (Tornay) नांवाचा एक प्रांत देऊन टाकला, आणि **हेन्री**ची बहीण **मेरी** इजबरोबर लग्न केलें. लग्न झाल्यापासून तीन महिन्यांनींच **लुई** मरण पावला. तेव्हां **मेरी**नें इंग्लंडमध्यें येऊन '**सफोक**' नांवाच्या एका सरदाराबरोबर पुनर्विवाह केला.

८ वुल्से (Wolsey)—यापुढें राजाच्या मंत्रिमंडळांत एका मूळच्या गरीब पण बुद्धिमान व हाडाच्या अस्सल इंग्रज गृहस्थाचा प्रवेश झाला व त्यानें एकवीस वर्षेपर्यंत जवळ जवळ मुखत्यारीनें इंग्लंडचा राज्यकारभार चालवून परराष्ट्रीय दरबारांतही मोठा मान मिळविला. या गृहस्थाचें नांव '**वुल्से**' असें असून त्याचा बाप खाटकाचा धंदा करीत असे. इ० स० १४७१ या वर्षी 'इपसिच' (Ipswich) नांवाच्या गांवीं त्याचा जन्म झाला, व **ऑक्सफर्ड** येथें विद्याभ्यास होऊन वयाच्या १४ व्या वर्षीच त्याला बी. ए. ची पदवी मिळाली. कांहीं दिवस सेनापती **डॉरसेट**च्या मुलांना शिकविण्याचें काम केल्यावर हँप (Hamp) जिल्ह्यांतील एका विद्यालयांत 'रेक्टर' (Rector) च्या जागेवर त्याची नेमणूक झाली. पुढें थोड्या दिवसांनीं 'कॅले'च्या धर्माधिकाऱ्याची जागा (Chaplaincy

of Calais) त्याला देण्यांत आली. यानंतर सातव्या **हेन्रीनें** त्याची बुद्धिमत्ता पाहून त्याला '**लिंकन**' (Lincoln) चा ' डीन ' (Dean) केलें. शिवाय त्याला खासगी रीतीनें कांहीं गुप्त कामगिरीबद्दल तो द्रव्यद्वारा मदत करीतच असे.

९ त्याचें वैभव व मान—' आठव्या **हेन्री** ' च्या कारकिर्दीत **फॉक्सनें** त्याचा राजदरबारांत प्रवेश करविला. दरबारी माणसाच्या अंगीं जे गुण असावयाचे ते सर्व '**वुल्से**' च्या अंगीं असून शिवाय तो विद्वानही असल्यामुळें लवकरच राजाची त्याच्यावर मर्जी बसली. राजाला ख्यालीखुशालीची आवड; **वुल्सेही** त्याच्या मताला मान देऊन त्याप्रमाणें वागणारा; तेव्हां लौकरच उभयतांची मैत्री जमून त्याचा राजाच्या मंत्रिमंडळांत शिरकाव झाला, आणि थोड्याच दिवसांत तो राजाचा मुख्य मंत्री बनला. **यॉर्क**चा मुख्य धर्माधिकारी व इंग्लंडचा ' पंडितराव ' (Chancellor) अशीं दोन कामें त्याच्यावर सोंपविण्यांत आलीं. इ० स० १५१५ मध्यें **पोपनेंही** त्याला एक मोठ्या बहुमानाची जागा (Cardinal) ‡ दिली, व पुढें तीन वर्षांनीं तर तो पोपचा इंग्लंडमधील खास प्रतिनिधि (Legate) बनला.

१० अशा रीतीनें इग्लंडच्या राज्यकारभारांतील व देवस्थानच्या कारभारांतील संपूर्ण अधिकार त्याच्या हातीं आले. त्याच्या ऐश्वर्याला सीमा राहिली नाहीं. मोठमोठे सरदार व अमीर–उमराव त्याच्या दारीं लोळण घेऊं लागले. त्याचा, त्याच्या खिजमतगारांचा, व नोकरांचा जरतारी पोषाख व सोन्यारुप्याचे दागिने पाहून लोक आश्चर्यचकित होत. व आपल्याचपैकीं एका खाटकाचा मुलगा इंग्लंडचीं राजकीय व धार्मिक सूत्रें हालवीत आहे हें पाहून हाडाच्या इंग्रजांना मनापासून आनंद वाटे. **वुल्से** विद्येचा मोठा भोक्ता असल्यामुळें कोणीहि विद्यार्थी त्याच्या घरीं गेला असतां विन्मुख होऊन परत येत नसे. न्यायाच्या कामांतहि तो समदृष्टि असे. असो.

११ फ्रान्स आणि स्पेन यांची चुरस—या वेळीं **फ्रान्समध्यें** लुईचा मुलगा पहिला **फ्रान्सिस** (Francis I) हा राज्य करीत होता. त्याच्या मनांतून **इटलीवर** पुन्हां स्वारी करावयाची होती. तेव्हां **हेन्रीचें** आपल्याशीं सख्य असावें म्हणून त्यानें **वुल्सेला** मोठमोठीं बक्षिसें देऊन व खुशामत करून त्याची कृपा संपादन केली. पुढें

‡ **कार्डिनल**–ख्रिस्ती धर्मखात्यांत हा हुद्दा मोठ्या मानाचा असून कार्डिनलच्या संघाला **पोपच्या** म्हणजे रोम येथील मुख्य ख्रिस्ती धर्माध्यक्षाच्या **निवडणुकींत** मत देण्याचा अधिकार असतो.

इ० स० १५१९ या वर्षी जर्मनीचा बादशहा † (Maximilian) मरण पावला. त्याला मुलगा नसल्यामुळें मुलीकडून फ्रान्सचा राजा फ्रान्सिस व स्पेनचा राजा पांचवा चार्लस (Charles V) हे दोघेही जर्मनीच्या गादीवर वारसा सांगूं लागले. या वादांत अखेर चार्लसचा जय होऊन स्पेन, ऑस्ट्रिया, जर्मनी व नेपल्स हे युरोप खंडांतील देश एकट्या चार्लसच्या ताब्यांत आले. शिवाय कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावल्यापासून व त्या वेळीं स्पेनचे लोक दर्यावर्दीपणांत पुढारी असल्यामुळें या ' नवीन जगा ' (New World) वर चार्लसचीच मालकी स्थापन झाली होती, आणि तेथल्या सोन्यारुप्याच्या खाणींतून बाहेर पडलेलें सोनें आणि रुपें स्पेनच्या तिजोरीची भर करीत होतें.

१२ फ्रान्सच्या राजाला या बलाढ्य शेजाऱ्याचा नेहमीं हेवा वाटे. तेव्हां इंग्लंडचें व आपलें सख्य असल्यास आपल्याला स्पेनपासून भीति बाळगावयास नको हें जाणून ' वुल्से'च्या मार्फत हेन्रीला आपला कायमचा दोस्त करावा असें त्यानें ठरविलें. स्पेनचा राजा चार्लस यालाही माहीत होतें कीं, फ्रान्स व इंग्लंड हीं दोन राष्ट्रें एक झालीं तर तीं आपल्याला भारी होतील. तेव्हां तोही इंग्लंडनें फ्रान्सबरोबर सख्य करूं नये अशी खटपट करीत होता. आणि त्या वेळीं इंग्लंडमध्यें वुल्से करील ती पूर्वदिशा अशीच जवळ जवळ स्थिति असल्यामुळें वुल्सेला स्पेनच्या राजाकडूनहि नजर नजराणे व बहुमानाचीं आश्वासनें मिळत होतीं.

१३ वुल्सेची महत्त्वाकांक्षा—यावेळीं सर्व ख्रिस्ती राष्ट्रांत पोपचें महात्म्य फारच वाढलेलें असून वुल्सेला आपण एकदां पोप होऊन त्या गादीवर बसावें अशी

---

†**जर्मन बादशहा**—सोळाव्या शतकाच्या आरंभीं जर्मनीचा बादशहा हा युरोपांतील बऱ्याच मोठ्या भागावर राज्य करीत असे. **बोहिमिया, ब्रॅडेनबर्ग, सॅक्सनी** व **पॅलॅटिनेट** हीं चार संस्थानें त्याच्या मांडलिकत्वाखालीं असून **मेन्झ, कोलन,** व **ट्रायर** येथील धर्मगुरु हेही त्याचे अंकित असत. वरील चार संस्थानांचे अधिपति व हे तीन धर्मगुरू मिळून सात असामींकडून बादशहाची निवडणूक होत असे. व पोपकडून राज्याभिषेक झाल्यावर तो ' बादशहा ' बनत असे. हें बादशाहीपद बहुधा एका ठरीव घराण्यांतील पुरुषांना मिळे. हेन्रीच्या कारकिर्दीत मॅक्झिमिलियन बादशहा मरण पावला. (इ. स. १५१९) तेव्हां त्याला पुरुष संतति नसल्यामुळें फ्रान्स व स्पेन येथील राजांना या बादशाहीची आशा वाटूं लागली.

जबर महत्त्वाकांक्षा होती; आणि युरोपांतील निम्याहून अधिक ख्रिस्ती राष्ट्रांवर या वेळीं स्पेनच्या राजाचा अंमल असल्यामुळें आपली ही महत्त्वाकांक्षा झाली तर चार्लसच्या मदतीनेंच सफल होईल अशी त्याला आशा वाटत असे, आणि म्हणून तो चार्लसच्या मसलती पार पाडण्याच्या कामीं शक्य ती खटपट करीत असे. अशा रीतीनें फ्रान्सिस व चार्लस या दोघांनाही त्यानें आपल्या नादाला लावून ठेवलें होतें.

१४ हेन्रीची फ्रान्सला भेट—इ० स० १५२० मध्यें फ्रान्सिसनें हेन्रीला फ्रान्समध्यें भेटीकरितां बोलवलें. हेन्री आपल्या राणीला व सर्व दरबारी मंडळीला बरोबर घेऊन फ्रान्समध्यें गेला. त्याच्या आदल्याच दिवशीं चार्लस राजाही वुल्सेला भेटून परत स्पेनमध्यें गेला होता. हेन्री फ्रान्समध्यें पोंचल्यावर १४ दिवसपर्यंत इंग्लंडची व फ्रान्सची दरबारी मंडळी एकमेकांना भेटी परत-भेटी देऊन आणि मेजवान्या व नाचतमाशे यांचा थाट उडवून चैन करीत होती. कित्येक सरदारांनीं तर आपला डौल सांभाळण्यासाठीं आपल्या जवळचें होतें नव्हतें तें सर्व विकूनहि टाकलें होतें. इतिहासांत या प्रसंगाला ‘ Field of the Cloth of Gold ’ म्हणजे ‘जरतारी वस्त्रांनीं आच्छादलेली भूमि ’, असें नांव दिलेलें आहे. हेन्रीची व फ्रान्सिसची भेट झाली; पण या भेटींत ‘ तुम्ही खुशाल, आम्ही खुशाल ’ यापेक्षां जास्त कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. परत येतांना हेन्रीनें स्पेनचा राजा चार्लस याचीहि भेट घेतली. त्या वेळीं चार्लसनें वुल्सेला बहुमोल नजराणा देऊन पोपची गादी तुम्हांला मिळवून देण्याचा प्रयत्न करीन असेंहि वचन दिलें, व वुल्सेला आपल्या बाजूला पुरें वळवून घेतलें.

१५ फ्रान्स व स्पेनची लढाई—पुढें दोन वर्षांनीं चार्लस व फ्रान्सिस यांच्यामध्यें युद्ध जुंपलें. तेव्हां चार्लस राजा पुन्हां इंग्लंडमध्यें आला व या भेटींत इंग्लंडनें फ्रान्सबरोबर युद्ध पुकारावें असें ठरून सरे (Surrey) नामक सरदाराला फ्रान्सच्या उत्तर भागावर हल्ला करण्यासाठीं पाठविण्यांत आलें. त्याच्या पुढल्या वर्षीं पुन्हां एका मोठ्या सैन्यानें फ्रान्समध्यें जाऊन जवळ जवळ पारिसपर्यंत पल्ला गांठला. पण एकंदरींत पाहतां या हल्ल्यापासून इंग्लंडला विशेषसा फायदा झाला नाहीं, व द्रव्याची अनुकूलता नसल्यामुळें फ्रान्समध्यें फार दिवस सैन्यहि ठेवतां येईना.

१६ स्कॉटलंडशीं लढाई—इकडे स्कॉटलंडमध्यें स्कॉट लोकांनीं फ्रान्सचे दोस्त म्हणून इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी चालविली. पण त्यांनीं हल्ला करण्याचे

अगोदरच इंग्रज सेना स्कॉटलंडमध्यें घुसली व थोडे दिवस उभय पक्षांची झटापट होऊन त्या वेळचा स्कॉटलंडमधील मुख्य कारभारी '**आल्बनो**' याला इंग्लंडशीं तह करून या सैन्याला माघारें घालवावें लागलें.

१७ पार्लमेंटची बैठक—अशा रीतीनें **स्कॉटलंडचा** बंदोबस्त झाल्यावर **हेन्रीला** पुन्हां फ्रान्सवर हल्ला करण्याला चांगली मोकळीक मिळाली. यावेळीं सैन्याच्या खर्चासाठीं पैसा पाहिजे होता, व राजाची तिजोरी तर रिकामी झाली होती. **पार्लमेंटची** बैठक होऊन सात वर्षें झालीं होतीं. या मुदतींत **हेन्रीला** पैशाची जरूर लागली म्हणजे खुषीची सक्ती (Benevolences) करण्याची मागील वहिवाट पुन्हां सुरू करून त्यानें पैसा जमा केला होता. पण अशा रीतीनें किती दिवस काम भागणार ? अखेर पैसा जमविण्यासाठीं **पार्लमेंटची** बैठक भरविणें जरूर झालें. सभा भरल्यावर **वुल्से** आपल्याबरोबर सरदार, दरकदार, व धर्माधिकारी यांची भली मोठी फौज घेऊन सभागृहांत आला, आणि राजासाठीं आठ लाख पौंड मंजूर करावे असें त्यानें पार्लमेंटच्या सभासदांना सांगितलें. सभेचा अध्यक्ष **सर थॉमस मूर** (Sir Thomas More) यानें **वुल्सेच्या** म्हणण्याला दुजोरा दिला. पण एवढी मोठी रक्कम देण्याला लोकसभा तयार होईना. या विषयावर आपल्यासमक्ष ताबडतोब चर्चा व्हावी असें **वुल्सेनें** सांगितलें. पण 'पैशा'संबंधाच्या बाबींची चर्चा चालू असतां लोकसभेच्या सभासदांशिवाय दुसरा कोणी आंत असतां कामा नये असा नियम असल्यामुळें आतांच्या आतां या विषयाचा निकाल लावतां यावयाचा नाहीं असें त्याला आदरपूर्वक सांगण्यांत आलें. या लोकसभेच्या स्वातंत्र्याचा राजाला राग येऊन त्यानें सात वर्षेंपर्यंत पुन्हां पार्लमेंटची बैठक भरविली नाहीं. आणि पूर्वीप्रमाणें खुषीच्या सक्तीचा सर्रास उपयोग करून जरूर तेव्हां पैसा जमविण्याचा क्रम त्यानें चालू ठेवला. असो.

१८ वुल्सेचा आशाभंग—यानंतर लौकरच **वुल्सेची** व **स्पेनच्या चार्लसची** मैत्री कमी होऊं लागली. आपल्याला **पोपची** गादी मिळावी ही **वुल्सेची** महत्वाकांक्षा होती, व **चार्लसच्या** मदतीनें आपली ही महत्वाकांक्षा सफल होईल या आशेवरच त्यानें चार्लसशीं सख्य जोडलें होतें. पण एकदां इ० स० १५२१ या वर्षी व दुसऱ्यांदा इ० स० १५२३ या वर्षी पोपची गादी त्या त्या वेळच्या गादीवरील पुरुषाच्या स्वर्गप्रयाणानें रिकामी झाली असतां **चार्लसनें वुल्सेला** त्या जागीं नेम-

ण्याची कांहीं खटपट केली नाहीं. तेव्हां **चार्लस**च्या मैत्रीपासून आपल्याला कांहीं एक फायदा नाहीं असें पाहून **स्पेन**शीं झालेला स्नेहसंबंध तोडून आपण पुन्हां **फ्रान्स**शीं सख्य करावें अशाविषयीं त्यानें राजाचें मन वळविलें.

१९ इटलींतील कारस्थान—इ० स० १५२५ या वर्षी इटलीच्या राज्या-संबंधानें **युरोपियन** राष्ट्रांत लढाई होऊन **फ्रान्स**चा राजा **फ्रान्सिस** हा '**पेव्हिया**' (Pavia) च्या लढाईंत पकडला गेला. **हेन्रीनें** स्पेनच्या राजाशीं पूर्वी झालेला तह रद्द करून **फ्रान्सिस**च्या आईबरोबर तह करून **फ्रान्सिस**ला सोडवून आणण्याचें वचन दिलें. त्याप्रमाणें अखेर पुढल्या वर्षी **फ्रान्सिस** फ्रान्समध्यें परत आला. परंतु इ० स० १५२७ या वर्षी पुन्हां **स्पेन**चें व **फ्रान्स**चें इटलींतील कारस्थानाबद्दलच युद्ध जुंपून **स्पेन**च्या सैन्यानें **रोम**वर स्वारी केली. आणि **पोप**ला आपल्या कबजांत घेऊन अटकेंत ठेवलें. तेव्हां **हेन्री** व **फ्रान्सिस** यांनीं पुन्हां नवीन तह करून इटलीमधून **स्पेन**च्या बाद-शाही फौजेला हाकून लावून **पोप**ला मुक्त करण्याचें ठरविलें.

२० धार्मिक क्रांतीचा आरंभ—पण या वेळीं इंग्लंडच्या परराष्ट्रांशीं ज्या लढाया झाल्या त्यांचें वर्णन करण्यापेक्षां खुद्द इंग्लंडमध्येंच ज्या घडामोडी झाल्या त्यांचें विस्तरशः वर्णन करणें हाच या ग्रंथाचा मुख्य विषय असल्यामुळें **हेन्री**च्या परराष्ट्रीय कारस्थानांची हकीकत येथेंच थांबवून इंग्लंडमध्यें या सुमारास धार्मिक बाबतींत जी एक क्रांति घडून येत होती तिचें वर्णन करणें जरूर आहे. या धार्मिक क्रांतीची सुरवात प्रथम जर्मन प्रांतांत होऊन तिच्या लाटा हळू हळू सर्व युरोपखंडभर पसरल्या, आणि त्यांतलीच एक लाट इंग्लंडमध्यें येऊन त्या ठिकाणीं निवळ त्या देशची अशी स्वतंत्र धर्मसंस्था निर्माण झाली. या क्रांतीला जर्मनींत कसा आरंभ झाला व तिचा इंग्लंडमध्यें कसा प्रवेश झाला हें पुढील प्रकरणांत सांगूं.

प्रकरण २९ वें.

खिस्ती सुधारक.

(इ. स. १५१७ इ. स. १५२९)

[१ खिस्ती जगद्गुरु–पोपची सत्ता.—२।३ धर्माधिकाऱ्यांचा मान व योगक्षेम–४ देवस्थानें आणि मठ–उपाध्यायाचें उत्पन्न व मान–५ त्यांची अवनति–६ मुसलमानांचा युरोपखंडांत प्रवेश–ग्रीक व लॅटिन विद्यांची स्थिति–नवे विद्वान–धर्मपुस्तकांचा अर्थ.–७ पुस्तकांची स्वस्ताई–नव्या जुन्यांतील कलह.–८ तेरावें व चौदावें शतक.–९ धार्मिक सुधारणा आणि कायदा–नवीन युग.–१० मार्टिन ल्यूथर–पीटरचें देवालय–स्वर्गद्वारचे पास.–११ ल्यूथरची स्पष्टोक्ति व तिचा परिणाम–बहिष्कारपत्र.–१२ इ. स. १५२९ मधील परिस्थिति.–१३ विक्लिफच्या प्रयत्नांचा परिणाम.–१४ हेन्रीचीं मतें–'धर्मरक्षक' पदवी.]

१ खिस्ती जगद्गुरु—युरोप खंडांत खिस्ती धर्माचा प्रवेश झाल्यावर लवकरच इटली देशांत **रोम** येथें **'खिस्ती जगद्गुरु'** (The Pope)ची गादी स्थापन झाली आणि प्रथम धार्मिक बाबतींत व पुढें पुढें ऐहिक व राजकीय बाबतींतहि पोपची सत्ता अतोनात वाढून '**पोप** म्हणजे साक्षात् ईश्वरांश, त्याची आज्ञा अमान्य करणें अगर त्याच्या शब्दाला मान न देणें म्हणजे आपल्यावर परमेश्वराची अवकृपा ओढवून घेण्यासारखें आहे ' असें मत सर्वत्र प्रसृत झालें हें मागें सांगितलेंच आहे.

२ धर्माधिकाऱ्यांचा मान व योगक्षेम—त्या कालीं सामान्य जनता अक्षरशत्रु (illiterate) असून विद्येची ओळख फक्त धर्माधिकाऱ्यांनाच (Priests) काय ती असे. व या धर्माधिकाऱ्यांची विद्वत्ता झाली तरी धर्मपुस्तक वाचून त्याचा अर्थ सांगणें यापलीकडे फारशी जात नसे. सर्व काळीं व सर्व देशांत ऐहिक ऐश्वर्यापेक्षां पारमार्थिक ऐश्वर्य श्रेष्ठ हें मत सारखेंच प्रचलित असल्याचें दिसून येतें; आणि पारमार्थिक गोष्टींची चर्चा व विचार करून संन्यस्त वृत्तीनें केवळ परोपकार करण्यांत आयुष्य वेंचणाऱ्या विभूतींना सर्व देशांत मान मिळालेला आपण पहातों. पण परमार्थपर विद्वानांना झालें तरी पोट हें असतेंच; व नुसता शाब्दिक मान मिळाल्यानें त्यांची तहानभूक हरून देहयात्रा चालणें शक्य नसल्यामुळें त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था समाजाला करावी लागते. ही त्यांची पोटापाण्याची व्यवस्था लागून

परमार्थपर श्रेष्ठ पुरुषांची परंपरा कायम रहावी व त्यांनीं धर्माच्या बाबतींत लोकांना उपदेश करून संसारांतल्या नाना तऱ्हेच्या काळजांनीं व संकटांनीं त्रस्त झालेल्या लोकांच्या अंतःकरणाला शांत करावें म्हणून धर्माधिकाऱ्यांना द्रव्यरूपानें अगर जमीन जुमल्याच्या रूपानें 'धर्म' करून त्यांची ऐहिक संसारयात्रा सुखकर करण्याची—निदान दुःखकर न होऊं देण्याची—खबरदारी सर्व काळीं व सर्व देशांत समाजानें घेतलेली दिसून येते.

३ पण धर्माधिकाऱ्यांनीं केवळ जीवनयात्रा चालण्यासाठीं द्रव्योपार्जन करणें वेगळें, व द्रव्योपार्जनासाठीं धर्मदीक्षा घेणें वेगळें. पहिल्या स्थितीचें दुसऱ्या स्थितींत रूपांतर झालें म्हणजे धर्मविचार व परोपकार एका बाजूला राहून धर्माधिकाऱ्याचा धंदा हा इतर धंद्यांप्रमाणें एक पैसा मिळविण्याचा, पण प्रतिष्ठित व बिन भांडवली धंदा बनून त्याचें मूळचें शुद्ध स्वरूप नाहींसें होतें. त्यामुळें अर्थातच धर्माधिकाऱ्यांचा मान कमी होऊन समाजांत त्यांचा बोज रहात नाहींसा होतो.

४ **देवस्थानें आणि मठ**—ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांच्या बाबतींतही असेंच झालें. पहिले पहिले ख्रिस्ती 'ब्राह्मण' (Bishop) त्या काळच्या विद्याप्रसाराच्या मानानें विद्वान असून सदाचरणी होते. त्यांची सामान्य जनतेवर चांगली छाप बसून ख्रिस्ती धर्माचा हां हां म्हणतां प्रसार झाला. आणि प्रत्येक देशांत देवस्थान-(The Church)चें म्हणून स्वतंत्र खातें निर्माण होऊन या खात्याला धनिकांकडून पुष्कळ द्रव्य व मोठमोठ्या जमिनी दान मिळून देवळें व मठ अस्तित्वांत आले. प्रत्येक गांवांत एक लहानसें देऊळ (The country church) असावयाचें, त्यांत त्या गांवच्या उपाध्यायानें रहावयाचें, गांवच्या लोकांचे धर्मसंस्कार करावयाचे, व त्यांच्याकडून मिळालेल्या देणग्यांवर चरितार्थ चालवावयाचा अशी पद्धति प्रथम सुरू झाली. हळू हळू या देणग्यांना 'करा'चें रूप आलें व गांवच्या उत्पन्नापैकीं अमुक एक भाग गांवच्या उपाध्यायाला द्यावयाचा अशी रीत चालू झाली. या रीतीला पुढें रूढीचें स्वरूप येऊन रूढीचा कायदा बनला. व गांवच्या उत्पन्नाच्या ठराविक भागावर (The tithe) गांवच्या उपाध्यायाचा हक्क लागू झाला. **रोम** येथील मुख्य जगद्गुरूची संपत्ती तर अतोनात वाढून राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या खात्यांप्रमाणें धर्मव्यवस्थेचींही निरनिराळीं खातीं स्थापन झालीं. व राजाच्या अधिकाऱ्यांप्रमाणें पोपचेही निरनिराळ्या दर्जाचे अधिकारी तयार होऊन स्वतः पोप हा सर्व ख्रिस्ती प्रजेचा 'मायबाप' झाला.

५ उपाध्यायांची अवनति—उपाध्यायांची पोटापाण्याची व्यवस्था बिन-आयासानें होऊं लागल्यावर त्यांना विद्येची जरूरी भासेनाशी झाली, आणि **पोपचें** अधिकारपत्र मिळालें म्हणजे आपल्यांत ईश्वरांश उत्पन्न झाला, मग सर्व लोकांनीं आपल्यास मान दिलाच पाहिजे अशी बुद्धि कांहीं कालानें त्यांच्यांत उत्पन्न झाली. सामान्य प्रजा काय, शुद्ध अडाणी; त्यांना पूर्वसंस्कारानें गांवचा उपाध्या व त्याचा सर्वश्रेष्ठ अधिकारी पोप हा सर्व शक्तिमान् व ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' समर्थ असें वाटून ती त्यांना भिऊन वागूं लागली, व धर्माधिकारी सांगतील तो खरा धर्म अशी स्थिति उत्पन्न झाली. पुढें धर्माधिकाऱ्यांची व विद्येची हळू हळू फारखत झाल्यामुळें धर्मपुस्तकांचा अर्थ त्यांचा त्यांनाच नीट समजेना; त्यामुळें धर्मपुस्तकांत एक असावें व यांनीं भलतेंच सांगावें असा प्रकार होऊन आपलें अज्ञान उघडकीला न येऊं देण्याच्या नाना प्रकारच्या युक्त्या ते योजूं लागले. अशी स्थिति चारपांचशें वर्षें चालली होती.

६ मुसलमानांचा युरोपखंडांत प्रवेश—चौदाव्या शतकांत **मुसलमान** लोकांनीं युरोप खंडांत प्रवेश करून ' **कॉन्स्टँटिनोपल** ' येथें आपल्या धर्माची व राज्याची गादी स्थापन केली. त्या ठिकाणीं जुनी ग्रीक व लॅटिन विद्या शिकलेले बरेच विद्वान होते, त्यांना मुसलमानांनीं हाकून लावल्यामुळें ते युरोपांतील निरनिराळ्या देशांत आश्रयार्थ जाऊन राहिले. या विद्वानांनीं सामान्य जनतेला शिक्षण देऊन त्यांच्यांत विद्येबद्दल अभिरुचि उत्पन्न केली. खिस्ती लोकांचें धर्मपुस्तक '**बायबल**' हें मूळ हिब्रू अगर लॅटिन भाषेंत लिहिलेलें असून तें गांवच्या उपाध्यायानें वाचून दाखवून त्याचा येईल तसा अर्थ सांगावा, त्याचें 'प्राकृत' भाषेंत भाषांतर करणें हें पाप, अशी खिस्ती उपाध्यायांनीं सामान्य जनतेची समजूत करून ठेवली होती; पण या नवीन आलेल्या विद्वानांनीं हिब्रू व लॅटिन भाषा लोकांना शिकवून आपल्या धर्मपुस्तकाचा अर्थ स्वतः करण्याचें साधन त्यांच्या हातीं आणून दिलें. अर्थातच आपले उपाध्ये आपल्याला कांहीं तरी सांगून फसवणूक करितात असें लोकांना हळू हळू कळून येऊं लागलें.

७ पुस्तकांची स्वताई—छापण्याच्या कलेचा शोध लागल्यावर तिच्या प्रसारानें पुस्तकें स्वस्त किंमतींत मिळूं लागलीं व लोकांत ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला. अज्ञानी व स्वार्थी धर्माधिकाऱ्यांना हा ज्ञानाचा प्रसार व्हावयास नको होता. ते या कामीं शक्य ते अडथळे आणूं लागले. देवस्थानच्या अगर धर्मव्यवस्थेच्या बाबतींत जुनें तितकें आहे त्या स्थितींत कायम ठेवण्याची धर्माधिकाऱ्यांची इच्छा, व

नवीन प्राप्त झालेल्या ज्ञानानुरूप अवश्य ती सुधारणा घडवून आणण्याची नव्या विद्वानांची इच्छा, यांचा विरोध येऊन नव्या–जुन्यांत कलह सुरू झाले. केव्हांही झालें तरी एकदां दोन पक्ष उत्पन्न झाले म्हणजे त्या त्या पक्षाच्या अनुयायांतील मूळच्या मतभेदाला पुढें द्वेषाचें स्वरूप येतें, व योग्य वेळीं दोन्ही पक्षांवर सारखी छाप ठेवणारा कोणी पुढारी मिळाला नाहीं म्हणजे त्या दोन पक्षांत पुढें हाडवैर उत्पन्न होतें. युरोप खंडांतील धार्मिक सुधारणेच्या बाबतींतहि हाच प्रकार झाल्याचें दिसून येतें. असो.

८ तेरावें व चौदावें शतक—तेराव्या शतकांत **फ्रान्स** देशांतील दक्षिण बाजूच्या लोकांमध्यें पोपचा अंमल झुगारून देण्याची चळवळ सुरू झाली होती. पण **फ्रान्स**च्या राजानें ती चळवळ सैन्याच्या जोरावर हाणून पाडली. चौदाव्या शतकांत इंग्लंडमध्यें '**विक्लिफ**' यानें धर्मसुधारणा करण्याची खटपट केली, पण त्याला स्वतःला नसले तरी त्याच्या '**लोलर्ड**' अनुयायांना कसे हाल भोगावे लागले हें मागें २२ व्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. या दोन्ही ठिकाणीं व वेळीं धर्मसुधारणा करण्याची ही चळवळ यशस्वी झाली नाहीं, याचें कारण त्या वेळीं लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार झालेला नव्हता हें होय. चाललें आहे हें बरोबर नाहीं असें लोकांना वाटूं लागलें होतें; पण चूक कोठें होते व ती कशी दुरुस्त करावी, याचें ज्ञान त्यांना झालें नव्हतें. छापण्याची कला अस्तित्वांत नसल्यामुळें पुस्तकें स्वस्त झालीं नव्हतीं, व अज्ञानाच्या काळोखांतून ज्ञानाच्या उजेडांत येण्याचा मार्ग त्यांना सांपडला नव्हता.

९ धार्मिक सुधारणा आणि कायदा—ज्या राजांना आपल्या राज्यांत धर्माधिकाऱ्यांचें व त्यांच्या द्वारें परकी **पोप**चें वजन वाढूं नये असें वाटे, ते राजे **कायदे** करून पोपच्या सत्तेला आळा घालण्याचा प्रयत्न करीत. पण **पोप**च्या सत्तेला आळा बसला तरी लोकांत ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय व लोकांचीं मनें नवीन सुधारणेला अनुकूल झाल्याशिवाय कायद्यानें धार्मिक सुधारणा करण्याचा प्रयत्न सिद्धीस जाण्यासारखा नव्हता. छापण्याच्या कलेच्या प्रसाराबरोबर नवीन युगाला आरंभ झाला. व लोक मोठ्या उत्सुकतेनें पुस्तकें विकत घेऊन वाचूं लागले. बायबलचा अभ्यास होऊं लागला. आणि धर्माधिकारी सांगतील तेंच केवळ खरें न मानतां लोकांना स्वतंत्र विचार करण्याची संवय लागली. धार्मिक बाबतींत धर्माधिकाऱ्यांकडून कोठें चुका होतात त्या लोकांना स्पष्ट दिसूं लागल्या. कित्येक उपाध्यायांचें व जोग्यांचें भ्रष्ट वर्तन पाहून लोकांना चीड येऊं लागली; व कोणीतरी धीराचा पुढारी पुढें येऊन धर्माधिकाऱ्यांचा जुलमी व भ्रष्ट कारभार कसा थांबेल याची

लोक चिंता करूं लागले. एकाद्या बाबतींत लोकांच्या मनोभावना तीव्रतम झाल्या म्हणजे परमेश्वर शेवटीं त्यांची इच्छा पुरी करतो असा अनुभव पुष्कळ वेळां येतो. त्याप्रमाणें जर्मनी देशांत इ० स० १५१५ सालीं '**मार्टिन लूथर**' (Martin Luther) नांवाचा पुरुष पुढें येऊन त्यानें **पोप**चा जुलमी अंमल झुगारून देऊन 'सुधारणेचा झेंडा' उभारला !

१० मार्टिन लूथर—लूथर हा जर्मनीमधील **विटेंबर्ग** (Wittenberg) च्या महाविद्यालयांत तत्त्वज्ञान विषयाचा अध्यापक होता. त्या वेळीं **रोम**मध्यें '**लिओ**' (LeoX) नांवाचा इटालियन गृहस्थ पोपच्या गादीवर असून त्यानें तेथें '**पीटर** (St. Peter) नांवाच्या साधूचें देवालय बांधण्याला आरंभ केला होता. या देवळाच्या खर्चासाठीं पैसा पाहिजे होता. तो मिळविण्यासाठीं त्यानें एक युक्ति काढली.* कागदाच्या तुकड्यांवर बायबलमधील कांहीं पवित्र वाक्यें लिहून या कपट्यांची त्यानें किंमत ठरविली, व हीं '**तिकिटें**' (Indulgences) जो कोणी विकत घेईल त्याचीं पापें नाहींशीं होऊन त्याला स्वर्गप्राप्ती होईल असा जाहीरनामा काढून, आणि ख्रिस्ती जोग्यांकडे स्वर्गद्वारीं जाण्याचे हे 'पास' देऊन त्यांची विक्री करण्यासाठीं त्यानें सर्व ख्रिस्ती राष्ट्रांतून त्या जोग्यांना रवाना केलें.

११ लूथरची स्पष्टोक्ति व तिचा परिणाम—'टेझेल' (Tetzel) या नांवाचा एक जोगी हीं तिकिटें घेऊन जर्मनींत आला, तेव्हां **लूथरनें** त्याची फार निर्भर्त्सना केली. "**येशू ख्रिस्तावर** भाव ठेवल्यानेंच (Faith in Christ) पापक्षालन होऊन स्वर्गाचे दरवाजे मोकळे होतात, पैसे घेऊन पापक्षालन करविण्याची रीति मूर्खपणाची व धर्मविरुद्ध आहे." असें त्यानें उघड सांगितलें. याबद्दल जाब देण्यासाठीं देवस्थानच्या अधिकाऱ्यांनीं त्याला आपल्यासमोर येण्याचा हुकूम केला. तेव्हां धार्मिक बाबतींत '**बायबल**' हाच एक अधिकारग्रंथ आहे असें जर्मनींतील शिष्टमंडळापुढें त्यानें साधार प्रतिपादन केलें. पुढें इ० स० १५२० मध्यें **पोप**नें त्याच्यावर बहिष्काराचें अस्त्र सोडलें, तेव्हां हें बहिष्कारपत्र (The Papal bull) त्यानें जाहीर रीतीनें जाळून टाकलें, आणि पोपच्या अन्यायानें पैसा उकळण्याच्या पद्धतीचा तीव्र निषेध करून त्याच्या बहिष्काराला मी काडीचीहि किंमत देत नाहीं असें त्यानें आपल्या वर्तनानें दाखविलें.

* ही युक्ति त्याची स्वतःची नसून त्याच्या पूर्वींच्या **पोपां**नींच ती रूढ केली होती असेंही कित्येकांचें मत आहे.

१२ इ. स. १५२९ मधील परिस्थिति—हळू हळू सर्व उत्तर जर्मनींत त्याच्या मतांचा प्रसार झाला आणि त्याचे अनुयायी हां हां म्हणतां इतके वाढले कीं, त्यांना सर्वांना शिक्षा करणें पृथ्वीवरील कोणत्याही सत्ताधीशाला अशक्य व्हावें ! पोपनें जुन्या धर्मांत ढवळाढवळ करणें हें महत्पाप आहे, सबब कोणीहि धर्माच्या कामीं हात घालूं नये असा वट हुकूम (Proclamation) काढला; पण इ० स० १५२९ या सालीं जर्मनींतील सहा संस्थानिकांनीं व १४ मोठमोठ्या शहरांतील पुढाऱ्यांनीं पोपचा हा वटहुकूम आम्ही पाळींत नाहीं असें जाहीर केलें.

१३ विक्लिफच्या प्रयत्नांचा परिणाम—जर्मनींतील या धार्मिक सुधारणेची लाट लौकरच इंग्लंडमध्यें येऊन पोंचली. ' विक्लिफ ' च्या अनुयायांनीं पूर्वी जी जागृति उत्पन्न केली होती ती कांहीं अगदींच फुकट गेली नव्हती. त्या वेळेपासून लोकांचीं मनें धर्मसंबंधीं बाबतींत साशंक झालीं होतींच; पुढें छापखान्यांचा प्रसार होऊन ' बायबल'चें इंग्रजी भाषेंत भाषांतर झालें, व लोक स्वतः आपलें धर्मपुस्तक वाचून विचार करूं लागले, तेव्हां आत्मिक उन्नतीसाठीं रोमच्या आचार्यांचे शिष्य सांगतील त्यावरच विश्वास ठेविला पाहिजे असें नाहीं, हा विचार बळावत जाऊन जुन्या विचारांच्या ग्रामोपाध्यायांवरचा पुष्कळ लोकांचा विश्वास उडत चालला होता. परकी पोपच्या अधिकाऱ्यांचा जुलूम नकोसा होऊन बरेच लोक त्या धर्माधिकाऱ्यांची फजिती करण्याची वाट पहात होते. पण ' राजा हेन्री ' (Henry VIII) स्वतः जुन्या मताचा असल्यामुळें पोपद्रोह म्हणजे राजद्रोह असें समजलें जाऊन आपला जीव विनाकारण धोक्यांत पडावयाचा तो कशाला पाहून घ्या म्हणून ते स्वस्थ होते.

१४ हेन्रीचीं मतें—हेन्रीनें स्वतः लूथरच्या मतांचें खंडन करणारा एक ग्रंथ लॅटिन भाषेंत लिहिला. त्यानें खूष होऊन पोपनें त्याला 'धर्मरक्षक' (Defender of the Faith) अशी पदवी दिली. पण ज्ञानरवीचा एकदां उदय झाल्यावर लोकांच्या डोळ्यांवरील अज्ञानांधःकाराचें पटल फार वेळ टिकणें शक्य नव्हतें. हेन्रीच्या विरोधाला न जुमानतां हळू हळू पण निश्चितपणें लूथरचीं मतें इंग्लिश लोकांना ग्राह्य होऊन इंग्लंडमध्येंहि सुधारकांचा वर्ग अस्तित्वांत आला आणि जुन्या मतांच्या लोकांचा व त्यांचा बरींच वर्षें झगडा चालला तरी अखेर सुधारकांचाच विजय होऊन इंग्लंडमधून पोपची सत्ता समूळ नष्ट झाली. मात्र पोपनें आठव्या हेन्रीला दिलेली ' धर्मरक्षक ' ही पदवी त्यावेळीं इंग्लंडच्या तक्ताधिपतीला एकदां चिकटली ती अद्यापिहि त्याच्या बिरुदावलींत कायम आहे.

प्रकरण ३० वें.

खासा न्याय !

(इ. स. १५२९ इ. स. १५३७)

[१ हेन्रीचें कुटुंबसौख्य—२।३ कॅथराइन राणी–पोपची पंचाईत. लग्नकमिशन–४ कमिशनरांतील मतभेद–पोपचा डाव–५ हेन्रीची वुल्सेवर गैरमर्जी–६–वुल्सेच्या वैभवाची ओहोटी व त्याचा अंत–त्याचे शेवटचे शब्द–७ हेन्री आणि सुधारक–८ क्रॅनमर–घटस्फोटाची चर्चा–९ क्रॅनमरची रेषा उमटली–पोपच्या सत्तेला प्रतिरोध–इंग्लंडमध्यें पोपपेक्षां राजा श्रेष्ठ–१० पोपचा दुर्बलपणा–११ गुप्त लग्न आणि घटस्फोट–कॅथराइन राणीचा अंत–१२ पोपशीं विरोध–इंग्रज धर्माधिकाऱ्यांचा स्वाभिमान–धार्मिक बाबतींतील राजसत्ता–१३ पोपचे अनुयायी–मठवासी जोगी–१४ इलिझाबेथ बार्टन–१५ थॉमस क्रॉमवेल–मठांची स्थिति–कमिशन–मठबंदी–१६ जोग्यांची दैना आणि उपदेश–सुधारकांविरुद्ध मोहीम–१७ आस्कचें बंड. १८ हेन्रीचें तिसरें लग्न–पुत्रसंतान.]

१ हेन्रीचें कुटुंबसौख्य—हेन्रीचें व **कॅथराइनचें** लग्न होऊन जवळ जवळ १० वर्षें झालीं. या कालांत **कॅथराइनला** बरींच मुलें झालीं. पण एका **'मेरी'** (Mary) नांवाच्या मुलीशिवाय बाकीचीं सगळीं अल्पवयांतच मेलीं. राजाला चाळिशी उलटून गेली तरी पुत्रसंतान नाहीं, त्यामुळें आपल्या मागें गादीची काय व्यवस्था करावी याची त्याला चिंता वाटूं लागली. आपलीं मुलें लहानपणींच मरतात याला कारण 'आपण आपल्या भावाच्या विधवेबरोबर लग्न केलें, त्यामुळें परमेश्वरी कोप तर झाला नसेल ना?' अशीहि शंका मधून मधून त्याच्या मनाला जाचूं लागली. त्यांतच **ॲन बोलीन** (Anne Boleyn) नांवाची एक राणीची दासी होती तिच्यावर हेन्रीची नजर जाऊन पुढें तिच्यावर त्याचें प्रेमही बसलें. तेव्हां **कॅथराइन** राणीशीं धर्मशास्त्राप्रमाणें घटस्फोट करून '**ॲन बोलीन**'शीं लग्न करावें असें त्याच्या मनानें ठरविलें.

२ कॅथराइन राणी—पण **कॅथराइनशीं** घटस्फोट करून घेणें हें काम सोपें नव्हतें. ती राणी मोठी सद्गुणी असून विदुषी होती. तिचें आपल्या नवऱ्यावर अतिशय प्रेम होतें. शिवाय तिचा पुतण्या **स्पेनच्या** गादीवर असून **रोमचा** पोप (Pope-

Clement) यावेळीं त्याच्या अटकेंत होता. हेन्रीनें घटस्फोटाला संमती देण्याविषयीं पोपकडे अर्ज केला, तेव्हां पोपला मोठी पंचाईत पडली (placed between the hammer & the forge). संमती द्यावी तर आपण आज ज्याच्या ताब्यांत आहों त्या स्पेनच्या राजाला राग येणार, न द्यावी तर हेन्री आपल्याला मुक्त करण्याची खटपट करीत आहे त्याला राग येऊन तो आपली बाजू सोडून देणार. शेवटीं बरेच दिवस विचार करून त्यानें इ० स० १५२९ या वर्षीं इंग्लंडमधील पोपचा प्रतिनिधि वुल्से व इटलींतील दुसरा एक धर्माधिकारी 'कांपेजिओ' (Cardinal Campeggio) या दोघांना या बाबतींतले न्यायाधीश नेमून त्यांनीं लंडन येथें आपली कचेरी भरवून हेन्रीचें व कॅथराइन राणीचें पूर्वीं झालेलें लग्न कायदेशीर होतें कीं काय या प्रश्नाचा निर्णय करावा असें ठरविलें.

३ त्याप्रमाणें या दोघां न्यायाधिशांनीं राजा–राणीला चौकशीसाठीं आपल्या धर्मकचेरींत पाचारण केलें. दोघांचीं नांवें पुकारलीं, तेव्हां राजा चौकशी करविण्यास कबूल झाला. पण कॅथराइन राणीचें नांव पुकारतांच तिनें नवऱ्याच्या पायांवर घालून घेतलें (knelt at the feet of her husband) आणि आपल्या लग्नाबद्दल विनाकारण संशय उपस्थित करूं नका म्हणून त्याची मोठ्या केविलवाण्या स्वरानें प्रार्थना केली. परंतु राजाचें मन द्रवेना; तेव्हां अखेरीस आपल्या लग्नाबद्दलची चौकशी करण्याचा या न्यायाधिशांना अधिकार नाहीं असें सांगून राणी निराशेनें कचेरींतून चालती झाली.

४ **कमिशनरांतील मतभेद**—पुढें दोन महिनेपर्यंत या चौकशीचें काम एकतर्फीच चाललें होतें. वुल्सेच्या मनांतून राजाच्या मनाप्रमाणें वागून त्याचें भावाच्या विधवेबरोबर झालेलें लग्न कायदेशीर नाहीं असा निकाल द्यावा असें होतें. पण दुसरा न्यायाधीश पोपच्या अनुरोधानें वागणारा असून स्वतः पोप आपल्याला हेन्रीपासून जास्त फायदा होईल कीं स्पेनच्या चार्लसपासून जास्त फायदा होईल याचा विचार करून त्याप्रमाणें या लग्नप्रकरणाचा निकाल लावावा म्हणून दिवसगत करीत होता. शेवटीं तिकडे स्पेनच्या राजाचीच सरशी आहे असें आढळून आल्यावर त्यानें हा खटला 'वर्ग' (transfer) करून रोममध्यें आपल्याकडे पाठवावा असा इंग्लंडमध्यें हुकूम पाठविला.

५ **हेन्रीची वुल्सेवर गैरमर्जी**—हेन्रीला मोठी आशा होती कीं, वुल्से यांत असल्यामुळें आपल्यासारखा निकाल होणार. पण आतां वुल्सेनें आपलें काम नीट बजावलें नाहीं असें वाटून त्याला त्याचा राग आला. इंग्लिश राष्ट्रालाहि आपल्या राजा–राणीच्या लग्नाचें प्रकरण परकी पोपच्या कचेरींत चालून धर्मसंबंधीं बाबतींत कां होईना पण इंग्लंडच्या राजाला परकी पोपचें अंकित व्हावें लागावें याबद्दल अत्यंत त्वेष आला. व वुल्से हा पोपचा इंग्लंडमधील प्रतिनिधी असल्यामुळें राजावर पोपचें वर्चस्व स्थापण्याच्या कामीं वुल्सेच पोपला सामील आहे असा संशय येऊन इंग्लंडचा राजा व प्रजा या दोघांनींही या सर्व अपेशाचें खापर वुल्सेच्या डोक्यावर फोडलें ! आधीं पोपच्या अधिकाऱ्यांनीं लंडनमध्यें बसून आपल्या कचेरींत राजाला चौकशीकरितां बोलवावा हीच गोष्ट लोकांना पसंत नव्हती. आणि त्यांत आतां पोपनें मध्येंच अरेरावी करून खटला आपल्याकडे मागवून घेतला व अशा रीतीनें इंग्लंडच्या राजाचा व इंग्लिश राष्ट्राचाही एकप्रकारें अपमान केला या गोष्टीनें फारच चिडून जाऊन वुल्सेला तावडतोब कामावरून दूर करावा म्हणून लोकांनीं ओरड चालविली. राजालाही आतां तो नकोसा वाटूं लागला होताच. तेव्हां त्याच्याकडे मुख्य प्रधानाचें जें काम होतें तें राजानें तावडतोब काढून घेतलें.

६ **वुल्सेच्या वैभवाची ओहोटी**—वुल्सेच्या वैभवाला आतां ओहोटी लागली. ' नदीनांच नखीनांच शृंगीणां शस्त्रपाणिनाम् । विश्वासो नैव कर्तव्यो स्त्रीषु राजकुलेषु च ॥ ' या वृद्धवचनांतील ' राजकुलेषु ' या वचनापुरता वुल्सेला अनुभव येऊं लागला. त्यानें लंडनमध्यें आपल्याला राहण्यासाठीं वाडा बांधला होता, त्यांतून निघून जाण्याविषयीं त्याला हुकूम झाला. त्याची जिनगी जप्त करण्यांत आली. (forfeiture of goods) आणि **ईशर** (Esher) नांवाच्या खेड्यांत जाऊन रहा अशी त्याला सूचना मिळाली. त्याचे शत्रु वाट पहात होतेच; त्यांनीं आतां उचल खाल्ली; आणि त्याच्या विरुद्ध निरनिराळे आरोप आणून त्याच्या अधःपाताची तयारी केली. पार्लमेंट सभेची बैठक भरून (The Reformation Parliament) तींत कोणाहि धर्माधिकाऱ्यानें इंग्लंडमध्यें पोपचें प्राबल्य वाढविण्याचा प्रयत्न करूं नये म्हणून पूर्वीं एक कायदा झाला होता (Statute of Proemunire) त्याचें वुल्सेनें उल्लंघन केलें म्हणून त्याच्यावर आरोप ठेवून त्याला दंडाची व कैदेची शिक्षा फर्मावण्यांत आली. पण हेन्रीनें पुढें मेहरबानीनें त्याला ही शिक्षा माफ केली, व यॉर्क येथील त्याच्या पूर्वीच्या धर्माधिकाऱ्याच्या

जागेवर जाण्याची त्याला मोकळीक दिली. पुढल्या वर्षी त्याच्या शत्रूंनीं त्याचा पिच्छा पुरविण्याचा निश्चयच केला. एकाएकीं राजद्रोहाच्या आरोपावरून त्याला पकडण्यांत आलें. त्याची प्रकृती आतां अगदीं क्षीण झाली होती. चौकशीसाठीं लंडनला आणीत असतां वाटेंत त्याला अतिसाराचा उपद्रव होऊन '**लिसेस्टर**'च्या देवळांत (Leicester Abbey) त्याचा अंत झाला. त्याचे अंतकाळचे शब्द असे होतेः—" मी माझ्या राजाची जितक्या एकनिष्ठपणें सेवा केली, तितक्या एकनिष्ठपणानें जर देवाची सेवा केली असती तर माझ्या देवानें मला म्हातारपणीं असा खचित टाकला नसता." (Had I but served my God as diligently as I have served my king, He would not have given me over in my grey hairs) असो.

७ हेन्री आणि सुधारक—**हेन्री**ला मनांतून **पो**पचा जरी फार राग आला होता, तरी या वेळीं तो त्याच्याशीं उघडपणें भांडण्यास तयार नव्हता. कारण ज्या '**सु**धारकांना' पोपचा अंमल झुगारून द्यावा असें वाटत असे, त्यांची मतें त्याला मान्य नव्हतीं; व आपण पोपचा उघडपणें द्वेष करूं लागलों तर सुधारक पक्षाला जोर येईल हें तो समजून होता. शिवाय युरोप खंडांत थोड्याच दिवसांत **स्पेन**च्या राजाचें वर्चस्व कमी होऊन **पो**प आपल्या म्हणण्याला कबूल होईल अशीहि त्याला आशा वाटत होती.

८ क्रॅनमर (Cranmer)—एक दिवस **केंब्रिज** (Cambridge)मधील '**डॉ. क्रॅनमर**' या नांवाचा एक 'प्रोफेसर' आणि '**गार्डिनर**' (Gardiner) व '**फॉक्स**' (Fox) असे **हेन्री**चे दोन अधिकारी एकत्र बोलत बसले असतां '**कॅथराइन**' राणीच्या घटस्फोटा (Divorce) चा विषय निघाला. **क्रॅनमर** म्हणाला, " भावाच्या विधवेशीं लग्न करणें कायदेशीर आहे कीं काय हा प्रश्न युरोप खंडांतील निरनिराळ्या विद्वन्मंडळापुढें (The Universities) मांडून त्यांची मतें मागवावीं " ही **क्रॅनमर** याची सूचना त्या अधिकाऱ्यांपैकीं एकानें **हेन्री**च्या कानावर घातली. तेव्हां राजाला फार आनंद होऊन त्यानें **क्रॅनमर**ला बोलावून आणलें, आणि त्याच्या सल्ल्याप्रमाणें युरोप खंडांतील विद्वन्मंडळांपुढें (Universities) हा विषय मांडण्यांत आला. व त्यांपैकीं बहुतेकांनीं राजाच्या तर्फे निकाल दिला.

९ क्रॅनमरची रेषा उमटली—आतां क्रॅनमरची रेषा उमटली. इ० स० १५३३ या वर्षी **हेन्री**नें त्याला '**कॅन्टरबरी**'च्या मुख्य आचार्याची जागा दिली. व

थोड्याच दिवसांनीं पोपनेंही त्याची नेमणूक मान्य केली. दरम्यान इंग्लंडमध्यें सुधारकांच्या मतांचा प्रसार वाढत चाललाच होता. शिवाय ज्यांना सुधारकांचीं धर्मसंबंधीं इतर मतें मान्य नव्हतीं, ते झाले तरी इंग्लंडमध्यें परकी पोपचा अप्रतिबंध अंमल चालूं देण्याला राजी नव्हतेच. मागील राजांच्या कारकिर्दींतून पोपनें इंग्लंडच्या देवस्थानांच्या बाबतींत वाजवीपेक्षां जास्त ढवळाढवळ करूं नये अशाबद्दल बरेच कायदे झालेले होते. व अशा एका कायद्याचा आधार घेऊनच वुल्सेला कामावरून दूर करण्यांत आलें होतें. या जुन्या कायद्यांचा आतां जारीनें अंमल चालू होऊन वुल्सेच्या मताला ज्यांनीं ज्यांनीं मान दिला होता, त्या त्या धर्माधिकाऱ्यांना शिक्षा होऊं लागल्या; पण पुढें हेन्रीनें या धर्माधिकाऱ्यांना माफी देऊन त्यांच्याकडून सुमारें एक लाख पौंड दंडादाखल घेतले. आणि यापुढें इंग्लंडमध्यें राजसत्तेपेक्षां पोपची सत्ता श्रेष्ठ आहे अशी कोणाला भ्रांति राहूं नये म्हणून इ० स० १५३३ या वर्षीं इंग्लंडमधील धर्माधिकाऱ्यांच्या सभेकडून "इंग्लंडचा राजा हा इंग्लंडमधील ख्रिस्ती देवस्थानांचा व धर्माधिकाऱ्यांचा पूर्ण अधिपति (Supreme Head of the English Church) आहे" असें कबूल करून घेतलें.

१० पोपचा दुर्बलपणा—धर्माधिकाऱ्याची एखाद्या जागीं नेमणूक झाल्यावर त्या जागेचें पहिल्या वर्षाचें जें उत्पन्न येई, तें पोपला द्यावयाचें असा पूर्वींपासून प्रघात चालत होता. इ. स. १५३२ मध्यें हें प्रथम वार्षिक उत्पन्न (First-fruits) पोपला देऊं नये असा पार्लमेंटनें ठराव केला. पुढल्या वर्षीं आणखी एक ठराव करून 'धर्मसंबंधीं बाबतींत राजाच्या हुकुमावर पोपकडे अपील (Appeal to Rome) होऊं नये, राजाचा ठराव हाच अखेरचा ठराव,' असा कायदा करण्यांत आला. पोपच्या विरुद्ध हे कायदे करण्यांत हेन्रीचा उद्देश असा होता कीं, 'घटस्फोटा' च्या बाबतींत पोपनें आपल्या बाजूला वळून आपल्यासारखा निकाल द्यावा. परंतु पोपच्या मनांतून जरी इंग्लंडमधील आपलें वर्चस्व कायम ठेवण्याकरितां हेन्रीतर्फें निकाल द्यावा असें होतें, तरी स्पेनच्या चार्लस बादशहाला दुखविण्याचें धैर्य त्याला होत नसे.

११ गुप्तलग्न आणि घटस्फोट—अखेर पोपकडून आपल्याला संमति मिळेपर्यंत वाट पहाण्यांत अर्थ नाहीं असें ठरवून हेन्रीनें इ० स० १५३३ या वर्षीं आपलें प्रेमपात्र '**ॲन बोलिन**' इजबरोबर गुप्तपणें लग्न केलें, आणि लगेच कँटरबरीचा मुख्य आचार्य '**क्रॅनमर**' यानें आपली धर्मकचेरी भरवून हेन्रीचा कॅथराइनबरोबर पूर्वीं झालेला विवाह अशास्त्र सबब रद्द आहे असा ठराव केला

(annulled the marriage). पुढें लौकरच ' अॅन बोलिन ' ला राज्ञीपदाचा अभिषेकही करण्यांत आला. कॅथराइन राणी दुःखानें व संतापानें व्याप्त होऊन गेली. इ. स. १५३६ या वर्षी ' किंबोल्टन ' (Kimbolton) येथें तिचा अंत झाला.

१२ पोपशीं विरोध—हेन्रीनें आपल्या संमतीशिवाय ' बोलिन'शीं लग्न केलें ही बातमी ऐकल्याबरोबर **पोपनें हेन्रीला** बहिष्कार घालण्याचा धाक घातला. पण आपल्या राजाला परकी **पोप** बहिष्काराची भीति दाखवितो हें पाहून इंग्लिश राष्ट्र खवळून गेलें. इंग्लंडमधील सर्व धर्माधिकाऱ्यांची सभा भरली, व त्यांनीं असें जाहीर केलें कीं, ' ह्या इंग्रजांच्या राज्यांत धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करण्याचा रोमच्या आचार्याला अधिकार नाहीं. ' अशा रीतीनें इंग्लंडच्या देवस्थानांतून **पोपचा** अंमल नाहींसा झाला. पुढें असा प्रश्न उपस्थित झाला कीं, पोपची सत्ता गेली तर आतां इंग्लिश देवस्थानावरील अखेरचा सर्वाधिकार कोणाच्या हातांत असावा ? या प्रश्नाचा निकाल इ. स. १५३४ मध्यें **पार्लमेंटनें** असा केला कीं, ' इंग्लंडच्या देवस्थानावरचा या भूतलावरील सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणजे इंग्लंडचा तक्ताधिपति हाच होय. '

१३ पोपचे अनुयायी.—याप्रमाणें इंग्लंडचें धर्मखातें पोपच्या जाचांतून मुक्त झालें. पण त्यामुळें ख्रिस्ती सुधारकांचा जय झाला असें मात्र नाहीं. कारण देवस्थानचा सर्वश्रेष्ठ अधिकार **पोपकडून** राजाकडे आला तरी धर्माधिकाऱ्यांच्या धार्मिक बाबतींतील मतांत म्हणण्यासारखा फरक झाला नव्हता. स्वतः **हेन्री** आपल्याला सुधारकांचा शत्रु समजण्यांत भूषण मानीत असे. व सुधारकांचीं मतें चुकीचीं असून जुनीं मतेंच बरोबर आहेत अशी त्याची समजूत होती. तथापि धार्मिक बाबतींतील अखेरची सत्ता वास्तविक **पोपची** असून ती राजानें पोपला धाब्यावर बसवून आपल्याकडे घ्यावी ही गोष्टही पुष्कळांना नापसंत होती. **पोपचे** कट्टे अनुयायी होते ते त्या सत्तेची फिरवाफिरव करणाऱ्या कायद्याला मान देईनात. मठवासी जोगी हे तर पोपची सत्ता पूर्वीप्रमाणें अबाधित राहिली पाहिजे असें म्हणण्यांत अग्रगण्य होते.

१४ इलिझाबेथ बार्टन (Elizabeth Barton)—केंट जिल्ह्यांत ' **इलिझाबेथ बार्टन** ' या नांवाची एक मुलगी होती. तिच्या अंगांत ' वारें ' येत असे व त्या स्थितींत असतां ती कांहींतरी चमत्कारिक शब्द बोले. धर्मवेड्या लोकांनीं तिला ईश्वराचा प्रसाद झाला आहे व ती मोठी भविष्यवादी आहे असा पुकारा केला. कित्येक ग्रामोपाध्यांनीं पोपची सत्ता पुन्हां प्रस्थापित करण्यासाठीं या पोरीचा उपयोग

करून घेण्याचा बेत करून 'सुधारकांचीं मतें खोटीं आहेत, पोपचा अपमान झाला तर इंग्लंडवर परमेश्वराचा कोप झाल्याशिवाय राहणार नाहीं. राजानें 'ॲन बोलिन'-बरोबर लग्न केलें हें फार वाईट झालें' वगैरे गोष्टी तिला म्हणायला शिकवून लोकांत पोपचें महात्म्य वाढविलें. प्रथम प्रथम हेन्रीनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पण मठवासी जोगी व पोपचे पक्षपाती उपाध्ये या मुलीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून गुप्त कट करण्याच्या तजविजीस लागले आहेत असें समजल्यावर या मुलीला पकडून तिला व तिच्या मदतनिसांना ठार मारण्यांत आलें.

१५ थॉमस क्रॉमवेल (Thomas Cromwell)—या वेळीं राजाचा मुख्य सल्लागार '**थॉमस क्रॉमवेल**' या नांवाचा एक हुषार कायदेपंडित गृहस्थ होता. इंग्लंडचें देवस्थान पोपच्या अंमलांतून मुक्त केल्यावर देवस्थानच्या व्यवहारावर देखरेख ठेवण्याचें काम या गृहस्थाकडे सोंपविण्यांत आलें. या वेळीं जोग्यांच्या मठांतून फार अव्यवस्था व अनाचार माजला होता. पोपची सत्ता पुन्हां प्रस्थापित करण्याचीं कारस्थानेंही या मठांतूनच चालत असत. **क्रॉमवेल**नें हे सर्व मठ बंद करून (Suppression of monasteries) मठांची मिळकत जप्त करण्याची राजाला सूचना केली. मठांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशननें पुष्कळ मठांतील घाणेरडीं कृत्यें (iniquities) उघडकीस आणलीं. तेव्हां इ० स० १५३६ या वर्षी **पार्लमेंट**नें कायदा करून सर्व मठ बंद करविले; व त्यांचें वार्षिक उत्पन्न सुमारें दोन लाख पौंड होत असे, त्याचा उपयोग कित्येक नवीन धर्माधिकाऱ्यांच्या जागा (new bishoprics) निर्माण करून तिकडे व्हावा असें ठरविलें. तसेंच कित्येक नवीन दवाखाने व शाळा सुरू करून त्यांच्या खर्चाचीहि या उत्पन्नांतूनच सोय लावण्यांत आली. पण त्यांतल्या त्यांत राजानें या उत्पन्नांपैकीं बराचसा भाग आपल्या आवडत्या दरबाऱ्यांना (new aristocracy) मिळवून देऊन आपली सत्ता दृढतर करून घेतलीच.

१६ जोग्यांची दैना आणि उपदेशः—जोग्यांचे मठ बंद झाल्यामुळें राज्यांत मोठी खळबळ उडाली. मठांतून हांकलून लावलेले जोगी निराश्रित होऊन खेड्यापाड्यांतून फिरूं लागले, व 'आमची आज अशी दशा झाली, उद्यां तुमच्या देवळांच्या मिळकतीवरही गदा येणार आणि थोड्याच दिवसांत आपल्या जुन्या धर्माचा उच्छेद होणार' असें लोकांना सांगून त्यांनीं जिकडे तिकडे तीव्र असंतोष उत्पन्न केला. त्यामुळें यापुढें धार्मिक

बाबतींत जास्त सुधारणा करूं द्यावयाची नाहीं असा निश्चय करून जरूर तर सुधारकांविरुद्ध हातांत शस्त्र धारण करावयाला पुष्कळ धर्माधिकारी व जोगी तयार झाले.

१७ आस्कचें बंड—' यॉर्क ' जिल्ह्यांतील ' **आस्क** ' (Aske) नांवाचा एक गृहस्थ या लोकांचा पुढारी झाला. चाळीस हजार लोकांनिशीं चाल करून इंग्लंडच्या उत्तरेकडील ' **यॉर्क** ', ' हल ' (Hull) वगैरे प्रमुख शहरें त्यानें काबीज केलीं. ' **यॉर्क** 'चा मुख्य धर्माधिकारी व इतर कित्येक बडे बडे सरदार त्याला मिळाले. लंडनमध्यें शिरून राजाच्या इलकट सल्लागारांना घालवून द्यावयाचें, पोपची धार्मिक सत्ता पुन्हां स्थापित करावयाची, व एकंदरींत धर्मलंडपणा माजलेला आहे तो मोडून टाकावयाचा, अशा उद्देशानें पुष्कळ पुराणमताभिमानी ही एक महायात्रा (Pilgrimage of Grace) आहे असें समजून या बंडांत सामील झाले. अंगांत लांब लांब कफन्या घातलेले पाद्री हातांत क्रॉस व ख्रिस्ती बायबलांतले मंत्र वर लिहिलेलीं निशाणें घेऊन सर्वांच्या पुढें चालले, व हें सर्व सैन्य लंडनवर चाल करून आलें. पण राजाच्या सैन्यानें त्याचा पराभव करून ' **आस्क** ' व इतर पुढारी यांना कैद करून फांशीं दिलें. अशा रीतीनें पोपची सत्ता पुन्हां स्थापन करण्याचा हा प्रयत्न फुकट गेला.

१८ हेन्रीचें तिसरें लग्न—हेन्रीचें ' ॲन बोलिन'शीं लग्न होऊन तीन वर्षें झालीं. तिला '**इलिझाबेथ**' या नांवाची एक मुलगी झाली, पण मुलगा होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां राजाची तिजवरील प्रीति हळू हळू कमी होऊं लागली. त्यांतच **जेन सेमूर** (Jane Seymour) म्हणून राणीची एक सुस्वरूप दासी होती तिच्यावर हेन्रीचें मन बसलें. ' बोलिन'च्या शत्रूंनीं ही संधी पाहून राजाकडे तिजविरुद्ध कुभांडें रचण्याला सुरवात केली. शेवटीं राजाला तिच्या पातिव्रत्याबद्दल संशय येऊन तिची लंडनच्या किल्ल्यांत रवानगी झाली, व पुढें उघडपणें तिच्यावर पातिव्रत्यभंगाचा आरोप (Unfaithfulness to husband) ठेवून तिला मरणाची शिक्षा देण्यांत आली. एका ' **क्रॅनमर** 'शिवाय तिच्या तर्फेनें बोलण्याला कोणीच पुढें आला नाहीं. इ० स० १५३६ च्या मे महिन्यांत या दुर्दैवी राणीचा शिरच्छेद करण्यांत आला, दुसऱ्याच दिवशीं राजानें जेन सेमूरशीं लग्न लाविलें, आणि पार्लमेंटनें राजाचें ॲन बोलिनशीं झालेलें लग्न रद्द ठरवून तिच्या मुलीवर अनौरसत्वाचा छाप मारला ! पुढल्या वर्षी ' जेन सेमूरला ' मुलगा झाला, पण राजा पुत्रोत्सवाच्या आनंदांत मग्न आहे तोंच बाराव्या दिवशीं ' **जेन** ' राणी हा लोक सोडून गेल्यामुळें राजाचा फार विरस झाला.

प्रकरण ३१ वें.

धर्म कीं राजकारण ?

(इ. स. १५३७-इ. स. १५४७).

[१ नवीं मतें.-२ बायबलचें इंग्रजी भाषांतर.-३ राजपुरस्कार.-४ मतभेद आणि तंटे.-इ. स. १५४३ तील कायदा.-५ हेन्रीचा सुधारकांना विरोध-धार्मिक पक्षाभिमानाचा परिणाम.-६ रोमवादी आणि आंग्लवादी-सुधारकांतील नेमस्त व जहालपक्ष.-७ इ. स. १५३९ मधील कायदा-विचार व आचार स्वातंत्र्य अमान्य.-८ हेन्रीचा अनियंत्रित अधिकार.-९ क्रॉमवेलचें कारस्थान-हेन्रीचें चौथें लग्न.-१० क्रॉमवेलची उतरती कळा आणि अंत.-११रोमवाद्यांची उचल.-१२ हेन्रीचें पांचवें लग्न.-१३ त्याचें सहावें लग्न.-१४ इ. स. १५४४ चा कायदा-प्रार्थनापुस्तक.-१५ स्कॉटलंडशीं युद्ध.-१६ स्कॉटलंड आणि फ्रान्स-फ्रान्सशीं युद्ध-तह.-१७ तुल्यारिमित्र-संधि.-१८ पोपवाद्यांचा कट.-१९ हेन्रीचा अंत-त्याचें मृत्युपत्र.-२० हेन्रीचा स्वभाव-लोकसभेचें वाढतें महत्त्व-हेन्रीच्या कारकिर्दीतील विशेष गोष्टी.]

१ नवीं मतें—या वेळेच्या सुमारास ख्रिस्ती सुधारकांचीं नवीन मतें इंग्लंडमध्यें मूळ धरूं लागलीं होतीं, व त्याबरोबरच जुन्या विचारांचे सरकारी अधिकारी नवीन मतानुयायांना त्यांच्या धर्मलंडपणाबद्दल दोष देऊन त्यांचा छळ करूं लागले होते.

२ बायबलचें इंग्रजी भाषांतर-ख्रिस्ती धर्मग्रंथ '**बायबल**' (the Bible) याचे जुना करार (Old Testament) व नवा करार (New Testament) असे दोन भाग असून, तो ग्रंथ पूर्वी लॅटिन भाषेंत लिहिलेला असे. इ० स० १५२६ या वर्षी 'वुइल्यम **टिंडाल**' (William Tyndale) नांवाच्या एका गृहस्थानें बेलज्यम देशांत अँटवर्प (Antwerp) येथें 'नव्या करारा'चें इंग्रजींत भाषांतर करून प्रसिद्ध केलें व पुढें चार वर्षांनीं 'जुन्या करारा'चेंहि इंग्रजी भाषांतर त्यानें प्रसिद्ध केलें. या पवित्र ग्रंथाचा (the Scriptures) अर्थ करूं नये अशी धर्माधिकाऱ्यांची आज्ञा असतां ती मोडून '**टिंडाल**'नें त्या ग्रंथाची पवित्रता बुडविली म्हणून इ० स० १५३६ मध्यें त्याला जिवंत जाळण्यांत आलें. पण त्याच वर्षी '**कव्हरडेल**' (Coverdale) नांवाच्या दुसऱ्या एका गृहस्थानें संपूर्ण बायबलचें भाषांतर करून तें स्वस्त किंमतीस देऊं केलें. इंग्लंडमधून पोपच्या सत्तेचें उच्चाटन झाल्यावर कँटरबरीचा मुख्य धर्माधिकारी क्रॅनमर यानें कव्हरडेलनें प्रसिद्ध केलेल्या बायबलचा खेड्यापाड्यांतूनहि प्रसार करविला. पुढील

तीन चार वर्षांत आणखी दोन तीन गृहस्थांनीं या पवित्र ग्रंथाचें आपापल्या मताप्रमाणें विवरण करणारे टीकाग्रंथही प्रसिद्ध केले.

३ राजपुरस्कार—पुढें राजाच्या हुकुमानें प्रत्येक देवळांत क्व्हरडेलच्या बायबलची एकेक प्रत देवळांतील वेदीकडे खांबाला सांखळदंडानें बांधून ठेवण्यांत आली. हेतु हा कीं, सर्वांना या धर्मपुस्तकाचें दर्शन घडावें. तरुण विद्यार्थी तर आतां या ग्रंथाचीं पारायणें करूं लागलेच, पण कित्येक म्हातारे-कोतारे सुद्धां स्वतःला या पवित्र ग्रंथांतील तत्त्वांचा आस्वाद घेतां यावा म्हणून लिहावाचावयास शिकले.

४ मतभेद आणि तंटे—अशा रीतीनें धर्मग्रंथाचा अभ्यास वाढल्यावर त्यांतील तत्त्वांसंबंधानें वादविवाद होऊं लागले, आणि पुष्कळ वेळां या वादविवादापासून तत्त्वबोध व्हावयाचा तो एकीकडे राहून कलहप्रिय लोकांची एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून मारामारी करण्यापर्यंत मात्र मजल पोंचूं लागली. तेव्हां अडाणी लोकांनीं निष्कारण वादांत पडून एकमेकांचीं डोकीं फोडूं नये म्हणून इ० स० १५४३ त कायदा करून ‘ शूद्रां ’(The Vulgar)ना बायबल वाचण्याचा अधिकार नाहीं असें ठरविण्यांत आलें.

५ हेन्रीचा सुधारकांना विरोध—बायबलचें इंग्रजींत भाषांतर होऊन त्याचा आपल्या प्रजेमध्यें प्रसार व्हावा अशा मताचा स्वतः **हेन्री** होता. तरी पण त्याची मजल सुधारकांचीं सर्व मतें ग्रहण करण्यापर्यंत पोंचली नव्हती. इंग्लंडमधील देवस्थानाला परकी पोपच्या अंमलांतून त्यानें मुक्त केलें खरें, पण नवीन सुधारकी मतांचा प्रवेश आपल्या राज्यांतील देवळांतून व्हावा हें त्यास इष्ट वाटत नसे. पण एकदां ज्ञानप्रसाराला सुरवात झाल्यावर अंधविश्वास नाहींसा होऊन त्याची जागा विचारानें घेतली म्हणजे हें विचारस्वातंत्र्य दडपून टाकण्याचा प्रयत्न यशस्वी होणें शक्य नसतें. आपल्या राज्यांतील धर्मखात्यावर पोपचा अंमल चालूं नये असें ज्याप्रमाणें **हेन्रीला** वाटत असे, त्याचप्रमाणें आपल्या मनाला शुद्ध वाटेल तसें वर्तन करण्याला आपल्याला पूर्ण मोकळीक असलीच पाहिजे असें इंग्रज प्रजेलाही आतां वाटूं लागलें होतें. अर्थात याचा एक स्वाभाविक परिणाम म्हणून पुढें नाना ऋषींचीं नाना मतें होऊन धार्मिक बाबतींत राष्ट्रांत तट उत्पन्न झाले, आणि अखेर मूळ मुद्दा एका बाजूला राहून आपल्या पक्षाला कोणत्या उपायानें यश येईल याचीच चर्चा जारीनें होऊं लागली. पुढें या धार्मिक पक्षाभिमानाला राजकीय पक्षाभिमानाची जोड मिळाली, आणि त्यांतच मानापमानाची, खासगी द्वेषाची, व सूडबुद्धीची भर पडून एक पक्ष दुसऱ्या पक्षाला पाण्यांत पाहूं लागला.

६ रोमवादी आणि आंग्लवादी-रोमच्या पोपचा अंमल धार्मिक बाबतींत पुन्हां स्थापन झाला पाहिजे असें म्हणणारा पक्ष होता त्याला '**रोमवादी**' असें (The Romanists) म्हणत. दुसऱ्या कित्येकांना—यांतही धर्माधिकारी व जुने सरदार यांचा बराच भरणा होता—रोमच्या पोपचा अंमल तेवढा नको होता; पण एरवीं धर्मसंबंधीं जुन्या मतांत बदल करण्यास ते तयार नव्हते. या मंडळीला '**आंग्लवादी**' (The Anglicans) हें नांव मिळालें. तिसरा पक्ष '**सुधारक**' पक्ष (The Reformers) म्हणून प्रसिद्ध होता. पण या पक्षांतही 'नेमस्त' व 'जहाल' असे दोन भेद होतेच. जहाल पक्षाला जुनें तितकें सर्व त्याज्य आहे असें वाटत असे. त्याच्या उलट नेमस्त पक्ष कित्येक जुन्या गोष्टी बदलण्याला कबूल होता; पण जुनें सर्व मोडून टाकून 'नवी विटी, नवें राज्य' करून सगळीच नवी मांडणी करण्याला तो तयार नव्हता. 'क्रॅनमर' (Cranmer) व इतर बरेच धर्माधिकारी या 'नेमस्त सुधारक' पक्षाचे होते.

७ इ. स. १५३९ मधील कायदा—या निरनिराळ्या पक्षांत भांडणें होऊं लागलीं, तेव्हां इ० स० १५३९ मध्यें पार्लमेंटची खास बैठक भरून तिनें एक सहा कलमी कायदा (Statute of the Six Articles) † पास केला. या काय-

† **सहा कलमी कायदा** (Statute of six articles)—या कायद्यानें असें ठरविण्यांत आलें कीं, प्रत्येक ख्रिस्तधर्मानुयायानें पुढील सहा **तत्त्वें** किंवा गोष्टी मान्य केल्याच पाहिजेत. (१) ख्रिस्तीलोकांत **प्रभुभोजन** (Lord's Supper) म्हणजे ख्रिस्ताच्या मृत्युदिवशीं एक भोजनसमारंभ करण्याचा प्रघात आहे. या श्राद्धाच्या प्रसंगीं भाकरी व द्राक्षासव हीं अभिमंत्रित करून पंक्तींत वाढावयाचीं असतात. या पदार्थांचें अभिमंत्रण होतांच त्यांना अनुक्रमें येशू ख्रिस्ताचें मांस व रक्त हीं स्वरूपें प्राप्त होतात, अशी भाविक ख्रिस्तीलोकांची समजूत आहे. तेव्हां त्यांना अशीं स्वरूपें प्राप्त होतात हें प्रत्येकानें मानलेंच पाहिजे ही पहिली गोष्ट. (२) या भोजनाच्या वेळीं धर्माधिकारी उपस्थित असलाच पाहिजे; त्याच्याशिवाय हें भोजन 'सांग' होत नाहीं ही दुसरी गोष्ट. (३) धर्मोपदेशकानें लग्न करतां कामा नये ही तिसरी गोष्ट. (४) कोणत्याही मठवाशानें ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली कीं ती मोडतां कामा नये ही चौथी गोष्ट. (५) मृताच्या आत्म्याच्या शांतीकरितां कोणालाही खाजगी रीतीनें प्रार्थना करण्याला हरकत नाहीं ही पांचवी गोष्ट. आणि (६) हिंदुलोकांत 'सर्वप्रायश्चित्त' म्हणून एक विधि करतात, त्याप्रमाणें ख्रिस्ती लोकांत धर्मोपदेशकाच्या कानांत आपलें पापोच्चारण करून प्रायश्चित्त घेण्याची चाल किंवा विधि तसाच कायम ठेवावयाचा ही सहावी गोष्ट.

ध्यानें ' सुधारकां 'चीं कित्येक मतें मान्य करण्यांत आलीं, पण सरसकट सर्वांना विचारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य असावें हा जो सुधारकांचा मुख्य उद्देश तो अमान्य करण्यांत आला, इतकेंच नव्हे तर या नवीन कायद्यांत ग्रथित केलेल्या तत्त्वांप्रमाणें जो न वागेल त्याला जिवंत जाळण्याचीही शिक्षा देण्यांत येईल असें ठरविण्यांत आलें.

८ हेन्रीचा अनियंत्रित अधिकार—या वेळीं पार्लमेंट सभा अगदीं राजाच्या मर्जीप्रमाणें वागण्यास तयार असे. तेव्हां त्याच बैठकींत दुसरा असा एक कायदा करण्यांत आला कीं, ज्या वेळीं पार्लमेंट सभेची बैठक भरत नसेल, त्या वेळीं राजानें काढलेल्या '**जाहिरनाम्या**'(Proclamation)ला कायद्याचें स्वरूप असावें. अशा रीतीनें **हेन्री** राजा धार्मिक व राजकीय बावतींत अनियंत्रित सत्ताधारी बनला. असो.

९ क्रॉमवेलचें कारस्थान-हेन्रीची तिसरी बायको जेन सेमूर ही मरून आतां जवळ जवळ तीन वर्षें होऊन गेलीं होतीं. राजाचा मुख्य मंत्री **क्रॉमवेल** हा सुधारकांच्या बाजूचा असून त्यानें आतां युरोपखंडांतील सुधारक संस्थानिकांशीं इंग्लंडच्या राजाचा शरीरसंबंध जुळवून आणून इंग्लंडला सुधारक बनवावें व एकंदरीनें सुधारकांच्या कार्याला मदत करावी अशी मसलत योजिली, आणि तिकडच्या जर्मन घराण्यांतील **ॲन** या नांवाची एक मुलगी पसंत करून एकदां तिची तसबीर **हेन्री**ला दाखविली. पुढें राजाला ही मुलगी पसंत पडली असें दिसून आल्यावर या वधूनें इंग्लंडमध्यें येऊन **हेन्री**शीं लग्न करावें असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें ही मुलगी इंग्लंडला आली; पण राजानें तिला प्रत्यक्ष पाहिल्यावर तिच्यावर त्याचें मन बसेना. **क्रॉमवेल**नें मला फसवून माझ्या गळ्यांत जर्मनींतील ही एक घोडी (great Flanders mare) बांधण्याचा बेत केला असें तो म्हणूं लागला. पण आतां लग्न न करावें तर जर्मन संस्थानिकांना राग येऊन ते आपला शत्रु जो स्पेनचा राजा त्याला जाऊन मिळतील अशी भीति होती. अखेर मोठ्या नाखुषीनें नाइलाज म्हणून राजा एकदांचा या लग्नाला कबूल झाला, व इ० स० १५४० च्या जानेवारी महिन्यांत **ॲन** (Anne of Cleves) इंग्लंडची राणी झाली.

१० क्रॉमवेलची उतरती कळा आणि अंत—परंतु क्रॉमवेलनें ही घोरपड आपल्या गळ्यांत बांधली हें **हेन्री** कधींही विसरला नाहीं. त्याच्यावर त्याची इतराजी झाली. **क्रॉमवेल** मूळचा गरीब असून आपल्या बुद्धिबलानें महत्पदास

चढला होता. त्यामुळें बडे जमिनदार (the Nobility) त्याचा द्वेष करीत असत. इंग्लंडमधील जोग्यांचे मठ बंद करण्यांत हाच पुढारी म्हणून राज्यांतले जुने धर्माधिकारी (clergy) त्याच्यावर दांत ओठ खात होतेच. व कट्टे सुधारकही इ० स० १५३९ च्या विचारस्वातंत्र्य हरण करणाऱ्या कायद्याचा हाच जनक असें समजून त्याच्यावर नाराज होते. त्यांत राजाच्या अवकृपेची भर पडल्याबरोबर त्याच्या शत्रूंनीं ही संधि साधून क्रॉमवेलवर राजद्रोहाचा (Treason) आरोप आणला. आणि इ० स० १५४० च्या जुलई महिन्यांत त्याला पकडून थोडे दिवस कैदेंत ठेवून अखेर त्याचा शिरच्छेद करण्यांत आला !

११ रोमवाद्यांची उचल—सुधारकांच्या शत्रूंना यामुळें जोर येऊन त्यांनीं राजाचें जर्मनींतील सुधारक संस्थानिकांशीं झालेलें सख्य मोडण्याचा उद्योग आरंभिला; आणि ॲन राणीशीं **हेन्रीचें** जें लग्न झालें, तें **हेन्रीच्या** इच्छेविरुद्ध झालें होतें या सबबीवर ॲनशीं घटस्फोट करून राजाला पुन्हां दुसरें लग्न करण्यास मोकळीक देण्यांत आली.

१२ हेन्रीचें पांचवें लग्न—' **नॉरफोक** ' (Norfolk) नामक सुधारणाद्वेष्टया ' रोमवादी ' सरदाराची **कॅथराइन** (Catherine Howard) नांवाची एक भाची होती, तिच्याबरोबर **हेन्रीनें** लग्न केलें आणि रोमवाद्यांचा दरबारांत वरचष्मा होऊन सुधारकांचा छळ होऊं लागला. पण लग्न होऊन सहा महिने झाले नाहींत तोंच राजाला कोणीं असें सांगितलें कीं, **कॅथराइन** ही लग्नाच्या पूर्वीं अनीतिकारक वर्तन (unchastity) करीत असे. राजाला प्रथम आश्चर्य वाटलें, पण पुढें त्याची खात्री झाल्यावर त्यानें तिचा सूड घेण्याचा निश्चय केला. आणि इ० स० १५४२ च्या फेब्रुआरी महिन्यांत ' ॲन बोलिन 'प्रमाणेंच **कॅथराइनचा** शिरच्छेद करण्यांत आला.

१३ सहावें लग्न—पुढल्या वर्षीं हेन्रीनें ' **पार** ' (Catherine Parr) नांवाच्या एका विधवेशीं सहाव्यांदा लग्न केलें. ' **पार** ' ही आंतून सुधारक पक्षाला अनुकूल होती. राजाचा मुलगा ' **एडवर्ड** ' (Edward) व मुलगी ' **इलिझाबेथ** ' (Elizabeth) यांना तिनें सुधारकांचीं तत्त्वें समजून सांगितलीं व त्यांच्या अंतःकरणांत सुधारणेचें बीज रोवलें.

१४ इ. स १५४४ चा कायदा—हा वेळपर्यंत इंग्लंडच्या देवळांतून प्रार्थना व्हावयाची ती लॅटिन भाषेंत होत असे. पण इ० स० १५४४ या वर्षीं कायदा

करून सार्वजनिक प्रार्थना इंग्लिश भाषेंतूनच व्हावी असें ठरविण्यांत आलें; आणि **प्रार्थनेच्या मंत्रांचें** एक पुस्तक (The Prayer Book) तयार करवून त्याप्रमाणें देवळांतून सकाळ संध्याकाळ प्रार्थना व्हावी असें ठरलें.

१५ स्कॉटलंडशीं युद्ध—इंग्लंडची पोपपासून फारकत झाल्यावेळेपासून पोपचे मित्र इंग्लंडचे शत्रु होऊन त्यांचीं इंग्लंडविरुद्ध निरनिराळीं कारस्थानें चाललीं होतीं. स्कॉटलंडचा राजा **जेम्स** (James V) हा पोपपक्षीय असल्यामुळें त्यानें आतां आपल्या प्रजेला इंग्लंडवर हल्ले करण्याला फूस दिली. स्कॉट लोकांचे हल्ले होऊं लागल्या-मुळें अर्थातच **हेन्रीनें स्कॉट**लंडशीं युद्ध पुकारलें, व इ० स० १५४२ या वर्षीं '**सॉलवे**' (Solway) येथें उभय पक्षांची गांठ पडून **स्कॉट** सैन्यानें पळ काढला (Rout of Solway Moss). जेम्सला या पराभवाचें इतकें वाईट वाटलें कीं, त्यानें पुन्हां राजवाड्याच्या बाहेर तोंड दाखविलें नाहीं, आणि या दुःखानें झुरून झुरून तो लवकरच मरण पावला.

१६ स्कॉटलंड आणि फ्रान्स—जेम्सच्या मागें त्याची एकुलती एक '**मेरी**' (Mary) नांवाची मुलगी होती. या मुलीचें आपल्या मुलाशीं लग्न लावून स्कॉटलंड देश इंग्लंडला जोडून टाकावा असा **हेन्रीनें** बेत केला. पण स्कॉट-लंडमधील पोपवादी पक्ष हें लग्न जुळूं देईना. त्या पक्षानें फ्रान्सच्या राजाशीं संधान बांधून फ्रेंच राजपुत्राबरोबर मेरीचें लग्न करण्याचें ठरविलें. **हेन्रीनें** संतापून फ्रान्स-बरोबर युद्ध मांडलें, व तीस हजार सैन्यानिशीं फ्रान्समध्यें जाऊन **बुलोन** (Boulogne) शहर काबीज केलें. पुढें ही लढाई दोन वर्षेपर्यंत चालली होती. पण या अवधींत सांगण्यासारखें असें कांहीं घडलें नाहीं. इ० स० १५४६ या वर्षी तह होऊन **हेन्रीनें** दोन लाख 'क्राउन' घेऊन '**बुलोन**' फ्रान्सला परत द्यावें असें ठरलें, व **हेन्री** इंग्लंडला परत आला.

१७ तुल्यारिमित्रसंधि—इंग्लंडमध्यें धर्मसंबंधीं झालेल्या निरनिराळ्या पक्षांत तंटेभांडणें सुरू होतींच. **हेन्रीचा** ओढा पहिल्यानें जरी जुन्या पक्षाकडे होता तरी अखेर अखेर त्याला सुधारकांचीं मतें मान्य होऊं लागलीं होतीं. शिवाय जर्मनीमधील सुधारक संस्थानिकांशीं 'तुल्यारिमित्र' संधि करून इंग्लंडला राजकीय बाबतींतही बळकटी आणावी असाही त्याचा आतां बेत दिसून आला. इंग्लंडमधील पोपपक्षीय मंडळीला ही गोष्ट आवडली नाहीं, व हरप्रयत्नानें पोपची सत्ता इंग्लंडमध्यें पुन्हां प्रस्थापित केली पाहिजे अशा विचारानें त्यांचे राजाविरुद्ध कट होऊं लागले.

१८ पोपवाद्यांचा कट—सरदार नॉरफोकच्या घराण्यांतील मंडळी पोपची कट्टी अनुयायी होती. त्या घराण्यांतील '**सरे**' (Earl of Surrey) नांवाच्या पुरुषाला हेन्रीच्या मागून इंग्लंडच्या गादीवर बसवावा असा पोपपक्षीय मंडळीनें कट केला. पण हा कट उघडकीस येऊन इ. स. १५४७ च्या जानेवारी महिन्यांत '**सरे**' वर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. '**सरे**' चांगला विद्वान् असून उत्तम शिपाईही होता. त्याच्या उत्कृष्ट कवित्वशक्तीमुळें इंग्रजी वाङ्मयागारांत त्याला बरेंच उच्चस्थान मिळालें आहे (The Purifier of English Poetry); परंतु भलत्याच महत्त्वाकांक्षेला बळी पडल्यामुळें त्याचा अखेर वाईट परिणाम झाला. असो.

१९ हेन्रीचा अंत—**हेन्री**ची प्रकृति आतां खालावत चालली होती. त्याचा देह इतका स्थूल झाला होता कीं, एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जावयाचें तर त्याला उचलून न्यावा लागत असे. अखेर पायांत कांहींसें दुखणें होऊन इ. स. १५४७ च्या जानेवारीच्या २८ व्या तारखेस त्याचा अंत झाला. शेवटपर्यंत त्याची शुद्धि कायम होती, व इंग्लंडनें परराष्ट्रांशीं कसें धोरण ठेवावें याबद्दल आदल्या दिवशीं त्यानें आपल्या मंत्रिमंडळाला उत्तम उपदेश केला होता. पण दुसऱ्या दिवशीं एकाएकीं दुखणें बळावून '**क्रॅनमर**' हा राजोपाध्या (Archbishop) जवळ बसून परमेश्वरप्रार्थना करीत असतांच त्यानें देह ठेविला. त्याच्यामागें त्याचा मुलगा '**एडवर्ड**,' आणि '**मेरी**' व '**इलिझाबेथ**' अशा दोन मुली होत्या. इंग्लंडची गादी आपल्या पश्चात् '**एडवर्ड**'ला द्यावी, या मुलाचा अकालीं अंत झाल्यास आपली मुलगी '**मेरी**' हिला इंग्लंडच्या गादीवर बसवावें, तिच्यामागून '**इलिझाबेथ**'ला राजपद द्यावें व यांना कोणालाच संतती न झाल्यास शेवटीं आपली बहीण '**मेरी**' हिच्या वंशाकडे गादी जावी असें त्यानें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें.

२० हेन्रीचा स्वभाव–**हेन्री** राजा मनाचा खंबीर व एकदां कोणतीहि गोष्ट करावयाची असें ठरल्यावर कसल्याही अडचणींना न जुमानणारा होता. क्षमा ही त्याच्या गांवींही नव्हती.† त्याचीं कित्येक कृत्यें निष्ठुरपणाचीं व अन्यायाचीं अशीं दिसतात.

† या हेन्रीच्या कारकिर्दीतील हत्याकांडासंबंधानें एक इतिहासकार म्हणतो, "हेन्रीनें ३८ वर्षें राज्य केलें, आणि तेवढ्या मुदतींत–विशेषतः त्याच्या कारकिर्दीच्या शेवटच्या १४ वर्षांत त्यानें २ राण्या, २ 'कार्डिनल' च्या हुद्याचे धर्माधिकारी

परंतु त्याला ज्या अडचणींतून मार्ग काढावयाचा होता, त्या अडचणीहि तशाच मोठ्या असल्यामुळें कित्येक वेळां त्याला अन्याय करणें भाग पडत होतें म्हटलें तरी चालेल. पार्लमेंटच्या सरदारसभेचें वर्चस्व कमी करण्यासाठीं सामान्य लोकांच्या सभेकडून अनेक वेळां त्यानें आपल्या कृत्यांना संमति मिळविली व त्यामुळें अर्थातच लोकसभेचें महत्त्व वाढलें. इ० स० १५३६ मध्यें वेल्स प्रांताचे प्रतिनिधी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें बसूं लागले, व इ० स० १५४२ या वर्षी आयर्लंड देश पूर्णपणें इंग्लंडचा अंकित झाला. इंग्लिश आरमाराची सुधारणा करण्यासाठीं हेन्रीनें 'वुलविच' (Woolwich), डेटफर्ड (Deptford), आणि पोर्टस्माउथ (Portsmouth) येथें गोद्या बांधल्या, व नाविक शिक्षण देण्यासाठीं शाळा स्थापन केल्या. पण त्याच्या कारकिर्दीतील मुख्य गोष्ट म्हणजे मागें तिसाव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें इंग्लंडमधील राजसत्तेप्रमाणेंच धर्मसत्तेचेही अष्टाधिकार राजाकडे (the Crown) जाऊन राजा हा या दोन्ही सत्तांच्या बाबतींत अनियंत्रित (Absolute) व सर्वाधिकारी (all-powerful) बनला ही होय. त्यानें पार्लमेंट सभेला मान दिला नाहीं असें नाहीं, पण हा मान नुसता औपचारिक होता. त्यानें सांगितलेली प्रत्येक गोष्ट तिनें मान्य केली म्हणूनच तिचा हा मान टिकला होता. त्याच्या कारकिर्दीत इंग्लंडमध्यें सुधारणेची जी प्रगति झाली, ती हेन्रीला सुधारणा मनापासून आवडत होती म्हणून नव्हे, तर ही सुधारणा पोपबरोबर भांडतांना किंवा इतर राजकारणाच्या बाबतींत त्याच्या पथ्यावर पडत होती म्हणून. अर्थात त्याच्या कारकिर्दीत धर्मसुधारणेच्या म्हणून ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांना प्रत्येक वेळीं धर्मापेक्षां 'राजकारणा'चाच वास ज्यास्त येत असे. पण असें असलें तरी एकंदरींत हेन्रीच्या कारकिर्दीत इंग्लंडची सर्व बाजूंनीं भरभराट होऊन परराष्ट्रांतही या देशाचा लौकिक वाढला व त्याला तिकडे चांगला मान मिळूं लागला यांत संशय नाहीं.

(Cardinals), २ आर्चबिशप, १८ बिशप, १३ ॲबट (Abbot), ४०० प्रायर आणि मंक (Prior and monk), ३८ धर्मशास्त्रज्ञ आणि वकील (Doctors of Divinity and Law), १२ सरदार, १६४ सभ्य गृहस्थ (Gentlemen), १२४ सामान्य लोक (Commoners) आणि ११० स्त्रिया एवढ्यांना फांशीच्या शिक्षा दिल्या!"

प्रकरण ३२ वें.

सुधारणेची प्रगति.

(इ. स. १५४७ इ. स. १५५३)

[१ बालराजा एडवर्ड–राजपालक समरसेट.–२ भावाभावांचें भांडण–३ स्कॉटलंडशीं युद्ध–पिंकीची लढाई–शिकार गेली.–४ सुधारकांचे दिवस–मूर्तिविध्वंस–देवळांची शुद्धि.–५ बॉनर आणि गार्डिनर–सामान्य प्रार्थनेचें पुस्तक–इंग्रजांची स्वतंत्र धर्मव्यवस्था.–६ ढोंगी सुधारक.–७ जमिनदार आणि कुळें यांच्यामधील तेढ–भिकाऱ्यांची वाढ व हाल–त्यांच्या विरुद्ध कायदा.–८ सुधारणेविरुद्ध चळवळ–भिकाऱ्यांचें बंड.–९ केटचें बंड.–१० समरसेट विरुद्ध वॉरविक.–११ समरसेटचा पाडाव.–१२ वॉरविकची महत्त्वाकांक्षा व समरसेटचा शिरच्छेद.–१३ राजाचें दुर्बलत्व व वॉरविकचें कारस्थान.–१४ जेन ग्रे–डडले.–१५ एडवर्डचा शेवट.–१६ एडवर्डचा स्वभाव.–१७ वॉरविकचें औट घटकांचें राज्य.–१८ मेरी राणी झाली.]

१ बालराजा एडवर्ड—हेन्रीच्या मागून त्याचा मुलगा **एडवर्ड** याला गादी मिळाली. पण वयानें तो केवळ १० वर्षांचा असल्यामुळें प्रत्यक्ष राज्यकारभार पहाण्यासाठीं १६ असामींचें एक '**कौन्सिल**' (Council) नेमण्यांत आलें. या कौन्सिलमध्यें त्या वेळच्या सुधारक व जुन्या मतांच्या अशा दोन्ही पक्षांची मंडळी घेण्यांत आली, व राजाचा मामा '**समरसेट**' (Somerset) याला राजपालक (Protector and Governor of the King) नेमिलें. **समरसेट** हा सुधारकांचा पक्षपाती असल्यामुळें सुधारक मंडळीला जोर आला व जुन्या पक्षाची मंडळी हळू हळू हतवीर्य होऊं लागली.

२ भावाभावांचें भांडण—या समरसेटचा भाऊ '**सेमूर**' (Seymour) म्हणून होता. त्याच्याकडे इंग्लंडच्या आरमाराचें आधिपत्य असे. त्यानें हेन्रीच्या शेवटच्या बायकोशीं पुनर्विवाह केला होता. समरसेटच्या हातीं अमर्याद सत्ता आल्याबद्दल त्याला फार विषाद वाटत असे. पुढें त्याची पहिली पुनर्विवाहित पत्नी वारल्यावर त्यानें **एडवर्ड**ची बहीण **इलिझाबेथ** इजबरोबर विवाह करण्याचा प्रयत्न चालविला. पण त्याचे हे सर्व बेत समरसेटच्या ध्यानीं येऊन अखेर या राजपालकानें आपल्या भावा वा लंडनच्या किल्ल्यांत शिरच्छेद करविला.

३ **स्कॉटलंडशीं युद्ध—स्कॉटलंडची** बालराजकन्या **मेरी** इजबरोबर **एडवर्ड**चें लग्न लावून स्कॉटलंड देश इंग्लंडला पूर्णपणें जोडून टाकण्याची माजी राजा हेन्री याची मसलत होती. इ० स० १५४६ मध्यें झालेल्या तहानें हा विवाह होण्याचें ठरलेंही होतें. पण स्कॉटलंडमधील पोपपक्षीय मंडळी हा विवाहसंबंध घडवून आणण्यास कबूल होईना, आणि त्या वेळीं स्कॉटलंडच्या राज्यव्यवस्थेंत त्यांचेंच प्राबल्य होतें. म्हणून **समरसेट**नें सामोपचारानें नाहीं तर लढाई करून ही राजकन्या जिंकून आणण्याचा बेत ठरविला. इ० स० १५४७ च्या सप्टेंबर महिन्यांत १८ हजार लोकांनिशीं **समरसेट** स्कॉटलंडवर चालून गेला. '**पिंकी**' (Pinkie) येथें उभय सैन्यांची झटापट होऊन स्कॉटिश सैन्याचा पराभव झाला. पुढें '**लीथ**' (Leith) वगैरे शहरेंही इंग्लिश सैन्यानें हस्तगत केलीं, पण स्कॉट लोकांनीं आपली राणी **मेरी** हिला सुरक्षिततेसाठीं फ्रान्समध्यें पाठवून दिलें, व **समरसेट**ला हातची शिकार गेली म्हणून हात हालवीत परत माघारें यावें लागलें.

४ **सुधारकांचे दिवस—समरसेट** हा सुधारक पक्षाचा होता हें वर सांगितलेंच आहे. इंग्लंडचा मुख्य धर्माध्यक्ष '**क्रॅनमर**' हाही त्याच मताचा होता. अशा रीतीनें धर्मसंस्था व राज्यसंस्था या दोन्ही संस्थांचे मुख्य अधिकारी अनुकूल असल्यामुळें या वेळीं इंग्लंडमध्यें धर्म-सुधारणेची प्रगति फारच झपाट्यानें होऊं लागली. लोकांतही ज्ञानाचा प्रसार बराच झाला होता. जुने ख्रिस्ती गुरु सांगतील त्या गोष्टी खऱ्या न मानतां स्वतः विचार करण्याची संवय लोकांना लागली होती. पूर्वी देवळांतून जुन्या संतांच्या व **बायबल**मधील कथाभाग दर्शविणाऱ्या मूर्ति व चित्रें (Statues and pictures) ठेवलेलीं असत. देवळांच्या भिंतीही निरनिराळ्या आकृतींनीं चित्रित केलेल्या असत. आतां या सर्व गोष्टी अनवश्यक आहेत असें वाटल्यामुळें लोकांनीं आपण होऊनच कित्येक देवळांतील मूर्ति उचलून बाहेर फेंकून दिल्या. समरसेटच्या हातीं अधिकार आल्यावर थोड्याच दिवसांत राज्यांतील धर्मस्थितीची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. व देवळांतील मूर्ती वगैरे काढून टाकून भिंतींवरील चित्रांना चुना फांसावा आणि सर्व देवळें 'व्हाइट वॉश' करून 'शुद्ध' करावीं असा सरकारी हुकूम निघून त्याची अंमलबजावणी करण्याचा या कमिशनला अधिकार देण्यांत आला ! प्रत्येक देवळांत **बायबला**ची एकेक इंग्रजी प्रत ठेवावी व 'क्रॅनमर'नें ठरवून दिल्याप्रमाणें प्रार्थना (The Liturgy) चालवावी असें ठरविण्यांत आलें.

५ बॉनर आणि गार्डिनर (Bonner and Gardiner)—शहरांतून या सुधारणेचा प्रसार त्वरित व बिनहरकत झाला. पण खेड्यापाड्यांतून लोकांचीं मनें तयार नसल्यामुळें हे नवीन फेरफार त्या लोकांना आवडले नाहींत. ‘ **बॉनर** ’ व ‘ **गार्डिनर** ’ अशा दोघां धर्माध्यक्षांनीं सुधारणेला कसून विरोध करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें. पार्लमेंटची बैठक भरून सुधारकां-विरुद्ध मागच्या कारकिर्दींत पास झालेले सर्व कायदे रद्द करण्यांत आले. इ० स० १५४९ या वर्षीं ‘ **सामान्य प्रार्थनेचें पुस्तक** ’ (The Book of Common Prayer) म्हणून एक धर्मसूत्रांचें पुस्तक प्रसिद्ध होऊन सर्व देवळां-तून या पुस्तकाप्रमाणें प्रार्थना चालवावयाची असा कायदा करण्यांत आला. पुढें दोन वर्षांनीं इंग्लंडमधील ख्रिस्ती धर्म **४२ सूत्रांत** (Forty-two Articles) गोंवून व मागच्या प्रार्थना पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ति काढून हा ‘ **द्विचत्वारिंशत्सूत्री** ’ ख्रिस्ती धर्म हाच इंग्लंडचा धर्म (The Established Church of England) होय, व या धर्माच्या विरुद्ध आचरण करतील ते **पाखंडी** (Heretics) असें ठरविण्यांत आलें. आणि असल्या पाखंड्यांना देहांत प्रायश्चित्त देण्याचा धडाका सुरू झाला.

६ ढोंगी सुधारक—याचा साहजिक परिणाम असा झाला कीं, मनांतून सुधारणेचा द्वेष करणारे, पण वरकांतीं सुधारकांसारखें आचरण करणारे असे ढोंगी सुधारक जिकडे तिकडे बोकाळूं लागले, व या स्वार्थी सुधारकांच्या वर्तनानें खऱ्या सुधारणेविषयींही लोकांच्या मनांत तिटकारा उत्पन्न होऊन सुधारक म्हणजे एक भ्रष्ट मनुष्य अशी समजूत पसरूं लागली. याच सुमारास लोकांच्या असंतोषांत भर पडण्यासारख्या आणखींही कांहीं गोष्टी घडून आल्या.

७ जमिनदार आणि कुळें यांच्यामधील तेढ—या वेळीं धर्मसंबंधीं ज्ञानाच्या प्रसाराबरोबरच व्यावहारिक ज्ञानही लोकांत बरेंच वाढलें होतें. पूर्वींची सरंजामी पद्धति मोडून गेली होती. जमिनदार व कुळें यांच्यामधील परस्पर हक्कां-बद्दलचीं भांडणें सुरू झालीं होतीं. अलीकडे लोकरीच्या व्यापाराला तेजी येऊन मेंढ्या पाळून लोकर तयार करणें हें फार किफायतशीर होऊं लागल्यामुळें पुष्कळ जमिनदारांनीं आपल्या शेतजमिनीचीं कुरणें बनवून शेती करून धान्य उत्पन्न करणाऱ्या कुळांना घालवून दिलें होतें. हीं कुळें निराश्रित होऊन मजुरीसाठीं फिरूं लागल्यामुळें मजुरीचे दर कमी झाले, आणि गरिबांच्या हालांत भर पडली. धान्याचें

उत्पन्न कमी झाल्यामुळें अन्नाची किंमतही वाढली. मोठमोठ्या जमिनदारांनीं गांवठाणाच्या जमिनींना कुंपण घालून सामान्य रयतेच्या गुरांढोरांना चाऱ्याची बंदी करून टाकली; खेड्यापाड्यांतून व शहरच्या रस्त्यांतून भिकाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी जमा होऊं लागल्या; उपाशीं मरणाऱ्या माणसाला पूर्वी जोग्यांच्या मठांतून अन्नाच्छादन मिळत असे, पण आतां ते मठ नाहींसे झाल्यामुळें गरिबांचें हें आश्रयस्थानही नाहींसें झालें होतें. गांवांत भिकाऱ्यांची संख्या जास्त झाल्यास त्यांना भीक तरी कोण घालणार ? या भिकाऱ्यांचा त्रास चुकविण्यासाठीं सरकारनें कायदे केले; परवान्याशिवाय भिक्षा मागेल त्याला चाबकांचा मार द्यावा, डागावा, कान कापून टाकावे, गुलाम करून विकावा व एवढेंहि करून तो पुन्हां कायदा मोडील तर त्याला फांशीं द्यावा असें ठरविण्यांत आलें ! पण यामुळें अर्थातच गरीब रयतेंत तीव्र असंतोष उत्पन्न झाला.

८ सुधारणेविरुद्ध चळवळ—सुधारणेचे शत्रु असलेल्या एखाद्या संधीची वाट पहात होतेच. घरदार नसलेले जोगी गांवोगांव भटकत होते, त्यांनीं ही सर्व आपत्ति पोपच्या अवकृपेचें फळ होय असा जिकडे तिकडे पुकारा करून अज्ञान जनसमूहांत सुधारणेविरुद्ध चळवळ सुरू केली, व सामान्य लोकांना बंड करून सुधारणा हाणून पाडण्यास प्रवृत्त केलें. '**कॉर्नवॉल**' (Cornwall) व '**डेव्हन**' (Devon) या दोन जिल्ह्यांत दहा हजार लोक शस्त्रें घेऊन उठले. '**रसेल**' (Russel) नामक सरदार त्यांच्यावर चालून गेला, त्यानें या बंडखोरांचा पाडाव करून व त्यांच्या पुढाऱ्यांना पकडून फांसावर चढविलें, आणि जिकडे तिकडे लष्करी कायदा पुकारून चळवळ्या लोकांचा वींमोड केल्यासारखा केला.

९ केटचें बंड—' नॉर्फोक ' (Norfolk) नांवाच्या दुसऱ्या एका जिल्ह्यांतील बंड यापेक्षां भयंकर स्वरूपाचें होतें. '**केट**' (Ket) नामक एक श्रीमंत कलाल तेथल्या बंडखोरांचा पुढारी होऊन १६ हजार लोकांनिशीं त्या प्रांतांत धुमाकूळ घालूं लागला. सरदार '**वॉरविक**' (Warwick) नें सहा हजार लोकांनिशीं या बंडखोरांवर चाल केली. दोन हजार बंडवाले लढतां लढतां मेले. अखेर '**केट**' ला पकडून **नॉरविच** (Norwich) किल्ल्यावर फांशीं दिल्यावर याही बंडाचा शेवट झाला. पुढें अशीं बंडें पुन्हां उद्भवूं नयेत म्हणून प्रत्येक जिल्ह्याला एकेक स्वतंत्र अधिकारी नेमून त्यानें जरूर त्या वेळीं स्थानिक सैन्य जमा करून राजाच्या शत्रूंचा समाचार घ्यावा असा त्याला अधिकार देण्यांत आला. असो.

१० समरसेट विरुद्ध वॉरविक—या वेळीं सर्व राज्यकारभार **समरसेटच्या** तंत्रानें चालत असे, इतकेंच नव्हे तर त्यानें राजाकडून मुखत्यारपत्र घेतल्यासारखें करून ‘ कौन्सिल ’ला विचारल्याशिवाय आपल्याच अखत्यारांत कोणतीही गोष्ट करण्याचा उपक्रम केला होता (assumed the authority of the Crown). जुने सरदार लोक हा हलक्या कुळांतील मनुष्य सरदारकीला चढल्या-बद्दल त्याचा द्वेष करीत असत. जमिनदार व रयत यांच्या भांडणांत त्यानें पुष्कळ वेळां गरीब रयतेची बाजू घेतल्यामुळें श्रीमंत जमिनदारांचा त्याच्यावर रोष झाला होता. पोपपक्षीय लोक सुधारणेचीं कडू फळें यानेंच चाखावयाला लावलीं म्हणून त्याच्यावर रागावले होते. आपल्या भावाचा निर्दयपणें वध केल्याबद्दल कित्येक लोक त्याच्यावर दांत ओंठ खात होते. लंडनच्या एका भागांत (The strand) स्वतःसाठीं एक वाडा बांधण्याकरितां त्यानें दोन देवळें व तीन मठ जमिनदोस्त केले; आणखी पांचसहा मठ असेच मोडून टाकून तेथील द्रव्यही त्यानें आपल्या खिशांत टाकलें. परदेशी राजकारणांतही हल्लीं त्याला यश येईनासें झालें होतें. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, त्याच्याविरुद्ध लोकमत क्षुब्ध होऊन त्याला राजपालकाच्या अधिकारावरून काढून टाकण्याचे कट होऊं लागले.

११ समरसेटचा पाडाव—मंत्रिमंडळांत ‘ **वॉरविक** ’ हा त्याचा प्रतिस्पर्धी होता. तो व त्याच्या पक्षाची मंडळी आतां **समरसेटचे** हुकूम न जुमानतां स्वतंत्र-पणें वागूं लागली. तेव्हां **समरसेटनें** मंत्रिमंडळावर राजद्रोहाचा व पोपची सत्ता इंग्लंडमध्यें पुन्हां स्थापन करण्याचा आरोप ठेवून लोकसभेनें या मंत्रिमंडळाला शासन करण्याचे कामीं राजाला मदत करावी म्हणून त्या सभेला विनंति केली. पण सामान्य प्रजाही त्याला विरुद्धच असल्यामुळें अखेर त्याला मंत्रिमंडळापुढें मान वांकवावी लागली. मंत्रिमंडळानें त्याच्यावर राजसत्ता बळकावण्याचा (usurpation of the king's power) आरोप ठेवून त्याची लंडनच्या किल्ल्यांत रवानगी केली. इ० स० १५४९ च्या आक्टोबर महिन्यांत **समरसेटनें** मंत्रि-मंडळाच्या सभेंत गुढगे टेंकून आपल्यावरील सर्व आरोप कबूल केले, व पार्लमेंट-सभेनें त्याचे सर्व अधिकार काढून घेऊन त्याला दोन हजार पौंड दंड केला. पुढें राजाच्या मध्यस्थीनें हा दंड त्याला माफ करण्यांत आला, आणि **वॉरविकचें** व त्याचें कांहीं काळ सख्य होऊन वॉरविकच्या वडील मुलाला त्यानें आपली मुलगीहि दिली.

१२ वॉरविकची महत्त्वाकांक्षा व समरसेटचा शिरच्छेद—समरसेटचा पाडाव झाल्यानंतर सर्व सत्ता 'वॉरविक'च्या हातीं आली. **वॉरविक** सरदार मोठा महत्त्वाकांक्षी होता. **एडवर्ड** राजा फार अशक्त असल्यामुळें त्याच्या मागून जमल्यास इंग्लंडची गादी आपल्या वंशाकडे चालण्याची व्यवस्था करावी अशी त्याला इच्छा झाली. पण या बेताला **समरसेट** खो घालणार हें त्यास पक्कें माहीत असल्यामुळें आपल्या मार्गांतील त्याचा हा कांटा काढून टाकण्याची त्यानें खटपट चालविली. **समरसेटही** **वॉरविकची** महत्त्वाकांक्षा ओळखून त्याच्याविरुद्ध गुप्त कट करूं लागला. परंतु दैव त्याला अनुकूळ नसल्यामुळें त्याचे बेत उघडकीस आले, आणि राजाला पळवून नेण्याचा व मंत्रिमंडळांतील कित्येक सभासदांचे प्राण घेण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप त्याच्यावर ठेवून **वॉरविकनें** '**टॉवरहिल**'-(Tower-hill) वर त्याचा शिरच्छेद करविला. त्याच्या शिरच्छेदाच्या वेळीं हजारों लोक वधस्तंभाकडे जमा झाले होते. **समरसेटच्या** आंगीं इतर कितीहि दुर्गुण असले तरी तो गरिबांचा कनवाळू होता. तेव्हां त्याची स्मृति रहावी म्हणून वधस्तंभाकडे जमलेल्या या लोकांनीं त्याच्या रक्तांत आपले हातरुमाल भिजवून घेतले, आणि ते आपल्या घरीं नेऊन मोठी मूल्यवान वस्तु म्हणून जपून ठेवले. ही गोष्ट इ. स. १५५२ च्या जानेवारींत घडली.

१३ राजाचें दुर्बलत्व व वॉरविकचें कारस्थान—समरसेटच्या मागून सर्व राज्याधिकार **वॉरविकच्या** हातीं आला. राजाला संतुष्ट राखण्यासाठीं आपण सुधारणेचे कैवारी आहों असा बाह्यात्कारीं डौल दाखवून त्यानें राजाचा विश्वास संपादन केला. **एडवर्ड** मूळचाच फार अशक्त होता हें मागें सांगितलेंच आहे. आतां तर त्याची प्रकृति अधिकच ढांसळून तो फार दिवस वांचेल असें दिसेना. **वॉरविकनें** ही संधी साधून राजाच्या मनांत असें भरवून दिलें कीं, 'आपल्या मागें हेन्रीच्या मृत्युपत्राप्रमाणें **मेरीकडे** जर इंग्लंडची गादी गेली, तर **मेरी** सुधारणेची द्वेष्टी असल्यामुळें आजपर्यंत झालेली सर्व सुधारणा रसातळास जाऊन पुन्हां इंग्लंडवर पोपचा अंमल चालू होईल. तेव्हां आपण निराळी व्यवस्था करून ठेवावी व **मेरीकडे** अगर इलिझाबेथकडे ही गादी जाऊं देऊं नये.'

१४ जेन ग्रे (Jane Gray)—**एडवर्डची** '**जेन ग्रे**' या नांवाची दूरची एक भाची होती.* ती फार देखणी व त्या काळच्या मानानें शिकलेली असून

* ही लेडी जेन ग्रे आठव्या हेन्रीच्या बहिणीची (मेरी) नात म्हणजे मुलीची मुलगी होती.

देवभक्त व अत्यंत सद्गुणी होती. या **जेन ग्रेशीं वॉरविकनें** आपला मुलगा '**डडले**' (Dudley) याचें लग्न लावून दिलें होतें. तेव्हां या **जेन ग्रेला** आपल्या मागें इंग्लंडची गादी मिळावी असें मृत्युपत्र करून ठेवण्यावद्दल **वॉरविकनें एडवर्डला** गळ घातली. **एडवर्डचें** पोरवयच होतें. त्याला ही युक्ति पसंत वाटून त्यानें त्याप्रमाणें **जेन ग्रेच्या** नांवानें अधिकारपत्र (Letters Patent) करून दिलें. व पुष्कळ सरदारांनीं **वॉरविकच्या** भीतीनें या व्यवस्थेला आपली संमतीहि दिली.

१५ एडवर्डचा शेवट—हें मृत्युपत्र झाल्यावर थोड्याच दिवसांत **एडवर्डची** प्रकृति अधिकच बिघडली. वॉरविकनें नेहमींच्या राजवैद्यांना रजा देऊन **एडवर्डला** औषध देण्याचें काम एका वैदू बाईकडे सोंपविलें. पण तिच्या औषधानें गुण न येतां **एडवर्डचें** दुखणें वाढूं लागलें. त्याच्या सर्वांगावर फोड उठले, केंस गळून पडले, नखें गळालीं. कोणी असेंही म्हणतात कीं, **वॉरविकनें** राजाला विषप्रयोग केला होता. अखेर त्याच दुखण्यांत **एडवर्डचा** अंत झाला. त्या वेळीं त्याचें वय अवघें सोळा वर्षांचें होतें.

१६ एडवर्डचा स्वभाव—हा राजपुत्र हाडाचा गरीब, धर्मनिष्ठ, व चांगला होतकरू होता. पण त्याचा अंत अकालीं झाल्यामुळें त्याच्या अंगच्या गुणांचा देशाला उपयोग झाला नाहीं. वय लहान असतांही त्याला विद्येची गोडी लागली होती, व गरिबांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठीं त्यानें शाळाही स्थापन करविल्या होत्या. असो.

१७ वॉरविकचें औट घटकांचें राज्य—वॉरविकनें **एडवर्डच्या** मृत्यूची बातमी दोन दिवसपर्यंत कोणाला कळूं दिली नाहीं, व **एडवर्डची** बहीण **मेरी** हिला पकडून ठेवण्यासाठीं सैन्य रवाना केलें. पण ती या सैन्याच्या हातांतून निसटून 'सफोक' (Suffolk) जिल्ह्यांत गेली. **वॉरविकनें** आपली सून '**जेन ग्रे**' (Lady Jane Grey) ही राणी झाल्याबद्दल जिकडे तिकडे द्वाही फिरविली. वास्तविक **जेन ग्रेला** राज्याधिकार नको होता. सासऱ्याच्या महत्त्वाकांक्षेनें तिच्यावर राज्यपद लादल्यासारखें झालें होतें. पण **वॉरविकचें** हें राज्य औट घटकांचेंच ठरलें.*

---

*औट घटका हा शब्द आम्ही 'फारच थोडा काल' अशा अर्थानें वापरला आहे. वास्तविक इंग्लंडचा राजमुकूट लेडी जेन ग्रेच्या मस्तकावर ९ दिवस होता. म्हणून तिला कित्येकांनीं 'नवदिन राज्ञी' (Nine-day Queen) असें नांव दिलें आहे आणि तिचें मोहक सौंदर्य, अप्रतिम बुद्धिमत्ता, आणि सुसंस्कृत वागणूक (accomplishments) यांची प्रशंसा करण्यांत सगळ्या पक्षांच्या लेखकांचें ऐकमत्य आहे.

कारण बरेचसे सरदार **मेरी** राणीला जाऊन मिळाले, आणि **वॉरविक** सहा हजार लोकांनिशीं त्यांच्यावर चालून गेला तेव्हां वाटेंतच त्याचे बहुतेक लोक त्याला सोडून गेले. म्हणून त्याला शेवटीं आपला पाय माघारा घ्यावा लागला.

१८ मेरी राणी झाली—ज्या सरदारांनीं एडवर्डनें केलेल्या मृत्युपत्रावर सह्या केल्या होत्या, त्यांनींच आतां '**मेरी**' हीच इंग्लंडची खरी राणी आहे असें जाहीर केलें व जिकडे तिकडे तिच्या नांवाचा जयघोष सुरू झाला. **वॉरविकनेंही** वारा आपल्याला अनुकूल नाहीं असें पाहून आपल्या महत्त्वाकांक्षेचें सुकाणूं फिरविलें, व 'ईश्वर **मेरी** राणीला चिरायु करो' असे उद्गार काढून आपण **मेरीच्याच** पक्षाचे झालों असें दर्शविलें! पण ही युक्ति साधली नाहीं. त्याला एकदम कैद करून लंडनच्या किल्ल्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. त्याच्याबरोबर त्याचा मुलगा **डडले** व बिचारी सून **जेन ग्रे** यांनाही कैद भोगावी लागली. आणि **मेरीनें** (Mary) मोठ्या विजयोत्साहानें आपल्या इलिझाबेथ बहिणीला बरोबर घेऊन लंडनमध्यें **प्रवेश** केला.

प्रकरण ३३ वें.

स्त्रीराज्य.

(इ. स. १५५३—इ. स. १५५९)

[१ सुधारणेची पिछेहाट-मेरीची सूडबुद्धि.—२ पोपवाद्यांचें प्रस्थ-'जुन्या' चें पुनरुज्जीवन—कायदे बदलले—पाद्र्यांच्या बायका.—३ पोपचें प्राबल्य वाढलें—प्रायश्चित्त-विधि.—४ मेरीचें लग्न.—५ बंडांचें विघ्न.—६।७ यॅटचें बंड—बंडाचा मोड व शिक्षा—८ लग्न झालें.—९ पाखंडसत्र—पहिले बळी—लॅटिमर आणि रिडले.—१० क्रॅनमरचें मतांतर—त्याचें धैर्य व प्राणत्याग.—११ सुधारकांचे हाल—त्या हालांचा जनतेवर परिणाम.—१२ फ्रान्स आणि स्पेन—स्पेनचें फ्रान्सशीं युद्ध—इंग्लंडची फ्रान्सबरोबर युद्ध करण्याची नाखुषी.—१३ फ्रान्सच्या दरबाराचा बेत—स्टॅफर्ड—फ्रान्सची आगळीक.—१४ इंग्लंड युद्धांत पडलें—कॅले हातचें गेलें.—१५ मेरीचें दुःख—तिची लोकांमधील अप्रियता—मेरीचा मृत्यु व स्वभाव.—१६ इलिझाबेथ—१७ स्कॉटलंडची राणी मेरी—फ्रान्सच्या राजाचा बेत.—१८ अडथळे दूर झाले—इलिझाबेथचें राज्यारोहण—१९ इलिझाबेथच्या अंगचे गुणावगुण—सुधारणेचे ग्रह—सुवर्णमध्यमार्ग.]

१ सुधारणेची पिछेहाट—मेरी राणी गादीवर आल्याबरोबर सुधारणेच्या पिछेहाटीला सुरवात झाली. तिच्या आजोळीं म्हणजे स्पेन देशांत '**पोपवाद्यां**'चें (Romanists) फार प्रस्थ असून स्पेनचा राजा हा पोपचा मुख्य **आधारस्तंभ** होता. तो सर्व ख्रिस्ती राष्ट्रांत पोपचें स्वामित्व अबाधित राहिलें पाहिजे अशा मताचा असून नेहमीं सुधारकांचा बीमोड करण्याला तत्पर असे. **मेरी**ची आई **कॅथराइन** हिजवर तिच्या नवऱ्यानें म्हणजे 'आठव्या हेन्री'नें विनाकारण आळ आणून तिचा फार छळ केला होता, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. आतां **मेरी**नें या छळांत ज्यांचें ज्यांचें आंग होतें त्यांचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. ती स्वतः जुन्याची (The old faith) पक्षपाती असल्यामुळें पोपपक्षीयांना जोर येऊन सुधारकांच्या छळाला सुरवात झाली.

२ पोपवाद्यांचें प्रस्थ—एडवर्डच्या कारकिर्दीत ज्या सुधारकांना धर्माध्यक्षाच्या जागा मिळाल्या होत्या, त्यांना त्या जागांवरून काढून टाकून जुन्या मताचे '**गार्डिनर**' (Gardiner), '**बॉनर**' (Bonner), वगैरे जे पाद्री (Prelates) अटकेंत होते त्यांची त्या जागांवर नेमणूक झाली. देवळांतून इंग्रजी भाषेंत प्रार्थना करण्याची पद्धति बंद पडून पूर्वीप्रमाणे लॅटिन या 'देव—भाषें'त धर्मकृत्यें होऊं लागलीं. कँटरबरीचा मुख्य आचार्य **क्रॅनमर** याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याला तुरुंगांत टाकिलें. लॅटिन मंत्रांनीं परमेश्वरस्तुति होऊन पार्लमेंटची बैठक सुरू झाली. **मेरी**च्या आईचें हेन्रीशीं झालेलें लग्न—जें **क्रॅनमर**नें अशास्त्र व बेकायदेशीर ठरविलें होतें तें—आतां सशास्त्र व कायदेशीर होतें असें ठरून **मेरी** ही हेन्रीची कायदेशीर मुलगी आहे असें ठरविण्यांत आलें. धर्मसंबंधीं सर्व जुने कायदे रद्द करून पोपचे कायदे परत सुरू करण्यांत आले. धर्माधिकारी अविवाहितच पाहिजेत असें ठरवून पाद्र्यांच्या बायकांना हांकलून लावलें. जे आपल्या बायकांना घालवून देण्यास तयार नव्हते, त्यांच्या जागा (Sees) काढून घेण्यांत आल्या; व हे नवीन केलेले फेरफार जे मानणार नाहींत त्यांना भयंकर शिक्षा द्याव्या असा कायदा करण्यांत आला.

३ पोपचें प्राबल्य वाढलें—पुढल्या वर्षी, गेलीं कित्येक वर्षे इंग्लंडची पोपपासून जी फारखत झाली होती त्याबद्दलचें प्रायश्चित्त देण्यासाठीं, '**पोल**' (Pole) नामक पोपचा प्रतिनिधी (Papal Legate) इंग्लंडमध्यें आला. पार्लमेंट सभेची बैठक भरली; सर्व सभासदांनीं गुडघे टेंकले, व झालेल्या

पापाबद्दल व अपराधाबद्दल पोपप्रतिनिधीची ' क्षमस्व ' म्हणून प्रार्थना केली. तेव्हां ' पोल 'नें तुमच्या पापांची निष्कृति (absolution) झाली असें सांगून इंग्लंडला पुन्हां पोपच्या ' कळपां 'त सामील केलें. (Reunion with the Papal See). धर्मसंस्थेच्या ज्या जमिनी राजाकडे आल्या होत्या त्या **मेरी**नें पुन्हां देवस्थानच्या खात्याला देऊन टाकल्या. मात्र सरदारांत ज्या जामिनी वांटल्या गेल्या होत्या त्या **पोप**नें मोठ्या मेहरबानीनें त्यांच्याकडे राहूं दिल्या. अशा रीतीनें इंग्लंडच्या धर्मव्यवस्थेंत क्रांति होऊन पोपचा अंमल पुन्हां पूर्ववत चालू झाला. *

४ मेरीचें लग्न—स्पेनचा राजा **चार्लस** (Charles) याला **मेरी** राणी गादीवर आल्याचें समजतांच त्यानें आपला मुलगा **फिलिप** (Philip) याजबरोबर लग्न करण्याविषयीं **मेरी**ला विनंति केली. **फि**लिपची पहिली बायको या वेळीं वारली असून तो वयानें **मेरी**पेक्षां दहा वर्षांनीं लहान होता. पण हें वयाचें अंतर क्षम्य आहे असें सांगण्यांत आलें. स्पेनच्या राजपुत्राशीं आपल्या राणीचें लग्न व्हावें ही गोष्ट इंग्लिश लोकांना मात्र आवडण्यासारखी नव्हती. अगोदरच सुधारकांविरुद्ध निरनिराळे कायदे झाले असल्यामुळें ते मोठ्या विवंचनेंत पडले होते. त्यांत **फि**लिपसारख्या कट्ट्या सुधारणाद्वेष्ट्याशीं **मेरी**चें लग्न झाल्यास आपलीं शंभर वर्षें भरलीं असें त्यांना वाटल्यास नवल नाहीं. सरदार व सामान्य लोक यांनाही **मेरी**चें स्पेनच्या राजपुत्राशीं लग्न झाल्यास इंग्लंड हा स्पेनच्या साम्राज्याचा एक भाग (Province of Spain) बनून राहील व त्याचें स्वातंत्र्य नष्ट होईल अशी भीति वाटत होती म्हणून स्पेनच्या राजाशीं संबंध करूं नये असें निरनिराळ्या प्रकारांनीं **मेरी**ला सांगण्यांत आलें. पण तिच्या मनानें स्पेनच्या राजपुत्राशीं लग्न करण्याचें घेतलें होतें; ती या बेतापासून परावृत्त होईना. तेव्हां जरूर तर शस्त्र हातांत घेऊन या लग्नाचा बेत हाणून पाडावा म्हणून कट होऊं लागले.

५ बंडांचें विघ्न—तिकडे फ्रान्सच्या राजाला स्पेनचें वाढत चाललेलें महत्त्व पहावत नसे. त्यानें या कटवाल्यांना मदत करण्याचें वचन दिलें. औट घटकेचें राज्यसुख भोगलेला **ग्रे**चा नवरा **डडले** हा या वेळीं कैदेंतून मुक्त झाला होता. त्यानें व

* इंग्लंड पुन्हां पोपच्या ' कळपांत ' आल्याची बातमी ऐकून पोप ज्यूलियसला इतका आनंद झाला कीं त्यानें ही बातमी त्याला सांगावयास आलेल्या दूताला (messenger) दृढालिंगन देऊन त्याला आनंदाश्रूंनीं न्हाऊं घातलें असें म्हणतात.

'**कारू**' नांवाच्या दुसऱ्या एका सरदारानें संगनमतानें अनुक्रमें **मिडलसेक्स** (Middlesex) व **डेव्हन** (Devon) या दोन जिल्ह्यांत एकदम बंड उभारलें. परंतु दोघांनाही यश न येतां माघार घ्यावी लागली.

६ यॅटचें बंड—यॅट (Wyat) नांवाच्या एका इसमानें याच वेळीं '**केंट**' जिल्ह्यांत बंडाचा पुकारा केला. त्याचा प्रयत्न बराच यशस्वी झाला. राणीकडून '**नॉरफोक**' (Norfolk) सरदाराला निवडक लोकांनिशीं '**यॅट**' वर पाठविण्यांत आलें. पण आयत्या वेळीं **नॉरफोकचे** लोक '**यॅट**'लाच जाऊन मिळाले. आणि **यॅट** मोठ्या उत्साहानें लंडन शहरांत शिरला. त्या ठिकाणचे अमीर उमराव आपल्याला अनुकूल होतील अशी त्याला आशा वाटत होती; पण ती फुकट गेली. मोठमोठे सरदार कोणत्याच पक्षाला न मिळतां तटस्थ राहिले, आणि अखेर **यॅटला** राजसैन्याच्या हातीं लागून देहांत शिक्षा भोगावी लागली. या बंडांतल्या चारशें पुढाऱ्यांना गळ्याला दोऱ्या बांधून राणीपुढें आणलें व त्यांनीं **मेरी**पुढें गुडघे टेंकून तिची करुणा भाकली. तेव्हां राणीनें त्यांना माफी दिली.

७ या बंडांचा अशा रीतीनें शेवट झाल्यावर पुन्हां बंड करण्याला लोकांना कारण राहूं नये म्हणून **मेरीनें जेन ग्रे**ला व तिच्या नवऱ्याला फांसावर चढविलें, व जे जे सरदार असंतुष्ट झाल्याचा संशय होता त्या सर्वांना पकडून तुरुंगांत टाकलें. **मेरीची** बहीण **इलिझाबेथ** हिलाही ठार करावें असा कित्येकांनीं राणीला सल्ला दिला; पण तिच्याविरुद्ध पुरेसा पुरावा न मिळाल्यामुळें तिला फक्त नजरकैदेंतच ठेवण्याचें ठरलें.

८ लग्न झालें—सर्व शत्रूंना अशा रीतीनें गप्प बसविल्यावर **मेरीनें** आपलें लग्न लवकर उरकून घेण्याचें ठरवून राजपुत्र **फिलिप** याला इंग्लंडमध्यें बोलावलें, आणि इ० स० १५५४ च्या जुलई महिन्यांत मोठ्या थाटानें **मेरीचा फिलिपशीं** विवाह झाला. इंग्लंड पुन्हां पूर्णपणें पोपच्या सत्तेखालीं आलें. '**पार्लमेंट**' नें आतां सुधारकांविरुद्ध कायदे करण्याचा सपाटा चालविला. आणि कायद्याच्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन '**गार्डिनर**' व '**बॉनर**' असे दोघे धर्माध्यक्ष पाखंड्यांचा नायनाट करण्याच्या उद्योगाला लागले.

९ पाखंडसत्र—इ० स० १५५५ च्या आरंभापासून या **पाखंडसत्राला** सुरवात झाली, व तें **मेरी** राणीच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंत चालू राहिलें. **हूपर**, (Hooper), **रोजर्स**, (Rogers), **सॉंडर्स** (Saunders) व '**टेलर**'

(Tailor) हे या सत्रांत पहिले बळी पडले. लॅटिमर (Latimer) व रिडले (Ridley) हे दोघे विद्वान व सद्‌गुणी सुधारक पूर्वीच्या कारकिर्दींत धर्माध्यक्षांच्या हुद्यावर होते. त्यांना जिवंत जाळण्याचा हुकूम होऊन दोघांना एकत्र जाळण्यांत आलें. चितेला अग्नि लागून ज्वाळा वर येऊं लागल्या तेव्हां लॅटिमर रिडलेला म्हणाला, ' बंधो, धीर सोडूं नको, मर्दाप्रमाणें वाग. आज आपण इंग्लंडमध्यें ज्ञानाची अशी प्रखर ज्योत पाजळूं कीं, ती कधींही विझणार नाहीं. ' *

१० क्रॅनमरचें मतांतर–कँटरबरीचा मुख्य आचार्य **क्रॅनमर** याचीही त्याच वेळीं चौकशी होऊन पाखंड मताबद्दल त्यालाही जिवंत जाळण्याची शिक्षा झाली. पण हा मनुष्य इंग्लंडमधील सुधारकांचा अग्रणी व सूत्रचालक असल्यामुळें असला मनुष्य जर आपल्या पक्षाला मिळाला तर पाखंड्यांची आपोआपच कमर मोडेल, तेव्हां त्याला ताबडतोब शासन न करितां तो आपल्या बाजूला मिळतो कीं काय हें पहावें म्हणून त्याला प्रथम कांहीं दिवस तुरुंगांत ठेवण्यांत आलें. बरेच दिवस तुरुंग–यातना भोगल्यावर जिवाच्या आशेनें तो आपलीं मतें सोडण्यास कबूल झाला. त्याप्रमाणें त्यानें लेखी कबुलीही दिली. पण **मेरी**चा राग एवढ्यानें शांत होण्यासारखा नव्हता. आपल्या आईचा घटस्फोट याच्याचमुळें झाला हें ती विसरली नव्हती. शिवाय **पो**पचा प्रतिनिधी म्हणून आलेला **पोल** याची **क्रॅ**नमरची मुख्य धर्माध्यक्षाची जागा आपल्याला मिळण्याबद्दल खटपट होती. तेव्हां **क्रॅ**नमरचा जीव घेतलाच पाहिजे असें अखेर ठरून त्याची शिक्षा अमलांत आणण्याचा दिवस नेमला गेला. आपलीं सुधारकी मतें चुकीचीं होतीं असें उघड प्रसिद्ध करण्याविषयीं त्याला हुकूम झाला. पण अखेर त्यानें सांगितलें कीं, ' मी भीतीनें तसें पूर्वी कबूल केलें. खरोखर पाहिलें असतां सुधारणेचींच मतें बरोबर असून माझ्या मनोदौर्बल्याबद्दल मला आतां पश्चात्ताप होत आहे, पुढें चिता रचून त्याला खुंटाला बांधला तेव्हां तो म्हणाला, 'माझ्या उजव्या हातानें माफीचा लेख लिहिला तेव्हां या हाताला प्रथम प्रायश्चित्त दिलें पाहिजे '§ असें म्हणून त्यानें उजवा

---

* " Play the man, master Ridley; we shall this day, by God's grace, light such a candle in England, as I trust shall never be put out ". लॅटिमर हा या वेळीं ८० वर्षांचा वृद्ध होता.

§ This was the hand that wrote the recantation; therefore it shall first suffer punishment.

ह्यात प्रथम पुढें करून अग्नीसमोर धरला व प्राण जाईपर्यंत तो मागें घेतला नाहीं, किंवा त्याच्या तोंडून दुःखाचा एकही शब्द बाहेर पडला नाहीं! असो.

११ सुधारकांचे हाल—अशा प्रकारें तीन वर्षांत तीनशें सुधारक जळून मेले. शिवाय कित्येकांना तुरुंगवासांत यमयातना भोगाव्या लागल्या त्या वेगळ्याच. या पाखंड्यांना कोणींही कसलीच दया दाखवूं नये असे राणीचे हुकूम असत. त्यांच्या पाठीवर फटके मारीत, त्यांना उपाशीं ठेवीत, भुयारांत कोंडून ठेवीत. थंडीच्या दिवसांत वस्त्र नाहीं, तुरुंगांत मेलेल्यांना उघड्या मैदानावर नेऊन टाकावयाचें, त्यांचा दफनविधीहि कोणीं करावयाचा नाहीं, अशी स्थिति चालली होती. पण या असल्या अत्याचारांनींच जुन्या धर्मापासून लोकांचीं मनें फिरलीं. पोपच्या जुलमाविरुद्ध शंभर व्याख्यानें देऊन जें काम झालें नसतें तें एका '**धर्मवीरा**'च्या (Martyr) धीरोदात्त वर्तनानें घडून येऊं लागलें. 'ज्या धर्माचे अग्रणी असले हाल करतात, करवितात व केलेले पहातात त्या धर्माला धिःक्कार असो' असे उद्गार जिकडे तिकडे निघूं लागले. कित्येक लोक देशत्याग करून निघून गेले. जर्मनीमध्यें या लोकांना आश्रय मिळाला; पण **मेरी** राणी वारल्यावर हे लोक पुन्हां इंग्लंडमध्यें आले व क्रियेच्या मागून प्रतिक्रिया व्हावयाची या नियमान्वयें त्यांनीं कट्टया सुधारकांचा एक नवीनच पंथ स्थापन केला. पण ही हकीकत सांगण्यापूर्वीं **मेरी** राणीच्या **फिलिप**शीं झालेल्या लग्नामुळें इंग्लंडच्या परराष्ट्रविषयक राजकारणांत काय फरक झाला हें सांगून हें प्रकरण संपवूं.

१२ फ्रान्स आणि स्पेन—युरोपखंडांत या वेळीं **फ्रान्स** व **स्पेन** हीं दोन राष्ट्रें अत्यंत प्रबळ असून त्यांचे एकमेकांत फार दिवसांपासून तंटे चाललेले असत. '**आठव्या हेन्री**'चा प्रख्यात मंत्री **वुल्से** यानें या दोन्ही राष्ट्रांना आपल्या नादीं कसें लावून ठेवलें होतें हें आपण मागें पाहिलेंच आहे. परंतु आतां बायकोमाणूस गादीवर असल्यामुळें तिला जो वश करून घेईल त्याचें वजन वाढणार होतें. **मेरी**शीं लग्न करून स्पेनच्या राजपुत्रानें हा डाव जिंकला, व फ्रान्सचें पारडें तितक्या मानानें हलकें झालें. लौकरच स्पेनचा वृद्ध बादशहा वानप्रस्थाश्रमी झाला, आणि **मेरी**चा नवरा **फिलिप** स्पेनचा बादशहा झाला. **फिलिप**ला फ्रान्सबरोबर युद्ध पुकारावयाचें होतें, व आतां आपल्या बायकोच्या वशिल्यानें इंग्लंड आपल्यातर्फें फ्रान्सबरोबर लढेल अशी त्याला आशा होती. परंतु **मेरी**चा व **फिलिप**चा लग्नाचा करार ठरला, तेव्हां इंग्रज मुत्सद्यांनीं त्या करारांत अशी एक अट घातली होती कीं, इंग्लंडला केव्हांही स्पेनच्या तर्फेनें फ्रान्सबरोबर युद्ध करण्याला भाग पाडूं नये.

म्हणून फिलिप राजा ज्या वेळीं मेरीचें मन वळविण्यासाठीं इंग्लंडमध्यें आला तेव्हां पार्लमेंटनें फ्रान्सबरोबर युद्ध मांडण्याच्या योजनेस कसून विरोध केला. आपल्या नवऱ्यास खूष करण्यासाठीं मेरीनें आपली शिकस्त करून पाहिली, पण इंग्रज मुत्सद्दी लढाईंत पडण्याला कबूल होईनात.

१३ फ्रान्सच्या दरबाराचा बेत—तिकडे फ्रेंच दरबाराला असें वाटत होतें कीं, मेरी राणीला अंतःकलहांतच गुंतवून ठेवलें म्हणजे इंग्लंडला फ्रान्सच्या वाटेस जाण्याला धीर होणार नाहीं. या हेतूनें स्टॅफर्ड (Stafford) नांवाचा इंग्लिश सरदार मेरी राणीच्या जुलमाला कंटाळून फ्रान्समध्यें येऊन राहिला होता, त्याला फ्रेंच मुत्सद्यांनीं सैन्याची व आरमाराची मदत करून इंग्लंडला पाठविलें. त्यानें एकाएकीं यॉर्क जिल्ह्यांत येऊन मेरीच्या जुलमांतून मुक्त होण्यासाठीं आपल्याला येऊन मिळा असा लोकांना उद्देशून जाहिरनामा काढला. लोक भराभर त्याच्या निशाणाभोंवतीं जमा झाले. परंतु मेरीनें तावडतोब तिकडे सैन्याची रवानगी करून स्टॅफर्ड व त्याचे ३१ साथीदार यांना कैद करून फांसावर चढविलें. पार्लमेंटलाही फ्रान्सच्या या कृत्याचा राग आला. जरी एरवीं फ्रान्सबरोबर युद्ध सुरू करण्याला तें तयार नव्हतें, तरी आतां फ्रान्सनेंच आगळीक केल्यामुळें मेरीनें अखेर इंग्लंडला युद्धांत ढकललें.

१४ इंग्लंड युद्धांत पडलें—सात हजार सैन्य स्पेनच्या मदतीला रवाना झालें, व या संयुक्त सैन्यानें फ्रेंचांचें 'क्वेंटिन' (St. Quentin) ठाणें हस्तगत केलें. उलट फ्रेंचांचा सरदार 'गाईज' (Guise) यानें फ्रान्समधील इंग्रजांचें अत्यंत महत्त्वाचें ठाणें जें ' कॅले ' (Calais) त्यावर हल्ला करून तें आठ दिवसांत हस्तगत केलें. 'कॅले'ला इंग्लंडच्या राजमुकुटांतील अत्यंत तेजस्वी रत्न असें मानीत असत. व 'तिसऱ्या एडवर्ड'नें ११ महिने लढून कॅलेचा किल्ला हस्तगत केल्यापासून आज २०० वर्षें इंग्रज फौजेला फ्रान्समध्यें केव्हांही उतरण्याला तें एक फार सोईचें स्थान होऊन राहिलें होतें. असलें महत्त्वाचें ठिकाण हातचें गेल्याबद्दल सर्व इंग्लंड दुःखानें व लज्जेनें व्याप्त होऊन गेलें.

१५ मेरीचें दुःख—मेरीला ही बातमी कळली तेव्हां तिला खरोखरच रडें कोसळलें. तिची प्रकृति अलीकडे बरी नव्हती, व त्यांतच हा दुःखाचा व निराशेचा चटका बसल्यामुळें ती अगदींच खालावली. तिला मूलबाळ न झाल्यामुळें फिलिपलाही ती आतां नकोशी झाली होती. फिलिप इंग्रजांचा द्वेष्टा असून इंग्रज लोकही

त्याला इंग्लंडमध्यें बेताचाच मान देत असत. तेव्हां त्यानें कंटाळून अलिकडे तर **मेरी**चें नांवच सोडून दिलें होतें. असला नवरा करून घेतल्याबद्दल लोकही तिच्यावर बिथरले होते. तिला आतां बारीक ताप येऊं लागला, व त्यांतच इ० स० १५५८च्या नोव्हेंबर महिन्यांत तिचा अंत झाला. 'माझ्या हृदयावर **फिलिप** व **कॅले** हे शब्द कोरलेले आढळतील' हे तिचे शेवटचे उद्‌गार होत. ती गादीवर आल्यावेळीं लोकांनीं तिचें केवढ्या उत्साहानें स्वागत केलें होतें ? पण तिच्या हट्टी व दुराग्रही स्वभावामुळें व धर्माच्या नांवावर तिनें लोकांचा जो छळ केला त्यामुळें लोकांचीं मनें आतां इतकीं विटून गेलीं होतीं कीं, **मेरी** मेली हें बरें झालें असेंच पुष्कळांना वाटलें, व तिच्याबद्दल कोणींही हळहळलें नाहीं ! तिचा मुख्य सल्लागार **पोल** हाही **मेरी** वारली त्याच दिवशीं मरण पावला.

१६ इलिझाबेथ—आतां राजघराण्यांत कोणी पुरुष वारस नसल्यामुळें इंग्लंडची गादी पुढें कोणाला द्यावी याबद्दल पुन्हां वाटाघाट सुरू झाली. **मेरी**ची सावत्रबहीण '**इलिझाबेथ**' (Elizabeth) ही या वेळीं 'हॅटफील्ड' (Hatfield) येथें नजरकैदेंत होती. पण तिचीं मतें सुधारकांच्या बाजूचीं असल्यामुळें जुन्या मतांच्या मंडळीला ती गादीवर यावयास नको होती. वास्तविक सरळ वारशानें व '**आठव्या हेन्री**'च्या मृत्युपत्रानें तीच गादीची खरी वारस होती. पण तिची आई '**बोलिन**' हिचें '**आठव्या हेन्री**'बरोबर झालेलें लग्न बेकायदेशीर ठरलेलें असल्यामुळें तिला अनौरसत्वाचा डाग लागलेला होता.

१७ स्कॉटलंडची राणी मेरी—**स्कॉटलंड**मध्यें तेथील राणी **मेरी** ही '**आठव्या हेन्री**'च्या बहिणीची वंशज असून वारसाच्या संबंधानें **इलिझाबेथ**च्या खालोखाल तिचा हक्क इंग्लंडच्या गादीवर पोंचत असे. या मेरीचें पूर्वीच फ्रान्सच्या राजपुत्राबरोबर लग्न झालें असून तो आतां फ्रान्सचा बादशहा झाला होता. **मेरी** राणीचीं मतें जुन्या पक्षाचीं होतीं. इंग्लंडचें फ्रान्सबरोबर युद्ध चालू होतेंच. तेव्हां फ्रान्सच्या राजानें ही आयती आलेली संधि साधून **मेरी** हीच इंग्लंडची खरी राणी व आपण इंग्लंडचा राजा असा किताब धारण केला. स्पेनचा बादशहा व पोप हे जुन्या मताचे पुरस्कर्ते असल्यामुळें तेही **इलिझाबेथ**चा हक्क कबूल करीनात.

१८ अडथळे दूर झाले—पण इतक्याही अडथळ्यांना न जुमानतां अखेर बहुतेक प्रमुख इंग्रज मुत्सद्यांनीं व सरदारांनीं **इलिझाबेथ**लाच राज्ञीपद देण्याचें ठरविलें व इ०स०१५५९च्या जानेवारीच्या तेराव्या तारखेस तिला राज्याभिषेक करण्यांत आला.

१९ इलिझाबेथच्या अंगचे गुणावगुण—ही राणी फार गर्विष्ठ व डौली असून तापट स्वभावाची व स्तुतिप्रिय होती. तिला आपल्या सौंदर्याची फार घमेंड असे. पण तिच्या अंगीं बरेच चांगले गुणही होते. आपल्या सर्व कारकिर्दींत योग्य व लायक असेच इसम तिनें आपले मंत्री नेमल्यामुळें त्यांच्या शहाणपणामुळें हिच्या कारकिर्दींत इंग्लंडची भरभराट होऊन इंग्रज राष्ट्राचा लौकिक फार वाढला. सुधारणेचेही (Reformation) ग्रह फिरले. **मेरी**च्या कारकिर्दींत तिला जी उलटी गती मिळाली होती, ती थांबून ती आतां दुप्पट जोरानें पुढें सरसावली. व सुधारकांना जोर येऊन '**जीर्णोद्धारक**' व '**दुर्धारक**' यांजवर कृतकर्मांचें प्रायश्चित्त भोगण्याची पाळी आली. **इलिझाबेथ** राणीनें कट्टे सुधारक व कट्टे दुर्धारक या दोन्ही पक्षांना कह्यांत ठेवून सुधारणेला '**सुवर्णमध्यमार्ग**' आक्रमिण्याला कशी मदत केली हें पुढें पाहूं.

प्रकरण ३४ वें.

सुधारणेचा मध्यकाल !

(इ. स. १५५९—इ. स. १५६८)

[१ इलिझाबेथचें शहाणपण.—२ बेकन आणि बर्ले.—३ कायद्यांतील बदल—समानतेचा कायदा.—४ सुधारणेचें पुढें पाऊल.—५ पोपचा बहिष्कार.—रोमन क्याथोलिक आणि प्रॉटेस्टंट–कॅथोलिकांचे कट व त्यांचा परिणाम.—६ ज्वलज्जहाल सुधारक.—७ इलिझाबेथचा विरोध.—त्यांच्या मतांची प्रगति.—धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य.—८ स्कॉटलंडमधील परिस्थिति.—९ समानशत्रुत्व व मित्रत्व.—१० इंग्लंड–स्कॉटलंडची लढाई—एडिंबरोचा तह.—११ स्कॉटलंडची राणी 'परत' आली—तिचा पुनर्विवाह.—१२ रिझिओ.—१३ डार्न्लेचा शेवट–बॉथवेल—मेरीचा तृतीय विवाह.—१४ सुधारकांचें मेरीशीं भांडण—सुधारकांचा जय—मुरे–मेरीचें पलायन.—१५ इलिझाबेथचा पेंच–मेरीची कैद.]

१ इलिझाबेथचें शहाणपण.—**इलिझाबेथ** गादीवर आल्यामुळें सुधारकांना परमानंद झाला. पण तिनें **मेरी**प्रमाणें एकदम क्रांति घडवून आणण्याचें धोरण

पत्करलें नाहीं. प्रथम प्रथम जुने मंत्री व अधिकारीच तिनें कायम ठेविले, आणि नवीन नेमतांना मात्र आपल्या मताचे नेमण्याची खबरदारी घेतली.

२ बेकन व बर्ले (Bacon and Burleigh)-तिच्या कारकिर्दीतील मंत्र्यांमध्यें '**बेकन**' व '**बर्ले**' हीं नांवें प्रमुख आहेत. 'बर्ले (Burleigh)नें चाळीस वर्षेंपर्यंत **इलिझाबेथ**ची व परंपरेनें इंग्लिश राष्ट्राची इमानें इतबारें सेवा केली. **इलिझाबेथ**ला उत्तम राज्यकर्त्री असें जें नांव मिळालें त्याचें बरेंचसें श्रेय या मंत्र्यालाच दिलें पाहिजे. असो.

३ कायद्यांतील बदल—राज्याभिषेक झाल्यावर **इलिझाबेथ**नें धर्ममतांसाठीं अज्ञातवास, तुरुंगवास, व हद्दपारी भोगीत असलेल्या सर्व सुधारकांना परत बोलाविलें; प्रार्थनाविधि लॅटिन भाषेंत न करितां इंग्लिश भाषेंतच व्हावे असें ठरविलें; लवकरच पार्लमेंटची बैठक भरून **मेरी**च्या कारकिर्दीत झालेले कायदे रद्द करून 'सहाव्या एडवर्ड'च्या कारकिर्दींत जे धर्मसंबंधीं कायदे व धर्मबंधनें होतीं, तेवढ्यांचें पुनरुज्जीवन (Restoration of Protestantism) करण्यांत आलें.* सर्व राज्यांत एकाच तऱ्हेनें परमेश्वरप्रार्थना व्हावी असें '**समानतेचा कायदा**' (Act of Uniformity) करून ठरविण्यांत आलें. हा कायदा जो कोणी मोडील त्याला पहिल्या खेपेला जंगमजप्ती, दुसऱ्या खेपेला एक वर्षाची कैद, व पुन्हां कायदा मोडल्यास जन्मभर कैदेची शिक्षा द्यावी असें ठरलें. रविवार व दुसरे सणाचे दिवस या दिवशीं ठरींव नियमाप्रमाणें प्रार्थना करण्याला जो देवळांत येणार नाहीं त्याला एक शिलिंग दंड करावा असाही कायदा झाला.† मेरीच्या कारकिर्दीत जोग्यांच्या मठांना ऊत आला होता. ते मठ आतां बंद होऊन जोगी व जोगिणी यांना पुन्हां दारोदार भीक मागण्याची पाळी आली.

४ सुधारणेचें पुढें पाऊल—अशा रीतीनें सुधारणेनें पुढें पाऊल टाकण्यास

---

* मागें **सहाव्या एडवर्ड**च्या कारकिर्दींत इंग्लंडमधील ख्रिस्तीधर्म बेचाळीस सूत्रांत गोंवून त्याचें स्वरूप निश्चित करण्यांत आलें होतें. इलिझाबेथच्या कारकिर्दींत या ४२ सूत्रांपैकीं ३ सूत्रें गाळण्यांत येऊन या पंथाला 'एकोनचत्वारिंशत्' सूत्रांचें स्वरूप देण्यांत आलें. हें त्याचें स्वरूप आजमितीसही कायम आहे.

† **इलिझाबेथ**च्या कारकिर्दींत दरसाल सुमारें ९ लाख पौंड कॅथोलिक लोकांवरील दंडाच्या रूपानें वसूल करण्यांत येत असत. (L. B.)

सुरवात केली. पण ही सुधारणा मोठमोठ्या शहरांच्या बाहेर लौकर पसरली नाहीं. खेड्यापाड्यांतून मेरीच्या कारकिर्दींत पुन्हां स्थापन झालेल्या जुन्या रूढीच चालू होत्या. तसेंच ही सुधारणा झाली तरी सगळ्यांना एकदम आवडली होती असेंही नाहीं. जुन्या पक्षाचा विरोध ठिकठिकाणीं होतच होता. पण वर सांगितलेल्या समानतेच्या कायद्यान्वयें ठिकठिकाणचे जुने धर्माधिकारी काढून टाकून नवे धर्माधिकारी नेमण्यांत आले. कांहीं जुन्या मतांचे पाद्री नाइलाजानें कां होईना, पण सुधारकांशीं मिळून मिसळून वागूं लागले. अशा रीतीनें सुमारें ११ वर्षे गेलीं.

५ पोपचा बहिष्कार—इ० स० १५७० मध्यें **पोपनें इलिझाबेथवर बहिष्कार** घातला. तेव्हां जुन्या पक्षाला पुन्हां एकदां जोर येऊन त्या पक्षाच्या मंडळींनीं आपले निराळे संघ स्थापन केले. या लोकांना आतां '**रोमन कॅथोलिक**' (Roman Catholic) अगर नुसते '**कॅथोलिक**' (Catholic) व सुधारकांना '**प्रॉटेस्टंट**' (Protestant) अशीं नांवें रूढ झालीं होतीं. यानंतर **कॅथोलिक** लोकांनीं **प्रॉटेस्टंटां**चा बीमोड करण्यासाठीं इंग्लंडची राज्यव्यवस्थाच मोडून टाकण्याचे पुष्कळ वेळां प्रयत्न केले व त्यामुळें त्यांना कडक शिक्षाही भोगावी लागली. **इलिझाबेथ**च्या कारकिर्दींतच सुमारें दोनशें कॅथोलिकांना राजद्रोहाबद्दल देहांत प्रायश्चित्त भोगावें लागलें.

६ ज्वलज्जहाल सुधारक—इंग्लंडच्या **धर्मसंस्थे**ला (The Church of England) या **कॅथोलिक** लोकांपासून जसा उपद्रव होत असे तसाच सुधारकांपैकींच कित्येकांच्या जहालपणामुळेंही होऊं लागला. मेरीच्या जुलमी कारकिर्दींत सुमारें आठशें लोक देशत्याग करून जर्मनी अगर स्वित्झर्लंडमध्यें जाऊन राहिले होते, व त्यांनीं तेथल्या सुधारकांचीं मतें उचललेलीं होतीं. **जॉन कॅल्व्हिन** हा प्रख्यात सुधारक त्यांचा गुरु होता. **मार्टिन लूथरनें** आरंभ केलेल्या धार्मिक सुधारणेला या कॅलव्हिननें बरीच पुढें ढकलली होती. 'नराचा नारायण' होण्याला मध्यस्थ नको, तें काम स्वप्रयत्नानेंच साध्य होईल; हें त्याच्या पंथाचें मुख्य तत्त्व होतें. **इलिझाबेथ** गादीवर आल्यावर हे लोक इंग्लंडांत आले, तेव्हां त्यांची जुनी आठवण बुजाली नव्हती. जुन्या पक्षाच्या मंडळींचें प्रत्येक कृत्य जुलमाचें आहे अशी त्यांची समजूत झाली होती. व हिंदुस्तानांत वीरशैव आणि वीरवैष्णव हे जसे पूर्वीं एका कालीं एकमेकांला पाण्यांत पहात असत, तसेच हे 'ज्वलज्जहाल' सुधारक (The Puritans) रोमन कॅथोलिकांना व कांहीं अंशीं प्रॉटेस्टंटानाही पाण्यांत पहात असत. जुने

आचार विचार सर्व मोडून टाकून, सर्व धर्मविधींना फाटा देऊन, डामडौल नाहींसा केला पाहिजे, व जुन्या कर्मठांचा बीमोड केला पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. "प्रार्थनेला देवळांतच गेलें पाहिजे असें नाहीं; परमेश्वराची प्रार्थना करावयाची ती घरीं अगर उघड्या मैदानांत बसून केली तरी चालते; बाप्तिस्मा देतांना क्रूसाची खूण केलीच पाहिजे असें नाहीं; लग्नाच्या वेळीं आंगठ्या कशाला? धर्मगुरूचा पांढरा पोषाख, प्रभुभोजनाच्या वेळचें गुडघे टेंकणें, आणि नाना प्रकारचे उत्सव आणि उपवास हीं सर्व ढोंगें आहेत" असें ते प्रतिपादन करीत असत.

७ **इलिझाबेथचा विरोध**—इ० स० १५६६ पासून त्यांनीं प्रार्थनेसाठीं देवळांत जाणें वर्ज्य केलें, व आपापल्या घरीं जमून प्रार्थना करण्याची पद्धत सुरू केली. प्रथम त्यांच्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं, पण पुढें **इलिझाबेथ**ला सुधारणेचा पल्ला इतक्या लांबीवर नेणें बरें नव्हे असें वाटून '**समानतेच्या कायद्या**' ची जारीनें अंमल बजावणी करून या लोकांना वठणीस आणण्याचें तिनें ठरविलें,* व या वीरसुधारकांना (Non-conformists or Puritans) दंड, कैद, व हद्दपारी अशी शिक्षा भोगावी लागूं लागली. पण त्यांच्या मतांचा फैलाव इतक्या जारीनें झाला कीं, लौकरच खुद्द पार्लमेंटचे बरेचसे सभासद त्यांचे अनुयायी बनले. धार्मिक बाबींप्रमाणेंच राजकीय बाबींतही सर्वांना स्वातंत्र्य असलें पाहिजे असें या पक्षाचें म्हणणें होतें. व इंग्लंडला आज जें प्रजास्वातंत्र्य उपभोगावयास मिळत आहे, तें प्राप्त करून देण्याच्या कामीं

---

*रोमवादी व वीर सुधारक या दोघांनाही तरवारीच्या धारेवर धरणाऱ्या या कायद्याला इतिहासांत 'रक्तस्मृति' (Bloody Statute) म्हणजे पाखंड्यांचें रक्त घेणारा कायदा असें नांव दिलेलें आहे. या कायद्यानें ख्रिस्ती धर्मांतील पुढील सहा तत्त्वें प्रत्येकानें मान्य केलींच पाहिजेत असें ठरविण्यांत आलें होतें. तीं तत्त्वें अशीं:—(१)प्रभुभोजनाच्या वेळीं (The Lord's Supper) पाद्र्यानें अभिमंत्रित केलेली भाकर आणि मद्य यांचें अनुक्रमें ख्रिस्ताच्या मांसांत व रक्तांत रूपांतर होतें; (२) या भोजनाच्या वेळीं धर्माधिकारी उपस्थित असलाच पाहिजे; (३) धर्मोपदेशकांनीं (Priests) ब्रह्मचारी राहिलेंच पाहिजे; (४) मठवाशांनीं (Monks) एकदां ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली कीं ती सदैव पाळली पाहिजे (५) धर्मोपदेशकाच्या कानांत पापोच्चारण करून पापनिर्मुक्त होण्याचा प्रायश्चित्तविधि कायम ठेवावयाचा; (६) मात्र, मृताच्या आत्म्याच्या शांतीकरितां कोणालाही खासगी रीतीनें प्रार्थना करण्याची मोकळीक असावयाची.

या वीरसुधारकांच्या बाणेदार व निस्पृही वर्तनानें पुष्कळ मदत केली आहे यांत संशय नाहीं. असो.

८ स्कॉटलंडमधील परिस्थिति—स्कॉटलंडांतही या वेळीं सुधारक व दुर्धारक अगर जीर्णोद्धारक यांमध्यें असेच झगडे चालू होते. तेथली राणी **मेरी** * हिचें फ्रान्सच्या राजाबरोबर लग्न झालें होतें हें मागें सांगितलेंच आहे. ती फ्रान्समध्यें असल्या मुदतींत स्कॉटलंडचा राज्यकारभार तिची आई पहात असे. धार्मिक बाबतींत ती स्वतः 'जुन्या'ची पक्षपाती असल्यामुळें स्कॉटिश सुधारकांशीं तिचें कधींच पटत नसे; पण फ्रेंच शिपाई तिच्या सेवेला हजर असल्यामुळें सुधारकांच्या मसलतीला यश येत नसे.

९ समानशत्रुत्व व मित्रत्व—पण पुढें सुधारकांचा पक्ष प्रबल होऊन स्कॉटलंडमध्यें यादवी माजण्यापर्यंत पाळी आली. तेव्हां मेरीच्या आईनें फ्रान्सची मदत मागितली. व स्कॉट सुधारकांनींही **इलिझाबेथ**कडे मदतीचें मागणें केलें. हे स्कॉट सुधारक इंग्लंडांतील वीरसुधारकांप्रमाणेंच धार्मिक बाबतींत फार पुढें गेलेले असून त्यांचीं मतें **इलिझाबेथ**ला पसंत नव्हतीं. पण मेरी राणी व तिचा फ्रेंच नवरा यांचा इंग्लंडच्या गादीवर डोळा आहे हें तिला माहीत असल्यामुळें समान शत्रुत्वाच्या नात्यानें तिनें या सुधारकांना मदत देण्याचें कबूल केलें.

१० इंग्लंड-स्कॉटलंडची लढाई—समुद्राच्या बाजूनें '**लीथ**' येथें इंग्लिश सैन्य पाठविण्यांत आलें. या सैन्यानें फ्रेंच सैन्याला वेढा दिला. अखेर एडिंबरो (Edinburgh) येथें तह होऊन फ्रेंच सैन्यानें स्कॉटलंडमधून निघून जावें व फ्रान्सच्या राजानें व मेरीनें इंग्लंडचा लोभ सोडावा असें ठरलें. पुढें कांहीं दिवसांनीं स्कॉटलंडच्या सुधारकांचा जय होऊन त्यांनीं तिकडे आपली विशिष्ट धर्मसंस्था (Presbyterianism) स्थापन केली.

११ स्कॉटलंडची राणी 'परत' आली—इतक्यांत मेरीचा नवरा मरण पावला व ती स्कॉटलंडला 'परत' आली. पुढें चार वर्षांनीं तिनें '**डार्नले**'

---

* ही स्कॉटलंडची मेरी राणी ' स्वरुपानें अतिसुंदर, स्वभावानें अति दुर्बल, अत्यंत आकर्षक, आणि उलट पक्षीं अत्यंत आकर्षण-क्षम होती. (The most beautiful, the weakest, the most attractive and most attracted of women)

(Darnley) नामक सरदाराशीं पुनर्विवाह केला.* मेरी राणी रूपानें फार सुंदर असून डार्नलेही फार देखणा होता. परंतु त्याचा स्वभाव फार घाणेरडा असून तो दुर्व्यसनीही होता. त्यामुळें लौकरच मेरीचें व त्याचें पटेनासें झालें. मेरी आपल्याला योग्य तो मान देत नाहीं असें पाहून त्याला फार राग आला व त्यानें मेरीची ज्यांच्या ज्यांच्यावर मर्जी होती त्यांचा सूड घेण्याचा क्रम आरंभिला.

१२ रिझिओ (Rizio)—'**रिझिओ**' म्हणून मेरीचा एक सेक्रेटरी होता; त्याचा **मेरी**शीं कांहीं वाईट संबंध आहे असा संशय येऊन **डार्नले** एके दिवशीं रात्रीं मेरी व रिझिओ अशीं एकत्र भोजन करीत असतां एकदम खोलींत शिरला. त्यानें **रिझिओ**ला ओढून जवळच्या एका खोलींत नेलें व तेथें त्याच्यावर तरवारीचे ५६ वार करून त्याचा प्राण घेतला.

१३ डार्नलेचा शेवट—नवऱ्याच्या या निष्ठुर वर्तनाचा **मेरी**ला फार राग आला; पण ती फार धूर्त असल्यामुळें तिनें आपला राग बाहेर दाखविला नाहीं. पुढें थोड्याच दिवसांनीं **डार्नले** आजारी पडला असतां त्याला दूर एका वाड्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. एके दिवशीं रात्रीं एडिंबरोच्या रहिवाशांना त्या बाजूला मोठा धडाका ऐकूं आला. सकाळीं जाऊन पहातात तर **डार्नले** रहात असे, तो वाडा जमीनदोस्त झाला असून **डॉर्नले**चें प्रेत एका बाजूस पडलें आहे असें आढळून आलें. '**बॉथवेल**' (Bothwell) नामक सरदार **मेरी**च्या अगदीं विश्वासांतला होता; त्यानेंच हें कृत्य केलें असावें असा लोकांना संशय आला. पण तो इतका बलाढ्य व वजनदार मनुष्य होता कीं, त्याची चौकशी व्हावी असें म्हणण्याचाही कोणाला धीर होईना. पण पुढें एक महिन्याच्या आंतच **बॉथवेलनें मेरी**ला 'डनबार' (Dunbar) नामक शहरीं नेलें व तेथें त्यांचा विवाह झाला.

१४ सुधारकांचें मेरीशीं भांडण—ज्यानें डार्नलेचा प्राण घेतला असा लोकांना संशय होता त्याच्याचबरोबर मेरीनें लग्न केलेलें पाहून **मेरी**नेंच **बॉथवेल**च्या सहाय्यानें डार्नलेचा प्राण घेतला याबद्दल लोकांना संशय राहिला नाहीं; व असल्या घातकी राणीस गादीवरून काढून टाकण्याचा सुधारक मुत्सद्यांनीं बेत केला. पुढें बरेच

* या **डार्नले**(Darnley) चें मूळचें नांव **हेन्री स्टुअर्ट** (Henry Stuart) असें असून त्याच्यापासून मेरीला झालेला मुलगा **जेम्स** (Jame VI) हाच पुढें इंग्लंडच्या गादीवर येऊन इंग्लंडच्या नव्या राजवंशाचा (Stuart Dynasty) प्रस्थापक झाला.

सरदार एकत्र होऊन त्यांनीं **मेरी** राणी व तिचा प्रियकर यांना कैद केलें. पण **बॉथवेल** युक्तीनें डेन्मार्क(Denmark) ला पळून गेला. यानंतर **मेरी**कडून स्कॉटलंडच्या गादीवरील तिचा हक्क तिच्या मुलाच्या नांवानें करून घेऊन व ' **मुरे** ' (Murray) नामक सरदाराला राजपालक नेमून घेतल्यावर तिला बंदिवासांत ठेवण्यांत आलें. पण पुढें सुमारें १० महिन्यांनीं **मेरी** तुरुंगांतून पळाली, व थोड्याच अवधींत सहा हजार लोक तिनें जमा केले. सरदार **मुरे** तिच्यावर चालून गेला. **ग्लासगो**(Glasgow)-जवळ उभय पक्षांची लढाई होऊन **मेरी**चा पराभव झाला, व ती जहाजांत बसून दक्षिणेकडे इंग्लंडला पळून आली.

१५ इलिझाबेथचा पेंच—इलिझाबेथ राणीला आतां काय करावें असा विचार पडला. **मेरी**ला आश्रय द्यावा तर तिनें असा घोर अपराध केला होता कीं, असल्या स्त्रीला थारा दिल्याबद्दल जग आपल्याला नांव ठेवील; बरें, तिला घालवून द्यावें, तर कॅथोलिक लोक तिचा आश्रय करून पुढें मागें इंग्लंडवर व आपल्या राजपदावर गदा आणल्याशिवाय रहाणार नाहींत हें तिला माहीत होतें.* शेवटीं तूर्त तिला अटकेंत ठेवून तिच्यावरील आरोपांची न्यायासनापुढें चौकशी करवावी असें ठरवून तिला **बोल्टन** (Bolton)च्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें व तिच्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठीं कमिशन नेमलें. चौकशींत तिच्याविरुद्ध सबळ पुरावा पुढें आला; पण कमिशनरांनीं कायमचा असा कांहींच निकाल दिला नाहीं. तथापि तिच्या अपराधाबद्दल **इलिझाबेथ**ची खात्री झालेली असल्यामुळें इंग्लंडच्या दरबारांत तिला आश्रय न मिळतां **इलिझाबेथ**नें तिला ' शेफील्ड ' (Sheffield) च्या किल्ल्यांत नजर कैदेंत ठेवलें.

---

*इलिझाबेथची आई ॲन बोलिन हिचें हेन्रीशीं झालेलें लग्न कॅथोलिक लोकांच्या दृष्टीनें सशास्त्र नसल्यामुळें त्या लग्नापासून झालेल्या संततीचा इंग्लंडच्या गादीवर कायदेशीर हक्क नाहीं व म्हणून मेरी ट्यूडरच्या मागून स्कॉटलंडच्या मेरी स्टुअर्टचाच इंग्लंडच्या गादीवर हक्क आहे असें कॅथोलिक लोक मानीत असत. या मेरीचें लहानपणींच फ्रान्सच्या फ्रान्सिस (Francis II) राजाशीं लग्न झालें होतें. लग्नानंतर या दांपत्यानें (Couple) आपल्या नांवांपुढें फ्रान्स आणि स्कॉटलंड यांचीं राजा-राणी (King and Queen of France and Scotland) या पदाला ' इंग्लंडचा राजा व राणी ' (King and Queen of England) हेंही पद जोडून घेतलें. त्यामुळें अर्थातच इलिझाबेथला राग येऊन ती मेरीविषयीं साशंक होती.

प्रकरण ३५ वें.

अस्तनींतला सर्प !

(इ. स. १५६८-इ. स. १५८७).

[१ सुधारक व दुर्धारक यांमधील झगडे.—२ फ्रान्समधील परिस्थिति.—३ इलिझाबेथच्या विरुद्ध कट.—४ नॉरफोक—नॉर्दंबरलंड व वेस्टमूरलंड.—५।६ पोपचा बहिष्कार-दुसरा कट—नॉरफोकचा अंत.—७ जेजुइट पंथ.—८ त्यांचे अत्याचार.—९ तिसरा कट—जेजुइट लोकांची हकालपट्टी.—१० चौथा कट.—११ मेरीची चौकशी—फांशीची शिक्षा.—१२ मध्यस्थी—इलिझाबेथपुढील पेंच.—१३ मेरीचें मरण-वधस्तंभाकडील हकीकत.]

१ सुधारक-दुर्धारकांमधील झगडे—इलिझाबेथनें मेरीला इंग्लंडमध्यें आश्रय देऊन तिला जिवंत राखली; पण तिच्या पायीं पुढें **इलिझाबेथ**चाच जीव घेण्याचे कट होऊं लागले. सर्व युरोपखंडभर या वेळीं सुधारक व दुर्धारक यांचे मध्यें भयंकर झगडे चालू होते†. फ्रान्स व स्पेन येथील बादशहा जुन्या पक्षाचे कैवारी असून जर्मनी, स्वित्झर्लंड, हॉलंड वगैरे देशांचे राजे सुधारक पक्षाचे होते. प्रत्येक देशांत दोन्ही पक्षांचे लोक एकमेकांचा नायनाट करण्यासाठीं टपत असत. व 'समानशील-व्यसनेषु सख्यम्' या न्यायानें एका देशांतील सुधारक अगर दुर्धारक लोकांचा दुसऱ्या देशांतील समानमतवाद्यांकडे साहजिकच ओढा असल्यामुळें ते एकमेकांना मदत करण्याला तयार असत.

---

† एकाच धर्माच्या दोन पंथांमध्यें हा जो आत्मवर्चस्वासाठीं झगडा चालला होता, त्यांत खुद्द इंग्लंडमध्येंच किती लोक प्राणास मुकले हें एका ठिकाणीं नमूद केलें आहे तें असें:—सहाव्या एडवर्डच्या अज्ञानावस्थेंत कारभारी मंडळानें रोमन-कॅथोलिक लोकांचा जो छळ केला, त्यांत त्या पंथाचे सात हजार लोक रणांगणावर किंवा सुळावर चढविल्यामुळें मृत्यु पावले. इलिझाबेथची कारकीर्द धार्मिक बाबतींत जरा उदारपणाविषयीं प्रसिद्ध होती. पण तिच्याही कारकिर्दींत दोन अडीचशें लोकांना धर्मासाठीं प्राणार्पण करण्याचा प्रसंग आलाच. मेरीची कारकीर्द तर काय 'रक्तपाताची' (Bloody) म्हणूनच प्रसिद्ध आहे. तिच्या कारकिर्दींत तीन वर्षांत तीनशें प्रॉटेस्टंट पंथीयांना अग्निदिव्य करावें लागलें !

२ **फ्रान्समधील परिस्थिति**—फ्रान्स देशांत सुधारक व पोपवादी रोमन कॅथोलिक मंडळी यांमध्यें उघड युद्ध सुरू असून **इलिझाबेथ**चा ओढा सुधारकांकडे असल्यामुळें त्यांनीं **इलिझाबेथ**ची मदत मागितली व तिनेंही त्यांना मदत करून इ० स० १५६२ त '**कॉंडी**' (Conde) नामक तेथल्या सुधारकांच्या पुढाऱ्याकडून (The Leader of The Huguenots) '**हावरे**' (Havre) प्रांत बक्षिस मिळविला. पण पुढील वर्षीं फ्रान्समधील ही यादवी थांबून इंग्रजांना हावरे प्रांतांतून निघून यावें लागलें.

३ **इलिझाबेथच्या विरुद्ध कट**—युरोपांतील रोमन कॅथोलिक लोकांना असें वाटत असे कीं, इंग्लंडमधून जर सुधारकी मतांचा (Protestantism) नायनाट करतां आला तर बाकीच्या देशांत त्यांचा बींमोड होण्यास वेळ लागणार नाहीं. पण इंग्लंडची खुद्द राणीच सुधारकांच्या बाजूची असल्यामुळें ती गादीवर असेपर्यंत तेथल्या सुधारकांचा छळ कसा करतां येणार ? तेव्हां अगोदर तिला गादीवरून काढून टाकून तिच्या जागीं रोमन कॅथोलिक मताच्या माणसाची नेमणूक करावी असें ठरवून **इलिझाबेथ**च्या खालोखाल वारसाच्या हक्कानें **स्कॉटलंड**च्या **मेरी** राणीचाच इंग्लंडच्या गादीवर हक्क असल्यानें **इलिझाबेथ**ला पदच्युत करून **मेरी**ला इंग्लंडच्या गादीवर बसविण्याबद्दल इंग्लंडमधील, व फ्रान्स, स्पेन वगैरे देशांतील **मेरी**च्या दोस्तांनीं खटपट आरंभिली.* तिचीं स्काटलंडमधील दुष्कृत्यें अद्यापि डोळ्यांसमोर असल्यामुळें

---

* इलिझाबेथचा व मेरीचा संबंध दर्शविणारी वंशावळ येणेंप्रमाणें आहे:—

सातवा हेन्री (ट्यूडर)

मार्गारेट × चौथा जेम्स (स्कॉटलंडचा राजा) | **आठवा हेन्री**
पांचवा जेम्स (,, ,,) | **इलिझाबेथ** (इंग्लंडची राणी)
मेरी (स्कॉटलंडची राणी) × डार्नले (**हेन्री स्टुअर्ट**)
सहावा जेम्स (हा इलिझाबेथच्या पश्चात् '**पहिला जेम्स**' म्हणून इंग्लंडच्या गादीवर आला.)

प्रथम प्रथम बरेच लोक तिच्या बाजूला जावयास नाखूष असत. पण एकदोन वर्षांनीं हळू हळू त्या दुष्कृत्यांची आठवण बुजत जाऊन बरेच सरदार तिला गादीवर बसविण्याच्या कटांत सामील होऊं लागले. **इलिझाबेथ**चा या वेळचा मुख्य मंत्री '**बर्ले**' याचें महत्त्व फार वाढल्यामुळें त्याचा हेवा करणारे जे कित्येक दरबारी सरदार होते, तेही **बर्ले**चा नाश करण्यासाठीं म्हणून या कटांत सामील झाले.

४ नॉरफोक—**मे**रीला कैदेंतून सोडवून तिला इंग्लंडची गादी द्यावी, व **नॉर**फोक (Norfolk) सरदारानें तिजबरोबर लग्न लावावें असा बेत ठरला. परंतु हा कट लौकरच उघडकीस येऊन **नॉर**फोकची लंडनच्या किल्ल्यांत रवानगी झाली. इ. स. १५६९ या वर्षीं '**नॉ**र्दंबरलंड' (Northumberland) व 'वेस्टमूरलंड' (Westmoreland) या दोन बड्या सरदारांनीं उत्तरेकडे बंड उभारलें; पण राजसैन्य त्यांच्यावर चालून गेलें तेव्हां ते **स्कॉ**टलंडमध्यें पळून गेलें. त्यांच्या सुमारें ६०० अनुयायांना यॉर्क व डरह्याम (Durham) या जिल्ह्यांतील शहरांतून व खेड्यांतून फांसावर चढविण्यांत आलें. पुढें थोड्या दिवसांनीं 'पुन्हां असें करणार नाहीं' असें वचन घेऊन **नॉर**फोकची सुटका करण्यांत आली.

५ पोपचा बहिष्कार—पुढल्या वर्षीं **पो**पनें **इलिझाबेथ**ला पुन्हां बहिष्कार घातला, व ती ख्रिस्ती नाहीं त्या अर्थीं तिच्या ख्रिस्ती प्रजेला तिचे हुकूम मानण्याचें कारण नाहीं म्हणून ठराव (Bull of Excommunication and Deposition) जाहीर केला. पुन्हां तिला गादीवरून काढून टाकण्याचे गुप्त कट सुरू झाले. **नॉर**फोकनें **मे**रीशीं लग्न लावावें, व स्पेनमधून **आल्व्हा** (Alva) नामक सरदार सैन्यानिशीं इंग्लंडमध्यें येऊन दाखल झाल्याबरोबर सर्व इंग्लंडनें एकदम हातांत शस्त्र घेऊन उठावें असा बेत ठरला. पण केवळ आकस्मिक रीतीनें हा कट उघडकीस येऊन कटवाल्यांना शिक्षा भोगावी लागली.

६ श्रूसबेरी(Shrewsbury)चा एक व्यापारी लंडनमधून परत आपल्या गांवीं जात होता. **नॉर**फोकच्या एका नोकरानें त्याजकडे एक गाठोडें देऊन 'यांत एक यादी आहे, ती **नॉर**फोकच्या 'श्रॉप' (Shrop) जिल्ह्यांतील एजंटाकडे नेऊन दे' म्हणून त्याला सांगितलें. त्या व्यापाऱ्यानें तें कबूल केलें. पण वाटेंत त्याला तो बोजा जडसा वाटला म्हणून त्यानें उघडून पाहिलें, तों आंत सहाशें पौंडांचें सोनें असून सांकेतिक लिपींत लिहिलेलें एक पत्र होतें. तो तावडतोब परत फिरला व त्यानें तें गांठोडें व

तें पत्र नेऊन ' **बर्ले** ' (Burleigh) च्या हवालीं केलें. त्या पत्रावरून या कटाच्या बातमीचा सुगावा लागला. आणि **नॉरफोक**ला अखेर इ० स० १५७२ मध्यें राजद्रोहाबद्दल देहांत शिक्षा भोगावी लागली. उत्तरेकडील ' **नार्दंबरलंड** ' हा सरदारही थोड्या दिवसांनीं **इलिझाबेथ**च्या हातीं लागला व त्यालाही देहांत शासन झालें.

७ जेझुइट पंथ—मेरीला गादीवर बसविण्याचे हे दोन प्रयत्न फुकट गेले. पण येवढ्यानें रोमन कॅथोलिक लोक स्वस्थ बसले नाहींत. त्यांच्यांत **जेझुइट** (Jesuit) नांवाचा एक नवीन पंथ उत्पन्न झाला होता. या पंथांतील लोक रोमच्या पोपचे कट्टे भक्त असून ते ' पागल सुधारकां'ची सरसहा कत्तल व खून करून पोपचा झेंडा जिकडे तिकडे फडकविला पाहिजे व या कामीं साधनांच्या बरे-वाईटपणाकडे पहाण्याचें कारण नाहीं अशा मताचे होते.

८ जेझुइटांचे अत्याचार—त्यांनीं फ्रान्स देशांत अतिगुप्तपणानें इ० स० १५७२ मध्यें ' **बार्थोलोम्यू** ' (Bartholomew) साधूच्या जयंतीच्या दिवशीं पारिस येथें पांचशें सरदार-दरकदार व दहा हजार इतर लोक यांची, ते केवळ सुधारक मताचे होते म्हणून, कत्तल केली. फ्रान्समधील इतर शहरांतूनहीं पिसाळलेल्या कुत्र्यामागें लोक लागतात, तसे हे लोक सुधारकांच्या मागें लागले आणि जिकडे तिकडे सुधारकांचा संहार सुरू होऊन पोपनें या अपूर्व विजयाबद्दल परमेश्वराचे आभार मानले ! हॉलंड (Holland) मध्यें ' **ऑरेंज** ' (Orange)चा **संस्थानिक** (Prince) सुधारकांचा प्रमुख होता त्याचाही पुढें लौकरच खून झाला. आतां प्रमुख सुधारक तत्त्वाधिपतींपैकीं **इलिझाबेथ**च काय ती शिल्लक राहिली.

९ तिसरा कट—इ० स० १५८४ या वर्षी इंग्लिश खाडींत संशयावरून एक गलबत पकडण्यांत आलें. त्या गलबतावर दोन रोमन कॅथोलिक पाद्री होते. त्यांच्या-कडे जे कागदपत्र सांपडले त्यावरून **इलिझाबेथ**चा खून करून स्पेनच्या राजाला इंग्लंडवर स्वारी करावयास बोलवावयाचें असा जेझुइट लोकांनीं कट केला असल्याचें आढळून आलें. ताबडतोब या आततायी ख्रिस्तभक्तांविरुद्ध कडक कायदे करण्यांत आले. 'चाळीस दिवसांच्या आंत सर्व जेझुइट व रोमन कॅथोलिक पाद्र्यांनीं इंग्लंड सोडून निघून जावें; या मुदतीनंतर या मंडळीपैकीं कोणी इंग्लंडमध्यें राहिल्यास व त्यांना इंग्लंडमध्यें कोणीं थारा दिल्यास त्यांना फांसावर चढविण्यांत येईल' असें फर्माविण्यांत आलें. या फर्मानाप्रमाणें पुढें कित्येक लोकांना देहांत प्रायश्चित्तही मिळालें.

१० चौथा कट—इ० स० १५८६ या वर्षी 'बॉलर्ड'(Ballard) नांवाचा एक रोमन कॅथोलिक पाद्री शिपायाच्या वेषानें इंग्लंडमध्यें आला, आणि त्यानें **इलिझाबेथ**चा खून करून **मेरी**ला गादीवर बसविण्याचा पुन्हां एक कट केला. '**डर्बी**' (Derby) जिल्ह्यांतील **बेबिंगटन** (Babington) नांवाचा एक तरुण गृहस्थ त्याला मिळाला. या **बेबिंगटन**नें **इलिझाबेथच्या** दरबारांतील कित्येक नोकर आपलेसे करून घेतले. या नोकरांपैकीं सहा असामींनीं ठराविक इशारत मिळतांच **इलिझाबेथ**चा खून करण्याचें कबूल केलें. **मेरी** राणीच्या वाड्यांतील मंडळीला दारू पुरविणारा एक कलाल (a brewer) होता. त्याच्या मार्फत या गुप्त मंडळीचा **मेरी**शीं पत्रव्यवहार सुरू झाला. पण **इलिझाबेथ**चा '**वॉल्सिंगहॅम**' (Walsingham) नांवाचा एक सेक्रेटरी होता, त्याचे **गुप्त** हेर त्याला या कटाची सर्व बातमी पुरवीत असत. **बेबिंगटन**चा **मेरी**शीं चाललेला सर्व पत्रव्यवहार **वॉलसिंगहॅम**ला समजत असे. या कटाची सर्व तयारी झाल्याचें समजतांच **वॉलसिंगहॅम**नें अचानक सर्व कटवाल्यांना पकडलें, व त्यांतल्या मुख्य मुख्य चौदा असामींना फांसावर चढविलें.

११ मेरीची चौकशी—**बेबिंगटन**च्या कटांत सामील असल्याचा भरपूर पुरावा मिळाल्यामुळें आतां **मेरी**ची उघड चौकशी करण्याचें ठरलें. प्रमुख अशा छत्तीस सरदारांचें एक कमिशन नेमून त्या कमिशनकडे **इलिझाबेथ**चा खून करण्याच्या कटांत सामील असल्याबद्दल **मेरी**ची चौकशी करण्याचें काम सोपविण्यांत आलें. प्रथम **मेरी**नें आपली चौकशी करण्याचा या कमिशनला अधिकार नाहीं असें सांगितलें, पण शेवटीं ती जाब देण्याला कबूल झाली. तिनें या कटांत आपलें मुळींच आंग नाहीं असा जबाब दिला. परंतु स्वतः **बेबिंगटन**ची व तिच्या स्वतःच्याच खासगी सेक्रेटरीची कबुली व शिवाय तिच्या हातचीं पत्रें पुढें आलीं. अखेर बरेच दिवस चौकशीचें काम चालल्यावर कमिशनरांनीं **मेरी**वरील आरोप शाबीत धरून तिला देहांत शिक्षा सुनावली. पार्लमेंटची बैठक भरून ही शिक्षा कायम करण्यांत आली; आणि ती अमलांत आणण्यासाठीं **मेरी**च्या मृत्यूचें वारंट सहीसाठीं **इलिझाबेथ**कडे आलें !

१२ मध्यस्थी—दरम्यान पोप व स्पेनचा राजा यांनीं फ्रान्सच्या राजाच्या मध्यस्थीनें **मेरी**ला जिवंत राखण्याविषयीं **इलिझाबेथ**ची विनंति केली. **मेरी**चा मुलगा **जेम्स** स्कॉटलंडमध्यें राज्य करीत होता, त्यानेंही **इलिझाबेथ**चें मन वळविण्याची थोडीशी खटपट केली. **इलिझाबेथ**ला आतां पंचाईत येऊन पडली. न्यायाच्या व

इंग्लंडच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें **मेरीला** फांशीं देणेंच योग्य आहे असें तिला वाटत होतें. पण तिच्या मरणाला आपण कारण झालों असें दाखविणेंही तिला बरें वाटेना. कांहीं महिने अशा स्थितींत गेले. जिकडे तिकडे गुप्त कट, विश्वासघात, व स्पेनच्या स्वारीची हूल उठून सर्व लोक अस्वथ झाले. **मेरीला** फांसावर चढविण्याला मागेंपुढें पाहूं नका असें **इलिझाबेथला** वारंवार सांगण्यांत येऊं लागलें. शेवटीं तिनें आपला सेक्रेटरी '**डेव्हिसन**' (Davison) यास **मेरीच्या** मृत्यूचें वारंट पुढें आणण्यास सांगितलें; आणि त्यानें तें आणल्यावर **इलिझाबेथनें** त्याच्यावर सही केली. दुसऱ्या दिवशीं पुन्हां तिचा बेत फिरून तिनें डेव्हिसनकडे तें वारंट परत मागितलें. पण 'तें आतां आपल्या हातीं नाहीं, अंमलबजावणीसाठीं रवाना झालें,' असें तो म्हणाला. त्या वेळीं **इलिझाबेथ** बरीच रागावलेली दिसली. पुढें दरबारी मंडळीनें तिला जास्त त्रास न देतां 'श्रूसबेरी' (Shrewsbury) व 'केंट' (Kent) या दोन सरदारांकडे त्या वॉरंटाची अंमलबजावणी करण्याचें काम सोंपविलें.

१३ मेरीचें मरण—मेरी रहात असलेल्या वाड्यांतच काळ्या कपड्यानें वेष्टिलेला वधस्तंभ उभा करण्यांत आला. सुमारें तीनशें सरदार व सभ्य गृहस्थांना हा फांशीं देण्याचा विधी पहाण्याची मोकळीक दिली होती. सकाळीं आठ वाजतां **मेरी** राणी काळा बुरखा घेऊन वधस्तंभाकडे आली. थोडा वेळ ईशप्रार्थनेंत गेल्यावर तिच्या दासींनीं तिचा काळा झगा काढून घेतला, व मांगानें दोन घावांत या दुर्दैवी राणीचें शीर धडापासून वेगळें केलें. रक्तबंबाळ झालेलें तिचें शीर प्रेक्षकांना दिसावें म्हणून वर धरण्यांत आलें. तेव्हां '**पीटरबरो**' (Peterborough) चा 'डीन' (Dean) ओरडून म्हणाला, 'राणीच्या सर्व शत्रूंचा असाच निःपात होवो!'* प्रेक्षक म्हणाले 'तथास्तु!' अशा रीतीनें स्कॉट लोकांची राणी **मेरी** हिचा शेवट झाला, व इंग्लिश सुधारकांच्या अस्तनींतला हा सर्प–अथवा ही नागीण–नाहींशी झाल्यामुळें त्यांना हायसें वाटलें !

---

* So perish the enemies of our Queen.

प्रकरण ३६ वें.

गर्वाचें घर खालीं !

(इ. स. १५८७—इ. स. १५९६)

[१ स्पेनच्या राजाची महत्त्वाकांक्षा—इंग्रज व स्पॅनिश नाविकांचे तंटे.—२ ड्रेक—स्पेनची तयारी.—३ अजिंक्य आरमार—मेदिना सिदोनिया—प्रथमग्रासे मक्षिकापातः.—४ इंग्लंडची तयारी—धर्मराजाचें तत्त्व.—५।६ इंग्रजांची देशभक्ति—हॉवर्ड—इंग्रज नाविक.—७ दोन्ही आरमारांची उपस्थिति.—८ इंग्रजी आरमाराची चलाखी.—९ लढाई—अजिंक्य आरमाराचा शेवट.—१० स्पेनच्या सैनिकांची दुर्दशा.—११ इंग्लिश नाविकांचें धैर्य—समुद्रस्वामिनीचा मान.]

१ स्पेनच्या राजाची महत्त्वाकांक्षाः—स्पेनचा राजा **फिलिप** याच्या मनांतून पुष्कळ दिवस इंग्लंडवर स्वारी करावयाची होती. तो पक्का रोमन कॅथोलिक मताचा असून सुधारकांचा बीमोड करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें त्यास वाटत असे. इंग्लंडमध्यें सुधारकांचा दिवसेंदिवस होत असलेला विजय व या सुधारकांकडून हॉलंडमधील आपल्या सुधारक शत्रूंना वेळीं अवेळीं होत असलेली मदत पाहून त्याच्या अंगाचा संताप होत असे. शिवाय एकदां त्यानें **इलिझाबेथ**कडे लग्नाबद्दल मागणी घातली असतां तिनें त्याला साफ धुडकावून लावलें होतें. या तिच्या उद्दामपणाबद्दल तिचें चांगलें पारिपत्य झालें पाहिजे असेंही त्याच्या मनांत होतें. त्याचप्रमाणें या वेळीं अमेरिका खंडांतून जीं सोन्यारुप्याचीं गलबतें भरून स्पेनला येत असत, त्यांबद्दल इंग्रजांना वैषम्य वाटत असून इंग्लिश व स्पॅनिश नाविकांचे समुद्रावर तंटे होऊन कित्येक वेळां लढाईपर्यंतही पाळी येत असे.*

२ ड्रेक (Drake)—एकदां ' **ड्रेक** ' या नांवाच्या एका इंग्रज आरमारी वीरानें स्पेनच्या **कॅडिझ** (Cadiz) बंदरांत प्रवेश करून तेथल्या शंभर गलबतांना

---

*स्कॉटलंडची राणी मेरी हिचा इंग्लंडच्या गादीवर जो वारसाचा दूरचा हक्क होता, तो तिनें वधस्तंभावर जातांना स्पेनच्या राजाच्या मुलीस दिला होता. तेव्हां हा हक्क इलिझाबेथकडून मान्य करून घेणें हेंही फिलिपच्या या इंग्लंडवरील स्वारीचें एक कारण होतें असें म्हणतात.

आग लावून दिली. तेव्हां फिलिप राजानें आपल्या समुद्रावरील अप्रतिहत सत्तेला प्रतिबंध करूं पाहणाऱ्या या 'पाखंडी' इंग्रज लोकांची कायमची खोड मोडण्याचा निश्चय करून एक प्रचंड आरमार तयार करण्याचें ठरविलें. स्पेनमधील प्रत्येक देवळांतून धर्मोपदेशकांनीं इंग्रजांविरुद्ध स्पॅनिश लोकांची मनें चिथावून दिलीं, आणि स्पेनमधील सगळ्या सरदार घराण्यांतील तरुण सरदार या धार्मिक मोहिमेवर जाण्यास तयार झाले.

३ अजिंक्य आरमार—थोड्याच दिवसांत सर्व तयारी झाली. सुमारें १३० मोठमोठ्या गलबतांवर चोवीसशें पितळी व लोखंडी तोफा बसविण्यांत आल्या, व आठ हजार खलाशी, एकोणीस हजार शिपाई, एक हजार स्वयंसैनिक व सहाशें धर्मोपाध्ये* इतके लोक या मोहिमेंत सामील झाले. स्पॅनिश लोकांना या मोहिमेच्या यशस्वीपणाबद्दल इतकी खात्री होती कीं, त्यांनीं या आपल्या आरमाराला '**अजिंक्य आरमार**' (Invincible Armada) असें नांव दिलें. '**मेदिना सिदोनिया**' (Medina Sidonia) नांवाचा सरदार या आरमाराचा मुख्य झाला. '**पार्मा**' (Parma) नांवाचा दुसरा एक स्पॅनिश सरदार उत्तरेकडे हॉलंडमध्यें होता; त्यानें आपल्या तीस हजार लोकांनिशीं या नाविक दलाला येऊन मिळावें असें ठरलें. इ० स० १५८८ च्या मे महिन्याच्या २९ वे तारखेस '**मेदिना सिदोनिया**' हा आरमारी सेनापती '**टेगस**' (Tagus) नदींतून बाहेर पडला. परंतु 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' व्हावा त्याप्रमाणें हा सेनापति बाहेर पडला तोंच समुद्रांत मोठें वादळ उठून त्याचीं गलबतें नादुरुस्त झालीं. तेव्हां तीं दुरुस्त करण्यासाठीं त्याला '**कारुना**' (Caruna) नांवाच्या बंदरांत थोडे दिवस रहाणें भाग पडलें.

४ इंग्लंडची तयारी—इकडे इंग्लंडमध्यें सरकारी गलबतें अशीं फक्त ३८ होतीं; व तींही स्पेनच्या गलबतांपेक्षां कितीतरी लहान होतीं. पण स्पॅनिश लोक आपल्या देशावर स्वारी करून इंग्लंडला स्पेनच्या बादशहाचा अंकित करून टाकणार ही बातमी समजल्याबरोबर इंग्लंडमधील सर्व प्रजेचें रक्त उसळलें. सरदार, व्यापारी, व इतर श्रीमंत नागरिक यांनीं आपल्याजवळचा पैसा राणीच्या हवालीं केला; व

*हे धर्मोपदेशक इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवतांच तेथल्या धर्मभ्रष्ट लोकांना प्रायश्चित्त देऊन पावन करून घेण्यासाठीं निघाले होते !

थोड्याच दिवसांत स्पेनच्या आरमाराला तोंड देण्यासाठीं नव्या तऱ्हेचीं शंभर हलकीं व लहान आकाराचीं व्यापारी गलबतें एकत्र झालीं. रोमन कॅथोलिक व प्रॉटेस्टंट सुधारक यांमध्यें तंटे चालले होते ते एकदम मिटले. कारण ' इंग्रज ' **रोमन कॅथोलिक**, ' इंग्रज ' **सुधारकांचा** जरी द्वेष करीत, तरी ' आपल्या ' इंग्लंड देशावर ' परकी ' **स्पेन**च्या राजाची सत्ता त्यांना नको होती. ' परस्परविरोधे तु वयं पंच च ते शतम् । अन्यैः सह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम् ' हें धर्मराजानें एका प्रसंगीं सांगितलेलें तत्त्व देशभक्त इंग्रजांच्या मनांत चांगलें बिंबलें असल्यामुळें या महदापत्तीच्या प्रसंगीं सर्व इंग्रज प्रजा आपल्यांतील भेदभाव विसरून एक झाली.

५ इंग्रजांची देशभक्ति—इंग्रजांचीं गलबतें स्पेनच्या गलबतांपेक्षां लहान असलीं तरी चौदा हजार धाडशी खलाशी देशभक्तीनें प्रेरित होऊन स्पॅनिश लोकांशीं सामना देण्यास तयार झाले होते. ' **हॉवर्ड** ' (Howard) नांवाचा रोमन कॅथोलिक इंग्रज सरदार या आरमाराचा सेनापति झाला; आणि जमिनीवर लढण्यासाठीं सत्तर हजार सैनिक तयार झाले. यांपैकीं २० हजार सैन्याची इंग्लंडचा दक्षिण किनारा सांभाळण्याकडे योजना झाली, वीस हजार सैन्यानें स्पॅनिश लोक इंग्लंडमध्यें ज्या ठिकाणीं उतरण्याचा प्रयत्न करतील त्या ठिकाणीं त्यांना अडथळा करावा असें ठरलें, व उरलेलें तीस हजार सैन्य **लंडन** राजधानीच्या रक्षणार्थ ठेवण्यांत आलें.

६ इलिझाबेथ राणी सैन्याला हुरूप आणण्यासाठीं स्वतः घोड्यावर स्वार झाली, व सैन्याच्या तळावर जाऊन, ' मी बायको माणूस असलें तरी शत्रूला शरण जाण्यापेक्षां तुमचा पुढाकार घेऊन समरांगणीं मरण पत्करीन, तुम्ही मात्र आपलें कर्तव्य विसरूं नका ' असा तिनें सैन्याला उपदेश केला. आरमारी सेनापति **हॉवर्ड** याच्या हाताखालीं काम करण्यासाठीं त्या काळचे प्रख्यात नाविक **ड्रेक** (Drake), **हॉकिन्स** (Hawkins), व **फ्रॉबिशर** (Frobisher) हे तयार झाले. व लौकरच सुमारें १९० इंग्लिश गलबतें इंग्लिश खाडींत संचारार्थ सज्ज झालीं.

७ दोन्ही आरमारांची उपस्थिति—जुलैच्या १९ व्या तारखेस संध्याकाळीं स्पेनचें ' **अजिंक्य आरमार** ' जवळ आलें अशी किनाऱ्यावरील टेहळ्यांनीं बातमी सांगितली. लागलेच सर्व सैनिक आपापल्या जागीं हजर झाले. **हॉवर्ड** आपला ' **काफिला** ' घेऊन बाहेर पडला. स्पॅनिश आरमारानें अर्धचंद्राकार व्यूह करून सात मैलांचा टापू व्यापला आहे असें त्यास आढळून आलें. होतां होईतों स्पॅनिश गलबतांच्या

जवळ जावयाचें नाहीं, दुरून हल्ला करावयाचा असें धोरण त्यानें ठेविलें. आणि इंग्लिश गलबतांचा आकार लहान असल्यामुळें त्याचें हें धोरण यशस्वीही झालें.

८ इंग्रजी आरमाराची चलाखी—स्पॅनिश गलबतें (galleons) उंच व अवज (unwieldy) असल्यामुळें तीं मंद गतीनें फिरत व त्यांवरून सोडलेले गोळे इंग्लिश गलबतांच्या शिडांवरून जाऊन त्यांना न लागतां समुद्रांत पडत. उलट पक्षीं इंग्लिश गलबतांवरून सोडलेले गोळे अवाढव्य स्पॅनिश गलबतांना कोठें ना कोठें तरी लागतच, व तितक्यांत हीं जलद चालणारीं इंग्लिश गलबतें स्पॅनिश गलबतांच्या टप्प्यांतून झटकन निघून जात. स्पॅनिश गलबतांतून एक गोळा सुटतो इतक्यांत इंग्रजांकडून चार गोळे येऊन पडत. इंग्रजांच्या या चलाखीचें स्पॅनिश लोकांना आश्चर्य वाटलें, व त्यांचीं गलबतें सरदार **पार्मा**च्या सैन्याला आणण्यासाठीं पुढें फ्रान्सच्या किनाऱ्यावर **कॅले** येथें निघून गेलीं. आतां इंग्रज नाविकांना अधिक धीर येऊन त्यांनीं त्यांचा पाठलाग करण्याचें ठरविलें, व त्यांनीं बरींच स्पॅनिश गलबतें पकडून इंग्लंडच्या किनाऱ्याला आणलीं.

९ लढाई—'**मेदिना सिदोनिया**' कॅले बंदरांत जाऊन पोहोंचला व त्या ठिकाणीं **पार्मा**च्या सैन्याची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. इतक्यांत एक दिवस रात्रीं **हॉवर्ड**नें आठ 'अग्निनौका' (fire-ships) काळोखांतून स्पॅनिश गलबतांवर सोडून त्यांना आग लावली. स्पॅनिश नाविक भीतीनें गांगरून जाऊन गलबतांचे दोर तोडून सकाळीं परत येऊं म्हणून आपापलीं गलबतें हांकारून बंदराच्या बाहेर आले. हें पाहून **हॉवर्ड** पेटलेल्या अग्नि-नौकांच्या उजेडाच्या सहाय्यानें स्पॅनिश गलबतांवर तुटून पडला. त्यानें त्यांची अधिकच दाणादाण झाली. '**अजिंक्य आरमारा**'नें आतां खरोखरच पळ काढला, व त्या गडबडींत त्यांतलीं बरींचशीं गलबतें एकमेकांवर आपटून फुटलीं.

१० स्पेनच्या सैनिकांची दुर्दशा—दुसऱ्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत इंग्रजांच्या गलबतांनीं स्पॅनिश गलबतांचा पाठलाग करून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. अखेरीस दारूगोळा संपल्यामुळें इंग्लिश गलबतांनीं पाठलाग करण्याचें सोडलें, व स्पॅनिश आरमारी सेनापती उत्तरेकडे 'उत्तर समुद्रां'त निघून गेला, तो पुन्हां या इंग्रज शत्रूंना तोंड दाखविण्यास आला नाहीं. चार हजार स्पॅनिश सैनिक बुडून मेले; त्यांच्या गलबतांवर जखमी शिपायांचीच गर्दी

झाली; गलबतांना जिकडून तिकडून भोकें पडून तीं नादुरुस्त झालीं; खालीं यावें तर इंग्लिश आरमार वाट अडवून बसलेलें; तेव्हां उत्तरेकडे जाऊन स्कॉटलंडला वळसा घालून पुढें अटलांटिक महासागरांत शिरावें असा स्पॅनिश आरमाराधिपतीनें बेत केला. पण तिकडच्या समुद्रांतील वाटांची त्याला माहिती नसल्यामुळें व तितक्यांत तिकडे भयंकर वादळ उठल्यामुळें त्याचीं बरीचशीं गलबतें खडकावर आपटूनच फुटलीं, आणि स्कॉटलंडच्या व आयर्लंडच्या किनाऱ्यावर आठ हजार स्पॅनिश लोकांचीं प्रेतें येऊन लागलीं. अशा रीतीनें स्पेनच्या या **अजिंक्य आरमाराचा** शेवट झाला. १३० गलबतांपैकीं ५० गलबतें कशींबशीं पुनः स्पेनच्या किनाऱ्याला लागलीं असतील.† असो.

११ इंग्लिश नाविकांचें धैर्य—पुढल्या वर्षीं '**ड्रेक**' व '**इसेक्स**' (Essex) यांनीं छाती करून पुन्हां उलट स्पेनच्या किनाऱ्यावरच हल्ला केला व **व्हिगो** (Vigo) नांवाचें शहर जाळून टाकलें. इ० स० १५९६ या वर्षीं **फिलिप** राजा पुन्हां इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी करीत आहे अशी बातमी लागल्यामुळें ड्रेक व हॉलंड (Holland) हे पुन्हां स्पेनच्या किनाऱ्याकडे गेले व त्यांनीं '**काडिझ**' (Cadiz) बंदर लुटून तीन चार गलबतें पकडून आणलीं. पण **अजिंक्य आरमाराच्या** नाशाबरोबरच स्पेनची इंग्लंडवर स्वारी होण्याची भीति नष्ट झाली होती. आणि पुढें हळू हळू स्पेनचें हा वेळ पर्यंतचें समुद्रावरील वर्चस्वही नाहींसें होऊन '**समुद्रस्वामिनी**' (Mistress of the Sea) होण्याचा मान इंग्लंडलाच मिळूं लागला.

---

† या अजिंक्य आरमाराच्या नाशाची बातमी **फिलिपला** समजली तेव्हां त्यानें उद्गार काढले ते असे:–' भगवदिच्छा बलीयसी ! मी माझें आरमार इंग्रज लोकांबरोबर लढण्यासाठीं पाठविलें होतें. पंचमहाभूतांशीं लढण्यासाठीं नव्हे ! (God's will be done ! I sent my fleet to fight with the English, not with the elements).'

प्रकरण ३७ वें.

नवें मन्वंतर !

(इ. स. १५९६–इ. स. १६०३)

[१ आयर्लंडमधील परिस्थिति.–२ ह्यू ओनील–काळ्या पाण्यावरची लढाई.–३ इसेक्सचें आगमन.–तहाचें बोलणें.–४।५ इसेक्सवरची गैरमर्जी–त्याचा शेवट.–६ आयर्लंडमधील बंडाचा शेवट.–७ इलिझाबेथचें मरण.–८ तिच्या अंगचे गुणदोष–योग्य मंत्र्यांची निवड.–९ सुधारकांचा आधार–लंडनची वाढ.–१० पायमोजे–चहा–बटाटे–खिशांतील घड्याळें–कागद–ईस्ट इंडिया कंपनी–अमेरिकेंतील पहिली वसाहत–बेकन–शेक्सपीअर.–११ ट्यूडर घराण्याचा शेवट.–१२।१३ जेम्सचें आगमन–त्याचें स्वागत.–१४ राज्याभिषेक.–१५ ट्यूडर आणि स्टुअर्ट राजांची तुलना.–१६ महादेवाचें विष.

१ आयर्लंडमधील परिस्थिति–स्पेनची भीति आतां नष्ट झाली; तेव्हां राणीचें लक्ष आयर्लंडकडे वळलें. आयरिश लोक पहिल्यापासून रोमन कॅथोलिक पंथाचे असून त्यांना इंग्लंडमध्यें होत असलेली सुधारणा बिलकूल मान्य नव्हती. आणि सुधारक राणीच्या अंमलाखालीं रहाणेंही त्यांना आवडत नसे. इंग्लंडमधून कित्येक बडे लोक तिकडे जाऊन त्यांनीं तेथें वसाहती करण्याचा प्रयत्न केला. पण या वसाहती करण्यांत ' जीवो जीवस्य जीवनम् ' हें तत्त्व अमलांत येत असल्यामुळें गरीब आयरिश लोकांचे हाल होऊं लागले.* तेव्हां तेही या नव्या उपटसुंभांना (Immigrants) होईल त्या रीतीनें त्रास देऊं लागले. इंग्रज–आयरिशांच्या या झगड्यांत पुष्कळ वेळां जरी आयरिशांचीं कृत्यें बंडाच्या सदरांत येऊन इंग्रज व सुधारक यांचा जय होत असे, तरी इंग्रजांना असले हे जय एकंदरींत स्वस्त पडत नसत.

२ ह्यू ओनील (Hugh O'neil)–इ० स० १५९७ च्या सुमारास '**ह्यू ओनील**' नांवाचा एक आयरिश पुढारी फार प्रबल झाला होता. **इलिझाबेथनें**

---

* इलिझाबेथच्या कारकिर्दीतील आयर्लंडची स्थिति एकानें वर्णन केली आहे ती अशी:—एका ' **मन्स्टर** ' प्रांतांत ६ महिन्यांत तीस हजार लोक अन्न अन्न करून मेले (starved to death). इ. स. १६०२ त तर डब्लिनमध्यें गव्हांचा भाव ३६ शिलिंग कॉर्टरवरून ९ पौंड क्वार्टरपर्यंत चढला होता.

त्याला ' टिरोन ' (Tyrone) ची सरदारकी देऊन आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न केला. पण या सरदाराला इंग्लंडच्या राणीचा आज्ञाधारक सेवक होऊन रहाण्यापेक्षां स्वतंत्रपणें आपली हुकमत चालविणेंच अधिक प्रशस्त वाटत असल्यामुळें त्यानें आयर्लंडमध्यें आपल्या पक्षाचे बरेच लोक तयार करून स्पेनकडे मदतीबद्दल मागणी केली. इ. स. १५९८ मध्यें त्यानें उघडपणें बंडाचा पुकारा केला. व 'ब्लॅक-वॉटर ' (Black Water) ऊर्फ ' काळ्या पाण्या 'वर इंग्लिश फौजेचा मोड करून १५०० इंग्लिश लोक कापून काढले.

३ इसेक्सचें आगमन—' टिरोन'ला हा जय मिळालेला पाहून आयरिश लोकांना आनंदाचें भरतें आलें व तो आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देईल अशी त्यांना आशा वाटूं लागली. इंग्लंडच्या दरबारांत आयरिश प्रश्नाबद्दल खल होऊन ताबडतोब जोराचे उपाय योजण्याचें ठरलें; व **इसेक्स** (Essex) नामक सरदाराला अठरा हजार लोक बरोबर देऊन आयर्लंडमध्यें पाठविण्यांत आलें. हा **इसेक्स इलिझाबेथ**चा ' प्यार ' ' (Favourite) असून तोही राणीची मर्जी संपादन करण्याचा प्रसंग वायां जाऊं देत नसे. इ० स० १५९९ मध्यें तो ' डब्लिन ' (Dublin) येथें जाऊन उतरला. पण बंडखोरांवर एकदम चाल करून न जातां त्यानें बरेच दिवस किरकोळ झटापटी करण्यांत घालविले. पण या किरकोळ झटापटींपासून विशेष फलनिष्पत्ति न होतां त्याचें सैन्य मात्र कमी होत गेलें. व अखेर अवघे चार हजार लोक शिल्लक राहिले, तेव्हां त्यानें ' टिरोन'ला शासन करण्याचा बेत एका बाजूस ठेवून त्याच्याबरोबर तहाच्या बोलण्याला सुरवात केली.

४ इसेक्सवरची गैरमर्जी—इलिझाबेथला हें त्याचें वर्तन आवडलें नाहीं व ' पुढील हुकूम होईपर्यंत आपण आयर्लंडमध्येंच रहावें ' असा तिनें त्याला हुकूम केला. पण **इलिझाबेथ**ची आपल्यावर खप्पा मर्जी होणार या भीतीनें तो त्या हुकुमा-विरुद्ध आपल्या वर्तनाचा खुलासा करण्यासाठीं म्हणून तांतडीनें इंग्लंडला आला. पण या वेळीं **इलिझाबेथनें** त्याच्याशीं भाषणही केलें नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट त्याला नजरकैदेंत ठेवण्याचा हुकूम केला. पुढें थोड्या दिवसांनीं त्याची सुटका झाली; परंतु राणीची त्याच्यावरून मर्जी उडाली ती उडालीच. त्याला दरबारांत येण्याची बंदी झाली व उंची दारूचा मक्ता त्याच्याजवळ होता तो काढून घेण्यांत आला. निराशेनें वैतागून जाऊन **इसेक्स** राणीला शिव्या देऊं लागला व पुढें राणीच्या मंत्र्यांना काढून टाक-ण्यासाठीं गुप्त कट करण्याचा उपक्रमही त्यानें चालविला. लंडनचे लोक (The

Londoners) आपल्या बाजूला येऊन मिळतील या आशेनें आपल्या दोनशें अनुयायांनिशीं राजवाडा हस्तगत करण्यासाठीं तो वाड्यावर चालून आला. पण हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. राजसैन्यानें त्याला पकडून इ० स० १६०१ मध्यें राजद्रोहाच्या आरोपावरून त्याचा शिरच्छेद केला.

५ इलिझाबेथनें पूर्वीं एकदां प्रेमभरांत (Moment of Tenderness) त्याला एक आंगठी देऊन ठेवली होती; व 'तुझ्या प्राणावर बेतेल तेव्हां ही आंगठी ओळखीसाठीं तूं माझ्याकडे पाठवून दे' असें त्याला सांगून ठेविलें होतें. **इसेक्स**नें ही आंगठी **इलिझाबेथ**कडे नेऊन देण्यासाठीं म्हणून **नॉटिंगहॅम** (Nottingham) नामक सरदाराच्या बायकोकडे दिली होती. पण त्या बाईचा नवरा **इसेक्स**चा द्वेष करीत असल्यामुळें त्यानें ती **इलिझाबेथ**कडे पोंचती करूं दिली नाहीं. ती आंगठी **इलिझाबेथ**ला मिळाली असती तर त्याचा प्राण वांचला असता असें म्हणतात. असो.

६ आयर्लंडमधील बंडाचा शेवट—**इसेक्स**च्या मागून **माउंटजॉय**' (Mountjoy) सरदाराला आयर्लंडमध्यें पाठवून तिकडचें बंड मोडण्यांत आलें. '**टिरोन**' ला माफी मिळाली; पण त्याच्या सर्व जमिनी जप्त करण्यांत आल्या.

७ इलिझाबेथचें मरण—**इसेक्स**च्या वधानें **इलिझाबेथ**ला फार वाईट वाटलें; तें इतकें कीं, तिनें पुढें अन्नपाणीहि वर्ज्य केलें. भ्रमिष्टासारखी ती दिवसाचे दिवस व रात्रीच्या रात्री एकाच जागीं बसून काढूं लागली. दिवसें दिवस तिची शारिरिक व मानसिक शक्तीही क्षीण होत चालली. आपल्यामागून स्कॉटलंडचा राजा **जेम्स** याला इंग्लंडची गादी द्यावी अशी तिनें एके दिवशीं आपली शेवटची इच्छा प्रदर्शित केली. व नंतर तिला जी झोंप लागली त्या झोपेंतून ती जागी झाली नाहीं. ही गोष्ट इ० स० १६०३ च्या मार्च महिन्याच्या २४ व्या तारखेस घडून आली. मरण समयीं तिचें वय ७० वर्षांचें होतें.

८ इलिझाबेथच्या अंगचे गुण दोष-**इलिझाबेथ**च्या अंगीं पुष्कळ चांगले गुण होते तसेच दुर्गुणही फार होते. ती फार हट्टी व तापट होती. एकाद्या प्रसंगीं मोठमोठ्या लोकांच्या अंगावर हात टाकण्यासही ती मागें पुढें पहात नसे.* लोकांनीं

---

* Not only the ladies about her person, but her courtiers and the highest officers in the state, felt the weight of her hand. She ever made the proudest of the nobility feel the distance between her and themselves, though at the same time, she courted the goodwill of the common people by her affability and kindness. (L. B.)

नेहमीं आपली खुशामत करीत रहावें असें तिला वाटत असे. तोंडाचें बोळकें होऊन 'मुख सुरकुतलें, मस्तक पिकलें' अशी स्थिती झाली, तरीही स्वार्थसाधु दरबारी मानकऱ्यांनीं तिच्या स्वरूपाची वाखाणणी केली म्हणजे खरोखरच ते आपल्या रुपावर लुब्ध झाले आहेत असें तिला वाटत असे. तथापि 'राजपदाधिष्ठित' व्यक्ती या नात्यानें तिनें आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. विशेषतः तिनें आपले मंत्री मोठ्या शहाणपणानें निवडले होते. व या तिच्या शहाणपणाच्या निवडणुकीमुळेंच **इलिझाबेथ**च्या कारकिर्दीचा काळ हा इंग्लंडच्या इतिहासांतील अतिउज्ज्वल काळांपैकीं एक काळ होऊन राहिला आहे. इंग्लंडच्या उत्कृष्ट राज्यकर्त्यांचीं नांवें सांगण्याचा प्रसंग आला असतां इंग्रज लोक त्या नाममालिकेंत **इलिझाबेथ**चा मोठ्या अभिमानानें व गौरवानें समावेश करितात.

९ सुधारकांचा आधार—तिच्या कारकिर्दींत सर्व युरोपखंडभर **प्रॉटेस्टंट** व **रोमन कॅथोलिक** यांचे झगडे चालू असल्यामुळें घरादारांना पारखे झालेले सुधारक इंग्लंडमध्यें आश्रयार्थ येत. हे लोक चांगले कसबी असल्यामुळें त्यांनीं इंग्लंडमध्यें विणकाम, रंगकाम व शिवणकामाचे कारखाने काढून इंग्लंडमधलीं कित्येक शहरें भरभराटीला आणलीं. या कालांत लंडनची वाढ तर इतक्या झपाट्यानें झाली कीं, एक वेळ यापुढें कोणींही नवीन इमारत बांधूं नये असा जाहीरनामा काढावा लागला होता.

१० पायमोजे, चहा वगैरे—इ० स० १५८९ मध्यें '**ली**' (Lee) नांवाच्या इसमानें पायमोजांचें यंत्र तयार केलें. इंग्लंडमध्यें रेशमी पायमोजे प्रथम घालणारी स्त्री **इलिझाबेथ** हीच होय. डच लोकांनीं चीनमधून चहा आणला. **रॅले**, (Raleigh), **ड्रेक**, **हॉकिन्स** यांनीं **अमेरिकें**तून तंबाकूचें झाड आणि बटाटे आणले. जर्मनीमधून खिशांतलीं घड्याळें आलीं. चिंध्यांपासून कागद तयार करण्याचा कारखाना '**केंट**' जिल्ह्यांत **डार्टफर्ड** (Dartford) येथें सुरू झाला. सुप्रसिद्ध **ईस्ट इंडिया कंपनी** (East India Company) **इलिझाबेथ**च्याच कारकिर्दींत स्थापन झाली. आणि **रॅलेनें** **अमेरिकें**त इंग्रजांची पहिली वसाहत (Colony) स्थापन केली तीही **इलिझाबेथ**च्याच कारकिर्दींत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता '**बेकन**' (Bacon), आणि इंग्लंडचा 'कालिदास' '**शेक्सपीअर**' (Shakespeare), हे हिच्याच कारकिर्दींत उदयास आले.‡ अशा रीतीनें **इलिझाबेथ**च्या कारकिर्दींत इंग्लंडची सर्व बाजूंनीं भरभराट झाली.

‡ **रिचर्ड हूकर** (Richard Hooker)—इ. स. १५५३-१६००—हाहि या काळांत एक प्रभावी ग्रंथकार होऊन गेला. त्यानें आपल्या ग्रंथांतून धार्मिक छळांचा

११ ट्यूडर घराण्याचा शेवट—इ. स. १४८५ मध्यें 'गुलाबी युद्धें' समाप्त होऊन 'ट्यूडर' घराण्यांतील राजपुत्र हेन्री हा 'सातवा हेन्री' म्हणून इंग्लंडच्या गादीवर बसला, तेव्हांपासून या घराण्यांतील स्त्री-पुरुषांनीं मिळून १००-१२५ वर्षें राज्य केलें. **इलिझाबेथचें** लग्न झालेलेंच नव्हतें; तेव्हां तिच्या मरणाबरोबर ट्यूडर घराण्याचा नष्टांश झाला.

१२ जेम्सचें आगमन—आतां सातव्या हेन्रीचा मुलीकडून निपणतू असलेला **स्कॉटलंडचा** राजा **जेम्स** याला **इलिझाबेथच्या** अखेरच्या इच्छेला अनुसरून इंग्लंडची गादी देण्याचें ठरलें. एके दिवशीं संध्याकाळीं **जेम्स** राजा स्कॉटलंडमध्यें आपल्या वाड्यांत विश्रांति घेत बसला असतां एक स्वार धांवत धांवत राजवाड्याच्या दरवाजाशीं येऊन दाखल झाला. या स्वाराचें नांव '**सर रॉबर्ट कॅरे**' (Sir Robert Carey) असें असून तो इंग्लंडमधून ही आनंदाची बातमी **जेम्सला** आपण पहिल्यानें सांगावी म्हणून घाईघाईनें आला होता. त्याची लगेच राजाकडे वर्दी लागली व त्यानें गुडघे टेकून ही आनंदाची बातमी त्याला निवेदन केली.

१३ पुढें तीन दिवसांनीं स्कॉटलंडमध्यें **जेम्स** हा इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या देशांचा राजा म्हणून द्वाही फिरविण्यांत आली. पुढल्या रविवारीं तो देवळांत प्रार्थनेस गेला असतां लोकांना उद्देशून त्यानें लहानसें भाषण केलें. त्या भाषणांत 'मी आपल्या जुन्या देशाला विसरणार नाहीं, दर तीन वर्षांनीं स्कॉटलंडमध्यें येऊन इकडच्या राज्यव्यवस्थेची तपासणी करीन, अगदीं गरिबांतल्या गरीबालासुद्धां आपलीं गाऱ्हाणीं राजाच्या कानावर घालण्याची मोकळीक आहे' वगैरे लोकांना खुष

निषेध करून कोणीं कोणतें धर्ममत मानावयाचें हें ज्याच्या त्याच्या विचारशक्तीवर सोंपवावें (a man's belief should be determined by his own reason), हें मत प्रतिपादन केलें. बकल नामक इतिहासकार सांगतो कीं, हूकरच्या या प्रतिपादनानें धार्मिक छळाच्या ज्वाळा पुष्कळच शांत झाल्या. हूकरचीं हीं मतें इ. स. १५९६ मध्यें प्रसिद्ध झालीं. त्यानंतर १७ वर्षांनीं इंग्रजी बिशपांनीं एकदां दोन 'पाखंड्यांना' जाहीर रीतीनें जाळल्याचा दाखला मिळतो. पण त्यानंतर केव्हांही इंग्लडची भूमि कोणाच्या धार्मिक मतांबद्दल सांडलेल्या रक्तानें दूषित झालेली आढळत नाहीं (The soil of England has never been stained by the blood of a man, who has suffered for his religious creed).

करणारीं आश्वासनें त्यानें दिलीं. नंतर दोन दिवसांनीं तो इंग्लंडला येण्यास निघाला. लंडनला येऊन पोंचण्याला त्याला एक महिना लागला. वाटेंत ठिकठिकाणीं लोकांनीं त्याचा चांगला आदरसत्कार करून त्याच्या मिरवणुकी काढल्या. या आनंदोत्सवा-निमित्त ठिकठिकाणच्या कित्येक कैद्यांनाही माफी देण्यांत आली.

१४ जेम्सचा राज्याभिषेक—लंडनला येऊन पोंचल्यावर शहरचा मुख्य अधिकारी (Mayor) व इतर ५०० नागरिक घोड्यांवर बसून व गळ्यांत सोन्याच्या सांखळ्या अडकवून त्याला सामोरे गेले, व मोठ्या समारंभानें त्यांनीं त्याला राजवाड्यांत नेऊन पोंचविलें. आपल्या नव्या इंग्लिश प्रजेला खुष करण्यासाठीं त्यानें पहिल्या दोन महिन्यांत २५० लोकांना सरदारकीचे किताब दिले. इ० स० १६०३ च्या जुलईच्या २५ व्या तारखेस **वेस्ट मिन्स्टरच्या** देवळांत 'राजा **जेम्स** व राणी **ॲन**' यांना राज्याभिषेक होऊन 'ग्रेट ब्रिटन व आयर्लंडचा राजा **पहिला जेम्स**' म्हणून त्याच्या नांवानें द्वाही फिरविण्यांत आली. ही पदवी धारण करणारा **जेम्स** हाच पहिला राजा होय.

१५ ट्यूडर आणि स्टुअर्ट राजांची तुलनाः—गेल्या १००।१२५ वर्षांत ट्यूडर राज्यकर्त्यांनीं **पार्लमेंटचें** महत्त्व अगदींच कमी करून टाकलें होतें. उत्तम म्हणून नांवाजलेली राणी **इलिझाबेथ** हीहि बहुतेक गोष्टी पार्लमेंटला धाब्यावर बसवूनच करीत असे. तोच कित्ता पुढें **जेम्स**प्रभृति '**स्टुअर्ट**' * (Stuart)

---

* **जेम्स** हा **मेरी**चा **डार्नले**शीं झालेल्या द्वितीय संबंधापासून झालेला मुलगा होय. **मेरी** व **डार्नले** यांचें विवाहपूर्व नातें दाखविणारी वंशावळ येणें प्रमाणेः—

सातवा हेन्री (मूळ पुरुष)

पहिला विवाह　　|　　दुसरा विवाह

(स्कॉ. राजा) **जेम्स** = **मार्गारेट** = (सरदार) **ॲंगस**

|　　|

(पांचवा) **जेम्स**　　मार्गारेट = (सरदार) **लेनॉक्स**

|　　|

मेरी = **डार्नले** (स्टुअर्ट)

|

(सहावा) **जेम्स**

डार्नले हा **स्टुअर्ट** घराण्यापैकीं असल्यामुळें **जेम्स**ला व त्याच्या वंशजांना **स्टुअर्ट** राजे असें नांव पडलें!

राजांनीं उचलला. पण **ट्यूडर** राजे प्रसंग पाहून वागत असत, तें धोरण **स्टुअर्ट** राजांना न साधल्यामुळें, व १००।१२५ वर्षें शांततेचा उपभोग घेत असलेला इंग्लंडचा लोकसमाज आतां पुनः स्वातंत्र्यार्थ झगडण्याला ताजा तवाना झाल्यामुळें पार्लमेंटला धाब्यावर बसवून एकतंत्रीपणानें राज्य करण्याचा **स्टुअर्ट** राजांचा प्रयत्न सिद्धीस जाण्यासारखा नव्हता. त्यामुळें स्टुअर्ट राजांच्या कारकिर्दींत राजा व प्रजा यांमध्यें पुनः भांडणाला सुरवात होऊन अखेर प्रजापक्ष टांकीचे घाव सोसतां सोसतां राजाला आपल्या मुठींत ठेवतां येण्याइतक्या देवकळेला पोंचला. नव्या मनूंतील राजा व प्रजा यांमधील भांडणाला **जेम्स**च्या कारकिर्दींतच सुरवात झाली; व कित्येक वर्षेंपर्यंत अनेक हालअपेष्टा सोसून व पराकाष्ठेचा स्वार्थत्याग करून प्रजापक्षांतील वीरांनीं अखेर राजा लोकच्छंदानुवर्ती असला पाहिजे, प्रजा राजासाठीं नसून राजा प्रजेसाठीं आहे हें तत्त्व उत्कृष्ट रीतीनें प्रस्थापित केलें.

१६ महादेवाचें विष—ट्यूडर घराण्यांतील पहिला राजा ‘ सातवा हेन्री ’ हा इंग्लंडच्या गादीवर आला, त्या वेळीं इंग्लंडची स्थिति अंतःकलहानें अगदीं केविल॰ वाणी होऊन गेली होती. त्यामुळें ट्यूडर घराण्यांतील राजांना प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजवितां आली. पण आतां **स्टुअर्ट** राजा ‘ पहिला **जेम्स** ’ हा स्कॉटलंडमधून इंग्लंडच्या गादीवर बसण्यासाठीं दक्षिणेकडे आला, त्या वेळीं इंग्लंड पूर्वींसारखें दुबळें राहिलें नव्हतें. **इलिझाबेथ**च्या कारकिर्दींत तर त्याच्या अंगांत नवीन जोम उत्पन्न होऊन इंग्रजांचा आत्मविश्वास वाढत चालला होता. स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा मोड केल्यामुळें इंग्रज नाविकांचें समुद्रावरील स्वामित्व वाढीला लागलें होतें, आणि इंग्लंडची दृष्टि अधिक व्यापक व दूरदर्शी बनली होती. धार्मिक बाबतींत स्वातंत्र्य उपभोगणारे इंग्रज राजकीय बाबतींतही तसेंच स्वातंत्र्य असलें पाहिजे असें प्रतिपादूं लागले होते. त्यामुळें ट्यूडर राजांच्या पचनीं पडलेलें अनियंत्रित राजसत्तेचें विष ‘महादेवाच्या विषा’प्रमाणें ट्यूडर राजा-राणींपुरतेंच मर्यादित झाल्यासारखें झालें. स्टुअर्ट राजांनीं तें पचविण्याचा केलेला प्रयत्न त्यांना साध्य झाला नाहीं. हा सर्व इतिहास मनोरंजक असून फार बोधप्रद आहे. तो पुढील भागांत वाचकांना वाचावयास मिळेल.

प्रकरण ३८ वें.

युरोप खंडांतील अहिमहींचें भांडण !

(इ. स. १५१९—इ. स १५९८)

[१ इंग्लंड, फ्रान्स व स्पेन.–२ युरोपखंडांतील परिस्थिति.–३ स्पेनच्या चार्लसचें वैभव.–४ फ्रान्स व फ्रान्सिस.–५ फ्रान्स–स्पेनमधील पहिलें युद्ध–माड्रिडचा तह.–६ फ्रान्सिसची शपथमुक्तता.–७ फ्रान्स–स्पेनमधील दुसरें युद्ध–बायांचा तह.–८ चार्लसचा दुसरा शत्रु–तुर्कांचा पराभव आणि चार्लसची वाहवा.–९ फ्रान्स–स्पेनमधील तिसरें व चौथें युद्ध–क्रेस्पीचा तह–चाळीस लाखांचा बळी.–१० अहिमहींतील मतैक्य व मतभिन्नता–त्यांच्या वैमनस्याचा सुधारणेला उपयोग.–११ फ्रान्सिसचा प्रायश्चित्त-विधि.–१२ चार्लसचा सुधारकद्वेष.–१३ सुधारकांचा संघ–‘ तोडलेल्या तरूची ’ वाढ.–१४ फ्रान्सिसचा मृत्यु आणि चार्लसचा पराभव–जर्मन संस्थानिकांचें धर्मस्वातंत्र्य.–१५ चार्लसचा वानप्रस्थाश्रम आणि मृत्यु.–१६।१७ फिलिपचें पित्राज्ञापालन–मूर लोकांचें बंड.–१८ तुर्कांवर मोहीम–पोप पायसचा आनंद.–१९ तुर्कसत्तेची पिछेहाट.–२० स्पेनची अधोगति.]

१ इंग्लंड फ्रान्स व स्पेन—**ट्यूडर** राजांच्या अमदानींत इंग्लंडचें परराष्ट्रीय राजकारणाकडे विशेष लक्ष लागलें, आणि **ट्यूडर** राजांनीं स्वदेशांत पार्लमेंटला खांकेला मारून अनियंत्रित सत्ता उपभोगिली, तरी त्या सत्तेचा उपयोग त्यांनीं स्वराष्ट्राचें अंतःसामर्थ्य वाढविण्याप्रमाणेंच परराष्ट्रांत इंग्लंडचा नांवलौकिक वाढविण्याकडेही केला. ‘ आठव्या हेन्री’च्या कारकिर्दींत इंग्लंडचा प्रख्यात मंत्री ‘ वुल्से ’ यानें **फ्रान्स** व **स्पेन** या दोन्ही देशांच्या राजांना कांहीं काल आपल्या नादाला कसें लावून ठेवलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. **युरोपखंडांतील** सगळ्या देशांत त्या वेळीं हीं दोन राष्ट्रेंच काय तीं प्रबळ होतीं; पण त्या दोन्ही देशांचे राजे एकमेकांना पाण्यांत पाहणारे असून त्यांच्या आपसांतील स्पर्धेमुळें कित्येक वर्षेपर्यंत सगळ्या युरोप खंडांत अस्वस्थता माजून राहिली होती. ट्यूडर राजांच्या शहाणपणामुळें युरोपांतल्या या अस्वस्थतेची झळ इंग्लंडला फारशी लागली नाहीं; तथापि इंग्लंड हें या सुमारास आपल्या पायांपुरतेंच पाहणारें संकुचित राष्ट्र राहिलेलें नसून युरोपखंडांतल्या राजकारणांत मन घालून जरूर त्या वेळीं ‘ सत्तेच्या समतोलपणा’साठीं, ‘ आर्तत्राणाय नः शस्त्रं ’ असा पुकारा करूं

लागल्यामुळें, युरोपखंडांतील **स्पेन** व **फ्रान्स** या दोन राष्ट्रांमधील सोळाव्या शतकांतील भांडणांची थोडी माहिती या प्रकरणांत आम्हीं देत आहों.

२ युरोप खंडांतील परिस्थिति—युरोप खंडाच्या नकाशाकडे पाहिलें असतां विस्ताराच्या दृष्टीनें जे चार दोन देश चटकन मनांत भरतात, त्यांत उत्तरेकडचा रशिया एका बाजूला ठेवला असतां पश्चिमेकडचे **फ्रान्स व स्पेन** हे देश प्रमुख होत. **जर्मनी, ऑस्ट्रिया** वगैरे देश आज थोडे विस्तृत दिसत असले तरी सोळाव्या शतकांत ते निरानराळ्या संस्थानिकांत विभागलेले होते. **भूमध्य** समुद्रांत एकाद्या लांब पायासारखा दिसणारा इटली हा त्या वेळीं **रोम**च्या जगद्गुरूच्या गादीमुळें महत्त्वाचा वाटत असला तरी राजकीय सामर्थ्याच्या दृष्टीनें पंगूच होता. मध्य युरोप खंड अनेक छोट्या संस्थानिकांत विभागलेलें होतें, आणि **फ्रा**न्स आणि **स्पेन** हे प्रबल प्रतिस्पर्धी त्या वेळीं या संस्थानिकांना आपल्या पोटांत घालून घेण्याची अहर्निश खटपट करीत होते.

३ स्पेनच्या चार्लसचें वैभव—पंधराव्या शतकाच्या अखेरीं अखेरीला युरोप खंडांतील या निरनिराळ्या देशांचे बरेचसे राजे आणि संस्थानिक लग्नग्रंथीनें (Matrimonial Alliances) बद्ध झालेले दिसत होते. **ऑस्ट्रिया** (Austria), **बरगंडी** (Burgundy), **कॅस्टिल** (Castile), आणि **आरागॉन** (Aragon) हीं चार संस्थानें या प्रेमरज्जूनें एकत्र झालीं होतीं. इ. स. १५१९ च्या सुमारास या सर्व संस्थानांचें आधिपत्य केवळ वारसाच्या हक्कानें (Hereditary right) **स्पेन**चा तरुण राजपुत्र **चार्लस** (Charles V) याच्याकडे आलें,‡ आणि तो युरोप खंडाच्या निम्या अधिक भागाचा स्वामी झाला.

४ फ्रान्स व फ्रान्सिस—फ्रान्सचा राजा **फ्रान्सिस** (Francis I) हा वारसाच्या हक्कांत चार्लसचा प्रतिस्पर्धी होता. पण चार्लसचें दैव बलवत्तर असल्यामुळें **फ्रान्सिस**चे सर्व डाव त्याच्याच अंगलट येऊन वर सांगितलेल्या सगळ्या संस्थानांचा वारसा चार्लसकडे गेला होता आणि पुढें जर्मन संस्थानिकांनीं (The

‡ स्पेनचा हा **पांचवा चार्लस** राजा मोठा भाग्यवान होता. त्याचा जन्म इ. स. १५०० मध्यें झाला. पण तो वयांत येण्याच्यापूर्वीच इ. स. १५०६ मध्यें त्याचा बाप वारला, इ. स. १५१६ मध्यें त्याच्या मातामहानें (स्पेनचा राजा फर्डिनांड यानें) स्पेन आणि नेपलसचीं राज्यें त्याला दिलीं आणि इ. स. १५१९ मध्यें त्याचा पितामह मॅक्झिमिलिअन वारल्यावर ऑस्ट्रियाचें राजपद आणि त्याच्या मांडलिक संस्थानांवरील आधिपत्य त्याच्याकडे आलें. याशिवाय स्पेनच्या राजाचें अमेरिकेवरील

Electors of Germany) पवित्र रोमन साम्राज्याचें (The Holy Roman Empire) बादशाही पदही† चार्लसलाच दिल्यामुळें फ्रान्सिसला आपली मोठी मानहानी झाली असें वाटून तो चार्लसचा पक्का दुष्मन बनला.

५ **फ्रान्स-स्पेनमधील पहिलें युद्ध**—इ. स. १५२१ मध्यें **चार्लस** आणि **फ्रान्सिस** यांचें युद्ध जुंपलें. त्याच्यापूर्वी थोडेच दिवस **फ्रान्सिसनें** इंग्लंडचा राजा आठवा हेन्री याला मुद्दाम निमंत्रण पाठवून फ्रान्समध्यें बोलाविलें होतें. दोघांची **कॅलेजवळ** मोठ्या समारंभाची भेट झाली (इ. स. १५२०); उभयतांचा अवाढव्य लवाजमा आणि थाटमाट यांनीं या दरबारी भेटीच्या स्थानाला 'सुवर्णपटभूमि' (Field of the Cloth of Gold) असें नांव मिळालें; पण शेवटीं 'आठव्या हेन्री'नें या युद्धांत मदत केली ती चार्लसलाच. हें युद्ध चार पांच वर्षें चाललें होतें. त्यांत **फ्रान्सिसचे** कित्येक विश्वासू सरदारच आयत्या वेळीं **चार्लसला** जाऊन मिळाले, आणि स्वतः फ्रान्सिस इ. स. १५२५ मध्यें **पॅव्हिआ**(Pavia)च्या लढाईंत जखमी होऊन **चार्लसच्या** हातीं लागला. पुढें इ. स. १५२६ मध्यें स्पेनची राजधानी

स्वामित्व स्पेनच्या गादीशीं संलग्न असल्यामुळें तेंही त्याच्याकडे आलें होतें. त्याच्या या वारसा-हक्काची पूर्वपीठिका पुढील वंशावळीवरून समजेल:—

चार्लस (बर्गंडीचा संस्थानिक, मूळ पुरुष)
|
मेरी=**मॅक्झिमिलिअन** (ऑस्ट्रियाचा राजा आणि जर्मनीचा बादशहा).
|
फिलिप=**जोना** (स्पेनचा राजा फार्डिनांड याची मुलगी व आठव्या हेन्रीची बायको कॅथराइन हिची बहीण)
(ऑस्ट्रियाचा राजा)
|
पांचवा चार्लस (स्पेनचा राजा).

† या वेळीं जर्मनीमध्यें जीं अनेक लहान लहान संस्थानें होतीं, त्यांचे राजे आपल्यापैकीं एकाला 'बादशहा' म्हणून निवडून त्याचा अभिषेकविधि रोमच्या पोपकडून करवून घेत. आणि पोप त्याला आपल्या 'पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा' अशी पदवी देई. अलीकडे रोमच्या साम्राज्याची स्थिति 'काप गेले आणि भोकें राहिलीं' अशी झालेली असल्यामुळें हें साम्राज्य वास्तविक जर्मन संस्थानिकांपुरतेंच मर्यादित होतें. तथापि जर्मन संस्थानिकांना नांवांतही जी एक प्रकारची जादू वाटे, तिनें इतर लहान, लहान राजांना व संस्थानिकांना भारून टाकण्याला या पदवीचा उपयोग त्यांना होत

असे. माड्रीड (Madrid) येथें तह होऊन फ्रान्सिसनें स्पेनच्या वाटेला न जाण्याचें कबूल करून आपली सुटका करून घेतली आणि तो पुनः फ्रान्सला परत आला.

६ **फ्रान्सिसची शपथ-मुक्तता**—पण फ्रान्सिसच्या मनांतून संकटाच्या वेळीं सही करून दिलेला हा माड्रिडचा तह पाळावयाचा नव्हता. त्यानें पुढल्याच वर्षी पोपकडून चार्लसला दिलेल्या वचनांतून मुक्त होण्याची परवानगी (absolution from the promises to Charles) मिळविली (कारण त्या वेळीं एकाद्याला शपथमुक्त करण्याचा अधिकार पोपला आहे असें मानीत असत); आणि चार्लसच्या विरुद्ध एक संघ (League) घडवून आणला. पोप आणि इटलींतले कित्येक संस्थानिक चार्लसच्या साम्राज्यतृष्णेमुळें त्याचा हेवा करूं लागले होते, ते सहजच फ्रान्सिसला मिळाले. पण इंग्लंडचा राजा ' आठवा हेन्री ' हाही आतां चार्लसला सोडून फ्रान्सिसलाच मिळाला.

७ **फ्रान्स-स्पेनमधील दुसरें युद्ध**—चार्लस आणि फ्रान्सिस यांच्यामधील हें दुसरें युद्ध इ. स. १५५७ पासून १५५९ पर्यंत दोन वर्षें चाललें. इटली हेंच या वेळचेंही मुख्य ' रणक्षेत्र ' (battle-ground) होतें. याहि युद्धांत फ्रान्सिसचा व त्याच्या दोस्तांचा (Allies) पराभव झाला, आणि अखेर कॅंब्रे (Cambray) येथें चार्लसची मावशी आणि फ्रान्सिसची आई यांनीं तह घडवून आणल्यावर (Ladies' Peace of Cambray) पांच सहा वर्षें हे दोघे युयुत्सु राजे एकमेकांच्या वाटेला गेले नाहींत.

८ **चार्लसचा दुसरा शत्रु**—दरम्यान चार्लसला दुसऱ्या एका शत्रूशीं टक्कर द्यावयाची होती. हा शत्रु म्हणजे टर्कीचा सुलतान '**सुलेमान**' हा होय. त्यानें पूर्वयुरोपप्रमाणेंच भूमध्य समुद्रांतही मोठा धुमाकूळ माजवून दक्षिण युरोप पादाक्रांत करण्याचा घाट घातला होता. इ. स. १५२२ मध्यें दोन लाख तुर्क लोक ऱ्होडस (Rhodes) बेटांत घुसले, आणि त्यांनीं तेथल्या ' जॉन साधुदासांना ' (Knights of St. John) शरण यावयास लावून तें बेट काबीज केलें. सुलतानाच्या या जयानें भूमध्य समुद्रावर मुसलमानांचा दरारा बसला, आणि टर्किश नाविकांना वाटेल त्या वेळीं युरोपच्या दक्षिण बाजूच्या बंदरांत शिरून जाळपोळ आणि लुटालूट करण्याला मुभा मिळाल्यासारखी झाली. तुर्कांचा आरमाराधिपति बार्बारोसा (Barbarossa) यानें एकदां सोळा सहस्र ख्रिश्चन लोक धरून आणून बॉस्फरस (Bosphorus)च्या सामुद्रधुनीवरील आपल्या राजवाड्या-

समोर गुलाम म्हणून विकले होते असें सांगतात. समुद्रानजीकच्या एखाद्या बंदरावर तुर्क लोकांचा हल्ला झाला म्हणजे तेथले नाविक, व्यापारी, आणि प्रवासी हे तर अचानक दुर्दैवाच्या फेऱ्यांत अडकले जातच, पण समुद्रापासून दूर असलेले शेतकरी, हातांत स्मरणी घेऊन जप करीत बसलेले गोसावी, आणि मठाच्या एकांतवासांत ध्यानस्थ बसलेल्या जोगिणी यांचीही केव्हां काय गत होईल याचा नेम नसे.* आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील ट्यूनिस (Tunis) नांवाचें बंदर हें तुर्क लोकांचे मोठें बळकट ठाणें (Stronghold) होतें. चार्लसनें इ० स० १५३२ या वर्षी या ठाण्यावर हल्ला करून तेथले वीस हजार ख्रिश्चन कैदी सोडवून आणले. त्यामुळें त्याची युरोपखंडभर मोठी वाहवा झाली.

१ फ्रान्स-स्पेनमधील तिसरें व चौथें युद्ध—इ. स. १५३६ मध्यें फ्रान्सिसनें तुर्की सुलतानाशीं सख्य करून चार्लसविरुद्ध पुनः युद्ध पुकारलें. पण लवकरच नाइस (Nice) येथें एक ‘ तात्पुरता तह ’ (Truce) होऊन तें बंद झालें. हा तात्पुरता तह तीन चार वर्षें टिकला. इ. स. १५४२ मध्यें फ्रान्सिसनें तुर्की सुलतानाला मदतीला घेऊन चार्लसशीं चौथ्यांदा युद्ध मांडलें. पण फ्रान्सिसचें हें कृत्य युरोपांतल्या सगळ्या ख्रिस्ती राष्ट्रांना चिरडीला जाण्याला कारण झालें, आणि चार्लसनें इंग्लंडच्या ‘आठव्या हेन्री’ला आपल्या बाजूला वळवून घेऊन फ्रान्सवर एकदम तीन बाजूनीं हल्ला चढविला. पण या वेळीं फ्रान्सिसचें दैव थोडेसें अनुकूल असल्यामुळें त्याला कित्येक ठिकाणीं विजयश्रीनें माळ घातली. त्यामुळें चार्लसनेंही अखेर विशेष आढेवेढे न घेतां क्रेस्पी (Crespy) येथें तह घडवून आणला

* It was not only the seaman, the merchant, or the traveller, who was exposed to this calamitous fate. The peasant of Aragon or Provence, who returned at sunset, from pruning his vines, or his olives far from the sound of the waves, might, on the morrow, be ploughing the main, chained to a Barbary oar. Sometimes, a whole brotherhood of friars, from telling their beads at ease at Valencia, found themselves hoeing in the rice-fields of Tripoli; sometimes the vestals of a Sicilian nunnery were parcelled out amongst the harems of Fez. (Stirling, Life of Charles V.)

(इ. स. १५४४), आणि युरोपांतल्या या अहिमहींच्या भांडणाचा एकदांचा शेवट होऊन सगळें युरोपखंड पंचवीस वर्षें गोंधळांत पडलें होतें तें त्यांच्या जाचांतून मुक्त झालें ! या युद्धांत फ्रान्सिसचे वीस लाख लोक कामास आले आणि चार्लसचेही तितकेच मारले गेले असा एकानें हिशोब केला होता ! या शिवाय तुर्कलोकांच्या तरवारींना बळी पडून अगर त्यांच्या तावडींत सांपडून देशभ्रष्ट झालेले लोक निराळेच.

१० अहिमहींतील मतैक्य व मतभिन्नता—पण फ्रान्सिस आणि चार्लस हे राजकीय महत्त्वाकांक्षेच्या व अतिक्रमणाच्या बाबतींत एकमेकांचे शत्रु असले तरी धार्मिक बाबतींत दोघेही पक्के कॅथोलिक म्हणजे जुन्या पंथाचे कट्टे अभिमानी होते. तत्कालीन लोक एकाला 'खरा ख्रिस्ती राजा' (The most Christian King) आणि दुसऱ्याला 'त्याचा खरा पुराणमताभिमानी भाऊ' (His most Catholic Brother) असें म्हणत असत. आणि सुधारकांच्या छळाच्या बाबतींत हे दोघेही राजे खरोखरच एकमेकांवर ताण करणारे होते. पण एका सुभाषितकारानें म्हटल्याप्रमाणें व्याघ्रादि क्रूर प्राण्यांच्या अंगीं आलस्यादि कित्येक अवगुण असल्यामुळेंच जगांत कांहीं प्राणी तरी जिवंत राहतात, त्याप्रमाणें या दोघां ' बंधु-राजां'चें राजकीय बाबतींत आपसांत वैमनस्य होतें व त्यांचें बरेंचसे सामर्थ्य आणि उत्साह एकमेकांचा पाडाव करण्यांत खर्च होत असे, म्हणूनच त्या वेळीं सुधारकांना श्वास घेण्यापुरती तरी उसंत मिळाली, आणि ल्यूथरच्या नव्या पंथाच्या नरडीला मुळांतच नख लागण्याचें राहिलें.*

---

*In 1521, the year of the Diet of Worms, the body that tried Luther for herecy, Charles was ready to use force to suppress the reformers, and had he not been compelled by the hostile movements of his rival, Francis, to defer, until a more convenient season, the execution of his designs against them, the Reformation in Germany might have been strangled in its cradle. ...Francis had already displayed his zeal for the old faith by cruel persecution of his Protestant subjects; but political considerations—chiefly the fear of alienating the Protestant German Princes-had prevented his carrying his measures of repression to such extremes as he would otherwise have done." (P. V. N. Myres)

११ फ्रान्सिसचा प्रायश्चित्त-विधि—पण आतां दोघेही आपसांतील युद्ध थांबवून सुधारकांचा वींमोड करण्याच्या (Extirpation) पवित्र कार्याला मोकळे झाले. फ्रान्सिसचा तर सुधारकांविरुद्ध शस्त्र धरण्यांत आणखीं एक हेतु होता. त्यानें चार्लसविरुद्ध तिसऱ्यांदा मोहीम सुरू केली (इ. स. १५३६–१५३८), त्या वेळीं त्यानें आपल्या ख्रिस्ती बांधवांविरुद्ध विधर्मी तुर्की सुलतानाची मदत घेतल्यामुळें सगळ्या ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीनें एक महापातक केल्यासारखें झालें होतें. तेव्हां या पातकाची निष्कृति करण्यासाठीं म्हणूनच कीं काय त्यानें आतां आपल्या कक्षेंतल्या प्रांतांतल्या साऱ्या सुधारकांचा निःपात करण्याचा संकल्प केला. इ. स. १५४५ मध्यें पींडमाँट (Piedmont) आणि प्रॉव्हेन्स (Provence) हे दोन प्रांत निःसुधारक करण्याचा हुकूम निघाला, आणि फ्रान्सिसचें एक भलें मोठें सैन्य त्या प्रांतांत घुसून सुधारकांचा शोध व छळ करूं लागलें. हजारों लोक या सैन्याच्या तरवारीला बळी पडले, आणि शेंकडों लोकांना जिवंत जाळून मारण्यांत आलें. या वेळीं ज्यांनीं अरण्याचा आश्रय केला, तेवढेच थोडेसे लोक काय ते जिवंत राहिले, आणि तिकडच्या सगळ्या प्रदेशाची वाताहात होऊन त्याला स्मशानाचें स्वरूप आलें !

१२ चार्लसचा सुधारकद्वेष—चार्लसचा सुधारकद्वेष यापेक्षांही भयंकर स्वरूपाचा होता. त्याची पुराणमतावर मूळची आत्यंतिक श्रद्धा होतीच; पण त्यापेक्षांही आपलें साम्राज्य पुराणमताशीं संलग्न राहिलें तरच टिकेल, अशी त्याची ठाम समजूत झाल्यामुळें आपल्या अंमलाखालील प्रदेशांत एकही सुधारक जिवंत राहतां कामा नये असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय करून ठेवला होता. जर्मन प्रांतांतील बहुतेक संस्थानिक या वेळीं त्याचे अंकित होते, आणि त्याच प्रांतांत सुधारकांचा विशेष भरणा होता. त्यामुळें फ्रान्सशीं चाललेलें भांडण मिटल्याबरोबर त्यानें आपलें सगळें सामर्थ्य जर्मनींतील सुधारक संस्थानिक आणि लोक यांच्याविरुद्ध उपयोगांत आणण्याचें ठरविलें.

१३ सुधारकांचा संघ–इ. स. १५३०च्या सुमाराला जर्मनींतील धर्मखात्याच्या स्थितीचा विचार करण्यासाठीं ऑग्सबर्ग (Augsburg) एथें एक सभा (Diet) भरली होती. त्या सभेचा अध्यक्ष या नात्यानें चार्लसचें जें वर्तन दिसून आलें, त्यानें तिकडच्या सुधारक संस्थानिकांना आपल्या भावी स्थितीविषयीं भीति वाटूं लागली होती. आणि त्यांनीं चार्लसच्या अतिक्रमणापासून आपला बचाव व्हावा म्हणून आपसांत एक संघ स्थापन केला होता. चार्लसनें आतां या संघावरच पहिला हल्ला चढविला (इ. स. १५४६). सॅक्सनीचा मॉरिस नांवाचा एक

बलाढ्य सुधारक संस्थानिक (The Protestant Prince Maurice of Saxony) या संघांतून फुटून चार्लसला येऊन मिळाला. त्यामुळें हा संघ कमकुवत होऊन सहजासहजीं चार्लसच्या माऱ्यापुढें चिरडून गेला. या संघाचे जे पुढारी चार्लसच्या हातीं लागले त्यांना त्यानें अत्यंत निर्दयपणानें वागविलें, आणि दोघांना तर आपल्या सामर्थ्याचें प्रदर्शन करण्यासाठीं लढाईंत मिळालेल्या विजयचिन्हां-प्रमाणें आपल्याबरोबर आपल्या स्वारींतून हिंडविलें ! पण चार्लसच्या असल्या कृत्यांनीं सुधारकांचें मस्तक कांहीं काल नमल्यासारखें झालें. तरी आतां सुधारणेचीं बीजें जनतेच्या मनोभूमिकेंत खोल गेलेलीं असल्यामुळें त्यांना फिरून अंकुर फुटणें कठीण नव्हतें. किंवहुना यापुढील सुधारणेची प्रगति 'कीं तोडिला तरु फुटे अणखीं भरानें' या न्यायानें पुराणमतवाद्यांच्या प्रत्येक वेळच्या छळाबरोबर वाढतच गेल्याचें दिसतें.

१४ फ्रान्सिचा मृत्यु आणि चार्लसचा पराभव—इ. स. १५४७ मध्यें फ्रान्सचा राजा फ्रान्सिस मरण पावला, आणि त्याचा मुलगा हेन्री (Henry II) हा त्याच्या गादीवर आला. त्यानें आपल्या बापाचें चार्लसशीं असलेलें वैर तसेंच पुढें चालवून जर्मनींतील प्रॉटेस्टंट संस्थानिकांना मदत केली आणि एक दोन लढायांत चार्लसचा अगदीं 'न भूतो न भविष्यति' असा पराभव केला. तेव्हां शेवटीं चार्लसला जर्मनींतल्या सगळ्या संस्थानिकांना धार्मिक बाबतींत एका दावणींत आणून बांधण्याचे प्रयत्न फुकट आहेत हें कळून आलें, आणि इ. स. १५५५ या वर्षी ऑग्सबर्ग येथें एक धार्मिक तह (Religious Peace) होऊन जर्मनींतल्या प्रत्येक संस्थानिकाला जुना किंवा नवा वाटेल तो पंथ स्वीकारण्याची मुभा देण्यांत आली. मात्र या तहानें मिळालेलें हें धर्म अगर पंथ-स्वातंत्र्य राजपदाधिष्ठित व्यक्ती-पुरतेंच होतें. म्हणजे प्रत्येक संस्थानिकाला जुना नवा वाटेल तो पंथ स्वीकारण्याची मोकळीक मिळाली, तरी त्याच्या संस्थानांतील लोकांनीं त्या त्या संस्थानिकानें स्वीकारलेल्या पंथाप्रमाणेंच आपलीं धर्मकृत्यें चालविलीं पाहिजेत असा निर्बंध कायमच होता. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे या तहानें संस्थानिक चार्लसच्या धार्मिक जोखडापासून मुक्त झाले, तरी संस्थानांतील प्रजा संस्थानिकांच्या जोखडाखालीं चेंगरून मरावयाची कांहीं थांबली नाहीं. असो.

१५ चार्लसचा वानप्रस्थाश्रम आणि मृत्यु—इ० स. १५५५ मध्यें चार्लस राजानें 'वानप्रस्थाश्रम' स्वीकारला. आणि तो स्पेनच्या पश्चिम भागीं

'सान युस्टी' (San Yusti) नांवाच्या एका खेड्यांतील मठींत जाऊन राहिला. त्या ठिकाणीं त्यानें आपले दिवस तेथल्या जोग्यांबरोबर परमेश्वरचिंतनांत घालविले आणि इ० स० १५५८ मध्यें तेथेंच देह ठेवला.

१६ **फिलिपचें पित्राज्ञापालन**—चार्लसच्यामागून त्याची गादी त्याचा मुलगा **फिलिप** (Philip II) याला मिळाली. इंग्लंडच्या मेरी राणीबरोबर विवाह करणारा फिलिप तो हाच. त्यानें बापाच्या पावलावर पाऊल ठेवून सुधारकांचा बींमोड करण्याची शिकस्त केली. चार्लसनें आपल्या मृत्युपत्रानें फिलिपला अगदीं शपथ घालून अशी ताकीद देऊन ठेवली होती कीं, 'माझ्या राज्यांत एकही पाखंडी जिवंत राहतां कामा नये. या कामीं 'धर्मसमीक्षण सभे'सारखें उत्कृष्ट साधन आयतें हाताशीं आहे त्याचा चांगला उपयोग करून घे; तरच माझा तुला आशीर्वाद मिळेल, आणि देव तुझे सर्व मनोरथ पूर्ण करील!'‡

१७ **फिलिप** राजा बापासारखाच दुराग्रही, हेकेखोर आणि जुलुमी होता (bigoted, intolerant, and despotic). त्यानेंही फ्रान्सच्या राजाबरोबरचें भांडण तसेंच पुढें चालविलें, आणि इ. स. १५५७ मध्यें सेंट क्वेंटिन (St. Quentin) च्या लढाईत फ्रेंचांचा पुरा मोड केला. फ्रेंचांप्रमाणेंच तो मूर (The Moors) लोकांच्याही पाठीस हात धुवून लागला. मूर लोकांनीं आपल्या मातृभाषेला रजा द्यावी, आपल्या मुलांना ख्रिस्ती नांवें ठेवावीं, आणि त्यांना ख्रिस्ती शाळांतच पाठवावीं असा त्यानें एक वटहुकूमच काढला. त्यानें चिडून जाऊन मूर लोकांनीं बंड केलें, पण फिलिपनें तें अत्यंत निर्दयतेनें मोडून काढलें (इ. स. १५७१).

१८ **तुर्कांवर मोहीम**—त्याच वर्षीं फिलिपनें लेपँटो (Lepanto) येथें तुर्क लोकांवरही एक मोठा विजय मिळविला. हा वेळपर्यंत भूमध्य समुद्रांत तुर्क लोकांचा

---

‡ He (Charles) had enjoined upon his son to follow up and bring to justice any heretic in his dominions, and this withont exception and without favour or mercy to any one. He conjured Philip to cherish the Holy Inquisition as the best means for accomplishing this good work. 'So,' he concluded, 'shall you have my blessing, and the Lord shall prosper all your undertakings" (—Prescott)

धागडधिंगा सारखा चालू होता. **सायप्रस** (Cyprus), **माल्टा** (Malta) वगैरे बेटें त्यांच्या हातीं जाऊन तेथल्या ख्रिस्ती लोकांचें जीवन कष्टमय होऊन राहिले होतें, आणि त्यांची धाड कोणत्या प्रांतावर केव्हां येऊन पडेल याचा नेम नसल्यामुळें युरोप खंडांतील सर्वच ख्रिस्ती प्रजा नेहमीं भीतिग्रस्त असे. या वेळीं पोपच्या गादीवर **पायस** (Pius V) नांवाचा एक उत्साही व लढाऊ बाण्याचा गृहस्थ होता. त्यानें स्वधर्मरक्षणासाठीं युरोपांतल्या सगळ्या ख्रिस्ती राजांनीं एक व्हावें म्हणून आज्ञापत्र काढलें, आणि त्याचा बराचसा सुपरिणाम होऊन विशेषतः युरोपच्या दक्षिण भागांतील लोकांत मध्ययुगांतील धर्मयुद्धांचा आवेश संचरल्यासारखा झाला. **फिलिपचा** सावत्र भाऊ **डॉन जॉन** (Don John of Austria) याच्या हाताखालीं एक प्रचंड आरमार तयार करण्यांत आलें, आणि या आरमाराची आणि तुर्कांच्या आरमाराची लेपँटोच्या आखातांत निकराची झटापट होऊन तुर्की आरमाराचा पुरा मोड झाला. या आरमारी युद्धांत दोन्ही पक्षांकडचीं मिळून ६०० गलबतें आणि दोन लाख लोक सामील झाले होते असें म्हणतात. **डॉन जॉनला** जय मिळाल्याचें ऐकतांच पोप **पायसला** इतका आनंद झाला कीं, त्यानें ही बातमी त्याला सांगणाऱ्या दूताला (messenger) कडकडून मिठी मारली आणि त्याला आनंदाश्रूंनीं न्हाऊं घालून पुढील उद्गार काढले, "**बाबा, देवानें अखेर एक तरी माणूस पाठविला, तो कोण म्हणशील तर जॉन** !" (There was a man sent by God, and his name was John!)

१९ तुर्कसत्तेची पिछेहाट—लेपँटोच्या या युद्धानें युरोपांतल्या ख्रिस्ती–मुसलमान संबंधांत फार मोठी क्रांति घडून आली. प्रथम अरब आणि मागाहून तुर्क मुसलमानांनीं सुमारें एक हजार वर्षेपर्यंत युरोपच्या पूर्व व दक्षिण भागावर एकसारखा धुमाकूळ माजवून सोडला होता. पण या लढाईंत तुर्कांचा पराभव झाल्यामुळें त्यांचें ख्रिस्ती लोकांतील वजन (prestige) जें एकदां कमी झालें, तें त्यांना पुनः केव्हांही परत बसवितां आला नाहीं. आणि त्यांची युरोपांतील सत्ता आणि सामर्थ्य (authority and power) हीं या वेळेपासून जीं एकदां घसरणीला लागलीं तीं त्यांना पुढें केव्हांही सांवरून धरतां आलीं नाहींत.

२० स्पेनची अधोगति—इ. स. १५८० मध्यें पोर्च्युगाल देश स्पेनच्या अधिराज्यांत सामील झाला. यानंतर इ. स. १५८८ मध्यें **फिलिपनें** इंग्लंड पादाक्रांत करण्यासाठीं 'अजिंक्य आरमारा'ची उभारणी केली; पण त्याची काय दशा झाली तें मागें ३६ व्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा शेवट झाल्यावर त्याच्या

युरोपमधील सत्तेला ओहोटी लागल्यासारखी झाली आणि इ० स० १५९८ मध्यें फिलिप राजा मरण पावल्यावर तर स्पेनची अधोगति इतक्या झपाट्यानें झाली कीं, पुढल्या तीस चाळीस वर्षांत 'तिसऱ्या फिलिप'च्या कारकिर्दींत नेदरलंड, पोर्च्युगाल, वगैरे प्रांत स्वतंत्र होऊन युरोपखंडांतील त्याचें पहिल्या नंबरचें स्थान नष्ट झालें आणि त्याला तिसऱ्या चौथ्या दर्जाच्या राष्ट्राचा दर्जा प्राप्त झाला !

प्रकरण ३९ वें.

सोळाव्या शतकांतील सुधारणा आणि सुधारक.

(इ. स. १४८५–इ. स. १६०३)

[१ विहंगमावलोकन–ब्रिटिश राष्ट्राची सर्वांगीण प्रगति. २ सुधारणा म्हणजे काय ? ३ पोप–सत्तेचा कळस व अधोगति. ४ 'मायर्स'चें मत. ५ विद्येचें पुनरुज्जीवन आणि प्रसार. ६ नव्या विद्वानांतील असंतोष. ७ पापनिर्मुक्ततेचे पास. ८ ल्यूथरची शहाण्णव कलमी यादी. ९ पोपचें निर्वाणीचें अस्त्र. १० वर्म्स येथील सभा. ११ ल्यूथरची स्पष्टोक्ति. १२ ल्यूथरचे मित्र–त्याची सक्तीची विश्रांति. १३ जर्मनींतील शेतकऱ्यांचे दंगे. १४ स्पायर्सची धर्मपरिषद. १५ प्रॉटेस्टंट शब्दाची उत्पत्ति. १६ प्रॉटेस्टंटांचें म्हणणें. १७ रोमन कॅथोलिक शब्दाची उत्पत्ति. १८ या दोन पंथांतील भेद. १९ ग्रीक चर्च. २० सुधारणेचा इंग्लंडमध्यें प्रवेश–हेन्रीचें घटस्फोट प्रकरण. २१ इंग्लंडमधील नव्या धर्मसंस्थेचें स्वरूप–हेन्रीची धर्मरक्षक पदवी. २२ अँग्लिकन पंथ. २३ सुधारणेची परागति आणि प्रगति. २४ प्यूरिटन पंथ. २५–२६ कॅलव्हिनिझम. २७ प्रेस्बिटेरियन पंथ. २८ जेझुइट पंथ. २९ सुधारणेचा पहिला परिणाम. ३० परधर्मसहिष्णुता. ३१ लोकशाहीची वाढ. ३२ बौद्धिक प्रगति. ३३ राष्ट्रीय भाषांची वाढ. ३४ नीतिकल्पनांत बदल.–३५ आधिभौतिक सुखसोई आणि सुधारणा. ३६ सुधारणेचा अप्रत्यक्ष परिणाम. ३७ जुन्यांचें मत–त्रयस्थमत.]

१ विहंगमावलोकन—ट्यूडर वंशांतला पहिला राजा 'सातवा हेन्री' याच्या वेळेपासून त्या वंशांतली शेवटची राणी इलिझाबेथ हिच्या मृत्यूपर्यंतच्या कालाकडे विहंगमदृष्टीनें पाहिलें असतां इंग्लंडची–किंवा आतां ज्यास्त व्यापक दृष्टीनें म्हणावयाचें म्हणजे

ग्रेट ब्रिटनची—या कालांत राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक बाबतींत एकंदरींत प्रगतीच झालेली दिसून येते. ट्यूडर राजांनीं स्वतःच्या महत्त्वाबरोबरच आपण ज्या देशावर राज्य करतों, त्या देशाचें अंतःसामर्थ्य आणि परराष्ट्रांतील राजकीय महत्त्व व दरारा वाढविण्यासाठीं कसकसे प्रयत्न केले, हें आतांपर्यंतच्या हकीकतीवरून वाचकांना समजून आलेंच असेल. पण राजकीय सामर्थ्य हें या राष्ट्ररूपी विराट पुरुषाच्या देहाचें एक अंग झालें. या अंगाबरोबरच त्याच्या इतर अंगांची वाढ झाली नसती, तर त्याचा देह बेढब, चढाईच्या कार्यक्रमाला असमर्थ, आणि बचावाच्या धोरणाच्या वेळीं अप्रति-कार-क्षम बनून पुढें केव्हांतरी कोलमडून पडला असता. पण त्याच्या आतांपर्यंतच्या इतिहासांत तसें कधींच घडून आलेलें दिसत नाहीं. किंबहुना ब्रिटिश राष्ट्रासारखें सर्व बाजूंनीं सारखी वाढ होत असलेलें चिवट राष्ट्र आज उभ्या युरोपखंडांत-नव्हे साऱ्या जगांतही—नाहीं म्हटल्यास चालेल. तेव्हां या राष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करतांना त्याच्या राजकीय अंगांप्रमाणेंच इतर अंगांकडेही मधून मधून लक्ष देणें अवश्य आहे.

२ सुधारणा म्हणजे काय ?—इ. स. चें सोळावें शतक हें युरोप खंडाच्या इतिहासांत धार्मिक क्रांतीचें शतक असें समजतात. या काळाच्या धार्मिक इतिहासांत 'सुधारणा' (Reformation) हा शब्द ज्या चळवळीला लावतात, ती चळवळ म्हणजे रोमच्या मुख्य ख्रिस्ती धर्माध्यक्षानें (The Pope) घालून दिलेले तंत्रविधि (formalism) आणि त्यांना पुढें प्राप्त झालेलें विकृत स्वरूप (abuses) यांचा निषेध (protest) करून पोपच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारण्याची (revolt against the authority) चळवळ होय.

३ पोपसत्तेचा कळस व अधोगति—चौदाव्या व पंधराव्या शतकांत पोपची सत्ता धार्मिक बाबतींतच नव्हे तर ऐहिक व राजकीय बाबतींतही अगदीं कळसाला जाऊन पोंचली होती. आणि पंधराव्या शतकाच्या अखेरीस या सत्तेच्या नैतिक अधोगतीची अगदीं सीमा होऊन गेली होती.

४ मायर्सचें मत—प्रसिद्ध इतिहासकार मायर्स (Myres) म्हणतो—

"The Papacy reached its deepest degradation in the pontificate of Alexander VI (1493—1503), who seated himself in the Papal Chair through the most shameless bribery. His conduct was simply execrable. In his efforts to advance the interests of his in-

famous son Cæsar, he stopped short of no crime" यांचें तात्पर्य असें कीं " इ. स. १४९३ पासून १५०३ पर्यंत सहावा अलेक्झांडर हा पोपच्या गादीवर असतांना रोमन कॅथोलिक धर्मपंथाच्या अधोगतीची अगदीं हद्द झाली. या अलेक्झांडरला पोपची गादी मिळाली तीच मुळीं अगदीं निर्लज्जपणाच्या लांचलुचपतीनें. अलेक्झांडरच्या वर्तनाविषयीं तर काय बोलावयासच नको ! आणि त्यानें आपला दिवटा मुलगा सीझर याचे हितसंबंध दृढ करण्यासाठीं जे प्रयत्न केले त्या प्रयत्नांत त्यानें कोणता एक गुन्हा करावयाची बाकी म्हणून ठेवली नाहीं !" तेव्हां अशा परिस्थितींत कॉन्स्टँटिनोपलहून पळून आलेल्या ग्रीक पंडितांनीं पश्चिम युरोपांत विद्येच्या पुनरुज्जीवनाची (The Renaissance) जी लाट उसळून दिली होती, त्या लाटेबरोबर उत्पन्न झालेल्या नव्या विचारांनीं जुन्या धर्मसमजुतींत क्रांति घडून आल्यास नवल नाहीं.

५ विद्येचें पुनरुज्जीवन आणि प्रसार—पण एका दृष्टीनें हें विद्यापुनरुज्जीवन 'सुधारणे'चें प्रमुख कारण मानलें तर दुसऱ्या दृष्टीनें सुधारणेमुळें लोकांमधील विद्या-प्रसाराला जोराची गति मिळाली हीं गोष्टही खोटी नाहीं (It hastened the Reformation and was itself hastened by it). असो.

६ नव्या विद्वानांतील असंतोष—पोप, त्याच्या हाताखालचे लहान मोठे धर्माधिकारी, आणि मठवासी जोगी, यांचें भ्रष्ट वर्तन नवीन विद्येनें सुसंस्कृत झालेल्या मंडळींना खपण्यासारखें नव्हतें; आणि राजेलोकही अलीकडे पोपची राजकीय बाबतींतील लुडबुड (interference in governmental affairs) मानीनातसे झाले होते. छापखान्याच्या पूर्णावस्थेमुळें बायबलच्या हजारों प्रती छापल्या जाऊन लोकांच्या हातांत " ईश्वराचा शब्द " प्रत्यक्ष पडण्याची सोय झाली होती. आणि या शब्दाची आणि पाद्री (Priests) सांगत असलेल्या मतांची (Doctrines) आणि विधींची (Ceremonies) विसंगति पाहून जुन्या धर्मपंथावरील लोकांचा विश्वास उडत चालला होता.

७ पापनिर्मुक्ततेचे पास—जनतेंतील धार्मिक भावनांची स्थिति अशा प्रकारची असतांना इ. स. १५१३मध्यें पोप लिओ (Leo X) यानें रोममध्यें पीटर साधूचें देवालय बांधण्याकरतां पैसा जमविण्यासाठीं जेव्हां पापनिर्मुक्ततेचे पास (Indulgences) काढून ते ठिकठिकाणीं विक्रीसाठीं पाठविले, तेव्हां जर्मनींत लूथर या धर्मसुधारकानें पोपच्या या पैसा उकळण्याच्या पद्धतीचा निषेध केला.

८ लूथरची शहाण्णव कलमी यादी—‘ टेझेल ’ (Tetzel) या नांवाचा एक गोसावी (Friar) हे पास घेऊन जर्मनींत आला, तेव्हां लूथरनें या पासां-विरुद्ध एक ९६ कलमी यादी लिहून ती विटेंबर्गच्या देवालयाच्या दरवाजावर चिकटविली, आणि कोणाला छाती असेल तर त्यानें पुढें येऊन आपलें म्हणणें खोडून काढावें असें जाहीर आव्हान केलें. जर्मनींतल्या छापखान्यांनीं या यादीचा लगेच सगळ्या युरोपखंडभर प्रसार केला; आणि युरोपांतील सगळ्या सुशिक्षित वर्गाचे डोळे पोपची आज्ञा जाहीर रीतीनें अवमानणाऱ्या या सुधारकाकडे लागले. जिकडे तिकडे वादविवाद आणि मतप्रदर्शन सुरू झालें. आणि लवकरच युरोपखंडाचीं धार्मिक बाबतींत दोन शकलें होऊन उत्तर युरोप लूथरच्या मतांचें आणि दक्षिण युरोप पोपच्या मतांचें झालें.

९ पोपचें निर्वाणीचें अस्त्र—इ. स. १५२० मध्यें पोपनें आपलें निर्वाणीचें अस्त्र बाहेर काढलें. त्यानें लूथरचे लेख ‘पाखंड’मताचे आहेत असें ठरवून ते कोणींही वाचूं नये असें फर्मान सोडलें आणि लूथरनें दोन महिन्यांच्या आंत आपली चूक कबूल करून ते लेख मागें घेतले नाहींत तर त्याला पकडून पोपच्या धर्मसंस्थेच्या हवालीं करावा असा हुकूम सोडला. लूथरही आतां हट्टालाच पेटला; त्यानें पोप हाच धर्मलंड (Anti-Christ of Revelation) आहे असें जाहीर केलें, आणि पोपचें आज्ञापत्र विटेंबर्गच्या वेशीवर उघडपणें जाळून टाकलें ! (इ. स. १५२०).

१० वर्म्स येथील सभा—यानंतर पोपनें स्पेनचा राजा पांचवा चार्लस (Charles V)–जो रोमन कॅथोलिक धर्माचा कट्टा पुरस्कर्ता होता व ज्याला नुकतेंच जर्मनीचें बादशाहीपद देण्यांत आलें होतें–त्याला सांगून वर्म्स (Worms) येथें एक मोठी धर्मपरिषद (Diet) भरविली (इ. स. १५२१). या सभेला जर्मनींतले सगळे संस्थानिक, सरदार, व धर्माधिकारी जमा झाले होते. लूथरला या सभेपुढें येऊन आपलीं मतें सिद्ध करण्याविषयीं बादशाहाचें बोलावणें (Summons) गेलें. त्याच्या मित्रांनीं त्याला या सभेंत जाऊन आपला जीव धोक्यांत न घालण्याविषयीं परोपरीनें सांगितलें; पण तो म्हणाला, “असलीं शेंकडों भुतें(Devils) जमा झालीं तरी मी त्यांना भिऊन मागें सरणार नाहीं !”

११ लूथरची स्पष्टोक्ति--शेवटीं लूथर या बादशाही सभेंत (The Imperial assembly) जाऊन दाखल झाला. सभेनें त्याला आपली चूक कबूल करण्यास (to recant his errors) सांगितलें. पण त्यानें सांगितलें कीं, मी

प्रतिपादलेलीं मतें बायबलच्या विरुद्ध आहेत असें कोणीं तें दाखवून द्यावें म्हणजे मी माझे लेख मागें घेईन. पण तसें कोणींच केलें नाहीं. सभेंत जमलेल्या कित्येक 'भुतां'नीं— किंवा 'देवचारां'नीं म्हणा—त्याला ताबडतोब जाळून मारावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती. पण चार्लस बादशहाला तें आवडलें नाहीं; आणि लूथर सभागृह सोडून सुखरूप माघारा गेला. मात्र सभेनें तो निघून गेल्यावर एक ठराव (Decree) करून त्याला पाखंडी (Heretic) व राजरक्षणबाह्य (Outlaw) ठरविलें !

१२ लूथरचे मित्र—स्पेनचा **चार्लस** बादशहा लूथरला व त्याच्या धर्ममतांना पाण्यांत पाहणारा होता, तरी जर्मनींतले सगळेच संस्थानिक कांहीं तसे नव्हते. **सॅक्सनी**-(Saxony)चा संस्थानिक (Elector) **फ्रेडरिक** (Frederick the Wise) हा लूथरचा मित्र होता. लूथर वर्म्स येथील सभेंतून परत येत असतां त्याच्या जिवाला अपाय होऊं नये म्हणून फ्रेडरिकनें वाटेंतच कित्येक बुरखा घेतलेल्या घोडेस्वारांना (masked horsemen) पाठवून त्याला पकडून कोणाला नकळत वॉर्टनबर्गच्या किल्ल्यांत नेऊन ठेवलें. त्या ठिकाणीं सुमारें एक वर्षपर्यंत लूथरला ही जबरीची विश्रांति घ्यावी लागली. पण त्यानें ती बायबलचें भाषांतर करण्यांत घालविली.

१३ जर्मनींतील शेतकऱ्यांचे दंगे--इ. स. १५२४-२५ हीं वर्षें जर्मनींत शेतकऱ्यांच्या दंग्यांनीं मोठ्या धामधुमीचीं गेलीं. हे शेतकरी जमिनदारांच्या जुलमांनीं अगदीं गांजून गेले होते. इतर देशांत पाद्री लोक बहुधा शेतकऱ्यांची बाजू घेऊन त्यांना मदत करीत; पण जर्मनींतली स्थिती अगदीं विरुद्ध होती. तेथले पाद्री शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजीं त्यांच्या धार्मिक कृत्यांसाठीं त्यांच्यावर नानाप्रकारचे कर बसवून त्यांचें जीवित अधिकच कष्टमय करून सोडीत. शेवटीं या दुहेरी जुलमांत लूथरच्या पाद्र्यांविरुद्ध चाललेल्या चळवळीची भर पडल्यावर सूबिया (Suabia) आणि फ्रँकोनिया (Franconia) येथील शेतकऱ्यांनीं बंडाचा बावटा उभारला. बड्या सरदार जमिनदारांचे किल्ले आणि जोग्यांचे मठ हे त्यांच्या प्रथम भक्ष्यस्थानीं पडले, आणि अनेक ठिकाणीं अनन्वित अत्याचार (horrible outrages) झाल्याच्या बातम्या सर्वत्र पसरल्या. शेवटीं जर्मन बादशहानें हें बंड मोडलें, पण त्यांत एक लाख लोक प्राणास मुकले, जर्मनीचा दक्षिण भाग उध्वस्त झाला (ravaged), आणि सुधारकांच्या शत्रूंना कार्यकारणांचा विपर्यास करून या बंडाचें खापर लूथरच्या व त्याच्या अनुयायांच्या डोक्यावर फोडण्याला चांगलें निमित्त सांपडलें !

१४ स्पायर्सची धर्मपरिषद्--इ० स० १५२९ मध्यें जर्मनींतच स्पायर्स येथें दुसरी धर्मपरिषद (Second Diet of Spires) भरविण्यांत आली. या सभेनें

धार्मिक बाबतींत पोप हाच मुख्य असून त्यानें घालून दिलेले आचाराचे नियम—अर्थात् जुने—सर्वांनीं पाळलेच पाहिजेत, असा ठराव करून ल्युथरप्रभृति नवमतवाद्यांच्या मतांचा प्रसार करण्याची मनाई करणारें फर्मान (Edict) काढलें. पण या मुदतींत सुधारकांच्या मतांनीं जनतेच्या मनांत चांगलेंच मूळ धरलेलें असल्यामुळें जर्मन साम्राज्यांतील सात संस्थानिक आणि बऱ्याच मोठ्या शहरांतील प्रतिष्ठित नागरिक यांनीं या फर्मानाचा निषेध करणारें एक जाहीर-पत्रक (a formal protest) प्रसिद्ध करून लोकांची विचारशक्ति व सदसद्विवेक बुद्धि (judgment and conscience) यांना फर्मानांनीं बंधन घालण्याचा धर्मपरिषदेला अधिकारच नाहीं असें जाहीर केलें.

१५ प्रॉटेस्टंट शब्दाची उत्पत्ति—अशा रीतीनें धर्मपरिषदेच्या अधिकाराचा अधिक्षेप करणाऱ्या या मंडळीला इंग्रजी ' प्रॉटेस्ट ' (Protest) या शब्दावरून ' प्रॉटेस्टंट '(Protestant) म्हणजे अधिक्षेपक—निषेधक असें नांव पडलें. (आम्हीं या पुस्तकांत या पोप-निषेधकांचा सर्वसामान्यपणें 'सुधारक' या नांवानें उल्लेख केला आहे.)

१६ प्रॉटेस्टंटांचें म्हणणें—पोपसत्ता आणि पोपस्मृति यांच्या या निषेधकांचें (The Protestants) थोडक्यांत म्हणणें असें कीं, ख्रिस्ती श्रुतिग्रंथांत म्हणजे बायबलांत प्रकट झालेला परमेश्वराचा शब्द (The Word of God) हे भोंदू धर्माध्यक्ष व त्यांचे अनुयायी आपल्या निरर्थक आणि भ्रष्ट संस्कारांनीं (rituals) व समारंभांनीं (ceremonies) खोटा पाडतात आणि लोकांना भलतीच दिशा दाखवून खड्डयांत लोटतात. म्हणून धार्मिक बाबतींत दृढमूल झालेली त्यांची सत्ता उखडून टाकून आपण आपली निष्ठा (allegiance) धर्म-खात्यावर (The Church) न ठेवतां धर्म-पुस्तकावर (The Bible) तेवढी ठेवली म्हणजे झालें.

१७ रोमन कॅथॉलिक शब्दाची उत्पत्ति—पोप-निषेधकांना प्रॉटेस्टंट हें नांव पडल्यावर त्यांनीं उलट पोपला देव मानणाऱ्यांना तिरस्कारानें ' रोमचे दास ' अशा अर्थाचें ' रोमॅनिस्ट ' (Romanist) असें नांव दिलें. पण पोपचे अनुयायी स्वतःला कॅथॉलिक (Catholic) म्हणजे जुन्याचें संरक्षक किंवा स्थिर-रक्षक असेंच म्हणत असत. पुढें रोमॅनिस्ट व कॅथॉलिक या दोन नांवाचा संयोग होऊन रोमन कॅथॉलिक (Roman Catholic) हें नांव प्रचारांत आलें.

१८ या दोन पंथांतील भेद—' प्रॉटेस्टंट ' व ' रोमन कॅथॉलिक ' या दोन पंथांमधला तात्त्विक भेद थोडक्यांत सांगावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, रोमन

कॅथोलिक पंथांत पोप व तन्नियुक्त धर्मगुरु यांच्या मध्यस्थीशिवाय मनुष्याला मोक्ष मिळणें शक्य नाहीं असें समजण्यांत येतें, तर प्रॉटेस्टंट पक्षांत मोक्षप्राप्तीला या 'भटां'च्या मध्यस्थीची जरूरी नाहीं, मनुष्यानें 'बायबल'वर विश्वास ठेवून त्यांत सांगितल्याप्रमाणें आचरण ठेवलें म्हणजे तो पापविमुक्त होऊन मोक्षाचा अधिकारी होतो असें प्रतिपादण्यांत येत असतें.

१९ ग्रीक चर्च—याशिवाय-'ग्रीक चर्च' (Greek Church) नांवाचा तिसरा एक पंथ ख्रिस्तीधर्मांत आहेच. तो या सुधारणेच्या चळवळीच्या पूर्वींच निघालेला असून त्याच्या मुख्य आचार्यांची (Patriarch) गादी कित्येक शतकें 'कॉन्स्टँटिनोपल' येथें होती. हल्लींच्या काळांत रशियन लोक हे या ग्रीक चर्चचे मुख्य अनुयायी आहेत-किंवा निदान अलीकडेपर्यंत तरी होते. कारण आतां 'सोव्हिएट' सरकारनें त्या देशांतून 'धर्मा'ची अजिबाद उचलबांगडी करून टाकली आहे!

२० सुधारणेचा इंग्लंडमध्यें प्रवेश—युरोप खंडाच्या प्रक्षुब्ध वातावरणांत उठलेली पोप-निषेधाची ही लाट लवकरच इंग्लंडच्या किनाऱ्यावरही येऊन पोंचली. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दीत राजाला आपलें कॅथराइनशीं झालेलें लग्न रद्द करवून घ्यावयाचें होतें; पण तत्कालीन पोपनें स्पेनच्या राजाच्या भीतीनें तसें करण्याचें नाकारलें, तेव्हां हेन्रीनें पोपचा इंग्लंडांतला धार्मिक बाबतींतला अधिकारच कसा झिडकारून टाकला हें आपण मागें पाहिलेंच आहे. पण कॅथराइनच्या या घटस्फोट प्रकरणांत हेन्रीचा मुख्य हेतु धार्मिक नसून राजकीयच होता. *

---

* Political considerations, without doubt, had much if not most, to do in bringing Henry to this state of, mind. He was ready to divorce Catherine and break openly with Spain, because, the Emperor Charles V to whom he had offered the hand of the Princess Mary had married the Infanta of Portugal and thus cast aside the English alliance. म्हणजे स्पेनच्या चार्लस राजाला हेन्रीनें आपली मुलगी मेरी देऊं केली असतांना त्यानें ती न स्वीकारतां पोर्तुगालच्या इनफंटा राजकन्येशीं लग्न करून इंग्लंडच्या मैत्रीची आपल्याला पर्वा नाहीं असें दाखविलें त्यामुळें हेन्रीनेंही कॅथराइनशीं घटस्फोट करून स्पेनचा संबंध उघडपणें तोडून टाकण्याची तयारी केली. (Myres)

२१ इंग्लंडमधील नव्या धर्मसंस्थेचें स्वरूप—यानंतर पार्लमेंट सभेंत निरनिराळे कायदे संमत करून घेऊन हेन्री स्वतःच इंग्लंडच्या धर्मसंस्थेचा ' सर्वाधिकारी ' कसा बनला हें पूर्वी ३० व्या प्रकरणांत येऊन गेलेंच आहे. तथापि निव्वळ धार्मिक दृष्ट्याच पाहिलें तर हेन्रीच्या कारकिर्दींत इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या धर्मसंस्थेचें स्वरूप प्रॉटेस्टंट होतें असें म्हणतां येत नाहीं. फार झालें तर ही संस्था या वेळीं संक्रमणावस्थेंत होती असें म्हणतां येईल. ‡ स्वतः हेन्रीला लूथरचीं मतें मान्य नव्हतीं. इतकेंच नव्हे तर त्यानें तीं मतें खोडून काढणारा एक निबंध लिहून वर सांगितलेल्या घटस्फोट प्रकरणाच्या पूर्वीं पोपकडून ' धर्मरक्षक ' (Defender of the Faith) ही पदवीही संपादन केली होती. +

२२ अँग्लिकन पंथ—हेन्रीच्या मागून इंग्लंडच्या गादीवर आलेला त्याचा मुलगा सहावा हेन्री याच्या कारकिर्दींत मात्र जिला खऱ्या अर्थानें सुधारणा असें म्हणतां येईल अशी बरीच धार्मिक उलथापालथ घडून आली. आणि निव्वळ प्रॉटेस्टंट नव्हे किंवा निव्वळ कॅथोलिकही नव्हे, तर ज्यांत या दोन्ही पंथांचें थोडथोडें मिश्रण झालें आहे असा खास इंग्लंडचा एक स्वतंत्र धर्मपंथ (Established Church) अस्तित्वांत आला. या पंथाला इंग्लंडचें वैशिष्ट्यदर्शक असें 'अँग्लिकन' (Anglican) हें नांव कित्येकांनीं दिलें आहे. ×

---

‡ It was not Protestant; and it was just as far from being Catholic; we can only say that it was in a transition state. —Myres.

+ ही पदवी अद्यापिही इंग्लंडच्या अधिपतीच्या बिरुदावलींत कायम आहे. पण आज या पदवीचे शब्द तेच असले तरी इंग्लंडचे राजे आज ज्या धर्माचे (Faith) रक्षक आहेत, तो ' धर्म ' हेन्रीनें रक्षिलेल्या ' धर्मा 'च्या किती तरी विरुद्ध आहे. कर्णार्जुन–युद्धाच्या वेळीं कर्णानें श्रीकृष्णाला ' धर्म ' पाळण्याविषयीं सांगितलें असतां श्रीकृष्णानें कर्णाच्या व कौरवांच्या पूर्वीच्या ' अधर्मा 'ची त्याला आठवण देऊन शेवटीं " रक्षितसों ' धर्मा 'तें आम्हांला ' धर्म ' ठाऊका नान्य " असें सांगितलें, त्यांतील ' धर्म ' शब्दांतील श्लेषाची या पदवींतील Faith शब्दांतील श्लेषाशीं तुलना करण्यासारखी आहे.

× या धर्मपंथाला **' एपिस्कोपसी '** (Episcopacy) असें दुसरें नांव असून त्यांत धर्मखात्याची बहुतेक व्यवस्था ' बिशपां 'च्या मार्फत चालते. किंवा

२३ सुधारणेची परागति आणि प्रगति—एडवर्डच्या मागून आलेल्या मेरी राणीच्या कारकिर्दीत या सुधारणेला पुनः उलटी गति मिळाली आणि इंग्लंडवर पोपचें धार्मिक वर्चस्व पुनः स्थापिलें गेलें. या मेरीच्या कारकिर्दीत प्रॉटेस्टंट सुधारकांचे झालेले हाल तर अंगावर शहारे आणणारे आहेत.* मेरीच्या पश्चात् सुप्रसिद्ध इलिझाबेथ राणी इंग्लंडच्या गादीवर आली आणि सुधारणेचें गाडें मागें वळलें होतें तें पुनः सरळ रस्त्याला लागलें. पण तिच्याही कारकिर्दीत धार्मिक बाबतींत सुधारणा झाली ती धर्मविषयक कळकळीनें नसून पुष्कळ अंशीं राजकीय व व्यावहारिक हेतूनेंच. इलिझाबेथच्या कारकिर्दीत रोमन कॅथोलिकांप्रमाणेंच प्यूरिटन सारख्या 'शुद्ध' धार्मिक सुधारणावाल्यांचा छळ झाला त्याचें कारण झालें तरी हेंच होय. असो.

२४ प्यूरिटन पंथ—या कालांत धर्मविषयक मतभेदांवरून उत्पन्न झालेले आणखी पोटपंथ येणेंप्रमाणें—

प्यूरिटन—(Puritan) हा प्रॉटेस्टंट पंथांतील एक जहाल उपपंथ होय. प्युरिटन या इंग्रजी शब्दांत मूळ शब्द प्यूअर (Pure) म्हणजे 'शुद्ध' असा असून

महाराष्ट्रांतील हल्लींच्या सत्यशोधकी भाषेंत सांगावयाचें म्हणजे या पंथांत अजून 'भटशाही' कायमच आहे.

* पण त्या काळीं या धार्मिक छळाबद्दल एकटी मेरीच दोषी होती असें नाहीं. सुधारक काय, किंवा दुर्धारक अगर पुराणमतवादी काय, सर्वांनाच असें वाटत असे कीं, आपल्या, अर्थात आपल्या पंथाच्या, लोकांव्यतिरिक्त इतर माणसांच्या समजुती चुकीच्या असून तीं माणसें त्या समजुती तशाच उराशीं बाळगून बसतील, तर मरणोत्तर त्यांना अक्षय्य नरकवास किंवा अग्निदाहाची (Everlasting flames) शिक्षा भोगावी लागणार. तेव्हां ती त्यांची शिक्षा टळावी म्हणून या जगांतच थोड्याशा लोकांना भस्मसात् करण्यांत आलें, तर इतर लोक तरी पाखंडमतापासून परावृत्त होऊन अक्षय्य शांतीचा लाभ घेऊं शकतील; इतकेंच नव्हे तर ज्यांच्या हातीं धार्मिक सामाजिक अगर राजकीय सत्ता असेल, त्यांनीं आपल्या चुकलेल्या बांधवांना ताळ्यावर आणण्यासाठीं आपल्या सत्तेचा व सामर्थ्याचा उपयोग न करणें म्हणजे स्वतःचें एक अवश्य कर्तव्य न बजावल्यानें आपल्यावर परमेश्वराची अवकृपा (Heaven's displeasure) ओढवून घेणें होय अशीच पुष्कळांची समजूत असे. तात्पर्य काय कीं, त्या कालच्या धार्मिक अत्याचारांबद्दल एकाच व्यक्तीला दोष देण्यापेक्षां सर्वसाधारणपणें त्या काला (age)-लाच दोष देणें अधिक योग्य होइल.

आंग्लधर्मवाद्यां(Anglicans)पेक्षां शुद्धतर असा पूजाविधि (Purer form of worship) असावा असें म्हणणाऱ्यांना तो शब्द प्रथम थट्टेनें लावीत असत. पण पुढें या थट्टेच्या शब्दालाच मान्यतेचें स्वरूप (honorable distinction) मिळून सुधारकांतील शुद्धतर सुधारक—कट्टे सुधारक—वीरसुधारक अशा अर्थानें तो रूढ झाला.

२५ **कॅल्व्हिनिझम्** (Calvinism)—जॉन कॅल्व्हिन (John Calvin) हा वरील प्यूरिटन पंथाचा (Puritanism) उत्पादक होय. " मोक्षप्राप्तीसाठीं मध्यस्थाची जरूरी नाहीं, 'आत्मैव आत्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः' हेंच या बाबतींतलें खरें तत्त्व आहे, धर्मविधि साधे असावे, धर्मव्यवस्था लोकायत्त असावी. बाप्तिस्मा (Baptism) देतांना क्रॉसची खूण करणें, लग्नाच्या वेळीं आंगठ्यांची अदलाबदल करणें, प्रार्थनेच्या वेळीं गाणें बजावणें करणें, नानाप्रकारचे उपासतापास आणि उत्सव, हे सर्व व्यर्थ आहेत " असें तो प्रतिपादन करीत असे. ल्यूथरचें धर्मसुधारणेचें कार्य यानें बरेंच पुढें रेटलें. त्याच्या कट्ट्या अनुयायांना 'कॅल्व्हिनिस्ट' (Calvinist) असें म्हणतात.

२६ या पंथाचा प्रसार खुद्द युरोपखंडापेक्षां बाहेरच ज्यास्त झाला. आणि त्याच्या तत्त्वांचा परिणाम त्या त्या देशांच्या धर्मपंथांवरच नव्हे, तर सर्वसाधारण इतिहासावरही घडून आला. फ्रान्स, स्कॉटलंड, इंग्लंड आणि अमेरिका येथील सगळे जहाल सुधारक कॅल्व्हिन पंथाचींच अपत्यें होत. (The Huguenots of France, the Covenanters of Scotland, the Puritans of England and the Pilgrim Fathers of New England were all the offspring of Calvinism).

२७ **प्रेस्बिटेरियन पंथ**—(Presbyterian Religion) हा ख्रिस्ती सुधारकांचाच एक पोटपंथ आहे. इंग्लंडमधील जुने सुधारक व हे नवे सुधारक यांच्यामध्यें मुख्य फरक असा कीं, इंग्लंडमधील सुधारकांनीं कॅथोलिक पंथापासून आपली फारखत करून घेतली, तरी त्यांच्या धर्मव्यवस्थेंत खालच्या दर्जाचे 'क्लर्जि' (Clergy), त्यांच्यावर 'बिशप' (Bishop) व त्यांच्या वर 'आर्चबिशप' (Arch Bishop), अशी अधिकाऱ्यांची परंपरा असून इंग्लंडचा तख्ताधिपति हा सगळ्या धर्मखात्याचा मुख्य असें मानण्यांत येतें. प्रेस्बिटेरियन पंथाला ही व्यवस्था

मान्य नसून त्यांचे धर्मगुरु सामान्य जनांनींच निवडलेले असतात, आणि त्यांच्या धर्मखात्याची व्यवस्था हे धर्मगुरु व इतर कांहीं शहाणे (Presbyters) यांच्या मंडळाकडे सोंपविलेली असते. आणि ही निवडणुकीची पद्धतीहि अगदीं लहानशा खेड्यांपासून मोठ्या शहरांपर्यंत एकसारखीच असते. या पंथाला ' शिष्टजनसत्ताक धर्मपंथ ' असें नांव देतां येईल. स्कॉटलंडमध्यें या पंथाचें विशेष प्राबल्य असून अमेरिकन संयुक्त संस्थानेंही बहुतेक याच पंथाचीं आहेत.

२८ जेझुइट पंथ (Jesuit)—प्रॉटेस्टंट पंथांतील प्यूरिटन, प्रेस्बिटेरियन वगैरे उपपंथांप्रमाणेंच जेझुइट हा रोमन कॅथोलिक पंथाचा एक उपपंथ आहे. इ. स. १५३४ मध्यें इग्नेशियस लायोला (Ignatius Loyola) नांवाच्या एका स्पेनमधील सरदारानें सुधारकांच्या हल्ल्यापासून जुन्या धर्माचें संरक्षण करण्यासाठीं हा पंथ स्थापन केला. आणि या पंथांतील लोकांनीं पुष्कळ वर्षेंपर्यंत पोपच्या गादीची सत्ता अबाधित राखण्यासाठीं सुधारकांशीं निकरानें झुंज केली. पोपांच्या पडत्या काळांत पोपची गादी त्यांनीं बरीच सांवरून धरल्यामुळें त्यांना त्या गादीचे आधारस्तंभच मानीत असत. या पंथांतील सभासदांचे धर्मगुरु, सभासद व साधे सभासद असे दोन वर्ग असत. व या पंथाची दीक्षा घेण्यापूर्वी प्रत्येक सभासदाला कडक शिस्त पाळून बराचसा अभ्यास करावा लागे. "आम्हीं स्वेच्छेनें गरिबींत राहूं, नीतिमत्ता सोडणार नाहीं. वरिष्ठाचे हुकूम बिनहरकत पाळूं, पोपच्या आज्ञा शिरसावंद्य मानूं" वगैरे प्रकारच्या शपथा या पंथांत प्रवेश करून घेऊं इच्छिणाऱ्यांना घ्याव्या लागत. त्यांची धर्मश्रद्धा, कर्तव्यनिष्ठा व विद्वत्ता यांच्या योगानें त्यांनीं कांहीं काल जनतेच्या मनावर आपली चांगलीच छाप बसविली होती. शाळांतून शिकविण्याचें काम अंगावर घेऊन त्यांनीं शिक्षणपद्धतींत अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या कडव्या धर्मनिष्ठेनें व धर्मसेवेबरोबरच राजकारणांतही ढवळाढवळ करण्याच्या संवईनें त्यांच्या हातून कित्येक वेळां अनन्वित कृत्येंही घडलीं व त्यांचें प्रायश्चित्त म्हणून त्यांना अनेक वेळां हद्दपारी, तुरुंगवास, व फांशी या शिक्षाही भोगाव्या लागल्या. इ. स. १५७२ मध्यें पारीस येथें बार्थोलोम साधूच्या जयंतीच्या दिवशीं या पंथाच्या लोकांनीं केवढा अत्याचार केला, हें प्रकरण ३५ मध्यें सांगितलेंच आहे. पोर्च्युगालहून हिंदुस्तानांत आलेल्या या लोकांनीं गोमांतकांतील हिंदु लोकांचे कसे हाल केले व त्या प्रांताचें मूळचें हिंदुस्वरूप कसें पार बदलून टाकलें हें सर्वश्रुतच आहे. अजूनही या पंथाचे पुष्कळ लोक विरक्तपणानें राहून ख्रिस्ती धर्मप्रसाराचें कार्य करीत असतात.

२९ सुधारणेचा पहिला परिणाम.—सोळाव्या शतकांतील ‘सुधारणा’ व तिच्यापायीं समाजांत उद्भवलेले हे निरनिराळे पंथोपपंथ यांची माहिती सांगितल्यावर या ‘सुधारणे’चे त्या कालच्या व त्यापुढील कालच्या लोकस्थितीवर काय परिणाम (Results of the Reformation) घडून आले हेंही सांगितलें पाहिजे. युरोपच्या उत्तर भागांतील देश पोपच्या अधिकारक्षेत्रांतून बाहेर पडून धार्मिक बाबतींत स्वतंत्र होणें (severance from the ecclesiastical Empire of Rome), हा या सुधारणेचा पहिला व सर्वांत मोठा परिणाम होय. मध्ययुगांत (Medieeval centuries) उत्तर युरोपांतल्या रानटी टोळ्यांना एकत्र आणण्याचें काम ख्रिस्ती-धर्मानें केलें होतें. त्या वेळीं त्यांना ख्रिस्ती धर्माची सावली उपकारक झाली. पण तोच ख्रिस्ती धर्म आतां अन्यायी व जुलमी बनल्यावर हे उत्तरेचे ट्यूटॉनिक (Teutonic) लोक त्याचे वाभाडे काढण्याला सर्वांच्या अगोदर तयार झाले, आणि त्यांनीं आपापल्या देशांत आपापल्यापुरता पोपपासून अलिप्त असा स्वतंत्र पंथ स्थापन केला.

३० परधर्म-सहिष्णुता—परधर्माविषयीं सहिष्णुता (Religious toleration) बाळगिली पाहिजे हें तत्त्व प्रस्थापित होणें हा या सुधारणेचा दुसरा परिणाम होय. पहिले पहिले सुधारक हें तत्त्व मान्य करण्याइतके मनोविकास झालेले किंवा अंतःकरणाचे उदार नव्हते हें खरें; पोपसेवक (Papists) आणि पोपनिषेधक (Protestants) दोघेही ‘पाखंडमत’ (herecy) नाहींसें झालें पाहिजे असेंच म्हणणारे होते. फक्त त्यांच्या ‘पाखंडा’च्या व्याख्येंत फरक होता. पाखंड्यांना जाळून मारलें पाहिजे असें दोघेही म्हणत. मात्र पोपविरुद्ध बोलणें हें पाखडांत येत नाहीं असें पोपनिषेधकांचें म्हणणें होतें. (Heretics were still to be burned, but speaking against the Pope was declared no longer to be herecy !) पण प्रारंभीं अशी स्थिती असली तरी भक्तीचें अगर श्रद्धेचें अधिष्ठान ‘धर्माचार्यां’वरून निघून ‘धर्मपुस्तका’वर येऊन बसलें म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क प्रस्थापित झाल्यासारखा झालाच, आणि व्यक्ति-स्वातंत्र्याचा हक्क (The right of private judgment) एकदां मान्य झाला म्हणजे त्याचें पर्यवसान सरळ परधर्म-निदान-परपंथ-सहिष्णुतेंत झाल्याशिवाय कसें राहील ?

३१ लोकशाहीची वाढ—राजकीय बाबतींत उत्तरोत्तर लोकशाहीची वाढ (growth of Democracy) हा या सुधारणेचा तिसरा परिणाम होय.

कार्याकार्यव्यवस्थितींत ‘ शास्त्र्या’पेक्षां ‘ शास्त्र ’ प्रमाण, आणि पोपसारखा बडा शास्त्री केवढाही मोठा झाला तरी तो मनुष्यच आहे, तो चुकीस पात्र आहे, तेव्हां त्याच्यावर सर्वस्वीं अवलंबून राहणें केव्हांही योग्य नाहीं, मग त्याचा मनाला न पटणारा हुकूम मानणें अगर जुल्म सहन करणें तर दूरच, ही विचारसरणी एकदां जनतेला पटली म्हणजे धर्मासारख्या अतींद्रिय ज्ञानाच्या बाबतींत जर ही दृष्टि, तर व्यावहरिक राजकारणासारख्या इंद्रियगोचर बाबतींत एका व्यक्तीचा जुल्म (despotism) मानणें हा तरी कुठला न्याय ? असें लोकांना सहजच वाटावयाचें. त्यामुळें युरोपांत ज्या ज्या ठिकाणीं सुधारणेच्या द्वारें मतस्वातंत्र्याचा प्रसार झाला त्या त्या ठिकाणीं धर्मस्वातंत्र्याच्या मागून राजकीय स्वातंत्र्य, पदार्थांच्या मागून छाया जावी त्याप्रमाणें, सरळ चालत गेलें. फिशर (Fisher) नांवाचा इतिहासकार म्हणतो, ‘नेदर्लंड (Netherlands) म्हणजे हल्लींचे हॉलंड आणि बेलज्यम हे देश स्वतंत्र झाले ते सुधारणेमुळेंच; इंग्लंडच्या राजकीय स्वातंत्र्याला कारण सुधारणाच; आणि अमेरिकेचें प्रजासत्ताक राज्य इंग्लंडपासून स्वतंत्र झालें त्याला कारणही सुधारणाच.’ (Reformation made the free Netherlands; the Reformation made free England, or was an essential agent in this work; the Reformation made the free Republic of America). किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं प्रॉटेस्टंट पंथ आणि स्वातंत्र्य, व रोमन कॅथोलिक पंथ आणि पारतंत्र्य यांची सांगड अबाधितच आहे !

३२ बौद्धिक प्रगति—व्यक्तीची बौद्धिक प्रगति आणि विचारांची वाढ (intellectual progress) हा या सुधारणेचा आणखीं एक परिणाम होय. सुधारणेचा जन्मच मुळीं बौद्धिक पुनरुज्जीवनांत (intellectual revival) झाल्यामुळें तिनें हें मातृऋण जगाची बौद्धिक प्रगति (mental progress of the world) करून फेडलें तर त्यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं.

३३ राष्ट्रीय भाषांची वाढ—सुधारकांना जनताजनार्दनाची (Masses) सेवा करतांना जनतेला समजेल अशा भाषेंतच बोलावें लागलें. त्यामुळें लोकभाषांना (National Languages) चालन मिळालें, आणि त्या भाषा वाढीला लागल्या. सुधारणापूर्वकालीन ग्रंथांना लॅटिन या शिष्ट व ‘ संस्कृत ’ भाषेचें माध्यम

असल्याशिवाय मान्यता मिळत नसे; पण सुधारणेनंतर लॅटिन मृतभाषा बनून जर्मन आणि इंग्लिश या भाषेंतील ग्रंथ भराभर प्रसार पावले.

३४ नीतिकल्पनांत बदल—सुधारणापूर्वकालीं ठिकठिकाणच्या ख्रिस्ती मठांतील जोगी आणि जोगिणी, बुवा आणि त्यांचे शिष्य यांच्या वर्तनांत जी घाण माजली होती, आणि जिचा दुर्गंध युरोपांतल्या सगळ्या समाजांना दूषित करून सोडीत होता ती घाण सुधारणेच्या प्रगतीबरोबर झालेल्या मठांच्या विध्वंसामुळें नाहींशी झाली. पाद्र्यांना लग्न करण्याची मोकळीक मिळाल्यामुळें सक्तीचें ब्रह्मचर्य हें समाजांतील अनीतिमत्तेच्या वाढीला पोषक झालेलें एक कारणही नाहींसें झालें. आणि धर्ममूलक साध्या रहाणीचें तत्त्व समाजाला पटल्यावर मानवी जीवनाचें पावित्र्य व उच्चत्व यांची वाढ झपाट्यानें होत गेली. इंग्लंडांतले ' प्युरिटन (Puritans) फ्रान्समधले ' ह्यूजिनॉट ' (Huguenots) आणि स्कॉटलंडमधले ' कॉव्हेनँटर ' (Covenanters) हे 'जुन्या' (Catholic) लोकांच्या दृष्टीनें कितीही ' भ्रष्ट ' असले तरी त्यांचे आचार आणि विचार जळजळीत धर्माभिमानानेंच उत्स्फूर्त झालेले होते यांत संशय नाहीं.

३५ आधिभौतिक सुखसोई आणि सुधारणा—सोळाव्या शतकानंतर आधिभौतिक सुखसोई आणि सुधारणा (Material Progrss) यांच्या वाढीला मिळालेली जोराची गति हाही या धार्मिक सुधारणेचा एक महत्त्वाचा परिणाम होय. आणि याचें ढळढळीत उदाहरण म्हणजे स्पेन, पोर्च्युगाल आणि इटलीयां सारखे कॅथोलिक पंथाभिमानी देश, इंग्लंड, हॉलंड आणि जर्मनीसारख्या प्रॉटेस्टंटपंथी देशांशीं साहस, शोध आणि औद्योगिक प्रगति या बाबतींत यापुढें टिकाव धरूं शकले नाहींत हें होय.

३६ सुधारणेचा अप्रत्यक्ष परिणाम—सुधारणेच्या या प्रत्यक्ष परिणामांप्रमाणेंच जुन्या मताच्या लोकांना खुद्द रोमन कॅथोलिक पंथाची अंतःसुधारणा करण्याची जरुरी वाटून त्यांच्यांत ' जेझुइट ' सारख्या मंडळ्या निर्माण होणें हा अप्रत्यक्ष परिणामही कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. ड्रेपर (Draper) नांवाच्या ग्रंथकारानें तर एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'सुधारणेनें हें एवढें एकच कार्य घडवून आणलें असतें तरीही जग तिला धन्यवाद दिल्यावांचून राहतें ना. '

३७ 'जुन्यां'चें मत—' सुधारणे 'चे वर दिलेले परिणाम हे इष्ट व हितकर ठरले होते ते अर्थातच सुधारकांच्या दृष्टीनें. रोमन कॅथोलिक लोकांच्या मतें ही

'सुधारणा' म्हणजे जगावर मोठी आपत्तिच (world disaster) आली होती, व त्यांनीं सुधारकांचा अनेक वर्षें छळ चालविला होता तो ही आपत्ति दूर व्हावी म्हणूनच. पण आज ख्रिस्ती धर्मांतील या पंथोपपंथांच्या जुन्या झगड्यांकडे ऐतिहासिक दृष्टीनें पाहणारा त्रयस्थ एवढेंच म्हणेल कीं, या निरनिराळ्या पंथांच्या मूळच्या उत्पादकांचे हेतु शुद्ध असले, तरी त्यांच्या अनुयायांनीं पुढें प्रतिपक्षाचा पाडाव व नाश करण्यासाठीं योजलेले उपाय निःसंशय गर्हणीय होते.

प्रकरण ४० वें

ट्यूडर कालीन समाजस्थिति.

(इ. स. १४८५ इ. स. १६०३)

[१ सामाजिक सुधारणेची प्रगति–गुन्ह्यांची संख्या–गरिबांचा कायदा.–२ इलिझाबेथ–युग.–३ ओजस्वी ग्रंथकार.–४ व्यापार व उद्योगधंद्यांची वाढ.–५ मध्यम वर्गाचें प्राबल्य.–६ ट्यूडर राजांचा कारभार.–७ युद्धसाहित्यांत बदल.–८ सरदारांचा परिवार.–९ दरबारी पोषाख.'पिन–मनी'.–१० करमणुकींचे प्रकार.–११ भोळ्या समजुती–फलज्योतिष.–१२ किमया.–१३ चेटूक.–१४ भूगोलज्ञान–नौकानयन–व्यापार.–१५ शिक्षण आणि शाळा.–१६ घरदार आणि खाद्य पदार्थ.–१७ गुलामांचा व्यापार.–१८ 'लासकास'ची करामत.–१९ इंग्रजांचा वांटा.]

१ सामाजिक सुधारणेची प्रगति—धार्मिक बाबींच्या खालोखाल किंबहुना धर्माशीं संलग्न अशी दुसरी बाब सामाजिक सुधारणेची. या बाबतींतही इंग्लंडची ट्यूडर कालांत बरीच प्रगति झाली. सोळाव्या शतकाच्या पूर्वी या राष्ट्रांतील गुन्ह्याचें प्रमाण भयंकर होतें. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींतही चोरी–घरफोडी अशासारख्या गुन्ह्यासाठीं दरसाल दोन हजार लोकांना फांसावर चढवावें लागे. इलिझाबेथच्या कारकिर्दींत हें प्रमाण दरसाल तीनचारशांवर आलें व त्याचें मुख्य कारण जनतेंत झालेला शिक्षणाचा व धार्मिक ज्ञानाचा प्रसार हेंच होय. गरिबांना अन्नाच्छादन देऊन त्यांचें दुःख हलकें करणारा पहिला कायदा (Poor Law) इलिझाबेथच्या

कारकिर्दीतच प्रथम पास झाला. या कायद्यानें प्रत्येक गांवच्या लोकांकडून ‘ दान-धर्म-कर ’ या नांवाचा एक कर वसूल करून त्यांतून त्या गांवांतल्या वृद्ध व पंगू भिकाऱ्यांची सोय लावावी असें ठरविण्यांत आलें.

१ इलिझाबेथ-युग—इंग्लंडच्या इतिहासांत इलिझाबेथच्या कारकिर्दीचा हा काळ स्वतंत्र रीत्या नमूद करण्यासारखा (an era) मानतात. या काळांत भौतिक शास्त्रांत आणि जागतिक ज्ञानांत महत्त्वाची भर पडली. कोलंबसानें नवीन जग (New world) शोधून काढलें, तर कोपर्निकसानें (Copernicus) नवें आकाश (New heaven) शोधून काढलें, म्हणजे आकाशस्थ ज्योतींविषयीं महत्त्वाचे शोध लावले.* धार्मिक सुधारणा, विचारस्वातंत्र्य, आकाशस्थ ज्योतींची आश्चर्यकारक माहिती, नव्या जगांतील गूढ दृश्यें, नव्या मानववंशांची माहिती, जुन्या कलांचें पुनरुज्जीवन, आणि जुन्या विद्यांच्या भांडाराचें उद्‌घाटन, या सगळ्या गोष्टी एकामागून एक जलदीनें घडून आल्यामुळें मानवी बुद्धीचा विकास आणि कल्पनांचें प्राचुर्य यांना जोराची गति मिळाली. इंग्रज राष्ट्रानें तर या काळांत प्रत्येक बाबतींत अघाडी मारली. धार्मिक बाबतींत रोमच्या पोपला विरोध करून त्यानें त्यांत यश मिळविलें, युरोपांतील एका महाबलाढ्य राजाचा गर्व हरण केला, आणि पृथ्वीप्रदक्षिणा करून पृथ्वीवरच्या सगळ्या समुद्रांचें पाणी जोखून ठेवलें !

२ ओजस्वी ग्रंथकार—अशा महत्त्वाच्या व कर्तबगारीच्या काळांत उत्पन्न झालेलें वाङ्मयही तसेंच पराक्रमोद्दीपक व जिवंत रसानें थबथबलेलें होतें. वुइल्यम शेक्सपीयर (William Shakespeare इ. स. १५६४–१६१६), एडमंड स्पेन्सर (Edmund Spencer इ. स. १५५२–१५९९), रिचर्ड हूकर (Richard Hooker इ. स. १५५३–१६००), सर वॉल्टर रॅले (Sir Walter Raleigh इ. स. १५५२–१६१८), फ्रॅन्सिस बेकन (Francis Bacon इ. स. १५६१–१६२६), वगैरे ग्रंथकारांच्या उत्कृष्ट गद्य-पद्य कृति याच कालांत पुढें आल्या.

---

* कोपर्निकसानें पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते ही कल्पना (the helio-centric theory) इ. स. १५०७ च्या सुमारासच बसविली होती. पण ती प्रसिद्ध केल्यास पाखंडमताचा आरोप येऊन पोपकडून छळ सोसावा लागेल या भीतीनें त्यानें ती इ. स. १५४३ पर्यंत प्रसिद्ध केली नाहीं !

४ व्यापार व उद्योगधंद्यांची वाढ—ट्यूडर कालाच्या पूर्वीच्या मध्ययुगांत शेती हाच सामान्य जनतेचा मुख्य धंदा होता. जमिनीचे विस्तृत तुकडे बड्या जमिनदारांच्या ताब्यांत असले, तरी त्यांना प्रत्यक्ष शेत कसणाऱ्या कुळांच्या मदतीशिवाय आपल्या जमिनीपासून पाहिजे तें उत्पन्न काढून घेतां येणें शक्य नव्हतें. ट्यूडर कालांत या स्थितींत बराच पालट झाला. बेलज्यममधल्या कोष्ट्यांनीं इंग्लंडांत येऊन लोकरींचीं वस्त्रें विणण्याला सुरवात केली, तेव्हां लोकरीसाठीं मेंढ्या पाळण्याकडे जमिनदारांचा कल वळला, आणि शेतीपेक्षां मेंढ्या पाळण्यांत ज्यास्त किफायत आणि स्वावलंबीपणा असल्यामुळें त्यांनीं आपल्या मोठमोठ्या शेतांचीं कुरणें बनविलीं. त्यामुळें कुळें स्थानभ्रष्ट होऊन त्यांची उपासमार होऊं लागली. पण पुढें इलिझाबेथच्या कारकिर्दींत या बाहेरून आलेल्या विणकरांना स्थायिक होऊं देतांना अशी एक अट घालण्यांत आली कीं; त्यांनीं आपल्या कुटुंबांत निदान एका तरी इंग्लिश मनुष्यास ठेवून घेऊन त्याला लोकरीचें कापड विणण्याची व रंगविण्याची कला शिकविली पाहिजे. या अटीचा इंग्लंडच्या व्यापारावर उत्कृष्ट परिणाम झाला. शिवाय या कालांत नौकानयनाच्या वाढीमुळें आयर्लंड, अमेरिका, वगैरे देशांत पुष्कळ इंग्लिश कुटुंबें जाऊन राहूं लागलीं, आणि स्पेनच्या अजिंक्य आरमाराच्या पाडावानंतर तर अटलांटिक व पासिफिक हे महासागर इंग्लंडला अगदीं खुले होऊन धाडशी इंग्रज व्यापाऱ्यांना पूर्वेकडील हिंदुस्थान, चीन, वगैरे देशांशीं व्यापार करून आपल्या स्वतः-च्या व आपल्या देशाच्या संपत्तींत भर टाकण्याचा मार्ग मोकळा झाला. अशा रीतीनें ट्यूडर कालांत लोकांचे शेतीकडचें लक्ष कमी होऊन तें व्यापार व उद्योगधंद्यांकडे लागलें.

५ मध्यम वर्गाचें प्राबल्य—ट्यूडर कालांतील दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या कालांत झालेली मध्यम वर्गाची वाढ ही होय. नॉर्मन कालांत सरदार-वर्गाचें फार प्राबल्य होतें. अँजेव्हिन कालांत या वर्गाला उतरती कळा लागली. इ. स. १४५५ पासून १४८५ पर्यंत चाललेल्या यादवींत पुष्कळशीं सरदार–घराणीं धुळीस मिळालीं. आणि ट्यूडर कालांत तर त्यांचें उरलें सुरलेलें वजन व सामर्थ्य अजिबाद नाहींसें झालें. नव्या जगाचा शोध, विद्येचें पुनरुज्जीवन, आणि धार्मिक बाबतींत घडून येत असलेल्या क्रांतींत उत्पन्न झालेल्या पंथोपपंथांचें आपसांतील झगडे, यांनीं समाजाच्या जुन्या घडीला एक प्रकारचा धक्का बसल्यासारखा झाला, आणि बुद्धिमत्ता, उद्योग, धाडस, आणि महत्त्वाकांक्षा या गुणांनीं युक्त असा मध्यम वर्ग उदयास येऊन त्यानें राजकारणांतही आपलें बरेंच बस्तान बसविलें. वुल्से, क्रॅनमर, क्रॉमवेल, रसेल

वगैरे ट्यूडरकालीन प्रसिद्ध पुरुष या मध्यम वर्गांतूनच पुढें आलेले होते. आणि व्यापारानें गबर झालेल्या या वर्गांतील अनेक लोकांनीं आतां जुन्या सरदारांचें बजन साफ नाहींसें केलें होतें. धार्मिक मठांच्या जमिनी खालसा झाल्यावर त्या राजकृपेंतल्या ज्या व्यक्तींना मिळाल्या, त्या व्यक्तींचीं घराणींही या मध्यम वर्गांतच मोडत असत.‡ हे नवे जमिनदार नेहमीं तक्ताधिपतींच्या बाजूला राहून त्यांच्या जुन्या सरदारांना वरचढ होऊं न देण्याच्या प्रयत्नांना मदत करीत असत.

६ **ट्यूडर राजांचा कारभार**—मात्र याचा एक इष्ट म्हणा, अनिष्ट म्हणा, असा परिणाम घडून आला कीं, **ट्यूडर**पूर्वकालीं राजसत्तेवर सरदारवर्गाचा जो दाब असे तो नाहींसा होऊन ट्यूडर तक्ताधिपति अनियंत्रित बनले. पार्लमेंट सभा नांवानें राष्ट्रमत-

‡ आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत मठ व त्यांशीं संलग्न असलेल्या इतर किती संस्था उध्वस्थ झाल्या त्यांची यादी एका ठिकाणीं दिली आहे, ती अशी:—

९० महाविद्यालयें (Colleges), ११० रुग्णशुश्रूषालयें (Hospitals), २३७४ प्रार्थनालयें (Chantries & Chapels), आणि ६४५ मठ (monasteries) या सर्व संस्थांची मालमत्ता राजानें प्रथम आपल्याकडे घेऊन मागाहून त्यांतली बहुतेक आपल्या भक्तांना आणि मर्जींतल्या इसमांना (adherents and favourites) वांटून दिली. इंग्लंडांतील आजच्या बहुतेक बड्या घराण्यांच्या इस्टेटींचा धागा या धार्मिक संस्थांच्या जप्त मिळकतींशीं नेऊन भिडवितां येतो. या मठांच्या उध्वस्ततेचा इंग्लंडच्या राज्यघटनेवरही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. कारण पार्लमेंटच्या सरदारसभेंत बसणाऱ्या सरदारांत धर्मखात्याचे सरदार (Spiritual Lords) म्हणून एक वर्ग असे, त्या वर्गांत देवस्थानांच्या मोठमोठ्या जमिनी धारण करणाऱ्यांचा अंतर्भाव होत असे, आणि मठांच्या वाढत्या उत्पन्नाबरोबर त्या मठाच्या अधिपतींनाही (Abbots) सरकारी धर्माधिकाऱ्यांप्रमाणेंच (Bishops) पार्लमेंटांत प्रवेश मिळत असे. हे 'ॲबट्स' म्हणजे बडे मठाधिकारी सरदारसभेंत आपल्या जातभाईंना म्हणजे बिशपांनांच मदत करीत असल्यामुळें देवस्थानेतर म्हणजे ऐहिक सरदारांचें (Temporal Lords) मताधिक्य होण्याला पुष्कळ वेळां अडचण पडे. पण आतां मठच नाहींसे झाल्यामुळें हे मठाधिकारी आपोआपच कमी झाले आणि सरदारसभेंतील ऐहिक सरदारांचें मताधिक्य कायम झाल्यासारखें झालें.

निर्णायक व राजसत्तानियामक असली, तरी ट्यूडर राजांनीं तिला केव्हांच खांकेला मारून ठेविली होती. आणि मठजप्ती, खुषीची सक्ति, राजशासनभंगप्रायश्चित्त वगैरे पैसे गोळा करण्याचे अनेक मार्ग ट्यूडर राजांच्या अगदीं अंगवळणीं पडल्यासारखे झाले असल्यामुळें त्यांना पार्लमेंट सभेची गरजही फारशी वाटत नसे. मात्र ट्यूडर राजांच्यातर्फे एवढी गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, या घराण्यांतील सगळ्या व्यक्ति स्वतःचा मान व प्रतिष्ठा वाढवून घेतांना आपल्या राष्ट्राचा मान व प्रतिष्ठा यांकडे दुर्लक्ष करीत नसत, किंबहुना आपण म्हणजेच इंग्लंडचें राष्ट्र आणि इंग्लंडच्या राष्ट्राचा मान तोच आपला मान असें मानण्याइतकें त्यांचें इंग्लंडशीं समरसत्व झालें होतें. म्हणूनच अनियंत्रित पण सामर्थ्यवान् अशा राजसत्तेपासून मिळणारे सगळे फायदे ट्यूडर काळांत लोकांना उपभोगावयास मिळाले, आणि ट्यूडर राजांचा आणि राण्यांचा अनियंत्रित कारभारही लोकप्रिय झाला.

७ युद्धसाहित्यांत बदल—मध्ययुगांत तिरकमठे आणि भाले हीं लढण्याचीं मुख्य हत्यारें होतीं. ट्यूडर कालांत बंदुकीच्या दारूचा शोध लागल्यामुळें बंदुका आणि तोफा अस्तित्वांत आल्या. पण हीं साधनें फार खर्चाचीं असल्यामुळें सामान्य सरदारांना तीं जवळ बाळगणें शक्य नव्हतें. ट्यूडर राजे बहुवा सगळेच सधन असल्यामुळें त्यांना खड्या फौजेच्या अभावींही या नवीन साधनांच्या जोरावर अंतःस्थ बंडाळी हां हां म्हणतां मोडून टाकून सरदारांची सत्ता समूळ उपटून टाकतां आली.*

८ सरदारांचा परिवार—या कालांत मोठमोठे सरदार आणि दरकदार यांच्या घरीं चाकरांनोकरांचा भरणा फार असे, आणि त्यांच्या घरचा थाट एखाद्या राजाप्रमाणें असे. केनिलवर्थ किल्ल्याचा मालक **लिसेस्टर** यानें एकदां इलिझाबेथ राणीला आपल्या किल्ल्यांत रहावयास बोलावलें होतें; तेव्हां सतरा दिवसपर्यंत दररोज मेजवान्या आणि प्रदर्शनें यांचा थाट उडत असे. या लिसेस्टरच्या घरीं दहा हजार लोकांना पुरतील इतकीं शस्त्रास्त्रें होतीं. त्याचप्रमाणें इलिझाबेथचा कारभारी बर्ले याच्या

---

* हिंदुस्थानांत तोफांचा उपयोग प्रथम इ. स. १५२६ सालीं मोंगल सरदार **बाबर** यानें केला असें म्हणतात. युरोपखंडांतही या एका दमासरशीं अनेकांचा प्राण घेणाऱ्या व लांबून उपयोगांत आणतां येणाऱ्या युद्धसाहित्यांतील 'हत्यारां'चा उपयोग तुर्क लोकांनींच 'कॉन्स्टँटिनोपल' शहर हस्तगत करतांना (इ. स. १४५३) प्रथम केला. अर्थात ही कला प्रथम आशिया खंडांतच निपजली असें दिसतें.

परिवारांत वीस गृहस्थ असे होते कीं एकेकाचें दरसालचें बैठें उत्पन्नच एक हजार पौंड भरे !

९ दरबारी पोषाख—पोषाखाच्या बाबतींतही या कालांत बरीच सुधारणा झाली. पूर्वी बायकांना टांचण्यांचा उपयोग माहीत नव्हता. आठव्या हेन्रीची बायको कॅथराइन हॉवर्ड हिनें प्रथम त्या फ्रान्समधून इंग्लंडांत आणल्या आणि त्या बऱ्याच महाग असल्यामुळें दरबारी स्त्रियांच्या नवऱ्यांना आपल्या बायकांचे हे 'चोंचले' पुरविण्यासाठीं 'पिन-मनी' (Pin-money) म्हणून कांहीं रक्कम निराळी काढून ठेवावी लागूं लागली ! पुरुषांचा काय किंवा बायकांचा काय, दरबारी पोषाख हा आतांप्रमाणेंच त्या वेळींही नवीं नवीं स्वरूपें धारण करीत असे. आठवा हेन्री उत्तर वयांत बराच स्थूल झाला, तेव्हां त्याच्या बरोबरचे मानकरी त्याच्यासारखे दिसण्यासाठीं आपल्या आंगरख्याच्या आंतून जाडजुड कापड चढवून लठ्ठ बनूं लागले होते ! इलिझाबेथ राणी तर काय नटवेपणांत आणि पोषाखाच्या बाबतींत अग्रगण्यच होती. अर्थात तिचा संसर्ग इतरांनाही बाधक होऊन खर्चांत पाडल्याशिवाय राहत नसे.

१० करमणुकीचे प्रकार—करमणुकीच्या बाबतींत घोड्यांच्या शर्यती, अस्वलांचे खेळ, हरिणांची शिकार, टेनिस आणि 'क्लबबॉल' हे श्रीमंतांचे खेळ होते. अक्षक्रीडा आणि बुद्धिबळें हे 'घरगुती' खेळही श्रीमंतांची करमणूक करण्याला उपयोगी पडत. नाचतमाशे आणि गाणेंबजावणें हें श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें चाले. 'नाताळांत' (Christmas) ताळतंत्र सोडून रस्त्यांतून नाचत बागडत जाण्याची चाल खालच्या वर्गांतून जिकडे तिकडे दिसून येत असे, आणि हिंदुस्तानांत हिंदूंच्या शिमग्यांत किंवा मुसलमानांच्या मोहरमांत वाघाचीं सोंगें आणतात, त्याप्रमाणें या नाताळाच्या दिवसांत बैलांचीं किंवा बकऱ्यांचीं सोंगें घेऊन आरडाओरड करीत फिरण्यांत त्या लोकांना कांहींच गैर वाटत नसे.

११ भोळ्या समजुती—फलज्योतिष, किमया, आणि चेटूक हीं त्याकालच्या भोळ्या समजुतींचीं सर्वसामान्य अधिष्ठानें होतीं. ताऱ्यांच्या गति-स्थितीवरून माणसाची भविष्य स्थिति सांगण्याची विद्या कांहीं नाहीं तरी चार हजार वर्षांची जुनी आहे असें समजतात. हिंदुस्तानांत आजही या भविष्यकथनावर पुष्कळांचा विश्वास आहे आणि त्याचो 'शास्त्र' या दृष्टीनें चिकित्सा चालू आहे. सोळाव्या शतकांत इंग्लंडांतही या 'शास्त्रावर' पुष्कळांचा विश्वास होता आणि मोठमोठे मुत्सद्दी आणि पंडित ही विद्या जाणणाऱ्या 'ज्योतिष्यां' (astrologers)ना मोठ्या सन्मानानें वागवून त्यांना

चांगली बिदागीही देत असत. या फलज्योतिष शास्त्रापासूनच पुढें खगोलशास्त्रा-(Astronomy)तील अनेक सिद्धांतांची उत्पत्ति झाली.

१२ किमया—म्हणजे तांब्यासारख्या किंवा लोखंडासारख्या हलक्या धातूचें सोनें बनविणें आणि चिरंजीव आणि चिरसुंदर राहतां यावें म्हणून 'अमृता'सारख्या वस्तूंचा शोध लावणें यांत त्या कालच्या शहाण्या लोकांचाही किती तरी वेळ, पैसा, आणि शक्ति खर्च होत असे. पण लोखंडाचें सोनें करणारा परीस (the Philosopher's stone) आणि स्वर्गलोकींचें अमृत (the Elixir of Life) या वस्तु अद्यापि कोणाला सांपडल्या नसल्या, तरी त्यांच्या शोधाच्या मार्गे लागल्यानें रसायनशास्त्राची जी वाढ झाली आहे ती पाहिली म्हणजे कोणीही झाला तरी त्या कालच्या त्या 'खुळ्या' लोकांचे कृतज्ञतापूर्वक आभारच मानले पाहिजेत असें म्हटल्याशिवाय राहणार नाहीं.

१३ चेट्टक-अथवा जादूटोणा (witchcraft) याची गोष्टही अशीच आहे. तीनशें वर्षांपूर्वी कोणीं एकादें नवें यंत्र शोधून काढलें, किंवा कोणीं एकादा नवा शोध लावला, तर ही गोष्ट त्याला एकाद्या ' चालगती ' (Evil one)च्या कृपेनें साध्य झाली आहे असें समजत. इतकेंच नव्हे तर एकादें मूल आजारी पडून मेलें, तरी तें गांवातल्या एकाद्या चेटकिणीचेंच (witch) 'कुरुत' आहे असें मानीत. एकाद्या वेळीं आकस्मिक वादळ उद्भवलें तर भीतीनें गांगरून गेलेला शेतकरी आपण मध्यरात्रीं भुतें ओरडतांना ऐकिलीं, आणि त्यांनींच हें वादळ उत्पन्न केलें आहे असें छातीला हात लावून सांगे. पण असल्या समजुती त्या वेळीं सर्वसाधारण असल्या, किंबहुना आजही खेड्यापाड्यांतील जनता या गोष्टीवर विश्वास ठेवीत असली, तरी आज आपल्या वैद्यकांतील नाना प्रकारच्या वनस्पतींची, औषधांची आणि अर्कांची, तसेंच नाना प्रकारच्या कलांची जी वाढ झालेली दिसून येते, तिचा उगम तीनशें वर्षांपूर्वींच्या त्या जादुटोण्याच्या आणि जडीबुटीच्या चिकित्सेंतच आहे ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे.

१४ भूगोल-नौकानयन-व्यापार—आधुनिक कालांतील कोणत्याही राष्ट्राची भरभराट ही भू-गोलाचें वास्तविक ज्ञान, नौकानयन आणि व्यापार या त्रयीवर आधारलेली असते. सोळाव्या शतकांत इंग्लंडनें या तिन्ही बाबतींत प्रगतीचा मार्ग आक्रमण्याला सुरवात केली. सातव्या हेन्रीनें इंग्लंडच्या आरमाराचा पाया घातला, मेरीच्या कारकिर्दीत इंग्लंडचा रशियाशीं व्यापार सुरू झाला, आणि इलिझाबेथच्या कारकिर्दीत नौकानयन आणि व्यापार या दोहोंना जोराची गति मिळून इंग्लंड हें खरेंखुरें बलाढ्य नाविक राष्ट्र (Naval Power) बनलें. तिच्या कारकिर्दीत

मोठमोठीं व्यापारी गलबतें बांधण्यांत आलीं आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनें हिंदी साम्राज्याचा पाया घातला गेला.

१५ शिक्षण आणि शाळा—शिक्षणाच्या बाबतींत जेजुइट लोकांनीं प्रथम पद्धतशीर प्रयत्न केल्याचें मागें सांगितलेंच आहे. अलीकडच्या मध्यम शिक्षणाचा (Secondary Education) पायाही याच कालांत घातला गेला. मध्यम वर्गांतील (Middle Classes) तरुण विद्यार्थ्यांना ' नव्या ज्ञाना '-(New Learning)ची माहिती व्हावी म्हणून ' कोलेट ' (Colet) नें सेंट पॉलची शाळा (St. Paul's School) प्रथम स्थापन केली. सहाव्या एडवर्डच्या कारकिर्दींत बर्मिंगहॅम (Birmingham) आणि श्रूसबेरी (Shrewsbury) या दोन जिल्ह्यांतच अठरा प्राथमिक शाळा (Grammar Schools) स्थापण्यांत आल्या. आठवा हेन्री, सहावा एडवर्ड, लेडी जेन, मेरी, आणि इलिझाबेथ ही राजघराण्यांतील सर्व मंडळी चांगल्या सुसंस्कृत पंडितांत (good classical scholars) मोडत असत. इलिझाबेथविषयीं तर तिचे गुरुजी सांगत कीं, एकादा पाद्री एका आठवड्यांत जितकें लॅटिन वाचीत असेल त्याच्यापेक्षां ज्यास्ती ग्रीक इलिझाबेथ एका दिवसांत वाचून टाकीत असे. वेस्टमिन्स्टरची शाळा (Westminster school) तिनेंच इ. स. १५६० मध्यें स्थापिली.

१६ घरदार आणि खाद्य पदार्थ—पूर्वीं बहुतेक घरें मातीचीं असत. आतां वरच्या वर्गांच्या घरांना तरी दगड–विटांचा उपयोग होऊं लागला. घरांतला धूर निघून जाण्यासाठीं पूर्वीं काळ्याकुट्ट छपराच्या मध्यभागीं एकादें भोंक असलें तर असलें. आतां 'चिमण्यां' (Chimneys) चा उपयोग सर्रास होऊं लागला. खिडक्यांना भिंगाचीं दारें लावण्याचा प्रघातही बराच वाढला. पूर्वीं गरिबांच्या घरांतल्या सामानसुमानांत एकादी चटई आणि पाट असला म्हणजे फार झालें असें समजत. झोंपतांना उशाला गवताची उशी घेणारा मनुष्य मोठा चैनवाज मानला जाई. अन्न खावयाचें तें लांकडाच्या पडग्यांतून आणि लांकडाच्या चमच्यांनीं. पण आतां या ' स्रुचिस्रुवांची ' जागा जस्ताचे (Pewter) ताटें आणि रुप्याचे चमचे यांनीं घेतली, आणि या वस्तु गरिबांच्याही घरांतून दिसून येऊं लागल्या. पूर्वीं गव्हांची भाकर हें श्रीमंतांचें अन्न समजलें जाई पण आतां तिचा खालच्या वर्गांतही उपयोग होऊं लागला. कोबी, चेरी, गूजबेरी आणि बटाटे यांची लगवड ठिकठिकाणीं होऊं लागली; आणि अमेरिकेंतून तंबाखू आल्यावर प्रथम चैनीची वस्तु म्हणून आणि मागाहून जीवनावश्यक वस्तु म्हणून त्याच

घरोघर प्रसार झाला. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दीत गोमांस आणि बकऱ्याची सागुती अर्ध्या पेनीला एक पौंडप्रमाणें मिळे.

१७ गुलामांचा व्यापार (The Slave Trade) आफ्रिकेंतील **नीग्रो** (Negro) लोकांना अमेरिकेंत नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा प्रघात प्रथम कोणीं कसा पाडला याची हकीगत बरीच मनोरंजक व उद्‌बोधक असल्यामुळें ती पुढें देत आहों:—युरोपियन लोकांना अमेरिका खंडाचा शोध लागल्यावर त्या ठिकाणीं पहिल्या वसाहती केल्या त्या स्पॅनिश लोकांनीं. त्या लोकांना सुमारें शंभर सवाशें वर्षें या नव्या जगाचा मक्ताच मिळाल्यासारखा झाला होता. या वसाहतवाल्यांनीं तिकडे ऊंस आणि तंबाखू यांचे मोठमोठे मळे तयार केले; तेथल्या मूळच्या ‘ इंडियन ’ लोकांची सोन्यारुप्याच्या खाणींच्या रूपानें शेंकडो वर्षें सांठलेली संपत्ति बाहेर काढली; आणि नंतर त्या दुर्दैवी लोकांना आपल्या खाणींतून आणि मळ्यांतून सक्तीनें कामास लावून (enforced labour) अगणित नफा जोडला. पूर्वीं कधीं संवय नाहीं असलें काम चाबकाच्या माराखालीं करावें लागल्यामुळें तिकडचे हजारों ‘ इंडियन ’ लोक प्राणास मुकले. पेरु प्रांतांतले तर अर्धे इंडियन स्पॅनिश लोकांसाठीं पेरूच्या सोन्यारुप्याच्या खाणी खोदतांना मरण पावले असें म्हणतात. पुढें ‘लास कास’ (Las Cas) या नांवाच्या एका ‘ दयाळू धर्माधिकाऱ्याला ’ (a benevolent priest) या इंडियन लोकांची दया येऊन त्यांची उरली सुरली प्रजा तरी जिवंत रहावी म्हणून, त्यानें आफ्रिकेंतून नीग्रो लोकांना अमेरिकेंत आणून इंडियन लोकांऐवजीं या राकट नीग्रोंकडून हें खाणी खोदण्याचें काम करून घेण्याविषयीं खाणीवाल्यांचें मन वळविलें. ‘ या लास कास’ला ‘ अमेरिकन इंडियन लोकांचा मोठा उद्धारकर्ता (Apostle) असें म्हणतात. कारण त्यानें त्यांच्या देशांत परकी देशांतले गुलाम आणून मानवी दुःख (human suffering) हलकें करण्याचें शतकृत्य केलें !

१८ इंग्रजांचा वांटा—पुढें इ. स. १५६२ मध्यें **हॉकिन्स** नांवाच्या इंग्रज नाविकानें आफ्रिकेंतील कित्येक ‘ नीग्रो ’ लोकांना आपल्या गलबतावर चढवून त्यांना अमेरिकेंत आणून स्पॅनिश मळेवाल्यांना विकलें, आणि या धंद्यावर पुष्कळ संपत्ति मिळविली. आणि त्याचें उदाहरण पुढें इतरांनीं गिरवून आफ्रिकेंतील या नीग्रो गुलामांच्या घामानें आणि रक्तानें अमेरिकेच्या भूमीला संपन्न करून सोडलें.

थोर लोकांचीं संक्षिप्त चरित्रें

(प्र०=प्रकरण प०=परिच्छेद.)

ख्रिस्टॉफर कोलंबस (Christopher Columbus) अमेरिका ऊर्फ ' पाताल ' खंडाच्या शोधाशीं ज्याचें नांव कायमचें निगडित होऊन राहिलें आहे, असा हा **जिनोवा** (Genoa) येथील एका व्यापाऱ्याचा मुलगा इ. स. १४४५



कोलंबस.

मध्यें जन्मला. पंधराव्या शतकाच्या पूर्वी हिंदुस्तानचा युरोपखंडाशीं जलमार्गानें चालणारा व्यापार अरबीसमुद्र-इराणी आखात—सिरिया-भूमध्य समुद्र या मार्गानें चालत असे. त्यामुळें भूमध्यसमुद्राच्या कांठच्या अनेक बंदरांना व्यापारी महत्त्व आलेलें होतें.

जिनोवा हें असेंच एक व्यापाराचें प्रमुख शहर होतें. पुढें तुर्क लोकांनीं कॉन्स्टँटिनोपल शहर काबीज करून युरोपियन व्यापाऱ्यांचा पूर्वेकडे येण्याचा हा मार्ग अडवून टाकल्यावर हिंदुस्थानच्या 'सुवर्णभूमीला' येण्याला दुसरा एकादा सोईवार मार्ग मिळतो कीं काय पहावा, या हेतूनें कित्येक युरोपियन दर्यावर्दी भूमध्यसमुद्रांतून पश्चिमच्या बाजूनें बाहेर पडल्यावर आफ्रिकाखंडाच्या दक्षिण टोंकाला वळसा घालण्याचा प्रयत्न करीत होते. त्या वेळीं पृथ्वी वाटोळी आहे याची अंधुक अंधुक कल्पना कित्येकांना झालेली होती. पण पोपच्या धर्मशास्त्रांत ती सपाट आहे असें लिहिलेलें असल्यामुळें पोपच्या अवकृपेच्या भीतीनें हें 'पाखंडी' मत बाहेर बोलून दाखविण्याला कोणी धजत नसे.

हिंदुस्तानाकडे येण्याच्या नवमार्गचिंतनांत असतांना कोलंबसाला अशी कल्पना सुचली कीं पृथ्वी जर वाटोळी असेल तर पूर्वेकडून न जातां थेट पश्चिमेकडे गेलें तरीही शेवटीं आपल्याला हिंदुस्थानची भूमी गांठतां येईल. ही कल्पना मनांत आल्यावर त्यानें ती त्या वेळच्या अनेक मोठमोठ्या सरदारांना व राजांना सांगितली (इ.स. १४८०) आणि ही पश्चिमची सफर तडीला नेण्याला कोणीं तरी द्रव्यद्वारा मदत करावी म्हणून पुष्कळ खटपट केली. पण इ. स. १४९२ पर्यंत त्याच्या प्रयत्नांना यश आलें नाहीं. शेवटीं त्या वर्षाच्या आगस्ट महिन्यांत स्पेनचा राजा **फर्डिनँड** (Ferdinand) व राणी **इसाबेला** (Isabella) यांनीं त्याच्या या साहसाला (Adventure) मदत करण्याचें कबूल केलें, आणि तीन जहाजें त्याच्या स्वाधीन केलीं. आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें तीं जहाजें थेट पश्चिमेकडे हाकारलीं. पण महिना दीड महिना झाला तरी जमीन दृष्टीस पडण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां जहाजावरचे खलाशी हा वेडा पीर आपल्याला कुठें तरी अज्ञात प्रदेशांत नेऊन नाहक बुडविणार म्हणून त्याच्यावर संतापून आल्या मार्गानें परत जाण्याचा विचार करूं लागले. पण कोलंबसानें मोठ्या युक्तीनें त्यांची समजूत घालून त्यांना थोपवून धरलें, आणि शेवटीं परमेश्वरकृपेनें घरून निघाल्यावर दोन महिन्यांनीं अटलांटिक महासागरांत एका ठिकाणीं जमीन त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां अर्थातच त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. पण पुढें ही जमीन म्हणजे हिंदुस्तान नसून दुसरेंच एक ओसाड व रानटी लोकांनीं व्यापलेलें बेट आहे असें त्याला कळून आलें. तथापि कांहीं झालें तरी थेट पश्चिमेकडे गलबतें हाकारलीं असतां नवीन भूप्रदेश हस्तगत करतां येईल ही त्याची कल्पना फळास आली होती; आणि स्पेनच्या बादशहालाही आपण त्याला केलेली मदत व्यर्थ गेली नाहीं या विचारानें अधिक मदत करण्याला हुरूप आला होता.

यानंतर कोलंबसानें आणखीं बरींच जलपर्यटनें केलीं आणि शेवटीं इ. स. १४९७ या वर्षीं अमेरिकेच्या मुख्य भूमीचा शोध लावला. पण गुणी मनुष्याच्या श्रमाचें त्याच्या काळांत नेहमींच चीज होतें असें नाहीं. कोलंबसाच्या बाबतींत हाच अनुभव आला. तो बाहेर ' परदेश शोधनां'त गुंतला असतां त्याच्यामागें त्याच्या शत्रूंनीं त्याच्याविरुद्ध कट करून नाना तऱ्हेच्या कंड्या उठविल्या; आणि त्याच्या श्रमाच्या व साहसाच्या मानानें त्याची योग्य ती संभावना होण्याचें एका बाजूलाच राहून त्याला दारिद्र्य व अनास्था (poverty and neglect) यांतच मरण आलें (इ. स. १५०६). त्यानें एवढें साहस करून शोधून काढलेल्या भूमीला नांव मिळालें त्यांतही त्याच्या नांवाचा संबंध न येतां अमेरिगो व्हेसपुसी (Amerigo Vespucci) नांवाच्या ' फ्लॉरेन्स 'च्या एका गृहस्थानें या नव्या जगाची हकीगत पहिल्यानें लिहून काढली म्हणून या नव्या भूमीला त्याच्या नांवावरून अमेरिका (America) हें नांव पडलें !

वास्को–द–गामा (Vasco–da–Gama) पंधराव्या शतकाच्या अखेरीस युरोप खंडांतील **स्पेन** व **पोर्च्युगाल** हीं राष्ट्रें दर्यावर्दीपणांत अग्रेसर होतीं. स्पेनच्या राजानें **कोलंबसाला** मदत केल्यामुळें **अमेरिका** खंडाच्या शोधाचें बरेंचसें श्रेय त्याच्या वांट्याला आलें व **स्पॅनिश** लोकांनीं व्यापाराच्या रुपानें त्याचा भरपूर फायदा घेतला. कोलंबस प्रथम जलपर्यटनाला निघाला होता तो **हिंदुस्तानला** येण्याचा नवा मार्ग शोधून काढण्यासाठींच; पण त्याला हा मार्ग न सांपडतां एक नवेंच जग सांपडलें, आणि हिंदुस्तानाला येण्याचा नवा जलमार्ग शोधून काढण्याचा मान पुढें पोर्च्युगीज दर्यावर्दींना मिळाला.

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत **पोर्च्युगीझ** खलाशी दरसाल धिमेपणानें **आफ्रिका** खंडाच्या पश्चिमेकडून खालीं थोडथोडे दक्षिणेकडे सतत जात राहिले होते. इ.स.१४८७ या वर्षीं **बार्थोलोम्यू–डिआझ** (Bartholomew Diaz) हा आफ्रिकेच्या अगदीं दक्षिण टोंकाला पोंचला होता; पण त्या ' भूशिरा 'शीं आल्यावर भयंकर वादळ झाल्यामुळें त्याला पुढें जाण्याचा हिय्या करवेना. त्यानंतर अनेक **पोर्च्युगीज** नाविक त्या बाजूला येऊन गेले. पण या भूशिराला पूर्णपणें वळसा घालून व त्याला ' केप ऑफ् गुड होप ' (Cape of good Hope) म्हणजे हिंदुस्तानाला पोंचण्याची ' आशा सफळ करणारें भूशिर ' असें नांव देऊन प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पहिल्यानें पाऊल ठेवण्याचा मान इ० स० १४९८ या वर्षीं **वास्को–**

द-गामा यानें मिळविला. त्यानें त्या वर्षाच्या मे महिन्यांत **मलबार** किनाऱ्यावर



वास्को-द-गामा.

कालिकत बंदरांत आपलीं जहाजें नांगरलीं आणि तेथला **हिंदुराजा** झामोरिन यास पोर्च्युगीझ बादशहाचें पत्र सादर करून हिंदुस्थानशीं व्यापार करण्याची परवानगी मिळविली.

युरोपच्या पश्चिमेकडील व्यापाऱ्यांना हिंदुस्तानला येण्याचा हा जलमार्ग सांपडल्यावर युरोपखंडाच्या पुढल्या दरवाज्याचें स्वरूप एकदम पालटलें (The front of Europe was suddenly changed) आणि भूमध्य समुद्रकांठच्या व्यापारी बंदरांचें महत्त्व कमी झालें. इटालियन व्यापारी हळूहळू धुळीला मिळाले, आणि इजिप्त आणि **सीरिया** देशांतल्या व्यापारी वखारी ओस पडल्या. **पोर्च्युगीझ** लोकांनीं लवकरच पूर्वेकडचा हा व्यापार काबीज केला; आणि व्यापाराबरोबरच पूर्वेकडे आपलें साम्राज्य स्थापण्याचा हव्यास धरून तो कांहीं अंशीं तडीसही नेला.

काब्राल (Cabral)— वास्को–द्–गामानंतर पोर्च्युगालच्या राजानें काब्रालच्या हाताखालीं तेरा जहाजें आणि बाराशें लोक देऊन त्याला पूर्वेकडच्या सफरीवर पाठवून दिलें. त्याच्या या गलबतांवर आठ ख्रिस्ती जोगी (Friars) होते. त्यांना राजाचा असा हुकूम होता कीं, " जे देश तुमचा उपदेश (Teaching) ऐकणार नाहींत त्या देशांत अग्नि आणि तरवार (Fire and Sword) यांचा खुशाल उपयोग करा. " काब्रालनें हिंदुस्थानांत आल्यांवर या दोहोंचा कसा उपयोग केला तें प्रसिद्धच आहे.*

मॅगेलन (Magellan)—कोलंबस हा जसा ' अमेरिकेचा शोधक ' (The Discoveror of America) म्हणून प्रसिद्ध आहे, तसा मॅगेलन हा युरोप खंडांतला पहिला 'पृथ्वी प्रदक्षिणिक' (Circumnavigator of the Globe) म्हणून प्रसिद्ध आहे. कोलंबस अमेरिका खंडाचा शोध लावून स्पेनला परत आल्यावर स्पेनच्या शेजारच्या पोर्च्युगाल देशांतलेही अनेक दर्यावर्दी लोक (Navigators) नव–भूमिशोधनासाठीं बाहेर पडले, आणि ' भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ' या म्हणीप्रमाणें पुढें स्पेन आणि पोर्च्युगाल यांच्यामध्यें या नव–संपादित किंवा–शोधित भूमीबद्दल भांडणें होऊं लागलीं. तेव्हां त्यावेळचा पोप ' सहावा अलेक्झांडर ' (Alexander VI) यानें एक आज्ञापत्र (bull) काढून असें फर्माविलें कीं, अटलांटिक महासागरांतील **अझोर्स** (Azores) बेटांपासून पश्चिमेकडे १०० 'लीगां'वर (Leagues) एक उत्तर दक्षिण रेषा आहे असें मानून या रेषेच्या पश्चिमेकडे सांपडेल ती सगळी जमीन स्पेननें घ्यावी आणि पूर्वेकडे सांपडेल त्या जमिनीवर पोर्च्युगालच्या राजाची मालकी असावी.

' हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण ' करणाऱ्या पोपच्या या आज्ञापत्राचें कारण असें होतें कीं, त्या वेळीं रोमचे पोप हे आपल्याला सगळ्या जगाचे–ख्रिस्तेतर लोकांच्या (Pagans) भूमीचेही–स्वामी (Sovereign) समजत असत, आणि ही भूमी वाटेल त्याला सुपूर्त करण्याचा त्यांना अधिकार आहे अशी युरोपांतल्या

* He captured and burnt all the Moorish ships in the harbour, seized their cargoes, killed their crew, and opened fire on the town of Calicut, which he bombarded for several hours and then set sail for Kochin—Marsden.


सगळ्या ख्रिस्ती लोकांचीही समजूत (Belief) होती. पण आजपर्यंत अज्ञात अशा या भू-भागांच्या शोधांचें क्षेत्र जसजसें वाढत चाललें, तसतसे **स्पेन** आणि **पोर्च्युगाल** यांच्यामधील कटकटीचे प्रसंगही वाढत चालले. पूर्वेकडच्या 'मसाल्याच्या बेटां'-संबंधानें (spice islands) तर दोन्ही देशांत उघड वैर जुंपण्याचा प्रसंग आला. तेव्हां स्पेनमधील कित्येक लोकांच्या डोक्यांत अशी कल्पना आली कीं, आपल्याला जर 'पश्चिम'च्या रोखानें जाऊनच या मसाल्याच्या बेटांत पाय ठेवतां आला तर **पो**पच्या आज्ञापत्राच्या आधारानेंच आपल्याला या बेटांवर कायदेशीर हक्क सांगतां येईल. लवकरच ही कल्पना अमलांत आणण्याचें ठरून मॅगेलन नांवाचा एक पोर्च्युगीझ दर्यासारंग (Admiral) कांहीं वैयक्तिक अपमान (personal slight) पावून आपल्या राजाची नोकरी सोडून स्पेनला आला होता, त्याच्या हवालीं ५ स्पॅनिश गलबतें करण्यांत आलीं, आणि तो इ. स. १५१९ या वर्षी आपल्या या स्मरणीय मोहिमेवर निघाला.

अटलांटिक महासागरांत कोलंबसानें अमेरिकेचा जो भूभाग शोधून काढला होता, तो दक्षिणेकडे कोठें तरी तुटला असला पाहिजे असें मनाशीं ठरवून **मॅ**गेलननें आपलीं जहाजें नैऋत्य दिशेनें हाकारलीं, आणि त्याचा हा अदमास खरा ठरून **पॅटॅगोनिया** (Patagonia) च्या अगदीं दक्षिण टोंकाशीं येतांच त्याला त्या ठिकाणीं खरोखरच एक चिंचोळी खाडी (channel) आढळली. तो या खाडींत शिरून तसाच पुढें गेला आणि पहातो तों आपल्यापुढें अफाट समुद्र पसरलेला असून पश्चिमेला कोरें करकरीत क्षितिज (blank horizon) दिसत आहे! या समुद्राचें स्वरूपही (face) अटलांटिक महासागरासारखें अक्राळ विक्राळ (stormy) नसून शांत व गंभीर (calm and unruffled) आहे असें त्याला आढळून आलें. म्हणून त्यानें त्याचें नांव शांत समुद्र (Pacific Ocean) असें ठेविलें.

पण त्याला सांपडलेल्या या समुद्राचें स्वरूप शांत असलें तरी त्याचे व त्याच्या बरोबरच्या खलाशांचे या अज्ञात व अथांग सागरांतून पुढें जात असतां कल्पनातीत हाल झाले, आणि एकदां पुढें टाकलेलें पाऊल कांहीं झालें तरी मागें घ्यावयाचें नाहीं असा त्यांनीं निघतांनाच निर्धार केला असल्यामुळेंच त्यांनीं ते मोठ्या धैर्यानें सोसले. मानवी साहसांच्या (human adventures) इतिहासांत **मॅ**गेलनच्या या जलपर्यटनाला (voyage) तोड सांपडणार नाहीं असें एकानें म्हटलें आहे तें शब्दशः खरें आहे. असो.

दोन वर्षे समुद्रप्रवास केल्यावर इ. स. १५२१ च्या नोव्हेंबरच्या ८ व्या तारखेस मॅगेलन एकदांचा अपेक्षित 'मसाल्याच्या बेटा'ला येऊन पोंचला, आणि त्याच्या पुढल्या वर्षी स्पेनला परत आला. या एकंदर समुद्र प्रवासाला त्याला सदतीस महिने लागले. पण कोलंबसाप्रमाणेंच मॅगेलनलाही ही पृथ्वीप्रदक्षिणा आपले अखेरचे दिवस स्वस्थतेंत घालवावयास कांहीं उपयोगी पडली नाहीं. कारण स्पेनला परत येतांना वाटेंत दक्षिणसमुद्रांतील एका बेटाशीं त्याचीं गलबतें नांगरलेली असतांना कोणी दुष्टानें त्याचा खून केला.

मार्टिन लूथर—(इ. स १४८३-१५४६) युरोप खंडांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाल्यावर लवकरच इटली देशांत रोम नामक शहरीं ख्रिस्ती धर्माध्यक्षाची (The pope) गादी स्थापन झाली. या गादीवर आरूढ झालेले पहिले



जर्मनींतील प्रख्यात धर्म सुधारक लूथर.

पहिले 'जगद्गुरु' विद्वान, शीलसंपन्न, व कर्तबगार होते. त्यांनीं धार्मिक बाबतींतच नव्हे तर व्यावहारिक व राजकीय बाबतींतही सगळ्या युरोपखंडावर आपला वचक बसवून ब्रह्मतेज (Spiritual power) क्षात्रतेजापेक्षां (Temporal power) श्रेष्ठ असतें हा सिद्धांत प्रस्थापित केला, आणि संन्याशाच्या भगव्या छाटींत किंवा त्यांच्या पद्धतीप्रमाणें काळ्या झग्यांत केवढें ऐश्वर्य सांठविलेलें असतें याचा सगळ्या जगाला प्रत्यय आणून दिला. पण ही परंपरा फार वर्षें टिकली नाहीं. पुढले पुढले 'आचार्य' धर्मभ्रष्ट व अनीतिमान झाले; पोपची गादी हें एक 'संस्थान' बनलें; आणि या संस्थानच्या गादीवर आरूढ होणाऱ्या 'शंकराचार्यांनीं' धर्माच्या नांवाखालीं निरनिराळ्या देशांतील लोकांवर नानाप्रकारचे कर बसवून आपला खजिना भरावा, आणि तो दुर्व्यसनांत किंवा भांडणांत उडवून टाकावा असा प्रकार चालू झाला.

शिवाय पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्राचीन विद्यांच्या पुनरुज्जीवनाची (The Renaissance) जी लाट उसळली, त्या लाटेंत युरोप खंडांतले सगळेच देश बुचकळून निघाले (प्र. २९ प. ६). त्यांतल्या त्यांत युरोपच्या उत्तर बाजूच्या जर्मन प्रांतांत ही लाट विशेष प्रभावी झाली आणि पोपच्या किंवा धर्मगुरूंच्या शब्दांपेक्षां बायबलांतील शब्दांच्या खऱ्या अर्थाला लोक ज्यास्त महत्त्व देऊं लागले.

सोळाव्या शतकाच्या आरंभीं युरोपांतील ख्रिस्ती धर्माची व धर्माचार्यांची अशी स्थिति असतांना इ. स. १५१७मध्यें जर्मनींत मार्टिन ल्यूथर या नांवाचा एक पुरुष पोपच्या धर्मसत्तेविरुद्ध उघडपणें बंड पुकारण्याला पुढें आला. ल्यूथरचें घराणें मूळचें अगदीं गरिबीचें (humble parentage) असून त्याचा बाप नुसता एक गरीब खाणींत काम करणारा मजूर होता. मार्टिन स्वतः लहानपणीं दारोदार गाणीं म्हणून आपली उपजीविका करीत असे. तथापि अशाही परिस्थितींत त्यानें झटून अभ्यास करून कायदा व तत्त्वज्ञान यांचें ज्ञान संपादन केलें. त्यानें वकिलीच्या धंद्यांत पडावें असा त्याच्या आईबापांचा फार आग्रह होता. पण त्याचा स्वतःचा या धंद्याकडे ओढा नसल्यामुळें त्यानें इ. स. १५१० मध्यें रोममध्यें जाऊन धार्मिक बाबींचा विशेष अभ्यास केला, व तिकडून परत आल्यावर विटेंबर्गच्या विश्वविद्यालयांत (University of Wittenburg) तत्त्वज्ञानाच्या अध्यापकाचें (a teacher of Theology) काम पत्करलें.

या सुमारास रोममध्यें पोप लिओ यानें 'पीटर साधू'चें मंदिर बांधण्याला सुरवात केली होती आणि त्या मंदिराच्या खर्चासाठीं पैसा गोळा करण्याला ठिकठिकाणीं आपले दूत पाठविले होते. एका कागदाच्या तुकड्यावर ख्रिस्ती धर्मशास्त्रांतील (The Bible)

कांहीं वाक्यें लिहून या कागदांच्या तुकड्यांची त्यानें किंमत ठरवून टाकली होती; आणि हे तुकडे जो कोणी विकत घेईल त्याला आकाशांतील बापाच्या (The Heavenly Father) राज्यांत जाण्याचे दरवाजे खुले होतील असें फर्मान काढलें होतें. जॉन टेझेल (John Tetzel) * नांवाचा एक जोगी स्वर्गद्वार अपावृत करणारे हे 'पास' † घेऊन जर्मनींत आला (प्र. २९ प. १०).

---

*या टेझेलबद्दल डायर (Dyer) म्हणतोः–' He was of licentious morals, but remarkable for his noisy and popular eloquence' म्हणजे टेझेलच्या नीतिमत्तेविषयीं न बोलणेंच बरें; मात्र मोठ्यानें ओरडून वक्तृत्व गाजविण्यांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता !

† या पापनिष्कृतिकारक पासाचा एक नमुना पुढें दिला आहे.

" May Our Lord Jesus Christ have mercy upon thee, and absolve thee by the merits of His Most Holy Passion. And I, by His authority, that of His blessed Apostles Peter and Paul and of the Most Holy Pope, granted and committed to me in these parts, do absolve thee, first from all ecclesiastical censures, in whatever manner they have been incurred, and then from all thy sins, transgressions, and excesses how enormous-soever they may be, even from such as are reserved for the cognizance of the Holy See; and as far as the Keys of the Holy Church extend, I remit to you all punishment which you deserve in purgatory on their account and I restore you to the Holy Sacraments of the Church, to the Unity of the Faithful, and to that innocence and purity which you possessed at baptism; so that when you die, the gates of punishment shall be shut and the gates of the paradise of delight shall be opened; and if you shall not die at present, this grace shall remain in full force when you are at the point of death. In the name of the Father, and of the Son, and of the Holy Ghost " (Prescott)

लूथरनें स्वतः ख्रिस्ती धर्मशास्त्राचा जो अभ्यास केला होता त्यांत त्याला अशा प्रकारानें स्वर्गद्वार खुलें होण्याचा उपाय कोठेंही आढळला नव्हता. आणि लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांनीं अशा रीतीनें लोकांवर आपलें वर्चस्व स्थापून त्यांची नागवणूक करावी ही गोष्ट त्याला पसंत नव्हती. तेव्हां त्यानें या पत्रकांविरुद्ध ९६ मुद्दे पुढें मांडून या पत्रकांचा निषेध केला, आणि असलें एक निषेधपत्र विटेंबर्गच्या देवालयाच्या (Church) दरवाजावर चिकटविलें.

जुन्या पद्धतीच्या धर्मगुरूंना अर्थातच लूथरच्या या विरोधाचा फार राग आला. पण बायबलचें नव्या पद्धतीनें अध्ययन केलेले लोक लूथरची स्तुति करून त्याला धन्यवाद देऊं लागले. पुढें पोप लिओ यानें लूथरला त्याच्या 'धर्मलंड-पणा'बद्दल वाळींत टाकिलें. पण पोपचें हे बहिष्कारास्त्र कच्च्या दिलाच्या माणसांत कांहीं काल भीति उत्पन्न करूं शकत असलें, तरी लूथरसारखे पक्क्या बोरूचे विद्वान त्यानें हतवीर्य होण्यासारखे नव्हते. त्यामुळें पोपचा बहिष्कार कागदांतल्या कागदांतच राहून ही धर्मसुधारणेची चळवळ मात्र जर्मनीप्रमाणेंच इतर देशांतही पसरली.

यानंतर ख्रिस्ती लोकांत पोपची आज्ञा मानणारे व तो धुडकावून लावणारे असे दोन पंथ उत्पन्न झाले. पहिल्यांना 'पोपवादी' अगर रोमवादी (Roman Catholics) व दुसऱ्यांना 'पोपविरोधी' (Protestants) अशीं नांवें पुढें प्रचारांत आलीं (ग्र. ४० प. १५ ते १८); आणि एकाच धर्माच्या या दोन पंथांमध्यें पुढें कित्येक वर्षेपर्यंत हाणामाऱ्या व रक्तपात यांची रेलचेल उडून जाऊन 'रोमन' क्याथोलिक आणि 'प्रॉटेस्टंट' हे पंथभेद दृढमूल होऊन राहिले. आज ग्रेट ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी वगैरे देश प्रॉटेस्टंट

हिंदुलोकांत 'सर्वप्रायश्चित्त' विधीच्या वेळीं 'अनुवादक' पापमुक्ततेच्छु व्यक्तीची शक्ति विचारांत घेऊन प्रायश्चित्त सांगतांना पुढीलप्रमाणें उद्गार काढीत असतो ते या ठिकाणीं वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेतः-"तव जन्मप्रभृति अद्ययावद् ज्ञानाज्ञान-कामाकाम-सकृदसकृत्-कृत-कायिक-वाचिक-मानसिक-सांसर्गिक-स्पृष्टास्पृष्ट-भुक्ता-भुक्त-पीतापीत-सकलपातकातिपातकोपपातक-लघुपातक-संकरीकरण--मलिनीकरण-अपात्री-करण-जातिभ्रंशकर-प्रकीर्णक-पातकानां-मध्ये-संभावितपापानां-निरासार्थंपर्ष-दुपदिष्टं षडब्दत्र्यब्द-सार्धाब्दान्यतमप्रायश्चित्तं प्रतिप्राजापत्यं तत्प्रत्याम्नाय गोनिष्क्रयीभूत-रजतनिष्कतदर्धतत्पादान्यतम द्रव्यदानद्वारा प्राच्योदीच्यांगसहितं त्वया आचरितव्यं तेन तव शुद्धिर्भविष्यति त्वं कृतार्थो भविष्यसि इति "

पंथी असून आयर्लंड, स्पेन, पोर्च्युगाल, इटली वगैरे कित्येक देश रोमन कॅथोलिक पंथाचे आहेत.

लूथर इ. स. १५४६ या वर्षी आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी मरण पावला. त्याच्यामागें फक्त त्याची बायको होती.* धर्मदीक्षा घेतलेली असून सुद्धां आपण लग्न केलें, तें " आपल्या बापाच्या आग्रहावरून, पोपला चिडवावा म्हणून, आणि सैतान काय करतो तें पहावें म्हणून " (To please his father, to tease the Pope, and to vex the Devil) असें तो म्हणत असे ! असो.

लूथरनें आपल्या सुमारें ४० वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमांत असामान्य धैर्य आणि दुर्दमनीय मानसिक सामर्थ्य (iron-will) यांच्या जोरावर अर्धे युरोपखंड पोपच्या कबज्यांतून ओढून काढलें, आणि जनतेच्या मनांत विचारस्वातंत्र्याचें बीजारोपण करून धार्मिक बाबतींतच नव्हे तर राजकीय बाबतींतही इतिहासाचा ओघ पार बदलून टाकला. त्याचा मोठेपणा निव्वळ विद्वत्तेंत किंवा पंडितगिरींत नव्हता. कारण त्याचा समकालीन कॅल्व्हिन हा या दोन्ही गुणांत त्याच्या वरचढ होता. दूरदर्शीपणा हाही त्याला मोठेपणा देण्याला कारण झाला असें म्हणवत नाहीं. कारण त्याच्या समकालीन मित्रांत हा गुण अंगीं असणारे पुष्कळ होते. तर त्याचा मोठेपणा त्यानें स्वतःच वर्णिलेल्या त्याच्या पुढील गुणांत होता. तो म्हणे " माझा जन्म असंख्य भुतें आणि राक्षस यांच्याशीं झगडण्यासाठीं झाला आहे. रानावनांतले दगड धोंडे बाजूला सारून आणि कांटेरी झुडपें तोडून टाकून रस्ता साफ करावा हा माझा जीवित हेतु आहे; आणि तो हेतु साध्य करण्यासाठींच मला लढाईच्या आवेशानें मोठ्यानें आरडाओरड करून आकाश पाताळ एक करून सोडावें लागतें !" दुसऱ्या एकानें त्याच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे तें असें:-" Whatever he said and did, he said and did with all his might.

*लूथरच्या या पत्नीचें नांव कॅथराइन असें असून तिची प्रेमळ व साधी वृत्ति, गोड स्वभाव, पतीच्या कामधंद्याविषयीं कळकळ, गृहकृत्यांतील दक्षता, व एकंदर संसारांतील त्रासास व कटकटीस पुरून उरणारा तिचा धिमेपणा, वगैरे गुणांचा लूथरला आपलें वैवाहिक जीवन सुखानें घालविण्याला फार उपयोग झाला. लूथरची तिच्यावर इतकी प्रीति होती कीं, " मला कोणी वाटेल तितकी संपत्ति देण्याचें कबूल करून माझ्या प्रिय कॅथराइनवांचून रहा म्हणून सांगितलें, तरी तसें माझ्याकडून कधींच व्हावयाचें नाहीं " असे उद्गार तो वारंवार काढीत असे.

Throughout his whole life, he was an open-hearted German." म्हणजे ल्थर जें जें कांहीं बोले किंवा करी त्यांत आपलें शक्तिसर्वस्व खर्च करी. जन्मापासून मेरपर्यंत तो अगदीं उघड्या अंतःकरणाचा 'जर्मन' होता.

कोलेट-इरॅस्मस-मूर—ल्थरच्या मतांचा इंग्लंडमध्यें सुलभपणें प्रवेश होण्याला त्याच्यापूर्वी **कोलेट** (Colet), **इरॅस्मस** (Erasmus) व **मूर** (Moore) यांनीं आपल्या लेखांनीं इंग्लिश जनतेची मनोभूमिका नांगरून कोळपून तयार करण्यांत केलेले परिश्रम हे पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले होते. पैकीं **कोलेट** हा दुसऱ्या दोघांच्या गुरुस्थानीं असून त्यानें लहानपणीं ज्ञानसंपादनार्थ ग्रीक पंडितांच्या पायाशीं बसून जुनी ग्रीक विद्या हस्तगत केली होती. **इरॅसमस** त्याच्या वेळच्या सगळ्या पंडितांत अग्रणी होता. 'मूर्खस्तुति' (Praise of folly) या त्याच्या उपरोधिक ग्रंथानें त्या वेळच्या 'भटां'– (Ecclesiastics) ची मोठी तिरपीट उडवून दिली होती! त्याच्या लेखांनीं चिडून गेलेले 'जुन्या'चे अभिमानी इरॅस्मसला उघड दोष देऊन म्हणत असत कीं, 'इरॅस्मसनें सुधारणेचें अंडें घातलें आणि ल्थरनें ते उबविलें!' (Erasmus laid the egg and Luther hatched it). **थॉमस मूर** हा तर आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत कित्येक वर्षें त्याचा प्रमुख सल्लागार असून त्याच्या 'युटोपिया' ग्रंथानें सामान्य जनमनःसागरांत उडविलेली खळबळ धार्मिकच नव्हे, तर राजकीय सुधारणेच्या बाबतींतही इंग्लंडला पोषक झाली.

आठवा हेन्री—इंग्लंडच्या गादीवर बसलेल्या ट्यूडरवंशीय राजांत आठवा हेन्री हा फार प्रसिद्ध आहे. तो गादीवर आला तेव्हां इंग्लंडचा खजिना तुडुंब भरलेला होता. पण हेन्री ख्यालीखुशालीचा व चैनीचा भोक्ता असल्यामुळें त्यानें तो आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षांतच बहुतेक रिकामा केला. यानंतर त्यानें कधीं पार्लमेंटच्या सल्ल्यानें तर कधीं पार्लमेंटला धाब्यावर बसवून नाना प्रकारचे कर वसूल केले. पण हा सगळा पैसा त्यानें इंग्लंडचें वैभव व दरारा वाढविणाऱ्या परराष्ट्रीय राजकारणांतच खर्च केल्यामुळें लोकांना त्याबद्दल विशेषसें वाईट वाटलें नाहीं.

त्याच्या कारकिर्दींत फ्रान्स व स्पेन या युरोपस्थ देशांत भयंकर कलह चाललेले होते व त्या देशाचे राजे हेन्रीनें आपल्या बाजूला मिळावें म्हणून नेहमीं प्रयत्न करीत असत. हेन्रीनें मोठ्या शहाणपणानें दोघांनाही आपली जरूरी भासवून युरोपीय राज-

कारणांत आपलें व आपल्या राष्ट्राचें वर्चस्व स्थापन करून घेतलें (प्र. २८ प. ११।१२). त्याच्या कारकिर्दींत पोपचें इंग्लंडमधील धार्मिक बाबतींतलें वर्चस्व नाहीसें झालें आणि इंग्लंडचा राजा हाच इंग्लिश धर्मखात्याचा पूर्ण सत्ताधारी बनला (प्र. ३० प. १२). पण अशा रीतीनें धार्मिक अधिकाराच्या बाबतींत हेन्रीनें पोपशीं विरोध केला तरी त्या काळीं उठलेल्या धर्मसुधारणेच्या वावटळींत त्यानें पोपच्या बाजूचेंच मंडन करून 'धर्मरक्षक' ही पदवी मिळविली. पण ही पदवी झाली तरी त्यानें केवळ विद्वत्तेच्या जोरावरच मिळविली होती. तींत धार्मिक भावनेचा किंवा श्रद्धेचा ओलावा नव्हता. त्याच्या कारकिर्दींत राजसत्ता अनियंत्रित व सर्वश्रेष्ठ आहे असें ठरविणारे अनेक कायदे खुद्द पार्लमेंटनेंच पास केले. इंग्लंडचा राजा हा व्यावहारिक बाबतींप्रमाणेंच धार्मिक बाबतींतही इंग्लंडचा मुख्य आहे असें ठरविणारा 'Act of Supremacy' हा कायदा, किंवा एकादा कज्जा इंग्लिश कोर्टाच्या अधिकारांतला असतां तो कोणीं पोपच्या कोर्टांत नेल्यास किंवा पोपचीं फर्मानें राजाच्या संमतीशिवाय कोणीं इंग्लंडमध्यें आणविल्यास त्याची मालमत्ता जप्त करण्याची व्यवस्था करणारा 'Statute of Proemunire' हा कायदा हे पार्लमेंटच्या पोपाधिकार-विरोध वृत्तीचे उत्कृष्ट निदर्शक आहेत. इ. स. १५२९ मध्यें भरलेल्या पार्लमेंटला तर सुधारणापार्लमेंट (Reformation Parliament) असेंच नांव इतिहासकारांनीं दिलें आहे. कारण इ. स. १५२९ पासून इ. स. १५३६ पर्यंतच्या त्याच्या सात वर्षांच्या कालांत तिनें हेन्री सांगेल ते पोपच्याविरुद्ध सर्व कायदे मंजूर करून हेन्रीला इंग्लंडच्या धर्मसंस्थेचा सर्वाधिकारी (Supreme Head) करून सोडलें !

तसेंच इ. स. १५३९ मध्यें पार्लमेंटमध्यें पास झालेला जाहिरनाम्यांचा कायदा (Statute of Proclamations) म्हणजे पार्लमेंटनें स्वखुषीनें आपला अधिकार-न्यास केल्याची कबुलीच होय (प्र. ३१प. ८). कारण या कायद्याप्रमाणें राजानें काढलेल्या जाहिरनाम्यांस पार्लमेंटच्या कायद्याप्रमाणेंच मान मिळावा असें ठरविण्यांत आलें होतें; आणि या कायद्याचा आधार घेऊन खुद्द हेन्रीनेंच पुढें १२० जाहिरनामे काढले होते.

हेन्रीची कौटुंबिक व घरगुती वागणूक अत्यंत गलिच्छ होती. त्यानें एकंदर ६ लग्नें केलीं; पण त्या प्रत्येक लग्नाच्या वेळीं आपल्या पूर्व-पत्नीशीं त्यानें केलेली वागणूक ख्रिस्तीधर्माच्या दृष्टीनें तरी दोषास्पद अशीच होती. त्यानें आपल्या मित्रांशीं अनेक वेळां केलेलें विश्वासघाताचें वर्तन त्या मित्रांवर प्राणसंकट ओढवण्याला कसें कारण झालें हें वुल्सेच्या अखेरच्या उद्गारांवरून दिसून येण्यासारखें आहे. पण त्याबरोबरच हेंही

लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्याच्या कारकिर्दीत इंग्लंडमध्यें अंतस्थ शांतता आणि बाहेरच्या राष्ट्रांत इंग्लंडचा दरारा राहिला त्याचें मुख्य कारण त्याचा निश्चयी स्वभाव हेंच होय. थॉमस वुल्सेनेंच त्याच्या या निश्चयी स्वभावाविषयीं एकदां पुढील उद्गार काढले होते. "हेन्री राजा आपल्या इच्छेच्याविरुद्ध एकादी गोष्ट होण्यापेक्षां आपलें अर्धें राज्यही गमाविण्यास तयार होईल." त्याचप्रमाणें त्याच्या सदसद्विवेकहीन स्वार्थासंबंधानें तर थॉमस मूर या विद्वान गृहस्थानें त्याच्या तोंडावरच एकदां असें सांगितलें होतें कीं, 'तुम्हीं माझ्यावर कितीही लोभ आहे असें दाखविलें, तरी माझें डोकें जाऊन फ्रान्स-मधला एकादा किल्ला मोबदला मिळण्याचा तुम्हांला संभव दिसला, तर माझें डोकें कसें उडवूं हा विचार कांहीं तुमच्या मनांत येणार नाहीं हें मला माहीत आहे !'

इतिहासकार मायर्स यांनीं आठव्या हेन्रीच्या एकंदर कृत्यांचा आढावा काढून त्याच्याविषयीं आपलें पुढील मत व्यक्त केलें आहे:— "If the plain truth be told, he was doubtless, if we except King John, the most cruel, capricious, arbitrary, self-willed and remorseless tyrant that ever sat upon the English throne. As we said of John, so may we say of Henry, that the English People are greatly indebted to him, but without owing him any thanks. He delivered England indeed from the power of the Papal See, and became the founder, if that distinction may be given to any single man, of the Anglican Church; but in all this, he was actuated rather by selfish motives, than by a true regard for the welfare of his people, or by sympathy with the teachings of Luther."

याचा अर्थ असा:—खरेंच सांगावयाचें म्हणजे जॉन राजा वगळला असतां इंग्लंडच्या गादीवर जे राजे बसले, त्यांत हेन्रीइतका निष्ठुर, लहरी, हेकट, जुलुमी आणि निर्लज्ज अरेराव कोणी झाला नसेल. जॉनप्रमाणेंच हेन्रीविषयींही असें म्हणतां येईल कीं त्याच्याहातून इंग्लंडवर पुष्कळ उपकार झाले, पण त्याबद्दल कोणीं त्याचे आभार मानण्याचें मात्र कारण नाहीं. त्यानें पोपच्या मगरमिठींतून इंग्लंडची मुक्तता केली आणि खास इंग्लंडची अशी 'आंग्लधर्मसंस्था' स्थापन केली हें खरें, पण त्याच्याहातून झालेलें

कोणतेंही धार्मिक कृत्य इंग्लिश प्रजेच्या कल्याणाच्या हेतूनें किंवा लूथरच्या मताबद्दलच्या सहानुभूतीनें झालेलें नसून त्या प्रत्येक कृत्यांत स्वार्थ हाच त्याचा प्रधान हेतु होता.

पण असें असलें तरी आठव्या हेन्रीची कारकीर्द एकंदरींत लोकप्रिय झाली, याचीं कारणें म्हणजे त्याच्या कारकिर्दींत इग्लंडांतील राजसत्ता व धर्मसत्ता एका व्यक्तींत केंद्रीभूत होऊन इंग्लंडची पोपच्या अधिकारापासून फारखत होणें, त्याचें परराष्ट्रीय धोरण इंग्लंडचा युरोप खंडांतील मान व दर्जा वाढविण्याला कारण होणें, व्यापार व नौकानयन यांस त्यानें दिलेलें उत्तेजन, आणि धार्मिक व राजकीय बाबतींत अनेक पक्षोपपक्ष उत्पन्न झाले, तरी त्या सर्वांना अनियंत्रित दंडुकेशाहीच्या जोरावर कां होईना; पण आपल्या कह्यांत ठेवून त्यानें स्वदेशांत राखलेली शांतता हींच होत. त्याची वैयक्तिक लोकप्रियता आकर्षक मुद्रा, ठसकेबाज चालचलणूक आणि उत्साहपूर्ण कृति, यांवर अधिष्ठित होती. (He was attractive in person, animated in manner, and energetic in action). तो इ. स. १५४७ मध्यें आपल्या वयाच्या ५६ व्या वर्षीं मरण पावला.

थॉमस वुल्से (Thomas Wolsey)–हा इंग्लंडमधील एका खाटकाचा मुलगा इप्सिच (Ipswich) येथें इ. स. १४७१ सालीं जन्मला. ट्यूडर घराण्यांतील राजा 'सातवा हेन्री' यानें त्याची बुद्धिमत्ता व कार्यक्षमता पाहून त्याचा आपल्या परराष्ट्रीय राजकारणांत उपयोग करून घेतला. पुढें आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत तर कित्येक वर्षेपर्यंत तो करील ती पूर्व दिशा (trusted councillor of the King) अशी स्थिति होती. राजा डामडौलाचा व ऐषआरामाचा शोकी; वुल्सेही राजाचा कल पाहून त्याप्रमाणें वागणारा; यामुळें त्या दोघांची गट्टी जमण्यास वेळ लागला नाहीं. एक वेळ तर वुल्सेचें वैभव एवढें वाढलें होतें कीं, तो बाहेर निघाला म्हणजे त्याच्या स्वारींत भपकेबाज जरतारी पोषख केलेले एक हजार लोक रांगारांगानीं चालत. हेन्रीनें त्याला प्रथम लिंकनचा बिशप, नंतर यॉर्कचा आर्चबिशप, आणि शेवटीं इ. स. १५१५ मध्यें लॉर्ड चॅन्सेलर (Lord Chancellor) म्हणजे राजाचा मुख्य मंत्री, सरदार सभेचा अध्यक्ष, आणि इंग्लंडच्या राष्ट्रीय शिक्क्याचा रक्षक नेमलें. शिवाय पोपनेंही त्याला आपल्या प्रतिनिधित्वाचा मान दिला (Papal Legate). पण वुल्सेची महत्त्वाकांक्षा याहूनही मोठी होती. त्याला जमल्यास रोमच्या मुख्य आचार्याचें पद (Papal Chair) मिळवावयाचें होतें. आणि त्यासाठीं त्यानें फ्रान्स व स्पेन या दोन्ही देशांच्या बादशहांना आळीपाळीनें खूष ठेवण्याचा प्रयत्न कित्येक वर्षें चालविला होता. (प्र. २८ प. १२।१३).

आठव्या हेन्रीच्या मनांतून आपल्या कॅथराइन राणीशीं घटस्फोट करावयाचा होता व त्यासाठीं त्याला पोपची संमति मिळवावयाची होती. पण त्या वेळचा पोप हा स्पेनच्या राजाच्या हातचें बाहुलें बनलेला असून स्पेनचा राजा कॅथराइन राणीचा पुतण्या लागत होता. हेन्रीनें हें नाजुक काम वुल्सेवर सोंपविलें. पण तें त्याला तडीस नेतां न आल्यामुळें शेवटीं राजाची त्याच्यावर खप्पा मर्जी झाली, आणि इ. स. १५२९ मध्यें त्याला आपल्या सर्व वैभवावर पाणी सोडून ईशर येथें एका मठांत दिवस कंठावे लागले. पुढल्या वर्षीं त्याच्यावर राजद्रोहाचा (High Treason) आरोप ठेवून चौकशीसाठीं त्याला लंडनला बोलावलें. पण लंडनला येत असतां वाटेंतच त्याचें प्राणोत्क्रमण झालें (इ. स. १५३०). त्याचे अखेरचे शब्द असे होते:—" मीं माझ्या राजाची जितक्या एकनिष्ठपणें सेवा केली, तितक्या एकनिष्ठपणानें जर देवाची सेवा केली असती, तर त्या देवानें मला म्हातारपणीं असा खचित टाकला नसता ! " (प्र. ३० प. ६).

आठव्या हेन्रीची कारकीर्द इंग्लंडच्या अंतःस्थ बळकटीप्रमाणेंच परराष्ट्रांतील वाढत्या वजनाची व मानाची म्हणून प्रसिद्ध आहे. इंग्लंडला परराष्ट्रांत हा मान व वैभव प्राप्त करून देण्याला वुल्सेच्या शहाणपणाची व दूरदृष्टीची फार मदत झाली होती. खुद्द इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या सभासदांना मुठींत ठेवण्याची कलाही वुल्सेला चांगली अवगत असल्यामुळें हेन्रीला कोणत्याही बाबतींत पार्लमेंटची संमति मिळविण्याला वेळ लागत नसे. पण हेन्रीच्या स्वभावांत आपलें काम झालें कीं, मित्रोपकार विसरून जाण्याचा फार मोठा दोष असल्यामुळें वुल्सेचे शेवटचे दिवस काळजींत व मानहानींत गेले, आणि वर लिहिल्याप्रमाणें पश्चात्तापाचे उद्गार काढण्याची त्याच्यावर पाळी आली.

इलिझाबेथ (Elizabeth)—इंग्लंडच्या इतिहासांत ज्या स्त्रियांचीं नांवें राज्यकर्त्या स्त्रिया म्हणून गाजलेलीं आहेत, त्यांत सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत तक्तनशीन असलेल्या इलिझाबेथचें नांव प्रमुख आहे. ही ट्यूडर राजघराण्यापैकीं असून आठव्या हेन्रीच्या अनेक पत्न्यांपैकीं ॲन बोलिनची मुलगी. इलिझाबेथच्या जन्मानंतर लौकरच तिच्या आईवर पातिव्रत्यभंगाचा आरोप येऊन तिला हा लोक सोडून जावें लागलें, व इलिझाबेथवर अनौरसत्वाचा शिक्का बसला. पण पुढें हेन्रीनें जें मृत्युपत्र केलें, त्यांत आपल्या मेरी मुलीच्या पश्चात् इंग्लंडचें राजपद इलिझाबेथला द्यावें असें नमूद करून ठेवलेलें असल्यामुळें इ.स. १५५९ मध्यें तिला इंग्लंडची गादी मिळाली आणि पुढें तिनें पार्लमेंट सभेकडून एक ठराव करून घेऊन आपल्यावरील अनौरसत्वाचा डाग धुवून काढला.

इंग्लंडच्या इतिहासांत इलिझाबेथची कारकीर्द अनेक दृष्टींनीं फार महत्त्वाची आहे. तिच्या कारकिर्दींत इंग्लंडमधील धार्मिक सुधारणेला निश्चित स्वरूप प्राप्त होऊन ती वाढीला लागली (प्र. ३४); स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा पराभव होऊन, इंग्लंडचा



राणी इलिझाबेथ.

आरमारी सामर्थ्याविषयींचा आत्मविश्वास दृढ झाला (प्र.३६); इंग्लंडच्या अमेरिकेंतील वसाहतींचा पाया खोदण्यांत येऊन ब्रिटिश साम्राज्याची मुहूर्त-मेढ रोवली गेली; आणि उद्योगधंदे आणि व्यापार हींच इंग्लंडच्या भरभराटीचीं मुख्य साधनें आहेत ही गोष्ट इंग्रजांना पटून त्याचे त्या दिशेनें जारीनें प्रयत्न चालू झाले.

दृढ निश्चय, असामान्य धैर्य, प्रशंसनीय तारतम्यज्ञान, आणि उत्कृष्ट राजकीय युक्तिबाजपणा (tact) हे इलिझाबेथच्या अंगचे विशेष गुण होत. या गुणांच्या जोरावरच तिला आपलें स्वतःचें नांव इंग्लंडच्या इतिहासांत अजरामर करून ठेवतां आलें. पण तिच्या अंगच्या या गुणांबरोबरच लहरीपणा, विश्वासघात, सदसद्विवेकबुद्धिहीनता, पुरुषी (unwomanly) चालचलणूक, आणि धार्मिक अगर नैतिक भावनेचा अभाव (devoid of a moral or religious sense) हे तिच्या अंगचे दुर्गुण दृष्टिआड करून चालणार नाहीं. सुप्रसिद्ध इतिहासकार 'ग्रीन' तर सांगतो कीं, खोटें बोलण्यांत त्या वेळच्या सगळ्या ख्रिस्ती माणसांत तिचा पहिला नंबर होता; एखाद्या गोष्टीविषयीं कौन्सिलांत वादविवाद चालू असतां शपथा घेऊन तो मध्येंच थांबविणें हा तिचा नित्याचा विषय होता; आपल्यासारखी सुंदर स्त्री जगांत नाहीं असें लोकांनीं म्हणावें म्हणून ती नानाप्रकारचे ढंग करीत असे; सत्तर वर्षांची बुड्ढी झाली तरी तिची नाचाची हौस कमी झाली नव्हती; पोषाखाच्या बाबतींत तर तिनें इतकी कमाल केली होती कीं, एकदां केलेला पोषाख ती दुसऱ्यांदा करीत नसे ! मरतेसमयीं तिच्या कपाटांत तीन हजार कपडे (dresses) होते असें सांगतात.

पण इतकें झालें तरी राष्ट्रीय दृष्ट्या तिच्या एकंदर गुणदोषांचा आढावा काढणाऱ्याला तिच्या गुणाचेंच पारडें जड होतें हें कबूल करावें लागतें. तिची लोकप्रियता तर इतकी विलक्षण होती कीं, सगळें इंग्लंड तिला प्रेमानें 'आमची भली राणी बेस' (Our Good Queen Bess) असें म्हणत असे. उलटपक्षीं तिचें इंग्लिश राष्ट्रावरचें प्रेमही तितकेंच विलक्षण होतें. तिच्या लग्नाची गोष्ट कोणी काढली कीं, ती म्हणे 'राज्याभिषेकाच्या वेळींच माझें इंग्रज 'राज्यनृपती' शीं लग्न लागलें आहे. तेव्हां मला दुसरा नवरा कोणी नको'. (She declared that on her coronation day she was married to the English Realm, and she would have no other husband.)

थॉमस क्रॉमवेल—हा इंग्लंडमधील एका घिसाड्याचा (a black-smith) मुलगा इ. स. १४९० मध्यें जन्मला. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत वुल्सेची चलती

असतांना त्यानें प्रथम याची कित्येक गुप्त कामगिऱ्यांवर (Secret mission) योजना केली. इ. स. १५३५ मध्यें त्याची इंग्लंडच्या धर्मखात्यांत 'व्हिकार जनरल'- (Vicar General) च्या हुद्यावर नेमणूक झाली. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत इंग्लंडांतले धर्ममठ मोडून टाकून त्यांचें द्रव्य सरकारी तिजोरींत आणून जमा करण्याची कामगिरी बहुतांशीं यानेंच पार पाडली (प्र.३०५.१५). पण पुढें 'अॅन ऑफ् क्लीव्हज' या जर्मन युवतीचें हेन्रीशीं लग्न घडवून आणण्याची कारवाई त्याच्या अंगलट आल्यामुळें त्याच्यावर हेन्रीची खप्पा मर्जी (displeasure) झाली, आणि त्याच्यावर पाखंडमत व राजद्रोह (heresy and high treason) हे दोन आरोप ठेवून इ. स. १५४० मध्यें त्याचा शिरच्छेद करण्यांत आला (प्र.३१५.९।१०). त्याचीं मतें सुधारक पंथाचीं असून इंग्लंडांतील सुधारणा पुढें ढकलण्याच्या कामीं त्यानें बरीच खटपट केली होती.

थॉमस क्रॉमवेल हा हेन्रीप्रमाणेंच दृढनिश्चयी (man of iron will) व राजाच्या अनियंत्रित सत्तेचा कट्टा पुरस्कर्ता होता. धार्मिक बाबतींत काय किंवा राजकीय बाबतींत काय इंग्लंडांत हेन्री हाच सर्व सत्ताधीश असला पाहिजे व त्याच्या इच्छामात्रेंकरून राज्यांतले सगळे व्यवहार चालले पाहिजेत असें त्याचें मत होतें. (Parliament, Church and everything were to be subjected to a single will, and that single will was to be Henry's). त्यानें ज्या दहा वर्षांत हेन्रीच्या मुख्य सल्लागाराचें काम केलें, त्या दहा वर्षांच्या कालाला इतिहासकारांनीं 'कृतांत कारकीर्द' (Reign of Terror) असें नांव दिलें आहे. कारण त्याच्या मार्गांत जो जो म्हणून आडवा येण्याचा प्रयत्न करी, किंवा ज्याच्यावर त्याची कोणत्याही कारणानें खप्पा मर्जी होई, त्याच्यावर तात्काल मांगाची कुऱ्हाड पडलीच, अशी त्या वेळीं स्थिति होती (The executioner's axe was constantly wet with the blood of those, who stood in his way or who in any manner incurred his displeasure).

सर फ्रॅन्सिस ड्रेक—हा इलिझाबेथच्या कारकिर्दींतला प्रख्यात दर्यासारंग (Admiral) होय. तो इ. स. १५४५ मध्यें जन्मला. त्याला लहानपणापासूनच समुद्रावरील सफरींची आवड असल्यामुळें त्या वेळच्या इंग्रजांच्या 'वेस्ट इंडीज' (West Indies) व दक्षिण अमेरिकेकडील जलपर्यटनांत त्यानें अनेक वेळां

भाग घेतला होता. स्पॅनिश लोकांचीं गलबतें लुटून आणण्यांत त्याचा धाडसी स्वभाव व समुद्रावरील हालचालींविषयींचें ज्ञान चांगलें दिसून येत असे. इ. स. १५७७–८० या कालांत त्यानें पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली, आणि या त्याच्या यशस्वी साहसानें खुष होऊन इलिझाबेथ राणीनें त्याच्या आवडत्या ‘ सुवर्णहिंद ’ (Golden Hind) या गलबतावर जाऊन त्याला ‘सर’ ही पदवी दिली. इ.स.१५८६ मध्यें त्यानें अमेरिकेच्या ‘ व्हर्जिनिया ’ वसाहतींत जाऊन तेथल्या ज्या वसाहतवाल्यांचे हाल होत होते, त्यांना



सोळाव्या शतकांतील पहिला इंग्रज पृथ्वी–प्रदक्षिणक **सर फ्रॅन्सिस ड्रेक.**

परत इंग्लंडमध्यें आणलें. पुढल्या वर्षीं त्यानें स्पेनच्या कॅडिझ बंदरांत शिरून अनेक स्पॅनिश गलबतांचा नाश केला. पुढें इंग्लंडनें स्पेनच्या अजिंक्य आरमारापासून आपला बचाव करण्याची तयारी चालविली, तेव्हां हॉवर्ड या मुख्य आरमाराधिपतीच्या हाताखालीं ड्रेकला व्हाइस ॲडमिरल (Vice-Admiral) नेमण्यांत आलें होतें. तो इ. स. १५९६ मध्यें मरण पावला.

एका इतिहासकारानें त्याच्या कार्याचें स्वरूप वर्णिलें आहे तें असें.— सर फ्रॅन्सिस ड्रेक (Sir Francis Drake) हा ' अर्धा संशोधक आणि अर्धा समुद्रावरचा लुटारू ' होता (half explorer and half pirate). इ. स. १५७५ पासून १५७९ पर्यंतचीं चार वर्षें त्यानें पृथ्वीपर्यटनांत घालविलीं होतीं. आणि त्याचें सगळें आयुष्य स्पेनचा राजा फिलिप (Philip II) याच्या आरमाराशीं भांडण्यांत, स्पेनचीं जहाजें लुटण्यांत, आणि नव्या–जुन्या जगांतील स्पेनच्या ताब्यांतील बंदरांत शिरून तेथल्या वसाहती आणि वखारी लुटून फस्त करण्यांत गेलें. इलिझाबेथची बहुतेक कारकीर्द स्पेनशीं भांडण्यांतच गेल्यामुळें त्या मुदतींतल्या त्याच्या समुद्रावरील दरोड्यांना आणि अत्याचारांना (Robberies and atrocities) युद्धकालीन स्वाऱ्यांच्या हालचालीचें स्वरूप आपोआपच मिळत असे.

सर थॉमस मूर-इंग्रजी भाषेंतील युटोपिया (Utopia) या सुप्रसिद्ध ग्रंथाचा हा कर्ता इ. स. १४८० मध्यें जन्मला. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत त्याचे जे अनेक मित्र होते त्यांत याची गणना होती. वुल्सेच्या मागून त्याला इंग्लंडच्या मुख्य कारभाऱ्याचें पद (Lord High Chancellor) कांहीं काल उपभोगावयास मिळालें होतें. पण पुढें धार्मिक बाबतींत राजाचें श्रेष्ठत्व मानण्याचें नाकारल्यामुळें त्याला हेन्रीच्या अवकृपेला बळी पडून इ. स. १५३५ मध्यें शिरच्छेदाची शिक्षा भोगावी लागली.

थॉमस क्रॅनमर—सोळाव्या शतकांतील इंग्लंडमधील सुधारणेच्या इतिहासांत आपल्या मतासाठीं प्राणार्पण करणाऱ्या ज्या सुधारकांचीं नांवें प्रामुख्यानें झळकतात, त्यांत थॉमस क्रॅनमरचें एक नांव आहे. आठव्या हेन्रीला आपल्या कॅथराइन राणीला कायदेशीर रीतीनें कशी दूर करावी याची चिंता लागली असतांना क्रॅनमरनें तिच्या हेन्रीशीं झालेल्या लग्नाचा प्रश्न युरोपांतल्या विद्वन्मंडळापुढें मांडण्याची युक्ति प्रथम सुचविली. पुढें त्याला इंग्लंडमधील मुख्य धर्माचार्याची (Archbishop) जागा देण्यांत आल्यावर त्यानें इ. स. १५३३ मध्यें हेन्रीचें कॅथराइनशीं झालेलें लग्न अशास्त्र ठरवून रद्द केलें (प्र.३०प.११). बायबलच्या इंग्लिश भाषांतराच्या कामीं त्याचें पुष्कळ साहाय्य झालें होतें. आठव्या हेन्रीच्या पश्चात् बालराजा सहावा एडवर्ड गादीवर आला तेव्हां जें राजपालकमंडळ (Regency) नेमण्यांत आलें त्यांत क्रॅनमर हा एक होता. इ.स.१५४९ मध्यें इंग्लंडचा खास धर्म निश्चित करण्याचें ठरलें, तेव्हां तयार करण्यांत आलेल्या ४२ सूत्रांच्या रचनेच्या कामींही त्याचें बरेंच अंग होतें.

पण पुढें मेरीची कारकीर्द सुरू झाल्यावर त्याच्या मागील वैभवाचें सगळें उट्टें निघालें, आणि त्याला एकदम तुरुंगांत टाकण्यांत आलें. पुढें सुधारणेच्चीं मतें धारण करण्याबद्दल ज्या सुधारकांना 'पाखंडी' म्हणून जिवंत जाळण्याच्या शिक्षा झाल्या, त्यांत क्रॅनमरही सांपडला, आणि त्यानें प्रथम जिवाच्या आशेनें आपलीं 'सुधारकी' मतें चुकीचीं होतीं असें लिहून दिलें, तरी त्याला पुढें पश्चात्ताप होऊन त्यानें आपलें म्हणणें मागें घेतलें, आणि सुधारणेचीं मतेंच बरोबर आहेत असें जाहीर करून इ. स. १५५६ मध्यें ऑक्सफर्ड येथें चाललेल्या 'अग्निदिव्यांत' आपल्या उजव्या हाताला प्रथम जळण्याचा मान देऊन शांतपणें आपल्या देहाची राख करून घेतली! (प्र.३३प.१०).

सर फिलिप सिडने—हा इलिझाबेथच्या कारकिर्दींतील इंग्लंडमधला एक उत्तम शिपाई गडी असून ग्रंथकारही होता (Soldier and author). इलिझाबेथची त्याच्यावर फार मर्जी होती. इतकी कीं, ती त्याला 'आपल्या राज्यांतलें एक रत्न' (Jewel of her dominions) म्हणत असे. इ. स. १५८६ मध्यें युरोपखंडांत स्पेन व नेदर्लंडचे संस्थानिक यांच्यामध्यें युद्ध जुंपलें असतां नेदर्लंडच्या संस्थानिकांना मदत करण्यासाठीं इलिझाबेथचें सैन्य रवाना झालें, तेव्हां सिडने त्या सैन्यांत एक प्रमुख अधिकारी होता. 'झुटफेन' (Zutphen)-च्या लढाईत जबर जखम होऊन पडल्यावर त्याला एका डोलींतून दुसरीकडे नेत होते; तेव्हां वाटेंत एका ठिकाणीं पाणी पिण्यासाठीं त्यानें पाण्याचा पेला आपल्या ओंठाकडे नेला असतां जवळच्या एका जखमी शिपायाची दृष्टि त्या पेल्याकडे लागलेली पाहून "माझ्यापेक्षां तुझी गरज ज्यास्त आहे" असें म्हणून त्यानें तो पेला त्या शिपायाला दिल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. आणि मरतां मरतांही त्यानें दाखविलेल्या या औदार्याबद्दल त्याचें नांव उदार गृहस्थांच्या नाममालिकेंत कायमचें अधिष्ठित होऊन राहिलें आहे. 'आर्केडिया' (Arcadia) हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ होय.'

प्रस्तुत भागांत आलेल्या महत्त्वाच्या गोष्टी

सत्तेचा समतोलपणा—'आठव्या हेन्री'च्या परराष्ट्रीय धोरणांत युरोपखंडांत 'सत्तेचा समतोलपणा' (Balance of Power) राखणें म्हणजे कोणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्रांवर कुरघोडी करण्याइतकें प्रबल होऊं न देणें हा विचार मुख्य

होता. युरोपखंडांतील या कालचीं प्रबल राष्ट्रें म्हणजे फ्रान्स, स्पेन, व इटली. पण इटलींत या वेळीं सर्वत्र बजबजपुरी माजलेली असून तो देश पांच छोट्या राज्यांत विभागला गेला होता. आणि स्पेन व फ्रान्स येथील राजे हीं छोटीं राज्यें आपल्या घशांत टाकण्याचा डाव खेळत होते. जर्मन 'बादशहां'ची स्थितिही चांगलीशी नव्हती. रोमचा पोप धार्मिक बाबींप्रमाणेंच ऐहिक बाबतींतही आपण सर्वाधिकारी आहों असें म्हणे. तथापि तें त्याचें सर्वाधिकारित्व केवळ नाममात्र व कागदोपत्रीं तेवढें उरलें होतें. सर्वाधिकारित्वाची व प्रबलत्वाची खरी चढाओढ फ्रान्स व स्पेन यांच्यामध्येंच होती. इंग्लंडनें वुल्सेच्या सल्ल्याप्रमाणें जो पक्ष ज्या वेळीं दुर्बळ दिसेल, त्या पक्षाला त्या वेळीं मदत करून सांवरून धरावयाचें, व अशा रीतीनें कोणालाच फाजील प्रबळ होऊं द्यावयाचें नाहीं असें ठरविलें. या धोरणांत हेन्रीची वैयक्तिक वर्चस्वाची हौस व वुल्सेची 'पोपची खुर्ची' मिळविण्याची महत्त्वाकांक्षा (प्र. २८ प. १३)या गोष्टींची भर पडल्यामुळें इंग्लंडच्या या वेळच्या फ्रान्स व स्पेन देशांशीं झालेल्या वर्तनांत धरसोड दिसून येते. पण या धरसोडीनें इंग्लंडला प्रत्यक्ष फायदा कांहीं झाला नसला तरी त्याचा युरोपला दरारा वाटावयाचा तो वाटतच असे. आज मितीसही इंग्लंडचें युरोपखंडांतील निरनिराळ्या राष्ट्रांशीं जें धोरण आहे तें अशाच प्रकारचें आहे.

आठव्या हेन्रीच्या बायकाः—

(१) **कॅथराइन**—लग्न इ. स. १५०९; घटस्फोट इ. स. १५३३. **मेरी** ही हिची मुलगी.

(२) **ॲन बोलीन**—लग्न इ. स. १५३३; शिरच्छेद इ. स. १५३६. **इलिझाबेथ** ही हिची मुलगी.

(३) **जेन सेमूर** लग्न १५३६; मृत्यु इ. स. १५३७. **एडवर्ड** हा हिचा मुलगा.

(४) **ॲन ऑफ क्लीव्हज**—लग्न इ. स. १५४०; घटस्फोट इ. स. १५४०.

(५) **कॅथराइन हॉवर्ड** लग्न इ. स. १५४०; शिरच्छेद इ. स. १५४२.

(६) **कॅथराइन पार**—लग्न इ. स. १५४३; हिनें हेन्रीच्या मृत्यूनंतर **लॉर्ड सेमूर**शीं पुनर्विवाह केला.

स्टार चेंबर कोर्ट (Star Chamber Court)—हें 'सातव्या हेन्री'नें निर्माण केलेल्या एका न्यायालयाचें नांव होतें. राजाच्या अगदीं विश्वासांतले असे सात गृहस्थ या न्यायालयांत बसून इंग्लंडांतल्या ज्या सरदारांना त्यांच्यापुढें न्याया-

साठीं खेंचण्यांत येई, त्यांचा 'न्याय' (हा बहुधा त्यांच्या विरुद्ध व्हावयाचा हें ठरलेलेंच असे) करीत असत. इंग्लंडांतले जे सरदार आपल्या सत्तेच्या व वरिष्ठ दर्जाच्या जोरावर आपल्या हद्दींतील न्यायाधिशांना न जुमानतां सरकारी कायदे धाब्यावर बसवीत, त्यांची नांगी मोडण्याच्या कामीं हेन्रीला या कोर्टाचा फार उपयोग झाला (प्र. २७ प. १५). ही न्यायकचेरी ज्या खोलींत भरे त्या खोलीच्या भिंतीवर व छतावर जिकडे तिकडे ताऱ्यांचीं चित्रें काढलेलीं होतीं. म्हणून या न्यायालयाला 'स्टार चेंबर कोर्ट' म्हणजे 'तारकापुंज न्यायालय' असें नांव पडलें होतें. त्याचें दुसरें नांव 'प्रिव्ही कौन्सिल' (Privy Council) असें होतें.

धर्मसमीक्षण सभा (Inquisition)—ख्रिस्ती धर्मांत परधर्मांविषयींच्या असहिष्णुतेचें (intolerance) व द्वेषाचें वारें शिरल्यावर ख्रिस्तेतरांना किंवा 'पाखंड्यां'ना वठणीवर आणण्यासाठीं ख्रिस्ती धर्माध्यक्षांकडून ज्या राक्षसी उपायांचा अवलंब होऊं लागला. त्या उपायांना कायदेशीर व शास्त्रीय स्वरूप देण्यासाठीं पोपनें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें नेमलेल्या न्यायाधिकाऱ्यांच्या धर्मकोर्टाला (Ecclesiastical tribunal) हें नांव दिलेलें होतें. या संस्थेची उत्पत्ति इ. स. च्या बाराव्या–तेराव्या शतकांतली आहे. पण पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत स्पेनमध्यें या संस्थेनें जो धुमाकूळ घातला, तेथपासून तिचा फार गाजावजा झाला. लूथरनें पोपची सत्ता झुगारून दिल्यावर तर पोपला हें पाखंडसत्र जोरानें चालविणें अधिकच अवश्य वाटूं लागलें, आणि इ. स. १५४२ च्या सुमाराला रोमच्या धर्माध्यक्षानें युरोपांतील प्रत्येक देशांत हें कोर्ट स्थापून पाखंड्यांचा बीमोड करण्याचा निश्चयच केला. त्या वर्षी सहा 'कार्डिनलां'ना (Cardinal) धर्मसमीक्षकांच्या (inquisitors) जागा देऊन आल्पस (Alps) पर्वताच्या दोन्ही बाजूंच्या म्हणजे उत्तर दक्षिण युरोपांतल्या सगळ्या पाखंड्यांना शोधून काढून शिक्षा करण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें. ज्या देशांत रोमन-कॅथोलिक पंथाचें प्राबल्य होतें, तेथले सरकारी अधिकारी (secular authorities) या धर्मकोर्टांनीं दिलेल्या शिक्षा अंमलांत आणण्याच्या कामीं हातभार लावीत; पण इतर देशांतून त्यांच्या या शिक्षा पुष्कळ वेळां तोंडांतल्या तोंडांत किंवा कागदांतल्या कागदांतच राहत.

या धर्मकोर्टांची न्यायपद्धति म्हणजे न्यायाची शुद्ध थट्टा असे. अमुक व्यक्ति 'पाखंडी' आहे असें कोणीं सांगितलें, असें विचारण्याची सुद्धां सोय नसे. आईबापांना आपल्या मुलांविरुद्ध आणि मुलांना आपल्या आईबापांविरुद्ध माहिती सांगण्याचे

हुकूम होत. एकाद्या पाखंड्याची कोणाला माहिती असून ती त्यानें आपण होऊन कळविली नाहीं, तरीही तो शिक्षेला पात्र होत असे. या शिक्षेचे प्रकारही अत्यंत क्रूरपणाचे व अंगावर शहारे आणणारे असत. संशयित पाखंड्यांना धर्मकोर्टाच्या तळघरांतील कैदखान्यांत (subterranean dungeons) नेऊन त्या ठिकाणीं त्यांना 'समज' देण्याचें काम चाले! त्यांच्या तावडींत सांपडलेल्या लोकांच्या हृदयद्रावक आरोळ्या बाहेरच्या जगाला ऐकूं येऊं नयेत म्हणून ही व्यवस्था केलेली असे, आणि ज्या अपराधांची या दुर्दैवी प्राण्यांना कधीं कल्पनाही नसे अशा अपराधांची कबुली (confession) त्यांच्या मुखांतून वदविली जाई! पाखंड्याला उघड्यावर जाळून मारणें आणि त्याची मिळकत जप्त करणें या गोष्टी तर या धर्मकोर्टाच्या अगदीं अंगवळणींच पडून गेल्या होत्या. शिक्षा म्हणून जप्त झालेली मिळकत बहुधा धर्मसमीक्षक न्यायाधीश (The inquisitors), पोपमहाराज, आणि ही शिक्षा अंमलांत आणणारे राजे आपसांत वांटून घेत!

जेझुइट (Jesuit)—सोळाव्या शतकांत जर्मनीमध्यें **मार्टिन लूथर** हा प्रख्यात धर्मसुधारक उत्पन्न होऊन त्यानें ख्रिस्तीधर्मांतील कित्येक वेडगळ आचारांवर व ख्रिस्ती उपाध्यायांच्या अनैतिक व जुलमी वर्तनावर हल्ला चढविला व त्याचे अनुयायी सर्व युरोपखंडांत भराभर वाढूं लागले. तेव्हां रोमच्या पोपलाही आपल्या व आपल्या अधिकाऱ्यांच्या वर्तनांत बदल करणें अवश्य वाटूं लागलें. ज्ञानाच्या प्रसाराबरोबर 'जुन्याला' केवळ 'जुनें तें सोनें' म्हणून कवटाळून बसणारे लोक यापुढें राहणार नाहींत, हें कित्येक जुन्या मताच्या उपाध्यायांच्याही लक्षांत आलें आणि त्यांनीं ख्रिस्तीधर्मांतील जुन्या म्हणजे 'कॅथोलिक' पंथाच्या कित्येक विधींत जरूर ती सुधारणा घडवून आणली.

'इग्नेशियस लॉयोला' (Ignatius Loyola)—या नांवाच्या एका स्पॅनिश सरदारानें इ. स. १५३४ मध्यें कॅथोलिक पंथाचें 'प्रॉटेस्टंट' म्हणजे सुधारक पंथापासून रक्षण करण्यासाठीं 'जीजस'च्या नांवानें एक मंडळ स्थापन केलें, व त्याला पोपनें इ. स. १५४०मध्यें मान्यता दिली. 'जीजस'च्या नांवावरूनच या मंडळाला पुढें 'जेझुइट' हें नांव प्राप्त झालें. 'जीजस ख्राइस्ट'ची व त्यानें उपदेशिलेल्या तत्त्वांची मनःपूर्वक सेवा बजावणें, स्वेच्छेनें गरिबीचें व्रत पत्करून अध्ययन व अध्यापन यांतच आपला काल घालविणें, पोपची सत्ता सर्वश्रेष्ठ असें मानून आपल्या वरिष्ठांचे हुकूम बिनहरकत मानणें (implicit obedience

to the Pope), नीतिमत्ता व शिस्त कडकपणें पाळणें, वगैरे नियमांनीं या मंडळाचे सभासद बांधलेले असत (प्र.३९प.२८). त्यांनीं कॅथोलिक पंथाची अंतःसुधारणा करून ल्यूथरच्या सुधारणेला शह दिला आणि सुधारकांच्या उपदेशानें डळमळूं लागलेल्या मतांना स्थिर करून ख्रिस्ती धर्मांत एकप्रकारची पोट-सुधारणा (Counter Reformation) घडवून आणली. या पंथाचे लोक विद्वत्ता, कर्तव्यनिष्ठा, व धर्मश्रद्धा या बाबतींत कोणालाही हार जाणारे नसत. त्यांच्या प्रयत्नानें कॅथोलिक पंथाची अवनति थांबून तो पंथ पुनः ताजातवाना झाला आणि प्रॉटेस्टंट पंथाशीं दोन हात करण्याचें सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळें पुढें बराच काल टिकाव धरून राहिला.

जेझुइट लोकांनीं त्या वेळच्या शिक्षणपद्धतींतही बऱ्याच सुधारणा केल्या, आणि पुढें धर्मकारणाप्रमाणेंच राजकारणांतही भाग घेऊन विरुद्ध पक्षाच्या छळाला न जुमानतां अनेक ठिकाणीं व अनेक वेळां आपलें वर्चस्व मिरविलें. त्यांच्या कार्यक्षेत्रांतून एकही खातें सुटलें नव्हतें. वैद्यकी, 'मास्तरकी,' व्यापार, नोकरी, भिक्षुकी वगैरे सर्व धंद्यांत त्यांनीं आपला प्रवेश करून घेतला होता. त्यांची धर्मनिष्ठा किंवा पंथनिष्ठा इतकी जाज्वल्य असे कीं, त्यांना आपल्या पंथाबाहेरचे इतर सगळे पंथ पाखंडी व जगांत राहण्यालाही अपात्र असे वाटत (प्र. ३५ प.७१८). त्यामुळें स्वेतर पंथीयांचा अमानुष छळ करण्याला ते केव्हांही मागें पुढें पहात नसत. पाखंड्यांना येन केन प्रकारेण ख्रिस्ताच्या कळपांत ओढणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें वाटत असल्यामुळें त्यांनीं इतर धर्मीयांवर केलेल्या अत्याचारांची साक्ष हिंदुस्थानांतील गोमांतक वगैरे प्रांतांतील ख्रिस्तीधर्माचा इतिहास देतच आहे. **फ्रॅन्सिस झेवियर** (Francis Xavier) या नांवाच्या त्यांच्या एका साधूनें हिंदुस्तान, जपान वगैरे पूर्वेकडील देशांत फिरून एकट्यानेंच दहा लाख लोक ख्रिस्ताच्या कळपांत आणले होते असें म्हणतात.

अजिंक्य आरमार—कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावून त्यावर स्पेनची मालकी स्थापन केल्यावर स्पेनमधील अनेक साहसी लोक तिकडे संपत्ति व मुलूख मिळवून वसाहती करण्याला गेले. तिकडच्या रानटी लोकांचीं मेक्सिको (Mexico) आणि पेरू (Peru) हीं दोन बलाढ्य राज्यें त्यांनीं अनुक्रमें इ. स. १५२१ व इ स.१५३६ या वर्षीं काबीज केलीं, आणि हजारों स्पॅनिश वसाहतवाले तिकडे जाऊन त्यांनीं स्वतःचें व आपल्या देशाचें उखळ पांढरें केलें. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत स्पेनचें या पश्चिम गोलार्धांतील (Western Hemisphere) राज्य म्हणजे एक अवाढव्य साम्राज्यच (Magnificent Empire) बनलें होतें, आणि

तेथल्या सोन्यारुप्याच्या खाणींतले झरे स्पेनच्या युरोपांतल्या तिजोरीपर्यंत (Royal Exchequer) येऊन आणि त्या देशाचें आर्थिक बल वाढवून स्पेनच्या बादशहाला युरोपखंडांत अग्रेसरत्वाचा मान मिळवून देत होते. पण ही स्थिति अर्थातच फार काळ टिकली नाहीं. फ्रान्सपोर्च्युगालसारखीं शेजारचीं राष्ट्रें लवकरच स्पेनचा हेवा करूं लागलीं, आणि समुद्रसंचारांत प्रगतिपंथाला लागलेल्या हॉलंड-इंग्लडादि देशांतील नाविक लोक स्पेनचीं सोन्यारुप्यांनीं भरलेलीं जहाजें समुद्रावर आढळलीं कीं, त्यांना अडवून लुटणें हा आपला हक्कच आहे असें म्हणूं लागले. या वेळीं इंग्लंड, हॉलंड व फ्रान्स, या तिन्ही देशांतील 'संभावित आणि घरंदाज' असे खलाशी आणि नावाडी स्पेनचीं हीं गलबतें लुटण्याचा धंदा राजरोसपणें करीत असत. आणि स्पेनच्या अधिकाऱ्यांकडून या बाबतींत विचारणा झाली, म्हणजे त्या देशांतले मुत्सद्दी त्यांना उत्तर पाठवीत कीं, या चांचे लोकांकडून आपल्यास व आपल्या व्यापारासही त्रास होत असून त्यांना पकडून वाटेल ती शिक्षा करण्यांत आली, तरी त्याबद्दल आपली मुळींच हरकत नाहीं !

इंग्लंड आणि स्पेन यांमधील या वेळच्या वितुष्टाला आणखीही एक कारण होतें. स्पेनचा राजा फिलिप हा मोठा मानी व महत्त्वाकांक्षी होता. आणि इंग्लंडची राणी इलिझाबेथ हीहि घमेंडखोर आणि प्रत्येक बाबतींत आत्मवर्चस्व मिरविणारी होती. फिलिपनें एकदां इलिझाबेथला लग्नाची मागणी घातली. पण ती तिनें धुडकावून लावली. तेव्हां फिलिपला फार राग येऊन त्यानें इलिझाबेथला चांगली अद्दल घडविण्याचा निश्चय केला होता. शिवाय या वेळीं सगळ्या युरोपखंडांत ख्रिस्ती धर्मांतील रोमन कॅथोलिक आणि प्रॉटेस्टंट या दोन पंथांच्या अनुयायांमध्यें भयंकर झगडे चाललेले असून फिलिप रोमन कॅथोलिक लोकांचा बडा पुरस्कर्ता आणि इलिझाबेथ ही त्याच्या उलट प्रॉटेस्टंट ऊर्फ सुधारक पंथीयांना आश्रय देणारी असल्यामुळें याही कारणानें इंग्लंड व स्पेन या दोन राष्ट्रांचा परस्पर संबंध म्हणजे अहि–नकुलसंबंध होऊन राहिला होता.

उभय राष्ट्रांची मनःस्थिति अशा प्रकारची असतांना इंग्रजांच्या सर फ्रॅन्सिस ड्रेक या नाविक वीरानें इ. स. १५८६ मध्यें जेव्हां स्पेनच्या कॅडिझ बंदरांत अचानक शिरून तेथल्या स्पॅनिश गलबतांना आग लावून दिली, तेव्हां फिलिपनें आपल्या समुद्रा-वरील सत्तेचा असा उपमर्द करणाऱ्या या पाखंडी इंग्रजांना एकदां चांगलेंच शासन केलें पाहिजे असें मनाशीं ठरवून इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी केली. आणि त्या कामासाठीं एक प्रचंड आरमार तयार केलें. हेंच 'अजिंक्य आरमार' होय.

पण स्पॅनिश लोकांनीं आपल्या या आरमाराला अभिमानानें दिलेलें हें नांव परिणामीं 'सार्थ' न होतां 'व्यर्थ'च ठरलें. कारण कांहीं अंशीं इंग्रज नाविकांच्या धडाडीनें आणि पुष्कळ अंशीं पंचमहाभूतांच्या कोपानें 'सुरक्षितं दैवहतं विनश्यति' अशी त्याची स्थिति झाली, आणि स्पेनचा आरमाराधिपति मेदिना सिदोनिया याच्या अटलँटिक महासागरांतील वाटांच्या अनभ्यस्तपणामुळें अखेर या आरमारांतील एकशेंतीस गलबतांपैकीं दोन तृतीयांश गलबतें खडकांवर आपटून फुटलीं आणि उरलेलीं स्पेनच्या किनाऱ्याला परत आलीं तींही मोडक्या तोडक्या स्थितींतच (प्र. ३६ प. १०).

स्पेनच्या अजिंक्य आरमाराच्या या नाशानें स्पेनच्या वैभवाला उतरती कळा लागली आणि इंग्लंडच्या आरमाराची उत्तरोत्तर भरभराट होऊन त्याचें समुद्रावरील वर्चस्व वाढत गेलें.

रिनेसन्स (Renaissance)—मुसलमान लोकांनीं पूर्व युरोप खंड काबीज केल्यावर कॉन्स्टँटिनोपल येथें आपल्या धर्माची गादी स्थापन केली, तेव्हां तेथले जुने ग्रीक पंडित तिकडून निघून पश्चिम व दक्षिण युरोपांत आले. त्यांनीं युरोप खंडांतील ज्या ज्या देशांत आपलें बिऱ्हाड ठोकलें, त्या त्या देशांतील लोकांना आपल्या जवळचें प्राचीन विद्यांचे ज्ञानभांडार यथेच्छ लुटण्याला दिलें. त्या ज्ञानानें ठिकठिकाणीं जी जागृति झाली, त्या जागृतीनें प्राचीन विद्याकलादिकांचा उद्धार होऊन लोकांमध्यें नव चैतन्याचा जो उद्भव झाला त्याला इंग्रजींत ' रिनेसन्स ' म्हणजे ' जुन्या विद्यांचें पुनरुज्जीवन ' असें म्हणतात (प्र. २९ प. ६).

इंग्लंड आणि वेल्स--ट्यूडर कालांत या दोन प्रांतांचे संबंध एकंदरीनें सलोख्याचेच होते. ट्यूडर वंश हा मूळचा वेल्स प्रांतांतलाच असल्यामुळें ट्यूडर राजे हे वेल्स लोकांना आपलेच असें वाटे. इ. स. १५३६ मध्यें वेल्स प्रांताचे निरनिराळे परगणे करून त्याचे प्रतिनिधि इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें घेण्यांत आले व अशा रीतीनें इंग्लंड-वेल्सची राजकीय एकी (Political Union) दृढ करण्यांत आली.

इंग्लंड आणि स्कॉटलंड—ट्यूडर कालांत इंग्लंड आणि स्कॉटलंड यांचे परस्परसंबंध पहिल्यानें तरी विरोधाचेच होते. फ्रान्स हा इंग्लंडचा शत्रु आणि स्कॉटलंड हा फ्रान्सचा मित्र. अर्थात् ज्या ज्या वेळीं इंग्लंड-फ्रान्स यांच्यामध्यें वितुष्ट येऊन लढाई जुंपे, त्या त्या वेळीं स्कॉटलंड पूर्वीप्रमाणेंच फ्रान्सच्या सहानुभूतीनें इंग्लंडवर

हल्ले चढवी. पण या हल्ल्यांपासून एकंदरीनें शेवटीं स्कॉटलंडचें नुकसानच होई. आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींत एकदां फ्लॉडेन फील्ड येथें इंग्लंड-स्कॉटलंडची जी लढाई झाली, ती लढाई तर 'सोनपत-पानपता'प्रमाणें स्कॉट लोकांच्या सदैव स्मरणांत राहण्यासारखी झाली (प्र. २८ प. ६). या लढाईंत स्कॉटलंडचा राजा 'चौथा जेम्स' हा तर ठार झालाच, पण त्या वेळीं स्कॉटलंडमधील एकही सरदार घराणें असें नव्हतें कीं, त्यांतला कोणी ना कोणी पुरुष या लढाईंत पडला नव्हता. सुप्रसिद्ध कादंबरीकार स्कॉट यानें या लढाईचें वर्णन करतांना पुढील उद्गार काढले आहेत:—" Scarce a family of eminence but had an ancestor at Flodden; and there is no province of Scotland even at this day where the battle is mentioned without a sensation of terror and sorrow. " म्हणजे फ्लॉडेनच्या रणमैदानावर स्कॉटलंडांतील प्रसिद्ध घराण्यांतील एक ना एक पुरुष पडलेला आहेच, आणि आज मितीसही या लढाईचें स्मरण झालें कीं, भीति आणि दुःख यांनीं व्याप्त होत नाहीं असा स्कॉटलंडांतील एकही प्रांत सांपडणार नाहीं !

आठव्या हेन्रीच्या पश्चात् सहाव्या एडवर्डच्या कारकिर्दींतही इंग्लंड-स्कॉटलंडमधलें भांडण मिटलें नव्हतेंच. इलिझाबेथच्या कारकिर्दींत या भांडणाचें स्वरूप पालटलें. म्हणजे पूर्वीं या भांडणांत प्रत्येक देशाच्या राजा-प्रजांची एकी होती, ती आतां नाहींशी होऊन इंग्लंडची इलिझाबेथ राणी आणि स्कॉटलंडचे 'सुधारक' एका बाजूला, आणि स्कॉटलंडची मेरी राणी आणि इंग्लंडमधले कॅथोलिक जीर्णमतवादी दुसऱ्या बाजूला असा हा सामना कधीं उघड रीतीनें तर कधीं गुप्त रीतीनें बरेच दिवस चालला. शेवटीं मेरी राणीला इलिझाबेथचा प्राण घेण्याच्या कटांत सामील असल्याच्या आरोपावरून फांसावर जावें लागलें (प्र. ३५ प. १३). पण पुढें तिचाच मुलगा इलिझाबेथच्या पश्चात् इंग्लंडच्या गादीवर येऊन इ. स. १६०३ मध्यें इंग्लंड-स्कॉटलंडची एकी झाली ती अद्यापपर्यंत कायम आहे.

इंग्लंड आणि आयर्लंड—यांचे संबंध मात्र पूर्वींप्रमाणेंच या कालांतही विरोधाचेच राहिले. प्रथम सातव्या हेन्रीच्या कारकिर्दींत काय, किंवा शेवटीं इलिझाबेथच्या कारकिर्दींत काय, आयर्लंडमधील जनता इंग्लिश जनतेशीं आणि तत्स्वाधिपतीशीं विरोधी भावनेनेंच वागली. सातव्या हेन्रीच्या कारकिर्दींतील तोतयांना तिनें शक्य

ती मदत केली. उलट पॉयनिंग्जनें आयरिश पार्लमेंटच्या पायांत खोडा घालून तिला इंग्लंडला जखडून टाकण्याचे शक्य ते उपाय योजले (प्र. २७ प. ६).

सुधारणेमुळें झालेल्या पक्षभेदांतही ग्रेटब्रिटन सामान्यतः सुधारकपक्षी तर आयर्लंड बहुतांशीं कॅथोलिकपक्षी अशीच स्थिति होती. इलिझाबेथच्या कारकिर्दीत इंग्लंडमधले कित्येक वजनदार लोक आयर्लंडच्या उत्तरभागांत जाऊन वसाहती करूं लागले. पण त्यामुळें आयरिश लोकांना अधिकच चीड येऊन इ. स. १५९८ च्या सुमारास तर ओनील याच्या नेतृत्वाखालीं तिकडे एक मोठेंच बंड झालें (प्र. ३७ प. २). पण तें फार काल टिकलें नाहीं.

खुषीची सक्ति (Benevolence)—राजाला पैशाची जरुरी लागली आणि पार्लमेंटसभा पैशाची मागणी कबूल करण्याला नाखुष दिसली, म्हणजे पार्लमेंटसभेला न विचारतां राज्यांतल्या पैसेवाल्या लोकांना बोलावून आणून त्यांच्याकडून सक्तीनें देणग्या वसूल करण्याच्या पद्धतीला हें नांव आहे. आम्ही हा शब्द ज्या इंग्रजी शब्दाचा पर्यायवाचक म्हणून वापरला आहे, त्या इंग्रजी 'बेनिव्होलन्स' शब्दाची व्याख्याही अशीच आहे. " Benevolences were nothing more nor less than gifts extorted from the well-to-do by moral pressure. They were collected in much the same way that subscriptions for local or benevolent purposes are often raised. " याचें तात्पर्य असें कीं, ' बेनेव्होलन्स ' म्हणजे सुखवस्तु लोकांकडून नैतिक दाबाच्या जोरावर उकळलेली देणगी होय. आणि ती गोळा करण्याची रीतही आजच्या एकाद्या स्थानिक अगर परोपकाराच्या कार्यासाठीं वर्गण्या जमविण्याच्या रीतीसारखीच असे, इंग्लंडमध्यें ट्यूडर कालाच्या पूर्वीच ही पद्धति रूढ झाली होती. सातव्या हेन्रीच्या कारकिर्दीतील 'मॉर्टनचा कांटा' प्रसिद्धच आहे (प्र. २७ प. १६). आठव्या हेन्रीनेंही या चालीचा पुष्कळदां उपयोग केला आणि इलिझाबेथची कारकीर्दही या बाबतींत अगदींच सोंवळी होती असें नाहीं.

टनेज आणि पौंडेज—'सातवा हेन्री' गादीवर आल्यावर लवकरच पार्लमेंटनें त्याला इंग्लंडमधल्या आयात मालावरील जकातीचें उत्पन्न बहाल केलें. त्यांत दारूवर दर टनी २ शिलिंग व इतर जिनसांवर एक पौंड वजनाला अर्धा शिलिंग असे कर मुख्य होते. त्यांना अनुक्रमें टनेज आणि पौंडेज अशीं नांवें होतीं.

लिव्हरी आणि मेंटेनन्स—पूर्वी सरदार लोक आपल्या तैनातीस जी फौज ठेवीत किंवा प्रसंग विशेषीं जी फौज जमा करीत, तिला आपल्या घराण्याचा विशिष्ट असा एक पोषाख देत असत. त्याला लिव्हरी असें म्हणत. त्याचप्रमाणें सरदारांनीं आपल्या तैनातीस असलेल्या शिपायांच्या (Liveried Retainers) किंवा आपल्या कुळांच्या कज्जाभांडणांत त्यांना मदत करण्याची जी पद्धति तिला मेंटेनन्स असें म्हणत. या पद्धतीनें शिपायांच्या आणि कुळांच्या पाठीशीं असलेल्या सामर्थ्याचा खुंट जितका बळकट, तितकीं त्यांचीं भांडणें मोठें स्वरूप धारण करीत; आणि पुष्कळ वेळां त्यांचें पर्यवसान दंग्याधोप्यांत आणि बंडांत होई. सातव्या हेन्रीनें या पद्धतीला कायद्यानेंच आळा घातला (प्र. २७ प. १५).

संस्मरणीय सन.

इ. स.

१४८६ लँबर्ट सिम्नेलचें बंड; ' स्टार चेंबर कोर्टा ' ची स्थापना.

१४९२ एस्टापल्सचा तह.

१४९२ अमेरिका खंडाचा व बहामा बेटांचा शोध.

१४९५ पराकिन वॉरबेकचें बंड.

१४९८ वास्को–द–गामाची हिंदुस्थानला भेट.

१४९९ बाल ' एडवर्ड ' चा शिरच्छेद.

१५०९ ' सातव्या हेन्री 'चा मृत्यु व ' आठव्या हेन्री 'चें राज्यारोहण.

१५१३ ' गिनीगेट 'ची लढाई (Battle of the Spurs)

१५१७ मार्टिन ल्यूथरचा उदय.

१५२० आठव्या हेन्रीची फ्रान्सला भेट (Field of the cloth of gold)

१५२१ आठव्या हेन्रीची ' धर्मरक्षक ' पदवी.

१५२९ प्रॉटेस्टंट पंथाची प्राणप्रतिष्ठा.

१५३० वुल्सेचा मृत्यु.

१५३४ आठव्या हेन्रीचें धार्मिक बाबींतील सर्वाधिकारित्व (Act of Supremacy)

१५३६ इंग्लंड—वेल्सचा पार्लमेंटांत संयोग.

१५३९ रक्तस्मृति (सहा कलमी कायदा)

१५४० जेझुइट पंथाची स्थापना.

१५४७ आठव्या हेन्रीचा मृत्यु व सहाव्या एडवर्डचें राज्यारोहण.

१५४९ इंग्लिश प्रार्थनापुस्तकाची रचना.

१५५१ ‘ चर्च ऑफ् इंग्लंड ’ ची स्थापना.

१५५३ ‘ सहाव्या एडवर्ड ’चा मृत्यु व ‘ मेरी ’चें राज्यारोहण.

१५५४ मेरीचें स्पेनच्या फिलिपशीं लग्न.

१५५५ पाखंडसत्राला सुरवात.

१५५८ मेरीचा मृत्यु व इलिझाबेथचा राज्याभिषेक.

१५६६ प्यूरिटन पंथाची स्थापना.

१५७० पोपचा इलिझाबेथवर बहिष्कार.

१५७२ ‘ बार्थोलोम्यू ’ दिनाची कत्तल.

१५८६ बेबिंगटनचा कट.

१५८७ स्कॉटलंडच्या मेरी राणीचा शिरच्छेद.

१५८८ स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा पराभव.

१५९७ ह्यू ओनीलचें बंड.

१६०० ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.

१६०१ इसेक्सचा शिरच्छेद.

१६०२ डच ईस्ट इंडिया कंपन्यांचें एकीकरण.

१६०३ इलिझाबेथचा मृत्यु व ‘ जेम्स स्टुअर्ट ’चें राज्यारोहण.

इंग्लंडांतील राजवंशमालिका.

इ. स. १४८५ मध्यें गुलाबी युद्धांबरोबरच इंग्लंडच्या अँजेव्हिन राजघराण्याचाही शेवट होऊन तिसऱ्या एडवर्डशीं दूरचा संबंध पोंचत असलेल्या हेन्री टयूडरची ' सातवा हेन्री ' म्हणून इंग्लंडच्या सिंहासनावर स्थापना करण्यांत आली. या टयूडर घराण्यांतील पुढच्या तक्ताधिपतींची नांवें येणेंप्रमाणें:—

(७) टयूडर राजवंश.

हेन्री (सातवा)
(इ. स. १४८५).
|
हेन्री (आठवा)
(इ. स. १५०९).
|

एडवर्ड (सहावा)	**मेरी**	**इलिझाबेथ**
(इ. स. १५४७).	(इ. स. १५५३)	(इ. स. १५५८).

' आठव्या हेन्री ' च्या मुलांपैकीं एडवर्ड वयाच्या १६ व्या वर्षींच वारला. मेरीचें स्पेनच्या राजाशीं लग्न झालें, तरी तिला मूलबाळ कांहीं झालें नाहीं. आणि इलिझाबेथ ही मरेपर्यंत अविवाहितच राहिली. मृत्युसमयीं पुढें इंग्लंडची गादी कोणाला द्यावी या संबंधांत तिचें मत विचारण्यांत आलें, तेव्हां तिनें ' No rascal but a King ' असे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध आहे. या उद्गारांचा अर्थ असा कीं, माझ्यामागून इंग्लंडची गादी एकाद्या पाजी लफंग्या माणसाला न देतां ती अस्सल राजवंशांतल्या माणसाला द्यावी, टयूडर घराण्याशीं संबंध पोंचत असलेला असा जवळचा राजपुत्र म्हणजे स्कॉटलंडचा राजा जेम्स स्टुअर्ट हाच होता; व तोच तिच्या मागून इ० स० १६०३ मध्यें ' पहिला जेम्स ' म्हणून इंग्लंडच्या गादीवर आला.

प्रश्न.

(१) ट्यूडर राजवंशाचा आरंभ हा अर्वाचीन इतिहासाचा उदयकाल (dawn) आणि मध्ययुगाचा शेवट (close) होय असें म्हणतात तें कां ?

(२) सातव्या हेन्रीचे इंग्लंडच्या गादीवर कोणते हक्क (claims) होते ? त्या हक्कांच्या कमजास्त महत्त्वाचें (value) विवरण करा.

(३) सातव्या हेन्रीच्या कारकिर्दीच्या पहिल्या भागांत बंडें झालीं तीं कोणतीं ?

(४) सातवा हेन्री अनियंत्रित राजा झाला तो कसा ? त्यानें सरदारांची सत्ता कशी कमी केली ? त्यानें पैसा जमा करण्याचीं कोणतीं साधनें उपयोगांत आणलीं ?

(५) ट्यूडर राजांच्या कारकिर्दींत प्रजेच्या हक्कांचें व स्वातंत्र्याचें भांडण मागें पडलें तें कां ? त्याचा परिणाम काय झाला ?

(६) 'स्टार चेंबर कोर्ट', 'मॉर्टनचा कांटा', 'लिव्हरी आणि मेन्टेनन्स', 'पॉयनिंग्जचा कायदा' आणि 'पिन-मनी' यांच्यावर संक्षिप्त टीपा (short notes) द्या.

(७) ट्यूडर राजांनीं, विशेषतः आठव्या हेन्रीनें इंग्लंडचें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्व (national and international greatness) वाढविण्याचे कोणते उपाय योजले ?

(८) आठव्या हेन्रीच्या कारकिर्दींतील घटस्फोट प्रकरणाचें (Divorce Question) वर्णन करा.

(९) 'सत्तेचा समतोलपणा' म्हणजे काय ? आठव्या हेन्रीनें हा समतोलपणा (Balance of Power) सांभाळण्यासाठीं परराष्ट्रांशीं कोणतें धोरण ठेवलें ?

(१०) आठव्या हेन्रीनें धार्मिक बाबतींत संपादिलेल्या सत्तेचा (Spiritual Authority) राजसत्ता दृढावण्याकडे (Aggrandizement of the Crown) उपयोग केला तो कसा ?

(११) आठव्या हेन्रीच्या स्वभावाचें (Character) थोडक्यांत वर्णन (sketch) करा. त्यानें आपल्या मागें मुलाच्या अज्ञानावस्थेंत राज्यव्यवस्थेची कोणती योजना करून ठेवली होती ?

(१२) ' पिलग्रिमेज ऑफ ग्रेस ', ' डिसोल्यूशन ऑफ मोनॅस्टरीज ', ' स्टॅट्यूट ऑफ दि सिक्स आर्टिकल्स ', ' रिनॅसन्स ', ' डिफेंडर ऑफ धि फेथ ', ' रिफॉर्मेशन ' ' बेनिव्होलन्स ', ' इंडल्जन्स ', ' कॉमन प्रेअरबुक ', यांच्यावर संक्षिप्त टीपा द्या.

(१३) आठव्या हेन्रीनें स्कॉटलंड व आयर्लंड यांशीं कोणतें धोरण ठेवलें होतें ? ट्यूडर कालांतील आयर्लंडच्या सर्वसामान्य स्थितीचें वर्णन करा.

(१४) वुल्से, ल्यूथर, समरसेट, सेमूर, नार्दंबर्लंड, क्रॅनमर, थॉमस क्रॉमवेल, व कोलंबस यांचीं थोडक्यांत चरित्रें लिहा.

(१५) मेरी व इलिझाबेथ यांचें धार्मिक धोरण (Religious policy) व परराष्ट्रीय धोरण (Foreign policy) यांचें थोडक्यांत वर्णन करा.

(१६) इलिझाबेथनें पार्लमेंटशीं कोणत्या प्रकारचें धोरण ठेवलें होतें ?

(१७) मेरी स्टुअर्ट, लेडी जेन ग्रे, कॅथराइन (आठव्या हेन्रीची बायको) व इलिझाबेथ यांच्या स्वभावांतील वैशिष्ट्य सांगा.

(१८) पंधराव्या व सोळाव्या शतकांतील स्पॅनिश व पोर्च्युगीझ लोकांच्या सामुद्रिक (Naval) व वासाहतिक (Colonial) उद्योगांचें (activities) वर्णन करा.

(१९) स्पेनच्या अजिंक्य आरमाराचें थोडक्यांत वर्णन करून त्याच्या पराभवाच्या कारणांची मीमांसा (discuss) करा. या पराभवाचा इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांवर काय परिणाम झाला ?

(२०) इलिझाबेथच्या कारकिर्दींत इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय महत्त्व (International greatness) कसें वाढलें तें सांगा.

(२१) सोळाव्या शतकांतील फ्रान्स व स्पेन यांच्यामधील भांडणाचें कारण काय ? त्या भांडणांचा त्या त्या देशांतील व इतर राष्ट्रांतील जनतेवर काय परिणाम झाला ?

(२२) नवीन जगाचा शोध, व मठांचा विध्वंस यांच्यामुळें इंग्लंडवर राजकीय, आर्थिक, व सामाजिक कोणते परिणाम झाले ?

(२३) मेरी व इलिझाबेथ यांच्या कारकिर्दींतील धर्ममतांसाठीं प्राणार्पण करणाऱ्या प्रसिद्ध पुरुषांचीं नांवें सांगून त्यांच्या वर्तनाचा सामान्य जनतेवर काय परिणाम झाला तें सांगा.

(२४) ट्यूडर राजे अनियंत्रित असूनही लोकप्रिय झाले ते कसे ?

(२५) ट्यूडर कालांत धर्मसत्तेवर राजाचें वर्चस्व कसकसें प्रस्थापित होत गेलें ?

(२६) इंग्लंडचा व्यापार, त्याचें युरोपखंडांतील महत्त्व, आणि स्वदेशांतील शांतता या बाबतींत ट्यूडर कालाचा आरंभ आणि शेवट यांची तुलना करा.

(२७) 'इंग्लंडमधील धर्मसुधारणा ही मूळांत राजकीय हेतूसाठीं आणि राजकीय स्वरूपाची झाली' असें म्हणतात तें खरें काय व तें कसें ?

(२८) मॅगेलन व ड्रेक यांच्या पृथ्वी–पर्यटनांचें वर्णन करा.

(२९) आठव्या हेन्रीची आपल्या 'पत्न्यां' शीं वर्तणूक कोणत्या प्रकारची होती ?

(३०) आठव्या हेन्रीचे 'पोप', 'स्पेनचा राजा चार्लस' आणि 'फ्रान्सचा राजा फ्रान्सिस' यांच्याशीं असलेले संबंध वेळोवेळीं बदलत गेले ते कसे व कां ?

(३१) मेरीचें राज्यारोहण आणि अंत या दोन्ही प्रसंगाच्या वेळीं लोकांची मनःस्थिति कोणत्या प्रकारची होती ?

(३२) इलिझाबेथच्या अंगचे कोणते गुण राष्ट्रहितपोषक होते ? तिच्या अंगीं कोणते अवगुण होते ? त्या अवगुणांमुळें राष्ट्राची कांहीं हानि झाली काय ? नसल्यास कां नाहीं ?

(३३) पोपनें आठवा हेन्री व इलिझाबेथ यांच्यावर वेळोवेळीं बहिष्कार घातला तो कां ? त्यांचा इंग्लिश लोकांवर काय परिणाम झाला ?

(३४) स्कॉटलंडच्या मेरी राणीच्या अंगच्या गुणावगुणांचें वर्णन करा. तिला 'अस्तनींतली नागीण' म्हटलें आहे तें कां ?

(३५) ख्रिस्ती धर्मांतील निरनिराळ्या पंथांची थोडक्यांत माहिती द्या. अँग्लिकन धर्मसंस्थेचें वैशिष्ट्य काय आहे !

(३६) ट्यूडर कालांतील 'करमणुकीचीं साधनें', 'भोळ्या समजुती', 'लोकांची राहणी' आणि 'गुलामांचा व्यापार' यांच्यावर थोडक्यांत टीपा द्या.

(३७) ट्यूडर कालीन 'सुधारणे'चा तत्कालीन व तत्पश्चात् राजकीय, सामाजिक व बौद्धिक परिस्थितीवर काय परिणाम झाला ?

जगांतील समकालीन घडामोडी.

इ. स. चें सोळावें शतक.

(पूर्वार्ध)

ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड.

या कालांत ट्यूडर राजवंशांतील सातवा व आठवा हेन्री, आणि आठव्या हेन्रींचा मुलगा सहावा एडवर्ड हे राजे इंग्लंडच्या गादीवर होते. त्यांनीं इंग्लंडांत अंतस्थ शांतता राखून परराष्ट्रांत इंग्लंडचा नांवलौकिक वाढविला. स्कॉटलंड व आयर्लंड या नजीकच्या देशांवर दाब ठेवून त्यांना इंग्लंडच्या सत्ताक्षेत्रांत आणण्याचा प्रयत्न केला, इंग्लंडची तिजोरी बहुधा नेहमीं भरलेली राखली, इंग्लंडमधून धार्मिक बाबतींतलें पोपचें वर्चस्व नाहींसें केलें, आणि इंग्लंडच्या तक्ताधिपतीला राजसत्ता आणि धर्मसत्ता यां दोन्ही सत्तांच्या बाबतींत सर्वाधिकारी करून सोडलें. युरोपखंडांतील जर्मनी देशांत सुरू झालेली सुधारणेची चळवळ यथाकाल ग्रेटब्रिटनमध्येंही येऊन थडकली. पण तिचें इंग्लंड-स्कॉटलंडमधलें स्वरूप युरोपांतल्या तिच्या स्वरूपाहून निराळें झालें. या कालांत इंग्लंडमधला जुना सरदारवर्ग अगदींच नष्ट झाल्यासारखा झाला आणि मध्यम वर्गाचें प्राबल्य वाढून वुल्से, क्रॅनमर, थॉमस क्रॉमवेल वगैरे पुरुष राजदरबारांत मान्यता व प्रतिष्ठा पावले आणि शेवटीं राजाच्या अवकृपेला बळी पडून अपमानाचे व अप्रतिष्ठेचेही धनी झाले.

युरोपखंड.

या कालाच्या पूर्वभागांत जर्मनी देशांत ल्थर या नांवाचा धर्मसुधारक उत्पन्न होऊन त्यानें पोपच्या धार्मिक वर्चस्वाला यशस्वी विरोध केला आणि सगळें युरोपखंड हालवून सोडलें. प्रॉटेस्टंट या नवीन धर्मपंथाची स्थापना व त्या पंथाचा बीमोड करण्याचे फ्रान्स व स्पेन या देशांच्या राजांचे प्रयत्न, मॅगेलनची पृथ्वी-प्रदक्षिणा, वगैरे गोष्टी या कालांत घडून आल्या. इ० स० १५३२ मध्यें ब्रिटनी हें युरोपखंडांतील एक स्वतंत्र संस्थान फ्रान्सच्या राज्याला जोडलें गेलें.

कॅलव्हिन—(Calvin) हा या कालचा ल्थरच्या खालोखालचा मातबर सुधारक होय. हा जातीचा फ्रेंच असून ल्थरची व याचीं मतें जरी बऱ्याच

बाबतींत भिन्न होतीं तरी पोपची अवज्ञा करण्यांत हे दोघेही सारखेच निग्रही असल्या-मुळें त्याला लवकरच फ्रान्समधून पळ काढून जिनीवा (Geneva) येथें जाऊन रहावें लागलें. पण पुढें तो तेथला 'प्रॉटेस्टंट पोप'च (Protestant Pope) बनला.

हिंदुस्तान व आशिया खंड.

हिंदुस्तानांतील **मोंगल** साम्राज्याचा संस्थापक **बाबर** आणि **विजयनगरच्या** हिंदु राज्यांतील **कृष्णदेवराय** हे प्रसिद्ध पुरुष या कालांत होऊन गेले. अर्वाचीन कालांतील **पानिपतची** पहिली लढाई (इ० स० १५२६) बाबर आणि इब्राहिमखान लोदी यांच्यामध्यें झाली. वास्को-द-गामानें इ. स. १५०२ मध्यें कोचीन येथें पहिली युरोपियन वसाहत (Settlement) स्थापन केली, आणि पोर्च्युगीझ सरदार आल्बु-कर्क यानें विजापुरकरांकडून गोवें काबीज करून (इ. स. १५१०) हिंदुस्तानांत पोर्च्युगीझ साम्राज्याचा पाया घातला. वसई, ठाणें, वगैरे प्रांत पोर्च्युगीझांच्या ताब्यांत जाऊन तेथें ख्रिस्ती धर्माचा प्रसार होणें (इ. स. १५२९), इराणांत शहा इस्मायल यानें तुर्क घराण्याची स्थापना करणें, वगैरे गोष्टी या कालांतच घडून आल्या.

आफ्रिका-अमेरिका

युरोपियन लोकांना अमेरिकेचा शोध नुकताच लागला होता आणि त्या बाजूला वसाहती करण्याला मुबलक जमीन, आणि कष्ट करून घेण्याला अडाणी पण काटक लोक आहेत, याची माहिती हळूहळू सगळ्या युरोपखंडांत पसरत होती. स्पेन व पोर्च्युगालमधील पुष्कळ धाडसी नाविक तिकडे जाऊन अधिकाधिक भूप्रदेश आपल्या नजरेच्या म्हणजेच सत्तेच्या टापूंत आणीत होते. सुलतान सेलिम यानें आफ्रिकेच्या उत्तर भागांतील इजिप्त देश काबीज केला तोहि याच कालांत.

(उत्तरार्ध)

ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड.

मेरी व इलिझाबेथ या राण्यांची या कालांतील कारकीर्द 'सुधारणा,' ज्ञानप्रसार, धार्मिक छळ, आणि राजकीय वर्चस्व, यांविषयीं प्रसिद्ध आहे. युरोपमधील इंग्लंडच्या नाविक वर्चस्वाचा पाया याच काळांत घातला गेला. आणि समुद्रावरील स्वैर संचार आणि व्यापार या दोन गोष्टींनींच इंग्लंडची सांपत्तिक भरभराट घडून

येणार ही गोष्ट लोकांना पटल्यामुळें नाविक साहसांत अधिकाधिक इंग्रज लोक पुढें येऊं लागले. स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा पराभव ही या कालच्या इंग्लंडच्या इतिहासांतील संस्मरणीय गोष्ट होय. स्काटलंडच्या मेरी राणीनें आपल्या नवऱ्याचा खून करणें, आणि पुढें इंग्लंडमध्यें येऊन राहिल्यावर तेथल्या इलिझाबेथ राणीच्या खुनाच्या कटांत सामील होऊन स्वतः फांशीं जाणें, इंग्लंडच्या मेरी राणीनें केलेला सुधारकांचा छळ, आणि इलिझाबेथनें केलेला त्यांचा पाठपुरावा, इंग्रजांचें आयर्लंडमध्यें 'वसाहत–स्थापन,' आणि शेक्सपीयर, सिडने, स्पेन्सर, हूकर, बेकन, वगैरे ग्रंथकारांचा उदय, या गोष्टींनीं सोळाव्या शतकाचें उत्तरार्ध इंग्लंडच्या इतिहासांत स्मरणीय होऊन राहिलें आहे.

युरोपखंड.

युरोपखंडांत या वेळीं स्पेन आणि फ्रान्स या देशच्या राजांमध्यें आत्मवर्चस्वासाठीं भयंकर कलह चालले होते. तसेंच युरोपखंडांतून सुधारणेचा नायनाट करण्यासाठीं या दोन्ही देशच्या राजांनीं कंबरा बांधल्या होत्या. स्पेन आणि नेदर्लंड यांच्यामध्यें कित्येक वर्षें चाललेलें युद्ध, आणि या युद्धांत दोन्ही पक्षांकडच्या लोकांकडून माणसांच्या प्राणांची किंमत कस्पटासमान मानण्याची वृत्ति, या योगानें उभय पक्षीं अत्याचारांना अगदीं ऊत आला होता. एकदां हार्लेम (Harlem)च्या वेढ्याच्या वेळीं किल्ल्यांतील डच लोकांना मदत करण्यासाठीं निघालेला कॅप्टन कॉनिंग नांवाचा सरदार स्पॅनिश सैनिकांच्या हातीं लागला, तेव्हां त्यांनीं त्याचें डोकें कापून तें किल्ल्यांतील लोकांकडे पाठवून दिलें, आणि सोबत चिठी पाठविली कीं हार्लेमच्या संरक्षणासाठीं निघालेल्या कॉनिंगचें हें डोकें पुढें आलें आहे आणि मागाहून त्याचे लोक येत आहेत. त्यावर किल्ल्यांतल्या लोकांनींही त्यांच्या ताब्यांत असलेल्या ११ स्पॅनिश लोकांची डोकीं कापून तीं एका पिंपांत भरून बाहेर वेढा घालून बसलेल्या स्पेनच्या सरदाराकडे पाठविलीं आणि त्याला निरोप पाठविला कीं सरदार आल्वाला आमच्याकडून 'टेन पेनी टॅक्स वसूल करावयाचा आहे, त्याचा हा एक हप्ता पाठवून दिला आहे. यांतलीं दहा डोकीं ऐन म्हणून आणि अकरावें व्याजादाखल जमा करून घ्यावें!' या वेढ्यांत एका आणीबाणीच्या प्रसंगीं (इ. स. १५७२) तीनशें बायकांनीं पुढें होऊन किल्ल्याचें रक्षण केलें होतें. शेवटीं ऑरेंजच्या संस्थानिकानें (William, Prince of Orange) स्पेनच्या हल्ल्याला न जुमानतां, आणि एकदां तर स्वतःच

हॉलंडचे समुद्रापासून संरक्षण करणारे बांध (Dykes) फोडून टाकून व सर्व प्रदेश जलमय करून सोडून डच लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व गमावण्याच्या निर्धाराचा स्पॅनिश लोकांना प्रत्यय आणून दिला. आणि शेवटीं त्यांना माघारें हटावयास लावून डच रिपब्लिकची स्थापना केली (इ. स. १५७६). पुढें या ऑरेंजच्या वुइल्यमचा विश्वासघातानें खून करण्यांत आला (इ. स. १५८४). जेजुइट लोकांनीं फ्रान्समधल्या दहा हजार ख्रिस्ती सुधारकांची एका दिवसांत कत्तल करणें (इ. स. १५७२) ही तत्पंथीयांच्या फाजील पंथनिष्ठेची गोष्टही त्या लोकांना माणसांच्या प्राणांची कशी पर्वा वाटत नसे याचीच निदर्शक आहे.

इ. स. १५८२ मध्यें पोप ग्रेगरी यानें पाश्चात्य पंचांगाची (calendar) सुधारणा केली, त्या वेळीं त्यानें ११ दिवस अजिबात कमी करून मागची चूक काढून टाकली आणि यापुढें दर तीन वर्षांनीं एक वर्ष ३६५ दिवसांऐवजीं ३६६ दिवसांचें धरावें असें ठरविलें. ही नवी पद्धति (New style) त्या वेळीं सर्वांनाच पटली असें नाहीं. पण पुढें रशियाखेरीज इतर सर्व देशांतून ती मान्य झाली. इ. स. १५९८ मध्यें फ्रान्सचा राजा चौथा हेन्री यानें आपल्या प्रॉटेस्टंट प्रजेला धर्मस्वातंत्र्य (toleration) दिलें. या वेळीं रशिया देशांतील 'रूरिक' (Ruric) राजवंशाचा शेवट होऊन जिकडे तिकडे जी बंडाळी माजली होती, ती पुढें इ. स. १६१३ पर्यंत कायम होती.

हिंदुस्तान आणि आशिया खंड.

मोंगल बादशहा अकबर हा या कालांतील हिंदुस्तानांतील पराक्रमी व वैभवशाली बादशहा होय. त्यानें हिंदुस्तानांतील मोंगल सत्ता दृढ केली, आणि हिंदु आणि मुसलमान यांना समानतेनें वागवून उभयतांना मान्य होण्यासारख्या एका नव्या धर्माची स्थापना करण्याचाही प्रयत्न केला. अकबर हा इंग्लंडांतील इलिझाबेथ राणीचा समकालीन असून (इ. स. १५५६–इ. स. १६०५) पानिपतच्या दुसऱ्या लढाईत (इ. स. १५५६) त्यानें शीरशहाचा पराभव केला, गुजराथ–बंगाल सिंध–कंदाहार हे उत्तर हिंदुस्तानांतले सगळे प्रांत एका छत्राखालीं आणले, आणि आपल्या कारकिर्दीच्या अखेरीस मोंगल साम्राज्याचा पसारा किती तरी वाढवून ठेवला. बिरबल, राजा तोडरमल, आणि मानसिंग हे या कालांतील प्रसिद्ध हिंदु मुत्सद्दी होत. दक्षिण हिंदुस्तानांत याच वेळीं शिवाजीच्या भोंसले घराण्यांत मालोजी–शहाजी, हे पुरुष अहमदनगर व विजापूरच्या बादशाहींत पुढें येऊन मराठ्यांच्या अंगच्या शौर्य-

धैर्य–स्वामिनिष्ठादि गुणांचा मुसलमानांना प्रत्यय आणून देत होते. इ. स. १५६५ मध्यें तालिकोट येथें बहामनी राज्याच्या एकत्र झालेल्या सैन्यानें विजयनगरच्या हिंदु राजाचा पुरा मोड करून तें साम्राज्य धुळीला मिळविलें; तथापि या दोन्ही साम्राज्यांच्या अंतर्भूत असलेले ठिकठिकाणचे पाळेगार सोळाव्या शतकाच्या अखेरीला ठिकठिकाणीं धुंडाई गाजवून, आणि स्वतंत्रतेचे सक्रिय पाठ घेऊन, भावी मराठी साम्राज्याच्या पायाला उपयोगी पडणारे दगड ठिकठिकाणीं रचून ठेवीतच होते.

आफ्रिका - अमेरिका.

या खंडांतील अज्ञात प्रदेशाचा युरोपियन लोकांना अधिकाधिक शोध लागून तेथली कित्येक वर्षें ‘ पड ’ पडलेली भूमि लागवडीस आणण्याचे उद्योग या कालांत नवीन वसाहतवाल्यांकडून जोरानें सुरू झाले. आफ्रिकाखंडाच्या उत्तर भागांत असलेल्या मुसलमानांच्या सत्तेला या कालांत ओहोटी लागलेली दिसते, आणि अमेरिका ही नवी ‘ सुवर्णभूमि ’ बनण्याच्या मार्गांत एकेक पाऊल पुढें टाकूं लागते.

स्टुअर्टकालीन इंग्लंड



इंग्रजांचें स्वराज्य
अथवा
इंग्लंडचा संपूर्ण इतिहास

भाग ४ था.

प्रकरण ४१ वें

दोन कट.

(इ. स. १६०३–इ. स. १६०५)

[१ तीन पक्ष—पोपवादी–वीरसुधारक–स्वदेशधर्मवादी. २ जेम्सचें धोरण. ३ कटाला सुरवात—सर वॉल्टर रॅले. ४ इलिझाबेथच्या कारकिर्दीतील वीरसुधारक. ५ पाद्र्यांचा अर्ज. ६ हॅम्टनकोर्ट येथील सभा–बायबलचें भाषांतर. ७ पोपवाद्यांची निराशा. ८ कॅटेस्बी–गाय फॉक्स. ९ पार्लमेंट गृहाखालचें भुयार. १० डिग्बी–कटाची तयारी. ११ कट कसा फुटला?–मॉंटीगलचें पत्र. १२ कट फुटल्यानंतर. १३ पोपवाद्यांचा छळ.]

१ तीन पक्ष—मागें ३८ व्या प्रकरणाच्या शेवटीं **स्कॉटलंडचा** राजा **जेम्स स्टुअर्ट** (James Stuart) हा इंग्लंडच्या गादीवर येऊन ‘ **स्कॉच** ’ (Scotch) व इंग्रज लोक यांची एकी होण्याला कशी मदत झाली हें सांगितलें. त्याचप्रमाणें या सुमारास धार्मिक बाबतींतील मतभेदांवरून या दोन्ही प्रांतांतील लोकांमध्यें पोपवादी, पोपनिषेधक, प्यूरिटन, प्रेस्बिटेरियन वगैरे पक्ष कसे उत्पन्न झाले होते, हेंही ३९ व्या प्रकरणांत सांगितलें. यांपैकीं पोपवादी पक्ष हा नुसत्या धार्मिक बाबतींच नव्हे, तर

राजकीय बाबतींतही पोपची सत्ता अमर्याद (absolute) व सर्वश्रेष्ठ (all powerful) असली पाहिजे अशा मताचा होता, व नवा राजा जेम्स याची आई मेरी ही पूर्वी या पक्षाची पुरस्कर्ती असल्यामुळें तिचा मुलगाही आपल्या पक्षाच्या तंत्रानें चालेल असें त्यांना वाटत असे. उलट पक्षीं पोपवाद्यांचे कट्टे द्वेष्टे जे **वीर सुधारक** (Puritans) त्यांना जुन्या धर्माच्या आचार–विचारांत सर्वत्र क्रांति झाली पाहिजे असें वाटत असून आपल्या नव्या राजाचें शिक्षण स्कॉटलंडमधील सुधारकांच्या (Presbyterians) तालमींत झालेलें असल्यामुळें तो आपल्या पक्षांतील मंडळीशीं विशेष सहानुभूतीनें वागेल अशी त्यांची अपेक्षा होती. ज्यांना पोपवादी पुराणमताभिमानी (Roman Catholics), अगर सगळ्या जुन्या आचार-विचारांचा एकदम त्याग केला पाहिजे असें म्हणणारे कट्टे सुधारक (Puritans) या दोघांचीही मतें मान्य नव्हतीं, असा जो आंग्लवादी पक्ष त्याला इंग्लंडच्या धर्म-संस्थेवर (The church) पोपची सत्ता असू नये, सुधारकांचीं (Pro-testants) कांहीं मतें मान्य करावीं, पण धार्मिक बाबतींतील विधिनिषेध सर्व गुंडाळून ठेवून सर्वांना सरास आचार व विचार–स्वातंत्र्य देणें योग्य नव्हे असें वाटत असे. **खास इंग्रजांची** (The English Church) अशी स्वतंत्र धर्मसंस्था असली पाहिजे, व या धर्मसंस्थेनें घालून दिलेले नियम व धर्मविधि सर्वांनीं पाळलेच पाहिजेत, ते पाळणें न पाळणें कोणाच्या मर्जीवर ठेवून उपयोगाचें नाहीं असें म्हणणारा हा पक्ष होता. व मागें **सहाव्या एडवर्ड**च्या कारकिर्दीत स्थापन झालेला **द्विचत्वारिंशत् सूत्री खिस्ती** धर्म हाच खरा व्यावहारिक धर्म (The Established Church) आहे, त्या धर्माविरुद्ध वागेल तो पाखंडी असें यांचें मत होतें. **इलिझाबेथ**च्या कारकिर्दीत याच पक्षाचें प्राबल्य होतें. व त्याला आम्हीं या पुस्तकांत **स्वदेशधर्मवादी** (Episcopalians) असें नांव दिलेलें वाचकांच्या स्मरणांत असेलच.

२ जेम्सचें धोरण—जेम्स राजानें पाहिलें कीं, 'वीरसुधारक' लोक हे धार्मिक बाबींप्रमाणें राजकीय बाबतींतही सर्वांना सारखें स्वातंत्र्य असावें असें प्रति-पादणारे असल्यामुळें त्यांना जवळ केल्यानें आपलें नुकसान होईल. 'पोपवादी' हे राजकीय बाबतींतही पोपचें प्राबल्य असावें असें म्हणणारे असल्यामुळें ते तर त्याज्यच होत. पण 'स्वदेशधर्मवादी' हे राजाला मान देणारे असून नेमस्तपणानें वागणारे असल्यामुळें व त्यांचें राज्यांत प्राबल्य असल्यामुळें त्यांना जवळ करणें शहाणपणाचें

होईल. तेव्हां या विचारानें त्यानें ' पोपवादी ' व ' वीर सुधारक ' या दोघांनाही बाजूला सारून ' स्वदेशधर्मवाद्यां 'नाच जवळ केलें.

३ कटाला सुरवात—पण यामुळें ' पोपवादी ' व ' वीरसुधारक ' दोघेही असंतुष्ट झाले, आणि लोकांतील या असंतोषाचा फायदा घेऊन आपलें हितसाधन करणाऱ्या कारस्थानी लोकांनीं गुप्त कट करण्याला सुरवात केली. सर वॉल्टर रॅले-(Sir Walter Raleigh)प्रभृति तीन चार सरदार एकत्र होऊन त्यांनीं जेम्सला पदच्युत करून त्याची एक दूरची चुलत बहीण (Arabella) होती, तिला गादीवर बसविण्याचा बेत केला (The Main plot). दुसऱ्या कित्येकांनीं—यांत पोपवादी व वीर सुधारक दोन्ही पक्षाचे लोक होते—राजाला पकडून आपल्याला अनुकूल असें धर्मस्वातंत्र्य (Toleration) त्याजकडून कबूल करून घ्यावयाचें अशी मसलत योजिली (The Bye Plot). पुढें हे दोन्ही कटवाले एक झाले; पण त्यांच्या कटाला रंगरूप येण्यापूर्वींच हा कट उघडकीला आला व कित्येकांना फांसावर जावें लागून इतरांना हद्दपारी भोगावी लागली. सर वॉल्टर रॅलेला १३ वर्षेंपर्यंत तुरुंगांत ठेवलें होतें. तुरुंगांत त्यानें ' जगाचा इतिहास ' (History of the World) नांवाचें पुस्तक लिहिलें. १३ वर्षांनंतर त्याला अमेरिकेंत ग्वाएना (Guiana) नामक प्रांतांत सोन्याची खाण शोधून काढण्याच्या अटीवर मुक्त करण्यांत आलें; परंतु त्याला त्या कामीं यश न आल्यामुळें इ० स० १६१८ च्या आक्टोबरच्या २९ व्या तारखेस १५ वर्षांपूर्वीं फर्माविलेल्या शिक्षेनुसार त्याला फांसावर चढविण्यांत आलें.

४ इलिझाबेथच्या कारकिर्दींतील वीरसुधारक—दुसरा कट याहीपेक्षां भयंकर स्वरूपाचा होता. 'वीर सुधारक' लोकांनीं पूर्वीं **इलिझाबेथ**च्या कारकिर्दींतही बरीच चळवळ केली होती. त्यांना सुधारणेची गाडी भरधांव सोडावयाची होती, व सामान्य प्रार्थनेच्या पुस्तकांत (The Book of Common Prayer) ठरवून टाकलेल्या अनेक गोष्टींबद्दल त्यांची अत्यंत नापसंती होती. या पक्षांतील कांहीं पुढाऱ्यांनीं अत्यंत 'जहाल' लेख लिहिल्यामुळें इलिझाबेथसारख्या सुधारक (Protestant) राणीचीहि त्यांच्यावर अवकृपा होऊन कित्येकांना देहांत प्रायश्चित्त भोगावें लागलें होतें.

५ पाद्र्यांचा अर्ज—आतां नवा राजा **जेम्स** हा स्कॉटलंडांतील सुधारकांचा पक्षपाती असल्यामुळें व कोणत्याही नव्या राजाची प्रारंभीं तरी लोकांना खूष राखण्याकडेच प्रवृत्ति असणार, या आशेमुळें त्याच्याकडून आपल्या पक्षाला प्रोत्साहन व मदत

मिळेल अशा समजुतीनें या 'वीरसुधारकां' नीं सुमारें ८०० पाद्र्यांच्या सह्यांचा एक अर्ज राजाला सादर केला. या अर्जांत इंग्लंडांतील 'स्वदेश धर्मवादी' (The Episcopalians) पक्ष व आपण म्हणजे वीरसुधारक (Puritans) यांच्यामधील वादाच्या मुद्यांचा निकाल करण्याचे कामीं राजानें आपलें वजन खर्च करावें अशी मागणी केली होती.

६ हॅम्टन कोर्ट येथील सभा—जेम्सनें हॅम्टन कोर्ट (Hampton Court) येथें आपल्या अध्यक्षतेखालीं ख्रिस्ती 'दीक्षितांची' (Leading men) एक सभा (conference) बोलावली. या सभेंत 'वीरसुधारकांचे' चार व 'स्वदेशधर्मवाद्यांचें' सोळा प्रतिनिधी यांनीं एकत्र बसून वादाच्या मुद्यांची चर्चा केली. तीन दिवस खलबत झाल्यावर 'सामान्य प्रार्थनेच्या पुस्तकांत' (The Book of Common Prayer) थोडीशीं सुधारणा करणें, व बायबलचें नवीन भाषांतर करणें, हीं दोन मुख्य कामें हातांत घ्यावयाचें ठरविण्यांत आलें. बायबलच्या भाषांतराचे कामीं ४७ शास्त्र्यांची (ministers) नेमणूक झाली, व त्यांनीं ३ वर्षांत हें काम पुरें करून इ० स० १६११ त सार्थ बायबल इंग्रजी बालबोध लिपींत (Roman character) छापून काढलें.

७ पोपवाद्यांची निराशा—याप्रमाणें 'वीरसुधारकां'चें थोडेसें समाधान झालें; पण पोपवादी पक्ष अत्यंत चिडला होता. त्या लोकांना पूर्वी आपल्या आवडत्या **मेरी** राणीचा हा मुलगा आपल्याला अनुकूल होईल असें वाटत होतें; परंतु **जेम्स** त्यांना अनुकूल होण्याचें दूरच राहिलें; उलट त्यानें इलिझाबेथच्या कारकिर्दींतील त्यांच्याविरुद्ध झालेले कायदे कडक रीतीनें अमलांत आणण्याला सुरवात केली. त्यामुळें त्यांची अत्यंत निराशा झाली व त्या निराशेच्या व रागाच्या भरांत त्यांनीं 'राजा' व 'सुधारक' लोक या दोघांवरही भयंकर सूड उगवण्याचा निश्चय केला.

८ कॅटेस्बी—रॉबर्ट कॅटेस्बी (Robert Catesby) या नांवाच्या गृहस्थानें राजा व पार्लमेंटचे सभासद यांना सुरुंगानें उडवून देण्याची (Gunpowder plot) मसलत योजिली व ती आपल्या मित्रांना कळवून सुमारें २० लोक या कटांत सामील करून घेतले. या २० लोकांनीं ही मसलत गुप्त राखण्याबद्दल येशू ख्रिस्ताच्या नांवानें शपथ घेतली. व **गाय फाक्स** (Guy Fawkes) नांवाच्या स्पेनच्या राजाच्या नोकरींतील एका साहसी व धीट इसमाची हा बेत तडीस नेण्याच्या कामावर नेमणूक झाली.

९ पार्लमेंट गृहाखालचें भुयार—इ० स० १६०४ च्या उन्हाळ्यांत या कटवाल्यांनीं पार्लमेंटसभा भरत असे त्याच्या शेजारचें एक घर भाड्यानें घेतलें व त्या घराच्या तळघराच्या भिंतीखालून एक बोगदा खणून तयार केला. पुढें पार्लमेंटची सरदार सभा ज्या खोलींत बसत असे, त्या खोलीला हा बोगदा नेऊन भिडविण्यांत आला तों त्या ठिकाणीं आयतें एक भुयार असलेलें त्यांना आढळलें. या भुयाराचा दगडी कोळसा ठेवण्याकडे उपयोग करीत असत. कटवाल्यांनीं हें भुयार लागलेंच भाड्यानें घेतलें, आणि त्यांत ३६ पोतीं बंदुकीची दारू भरून ठेवली. भुयाराच्या तोंडावर दगडी कोळसे, लांकडाचे भारे वगैरे ठेवण्यांत आले, व भुयाराचीं दारें उघडीं ठेवण्यांत आलीं. अशासाठीं कीं आंत कांहीं निराळा जिन्नस असेल अशी कोणाला शंका येऊं नये.

१० डिग्बी—सुमारें १॥ वर्षपर्यंत हा कट गुप्त राहिला. इ० स० १६०५ च्या नोव्हेंबर महिन्यांत पार्लमेंटसभा भरावयाची होती, त्या सुमारास कटवाल्यांनीं सर्व सिद्धता करून ठेवली. कटवाल्यांचा पुढारी ' डिग्बी ' (Digby) म्हणून होता, त्यानें **पार्लमेंट** उघडण्याचे दिवशीं शिकारीच्या निमित्तानें वॉरविक जिल्ह्यांत जावें व त्या ठिकाणीं इतर कटवाल्यांनीं त्याला येऊन मिळून बंड उभारावें व इकडे **गाय फॉक्सनें** पार्लमेंट सभा भरतांच बार उडवून द्यावा असें ठरलें !

११ कट कसा फुटला ?—परंतु हा बेत सिद्धीस जावयाचा नव्हता. मॉन्टीगल (Mounteagle) या नांवाचा एक ' पोपवादी ' सरदार पार्लमेंटचा सभासद होता. त्याला पार्लमेंट सभा भरावयाच्या थोडे दिवस अगोदर कोणीं पत्र पाठविलें कीं, आपण येत्या पार्लमेंटसभेला हजर राहूं नये. त्या पत्रांत खालील अर्थाचे शब्द होते. " या पार्लमेंट सभेच्या मंडळीला भयंकर धक्का बसेल पण आपल्याला कोण दुखापत करतो हें त्यांना समजणार नाहीं. "† हें पत्र त्या सरदारानें राजापुढें नेऊन ठेवलें. राजानें तर्क केला कीं, सुरुंगानें धक्का बसेल असा याचा अर्थ असावा. नंतर सभा भरण्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं सरदार सभेच्या खोलींतील भुयाराची पहाणी करण्यांत आली, तों तेथें गाय फॉक्स सर्व सरंजामानिशीं तयार असलेला आढळला !

---

† The Parliament shall receive a terrible blow, and shall not see who hurts them.

१२ कट फुटल्यानंतर—तिकडे ठरल्याप्रमाणें डिग्बी व इतर कटवाले यांनीं बंडाचा झेंडा उभारला होता, तोंच कट उघडकीस आल्याची बातमी त्यांस समजली. तेव्हां त्यांनीं लगेच पळ काढला; परंतु राजाच्या लोकांनीं त्यांचा पाठलाग सुरू केला; आणि कित्येकजण पळतां पळतांच गोळी लागून ठार झाले. अखेर त्यांचे प्रमुख पुढारी राजसैन्याच्या हातीं लागून सुळावर गेले.

१३ पोपवाद्यांचा छळ—या कटाच्या कारस्थानानें पोपवादी लोकांविषयीं लोकांची मनें बिथरलीं व त्यांच्याविरुद्ध अतिशय कडक कायदे पार्लमेंट सभेंत पास झाले. कोणाही पोपवाद्याला लंडनमध्यें राहूं देऊं नये, त्याला वैद्यकी अगर वकिली करूं देऊं नये, वाटेल त्यानें वाटेल त्या वेळीं त्यांच्या घरांत शिरून त्यांच्या सामानसुमानाची नासधूस केली, तरी त्याबद्दल कोणाला शिक्षा होऊं नये (out-law), अशा प्रकारचे कायदे (penal laws) भराभर अंमलांत आले.

प्रकरण ४२ वें.

श्रीमंतांचे आश्रित व लोकसभा.

(इ. स. १६०५–इ. स. १६२५)

[१।२ थोडेसें सिंहावलोकन. ३ स्कॉटलंडचें नफा नुकसान. ४ आश्रितांचा वरचष्मा. ५ रॉबर्ट कार–त्याचा पुनर्विवाह–मिसेस इसेक्स–कार जोडपें. ६ जॉर्ज व्हिलर्स–बकिंगहॅम–देवापुढचा देव. ७ आयर्लंडमधील परिस्थिति–टिरोन. ८ अल्स्टरची वसाहत. ९ जेम्सची समजूत–ना विष्णुः पृथिवीपतिः १० लोकांची चिकाटी. ११ पार्लमेंटचा जोर–अडवणूक. १२ राजाची कुप्ति. १३ पार्लमेंटशिवाय राज्यकारभार–खुषीची सक्ती. १४ अधिकाऱ्यांचें वेतन. १५ युवराज चार्लस–स्पेनच्या राजकन्येची पहाणी–लग्न मोडलें. १६ जेम्सचा जांवई फ्रेडरिक. १७ सुधारकांचा देशत्याग–मे फ्लॉवर–अमेरिकेंत प्रयाण. १८ पार्लमेंटची बैठक–लोकधुरीणांची धिटाई. १९ जेम्सचा राग–लोकांचा त्वेष. २० बेकन–सरदार सभेपुढील चौकशी–राजाची ढवळाढवळ–बेकनचा अंत. २१ जेम्सचा मृत्यु–त्याचा स्वभाव–विषवृक्षाचें बीं. २२ विशेष गोष्टी.]

१ थोडेंसें सिंहावलोकन—पूर्वी नॉर्मन घराण्यांतील जॉन राजाच्या कारकिर्दींत राजा प्रजेवर जुलम करूं लागला, त्या वेळीं प्रजापक्षीय सरदारांनीं जूट करून

इ. स. १२१५ मध्यें राजा अडचणींत सांपडला असतां त्याजकडून प्रजेच्या स्वातंत्र्याची सनद कशी संपादन करून घेतली, हें आपण प्रकरण १६ मध्यें पाहिलेंच आहे. त्याचप्रमाणें इ० स० १२६५ मध्यें मुख्यतः सायमन नांवाच्या इंग्लंडमधील धर्माचार्यांच्या खटपटीनें इंग्लंडच्या पार्लमेंटचा पाया कसा घातला गेला हेंही वाचकांच्या लक्षांत असेलच. त्या वेळेपासून या पार्लमेंटनें संधी सांपडेल तेव्हां आपले हक्क वाढवून घेण्याच्या बाबतींत एक एक पाऊल पुढें टाकलें होतें. इ० स० १४५५ पासून इ० स० १४८५ पर्यंत 'गुलाबी युद्धें' म्हणून इंग्लंडमध्यें जी यादवी माजली होती, त्या यादवींत बहुतेक प्रमुख सरदारांचा वर्ग नष्ट झाल्यामुळें ही यादवी थांबून ट्यूडर घराण्यांतील राजे राज्य करूं लागले; त्या वेळीं त्यांच्यावर कोणाचा दाब नाहींसा झाला. त्यामुळें त्या घराण्यांतील राज्यकर्त्यांनीं पार्लमेंट सभेला बहुतेक खांकेला मारून आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणें कायदे करून घेतले होते, व पार्लमेंटमधील एखाद्या पुढारी सरदाराची व तक्ताधिपतीची गट्टी जमलेली असली कीं, त्यांना इतर सभासदांच्या मतांकडे लक्ष न देतां मन मानेल तसा कारभार चालवितां येत असे. उत्तम राज्यकर्ती म्हणून नांवाजलेल्या इलिझाबेथ राणीनेंही आपला कारभार बहुतेक पार्लमेंटला धाब्यावर बसवूनच चालविला होता हें मागें सांगितलेंच आहे.

२ आतां नवीन आलेला राजा जेम्स यानें तोच क्रम चालविण्याचा प्रयत्न केला; परंतु ट्यूडर राजांच्या अंगचें शहाणपण याच्या अंगीं नसल्यामुळें व दिवसेंदिवस प्रजापक्षीय पुढारीही शहाणे होऊं लागल्यामुळें, त्याचप्रमाणें धार्मिक बाबतींत जसें लोकांना स्वातंत्र्य पाहिजे, तसेंच राजकीय बाबतींतही केवळ राजा म्हणेल ती पूर्व दिशा हें म्हणणें बरोबर नसून लोकांनाही कांहीं हक्क आहेत व राजानें ते मानलेच पाहिजेत, असें प्रतिपादणाऱ्या सुधारक लोकांचा भरणा दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें राजाच्या अधिकारावर प्रजेचा कितपत दाब असावा या संबंधाचें भांडण जेम्स राजाच्या कारकिर्दीत पुन्हां उपस्थित झालें, व एकीकडून 'राजा हा ईश्वरी अंश आहे, त्याची सत्ता अमर्याद (absolute) असली पाहिजे' असें म्हणणारे राजपक्षीय लोक व 'राजाची सत्ता ही प्रजेपासून त्याला प्राप्त झालेली असते, त्या व्यष्टिरूप राजसत्तेवर समष्टिरूप प्रजासत्तेचा दाब असला पाहिजे' असें म्हणणारे प्रजापक्षीय लोक यांच्यामध्यें भांडण जुंपलें; परंतु या भांडणाची हकीकत सांगण्यापूर्वी जेम्स राजा स्कॉटलंडमधून इंग्लंडमध्यें आल्यामुळें स्कॉच व इंग्रज यांचें

काय नफा नुकसान झालें, तसेंच त्या वेळीं इंग्लंडच्या पूर्णपणें ताब्यांत आलेल्या शेजारच्या आयर्लंडमध्यें राज्यकारभार कसा काय चालला होता या दोन आनुषंगिक गोष्टींबद्दल थोडक्यांत माहिती देऊं.

३ **स्कॉटलंडचें नफानुकसान—जेम्स** राजा इंग्लंडला आला तेव्हां आपल्या देशांतील राजा इंग्लंडला जात आहे, तर आपणही तिकडे गेल्यास आपली प्रतिष्ठा वाढेल व पैसाहि कमावतां येईल या आशेनें पुष्कळ **स्कॉटिश** सरदार जेम्स राजाबरोबर इंग्लंडमध्यें येऊन राहिले. हे सरदार स्कॉटलंडमधील आपल्या इस्टेटींच्या उत्पन्नाचा पैसा इंग्लंडमध्यें खर्च करूं लागले. त्यामुळें स्कॉटलँड देश तितक्या प्रमाणांत गरीब होत आहे असें तेथील लोकांना वाटूं लागलें. त्याचप्रमाणें बरेच साहसी स्कॉच लोक पैसा व नांवलौकिक कमावण्यासाठीं देशांतर करून इंग्लंडमध्यें कायमचेच येऊन राहूं लागल्यामुळें स्कॉटलंडमधील व्यापारालाही बराच धक्का बसला.

४ **आश्रितांचा वरचष्मा—जेम्स** राजाचा आपल्या देशांतील मित्रांकडे स्वाभाविकच ओढा असे. पण हे 'श्रीमंतांचे आश्रित' (Favorites) बहुतेक फार दुर्व्यसनी व दुष्ट असल्यामुळें त्यांच्या कृत्यांनीं राजाचें नांव बद्द होत असे व पुढें पुढें तर या चढेल मित्रांचें राजा व त्याचें दरबारी मंडळ यांजवर पूर्ण वर्चस्व झाल्यामुळें राजा व प्रजा यांच्यामधील कटकटींत अधिकाधिक भर पडत चालली.

५ **रॉबर्ट कार**—इलिझाबेथच्या कारकिर्दींत **बर्ले** म्हणून तिचा एक जीवश्च कंठश्च मित्र होता. त्याचा मुलगा **रॉबर्ट सेसिल** (Robert Cecil) याजवर **जेम्स** राजाची प्रथम मर्जी होती. तो. इ० स० १६१२ त निवर्तल्यावर एका स्कॉच सरदारानें राजाचें मन आकर्षण करून घेतलें. या सरदाराचें नांव '**रॉबर्ट कार**' (Robert Carr) असें होतें. तो इ० स० १६०९ च्या सुमारास **लंडन**मध्यें येऊन राहिला होता. हा स्वरूपानें देखणा असून राजासमक्ष चाललेल्या कसल्याशा एका खेळांत त्याचा पाय मोडल्यामुळें तो आतां लंगडा झाला होता. राजाला त्याची कींव आल्यामुळें त्यानें त्याला जवळ करून राजवाड्यांत आणून ठेवलें. पुढें राजाचें त्याच्यावर फारच प्रेम बसलें. जेम्सनें त्याला 'सर' हा किताब दिला व दरबारांत त्याचें प्रस्थ फारच वाढलें. त्यानें 'इसेक्स' नामक एका तरुण सरदाराच्या घटस्फोट करून घालवून दिलेल्या बायकोशीं लग्न केलें; या बाईचें दुसऱ्या एका सरदाराशीं वांकडें होतें; त्या सरदाराला एका यःकश्चित अपराधाबद्दल तुरुंगांत पाठविण्यांत आलें, व कांहीं दिवसांनीं त्याला

विषप्रयोग करून ठार करण्यांत आलें. या खुनाबद्दल लोकांत बराच गवगवा झाला. अखेरीस या दुष्ट कृत्यांत सामील असलेल्या बहुतेकांना शिक्षा झाल्या, व राजालाही नाइलाजानें **कार** व त्याची बायको यांना दरबारांतून घालवून द्यावें लागलें !

६ जॉर्ज व्हिलर्स—'कार'च्या मागून 'जॉर्ज व्हिलर्स' (George Villiers) नांवाच्या एका इसमावर राजाची मर्जी बसली. हाही इसम ' कार ' इतकाच व्यसनी व पाजी होता. पण तो बराच शहाणा व दूरदर्शी होता. जेम्सनें त्याला ' बकिंगहॅमची सरदारकी दिल्यावर तो **बकिंगहॅम** या नांवानेंच विशेष प्रसिद्धीस आला, व लौकरच इंग्लंडमधील पहिल्या प्रतीचा सरदार बनला. राजाचें दरबारी मंडळ व प्रत्यक्ष राजाही त्याच्या हातांतलें बाहुलें बनून राष्ट्रांतील मुख्य मुख्य अधिकाराच्या जागा त्याच्या पंखाखालच्या इसमांनीं भरून गेल्या. आणि महादेवाचें दर्शन घेण्यापूर्वीं ज्याप्रमाणें नंदीला आंजारा-गोंजारावा लागतो, त्याप्रमाणें **जेम्स**चा कृपाप्रसाद (Royal Favour) मिळवावयाचा म्हणजे अगोदर ' **बकिंगहॅम** 'ची मर्जी संपादन केली पाहिजे असें ठरून गेल्यासारखें झालें.

७ आयर्लंडमधील परिस्थिति—तिकडे आयर्लंडमध्यें त्या देशांतील उत्तरेकडच्या भागांत **टिरोन*** (Tyrone) नामक एक सरदार प्रमुख होता. त्यानें पूर्वी इलिझाबेथच्या कारकिर्दीत बंड केलें होतें; परंतु त्या बंडाचा मोड झाल्यावर तो इंग्रजांशीं मिळून मिसळून वागत असे; पण पुढें आपल्या देशांत ' परकी ' इंग्रजांनीं सर्व सत्ता बळकावून बसावें याचा त्याला विषाद वाटूं लागला होता. त्याचा व दुसऱ्या एका आयरिश सरदाराचा एकदां कांहीं कारणामुळें तंटा झाला; तेव्हां त्याला आयर्लंडची राजधानी डब्लिन येथें **जेम्स**चा प्रतिनिधी **'चिचेस्टर'** (Chichester) यानें जाब देण्यासाठीं बोलावलें. परंतु त्याच्यासमोर **टिरोन** हा मगरुरीनें वागल्यामुळें त्याला आपल्या कृत्याचा जाब देण्यासाठीं खुद्द इंग्लंडमध्यें जाण्याविषयीं हुकूम झाला.

८ अल्स्टरची वसाहत—**टिरोन**ला माहित होतें कीं, आपण एकदां इंग्लंडला गेल्यास परत येण्याची आशा नाहीं. तेव्हां तो व दुसरा एक सरदार असे इंग्लंडला न जातां **स्पेन**मध्यें पळून गेले. तेव्हां त्यांची आयर्लंडमधील जमीन जप्त होऊन ती इंग्लंडांतील व स्कॉटलंडांतील जे लोक तिकडे जाऊन रहाण्यास कबूल होते त्यांना देण्यांत आली. अशा रीतीनें **आयर्लंड**च्या उत्तरेकडील **अल्स्टर** (Ulster) नामक

---

* हें ' ह्यू ओनील'चें दुसरें नांव होतें.

भागांत 'परकी' इंग्लिश लोकांची वसाहत (Plantation) होऊन तेथील मूळचे आयरिश लोक निवळ उपरी कुळें बनून गेले ! असो.

९ जेम्सची समजूत—जेम्स राजा गादीवर आल्यावर त्याच्या सभोंवतालच्या दरबारी मंडळीनें त्याच्या मनांत असें भरवून दिलें होतें कीं, राजकुलांत जन्मास येणें ही गोष्ट परमेश्वरी कृपेनें घडून येणारी असल्यामुळें राजाचा गादीवरील हक्क हा परमेश्वरानेंच त्याला दिलेला आहे (Divine Right). गादीबद्दल तो लोकांना जबाबदार नाहीं. राज्यकारभार चालवितांना लोकांचें म्हणजे पार्लमेंटमधील लोकप्रतिनिधींचें मत घेण्याचें त्याला कारणही नाहीं. त्यानें स्वतंत्रपणें पाहिजे तसा कारभार चालवावा. त्याच्या सत्तेला कोणी मर्यादा घालण्याचा प्रयत्न करील तर तो राजद्रोही होय.

१० लोकांची चिकाटी—जेम्सनें शक्य असतें तर लोकसभेला अजिबात गुंडाळून ठेवून मन मानेल तसा अंमल चालविला असता; परंतु लोकसभेंतील सभासदांनींही **जेम्स** गादीवर आल्यापासून आपल्या हक्कांबद्दल चिकाटीनें भांडण्याचें ठरविलें.

११ पार्लमेंटचा जोर—जेम्सच्या राज्यारोहणानंतर **पार्लमेंट**ची जी पहिली बैठक झाली, त्या बैठकींतच लोकसभेच्या पुढाऱ्यांनीं राजाला असें स्वच्छ कळविलें कीं, आमच्या संमतीशिवाय कोणताही नवीन कायदा आम्ही करूं देणार नाहीं अगर जुन्यांत बदल करूं देणार नाहीं. राजाला पैशाची पंचाईत पडली म्हणजे **पार्लमेंट**कडे पैसा मागण्याशिवाय गत्यंतर नसे. तेव्हां पैशाची मागणी **पार्लमेंट**कडे आली, म्हणजे आमचीं गाऱ्हाणीं दूर झाल्याशिवाय आम्हीं पैसा देत नाहीं (no supplies until grievances are redressed) असें म्हणून **पार्लमेंट**-सभा राजाला अडवूं लागली.

१२ राजाची कृति—उलटपक्षीं राजानेंही इतर रीतीनें पैसा जमविण्याची तजवीज आरंभली. अपराध्यांना भयंकर दंड करणें, सरदारकीचे (Baronetcy) किताब उघडपणें विकणें, राजा प्रवासाला निघाला म्हणजे ज्या प्रांतांत त्याचा मुक्काम असेल, तेथल्या लोकांकडून लागेल तें सामानसुमान घेऊन मर्जीस येईल तितकीच किंमत त्यांस देणें (Purveyance), एखाद्या जिनसाची खरेदी–विक्री करण्याचा मक्ता देऊन मक्तेदाराकडून पैसा उकळणें (Monopoly), वगैरे नाना प्रकारच्या युक्त्यांनीं त्यानें पैसा जमा केला. पण त्याचा खर्चही तसाच अफाट असल्यामळें अशा रीतीनें जमा केलेला पैसा पुरा पडेना.

१३ पार्लमेंटाशिवाय राज्यकारभार—पार्लमेंटनें आपल्या संमतीशिवाय लोकांवर कर बसविणें बेकायदेशीर (illegal) आहे म्हणून तक्रार केली; तेव्हां राजानें इ. स. १६१०मध्यें **पार्लमेंट** सभाच बरखास्त करून चार वर्षेंपर्यंत एकतंत्रपणें कारभार हांकला. परंतु इ. स. १६१४ मध्यें पैशाची जास्त निकड लागल्यामुळें त्यानें पुन्हां **पार्लमेंट** सभेची बैठक भरविली. या बैठकींतही राजाला पैसा पाहिजे असेल, तर त्यानें आमच्यीं गाऱ्हाणीं अगोदर दूर केलीं पाहिजेत अशा लोकसभेच्या पुढाऱ्यांनीं आग्रह धरिला; तेव्हां ही सभा (addled parliament) राजानें बरखास्त करून व्यापाऱ्यांना बोलावून आणून त्यांजकडून खुषीच्या सक्तीनें (benevolence) पैसा उकळला.

१४ अधिकाऱ्यांचें वेतन—अशा रीतीनें त्यानें सात वर्षें काढलीं. त्या वेळीं सरकारी अधिकाऱ्यांना आतांच्यासारखा ठराविक सरकारी पगार मिळत नसे. ज्या लोकांना या अधिकाऱ्यांची मदत पाहिजे असेल, त्यांनीं वाटल्यास त्यांना नजराणे व बक्षिसें द्यावीं अशी पद्धत होती. यामुळें लांचलुचपतीला उत्तेजन मिळून फार अन्याय होत असे.

१५ युवराज चार्लस—या सुमारास युवराज **चार्लस** (Charles) याचें स्पेनच्या राजकन्येशीं लग्न होण्याचें घाटत होतें; परंतु स्पेनचे राजे हे पोपवादी असल्या-मुळें त्यांच्याशीं इंग्लंडच्या सुधारक राजांचा शरीरसंबंध होणें घातक आहे असें म्हणून लोक या संबंधाला नाखूष होते. पण **जेम्स** आपला आग्रह सोडीना. युवराज **चार्लस** आणि राजमंत्री **बकिंगहॅम** (Buckingham) हे वेष पालटून **स्पेन**च्या दरबारांत जाऊन आले. पण **बकिंगहॅम**ची वर्तणूक स्पेनच्या दरबारी मंडळीला आवडली नाहीं, व युवराज **चार्लस**चें परत येतांना **फ्रान्स**मध्यें तेथील राजकन्येवर प्रेम बसलें. त्यामुळें **स्पेन**च्या राजकन्येशीं होऊं घातलेला विवाह आपोआपच मोडला.

१६ जेम्सचा जांवई फ्रेडरिक—याच सुमारास युरोप खंडांतील **बोहिमिया** (Bohemia) नांवाच्या संस्थानच्या गादीबद्दल तिकडील प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक संस्थानिकांमध्यें लढाई चालू होती. त्यांत **जेम्स**चा जांवई **फ्रेडरिक** (Frederick) म्हणून होता, त्याचा हितसंबंध होता. म्हणून त्याला मदत करण्यासाठीं **जेम्सनें** थोडेंसें सैन्य तिकडे रवाना केलें. पण त्यापासून त्याला किंवा **फ्रेडरिक**ला कांहीं फायदा न होतां व्यर्थ खर्च मात्र झाला.

१७ सुधारकांचा देशत्याग—राजकीय बाबतींतल्याप्रमाणेंच धार्मिक बाबतींतही आपल्याला 'राजा' या नात्यानें अनियंत्रित अधिकार (absolute power) आहेत असें **जेम्स** समजत असे. यामुळें पुष्कळ सुधारकांना छळ सोसावा लागून आपल्याला पाहिजे तें स्वातंत्र्य इंग्लंडमध्यें मिळण्याचा संभव नाहीं, असें वाटून बऱ्याच सुधारकांनीं इंग्लंड सोडून जाण्याचा निश्चय केला. त्यांची एक टोळी (a company) कांहीं वर्षें हॉलंडमध्यें जाऊन राहिली होती; परंतु पुढें कांहीं कारणामुळें त्यांनीं अमेरिकेंत जाण्याचें ठरवून इ०स० १६२० च्या नोव्हेंबर महिन्यांत 'मे फ्लॉवर' (May Flower) नांवाच्या गलबतांतून अमेरिकेची वाट धरली, व तिकडे 'न्यू इंग्लंड' (New England) अथवा 'नवांग्लभूमि' नामक वसाहत स्थापन केली. हाच सध्यांच्या बलाढ्य अमेरिकन संयुक्त संस्थानांचा पाया होय.

१८ पार्लमेंटची बैठक—इ० स० १६२१ मध्यें पार्लमेंटची बैठक पुन्हां भरविण्यांत आली. या वेळीं लोकसभेच्या सभासदांनीं पूर्वींपेक्षांहि जास्त निकरानें राजाला अडविण्याची तयारी केली, आणि राजानें जेव्हां 'तुम्हांला राज्यकारभारांत हात घालण्याचा अधिकार नाहीं, तुमचे हक्क हक्क म्हणतां, त्या फक्त माझ्या पूर्वजांच्या मेहरबानीनें तुम्हांला प्राप्त झालेल्या सवलती आहेत' असें सांगितलें. तेव्हां लोकसभेच्या पुढाऱ्यांनींही 'भाषण–लेखनादींचें स्वातंत्र्य, आणि राष्ट्र, राष्ट्रसंरक्षण, धर्म, कायदे, व सार्वजनिक दुःखें यांची चर्चा करण्याचे पार्लमेंटचे अधिकार हे इंग्लंडच्या प्रजेचे जन्मसिद्ध व वंशपरंपरागत चालत आलेले हक्क आहेत' असा ठराव केला.*

१९ जेम्सचा राग–**जेम्सनें** रागानें पार्लमेंटचें दप्तर मागून आणलें व हा ठराव ज्या पानांवर लिहिला होता, तीं पानें त्यानें आपल्या हातानें फाडून टाकलीं. नंतर त्यानें पार्लमेंटची बैठक बरखास्त केली, आणि प्रमुख प्रमुख पुढाऱ्यांना तुरुंगांत टाकलें. लोकसभेलाहि त्वेष चढला, व तिनें थोड्याच दिवसांनीं राजाच्या विरोधाला न जुमानतां मक्ते देण्याची पद्धति बेकायदेशीर आहे असा ठराव केला. सरकारी अधिकाऱ्यांनीं कांहीं अपराध केल्यास त्यांना सरदारसभेच्या न्यायासनापुढें खेंचून नेऊन त्यांची तेथें चौकशी करण्याची जुनी पद्धतीही लोकसभेनें पुन्हां प्रचारांत आणली.

---

* The liberties, franchises, privileges and jurisdictions of Parliament are the ancient and undoubted birth-right and inheritance of the subjects of England.

२० बेकन—प्रसिद्ध तत्त्ववेत्ता **बेकन** हा **जेम्स**च्या कारकिर्दीत मुख्य न्यायाधिशाच्या जागेवर होता; पण त्या कालच्या पद्धतीप्रमाणें त्यानें पक्षकारांकडून बऱ्याच देणग्या उपटल्या होत्या. आपला बडेजाव दाखविण्याची हौस, व एकंदरींत काटकसरीनें वागण्याच्या गुणाचा अभाव, यांमुळें त्याचा खर्चच भागत नसे; व त्यामुळें त्याला हा लांच घेण्याचा मोह आवरतां येत नसे. लोकसभेनें त्याच्यावर २२ आरोप ठेवून त्याची सरदारसभेपुढें चौकशी (impeachment) करविली, व त्याला नोकरीवरून बडतर्फ करून ४० हजार पौंड दंडाची शिक्षा देण्यांत आली. आपल्या एका प्रधानाला पार्लमेंटनें शिक्षा करावी ही गोष्ट राजाच्या अधिकाराला बाध आणणारी आहे, असें वाटून **जेम्स**नें त्याची शिक्षा रद्द केली; पण पुढें **बेकन** हा एकांतवासांत राहून इ० स० १६२६ या वर्षी मरण पावला. असो.

२१ जेम्सचा मृत्यु—**जेम्स** राजा इ० स० १६२५ च्या मार्चच्या २७ व्या तारखेस तापानें मरण पावला. हा राजा स्वभावतः शांत स्वभावाचा होता व त्याला आपण विद्वान् असल्याबद्दलची मोठी घमेंड होती; पण त्याच्या कारकिर्दीतील विशेष लक्षांत रहाण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे राजकीय व धार्मिक बाबतींत आपली सत्ता निरंकुश चालावी, अशी त्याची मोठी इच्छा असल्यामुळें इंग्लंडमध्यें राजा व प्रजा यांमधील भांडणाच्या विषवृक्षाचें बीं त्याच्या कारकिर्दीत रुजत घातलें गेलें ही होय. या बीजाला अंकुर फुटून पुढें त्याचा वृक्ष कसा बनला हें पुढें दिसून येईलच.

२२ विशेष गोष्टी—**जेम्स**च्या कारकिर्दीतील आणखीं सांगण्यासारख्या गोष्टी म्हणजे इ०स० १६०४ या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्तानांत सुरत येथें आपली वखार स्थापन केली व जावा व सुमात्रा या बेटांशीं व्यापार सुरू केला; इंग्लंडमध्यें फार्दिंग (farthing) हें पहिलेंच तांब्याचें नाणें पाडण्यांत आलें; व इंग्लंडमधील पहिलें वर्तमानपत्र 'आठवड्यांतील समाचार' (Weekly News) हें इ० स० १६२२ मध्यें निघूं लागलें या होत.

प्रकरण ४३ वें.

आणखीं एक सनद

(इ. स. १६२५–इ. स. १६२८).

[१ नवा राजा चार्लस. २ वीर सुधारकांचा विरोध. ३ पार्लमेंटची बैठक–पोपवादी राणी–बकिंगहॅम–' ना विष्णुः पृथिवी पतिः' चें तत्त्व. ४ पार्लमेंटची मागणी. ५ चार्लस रागावला–खुषीची सक्ति–राणीची फूस. ६ स्पेनशीं युद्ध–कॅडीझ घेण्याचा प्रयत्न. ७ पार्लमेंटची बैठक भरली–पोपवाद्यांविरुद्ध तक्रार–लोकसभेचा विरोध. ८ राजाची पुंडाई. ९ फ्रान्सबरोबर युद्ध–फ्रेंच सुधारकांना मदत–बकिंगहॅम गेला आणि आला–त्याचा मृत्यु. १० पार्लमेंटची तिसरी बैठक–लोकसभेचा जोर. ११।१२ नवी सनद. १३ राजानें वचन मोडलें–लोकसभेची बैठक–राजाचा हुकूम–पुढाऱ्यांची कैद–फ्रान्स व स्पेनशीं तह. १४ एकतंत्री कारभार.]

१ नवा राजा चार्लस—जेम्सच्या मागून त्याचा मुलगा **चार्लस** हा गादीवर आला. ही वेळ मोठ्या आणीबाणीची होती. जेम्स राजा स्कॉटलंडमधून इंग्लंडच्या गादीवर बसण्याला आला. त्या वेळीं **पार्लमेंटच्या** हातून राजसत्तेवर नियंत्रण ठेवण्याच्या कामीं थोडीशी हयगयच झाली होती. या गोष्टीचा फायदा घेऊन राजाच्या दरबाऱ्यांनीं " राजा हा ईश्वरी अंश असल्यामुळें ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ' समर्थ आहे, प्रजेला राजाच्या कारभारांत बोलण्याचा हक्क नाहीं " हीं तत्त्वें राजाच्या मनांत भरवून देऊन प्रजेमध्यें कसा असंतोष पसरविला व त्यामुळें जेम्सच्या कारकिर्दींत प्रजेमधील राजाविषयींचा आदरभाव कसा कमी झाला, हें मागील प्रकरणांतील हकिकतीवरून दिसून आलेंच असेल.

२ वीर सुधारकांचा विरोध—आतां नवा राजा गादीवर आल्यावर पार्लमेंटनें विशेष सावधगिरी ठेवण्याचा निश्चय केला धर्मसंबंधीं बाबतींतील ' वीर सुधारकां'च्या मतांना या वेळीं देशांत मोठा मान मिळूं लागला होता; आणि **ट्यूडर** राजांच्या कारकिर्दीपासून इंग्लंडमधील धार्मिक व राजकीय सत्ता इंग्लंडच्या तक्ताधिपतीमध्यें समाविष्ट झालेली असल्यामुळें राजकीय व धार्मिक अशा दोन्ही बाबतींत स्वातंत्र्य मिळवूं पहाणाऱ्या ' वीर सुधारकां ' (Puritans)ना राजाच्या जुलमी सत्तेला विरोध करणें ओघानेंच प्राप्त होतें.

३ पार्लमेंटची बैठक—चार्लस राजाचें फ्रान्सच्या राजकन्येवर प्रेम जडल्या-वर मुख्यतः बकिंगहॅमच्या आग्रहावरून इ० स० १६२४ मध्यें इंग्लंड व स्पेन यांच्या दरम्यान युद्ध उपस्थित झालें होतें, व इंग्रजांच्या मनांत स्पेनविषयींचा द्वेष तीव्र असल्यामुळें पार्लमेंटनें युद्धखर्चासाठीं ३ लक्ष पौंडांची मंजुरी दिली होती. ही रक्कम युद्ध पुढें चालू ठेवण्याला अपुरी होती. शिवाय जेम्स राजानें बरेंच कर्जही करून ठेवलें होतें. तेव्हां या कर्जाची फेड करण्यासाठीं व युद्धाच्या खर्चासाठीं पैसा पाहिजे, म्हणून नव्या राजानें राज्यारोहणानंतर थोड्याच दिवसांनीं पार्लमेंट सभेची बैठक भरविली (First Parliament). त्या वेळीं पार्लमेंटमध्यें ' वीरसुधारकां 'चा भरणा बराच मोठा होता. यापूर्वीं थोडेच दिवस राजानें फ्रान्सच्या राजकन्येशीं (Henrietta-Maria) लग्न केलें होतें, व स्पेन्सच्या राजाप्रमाणेंच फ्रान्सचा राजाही पोपवादी असल्यामुळें या सुधारकांना ' पोपवादी ' राणी इंग्लंडमध्यें असणें हें बऱ्याचें लक्षण नव्हे असें वाटत होतें. त्याचप्रमाणें राजमंत्री बकिंगहॅम हा सुधारकांचा द्वेष्टा असल्यामुळें लोक त्याच्यावर नाराज झाले होते, व चार्लस राजाही बापाच्या तालमींतच तयार झालेला असल्यामुळें ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' या तत्त्वाचा अभिमानी होता.

४ पार्लमेंटची मागणी—पार्लमेंटची बैठक भरली त्या वेळीं सुधारकांनीं या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन पार्लमेंटचे हक्क वाढवून घेण्याचा उपक्रम केला. राजानें मागि-तली तेवढी सर्व रक्कम मंजूर न करितां पार्लमेंटनें फक्त १ लक्ष ४० हजार पौंड व १ वर्षाचें कांहीं जिनसांवरील जकातीचें उत्पन्न (tunnage and poundage) खर्चासाठीं राजाला देण्याचें ठरविलें. ही रक्कम जेम्स राजानें करून ठेवलेल्या कर्जापैकीं निम्में कर्ज फेडण्यालाही पुरेशी नव्हती. शिवाय त्या वेळीं सुधारकांनीं रोमन कॅथोलिक अगर पोपवादी लोकांविरुद्ध पूर्वीं वेळोवेळीं झालेले कायदे सक्त रीतीनें अंमलांत आणण्याविषयीं राजाला विनंती केली, व राजमंत्री बकिंगहॅम याजवर बरेच आरोप ठेवून त्याची चौकशी करविण्याची मागणी (demand) केली.

५ चार्लस रागावला—चार्लस राजाला पार्लमेंटनें आपल्याविषयीं असा अवि-श्वास (want of confidence) दाखविल्याबद्दल फार राग आला व त्यानें एका पंधरवड्याच्या आंतच पार्लमेंटसभा बरखास्त केली. खुषीची सक्ती करून पैसा उकळ-ण्याची जुनी वहिवाट पुन्हां सुरू करून त्यानें जरूर तितका पैसा जमविला, व सैन्यांतील शिपायांना गांवांतल्या लोकांकडून परस्पर रसद वसूल करून घेण्याचा अधिकार दिला (billeting of soldiers). राजमंत्री बकिंगहॅम व राणी हेन्रीएटा हीं राजाचीं

मुख्य सल्लागार बनलीं. **चार्लस** राजाच्या अंगीं राजसत्तेचा फाजील अभिमान हा आनुवंशिक दोष होताच; त्यांत आतां त्याच्याचसारख्या एकतंत्री सत्तावादी फ्रान्सच्या राजाची कन्या त्याच्या मताला दुजोरा देऊन भर देण्याला मिळाली असल्यामुळें राजा अधिकाधिकच बहकूं लागला यांत आश्चर्य कसलें ?

६ स्पेनशीं युद्ध—स्पेनशीं जें युद्ध चालू होतें, त्यासाठीं सुमारें १० हजार शिपाई तिकडे रवाना झाले होते. त्यांनीं तिकडे **कॅडिझ** (Cadiz) नांवाचें बंदर काबीज करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला; व पैशापरी पैसा जाऊन राजाला पदरीं अपेश घेण्याची पाळी आली.

७ पार्लमेंटची बैठक भरली—पुन्हां पैशाची अडचण पडली; तेव्हां इ. स. १६२६ या वर्षी पार्लमेंटची बैठक बोलावण्यांत आली (Second Parliament). या वेळीं पूर्वीच्या वैठकींत ज्यांनीं राजाला विरोध केला होता, अशा पार्लमेंटच्या कित्येक सभासदांना सरकारी नोकरीच्या जागा देण्यांत येऊन त्यांची लोकसभेमध्यें निवडणूक होण्याचा मार्ग बंद करण्यांत आला होता. पण पार्लमेंटसभा भरली त्या वेळीं राजाला आढळून आलें कीं, या वेळीं निवडून आलेले लोकसभेचे सभासद पूर्वीपेक्षां अधिकच विरोध करणारे आहेत! त्यांनीं पोपवाद्यांविषयीं जोरानें तक्रार केली, आपल्या संमतीशिवाय कर वसूल करण्याचा राजाला अधिकार नाहीं असें ठासून सांगितलें, आणि राजमंत्री **बकिंगहॅम** याची सरदारसभेच्या न्यायासनापुढें चौकशी करविण्याची तयारी केली.

८ राजाची पुंडाई—लोकसभेच्या विरोधानें संतापून जाऊन राजानें **डिग्ज** (Digs) व **इलियट** (Eliot) या दोन पुढाऱ्यांना राजद्रोही भाषण केल्याबद्दल तुरुंगांत टाकलें, व आपला दोस्त **बकिंगहॅम** याच्यावर कसलाच आरोप येऊं नये म्हणून त्याच्या सर्व कृत्यांची जबाबदारी आपल्यावर घेतली. लोकसभेचें असें म्हणणें पडलें कीं, राजाचे मंत्र्यांनीं आपल्या कृत्यांबद्दल पार्लमेंटला जाब दिला पाहिजे. **बकिंगहॅमला** ताबडतोब कामावरून दूर केला पाहिजे अशाविषयीं तर सभेचा आग्रहच पडला. तेव्हां राजानें पुन्हां पार्लमेंट सभा बरखास्त केली, विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांना तुरुंगांत टाकलें, बेकायदेशीरपणें पैसा गोळा करण्याची वहिवाट सररास चालू केली, व कित्येक ठिकाणीं लष्करी कायदाही चालू केला.

९ फ्रान्सबरोबर युद्ध—पुढल्या वर्षी इंग्लंडचें फ्रान्सबरोबर युद्ध जुंपलें. फ्रान्सच्या दरबारांत **रिचेल** (Cardinal Richelieu) म्हणून एक प्रख्यात

मंत्री होता. त्याचें व बकिंगहॅमचें कांहीं कारणावरून भांडण झालें. रिचेल हा कट्टा पोपवादी असून तिकडील सुधारकांना दाबांत ठेवण्याचा त्याचा अहर्निश प्रयत्न चालू असे. या वेळीं रोचेल (La Rochelle) नामक किल्ल्यांतील सुधारकाशीं त्याचा सामना चालू होता व त्या किल्ल्याला फ्रेंच सैन्यानें वेढा दिला होता. बकिंगहॅमनें रिचेलची खोड मोडण्याला ही संधी चांगली आहे असें पाहून फ्रेंच सुधारकांच्या मदतीसाठीं म्हणून फ्रान्समध्यें सैन्य पाठविण्याविषयीं चार्लसला सल्ला दिली. चार्लसनें पाहिलें कीं, इंग्रज सुधारकांचा फ्रेंच सुधारकांकडे ओढा असल्यामुळें फ्रेंच सुधारकांना मदत करण्याच्या कामगिरीवर बकिंगहॅमची योजना केल्यास इंग्रज सुधारकांनाही संतोष वाटेल व त्यांचा बकिंगहॅमविषयींचा द्वेष कमी होईल. म्हणून त्यानें तशी योजना करून बकिंगहॅमला बरोबर ७००० सैन्य देऊन तिकडे रवाना केलें. पण तिकडच्या सुधारकांचा बकिंगहॅमवर विश्वास नव्हता. त्यांनीं या सैन्याला बंदरावर उतरूंच दिलें नाहीं. तेव्हां बकिंगहॅम या सैन्याला घेऊन जवळच्याच एका बेटावर उतरला. पण त्या ठिकाणीं त्याचे अर्धे लोक मेले व त्याला हात हालवीत परत इंग्लंडला यावें लागलें. पुन्हां एकदां त्यानें राजाचें मन वळवून फ्रान्समध्यें सैन्य घेऊन जाण्याची तयारी केली; परंतु ही तयारी चालली असतांना 'फेल्टन' (Felton) नांवाच्या एका बडतर्फ केलेल्या अधिकाऱ्यानें रागानें त्याच्या छातींत खंजीर खुपसून त्याचा प्राण घेतला. इकडे फ्रान्समध्यें अखेरीस 'रोचेल' च्या सुधारकांना नाइलाजानें इ० स० १६२८ च्या आक्टोबर महिन्यांत फ्रान्सच्या राजाला शरण जावें लागलें.

१० पार्लमेंटची तिसरी बैठक—दरम्यान इकडे **चार्लस** राजानें फ्रान्सबरोबर युद्ध चालविण्याला लोक उत्सुक आहेत असें पाहून इ० स० १६२८ मध्यें तिसऱ्यांदा पार्लमेंट सभेची बैठक भरविली (Third Parliament), पण या वेळीं लोकसभेचे प्रतिनिधी आपले हक्क व आपलें स्वातंत्र्य कायम करून घेण्याविषयीं अधिकच निकरानें भांडण्यास तयार झाले. खर्चाची मंजुरी देण्याच्या पूर्वी त्यांनीं प्रजेचे हक्क मान्य करून घेणारी एक नवीन सनदच (Petition of Right) राजाकडून कबूल करून घेतली. या सनदेप्रमाणें खालील गोष्टी करण्याचें राजानें शपथपूर्वक कबूल केलें. त्या गोष्टी अशा:—

११ नवी सनद—(१) पार्लमेंटच्या संमतीशिवाय लोकांकडून 'देणग्या' वसूल करावयाच्या नाहींत. (२) बेकायदेशीर कर देण्याचें नाकारल्याबद्दल कोणालाही तुरुंगांत घालावयाचें नाहीं. (३) सैन्यांतील शिपायांना लोकांच्या घरीं

धरणें धरावयास लावून लोकांकडून परस्पर त्यांचा खर्च भागवावयाचा नाहीं. (४) शांततेच्या वेळीं लोकांवर लष्करी कायद्याची अंमलबजावणी करावयाची नाहीं. (५) आरोप न सांगतां कोणालाही कैदेंत टाकावयाचें नाहीं; किंवा खटला चालू न करतां आरोपीस तुरुंगांत खितपत ठेवावयाचें नाहीं.

१२ महत्त्वाच्या मानानें या सनदेला इंग्रज लोक आपल्या हक्कांबद्दलची दुसरी सनद असें मानतात. पहिली ' बडी सनद ' त्यांनीं **जॉन** राजाच्या कारकिर्दींत मिळविली होती हें वाचकांच्या लक्षांत असेलच. असो.

१३ राजानें वचन मोडलें.—अशा रीतीनें राजाला कैचींत धरून वरील प्रमाणें अटी त्याच्याकडून पार्लमेंटनें कबूल करून घेतल्यावर चार लाख पौंड खर्चासाठीं मंजूर करण्यांत आले, व आतां राजा व प्रजा यांमधील कटकट बंद पडेल असें वाटून लोकांना समाधान वाटलें. पण तीन आठवड्यांच्या आंतच राजा आपल्या वचनाला किती किंमत देतो तें समजून आलें. **पार्लमेंटची** संमति न घेतां त्यानें पुन्हां बेकायदेशीर कर वसूल करण्याला सुरवात केली. राजाची कानउघाडणी करण्यासाठीं लोकसभेची बैठक भरली; तेव्हां सभेच्या अध्यक्षांनीं सभा तहकूब करण्याबद्दल (adjournment) राजाचा हुकूम झाला आहे म्हणून सांगितलें. तेव्हां कित्येक सभासदांनीं अध्यक्षाला जबरीनें खुर्चीवर बसवून आपल्याला पाहिजे होते, ते ठराव पास करून घेतले. राजानें ताबडतोब **पार्लमेंटसभा** बरखास्त केली, नऊ पुढाऱ्यांना पकडून तुरुंगांत टाकलें, व या घरच्या भानगडीमुळें बाहेर युद्ध चालू ठेवणें शक्य नाहीं असें पाहून **फ्रान्स** व **स्पेन** यांजबरोबर तह केला.

१४ एकतंत्री कारभार—यापुढें ११ वर्षेंपर्यंत पार्लमेंट सभेची बैठकच भरली नाहीं. राजानें प्रजापक्षांतील कित्येक पुढाऱ्यांना वश करून घेऊन एकतंत्रीपणानें कारभार चालविला. या कालांत प्रजेला कोणतीं दुःखें भोगावीं लागलीं व ' प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः । राज्ञः कुलं श्रियं प्राणान् दग्ध्वा स न निवर्तते ॥' या वचनाचा प्रत्यय **चार्लस** राजाला कसा आला तें पुढें पाहूं.

प्रकरण ४४ वें.

राजाविरुद्ध प्रजा.

(इ. स. १६२८–इ. स. १६३७)

[१ कुऱ्हाडीचा दांडा–वेंटवर्थ. २।३ वेंटवर्थचें धोरण–विश्वासघात. ४ इंग्लंडांतील सैन्यव्यवस्था–पगारी सैन्य. ५ आयर्लंडांतील प्रथम प्रयोग–नवीन उमेद. ६ लॉड–त्याचीं मतें–पोपची आशा. ७ लॉडच्या कृत्यांचा परिणाम. ८ पार्लमेंट सभा नामशेष झाली–जुन्या जुलमी कायद्यांचा अंमल–दोन जुलमी कोर्टें. ९ शिक्षेचे प्रकार–अनियंत्रित राजसत्तेचा धिंगाणा. १० नौकाद्रव्य–नौकाद्रव्याचा पूर्वेतिहास–कायद्याचा आधार. ११ लोकांचें म्हणणें. १२ इ. स. १६३७–जॉन हॅम्डेन कर देण्याचें नाकारतो–न्यायाधिशाचा निकाल. १३ सर्वराष्ट्रीय संकट. १४ देशत्याग. १५ देशत्यागालाही मनाई–भवितव्यता बलीयसी. १६ स्कॉटलंडमध्यें प्रयोग–पारडें फिरलें.]

१ कुऱ्हाडीचा दांडा—आपल्या मराठी भाषेंत 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' अशी एक म्हण आहे, तिचा प्रत्यय इतिहासांत अनेक वेळां आलेला दृष्टीस पडतो. **चार्लस** राजाला त्याच्या जुलमाच्या कृत्यांत प्रजापक्षीय लोक कसा अडथळा करीत असत हें मागील प्रकरणांतील हकिकतीवरून वाचकांना समजून आलेंच असेल. आतां राजानें अशी युक्ति काढली कीं, प्रजापक्षांतील कांहीं पुढाऱ्यांना पदव्यांच्या व अधिकारदानाच्या आमिषानें आपल्या बाजूला वळवून घ्यावें. कोणत्याहि काळांत व कोणत्याहि देशांत अशा स्वार्थसाधु मंडळींचा लहान मोठा भरणा असतोच. अशा मंडळींपैकीं 'वेंटवर्थ' (Wentworth) या नांवाचा एक प्रजापक्षीय पुढारी राजानें निवडून काढला.

२ वेंटवर्थचें धोरण—मागील प्रकरणांत सांगितलेली 'पंचसूत्री' सनद (Petition of Right) राजाकडून कबूल करून घेण्याच्या कामीं ज्यांनीं पुढाकार घेतला होता, त्या मंडळींत हा 'वेंटवर्थ' प्रमुख होता. पण त्या वेळीं तो राजाच्या विरुद्ध होता, त्याचें कारण त्याला मनापासून प्रजापक्षाला मदत करावयाची होती हें नसून, त्याच्या मनांत त्या वेळचा राजमंत्री बकिंगहॅम याच्याविषयीं वसत असलेला खासगी द्वेष हेंच त्या वेळीं त्याला राजाविरुद्ध असण्याला मुख्य कारण झालें होतें. वास्तविक प्रजापक्षाविषयींच्या सहानुभूतीचें त्यानें नुसतें ढोंग केलें होतें. त्याचीं मतें **चार्लस**च्या इतर

दरबारी मंडळीच्या मताप्रमाणेंच होतीं. अर्थात बकिंगहॅम मरण पावल्यावर अंतस्थ कारण नाहींसें झाल्यामुळें वेंटवर्थ सहजच राजपक्षाला जाऊन मिळाला, व प्रजापक्षाची किल्ली माहीत असलेला पुढारी राजाला मिळाल्यामुळें राजसत्ता प्रबळ होण्याला बरीच मदत झाली.

३ वेंटवर्थ जात्या हुषार होता व प्रजापक्षीय मंडळीचे बेत व कारस्थानें त्याला पूर्णपणें माहीत होतीं. या सर्व माहितीचा राजसत्ता वाढविण्याच्या कामीं उपयोग करण्याचा त्यानें निश्चय केला. लोकसभेच्या पुढाऱ्यांना वेंटवर्थच्या या विश्वासघाता-बद्दल पराकाष्ठेचा राग आला व त्याचा प्राण केव्हां घऊं असें त्यांना होऊन गेलें. उलट पक्षीं वेंटवर्थही आतां आपले प्रतिपक्षी बनलेल्या जुन्या दोस्तांना नाहींसे करण्याच्या खटपटीस लागला.

४ **इंग्लंडांतील सैन्यव्यवस्था**—इंग्लंडमध्यें या वेळपर्यंत कायमचें असें पगारी सैन्य नसे. जरुरीच्या वेळीं सैन्य जमा करावयाचें व काम होतांच त्याला रजा द्यावयाची अशी पद्धत असे. वेंटवर्थनें आतां अशी युक्ति सुचविली कीं, राजानें कायमचें पगारी सैन्य (Standing Army) ठेवावें म्हणजे त्या सैन्याच्या जोरावर सर्व सत्ता त्याला आपल्या हातीं ठेवतां येईल.

५ **आयर्लंडांतील प्रथम प्रयोग**—इ. स. १६३१ या वर्षी वेंटवर्थला आयर्लंडचा 'व्हाइसरॉय' (Viceroy) नेमण्यांत आलें, तेव्हां आपल्या या नव्या युक्तीचा प्रयोग त्यानें तिकडे करून पाहिला. सात वर्षेपर्यंत आयर्लंडमधील मूळचे रहिवासी व इंग्रज वसाहतवाले या दोघांनाही त्यानें सैन्याच्या जोरावर हूं कीं चूं करूं दिलें नाहीं. हा प्रथम प्रयोग (first experiment) यशस्वी झाल्यामुळें त्याला असें वाटूं लागलें कीं, युरोपखंडांत ज्याप्रमाणें जिकडे तिकडे राजांचा एकतंत्री अंमल चालू आहे, त्याचप्रमाणें थोड्याच दिवसांत इंग्लंडमध्येंही राजाला सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊन पार्लमेंटसभा मोडून टाकून प्रजेची पूर्ण मुस्कटदाबी करतां येईल.

६ **लॉड**—अशा रीतीनें वेंटवर्थच्या मदतीनें राजकीय बाबतींतील सर्व सत्ता **चार्लस**च्या हातीं येऊं लागली. धर्मसंबंधीं बाबतींतही वेंटवर्थच्याच लायकीचा एक धर्माधिकारी त्याला मिळाला; त्याचें नांव '**लॉड**' (Laud) असें होतें. 'सुधारकांनीं धार्मिक बाबतींत फारच पुढें पाऊल टाकलें आहे हें चांगलें नाहीं, तेव्हां त्यांना बरेंच मागें खेंचून धरलें पाहिजे' असें त्याचें मत होतें, व त्या उद्देशानें कित्येक जुने विधी पुन्हां सुरू

करण्याची त्याची इच्छा होती. या त्याच्या मनोदयावरून एक वेळ रोममधील पोपलाही असें वाटावयाला लागलें होतें कीं, 'लॉड'च्या मदतीनें आपल्याला इंग्लंडमध्यें आपलें स्वामित्व पुन्हां प्रस्थापित करतां येईल. म्हणून त्यानें खासगी रीतीनें एका बहुमानाच्या हुद्याची जागाही 'लॉड'ला देऊं केली. परंतु त्याला पोपच्या इतका आहारीं जाणें न आवडल्यामुळें त्यानें ती नाकारली.

७ लॉडच्या कृत्यांचा परिणाम—लॉडचा सुधारकांविषयींचा द्वेष मात्र कायम होता; राजानें त्याला इंग्लंडमधील धर्मसंस्थेच्या मुख्याचार्यांची जागा दिलेली असल्यामुळें त्याचें न ऐकणाऱ्या सुधारकांना फार हाल भोगावे लागून इंग्लंडच्या धर्मसंस्थेचें नांव बद्दू होऊं लागलें व त्याच्या कित्येक कृत्यांनीं पुढें राजाच्याही अडचणींत भर पडली.

८ पार्लमेंट सभा नामशेष झाली—पार्लमेंट सभा आतां बहुतेक नामशेष झाल्यासारखीच होती. राजा आपल्या स्वतःच्याच अधिकारानें प्रजेकडून वाटेल त्या रीतीनें पैसा उकळूं लागला. जुने जुलमी कायदे पुन्हां जोरानें चालू झाले. जमिनीच्या मालकीहक्काबद्दलचे वाद उपस्थित होऊन राजाच्या तिजोरींत भर पडूं लागली. सर्व जिन्नस मक्त्यानें विकण्याची पद्धती जारीनें सुरू झाली. निरनिराळे कर न देणारांची स्थावरजंगम मिळकत जप्त होऊन त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. लोकांमध्यें कोठें यत्किंचित् असंतोषाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास राजाचें खास उभारलेलें खडें सैन्य तावडतोब तिकडे जाऊन असंतोषाचा बीमोड करूं लागलें. राजाच्या कृत्यांबद्दल दाद मागण्याची सोय राहिली नाहीं. न्यायाधीश राजानेंच नेमलेले असल्यामुळें राजाच्या अवकृपेच्या भीतीमुळें ते त्याच्याविरुद्ध निकाल देईनासे झाले. वेंटवर्थ व लॉड या जोडीच्या मुठींत असलेलीं दोन बडीं कोर्टें (Star Chamber and High Commission Court) राजकीय व धार्मिक बावतींतल्या अपराध्यांना कडक शिक्षा देऊं लागलीं, आणि या कोर्टांवर पार्लमेंटचा दाब नसल्यामुळें भयंकर दंड, तुरुंगवास, खोड्यांत घालणें, नाक–कान कापणें (mutilation), असल्या शिक्षा सररास चालू झाल्या.

९ शिक्षेचे प्रकार—डॉ. लिटन (Lyton) या नांवाच्या एका इसमास कसलेंसें एक पुस्तक लिहिल्याबद्दल सार्वजनिक जागीं फटके मारून त्याचे नाक व कान कापण्यांत आले व गालांवर 'राजद्रोही' म्हणून डाग देण्यांत आला. 'ग्रीन' (Green) नांवाच्या दुसऱ्या एका वकिलाला दुसरें एक पुस्तक लिहिल्याबद्दल जबर दंड करून खोड्यांत

अडकाविण्यांत आलें व त्याचे कान कापण्यांत आले. अशा रीतीनें राजा व त्याचे 'नृपांगणगत खल' यांनीं लोकांवर दहशत बसवून राजसत्ता पूर्णपणें अनियंत्रित करण्याचा प्रयत्न चालविला.

१० नौकाद्रव्य–चार्लसनें बेकायदेशीर रीतीनें जे कर बसविले त्यांत 'शिप–मनी' (Ship–Money) म्हणजे 'नौकाद्रव्य' नांवाच्या करानें तर लोकांत तीव्र असंतोष पसरला. इंग्लंड हा देश चोहोंबाजूंनीं समुद्रवेष्टित असल्यामुळें पूर्वीपासून शेजारच्या देशांतील चांचे लोकांचें त्याला फार भय बाळगावें लागे. पूर्वी डेन्स लोक या देशावर स्वाऱ्या करीत असत, त्या वेळीं किनाऱ्यावरील प्रदेशांत जे लोक रहात असतील, त्यांनीं किनाऱ्याच्या संरक्षणार्थ जहाजें बांधून तयार ठेवावयाचीं असा पूर्वीच्या इंग्रज राज्यकर्त्यांच्या वेळेपासून प्रघात होता. किनाऱ्याचें संरक्षण करण्याचा हा बोजा प्रथम समुद्रकांठीं रहाणाऱ्या प्रजेवर पडत असे. पुढें चांचांचा त्रास कमी झाला तेव्हां समुद्रकिनाऱ्यावरील लोकांकडून जहाजांच्या ऐवजीं नक्त पैशाच्या रूपानें कर घेण्यांत येऊं लागला. आतां इ. स. १६३४ मध्यें **'फिंच'** (Finch) व **'नॉय'** (Noy) या दोन कायदेपंडितांनीं राजाला हा जुना कर वसूल करण्याबद्दल कायद्याचा आधार दाखवून दिला. आणि या वेळीं समुद्रकिनाऱ्यावरच्या लोकांकडूनच नव्हे, तर समुद्रापासून दूर मध्य इंग्लंडमध्यें रहाणाऱ्या लोकांकडूनहि हा कर वसूल करण्याची राजानें खटपट आरंभिली.

११ लोकांचें म्हणणें—लोकांमध्यें धुसफुस सुरू झाली. लोकांचें असें म्हणणें पडलें कीं, हा कर लढाईच्या वेळींच बसवावयाचा; तो शांततेच्या वेळीं घेण्याचा राजाला अधिकार नाहीं. बरें, शांततेच्या वेळीं घेतला तर घेतला; पण त्याचा उपयोग तरी इंग्लंडच्या संरक्षणासाठीं आरमार बांधण्याकडे करावा; पण तें एकीकडेच राहून या कराच्या पैशांतून राजाचें खडें सैन्य पोसलें जाऊन लोकांना दुप्पट त्रास होऊं लागला. शिवाय हा कर पार्लमेंटच्या संमतीशिवायच बसविलेला असल्यामुळें या बाबतींत इतकीं वर्षें खटपट करून महत्प्रयासानें प्रजेनें मिळविलेला हक्क नाहींसा होण्याच्या बेतांत आला.

१२ इ. स. १६३७–हा असंतोष सुमारें तीन वर्षेंपर्यंत लोकांच्या मनांत धुमसत राहिला होता. शेवटीं इ. स. १६३७ या वर्षीं त्याची ज्वाला बाहेर पडली. बकिंगहॅम जिल्ह्यांत 'जॉन हॅम्डेन' (John Hmpden) या नांवाचा एक सुखवस्तु गृहस्थ रहात असे. त्याच्या मिळकतीवर या कराची २० पौंड आकारणी झाली. हॅम्डेननें धीर करून हा कर बेकायदेशीर आहे, सबब मी तो देत नाहीं म्हणून सांगितलें. पुढें हें

प्रकरण न्यायकोर्टांत गेलें (The Court of Exchequer). पण न्यायाधीश राजाच्या हातांतील बाहुलें बनलेले. त्यांनीं हा कर कायदेशीर आहे असा निकाल दिला.

१३ सर्वराष्ट्रीय संकट—पण हा खटला चालल्यावेळीं दोन्ही पक्षांकडून जे मुद्दे पुढें मांडण्यांत आले, त्यांवरून लोकांची खात्री झाली कीं, राजाच्या मनांत प्रजेचे सर्व हक्क काढून घ्यावयाचे आहेत. तेव्हां हें सर्वराष्ट्रीय संकट आहे असें समजून तें दूर करण्याला कोणते उपाय योजावेत याबद्दल सर्वत्र चर्चा सुरू झाली. ‘ वेंटवर्थ ’ व ‘ लॉड ’ यांचे गुप्त हेर (spies) सर्वत्र पसरलेले असत, ते लोकांमधील या चर्चेची बित्तंबातमी त्यांना कळवीत; व त्यामुळें प्रमुख प्रमुख व्यक्तींना अनेक वेळां जबर दंड, तुरुंगवास, खोडा, अशा शिक्षा भोगाव्या लागत. शेवटीं ‘वीर सुधारक’ लोक तर या जुलमाला अतिशय कंटाळून गेले व त्यांनीं या जुलमी सत्तेखालीं मान वांकवून रहाण्यापेक्षां देशत्याग करण्याचें ठरविलें.

१४ देशत्याग—मागील राजाच्या कारकिर्दींत कित्येक लोक अमेरिकेंत जाऊन तिकडे घरेंदारें करून राहिले होते; तेंच उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून आतां राजाच्या व त्याच्या दुष्ट हस्तकांच्या जुलमाला त्रासलेले ‘ सुधारक ’ लोक इंग्लंडला कायमचा रामराम ठोकून ‘ नव्या जगां’त जाऊन स्वतंत्रपणें वसाहती स्थापूं लागले. पण आपले शत्रु आपल्या हातांतून निसटून जाऊन अमेरिकेंत स्वतंत्र वसाहती स्थापतात ही गोष्टही राजाला व त्याच्या दरबारी मंडळीला आवडेना.

१५ देशत्यागालाही मनाई—एकदां असेंच जुलमानें गांजलेले कित्येक देशभक्त अमेरिकेंत जाण्याची तयारी करून आठ गलबतांवर सामानसुमान चढवून गलबतें हांकारण्याची वाट पहात होते. इतक्यांत राजाचा हुकूम येऊन थडकला कीं, या गलबतांना टेम्स नदीच्या बाहेर पडण्याची मनाई आहे. या गलबतांपैकीं एकावर हॅम्डेन, पिम (Pym), क्रॉमवेल (Cromwell), वगैरे प्रख्यात देशभक्त होते व राजाची मनाई झाली नसती, तर ते त्या दिवशीं अमेरिकेला निघूनहि गेले असते. परंतु म्हणतात ना ‘ भवितव्यता बलीयसी ’ ! राजाला त्या लोकांना बाहेर जाऊं न देण्याची बुद्धि झाली; ते परत इंग्लंडच्या भूमीवर उतरले; आणि पुढें राजाविरुद्ध झालेल्या निकराच्या भांडणांत त्यांचा प्रजापक्षाला फार उपयोग व मदत झाली, तेव्हां **चार्लस**ला आपल्या चुकीबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी आली. असो.

१६ स्कॉटलंडमध्यें प्रयोग—पण राजाच्या जुलमाचा हा पुढला परिणाम विचारांत न घेतला, तर या वेळीं मात्र सर्व राष्ट्र **चार्लस**च्या अगदीं मुठींत असल्या-

सारखें झालें होतें. आणि वेंटवर्थची खड्या सैन्याच्या जोरावर प्रजेंतील असंतोष दडपून टाकण्याची युक्ति सफळ झाल्यासारखी वाटूं लागली होती. पण इतक्यांत इंग्लंडमध्यें आलेल्या यशानें फुगून जाऊन **चार्लसनें** जेव्हां तीच युक्ति स्कॉटलंडमध्यें योजण्याचा उपक्रम केला, तेव्हां त्यांत त्यास यश न येतां सर्वच पारडें एकदम फिरल्यासारखें झालें !

प्रकरण ४५ वें.

स्कॉटलंडांतील हकीकत.

(इ. स. १६३७ इ. स. १६४१)

[१ स्कॉटलंडमधील सुधारक. २ **चार्लस** स्कॉटलंडमध्यें गेला. ३ चवदा आचार्य. ४ स्कॉटलंडमधील सुधारक आणि इंग्लिश स्वदेशधर्मवादी. ५ प्रार्थना पुस्तकाची सक्ति–अरे हा पोप !–बंड माजलें. ६ पाद्र्यांची चिथावणी–चार कमिट्या–शपथ-पत्रिकेवर सह्या–सामान्य परिषद–वीरसुधारकांचा जय. ७ राजा हट्टाला पेटला–स्कॉटिश लोकांची तयारी–रिचेलची मदत–इंग्रजांचा तटस्थपणा–सामाचें बोलणें–संयुक्त परिषद. ८ परिषदेचा निकाल–पार्लमेंटची बैठक बोलाविली. ९ अकरा वर्षांनंतर जमलेले प्रतिनिधि–लोकांचीं गाऱ्हाणीं–राजाचा राग–लोकही चिडले–आगींत तेल–स्कॉट लोकांची तयारी. १० जनरल लेस्ली–इंग्रज फौजेचा पराक्रम–सरदारांची सभा–पुन्हां पार्लमेंट–इंग्लंड–स्कॉटलंडचा तह. ११ इ० स० १६४० मधील बैठक–कैद्यांची मुक्तता–वेंटवर्थवरील आरोप–लॉडचा तुरुंगवास. १२ पार्लमेंटचे ठराव. १३ वेंट-वर्थची चौकशी १४ लोकसभेंतील बिल–खवळलेलें लोकमत–वेंटवर्थ फांसावर गेला–लॉडचा मृत्यु. १५ स्कॉटिश लोकांना बक्षीस. १६ राजाचें स्कॉटलंडांतील धोरण–लोकाराधना.]

१ स्कॉटलंडमधील सुधारक––जेम्स राजा स्कॉटलंडमधून निघून इंग्लंडला आल्यावर तिकडील बरेच सरदार इंग्लंडमध्यें येऊन जाऊन रहात असत. आणि स्कॉटलंडमध्यें स्वतःचें वर्चस्व राखण्याच्या कामीं या सरदारांची जेम्सला फार मदत होत असे. इंग्लंडप्रमाणेंच स्कॉटलंडमध्येंही राजकीय व धार्मिक बाबतींत तीव्र

पक्षभेद होतेच. पण इंग्लंडपेक्षां स्कॉटलंडमध्यें सुधारक मंडळीचें प्रस्थ ज्यास्त होतें. जेम्सला इंग्लंडला आल्यावर तेथल्या स्वदेशधर्मवाद्यांची बहुतेक धार्मिक मतें (Episcopacy) मान्य झाल्यामुळें स्कॉटलंडमध्येंही हाच धर्म प्रस्थापित करावा अशी त्याची फार इच्छा होती. पण स्कॉटलंडचे सुधारक आपल्या देशाची स्वतंत्र धर्मपद्धति असावी असें म्हणणारे असल्यामुळें व त्यांचेंच त्या देशांत वर्चस्व असल्यामुळें जेम्सचा हा बेत तडीस गेला नव्हता.

२ चार्लस स्कॉटलंडमध्य गेला--पुढें **चार्लस** राजानें इंग्लंडचा मुख्य धर्माचार्य '**लॉड**' याच्या मदतीनें बापाची ही इच्छा आपण तडीस नेऊं अशी उमेद धरली, आणि इंग्लंडमध्यें खड्या सैन्याच्या मदतीनें लोकांवर दहशत बसविण्याच्या कामीं त्याला जें यश आलें, त्यामुळें शेफारून जाऊन त्याच उनादानें आपण स्कॉटिश सुधारकांनाही आपलें म्हणणें कबूल करावयास लावूं अशा समजुतीनें इ० स० १६३३ मध्यें **चार्लस** राजा **लॉड**सहवर्तमान स्कॉटलंडमध्यें गेला.

३ चवदा आचार्य—तिकडे गेल्यावर त्यानें आपल्या मताचे चवदा छोटे आचार्य निरनिराळ्या ठिकाणीं नेमून टाकले व त्यांना मोठ्या मानाच्या व किफायतीच्या जागा दिल्या. स्कॉटलंडमधील सुधारक सरदारांना हे परकी 'भुरटे' आपल्या देवस्थानची मिळकत नागविण्यासाठीं आले आहेत असें वाटून ते त्यांचा फार द्वेष करूं लागले. आणि या सरदारांचें सामान्य प्रजेवर बरेंच वजन असल्यामुळें स्कॉटलंडांतील बहुजनसमाजही **चार्लस**विषयीं व त्याच्या कृत्यांविषयीं फार नाखूष झाला.

४ स्कॉटलंडमधील सुधारक आणि इं. स्वदेशधर्मवादी—स्कॉटलंड मधील सुधारकांना पोपवादी मंडळीची पराकाष्ठेची चीड येत असे. व इंग्लंडमधील स्वदेशधर्मवादी सुधारकांचा कांहीं कांहीं जुन्या चालीरीति कायम ठेवण्याकडे कल असल्यामुळें हे 'नेमस्त' सुधारक तिकडील सुधारकांना प्रच्छन्न पोपवादीच (Papists) वाटत असत. शिवाय यांची प्रार्थनापद्धति वगैरे त्यांना बिलकूल पसंत नसे. तथापि जोंपर्यंत इंग्लिश पद्धतीनेंच सार्वजनिक प्रार्थना वगैरेही झाली पाहिजे अशी स्कॉटलंडमध्यें सक्ति झाली नव्हती, तोंपर्यंत तिकडचे लोक असंतुष्ट असले तरी राजाला उघडपणें विरोध करण्याला मागें घेत असत.

५ प्रार्थना-पुस्तकाची सक्ति—पण आतां **चार्लस** राजाला दुर्बुद्धि आठवून त्यानें इ. स. १६३७ या वर्षी इंग्लंडमध्यें रूढ झालेल्या प्रार्थना पुस्तकाच्या धर्तीवर एक

प्रार्थनापुस्तक (PrayerBook) * तयार करवून तें एका ठरलेल्या रविवारीं स्कॉटलंडमध्यें चालू करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें सर्व धर्माधिकाऱ्यांना ' नोटीस ' काढली ! ठरलेल्या दिवशीं स्कॉटलंडची राजधानी एडिंबरो येथील एका मुख्य देवळांत त्या देवळाचा मुख्य आचार्य, इतर लहान मोठे धर्मोपदेशक व आजूबाजूचा प्रचंड जनसमाज जमला असतां पुस्तकांतील नवीन प्रार्थना (Liturgy) वाचूं लागला. पण त्यानें चार दोन ओळी वाचल्या असतील नसतील, तोंच लोकांनीं गोंगाट करण्यास सुरवात केली. जिकडून तिकडून ' अरे हा पोप ! याला दगड मारा ! ' अशा आरोळ्या सुरू झाल्या. एक ' बिशप ' व्यासपीठावर चढून लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न करूं लागला, तोंच एका बाईनें एक स्टूल उचलून त्याच्यावर फेंकलें. त्यानें त्याचा प्राणच जावयाचा, पण थोडक्यांत निभावलें ! अशा रीतीनें कांहीं वेळ गोंधळ माजून पुढें त्याचा परिणाम दंग्यांत झाला आणि या दंग्याला लवकरच बंडाचें स्वरूप प्राप्त झालें !

६ **पाद्र्यांची चिथावणी—चार्लस** राजानें या आडदांड स्कॉट लोकांना आपल्या खड्या सैन्याची धमकी देऊन पाहिली; पण व्यर्थ ! लोक अतिशय चिडून गेले, आणि स्कॉटलंडमधील सर्व पाद्र्यांनीं लोकांच्या भावना उद्दीपित करणारीं भाषणें करून जिकडे तिकडे मोठी खळबळ उडवून दिली. **एडिंबरो** येथें तिकडचे बहुतेक सरदार, जमिनदार, व्यापारी व सामान्य रयत यांची एक सभा भरली आणि त्यांच्या चार कमिट्या नेमण्यांत येऊन स्कॉटलंडमधील सर्व सत्ता या कमिट्यांनीं आपल्या हातीं घेतली. त्यांनीं लगेच एक करारपत्राचा मसुदा तयार केला. त्यांत आपल्या धर्मांत हात घालणाऱ्यांशीं निकरानें झुंजण्याची व कोणीं जुलूम करूं लागल्यास एकमेकांना मदत करण्याची अट घातली होती. दोन महिन्यांच्या आंत स्कॉटलंडमधील सर्व दर्जाचे स्त्रीपुरुष मिळून शेंकडा पंचाण्णव लोकांनीं या राष्ट्रीय शपथपत्रिकेवर (National Covenant) सह्या केल्या. लवकरच **ग्लासगो** (Glasgow) येथें स्कॉटलंडमधील सर्व लोकांची ' सामान्य परिषद ' (General Assembly) भरली, आणि त्या परिषदेनें **चालस** राजानें नवीन सुरू केलेले सर्व धर्मविधि (late innovations) त्याज्य ठरवून बंद केले. आणि **चार्लस**च्या मुठींतलें अन्यायी न्यायकोर्टें मोडून टाकलें.

---

* कोणालाच पसंत नसलेल्या या 'सर्व्हिस बुका'ला त्या वेळच्या एका टीकाकारानें पोपिश–इंग्लिश–स्कॉटिश–मास सर्व्हिस बुक ' असें नांव दिलें होतें.—Warner Marton.

७ राजा हट्टाला पेटला--अशा रीतीनें स्कॉटलंडमध्यें **चार्लस**ची सत्ता संपुष्टांत येऊन स्कॉटिश वीरसुधारकांचे पाय चांगलेच जमिनीला लागले. राजालाही आपल्या इभ्रतीचा अभिमान होताच. दोन्ही पक्ष हट्टाला पेटले. 'बेरिक' (Berick) येथें **चार्लस**नें वीस हजार सैन्य जमा केले. उलट पक्षीं स्कॉटिश सुधारकांनींही आपल्या धर्मासाठीं व स्वातंत्र्यासाठीं राजाशीं दोन हात करण्याची तयारी केली. फ्रान्समधील मागें सांगितलेला ' रिचेल ' हा समानशत्रुत्वामुळें गुप्तरूपें **चार्लस**विरुद्ध स्कॉटलंडांतील सुधारकांना मदत करूं लागला. तसेंच पाहूं गेलें असतां इंग्रज लोक या वेळीं स्कॉटलंडमधील या बंडखोरांचा समाचार घेण्यास समर्थ होते. परंतु बऱ्याच इंग्रज लोकांना या वेळीं असें वाटूं लागलें होतें कीं, **स्कॉच** लोकांचें हें बंड जर यशस्वी झालें तर त्यामुळें आपलें नुकसान न होतां कदाचित राजाच्या जुलमी सत्तेला आळा घालण्याचे कामीं त्याचा आपल्यालाही उपयोग करून घेतां येईल. **चार्लस** राजाही आपल्या इंग्रज प्रजेला ओळखून होता. तेव्हां त्यानें सर्व रागरंग पाहून इ. स. १६३९ मध्यें स्कॉटलंडमधील बंडखोरांशीं सामाचें बोलणें लाविलें, आणि उभयपक्षांमधील वादाचा निकाल स्कॉट लोकांची ' सामान्य परिषद ' व इंग्रजांची ' **पार्लमेंट** सभा ' यांनीं करावा असें ठरलें.

८ परिषदेचा निकाल--परंतु या दोन्ही सभांनीं स्कॉट लोकांनीं जें केलें तें बरोबर आहे असा निकाल दिला; इतकेंच नव्हे तर यापुढें राजसत्तेवर नियंत्रण घालण्याला काय उपाय योजावे याचाही विचार चालविला. तेव्हां **चार्लस** राजा स्कॉट लोकांना धार्मिक बाबतींत बरेंचसें स्वातंत्र्य देण्याला तयार झाला. पण इतर बाबतींतले आपले अधिकार सोडण्यास तो कबूल होईना. पण अधिकार सोडावयाचे नाहीत म्हणजे सैन्याचें पाठबळ पाहिजे, सैन्य पोसावयाला पैसा पाहिजे, आणि पैशाचा तर या वेळीं **चार्लस**जवळ अत्यंत तुटवडा होता. तेव्हां निरुपायानें इ. स. १६४० च्या वसंत ऋतूंत त्यानें पार्लमेंटची बैठक भरविली, आणि तींत एकदम पैशासंबंधाचें मागणें पुढें मांडलें.

९ अकरा वर्षांनंतर जमलेले प्रतिनिधि—**पार्लमेंट**चे सभासद आज अकरा वर्षांनंतर एकत्र जमले होते. या अकरा वर्षांत राजानें नाना प्रकारें लोकांना त्रास दिला होता. ते राजाचें म्हणणें या वेळीं एकदम थोडेंच कबूल करणार! त्यांनीं पैशाची मंजुरी न देतां उलट अगोदर आपलींच गाऱ्हाणीं राजापुढें मांडलीं. पार्लमेंटच्या सभासदांच्या या कृत्याचा राजाला अर्थातच राग आला आणि त्यानें **पार्लमेंट** सभा तावडतोब बरखास्त केली. राजाच्या या कृत्यानें लोक अधिकच चिडले. आणि पुढें जेव्हां राजा पूर्वींप्रमाणें

पार्लमेंटच्या संमतीशिवाय निरनिराळ्या स्वरूपांनीं लोकांकडून पैसा उकळूं लागला तेव्हां आगींत तेल ओतल्यासारखें झालें ! अन्यायानें उकळलेल्या पैशाच्या जोरावर राजानें कसें बसें वीस हजार सैन्य गोळा केलें; परंतु स्कॉट लोकांना **चार्लस** राजाला विरोध करणाऱ्या इंग्रज लोकांच्या उदाहरणानें उत्तेजन मिळालें असल्यामुळें त्यांचीही राजाशीं दोन हात करण्याची अगोदरच तयारी झाली होती.

१० जनरल लेस्ली—असंतुष्ट स्कॉट लोकांनीं आतां जनरल '**लेस्ली**' (Leslie) नामक सरदाराच्या नेतृत्वाखालीं स्कॉटलंडची हद्द ओलांडून इंग्लंडमध्यें पाऊल ठेवलें, आणि सरहद्दीवरच इंग्रज फौजेचा पराभव करून 'न्यू कॅसल' (New Castle) नांवाचें ठिकाण हस्तगत केलें. इकडे **चार्लस** राजा पुनः गडबडला. आतां त्यानें इंग्लंडमधील सरदार लोक (Peers) तरी आपल्या बाजूला वळतात कीं काय हें पहावें म्हणून ' यॉर्क ' येथें नुसत्या सरदारांचीच सभा बोलाविली. परंतु या सरदारांनीं राजाला सांगितलें कीं, लोकसभेची बैठक भरल्याशिवाय कांहीं होणें नाहीं. तेव्हां अखेर संपूर्ण **पार्लमेंट** सभेची बैठक बोलावून स्कॉट लोक पुढें चाल करून येत आहेत, त्यांना थोपवून धरण्यासाठीं काय उपाय योजावे त्याचा विचार करावा असें ठरलें; आणि बऱ्याच वाटाघाटीनंतर शेवटीं वादाच्या मुद्यांचा निकाल इंग्लड व स्कॉटलंड या दोन्ही देशांच्या **पार्लमेंट** सभांनीं करावा व तोंपर्यंत स्कॉट सैन्याचा खर्च इंग्रजांनीं द्यावा अशा अटींवर उभय राष्ट्रांमध्यें तात्पुरता तह झाला.

११ इ. स. १६४० मधील बैठक—ठरल्याप्रमाणें इ. स. १६४० च्या नोवेंबर महिन्यांत इंग्लंडच्या पार्लमेंट सभेची बैठक (The long Parliament) भरली. या वेळीं गेल्या ११।१२ वर्षांत राजाच्या अवकृपेच्या माऱ्यांतून लोकांचे जे पुढारी शिल्लक राहिले होते. त्यांतले बहुतेक लोकांतर्फे निवडून आले होते. त्यांनीं स्कॉट लोकांचें सैन्य राजाच्या उरावर बसण्याला आयतें आलें आहे, तेव्हां ही संधि साधून राजाच्या अनियंत्रित कारभाराला आळा घालतां आला तर पहावा असा विचार केला. आणि **पार्लमेंटनें** पैशाच्या मागण्यांचा विचार तहकूब करून राजाच्या जुलमानें जे लोक तुरुंगांत खितपत पडले होते व ज्यांचें भयंकर नुकसान झालें होतें, त्या लोकांना **पार्लमेंटच्या** हुकुमानें तुरुंगांतून मोकळें करून त्यांची नुकसानभरपाईही करून दिली; राजाच्या मुख्य सल्लागारांवर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याचें ठरलें. लोकसभेचा पुढारी ' **पिम** ' यानें ' **वेंटवर्थ** 'वर विश्वासघाताचा व फंदफितुरीचा आरोप ठेवला,

व त्याची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली; वेंटवर्थच्या मागून ' लॉड 'चीहि किल्ल्यांत रवानगी झाली; पार्लमेंटचा हा रागरंग पाहून कित्येक राजपक्षीय मंडळींनीं अगोदरच इंग्लंडमधून पाय काढला; धार्मिक बाबतींतही लॉडनें केलेले सर्व फेरफार पार्लमेंटनें रद्द करून टाकले; आणि रोमन कॅथोलिक लोकांना दरबारांतून व सैन्यांतून घालवून देण्यांत आलें.

१२ पार्लमेंटचे ठराव—अशा रीतीनें दहा महिनेपर्यंत निरनिराळे ठराव करून पार्लमेंटनें आपले गेलेलें स्वातंत्र्य परत संपादन केलें. पार्लमेंट सभेची बैठक वाटेल तेव्हां बरखास्त करण्याची राजाला दुष्ट खोड लागली होती. परंतु आतां पार्लमेंटनें असा ठराव केला कीं, सभेची बैठक भरल्यापासून दोन महिन्यांच्या आंत राजानें ती बरखास्त करूं नये अगर तहकूबही करूं नये. तसेंच निदान तीन वर्षांनीं तरी पार्लमेंट सभेची बैठक भरविलीच पाहिजे आणि योग्य वेळीं पार्लमेंट सभा बोलावण्याला जर राजा अनमान करील, तर लोकांनीं आपण होऊनच आपले प्रतिनिधि निवडून सभा चालू करावी.

१३ वेंटवर्थची चौकशी—अशा रीतीनें राजाची सत्ता बरीच मर्यादित केल्यावर ' वेंटवर्थ'ची सरदार सभेपुढें चौकशी करण्याचें ठरलें. इ० स० १६४१ च्या मार्च महिन्याच्या २२ व्या तारखेला सर्व सरदार व सामान्य लोकांचें प्रतिनिधी यांनीं पार्लमेंटचें सभागृह भरून गेलें. ' पिम'नें ' वेंटवर्थ ' विरुद्ध एकंदर २८ आरोपांची यादी वाचून दाखविली. आयर्लंडमध्यें त्यानें केलेल्या भयंकर जुलमाचें वर्णन करून आपल्या म्हणण्याला दुजोरा देणारा साक्षीपुरावाही त्यानें हजर केला. उलट पक्षीं 'वेंटवर्थ'नेंही आपल्या नेहमींच्या गंभीर वक्तृत्वानें (dignified eloquence) असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं, 'पिम'नें केलेले सर्व आरोप एकत्र केले तरी, त्यांवरून आपल्यावर 'विश्वासघाता' (treason)चा आरोप शाबीत होत नाहीं. या चौकशीचें काम जवळ जवळ एक महिना चाललें होतें. शेवटीं 'वेंटवर्थ'नें एका खासगी सभेमध्यें (a private council) केलेल्या भाषणाचीं त्याच्या हातचीं टांचणें सभेपुढें आलीं.

१४ लोकसभेंतील बिल—लोकसभेचे पुढारी या आपल्या जुन्या दगलबाज दोस्तावर केव्हां सूड घेऊं म्हणून उतावीळ झाले होते (nervous excitement). पण त्यांना नुसत्या सरदार सभेच्या न्यायासनासमोरील चौकशी (impeachment)नें त्याचा प्राण घेण्याचें काम साधणार नाहीं असें दिसून आलें. तेव्हां दुसऱ्या एका मार्गाचा अवलंब करण्यांत आला. 'वेंटवर्थ'ला जिवंत ठेवणें योग्य नाहीं अशा अर्थाचें बिल

(Bill of Attainder) लोकसभेपुढें येऊन तें प्रचंड बहुमतानें पास झालें.† पुढें रीतीप्रमाणें तें बिल सरदारसभेपुढें गेल्यावर तेथेंही तें पास झालें. इतका विधि झाल्यावर फक्त राजाच्या संमतीचें अत्र राहिलें. राजा अर्थातच आपल्या प्रिय मंत्र्याला फांसावर जाऊं देण्याला तयार नव्हता. 'वेंटवर्थ'नें किल्ल्यावरील अधिकाऱ्याला लांच देऊन किल्ल्यांतून पळून जाण्याचीही खटपट करून पाहिली. पण किल्लेदार कबूल होईना. लोकांच्या झुंडीच्या झुंडी राजवाड्यासभोंवतीं जमून गुन्हेगार वेंटवर्थला फांसावर चढवा म्हणून आरडाओरड करूं लागल्या. राणीला या लोकसमुदायाची भीति वाटून तिनें डोळ्यांत आसवें आणून लोकांचे मागणें कबूल करावें म्हणून राजाला विनंती केली. हा आणीबाणीचा प्रसंग लक्षांत आणून आतां 'वेंटवर्थ'नेंही आपल्या मरणाची तयारी केली, आणि राजाला स्वदस्तुरचें पत्र लिहून मी लोकांच्या इच्छेप्रमाणें मरण्यास तयार आहें, तेव्हां देशांत शांतता होण्यासाठीं आपण लोकांच्या मागण्याला कबुली द्यावी म्हणून कळविलें. शेवटीं राजाची सही होण्याचा विधी यथाशास्त्र झाल्यावर मे महिन्याच्या बाराव्या तारखेस 'वेंटवर्थ'ला फांसावर चढविण्यांत आलें.* त्या दिवशीं रात्रीं 'लंडन' मध्यें लोकांनीं रस्त्यांतून रोषनाई करून होळ्या पेटविल्या (Bonfires) आणि जिकडे तिकडे 'एकदांची पीडा नाहींशी झाली !' (His head is off) असा ध्वनि दुमदुमूं लागला. थोडक्याच दिवसांनीं 'धर्माध्यक्ष' लॉडचीही तीच गत झाली.

---

† **इंपीचमेंट** म्हणजे सरदारसभेच्या न्यायासनापुढील 'चौकशी' आणि **बिल ऑफ अटेंडर** म्हणजे पार्लमेंटपुढील 'सभासद-मत-प्रदर्शक कायद्याचा मसुदा'. यांत फरक आहे तो फक्त विधी (Form) चा आहे. म्हणजे पहिल्यांत 'हाउस ऑफ कॉमन्स' उर्फ सामान्य लोकांच्या सभेचे प्रतिनिधी आणि हाउस ऑफ् लॉर्डस म्हणजे सरदार सभा यांच्या भूमिका अनुक्रमें फिर्यादी व न्यायाधीश अशा प्रकारच्या असतात, आणि दुसऱ्यांत पार्लमेंट सभेपुढें आलेलें 'बिल' इतर कायद्यांच्या मसुद्यांप्रमाणेंच पार्लमेंटच्या दोन्ही सभांत 'पास' होऊन त्याला राजाची संमति मिळवावी लागते. पण 'चौकशी'च्या वेळीं सरदारसभा न्यायाधिशाच्या भूमिकेवर असल्यामुळें लोकसभेनें 'पास' केलेलें एकादें बिल 'नापास' करण्यापेक्षां 'चौकशीं'त एकाद्याला दोषमुक्त करून सोडून देणें सरदार सभेला अधिक सोईचें होतें हें उघड आहे.

* वेंटवर्थ उर्फ स्ट्रॅफर्ड याच्या या मरणासंबंधानें इतिहासकार जेन्स (Gense) म्हणतो, " Charles singularly disgraced himself by signing

१५ स्कॉटिश लोकांना—नंतर **पार्लमेंटनें** राजाचा हुकूम झाला तरी सभासदांचें बहुमत झाल्याशिवाय सभा बरखास्त होऊं नये असा ठराव केल्यावर स्कॉट सैन्याला त्यांच्या मदतीबद्दल तीन लाख पौंड देण्याचा ठराव केला. आणि राजानें 'वेंटवर्थ' व 'लॉड'च्या मदतीनें स्थापन केलेलीं नवीं न्यायकोर्टें बंद केलीं.

१६ राजाचें स्कॉटलंडांतील धोरण.—त्याच वर्षाच्या हिंवाळ्यांत **चार्लस** राजा स्कॉटलंडमध्यें गेला आणि तिकडील लोकांना वश करण्यासाठीं आपले सर्व अधिकार त्यानें तिकडील **पार्लमेंटसभेच्या** हवालीं करण्याचें कबूल केलें. तसेंच ज्यांनीं तिकडे शस्त्र उपसलें होतें त्यांना त्यानें माफी देऊन त्यांचीं मनें आपल्या बाजूला वळवून घेतलीं. या कृत्यामुळें इंग्लंडमध्यें पार्लमेंटनें आतांपर्यंत राजसत्ता नियंत्रित केली तितकी पुरे, आतां यापुढें राजावर ज्यास्त दाब ठेवण्याचें कारण नाहीं असें म्हणणारा एक पक्ष उत्पन्न झाला होता त्याला उत्तेजन मिळालें.

प्रकरण ४६ वें.

नेमस्त व जहालपक्ष.

(इ. स. १६४१–इ. स. १६४२)

[१।२ आयर्लंडमधील असंतोष–स्कॉट लोकांचें उदाहरण. ३ रोजर ओनील–आयरिश देशभक्तांचा बेत. ४ बंडाचा बावटा–इंग्रजांबद्दलचा द्वेष–इंग्रजांची कत्तल. ५ पार्लमेंटचा राग व धास्ती–एक अफवा–स्वसंरक्षणाची तयारी. ६।७ दोन पक्ष–प्रत्येकाचे विचार. ८ राजकीय कारणाची भर. ९।१० प्रत्येक पक्षांतील घटक–राजपक्ष व प्रजापक्ष यांचें बलाबल. ११ पहिलीं कुत्सित नांवें–पुढें शिष्टता पावलीं–शिलेदार आणि चक्रशीर्ष–टोरी आणि व्हिग-कॉंझरव्हेटिव्ह आणि लिबरल-नेमस्त आणि जहाल. १२ चार्लसचें इंग्लंडमध्यें आगमन. १३ जहालांचा जाहिरनामा. १४ जाहिर-

---

his best friend's death-warrant; but no less disgraceful was the conduct of Parliament, when they passed a Bill of Attainder, to do away with an enemy whom they could not convict of capital offence."

नाम्याचा पार्लमेंटमधील वाद. १५ दोन्ही पक्षांची चुरस–जहालांचा विजय–ऑलिव्हर क्रॉमवेलचे उद्‌गार. १६ नेमस्तांचें धोरण-जहालांची भीति. १७ संकटाची चर्चा–रोमन कॅथोलिक धर्माध्यक्षाबद्दलचा राग–जाहीरपत्रक–राजद्रोहाचा आरोप. १८ राजाची युक्ति–पार्लमेंटांतील चर्चा–राजाचा बेकायदेशीरपणा व त्याची अरेरावी–त्याचा हुकूम व हुकुमाचें उत्तर. १९ लोक सभेचा हुकूम–आरोपितांचें भाषण–पुढें–विश्रांतीनंतर. २० सावजें निसटलीं–राजा रागावला–राजाचे प्रश्न–अध्यक्षांचें उत्तर–आमचे हक्क ! २१ बंदरांची नाकेबंदी–लंडनचे नागरिक–राजाचा तपास–लोकांची निष्ठा. २२ पार्लमेंटची कमिटी–राजा पळाला–आरोपितांचा सन्मान. २३ इ. स. १६४२. २४ हल–एकोणीस कलमी यादी. २५ पार्लमेंटचें सैन्य–राजाची तयारी.]

१ आयर्लंडमधील असंतोष—स्कॉटलंडमध्यें लोकांचीं मनें शांत होऊन स्थिरस्थावर होत आहे, तोंच इकडे आयर्लंडमध्यें बंड झाल्याची बातमी आली. जेम्सच्या कारकिर्दींत बरेच इंग्रज व स्कॉट लोक आयर्लंडमध्यें जाऊन तिकडे त्या देशाच्या उत्तरभागांत कायमची वसाहत करून राहिले होते हें मागें सांगितलेंच आहे. या ‘ उपऱ्या ’ ब्रिटिश लोकांबद्दल आयर्लंडमधील मूळच्या रहिवाशांच्या मनांत फार दिवसांपासून द्वेष धुमसत होता. आयर्लंडमधील बहुजनसमाज पोपवादी व हे नवे वसाहतवाले सुधारक यामुळें धर्मसंबंधानें त्यांच्यांत साहजिकच तेढ होती.

२ वेंटवर्थ हा तिकडे ‘ गव्हर्नर ’ असेपर्यंत त्याच्या करड्या अंमलामुळें आयरिश लोक मनांत जळफळत असले तरी असंतोषाचें बाह्य चिन्ह कांहीं दिसत नव्हतें. पण हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार देण्याच्या पद्धतीनें साहजिकच प्रत्येक इंग्रज गृहस्थाविषयीं व इंग्रजी चालीरीतीविषयीं तद्देशीयांच्या मनांत पराकाष्ठेचा द्वेष उत्पन्न झाला. स्कॉट लोकांनीं बंड करून राजाला नमविलें व खुद्द इंग्लंडमध्यें राजाला फारसें वजन राहिलें नाहीं हें पाहून आतां आयरिश लोकांनाही स्फुरण चढलें.

३ रोजर ओनील—वेंटवर्थ फांसावर गेलेला; त्याच्याबरोबरच ज्याच्यावर त्याची सारी भिस्त, तें त्याचें खडें सैन्य कमी झालेलें; अशी संधी पाहून आयर्लंड मधील इंग्रजांचें वर्चस्व नाहींसें करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत यश येईल अशी आशा आयरिश देशभक्तांच्या मनांत उत्पन्न झाली. रोजर ओनील (Roger O'neill) नांवाचा धाडसी सरदार व त्याच्याचसारखे आणखी अनेक लहान मोठे पुढारी एकत्र जमून त्यांनीं गुप्तपणें खलबतें करून आयर्लंड ‘ निरिंग्रज ’ करण्याचा बेत केला.

४ बंडाचा बावटा—इ० स० १६४१ च्या आक्टोबर महिन्यांत उत्तरेकडील आयरिश लोकांनीं बंडाचा बावटा उभारला व लागलीच त्यांचें अनुकरण सर्व ठिकाणीं होऊं लागलें. आयरिशांच्या मनांत इंग्रजांविषयींचा द्वेष इतका खोल रुतला होता कीं, इंग्रज म्हटला कीं, पुरुष, स्त्री अगर लहान मूल इकडे लक्ष न देतां निर्दयपणें त्याला कापून काढावयाचा असा क्रम सुरू झाला. त्यांच्या दृष्टीनें इंग्रज सुधारक हा दयेला अपात्र असा 'पाखंडी' असल्यामुळें असल्या पाखंड्यांना जगांतून नाहींसें करणें हें मोठें पुण्य कृत्य आहे असें उघडपणें प्रतिपादन होऊं लागलें. या वेळच्या कत्तलींत किती जीव बळी पडले हें नक्की सांगतां येत नाहीं. कित्येकजण सुमारें दोन लाख लोक मरण पावले असावे असें म्हणतात, पण ही संख्या ४० हजारांत कमी नव्हती याबद्दल सर्वांचें एकमत आहे.

५ पार्लमेंटचा राग—आयर्लंडमधील ही भयंकर बातमी ऐकून इंग्लंडच्या पार्लमेंटलाही पोपवादी लोकांचा भयंकर संताप आला. परंतु या बंडखोरांचें पारिपत्य करण्यासाठीं सैन्य उभारलें, तर **चार्लस** राजा त्या सैन्याचा इंग्लंडचें स्वातंत्र्य हरण करण्याचे कामीं उपयोग करील, या धास्तीमुळें सैन्य जमा करून बंडखोरांचें पारिपत्य करण्याचे कामीं पार्लमेंटनें दुर्लक्ष्य केलें; परंतु पुढें अशीहि एक वदंता पसरली कीं, **चार्लस**चा ओढा पोपवादी लोकांकडे असल्यामुळें त्याच्याच गुप्त चिथावणीनें आयर्लंडमधील हे अत्याचार घडून आले आहेत. त्यामुळें लोकसभेच्या पुढाऱ्यांना संशय वाटून त्यांनीं कदाचित इंग्लंडमध्येंहि कांहीं गडबड उपस्थित झाल्यास स्वसंरक्षणाची तरतूद करण्यासाठीं पैसा व शस्त्रास्त्रें जमविण्याची जारीनें तयारी चालविली.

६ दोन पक्ष—पार्लमेंट सभेची बैठक सुरू झाल्यापासून पहिले दहा महिनेपर्यंत सभेंतील काम बहुतेक एकमतानें चाललें होतें. पण **चार्लस** राजाच्या जुलमी सत्तेवर जरूर तें नियंत्रण पडल्यावर व विशेषतः स्कॉटलंडमधील त्याच्या हल्लींच्या वर्तनावरून तो यापुढें जुलूम करणार नाहीं असें कित्येकांना वाटूं लागलें होतें. राजाचे अधिकार अगदींच संपुष्टांत आणून ठेवल्यास जिकडे तिकडे बेबंदशाही (anarchy) माजेल अशीही कित्येक मंडळीला भीति वाटत असे. शिवाय राजसत्तेला कसून विरोध करणाऱ्या मंडळींत धार्मिक सुधारणेच्या कट्ट्या अभिमान्यांचें वर्चस्व असल्यामुळें या जहाल सुधारकांचा वर पगडा झाल्यास इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या स्वतंत्र धर्मसंस्थेला धोका बसेल असेंही कित्येकांना वाटूं लागलें होतें.

७ उलटपक्षीं विरुद्ध बाजूच्या मंडळीला असें वाटत असे कीं, राजाच्या शब्दावर विश्वास ठेवून स्वस्थ बसण्यांत अर्थ नाहीं. इतक्या दिवसांच्या परिश्रमानें प्रजेच्या

स्वातंत्र्याचे जे हक्क आपण मिळविले आहेत, ते कायम रहाण्याला आपण पूर्वीप्रमाणेंच राजाच्या प्रत्येक कृत्यावर बारकाईनें नजर ठेवली पाहिजे, व त्याला अडचणींतून मोकळा सुटूं देतां उपयोगी नाहीं.

८ राजकीय कारणांची भर—आजपर्यंत इंग्लंडमध्यें धार्मिक बावतींतील मतभेदांवरून निरनिराळ्या वेळीं लोकांमध्यें निरनिराळे पक्ष उत्पन्न झाले होते. परंतु या वेळीं या पक्षभेदाला राजकीय बाबतींतील वर दिग्दर्शित केलेला मतभेद हेंच प्रधान कारण होतें. आणि त्या वेळीं राजकीय कारणामुळें एकदां उत्पन्न झालेले हे दोन पक्ष आजमितीलाही निराळ्या नांवांनीं व निराळ्या स्वरूपांत पण कायमच आहेत.

९ प्रत्येक पक्षांतील घटक—पहिल्या पक्षांत त्या वेळचा बहुतेक सरदारवर्ग, उपाध्याय वर्ग व बड्या जमिनदारांचा वर्ग यांचा समावेश होत असे. पूर्वी एक वेळ राजाला विरोध करणारे 'फॉकलंड' (Falkland), 'हाइड' (Hyde), 'कलपेपर' (Culpeper) वगैरे बरीच मंडळी या वेळीं पहिल्या पक्षांत सामील झाली होती. त्याचें मुख्य कारण **चार्लस** राजानें स्कॉटलंडमध्यें सामोपचाराचें धोरण स्वीकारून विरुद्ध बाजूच्या मंडळीला वश करून घेतलें हें होय. पोपवादी सर्व मंडळी याच पक्षाकडे होती. या पक्षाला पुढें 'रॉयलिस्ट' (Royalist) म्हणजे राजपक्ष हें नांव पडलें.

१० दुसऱ्या पक्षाच्या मंडळींत 'पिम' (Pym), 'हॅम्डेन' (Hampden) वगैरे मंडळी प्रमुख होती. मोठमोठ्या शहरांतील बडे व्यापारी व वाणी आणि खेड्यापाड्यांतील स्वतंत्र छोटे जमिनदार या मंडळींचा या दुसऱ्या पक्षाला पाठिंबा होता. एकदोन बडे सरदारहि या पक्षाचे अध्वर्यु होते, आणि बहुजनसमाजावर त्यांचें वजन दांडगें असल्यामुळें व श्रीमंतीमुळेंही ते दुर्लक्ष करण्यासारखे नव्हते. रूढ धर्ममतें व धर्मविधी मान्य नसणारे सर्व सुधारक अर्थातच या दुसऱ्या पक्षांतच होते. एकंदरींत त्या वेळीं या दोन्ही पक्षांचें बलाबल बहुतेक समानच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कदाचित कांटा झुकलाच तर दुसऱ्या म्हणजे प्रजापक्षाकडेच झुकण्याचा संभव ज्यास्त होता. असो.

११ पहिलीं कुत्सित नांवें—आतां पार्लमेंट सभेंत कोणताही विषय वादाला निघाला कीं, या दोन पक्षांत अहमहमिका सुरू होऊं लागली. वादाला रंग चढे तसतसें भांडण विकोपाला जाई. दोन्ही पक्षांची मंडळी एकमेकांना प्रथम कुत्सित नांवें (nick names) ठेवूं लागली. पण तींच नांवें पुढें प्रचारांत येऊन मान्यता

पावली. राजपक्षाच्या मंडळीला विरुद्ध पक्षाच्या मंडळीनें ' शिलेदार ' (Cavalier) असें नांव ठेवलें व राजपक्षीय मंडळी प्रजापक्षाच्या पुढाऱ्यांना त्यांच्या डोक्याचे केंस राखण्याच्या विशिष्ट तऱ्हेवरून ' चक्रशीर्ष ' (Round head) असें म्हणूं लागली ! पुढें कांहीं वर्षांनीं राजपक्षाला ' टोरी ' (Tory) व प्रजापक्षाला ' व्हिग ' (Whig) हीं नांवें प्रचारांत आलीं. हल्लीं त्याच पक्षांना अनुक्रमें ' काँझर्वेटिव्ह ' (Conservative) व ' लिबरल ' (Liberal) असें म्हणतात. आपण त्यांच्या ऐवजीं आपल्याकडे आतां बहुतेक सर्वांच्या परिचयाचे झालेले ' नेमस्त ' (Moderate) व ' जहाल ' (Extremist) हे शब्द वापरूं.

१२ चार्लसचें इंग्लंडमध्यें आगमन—चार्लस राजा स्कॉटलंडमध्यें स्थिरस्थावर करून इंग्लंडला आला, तेव्हां लंडनच्या नागरिकांनीं त्याचें प्रेमपुरस्सर स्वागत केलें. हें पाहून पार्लमेंटमधील जहाल मंडळीला भीति वाटूं लागली. तितक्यांत अशी एक बातमी पसरली कीं, इंग्लंडमधील जहाल पक्षाच्या पुढाऱ्यांचा स्कॉट पुढाऱ्यांशीं झालेला राजद्रोही स्वरूपाचा पत्रव्यवहार राजाला सांपडला असून तो त्याबद्दल अपराध्यांना कडक शासन करणार आहे. अशा रीतीनें लोकसभेच्या पुढाऱ्यांचीं मनें साशंक झालीं असतां, या प्रकरणाच्या आरंभीं सांगितलेली आयर्लंडमधील भयंकर बातमी इंग्लंडमध्यें पसरली व पार्लमेंटमध्यें कडाक्याचे वादविवाद चालू झाले.

१३ जहालांचा जाहिरनामा—जहाल पक्षाचा राजाच्या शब्दावर विश्वास नव्हता, व त्याची दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकप्रियता आपल्या नाशाला कारणीभूत होईल अशी त्यांना धास्ती वाटूं लागली होती. म्हणून लोकांत वाढत जाणारी राजनिष्ठेची लाट वेळींच थांबवून धरून प्रजेचें स्वातंत्र्य सुरक्षित राखण्याची कांहींतरी तजवीज केली पाहिजे असा विचार करून त्यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहिरनाम्यांत (The Grand Remonstrance) **चार्लस** राजा गादीवर आल्यापासून राज्यकारभारांत कोणकोणत्या चुका (misgovernment) झाल्या, त्या नमूद केल्या असून त्याच्या हल्लींच्या कार्यपद्धतीविषयींही गैरविश्वास प्रगट केलेला होता. ' पोपवादी मंडळीचें राजदरबारांत प्रस्थ माजलें असल्यामुळें इंग्लंड व स्कॉटलंडमध्यें मूर्खपणाचे जुने धार्मिक आचार व विधि सुरू झाले आहेत, त्यांमुळें राज्याला पोपपासून धोका येण्याचा संभव आहे, व या पोपवादी मंडळीच्या चिथावणीवरूनच आयर्लंडमध्यें दंगे झाले ' असेंहि या जाहिरनाम्यांत ध्वनित केलें होतें.

१४ जाहिरनाम्याचा पार्लमेंटमधील वाद—नेमस्त पक्षाला हा जाहिरनामा म्हणजे शांत झालेल्या असंतोषाला चेतविण्याचा प्रयत्न आहे व ही जहाल मंडळी मुद्दाम होऊन राजाविरुद्ध भांडण उकरून काढीत आहे असें वाटत असे. या जाहिरनाम्या संबंधीचा वाद पार्लमेंटमध्यें निघाला त्या वेळीं दोन्ही पक्षांमधील भांडण इतकें विकोपास गेलें कीं, एक वेळ तर प्रत्यक्ष मारामारीवर प्रसंग येतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. लंडनच्या रस्त्यांतून तर दोन्ही पक्षांची अनुयायी मंडळी हातघाईवर आलीच.

१५ दोन्ही पक्षांची चुरस—राष्ट्रांत नेमस्त व जहाल पक्षांपैकीं कोणाचें वजन जास्त आहे याची परीक्षा होण्याचीच ती वेळ होती; व ज्या पक्षाचें वजन जास्त दिसून येईल त्याच्या तंत्राप्रमाणेंच पुढें राष्ट्राचा कारभार चालावयाचा होता. दोन्ही पक्ष हट्टाला पेटले होते. दोन्ही बाजूला सभासदांची संख्या बहुतेक सारखीच होती. पण शेवटीं बरेच दिवसपर्यंत कडाक्याचा वादविवाद झाल्यावर जहाल पक्षाच्या बाजूला १५९ मतें व नेमस्त पक्षाच्या बाजूला १४८ मतें पडून ११ मतांनी जहालांचा विजय झाला. जहाल मंडळीला या प्रश्नाचें इतकें महत्त्व वाटत होतें कीं, त्यांचा एक पुढारी 'ऑलिव्हर क्रॉमवेल' यानें सभेची बैठक आटोपल्यावर सभागृहांतून बाहेर पडतांना असे उद्गार काढले कीं, 'या वेळीं जर आमचा पराभव झाला असता तर मी माझी सगळी इस्टेट विकून टाकून अमेरिकेला निघून गेलों असतों.'

१६ नेमस्तांचें धोरण—अशा रीतीनें जहाल मंडळीचा विजय झाला खरा, पण नेमस्त मंडळीनें पाहिलें कीं, हा विजय फक्त ११ च मतांनीं झालेला असून राजानें जर राष्ट्राच्या कायद्यांना मान देऊन आपल्या वर्तनांत नेमस्तपणा राखला तर लौकरच आपल्या बाजूचें बहुमत होण्याला अडचण पडणार नाहीं. 'हाइड' (Hyde), 'फॉकलंड' (Falkland), प्रभृति एकदां विरुद्ध बाजूला असलेली मंडळी आतां राजाची मुख्य सल्लागार बनली; व सर्व गोष्टी सुरळीत चालतील असें दिसूं लागलें. परंतु जहाल पक्षाच्या मंडळीला जाहिरनाम्याच्या बाबतींतला हा विजय पुरेसा वाटेना. राजाच्या हेतूबद्दल ते नेहमीं साशंक असत, व पोपवादी मंडळीची भीति तर त्यांना चैन पडूं देत नसे.

१७ संकटाची चर्चा—इतक्यांत रोमन कॅथोलिक लोकांनीं गुप्त कट केल्याच्या बातम्या उठूं लागल्या, आणि लंडनमधील देवळांतून इंग्रजांच्या स्वतंत्र धर्म-संस्थेवर (Established Church) गदा येण्याच्या काल्पनिक संकटाबद्दल चर्चा होऊं लागली. अखेरीस रोमन कॅथोलिक पाद्र्यांचा लोकांना इतका राग आला

कीं, त्यांची भर रस्त्यांत छीः थू होऊं लागली. सरदारसभेच्या बैठकींना हजर रहाण्याचीही त्यांना पंचाईत पडूं लागली. तेव्हां शेवटीं त्यांनीं आपल्या गैरहजिरींत पास झालेले कायदे आपल्याला मान्य नाहींत असें जाहिरपत्र काढलें. याबद्दल लोकसभेच्या पुढाऱ्यांनीं त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांची किल्ल्यांत रवानगी केली.

१८ राजाची युक्ति--राजाला या 'ब्राह्मणां'वर (Bishops) होत असलेला जुलूम सहन होईना. त्यानेंही उलट लोकसभेच्या सभासदांना दहशत घालण्याची एक युक्ति योजिली. 'हॉलिस' (Hollis), 'हॅमडेन', 'पिम', 'हेसलरिग' (Haselrig) आणि 'स्ट्रोड' (Strode) या पांच लोकसभेच्या पुढाऱ्यांवर व 'किंबोल्टन' (Kimbolton) नांवाच्या सरदारावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याविषयीं त्यानें आपल्या कायदेपंडितांना (Attorney General) सांगितलें. इ० स० १६४२ च्या जानेवारीच्या तिसऱ्या तारखेस सरकारी कायदेपंडितानें पार्लमेंट सभेंत या सहा इसमांविरुद्ध राजद्रोहाचे अंगभूत असे एकंदर सात आरोप (seven articles) वाचून दाखविले. * 'किंबोल्टन'नें तावडतोब उठून या आरोपांचा इनकार केला (denied the charges); इतक्यांत 'पिम'चा नोकर सभागृहाच्या दाराशीं येऊन त्यानें 'पिम'ला सांगितलें कीं, राजाच्या हुकमानें राजाच्या माणसांनीं आपल्या घरीं जाऊन आपल्या लिहिण्याच्या खोलीला व पेट्यांना कुलूप ठोकलें आहे. हॉलिसच्या घरूनहि तशीच बातमी येऊन पोंचली. पिमनें लोकसभेंत ही गोष्ट सांगितली, तेव्हां राजाचें हें कृत्य बेकायदेशीर आहे (Both law and privilege have been violated); असा लोकसभेनें ठराव केला व या कृत्याबद्दल राजाला जाब देण्यास कसें भाग पाडावें या गोष्टीचा विचार सभेंत होण्याला सुरवात झाली. इतक्यांत राजाचा लष्करी अधिकारी (Sergeant-at-Arms) सभागृहांत येऊन त्यानें अध्यक्षाला राजाचा असा निरोप (Royal message) कळविला कीं, 'पिम'प्रभृति पांच सभासदांना राजद्रोहाच्या आरोपाबद्दल तावडतोब आपल्या हवालीं करा. हा लष्करी अधिकारी आपला राजदंड (Mace) बरोबर

* हे आरोप येणेंप्रमाणें होतेः—(१) सरकार व कायदा उलथून पाडणें. (२) राजद्रोही जाहिरनामा (The Grand Remonstrance) तयार करणें. (३) सैन्यांत फितुरी करणें. (४) स्कॉटिश बंडखोरांना इंग्लंडांत बोलावणें. (५) पार्लमेंटचे हक्क व अस्तित्व नाहींसे करण्याचा प्रयत्न करणें. (६) दंगे उभारणें. (७) राजाविरुद्ध लढाई करणें.

आणावयास विसरला होता, तेव्हां अध्यक्षानें तो घेऊन या म्हणून त्यास सांगितलें. व तो बाहेर निघून गेल्यावर चार सभासदांचें एक ' डेप्युटेशन ' (Deputation) नेमून राजाला असा निरोप पाठविला कीं, ' या प्रश्नाचें उत्तर शक्य तितक्या लौकर आपल्याकडे रवाना होईल आणि दरम्यान ज्यांच्यावर आपण राजद्रोहाचा आरोप केला आहे, ते सभासद आपल्यावरील आरोप कायदेशीर असल्यास त्यांचा जाब देण्याला केव्हांही तयार रहातील.' तसेंच त्या पांच सभासदांना अध्यक्षांनीं असा हुकूम केला कीं, ' तुम्ही दररोज पार्लमेंटसभेंत हजर रहात चला.'

१९ लोकसभेचा हुकूम—दुसऱ्या दिवशीं राजाला काय उत्तर पाठवावें याचा विचार करण्यासाठीं सगळ्या लोकसभेची ' कमिटी ' (Grand Committee) भरली व चर्चा सुरू झाली. संध्याकाळच्या वेळीं ज्या सभासदांच्या घरांना राजानें कुलपें ठोकलीं होतीं, त्यांच्या घरांचीं तीं कुलपें काढून टाकून कुलूप घालणाऱ्या अधिकाऱ्यांना पकडून ठेवावें असा लोकसभेचा हुकूम सुटला. तिसऱ्या दिवशीं सकाळीं ८ वाजतां पुन्हां लोकसभेची बैठक चालू झाली. १२ वाजेपर्यंत एकसारखें काम चालू होतें राजानें गुन्हेगार ठरविलेल्या पांच सभासदांनीं सर्व आरोपांबद्दल मुद्देसूद भाषण केलें. हॅम्डनच्या भाषणाचा तर सभासदांवर फारच उत्कृष्ट परिणाम झाला. १२ वाजतां सर्व सभासद तासभर विश्रांति घेण्यासाठीं उठले (adjourned). दरम्यान राजा या पांच सभासदांना जबरीनें घेऊन जाणार आहे अशी बातमी येऊन पोंचली; तथापि विश्रांती घेऊन सभासद परत आपल्या जागीं आले त्या वेळीं अध्यक्षांच्या हुकमाप्रमाणें हे पांचही सभासद आपापल्या जागीं येऊन वसले. या पांच असामींनीं आतां काय करावें याबद्दलची चर्चा सभासदांत सुरू झाली; इतक्यांत एक फ्रेंच लष्करी अधिकारी दरवाजाशीं येऊन त्यानें अशी वर्दी दिली कीं, राजा लष्करी अधिकाऱ्यांनिशीं राजवाड्यांतून निघाला असून तो थोड्याच वेळांत पार्लमेंट सभागृहामध्यें येईल. तेव्हां त्या पांच सभासदांनीं जलदी करून सभागृहांतून पाय काढला. ते एका बाजूनें सभागृहांतून बाहेर पडतात न पडतात, तोंच दुसऱ्या बाजूनें **चार्लस** राजा ४०० सशस्त्र लोक बरोबर घेऊन सभागृहांत दाखल झाला.

२० सावजें निसटलीं—सभासदांनीं नेहमीं प्रमाणें टोप्या काढून राजाचें स्वागत केलें (doffed their hats). राजानेंही उलट टोपी काढून सभासदांचा नमस्कार घेतला. पण या सभासदांत राजाला हवे असलेले पांच असामी कुठें दिसेनात. राजानें ताडलें कीं आपलीं सावजें आपल्या हातांतून निसटलीं (birds were flown).

रागानें त्याच्या तोंडांतून शब्द निघेना; एक पाय अध्यक्षाच्या खुर्चीवर ठेवून तो स्तब्ध उभा राहिला; कांहीं वेळानें त्याला वाचा फुटली. 'पिमप्रभृति पांच सभासदांवर राजद्रोहाचा आरोप आहे आणि राजद्रोह्यांना कोणीं आश्रय देतां कामा नये,' असे शब्द कसेबसे उच्चारून 'पिम येथें आहे काय?' असा त्यानें दरडावून प्रश्न केला. पण कोणीच उत्तर देईना. राजानें पुनः प्रश्न केला 'हॉलिस येथें आहे काय?' तरीही उत्तर नाहीं. तिसऱ्याचें नांव घेऊन राजानें पुनः तसाच प्रश्न केला. तेव्हां सभेच्या अध्यक्षानें सांगितलें कीं, "या ठिकाणीं सभेच्या हुकुमाशिवाय माझे डोळे पाहूं शकत नाहींत व तोंड बोलूं शकत नाहीं!" ‡ आपला डाव फसला असें पाहून राजा रागानें जावयास निघाला. सभागृहाच्या बाहेर लोकांचीही गर्दी झाली होती! या गर्दीतून "आमचे हक्क! आमचे हक्क!" (Privilege! Privilege!) म्हणून एकच आरोळी सुरू झाली! असो.

२१ बंदरांची नाकेबंदी—त्या दिवशीं रात्रीं लंडन शहरामध्यें जिकडे तिकडे चळवळ दृष्टीस पडत होती. लोकांचीं मनें दुःखानें व संतापानें व्याप्त झालीं होतीं. इतक्यांत राजाचे आरोपी देशाबाहेर पळून जातील म्हणून बंदरांची नाकेबंदी केली आहे असा जाहिरनामा (Proclamation) लागला, व दुसरा असा हुकूम (Edict) निघाला कीं या पांच आरोपींना कोणींहि आश्रय देऊं नये. पण लंडनचे नागरिक नेहमींप्रमाणें या वेळींही स्वातंत्र्याचे रक्षणकर्ते बनले. पिमप्रभृति पांचही सभासदांना लंडनमध्येंच एका गल्लींत (Coleman street) आश्रय मिळाला. दुसऱ्या दिवशीं राजाची स्वारी सशस्त्र सैनिकांनिशीं तपासासाठीं बाहेर पडली. पण कोणींही त्याला दाद लागूं दिली नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या प्रतिनिधींचें संरक्षण करण्यासाठीं कित्येक नागरिक सशस्त्र होऊन पार्लमेंटच्या सभागृहाभोंवतीं पहारा करूं लागले.

२२ पार्लमेंटची बैठक—पार्लमेंट सभेनें एक कमिटी (Committee of the House) नेमून राजानें लोकांच्या हक्कावर गदा आणली (encroachment), त्याबद्दलचा निषेध प्रदर्शित करणें आणि पिमप्रभृति पांच सभासदांना सन्मानपूर्वक पुनः लोकसभेमध्यें आणून बसविणें हीं कामें त्या कमिटीकडे सोंपविलीं. राजाच्या बाजूच्या नेमस्तांना कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. राजाच्या या मूर्खपणाच्या अत्याचारामुळें त्यांना लज्जेनें मान खालीं घालावी लागली. कित्येकांना तर

‡ 'He had neither eyes to see nor tongue to speak in that place but as the house was pleased to direct.'

जिवाच्या भीतीनें पार्लमेंट सभेमध्यें जाणेंच वर्ज्य करावें लागलें. लोक इतके बिथरले होते कीं, राजाला राजवाड्यांत राहणेंही सुरक्षित वाटेना. त्या महिन्याच्या १० व्या तारखेस राजा लंडन सोडून निघून गेला. दुसऱ्या दिवशीं लोकांच्या प्रचंड घोळक्यांतून मिरवत मिरवत राजानें राजद्रोही म्हटलेले सभासद पार्लमेंट सभागृहापर्यंत येऊन पोंचले (triumphant return). सभेच्या अध्यक्षानें व इतर सभासदांनीं उत्थापन देऊन त्यांचें स्वागत केलें. व नंतर पिमनें सर्वांच्या वतीनें लंडनच्या नागरिकांचे आपल्याला आश्रय दिल्याबद्दल व आपला सत्कार केल्याबद्दल आभार मानले.

२३ इ० स० १६४२—फेब्रुवारी अखेरच्या सुमारास राणी राजवाड्यांतील राजमुकुटाचीं हिरेमाणकें (Crown jewels) घेऊन हॉलंडला पळून गेली. आणि तीं तिकडे विकून तिनें राजाला शस्त्रास्त्रें व इतर रणसाहित्य पुरविण्याची तजवीज केली. पुढें कित्येक दिवसपर्यंत राजा व पार्लमेंटचे सभासद यांच्यामध्यें सामोपचाराचें बोलणें चालू होतें (Messages passed between the king and the Parliament). परंतु अखेर ‘ साम ’ न होतां दिवसेंदिवस दोघांमधील वितुष्ट वाढतच चाललें. लोकसभेच्या पुढाऱ्यांची खात्री झाली होती कीं, राजाला पुनः सत्ता प्राप्त झाली तर तो आपल्याला चिरडून टाकल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां त्याला निर्विष सापाच्या पंक्तीला बसवावयाचा तर सैन्यावरील अधिकार त्याच्याकडे ठेवून उपयोगी नाहीं. म्हणून त्यांनीं इ. स. १६४२ मध्यें लष्करी सत्ता राजाच्या हातून काढून घेणारें एक बिल (A Militia Bill) पार्लमेंटमध्यें मंजूर करून संमतीसाठीं राजाकडे पाठविलें. राजा सुखासुखी अशा कायद्याला संमति थोडीच देणार ! तेव्हां कदाचित् बळजबरीनें हे लोक आपल्याला संमति देण्याला भाग पाडतील, म्हणून तो उत्तरेकडे यॉर्क येथें निघून गेला.

२४ हल—तिकडे जात असतांना त्याला असें आढळून आलें कीं, लंडनमधील नागरिकांचीं कृत्यें उत्तरेकडच्या लोकांना सर्वस्वीं कांहीं पसंत नाहींत. व क्रियेमागून प्रतिक्रिया व्हावयाचीच त्याप्रमाणें उत्तरेकडे आपल्याविषयीं बऱ्याच लोकांची सहानुभूती आहे. ‘ हल ’ (Hull) येथें शस्त्रास्त्रांचा बराच मोठा सांठा होता. पण तेथले नागरिक **चार्लस**ला आंत घेण्यालाच कबूल होईनात ! शेवटीं यॉर्क येथें प्रजापक्षीय पुढाऱ्यांनीं राजाकडे आपल्या हक्कांबद्दलची एक १९ कलमी यादी पाठवून त्या यादीला राजाची संमति मागितली. राजा अर्थातच ऐकेना. इंग्लंडच्या सैन्यावरचा अधिकार राजानें पार्लमेंटच्या हातीं द्यावा या मागणीला तर तो मुळींच कबूल होण्यासारखा

नव्हता. कारण आतां प्रजापक्षीय पुढाऱ्यांचा जसा राजावर विश्वास नव्हता, तसा राजाचाही पार्लमेंट सभेवर विश्वास नव्हता. आणि आपल्या हातचा हा अधिकार गेल्यावर आपल्याला निव्वळ पार्लमेंटच्या हातांतील बाहुलें बनून रहावें लागणार हें तो समजून चुकला होता.

२५ पार्लमेंटचें सैन्य—इकडे पार्लमेंटनें राजाची संमति वगैरे न घेतांच 'राजा व पार्लमेंट यांच्या संरक्षणासाठीं' म्हणून सैन्य जमा करण्याला आरंभ केला होता. व या सैन्याचा जरूर लागल्यास राजाविरुद्ध उपयोग करण्याचा पार्लमेंटनें निश्चयच केला होता. आतां पार्लमेंट सांगेल त्याप्रमाणें सर्व अधिकार सोडून देऊन निवळ नामधारी राजा होऊन रहावें एक, नाहीं तर आपले अधिकार संभाळण्यासाठीं शस्त्र उपसावें हा दुसरा, याशिवाय राजाला तिसरा मार्ग राहिला नाहीं. त्यानें बराच विचार करून शेवटीं दुसरा मार्ग पत्करला, आणि इ. स. १६४२ च्या आगस्टच्या २५ व्या तारखेस **नॉटिंगहॅम** (Nottingham) येथें किल्ल्यावर राजचिन्हांकित निशाण उभें केलें (unfurled the Royal Banner). लवकरच दहा हजार लोक या निशाणाभोंवतीं गोळा झाले.

प्रकरण ४७ वें.

लढाई जुंपली !

(इ. स. १६४२ इ. स. १६४८)

[१ लढाईचा बावटा–राजपक्षीय सैन्य. २ पार्लमेंटचे सैनिक–उभय पक्षांचें बलाबल. ३ लढाईला सुरवात ४ 'एजहिल'ची लढाई–स्कॉटलंडची मध्यस्थी–ब्रिसल, ग्लावसेस्टर, न्यूबेरी–चालग्रोव्ह. ५ सुधारकांतील उपपक्ष. ६ ऑलिव्हर क्रॉमवेल–'लोह हृदयी' शिपाई. ७ आयरिश आणि स्कॉट लोकांचा प्रवेश. ८।९ पुढील हकीगत. १० मँचेस्टरची हकालपट्टी. ११ क्रॉमवेलचें वजन. १२।१३ स्वातंत्र्यवादी सुधारक. १४ नेसबीची लढाई–स्कॉटलंडमधील लढाया. १५ पार्लमेंटमधील दुफळी. १६ चार्लसची आशा–राजा कैदी झाला. १७ समेटाचें बोलणें. १८ स्कॉट लोकांचा द्रव्यलोभ–राजा पार्लमेंटच्या सैन्याच्या हातांत सांपडला. १९ स्वातंत्र्यवादी पक्षाची अरेरावी. २०।२१ लष्करचा वरचष्मा–२२ राजा निसटला–पण पुढें ?]

१ लढाईचा बावटा—राजानें लढाईचा बावटा उभारल्याबरोबर इंग्लंडमध्यें प्रत्येक जिल्ह्यांत उभय पक्षांचे लोक शस्त्रें घेऊन उठले. राजपक्षीय सैन्यांत अनुभवी

सैनिकांचा व सुखवस्तु गृहस्थांचा (Gentlemen) बराच भरणा होता. कसलेले घोडेस्वारही त्या सैन्यांत पुष्कळ होते. परंतु राजाच्या हातचा तोफखाना व दारूगोळा तितकासा चांगला नव्हता आणि पैशासाठीं तर त्याला सर्वस्वीं आपल्या राजनिष्ठ अनुयायांवरच अवलंबून राहावें लागत असे. या अनुयायांनीं मात्र त्याला या वेळीं दगा दिला नाहीं. त्यांनीं आपल्याजवळचे दागदागिने व हांडेंभांडें विकून व जमिनी गहाण टाकून राजाला या वेळीं पैशाची मदत केली.

२ पार्लमेंटचे सैनिक—उलट पक्षीं पार्लमेंटच्या बाजूचें सैन्य अडाणी कुणबी (plough-boys) व वाणी (tradesmen) यांनीं भरलेलें असून त्यांना लष्करी शिक्षणही मिळालेलें नव्हतें. तथापि लंडन शहर व त्याच्या भोंवतालचा मुलूख त्यांच्या ताब्यांत असून इतरही बरींच संपन्न शहरें त्यांच्या बाजूला होतीं. शिवाय बंदरांचें संरक्षण करणारें आरमारही त्यांच्या ताब्यांत होतें. आणि कर बसविण्याचा व ते वसूल करण्याचा अधिकार पार्लमेंटच्याच हातीं असल्यामुळें कितीही दिवस लढाई चालली, तरी त्यांना पैशाची अडचण पडण्यासारखी नव्हती. असो.

३ लढाईला सुरवात—दोन तीन महिने उभयपक्षांची तयारी होण्यांत गेल्यावर आक्टोबरच्या अखेरीस लढाईला सुरवात झाली. राजसैन्यांतील घोडदळाचें आधिपत्य स्वतः राजा व त्याचा भाचा रूपर्ट (Prince Rupert) यांनीं स्वीकारलें. व लिंडसे (Lindsey) नामक सरदार पायदळाचा ‘कमांडर’ (Commander) झाला. पार्लमेंटनें आपल्या सैन्याचें आधिपत्य इसेक्स (Essex) नामक सरदाराला दिलें.

४ एजहिलची लढाई—दोन्ही सैन्यांमध्यें पहिली चकमक ‘ एजहिल ’ (Edgehill) येथें उडाली. त्यांत लिंडसे जखमी होऊन शत्रूच्या हातीं लागला. पण त्यामुळें राजसैन्याचा पराभव झाला असें नाहीं. मात्र चार्लसला आपला लंडनवर चाल करून येण्याचा बेत तहकूब करावा लागला आणि तो हिंवाळा आणखीं तयारी करण्यांत घालवावा म्हणून ऑक्सफर्ड येथें गेला. इ. स. १६४३ च्या आरंभीं स्कॉटलंडच्या पार्लमेंटनें इंग्लंडच्या या यादवींत मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला पण तो फुकट गेला. पुनः लढाईला तोंड लागून ‘ ब्रिसल ’ (Bristol) नांवाचें संपन्न शहर राजसैन्याच्या हातीं आलें. नंतर चार्लसनें ‘ ग्लावसेस्टर ’ (Gloucester) शहराला वेढा दिला. तेंही शहर पडण्याच्या बेतांत आलें होतें. परंतु पार्लमेंटच्या सैन्याचा अधिपति इसेक्स हा त्वरा करून चौदा

हजार सैन्यानिशीं लंडनहून येऊन पोंचल्यामुळें राजाला वेढा उठविणें भाग पडलें. पुढें कांहीं दिवसांनीं 'न्यूबेरी' च्या (Newbury) लढाईंत राजपक्षीय सरदार फॉकलंड (Falkland) मारला गेला. त्यामुळें त्या पक्षाचें मोठें नुकसान झालें. उलटपक्षीं 'चालग्रोव्ह' (Chalgrove) च्या लढाईंत प्रजापक्षीय पुढारी हॅम्डेन हा मारला गेल्यामुळें त्या पक्षाचाही आधार कमी झाला होता. इ. स. १६४३ साल अशा रीतीनें उभय पक्षांना सारखेंच हानिकारक गेलें.

५ सुधारकांतील उपपक्ष—देशांत ही यादवी चालली असतांनाच प्रजापक्षीय 'सुधारक' पक्षांत एक उपपक्ष उत्पन्न होऊं लागला होता. इंग्लंडच्या देवस्थानखात्यांत (Church of England) मुलकी अधिकाऱ्यांप्रमाणेंच एकावर एक वरिष्ठ अधिकाऱ्यांची परंपरा लागलेली असे, व वरिष्ठ अधिकारावर असलेल्या उपाध्यायांचे हुकूम त्यांच्या हाताखालच्या पाद्र्यांना मानावे लागत. ही स्थिति इष्ट नसून प्रत्येक ख्रिश्चन व्यक्तिसमूह (Every Christian Congregation) हा आपल्या धार्मिक आचाराविचारांपुरता स्वतंत्र (Independent Church) असला पाहिजे असें या नव्या पक्षाचें मत होतें. आणि राजकीय बाबतींत तर राजसत्ता अजिवात नाहींशी करून प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें पाहिजे असें हा पक्ष प्रतिपादन करीत असे. जहालांतील या 'आमूलाग्र' (Root and Branch) सुधारणा करूं इच्छिणाऱ्या पक्षाला '**स्वा**तंत्र्यवादी' पक्ष असें आपण नांव देऊं.

६ ऑलिव्हर क्रॉमवेल—या पक्षाचा या वेळचा पुढारी ऑलिव्हर क्रॉमवेल (Oliver Cromwell) हा होता. वयाचीं पहिलीं कांहीं वर्षे 'हंटिंगडन' (Huntingdon) येथील आपल्या शेतवाडींत घालविल्यावर तो वयाच्या ३०।३२ व्या वर्षी लोकसभेचा सभासद झाला. पार्लमेंट सभेंतील त्याचें वर्तन गबाळ्यासारखें (slovenly) असे. त्याचें भाषणही एकाद्या अडाणी माणसाप्रमाणेंच असे. पण पार्लमेंटची राजसैन्याशीं लढाई सुरू झाल्यावर त्यानें प्रजापक्षीय सैन्याच्या एका भागाचें आधिपत्य स्वीकारलें, आणि इ. स. १६४३ या वर्षी पार्लमेंटच्या सैन्याचा दक्षिणेकडे पराभव होत असतां यानें उत्तरेकडे राजपक्षीय सैन्यावर बरेंच जय मिळविले. त्या वेळीं रणांगणांतील त्याचें शौर्य व चातुर्य उघडकीस आलें. त्यानें पाहिलें कीं, राजसैन्याला जय मिळतो त्याचें कारण त्या सैन्यांत शिस्त आहे हें होय. आपलें सैन्य बेशिस्त व अडाणी कुणबटांचें (clownish soldiers) असल्यामुळें या सैन्याची शिस्तवार मांडणी करून या कुणबटांच्याच अंतःकरणांत ईश्वराविषयीं निष्ठा व

आपल्या धर्माविषयीं प्रेम उत्पन्न करून त्यांचीं अंतःकरणें लोखंडासारखीं कठीण केल्याशिवाय आपल्या सैन्याला यश येणार नाहीं. हॅम्डेन गेल्यामुळें प्रजापक्षीय सैन्याला बराच धक्का बसला होता. पण क्रॉमवेलनें हॅम्डेनची उणीव भरून काढली इतकेंच नव्हे, तर त्याच्यापेक्षां कांकणभर ज्यास्तच कामगिरी करून दाखविली. त्याला आतां कर्नलचा (Colonel) हुद्दा मिळाला होता. त्यानें आपल्या 'पल-टणीं 'त (Regiment) आपल्यासारख्याच दणदाकट लोकांची भरती करून त्यांना शिस्तीच्या व कवाइतीच्या मान्याखालीं असे तयार करून ठेवलें कीं, लवकरच क्रॉमवेलचे 'लोहहृदयी' (Ironsides) शिपाई लढाईंत अजिंक्य होऊन शत्रूला थरथर कांपवूं लागले !

७ आयरिश आणि स्कॉट लोकांचा प्रवेश—चार्लसनें या वेळीं आणखीं एक चूक केली. त्यानें **आयरिश** लोकांना आपल्या मदतीला बोलाविलें. या त्याच्या कृत्यानें आयरिश लोकांनीं थोड्या दिवसांपूर्वीं केलेल्या अत्याचारांनीं मनांत जळफळत असलेले राजाचे कांहीं मित्र त्याला सोडून गेले आणि **चार्लस** राजा आयरिश लोकांची मदत मागतो, तर आपण स्कॉट लोकांना वश करून घेऊं या म्हणून पार्लमेंटनें स्कॉट लोकांशीं बोलणें सुरू केलें.

८ पुढील हकीकत—स्कॉट सुधारकांचीं मतें इंग्लंडमधील स्वातंत्र्यवादी पक्षाशीं जुळतीं होतीं. त्यांनीं तुम्ही इंग्लंडमध्यें आमच्या सारखीच धर्मपद्धति सुरू करीत असाल, तर आम्ही तुम्हाला राजाविरुद्ध मदत करूं असें सांगितलें. आणि उभयपक्षांमध्यें स्वातंत्र्यवादी पक्षाला मान्य असलेल्या समान धर्मसंस्थेच्या (Uniformity of Religion) पायावर दोन्ही देशांची एकी व्हावी व प्रत्येक देशांतील पार्लमेंट आपल्या देशांतील राज्यकारभार पाहण्याला स्वतंत्र (Freedom of Parliament) असावें अशा अटींवर स्कॉट लोकांनीं इंग्लंडमधील प्रजापक्षाला मदत करण्याचें कबूल केलें. दोघांचे करारमदार (Solemn League and Covenant) ठरले, आणि इंग्लंडच्या धर्मसंस्थेची स्कॉटलंडच्या धर्मसंस्थेशीं जुळती अशी नवी मांडणी करण्यासाठीं पार्लमेंटच्या दीडशें सभासदांची एक सभा भरून सार्वजनिक प्रार्थनेबद्दलचे वगैरे नवीन नियम करण्यांत आले. आणि हे नियम पाळण्याचें ज्यांनीं नाकारलें अशा सुमारें दोन हजार पाद्र्यांना त्यांच्या देवळांतून हांकून लावण्यांत आलें !

९ इ० स० १६४४ च्या जानेवारी महिन्यांत स्कॉट लोकांचें वीस हजार सैन्य ठरल्याप्रमाणें इंग्लंडांतील प्रजापक्षाच्या मदतीला आलें. दक्षिणेकडे पार्लमेंटच्या सैन्याचा

राजसैन्यानें पराभव केला. परंतु उत्तरेकडे स्कॉट लोकांच्या मदतीनें क्रॉमवेल व त्याचें नवीन धर्तीचें लष्कर यांनीं राजसैन्याची धूळधाण उडवून टाकली. यॉर्क व न्यू कॅसल हीं शहरें क्रॉमवेलच्या हातीं लागलीं. पुढें न्यूबेरी (Newbury) येथें आणखी एक लढाई होऊन तींत **चार्लस** राजाचा पुरा पराभव झाला.

१० मँचेस्टरची हकालपट्टी—या वेळीं प्रजापक्षाचा सेनापति सरदार मँचेस्टर (Lord Manchester) याला क्रॉमवेलनें सांगितलें कीं, पळूं लागलेल्या राजसैन्याचा तूं पाठलाग कर. परंतु त्यानें तसें करण्याचें नाकारल्यामुळें क्रॉमवेलचें व त्याचें वितुष्ट आलें. पुढें इ. स. १६४५ मध्यें क्रॉमवेलच्या वजनामुळें **पार्लमेंटनें** असा एक ठराव केला कीं, पार्लमेंटच्या सभासदांकडे सैन्याचें आधिपत्य असूं नये. (Self-denying Ordinance) या ठरावामुळें मँचेस्टरला आपलें सेनापतित्व सोडावें लागलें.

११ क्रॉमवेलचें वजन—फेअरफॅक्स (Fairfax) नामक सरदार आतां पार्लमेंटच्या सैन्याचा मुख्य सेनापति झाला. क्रॉमवेलही पार्लमेंटचा सभासद होता. पण पुढें त्याच्यापुरता अपवाद मानून त्याला घोडदळाचें आधिपत्य देण्यांत आलें, आणि पुढें लवकरच तो नांवानें नसला तरी वस्तुतः पार्लमेंटच्या सर्वच सैन्याचा अधिपति झाला.

१२ स्वातंत्र्यवादी सुधारक—क्रॉमवेल व त्याची नवीन धर्तीवर तयार झालेली सेना ही स्वातंत्र्यवादी पक्षाच्या लोकांनीं भरलेली होती हें मागें सांगितलेंच आहे. हे स्वातंत्र्यवादी लोक थोडे जहाल असले तरी अंतःकरणपूर्वक देशसेवा करणारे असून त्यांना धार्मिक बाबतींतील ढोंगासोंगाचा अत्यंत तिटकारा असे. हे परमेश्वराला भिऊन वागणारे (God-fearing) असून नीतिमान व सदाचरणी असत. बाह्य डामडौलाला ते मुळींच किंमत देत नसत, व साधेपणानें राहून हातीं घेतलेलें काम चिकाटीनें तडीस नेण्याची त्यांची हौस दांडगी असे.

१३ क्रॉमवेलनें आतां प्रजापक्षाच्या सर्वच सैन्यांत अशीच शिस्त बसविण्याचा उपक्रम केला. त्याचे सैनिक व सैन्यावरचे अधिकारी तंबूंत व बराकींत नियमानें प्रार्थना करूं लागले, जुवा खेळणें, दारू पिणें, व तदनुषंगिक इतर व्यसनें सैन्यांतून नाहींशीं झालीं, आणि सैनिक लढाईवर जाण्यास निघाले म्हणजे परमेश्वराच्या स्तुतिपर स्तोत्रांचे घोष ऐकूं येऊं लागले. अशा रीतीनें क्रॉमवेलच्या कडक शिस्तींत तयार झालेलें हें सैन्य ही यादवी आटपल्यावरही इंग्लंडच्या वतीनें युरोप खंडांत इतर

शत्रूंशीं लढत असतां युरोपखंडांतील उत्तमोत्तम (finest) सैन्याला भारी होत असे. असो.

१४ नेसबीची लढाई—या यादवींतील इंग्लंडमधली अखेरची लढाई इ. स. १६४५च्या जूनच्या १४ व्या तारखेस 'नेसबी' (Naseby) येथें होऊन तींत राज-सैन्याचा पुरा मोड झाला, व **चार्लस** राजा आश्रयासाठीं वेल्समध्यें पळून गेला. तिकडे स्कॉटलंडमध्यें राजपक्षीय सेनापति 'मॉँट्रोज' (Montrose) यानें थोडेसें सैन्य जमा केलें. त्यामुळें पुनः आपल्या पक्षाची सरशी होईल अशी राजाला आशा वाटूं लागली. परंतु लवकरच ही आशा नष्ट झाली. प्रजापक्षीय सेनापति 'लेस्ली' (Leslie) यानें 'फिलिफा' (Philiphaugh) च्या लढाईंत 'मॉँट्रोज'चा पराभव केला. दुसरा राजपक्षीय सेनापति रूपर्ट हाही शरण आला, आणि **चार्लस** राजा पुनः ऑक्सफर्ड येथें येऊन त्यानें पार्लमेंटशीं सामोपचाराचें बोलणें (negotiations) सुरू केलें.

१५ पार्लमेंटमधील दुफळी—अशा रीतीनें राजाविरुद्ध चाललेल्या लढाईंत पार्लमेंटचा पुरा जय झाला खरा (The Parliament was triumphant), पण आतां पार्लमेंटच्या सभासदांमध्येंच दोन तट (Factions) उत्पन्न झाले. एका पक्षाचें म्हणणें 'राजा नमतें घेत आहे तर त्याला पुन्हां गादीवर बसवून त्याची सत्ता मात्र नियंत्रित करून ठेवली म्हणजे झालें,' दुसऱ्या पक्षाचें म्हणणें 'यापुढें इंग्लंड-मध्यें राजा असूंच नये, प्रजासत्ताक राज्यपद्धति (Republic) स्थापन करून इंग्लंडचा कारभार चालवावा.' धार्मिक बाबतींतही क्रॉमवेलच्या अनुयायांचा फाजील साधेपणा सर्वांना मान्य नव्हता. स्कॉट लोक साधारणपणें पहिल्या पक्षाला अनुकूल होते, व क्रॉमवेल आणि त्याचें सैन्य दुसऱ्या पक्षाचा पुरस्कार करणारें होतें.

१६ चालसची आशा—**चार्लस**नें आतां प्रजापक्षीय सैन्यामध्यें ही फूट पडलेली पाहून त्यांतल्या त्यांत क्रॉमवेलच्या स्वातंत्र्यवादी (Republicans) पक्षापेक्षां नियंत्रित राजसत्तावादी पक्ष आपल्या बाजूचा होईल तर पहावा म्हणून खट-पट आरंभिली. इ. स. १६४६ च्या आरंभीं स्कॉट लोकांचें सैन्य **नीवर्क** (Newark) नामक शहराला वेढा देऊन बसलें होतें. **चार्लस** ऑक्सफर्डमध्यें होता. त्या शहराला प्रजापक्षीय सेनापती **फे**अरफॅक्स यानें वेढा दिला. फेअरफॅक्स आलेला पाहून एके दिवशीं रात्रीं **चार्लस** राजा गुप्तपणें शहरांतून बाहेर पडला, आणि **मे**च्या पांचव्या तारखेस 'नीवर्क' येथें जाऊन 'तुम्हीं काय कराल तें करा' म्हणून स्कॉट सैन्याच्या

स्वाधीन झाला (surrendered himself). स्कॉटिश पुढाऱ्यांनीं त्याला आदरानें वागविलें. तथापि कितीही झालें तरी तो आतां त्यांचा कैदी झालेला! स्कॉट लोकांचे धर्मोपदेशक त्याचा धिःकार करीत, व राजाला तो सर्व अपमान मुकाट्यानें सहन करावा लागे.

१७ समेटाचें बोलणें—राजा स्वाधीन झाल्यावर स्कॉटिश सैन्य त्याला घेऊन न्यू कॅसल (New Castle) येथें गेलें. आणि तेथून इंग्लंडच्या पार्लमेंटशीं पुन्हां समेटाचें बोलणें सुरू झालें. पार्लमेंटचें मागणें असें पडलें कीं, सुधारकांच्या मतांना अनुकूल असा नवीन धर्म इंग्लंडमध्यें स्थापन करण्याला राजानें कबुली द्यावी, इंग्लंडच्या खड्या सैन्याचें आधिपत्य नेहमीं पार्लमेंटकडे असावें, व आयर्लंडमध्यें राजप्रतिनिधि नेमण्याचा अधिकार पार्लमेंटकडेच असावा. राजा अशा रीतीनें हातपाय बांधून पार्लमेंटच्या स्वाधीन होण्याला कबूल होईना. तेव्हां हें बोलणें तितकेंच राहिलें.

१८ स्कॉट लोकांचा द्रव्यलोभ—पुढें कांहीं दिवसांनीं पार्लमेंटनें स्कॉट लोकांशीं असें बोलणें लाविलें कीं, **चार्लस** राजाला तुम्हीं आमच्या हवालीं करा. स्कॉट सैन्याच्या खर्चाची बरीच बाकी पार्लमेंटकडे येणें होती. राजा स्कॉट सैन्याच्या हातीं होता, तरी तो निष्कांचन झालेला असल्यामुळें त्याच्याकडून ही बाकी फिटण्यासारखी नव्हती. बरें, राजाला पार्लमेंटच्या हवालीं करावा तर पार्लमेंटमधील स्वातंत्र्यवादी पक्ष त्याच्या जिवावर उठलेला ! तेव्हां पुढें काय करावें अशी स्कॉट लोकांना विवंचना पडली. पण अखेर द्रव्यलोभाचा वरचष्मा होऊन स्कॉट लोक पार्लमेंटकडून चार लाख पौंड घेऊन राजाला इंग्रजांच्या स्वाधीन करण्याला कबूल झाले. हें बोलणें चालू असतां स्कॉट पुढाऱ्यांनीं पार्लमेंटकडे राजाच्या जिवाला अपाय होणार नाहीं अशाबद्दल खात्री मागितली. परंतु पार्लमेंटचे पुढारी उलट आम्ही आमच्या राजाचा जीव घेऊं म्हणून स्कॉटिश लोकांनीं संशय प्रदर्शित करावा याबद्दल त्यांच्यावरच रागावले! झालें, शेवटीं **चार्लस**च्या जिवाला अपाय होणार नाहीं अशी खात्री वाटून स्कॉट लोकांनीं त्याला पार्लमेंटच्या हवालीं केलें, आणि ते आपल्या देशीं निघून गेले.

१९ स्वातंत्र्यवादी पक्षाची अरेरावी—पण स्कॉट लोकांनीं विश्वासानें हवालीं केलेली ही **चार्लस** राजाच्या देहाची ठेव पार्लमेंटकडून नीट संभाळली गेली नाहीं. इंग्लंडमधील राजपक्ष व प्रजापक्ष यांमधील यादवी मुख्यतः क्रॉमवेलच्या सैन्याच्या जोरावर थांबून राजा पार्लमेंटच्या हातीं लागला होता. आणि क्रॉमवेल व त्याचें स्वातंत्र्यवादी लष्कर यांचाच या वेळीं देशांत वरपगडा होता. या स्वातंत्र्यवादी

पक्षाला इंग्लंडमधून राजसत्ता अजिबात नाहींशी करून टाकावयाची होती. पार्लमेंटमधील नियंत्रित राजसत्तावादी पक्ष या म्हणण्याला कबूल नव्हता, आणि तेथें याच पक्षाचें बहुमत होतें. परंतु या वेळीं सर्व सैन्य क्रॉमवेलच्या हातीं असल्यामुळें एकदम त्याला तोडणेंही या पक्षाला शक्य नव्हतें. म्हणून आतां लढाई थांबली आहे तेव्हां एवढें खडें सैन्य ठेवण्याची जरूरी नाहीं असें म्हणून थोड्याशा सैन्याला रजा देण्याचा विचार पार्लमेंटमध्यें चालू झाला. पण क्रॉमवेलचा स्वातंत्र्यवादी पक्ष आपलें लष्करी सामर्थ्या-मुळें प्राप्त झालेलें बल कमी करून घेण्याला कबूल होईना. इतकेंच नव्हे तर पार्लमेंट सभा ऐकत नाहींसें पाहून राजाला सामोपचारानें नाहीं तर बळजबरीनें पार्लमेंटच्या हातून हिसकावून घेण्याचा या पक्षानें डाव मांडला.

२० लष्करचा वरचष्मा—प्रथम या पक्षानें **चार्लस**ला असें आमिष दाखविलें कीं, आपण आमच्या स्वाधीन झाल्यास आम्ही तुम्हांला पुन्हा राजपद देऊं. पण **चार्लस** राजा त्यांना पुरा ओळखून होता. त्यानें त्यांच्या स्वाधीन होण्याचें अजिबात नाकारलें. तेव्हां क्रॉमवेलच्या गुप्त हुकुमावरून 'जॉइस' (Joyce) नामक लष्करी अधिकाऱ्यानें आपल्या घोडेस्वारांच्या मदतीनें **चार्लस** राजाला ज्या ठिकाणीं (Holmby House) ठेवलें होतें तेथून बळजबरीनें बाहेर काढून 'न्यू मार्केट' (New Market) येथें लष्करचा तळ होता तेथें नेलें. लष्करचा हा अरेरावीपणा पाहून पार्लमेंट सभा रागावली. हें क्रॉमवेलचेंच कृत्य आहे हें ओळखून त्याचें पारि-पत्य करण्याचा तिनें निश्चय केला. पण क्रॉमवेल पार्लमेंटच्या सभासदांचा रागरंग पाहून आपल्या लष्करांत पळून गेला. पण लोकसभा झाली तरी लष्करच्या मदतीशिवाय आपला अधिकार कसा चालविणार ? तेव्हां अर्थातच शेवटीं पार्लमेंटच्या सभासदांना लष्करी अधिकाऱ्यांपुढें हात टेकावे लागले. क्रॉमवेल सर्व सैन्यानिशीं लंडनवर चालून आला; व इंग्लंडमध्यें लष्करी सत्ता हीच सर्वश्रेष्ठ सत्ता होते कीं काय अशी धास्ती वाटूं लागली.

२१ चार्लस राजाला एका किल्ल्यांतून दुसऱ्या किल्ल्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत अशा रीतीनें फिरवीत फिरवीत 'हॅंपटन कोर्ट' (Hampton Court) नांवाच्या बंदोबस्ताच्या ठिकाणीं ठेवण्यांत आलें. या ठिकाणीं त्याला बऱ्याच सवलती देण्यांत आल्या; कुटुंबांतील माणसांशीं व मित्रांशीं पत्रव्यवहार करण्याची त्याला मोकळीक मिळाली; व त्याच्या समजुतीप्रमाणें त्याचे खासगी धार्मिक विधिही करण्याला त्याला परवानगी देण्यांत आली. लोकसभेची खोड मोडण्यासाठीं लष्करनें राजाशीं तडजोडीचें बोलणें सुरू केलें. आणि इकडे पार्लमेंटनेंही आपल्यापरी राजाशीं तडजोड करण्याचें ठरविलें.

२२ राजा निसटला—तिकडे स्कॉट लोकांना आतां आपण राजाला पार्लमेंटच्या हवालीं केल्याबद्दल पश्चात्ताप वाटूं लागला होता. व क्रॉमवेलचा स्वातंत्र्यवादी पक्ष (Independents) प्रबळ झाल्यास पुढें मागें आपल्यालाही जड जाईल असें त्यांना वाटूं लागलें होतें. त्यांनींही आतां राजाशीं बोलणें सुरू करून जरूर लागल्यास त्याला मदत करण्याचें कबूल केलें. **चार्लस** राजाही कमी धोरणी नव्हता. देशांत निरनिराळे तीन पक्ष आत्मवर्चस्वासाठीं खटपट करीत आहेत असें पाहून कोणत्याच पक्षाशीं वचनबद्ध न होतां आपल्याला गादी मिळाली तर पहावी, असा त्यानें विचार केला आणि एक दिवस संधि साधून तो हँपटन कोर्टमधून पोबारा करून निघून गेला आणि इंग्लंडच्या दक्षिणेस ' वाईट ' (Isle of Wight) नांवाचें बेट आहे तेथें जाऊन राहिला ! या ठिकाणीं पार्लमेंटची मंडळी व स्कॉट पुढारी यांनीं त्याच्याशीं पुन्हां वेगवेगळीं बोलणीं चालू केलीं. आणि शेवटीं स्कॉट लोकांनीं लष्करी मदत करण्याचें वचन दिल्यावरून पार्लमेंटच्या तर्फेचें बोलणें राजानें धुडकावून लावलें. पण याचा परिणाम काय झाला तो पुढील प्रकरणांत सांगूं.

प्रकरण ४८ वें.

राजाचा शिरच्छेद

(इ. स. १६४८–इ. स. १६४९)

[१ राजावरील आरोप. २।३ राजाचा अखेरचा प्रयत्न. ४ पुन्हां सामोपचाराचें बोलणें–क्रॉमवेलचा निश्चय. ५।६ प्राइडचा रेचक–न्याय कोर्ट नेमलें. ७ चौकशी. ८ न्यायाच्या कचेरींत–९ आरोप शाबीद–चार्लसचें वर्तन. १० फांशीची शिक्षा–वधस्तंभाजवळ. ११ लक्षांत ठेव ! १२ चार्लसचे गुणावगुण. १३ त्याच्या कारकिर्दींतील शोध–अमेरिकेंतील पहिली वसाहत–एक्साइझ कर. १४ चार्लसचीं मुलें–१५ राजवधानंतर. १६ सामुदायिक सत्तामंडळ. १७।१८ लष्करची कारकीर्द–अकरा वर्षें.]

१ राजावरील आरोप—राजा ' वाइट ' बेटांत गेला त्या वेळीं त्याचा बेत तेथून निसटून युरोप खंडांत जाऊन रहावें असा होता. परंतु तेथला गव्हर्नर ' हॅमंड '

(Hommand) हा त्या वेळीं पार्लमेंटचा ताबेदार असल्यामुळें **चार्लस**ला तो निसटून जाऊं देईना. त्यानें त्याला 'कॅरिसब्रूक' (Carisbrooke) नामक किल्ल्यांत मोठ्या बंदोबस्तानें ठेवलें होतें. व याच ठिकाणाहून मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राजाचीं स्कॉट लोकांशीं व पार्लमेंटशीं खलबतें चालू होतीं. आतां पार्लमेंटचें बोलणें राजानें नाकबूल केल्यामुळें **चार्लस**वर सक्त नजर ठेवण्याविषयीं 'हॉमंड 'ला पार्लमेंटचा हुकूम झाला. व त्याच्याकडे कोणालाही फिरकूं देण्याचें बंद करण्यांत आलें. इकडे इंग्लंडच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं आपली एक सभा भरवून इंग्लंडमध्यें विनाकारण यादवी सुरू करून (Waging war against the People) रक्तपात केल्याचा आरोप राजावर ठेवून त्याची चौकशी करावी असें ठरविलें.

२ राजाचा अखेरचा प्रयत्न—इ० स० १६४८ मध्यें या दुर्दैवी राजाला त्याचें पद पुन्हां प्राप्त करून देण्याचा आणखी एक प्रयत्न झाला. **नॉ**रफोक, **स**फोक **कें**ट वगैरे इंग्लंडमधील चार पांच जिल्ह्यांत व **वे**ल्स प्रांतांत राजपक्षीय लोकांनीं पुन्हां एकदां उचल केली. **टे**म्स नदींत आरमार होतें, त्यानें एके दिवशीं राजाचा बावटा उभारून तें नदींतून बाहेर पडलें आणि युरोपांत हॉलंड देशांत राजाचा मुलगा होता त्याला जाऊन मिळालें. उत्तरेकडून स्कॉट लोकांनीं ठरल्याप्रमाणें इंग्लंडवर स्वारी केली आणि इंग्लंडच्या उत्तरेकडील जिल्ह्यांतले बहुतेक राजपक्षीय लोक या स्कॉट सैन्याला जाऊन मिळाले.

३ परंतु इकडे पार्लमेंट व लष्करचे पुढारी यांच्यामध्यें राजसत्तेवर किती दाब ठेवावयाचा याबद्दल कितीही मतभेद असला, तरी राजाला स्कॉट लोकांच्या मदतीनें पुन्हां गादीवर येऊन पूर्वीप्रमाणेंच अनियंत्रित रीतीनें राज्यकारभार चालवूं देण्याला दोन्ही पक्ष अर्थातच कबूल नव्हते. त्यांनीं मोठी सावधगिरी ठेवून राजपक्षाचा हा शेवटचा प्रयत्न सिद्धीस जाऊं दिला नाहीं. क्रॉमवेल उत्तरेकडे स्कॉट लोकांचें पारिपत्य करण्याला निघून गेला, आणि दक्षिणेकडे सरदार 'फेअरफॅक्स' हा **पार्लमेंटचा** सेनापति लंडनच्या आसपासच्या जिल्ह्यांतील बंडखोरांचा पाडाव करण्यासाठीं राहिला. क्रॉमवेलनें उत्तरेकडे स्कॉट व त्यांना मिळालेले राजपक्षीय लोक यांचा पुरा मोड केला, आणि ऑगस्टच्या विसाव्या तारखेस त्यांना शरण यावयास लाविलें.

४ पुन्हां सामोपचाराचें बोलणें—क्रॉमवेल आपलें लष्कर घेऊन उत्तरेकडे निघून गेल्याची संधि पाहून **पार्लमेंट**नें राजाशीं पुन्हां सामोपचाराचें बोलणें लाविलें आणि न्यूपोर्ट (Newport) येथें उभयपक्षीं कांहीं अटी ठरल्याही. लोकसभेनें या ठरलेल्या अटींवरून आतां पुढें उभयपक्षीं समाधानकारक असा तह

होण्याला अडचण नाहीं असा ठरावही केला. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें लष्करी अधिकाऱ्यांनीं इंग्लंडांतून राजसत्ता अजीबात नष्ट करण्याचा विडाच उचलला होता. उत्तेरकडील बंडवाल्यांचा पराभव करून क्रॉमवेल दक्षिणेकडे आला, तेव्हां लोकसभेनें न्यूपोर्ट येथें राजाशीं तह केल्याची बातमी त्याला समजली. त्यानें ताबडतोब राजाला पकडून 'हर्स्ट' (Hurst) नामक किल्ल्यांत त्याची रवानगी केली. आणि लोकसभा आणि सरदारसभा या पार्लमेंटच्या दोन्ही अंगांना एक जबर धक्का देऊन आपला हेतु तडीस नेण्याचा निश्चय केला.

५ प्राइडचा रेचक—आपल्या मताला अनुकूल नसलेल्यांना पार्लमेंटमध्यें बसूंच द्यावयाचें नाहीं असा बेत करून त्यानें कर्नल 'प्राइड' (Colonel Pride) नामक लष्करी अधिकाऱ्याला पार्लमेंटच्या सभागृहाला गराडा देण्यास सांगितलें. या 'प्राइड'नें सभागृहाला वेढा देऊन सुमारें दोनशें सभासदांना पकडलें. सरदार सभा तर अजीबात बंद करण्यांत आली. आणि अशा रीतीनें पार्लमेंट सभेला जणूं काय 'रेचक' (purge) देऊन लष्करी अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें 'घाणेरडे' ठरलेल्या सभासदांना बाहेर काढल्यावर उरलेल्या सुमारें ५०।६० सभासदांच्या 'शुद्ध' सभेनें **चार्लस** राजानें इंग्लंडच्या लोकांबरोबर विनाकारण युद्ध केल्याच्या आरोपाबद्दल त्याची चौकशी करण्याचा ठराव करून एकशें पस्तीस कमिशनरांचें (Commissioners) एक न्यायाचें कोर्टही नेमून टाकिलें !

६ या एकशेंपस्तीस कमिशनरांमध्यें पार्लमेंटमधील व लष्करमधील जे लोक स्वातंत्र्यवादी पक्षाच्या मतांचे आहेत असें क्रॉमवेलला वाटलें, त्यांचाच भरणा करण्यांत आला होता. लंडनमधील त्या मताच्या कांहीं नागरिकांचाही या कमिशनरांमध्यें समावेश केला होता. परंतु हें न्यायाचें कोर्ट भरण्याच्या वेळीं १३५ सभासदांपैकीं अवघे ६० सभासदच राजाची चौकशी करण्याच्या कामीं न्यायाधिशाचें काम करण्यास कबूल झाले. 'ब्रॅडशॉ' (Bradshaw) नांवाचा एक वकील या कोर्टाचा मुख्य न्यायाधिश बनला.

७ चौकशी—इ. स. १६४९ च्या जानेवारी महिन्याच्या विसाव्या तारखेस राजाला या कोर्टापुढें आणण्यांत आलें. राजानें बेकायदेशीर रीतीनें निर्माण झालेल्या (in defiance of the Law) या कोर्टाला आपली चौकशी करण्याचा

अधिकार नाहीं असें सांगितलें.* कारण इंग्लंडच्या जुन्या कायद्याप्रमाणें (ancient maxim of the constitution) कोणाही आरोपीच्या बरोबरच्या गृहस्थांनाच त्याचा न्याय करण्याचा अधिकार असे; व राजा हा बड्या सरदार वर्गांतील असल्यामुळें त्याची चौकशी करण्याचा अधिकार वास्तविक सरदार सभेलाच होता. पण हें म्हणणें ऐकतो कोण ? त्याच्यासमोर बसलेल्या न्यायाधिशांनीं काय निकाल द्यावयाचा तोहि अगोदरच ठरवून ठेवला होता. असो.

८ न्यायाच्या कचेरींत—खटला सुरू होण्याच्या वेळीं न्याय करण्याला बसलेल्या सभासदांचीं नांवें वाचण्यांत आलीं. पार्लमेंट सभेचा सेनाध्यक्ष 'फेअरफॅक्स' याचें नांव पूर्वीं त्या यादींत घातलें होतें. पण तो या वेळीं हजर राहिला नाहीं. कोर्टांत लोकांची अतोनात गर्दी झालेली होती. फेअरफॅक्सचें नांव उच्चारतांच ग्यालरींतून ' तो इतका वेडा नाहीं ' असे शब्द ऐकूं आले. पुढें राजावरील आरोप वाचून दाखवितांना ' इंग्लंडमधील लोकांच्या वतीनें ' अमुक अमुक आरोप **चार्लस** राजावर करण्यांत येत आहेत असें जेव्हां सांगण्यांत आलें, तेव्हां पुन्हा ग्यालरींतून 'या कामीं इंग्लंडमधील शेंकडा दहा लोकांचीही संमति नाहीं' असे शब्द निघाले. हे शब्द ज्या बाजूनें आले त्या बाजूला बंदुका झाडण्याचा पहारेकऱ्यांच्या मुख्यानें आपल्या शिपायांना हुकूम केला. परंतु हे शब्द उच्चारणारी व्यक्ति फेअरफॅक्सची बायको आहे, असें जेव्हां आढळून आलें तेव्हां हा हुकूम मागें घेतला गेला. असो.

९ आरोप शाबीत—सात दिवसपर्यंत न्यायाचा फार्स होऊन शेवटच्या दिवशीं राजावर ' जुलूम, विश्वासघात, खून आणि देशद्रोह ' हे आरोप शाबीत आहेत असें ठरवून त्याला शिरच्छेदाची शिक्षा सांगण्यांत आली ! या सगळ्या वेळांत **चार्लस** राजाची वर्तणूक मात्र फार गंभीरपणाची होती. त्यानें आपल्या राजाच्या दर्जाला शोभेल असें वर्तन (kingly dignity) ठेवण्याला कमी

---

* **चार्लस** राजाची ही चौकशी इंग्लंडचा कायदा व वहिवाट या दोहोंनाही एका बाजूला ठेवूनच चालली. कारण इंग्लंडांतल्या प्रत्येक मनुष्याला त्याच्या बरोबरीच्या पंचांनीं दोषी ठरविल्याशिवाय तो गुन्हेगार समजला जाऊं नये, हा इंग्लंडच्या प्रजेच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणारा कायदा राजाच्या बाबतींतही लागू करणें न्याय्य होतें. अर्थात **चार्लस**ची चौकशी दर्जानें त्याच्या बरोबरीच्या पंचांसमोर, निदान सरदार-सभेच्या सभासदांसमोर तरी होणें हेंच ' कायदेशीर ' होतें हें उघड आहे.

केलें नाहीं, आपला धीर खचल्याचें चिन्ह दाखविलें नाहीं, अगर लष्करच्या हलक्या-सलक्या शिपायांनीं उद्धटपणाचें वर्तन केलें असतांही आपल्या चेहऱ्यावर रागाचें अगर वाईट वाटल्याचें चिन्ह दिसूं दिलें नाहीं. खरोखर या वेळची त्याची वर्तणूक एकाद्या साधु पुरुषाला शोभण्यासारखी होती असें सांगतात. एकदां एक हलकट शिपाई त्याच्या तोंडावर थुंकला. तेव्हां या बंदिवान राजानें आपल्या हातरुमालानें आपलें तोंड पुसलें आणि तो इतकेंच म्हणाला कीं, "गरीब बिचारा! एका पैशासाठीं हा आपल्या बापाच्या तोंडावर थुंकण्यालाही कमी करणार नाहीं!" दुसऱ्या एका वेळीं त्याला कचेरीकडे नेत असतां एका शिपायानें त्याचें नांव उच्चारून 'तुमचें देव कल्याण करो!' असें म्हटलें. शिपायाच्या या अपराधाबद्दल त्याच्या वरच्या अधिकाऱ्यानें ताबडतोब त्याची गर्दन छाटून टाकली. हें कृत्य पाहून राजा म्हणाला, "मला वाटतें अपराधाच्या मानानें या शिपायाला ही शिक्षा फार झाली!" † असो.

१० **फांशीची शिक्षा**—राजाची चौकशी पुरी होऊन शिक्षा सुनावण्यांत आल्यावर त्याला 'सेंट जेम्स' (St. James) वाड्यांत ठेवण्यांत आलें. त्या ठिकाणीं त्यानें आपलें भावी मरण शांतपणें सोसण्याला अवश्य अशी मनाची तयारी केली. जानेवारीच्या तिसाव्या तारखेस 'व्हाइट हॉल' (White-hall) नामक वाड्याच्या पुढल्या पटांगणांत एक वधस्तंभ (Scaffold) उभारण्यांत आला. दोन मांग बुरखे घेऊन पुढें झाले. या प्रसंगीं सभोंवतीं लष्करचा सक्त पहारा होता आणि बाजूला हजारों लोक हा करुणास्पद देखावा पहाण्याला उभे राहिले होते. ठरलेल्या वेळीं राजाला वधस्तंभाकडे आणण्यांत आलें. 'जक्सन' (Juxon) नांवाचा धर्माधिकारी राजाबरोबर होता. वधस्तंभाशीं आल्यावर हा 'बिशप' राजाला म्हणाला, 'महाराज! आणखीं एक पायरी चढलांत कीं आपण या मृत्युलोकांतून निघून स्वर्गाच्या दारांत पाऊल टाकल्यासारखें होईल. त्या ठिकाणीं या मृत्युलोकांतील राजमुकुटापेक्षां अत्यंत मौल्यवान असा शाश्वत वैभवाचा मुकूट आपल्याला प्राप्त होईल."

---

† **चार्लस**चा हा वध ज्यांनीं घडवून आणला त्या लष्करच्या अधिकाऱ्यांचें **जेन्सनें** वर्णन केलें आहे तें असें–"It was the army, an assembly of men of all shades of fanatical and hypocritical belief, to whom Cromwell and the Rump were subservient, that did the deed.

राजानें उत्तर दिलें, " या जगांतील नश्वर राजमुकूट सोडून मी स्वर्गीय मुकूट मिळविण्यासाठींच तिकडे जात आहें. त्या ठिकाणीं येथल्या दुःखांना जागा नाहीं." नंतर



राजा चार्लसचें वधस्तंभ-गमन.

मांगानें घाव घालण्याच्या वेळीं तो ' जक्सन ' ला उद्देशून जोरानें म्हणाला, " लक्षांत ठेव ! " इतक्यांत मांगानें तडाका लगावला, व एका क्षणांत राजाचें शिर धडापासून वेगळें झालें !

११ लक्षांत ठेव—मांगानें तें रक्तबंबाळ शीर उचलून ' हें पहा विश्वासघातक्याचें डोकें ! " (This is the head of a traitor) असे शब्द उच्चारले. तेव्हां जवळच्या शिपायांनीं आनंदानें जयघोष केला. पण सभोंवतीं जमलेल्या इतर लोकांच्या डोळ्यांतून टपटपां अश्रू गळूं लागले, व ते आक्रोश (a deep groan) करीत निघून गेले. राजानें 'लक्षांत ठेव ' म्हटलें त्याचा अर्थ काय म्हणून ' जक्सन 'ला विचारतां त्यानें सांगितलें कीं, " राजानें आपल्याला असा हुकूम केला होता, कीं ' युवराज चार्लस 'ला आपल्या बापाचा खून करणाऱ्यांना माफी देण्याविषयीं तूं बोध कर. या हुकुमाची आठवण रहावी म्हणून त्यानें ते शब्द उच्चारले."

१२ चार्लसचे गुणावगुण—आतांपर्यंत सांगितलेल्या हकीकतीवरून **चार्लस** राजाच्या गुणावगुणांविषयीं वाचकांना माहिती झालीच असेल. राजसत्तेच्या अनियंत्रितपणाविषयींच्या भ्रामक कल्पनेनें त्याला घेरलेलें असल्यामुळें तो अनियंत्रितपणा कायम राखण्यासाठीं वाटेल तें कृत्य केलें तरी तें योग्यच अशी त्याची प्रामाणिक समजूत झाली होती. व या आपल्या समजुतीला धरूनच त्यानें आपल्या प्रतिपक्षीयांशीं वर्तन ठेवलें होतें. त्यानें कोणत्याच पक्षाविषयीं विश्वास बाळगला नाहीं व या त्याच्या अविश्वासीपणामुळेंच त्याच्यावर संकटें येऊन त्याचा अशा भयंकर रीतीनें अंत झाला, असें पुष्कळ इतिहासकारांचें म्हणणें आहे. एरवीं त्याच्या अंगीं खऱ्या सद्गृहस्थाच्या अंगीं असणारे पुष्कळ चांगले गुण होते. व तो जर राजा नसता तर उत्तम शीलवान सद्गृहस्थ म्हणून त्याचें आयुष्य सुखांत गेलें असतें असें पुष्कळांनीं लिहिलें आहे. त्याला विद्येची अभिरुचि असून त्याचें खासगी वर्तन निष्कलंक होतें. तो चित्रकलेचाही भोक्ता असून 'रुबेन' (Ruben) व 'व्हांडिक' (Vandick) या डच चित्रकारांना त्यानें चांगला आश्रय दिला होता. उलट पक्षीं त्याच्या कारकिर्दींत जहाल सुधारकांच्या फाजील साधेपणाच्या बाण्यामुळें कित्येक देवळांतील नक्षीकाम मोडून तोडून नाहींसें करण्यांत आलें होतें.

१३ त्याच्या कारकिर्दींतील शोध—मोठ्या घड्याळांना लंबक लावण्याची युक्ति, आणि वायुभारमापक यंत्राचा शोध हे **चार्लस**च्या कारकिर्दींत लागले. इंग्लंडमध्यें कॉफीचा उपयोग **चार्लस**च्याच कारकिर्दींत प्रथम लोकांमध्यें सुरू झाला. अमेरिकेंतील 'वेस्ट इंडीज' नामक बेटांत पहिली इंग्रजी वसाहत इ. स. १६४० च्या सुमारास झाली. देशांतल्या देशांत तयार झालेल्या पक्क्या मालावर 'एक्साइज' (Excise) नांवाचा कर लढाईच्या खर्चासाठीं म्हणून पार्लमेंटनें प्रथम **चार्लस**च्याच कारकिर्दींत बसविला. इतर उपयुक्त व सुधारणेच्या गोष्टींत लंडनमध्यें भाड्याचे टांगे, आणि लढाईच्या वेळीं स्कॉटलंडला पत्रें रवाना करण्यासाठीं तसेंच इतर कांहीं मोठ्या शहरांना पत्रें पाठविण्यासाठीं पोस्ट ऑफिसांची व्यवस्था चालू होणें या मुख्य होत.

१४ चार्लसचीं मुलें—चार्लसला तीन मुलगे आणि तीन मुली होत्या. थोरल्या मुलाचें नांव '**चार्लस**' असेंच होतें. मधल्या मुलाचें नांव **जेम्स**, व धाकट्याचें **हेन्री** असें होतें. यांपैकीं **चार्लस** व **जेम्स** यांचा पुढें आपल्याला परिचय होणारच आहे. मुलींपैकीं **मेरी** नांवाच्या मुलीचें युरोपांतील '**ऑरेंज**' संस्थानच्या राजपुत्राशीं लग्न झालें होतें. तिच्या संततीचाही पुढें आपल्याला परिचय करून घ्यावा

लागले. बाकी दोन मुलींचीं नांवें ' इलिझाबेथ ' व ' मराया ' अशीं होतीं. पैकीं इलिझाबेथ **चार्लस**च्या मागून थोड्याच दिवसांनीं मरण पावली. व **चार्लस** राजाच्या बायकोनें **चार्लस**च्या वधानंतर ' जर्मिन ' (Germin) नांवाच्या एका सरदाराशीं पुनर्विवाह केला. ही राजकुटुंबांतील मंडळींचीं हकीकत झाली.

१५ राजवधानंतर—चार्लसला फांशीं दिल्यावर लष्करी अधिकाऱ्यांनीं असा जाहिरनामा काढला कीं, यापुढें इंग्लंडमध्यें कोणालाही ' राजा ' ही पदवी देणें हा गुन्हा मानला जाईल. **पार्लमेंट** सभा नांवानें अस्तित्वांत होती खरी; परंतु मागें ' **प्राइड** ' नें या सभेला ' रेचक ' देऊन **क्रॉम**वेलला अनुकूल नसलेल्या सर्व सभासदांना पार्लमेंटचें द्वार बंद करून टाकलें असल्यामुळें क्रॉमवेलच्या ६०।७० अनुयायांशिवाय या सभेंत कोणीच येत नसे. तरी पण ही खच्ची केलेली सभा आपल्याला ' लोकसभा ' हें नांव धारण करून सर्व ठराव करी व सर्व हुकूम सोडी.

१६ सामुदायिक सत्तामंडळ—या सभेच्या एका बैठकींत असा ठराव पास करण्यांत आला कीं, पार्लमेंटची 'सरदार सभा' ही निरुपयोगी व भयंकर असल्यामुळें ती मोडून टाकावी आणि इंग्लंडमध्यें राजपद हें अनवश्यक व भारभूत झाल्यामुळें तें पुन्हां कधींही स्थापन करण्यांत येऊं नये (Royalty and the House of Lords were formally abolished). राज्यकारभाराची सर्व व्यवस्था लोकसभेनेंच करावी असें ठरून एकेचाळीस सभासदांचें एक कार्यकारी मंडळ (a council of forty-one members) नेमण्यांत आलें. या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष **चार्लस** राजाला फांशीची शिक्षा सुनावणारा हायकोर्टाचा जज्ज ' ब्रॅडशॉ ' (Bradshaw) हा झाला, व प्रसिद्ध कवि **मिल्टन** (Milton) हा परराष्ट्रमंत्र्याचें काम पाहूं लागला. **क्रॉम**वेल व **फे**अरफॅक्स हे सैन्याची व्यवस्था पाहूं लागले (directed the army) व आरमाराचें काम ' व्हेन ' (Sir Henry Vane) नामक सरदाराच्या हवालीं करण्यांत आलें. या नवीन राज्ययंत्राचें नांव इंग्लंडचें 'सामुदायिक सत्तामंडळ' (The Common Wealth) असें ठेवण्यांत आलें. व या मंडळाच्या नांवानें सर्व कारभार चालूं लागला.

१७ लष्करची कारकीर्द—परंतु ही स्थिति सर्व राष्ट्राला पसंत पडण्यासारखी नव्हती. लष्करी अधिकाऱ्यांनीं दंडुक्याच्या व तरवारीच्या जोरावर हें राज्ययंत्र निर्माण केलें होतें; व तें चालू राहण्याला अप्रतिहत लष्करी सामर्थ्याचीच जरूरी होती. आपल्या राजाचा शिरच्छेद झाला ही गोष्ट राष्ट्रांतील पुष्कळ विचारी लोकांच्या मनाला खात

होती; व सर्व देशभर लष्करी अधिकाऱ्यांची अरेरावी सतत चालू देणें त्यांना भयंकर वाटत होतें. नवीन निर्माण झालेल्या राज्ययंत्राला पार्लमेंटच्या लोकसभेची संमति आहे असें कितीही भासविण्यांत आलें, तरी तेवढ्यानें लोकांचें समाधान होण्यासारखें नव्हतें.

१८ पण या नव्या राज्ययंत्राचे चालक आपल्यावर सर्व जनतेच्या प्रतिनिधींचें नियंत्रण घालून घेण्यालाही कबूल नव्हतेच. अर्थात पूर्वी **चार्लस** राजाचा जुलूम सहन करावा लागत असे, तर आतां **क्रॉ**मवेलचा लष्करी जुलूम सहन करावा लागूं लागला ! एकूण सर्वसाधारण जनतेचीं दुःखें कांहीं कमी झालीं नाहींत. यामुळें **चार्लस** राजा गेला तर गेला, त्याच्या वंशांतील पुरुषांना तरी पुनः इंग्लंडच्या गादीवर बसवून लष्करचा धिंगाणा नाहींसा करावा असें पुष्कळांना वाटूं लागलें. पण उपयोग काय ? क्रॉमवेलच्या शिस्तवार सैन्यापुढें राजपक्षीयांच्या किरकोळ बंडांचा निभाव लागेना व राजातर्फें भांडण्यासाठीं कोणी पुढें झाला कीं, लष्करनें त्याचें डोकें ठेंचून टाकावें असा क्रम चालू झाला. कित्येक राजपक्षीय मंडळींकडून जबर दंड घेण्यांत येऊं आगला. पूर्वी **चार्लस** राजाच्या कारकिर्दींत इंग्लंडच्या तिजोरींत वर्षाला जितकी भर पडत असे त्याच्या दुप्पट भर या दंडाच्या योगानें ‘ सामुदायिक सत्तामंडळा’च्या तिजोरींत पडूं लागली. पण इतकेंही झालें तरी राजपक्षीय मंडळींनीं धीर सोडला नाहीं, व पुढें पुढें लष्करी अधिकाऱ्यांमध्येंच बेबनाव उत्पन्न होऊन राजपक्ष प्रबल होऊं लागला. इ. स. १६४९ पासून इ. स. १६६० पर्यंतचीं हीं अकरा वर्षें इंग्लंड, स्कॉटलंड, व आयर्लंड या तिन्ही देशांतील लोकांना फार त्रासाचीं व अस्वस्थतेचीं गेलीं; या अस्वस्थतेचें स्वरूप पुढील प्रकरणांत कथन करूं.

प्रकरण ४९ वें.

लष्करचा धिंगाणा !

(इ. स. १६४९–इ. स. १६६०)

[१।२ आयर्लंडमधील लोकमत. ३ ऑरमंड. ४ एकजुटीचा अभाव. क्रॉमवेल आयर्लंडमध्यें जातो. ५ ड्रॉघेडा व वेक्सफर्ड येथील लढाया–इंग्रजांचे अत्याचार–क्रॉमवेलचा जयजयकार. ६ स्कॉट पुढाऱ्यांची उचल–चार्लसचा मुलगा. ७ मॉंट्रोज.

८ तरुण चार्लसचें स्कॉटलंडमधील स्वागत. ९ स्कॉट व इंग्रज यांची लढाई. १०।११ डनबारची लढाई. १२ लढाईचा शेवट. १३ उत्तर स्कॉटलंडमधील लोक-तरुण चार्लसचा विचार. १४ चार्लसचा राज्याभिषेक-इंग्लंडमध्यें प्रवेश. १५ वुरसेस्टरची लढाई. १६ चार्लसचा अज्ञातवास. १७ स्कॉटलंडवर अंमल. १८।१९ हॉलंडशीं तंटा. २० आरमारी चकमक-युद्ध जुंपलें. २१ जयापजय-हॉलंडच्या आरमाराचा पराभव-तह. २२ क्रॉमवेलविषयीं अप्रीति. २३ लष्कर व पार्लमेंट यांमधील झगडा. २४ क्रॉमवेलचा उद्दामपणा-सभागृहाला कुलूप.२५।२६ नवी घटना.२७ लग्नाचा कायदा. २८ क्रॉमवेल 'रक्षक' झाला. २९ नवे नियम. ३० क्रॉमवेलचा अनियंत्रित कारभार. ३१ लष्करी अंमल. ३२ क्रॉमवेलचें परराष्ट्रीय धोरण. ३३ इ. स. १६५६-राजा कीं रक्षक ? ३४ नवे सरदार-पार्लमेंटची गळचेपी. ३५ क्रॉमवेलचे अखेरचे दिवस-त्याचा सावधपणा-घरगुती संकटें-क्रॉमवेलचा अंत. ३६ त्याच्या अंगचे गुणावगुण-३७।३८ क्रॉमवेलच्या मागून. ३९ बळी तो कानपिळी-स्वास्थ्यकमिटी. ४० लष्करमधील तंटे-मंक. ४१ पार्लमेंटचा आनंद. ४२।४३ कन्व्हेन्शन पार्लमेंट. ४४ तरुण चार्लसचा राज्याभिषेक. ४५ अकरा वर्षांचें सिंहावलोकन.]

१ आयर्लंडमधील लोकमत—आयर्लंडमधील बहुजनसमाज पूर्वीपासूनच पोपवादी होता हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. इंग्लंड व स्कॉटलंडमध्यें धार्मिक बाबतींत कितीही सुधारणा झाली, तरी त्या सुधारणेचा आयर्लंडमधील लोकांवर कांहीं एक परिणाम होत नसे. व आयर्लंडमध्यें हे इंग्लिश व स्कॉच सुधारक त्या लोकांशीं ज्या तऱ्हेनें वागत असत, त्या तऱ्हेकडे पाहिलें तर आयरिश लोकांना सुधारकांच्या या सुधारणेची भीति वाटण्याला सबळ कारण होतें असें म्हणणेंही वावगें होणार नाहीं.

२ या वेळीं सर्वच युरोपखंडांत साधारणपणें अशी स्थिति होती कीं, पोपवादी राजसत्तेला बहुधा अनुकूल असावयाचे व धार्मिक बाबतींतील स्वातंत्र्यवादी मंडळी बहुधा राजसत्तेलाही प्रतिकूल असावयाची. चार्लस राजानें म्हणजे आयरिश लोकांचें मोठेंसें कल्याण केलें होतें असें नाहीं, तरी पण इंग्लंडमधील प्रजासत्तावादी सुधारकांपेक्षां चार्लस राजा व तेथील राजपक्षीय मंडळी ही आयरिश लोकांना अधिक जवळची वाटे. त्यामुळें चार्लस राजाच्या वधाची बातमी ऐकून आयर्लंडमध्यें चार्लसच्या 'स्टुअर्ट' घराण्याविषयीं अनुकंपा बाळगणाऱ्या मंडळीनें उचल खाल्ली यांत नवल नाहीं.

३ ऑरमंड—इ. स. १६४१ पासूनच आयर्लंडमध्यें जिकडे तिकडे बेबंदशाही

माजली होती. परंतु घरच्या तंट्यांच्या भानगडीमुळें इंग्लिश पार्लमेंटला तिकडे लक्ष देण्याला सवड मिळाली नव्हती. इ. स. १६४९ च्या सुमारास आयर्लंडमध्यें निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं पांच सैन्यें एकजुटीनें नव्हे पण स्वतंत्र रीतीनें इंग्लिशांविरुद्ध शस्त्र उचलून तयार होतीं. देशांतील बहुतेक सर्व किल्ले 'ऑरमंड' (Marquis of Ormond) नांवाच्या राजपक्षीय पुढाऱ्याच्या हातांत असून इंग्लंडच्या पार्लमेंटची आयर्लंडमधील सत्ता अजीबात नष्ट होण्याच्या बेताला आली होती. आणि चार्लसच्या वधानंतर ऑरमंडनें राजाच्या वडील मुलाच्या नांवानें द्वाहीहि फिरविली होती (proclaimed Charles II).

४ एकजुटीचा अभाव—त्या सालच्या आगष्ट महिन्यांत क्रॉमवेल आपल्या निवडक सोळा हजार लोकांनिशीं आयर्लंडमध्यें गेला. सर्व आयरिश सैन्य या वेळीं एक झालें असतें, तर हें इंग्लंडचें सोळा हजार सैन्य त्या सैन्याशीं टक्कर देण्याला समर्थ झालें असतें कीं नाहीं याची शंकाच होती. परंतु एकजुटीचा अभाव हा तर पूर्वीपासून आयर्लंडच्या पांचवीला पुजलेला होता. आयर्लंडच्या सैन्याची एकी कांहीं होईना, आणि क्रॉमवेलचें सैन्य म्हणजे अस्सल क्षात्रिय बाण्याचें ! त्यांना रणांगणांत पाठ दाखविणें अगर शत्रूला शरण जाणें कधींच माहीत नव्हतें (they knew not what it was to yield); त्यांनीं हां हां म्हणतां या विस्कळित आयरिश सैन्याची दाणादाण करून टाकली.

५ ड्रॉघेडा व वेक्सफर्ड येथील लढाया—' ड्रॉघेडा (Drogheda) येथें उभय सैन्यांची मुख्य गांठ पडली. तेथें इंग्लिश सैन्यानें किल्ल्यांतील तीन हजार शिपायांना कापून काढलें. 'वेक्सफर्ड' (Wexford) नांवाच्या दुसऱ्या एका ठिकाणीं रक्ताचे पूर वहाले (deluged with the blood of massacre). शहरांचीं शहरें उध्वस्त झालीं. पोपवादी म्हटला कीं कापून काढाव-याचा असें ठरवून क्रॉमवेलचे शिपाई जिकडे तिकडे फिरूं लागले. व हे इंग्लंडचे '**सुधारक वीर**' दृष्टीस पडले कीं, आयर्लंडच्या पोपवाद्यांनीं घरादारांचा त्याग करून, पश्चिमेकडील कॉनॉट (Connought) परगण्यांतील अरण्यांचा * आश्रय करावा अगर देशत्याग करून अमेरिका वगैरे देशांत निघून जावें अशी स्थिति प्राप्त झाली.

---

* पश्चिमेकडच्या या अरण्याची या वेळची स्थिति तर अशी होती कीं, 'कोणी पाण्यांत जीव देऊं म्हणेल तर तेवढें पाणी नाहीं, गळफांस लावून आत्महत्या करूं म्हणेल तर तेवढ्या उंचीचें झाड नाहीं, आणि कोणी मेलाच तर त्याला मूठमाती देण्याला पुरेशी मातीही नाहीं !'

अशा रीतीनें उध्वस्त झालेल्या प्रदेशावर इंग्लंडमधील सुधारकांचीं कित्येक कुटुंबें जाऊन त्यांनीं तिकडे नवीन वसाहतच केली. व आयर्लंडमध्यें इंग्रजी पार्लमेंटचा अंमल पुन्हां चालू झाला. * क्रॉमवेल आयर्लंडमधील हा विजय संपादन करून परत आला, तेव्हां इंग्लंडच्या नामधारी लोकसभेनें त्याचा जयजयकार केला आणि इंग्लंडच्या ' सामुदायिक सत्तामंडळा 'च्या सैन्याच्या मुख्याधिकाऱ्याचें पद त्याला अर्पण केलें.

६ स्कॉट पुढाऱ्यांची उचल—तिकडे स्कॉटलंडमध्येंही स्कॉच लोक

* या वेळच्या आयर्लंडमधील जमिनदारांच्या कायदेशीर दुर्दशेचें वर्णन एका ठिकाणीं केलेलें आहे तें असें:—" The Parliament of 1642 had passed an Act granting 2,500,500 acres of land to such as advanced money for the Irish war. The Act of 1652 put practically all the land hitherto held by Irish Catholics at the disposal of the State. In 1654 all Irish Catholic land-owners were ordered to transplant themselves across the Shnannon. In 1655 Courts-martial were established to try those who failed to remove" (L. B.). आणि जी स्थिति जमिनदारांची तीच सामान्य रयतेची. " When the war ended in 1652, out of a population of 1,466,000, 616,000 had in eleven years perished by the sword, by plague, or by famine artificially produced. Human food had been systematically destroyed, and the price of corn had risen from 12 s. to 50 s. a bushel. From 30,000 to 40,000 able-bodied men fled from the country to enlist in foreign service. The land of the three largest and richest provinces was confiscated, and distributed among the Puritan soldiers. Slave-dealers were let loose upon the land, and several thousand Irish were collected in bodies, driven on ship-board, and conveyed to Barbados, there to be sold as planters." (Ibid)

चार्लसच्या वधानें संतापून गेले होते. त्यांनीं ताबडतोब त्याच्या मुलास स्कॉटलंडचें राजपद देण्याचें ठरवून तो हॉलंडमध्यें होता तिकडे त्याला बोलावणें पाठविलें. स्कॉटलंडच्या धर्मसंस्थेचें इंग्लंडच्या धर्मसंस्थेपासून असलेलें वैशिष्ट्य कायम राखून साधल्यास राजाच्या मदतीनें इंग्लंडमध्येंही आपली धर्मसंस्था (Presbyterianism) स्थापण्याचा उद्देश स्कॉट पुढाऱ्यांनीं जाहीर केला. पण चार्लस राजाचा मुलगा आनुवंशिक संस्कारानें पोपवादी पडल्यामुळें तो स्कॉटलंडमधील नेमस्त सुधारकांच्या पक्षालाही मिळण्यास कबूल होईना. त्यानें हॉलंडमधून ' मॉँट्रोज ' (Montrose) नांवाचा एक सरदार स्कॉटलंडमध्यें पाठवून स्कॉटलंडमधल्या सुधारकांची मदत न घेतां (independently of the Covenanters) स्वतंत्र रीतीनेंच गादी मिळविण्याची खटपट आरंभिली.

७ मॉँट्रोज (Marquis of Montrose)—**मॉँट्रोज** सहाशें लोक बरोबर घेऊन स्कॉटलंडला आला आणि त्याची स्कॉच सुधारकांशीं लढाई जुंपली. स्कॉच सैन्य कसलेलें होतें. **मॉँट्रोजचें** सैन्य नवीनच बनलेलें होतें. स्कॉच लोकांनीं हल्ला चढविल्याबरोबर **मॉँट्रोजच्या** सैन्यानें रणांगणावर शस्त्रें टाकून पळ काढला ! **मॉँट्रोजही** पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता; पण पुढें तो स्कॉच सैन्याच्या हातीं लागला. त्याला स्कॉटलंडची राजधानी एडिंबरो (Edinburgh) येथें नेऊन ३० फूट उंचीच्या सुळावर चढविण्यांत आलें ! स्कॉच सैन्यानें या सरदाराची फारच अप्रतिष्ठा केली; पण त्यानें ती इतक्या शांतपणानें व धैर्यानें सोसली कीं, अखेर त्याच्या शत्रूंच्याही डोळ्यांतून पाणी आल्यावांचून राहिलें नाहीं. ही गोष्ट इ. स. १६५० च्या मे महिन्यांत घडली.

८ तरुण चार्लसचें स्कॉटलंडमधील स्वागत—**मॉँट्रोजची** खटपट अशा रीतीनें फसली असें पाहून ' तरुण चार्लसनें ' (young Charles) दुसरा उपाय नाहीं असें पाहून स्कॉच सुधारकांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या करारपत्रावर सही करण्याचें कबूल केलें. आणि जून महिन्यांत तो स्कॉटलंडमध्यें आला. एडिंबरो येथें स्कॉट लोकांनीं त्याचें उत्साहपूर्वक स्वागत केलें (joyous welcome); परंतु तो जात्या पोपवादी असल्यामुळें सुधारकांच्या मंडळींत त्याला चैन पडत नसे. त्याच्या पाद्र्यांचीं पुराणें व त्या पुराणांतून आपल्या आईबापांची केलेली निंदा त्याला मुकाट्यानें सहन करावी लागे. आणि या वेळीं त्याच्या मनांत तिकडच्या सुधारकांविषयीं जी अढी बसली ती केव्हांही नाहींशी झाली नाहीं. असो.

९ स्कॉट व इंग्रज यांची लढाई—स्कॉट लोकांनीं या नव्या चार्लस राजाला आश्रय दिला हें पाहून इंग्लंडमधील **क्रॉमवेल**च्या **पार्लमेंट**नें स्कॉटलंड-मध्येंही आपल्याप्रमाणेंच 'सामुदायिक सत्तामंडळ' स्थापण्याचें ठरवून **क्रॉमवेल**ला सोळा हजार सैन्यानिशीं तिकडे पाठविलें. स्कॉट लोकांनीं 'डेव्हिड लेस्ली' (David Leslie) नामक पुढाऱ्याला सेनापतित्व देऊन आपल्या आश्रयाला आलेल्या **चार्लस** राजाच्यातर्फे इंग्रजांशीं लढाई करण्याचें ठरविलें. **क्रॉमवेल**च्या लोहहृदयी सैन्या-(Ironsides) पुढें आपला निभाव लागणार नाहीं हें पाहून **लेस्ली**नें इंग्लिशांशीं तोंडास तोंड न देतां गनिमी काव्यानें लढण्याची पद्धति स्वीकारली. आणि इंग्रजांच्या सैन्याला अन्नपाणी मिळूं नये म्हणून सरहद्दीवरील बराच मुलूख उध्वस्त करून स्कॉट सैन्य मागें मागें हटत चाललें (avoided a battle and let hunger do its work). इंग्रज सेना परमुलुखांत गेलेली; त्यांना इंग्लंडमधून अन्नसामुग्री नेणें फार खर्चाचें व अडचणीचें होतें. आणि तिकडे तर स्कॉट सैन्यानें सोडून दिलेल्या मुलुखांत एक दाणाही मिळेना. त्यामुळें भुकेनेंच इंग्रज सैनिक मरूं लागले. त्यांतच रोगराई उत्पन्न झाली. त्यामुळें **क्रॉमवेल**ला किनाऱ्याचा आश्रय करून गलबतांतून आजारी सैनिकांना इंग्लंडला पोंचतें करावें लागलें.

१० डनबारची लढाई—**क्रॉमवेल** किनाऱ्याकडे सरकत चालला आहे असें पाहून **लेस्ली**नें मोठ्या सावधगिरीनें व दूरदर्शीपणानें प्रत्यक्ष लढाईचा प्रसंग आणूं न देतां इंग्लिशांचा पाठलाग आरंभला, आणि अखेर **डनबार** (Dunbar) येथें त्यांना चोहोंकडून वेढलें. एका बाजूला समुद्र आणि दुसऱ्या बाजूला उंच डोंगरावर स्कॉट सैन्य जमा झालेलें; अशा अडचणीच्या ठिकाणीं सांपडल्यामुळें **क्रॉमवेल**ला यांतून कसें निभावून जावें याची काळजी पडली. पण दैव अनुकूल असलें म्हणजे सर्व गोष्टी अचानक जुळून येतात असें म्हणतात त्याचा प्रत्यय या वेळीं त्याला आला.

११ स्कॉट सैन्यामध्यें कांहीं धर्मोपदेशक होते; त्यांनीं **लेस्ली**ला वेडा ठरवून स्कॉट सैन्याला अशी मसलत सांगितली कीं, इंग्लिश सैन्याला असें नुसतें अडवून धरण्यापेक्षां आतां उघड्या मैदानांत जाऊनच त्यांच्याशीं लढाई द्यावी, व त्यांना परत इंग्लंडला जाऊं देऊं नये. पण ही मसलत ऐकल्यामुळेंच अखेर स्कॉट सैन्याचा पराभव झाला. **क्रॉमवेल**नें अगदीं आशा सोडली होती, इतक्यांत स्कॉट सैन्य डोंगर

उतरून अलीकडे येत आहे असें त्याला कोणीं सांगितलें. तेव्हां तो उद्गारला, "देवच त्यांना आमच्या हातांत आणून देत आहे !"

१२ लढाईचा शेवट—स्कॉट सैन्य खालीं उतरत आहे असें पाहून **क्रॉमवेलनेंही** आपलें सैन्य लढाईच्या शिस्तीनें उभें केलें. इ.स.१६५०च्या सप्टेंबर महिन्याची तिसरी तारीख; पहांटेच्या वेळीं **क्रॉमवेलचे** शिपाई शिस्तवार उभे आहेत; **क्रॉमवेल** इकडे तिकडे हिंडून सर्वांना धीर व उत्तेजन देत आहे; तोंच सूर्य क्षितिजाखालून वर डोकें काढतांना दिसला. तेव्हां **क्रॉमवेल** सर्व शिपायांना ऐकूं जाईल अशा स्वरानें म्हणाला, "देव वर येवो, आणि शत्रूंची दाणादाण करो !" स्कॉट सैन्य खालीं येऊन लढाईला तोंड लागलें. **क्रॉमवेलचे** कसलेले शिपाई अशा संधीची वाटच पहात होते. त्यांनीं थोड्याच वेळांत शत्रूचे तीन हजार लोक कापून काढले आणि सुमारें दहा हजार कैदी व सर्व दारूगोळा हस्तगत केला (Dunbar Drove). पुढें या पकडलेल्या कैद्यांपैकीं बरेचसे कैदी अमेरिकेंत पाठवून तिकडे त्यांना गुलाम म्हणून विकण्यांत आलें.

१३ उत्तर स्कॉटलंडमधील लोक—अशा रीतीनें स्कॉटलंडचा दक्षिण भाग इंग्रजांच्या हातीं आला, परंतु उत्तरभागचे लोक इंग्रजांना शरण येईनात. स्कॉटलंडच्या उत्तरेकडील डोंगरी लोक (Highlanders) फार शूर व कडवे असल्याबद्दल फारा दिवसांची ख्याति आहे. त्यांनीं **क्रॉमवेलला** न जुमानतां **चार्लस** राजाला राज्याभिषेक करण्याचें ठरविलें. पण खुद्द राजा आतांपर्यंत स्कॉट सुधारकांच्या कैदेंत राहून कंटाळला होता. त्यानें एकदां संधि साधून आपली सुटका करून घेतली, आणि आणखीं एकदां स्कॉट सुधारकांच्या मदतीनें नव्हे, तर आपल्या मताच्या राजपक्षीय मंडळींच्या जोरावर आपली गादी प्राप्त करून घेण्याचा विचार चालविला. परंतु ही त्याची आशा सफल होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां लवकरच शहाणपणा करून तो पुनः स्कॉट सुधारकांच्या तंत्रानें चालण्याला कबूल झाला.

१४ चार्लसचा राज्याभिषेक—इ. स. १६५१ च्या वर्षप्रतिपदेच्या (New Year's Day) मुहूर्तावर 'स्कोन' (Scone) नांवाच्या गांवीं स्कॉट लोकांनीं **चार्लसकडून** आपल्या धर्मासंबंधाचे करार कबूल करून घेतल्यावर त्याला विधिपूर्वक राज्याभिषेक केला. लेस्लीचें उरलेलें सैन्य ' स्टर्लिंग ' (Sterling) येथें खंदकांच्या आश्रयानें टिकाव धरून राहिलें होतें. **चार्लसचें** हें नवें सैन्य त्या सैन्याला जाऊन मिळालें. उत्तरेकडील डोंगरी लोकांचीही त्यांना मागाहून कुमक

मिळण्यासारखी होती. पुनः क्रॉमवेलला काय करावें याची पंचाईत पडली. त्यानें फोर्थ (Forth) नदी ओलांडून स्कॉट लोकांना उत्तरेकडून मिळणारी रसद बंद पाडण्याचें ठरविलें; व तो नदी ओलांडून पलीकडे गेला असें पाहून चार्लसनें एकाएकीं मोठा धीर करून खुद्द इंग्लंडवरच स्वारी केली.

१५ वुरसेस्टरची लढाई—इंग्लंडमध्यें गेल्यावर राजपक्षीय मंडळी आपल्याला अनुकूल होईल अशी त्याला आशा होती. परंतु इकडचे राजपक्षीय लोक राजाला मदत करण्याला खुषी असले तरी त्यांची तयारी कोठें होती ? चार्लस इंग्लंडची सरहद्द ओलांडून दोन तीन दिवसांत 'वुरसेस्टर' (Worcester) येथें येऊन पोंचला, तों तिकडून क्रॉमवेलनें आपला मोर्चा फिरवून तो या स्कॉट सैन्याचा पाठलाग करीत वुरसेस्टरला आला. उभय सैन्यांमध्यें निकराची लढाई झाली. तीन हजार स्कॉट लोक धारातीर्थी पतन पावले. आणि दहा हजार लोक इंग्लिशांचे कैदी झाले. या कैद्यांना पूर्वीप्रमाणेंच आफ्रिका, अमेरिका वगैरे खंडांतून इंग्रजांच्या नवीन वसाहतींत गुलाम म्हणून विकण्यांत आलें.

१६ चार्लसचा अज्ञातवास—चार्लस मात्र वुरसेस्टरच्या समरांगणांतून निसटला. तो वेष पालटून महिना दोन महिने इंग्लंडच्या मध्यभागच्या जिल्ह्यांतून (Midland counties) भटकत होता. या अज्ञातवासांत त्याच्यावर पुष्कळ संकटें ओढवलीं. परंतु त्या सर्व संकटांतून तो बचावला. एकदां एका मोठ्या ओक वृक्षाच्या खांद्यांवर बसून त्याला सबंध दिवस काढावा लागला. पार्लमेंटनें चार्लसला पकडून देणाऱ्याला एक हजार पौंडांचें बक्षिस लावलें होतें. क्रॉमवेलचे शिपाई (Red coats) सभोंवारच्या रानांतून त्याचा शोध करीत होते. आणि हा त्या झाडावर बसून त्यांच्या सर्व हालचाली पहात होता ! दुसऱ्या एका वेळीं एक बाई पुढें चालली आहे, आणि हा मोतद्दाराचा वेष घेऊन तिचा घोडा हातांत धरून नेत आहे, बरोबर त्याचा स्नेही सरदार 'विलकट' (Wilcot) हा कुत्रीं घेऊन चालला आहे, व ही सर्व मंडळी जणूं काय कोठें शिकारीला निघाली आहे, असा बहाणा करून त्याला वेळ मारून न्यावी लागली ! हा त्याचा अज्ञातवास सुमारें चाळीस एक लोकांना तरी माहीत होता. पण या वेळीं कोणींही विश्वासघात करून त्याला पार्लमेंटच्या हवालीं केलें नाहीं. अखेरीस मोठ्या प्रयासानें त्यानें बंदर किनारा गांठला, आणि तेथून कोळसे वाहणाऱ्या एका गलबतांत (a coal-boat) बसून फ्रान्सचा रस्ता सुधारला.

१७ स्कॉटलंडवर अंमल—इकडे वुरसेस्टरच्या पराभवानें स्कॉटलंडमधील राजपक्षीय मंडळींची अखेरची आशा नष्ट झाली, आणि **क्रॉमवेलनें** ' मंक ' (Monk) नांवाच्या एका सरदाराची स्कॉटलंडमध्यें नेमणूक करून सर्व स्कॉटलंड देश आपल्या अंमलाखालीं आणला.

१८ हॉलंडशीं तंटा—स्कॉटलंडची व आयर्लंडची ही हकीगत झाली. आतां **क्रॉमवेल** व त्याचें शूर सैन्य यांची जिकडे तिकडे दहशत बसूं लागली. तोंच युरोपांतील हॉलंड देशाशीं इंग्लंडचें आरमारी युद्ध होण्याचा रंग दिसूं लागला. मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, इंग्रजांनीं वधस्तंभावर चढविलेल्या **चार्लस** राजाच्या **मेरी** (Mary) नांवाच्या मुलीचें ऑरेंज (Orange) प्रांताच्या राजपुत्राशीं लग्न झालें होतें. या राजपुत्राचें नांव **वुइल्यम** (William) असें असून तो या वेळीं हॉलंडच्या लोकसभेचा अध्यक्ष होता. त्याला इंग्लंडच्या **पार्लमेंटनें** केलेलीं कृत्यें मान्य नव्हतीं. त्यामुळें इंग्लंडमधील राजपक्षीय मंडळीला हॉलंड ही एक आश्रयाची जागा झाली होती. पुढें कांहीं दिवसांनीं वुइल्यम राजपुत्र मरण पावला, तरी हॉलंडचें सरकार इंग्रजांशीं वैरभावानें वागावयाचें तें वागतच असे.

१९ अशी स्थिति असतांना इ स. १६५१ च्या ऑक्टोबर महिन्यांत इंग्लिश **पार्लमेंटनें** असा कायदा (Navigation Act) केला कीं, **युरोप** खंडांतून इंग्लंडमध्यें जो माल यावयाचा, तो इंग्रजी जहाजांतून आला पाहिजे किंवा ज्या देशाचा तो माल असेल त्याच देशाच्या जहाजांतून आला पाहिजे. तिसऱ्या देशाच्या जहजांतून आणूं द्यावयाचा नाहीं. या कायद्याचा रोंख हॉलंडच्या व्यापाराला धक्का देण्याचा होता. कारण या वेळीं **युरोपखंडांतील** बहुतेक देशांतील मालाची ने–आण हॉलंडच्या गलबतांतून होत असे. व त्यामुळें त्या देशाच्या आरमारालाही बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. आतां हॉलंडच्या गलबतांना इंग्लंडला येण्याची बंदी झाल्यामुळें दोन्ही देशांमधलें वैर ज्यास्तच वाढलें.

२० आरमारी चकमक—इंग्लंड व **हॉलंड** यांच्यामध्यें जो समुद्राचा चिंचोळा भाग आहे त्यांत दोन्ही देशांचीं गलबतें सफरी करीत असत. एके दिवशीं **ब्लेक** (Blake) नामक इंग्रज आरमाराधिपतीनें हॉलंडच्या आरमाराधिपतीला सांगितलें कीं, इंग्लंडचा बावटा दिसला म्हणजे तुम्हीं आपल्या गलबताचें शीड गुंडाळलें पाहिजे. कारण या समुद्रावर आमचें स्वामित्व असल्यामुळें परकी देशच्या गलबतांनीं असेंच करण्याची पूर्वापार वहिवाट आहे. हॉलंडच्या आरमाराचा अधिकारी ' ट्रॉम्प '

(Tromp) यानें अर्थातच ही गोष्ट नाकबूल केली, आणि दोघांमध्यें युद्ध जुंपलें. या युद्धांत ट्रॉम्पचा पराभव होऊन त्याचीं दोन गलबतें बुडालीं. ही गोष्ट इ. स. १६५२ च्या मे महिन्यांत घडली. पुढें लवकरच दोन्ही देशांमध्यें उघड युद्ध सुरू झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

२१ जयापजय—सप्टेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस इंग्रज आरमाराधिपति ब्लेक यानें डच (हालंडच्या लोकांना डच म्हणतात) आरमाराधिपति रूटर (De Ruyter) व विट (Witt) यांचा पराभव केला. पण पुढच्या महिन्यांत ट्रॉम्प या डच आरमाराधिपतीनें ब्लेकचा पराभव करून उसनें फेडलें. ही लढाई काळोख पडेपर्यंत चालली होती. शेवटीं ब्लेकला आपलीं गलबतें मागें घ्यावीं लागलीं. या जयानें ट्रॉम्प इतका फुगून गेला कीं, त्यानें इंग्रजांचें आरमार समुद्रांतून मी झाडून काढणार या अर्थाची निशाणी म्हणून एक केरसुणी (a broom) आपल्या गलबताच्या डोलकाठीवर (mast head) बांधली ! परंतु पुढल्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यांत ब्लेकनें पुन्हां तयारी करून पोर्टलंड(Portland)जवळ ट्रॉंपला गांठलें आणि त्याच्या गलबतांवर तीन दिवस मारा करून अखेर त्याला खालीं मान घालून हॉलंडला परत जावयास लावलें. या लढाईंत हॉलंडचीं एकेचाळीस गलबतें नाहींशीं झालीं आणि पस्तीसशें लोक प्राणांस मुकले. थोड्या दिवसांनीं ट्रॉंपनें पुन्हा एकदां प्रयत्न करून पाहिला; परंतु याही वेळीं त्याचीं एकवीस गलबतें नाहींशीं होऊन त्याला हिरमुसलें होऊन परत हॉलंडला जावें लागलें. नंतर इंग्लिशांनीं ट्रॉंप ज्या बंदराचा आश्रय करून होता त्या बंदराला वेढा दिला. या ठिकाणीं पुन्हां तीन दिवस लढाई चालली आणि त्या लढाईंत ट्रॉंप गोळी लागून ठार झाला. हॉलंडच्या या पराभवानें आतां इंग्लंडचें समुद्रावरील स्वामित्व निर्विवाद ठरलें गेलें. आणि पुढें इ. स. १६५४ च्या एप्रिल महिन्यांत उभय राष्ट्रांमध्यें तह होऊन डच लोकांनीं इंग्रजांच्या राजाला अगर राजपक्षीय लोकांना आश्रय देऊं नये, इंग्लंडच्या पार्लमेंटच्या निशाणाला त्यांनीं योग्य तो मान द्यावा, आणि कित्येक इंग्रज व्यापाऱ्यांचीं डच व्यापाऱ्यांशीं येण्यादेण्याच्या बाबतींतील भांडणें होतीं तीं भांडणें मिटवून टाकावीं असें ठरलें.

२२ क्रॉमवेलविषयीं अप्रीति—हॉलंडशीं हें युद्ध सुरू असतां इंग्लंड-मध्यें राज्यकारभारासंबंधानें बरीच गडबड चालली होती. क्रॉमवेलच्या पराक्रमानें इंग्लंडचा बाहेरच्या देशांत बोलबाला होत होता. परंतु खुद्द इंग्लंडमध्यें तो

करील ती पूर्व दिशा असें होऊन गेलें असल्यामुळें त्याच्याविषयीं पुष्कळांना मत्सर व भीति वाटूं लागली होती. पार्लमेंट सभेच्या बहुतेक सभासदांना हांकून देऊन त्यानें आपल्याला अनुकूल अशी लोकसभा निर्माण केली होती हें मागें सांगितलेंच आहे. आतां या त्याच्या लोकसभेलाहि तो इंग्लंडमधील सगळी सत्ता बळकावून बसतो कीं काय अशी भीति वाटूं लागली.

२३ लष्कर व पार्लमेंट यांमधील झगडा—इ. स. १६५१ मध्यें लोकसभेनें असा एक ठराव केला होता कीं, इ. स. १६५४ च्या अखेरपर्यंत इंग्लंडमध्यें सर्वसंमत व स्थिर अशी राज्यघटना तयार करून आपण बरखास्त व्हावें. ती वेळ आतां येऊन ठेपली. परंतु आतां जिकडे तिकडे लष्करचा वरपगडा झालेला असल्यामुळें हें सर्व लष्कर असेंच राहूं दिल्यास स्थिर अशी राज्यघटना निर्माण करण्याचें काम कठीण होईल असें वाटून या सभेच्या सभासदांनीं कांहीं सैनिकांना रजा देऊन लष्कर कमी करावें असें ठरविलें. परंतु क्रॉमवेल थोडाच या सभेला दाद देणार ! लष्कर कमी करण्याचा प्रश्न निघाल्याबरोबर या सभेला असें करण्याचा अधिकारच नाहीं असें त्यानें ताबडतोब बजाविलें ! नंतर आपल्यांत आणखीं कांहीं 'त्रयस्थ' इसम सभासद करून घ्यावे असा ठराव लोकसभेपुढें आला. हा ठराव कशाकरतां पुढें आला हें क्रॉमवेलनें तात्काळ ओळखलें, आणि असले ठराव पुढें आणून लष्कराची सत्ता कमी करूं पाहणारी ही सभाच बंद करण्याचा त्यानें निश्चय केला.

२४ क्रॉमवेलचा उद्दामपणा—वर सांगितलेल्या ठरावावर सभेंत चर्चा होऊं लागली तेव्हां क्रॉमवेल उठून उभा राहिला, आणि एकेका सभासदाचें नांव घेऊन "हा लुच्चा आहे, तो पाजी आहे, अमका सभासद स्वार्थलंपट आहे, तमका आपल्या पोळीवर तूप ओढूं पहात आहे, हे राजेश्री भ्रष्ट आहेत", अशा प्रकारें त्यानें सर्व सभासदांवर ताशेरा झाडला; आणि शेवटीं सर्वांना उद्देशून तो म्हणाला, "पण आतां तुमचें काम संपलें. देवानें आपले हेतु तडीस नेण्यासाठीं तुमच्यापेक्षां अधिक लायक लोकांची योजना करून ठेवली आहे." हें ऐकून एक सभासद उठून म्हणाला 'लोकसभेच्या नोकरा'नें असली भाषा बोलणें योग्य नव्हे.' तेव्हां क्रॉमवेल पुढें होऊन म्हणाला "या महाराज ! या ! तुमची ही बडबड मी चालूं देणार नाहीं. तुम्ही म्हणजे पार्लमेंट सभा नव्हे. येथून चालते व्हा ! तुमची जागा तुमच्यापेक्षां अधिक प्रामाणिक असे दुसरे लोक भरून काढतील." (Get you

gone, and give way to honester men)! असें म्हणून त्यानें आपला पाय जमिनीवर आपटला; तोंच या इशाऱ्याची वाट पहात बाहेर उभे असलेले बंदुका घेतलेले शिपाई दरवाजा उघडून एकदम आंत घुसले. सभेच्या अध्यक्षाकडे बोट दाखवून क्रॉमवेल म्हणाला, "या दारूबाजाला बाहेर घेऊन चला!" त्याला घालवून दिल्यावर तो सभेच्या व्यासपीठावरील मेजावर राजदंड (Mace) होता, त्याच्याकडे बोट दाखवून म्हणाला, "हें लांकूड बाहेर फेंकून द्या!" (Take away that bauble). सर हेन्री व्हेन (Sir Henry Vane) म्हणून या 'सामुदायिक सत्ता-मंडळा'च्या सभेंत एक वजनदार सभासद होता, त्याला सर्व सभासद व इतर लोकही वचकून असत. तो या वेळीं उभा राहून म्हणाला, "क्रॉमवेल! हें बरें नव्हे! या गोष्टी नीति व प्रामाणिकपणा यांशीं विरुद्ध आहेत." त्यावर क्रॉमवेल संतापून चेष्टेच्या स्वरानें म्हणाला, "कोण? सर हेन्री व्हेन? देवा! या सर हेन्रीपासून माझी मुक्तता कर!" अशा रीतीनें क्रॉमवेलनें आपल्याला अडथळा करणाऱ्या सर्व सभासदांना हांकून लावून (Expulsion of the Long Parliament) सभागृहाला कुलूप ठोकलें, आणि किल्ल्या खिशांत घालून तो आपल्या वाड्यांत निघून गेला. दुसऱ्या दिवशीं एका वात्रट राजपक्षीय गृहस्थानें 'हें घर भाड्यानें देणें आहे,' अशी जाहिरात पार्लमेंटच्या सभागृहाच्या दरवाजावर चिकटून ठेवलेली आढळली! असो.

२५ नवी घटना.—आतां क्रॉमवेल खरोखरच सर्व सत्ताधीश झाला. त्यानें आपल्याला अनुकूल असे आठ लष्करी अधिकारी व चार मुलकी अधिकारी निवडून यांचें एक कौन्सिल (Council) बनविलें. परंतु ही त्याची व्यवस्था लोकांना आवडणारी नव्हती व लोक संतुष्ट असल्याशिवाय त्याचा हा अधिकार फार दिवस चालण्यासारखाही नव्हता. तेव्हां लोकांना शांत करण्यासाठीं त्यानें इंग्लंडमधील सगळ्या धर्माधिकाऱ्यांना 'विश्वासू, देवाला भजणारे, व निर्लोभी' अशा गृहस्थांची एक यादी तयार करावयास सांगितली; आणि या गृहस्थांपैकीं १३९ गृहस्थांचें एक मंडळ बनवून त्यांच्याकडे १५ महिनेपर्यंत इंग्लंडमधील मुख्य सत्ता असावी असें ठरविण्यांत आलें.

२६ या मंडळाची पहिली सभा इ. स. १६५३ च्या जुलै महिन्यांत भरली. या सभेंत बेअरबोन (Barebone) नांवाचा एक चांभार सभासद होता त्याच्या नांवावरून या सभेला 'बेअरबोनची सभा' (Barebone's Parliament) असें म्हणत असत. या सभेनें मोठ्या जोरानें काम करण्यास सुरवात केली.

पण या 'शहाण्या' सभासदांनीं सुचविलेल्या कित्येक ठरावांबद्दल खुद्द क्रॉमवेललाच लाज वाटून पांच महिन्यांच्या अखेरीस त्यानें ही सभा मोडून टाकली !

२७ लग्नाचा कायदा—या सभेनें पास केलेल्या ठरावांपैकीं लग्नसंबंधाचा एक ठराव मात्र पुढें अंमलांत आला. आजपर्यंत इंग्लंडमध्यें लग्न हा आपल्या इकडच्याप्रमाणेंच एक धार्मिक 'संस्कार' असें मानीत असत. परंतु या सभेनें एक ठराव करून लग्न हा 'करार' आहे व तो पुरा होण्याला धर्माचार्यांची आवश्यकता नसून एकाद्या माजिस्ट्रेटपुढें तो पुरा केला म्हणजे झालें असें ठरविलें.

२८ क्रॉमवेल रक्षक झाला—वर सांगितल्याप्रमाणें या छोट्या मंडळाची इतिश्री झाल्यावर **क्रॉ**मवेलच्या कौन्सिलनें **क्रॉ**मवेलला इंग्लंडचा 'रक्षक' (Lord Protector) ही पदवी देऊन राजाचे सर्व अधिकार त्याला देण्याचें ठरविलें. राज्याभिषेकाच्या वेळीं राजाची मिरवणूक काढतात, तशी त्याची मिरवणूक काढून 'वेस्टमिन्स्टर हॉल' (Westminster Hall) नामक जुन्या सुप्रसिद्ध राज्याभिषेक करण्याच्या वाड्यांत न्यायाधीश, लष्करचे मुख्य मुख्य अधिकारी, व इतर बडे गृहस्थ जमल्यावर लँबर्ट (Lambert) नांवाच्या एका सेनापतीनें इंग्लंड, **स्कॉ**टलंड, व **आ**यर्लंड यांच्या वतीनें 'रक्षक' ही पदवी स्वीकारण्याविषयीं **क्रॉ**मवेलला विनंति केली, व क्रॉमवेलनें ती मान्य करून पुढें दिलेल्या नियमांना (Instrument of Government) अनुसरून राज्यकारभार चालविण्याचें कबूल केलें. ते नियम असेः—

२९ नवे नियम—(१) तीन वर्षांनीं एकदां पार्लमेंटची निवडणूक करावयाची व प्रत्येक वर्षी निदान पांच महिनेपर्यंत तरी पार्लमेंटची सभा चालावयाची. (२) इंग्लंडचे ४०० आणि **स्कॉ**टलंडचे व **आ**यर्लंडचे मिळून ३० असे सभासद पार्लमेंटमध्यें असावयाचे. (३) तीस हजार सैनिकांचें लष्कर सदैव ठेवावयाचें. (४) **पो**पवादी शिवाय करून इतर सर्वांना धार्मिक बाबतींत स्वातंत्र्य द्यावयाचें. (५) 'रक्षका'ची जागा निवडणुकीवर अवलंबून रहावयाची. या नियमांनुसार राज्यकारभार चालविण्याचें कबूल करून **क्रॉ**मवेल परत आपल्या वाड्यांत गेला व दुसऱ्या दिवशीं तो 'रक्षक' झाल्याबद्दल जिकडे तिकडे द्वाही फिरविण्यांत आली.

३० क्रॉमवेलचा अनियंत्रित कारभार—पुढल्या वर्षी ठरल्याप्रमाणें **क्रॉ**मवेलनें **पा**र्लमेंट सभेची बैठक भरविली. परंतु या सभेचे सभासद **क्रॉ**मवेलच्या

मतांना अनुकूल होईनात. तेव्हां पांच महिन्यांनीं ही सभा मोडून टाकण्यांत आली. लष्कर त्याचा शब्द झेलण्यास तयार होतेंच. तेव्हां त्याच्या जोरावर त्यानें आतां पार्लमेंट सभेशिवाय राज्य चालविण्याचें ठरविलें. पार्लमेंटचें नियंत्रण नसल्यामुळें त्याच्या कृत्यांना दुर्दैवी चार्लस राजाच्या कृत्यांप्रमाणेंच आतां जुलमाचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. आणि हळूहळू चार्लस राजापेक्षांही लोक क्रॉमवेलचा ज्यास्त द्वेष करूं लागले.* पूर्वी त्याच्या पक्षाचे असलेले कित्येक स्वातंत्र्यवादी लोकही आतां राजपक्षीय मंडळीला जाऊन मिळूं लागले आणि जिकडे तिकडे गुप्त कट आणि गुप्त मसलती यांचें साम्राज्य पसरलें.

२१ लष्करी अंमल—उलट पक्षीं क्रॉमवेलनेंही जिकडे तिकडे गुप्त हेर ठेवून सर्व बातमी मिळविण्याची तजवीज केली. आणि कोठें बंडाचा यत्किंचितही संशय आल्यास तें मुळांतच नाहींसें करण्याचा क्रम चालविला. सर्व देशाचे १२ भाग (Military Districts)करून त्यानें प्रत्येक भागावर एकेका लष्करी अंमलदाराची(Major-General) नेमणूक केली. आणि त्याला आपले सर्व अधिकार चालविण्याची मोकळीक (Absolute power) दिली. कोणीं कोठें हूं कीं चूं केल्यास त्याला जबर दंड,

---

* क्रॉमवेलच्या लष्करशाहीपेक्षां जुनी राजशाहीच बरी असें लोकांना कां वाटूं लागलें, याचें कारण या लष्करशाहीच्या पुढील वर्णनांत आढळेलः—" His (Cromwell's) administration was harsh and despotic. He summoned, prorogued and dissolved parliaments. The nation was really under Martial Law. Papists and Royalists were treated with the utmost rigor. A censorship of the Press was established. Scotland was overawed by strong garrison. The Irish Royalists rising against the 'usurper' were crushed with remorseless severity. Thousands were massacred, and thousands more transported to the West Indies to be sold as slaves. Forty thousand sought freedom from the Protector's tyranny by enlisting in the armies of the Continent. " (Myres)

हद्दपारी, तुरुंगवास, अशा शिक्षा होऊं लागल्या. कित्येकांस बाहेरच्या वसाहतींत नेऊन गुलाम म्हणूनही विकण्यांत आलें. हा लष्करी जुलूम (Military Despotism) नाहींसा करण्याला कोणाला कांहींच मार्ग दिसेना. अखेरीस क्रॉमवेलचा खून केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा विचार लोकांच्या मनांत येऊं लागला आणि क्रॉमवेलही फार सावध राहून नंग्या तरवारींच्या पहाऱ्याशिवाय आपल्या वाड्यांतून बाहेर पडेनासा झाला !

३२ क्रॉमवेलचें परराष्ट्रीय धोरण—त्या कालांतील क्रॉमवेलचें परराष्ट्रीय धोरण मात्र इंग्लंडचा नांवलौकिक वाढवितें झालें. त्याच्या सैनिकांचें शौर्य, चिकाटी, व आत्मसंयमन पाहून त्याच्या शत्रूंनींही तोंडांत बोटें घातलीं. हॉलंडला त्यानें आपण सांगूं त्या अटीवर तह करण्यास भाग पाडलें. स्पॅनिश लोकांशीं युद्ध सुरू झाल्यावेळीं जमिनीवर व समुद्रावर दोन्ही ठिकाणीं त्यांना चांगलाच चोप खावा लागला, व जमैका (Jamaica) बेट इंग्लिशांच्या हवालीं करावें लागलें. फ्रान्सच्या दरबारांतील मंत्रीही त्याला मान देऊं लागले. व खुद्द पोपमहाराजही क्रॉमवेलच्या भीतीनें युरोप खंडांतील रोमन क्याथोलिक लोकांवरील धार्मिक जुलमाला सौम्य स्वरूप देऊं लागले. असो.

३३ इ. स. १६५६—या वर्षी क्रॉमवेलनें सर्व राष्ट्र आपल्याविरुद्ध खवळलेलें आहे असें माहीत असूनसुद्धां आपल्या लष्करी अंमलदारांच्या मदतीच्या जोरावर पुनः पार्लमेंट सभा बोलाविली. या वेळीं मतदारांनीं निवडलेल्या सुमारें ९० प्रतिनिधींना ते क्रॉमवेलच्या जुलमी अंमलाला विरोध करणारे म्हणून पार्लमेंटमध्यें बसूं दिलें नाहीं. पुढल्या वर्षी या नव्या पार्लमेंटनें क्रॉमवेलला ' राजा ' (King) ही पदवी देण्याचा ठराव केला. परंतु त्यानें ही पदवी घेण्याचें नाकारलें. तेव्हां ' रक्षक ' ही पदवी त्याजकडे तशीच ठेवण्याचा ठराव पुन्हां कायम करण्यांत येऊन आपल्यामागें ती जागा वाटेल त्याला देण्याचा व नवीन सरदार निर्माण करण्याचा अधिकार त्याला देण्यांत आला. राजनिष्ठेच्या शपथेप्रमाणें सर्व सभासदांनीं क्रॉमवेलशीं ' रक्षक–निष्ठे'च्या शपथा घेतल्या. आणि 'राजानें' भोगावयाचा सर्व इतमाम क्रॉमवेलला अर्पण करण्यांत आला.*

३४ नवे सरदार—नवीन साठ सरदार निर्माण करून त्यांची सरदारसभा बनविण्यांत आली. या सरदारांतले बहुतेक सरदार हलक्या कुळांतले (inferior birth)

* He was installed a second time, when he received a Bible, a sword and a sceptre.

आडाणी व उद्धट वर्तनाचे होते. त्यामुळें जुने खानदानी सरदार त्यांना जवळ घेऊन बसण्यास कबूल होईनात. इ. स. १६५८ या वर्षी पार्लमेंटची सभा भरली, त्या वेळीं मागच्या वर्षी मनाई केलेल्या सभासदांतले बरेच सभासद आपल्या जागीं दिसत होते. क्रॉमवेलनें नवीन निर्माण केलेल्या सरदार सभेला मान्यता देण्याचा प्रश्न या सभेपुढें आला, तेव्हां लोकसभा त्या गोष्टीला कबूल होईना. क्रॉमवेलनें ही सभा ताबडतोब बरखास्त केली, आणि पुन्हां पार्लमेंटची बैठक भरवावयाची नाहीं असा निश्चय केला, व तो मरेपर्यंत कायम राखला !

३५ क्रॉमवेलचे अखेरचे दिवस—कॉमवेलचे अखेरचे दिवस मात्र फार त्रासांत व काळजींत गेले. त्याच्या जुलमी अंमलाला कंटाळून जुनी राजपक्षीय मंडळी व नवी स्वातंत्र्यवादी मंडळी त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न करूं लागली होती. त्यानें त्यांचा एकही कट साधूं दिला नाहीं ही गोष्ट खरी. परंतु आपला जीव नेहमीं धोक्यांत आहे ही जाणीव कोणाला कसें चैन पडूं देणार ? तो नेहमीं उदास व चिंतेनें व्यापलेला (dark and gloomy) असा दिसत असे. ' क्रॉमवेलचा जीव घेणें हा खून नव्हे ' (killing is no murder) असें प्रतिपादन करणारीं हस्तपत्रकें आतां देशभर विकण्यांत येऊं लागलीं होतीं. अंगांत चिलखत घालून वर कपडे करावयाचे, खिशांत नेहमीं पिस्तुलें बाळगावयाचीं, एकाच खोलींत कधीं निजावयाचें नाहीं; प्रवासाला निघाला तर फार जलदीनें जावयाचें, व गेलेल्या वाटेनें परत यावयाचें नाहीं, इतका सावधपणा त्याला ठेवावा लागे. त्यांतच घरगुती संकटांची व दुःखांचीही भर पडूं लागली. ' क्लेपोल ' (Clepole) नांवाची त्याची एक आवडती मुलगी होती. ती आसन्नमरण होऊन पडली असतां तिनें बापाला त्याच्या जुलमी वर्तनाबद्दल फार दोष दिला. तें त्याच्या जिवाला फार लागलें. शेवटीं काळजीनें व त्रासानें त्याची शक्ति क्षीण होऊन त्याला बारीक ताप येऊं लागला, व तोच पुढें बळावून इ. स. १६५८ च्या सप्टेंबरच्या तिसऱ्या तारखेस वयाच्या ६० व्या वर्षी त्याचा अंत झाला. त्याचा दफनविधि एखाद्या राजाच्या दफनविधीप्रमाणें मोठ्या समारंभानें करण्यांत आला.

३६ त्याच्या अंगचे गुणावगुण—क्रॉमवेलच्या अंगीं उपजत लष्करी बुद्धि, उत्साह, चिकाटी, छातीठोकपणा, व निश्चयी इच्छाशक्ति हे गुण प्रामुख्यानें वसत होते. मनुष्यस्वभावाची पारखही त्याला फार चांगली होती. सार्वजनिक बाबतींत कठोरपणानें व दृढनिश्चयानें वागणारा हा पुरुष घरांतल्या मंडळींशीं फार प्रेमानें वागे, व त्याच्या

खासगी वर्तनक्रमांत कोणाला नांव ठेवण्यासारखें कांहीं आढळण्यासारखें नव्हतें. ईश्वरावर त्याची फार निष्ठा होती. आयुष्याच्या शेवटच्या आठवड्यांत त्यानें केलेली प्रार्थना पुढीलप्रमाणें होती असें सांगतात, " हे परमेश्वरा ! मी लवकरच तुझ्याकडे येणार आहे. लोककल्याणासाठीं तूं मला जन्माला घातलेस. तें लोककल्याण व तुझी सेवा मी यथामति केली आहे. आतां तूं माझें वाटेल तें कर; पण या लोकांचें हित करण्यास मात्र तूं कधींही विसरूं नको." दिसण्यांत तो ओबडधोबड व गबाळ्यासारखा दिसे, आणि त्याचें भाषण कर्कश व चालचलणूक अडाणीपणाची वाटे. त्याला पांच मुलगे व चार मुली झाल्या होत्या; परंतु मुलांपैकीं रिचर्ड व हेन्री असे दोघेच त्याच्या मरणसमयीं जिवंत होते. पैकीं आपल्या मागून इंग्लंडचें ' रक्षकपद ' त्यानें रिचर्डला देऊन टाकलें होतें. असो.

३७ **क्रॉमवेलच्या मागून**—क्रॉमवेलच्या मरणानंतर त्यानें ठरवून ठेवल्या-प्रमाणें त्याचा मुलगा रिचर्ड याला इंग्लंडचें ' रक्षकपद ' मिळालें. त्यानें रीतीप्रमाणें पार्लमेंट सभा बोलावली. पण आतां लष्करी अधिकाऱ्यांचें वजन कमी झालेलें असल्यामुळें पार्लमेंट व लष्कर यांमधील पूर्वीचें भांडण पुनः जोरानें उसळलें. खुद्द लष्करी अधिकाऱ्यांतही आतां सत्तेविषयीं अहमहमिका उत्पन्न झाली होती.

३८ लँबर्ट (Lambert) नांवाच्या अधिकाऱ्यानें तर 'रक्षकपद'च आपल्याला मिळावें अशी खटपट चालविली. शूर व पराक्रमी बापाचा मुलगा बहुधा भ्याड व नेभळा निपजावयाचा, असा जो इतिहासांत पुष्कळ वेळां ' ब्रह्मदेवाच्या घरचा उलटा न्याय ' दिसून येतो, तोच क्रॉमवेलच्या या मुलाच्या बाबतींतही दिसून आला. * रिचर्ड जात्या मंद व कर्तृत्वहीन असल्यामुळें तो कौन्सिलच्या हातांतलें निव्वळ बाहुलें बनला. कौन्सिलनें पार्लमेंट सभा बंद करण्याविषयीं त्याला सल्ला दिली व त्यानें ती ऐकली. नंतर मागें इ. स. १६५३ मध्यें क्रॉमवेलनें हांकलून लावलेल्या पार्लमेंटच्या (The Rump) सभासदांना पुन्हां बोलावण्याचें ठरलें. परंतु रिचर्डनें आतां आपल्याला ही दगदग नको म्हणून रक्षकपदाचा राजीनामा दिला आणि तो ' चेशनट ' (Cheshnut) येथें आपल्या वतनवाडीवर (farms) जाऊन राहिला.

---

* Richard was exactly the opposite of his father—timid, irresolute, and irreligious.

३९ बळी तो कान पिळी—दरम्यान माजी पार्लमेंटचे सभासदही धीर करून एकत्र जमा झाले. परंतु लष्करी अधिकाऱ्यांशीं त्यांचें पटेना. लष्करी अधिकाऱ्यांना आतां लोकसभेला हाताशीं धरून इंग्लंडवर अंमल चालवावयाचा होता. आणि लोकसभा लष्करी अधिकारी हे राष्ट्राचे सेवक असल्यामुळें त्यांच्यावर आपला दाब ठेवण्याची खटपट करीत होती. परंतु या वेळीं 'बळी तो कान पिळी' अशीच स्थिति (Anarchy) झालेली ! लँबर्टनें (Lambert) इ. स. १६५९ च्या आक्टोबरच्या १२ व्या तारखेस दंडुकेगिरी चालवून पार्लमेंटच्या सभासदांना हांकलून लावलें (expelled the Parliament) आणि सर्व सत्ता लष्करी अधिकाऱ्यांची एक 'स्वास्थ्य कमिटी' नेमून त्यांच्या हातीं दिली. लष्करचा हा अरेरावीपणा जिकडे तिकडे आपला प्रताप गाजवूं लागला. लोक या माथेफिरू शिपायांच्या अंमलाला कंटाळले, आणि असल्या ह्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या (Republic) जुलमापेक्षां राजाचा जुलूम पुरवला असें वाटून, जो तो राजपुत्र **चार्लस**ला पुन्हां इंग्लंडच्या गादीवर बसविण्याचा विचार करूं लागला. ‡

४० लष्करमधील तंटे—याच सुमारास लष्करी अधिकाऱ्यांमध्येंही बेबनाव उत्पन्न झाला. स्कॉटलंडमध्यें जें सैन्य होतें, त्याचा पुढारी 'मंक' (Monk) हा होता. या 'मंक'नें मागच्या यादवींत प्रथम **चार्लस** राजाच्या बाजूनें शस्त्र उचललें होतें. परंतु पुढें प्रजापक्षीय मंडळींच्या हातीं लागल्यावर तो **क्रॉम**वेलचा पट्टशिष्य बनला होता. व आपल्या अंगच्या धैर्य, युक्तिबाजपणा वगैरे गुणांनीं त्यानें पार्लमेंटच्या सैन्यामध्यें मोठ्या मानाची जागा मिळविली होती. **क्रॉम**वेलनें **स्कॉट**लंड पादाक्रांत केल्यावर तिकडच्या 'सामुदायिक सत्तामंडळा'ची व्यवस्था पाहण्याला मंकला नेमलें होतें हें वाचकांच्या लक्षांत असेलच. आतां रिचर्डनें इंग्लंडच्या रक्षक-पदाचा राजीनामा दिल्यावर इंग्लंडमध्यें लँबर्टचें महत्त्व भलतीकडे वाढलेलें न खपून मंक हा इंग्लंडमधील पार्लमेंटचे हक्क रक्षण करण्यासाठीं म्हणून लंडनवर चालून येऊं लागला.

‡ लष्करच्या धिंगाण्यापेक्षां राजशाहीच बरी असें लोकांना वाटायला लागण्याला या लोकशाहींत राज्यव्यवस्थेचा खर्च अतोनात वाढला होता हेंही एक कारण होतें. कारण जेम्स व चार्लस यांच्या कारकिर्दींत लोकसभेचें राजाबरोबर भांडण होतें, तें फार तर दोन तीन लाख पौंडांसाठीं असेल. पण लष्करी अंमलाच्या १९ वर्षांत इंग्लंडला निरनिराळ्या लढाया आणि इतर खर्च यांच्या पायीं आठ नऊ कोटि म्हणजे दरसाल सुमारें चार साडेचार लाख पौंड उभे करावे लागले होते.

४१ मंक—दरम्यान इकडे इंग्लंडमधल्या पार्लमेंटच्या सभासदांनीं लष्करी अधिकाऱ्यांत बेबनाव उत्पन्न झाला आहे असें पाहून आपआपसांत जमून पुढें काय करावें याचा विचार चालविला होता. इतक्यांत त्यांना उत्तरेकडून **मंक** येत आहे ही बातमी समजली. परंतु **मंक** हा **क्रॉमवेल**चा अनुयायी असल्यामुळें तो येत आहे तो पार्लमेंटला मदत करण्यासाठीं येत आहे कीं **लँबर्ट**ची सत्ता आपण बळकाविण्यासाठींच येत आहे याचा त्यांना संशय पडला. इ. स. १६६० च्या फेब्रुवारीच्या तिसऱ्या तारखेस ७ हजार सैन्यानिशीं **मंक**नें लंडनमध्यें प्रवेश केला आणि आपण पार्लमेंटच्या बाजूचे आहों असें जाहीर केलें. हें ऐकून सगळें राष्ट्र आनंदित झालें. जिकडे तिकडे आनंदाचे घंटानाद होऊं लागले. आणि दररोज रात्रीं लंडनच्या सभोंवतालचें पांच मैलांचें आकाश आनंदसूचक होळ्यांच्या (Bonfires) प्रकाशानें लाल दिसूं लागलें. फेब्रुवारीच्या एकविसाव्या तारखेस पार्लमेंटचे जुने सभासद एकत्र जमले आणि त्यांनीं पुन्हां निवडणूक करून नवीन पार्लमेंटची सभा बोलवावी असा ठराव केला.

४२ कन्व्हेन्शन पार्लमेंट—पार्लमेंट सभा ही राजाच्या हुकुमानें बोलावण्यांत येत असते. पण या वेळीं राजाच जाग्यावर नसल्यामुळें हुकूम करणार कोण ? जुन्या सभासदांनीं पुढील व्यवस्था करण्यासाठीं ही सभा बोलावली होती. म्हणून पार्लमेंटच्या इतिहासांत या सभेला ‘ कन्व्हेन्शन पार्लमेंट ’ (Convention Parliament) म्हणजे ‘ बिन अधिकारी पार्लमेंटसभा ’ असें नांव दिलेलें आहे. असो.

४३ या परिषदेची पहिली बैठक एप्रिलच्या २५ व्या तारखेस भरली. **मंक**नें यापूर्वीं कांहीं दिवस राजपुत्र **चार्ल्स**शीं पत्रव्यवहार चालविला होता. मेच्या पहिल्या तारखेस सदरील परिषदेची बैठक चालू असतां **मंक**नें सांगितलें कीं, दरवाजाशीं राजपुत्र **चार्ल्स**कडून एक हरकारा (Messenger) आला आहे. हें ऐकून सर्व सभासदांना आनंद झाला. **चार्ल्स**कडून आलेल्या वकिलाला ताबडतोब आंत बोलावण्यांत आलें. आणि या वकिलानें **चार्ल्स**चें पत्र सभासदांना वाचून दाखविलें.

४४ तरुण चार्ल्सचा राज्याभिषेक—त्या पत्रांत आपणाला इंग्लंडची गादी मिळाल्यास पुढील अटींप्रमाणें वागण्यास मी कबूल आहें असें **चार्ल्स**नें लिहिलें होतें. त्या अटी अशा:—(१) सर्व अपराध्यांना बिनशर्त माफी (amnesty) द्यावयाची; कोणाला माफी द्यावयाची नाहीं तें पार्लमेंटनें ठरवावें. (२) धार्मिक बाबतींत सर्वांना स्वातंत्र्य (Liberty of Conscience) द्यावयाचें. (३) देशांतील ज्या इस्टेटींबद्दल वाद

उत्पन्न झाला असेल त्यांचा निकाल पार्लमेंटनें करावयाचा. (४) मंकच्या शिपायांचा मागचा सर्व पगार पार्लमेंटनें देऊन टाकावयाचा व तेवढें लष्कर कायमचें ठेवावयाचें. या अटींवर राजाला परत बोलाविण्याचें सर्वानुमतें ठरलें, आणि मेच्या २५ व्या तारखेस चार्लस राजा हॉलंडमधून मोठ्या समारंभानें इंग्लंडमध्यें येऊन दाखल झाला.

३५ अकरा वर्षांचें सिंहावलोकन—अशा रीतीनें माजी चार्लस राजाच्या वधानंतर इंग्लंडमध्यें माजलेली ‘ लष्करशाही ’ मोडली, आणि इंग्लंडच्या राजपदावर पुनः ‘ राजा ’ची प्राणप्रतिष्ठा झाली. इ. स. १६४९ पासून इ. स. १६६० पर्यंतचीं हीं ११ वर्षें इंग्लंडमधल्या सर्वच प्रजेला मोठ्या विवंचनेंत व त्रासांत काढावीं लागलीं. क्रॉमवेलचा स्वातंत्र्यवादी पक्ष धार्मिक बाबतींत ‘ मनःपूतं समाचरेत् ’ हें तत्त्व तोंडानें प्रतिपादणारा होता, तरी प्रत्यक्ष कृतींत त्याची परमतसहिष्णुता दिसून येत असे असें म्हणवत नाहीं. जेम्स नेलर (James Nellor) नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्याला त्याच्या कांहीं मतांबद्दल प्रथम चाबकानें मारून नंतर त्याच्या जिभेवर डाग देऊन जन्मभर कैदेंत ठेवण्यांत आलें होतें. जॉर्ज फॉक्स (George Fox) नांवाच्या एका इसमानें ‘मित्रमंडळ’ म्हणून एक निराळा संघ स्थापन केला, त्याबद्दल त्याला अनेक वेळां खोड्यांत घालून तुरुंगांतही पाठविण्यांत आलें होतें. ‘सामुदायिक सत्तामंडळा’च्या या अमदानींत घडलेल्या चांगल्या गोष्टी म्हणजे ज्यू लोकांना पुन्हां लंडनमध्यें राहूं देण्यांत आलें, बँकेचा धंदा सुरू झाला, लंडनमध्यें अनेक कॉफीगृहांची स्थापना झाली, व इंग्लंडच्या स्वतःच्या कारखान्यांत खिशांतलीं घड्याळें तयार होऊं लागलीं या होत.

प्रकरण ५० वें.

नवा राजा.

(इ. स. १६६०– इ. स. १६७४)

[१।२ राजनिष्ठेची लाट. ३ चार्लसचा वाढदिवस. ४ राजनिष्ठांचा सन्मान. पार्लमेंटचें काम. ५ राजाचा तनखा. ६ मिळकतीचे वाद. ७ देवस्थान प्रकरण. ८ अपराध्यांना शिक्षा. ९ क्रॉमवेलच्या शवाची विटंबना. १० स्कॉटलंड व आयर्लंडमध्यें. ११ नवी निवडणूक–सुधारकांवरील मोहीम. १२ असंतोषावर उपाय १३

नव्या चार्लस राजाची चैन-पैशाची अडचण व संपादन. १४ डच लोकांशीं भांडण. १५।१६ प्लेगचा कहर-लोकांची दुर्दशा. १७ आग. १८ आगीनें काय साधलें ? १९ चार्लसचा दरबार. २० राजाचा अधःपात-लोक विटले ! २१ क्लॅरेंडन. २२ राजसत्तावादी पंचक. २३ फ्रान्सचें प्रस्थ-आळा बसला. २४ राजा व फ्रान्स. २५ लुईचें कारस्थान-मॅडम कारवेल. २६ सराफांची मुस्कटदाबी. २७ वटहुकूम. २८ हॉलंडशीं युद्ध. २९ इ. स. १६७३-एक नवा कायदा-पंचकांचा अधिकारन्यास.]

१ राजनिष्ठेची लाट—मागील प्रकरणांत इ. स. १६६० च्या मे महिन्याच्या २५ व्या तारखेस नवा राजा **चार्लस** हा हॉलंडमधून इंग्लंडमध्यें येऊन पोंचल्याचें सांगितलें. या वेळीं इंग्लंडमधील प्रजेमध्यें राजनिष्ठेची लाट पुन्हां उसळली. **क्रॉमवेल**च्या मागून लष्करनें जो धिंगाणा घातला, त्यामुळें लोकांना निव्वळ प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा वीट येऊन, कसाही असला तरी राजा म्हणून कोणी तरी पाहिजे असें वाटूं लागलें होतें. त्यामुळें माजी **चार्लस** राजाच्या पक्षपाती मंडळीला राजसत्तारूपी मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचें काम (Restoration) सुलभ गेलें.

२ चार्लसचा वाढदिवस—डोव्हर (Dover) येथें नव्या राजाची स्वारी उतरल्यापासून लोकांच्या आनंदाला भरतें येऊन जिकडे तिकडे राजनिष्ठेचे पोवाडे गाण्यांत येऊं लागले. **चार्लस** राजपुत्राला पाहून लोकांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. डोव्हरपासून लंडनला जाऊन पोंचेपर्यंत मधल्या ज्या ज्या खेड्यांतून व शहरांतून राजाची स्वारी गेली, त्या त्या सर्व ठिकाणच्या लोकांनीं राजाचें मोठ्या प्रेमानें व उत्साहानें स्वागत केलें. गुढ्या उभारणें, देवळांतून घंटानाद करणें, तोफांची सलामी देणें, वगैरे आनंदसूचक सर्व प्रकार सर्व ठिकाणीं दिसून आले.

३ राजनिष्ठांचा सन्मान—मेच्या २९ व्या तारखेस **चार्लसचा** वाढदिवस होता. त्या दिवशीं त्यानें लंडन नगरींत प्रवेश केला. रस्त्यांतून दुतर्फा राजनिष्ठ नागरिकांचें सैन्य राजाला सलामी देण्याला उभें होतें, मिरवणुकीच्या रस्त्यावरील घरें शृंगारण्यांत आलीं होतीं, आणि जिकडे तिकडे गुढ्या-तोरणें उभारून लोकांनीं आपला आनंद प्रदर्शित करण्याची शिकस्त केली होती. जुन्या लष्करापैकीं कांहीं सैनिकांना हा देखावा आवडला नाहीं. परंतु या लष्करांत एकीचा अभाव झालेला असल्यामुळें लोकांच्या राजनिष्ठेच्या पुराला बांध घालण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें राहिलें नव्हतें. लोकांनीं प्रदर्शित केलेल्या आनंदावरून त्यांच्या राजनिष्ठेचें **चार्लस** राजालाही कौतुक

वाटलें. एकदां तर तो असेंही म्हणाला कीं, "मी यापूर्वींच परत आलों नाहीं ही खरोखर माझीच चूक झाली."

४ पार्लमेंटचें काम—राजाला परत गादीवर बसविण्यांत ज्यांनीं ज्यांनीं पुढाकार घेतला होता, त्यांच्यावर आतां अर्थातच पदव्यांचा व मानपानांचा वर्षाव होऊं लागला. सेनापति **मंक** याला सरदार बनविण्यांत आलें. व पूर्वींच्या राजाच्या गादीशीं इमान राखणाऱ्या लोकांना बहुमानाच्या जागा देण्यांत आल्या. मधल्या धामधुमीच्या काळांत राज्यांतलीं सर्वच खातीं विस्कळित झालीं होतीं, त्यांची पुनः नवी मांडणी करण्यांत आली. आणि पार्लमेंटनें मुख्यतः राजाचा तनखा ठरविणें, मिळकती-संबंधाच्या वादाचा निकाल करणें, देवस्थानच्या भानगडी मिटविणें आणि राजकीय अपराध्यांना माफी देण्याचा विचार करणें, हे प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याचें अवघड काम आतां हातीं घेतलें.

५ राजाचा तनखा—इंग्लंडमधील जहागिरी पद्धती (Feudal system)-प्रमाणें एकादा जहागिरदार मयत झाल्यावर त्याच्या वारसाच्या नांवानें जहागीर करतेवेळीं बरीच मोठी रकम राजाला नजराणा म्हणून द्यावी लागत असे. माजी **चार्लस** राजाच्या वधानें राज्यांत राजाच नाहींसा झाल्यामुळें ही पद्धति आपोआप बंद झाली होती. आतां ही पद्धति पार्लमेंटच्या कायद्यानेंच बंद करण्यांत आली. आणि सरकारी तिजोरींतून नव्या राजाला दरसाल बारा लाख पौंड देत जावे असें ठरविण्यांत आलें.

६ मिळकतीचे वाद—मिळकतीसंबंधाच्या वादाचा निकाल करणें ही गोष्ट इतकी सोपी नव्हती. 'सामुदायिक सत्तामंडळा'च्या कारकिर्दींत व त्याच्या पूर्वींच्या यादवींत राजाच्या खासगी मालकीच्या जमिनी, देवस्थानच्या जमिनी, व इतर बऱ्याच खासगी व्यक्तींच्या जमिनीही मूळ मालकांच्या हातून जाऊन तिसरेच लोक त्यांचा उपभोग घेत असत. **पार्लमेंटनें** मूळ मालक कोण त्याची चौकशी करून त्या जमिनी ज्याच्या त्याच्या हवालीं केल्या, आणि खरेदीसंबंधानें वगैरे कोणाचा हक्क पोंचत असल्यास त्यांनीं न्यायाच्या कोर्टांत जाऊन आपला हक्क शाबीत करून घ्यावा असें ठरविलें.

७ देवस्थान प्रकरण—देवस्थानच्या मिळकतीसंबंधानें तर बराच घोंटाळा झाला होता. माजी **चार्लस** राजाच्या कारकिर्दींत इंग्लंडमध्यें 'स्वदेशधर्मवाद्यां'चा वरचष्मा अस-ल्यानें इंग्लंडमधील बहुतेक देवळांतून त्या पंथाचे पाद्री देवस्थानची वहिवाट पहात असत.

परंतु 'सामुदायिक सत्तामंडळा'च्या कारकिर्दीत स्कॉटलंडमधील सुधारक पक्षाचा इंग्लंडमधील देवस्थानांत शिरकाव झाल्यामुळें जुन्या पाद्र्यांना देवळांना रामराम ठोकून पळ काढावा लागला होता. आतां नवा राजा गादीवर आला, त्या वेळीं पुन्हां इंग्लंडच्या स्वदेशधर्मवाद्यांचा अगर 'राष्ट्रीय धर्मवाद्यां'चा वरपगडा होऊन पार्लमेंटच्या ठरावानें जुन्या हांकून लावलेल्या पाद्र्यांना त्यांच्या देवळांत पुन्हां नेऊन बसविण्यांत आलें. मात्र ज्या देवळांतले जुने हक्कदार पाद्री मयत झाले होते, त्या देवळांतून 'सामुदायिक सत्तामंडळा'च्या कारकिर्दींत नेमलेल्या पाद्र्यांना कायम ठेवण्यांत आलें.

८ **अपराध्यांना शिक्षा.**—चौथा प्रश्न राजकीय अपराध्यांना माफी देण्यासंबंधाचा. पार्लमेंटमध्यें या वेळीं जुन्या राजपक्षीय मंडळींचा भरणा ज्यास्त होता. त्यांनीं माजी चार्लस राजाचा वध करणाऱ्या इसमांची चौकशी करण्याचा ठराव पास केला. या ठरावाप्रमाणें २९ इसमांची चौकशी होऊन त्यांच्यावर राजवधाचा आरोप शाबीत धरण्यांत आला, परंतु शेवटीं त्यांतल्या फक्त दहा इसमांना फांशीं देण्यांत आलें. शिवाय ज्यांनीं मागच्या 'लष्करशाहीं'त प्रामुख्यानें भाग घेतला होता, त्यांच्यापैकींही कित्येक वजनदार इसमांना फांसावर लटकाविण्यांत आलें.

९ **क्रॉमवेलच्या शवाची विटंबना**—राजपक्षीय मंडळींचा माजी लष्कराच्या अधिकाऱ्यांबद्दलचा राग मात्र एवढ्यानेंही शांत झाला नाहीं. मृतांची थडगीं उकरून त्यांच्या शवांची विटंबना करण्याचा बूट निघून, क्रॉमवेल (Cromwell), ब्रॅडशॉ (Bradshaw), वगैरेंचीं प्रेतें उकरून काढून तीं एक दिवसपर्यंत सुळावर टांगण्यांत आलीं, आणि नंतर त्यांचे तुकडे तुकडे करून डोकीं 'वेस्टमिन्स्टर' सभागृहावर टांगण्यांत आलीं, व बाकीचा भाग खंदकांत फेंकून देण्यांत आला. अशा रीतीनें मुख्य मुख्य प्रश्नांचा निकाल झाल्यावर इंग्लंडमधील या 'बिन अधिकारी' पार्लमेंटची (Convention Parliament) बैठक खलास करण्यांत आली!

१० **स्कॉटलंड व आयर्लंडमध्यें**—तिकडे स्कॉटलंड व आयर्लंडमध्येंही राजपक्षीय मंडळीला जोर चढून तिकडच्या पार्लमेंटांतून माजी चार्लस राजाशीं युद्ध सुरू झाल्यावेळेपासून पुढें झालेले सर्व कायदे रद्द करण्यांत आले. व त्या 'बंडांत' सामील झालेल्या बहुतेक इसमांना देहांत प्रायश्चित्त देण्यांत आलें. अशा रीतीनें

राजकीय अपराध्यांना माफी देण्यासंबंधाचें वचन धाब्यावर बसविण्यांत येऊन नव्या राजानें व त्याच्या मंत्र्यांनीं प्रतिपक्षीयांचा सूड उगविला.

११ नवी निवडणूक–'बिन अधिकारी' पार्लमेंटची पहिली बैठक खलास झाल्यावर पुढल्या वर्षीं राजाच्या हुकुमानें नवीन पार्लमेंटची रीतसर निवडणूक झाली. या निवडणुकींत राजपक्षीय मंडळीचेंच मताधिक्य झालें. या पार्लमेंटमध्यें सुधारकांविरुद्ध निरनिराळे कायदे होऊन त्यांच्यांत फारच असंतोष माजला. एका कायद्यानें इंग्लंडमधील स्वदेशधर्म-वाल्यांच्या मताविरुद्ध ज्या कोणाचें मत असेल, त्याला राज्यांतली महत्त्वाची नोकरी देऊं नये असें ठरविण्यांत आलें (Corporation Act). दुसऱ्या एका काय-द्यानें सर्व पाद्र्यांना पूर्वीं इलिझाबेथच्या कारकिर्दींत तयार केलेल्या 'सामान्य प्रार्थना-पुस्तका'च्या बाहेर धार्मिक उपदेश करूं द्यावयाचा नाहीं व जे कोणी हें प्रार्थनापुस्तक मानणार नाहींत, त्यांना देवळांतून हांकून द्यावयाचें असें ठरलें (Act of Uniformity). त्याप्रमाणें इ. स. १६६२ च्या मे महिन्यांत सुमारें दोन हजार पाद्री आपल्या जागा सोडून चालते झाले. या पाद्र्यांनीं पुढें आपल्या मताप्रमाणें प्रार्थना करण्याचे खासगी मठ स्थापन केले. परंतु इ. स. १६६४ मध्यें पार्लमेंटनें आणखीं एक कायदा पास करून (Conventicle Act) असल्या धार्मिक सभांना सोळा वर्षांच्या वरच्या वयाचे जे इसम हजर राहतील, त्यांना प्रथम अपराधाबद्दल तीन महिन्यांची कैदेची शिक्षा, दुसऱ्यानें हजर राहिल्यास सहा महिन्यांच्या कैदेची शिक्षा, व तिसऱ्यानें हजर राहिल्यास सात वर्षांच्या काळ्यापाण्याची शिक्षा द्यावी असें ठरविलें ! पुढें सहा वर्षांनीं या कायद्यांत थोडी दुरुस्ती होऊन श्रोत्यांची शिक्षा जरा सौम्य करण्यांत आली, पण उपदेशकांना व जे लोक आपल्या घरांतून असल्या उपदेशकांना उपदेश करूं देतील, त्यांना जबर दंड करावा असें ठरविण्यांत आलें !

१२ असंतोषावर उपाय—असल्या कायद्यांनीं सुधारकांमध्यें अर्थातच तीव्र असंतोष माजत चालला, व पार्लमेंटनें हा त्यांचा असंतोष दाबून टाकण्यासाठीं अधि-काधिक कडक कायद्यांची योजना केली. इ. स. १६६५ मध्यें राजाला विरोध करणार नाहीं, अशा अर्थाची शपथ घेण्याचें जे नाकारतील, त्यांना पार्लमेंट सभेला ज्या शहरांतून अगर खेड्यांतून सभासद निवडून पाठविण्यांत येतात, अशा शहरांच्या अथवा खेड्यांच्या हद्दीबाहेर पांच मैलपर्यंत राहूं देऊं नये असें ठरविण्यांत आलें (Five Miles Act) या चारी कायद्यांना मिळून 'क्लॅरेंडनचें कोड' (Clarendon Code). असें म्हणतात. असो.

१३ चार्लसची चैन—नवा **चार्लस** राजा पुढें फार व्यसनी व छंदी (dissolute) निघाला. त्यामुळें त्याला वारंवार पैशाची अडचण पडूं लागली. आणि ज्या योगानें आपल्या खिशांत पैसा येऊन पडेल, अशी कोणतीही गोष्ट करण्याला तो मागेंपुढें पाहीनासा झाला. **पोर्च्युगीझ** राजकन्या **कॅथराईन** इजबरोबर लग्न झाल्यामुळें हुंडा म्हणून त्याला पांच लाख पाड व आफ्रिकेंतील टँजीर (Tangier) नांवाचा किल्ला आणि हिंदुस्तानांतील मुंबई बेट (Bombay) असे प्रदेश मिळाले होते. आतां फ्रान्समधील डंकर्क (Dunkirk) नांवाचा किल्ला फ्रेंच राजाला त्यानें पांच लाख पौंडांना विकून टाकला.

१४ डच लोकांशीं भांडण—पुढें **चार्लस**चा भाऊ म्हणजे **यॉर्क**चा सरदार **जेम्स** याचें आफ्रिका खंडांतील डच (Dutch) वसाहतवाल्यांशीं कांहीं कारणावरून भांडण झालें; तें निमित्त करून त्यानें डच लोकांशीं लढाई सुरू केली, आणि तिकडे आरमार पाठविण्यासाठीं म्हणून **पार्लमेंट**कडून बरीच रकम काढली. परंतु ही रकम आरमाराच्या कामीं खर्च न करतां राजानें आपल्या चैनी चालविण्याकडेच तिचा उपयोग करून मोडकीं तोडकीं चार गलबतें डच आरमाराशीं लढण्यासाठीं पाठवून दिलीं. हीं गलबतें पुढें अपेश पदरीं घेऊन माघारीं आलीं. इतकेंच नव्हे तर डच आरमाराधिपति 'डी विट' (De wytt) व 'डी रूटर' (De Ruyter) हे उलट खुद्द टेम्स नदींतून वर घुसले आणि इंग्लंडच्या गोद्यांतील लढाऊ गलबतांना आग लावून चालते झाले ! पुढें इ. स. १६६७ च्या जुलैच्या २१ व्या तारखेस उभय राष्ट्रांमध्यें तह होऊन हें भांडण मिटलें.

१५ प्लेगचा कहर—तिकडे डच लोकांशीं ही लढाई चालली असतां इकडे खुद्द लंडनमध्येंही लोकांवर दोन भयंकर संकटें ओढवलीं. इ. स. १६६४ च्या हिंवाळ्यांत चार दोन ठिकाणीं प्लेगचा ताप उद्भवला होता. पण पुढें उन्हाळा सुरू झाल्यावर या तापाचा कहर उसळला. लंडनमधील त्या वेळचे रस्ते अरुंद व घाणेरडे असत, व घरेंही गलिच्छ व कोंदट हवेंत बांधलेलीं असत. **प्लेग**चा तडाका सुरू झाल्याबरोबर सरदार व श्रीमंत लोक तावडतोब लंडन सोडून बाहेर चालते झाले. त्यांच्यामागून इतर लोकही शहर सोडून निघाले, व त्यांच्या बरोबर प्लेगही बाहेरच्या गांवांतून पसरत चालला. तेव्हां अधिकाऱ्यांनीं लोकांना बाहेर जाण्याची मनाई केली. बहुतेक शहर ओस पडलें. कामधंदा बंद झाला, आणि रस्त्यांतून गवत

उगवले. ज्या घरांत प्लेगनें रोगी मरे, तें घर एक महिनापर्यंत बंद ठेवण्यांत येऊन दरवाजावर 'देवा पाव !' (Lord, have mercy on us) अशा अर्थाचीं अक्षरें लिहीत असत. रात्रीच्या वेळीं रस्त्यांतून खटारे (Dead Carts) फिरत, आणि गाडीवान 'घरांत प्रेतें असल्यास बाहेर आणा' म्हणून ओरडत. अशा रीतीनें सर्व प्रेतें जमा केल्यावर तीं शेजारच्या मसणवटींत नेऊन खंदकांत टाकून पुरीत असत.

१६ इ. स. १६६५च्या सप्तेंबर महिन्यांत तर ही प्लेगची मृत्युसंख्या रोजीं पंधरा हजार पर्यंत जाऊन पोंचली. जिकडे तिकडे हाहाःकार उडून गेला. दैववादी धर्मशील लोक नशिबावर हवाला टाकून स्वस्थ बसले. आणि 'चार्वाकपंथी' लोक 'जाते घडी ही आपली, उद्यांचा काय भरंवसा ? तेव्हां आजच चैन करून घेऊं या' म्हणून दुःखशमनार्थ वारुणी देवतेची आराधना करण्यांत गढून जाऊं लागले ! (drowned their fears in scenes of riot and drunkenness). लोकांची नीतिमत्ता बिघडून जिकडे तिकडे अधार्मिकता भाजल्यामुळें हा ईश्वरी कोप झाला आहे, असें त्या वेळीं पुष्कळ लोकांना वाटत असे. व हे लोक ही 'राष्ट्रीय आपत्ति' दूर होण्यासाठीं परमेश्वराचा धांवा करण्यांत व भजनपूजन करण्यांत आपला वेळ घालवीत असत. एकट्या लंडन शहरांत या सांथीला एक लाख लोक बळी पडले. आजूबाजूच्या खेड्यांतून मेले ते निराळेच. पुढें डिसेंबरच्या सुमारास प्लेगची मृत्युसंख्या उतरत चालली. असली सांथ लंडनच्या लोकांना तीन शतकें माहीत नव्हती. असो.

१७ आग—प्लेगनें उसळलेला कहर शमतो न शमतो, तोंच पुढल्या वर्षी लंडन शहरांत भयंकर आग लागली. इ. स. १६६६ च्या सप्टेंबरच्या दुसऱ्या तारखेस रविवार होता. त्या दिवशीं रात्रीं एका रोटीवाल्याच्या दुकानाला प्रथम ही आग लागली. त्या बाजूचीं घरें सगळीं लांकडाचीं बांधलेलीं होतीं. रस्ते अरुंद, वारा जोराचा सुटलेला, आणि पाण्याचें दुर्भिक्ष पडलेलें. त्यामुळें ही आग ताबडतोब फैलावली. तीन दिवस सगळें शहर पेटत होतें. व तीनशें मैलांवर ह्या अग्नीच्या ज्वाळा दिसत होत्या. पुढें आठ दिवसांनीं हा अग्नि विझला, दोन लाख लोक उघड्यावर पडले, आणि लंडनच्या आसपासच्या शेतांतून मोकळ्या जमिनीवर उघडे बोडके राहूं लागले. लंडनमधील प्रसिद्ध देवळें आणि तेरा हजार घरें जमीनदोस्त झालीं. सुप्रसिद्ध 'सेंट पॉल'चें मंदिरही (Old St. Paul's Cathedral) या आगींत जळून खाक झालें. पण त्याच जागेवर क्रिस्टॉफर रेन (Wren) या नांवाच्या

प्रसिद्ध शिल्पकाराकडून पुन्हां नवीन मंदिर बांधण्यांत आलें.* रोमन कॅथोलिक लोकांची भ्रष्टता या आगीला कारण आहे असा त्या वेळीं पुष्कळांचा समज होता, व तशा अर्थाचा लेखही या मंदिरावर खोदण्यांत आला होता !

१८ आगीनें काय साधलें?—पण परमेश्वर जें कांहीं करतो, तें आपल्या बऱ्यासाठींच करतो असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. मागील वर्षाच्या प्लेगच्या तडाख्यांत लंडन शहराची घाण काढून टाकण्याचा विचार पुष्कळांच्या मनांत आला होता. परंतु उभीं असलेलीं घरें मुद्दाम पाडून ऐसपैस रस्ते व हवाशीर घरें बांधण्याचें काम जें एरवीं कित्येक वर्षेपर्यंत झालें नसतें, तें या अग्निप्रलयानें (conflagration) आयतें घडवून आणतां आलें ! बहुतेक शहर जळून खाक झालेलें असल्यामुळें नवीन मांडणी करतांना रस्ते रुंद आंखतां आले, व घरांची मांडणी नवीन पद्धतीवर होऊन लांकडांऐवजीं विटांची घरें बांधण्यांत येऊं लागलीं. आणि अशा रीतीनें शहरांतून रोगराईचा कायमचा बंदोबस्त होऊं लागला.†

१९ चार्लसचा दरबार—'सामुदायिक सत्तामंडळा'च्या कारकिर्दींत 'वीर सुधारकां'चा राष्ट्रामध्यें वरपगडा असल्यामुळें व या 'वीर सुधारकां'ना बाहेरील डामडौल मुळींच नकोसा असल्यामुळें शिल्पकला, चित्रकला, अशांसारख्या उपयुक्त ललित-

---

* हें सेंट पॉलचें मंदिर सगळ्या जगांतलें अत्यंत सुंदर प्रॉटेस्टंट मंदिर असें समजतात. त्याच्या आंत ख्रिस्तोफर रेनचें थडगें आहे; त्याच्यावर पुढील लेख कोरलेला आहे:—" त्याचें स्मारक पहावयाचें असेल तर सभोंवतीं नजर टाका " (If you ask for his monument, look around).

† 'प्लेग' आणि 'आग' या भयंकर आपत्ति तर खऱ्याच; पण परमेश्वर कधीं कधीं आपत्तींनींच माणसांचें कल्याण घडवून आणतो ह्मणतात; त्याचा अनुभव पुढें लंडनच्या लोकांना आल्याशिवाय राहिला नाहीं. इ. स. १६६५ सालीं सहा महिन्यांत प्लेगनें एक लाख लोक मेले, आणि हजारों लोक घरेंदारें टाकून पळाले, तर पुढल्या वर्षी आगीनें तेरा हजार घरें जमीनदोस्त केलीं. पण या आगीच्या ज्वालांनीं प्लेगचे जंतु समूळ नाहींसे केले, आणि यानंतर बांधण्यांत आलेलीं घरें चांगलीं हवाशीर बांधल्यामुळें आणि रस्ते रुंद केले गेल्यामुळें पूर्वी तीस चाळीस वर्षांनीं एकदां तरी प्लेगोबाची स्वारी हटकून व्हावयाचीच अशी जी स्थिति होती, ती नाहींशी होऊन त्या वेळेपासून आतांपर्यंत लंडन शहराला या रोगाचा संसर्ग झालेला नाहीं.

कलांना उतरती कळा लागली होती. करमणुकीच्या जागा व निरनिराळे खेळ बंद करण्यांत आले होते. परंतु आतां चैनी व गुलहौशी (profligate) **चार्लस** राजाची कारकीर्द सुरू झाल्यापासून पुन्हां नाटकांना व निरनिराळ्या चैनबाजीच्या विलासांना ऊत येऊं लागला. स्वतः राजा आपला सर्व वेळ ख्यालीखुशालींत व पण्यांगनांच्या सहवासांत घालवीत असे. व दरबारी खुषमस्क्ऱ्ये (witty companions) हेच आतां राज्यांतील सूत्रें हालवूं लागले होते! **रा**वबाजीच्या कारकिर्दींत पुण्यांत जी अनीति व सांवळागोंधळ माजला होता म्हणून सांगतात, तसली स्थिति या **चार्लस** राजाच्या कराकिर्दींत आतां इंग्लंडमध्यें जिकडे तिकडे दिसून येऊं लागली!

२० राजाचा अधःपात—हा राजा गादीवर आला तेव्हां राजपक्षीय लोकांना व कांहीं सुधारकांनाही आनंद झाला होता. परंतु आतां गादीवर स्थिर झाल्यावर तो पूर्वींच्या स्नेह्यांना विसरत चालला. ज्यांनीं त्याला गादीवर आणण्यासाठीं आपलें सर्वस्व वेंचण्यास मागें पुढें पाहिलें नव्हतें, त्यांना योग्य तें बक्षिस न देतां राजानें राष्ट्राची दौलत ख्यालीखुशालींमध्यें उडवून टाकली. सुधारकांना धार्मिक बाबतींत स्वातंत्र्य पाहिजे होतें, तें न मिळतां आतां धर्माचीच थट्टा होऊं लागली. प्लेगच्या तडाख्यांतून सुटलेले लोक अग्निप्रलयानें रसातळास गेले होते. व डच लोकांनीं प्रत्यक्ष लंडन राजधानीनजीक येऊन तोफांची सलामी दिल्यामुळें राष्ट्राच्या अब्रूचें मातेरें (humiliation) झालें होतें. अशा स्थितींत पुन्हां राजाविषयीं लोकांचीं मनें विटून जाऊं लागल्यास नवल नाहीं.

२१ क्लॅरेंडन—या वेळीं क्लॅरेंडन (Clarendon) नांवाचा मुत्सद्दी राष्ट्रांत प्रमुख होता. **चार्लस** राजा गादीवर येण्यापूर्वीं व नंतरही राज्याचीं बहुतेक सूत्रें त्याच्या हातीं होतीं. वर कलम ११।१२ मध्यें वर्णन केलेले कायदे हे त्याच्याच प्रोत्साहनानें व प्रयत्नानें घडविण्यांत आले होते. राजा गादीवर आल्यावर राजाच्या जेम्स नांवाच्या भावाला त्यानें आपली मुलगी देऊन राजकुळाशीं शरीरसंबंध जोडला होता. परंतु स्वतः राजाला मात्र तो मुळींच आवडत नसे. दोघांचे स्वभावच भिन्न होते. क्लॅरेंडनचा धर्मशीलपणा व त्याला अनुसरून असलेले त्याचे आचारविचार **चार्लस**-सारख्या गुलहौशी व नीतिभ्रष्ट राजाला आवडण्यासारखे नव्हते. आणि त्यामुळें क्लॅरेंडन राजाला कांहीं उपदेश करूं लागला कीं, त्याचा भलताच परिणाम होऊन दरबारांत त्याचे शत्रु मात्र वाढूं लागले. अखेरीस सर्वांनींच राष्ट्राच्या दुःस्थितीचें खापर क्लॅरेंडनच्या माथीं फोडलें. राजपक्षीय लोक म्हणूं लागले, आपली राजाकडून योग्य संभावना

व्हावयाची ती क्लॅरेंडनमुळें झाली नाहीं. सुधारक म्हणत, क्लॅरेंडन विरुद्ध असल्यामुळें आपल्याला राजाकडून छळ सोसावा लागतो. व पार्लमेंट सभा म्हणे, इंग्लंडला पर-राष्ट्रीय राजकारणांत अपेश येऊन डच लोकांकडून मानहानि करून घेण्याचा प्रसंग आला, तो क्लॅरेंडनच्या चुकीच्या धोरणामुळेंच. अशा रीतीनें सर्वच लोक उलट झाल्यामुळें क्लॅरेंडनला इंग्लंडांत राहणें धोक्याचें वाटूं लागलें, आणि तो फ्रान्समध्यें पळून गेला. पुढें इ. स. १६६७ च्या नोव्हेंबर महिन्यांत पार्लमेंटनें एक ठराव पास करून क्लॅरेंडनला जन्मभर हद्दपारीची शिक्षा सुनावली, व हा प्रसिद्ध पुरुष इ. स. १६७४ मध्यें रूवें (Rouen) येथें मरण पावला.

२१ राजसत्तावादी पंचक—क्लॅरेंडनचा कांटा इंग्लंडांतून निघाल्यानंतर क्लिफर्ड (Clifford), अॅशले (Ashley), बकिंगहॅम (Buckingham), आर-लिंगटन (Arlington) आणि लॉडरडेल (Lauderdale) अशा पांच असामींकडे राज्यसूत्रें आलीं. हे कट्टे राजसत्तावादी (Royalists) असून पार्लमेंटचा ताबा राजावर मुळींच असूं नये असें म्हणणारे होते. यांनीं गुप्त मसलती करून इंग्लिश लोकांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणण्याचें कारस्थान चालविलें. व त्यामुळें या पांच असामींच्या कूटमंडळाला (Clique of Political Schemers) पुढें पुढें सर्व राष्ट्र पाण्यांत पाहूं लागलें. तथापि या 'कूटमंडळा'चीं पहिलीं कांहीं कृत्यें मात्र सामान्य जनतेला पसंत पडतील अशींच होतीं. विशेषेंकरून फ्रान्सच्या बादशहाच्या महत्त्वाकांक्षेला आळा घालण्यासाठीं त्यांनीं जें परराष्ट्रीय राजकारण केलें, तें तर लोकांना फारच पसंत पडलें.

२२ फ्रान्सचें प्रस्थ—त्या वेळीं फ्रान्सच्या गादीवर 'चवदावा लुई' (Louis XIV) नांवाचा राजा असून त्याचें प्रस्थ युरोपखंडांत फारच माजलें होतें. उत्तरेकडे हॉलंडच्या सरहद्दीपर्यंत आपल्या राज्याची सीमा नेऊन भिडवावी अशी त्याची फार इच्छा होती. व त्या टापूंत त्या वेळीं स्पेनची सत्ता चालत असल्यामुळें त्याचें स्पेनशीं युद्ध जुंपलें होतें. हॉलंडच्या संस्थानिकांना फ्रान्सचे हातपाय पसरलेले पाहून भीति वाटूं लागली होती. परंतु त्यांच्या एकट्याच्यानें फ्रान्सला शह देणें झेंपण्यासारखें नव्हतें. इंग्रज लोकांनाही या आपल्या शेजाऱ्याचे हातपाय लांबवर पसरलेले पाहवत नव्हते. म्हणून इंग्लंडच्या त्या वेळच्या मुत्सद्दी 'कूटमंडळा'नें हॉलंड व उत्तरेकडील स्वीडन (Sweden) या देशांशीं स्नेहसंधि (Triple Alliance) करून इंग्लंड, हॉलंड, व स्वीडन यांनीं एकजुटीनें फ्रान्सला मार्गे हांकून

लावावें असा करारनामा केला. ही बातमी लुईला समजतांच त्यानें स्पेनशीं तह करून उत्तरेकडे पसरलेले आपले पाय मागें घेतले.

२४ राजा व फ्रान्स—वर सांगितल्याप्रमाणें इंग्लंडमधील सामान्य प्रजाजनांना फ्रान्सची वाढत चाललेली सत्ता सहन होत नव्हती हें खरें. परंतु स्वतः **चार्लस** राजा मात्र फ्रान्सच्या राजाशीं स्नेहसंबंध कायम ठेवण्यास फार उत्सुक असे. इंग्रज प्रजेचीं मनें आपल्याविषयीं साशंक होत चाललीं आहेत हें पाहून तर त्यानें फ्रान्सच्या दरबाराशीं आपला असलेला स्नेहसंबंध अधिकच दृढ केला. अलीकडे इंग्लंडच्या लोकसभेंतील कित्येक सभासदांनीं राजाच्या दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठीं आपला एक संघ स्थापन केला होता. या संघाच्या चळवळीनें चिडून जाऊन राजानें उलट फ्रान्सच्या बादशहाशीं गुप्त रीतीनें खलबत करून आयत्या वेळीं जरूर तर तिकडून माणसें व पैसा मिळविण्याची तजवीज करून ठेविली.

२५ लुईचें कारस्थान—फ्रान्सचा बादशहा लुई हा मोठा कारस्थानी होता. इंग्लंडचें 'प्रधान मंडळ' (Cabal) तिकडे आपल्याविरुद्ध हॉलंड वगैरे देशांशीं स्नेहसंधि करीत असतां, स्वतः इंग्लंडचा राजा आपल्याकडे मदतीबद्दल याचना करीत आहे, तेव्हां ही संधि साधून जमल्यास इंग्लंडला आपला अंकित देश करून टाकावा अशी मसलत त्यानें योजली. **चार्लस** राजाचा स्वभाव त्याला पक्का माहित होता. आणि व्यसनी मनुष्याला जाळ्यांत अडकविण्याची कलाही त्याला चांगली साधली होती. त्यानें आपल्या दरबारांतील एक सुंदर ' अप्सरा ' (a handsome French woman) **चार्लस**ला भुरळ घालून आपल्या मुठींत ठेवण्यासाठीं इंग्लंडला रवाना केली. या बाईचें नांव **मॅडम कारवेल** (Madame Carwell) असें असून तिनें इंग्लंडच्या दरबारांत प्रवेश केल्यापासूनच **चार्लस**वर पगडा बसविला. अखेर इ. स. १६७० च्या मे महिन्यांत **चार्लस**नें लुईशीं गुप्त तह (Secret treaty) करून आपण रोमन कॅथोलिक धर्म स्वीकारण्याचें व हॉलंडविरुद्ध लुईला मदत करून स्पेनची गादी लुईला मिळवून देण्याच्या कामीं मदत करण्याचें कबूल केलें. याचा मोबदला म्हणून लुईकडून **चार्लस**ला दरसाल दोन लाख पौंडांचें पेनशन मिळावें आणि इंग्लंडमध्यें बंड वगैरे उपस्थित झाल्यास सहा हजार फ्रेंच लष्कर **चार्लस**च्या मदतीला यावें असें ठरलें.

२६ सराफांची मुस्कटदाबी:—वर सांगितल्याप्रमाणें **चार्लस**चा लुईशीं तह झाला खरा, पण तो गुप्त तह होता. बाहेरून इंग्लिश लोकांना राजी राखण्यासाठीं

आपण लुईचा द्वेष करतों असेंच राजा दाखवीत असे. व पूर्वी सांगितलेल्या 'कूटमंडळा'नें हॉलंडबरोबर जो स्नेहसंधि केला होता, तो आपणास कबूल आहे असेंच तो भासवीत असे. त्या तहाप्रमाणें वागावयाचें म्हणजे इंग्लंडचें आरमार बलाढ्य असलें पाहिजे. तेव्हां तें तसें करण्यासाठीं म्हणून **चार्लसनें पार्लमेंटकडून** आठ लाख पौंडांची संमति घेतली. आणि हा पैसा हातीं पडल्याबरोबर लगेच **पार्लमेंट** सभा बरखास्त केली. पुढें राजानें पैसा उकळण्याची एक नवी युक्ति काढली. त्या वेळीं लंडनचे सराफ (London goldsmiths) राष्ट्रीय तिजोरीच्या (Exchequer) तारणावर राजाला कर्जाऊ रकमा देत असत. एके दिवशीं **चार्लसनें** सगळ्या सराफांना सांगून पाठविलें कीं, तुम्हांला तुमची ऐन रक्कम परत मिळणार नाहीं, फक्त व्याज देऊं. अशा रीतीनें तेरा लाख पौंड राजाच्या खिशांत पडले. पण या कृत्यानें व्यापाराला मोठा धक्का बसून (Trade was paralyzed) कित्येक पेढीवाल्यांचीं दिवाळीं वाजलीं !

२७ वटहुकूम—फ्रान्सच्या लुईबरोबर केलेल्या गुप्त तहाप्रमाणें **चार्लसनें** स्वतः रोमन कॅथोलिक व्हावयाचें व अर्थातच रोमन कॅथोलिक लोकांना शक्य त्या सवलती द्यावयाच्या असें ठरलें होतें. परंतु इंग्लंडांतील बहुजनसमाज तर सुधारक बनलेला; तेव्हां पार्लमेंटच्या संमतीनें रोमन कॅथोलिक लोकांना सवलती देणें शक्य नव्हतें. म्हणून **चार्लसनें** पार्लमेंटसभा बोलावण्याच्या भानगडींत न पडतां आपल्याच अखत्यारांत कित्येक वटहुकूम काढण्यास (declarations) आरंभ केला. त्यांपैकीं एका वटहुकुमानें (Declaration of Indulgence) धार्मिक बाबतींतील सर्व दंड माफ करण्यांत आले. या हुकुमानें इंग्लंडमधील कित्येक 'वीर सुधारकांना'ही फायदा झाला हें खरें. पण त्यांनाही कळून चुकलें कीं. हा हुकूम आपल्या फायद्यासाठीं राजानें काढलेला नसून रोमन कॅथोलिक लोकांची मर्जी सुप्रसन्न करण्यासाठींच निघालेला आहे.

२८ हॉलंडशीं युद्ध—पुढें थोड्या दिवसांनीं हॉलंडविरुद्ध युद्ध पुकारण्यास कांहीं तरी खुसपट पाहिजे, म्हणून हॉलंडचे लोक इंग्रजांच्या निशाणाला मान देत नाहींत अशी सबब **चार्लसनें** पुढें केली. व प्रत्यक्ष युद्ध पुकारण्यापूर्वींच हॉलंडचीं कांहीं गलबतें इंग्रजी आरमारानें पकडून आणलीं. पुढें रीतसर लढाई सुरू झाली. त्यांत जरी इंग्रजांचा जय झाला तरी तो त्यांना फारच महाग पडला. फ्रान्स व इंग्लंड या दोन्ही देशांचीं सैन्यें आपल्यावर चाल करून येत आहेत,

असें पाहून हॉलंडच्या लोकांनींही आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं कंबरा बांधल्या आणि वुइल्यम नामक राजपुत्राला पुढारी करून त्याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं फ्रान्सच्या राजाला सळो का पळो करून सोडलें (The French fled for their lives).

२१ इ. स. १६७३—इकडे **चार्लस** राजाजवळचा पैसा संपत आला. त्याला लढाईची काळजी थोडीच होती! हातीं पैसा मिळाल्याबरोबर तो चैनींत दंग होऊन जात असे. पुढें आणखीं पैसा मिळविण्यासाठीं पार्लमेंटची बैठक भरविणें भाग पडलें. पण इ. स. १६७३ मध्यें पार्लमेंट सभा भरल्याबरोबर तिनें आधीं राजाच्या धोरणावरच हल्ला केला. रोमन कॅथोलिक लोकांना उत्तेजन देणारा राजाचा पूर्वी सांगितलेला वटहुकूम राजाला परत घेणें भाग पडलें. इतकेंच नव्हे, तर या पार्लमेंटनें एक नवा कायदा (Test Act) करून इंग्लंडमधील मुलकी अगर लष्करी अधिकार धारण करणाऱ्या प्रत्येक इसमाला इंग्लंडच्या राष्ट्रीय धर्माच्या विधींप्रमाणें एका विशिष्ट तऱ्हेची शपथ (Sacrament of the Lord's Supper) घेणें भाग पाडलें. त्यामुळें कित्येक बड्या बड्या रोमन कॅथोलिक अधिकाऱ्यांना आपल्या जागा सोडाव्या लागल्या. नंतर पार्लमेंटनें हॉलंडशीं तह केला. त्यामुळें अखेर **चार्लस** राजाला लुईशीं केलेला गुप्त तह तूर्त तरी अंमलांत आणणें अशक्य होऊन गेलें. पण एकंदरींत हॉलंडशीं झालेल्या तहानें तरी राजाचा फायदाच झाला. कारण त्याला त्या तहानें दोन लाख पौंड मिळाले. त्याच वर्षी (इ. स. १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यांत) 'कूटमंडळ' प्रधान-पदावरून दूर झालें.

प्रकरण ५१ वें.

नवीं भांडणें.

(इ. स. १६७४–इ. स. १६८५)

[१।२ खोट्या कंड्या. ३ टिटस ओएट्स. ४ कोलमन–कंडीला पुष्टि–लोकांचा सावधपणा. ५ नवी निवडणूक–विरोध व बरखास्ती. ६ एक उपयुक्त कायदा. ७।८ व्हिग व टोरी. ९ इ. स. १६८०–लोकसभेचा राग–राजाचें धोरण. १० स्कॉट-

लंडमधील मतांतर. ११ शार्प-ग्रॅहॅम-बॉथवेलची लढाई-जेम्सचा कारभार. १२ मनमथ. १३ इ. स. १६८१. १४ जेम्सविरुद्ध लोकमत-शॅफ्ट्सबरी. १५।१६ गुप्तकट-गुप्तस्फोट व शिक्षा. १७ चार्लस राजाचा मृत्यु. १८ त्याचे अवगुण. १९ दुसरी पांढरी बाजू-रॉयल सोसायटी. २० त्याच्या कारकिर्दीतील विशेष गोष्टी. २१ ' यात्रेकरूचा प्रवास '-' बंडाचा इतिहास '.]

१ खोट्या कंड्या—मागील प्रकरणांत सांगितलेल्या **चार्लस** राजाच्या लुईबरोबर झालेल्या गुप्त तहाची बातमी हळू हळू बाहेर फुटूं लागली. त्यामुळें इंग्लंडमधील सुधारक पक्षाला रोमन कॅथोलिक लोकांचा फारच संशय येऊं लागला. इतक्यांत **चार्लस** राजाचा भाऊ **जेम्स** यानें उघडपणें आपण रोमन कॅथोलिक मताची दीक्षा घेतल्याचें जाहीर केलें. तेव्हां तर सुधारकांचें पित्त फारच खवळून रोमन कॅथोलिक लोकांच्या कारस्थानांबद्दलची कसलीही गोष्ट खरी मानण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति झाली.

२ लोकांचीं मनें अशा रीतीनें भीतिग्रस्त झालेलीं पाहून कित्येक मतलबी लोकांनीं खोट्या कंड्या उठवून आपल्या प्रतिपक्षीयांस नाहींसे करण्याचा घाट घातला. **टिटस ओएटस** (Titus Oates) नांवाच्या एका 'मवाली' (disgraced for vicious habits) माणसानें अशी कंडी उठविली कीं, 'इंग्लंडमधील रोमन कॅथोलिक लोकांनीं एक गुप्त कट केला असून, ते **चार्लस** राजाचा खून करून आपल्या मताच्या **जेम्स** या त्याच्या भावाला गादीवर बसविणार आहेत. व या भावानें नंतर सुधारकांना नाहींसें करण्याचें त्यांना वचन दिलें आहे.'

३ टिटस ओएटस—या **टिटस ओएटस**चें पूर्ववृत्त सांगण्यासारखें आहे. **क्रॉमवेल**च्या 'सामुदायिक सत्तामंडळा'च्या कारकिर्दींत तो धर्मोपदेशकाचें काम करीत असे. नंतर कांहीं दिवसांनीं इंग्लंडच्या राष्ट्रीय धर्मखात्यांत त्यानें नोकरी धरली होती. पुढें एका खटल्यांत खोटी साक्ष दिल्याचा आरोप त्याच्यावर शाबीत झाल्यामुळें त्याची नोकरी गेली. तेव्हां त्यानें युरोपांत जाऊन रोमन कॅथोलिक पंथीयांचा आश्रय केला. व त्या पंथाच्या कॉलेजांतून कांहीं दिवस काढले. तिकडे असतांना इंग्लंडवर पुन्हां रोमन कॅथोलिक पंथाचा पगडा बसविण्याविषयींचे बेत तिकडील मंडळीमध्यें चाललेले असत, ते त्याच्या कानावर आले असण्याचा संभव आहे. किंबहुना **चार्लस** राजानें लुईबरोबर जो गुप्त तह केल्याचें मागें सांगितलें, त्यावरूनही कदाचित सुधारकांविरुद्ध रोमन कॅथोलिक लोकांचा एखादा कट

झालेला असणें संभवनीय आहे. परंतु या वेळीं ओएटसनें जी कंडी उठविली, तिला मात्र त्याच्याजवळ फारसा आधार नव्हता. त्यानें निव्वळ आपली तुंबडी भरून घेण्यासाठीं ही कटाची हूल उठविली होती.

४ **कोलमन**—त्यानें ज्यांचीं नांवें सांगितलीं, त्यांत जेम्सचा खासगी कारभारी कोलमन (Coleman) म्हणून होता, त्याचें नांव होतें. त्याच्या वाड्याचा झाडा घेण्यांत आला, तेव्हां त्याच्याजवळ लुईच्या उपाध्यायाला लिहिलेलीं कांहीं पत्रें सांपडलीं. त्यामुळें ओएटसनें उठविलेल्या कंडीला थोडासा आधार मिळाल्यासारखा झाला. इतक्यांत ओएटसची कोलमनविरुद्ध ज्या न्यायाधिशापुढें जबानी झाली होती त्याचा कोणीं खून केला. तेव्हां हा खून रोमन कॅथोलिकांच्या कटाचेंच एक अंग आहे, असा सुधारकांना संशय येऊन ओएटसच्या कंडीला पुष्टि मिळाल्यासारखी झाली. आणि सर्व लंडन शहरभर ज्याच्या त्याच्या तोंडीं हा कटाचा विषय होऊन बसला. घरांतून बाहेर पडावयाचें म्हणजे प्रत्येकानें हातांत कांहींना कांहीं शस्त्र घेतल्याशिवाय जाऊं नये इतकी लोकांमध्यें दहशत बसून गेली (It was an English Reign of Terror). रोमन कॅथोलिक सरदारांना पार्लमेंटमध्यें बसण्याची मनाई करण्यांत आली. आणि तुरुंगांतून रोमन कॅथोलिक लोकांची गर्दी होऊन गेली. ' ओएटससारखा दूरदर्शी आणि धूर्त माणूस मिळणें विरळा ' असें जो तो म्हणूं लागला, आणि त्याच्याचमुळें देशावरचें एक महान संकट टळलें, असें समजून दरसाल बाराशें पौंडाचें वर्षासन त्याला देऊं करून खुद्द राजाच्या वाड्यांत त्याची तैनात चालू झाली. ओएटसचें हें नशीब असें उदयाला आलेलें पाहून आपणही कांहीं तरी कंडी उठवावी आणि प्रसिद्ध पुरुषांना गोत्यांत आणून आपला तळिराम गार करावा म्हणून दुसरे कित्येक हलकट लोक पुढें आले. आणि असल्या स्वार्थसाधु नीच माणसांच्या जबान्यांवर विश्वास ठेवून कित्येक निरपराधी रोमन कॅथोलिकांनाही फांसावर चढविण्यांत आलें.

५ **नवी निवडणूक—चार्लस** राजाला अर्थातच रोमन कॅथोलिक लोकांचा हा होत असलेला छळ आवडत होता असें नाहीं. परंतु लोकांच्या मनामध्येंच हें कटाचें व रोमन कॅथोलिक लोकांच्या द्वेषाचें खूळ पक्कें बिंबून गेलें असल्यामुळें त्याचें प्रतिबिंब पार्लमेंटमध्यें दिसून येत असे. व त्यामुळें त्याचा नाइलाज झाला होता. शेवटीं इ. स. १६७८ मध्यें राजानें पार्लमेंटसभा बरखास्त केली, व नवीन निवडणूक करण्याचा हुकूम बाहेर पडला. या नव्या

निवडणुकींत निवडून आलेले सभासद मागच्यांना बरें म्हणावयाला लावणारेच आले ! **चार्लस** राजाच्या मागून कायदेशीर वारस त्याचा भाऊ जेम्स हा व्हावयाचा होता. परंतु तो उघडपणें रोमन कॅथोलिक मतांचा पुरस्कार करणारा असल्यामुळें त्याला इंग्लंडची गादी देण्यांत येऊं नये असा ठराव या नवीन पार्लमेंटमध्यें आला. राजानें सुधारकांच्या धर्माला बिलकूल धक्का बसूं देणार नाहीं अशी आपण हमी घेतों, तुम्हीं गादीच्या वारसाचा प्रश्न आपल्याकडे सोंपवा म्हणून परोपरीनें सांगितलें. परंतु पार्लमेंट सभा ऐकेना. तेव्हां शेवटीं इ. स. १६७९ च्या मे महिन्यांत **चार्लसनें** पुनः ही नवी पार्लमेंटसभा बरखास्त केली.

६ एक उपयुक्त कायदा—अशा रीतीनें पार्लमेंट सभेचें मत रोमन कॅथोलिक लोकांविषयीं जरी अत्यंत कलुषित झालेलें होतें, तरी या सुमारास या सभेंत जो एक अत्यंत उपयुक्त कायदा पास झाला, त्या योगानें इ. स. १६७९ च्या या पार्लमेंटचें नांव अजरामर होऊन राहिलें आहे. पूर्वी एकाद्यावर राजद्रोहासारखा किंवा इतर कसला तरी आरोप आला म्हणजे त्याला पकडून नेऊन तुरुंगांत टाकीत असत. मग त्याची चौकशी केव्हां होईल तेव्हां होईल. पण आतां पार्लमेंटनें कायदा (Habeas Corpus Act) करून असें ठरविलें कीं, प्रत्येक कैद्याला किंवा आरोपित इसमाला त्यानें तशी मागणी केली कीं, पकडल्यापासून ठराविक मुदतींत चौकशीसाठीं कोर्टापुढें आणलेंच पाहिजे. आणि जर तो त्या आरोपांतून एकदां मुक्त झाला, तर पुन्हां त्याच आरोपाबद्दल त्याला तुरुंगांत घालतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें इंग्लंडमधल्या कोणत्याही रहिवाशाला इंग्लंडच्या बाहेर म्हणजे स्कॉटलंडसारख्या देशांत त्याच्या संमतीशिवाय तुरुंगांत ठेवूं नये. मात्र अशा अपराध्यानें बाहेरच्या देशांत देहांत प्रायश्चित्त मिळण्यासारखा गुन्हा केला असल्यास गोष्ट निराळी. या कायद्याचें महत्त्व इंग्रज लोक सुप्रसिद्ध 'मॅग्ना चार्टा' (Magna Charta) नामक स्वातंत्र्यसनदेच्या खालोखाल मानतात. असो.

७ व्हिग व टोरी—वर सांगितल्याप्रमाणें **चार्लसनें** पार्लमेंट सभा पुन्हां बरखास्त केली. परंतु लोकांचा रोमन कॅथोलिक लोकांविषयींचा द्वेष रतिभरही कमी झाला नाहीं. जेम्ससारख्या पोपवाद्याला इंग्लंडच्या गादीवर बसूं द्यावयाचें नाहीं असा त्यांनीं निर्धारच केला. तेव्हां उलट राजपक्षीय मंडळीलाही चेव येऊन त्यांनीं जेम्सलाच गादी देण्याचा विडा उचलला. सर्वच राजपक्षीय मंडळीला जेम्सचीं धार्मिक मतें मान्य होतीं असें नाहीं. परंतु अशाही मंडळींना मनापासून असें वाटत

असे कीं, जेम्सला गादी मिळावयाची ती त्याला देवानेंच देऊं केली आहे. तेव्हां कांहीं झालें तरी त्याच्या धार्मिक मतांकडे लक्ष न देतां त्याचा हा ईश्वरदत्त हक्क आपण मान्य केलाच पाहिजे.

८ हळू हळू राष्ट्रांत कायमचे दोन तट होऊन खेड्यापाड्यांत सुद्धां या विषयासंबंधाचे वादविवाद चालू होऊन रणें माजूं लागलीं. दोन्ही पक्षांची मंडळी एकमेकांना कुत्सित नांवानें संबोधूं लागली. राजपक्षीय लोक विरुद्ध पक्षाच्या लोकांना 'व्हिग' या निंदाव्यंजक नांवानें हाक मारूं लागले, तर उलट विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं जेम्सच्या चहात्यांना 'टोरी' असें तिरस्कारसूचक नांव दिलें.* पण पुढें कांहीं

*या पक्षभेददर्शक नांवांची उत्पत्ति एका ठिकाणीं दिली आहे ती अशीः—एकदा सरदार यॉर्क (Duke of York) स्कॉटलंडमध्यें असतांना पार्लमेंटची सभा भरविण्याबद्दल जोराची चळवळ चालली होती. राजानें कौन्सिलमधून काढून टाकलेला शॅफ्ट्सबरी (Shaftsbury) हा सरदार या चळवळीचा पुढारी होता. त्याच्या सूचनेवरून खेड्यापाड्यांतील अनेक लोकांनीं 'पार्लमेंटसभेची बैठक भरवा' असे 'अर्ज' (Petitions) राजाकडे पाठविले. तेव्हां राजाच्या दरबारांतील मंडळीकडूनही राजाच्या अधिकारांत (prerogative) ढवळाढवळ (interference) करण्याच्या या पद्धतीचा निषेध (abhorrence) व्यक्त करणारे 'उलट-लेख' (Counter addresses) राजाकडे धाडण्यांत आले. त्यावरून राजाकडे पहिले अर्ज करणारे ते Petitioners म्हणजे 'अर्जवाले' आणि 'उलट-लेख' पाठविणारे ते abhorrers म्हणजे 'निषेधवाले' अशीं नांवें प्रथम प्रचारांत आलीं, आणि त्यांनाच पुढें अनुक्रमें 'व्हिग' व 'टोरी' असें म्हणूं लागले.

या नांवांच्या उत्पत्तीची दुसरी एक कहाणी आहे ती अशीः—व्हिग (whig) या शब्दाचा मूळचा अर्थ ताक (sour milk) असा होता. इंग्लंडांतल्या शिलेदारांनीं (Cavalier) तो प्रथम स्कॉटलंडच्या 'कॉव्हेनंटर' (Covenanter)-ना 'आंबट तोंडे', 'नाखुष' अशा अर्थानें लावला. 'टोरी' शब्दाचा मूळचा अर्थ 'मला दे' असा असून आयर्लंडांतील वाटमारे (free-booters) प्रवाशांना अडवितांना या शब्दाचा उपयोग करीत असत. राजकृपेंतली मंडळी सत्तेच्या जोरावर लोकांकडून सक्तीनें कर वसूल करावयास निघाली, म्हणजे सामान्य लोक त्यांना हे आयर्लंडमधील 'मला दे वाटमारे' आले असें म्हणत, त्यावरून पुढें सगळ्याच राजपक्षी मंडळीला हें नांव पडलें !

कालानें या नांवांतील निंदाव्यंजकत्व अगर तिरस्कार नाहींसा होऊन आपल्या इकडील अलीकडच्या 'जहाल' अगर 'नेमस्त' या नांवांप्रमाणें राजपक्षीय लोक आपल्याला 'टोरी' (Tory) व प्रजापक्षीय लोक आपल्याला 'व्हिग' (Whig) म्हणवून घेण्यांत भूषणच मानूं लागले. आणखीं कांहीं वर्षांनीं या नांवांचें 'कॉंझरव्हेटिव्ह' (Conservative) व 'लिबरल' (Liberal) म्हणजे 'पुराणमतवादी' व 'नवमतवादी' अशा नांवांत रूपांतर झालें. असो.

९ इ. स. १६८०—इ. स. १६८० मध्यें पार्लमेंटसभा पुन्हां भरली व जेम्सला गादी मिळूं द्यावयाची नाहीं अशा अर्थाचा ठराव लोकसभेंत (House of Commons) पास झाला, परंतु सरदार सभेनें (House of Lords) हा ठराव फेंटाळून लावला. लोकसभेचे सभासद खवळून त्यांनीं स्टॅफर्ड (Stafford) नांवाच्या एका निरपराधी सरदाराला ओएटसच्या जबानीवरून तो कटवाला म्हणून फांशीं दिलें. आणखींही कित्येकांना सुळावर जावें लागणार होतें. परंतु राजानें ताबडतोब पार्लमेंटसभा बरखास्त करून स्टॅफर्डच्या वधामुळें कित्येक समंजस लोक राजपक्षाला मिळूं लागले होते, त्यांना एकत्र करून आपला पक्ष सबल करण्याची तजवीज केली.

१० स्कॉटलंडमधील मतांतर—तिकडे स्कॉटलंडमध्येंही धार्मिक बाबतींतील मतभेदांवरून भांडणें विकोपास जाऊन दोन्ही बाजूंच्या अत्याचारांना सुरवात झाली. चार्लस राजा गादीवर आला, तेव्हां स्कॉटलंडमधील 'कौन्सिल'नें त्याच्या धर्मसमजुतींचा मोठ्या उत्साहानें स्वीकार करून सुधारकांचा (Covenanters) पाडाव करण्याचें कंकण हातीं बांधलें होतें. व त्याप्रमाणें स्कॉटलंडमधील सुधारकांची त्यांच्या अधिकारांच्या जागांवरून हकालपट्टी होऊन त्या जागा इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय धर्मा'च्या (Established Church) अनुयायांना देण्यांत आल्या होत्या. नंतर इंग्लंडमधले धार्मिक बाबतींतले कायदे तिकडेही सुरू झाले व ते कायदे मोडणाऱ्यांना कडक शिक्षा होऊं लागल्या. परंतु कांहीं दिवसांनीं लोकमतानें पुन्हां उलट खाल्ली, आणि सुधारक पक्षाला बरीच मंडळी मिळून इंग्लंडच्या राष्ट्रीय अगर स्वदेशधर्मवाद्यांशीं त्यांचा उघड सामना सुरू झाला.

११ शार्प—शार्प (Sharpe) नांवाच्या एका मुख्य धर्माधिकाऱ्याला सुधारकांनीं गाडींतून ओढून काढून त्याच्या मुलीच्या समक्ष त्याचे तुकडे तुकडे केले. याचा सूड उगाविण्यासाठीं ग्रॅहॅम (Graham) नांवाच्या सरदारानें या सुधारक

बंडखोरांवर चाल केली. परंतु त्याचा पराभव होऊन सुधारकच उलट ग्लासगोवर (Glasgow) चालून आले. ही बातमी **चार्लस** राजाला समजतांच त्यानें 'मनमथ' (Monmouh) नामक सरदाराच्या हाताखालीं बरेंच मोठें सैन्य देऊन त्याला स्कॉटलंडमध्यें पाठविलें. या सैन्याची बॉथवेल (Bothwell Bridge) येथें चार हजार सुधारक बंडखोरांशीं गांठ पडली. या लढाईंत सुधारकांचा पराभव होऊन त्यांचे चारशें लोक रणांगणावर पडले, आणि बाराशें कैद झाले. नंतर **चार्लस** राजाचा भाऊ **जेम्स** हा स्कॉटलंडमध्यें राज्यकारभार पाहण्यासाठीं गेला, आणि त्याच्या करड्या अंमलाखालीं बहुतेक सुधारक भरडून निघाले, आणि उरलेल्या कित्येकांनीं प्राणरक्षणासाठीं अमेरिकेची वाट धरली.

१२ मनमथ—वर सांगितलेला **मनमथ** सरदार हा 'लुसी वॉल्टर्स' (Lucy Walters) नांवाच्या बाईला **चार्लस** राजापासून झालेला मुलगा होय. **वॉल्टर्स** बाईचें लग्न **चार्लस** राजाशीं विधिपूर्वक झालें होतें कीं काय याविषयीं संशय आहे. पण राजानें त्याला आपल्या अगदीं औरस मुलाप्रमाणें वाढविलें होतें एवढी गोष्ट खरी. त्याचें एका बड्या सरदाराच्या मुलीशीं त्यानें लग्नही लावून दिलें होतें. राज्यांतील कित्येक महत्त्वाच्या व मानाच्या जागा त्याला वरचेवर देण्यांत येत असत. तो स्वरूपानें देखणा असून त्याची चालचलणूक सभ्यपणाची व लोकांचीं मनें आकर्षण करून घेणारी असल्यामुळें तो जाईल तेथें लोकप्रिय होत असे. पुष्कळांना तो राजाचा कायदेशीर वारस आहे असेंच वाटत असे, व प्रजापक्षीय 'व्हिग' मंडळींपैकींही पुष्कळ लोक त्याच मताचे होते. त्यामुळें **चार्लस**च्या मागून त्यालाच राजपद मिळावें अशी जी कित्येकांची इच्छा दिसून येत असे, त्या इच्छेला बळकटी मिळाली होती. परंतु 'व्हिग' लोकांच्या या उत्तेजनामुळें कित्येक राजपक्षीय टोरी मंडळीच्या संशयांत भर पडत चालली, हें त्या वेळीं 'व्हिगां'च्या लक्षांत आलें नाहीं.

१३ इ. स. १६८१—इ. स. १६८१ मध्यें पार्लमेंट सभेची बैठक भरली. त्या सभेंत राजपक्षीय मंडळीचें मताधिक्य दिसून आलें. परंतु लोकसभेमध्यें प्रजापक्षीय (Country Party) 'व्हिग' लोकांचेंच प्राबल्य होतें. व त्यांनीं **जेम्स**ला गादी न देण्याबद्दलचा ठराव कांहीं झालें तरी पास करून घ्यावयाचा असा निश्चयच केला होता. तेव्हां **चार्लस**नें पुन्हां एका आठवड्याच्या आंतच ही पार्लमेंट सभा बरखास्त केली.

१४ जेम्सविरुद्ध लोकमत—अलीकडे कित्येक दिवस राजपक्षीय मंडळींत अधिकाधिक भर पडत चालली होती. **टिटस ओएटस** व त्याचे साथीदार यांनीं उठविलेल्या कंड्यांप्रमाणें कोठें बंड झाल्याचें दिसून न आल्यामुळें त्यांचीही चलती आतां कमी झाली होती. अखेर **चार्लस** राजाचा आपल्या मागून आपल्या भावाला गादी देण्याचा बेत पुष्कळांना पसंत पडून राष्ट्रांतील बडे जमीनदार व बरेच मध्यम वर्गाचे लोकही त्याला अनुकूल झाले. तेव्हां त्यानें **टिटस ओएटस**चें अनुकरण करणाऱ्या आपल्या पुठ्ठ्यांतल्या गुप्त हेरांचें सहाय घेऊन 'व्हिग' मंडळीचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. त्यांचा प्रमुख पुढारी शॅफ्ट्सबरी (Shaftsbury) याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याची चौकशी करण्यांत आली. पण या वेळीं लंडनचा शेरीफ (Sheriff) शॅफ्ट्सबरीच्या मदतीला गेला. त्यानें बडें 'पंचमंडळ' (Grand Jury) नेमून त्याची सुटका करून घेतली ! पुढें शॅफ्ट्सबरी हॉलंडला पळून गेला. आणि **चार्लस**नें रागानें लंडन शहराची असल्या बाबतींतल्या अधिकाराची सनदच काढून घेतली !

१५ गुप्त कट—राजाच्या या जुलमी कृत्यांनीं चिडून जाऊन प्रजापक्षीय लोक आतां गुप्त कट (Conspiracy) करूं लागले. **रसेल** (Russell), **इसेक्स** (Essex), **हॉवर्ड** (Howard), **मनमथ**, आणि **सिडने** (Sidney) या प्रमुख प्रजापक्षीय पुढाऱ्यांनीं उघडपणें बंड पुकारण्याची तयारी केली, आणि ते अनुकूल संधीची वाट पहात राहिले. **रम्बोल्ड** (Rumbold) म्हणून एक इसम होता त्यानें अशी युक्ति सुचविली कीं, राजा आपल्या घरावरून (The Rye House) जाऊं लागला म्हणजे त्याला गोळी घालून ठार मारावें, पण ही मसलत केव्हांच साधली नाहीं. कांहीं दिवसांनीं हा कट बाहेर फुटला आणि त्यांत सामील असलेले लोक एकमेकांचीं नांवें सांगून आपण सुटून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. **रसेल** व **सिडने** यांना या खुनाच्या कटाची माहिती नव्हती. तरी त्यांना फांसावर चढविण्यांत आलें; **इसेक्स**नें आत्महत्या करून घेतली; **मनमथ**नें **चार्लस**च्या पायांवर घालून घेतल्यामुळें त्याला माफी मिळून युरोपांत जाऊन रहाण्याला परवानगी मिळाली; आणि **हॉवर्ड** हा कबुली जबाब देणारा म्हणून सुटला.

१६ हा कट उघडकीस आल्यामुळें व्हिग मंडळीला मान खालीं घालण्याचा प्रसंग आला. व त्यांचें राज्यांतील वजन नाहींसें होऊन राजाला त्यांच्यावर वाटेल तसा सूड उगविण्याची संधि अनायासें प्राप्त झाली. राजाचा भाऊ **जेम्स** हा पुन्हां

राज्यकारभारांत प्रामुख्यानें भाग घेऊं लागून आपल्या जुन्या शत्रूंचा फन्ना उडवूं लागला. रोमन कॅथोलिक धर्माविषयींचा त्याचा उत्साह इतका जाज्वल्य होता कीं, एकदां **चार्लस** राजा त्याला म्हणाला, “ भाऊ ! मला आतां पूर्वीच्या मार्गानें जाण्याचें त्राण राहिलें नाहीं. तुला जमेल तर जा. ” याचा अर्थ असा होता कीं, तुझ्या उत्साहातिरेकाच्या कृत्यांनीं पुन्हां बंड उद्भवण्याचा संभव आहे, त्याची तयारी कर !

१७ चार्लस राजाचा मृत्यु—पुढें एका रविवारीं **चार्लस** राजा एकाएकीं आजारी पडला आणि एका आठवड्याच्या आंत ता. ६ फेब्रुवारी सन १६८५ रोजीं मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ५५ वर्षांचें होतें. कॅथराइन राणीपासून त्याला मूलबाळ कांहींच झालें नव्हतें. परंतु त्याच्या पदरीं बऱ्याच ‘ रखेल्या ’ होत्या, त्यांपासून त्याला बरीच संतति झाली होती. पुष्कळ इंग्रज इतिहासकार आजच्या बऱ्याचशा सरदार घराण्यांच्या पूर्वजाचा मान त्याला देत असतात.

१८ त्याचे अवगुण—या राजानें नीतिमत्तेच्या बाबतींत अगदींच ताळतंत्र सोडलेला होता. त्याच्या शब्दावर कोणी विश्वास ठेवीत नसे. त्याच्या दरबारांतही समानशीलत्वामुळें त्याच्यासारख्याच नीतिभ्रष्ट लोकांचा भरणा झालेला असून तो कोणाच्या अब्रूवर केव्हां घाला घालील याचा नेम सांगवत नसे. त्याला बाहेरख्यालीचा फार नाद असून राज्यकारभाराकडे त्याचें मुळींच लक्ष नसे. लोक काय म्हणतील याची तो मुळींच पर्वा करीत नसे, व राष्ट्राच्या अब्रूचें मातेरें झालें तरी त्याची त्याला फिकीर नसे. कोणीकडून तरी आपला खिसा कसा गरम राहील व चैनबाजींत व ख्यालीखुशालींत कसे दिवस घालवितां येतील, हीच त्याची नेहमींची काळजी असे. त्याचा स्वभाव वर्णन करतांना त्याचें ‘ मेरी मॉनर्क ’ (Merry Monarch) म्हणजे ‘ रंगेल नृपति ’ हें नांव त्याच्या स्वभावाचें उत्कृष्ट निदर्शक आहे असें एकानें म्हटलें आहे. आळस तर त्याच्या हाडींमासीं इतका खिळून गेलेला होता कीं, उद्योगाचें कोणीं नांव काढलें कीं त्याला तिटकारा येत असे असें म्हणतात. (He was an idler, who hated the very sight or thought of business)

१९ दुसरी पांढरी बाजू—पण या त्याच्या स्वभावाच्या ‘ काळ्या ’ बाजूबरोबरच दुसऱ्या ‘ गोऱ्या ’ बाजूचेंही वर्णन करावयाचें तर हा राजा मोठा धूर्त होता. पार्लमेंटबरोबर तंटा विकोपास नेणें धोक्याचें आहे हें त्यानें ओळखलें होतें. म्हणून प्रसंग विशेषीं पार्लमेंटशीं तंटे झाले, तरी तो तुटेपर्यंत ताणून धरीत नसे व

लोकमतांत पालट होईल, त्याप्रमाणें त्या लोकमताचा आपल्या फायद्यासाठीं कसा उपयोग करून घ्यावा ही कला त्याला चांगली साधली होती. म्हणूनच पार्लमेंटशीं तंटेभांडणें करूनही पंचवीस वर्षेंपर्यंत त्याला चैनीनें गादीचा उपभोग घेतां आला. शास्त्रीय ज्ञानाची त्याला फार आवड होती. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध रॉयल सोसायटी (Royal Society) म्हणजे भौतिकशास्त्रसंशोधनमंडळ हें त्यानेंच इ. स. १६६२ मध्यें स्थापन केलें. प्रसिद्ध गणिती सर आयझॅक न्यूटन (Sir Issac Newton) हा या मंडळाचा पहिल्यानें साधा सभासद व पुढें चोवीस वर्षेंपर्यंत अध्यक्ष होता.

२० चार्लसच्या कारकिर्दींतील विशेष गोष्टी—या राजाच्या कारकिर्दींतील आणखीं सांगण्यासारख्या गोष्टी म्हणजे इ. स. १६६८ मध्यें मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला, राजाला वार्षिक दहा पौंड देण्याच्या करारानें मिळालें; इ. स. १६८१ मध्यें एक पेनीचें तिकिट लावून पोस्टांतून पत्रव्यवहार चालू लागला; आणि इ. स. १६६३ मध्यें 'गिनी' नांवाचें सोन्याचें नाणें पाडण्यांत आलें या होत.

२१ यात्रेकरूचा प्रवास—इंग्रजींत 'यात्रेकरूचा प्रवास' (Pilgrim's Progress) या नांवाचें एक उत्कृष्ट पुस्तक आहे. त्याचा कर्ता **जॉन बनयन** (John Bunyan) हा **चार्लस**च्या कारकिर्दींतच होऊन गेला. तो 'वीरसुधारक' पंथाचा असून पूर्वीं पहिल्या **चार्लस**च्या विरुद्ध पार्लमेंटच्या सैन्यांत त्यानें भाग घेतला होता. पुढें दुसऱ्या **चार्लस**च्या कारकिर्दींत त्याची 'दुराराध्यांत' (Non-Conformists or Irreconcilibles) गणना होऊन इ. स. १६६० पासून इ. स. १६७२ पर्यंतचीं बारा वर्षें त्याला तुरुंगांत काढावीं लागलीं. पुढें कांहीं काळ सुटका झाल्यावर इ. स. १६७५ मध्यें त्याला अशाच कांहीं अपराधावरून पुन्हां तुरुंगांत टाकलें व या वेळींच त्यानें वरील पुस्तक लिहिलें. 'क्लॅरेंडन' नें लिहिलेलें 'बंडाचा इतिहास' (History of the Great Rebellion) हें पुस्तकही याच कालांत प्रसिद्ध झालेलें असून त्यांत पहिला **चार्लस** राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें झालेल्या झगड्याचें राजाच्या बाजूचें सुंदर वर्णन केलेलें आहे. या **चार्लस**च्या कारकिर्दींत 'व्हिग' व 'टोरी' या दोन पक्षांमध्यें बरीच चुरस माजलेली असल्यामुळें प्रत्येक पक्षाचीं मतें प्रतिपादणाऱ्या वर्तमानपत्रांनाही राजकीय महत्त्व (Political importance) प्राप्त झालें. 'लंडन गॅझेट' (The London Gazette) आणि 'ऑब्झरव्हेटर' (The Observator) हीं त्या वेळचीं सरकारी बाजू पुढें मांडणारीं प्रमुख वर्तमानपत्रें होत.

प्रकरण ५२ वें.

वेताळ पूर्वस्थळीं आला !

(इ. स. १६८५-१६८८)

[१ दुसरा जेम्स राजा झाला. २ राज्यारोहण आणि राजनिष्ठा. ३ शत्रूंचा सूड-टिटसला प्रायश्चित्त. ४ रोमन कॅथोलिकांची आशा. ५ बंडांची धामधूम. ६ मनमथचें आगमन व स्वागत. ७ सेजमूरची लढाई. ८ मनमथची दुर्दशा. ९ बंडखोरांना शिक्षा-गिबेट. १० जेफ्रेजची क्रूरता. ११।१२ नरराक्षस. १३ पार्लमेंटचें विसर्जन-खडें सैन्य. १४ बडी न्यायसभा-रोमन कॅथोलिकांचा भाग्योदय. १५ प्रतिक्रिया. १६।१७ विद्यापीठांवर सक्ति. १८ इ. स. १६८७-धर्मस्वातंत्र्याचा जाहिरनामा. १९ या जाहिरनाम्याचा उद्देश-दुसरा एक हुकूम. २० हुकुमाचा अनादर. २१।२२ सात बिशप-त्यांची चौकशी-दोषमुक्तता व अभिनंदन. २३ राजाला मुलगा झाला ! २४ लोकांमधील असंतोष-राजाच्या पदच्युतीची चर्चा. २५ मेरी व वुइल्यमला पाचारण. २६ जेम्सचा डाव-सासऱ्याजांवयांचें भांडण.]

१ दुसरा जेम्स राजा झाला—चार्लस राजा मरण पावला, त्या वेळीं राजाच्या खास मंत्रिमंडळांतील सभासद वाड्यांतच होते. चार्लसचें प्राणोत्क्रमण झाल्यापासून पाव तासाच्या आंत त्याचा भाऊ जेम्स यानें '**दुसरा जेम्स**' (James II) असें नांव धारण करून चार्लसचा अधिकार आपल्याकडे घेतला. व आपण इंग्लंडमधील ठरलेल्या राज्यव्यवस्थेंत अगर धर्मव्यवस्थेंत ढवळाढवळ करणार नाहीं (to govern according to the laws and uphold the Church of England), असें वचन दिलें. पुढें पार्लमेंट सभा भरल्यावर या वचनाची पुनरुक्ति करण्यांत आली. राज्यांतील धर्माधिकाऱ्यांनीं आपआपल्या प्रांतांतून राजाचें हें वचन जाहीर केलें. टोरी पक्षाला परमानंद होऊन त्यांनीं मोठ्या उत्साहानें जेम्सचें अभिनंदन केलें. व इतर पक्षांची मंडळी काय काय होतें तें पहात स्वस्थ बसली.

२ राज्यारोहण आणि राजनिष्ठाः—एप्रिलच्या तेविसाव्या तारखेस जेम्सचा राज्यारोहण समारंभ झाला. त्या समारंभांतील मुख्य विधि इंग्लंडच्या

ठरलेल्या राष्ट्रीय धर्माप्रमाणेंच करण्यांत आले. परंतु किरकोळ विधि जुन्या म्हणजे रोमन कॅथोलिक पंथाच्या नियमांप्रमाणें झाले. जिकडून तिकडून राजनिष्ठेचीं मानपत्रें राजाकडे येऊं लागलीं, आणि ज्यांत टोरी पक्षाचेंच बहुमत होतें अशा या नव्या पार्लमेंटनें राजाला खर्चासाठीं वीस लाख पौंड मंजूर केले.

३ शत्रूंचा सूड—पुढें **पार्लमेंट** सभेचा आपल्याला पूर्ण पाठिंबा आहे असें दिसून आल्यावर **जेम्स** राजानें आपल्या जुन्या शत्रूंवर सूड घेण्याचा सपाटा चालविला. ज्यांनीं पूर्वींच्या कारकिर्दीत खोट्या साक्षी देऊन निरपराधी रोमन कॅथोलिकांना देहांत शासन देवविलें होतें. अशा सर्व मंडळींची आतां प्रायश्चित्त भोगण्याची पाळी आली. **ओएटस** आणि त्याचा सोबती डेंजरफील्ड (Dangerfield) यांच्यावर खोटी साक्ष दिल्याचा आरोप ठेवून त्यांना एका खटाऱ्याच्या मागें बांधून रस्त्यांतून चाबकानें मारीत न्यावें, आणि ही शिक्षा भोगून ते वांचले तर त्यांना जन्मभर तुरुंगांत ठेवून वर्षांतून पांचदां खोडा घालण्यांत यावा अशी शिक्षा सुनावण्यांत आली. **टिटसचें** नशीब बलवत्तर असल्यामुळें तो या यमयातना भोगूनही जिवंत राहिला ! त्याचा सोबती **डेंजरफील्ड** हा मात्र चाबकांचा मार खाऊन झाल्यावर **फ्रॅन्सिस** (Francis) नांवाच्या एका इसमानें डोळ्यांवर काठी मारल्यामुळें मरण पावला. पुढें **फ्रॅन्सिसलाही** या त्याच्या क्रूर कृत्याबद्दल फांसावर चढविण्यांत आलें.

४ रोमन कॅथोलिकांची आशा—माजी **चार्लस** राजाला मारण्याचा कट उघडकीस आल्यानंतर त्या कामीं सामील असलेले बरेच लोक **हॉलंडमध्यें** जाऊन लपून राहिले होते. **चार्लसचा** मुलगा म्हणून मानला गेलेला **मनमथ** याला बापानें इंग्लंडमधून हांकून दिल्यावर तोही हॉलंडमध्येंच जाऊन राहिला होता. स्कॉटलंडमध्यें **चार्लसचा** जुलमी अंमल सुरू झाल्यावर तिकडूनही कित्येक लोक हॉलंडमध्येंच आश्रयार्थ गेले होते. या मंडळींत **आर्गाइल** (Argyle) नांवाचा एक सरदार प्रमुख होता. **मनमथची** व **आर्गाइलची** गांठ पडल्यावर दोघांना असें वाटलें कीं, आतां इंग्लंडमध्यें **जेम्स** हा पक्का पोपवादी राजा गादीवर असल्यामुळें आपण तिकडे जाऊन बंड उभारल्यास सुधारक मंडळी सर्व आपल्याला अनुकूल होईल. दोघांचा बेत ठरून **आर्गाइलनें** ताबडतोब स्कॉटलंडमध्यें जाऊन बंड उभारावें व **मनमथनें** इंग्लंडवर हल्ला चढवावा असें ठरलें. पुढें मे महिन्याचे आरंभींच **आर्गाइल** स्कॉटलंडमध्यें आला आणि त्यानें आपल्या अनुयायांना आपल्याला येऊन मिळण्याविषयीं सूचना दिली.

५ **बंडाची धामधूम**—सुमारें १८०० लोक त्याच्या झेंड्याभोंवतीं जमा झाले. आणि त्यांनीं कित्येक गांवें उध्वस्त करून ग्लासगो(Glasgow)वर चाल केली. परंतु त्याच्या अनुयायांत पुढें फाटाफूट होऊन तिकडून जेम्सचें सैन्य आल्याबरोबर आर्गाइलच्या सर्व सैन्याची पांगापांग झाली. खुद्द आर्गाइल शेतकऱ्याचा वेष घेऊन पळून जाण्याच्या बेतांत होता. परंतु दुर्दैवानें तो राजपक्षीयांच्या हातीं लागला तेव्हां त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. त्याच्या अनुयायांपैकीं कित्येकांना फांसावर चढविण्यांत आलें आणि शेकडों लोकांना हद्दपार करून दूरच्या वसाहतींत पाठवून दिलें.

६ **मनमथचें आगमन**—दरम्यान मनमथही ठरल्याप्रमाणें त्याच्यासारखीच हद्दपारी भोगीत असलेल्या सुमारें ८० लोकांनिशीं इंग्लंडमध्यें येऊन दाखल झाला. ‘ लिम ’ (Lyme) नांवाच्या गांवीं उतरल्याबरोबर त्यानें लोकांना उद्देशून एक जाहिरनामा काढला. त्या जाहिरनाम्यांत आपण सुधारकांच्या धर्माचें, इंग्लंडच्या कायद्यांचें, व राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं आलों आहों असें म्हटलें होतें. चोवीस तासांच्या आंतच सुमारें पंधराशें लोक त्याच्या निशाणाभोंवतीं जमा झाले. पुढें चार दिवसांच्या आंत तीन हजार लोक बरोबर घेऊन त्यानें टाँटन (Taunton) नामक शहरावर स्वारी केली. त्या शहरच्या लोकांनीं त्याचें मोठ्या उत्साहानें स्वागत करून त्याची मोठी मिरवणूक काढली आणि तेथल्या तरुण कुमारिकांनीं (A band of young girls) त्याला बायबलचें पुस्तक नजर केलें. तें हातांत घेऊन मनमथ म्हणाला, ‘ मी या पुस्तकांतील सत्य गोष्टींच्या संरक्षणासाठीं व जरूर तर माझ्या रक्ताचा त्याच्यावर शिक्का मारण्यासाठीं आलों आहें. ”

७ **सेजमूरची लढाई**—पुढें मजल दरमजल करीत तो ब्रिस्टल (Bristol) येथें पोंचला, तेव्हां सहा हजार लोक त्यास येऊन मिळाले होते. परंतु या लोकांत शेतकरी (Ploughmen) व खाणींतील मजूर (Miners) यांचाच भरणा मोठा असून सरदार मंडळीपैकीं त्याला कोणी अनुकूल झाले नव्हते. जेम्सनें आपल्या सैन्याचें आधिपत्य फीव्हरशॅम (Feversham) नांवाच्या सरदाराकडे देऊन चार हजार सैन्यानिशीं त्याची मनमथबरोबर लढण्यासाठीं रवानगी केली. सेजमूर (Sedgemoor) येथें उभय दळांची गांठ पडून मोठी निकराची लढाई झाली. मनमथच्या अनभ्यस्त शेतकरी सैनिकांनीं शिकस्त करून पाहिली. परंतु राजसैन्याच्या तोफखान्यापुढें त्यांचें कांहीं चालेनासें होऊन त्यांचा पराभव झाला. सुमारें एक हजार लोक समरांगणीं पडले.

राजसैन्याचेही सुमारें तीनशें लोक कामास आले. आधुनिक कालांत खुद्द इंग्लंडच्या भूमीवर झालेली अशी ही शेवटची लढाई होय असें मानतात.

८ मनमथची दुर्दशा—दोन दिवसांनीं मनमथला धनगराच्या वेषांत असतांना पकडण्यांत आलें. वाटेंत त्यानें जेम्स राजाला अत्यंत नम्रतापूर्वक आपल्याला जीवदान देण्याविषयीं काकुळतीचें पत्र (imploring letter) लिहिलें, व त्याची समक्ष गांठ पडल्यावर त्याच्यापुढें लोटांगण घालून (lay on the floor) अत्यंत दीन वाणीनें त्यानें त्याची करुणा भाकली. परंतु या सर्व प्रार्थनांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्याला रीतीप्रमाणें देहांतशासनाची शिक्षा झाली. सरते-शेवटीं फांसावर चढविणाऱ्या मांगाला ' तूं तरी आतां आपलें काम झटपट आटप. विनाकारण माझ्या देहाला यातना देऊं नको ' असें त्यानें सांगितलें. परंतु दुर्दैव येथेंही त्याला आड आलें. मांगाची कुऱ्हाडच बरोबर चालेना, व पांचवा घाव पडेपर्यंत त्याच्या शरिराची हालचाल थांबेना. शेवटीं पांचव्या घावानेंही त्याचें शिर धडापासून वेगळें झालें नाहीं. तें मग सुरी घेऊन कापून काढण्यांत आलें !

९ बंडखोरांना शिक्षा--सेजमूरची लढाई आटपल्यावर बंडखोरांना शासन करण्याचें काम फीवरशॅम व कर्नल कर्क (Colonel Kirke) यांच्याकडे सोंपविण्यांत आलें फीवरशॅमनें रस्त्याच्या दोहों बाजूंना ' गिबेट ' (Gibbet) नांवाचीं ' मरण-यंत्रें ' उभीं करून शेंकडों लोकांना यमसदनास पाठविलें. आणि कर्कनें टॉटन येथें मनमथच्या हजारों शेतकरी अनुयायांना फांसावर चढविलें. हे बिचारे गरीब लोक प्राणांताच्या आरोळ्या मारीत असतां कर्कचे शिपाई हांसत खिदळत त्यांची चेष्टा करीत, आणि तुताऱ्या व ढोलकीं वाजवून आपला आनंद व्यक्त करीत. परंतु जेफ्रेज (Jeffreys) नांवाच्या दुसऱ्या एका नरपशूच्या क्रूर कृत्यांचें वर्णन वाचलें म्हणजे फीवरशॅम व कर्क यांचीं क्रूर कृत्यें कांहींच नव्हत असें वाटूं लागतें.

१० जेफ्रेजची क्रूरता—जेफ्रेज याच्याकडे पूर्वी मुख्य न्यायाधिशाचें (Chief Justice) काम होतें. या न्यायाधिशाला आतां देशभर फिरून अपराध्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा देण्याचें काम सांगण्यांत आलें. ' विंचेस्टर ' (Winchester) येथें त्यानें आपल्या ' न्यायदाना'ला आरंभ (Circuit) केला. त्या ठिकाणीं ॲलिस लिस्ले (Alice Lisley) या नांवाची एक विधवा बाई होती. तिनें सेजमूरहून पळून आलेल्या दोन बंडखोरांना आश्रय दिला असा तिच्यावर आरोप होता. तिनें असें सांगितलें कीं, ' मीं त्या माणसांना आश्रय दिला खरा, परंतु ते बंडखोर आहेत हें

मला माहीत नव्हतें.' तिच्या विरुद्ध पुरावाही कांहीं नव्हता. तथापि जेफ्रेजनें पंचांना दरडावून ती दोषी (guilty) आहे असा ठराव करून घेतला, आणि तिला जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यांत आली (to be burnt alive). तेथल्या धर्माधिकाऱ्यानें त्या बाईला वांचविण्याबद्दल जेफ्रेजची बरीच मनधरणी केली. परंतु या मनधरणीचा उपयोग झाला तो एवढाच कीं, जिवंत जाळण्याऐवजीं तिचें एकदम डोकें मारावें (beheading) असा तिच्या शिक्षेंत बदल करण्यांत आला !

११ नरराक्षस—विंचेस्टरहून काम आटपून जेफ्रेजची स्वारी डॉरचेस्टर (Dorchester) येथें गेली. त्या ठिकाणीं २९२ इसमांना देहांत शिक्षा सुनावण्यांत आली. पुढें एक्झीटर (Exeter) येथें कित्येकांना फांशीं देऊन हे न्यायाधीश समरसेट (Somerset) जिल्ह्यांत गेले. त्या ठिकाणीं थोड्याच दिवसांत २३३ इसमांना फांसावर चढविण्यांत आलें. जेफ्रेजची या लोकांना फांसावर चढविण्याच्या वेळची वागणूक पाहिली, म्हणजे हा कोणी राक्षस मनुष्यरूपानें अवतीर्ण होऊन मानवजातीचा संहार करूं पाहत आहे कीं काय असें वाटे. रस्त्याच्या नाक्यानाक्यांनीं सूळ उभे करून त्यांवर गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांचीं प्रेतें लोंबकळत ठेवावयाचीं, व त्यांची दुर्गंधि जिकडे तिकडे पसरून प्रवाशांना व आजूबाजूच्या रहिवाशांना हें जीवित नकोसें वाटावयाचें असा प्रकार कित्येक ठिकाणीं दिसून येत असे.

१२ पण देशांत एकीकडे हा असा भयंकर प्रकार चालू असतां दुसरीकडे जेम्स राजा घोड्यांच्या शर्यतींत आपली करमणूक करून मजेंत दिवस घालवीत होता. वर सांगितलेल्या देहांतप्रायाश्चित्त दिलेल्या बंडखोरांशिवाय सुमारें आठशें नऊशें इसमांना काळ्या पाण्याच्या शिक्षा सुनावण्यांत येऊन हे कैदी राजाच्या दरबारी खुषमस्कऱ्यांमध्यें वांटून देण्यांत आले होते. ज्याला आपली सुटका करून घ्यावयाची असेल त्यानें आपल्या धन्याला बरीचशी रक्कम दिली म्हणजे काम भागत असे. जेफ्रेज न्यायाधिशानेंही अशा रीतीनें कित्येकांकडून पैसा उकळून आपली तुंबडी भरून घेतली होती. ज्यांना या प्रकारानें आपली सुटका करून घेण्याला द्रव्याची अनुकूलता नसे, त्यांना गुलाम म्हणून दूर नेऊन विकण्यांत येत असे.*

---

* जेफ्रेजच्या या सत्रांत मनमथच्या अनुयायांपैकीं ८०० लोकांना वेस्ट इंडीज बेटांत हद्दपार करण्यांत आलें, ३३० लोकांना देहांतशिक्षा देण्यांत आली, आणि चावकांचा मार आणि तुरुंगवास किती इसमांना मिळाला याची गणतीच नाहीं !

१३ पार्लमेंटचें विसर्जन—मनमथचा पराभव होऊन बंडाचा पूर्ण मोड झाल्यावर आतां जेम्सला आपली मनांतली इच्छा पुरी करून घेण्याला चांगली संधि आहे असें वाटलें. ही इच्छा म्हणजे इंग्लंडमध्यें पुन्हां रोमन कॅथोलिक धर्माची प्राणप्रतिष्ठा करणें (Restoration of Roman Catholicism) ही होय. या कामीं त्याला आतां खड्या सैन्याचीं जरूरी भासूं लागली. परंतु पूर्वी एकदां पार्लमेंटकडून रोमन कॅथोलिक लोकांना सैन्यांत नोकरी देऊं नये असा कायदा करण्यांत आला होता. हा कायदा त्याला पाहिजे होते तसले लोक सैन्यामध्यें ठेवण्याला आड येऊं लागल्यामुळें व पार्लमेंट हा कायदा बदलण्याला संमति देईना म्हणून त्यानें पार्लमेंट सभेची बैठक बरखास्त केली. आणि असले कायदे रद्द करण्याचा आपल्याला एकट्यालाच अधिकार आहे असा न्यायकोर्टाकडून निकाल करून घेऊन त्यानें रोमन कॅथोलिक अंमलदार सैन्यामध्यें ठेवून खडें सैन्य उभारलें. आणि सैन्यांतल्या शिपायांनाही आतां रोमन कॅथोलिक धर्म स्वीकारण्याविषयीं सर्व तऱ्हेनें उत्तेजन देण्यांत आलें.

१४ बडी न्यायसभा—यानंतर जेम्सनें एक बडी धर्मसभा (A Court of Ecclesiastical Commission) स्थापन केली. या सभेंत ७ न्यायाधीश असून त्यांचा मुख्य जेफ्रेज हा होता. या न्यायसभेकडे इंग्लंडच्या देवस्थानाचें काम सोंपविण्यांत आलें. या कचेरींतून हुकुमावर हुकूम सुटून धर्माधिकाऱ्यांना पोपविरुद्ध उपदेश करण्याची बंदी करण्यांत आली; जे धर्माधिकारी हा हुकूम अमान्य करतील, त्यांना त्यांच्या जागांवरून काढून टाकण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें; रोमन कॅथोलिक लोकांच्या निरनिराळ्या संघांना शाळा वगैरे घालून लोकांचीं मनें सुधारकांच्या धर्ममतांपासून परावृत्त करण्याच्या कामीं उत्तेजन देण्यांत आलें; आणि पूर्वींचे जोगी-जोगिणींचे मठ पुनः स्थापन करण्यांत आले. जेम्सनें पोपकडे विनंति केल्यावरून रोम येथून पोपचा एक प्रतिनिधि इंग्लंडमध्यें आला आणि राजमंत्र्यांच्या जागाही भराभर रोमन कॅथोलिकांनाच मिळूं लागल्या. अशा रीतीनें जेम्सनें गादीवर बसण्याच्या वेळीं इंग्लंडच्या 'राष्ट्रीय धर्मा'मध्यें ढवळाढवळ करणार नाहीं असें जें वचन दिलें होतें, तें आतां तो उघडपणें मोडीत आहे असें दिसून येऊं लागलें.

१५ प्रतिक्रिया—याच सुमारास तिकडे फ्रान्समध्यें लुई राजानेंही तिकडच्या सुधारकांचा छळ करण्याला आरंभ केला आणि तिकडचे हजारों लोक रोमन कॅथोलिक अधिकाऱ्यांच्या जुलमाला कंटाळून देशत्याग करूं लागले. त्यांतले कांहीं इंग्लंडमध्यें

येऊन रोमन कॅथोलिक धर्म किती परमताऽसहिष्णु आहे त्याबद्दलच्या कथा इंग्लंडच्या खेड्यापाड्यांतून पसरूं लागले. सर्व मोठमोठ्या शहरांतून रोमन कॅथोलिकांविरुद्ध लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन गेलीं. आणि कित्येक ठिकाणीं दंग्यांपर्यंतही मजल येऊन पोंचली.

१६ **विद्यापीठांवर सक्ति**—जेम्सनें या दंग्यांपासून योग्य तो धडा घ्यावयाचा तो न घेतां, तो आपल्या बेताला अधिकच चिकटून राहूं लागला. ऑक्सफर्ड (Oxford) व केंब्रिज (Cambridge) येथील विद्यापीठांनाही (Universities) त्यानें आपल्या मुठींत आणण्याचा उद्योग सुरू केला. इ. स. १६८७ च्या आरंभींच केंब्रिजच्या विद्यापीठाच्या मुख्य अधिकाऱ्याला त्यानें एक पत्र पाठविलें, आणि फ्रॅन्सिस (Francis) नांवाच्या एका रोमन कॅथोलिक गृहस्थाला (a Benedictine monk) नेहमींचे विधि केल्याशिवाय एम्. ए.ची पदवी द्यावी असें फर्माविलें. त्या अधिकाऱ्यानें राजाचें हें म्हणणें अमान्य केलें. तेव्हां त्याला व त्याच्याबरोबर इतर आठ अधिकाऱ्यांना त्यांच्या जागांवरून काढून टाकण्यांत आलें.

१७ त्याच वर्षाच्या मार्च महिन्यांत ऑक्सफर्डमधील एका महाविद्यालयांतील मुख्य अध्यापकाची जागा रिकामी झाली. जेम्सनें त्या जागीं 'अँटोनी फार्मर' (Antony Farmer) नांवाच्या एका माणसाची नेमणूक करा, म्हणून त्या विद्यालयाच्या अधिकाराऱ्यांना सांगितलें. त्या अधिकाऱ्यांनीं जेम्सच्या या माणसाला एकीकडे ठेवून आपल्यांतील डॉ. हाव (John Hough) नांवाच्या इसमाची त्या जागीं नेमणूक केली. तेव्हां राजा स्वतः ऑक्सफर्डला गेला आणि त्या विद्यालयांतील सर्व सुधारक अधिकाऱ्यांना घालवून देऊन, त्यानें त्या ठिकाणीं रोमन कॅथोलिक मंडळींची नेमणूक केली. त्या वेळीं ऑक्सफर्डच्या विश्वविद्यालयाला देशांत फार मान होता, व त्या संस्थेच्या अधिकारांत कोणीं ढवळाढवळ केल्यास त्याची लोकांना फार चीड येत असे. राजाचें हें अरेरावीचें कृत्य पाहून सर्व राज्यांतील सुधारक धर्माधिकाऱ्यांना अत्यंत त्वेष आला, आणि थोड्याच दिवसांत आपण असल्या शिक्षणसंस्थेला दुखविलें, हें बरें केलें नाहीं असा जेम्सलाही प्रत्यय आला.* असो.

* James felt the bitter truth that this blow, which as he thought, struck at the root of English Protestantism, had in reality overturned his own throne.—R. H.

१८ इ. स. १६८७—इ. स. १६८७ मध्यें जेम्सनें आपल्याच अखत्यारांत एक जाहिरनामा काढला. वाचकांना आठवत असेलच कीं, पूर्वीं पार्लमेंटमध्यें ज्या पक्षाचें वजन ज्यास्त असेल तो पक्ष आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें जे वर्तन करणार नाहींत, त्यांना 'पाखंडी' समजून त्यांच्याविरुद्ध नानातऱ्हेचे जुलमी कायदे पास करून घेत असे. 'सुधारकां'चा वरपगडा असला म्हणजे 'रोमन कॅथोलिकां'विरुद्ध कायदे होत असत, आणि 'रोमन कॅथोलिकां'चें बहुमत असलें म्हणजे 'सुधारकांचीं' कृत्यें हाणून पाडण्यांत येत असत. एकूण कायद्यानें कोठल्या तरी एका पक्षाच्या लोकांना नेहमींच कांहीं तरी बंधन घातलेलें असे. आतां राजानें असा वटहुकूम काढला कीं, आपल्या राज्यांत कोणाही प्रजाजनाला धर्मासंबंधीं वाटेल तें मत धारण करण्याचा व त्याप्रमाणें वागण्याचा हक्क आहे. (Declaration of Indulgence).

१९ जाहिरनाम्याचा उद्देश—आज विसाव्या शतकांत राजाच्या असल्या हुकुमाला कोणीही मानच डोलवील. किंबहुना असला हुकूम करणें हें मोठेसें 'उदार कृत्य' आहे असेंही कोणी आतां मानणार नाहीं. पण ते दिवस तसे नव्हते. इंग्लंडच्या राष्ट्रीय धर्माविरुद्ध आचरण करण्याची त्या वेळीं कोणाला मोकळीक नव्हती. व राजाचा उद्देश झाला तरी सर्व प्रजाजनांना धर्मस्वातंत्र्य देण्याचा नसून, पार्लमेंटच्या कायद्यानें रोमन कॅथोलिक लोकांवर जे निर्बंध लादलेले होते, ते दूर करून त्या मंडळीला स्वातंत्र्य देऊन आपल्या पक्षाला बळकटी आणावी असाच त्याचा उद्देश होता. पण याहीपेक्षां या वेळीं लोकांना चीड येण्यासारखी गोष्ट म्हणजे असले कायदे करण्याचा हक्क पार्लमेंट सभेचा असतां राजा पार्लमेंट सभा न बोलावतां आपल्याच हुकुमाला कायद्याचें स्वरूप देऊं पहात होता ही होय. पुढल्या वर्षीं असाच आणखीं एक जाहिरनामा (Second Declaration) निघाला. आणि कांहीं दिवसांनीं राजानें असा हुकूम (Order in Council) केला कीं, आपला हा जाहिरनामा इंग्लंडमधील सर्व देवळांतून धर्माधिकाऱ्यांनीं एकामागून एक दोन रविवारीं (two successive Sundays) प्रार्थनेच्या वेळीं वाचून दाखवावा.

२० हुकुमाचा अनादर—हा हुकूम बेकायदेशीर आहे इतकेंच नव्हे तर हा आपला जाणून बुजून उपमर्द करण्यांत येत आहे असें धर्माधिकाऱ्यांना वाटलें. आणि त्यामुळें इंग्लंडमधील सात प्रमुख धर्माधिकाऱ्यांनीं या हुकुमाविरुद्ध राजाकडे एक अर्ज (Petition) सादर केला. हा अर्ज पाहून राजा रागानें लाल (furious) झाला, आणि असला अर्ज म्हणजे प्रत्यक्ष बंडाचें निशाण आहे असे

उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले. परंतु ठरलेल्या रविवारीं लंडनमधील फक्त चार देवळांतून राजाचा हा हुकूम पाळण्यांत आला. आणि त्या देवळांतून झालें तरी पाद्र्यांनीं हा हुकूम वाचून दाखविण्यास सुरवात केल्याबरोबर लोक देऊळ सोडून बाहेर चालते झाले! लंडनचाच कित्ता आजूबाजूच्या देवळांतून गिरविण्यांत आला. ' राष्ट्रीय धर्मवाद्यां'ना विरोध करणाऱ्या 'वीर सुधारक पक्षानें'ही या चळवळीला मदत केली. कारण या कामीं इंग्लंडच्या पार्लमेंटच्या धार्मिक व राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें आलेला होता. असो.

२१ सात बिशप--लोकांचा हा विरोध पाहून राजा फारच खवळला, आणि त्यानेंही लोकांच्या चळवळीला भीक न घालतां आपलें म्हणणें खरें करण्याचा दुराग्रह सोडून देण्याचें नाकारलें. ज्या सात धर्माधिकाऱ्यांनीं त्याच्याकडे अर्ज दिला होता, त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याचा घाट घालण्यांत आला आणि त्यांना किल्ल्यांत नेऊन ठेवण्यांत आलें. हजारों लोक या ' सप्तऋषीं ' च्या (The Seven Bishops) दर्शनासाठीं उत्सुक होऊन त्यांच्याकडून आशीर्वाद घेण्यासाठीं रस्त्यावर उभे राहूं लागले. इ. स. १६८८ च्या जून महिन्याच्या २९ व्या तारखेस राजानेंच निर्माण केलेल्या चार न्यायाधिशांच्या 'कोर्टा'पुढें (The Court of King's Bench) या धर्माधिकाऱ्यांची चौकशी सुरू झाली. राजपक्षीय मंडळीनें पंचांना हरतऱ्हेनें वश करून घेण्याची सर्व खटपट केली होती; रात्रभर चौकशीचें काम चालू होतें; सकाळीं पंचांचा काय निकाल बाहेर पडतो, तो ऐकण्यासाठीं हजारों लोक कोर्टाच्या आवारांत व बाहेरच्या रस्त्यावर जमा झाले; पंच सभास्थानीं आले; आणि ' हे सातही असामी दोषमुक्त आहेत ' असा त्यांनीं निकाल (verdict) दिला.

२२ 'दोषमुक्त' (not guilty) हे शब्द ऐकल्याबरोबर जमलेला जनसमुदाय आनंदानें बेहोष होऊन त्या सात धर्माधिकाऱ्यांच्या नांवानें मोठमोठ्यानें जयघोष करूं लागला. हा गलबला राजा आपला मित्र **फीवरशॅम** (Feversham) याच्याबरोबर भोजनास बसला होता तिकडे ऐकूं गेला. तेव्हां जेम्स उद्गारला " कांहीं हरकत नाहीं! पाहून घेतों! " त्या दिवशीं रात्रीं सर्व लंडनभर लोकांनीं रोषनाई केली (The night was a blaze of illumination). प्रत्येक घराच्या खिडकींत या सात सत्पुरुषांच्या अभिनंदनार्थ सात सात मेणबत्त्या लावण्यांत आल्या होत्या. असो.

२३ राजाला मुलगा झाला?—या खटल्याच्या थोडे दिवस आधीं राणीला मुलगा झाल्याचें वर्तमान बाहेर आलें होतें. परंतु लोकांचा या बातमीवर विश्वास बसेना. जेम्सची मेरी नांवाची एक मुलगी होती, ती सुधारक पंथाची असून तिचें हॉलंडमधील एका राजपुत्राशीं लग्न झालें होतें. जेम्सला पुत्रसंतान नसल्यामुळें त्याच्यामागून तीच गादीची वारस होणार होती. व तिच्या कारकिर्दींत आपल्याला बरे दिवस यतील असें इंग्लंडमधील सर्व पक्षांना व विशेषेंकरून दिवसेंदिवस प्रबल होत जाणाऱ्या सुधारक पक्षाला वाटत होतें. तेव्हां राजाला मुलगा झाल्याचें हें वर्तमान त्यांना अर्थातच विषवत् वाटलें. रोमन कॅथोलिक दरबाऱ्यांनीं जेम्सच्यामागून मेरीला गादी मिळूं नये म्हणून हें कांहींतरी कपट केलें आहे, कोणाचा तरी मुलगा उपटून आणून तो राणीला झाला म्हणून बातमी उठविली आहे असें ते म्हणूं लागले. आणि खरोखरच पुढें कित्येक वर्षेंपर्यंत राष्ट्रांतील बहुतेक लोकांना हें रोमन कॅथोलिक लोकांचें कपटच असून खरोखर जेम्सला मुलगा झालेला नाहीं असेंच वाटत असे. त्या बिचाऱ्या मुलाला तर 'तोतया' या नांवाशिवाय त्यांनीं कधींच संबोधिलें नाहीं !

२४ लोकांमधील असंतोष—इंग्लंडमध्यें रोमन कॅथोलिक धर्माची पुन्हां प्राणप्रतिष्ठा करण्याचा जेम्सचा प्रयत्न, आणि तोही दिवसेंदिवस हुषार व दक्ष होत जाणाऱ्या पार्लमेंटशीं विरोध करून, सात धर्माधिकाऱ्यांचा बेकायदेशीर छळ, आणि आपल्यामागून मेरीकडे गादी जाऊं नये म्हणून एक प्रकारच्या 'दत्तक' मुलाची योजना, असल्या गोष्टींनीं साहजिकच लोकांमध्यें असंतोष वाढूं लागला. माजी चार्लस राजाचें भूत जेम्समध्यें संचरलें आहे असें लोकांना वाटूं लागलें; हळू हळू राष्ट्रांतील राजपक्षीय ऊर्फ टोरी मंडळीचें लोकांतील वर्चस्व कमी होऊं लागलें; व प्रजापक्षीय ऊर्फ व्हिग मंडळीला जोर चढूं लागला. जेम्सच्या रूपानें पुन्हां अवतीर्ण झालेल्या अनियंत्रित राजसत्तेच्या या वेताळाला इंग्लंडमध्यें आश्रय दिल्यास राष्ट्रीय स्वातंत्र्याचें नष्टचर्य पुढें ओढवल्यावांचून राहणार नाहीं असें बऱ्याच मुत्सद्यांना वाटूं लागलें. व जेम्सला पदच्युत करून नवीन राजा गादीवर बसविल्याशिवाय राजाच्या 'ईश्वरदत्त हक्का'चें (Divine Right of Kings) भूत गाडलें जाणार नाही अशी त्यांनीं पक्की खूणगांठ बांधली.

२५ मेरी व वुइल्यमला पाचारण—मागें सांगितलेंच आहे कीं, जेम्सची मुलगी मेरी ही हॉलंडमधील एका संस्थानिकाला (William of Orange)

दिलेली असून ती व तिचा नवरा हीं दोघींही सुधारक पक्षाचीं होतीं. या तिच्या नवऱ्याला इंग्लंडमध्यें बोलवावा व त्यांना इंग्लंडची गादी द्यावी असें बऱ्याच वजनदार व्हिग पक्षीय मुत्सद्यांनीं ठरविलें. व त्याप्रमाणें मेरीला व तिच्या नवऱ्याला–त्याचें नांव वुइल्यम असें होतें–कळविण्यांत आलें. अनियंत्रित जुलमी राजसत्ता, व पोपचा धार्मिक जुलूम, या दोहोंपासून इंग्लंडची सुटका करण्यासाठीं (to defend their freedom and their faith) आपल्याला आलेंच पाहिजे असें पांच सहा व्हिग सरदारांचें एक गुप्त पत्र वुइल्यमला गेलें, आणि त्यानें इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी चालविली.

२६ जेम्सचा डाव—फ्रान्सच्या राजानें ही बातमी जेम्सला कळविली. परंतु जेम्स आतां इतका आढ्यतेखोर बनला होता कीं त्याला ती प्रथम खरीच वाटेना. कांहीं दिवस गेल्यावर त्याला खरी स्थिति कळून आली. परंतु आतां कळून उपयोग नव्हता. इंग्लंडमधील सर्व प्रजापक्षीय पुढारी आपआपली तयारी करून वुइल्यमच्या येण्याची वाट पहात होते. तितक्यांतल्या तितक्यांत जेम्सनें घाई करून सुमारें चाळीस हजार लष्कर जमा केलें, आणि लोकांना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं आपल्या पूर्वीच्या दुष्कृत्यांवर सारवण घालण्यासारखीं कांहीं उदार बुद्धीचीं कृत्येंही करून पाहिलीं.* परंतु असल्या आणीबाणीच्या वेळच्या राजांच्या कृत्यांवर कितपत विश्वास ठेवावयाचा हें लोकांना आतां पुरें समजून चुकलें होतें. त्यांनीं राजपक्षाला मिळण्याच्या मोहाला बळी न पडतां नव्या राजाचें उत्साहानें स्वागत करण्याचें ठरविलें, आणि फार दिवसांनीं पुन्हां इंग्लंडच्या गादीसाठीं दोन राजांचें–सासऱ्याजांवयाचें–युद्ध जुंपण्याचा प्रसंग येऊन ठेपला. या भांडणाचा परिणाम काय झाला तें पुढील प्रकरणांत सांगूं.

---

* In a few hours he yielded almost all the points for which he had been contending during three years...... but all was to no purpose.

प्रकरण ५३ वें.

राज्यक्रांति !

(इ. स. १६८८ इ. स. १६८९)

[१ वुइल्यमची तयारी. २ वुइल्यमचें निशाण–त्याचा जाहिरनामा. ३।४ जेम्सचें सैन्य–फितुरी. ५ पलायनाचा प्रयत्न. ६ भीतीचें साम्राज्य. ७ जेफ्रेजची कैद. ८।९ जेम्सचें पलायन आणि वुइल्यमचें आगमन. १० इ. स. १६८९ चें पार्लमेंट. ११ तीन पक्ष–गादीची वाटाघाट. १२ राज्यदान कायदा. १३ मुख्य अटी–वुइल्यम आणि मेरीचें राज्यारोहण. १४ सनदशीर राज्यपद्धतीचे श्रुतिग्रंथ. १५ जेम्सचा मृत्यु. १६ जेम्सच्या अंगचे गुणदोष–दोघा भावांची तुलना. १७ थोडें सिंहावलोकन–राज्यक्रांतीचा परिणाम.]

१ वुइल्यमची तयारी–नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेस वुइल्यम हॉलंडमधून निघाला. ५० लढाऊ जहाजें, माणसें ने आण करणारीं ७०० गलबतें, व १५ हजार सैनिक एवढा लवाजमा त्याच्याबरोबर होता. वारा अनुकूल वहात असल्यामुळें लवकरच हें सर्व सैन्य डेव्हन जिल्ह्यांत (Devon shire) येऊन दाखल झालें. जो वारा वुइल्यमला अनुकूल तो जेम्सला प्रतिकूल असल्यामुळें जेम्सचीं टेम्स नदींतील गलबतें बाहेरच पडूं शकलीं नाहींत. त्यामुळें वुइल्यमला कोणत्याच प्रकारचा अडथळा झाला नाहीं. परंतु कदाचित् ही मोहीम यशस्वी झाली नाहीं, तर पुनः जेम्स राजाशीं व त्याच्या जेफ्रेज न्यायाधिशाशीं गांठ आहे अशी सामान्य जनतेला धास्ती वाटत असल्यामुळें, पहिल्यानें इंग्लंडमधले सामान्य लोक त्याला मिळावे तसे मिळाले नाहींत. लहानसहान जमिनदारही तटस्थच राहिले.

२ वुइल्यमचें निशाण–वुइल्यम मजल दरमजल करीत एक्झीटर (Exeter) नामक शहरांत येऊन पोंचला. त्याच्या निशाणांवरून ' सुधारणेचा व इंग्लंडच्या स्वातंत्र्याचा जयजयकार असो ' अशा अर्थाचीं वाक्यें लिहिलेलीं होतीं. आतां त्यानें एक जाहिरनामा काढून आपण इंग्रज लोकांचे हक्क व स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठीं, पार्लमेंटचा अधिकार अबाधित चालविण्यासाठीं, व जेम्स राजाला मुलगा झाल्याची जी वदंता आहे, तींत कितपत तथ्य आहे त्याची चौकशी करण्यासाठीं आलों आहें, असें

जाहीर केलें. आणि हळू हळू या जाहिरनाम्याची बातमी इंग्लंडच्या कानाकोंपऱ्यापर्यंत पसरून हजारों लोक त्याला जाऊन मिळूं लागले.

३ जेम्सचें सैन्य—इकडे जेम्सनेंही बरेंच मोठें सैन्य जमा केलें, आणि स्वतः या सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्यासाठीं तो लंडन राजधानींतून बाहेर पडला. त्याचा मुख्य सेनापति 'फीव्हरशॅम' त्याला वारंवार सावधगिरीची सूचना देत होता. कारण जेम्सजवळ जरी पुष्कळ सैन्य जमा झाल्यासारखें दिसत होतें, तरी त्या सैन्यांतील बहुतेक बडे अंमलदार आंतून त्याच्या जुलमाला कंटाळलेले असून, वुइल्यमचा जय होईल तर बरें असेंच त्यांना वाटत होतें. इतकेंच नव्हे तर त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं प्रसंग पाहून वुइल्यमलाच जाऊन मिळण्याची तयारीही केली होती.

४ राजा लंडनहून निघाला त्याच दिवशीं रात्रीं त्याचे दोन प्रमुख सरदार वुइल्यमला जाऊन मिळाले आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं आणखीं बऱ्याच अंमलदारांनीं त्यांचें अनुकरण केलें. जेम्सची ॲन (Anne) नांवाची दुसरी एक मुलगी डेन्मार्कच्या राजपुत्राला (Prince George of Denmark) दिलेली होती. हा त्याचा जांवई त्याला मदत करण्यासाठीं म्हणून इंग्लंडला आला होता. राजानें त्याला बडी मेजवानी देऊन त्याचें स्वागत केलें. परंतु दुसऱ्याच दिवशीं तो व त्याची बायको—खुद्द जेम्सची मुलगी—हीं शत्रूला जाऊन मिळाल्याचें त्याच्या कानीं आलें ! लंडनमध्यें जिकडे तिकडे एकच गोंधळ उडून गेला. इतर ठिकाणींही एकामागून एक सर्व सरदार आणि जमिनदार वुइल्यमला मिळताहेत अशा बातम्या येऊं लागल्या. आयर्लंडांतील भाडोत्री सैन्य मात्र आपण जेम्सला सोडणार नाहीं असा बहाणा करीत होतें. पण तेवढ्यानें काय होणार ? आपल्याच गोटांत असा फितुर झालेला पाहून जेम्सला समजून चुकलें कीं आतां आपली धडगत नाहीं. आणि पुढें जेव्हां युद्ध करून यश येणार नाहीं अशी त्याची खात्री झाली, तेव्हां त्यानें इंग्लंड सोडून पळून जावें असाच बेत योजला (resolved on flight).

५ पलायनाचा प्रयत्न—एके दिवशीं काळोख्या रात्रीं राणीला व तिच्या संशयित तान्ह्या मुलाला राजवाड्यांतून काढून एका बोटींत बसवून 'लॅंबेथ' (Lambeth) नांवाच्या गांवीं पोंचविण्यांत आलें. त्या ठिकाणीं त्यांना थंडीवाऱ्यांत कुडकुडत बराच वेळ काढावा लागला. पण अखेरीस तीं दोघेंही फ्रान्समध्यें केले येथें सुरक्षित पोंचलीं. मागाहून चोवीस तासांच्या आंतच डिसेंबरच्या अकराव्या तारखेस सकाळींच जेम्सनेंही राजवाड्याच्या बाहेर प्रस्थान ठेवलें, आणि

टेम्स नदी ओलांडून तो केंट जिल्ह्यांत फीव्हरशॅम येथें पोंचला. जातांना त्यानें इंग्लंडचा बडा शिक्काही (Great Seal) नदींत फेकून दिला ! हेतु असा कीं राज्याचा शिक्काच जाग्यावर नसला म्हणजे नवें सरकार कांहीं काळ तरी गोंधळांत पडल्यासारखें होईल ! त्या ठिकाणीं एक लहानसें गलबत त्याला फ्रान्समध्यें नेऊन पोंचविण्याला तयार होतें. परंतु राजा गलबतावर चढून नावाडी आतां गलबत हांकारणार, इतक्यांत किनाऱ्याबरचे कांहीं कोळी लुटीच्या आशेनें त्या गलबतावर चढले आणि आंतले उतारू कोणीतरी रोमन कॅथोलिक आहेत असें समजून, त्यांनीं त्यांची हड्डी बरीच नरम केली आणि त्याला पकडून ते पुनः किनाऱ्यावर घेऊन आले !

६ **भीतीचें साम्राज्य**—इकडे राजा पळून गेला ही बातमी बाहेर पडतांच लंडनमध्यें एकच दंगल माजली. वुइल्यम अजून लंडनमध्यें येऊन पोंचला नव्हता, आणि जेम्स तर अशा रीतीनें एकाएकीं पळून गेलेला; त्यामुळें जिकडे तिकडे अराजकता (Anarchy) माजण्याची पाळी आली. शहरांतल्या व आजूबाजूच्या बदमाष लोकांचें या वेळीं चांगलेंच फावलें. ‘ पोपवाद्यांचा निःपात करा ’ (Down with the Papists) अशा आरोळ्या जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागल्या. रोमन कॅथोलिक लोकांच्या देवळांवर हल्ले सुरू झाले. आणि देवळांतील सामान-सुमानाची नासधूस होऊं लागली. कित्येक खासगी घरांवरही दरवडे पडून रोमन कॅथोलिक लोकांच्या अनन्वित हालांना सुरवात झाली, आणि पोपवादी म्हटला कीं त्याला कांहीं एक दयामाया दाखवावयाची नाहीं असें होऊन जिकडे तिकडे भीतीचें साम्राज्य माजलें.

७ **जेफ्रेजची कैद**—जेम्सचा दोस्त न्यायाधीश ‘ जेफ्रेज ’ यानें खलाशाचा वेष घेऊन पोबारा केला होता. पण पूर्वीच्या त्याच्या एका वैऱ्यानें त्याला एका घराच्या तळघरांत पकडलें. बाहेरची मंडळी त्याचे फाडून तुकडे तुकडे करण्याच्या बेतांत होती. परंतु इतक्यांत एका अधिकाऱ्यानें येऊन त्याची लंडनच्या किल्ल्यांत रवानगी केली.

८ **जेम्सचें पलायन**—दरम्यान लंडनमधील सरदार लोकांनीं शांतता राखण्यासाठीं तात्पुरतें सरकार स्थापन केलें आणि राजा केंट जिल्ह्यांत कोळ्यांच्या हातीं सांपडला आहे असें समजल्यावर त्यांनीं फीव्हरशॅम सेनापतीची त्याला सोडवून परत लंडनला आणण्यासाठीं रवानगी केली. फीव्हरशॅमनें तिकडे जाऊन राजाला सोडविलें आणि त्याला घेऊन तो लंडनला आला. या गडबडींतच वुइल्यमही लंडन-

नजीक विंडसर (Windsor) येथें येऊन पोंचला होता. जेम्स आपभोगानें पळून गेल्यामुळें इंग्लंडची गादी रक्तपात झाल्याशिवाय आपल्याला अनायासें मिळेल अशी त्याची अटकळ होती. परंतु पुनः जेम्सचें हें विघ्न उपस्थित झालें. पण शेवटीं रक्तपात न होतांच त्याचे हेतु सिद्धीस गेले.

९ जेम्सला त्याच्या नेहमींच्या राहण्याच्या वाड्यांत राहणें धोक्याचें आहे असें सांगण्यांत येऊन त्याची दुसरीकडे राहण्याची व्यवस्था करण्यांत आली. परंतु याही ठिकाणीं आपल्या जिवास केव्हां अपाय होईल याचा नेम नाहीं, अशी धास्ती त्याला एकसारखी वाटत असल्यामुळें त्यानें ' तुम्ही इंग्लंडमधून जाऊं नका ' अशा आपल्या अनेक मित्रांच्या विनवण्यांना न जुमानतां फ्रान्समध्यें जाऊन राहण्याचा निश्चय केला, आणि डिसेंबरच्या बाविसाव्या तारखेस रात्रीच्या वेळीं गुपचुप एका गलबतांतून निसटून तो फ्रान्समध्यें जाऊन पोंचला. तिकडे लुई राजानें त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत करून सेंट जरमेनचा (St Jermain) स्वतंत्र वाडा त्याला राहण्यासाठीं दिला.

१० इ. स. १६८९ चें पार्लमेंट—ज्या दिवशीं जेम्स राजा लंडन सोडून निघाला, त्याच दिवशीं वुइल्यम लंडनमध्यें आला. त्यानें लगेच त्या वेळीं शहरांत असलेले सुमारें ७० सरदार, शहरचे प्रमुख नागरिक, आणि पूर्वींच्या पार्लमेंटसभेचे कित्येक वजनदार सभासद यांची सभा भरविली. या मंडळींनीं राष्ट्राच्या हिताहिताचा विचार करण्यासाठीं आपण अगोदर पार्लमेंटची प्राथमिक सभा बोलवावी असा वुइल्यमला सल्ला दिला. त्याप्रमाणें इ. स. १६८९ च्या जानेवारीच्या २२ व्या तारखेस पार्लमेंटची प्राथमिक सभा (Convention Parliament) भरून तिनें असा ठराव केला कीं, जेम्स राजानें इंग्लंडची राजकीय घटना (English Constitution) मोडून राज्यांतून पलायन केल्यामुळें इंग्लंडच्या गादीवरील त्याचा हक्क नष्ट झाला आहे. त्याचप्रमाणें ' सुधारक ' ऊर्फ ' प्रॉटेस्टंट ' मताच्या राज्यांत पोपवादी राजा असणें ही गोष्ट राष्ट्राच्या हिताला घातक आहे.

११ तीन पक्ष—गादी तर अशा रीतीनें रिकामी पडली (the throne was declared vacant). पुढचा प्रश्न आतां ही गादी कोणास द्यावी हा. राज्यांतील टोरी व व्हिग या दोन प्रमुख पक्षांमध्यें या प्रश्नासंबंधानें जारीनें वाटाघाट सुरू झाली. टोरी पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, जेम्सचा मुलगा लहान आहे तो वयांत येईपर्यंत कोणीतरी राजप्रतिनिधि अगर ' राजपालक ' ऊर्फ ' रीजंट ' (Regent)

नेमून राज्यकारभार चालू करावा. उलट पक्षीं व्हिग मंडळीचें मत असें होतें कीं, गादी रिकामी न ठेवतां तीवर ताबडतोब कोणीतरी राजा बसविला पाहिजे. दुसऱ्या कित्येकांनीं असा मार्ग सुचविला कीं, जेम्सच्या मुलाला एकीकडे ठेवून जेम्सच्या मुलीला–म्हणजे वुइल्यमच्या बायकोला गादीवर बसवावी (Mary should be Queen). स्वतः वुइल्यमनें असें सांगितलें कीं, आपण 'राजपालक' म्हणून राज्यकारभार करण्याला कबूल नाहीं, इतकेंच नव्हे तर तुम्ही बायकोला गादीवर बसवून तिच्यामार्फत मीं राज्यकारभार पहावा असें म्हणाल, तरीही मला ही गोष्ट बिलकुल कबूल नसून मी ताबडतोब हॉलंडला चालता होईन. तेव्हां अखेर एकच मार्ग शिल्लक राहिला, तो म्हणजे वुइल्यम आणि मेरी या दोघांनाही संयुक्तपणें इंग्लंडची गादी देणें हा होय.

१२ राज्यदान कायदा—या गोष्टीचा अखेर निर्णय करण्याच्यापूर्वी लोकसभेनें आपल्या पूर्वापार हक्कांचा ज्यांत समावेश केलेला आहे असा एक जाहिरनामा (Declaration of Right) काढला आणि या हक्कांना अनुसरून पार्लमेंटमध्यें इंग्लंडचा 'राज्यदान कायदा' (Bill of Right) म्हणून एक कायदा पास करण्यांत आला. या कायद्यानें असें ठरविण्यांत आलें कीं, वुइल्यम आणि मेरी हयात असेपर्यंत त्यांनीं दोघांनीं मिळून इंग्लंडचें राजपद भोगावें, व प्रत्यक्ष राज्यकारभार (the chief administration) वुइल्यमच्या हातीं रहावा; त्यांच्यामागून मेरीच्या मुलांना गादी मिळावी; त्यांच्या अभावीं मेरीची दुसरी बहीण ॲन हिला व तिच्या मुलांना गादी द्यावी; आणि त्यांच्या अभावीं वुइल्यमला मेरीशिवाय इतर स्त्रीपासून झालेल्या वुइल्यमच्या वंशजाकडे ही गादी चालावी. त्याचप्रमाणें या कायद्यानें असेंही ठरविण्यांत आलें कीं, यापुढें जर इंग्लंडच्या तक्तनशीन व्यक्तीनें रोमन कॅथोलिक धर्माचा स्वीकार केला किंवा रोमन कॅथोलिक घराण्याशीं शरीरसंबंध केला, तर त्याचा गादीवरील हक्क नष्ट होऊन तो पुढच्या सुधारक वारसदाराला मिळावा.

१३ मुख्य अटी—पण या राजपदव्यवस्थेच्या कलमांशिवाय राजसत्तेवरील निर्बंध, प्रजाजनांचे जन्मसिद्ध हक्क, आणि पार्लमेंटचे अधिकार, या संबंधाचीं या कायद्याचीं कलमेंच प्रजेच्या अधिकारांच्या दृष्टीनें ज्यास्त मोलाचीं होतीं, तीं अशीं:—

(१) राजाला कोणाही व्यक्तीस कायद्याची माफी अगर सूट देण्याचा अधिकार (dispensing or suspending power) नसावा.

(२) पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजानें खडी फौज (standing army) ठेवूं नये.

(३) राजानें प्रजेवर कोणताही कर पार्लमेंटच्या संमतीशिवाय बसवूं नये.

(४) आपलीं दुःखें दूर व्हावीं म्हणून राजास अर्ज करण्याचा प्रत्येक प्रजाजनाला हक्क आहे.

(५) राजानें आरोपिताकडून जबर जामीन मागूं नये अगर अपराध्याला असह्य दंड अगर क्रूर शिक्षा करूं नये.

(६) पार्लमेंटच्या सभासदांची निवडणूक होत असतां राजानें त्यांत ढवळाढवळ करूं नये.

(७) पार्लमेंटसभा वरचेवर बोलावण्यांत यावी आणि तिचे वादविवाद बिनहरकत चालावे.

या अटी कबूल करून वुइल्यम आणि मेरी फेब्रुवारीच्या तेराव्या तारखेस इंग्लंडच्या तक्तावर आरूढ झालीं.

१४ सनदशीर राज्यपद्धतीचे श्रुतिग्रंथ—इंग्लंडमध्यें आज जी नियंत्रित राजसत्ताक पद्धति रूढ आहे, तिचे नियम एके ठिकाणीं लिहून ठेवलेले असे नाहींत. वेळोवेळीं प्रजेनें राजाकडून ' सनदा ' व ' हक्क ' कांहीं पांढऱ्यावर काळे केलेले तर कांहीं केवळ अलिखित रूढीच्या बळावर संपादन केलेले आहेत. अशा स्थितींत इ. स. १२१५ मधली बडी सनद, इ. स. १६२८ मधील हक्कांचा अर्ज, व हा इ. स. १६८९ मधील हक्कांचा कायदा, हे तीन कागद इंग्रज प्रजेला प्राणापेक्षांही प्रिय वाटत असतात यांत नवल नाहीं. सुप्रसिद्ध मुत्सद्दी थोरला **पिट्ट** यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " हे तीन कायदे म्हणजे इंग्लंडांतील सनदशीर राज्यपद्धतीचे श्रुतिग्रंथ (Bible) होत. " असो.

१५ जेम्सचा मृत्यु—आतां माजी झालेल्या **जेम्स** राजानें फ्रान्समध्यें पारिस(Paris)नजीक **सेंट जरमेन** वाड्यांत फ्रान्सच्या राजाचा पाहुणचार खात (on bounty of Louis) आपल्या आयुष्याचे बाकीचे दिवस काढले. आणि इ. स. १७०१ मध्यें संधिवाताचें दुखणें होऊन त्याचा अंत झाला.

१६ जेम्सच्या अंगचे गुणदोष—चार्लस राजापेक्षां कांहीं कांहीं बाबतींत या त्याच्या भावाचें वर्तन चांगलें होतें. स्वतःच्या मतानें जी गोष्ट एकदां ग्राह्य म्हणून ठरली, त्या गोष्टीला तो मनापासून चिकटून राहणारा होता. परंतु आपल्याला

जशी बरेंवाईट समजण्याची बुद्धि परमेश्वरानें दिली आहे, तशीच इतरांनाही त्यांची त्यांची सदसद्विवेकबुद्धि असून त्यांनाही आपल्या मताप्रमाणें वागण्याचा हक्क आहे ही गोष्ट **जेम्स**ला पटत नसे. तसेंच **चार्लसे**पेक्षां त्याची बुद्धिमत्ताही एकंदरीनें कमीच होती. त्या वेळच्या एका दरबारी विनोदी गृहस्थानें या दोघा भावांचें असें वर्णन केलें आहे कीं, ' **चार्लस**नें कोणतीही गोष्ट समजून घेण्याचें मनांत आणल्यास ती समजून घेण्याची अक्कल त्याच्यांत होती. आणि **जेम्सला** एकादी गोष्ट समजण्यासारखी असल्यास ती समजून घेण्याला तो मागें घेणारा नव्हता (Charles could see things if he would; James would see things if he could). **जेम्स**ला पहिल्या बायकोपासून **मेरी** व **ॲन** अशा दोन मुली व दुसऱ्या बायकोपासून एक मुलगा व एक मुलगी अशीं चार अपत्यें झालीं होतीं; पैकीं वडील मुलगी **मेरी** हिला इंग्लंडची गादी मिळाली हें वर आलेंच आहे. असो.

१७ **थोडें सिंहावलोकन**—पहिला **चार्लस** राजा गादीवर आल्यापासून **पार्लमेंट** सभा व राजा यांच्यामध्यें जुंपलेलें भांडण (struggle between Sovereign and Parliament) एका राजाचा शिरच्छेद होऊन, आणि दुसऱ्याला पळून जावें लागल्यावर, पार्लमेंट सभेच्या हातांत महत्त्वाचीं राज्यसूत्रें येऊन मिटलें. इंग्लंडच्या इतिहासांत या घटनेचा उल्लेख "इंग्लडांतील फार मोठी राज्यक्रांति एकदांची पुरी झाली " असा केलेला आढळतो (The great English Revolution was now complete). **चार्लस** राजाला फांशीं दिलें, त्या वेळीं आणि **जेम्स** राजा पळून गेला, तेव्हां इंग्लंडमध्यें राजसत्ता अजिबाद नाहींशी होऊन पूर्ण लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन होते कीं काय (erection of a democracy) अशी पुष्कळांना शंका होती. परंतु एकंदरींत सर्वसामान्य इंग्रजांना संपूर्ण लोकसत्तेचें तितकेंसें वेड नव्हतें म्हणून म्हणा, किंवा तक्तनशीन पुरुषाविषयीं आदर बाळगून त्याचा मानमरातब राखण्याविषयीं कोणत्याही देशांतील सामान्य प्रजाजनांची जी वृत्ति आढळून येते, तीच वृत्ति या दोन्ही प्रसंगीं बळावली म्हणून म्हणा, इंग्लंडचें राजघराणें नष्ट न होतां कायम राहिलें. मात्र तक्ताधिकाऱ्यांची पूर्वीची 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' शक्ति नाहींशी होऊन (The sovereign can make or unmake no law) आणि राजाच्या बरोबरीनें सरदारसभा व लोकसभा यांचें वजन वाढून, राजा (The King), सरदारमंडळ (The Lords), व सामान्य प्रजेचें प्रातिनिधिक मंडळ (The Commons), हीं तीन राष्ट्राचीं मुख्य ' अंगें ' (Three estates of the Realm) मानण्यांत येऊं लागलीं; व या तिघांचा एकमेकांवर

दाब (Mutual check) राहून समतोलवृत्तीची राज्यपद्धति (Well-balanced Constitution) स्थापन झाली. त्याचप्रमाणें या राज्यक्रांतीनें धार्मिक बाबतींत सर्वांना मतस्वातंत्र्य (toleration) मिळालें; न्यायाधिकाऱ्यांना (The Judges) पूर्वी राजाच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागत असे, ती स्थिति नाहींशी होऊन एकदां न्यायाधिशाची नेमणूक झाल्यावर ती त्याच्या हयातीपर्यंत (for life), निदान त्याचें वर्तन दोषास्पद आहे असें दिसून येईपर्यंत (during good conduct) चालावी असेंही ठरलें.

प्रकरण ५४ वें.

राज्यक्रांतीनंतर !

(इ. स. १६८९ इ. स. १७०२)

[१ जमाखर्चावर ताबा—सिव्हिल लिस्ट. २ जॅकोबिट ऊर्फ जेम्सवाले. ३ स्कॉटलंडमध्यें. ४ मॅकडोनल्ड आणि ब्रेडलबेन. ५ ग्लेंकोची कत्तल. ६ वुइल्यमचें अंग. ७ आयर्लंडमध्यें. ८ लंडनडेरीचा वेढा. ९ लिमरिकचा तह. १० तह मोडला—पोपवाद्यांवरील जुलूम—त्याचा परिणाम. ११ सुधारक संस्थानिकांचा संघ—फ्रान्सबरोबर युद्ध. १२ इंग्लंडमधील कट. १३ इ. स.१६९०—मार्लबरो आणि रसेल. १४ अविश्वासाचें वातावरण. १५ वुइल्यमविषयींचें लोकमत. १६ जेम्सचा मूर्खपणा. १७ इ. स. १६९२ चा जाहिरनामा—राजनिष्ठेचें स्थित्यंतर. १८ फ्रान्सबरोबरचें आरमारी युद्ध. १९ रिसविकचा तह. २० मेरीचा मृत्यु. २१ बेरिक आणि बारक्ले. २२ राजनिष्ठ समिति—कट फुटले. २३ राष्ट्रीय कर्ज—खड्या सैन्याला रजा. २४ स्पेन आणि फ्रान्स—स्पेनच्या राज्याची वाटाघाट. २५ स्पेनच्या बादशहाचें मृत्युपत्र. २६ स्नेह—संधि. २७ जेम्सचा आजार आणि लुईचे उद्गार—लष्करभरती. २८ वारसाचा नवा कायदा—राजसत्तेवर निर्बंध. २९ वुइल्यमचा मृत्यु. ३० वुइल्यमच्या अंगचे गुण. ३१।३२ पार्लमेंटच्या सत्तेची वाढ—छापखान्याचें स्वातंत्र्य. ३३ इंग्लंडची बँक. ३४ संयुक्त प्रधानमंडळ. ३५ स्कॉट लोकांची वसाहत. ३६ आणखीं कांहीं गोष्टी.]

१ जमाखर्चावर ताबा—इंग्लंडच्या **पार्लमेंटनें वुइल्यम** आणि **मेरीला** संयुक्त तख्ताधिपतित्व दिल्यावर नवीन शपथविधि (Coronation oath and oaths

of allegiance and supremacy) तयार करून त्याप्रमाणें राजाराणीच्या व त्यांच्याशीं राजनिष्ठ राहण्याबद्दल सरदार वगैरेंच्या शपथा घेण्यांत आल्या. एप्रिलच्या ११ तारखेस राज्यारोहणसमारंभ झाला. या वेळीं लोकसभेनें राज्याच्या जमाखर्चावर दाब ठेवण्याचा उपक्रम करून असा ठराव केला कीं, राज्यांतील वार्षिक उत्पन्नापैकीं सुमारें सात लक्ष पौंडाचें उत्पन्न राजाच्या खासगी खर्चाकडे खर्च व्हावें* व बाकीचें सुमारें पांच लक्ष पौंडांचें उत्पन्न 'सरकारी' म्हणजे राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या कामीं व सार्वजनिक कल्याणाच्या इतर बाबींकडे खर्च करण्यांत यावें.

२ जॅकोबिट--कोणतीही राज्यक्रांति झाली तरी क्रांतीनंतरचे कांहीं दिवस गडबडींत जावयाचेच. **वुइल्यम-मेरीला** राज्याभिषेक होऊन त्यांच्याकडे इंग्लंडचें राजपद कायदेशीरपणें कायम झालें खरें. पण माजी राजा **जेम्स** याचे कांहीं पक्षपाती होते, त्यांना ही गोष्ट आवडणें शक्य नव्हतें. विशेषतः स्कॉटलंड व आयर्लंडमध्यें **जेम्स**च्या पक्षाचे बरेच लोक असल्यामुळें पुढें दोन तीन वर्षेंपर्यंत त्या प्रांतांत सतत धामधूम सुरू राहिली होती. खुद्द इंग्लंडमध्येंही कित्येक धर्माधिकारी **जेम्स**चे कट्टे अनुयायी होते. त्यांना आतां सुधारकांना मिळालेलें धार्मिक बाबतींतील स्वातंत्र्य मुळींच मान्य नव्हतें. त्यांनीं **वुइल्यम**विषयीं राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारल्यामुळें त्यांना त्यांच्या देवळांतून कमी करण्यांत आलें. पुढें या मंडळींनीं आपली एकजूट करून **वुइल्यम**ला होईल त्या रीतीनें त्रास देण्याचें व्रतच घेतलें. या मंडळीला इंग्लंडच्या इतिहासांतून 'जेम्स' या शब्दाचें लॅटिन रूप जें 'जॅकोबस' (Jacobus) त्यावरून 'जॅकोबिट' (Jacobite) म्हणजे 'जेम्सवाले' असें नांव दिलेलें आहे.

३ स्कॉटलंडमध्यें-स्कॉटलंडमध्यें तिकडच्या पार्लमेंटनें इंग्लंडच्या पार्लमेंटप्रमाणेंच **जेम्स**चा गादीवरील हक्क नष्ट झाला असें ठरवून, **वुइल्यम**ला राजा म्हणून मान्यता दिली. परंतु 'डंडी' (Dundee) नामक एका सरदारानें **जेम्स**वाल्यांचा पक्ष घेऊन **वुइल्यम**चा हक्क नाकबूल केला. स्कॉटलंडच्या डोंगरांतील तीन हजार पहाडी लोक (Highland Clans) त्याला अनुकूल झाले. राजपक्षीय सैन्याची व त्याची झटापट होऊन बहुतेक ठिकाणीं प्रथम 'डंडी'चा जय झाला. परंतु पुढें एका चकमकींत ऐन वेळीं 'डंडी' जखमी होऊन पडल्यामुळें त्याच्या पहाडी सैन्यांत फाटाफूट झाली आणि अखेर इ. स. १६८९ च्या अखेरीस स्कॉटलंडमध्यें **वुइल्यम**चा अंमल सर्वत्र बसल्यासारखा झाला.

---

* राजाला मिळावयाच्या या वार्षिक नेमणुकीला 'सिव्हिल लिस्ट' असें नांव आहे.

४ **मॅकडोनल्ड आणि ब्रेडलबेन**—पुढें कित्येक पहाडी सरदार अजून शरण आले नव्हते, त्यांना पैशाची लालूच दाखवून वश करून घ्यावें म्हणून ' ब्रेडलबेन ' (Breadalbane) नांवाच्या अधिकाऱ्याची तिकडे रवानगी करण्यांत आली. 'ब्रेडलबेन'च्या पैशाच्या पिशवीला वश होऊन उरले सुरले बहुतेक सरदार **वुइल्यम**चे अंकित झाले. पण 'मॅकडोनल्ड' (Macdonald) नांवाची एक टोळी कांहीं केल्या **वुइल्यम**चें स्वामित्व कबूल करीना. या ' मॅकडोनल्ड ' टोळीच्या 'मॅक आयन' (Mac I'an) नांवाच्या पुढाऱ्याचें आणि ब्रेडलबेनचें खासगी वैमनस्य होतें. त्यामुळें मॅक आयन मागे, ती रकम ब्रेडलबेनकडून त्याला मिळेना, व ब्रेडलबेनच्या मनांतून तर हरप्रयत्न करून सगळ्या मॅकडोनल्ड टोळीचाच नायनाट करावयाचा होता. तेव्हां या संधीचा आपण पुरा फायदा घ्यावा असें त्यानें ठरविलें. ' मॅक आयन'ही हुषार होता. त्यानें कांहीं दिवस खटपट करून पाहिली, पण पुढें आपलें आतां कांहीं चालावयाचें नाहीं असें जाणून त्यानें **वुइल्यम**चें स्वामित्व मान्य करण्याचें कबूल केलें. ठरलेल्या अधिकाऱ्यापुढें (Sheriff of Argyle) त्याचा शपथविधि होऊन आतां आपण **वुइल्यम**चे प्रजाजन म्हणून कबूल केल्यामुळें **वुइल्यम**शीं असलेलें शत्रुत्व नष्ट झालें, अशा समजुतीनें ' मॅकडोनल्ड ' टोळींतले लोक स्वस्थपणें घरीं जाऊन आपआपल्या उद्योगाला लागले. परंतु इकडे ब्रेडलबेननें ' मॅक आयन ' चें शपथपत्र दाबून ठेवलें, आणि **वुइल्यम**ला 'मॅक आयन' हाच स्कॉटलंडच्या सगळ्या बंडाळीचा प्रवर्तक असून त्याचा व त्याच्या टोळीचा निःपात केल्याशिवाय स्कॉटलंडमध्यें शांतता नांदणार नाहीं, असें खोटेंच सांगून या ' चोरां 'चीं (Set of thieves) पाळेंमुळें खणून काढण्याबद्दल **वुइल्यम**कडून अधिकारपत्र मिळवून ठेवलें.

५ **ग्लेंकोची कत्तल**—इ. स. १६९२ च्या फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेस ब्रेडलबेनचे सुमारें शंभर सवाशें शिपाई ' मॅकडोनल्ड ' टोळी ज्या गावांत राहत असे त्या ' ग्लेंको ' (Glencoe) नामक गांवीं येऊन दाखल झाले. या शिपायांचा मुख्य ' कप्तान कॅंपबेल ' (Captain Campbell) याचें व ' मॅक आयन'चें थोडेसें दूरचें नातेंही होतें. ' मॅक आयन 'ला या शिपायांचा कांहीं संशय न येतां त्यांना आपल्या गांवचे पाहुणे म्हणून त्यानें मोठ्या आदरानें वागविलें (a Highland welcome).मागाहून थोड्याच दिवसांनीं कॅंपबेलचे आणखीं चारशें लोक येऊन त्यांनीं 'ग्लेंको' गांवाची नाकेबंदी केली. फेब्रुवारीच्या बाराव्या तारखेचे रात्रीं कॅंपबेलला मोठी मेजवानी होऊन ती रात्र मोठ्या मजेंत गेली, आणि दुसऱ्या दिवशीं

सकाळीं पांच वाजतां 'मॅक आयन' आणि त्याच्या बरोबरीचे आणखीं सदतीस 'मॅकडोनल्ड' त्यांच्या घरासमोरील उकिरड्यावर मरून पडलेले आढळले ! पहिला गोळीबार झाल्याबरोबर त्या टोळींतील बाकीचे लोक उघडे नागडे वाट फुटेल तिकडे पळून गेले. तिकडे त्यांचे थंडीनें आणि भुकेनें अत्यंत हाल झाले. थोड्या दिवसांनीं उरलेले लोक परत येऊन पाहतात–तों सबंध 'ग्लँको' गांवाची राख झालेली ! गुरें-ढोरें मारेकऱ्यांनीं हांकून नेलेलीं ! आणि मेलेल्याचीं प्रेतें विद्रूप होऊन पडलेलीं !

६ **वुइल्यमचें अंग**—ही सर्व हकीकत एक वर्षपर्यंत गुप्त होती. परंतु पुढें 'जेम्सवाल्या' मंडळींकडून पहिल्यानें या गोष्टीचा सुगावा लागला. **वुइल्यम**च्या शत्रूंनीं ही कांहीं तरी कंडी पिकविली असेल असें प्रथम लोकांना वाटलें. परंतु पुढें तीन वर्षांनीं या गोष्टीची चौकशी करण्यासाठीं 'कमिशन' नेमल्यावर **वुइल्यम**वरील दोषारोप खरा आहे असें दिसून आलें. **वुइल्यमनें** आपण **ब्रेडलबेनला** अधिकारपत्र दिलें तें कामाच्या घाईत दिलें, त्यांतील मजकूर आपण वाचून पाहिला नव्हता असें सांगितलें. परंतु या कामांत ज्यांचें ज्यांचें अंग होतें असें उघडकीस आलें, त्यांना राजानें कांहींएक शिक्षा न केल्यामुळें राजाची ही सबब कोणालाही खरी वाटली नाहीं.

७ **आयर्लंडमध्यें**—तिकडे **आयर्लंडमध्यें** पूर्वींपासूनच **रोमन कॅथोलिक** ऊर्फ 'पोपवादी' लोक व **प्रॉटेस्टंट** म्हणजे 'सुधारक' यांचेमध्यें कित्येक वर्षें हाडवैर चालू होतें, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. नवा राजा **वुइल्यम** हा सुधारक पक्षाचा असल्यामुळें तिकडील **रोमन कॅथोलिक** मंडळीनें त्याचें स्वामित्व कबूल करण्याचें नाकारलें व माजी **जेम्स** राजाला बोलावून त्याच्या तर्फेनें निकराचा झगडा करण्याची तयारी केली.

८ **लंडनडेरीचा वेढा**—आतांप्रमाणेंच त्या वेळींही **आयर्लंडच्या** जवळजवळ तीनचतुर्थांश भागांत **रोमन कॅथोलिक** लोकांची वस्ती असून इंग्लंडमधून तिकडे वसाहत करण्यासाठीं गेलेले लोक तेवढे सुधारक पंथाचे होते. **जेम्स आयर्लंडमध्यें** येऊन दाखल झाला, आणि 'डब्लिन' (Dublin) राजधानींत तेथल्या **पार्लमेंट** सभेची बैठक भरून सुधारकांच्या धर्माचा बींमोड करावा व **रोमन कॅथोलिक** धर्माशीं जे विरोध करतील त्यांच्या जमिनी जप्त कराव्या, असा ठराव होऊन **जेम्स** आपलें बरेंच मोठें सैन्य घेऊन 'लंडनडेरी' (London-derry) या प्रसिद्ध शहरावर चालून गेला. त्या शहरच्या रहिवाशांनीं या वेळीं अवर्णनीय शौर्य व चिकाटी दाखविली. त्या वेळीं या शहरची तटबंदी बेताचीच असून तोफा, दारूगोळा वगैरे रणसाहित्यही शहरांत बेताबाताचेंच होतें. तरी चार महिने-

पर्यंत वेढा घालून बसलेल्या जेम्सच्या सैन्याला शहरांतील लोकांनीं दाद दिली नाहीं. बाहेरून दाणागोटा यावयाचा बंद झाल्यामुळें शहरवासीयांचे फार हाल झाले. घोडे, कुत्रीं, मांजरें, उंदीर, घुशी वगैरे सांपडेल त्या प्राण्यांवर निर्वाह करण्याची त्यांच्यावर पाळी आली. पण अखेरीस त्यांच्या या चिकाटीला यश आलें. इंग्लंडमधून ऐन वेळीं मदत येऊन पोंचली, आणि जेम्सचें सैन्य या शहरासमोर चार महिन्यांत आठ हजार लोकांचे फुकट बळी देऊन वेढा उठवून निघून गेलें.

९ लिमरिकचा तह—पुढें जुलै महिन्यांत फ्रान्समधून आलेल्या सैन्याच्या मदतीनें जेम्सनें पुन्हां एकदां प्रयत्न करून पाहिला, परंतु 'बॉइन'(Boyne)च्या लढाईंत त्याचा पराभव होऊन त्याला पुन्हां फ्रान्सचा रस्ता सुधारावा लागला.† पुढें आणखीं एक वर्षपर्यंत आयरिश लोकांशीं मधून मधून युद्ध चालूच होतें. शेवटीं इ. स. १६९१ च्या आक्टोबरच्या तिसऱ्या तारखेस लिमरिक (Limerick) येथें उभयपक्षीं तह होऊन असें ठरलें कीं, माजी दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकिर्दींत रोमन कॅथोलिक लोकांना धार्मिक बाबतींत जे हक्क उपभोगावयाला मिळत होते, त्या हक्कांत वुइल्यमनें ढवळाढवळ करूं नये, वुइल्यमचें स्वामित्व जे मान्य करतील त्यांच्या जमिनी जप्त होऊं नयेत, आणि ज्यांना आयर्लंड सोडून बाहेर देशांत निघून जावयाचें असेल त्यांना प्रतिबंध होऊं नये. या तहाप्रमाणें बारा हजार आयरिश लोक फ्रान्समध्यें निघून गेले, व त्यांनीं तिकडे फ्रान्सच्या लढायांत पुढें बराच लौकिक मिळविला. असो.

१० तह मोडला—पुढें लवकरच डब्लिनमध्यें आयरिश पार्लमेंटची बैठक भरली, आणि या पार्लमेंटनें लिमरिकचा तह बाजूला ठेवून पोपवादी लोकांविरुद्ध अत्यंत जुलमाचे व कडक कायदे केले. आयरिश लोकांची दहा लाख एकर जमीन जप्त करून

† 'जेम्स' आणि 'वुइल्यम' यांच्या या वेळच्या वर्तनांतच त्यांच्या अंगचे स्वभावविशेष दिसून आले. बॉइन (Boyne)च्या या लढाईच्या वेळीं जेम्स दूर उभा राहून लढाई पहात होता; आणि वुइल्यम स्वतः पुढारी होऊन आयरिश बंडखोरांशीं लढत होता. त्याला या लढाईंत जखम झाली तरी त्यानें आपली जागा सोडली नाहीं, तर उलट बंडखोरांचा पराभव झाला ही बातमी समजल्याबरोबर जेम्सनें किनारा गांठला, आणि तेथून फ्रान्सला पोबारा केला. वुइल्यमच्या या वेळच्या वर्तनाचें पराभूत आयरिश लोकांनाही इतकें कौतुक वाटलें कीं, "आपण राजांची अदलाबदल करून पुन्हां लढूं या, म्हणजे कोण कोणाकडून पराभूत होतो पाहूं" असे उद्गार त्यांच्यापैकीं कित्येकांनीं इंग्लिश सैनिकांपाशीं काढले.

ती बऱ्या इंग्रज जमिनदारांना वांटून देण्यांत आली. **रोमन** कॅथोलिक धर्माचें **आयर्लंड**मधून उच्चाटन करण्याचा संकल्प सुटून **पो**पवादी मंडळीवर अत्यंत जुलूम होऊं लागला. कोणाही पोपवाद्याला शाळामास्तर नेमूं नये, त्याला अज्ञानाचा पालक होण्याची मोकळीक असूं नये, किंवा वकिली करतां येऊं नये असें ठरविण्यांत आलें. रोमन कॅथोलिकांना **प्रॉटेस्टंट** लोकांशीं शरीरसंबंध करण्याची मनाई करण्यांत आली, आणि त्यांची जमिनीवरील मालकीही काढून घेण्यांत येऊन त्यांना अगदीं निःशस्त्र करण्यांत आलें. अशा रीतीनें जिकडून तिकडून गांजले गेल्यामुळें **वुइल्यम**शीं व सुधारक मंडळीशीं विरोध करण्याचें त्राण पोपवादी मंडळीच्या अंगीं राहिलें नाहीं हें खरें; तथापि असल्या जुलमाची आठवण आयरिश लोकांच्या मनांत पिढ्यान्‌पिढ्या कायमची राहून इंग्रजांविषयीं त्यांच्या मनांत जो तिटकारा उत्पन्न झाला व दिवसेंदिवस जो द्वेष बळावत गेला तो अद्यापिही पुरा नाहींसा झालेला नाहीं, ही गोष्ट तितकीच खरी आहे.

११ सुधारक संस्थानिकांचा संघ—वर सांगितल्याप्रमाणें **स्कॉटलंड** व **आयर्लंड**मध्यें **वुइल्यम**चा अंमल मान्य झाला. परंतु आतां खुद्द इंग्लंडमध्येंच त्याच्या-विरुद्ध कट होऊं लागले. माजी **जेम्स** राजा **फ्रा**न्समध्यें गेला, तोही कांहीं तिकडे स्वस्थ बसला नव्हता. फ्रान्सचा राजा हा युरोपांतील पोपवादी मंडळींचा प्रमुख पुरस्कर्ता असून सुधारक संस्थानिकांना हाणून पाडून जिकडे तिकडे **रोमन** कॅथोलिक धर्माचा प्रसार करण्याचा त्यानें चंग बांधला होता. आणि तिकडच्या सुधारक संस्थानिकांनींही आपला एक संघ स्थापून फ्रान्सच्या बादशहानें स्वारी केल्यास एकमेकांना मदत करण्याचें ठरविलें होतें. **वुइल्यम** इंग्लंडमध्यें येण्याच्या पूर्वींच या संघाची स्थापना झालेली असून इंग्लंडमध्यें आल्यावर इंग्लंडला या संघांत सामील करून घेण्याला त्याला फारसे प्रयास पडले नाहींत. शिवाय आतां फ्रान्सच्या बादशहानें **जेम्स**ला उघडपणें मदत केल्यामुळें तंट्याला आयतेंच निमित्त सांपडलें. आणि इ. स. १६८९ च्या मे महिन्यांत इंग्लंडनें फ्रान्सबरोबर युद्ध जाहीर केलें.

१२ इंग्लंडमधील कट—परंतु याच सुमारास इंग्लंडमध्यें **वुइल्यम**विरुद्ध कट होण्याला सुरवात झाली होती, आणि या कटांत सामान्य माणसेंच नव्हत तर अगदीं मुख्य मुख्य सेनापति व राज्यांतील मोठमोठ्या अधिकारावरची कित्येक मंडळीही सामील झाली होती. या कटवाल्यांचा फ्रान्समध्यें **जेम्स**बरोबर पत्रव्यवहार सुरू असे, व त्यामुळें **वुइल्यम**चे सगळे बेत **फ्रा**न्सच्या बादशहाला समजत असत.

१३ इ. स. १६९०—इ. स. १६९० मध्यें इंग्लंडचें व हॉलंडचें आरमार एकत्र होऊन त्यांची फ्रान्सच्या आरमाराशीं झटापट झाली. परंतु त्यांत इंग्लंडचा पराभव होऊन इंग्लंड व फ्रान्स यांच्यामधल्या इंग्लिश खाडीवर फ्रेंचांचा अंमल सुरू झाला. पुढल्या वर्षी **वुइल्यम** बरेंच सैन्य घेऊन **फ्रान्स**मध्यें गेला. परंतु याही वर्षी सैन्याच्या इकडून तिकडे येरझाऱ्या होण्यापलीकडे महत्त्वाची कांहीं गोष्ट घडून आली नाहीं. इंग्लंडच्या सेनापतींपैकीं एक प्रमुख सेनापति **मार्लबरो** (Marl-borongh) व इंग्लंड व **हॉलंड** या उभय राष्ट्रांच्या आरमाराचा मुख्य **रसेल** (Russel) हे दोघेही आंतून **जेम्स**ला अनुकूल होते व त्यांचा **जेम्स**शीं गुप्त पत्र-व्यवहार चाललेला होता. **जेम्स**नें या ' विश्वासघातक्यांच्या ' (treacherous) शब्दावर भिस्त ठेवून आतां फ्रान्सच्या बादशहाजवळ मदतीबद्दल मागणें केलें. आणि पूर्वी **आयर्लंड**मधून **फ्रान्स**मध्यें निघून आलेले **पोप**वादी **आयरिश** लोक आणि दहा हजार फ्रेंच लोक यांचें लष्कर फ्रेंचांच्या आरमारी गलबतांतून इंग्लंडच्या किनाऱ्यावर जाऊन उतरण्याला तयार झालें.

१४ अविश्वासाचें वातावरण—परंतु इतक्यांत इंग्लंडमध्यें **मार्लबरो**चें कपट उघडकीस आलें. जिकडे तिकडे **वुइल्यम**विरुद्ध झालेल्या कटाच्या अफवा पसरूं लागल्या. **वुइल्यम** फ्रान्समध्यें असल्या मुदतींत राज्यकारभाराचें काम **मेरी** राणी पहात असे. ती या कटाच्या बातम्या ऐकून भयचकित झाली. कोणता अंमलदार केव्हां फितुरी करील याचा नेम नाहींसा होऊन कोणावरच विश्वास ठेवण्याची सोय उरली नाहीं. परंतु तिकडे **जेम्स**चें वर्तनही इंग्लंडमध्यें त्याच्या मित्रांनीं त्याच्या तर्फे जी कामगिरी चालविली होती, त्या कामगिरीवर विरजण पडण्यासारखेंच दिसून येऊं लागलें.

१५ वुइल्यमविषयींचें लोकमत—**वुइल्यम** राजा हा कांहीं झालें तरी ' परकी ' असें कित्येक हाडाच्या इंग्रजांना मनापासून वाटत असल्यामुळें राज्य-क्रांतीच्या धामधुमींत **जेम्स**च्या दुर्वर्तनाला व जुलमाला कंटाळलेल्या या लोकांनीं त्याला जरी एक वेळ राजा म्हणून कबूल केला होता, तरी पुढें पुढें त्याचेंही वर्तन त्यांना पसंत पडेना. आपल्या मूळच्या देशांतील म्हणजे **हॉलंड**धील मित्रांवर त्याची स्वाभाविकपणेंच मेहरनजर असल्यामुळें इंग्रजांना वैषम्य वाटण्याला तेंही एक कारण होतें. शिवाय तो जात्या थंड व घुम्या असल्यामुळें इंग्रजांच्या उत्साहाला त्याच्याकडून उत्तेजन मिळत नसे. या सर्व कारणांमुळें त्याची पहिली लोक-

प्रियता आतां नाहींशी होत चालली होती. परंतु जेम्सनें आतां इंग्रजांच्या वुइल्यम विषयींच्या अप्रियतेचा फायदा घेण्याची संधि आली असतां आपल्या मूर्खपणामुळें तीही हातची घालविली.

१६ जेम्सचा मूर्खपणा—वुइल्यमविरुद्ध असलेल्या कटवाल्यांत जसे रोमन कॅथोलिक होते तसे कांहीं सुधारकही होते. परंतु या सुधारकांना आपल्या बाजूकडे पूर्णपणें वळवून घेण्याचें एकीकडेच ठेवून जेम्स त्यांना पूर्वींप्रमाणेंच कमी लेखीत असे. सुधारकानें जेम्सकरतां कितीही खटपट केली, तरी रोमन कॅथोलिक कटवाल्यांच्या मानानें त्याची जेम्सकडून योग्य ती संभावना कधींच केली जात नसे. मित्र म्हणून समजला जाणारा सुधारक मरण पावला, तर त्याचें प्रेतही कुत्र्यामांजराच्या प्रेताप्रमाणें रात्रीच्या वेळीं एकाद्या शेतांत नेऊन पुरण्यांत येत असे. पण अशा प्रकारच्या कृत्यांनीं जेम्सबद्दलची लोकांची पुन्हां उत्तेजित झालेली भक्तीही हळूहळू कमी होत चालली.

१७ इ. स. १६९२ चा जाहिरनामा—इ. स. १६९२ च्या मे महिन्यांत जेम्सनें एक जाहिरनामा काढला. त्यांत त्यानें आपली मागची एकही चूक कबूल केली नाहीं किंवा पुढें चांगल्या रीतीनें राज्य करण्याबद्दल एक अवाक्षरही लिहिलें नाहीं. या जाहिरनाम्यानें आतां त्याच्या मित्रांनाही आपण कोठले या फंदांत पडलों असें झालें, आणि हळूहळू त्याच्याविषयींची सहानुभूति नष्ट होऊं लागली.

१८ फ्रान्सबरोबरचें आरमारी युद्ध—याच सुमारास इंग्लंड व हॉलंडचें मिळून ९९ गलबतांचें आरमार फ्रान्समधून इंग्लंडवर होणाऱ्या स्वारीला अडथळा करण्यासाठीं ‘ ला होग ’ (La Hogue) नांवाच्या बंदराकडे निघालें. फ्रेंच आरमाराधिपति ‘ टोरव्हिल (Torvil) याला इंग्रजांच्या अलीकडील मनःस्थितीची कल्पना नव्हती. इंग्लंड–हॉलंडच्या संयुक्त आरमाराचा अधिपति रसेल (Russel) हा पूर्वींप्रमाणेंच जेम्सला आंतून अनुकूल असेल अशी त्याची कल्पना होती. परंतु वर सांगितल्याप्रमाणें जेम्सच्या अविचारीपणामुळें त्याच्या नवीन मित्रांपैकीं जे पुनः वुइल्यमच्या बाजूला जाऊन मिळाले होते त्यांतच रसेल हाही होता. रसेलनें आतां आपल्या आरमारांतील प्रत्येक जहाजावर जाऊन खलाशांना सांगितलें कीं, “बाबांनो ! तुम्हीं आपल्या कर्तव्याला जागा. तुमचे वरचे अधिकारी फितुरी करण्याचा उपदेश करतील तर त्यांना जलसमाधि द्या आणि मला पहिल्यानें उचलून समुद्रांत टाका ! ” ही सर्व हकीकत टोरव्हिलला माहीत नव्हती. त्यानें आपलें ४४ जहाजांचें

आरमार घेऊन इंग्रजांच्या आरमाराशीं टक्कर देण्याचा बहाणा केला. परंतु त्याला लवकरच आपली चूक कळून आली. रसेलचें आरमार 'टोरव्हिल 'ला सामील होण्याचें एकीकडेच राहून 'ला होग ' च्या लढाईत फ्रेंच आरमाराचा पुरा पराभव झाला. या पराभवानें इंग्लंडवर फ्रान्सची स्वारी होण्याची भीति नाहींशी झाली, व इंग्लिश खाडी(English Channel)वर पूर्ववत इंग्लंडचें स्वामित्व स्थापन झालें.

१९ रिसविकचा तह—जमिनीवर मात्र मार्लबरोच्या विश्वासघातामुळें इंग्लंडला जय मिळाले नाहींत. दोन तीन वर्षेपर्यंत उभय राष्ट्रांच्या एकमेकांशीं लढाया चालू होत्या. शेवटीं इ. स. १६९७ मध्यें दोन्ही पक्ष टेंकीस येऊन **रिसविक** (Ryswick) येथें तह करण्यांत आला. या तहानें फ्रान्सच्या बादशहानें **वुइल्यम** हा ग्रेट ब्रिटन व आयर्लंडचा राजा आहे हें कबूल केलें (acknowledged William as the King of Great Britain and Ireland) व **वुइल्यम**विरुद्ध कोणत्याही कटांत सामील न होण्याचें वचन दिलें. ही तहाची बातमी ऐकून जेम्सवादी मंडळीला फार वाईट वाटलें. पण इंग्लंडमधील बहुजनसमाजाला आतां या लढायांचा व कटांचा वीट आला असल्यामुळें त्यांनीं मोठ्या आनंदानें या तहाचें स्वागत केलें.

२० मेरीचा मृत्यु—इ. स. १६९४ च्या डिसेंबरच्या २८ व्या तारखेस **मेरी** राणी देवीच्या आजारानें मरण पावली. तिच्या मरणानें **जेम्स**वादी मंडळीला आणखीं एकदां प्रयत्न करून पाहण्याची ईर्षा उत्पन्न होऊन तिच्या नवऱ्याला म्हणजे **वुइल्यम**ला ठार करण्याचे कट होऊं लागले. अर्थांतच **जेम्स** हा फ्रान्समधून या कट-वाल्यांना शक्य ती मदत करीतच असे. इकडे इंग्लंडमध्यें कांहीं निवडक मंडळींनीं **वुइल्यम**चा खून करावा व त्याच सुमारास बाहेरून सैन्य आणून दुसऱ्या इसमांनीं बंडाचा पुकारा करावा अशी मसलत ठरली.

२१ बेरिक आणि बारक्ले—बेरिक (Berick) नांवाच्या एका सरदाराकडे बंड उभारण्याची कामगिरी सोंपविली होती. आणि **बारक्ले** (Barclay) नांवाच्या सरदारानें **वुइल्यम**चा खून करण्याचें काम पत्करलें होतें. **बारक्ले**नें थोडेसे इंग्लंडांतले आणि थोडेसे फ्रान्समधले मिळून चाळीस गळेकापू इसम (Cut-throats) जमा केले, आणि इ. स. १६९६ च्या फेब्रुवारी महिन्यांत एक दिवस निश्चित करून त्या दिवशीं राजा शिकारीहून परत येतांना वाटेंत त्याच्यावर हल्ला

करून आपलें काम उरकावें असें ठरविलें. तिकडे **फ्रान्स**मध्यें **कॅले** शहरीं सैन्याची जमवाजमव चालली होती. **वुइल्यम** मेल्याचें समजल्याबरोबर हें सैन्य ताबडतोब खाडी उतरून इंग्लंडमध्यें यावयाचें होतें. पण ईश्वरी सूत्र तसें नव्हतें.

२२ राजनिष्ठ-समिति—या कटवाल्या मंडळीपैकींच कांहींनीं ही बातमी बाहेर फोडली. **पार्लमेंट**मध्यें आणि इतरत्रही खून आणि स्वारी हे शब्द प्रत्येकाच्या कर्णरंध्रांत शिरून अंतःकरण उचंबळून सोडूं लागले. **पार्लमेंट**मधील बऱ्याच सभासदांनीं 'राजनिष्ठसमिति' (Loyal Association) या नांवाची एक मंडळी स्थापन केली. आणि **वुइल्यम**च्या प्राणांचे रक्षण करणें आणि त्याच्यामागून गादीचा वारसा (Succession) पूर्वीं कायद्यानें ठरवून टाकल्याप्रमाणें चालू ठेवणें हे दोन उद्देश या मंडळीनें आपल्यापुढें ठेविले. कटवाल्यांना शोधून काढून त्यांची लांडग्यांप्रमाणें शिकार करण्यांत येऊं लागली. मुख्य मुख्य पुढाऱ्यांना चौकशी करून सुळावर चढविण्यांत आलें. **बारक्**े मात्र फ्रान्समध्यें पळून गेल्यामुळें सुटला. **फेनविक** (Fenwick) नांवाच्या कटवाल्यानें तुरुंगांत असतांना **मार्लबरो**, **रसेल** वगैरे राज्यांतील श्रेष्ठ अधिकाऱ्यांचीं नांवें सांगून त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्याचेंही कबूल केलें. परंतु तो आज एक उद्यां एक असें सांगत असल्यामुळें त्याच्या बोलण्यांत धरबंध नाहीं असें पाहून, त्यानें त्यांचीं नांवें आकसानें घेतलीं असतील असें वाटून **मार्लबरो** वगैरे मंडळींवर काम चालविण्याचें तहकूब करण्यांत आलें, आणि **फेनविक**ला मात्र इ. स. १६९७ च्या जानेवारीच्या २८ व्या तारखेस फांसावर चढविण्यांत आलें. अशा रीतीनें **वुइल्यम**च्या विरुद्ध केलेला प्रत्येक कट उघडकीस येऊन **जेम्स**वादी मंडळीचे सर्व डाव फुकट गेले आणि मागें सांगितल्याप्रमाणें **रिसविक**च्या तहानें इंग्लंडचें व फ्रान्सचें तात्पुरतें तरी सख्य घडून आल्यामुळें, यापुढें **जेम्स**वादी मंडळीला स्वस्थ बसून जें जें होईल तें तें मुकाट्यानें पाहत राहण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं.

२३ राष्ट्रीय कर्ज—**फ्रान्स**शीं बरेच दिवस युद्ध चालू असल्यामुळें इंग्लंडच्या खजिन्यांत तूट पडूं लागली, तेव्हां कर्ज काढून रक्कम उभारावी व असल्या लढायांचा खरा फायदा पुढल्या पिढ्यांनाच मिळावयाचा असल्यामुळें त्यांनींच या कर्जाचा बराचसा बोजा उचलणें वाजवी आहे असें ठरवून हें कर्ज '**राष्ट्रीय कर्ज**' (National Debt) असें समजण्यांत यावें असें ठरलें होतें. या कर्जाची रक्कम या सुमारास दीड पावणेदोन कोटि पौंडांच्या घराला गेली होती; तेव्हां **पार्लमेंट**च्या **लोक**सभेनें आतां खर्चांत काटकसर करण्यासाठीं खड्या सैन्याला रजा देण्याचें ठरविलें; आणि दहा

हजार सैन्य असलें म्हणजे पुरे, यापेक्षां ज्यास्त सैन्य कायमचें बाळगण्याची जरूरी नाहीं असा ठराव पार्लमेंटमध्यें पास झाला. हा ठराव **वुइल्यम**ला पसंत नव्हता. कारण **फ्रान्स**बरोबर झालेला तह फार दिवस टिकणार नाहीं हें त्याला माहीत होतें. परंतु लोकसभेपुढें त्याचें कांहीं चालेना. इ. स. १६९८ मध्यें तर नव्या **पार्लमेंट**नें खड्या सैन्याची संख्या सात हजारांवर आणून ठेवली, आणि हें सैन्य सुद्धां आपल्याच देशांतल्या लोकांचें असावें, परक्या देशांतील लोक सैन्यांत नोकरीस ठेवूं नयेत, असा ठराव केला. या ठरावामुळें तर **वुइल्यम**ला फारच वाईट वाटलें. कारण त्याच्या मूळच्या देशांतून म्हणजे **हॉलंड**मधून त्यानें जे आपले विश्वासू सैनिक आपले संरक्षक म्हणून आणले होते, त्यांना आतां परत लावून देणें भाग पडलें.

२४ स्पेन आणि फ्रान्स—परंतु इंग्लंड अशा रीतीनें आपलें सैन्यबल कमी करीत असतां तिकडे **फ्रान्स**मध्यें **स्पेन** आणि **फ्रान्स** हे दोन्ही देश एका राजाच्या अंमलाखालीं आणण्याचे प्रयत्न चालले होते. **स्पेन**चा बादशहा चार्लस (Charles II) हा वृद्ध झाला असून त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. त्याच्या जवळच्या वारसांत फ्रान्सच्या बादशहाचा मुलगा (Louis, the Dauphin) हा एक होता. **ऑस्ट्रिया**च्या (Austria) बादशहाचा मुलगा (Arch Duke Charles) आणि **बव्हेरिया**च्या (Bavaria) संस्थानिकाचा मुलगा (Joseph Ferdinand) असे आणखीं दोघे असेच जवळचे वारस होते. **वुइल्यम**ला फ्रान्स आणि स्पेन हे दोन देश एकाच्या हातांत जाणें इष्ट नव्हतें. तेव्हां स्पेनचा बादशहा मेल्यावर त्याच्या मुलुखाची वांटणी या तिघां भावी वारसांमध्यें कशा रीतीनें व्हावी याबद्दल **वुइल्यम**नें गुप्त रीतीनें तिघांशींही वाटाघाट करून इ. स. १६९८ च्या आक्टोबर महिन्यांत एक वांटपपत्र (a partition treaty) तयार केलें. या वांटपपत्राप्रमाणें स्पेनच्या **चार्लस** राजाच्या मरणानंतर स्पेनची गादी **बव्हेरिया**च्या राजपुत्राला मिळावी व **स्पेन**च्या ताब्यांतील इतर मुलूख **फ्रान्स**च्या व **ऑस्ट्रिया**च्या राजपुत्रांनीं वांटून घ्यावा असें ठरलें होतें.

२५ स्पेनच्या बादशहाचें मृत्युपत्र—परंतु पुढें इ. स. १७०० मध्यें **बव्हेरिया**चा राजपुत्र मरण पावला. तेव्हां अर्थातच हें वांटप रद्द झाल्यामुळें त्या सालच्या उन्हाळ्यांत पुनः नवीन वांटपपत्र करण्यांत आलें. या नवीन वांटपपत्राप्रमाणें **बव्हेरिया**च्या राजपुत्राला पूर्वी दिलेली वांटणी म्हणजे **स्पेन**ची गादी **ऑस्ट्रिया**च्या राजपुत्रानें घ्यावी आणि **स्पेन**च्या ताब्यांतील इतर मुलूख फ्रान्सच्या

राजपुत्रानें घ्यावा असें ठरलें. पण हा वांटणीचा तह (Second Partition Treaty) खुद्द स्पेनच्या राजाला माहीत नव्हता. फ्रान्सच्या बादशहानें पुढें जेव्हां त्याला ही हकीगत कळविली, तेव्हां आपल्याला मुलुखाची वांटणी आपल्या न कळत तिऱ्हाइतांनीं केलेली पाहून त्याला राग आला, आणि त्यानें एक मृत्युपत्र (a will) करून स्पेन व त्याच्या ताब्यांतील इतर सर्व मुलुख फ्रान्सच्या राजपुत्राच्या मुलाला (Philip of Anjou, the second son of the Dauphin) म्हणजे फ्रान्सचा त्या वेळचा बादशहा लुई (Louis XIV) याच्या नातवाला देऊन टाकला.

२६ स्नेहसंधि—ही गोष्ट लुईच्या फायद्याचीच असल्यामुळें पुढें स्पेनचा बादशहा वारल्यावर त्यानें मागचा गुप्त तह (The Secret treaty) बाजूला ठेवून आपल्या नातवाला स्पेनची गादी मिळवून देण्याचाच प्रयत्न चालविला. ही गोष्ट अर्थातच ऑस्ट्रियाच्या राजपुत्राला न खपून त्यानें युद्धाची तयारी केली. परंतु इंग्लंडच्या पार्लमेंटनें आपण होऊन आपलें लष्करी सामर्थ्य या वेळीं कमी करून घेतलेलें असल्यामुळें इंग्लंडला या वेळीं फ्रान्सच्या महत्त्वाकांक्षेविषयीं मनांत जळफळत राहण्यापलीकडे कांहीं एक करतां येईना. तथापि त्यांतल्या त्यांत वुइल्यमनें हॉलंड व ऑस्ट्रिया या देशांशीं तह करून (The Grand Alliance) इंग्लंड, हॉलंड, व ऑस्ट्रिया यांनीं एक होऊन खुद्द स्पेनच्या राज्याव्यतिरिक्त स्पेनच्या ताब्यांतील इतर मुलूख तरी फ्रान्सच्या ताब्यांत न जाऊं देण्याविषयीं एकजुटीनें प्रयत्न करावा असें ठरविलें.

२७ जेम्सचा आजार—याच सुमारास जेम्स फ्रान्समध्यें अत्यवस्थ आजारी होता. एके दिवशीं लुई बादशहा त्याच्या खोलींत गेला आणि त्याला म्हणाला, "परमेश्वराच्या इच्छेनें आपण जरी आमच्यामधून निघून गेलां तरी मी तुमच्याशीं आतांपर्यंत ज्या रीतीनें वागलों, त्याच रीतीनें तुमच्या मुलाशींही वागेन आणि तुमचा मुलगा इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या देशांचा राजा आहे या गोष्टीला मान्यता देईन." फ्रान्सच्या बादशहानें जेम्सला असल्या तऱ्हेचें वचन देणें ही गोष्ट मागें उभय राष्ट्रांमध्यें झालेल्या तहाच्या विरुद्ध होती. त्यामुळें लुईचे हे उद्गार इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाले तेव्हां इंग्लिश लोक खवळून गेले. आणि इ. स. १७०१ च्या अखेरीस भरलेल्या पार्लमेंटसभेनें राजाला आपलें लष्कर व आरमार वाढविण्याबद्दल ताबडतोब मंजुरी दिली.*

* The new Parliament at once voted the king 40,000 soldiers and the same number of sailors—R. H.

२८ वारसाचा नवा कायदा—दरम्यान इंग्लंडच्या गादीचा वारसा ठरविणारा आणखी एक कायदा (Act of Settlement) करण्यांत आला. **वुइल्यम**च्या मागून त्याची मेहुणी ॲन (Anne) इनें गादीवर यावें असें पूर्वीच्या कायद्यानें ठरविलें होतेंच. या ॲनचीं सर्व मुलें एकामागून एक मरण पावल्यामुळें तिच्या पश्चात् गादी कोणाकडे जावी हें या नवीन कायद्यानें ठरवून टाकण्यांत आलें. पहिल्या **चार्लस** राजाची इलिझाबेथ म्हणून एक मुलगी होती. तिची मुलगी '**सोफिया**' (Princess Sophia) ही हॅनोव्हरच्या (Hanover) राजपुत्राला दिलेली होती. हॅनोव्हरचा राजपुत्र प्रॉटेस्टंट पंथाचा असल्यामुळें व इंग्लंडच्या गादीवर रोमन कॅथोलिक पंथाचा राजा अथवा राणी बसवावयाची नाहीं असा पार्लमेंटचा कृतसंकल्प असल्यामुळें ॲनच्या मागून इंग्लंडचें राजपद **सोफिया** व तिचीं मुलें यांना द्यावें असें आतां या नवीन कायद्यानें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें असल्या तऱ्हेच्या प्रत्येक कायद्यांतून प्रजेच्या स्वातंत्र्याचीं शक्य तितकीं कलमें घालून ठेवण्याच्या पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें याही वेळीं राजसत्तेवर निर्बंध घालणारीं बरींच कलमें या कायद्यांत समाविष्ट करण्यांत आलीं. इंग्लंडांतील न्यायाधिशांची नेमणूक तहाहयात (For life) असावी, पण पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं (Both Houses) तसा ठराव केल्यास त्यांना काढून टाकतां यावें; त्याचप्रमाणें एकाद्या गुन्हेगाराला माफी देण्याचा अधिकार राजाला असला (Pardon under the Great Seal) तरी त्यानें लोकसभेच्या चौकशी करविण्याच्या अधिकाराला (impeachment) बाध येऊं नये; हीं 'सार्वजनिक न्याया'चें (Public Justice) संरक्षण करणारीं दोन कलमें, आणि सरकारी नोकरांना (persons in the pay of the Crown) लोकसभेंत बसण्याचा मज्जाव असावा; आणि इंग्लंडच्या तक्ताधिपतीनें पार्लमेंटच्या संमतीशिवाय ग्रेट ब्रिटनच्या किंवा आयर्लंडच्या बाहेर पाऊल टाकूं नये, हीं राजाचे व त्याच्या नोकरांचें हातपाय बांधून टाकणारीं दोन कलमें या वेळच्या या कायद्यांत नवीन घालण्यांत आलीं होतीं. पैकीं शेवटचीं दोन पुढें रद्द करण्यांत आलीं. असो.

२९ वुइल्यमचा मृत्यु—**वुइल्यम** राजा आतां नाना तऱ्हेच्या काळज्यांनीं आणि दगदगीनें अगदीं त्रासून गेला होता. त्याला अलीकडे बरींच वर्षें दम्याचा विकारही जडला होता. एक दिवस घोड्यावरून फिरावयास गेला असतां एका ठिकाणीं घोड्याला ठेंच लागून तो खालीं पडला, त्यांत त्याच्या गळ्याकडच्या हाडाला दुखापत

झाली. तें निमित्त होऊन पुढें सुमारें पंधरा दिवसांनीं इ. स. १७०२ च्या मार्चच्या ८ व्या तारखेस त्याचा अंत झाला. त्या वेळीं त्याचें वय ५२ वर्षांचें होतें.

३० वुइल्यमच्या अंगचे गुण—वुइल्यम स्वरूपानें साधारण देखणा असून अंगानें सडपातळ होता. त्याला फारसें बोलावयाला नको होतें.* लढाईच्या वेळीं त्याला अत्यंत आवेश चढत असे. सेनापती व मुत्सद्दी या नात्यानें त्याला इतिहासांत बरेंच वरचें स्थान देतात. त्याची नीतिमत्ताही नांव ठेवण्यासारखी नव्हती. नेमस्तपणा, सत्यवादित्व व प्रामाणिकपणा हे त्याच्या अंगचे विशेष गुण होत.

३१ पार्लमेंटच्या सत्तेची वाढ—वुइल्यम इंग्लंडच्या गादीवर आला होता तोच मुळीं **पार्लमेंटच्या** कृपेनें. त्यामुळें त्याच्या कारकिर्दींत **पार्लमेंटचे** हक्क बरेच वाढले व तितक्या मानानें प्रजेच्या स्वातंत्र्यांत भर पडली. वुइल्यम गादीवर आला त्याच वर्षाच्या अखेरीस प्रजेच्या हक्कांचा एक कायदा (The Bill of Rights) पास करण्यांत आला. या कायद्यानें इंग्लंडमधील राजाचें राजपद हें पार्लमेंटच्या इच्छेवर अवलंबून आहे हें मुख्य तत्त्व तर मान्य करण्यांत आलेंच, पण याशिवाय इंग्लंडचें जमिनीवरील सैन्य, दर्यावरील आरमार, आणि इंग्लंडचीं न्याय-कोर्टें, यांच्यावरही **पार्लमेंटचा** दाब रहावयाचा असें ठरून पार्लमेंट ही राष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ सत्ता (Supreme in the state) आहे असें ठरविण्यांत आलें.

३२ इ. स. १६९४ मध्यें पार्लमेंटची निवडणूक दर तीन वर्षांनीं करावी (Bill for Triennial Parliament) असा कायदा पास झाला. इ. स. १६९६ मध्यें राजद्रोहाच्या गुन्ह्यासंबंधानें (Trial for Treason) एक कायदा होऊन राजद्रोही म्हणून न्यायाधिशासमोर आलेल्या इसमाला वकिलाची मदत घेण्याची मोकळीक असावी, त्याच्यावरील आरोपांची यादी त्याला देण्यांत यावी, आणि फिर्यादीला तीन वर्षांची मुदत असावी असें ठरविण्यांत आलें. पूर्वीं सरकारी परवान्याशिवाय कोणताही मजकूर छापूं न

* वुइल्यमच्या घुम्या स्वभावाविषयीं एकानें म्हटलें आहे कीं, "He thought as much as his wife talked, and as his wife's sister, the Princess Anne ate." म्हणजे वुइल्यमची बायको मेरी जितकी बडबडी, आणि तिची बहीण ॲन जितकी खादाड होती, तितकाच हा मुखस्तंभ पण विचारांत गढून जाणारा होता !

देण्याविषयीं एक कायदा झालेला होता. हा कायदा दरसाल पार्लमेंटमध्यें पास करून घ्यावा लागत असे. इ. स. १६९५ मध्यें हा कायदा पास करण्याविषयीं पार्लमेंट-मध्यें ठराव आला, तेव्हां तो पास करण्याचें पार्लमेंटनें नाकारलें. त्यामुळें हा कायदा आपोआपच नष्टप्राय झाला (expired), आणि छापखान्याचें स्वातंत्र्य (Freedom of the Press) स्थापन झालें.

३३ इंग्लंडची बँक—फ्रान्सबरोबर चाललेल्या युद्धामुळें तिजोरींत पैशाची तूट पडली, तेव्हां कांहीं व्यापाऱ्यांनीं दरसाल दरशेंकडा ८ व्याजानें बारा लाख पौंड सरकारला व्याजीं देण्याची योजना पुढें आणली. या व्यापाऱ्यांत पॅटरसन (Paterson) या नांवाचा एक स्कॉच व्यापारी प्रमुख होता. पार्लमेंटमध्यें या योजनेविषयीं बरीच भवति न भवति झाली; आणि अखेर ही योजना मंजूर होऊन इ. स. १६९५ मध्यें इंग्लंडच्या बँकेची (Bank of England) स्थापना झाली. पुढल्या वर्षी हॉलंड (Holland) नांवाच्या एका इंग्रजानें स्कॉटलंडच्या बँकेची (Bank of Scotland) स्थापना केली. त्याचप्रमाणें नाण्यांऐवजीं नोटाही याच सुमारास प्रचारांत आल्या.

३४ संयुक्त प्रधानमंडळ—वुइल्यमच्या कारकिर्दींत राज्यकारभार चाल-विण्याच्या बाबतींतही एक महत्त्वाची सुधारणा करण्यांत आली. पूर्वी प्रत्यक्ष राज्यकार-भाराचें काम चालविण्यासाठीं राजा प्रधान नेमीत असे. हे प्रधान राजाला जबाबदार (responsible to the king) असून त्याच्या मर्जीस वाटेल, तेव्हां (at will) तो त्यांना काढून टाकूं शकत असे. सरदार संडरलंड (The Earl of Sunder-land) प्रधान असतांना त्यानें पार्लमेंटमध्यें ज्या पक्षाचें बहुमत असेल, त्या पक्षांतील मंडळींतून प्रधान निवडून काढून प्रत्येक खात्याचा प्रधान त्या त्या खात्यापुरता जबाबदार असें न समजतां सगळ्या राज्यकारभाराचें धोरण या सर्व प्रधानांच्या संम-तीनें ठरावें अशी योजना तयार करून या संयुक्त प्रधानमंडळाकडून (The ministry) राज्यकारभार चालविण्याची पद्धति पाडली. या योजनेनें पार्लमेंटचा राज्यकारभारावर प्रत्यक्ष ताबा (direct control) चालूं लागला, आणि पार्ल-मेंटमध्यें ज्या पक्षाचें प्राबल्य असेल त्याच्या हातीं राज्यसूत्रें असावयाचीं (Party Government) असा प्रघात पडला, तो आजपर्यंत चालू राहिला आहे. *

* प्रिव्हि कौन्सिल (Privy Council) म्हणून राजाचें जें एक सर्वसाधारण सल्लागारमंडळ असे, त्या मंडळाचा आणि या प्रधान मंडळाचा कांहीं संबंध नसून

३५ स्कॉट लोकांची वसाहत—इ. स. १६९५ मध्यें इंग्लंडच्या बँकेचा संस्थापक पॅटर्सन यानें 'वेस्ट इंडीज बेटें' (West Indies) व आफ्रिका खंड (Africa) यांशीं व्यापार करण्यासाठीं एक स्कॉटिश कंपनी (Scottish Company) स्थापन केली. या कंपनीनें इ. स. १६९८ मध्यें 'डारियन'च्या संयोग-भूमीवर (The Isthmus of Darien) एक वसाहत स्थापन करून हिंदुस्थान आणि अमेरिका या दोन्ही खंडांशीं व्यापार करण्याची तयारी केली. पण त्या वेळीं भरभराटींत असलेल्या इंग्लंडच्या 'ईस्ट इंडिया कंपनी'ला हें आपल्या हक्कांवर अतिक्रमण (infringement of their right) होत आहे असें वाटलें, आणि त्यांनीं कित्येक डच व्यापाऱ्यांशीं संगनमत करून **वुइल्यमचें** मन या नव्या कंपनीविषयीं कलुषित करून टाकलें. पुढें 'डारियन'मधील ही स्कॉट वसाहत साफ बुडाली; तेथल्या लोकांचे अत्यंत हाल झाले; आणि शेवटीं स्पॅनिश लोकांनीं तेथल्या जमिनीवरही आपली मालकी सांगून आणि तेथल्या उरल्यासुरल्या लोकांवर हल्ले चढवून त्यांची 'दे माय धरणी ठाय' अशी स्थिति करून सोडली ! ‡

हे प्रधान स्वतंत्र रीतीनें एका बाजूला बसून आपल्या योजना तयार करीत आणि त्यानंतर पार्लमेंट सभेपुढें मांडीत. आज 'कॅबिनेट कौन्सिल' (Cabinet Council) म्हणून प्रधानांची जी खासगी सभा भरते, तिचा उगम (Origin) या जुन्या चालींत असून तसेंच पाहूं गेलें असतां, इंग्लंडच्या लिखित घटनेमध्यें (Constitution) या पद्धतीला आधार मिळावयाचा नाहीं.

‡ वास्तविक इंग्लिश आणि स्कॉट यांनीं निदान बाहेर देशीं तरी एकमेकांना पाण्यांत पहावयास नको होतें. पण त्या वेळीं ई. इं. कंपनीच्या व्यापाऱ्यांना मत्सर आणि द्रव्य-लोभ यांनीं इतकें पछाडलें होतें कीं, त्यांना आपल्या या साहसी बंधूंच्या हालांचें कांहींच वाटलें नाहीं. आणि 'डारियन'च्या आसपासच्या इंग्रज वसाहतवाल्यांनींही त्यांना या वेळीं कांहींच मदत केली नाहीं. (Jealousy and greed for gold made the merchants of the East India Company oppose the Scheme......the result was that the Colony was ruined, and all the money lost, whilst the colonists themselves were left to starve without the slightest assistance from the neighbouring English colonies.–Gense)

२६ आणखीं कांहीं गोष्टी—या कारकिर्दीतील आणखीं विशेष सांगण्यासारख्या गोष्टी म्हणजे ' बेयोन' (Bayonne) येथें निघालेली संगिनीची युक्ति, ' सेव्हरी ' (Savary) नें वाफेच्या यंत्राच्या सहाय्यानें पाणी वर चढविण्याचा लाविलेला शोध, आणि इ. स. १६९६ मध्यें सरकारनें जुनीं झिजलेलीं नाणीं काढून टाकून नवीं नाणीं पाडलीं या होत. हिंदुस्तानांत ईस्ट इंडिया कंपनीनें वुइल्यमच्या नांवानें बांधलेला व आतां ' कलकत्त्यां ' त नामांतर झालेला ' फोर्ट वुइल्यम ' हा किल्ला, व ख्रिस्ती धर्माचें ज्ञान इतर देशांतून पसरविण्यासाठीं इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या निरनिराळ्या मंडळ्या याही या कालांतील लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत. रशियाचा बादशहा पीटर (Peter) हा वेषांतर करून इंग्लंडमध्यें एका गोदींत एकाद्या सामान्य मजुराप्रमाणें काम शिकण्यासाठीं येऊन राहिला होता, तो वुइल्यमच्याच कारकिर्दींत होय.

प्रकरण ५५ वें.

लोकसत्तेची वाढ.

(इ. स. १७०२—इ. स. १७१४)

[१ अॅनला गादी मिळाली–मार्लबरोचें प्राबल्य–मिसेस मार्लबरो. २ पक्ष व पक्षांतर–व्हिग व टोरी. ३।४ युरोपांतील युद्ध–जिब्रॉल्टर. ५ स्कॉटलंडमधील असंतोष. ६।७ इंग्रज व्यापाऱ्यांची पोटदुखी–इ. स. १७०४. ८।९ नवा तहनामा. १० नवें निशाण. ११।१२ मार्लबरोचें पक्षांतर–अतिपरिचयादवज्ञा. १३ मिस हिल–हार्ले–वॉलपोल. १४ डॉ. सॅचिव्हेरेल—त्याच्यावरील खटला. १५ चौकशी व शिक्षा. १६ टोरींचें प्राबल्य. १७ नवे सरदार. १८ सरदारसभा व लोकसभा यांमधील तेढ–हार्लेची युक्ति–नवा पायंडा. १९ यूट्रेटचा तह–स्टुअर्ट वंशाशीं सहानुभूति. २० टोरी प्रधानमंडळांतील भांडण–अॅनचा मृत्यु. २१ अॅन च्या अंगचे गुणावगुण. २२ सेंट पॉलचें मंदिर. २३ व्हिग पक्षाचें प्राबल्य–नवें घराणें.]

१ अॅनला गादी मिळाली—वुइल्यम मरण पावल्यावर पूर्वी ठरल्याप्रमाणें अॅनला गादी मिळाली. गादीवर येण्यापूर्वी दोन वर्षें तिचें डेन्मार्क (Denmark)चा

राजपुत्र जॉर्ज (George) याच्याबरोबर लग्न झालें होतें. परंतु तो जात्या अशक्त व मेशा असल्यामुळें इंग्रज प्रजेवर त्याचें वजन बेताबाताचेंच असे. वुइल्यमच्या कारकिर्दीच्या अखेरीअखेरीला प्रसिद्ध सरदार **मार्लबरो** (Marlborough) याच्या विश्वासघातकी वर्तनामुळें त्याला दरबार बंद झाला होता. या **मार्लबरोची** बायको (Mrs. Marlborough) मोठी धूर्त व कावेबाज असून तिचें **ॲन**शीं फार सख्य होतें. त्यामुळें आतां **मार्लबरोचें** प्राबल्य पुनः वाढून सर्व दरबारचीं सूत्रें या बाईच्या तंत्रानें चालूं लागलीं. पुढें पुढें तर **ॲनची** व **मार्लबरोबाईची** इतकी दाट गट्टी जमली होती कीं, परस्परांबरोबर बोलतांना त्या 'अहो जाहो' अशी भाषा न वापरतां एकमेकांना तूं मी म्हणून संबोधूं लागल्या होत्या असें सांगतात.*

२ पक्ष व पक्षांतर—पार्लमेंट सभेमध्यें या सुमारास कायमचे दोन पक्ष झाले होते. दोन्ही पक्षांतील मंडळी कधीं राजपक्षाकडे, तर कधीं प्रजापक्षाकडे अशी झोंके घेतांना दिसे. त्याचप्रमाणें आजचे एका पक्षाचे समजले जाणारे लोक कांहीं वर्षांनीं दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्यांत गणले जात. शिवाय कांहीं लोक खासगी द्वेषबुद्धीमुळें तर कांहीं लांचलुचपतीमुळें वारंवार पक्षांतर करतांना आढळत. तसेंच प्रत्येक पक्षांत जहाल-मवाळ, नेमस्त, गरम, नरम असे पोटभेदही असत. तथापि सामान्यपणें राजपक्ष व प्रजापक्ष अगर त्या वेळच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास 'व्हिग्' व 'टोरी' या दोन सामान्य नांवांनीं पार्लमेंटमधील सभासदांची वर्गवारी करण्याची चाल पडत चालली होती. ज्या पक्षाचें पार्लमेंटमध्यें संख्याधिक्य असेल, त्या पक्षांतील पुढारी मंडळीला राजाच्या सल्ला, मसलतगारांचा मान मिळून त्यांच्याच तंत्रानें कारभार कळण्याची पद्धति **वुइल्यमच्या** कारकिर्दींतच सुरू झाली होती हें मागें सांगितलेंच आहे. असो.

३ युरोपांतील युद्ध—**ॲन** राणी गादीवर आली त्या वेळीं **पार्लमेंटमध्यें** 'व्हिग' पक्षाचें बहुमत होतें. तथापि **ॲनचा** ओढा 'टोरी' पक्षाकडे विशेष असल्यामुळें तिनें **मार्लबरोच्या** सल्ल्यानें **टोरी** पक्षांतूनच आपले प्रधान निवडले. मात्र **वुइल्यमच्या** कारकिर्दींत 'व्हिग' पक्षाकडून **स्पेनच्या** गादीच्या वारस–हक्कासंबंधानें जें धोरण अंमलांत आणण्याचें ठरलें होतें त्यांत तिनें बदल केला नाहीं. त्यामुळें

* In their familiar intercourse, ceremony and titles were laid aside. The Queen was Mrs. Morley; the Countess was Mrs. Freeman.

फ्रान्सविरुद्ध हॉलंड व ऑस्ट्रिया या देशांशीं सख्य करून वुइल्यमनें जो मित्रसंघ (The Grand Alliance) बनविला होता, तो कायम राहून युरोप खंडांतील या झगड्यांत इंग्लंडच्या वांट्यास आलेलें काम इंग्लंडकडून योग्य रीतीनें बजावण्यांत आलें. हॉलंडच्या व इंग्लंडच्या सैन्याचा मार्लबरो मुख्य सेनापति झाला. आणि त्यानें आपल्या समरकौशल्यानें त्या वेळच्या सेनापतींमध्यें अग्रस्थान मिळविलें.*

४ इ. स.१७०२ मध्यें युरोपखंडांतील या युद्धाला सुरवात झाली आणि अकरा वर्षेपर्यंत एकसारखी रणधुमाळी चालून शेवटीं इ. स. १७१३मध्यें युट्रेटच्या (Utrecht) तहानें या युद्धाची परिसमाप्ति झाली. या युद्धांत इ. स. १७०४ मध्यें स्पेनच्या दक्षिणेकडील जिब्रॉल्टर (Gibraltar) हें महत्त्वाचें ठाणें इंग्रजांच्या हातीं आलें होतें, तें कायमचें इंग्लंडकडे रहावें असें या तहांत ठरलें. बाकी ज्या कारणासाठीं हें युद्ध उपस्थित झालें होतें, तें कारण म्हणजे फ्रान्सच्या बादशहाच्या नातवाकडे स्पेनची गादी जावी कीं नाहीं हा मुद्दा तसाच अनिर्णीत राहिला. मात्र स्पेन व फ्रान्स हे देश एकाच राजाच्या अंमलाखालीं केव्हांही असूं नयेत आणि फ्रान्सच्या बादशहानें म्हणजे लुईनें इंग्लंडच्या माजी जेम्स राजाच्या तोतया मुलाचा (the Pretender) पक्ष सोडून देऊन ॲन ही इंग्लंडची राणी म्हणून मान्यता द्यावी असें ठरलें. असो.

---

* या मार्लबरोची अशी गोष्ट सांगतात कीं, ऐन लढाईच्या प्रसंगीं, तिकडे तोफांचा धडाका सुरू आहे, सैनिकांचे हल्ले आणि प्रतिहल्ले चालू आहेत, अशा वेळीं एकीकडे लढाईच्या हालचालीचे हुकूम सोडीत असतां, दुसरीकडे तो आपल्या सरकारकडे पाठवावयाचे अहवाल किंवा पत्नीला पाठवावयाचीं पत्रें लिहीत असे. इतकें त्याचें चित्त स्थिर असे. सुप्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार व्हाल्टेअर यानें त्याच्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, "He never fought a battle, which he did not win, and he never besieged a city which he did not capture" म्हणजे 'तो लढाईला गेला आणि पराभव पावून आला किंवा त्यानें एकाद्या शहराला वेढा घातला आणि तें पडलें नाहीं असें कधीं झालेंच नाहीं!' पण हा त्याचा लष्करी पराक्रम एका बाजूला ठेवला, तर त्याच्या अंगीं जे इतर दुर्गुण होते त्यांना मात्र सीमा नव्हती असें म्हणतात. (There are few vices to which Marlborough may not plead guilty, and it was rightly said of him that his wife, his position, and his pocket were the only three things he cared for.–Gense).

५ स्कॉटलंडमधील असंतोष—तिकडे ही युद्धाची धामधूम चालू असतां इकडे स्कॉटलंडमध्यें लोकांचीं मनें कांहीं कारणानें अत्यंत असंतुष्ट झालीं होतीं. स्कॉटलंडचा राजा जेम्स हा तिकडून इंग्लंडच्या गादीवर येऊन बसल्यामुळें दोन्ही देशांतील राजघराण्यांचा तंटा मिटला खरा; पण अजून स्कॉच लोकांचें इंग्रज लोकांशीं बेमालूम सख्य झालें नव्हतें. राजा व त्याचा दरबार इंग्लंडमध्यें असल्यामुळें आपल्या देशाला एक प्रकारचा कमीपणा आल्यासारखें स्कॉच लोकांना वाटत असे.

६ इंग्रज व्यापाऱ्यांची पोटदुखी—स्कॉच लोक जात्या इंग्रजांपेक्षांही कांकणभर ज्यास्त स्वतंत्र्यप्रिय व धाडसी असून अपमान सहन करणारे नव्हते. वुइल्यमच्या कारकिर्दींत स्कॉटलंडच्या पार्लमेंटच्या संमतीनें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याच्या हेतूनें अमेरिकेंतील डारियन (Darien) या नांवाच्या एका ठिकाणीं स्कॉच लोकांची वसाहत स्थापण्यासाठीं नऊ लाख पौंड भांडवलाची एक कंपनी उभारण्यांत आली होती. पण या कंपनीचा बेत तडीला गेल्यास आपल्या व्यापाराला धक्का बसेल, असें इंग्लंडमधील ईस्ट इंडिया कंपनीला वाटल्यामुळें तिच्या पुरस्कर्त्यांनीं वुइल्यमला गळ घालून या स्कॉच कंपनीला नाना तऱ्हेचे अडथळे आणले आणि त्यामुळें शेवटीं स्कॉच लोकांची ही योजना फुकट जाऊन त्यांचे पैसे पाण्यांत गेले ही हकीगत मागें सांगितलीच आहे. ही जी आपल्या देशाची हानि झाली, ती इंग्रज व्यापाऱ्यांच्या आपलपोटेपणामुळें झाली असें वाटून, स्कॉच लोकांच्या मनांत या वेळीं इंग्लंडविषयीं कायमची अढी बसली होती.

७ शिवाय अलीकडे इंग्लंडच्या राजपदाविषयीं व इतर बाबतींतही इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें जे कायदे पास होत, ते स्कॉटिश पार्लमेंटला न विचारतांच अंमलांत येत असल्यामुळें दोन्ही देशांची नांवाला एकी झाली खरी; पण इंग्लिश लोकांचें आपल्याशीं वर्तन ' तुझें तें माझें आणि माझें तें माझें आहेच ' अशा प्रकारचें होतें अशी स्कॉच लोकांची तक्रार सुरू होती. या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, इ. स. १७०४ मध्यें स्कॉटलंडच्या पार्लमेंटनें ' इंग्रजांनीं स्कॉटिश लोकांना आपल्याप्रमाणेंच व्यापाराचे व वसाहतींचे हक्क दिल्याशिवाय ॲन राणीच्या पश्चात् इंग्लिश पार्लमेंटनें पसंत केलेल्या राजाला स्कॉटलंडची गादी द्यावयाची नाहीं.' असा ठराव (Act of Security) पास केला. नुसता ठराव पास केला इतकेंच नव्हे, तर या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठीं स्कॉटलंडमधील वयांत आलेल्या सर्व पुरुषांना लष्करी कवाईत शिकविण्याचा बेतही मुक्रर करण्यांत आला.

८ **नवा तहनामा**—ही बातमी इंग्लंडमध्यें पसरली, तेव्हां दोन्ही देशांत पुनः युद्ध उपस्थित होतें कीं काय अशी सर्वांना धास्ती वाटूं लागली. पण अखेरीस दोन्ही देशांतील शहाणे लोक एकत्र होऊन त्यांनीं प्रत्येक देशातर्फे तीस तीस कमिशनर (Commissioners) नेमले; या साठ असामींनीं दोन्ही देशांची पूर्ण एकी व्हावी म्हणून एक तहनामा (Treaty of Union) तयार केला; आणि स्कॉटिश पार्लमेंटमध्यें (Scottish Parliament) बऱ्याच सभासदांना लांच देऊन (by lavish bribery) ११० विरुद्ध ६९ मतांनीं हा तहनामा पास करून घेण्यांत आला. इ. स. १७०७ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेपासून या तहनाम्याप्रमाणें दोन्ही देशांतील कारभार चालूं लागला.

९ या तहनाम्यांतील मुख्य अटी खालीलप्रमाणें होत्याः—

(१) **अॅन** राणीच्या मागून **हॅनोव्हरची सोफिया** (The Electress Sophia) व तिचे वंशज यांनीं—अर्थात् तीं **प्रॉटेस्टंट** धर्माचीं असतील तर—**इंग्लंड** व **स्कॉटलंड** या संयुक्त देशांचें राजपद भोगावें.

(२) इंग्लंडच्या बादशाही पार्लमेंटमध्यें (Imperial Parliament) स्कॉटलंडतर्फे सरदारसभेंत १६ व लोकसभेंत ४५ सभासद असावे.

(३) स्कॉच लोकांना इंग्रजांप्रमाणेंच व्यापाराचे व वसाहतीचे सर्व हक्क मिळावे.

(४) उभय राष्ट्रांच्या सार्वजनिक हितसंबंधाचे कायदे एकच असावे. पण खासगी मालमत्ता अगर व्यक्तींचे हक्क (Private rights) या बाबतींत अगर धर्मसंबंधीं बाबतींत **स्कॉच** लोकांना आपल्यापुरते कायदे करण्याची मोकळीक असावी.

१० **नवें निशाण**—याप्रमाणें कायदा होऊन दोन्ही देशांची पूर्ण एकी (The Union) करण्यांत आली. दोन्ही देशांची निशाणेंही एकत्र करून **ग्रेट ब्रिटनचें** नवीन राष्ट्रीय निशाण (The Union Jack) तयार करण्यांत आलें. पण अशा रीतीनें कायद्यानें एकी झाली, तरी **स्कॉच** लोकांचीं मनें मात्र अद्यापि शुद्ध झालीं नव्हतीं. तीं शुद्ध होण्याला पुढें दोन पिढ्या जाव्या लागल्या. असो.

११ **मार्लबरोचें पक्षांतर**—इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें 'व्हिग' व '**टोरी**' असे दोन पक्ष झालेले असून **अॅन** राणीचा ओढा 'टोरी' पक्षाकडे होता हें मागें सांगितलेंच आहे. आतां पार्लमेंटमध्यें कोणताही विषय चर्चेला निघाला, तरी त्यावर दोन पक्ष व्हावयाचे हें बहुधा ठरून गेल्यासारखेंच झालें होतें. कधीं धार्मिक बाबीं-

तील मतभेदावरून तर कधीं परराष्ट्रीय राजकारणावरून या पक्षांतील पुढाऱ्यांचे खटके उडत. 'व्हिग' धार्मिक बाबतींत परमतसहिष्णु असत. पण 'टोरीं'ना जुन्या धर्माचा विशेष अभिमान असून माजी चार्लस राजाच्या कारकिर्दीतील धर्मसंबंधीं कायदे पुनः जारीनें सुरू करावे असें वाटत असे.

१२ ॲन राणी गादीवर आल्यानंतर पार्लमेंटची जी निवडणूक झाली, तींत व्हिग पक्षाचा पराभव होऊन टोरी पक्ष पार्लमेंटमध्यें प्रबल झाला. पूर्वी व्हिगांच्या अमदानींत फ्रान्सबरोबर युद्ध सुरू झालेलें असल्यामुळें त्यांना लोकांवरील कर वाढवून पैशाची तूट भरून काढावी लागली होती. त्यामुळें व्हिग पक्षावर मतदार (voters) चिडले होते. आणि सरदार मार्लबरोसारखा खंदा वीर टोरींच्या बाजूला असल्यामुळें व्हिग मंडळीचें तेज फिकें पडूं लागलें होतें. तथापि पुढें पुढें टोरी-टोरींमध्येंच भांडणें सुरू झालीं. मार्लबरोला 'व्हिग' पक्षानें माजी राजाच्या कारकिर्दींत फ्रान्स-बरोबर सुरू केलेली लढाई तशीच पुढें चालवावयाची होती, तर इतर टोरी ही लढाई लवकर आटोपण्याविषयीं उत्सुक होते. त्यामुळें मार्लबरोलाही पुढें पुढें टोरींची बाजू सोडून व्हिग पक्षाला मिळावें लागलें. त्यानें कित्येक व्हिग पक्षीयांना प्रधानमंडळांत सामीलही करून घेतलें. पण यामुळें तिकडून ॲन राणीची मर्जी खप्पा होऊं लागली मार्लबरोची बायकोही 'अतिपरिचयादवज्ञा' या न्यायानें आतां ॲनच्या मर्जीतून उतरूं लागली होती.

१३ मिस हिल—याच सुमारास टोरी पक्षाकडून हिल (Miss Hill) या नांवाच्या एका बाईचा राजवाड्यांत प्रवेश करविण्यांत आला. या बाईनें आपल्या मोहक वक्तृत्वानें लवकरच ॲन राणीवर आपली छाप बसविली. आणि टोरी पक्षां-तील पुढारी हार्ले (Robert Harley) यानें आतां व्हिग मंडळीचें दरबारांतून उच्चाटन करण्याचें कारस्थान (intrigue) रचण्याला सुरवात केली. उलट पक्षीं हार्लेला प्रधानमंडळांतून कमी करा अशी व्हिग मंडळीनें ओरड चालविली. मार्लबरोला आतां व्हिग लोकांना नाखूष करणें शक्य नसल्यामुळें हार्लेला प्रधानमंडळांतून कमी करावा लागला. परंतु यामुळें ॲन राणीला वाईट वाटलें तें वाटलेंच आणि शिवाय हार्ले आतां पार्लमेंटच्या लोकसभे (House of Commons)मध्यें येऊन बसूं लागला, आणि त्यानें मार्लबरोविरुद्ध काहूर उसळून दिलें. यानंतर मार्लबरोनें वॉलपोल (Robert Walpole) नांवाच्या एका कुशाग्र बुद्धीच्या 'व्हिगा'ची प्रधान मंडळांत नेमणूक करून घेतली आणि व्हिग पक्षाच्याच मताप्रमाणें कारभार चालू झाला. पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं.

१४ **डॉ. सॅचिव्हरेल**—डॉ. सॅचिव्हरेल (Dr. Sacheverell) नांवाचा एक विद्वान् गृहस्थ टोरी मताचा होता. त्यानें एकदां आपल्या ' पुराणांत ' (sermon) इंग्लंडमध्यें झालेल्या राज्यक्रांतीची फार कडक भाषेंत निर्भर्त्सना केली. ' इंग्लंडच्या राष्ट्रीय धर्मानें मान्य केलेल्या आचारांप्रमाणें जे वागत नाहींत त्यांना कडक शिक्षा करावयाची ती न करतां हे व्हिग प्रधान त्यांना आचारस्वातंत्र्य देतात. त्यामुळें राष्ट्रीय धर्माला लवकरच धोका (imminent danger) पोंचल्यावांचून राहणार नाहीं; यासाठीं राष्ट्रीय धर्माचें संरक्षण करण्यासाठीं सर्व देशभक्तांनीं एक व्हावें,' अशी त्यानें श्रोत्यांना विनंति केली. पुढें या पुराणांतील भाषणाच्या प्रती छापून वांटण्यांत आल्या, तेव्हां व्हिग प्रधानांचें पित्त भडकलें, आणि मार्लबरो प्रतिकूल असतांही प्रधानमंडळानें सॅचिव्हरेलवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याची पार्लमेंटच्या सरदारसभेपुढें चौकशी करण्याचें ठरविलें.

१५ **चौकशी व शिक्षा**—टोरी पक्षानें सॅचिव्हरेलला सर्व प्रकारें मदत करून लोकमत त्याच्या बाजूचें बनविलें. तीन आठवडेपर्यंत ही चौकशी चालली होती. खुद्द ॲन राणी हा खटला ऐकण्यासाठीं सरदार सभेंत हजर राहत असे. हजारों लोक सॅचिव्हरेलला घराकडून सरदारसभेपर्यंत व पुन्हां सरदारसभेकडून घरीं पोंचविण्यासाठीं त्याच्या गाडीबरोबर असत. शहरांत जिकडे तिकडे धामधूम सुरू होऊन राष्ट्रीय धर्मविरोधकांच्या प्रार्थनेच्या जागा पाडून टाकण्यापर्यंत दंगेखोरांची मजल जाऊन पोंचली होती. तीन आठवड्यांनीं चौकशी संपून सॅचिव्हरेल दोषी आहे असा पंचांनीं बहुमतानें निकाल दिला. परंतु राजद्रोहासारख्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा देण्यांत आली, ती एवढीच कीं त्यानें तीन वर्षेपर्यंत कोठेंही पुराण सांगूं नये ! त्याच्या राजद्रोही ठरलेल्या पुराणाच्या प्रती जाळून टाकण्यांत आल्या. एवढ्या मोठ्या अपराधाबद्दल असल्या क्षुल्लक शिक्षेवर सुटणें म्हणजे आपला नैतिक विजयच (Triumph) झाल्यासारखा आहे, असें वाटून टोरी मंडळीला आनंद झाला आणि त्यांनीं जिकडे तिकडे रोषणाई करून आणि होळ्या पेटवून हा आनंद व्यक्तही केला.

१६ **टोरींचें प्राबल्य**—या खटल्याचा परिणाम असा झाला कीं, व्हिग लोकांचा राज्यांतील मान व महत्त्व कमी झालें, आणि ॲन राणीला टोरी मंडळीचा जोर किती आहे हें समजून येऊन तिनें आपल्या व्हिग प्रधानांना कामावरून दूर करून, त्यांच्या जागीं टोरी पक्षांतील प्रधानांची नेमणूक केली. फक्त मार्लबरोला

मात्र फ्रान्सशीं चाललेलें युद्ध अजून बंद झालेलें नसल्यामुळें व त्याच्याइतका कुशल सेनापति टोरी मंडळींत कोणी नसल्यामुळें त्याच्या जागेवर कायम ठेवण्यांत आलें. थोड्याच दिवसांनीं पार्लमेंटची नवी निवडणूक झाली. त्यांत टोरी पक्षाचेंच बहुमत झालें आणि त्यांनीं व्हिग मंडळीविरुद्ध विशेषतः राष्ट्रीय धर्माच्या बाबतींत कडक कायदे केले.

१७ नवे सरदार—या नव्या प्रधानमंडळाला स्पेनच्या गादीसंबंधानें फ्रान्स बरोबर चाललेलें युद्ध पुढें चालू ठेवावयाचें नव्हतें. म्हणून त्यांनीं मार्लबरोला समजूं न देतांच फ्रान्सच्या दरबाराशीं गुप्तपणें बोलणें चालणें सुरू केलें. मार्लबरोचें लोकसभेंतील वजन कमी झालें होतें, तरी सरदार सभेंत त्याचें वजन चांगलेंच होतें. त्याच्या मनांतून हा तह घडवून आणावयाचा नव्हता. सरदार सभा तह करण्याला संमति देईना. तेव्हां प्रधानमंडळानें एक नवीनच युक्ति काढून सरदारसभेंतही आपलें बहुमत करून घेतलें. त्यांनीं आपल्या पक्षाच्या बारा जणांना 'सरदारक्या' (Peerages) देऊन सरदारसभेंत बसण्याचा हक्क प्राप्त करून दिला, आणि त्यांच्या सहाय्यानें तहाची कलमें त्या सभेंत पास करून घेतलीं.

१८ सरदारसभा व लोकसभा यांमधील तेढ—या वेळच्या प्रधानमंडळाच्या या कृत्याला पार्लमेंटसभेच्या इतिहासांत बरेंच महत्त्व दिलेलें आहे. मागील राज्यक्रांतीनें इंग्लंडच्या राजावर पार्लमेंटचा दाब असावयाचा हें तत्त्व मान्य झालें होतें. परंतु पार्लमेंटच्या सरदारसभा व लोकसभा या दोन सभांपैकीं कोणाचें महत्त्व ज्यास्ती याचा निकाल या वेळेपर्यंत पूर्णपणें लागला नव्हता. या तहाच्या बाबतींत लोकसभेंत टोरी पक्षाचें बहुमत असून सरदार सभेंत विरुद्ध पक्षाची सरशी होती. तेव्हां या वेळीं लोकसभेचें म्हणणें खरें व्हावयाचें कीं लोकसभेचें मत कांहींही असलें तरी सरदार सभा सांगेल तें प्रधान मंडळानें ऐकावयाचें हा प्रश्न उपस्थित झाला. आणि या प्रश्नाचा निकाल हार्ले या प्रधान मुत्सद्यानें मोठ्या युक्तीनें वर सांगितल्याप्रमाणें पूर्ण सनदशीर रीतीनें (constitutionally) बारा नवीन सरदार निर्माण करून लोकसभतर्फे करून टाकला. लोकसभा सांगेल तें सरदार सभेनें मान्य न केल्यास नवीन सरदार निर्माण करून सरदारसभेवर मात करण्याची ही युक्ति पुढें इतकी परिणामकारक झाली कीं, लोकसभेंत बहुमत असलेल्या प्रधान मंडळानें नवीन सरदार निर्माण करण्याचा धाक घातल्याबरोबर सरदारसभा वठणीला येऊं लागली. व अशा रीतीनें सरदारसभेवर लोकसभेचा पगडा (Ascendency) बसून प्रधान मंडळांतील बहुतेक सभासद लोकसभेंतूनच निवडण्याची पद्धत चालू झाली. असो.

१९ यूट्रेटचा तह—वर सांगितल्याप्रमाणें **सरदारसभें**तही **मार्लबरो**चें कांहीं चालेना. त्याला आतां **टोरी** प्रधानांनीं घरीं बसावयास लावलें. त्याचा स्नेही **वॉल-पोल** यालाही **लोकसभें**तून हांकून लावण्यांत आलें. आणि इ. स. १७१३ च्या मार्चच्या ३१ व्या तारखेस **फ्रान्स**बरोबर चाललेलें युद्ध **युट्रेट**च्या (Utrecht) तहानें थांबविण्यांत आलें. **टोरी** पक्षाचा **व्हिग** पक्षावर पूर्ण जय झाल्यासारखा झाला. परंतु हा विजय फार दिवस टिकला नाहीं. **युट्रेट**च्या तहाचीं कलमें जेव्हां प्रसिद्ध झालीं, तेव्हां आजपर्यंत **मार्लबरो**नें तिकडे जी कीर्ति व जें यश मिळविलें होतें, त्या मानानें इंग्लंडला योग्य मोबदला मिळाला नाहीं (a poor return) असें लोक म्हणूं लागले. शिवाय नवीन प्रधान मंडळांतील प्रमुख मुत्सद्दी **हार्ले** व **बॉलिंगब्रोक** (Bolingbroke) यांचा माजी **स्टुअर्ट** राजघराण्यांतील अवशिष्ट मंडळींशीं ओढा असल्याचा जो बोभाटा होता, त्याला पुष्टि मिळण्यासारखा या दोघांही **टोरीं**चा **फ्रान्स**मधील जेम्सच्या मुलाबरोबरचा (the Pretender) गुप्त पत्रव्यवहार याच वेळीं उघडकीस आला.

२० टोरी प्रधान मंडळांतील भांडण—इ. स. १७१४ मध्यें **ॲन**च्या मागून जिला गादी द्यावयाचें ठरलें होतें, ती **सोफिया** (Princess Sophia) मरण पावली. तेव्हां तिचा मुलगा **जॉर्ज** (George) हा इंग्लंडच्या गादीचा भावी वारस ठरला. परंतु **बॉलिंगब्रोक**नें इतर कित्येक मंडळीच्या मदतीनें **ॲन**च्या मागून **जेम्स**च्या मुलाला गादी देण्याचें कारस्थान आरंभिलें. या कारस्थानाची बातमी हळू हळू बाहेर फुटली. तेव्हां **व्हिग** मंडळींनीं सावध राहून **बॉलिंगब्रोक**चें हें कारस्थान हाणून पाड-ण्याची तयारी चालविली. इतक्यांत कांहीं कारणावरून **हार्ले**चें व **बॉलिंगब्रोक**चें भांडण लागून **हार्ले**ला प्रधानमंडळांतून घालवून देण्यांत आलें. **टोरी** प्रधानांचें हें आपसां-तील भांडण, त्यांचा माजी **जेम्स** राजाच्या मंडळीकडे असलेला ओढा, आणि यूट्रे-टचा बिनफायद्याचा तह या सर्व गोष्टींचा परिणाम लोकमताचा वारा टोरी पक्षाविरुद्ध वाहूं लागण्यांत झाला. इतक्यांत **ॲन** राणी एकाएकीं आजारी पडली. तेव्हां दोन्ही पक्षांतील प्रमुख प्रमुख नेमस्त मंडळींनीं तिच्याकडून **श्रूसबेरी** (Shrewsbury) नामक **टोरी** पक्षाच्याच परंतु माजी **जेम्स** राजाच्या मुलाच्या विरुद्ध असलेल्या सरदाराकडे मुख्य राज्यसूत्रें सोंपवून घेतलीं. दुसऱ्याच दिवशीं म्हणजे इ. स. १७१४ च्या आगस्टच्या पहिल्या तारखेस **ॲन** राणीचें देहावसान झालें.

२१ ॲनच्या अंगचे गुणावगुण—ही राणी स्वभावानें प्रेमळ परंतु दुर्बळ आणि आळशी होती. तिची मुद्रा मोहक होती, परंतु दुसऱ्यावर छाप बसविणारा

राजसत्तेचा गंभीरपणा तिच्यावर दिसून येत नसे. तिचा नवरा जॉर्ज हा तिच्या पूर्वी सहा वर्षे मरण पावला होता. तिला एकंदर १९ मुलें झालीं. परंतु तीं सर्व लहानपणींच वारलीं. फक्त एक मुलगा ११ व्या वर्षांपर्यंत वांचला होता. पण पुढें तोही वारला.

२२ सेंट पॉलचें मंदिर—या ॲन राणीच्या कारकिर्दींत बऱ्याच वर्षांनीं इंग्लंड अंतस्थ बंडाळीपासून मुक्त राहिलें होतें. रेन (Wren) या नांवाचा एक मोठा शिल्पशास्त्रज्ञ हिच्या कारकिर्दींत होऊन गेला. प्रसिद्ध 'सेंट पॉल' (St. Paul) चें मंदिर ३७ वर्षें काम चालून, व दहा लाख पौंड खर्च होऊन, इ. स. १७०८ मध्यें याच्याहातून पुरें झालें. याशिवाय इंग्लंडमधील सुमारें ५० पेक्षां जास्त देवळें त्याच्या हातून बांधलीं गेलीं असतील. असो.

२३ व्हिग पक्षाचें प्राबल्य—मागें सांगितलेंच आहे कीं, बॉलिंगब्रोकनें माजी जेम्स राजाच्या मुलाला इंग्लंडमध्यें आणण्याची तयारी चालविली होती. परंतु ही तयारी पुरी होण्यापूर्वींच लोकमतांत बदल होऊन टोरी पक्षाचें वजन कमी झालें आणि पार्लमेंटच्या नवीन निवडणुकींत व्हिग पक्ष प्रबल झाला. ॲन राणी वारल्याबरोबर पूर्वीं ठरल्याप्रमाणें हॅनोव्हर (Hanover) घराण्यांतील सोफियाचा मुलगा जॉर्ज याच्या नांवानें द्वाही फिरविण्यांत आली. हा जॉर्ज (George) या वेळीं ५४ वर्षांच्या वयाचा असून त्याला इंग्रजी भाषाही धड बोलतां येत नव्हती. इंग्रज लोकांवर त्याचें प्रेमही बेताचेंच होतें. त्यामुळें तो नुसता नांवाचा राजा राहून सर्व कारभार प्रधानमंडळाच्या हातीं गेला आणि हळू हळू प्रधानमंडळच सर्वसत्ताधीश (all-powerful) झालें.

प्रकरण ५६ वें.

प्रगतीच्या मार्गावर !

(इ. स. १६०३-इ. स. १७१४)

[१ नव्या युगाचा विशेष. २ जेम्स राजाचें म्हणणें. ३ जेम्सचीं जुलमी कृत्यें. ४ कालिदासाचें वचन. ५।६ लोकांचें म्हणणें-प्रतिकाराच्या गोष्टी. ७ चार्लसच्या कारकिर्दींत-पिटिशन ऑफ राइट. ८ 'प्रजासत्ताक'ची अमदानी. ९ दुसऱ्या चार्लसची कारकीर्द-हेबीअस कॉरपस. १० धोरणी लुईची मदत-नवा मांत्रिक. ११ वुइल्यम

आणि बिल ऑफ राइट. १२ सनदशीर राज्यपद्धतीचें तत्त्व–आणखीं कांहीं कायदे. १३ अॅन राणी. १४ राजा कीं पार्लमेंट?–दोन्हीही. १५ अँग्लिकन पंथाचें वर्चस्व. १६।१७ व्यापार वाढविण्याची धडपड. १८।१९ अमेरिकेंतील वसाहती. २० पूर्वेकडील व्याप. २१ साम्राज्याचें बीज. २२ गृह आणि गृहोपस्कर. २३ लोकसंख्या, शहरें, वगैरे. २४ कॉफीगृहें. २५ स्त्रियांचें काम. २६ शिक्षक आणि भटभिक्षुक. २७ रस्ते. २८ मजूर. २९ नाण्यांची शुद्धि. ३०।३१ मिल्टन आणि त्याचीं काव्यें. ३२ बन्यनचा 'यात्रेकरू'. ३३ प्यूरिटनांचें शुद्धीकरण. ३४ छचोरपणाला ऊत. ३५ ग्रंथकर्तृत्व आणि राजकारण. ३६ वर्तमानपत्रें.]

राजकीय

१ नव्या युगाचा विशेषः—सोळाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडांत स्टुअर्ट राजवंशाची स्थापना होऊन नव्या शतकाबरोबरच एका नव्या युगाला (Period) सुरवात झाली. हें नवें युग इंग्लंडमध्यें राजा आणि प्रजा यांच्या भांडणामुळें फार गाजलें, आणि इंग्लिश लोक आज जें प्रजास्वातंत्र्य उपभोगीत आहेत, त्या स्वातंत्र्याला आधारभूत असे बरेचसे कायदे या कालांत पार्लमेंट सभेंत पास होऊन इंग्लंडच्या सनदशीर राज्यव्यवस्थेला लेखी कायद्यांचा आधार मिळूं लागला.

२ जेम्स राजाचें म्हणणें—स्टुअर्ट राजा पहिला जेम्स यानें 'ना विष्णुः पृथिवीपतिः' म्हणजे "राजपद ही परमेश्वरी इच्छेनें मिळालेली देणगी आहे, ती कोणा भलत्यालाच प्राप्त होत नाहीं, व परमेश्वराच्या इच्छेनुसार प्राप्त झालेल्या राजाच्या हक्कांत दुसऱ्या कोणीं ढवळाढवळ करणें परमेश्वराला खपणारही नाहीं, राजा हा परमेश्वराचा या मर्त्य लोकांतील प्रतिनिधी असल्यामुळें त्याच्या ताब्यांतील प्रजेनें तो करील ती पूर्वदिशा मानूनच आपले व्यवहार चालविले पाहिजेत" वगैरे तत्त्वांची उघडपणें घोषणा केली; आणि या तत्त्वाला पाठिंबा देण्यांतच ज्यांचा स्वार्थ साधणारा होता, अशा राजदरबारांतील त्याच्या स्नेह्यांनीं, आप्तेष्टांनीं आणि मर्जीतल्या इसमांनीं त्याची तळी उचलून धरून त्याच्याकडून प्रजापीडनाचे अनेक प्रकार करविले.

३ जेम्सचीं जुलुमी कृत्यें—जेम्स राजानें केलेल्या जुलुमाच्या कृत्यांत पुढील गोष्टींचा अंतर्भाव करतां येईलः—

(१) पार्लमेंटच्या संमतीशिवाय कर बसविणें आणि वाढविणें. (२) खुषीच्या सक्तीनें नजराणे व कर्ज घेणें. (३) न्यायाधिशांना आपल्या दाबाखालीं ठेवून त्यांच्या-

करून आपल्याला पाहिजे तसा खटल्याचा निकाल करून घेणें. (४) पदव्या, व मानमरातब विकून पैसे उकळणें. (५) पार्लमेंटला व लोकांना अप्रिय असे मंत्री नेमणें.

४ कालिदासाचें वचन—पण राजानें व त्याच्या स्वार्थी सल्लागारांनीं पुढें केलेलें हें 'ना विष्णुः पृथिवीपतिः'चें तत्त्व त्याच्या जुलमानें गांजलेल्या प्रजेला सदैव पटण्यासारखें नव्हतें. कालिदासानें रघुवंशांत वर्णिल्याप्रमाणें "प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि। स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः॥" हें वर्णन ज्या राजांना लागू पडेल, त्यांनाच फार झालें तर 'ना विष्णुः पृथिवीपतिः' असें म्हणतां येईल. पण जेम्ससारख्या एकाद्या 'पढतमूर्ख शिरोमणीनें' (The wisest fool in Christendom) हें तत्त्व पुढें करून प्रजेवर जुलूम करणें म्हणजे परमेश्वराची व त्याच्या आज्ञांची थट्टा करण्यासारखें आहे असें प्रजेंतील जाणत्या लोकांना वाटल्यास नवल नाहीं.

५ लोकांचें म्हणणें—पूर्वी टयूडर राजांच्या अमदानींत राजे अनियंत्रितपणेंच वागत होते हें खरें; पण त्यांच्या अंगीं दूरदर्शीपणा व शहाणपण तरी होतें. आपण व आपला देश हे एकरूप आहों, आपलें वैभव तें आपल्या देशाचें वैभव, आणि आपल्या देशाची मानहानि किंवा अधोगति ती आपली मानहानि व अधोगति असें मानण्याइतके ते देशाशीं समरस झालेले होते. पण जेम्सची स्थिति तशी नव्हती. शिवाय आतां व्यावहारिक ज्ञानाचा प्रसारही बराच झालेला असल्यामुळें लोकांना आपले हक्क काय आहेत हें कळूं लागलें होतें. 'राजा हा परमेश्वरी अंश असला तरी आपणही माणसेंच आहोंत, आपल्यालाही बरें वाईट समजण्याची अक्कल आहे, स्वाभिमान, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान यांचा मक्ता परमेश्वरानें केवळ राजालाच दिलेला आहे असें नाहीं, वगैरे विचार आतां बळावत चालले होते, आणि त्यामुळें राजाविषयींचा आदर कमी झाला होता. अर्थात जेम्सनें आपल्या 'ईश्वरदत्त' अधिकाराच्या गुर्मींत जेव्हां प्रजेला त्रासदायक अशीं वर निर्दिष्ट केलेलीं कृत्यें करण्याला सुरवात केली, तेव्हां प्रजेनें म्हणजे अर्थात त्यांच्या पार्लमेंटांतील प्रतिनिधींनीं त्या कृत्यांचा प्रतिकार पुढील गोष्टींनीं केलाः—

६ (१) आपल्या गाऱ्हाण्यांचा विचार झाल्याखेरीज राज्यकारभारासाठीं लागणाऱ्या पैशाची मंजुरी न देणें. (२) राजाच्या बेकायदेशीर गोष्टींचा उघड निषेध करणें. (३) आपल्याला अप्रिय अशा राजमंत्र्यावर खटला भरून त्याला दंड करणें. आणि (४) राजाच्या परराष्ट्रीय धोरणाला विरोध करून अडथळे आणणें.

७ चार्लसच्या कारकिर्दींत—जेम्सनंतर त्याचा मुलगा चार्लस हा गादीवर

आला. त्यानें आपल्या बापाचें धोरणच पुढें चालविलें, आणि पार्लमेंट सभेंत त्याच्या या धोरणावर हल्ला होऊन त्याला विरोध होऊं लागला, तेव्हां त्यानें पार्लमेंट सभाच तहकूब अगर बरखास्त करण्याचा सपाटा चालविला. त्याच्या पहिल्या ५ वर्षांच्या कारकिर्दींत ३ वेळां पार्लमेंट सभा बोलाविण्यांत आली, पण तिनें तिन्ही वेळां राजाच्या अरेरावीच्या मागण्या नाकबूल केल्या; आणि पुढें ११ वर्षांनंतर भरलेल्या ‘ लाँग ’ पार्लमेंटनें तर सभाबरखास्तीचा राजाचा हुकूमही अमान्य करण्याचें ठरविलें. पुढें राजा–प्रजांमधील हें भांडण विकोपास जाऊन पार्लमेंटच्या पुढाऱ्यांनीं लष्करच्या सहाय्यानें राजावरच देशद्रोहाचा आरोप ठेवून त्याची ‘ चौकशी ’ कशी केली आणि त्याला अखेर देहांत प्रायश्चित्त देऊन इंग्लंडमधून ‘ राजा ’ ही संस्थाच कांहीं काळ कशी नाहींशी करून टाकली हें मागें प्रकरण ४८ मध्यें येऊन गेलेंच आहे. या **चार्लस** राजाच्या कारकिर्दींत पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्यांत राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें ‘ पिटिशन ऑफ राइट ’ या महत्त्वाच्या कायद्याचा नामनिर्देश करणें अवश्य आहे.

८ प्रजासत्ताकची अमदानी—चार्लस राजाचा वध झाल्यानंतर इंग्लंडमध्यें ‘ प्रजासत्ताक ’ (The Commonwealth) राज्य सुरू झालें. पण तें नुसतें नांवाचेंच ‘ प्रजासत्ताक ’ होतें. खरी सत्ता **क्रॉमवेल** व त्याचें लष्कर यांच्याच हातीं होती. **क्रॉमवेलला** ही प्रजासत्ताक पद्धति दृढ पायावर उभारतां आली नाहीं म्हणा, कीं इंग्रज लोकांना शुद्ध प्रजासत्ताक राज्यपद्धति मानवली नाहीं म्हणा, कांहीं म्हटलें तरी या प्रजासत्ताकाच्या कारकिर्दींत अखेरी अखेरीला लोकांना राजा बरा पण हें ‘प्रजासत्ताक’ नको असें म्हणण्याची पाळी आली. मात्र या कालांत कांहीं वर्षें तरी राजा-वांचून राज्ययंत्र चालूं शकतें हें लोकांना कळून आल्यामुळें तक्ताधिपतीच्या ‘ ईश्वर-दत्त हक्का ’ ला जबरदस्त धक्का बसल्यासारखा झाला, आणि यापुढें राजाची ईश्वर-दत्त हक्कांची भाषा मागें पडली.

९ दुसऱ्या चार्लसची कारकीर्द—इ. स. १६४९ मध्यें स्थापन झालेलें हें ‘प्रजासत्ताक’ ऊर्फ ‘सामुदायिक सत्तामंडळ’ इ. स. १६६० मध्यें नष्ट झालें, आणि माजी **चार्लस** राजाचा मुलगा दुसरा **चार्लस** हा गादीवर आला. पण त्याला गादी मिळाली ती पार्लमेंटच्या पुढाऱ्यांच्या कृपेमुळें, त्यामुळें त्यानें **क्रॉमवेलच्या** शवाच्या विटंबनेसारखीं बापाच्या वधाचा सूड घेणारीं कित्येक कृत्यें केलीं, तरी पार्लमेंटनें केलेले कायदे अजिबात धाब्यावर बसविण्याचें धाडस त्याच्यानें करवलें नाहीं. तो फक्त वेळ-

प्रसंग आला कीं ते कायदे तहकूब करीत असे. त्याच्या कारकिर्दीत प्रजास्वातंत्र्याच्या वाढीला अत्यंत पोषक झालेला कायदा म्हणजे ' हेबिअस कॉरपस ' हा होय.

१० धोरणी लुईची मदत—दुसऱ्या चार्लसच्या मागून त्याचा भाऊ दुसरा जेम्स हा गादीवर आला. त्याला अनियंत्रित राजसत्तेच्या भुतानें पुनः पछाडलें. फ्रान्समध्यें राज्य करणारा महाधोरणी राजा चवदावा लुई हा पूर्वी चार्लसला आणि आतां जेम्सलाही पैशाची मदत करीत असे; त्यामुळें त्यांना पैशासाठीं सर्वस्वीं पार्लमेंटवर अवलंबून राहण्याचें कारण राहत नसे. जेम्स हा कट्टा रोमन कॅथोलिक होता. त्या पंथाच्या लोकांना धार्मिक सवलती देऊन इंग्लंडमध्यें त्या पंथाचें पुनरुज्जीवन करण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. पण पार्लमेंटनें त्याची ही मसलत साधूं दिली नाहीं. आणि त्याच्या अंगांत संचरलेलें अनियंत्रित राजसत्तेचें भूत जेव्हां फारच थैमान घालूं लागलें, तेव्हां प्रजापक्षीय पुढाऱ्यांनीं तें काढून टाकण्यासाठीं हॉलंडमधल्या वुइल्यम या प्रजासत्ता-पक्षपाती मांत्रिकाची योजना केली.

११ वुइल्यम आणि बिल ऑफ राइट—हा मांत्रिक इंग्लंडला आल्याबरोबर जेम्स फ्रान्समध्यें पळून गेला, आणि त्याच्याबरोबर इंग्लंडांतल्या अनियंत्रित राजसत्तेच्या भुतानेंही इंग्लिश चॅनेलमध्यें कायमची जलसमाधि घेतली. कारण त्याच्या मागून इंग्लंडची गादी वुइल्यमला देतांना पार्लमेंटनें एक स्वतंत्र ठराव (Bill of Right) करून पुढील गोष्टी या नव्या राजाकडून कबूल करून घेतल्या. (१) पार्लमेंटच्या संमतीखेरीज पूर्वीचे कायदे रद्द करण्याचा किंवा तहकूब करण्याचा राजाला अधिकार नाहीं. (२) राज्यकारभाराचे कामीं सल्ला घेण्यासाठीं आणि लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं पार्लमेंट सभेची बैठक वारंवार भरविणें हें राजाचें कर्तव्य आहे. (३) पार्लमेंटच्या सभासदांना भाषणस्वातंत्र्याचा हक्क आहे. (४) पार्लमेंटच्या संमतीखेरीज खडी फौज ठेवण्याचा किंवा लोकांवर कर बसविण्याचा राजाला अधिकार नाहीं. (५) आपलीं गाऱ्हाणीं अर्जेद्वारा राजास कळविण्याचा आणि आपल्याला योग्य वाटतील ते लोक पार्लमेंटमध्यें निवडून देण्याचा लोकांना हक्क आहे.

१२ सनदशीर राज्यपद्धतीचें तत्त्व—अशा रीतीनें वुइल्यमला इंग्लंडची गादी मिळाली, ती पार्लमेंटशीं करार करूनच मिळालेली असल्यामुळें पार्लमेंटचें महत्त्व या कालांत झपाट्यानें वाढत गेलें; आणि राजा हा ईश्वरी अंश असला तरी तो ज्या आपल्या ' हस्तकां'कडून राज्यकारभार चालवितो, ते हस्तक प्रजेला म्हणजे प्रजेनें

निवडून दिलेल्या प्रतिनिधींना मान्य असले पाहिजेत, हें जें सनदशीर राज्यपद्धतीचें प्रधान तत्त्व त्याचा अवलंब वुइल्यमनेंच प्रथम केल्यामुळें त्याचें नांव सनदशीर राज्यपद्धतीच्या इतिहासांत कायमचें समाविष्ट होऊन राहिलें. वुइल्यमच्या कारकिर्दींतील आणखी पुढील कायदे प्रजास्वातंत्र्याचे पोषक म्हणून नमूद करतां येतील. (१) इ. स. १६८९ मधला 'म्युटिनी' ॲक्ट, (२) इ. स. १६९४ मधला 'ट्रायनिअल' ॲक्ट, (३) इ. स. १६९७ मधला खडें सैन्य कमी करणारा ॲक्ट, (४) आणि इ. स. १७०१ मधला 'ॲक्ट ऑफ सेटलमेंट.'

१३ ॲन राणी—वुइल्यमच्या मागून ॲन राणी गादीवर आली. हिच्या कारकिर्दींत पार्लमेंटसभेंत ज्या राजकीय पक्षाचें बहुमत असेल, त्या पक्षाच्या मंडळीचेंच प्रधानमंडळ नेमून त्याच्या तंत्रानें राज्यकारभार हांकण्याचा प्रघात सर्रास चालू झाला, व इंग्लंडच्या सनदशीर राज्यघटनेला स्थिर स्वरूप प्राप्त झालें.

१४ राजा कीं पार्लमेंट? — अशा रीतीनें सतराव्या शतकाच्या अखेरीला व अठराव्या शतकाच्या प्रारंभीं राजाच्या ईश्वरदत्त हक्काचें तत्त्व आजिबात नाहींसें होऊन राजाचें राजपद व राजाचे अधिकार हे प्रजादत्त आहेत हें तत्त्व पूर्णपणें प्रस्थापित झाल्यासारखें झालें. सतराव्या शतकांतील पहिल्या म्हणजे इ. स. १६४९ मधल्या 'रक्त राज्यक्रांती'नें (Bloody Revolution) राजघराणें हादरल्यासारखें झालें तरी तिचें पर्यवसान अखेर राजशाहीपेक्षांही निष्ठुर अशा लष्करशाहींत झालें. दुसऱ्या म्हणजे इ. स. १६८८ मधल्या 'रक्तविहीन' (Bloodless Revolution) राज्यक्रांतीनें मात्र राजसत्ता खरीखुरी नियंत्रित होऊन सुप्रतिष्ठित राजसत्तेचे फायदे तेवढे राष्ट्राच्या पदरांत पडण्याची सोय झाली. आणि इंग्लंडच्या राज्यकारभारावर हुकमत कोणाची चालावयाची? राजाची कीं पार्लमेंटची? या प्रश्नाचें उत्तर एकट्या राजाची नव्हे, किंवा एकट्या पार्लमेंटचीही नव्हे, तर राजा व पार्लमेंट या दोघांचीही असें निश्चितपणें मिळालें.

धार्मिक.

१५ ॲँग्लिकन पंथाचें वर्चस्व—ट्यूडर कालाच्या शेवटीं इंग्लंडमध्यें धार्मिक बाबतींत सुधारक ऊर्फ प्रॉटेस्टंट पंथाचे पाय चांगले जमिनीला लागल्यासारखे झाले होते. इंग्लंडमध्यें स्थापन झालेला ॲँग्लिकन पंथ हा प्रॉटेस्टंट पंथाचाच एक पोटपंथ होता व स्कॉटलंडमधून आलेल्या जेम्स राजाला तो पसंत झाल्यामुळें

त्यानें त्याला उत्तेजन दिलें, इतकेंच नव्हे तर तो आपल्या मूळच्या देशांत म्हणजे स्कॉटलंडमध्यें स्थापन करावा असाही प्रयत्न केला. त्याच्यामागून आलेल्या **चार्लस** राजानेंही प्रथम हाच पंथ उचलून धरला होता. आणि तो स्कॉटलंडमध्यें बळजबरीनें स्थापन करण्याच्या पहिल्या चुकीमुळेंच ‘ कांद्याचा नायटा ’ होतो म्हणतात त्याप्रमाणें त्याच्या पहिल्या चुकीचें पर्यवसान त्याच्या राज्यत्यागांत व देहत्यागांत झालें. त्याच्या-मागून गादीवर आलेले त्याचे मुलगे **चार्लस व जेम्स** यांनीं इंग्लंडच्या प्रस्थापित धर्माला मागें सारून **रोमन कॅथोलिक** धर्माची तळी उचलून धरली, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. आणि पार्लमेंटनें अखेर इ. स. १७०१ मध्यें इंग्लंडचा तक्ताधिपति हा प्रॉटेस्टंट पंथाचाच असला पाहिजे, इतकेंच नव्हे तर त्याचा रोमन कॅथोलिक घराण्याशीं शरीरसंबंधही होतां कामा नये, असा कायदाच करून ठेवला. अशा रीतीनें इंग्लंडमध्यें नेहमीं प्रॉटेस्टंट पंथाचेंच वर्चस्व असावयाचें हें ठरून गेल्यासारखें झालें.

व्यापार व वसाहत.

१६ व्यापार वाढविण्याची धडपड—ट्यूडर कालाच्या शेवटीं इंग्लंडची ऐहिक भरभराट व्यापाराशिवाय होणें नाहीं ही गोष्ट लोकांच्या मनांत चांगली बिंबून गेली होती. त्यानंतरच्या **स्टुअर्ट** कालांत लोकांच्या व्यापारविषयक चळवळीला चोहों बाजूंनीं उत्तेजनच मिळत गेलें. या कालाच्या आरंभीं पूर्वेकडील हिंदुस्थान, जावा, सुमात्रा, वगैरे बेटांशीं चालणारा व्यापार बहुतेक डच लोकांच्या हातीं होता, व त्यांचीं गलबतें नव्या जुन्या जगांतील अनेक बंदरांचा माल युरोपांत नेऊन आपला देश समृद्ध करून सोडीत होतीं. आमूस्टरडॅम (Amasterdam) हें त्यांचें शहर म्हणजे तर जगांतील सर्व प्रकारच्या मालाची उतारपेठच बनली होती. इंग्लंडमधल्या मध्यम वर्गानें वणिग्वृत्ती स्वीकारून जगांतल्या व्यापारांत भाग घेण्याचें ठरविल्यावर त्यांना डच लोकांच्या या संपन्नतेचा अर्थातच हेवा वाटूं लागला, आणि त्यांचें नाविक सामर्थ्य वाढत गेलें तसतसे त्यांचे डच लोकांशीं वारंवार खटके उडूं लागले. इ. स. १६५२ ते १६५४ व इ. स. १६६५ ते १६६७ या कालांत इंग्लंडचें हॉलंडशीं चाललेलें युद्ध हें मुख्यत्वेंकरून डच लोकांनीं जगांतील व्यापारांत मिळविलेलें अग्रेसरत्व नाहींसें करण्यासाठींच चाललेलें होतें.

१७ या युद्धाप्रमाणेंच इ. स. १६६० मधील नौकानिर्बंधाचा कायदा, इ. स. १६६१ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेली नवी सनद, व त्या सनदेनें तिला तिच्या

नोकरींत नसलेल्या 'भुरट्या' व्यापाऱ्यांचें (interlopers) पारिपत्य करण्याचा दिलेला अधिकार, वगैरे गोष्टींनीं इंग्लंडनें आपलें अंतस्थ व्यापारी सामर्थ्य वाढविण्याचेही प्रयत्न केले, व या सर्वांचा परिणाम म्हणजे सतराव्या शतकाच्या अखेरीला जगांतील व्यापारी चढाओढींत डच लोक मागें पडून इंग्लंड हें युरोपांतील प्रमुख व्यापारी राष्ट्र बनलें.

१८ अमेरिकेंतील वसाहती—व्यापाराप्रमाणेंच वसाहतींच्या बाबतींतही इंग्लंडनें या कालांत बरीच प्रगती केली. त्या कालांतील वसाहतींचें मुख्य क्षेत्र म्हणजे अमेरिका ऊर्फ पातालखंड हेंच होतें. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत स्पेनच्या 'अजिंक्य आरमारा'चा पराभव झाल्यावर इंग्रजांना अमेरिकेंत जाऊन वसाहती करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. " सतराव्या शतकांत धर्मस्वातंत्र्य राखण्यासाठीं म्हणून म्हणा, अथवा किफायतशीर शेती करतां येईल म्हणून म्हणा, शेंकडों इंग्रज अमेरिकेंत गेले व त्यांनीं तिकडे वस्ती केली. इ. स. १६०७ मध्यें ' व्हर्जिनिया ' ही पहिली इंग्लिश वसाहत स्थापिली गेली. १६२०त आपलें धर्मस्वातंत्र्य राखण्यासाठीं प्रसिद्ध ' पिलग्रिम फादर्स ' अमेरिकेंत उतरले. पुढें १६२९ ते १६४० या दंडेलीच्या अकरा वर्षांत सुमारें वीस हजार प्यूरिटन अमेरिकेंत गेले * व त्यांनीं ' म्यासाच्युसेट्स् ' आदिकरून ' न्यू इंग्लंड ' वसाहतींची स्थापना केली. उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांच्या मध्यावर असलेलीं ' वेस्ट इंडीज ' बेटें अतिशय सुपीक असून त्या वेळच्या हमरस्त्यावर होतीं. त्यामुळें तीं व्यापण्यासाठीं युरोपियन राष्ट्रांची धडपड चाललेली असे. त्यांपैकीं ' बार्बाडोज ' हें बेट इंग्रजांनीं १६२४ त व्यापलें व ' जमैका ' हें बेट क्रॉमवेलच्या वेळीं जिंकून घेतलें. पुढें दुसऱ्या चार्लसच्या वेळीं अमेरिकेंत आणखीं वसाहती झाल्या. चार्लस शब्दाचें लॅटिन रूप कार्लस यावरून ' कॅरोलिना ' नांवाची वसाहत १६६३ त अस्तित्वांत आली. ' व्हर्जिनिआ ' व ' न्यू इंग्लंड ' यांजमधील मुलूख डचांच्या ताब्यांत होता, तो दुसऱ्या डच युद्धांत (१६६५-६७) इंग्रजांच्या ताब्यांत आला. मग त्यांत न्यूयॉर्क आदि करून मध्यवसाहती स्थापिल्या गेल्या........."

१९ " प्रथम या वसाहतवाल्यांना अमेरिकेंत आपलें आसन स्थिर करण्यासाठीं बरेच श्रम पडले. तथापि सर्व अडचणींतून ते पार पडले, व स्टुअर्ट कालाच्या शेवटीं अमेरिकेंत अॅलेगिनी पर्वत व अटलँटिक महासागर यांमध्यें लांब चिंचोळ्या

* याच्या पूर्वींचे हे आंकडे असे होतेः—इ. स. १६०७ मध्यें १००; इ. स. १६२० मध्यें १२०; आणि इ. स. १६२९ मध्यें १०००.

दक्षिणोत्तर पट्टीवर बारा इंग्लिश वसाहतींची अखंड रांग दिसूं लागली. पुढें १७३२ त ' जॉर्जिया ' ची भर पडून अमेरिकेंतील तेरा इंग्लिश वसाहती पूर्ण झाल्या. * ”

२० पूर्वेकडील व्याप—अमेरिकेंतील या वसाहतींप्रमाणेंच हिंदुस्थानांतही इंग्रजांचे व्यापारी पाय चांगले रुतले ते याच काळांत. इ. स. १६१२ मध्यें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर तापी नदीच्या कांठीं इंग्रजांची पहिली व्यापारी वखार स्थापन झाली. व तेथपासून पुढल्या १०० वर्षांत मुंबई, मद्रास, कलकत्ता, वगैरे ठिकाणीं प्रथम व्यापारी वखारी थाटून आणि मागाहून त्यांच्या संरक्षणासाठीं म्हणून तटबंदी करून त्यांनीं आपलीं ठाणीं मजबूत करून ठेवलीं. लवकरच ईस्ट इंडिया कंपनीनें या आपल्या ' केंद्रां ' तून कर्नाटक, महाराष्ट्र व बंगाल या प्रांतांत आपलें व्यापारी वर्चस्व चांगलेंच बसवून घेतलें. इ.स.१६९८मध्यें ईस्ट इंडिया कंपनीशीं स्पर्धा करण्यासाठीं एक नवीन कंपनी स्थापन झाली. पण या आत्मघातकी चढाओढींत दोघांचेंही नुकसान होईल ही गोष्ट वेळींच इंग्रज व्यापाऱ्यांच्या लक्षांत आल्यामुळें इ. स. १७०८ मध्यें मुख्य प्रधान गॉडॉल्फिन (Godolphin) याच्याच मध्यस्थीनें दोन्ही कंपन्यांचें एकीकरण होऊन ' युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी ' (United East India Company) या नांवानें त्यांचा व्यापार जोरानें सुरू झाला.

२१ साम्राज्याचें बीज—आज इंग्लंडचें सर्व जगावर जें अवाढव्य साम्राज्य पसरलेलें आहे त्याचा पायाही स्टुअर्ट कालांतच घातला गेला म्हणण्यास हरकत नाहीं. नव्या जगांत जाऊन नव्या वसाहती स्थापन करणें हा जसा साम्राज्यस्थापनेचा एक मार्ग, तसाच जुन्या जगांतलेंच लहान लहान देश अगर महत्त्वाचीं ठाणीं आपल्या अंकित करून घेणें हाही या साम्राज्यस्थापनेचा दुसरा मार्ग होता. सतराव्या शतकाच्या पूर्वी इंग्लंडची दृष्टि शेजारचा आयर्लंड देश पादाक्रांत करून आपल्या अंकित ठेवण्यापलीकडे फारशी गेलेली नव्हती. पण सतराव्या शतकांत त्यांना जगांत आपलें व्यापारी वर्चस्व स्थापण्यासाठीं स्पेन व हॉलंड यांशीं झगडावें लागलें, आणि त्या झगड्यांत जे प्रदेश त्यांच्या हातीं लागले, त्या प्रदेशांवर प्रथम स्वसंरक्षणाच्या, मागाहून व्यापाराच्या, व त्यानंतर हा व्यापार सुरळीत चालला पाहिजे म्हणून राजकीय सत्तेच्या रूपानें त्यांचा अंमल चालू झाला. इ. स. १७१३ च्या युट्रेक्टच्या तहानें युरोपांतील ' जिब्राल्टर ' व ' मिनोर्का ' आणि अमेरिका खंडांतील ' न्यूफाउंडलंड ' व ' नोवास्कोशिया ' हे प्रांत त्यांच्या हातीं आले. शिवाय इकडे आशिया खंडांतील हिंदुस्थान देशांतही त्यांचें बस्तान बसत चाललें होतेंच.

---

* मोडककृत ' इंग्लंडचा इतिहास '

सामाजिक आणि आर्थिक

२२ गृह आणि गृहोपस्कर--सोळाव्या शतकांतील लोकांच्या राहणीचें वर्णन करतांना "वरच्या वर्गाच्या घरांना तरी दगड-विटांचा उपयोग होऊं लागला होता" असें आम्हीं म्हटलें आहे. स्टुअर्ट कालांत या दिशेनें आणखीं बरीच प्रगति झाली. या कालांतील मध्यम वर्ग-ज्यांना 'कंट्रि जंटलमेन' (country gentlemen) म्हणजे शहराबाहेरचे सुखवस्तु गृहस्थ असें म्हणतात ते-आणि 'फार्मर' (Farmer) म्हणजे ज्यांचे वर्षाचें जमिनीचें उत्पन्न निदान साठ सत्तर पौंड तरी असे ते, अशांचें महत्त्व फार वाढलें, व त्यांच्या घरादारांची रचना त्या प्रमाणांत बरीच सुधारली. मात्र या वर्गांतले बहुतेक लोक त्या काळीं 'प्यूरिटन' बनलेले असल्यामुळें, डामडौल, छानछोकी, अगर कलाकुसरीचीं कामें यांच्याकडे त्यांचें विशेष लक्ष नसून शोभेपेक्षां उपयुक्ततेलाच ते ज्यास्त किंमत देत असत.

२३ लोकसंख्या, शहरें, वगैरे--स्टुअर्ट काळांत लोकांचें व्यापाराकडे लक्ष लागूं लागलें होतें, तरी शहरांच्या बाबतींत म्हणण्यासारखी सुधारणा मात्र अद्यापि झाली नव्हती. दुसरा चार्लस राजा मरण पावला तेव्हां लंडनची लोकसंख्या अवघी पांच लाख होती; टेम्स नदीवर एक मोडका तोडका पूल, घरांचे वरचे मजले खालच्या दुकानांवर पुढें आलेले, रस्त्यांत रात्रीच्या वेळीं उजेडाचें नांव नाहीं, चोरांचिलटांचीं नित्य भीति, आणि वात्रट लोक (dissipated young men) रात्रीच्या वेळीं रस्त्यांत भेटतील त्यांची टर उडविण्याला किंवा प्रसंगविशेषीं त्यांना लंबे करण्यालाही तयार, अशी त्या वेळीं लंडनची स्थिति होती. त्या वेळचें सर्वांत मोठें बंदर 'ब्रिस्टल्' हें होतें. तेथले लोक श्रीमान् असून आदरातिथ्यालाही चांगले होते. 'मॅन्चेस्टर'-जें आज कापडाच्या व्यापाराचें केंद्र (Centre) बनलेलें आहे.-त्याची त्या वेळची लोकसंख्या अवघी सहा हजार होती, आणि त्या सगळ्या शहरांत त्या वेळीं एकही छापखाना किंवा धमनी दिसण्यासारखी नव्हती. सध्यांचें लोकरीच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण 'लीड्स' (Leeds) हें त्या वेळीं सात हजार वस्तीचें शहर होतें. 'शेफील्ड' मध्यें दोन हजार लोक होते, आणि 'बार्मिंगहॅम'-(Birmingham)चें लोखंडी सामान एकदां आयर्लंडपर्यंत गेले, तेव्हां तेथल्या लोकांना मोठी धन्यता वाटली. 'लिव्हरपूल' (Liverpool) शहरांत त्या वेळीं

जेमतेम दोनशें खलाशी असतील नसतील; आणि सगळ्या इंग्लंडची लोकवस्ती झाली तरी त्या वेळीं पन्नास पंचावन्न लाखांपेक्षां ज्यास्त नव्हती.

२४ कॉफीगृहें (Coffee houses)—कॉफीगृहें व तेथें चालणारी चर्चा हें एक लंडन शहराचें वैशिष्ट्य आहे. हीं कॉफीगृहें प्रथम **क्रॉमवेलच्या** अमदानींत स्थापन झालीं. शहरांतल्या सर्व प्रकारच्या बातम्या आणि लोकनिंदा (scandals) ऐकायला मिळण्याचें खात्रीचें ठिकाण म्हणजे एखादें कॉफीगृह असा त्यांचा प्रथम लौकिक होता. इंग्रज लोकांत जरी जातिभेद नाहीं तरी धंद्यावरून उत्पन्न झालेले वर्गभेद होतेच. त्यामुळें प्रत्येक वर्गाचा बसण्याचा अड्डा स्वतंत्रच असे. भपकेबाज पोषाखाचे श्रीमंत व सुखवस्तु गृहस्थ एका अड्ड्यावर; विद्वान लोक (Literary men) दुसऱ्या अड्ड्यावर; रोमन कॅथोलिक मंडळी तिसऱ्याच ठिकाणीं; प्यूरिटन एका बाजूला; 'प्रस्थापित धर्मवादी' दुसऱ्या बाजूला; असे निरनिराळ्या लोकांचे गप्पासप्पा मारण्याचे निरनिराळे अड्डे असत.

२५ स्त्रियांचें काम—स्टुअर्ट कालांत बायकांचें मुख्य काम घरचा स्वयंपाक करणें (meals of the household) हेंच असे. संध्याकाळीं फुरसतीच्या वेळीं सूत काढणें किंवा शिवणें टिपणें हीं कामें त्या करीत. दगडी कोळसा हें चुलींतलें मुख्य 'इंधन' असे. जवळपास रान असलें म्हणजे तेथले लोक लांकडाचाही सरपणाकडे उपयोग करीत.

२६ शिक्षक आणि भटभिक्षुक—समाजांतील 'पांढरपेशा' वर्गाचा विचार करतां या कालांत 'धर्मगुरू'ला फारच थोडा मान असलेला दिसून येतो. गांवचा पाद्री म्हणजे एक 'दर्भ्या' भटासारखा कोनाकोंपऱ्यांतला माणूस असें समजलें जाई (stood low in the social scale). मोठमोठ्या सरदारांच्या वाड्यांतून एक 'चॅप्लेन' (Chaplain) नांवाचा 'भिक्षुक' असे. त्याला जेवायला घालून वर्षाचे दहा पौंड देत, आणि त्याचा दर्जा घरच्या एकाद्या वरच्या दर्जाच्या नोकराइतपत मानीत. त्याची बायको घरच्या स्वयंपाकाला उपयोगी पडे, आणि मुलगे नांगर धरायला आणि मुली वाढासवरायला उपयोगी पडत ! तथापि लंडनसारख्या शहरांतील कित्येक 'भिक्षुक' विद्या आणि वक्तृत्व यांत नांव घेण्यासारखेही असत. शिक्षक लोक विद्यार्थ्यांना शिकवितांना 'छडी वाजे छमछम, विद्या येई घम घम' हा मंत्र तोंडानें म्हणून चाबकाचा यथेच्छ उपयोग करीत ! धन्यांनीं आपल्या चाकरानोकरांना बडवून काढणें यांत कोणाला कांहींच गैर वाटत नसे.

२७ रस्ते—त्या वेळचे शहरांतले काय किंवा बाहेरचे काय सगळीकडचे रस्ते खराबच होते. त्यामुळें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं प्रवास करणें त्रासाचें होतें. मध्यें डोंगर आडवा आला असतां वळण घेऊन जाण्याची सोय नसून घांट्या चढून जावें लागे. माल नेण्या-आणण्याला खटारे आणि घोडे यांचा उपयोग करीत. श्रीमंत लोकांच्या स्वतःच्या गाड्या असत, पण त्या चिखलांतून ओढून न्यावयाच्या असल्या म्हणजे एकेका गाडीला सहासहा घोडे जोडावे लागत. इ. स. १६६९ मध्यें ऑक्सफर्ड येथून सकाळीं सहा वाजतां एक गाडी निघाली, ती पंचावन्न मैलांवरच्या लंडन शहरीं संध्याकाळीं ७ वाजतां पोंचली म्हणजे तेरा तासांत तिनें पंचावन्न मैलांचा प्रवास केला, हें तिनें मोठें आश्चर्यकारक साहस केलें असा उल्लेख एका ठिकाणीं केलेला आहे. पोस्टाच्या थैल्या घोड्यांवरून ताशीं पांच मैलप्रमाणें घेऊन जात, पण पुष्कळ ठिकाणीं आठवड्यांतून फक्त एकदांच 'डिलिव्हरी' होत असे.

१८ मजूर—मजुरांचा असा स्वतंत्र वर्ग अजून अस्तित्वांत आला नव्हता. खेड्यापाड्यांतील शेंकडा ऐंशीं लोकांचा धंदा शेती हाच असे. शहरांतली ज्यास्तींत ज्यास्त मजुरी म्हणजे आठवड्याला ५ शिलिंग. कारखान्यांतील मजुरांना मात्र आठवड्याचे ६ शिलिंग मिळत. मूल सहा वर्षांचें झालें म्हणजे त्याच्याकडून काम करून घेण्यास हरकत नाहीं असें समजत. 'राय' 'बार्ली' आणि 'ओट' हें गरिबांचें मुख्य अन्न असे. भिकारीही कांहीं कमी नव्हते. एकंदर लोकसंख्येंत त्यांचें प्रमाण शेंकडा वीसपर्यंत पडत असे.

२९ नाण्यांची शुद्धि—ट्यूडर कालांत आठव्या हेन्रीच्या कारकिर्दीत राष्ट्राच्या नाण्यांत हीन धातूची भेसळ करून त्यांची वास्तविक किंमत अगदीं कमी करून टाकण्यांत आली होती. सहाव्या एडवर्डच्या कारकिर्दींत तर खरें नाणें दुर्मिळ होऊन रुप्याच्या नाण्यांत एक-चतुर्थांश रुपें आणि तीन-चतुर्थांश भेसळ असा प्रकार झाला होता. इलिझाबेथच्या काळीं नवीं नाणीं पाडण्यांत येऊन त्यांची खरी म्हणजे ज्या धातूंचीं तीं असतील, त्या धातूंच्या तेवढ्या वजनाच्या तुकड्याशीं जुळेल अशी किंमत व राजमान्य किंमत यांचा मेळ घालण्यांत आला होता. पण आतां त्याला बराच काल लोटल्यामुळें तीं नाणीं झिजून गेलीं होतीं, आणि व्यापारी लोक तीं वजन करून घेत असल्यामुळें व्यापाराला बराच त्रास व प्रतिबंध होत होता. शिवाय धातूंच्या स्वस्ताईमुळें नाण्यांच्या वास्तविक व कागदी किंमतींतही बरीच तफावत पडली होती. तेव्हां

इ. स. १६९६ मध्यें मागचीं जुनीं नाणीं काढून टाकून नवीं नाणीं पाडण्यांत आलीं, आणि दर्शनी व खऱ्या किंमतीचाही मेळ घालण्यांत आला.

ग्रंथ आणि ग्रंथकार

३० मिल्टन व त्याचीं काव्यें—या कालांतील–विशेषतः राज्यक्रांतीच्या कालांतील–ग्रंथकारांत **मिल्टन** आणि **जॉन बन्यन** हे ग्रंथकार आपल्या प्रतिभेचा आपल्या कालावर कायमचा ठसा ठेवून गेले. पैकीं **मिल्टन** हा 'वीरसुधारकांचा' दांडगा पक्षपाती असून **स्टुअर्ट** घराण्याच्या जुलमाविरुद्ध **इंग्लिश** प्रजेच्या हक्कांचें व स्वातंत्र्याचें जोरदार समर्थन करणारा होता. **चार्लस** राजाच्या वधाचें समर्थन करण्यासाठीं त्यानें 'इंग्रज लोकांची कैफियत' (The Defence of the English People) या नांवाचें एक पुस्तक लिहिलें; त्यानें **चार्लस** राजाच्या वधामुळें सगळ्या युरोपखंडांत इंग्रजांविषयीं कांहीं काल जें कलुषित मत झालें होतें तें बरेचसें निवळण्याला मदत झाली.

३१ दुसरा **चार्लस** राजा गादीवर आल्यावर **मिल्टन**ला अर्थातच 'वानप्रस्थाश्रम' (retirement) स्वीकारावा लागला. पण त्यानें आपल्या वयाचीं हीं शेवटचीं १४ वर्षें—एकांतवासाचीं आणि अंधत्वाचीं वर्षें–'पॅरॅडाइस लॉस्ट' आणि 'पॅरॅडाइस रीगेंड' हीं आपलीं काव्यें लिहिण्यांत घालविलीं.

३२ बन्यनचा 'यात्रेकरू'—जॉन बन्यन (John Bunyan) हाही **मिल्टन**प्रमाणेंच 'वीर सुधारकां'चा पक्षपाती होता. दुसऱ्या **चार्लस**च्या आगमनानंतर त्याला १२ वर्षें 'बेडफर्ड'च्या तुरुंगांत काढावीं लागलीं. पण त्या शून्य व भयाण कारागृहाचा उपयोग त्यानें 'यात्रेकरूचें मार्गक्रमण' (Pilgrim's Progress) हा आपला उत्कृष्ट ग्रंथ लिहिण्याकडे केला. या 'अप्रस्तुत–प्रशंसा ग्रंथांत' (Allegary) त्याची गाढ धर्मनिष्ठा आणि बायबलचें खोल अध्ययन हीं चांगलीं प्रतिबिंबित झालीं आहेत.

३३ प्यूरिटनांचें शुद्धीकरण—पण याच्या उलट **क्रॉमवेल**चा सोंवळा काळ संपून **चार्लस स्टुअर्ट**चा रंगेल काल सुरू झाल्याबरोबर त्या वेळच्या रंगेलपणाचें प्रतिबिंब तत्कालीन ग्रंथांतही दिसून येऊं लागलें. लष्करशाहीच्या अमदानींत **प्यूरिटन** लोकांनीं जुगार, दारू, तमाशे, आणि अस्वलांचे खेळ, हे तर बंद केलेच होते; पण

नाटकासारखे सात्त्विक करमणुकीचे मार्ग, वसंतऋतूंतील खेडवळांचे नाच, नाताळा-सारख्या सणाच्या प्रसंगीं केले जाणारे गोड गोड पदार्थ, आणि घरांच्या सुशोभित-पणांत भर टाकणारीं भिंतीवरील चित्रें, किंवा निरनिराळ्या खोदकामाच्या तऱ्हा, याही 'धर्मलंडपणा'च्या म्हणून त्याज्य ठरविल्या होत्या. इतकेंच नव्हे तर पांढऱ्या रंगाशिवाय इतर रंगाचे कपडे वापरणें हें सुद्धां जीविताचा गंभीरपणा न समजण्याचें लक्षण आहे असें मानण्यांत येऊं लागलें होतें.

३४ छचोरपणाला ऊत—प्यूरिटनांच्या या शुद्धीकरणाचा स्वाभाविकच असा परिणाम झाला कीं, चार्लससारखा रंगेल राजा गादीवर आल्याबरोबर त्याच्या संसर्गानें राजाचा सगळा दरबार आणि या दरबाराचें अनुकरण करणारे सामान्य लोक साधेपणाच्या अगदीं उलट अशा दुसऱ्या टोंकाकडे झुकले. श्रद्धेच्या जागीं नास्तिकपणा आला; बिनअंमली पेयांची जागा दारूच्या बाटल्यांनीं घेतली; एकपत्नी-व्रताची थट्टा होऊं लागून वेश्याचार बोकाळला; काटकसरीच्या जागीं उधळेपणा आला; आणि वेदाभ्यासजडत्व (Bible study & psalm singing) नाहींसें होऊन नाटकी आणि छचोर लोक समाजांत प्रतिष्ठा पावूं लागले. सॅम्युअल बटलर (Samuel Butler) यानें आपल्या हुडिब्रास (Hundibras) नामक काव्यांत प्यूरिटनांची व त्यांच्या साध्या राहणीची जी चेष्टा केली आहे, ती त्या कालच्या सामान्य प्रजेच्या मनोवृत्तीची निदर्शक आहे. या कालांतल्या नाटककारांनीं तर अगदींच ताळतंत्र सोडला होता. त्यांनीं रंगभूमीवर आणलेलीं पात्रें (Characters) अत्यंत भ्रष्ट, आणि सद्गुण किंवा शिष्टाचार यांच्याशीं अगदीं फारकत करून घेतलेलीं (utterely devoid of all sense of virtue and decency) अशीं असत. ड्रायडन (Dryden), कॉन्ग्रीव्ह (Congreve), विचरली (Wycherly), व्हॅनब्रग (Vanbrugh) आणि फार्कहर (Farquhar) हे नाटककार त्या कालाचे प्रतिनिधि असें म्हणतां येईल.

३५ ग्रंथकर्तृत्व आणि राजकारण—वाङ्मयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा असा यानंतरचा काल म्हणजे ॲन राणीचा काल. त्या कालांत अलेक्झांडर पोप (Alexander Pope) जन्म १६८८; जोनॅथन स्विफ्ट (Jonathan Swift) जन्म १६६७; जोसेफ ॲडिसन (Joseph Addison) जन्म १६७२; डानियल डीफो (Daniel Defoe) जन्म १६६१; सर आयझॅक

न्यूटन (Sir Issac Newton) जन्म १६४२; हे निरनिराळ्या क्षेत्रांत आपलें लेखनकौशल्य दाखविणारे ग्रंथकार उदयाला आले. या सगळ्यांनीं अठराव्या शतकाचें पूर्वार्ध पाहिलें, आणि त्यांच्या लेखांचा प्रभावही पुढील शतकांतच दिसून आला. त्यांच्याविषयीं येथें सांगावयाची गोष्ट इतकीच कीं, ज्याला इंग्लंडचा इतिहास पुरा समजून घ्यावयाचा असेल त्यानें या ग्रंथकारांच्या ग्रंथांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. कारण या वेळीं इंग्लंडच्या वाङ्मयाचा राजकारणाशीं कायमचा संयोग होऊन राहिला होता. या कालांत व्हिग आणि टोरी हे राजकारणी दोन पक्ष कायमचे प्रस्थापित झाल्यामुळें त्या कालचे पट्टीचे लेखक आणि ग्रंथकार या किंवा त्या पक्षाचें समर्थन करण्यांतच आपली बुद्धिमत्ता, लेखनशैली, आणि निंदा किंवा स्तुतिगर्भ विनोद यांचा उपयोग करण्याची शिकस्त करीत असत. (All the resources of wit, satire, and literary skill, were exhausted in defending or in ridiculing the opposing principles and policies of Whig and Tory.)

३६ **वर्तमानपत्रें**—वर्तमानपत्रांची संस्था तेव्हां अगदींच बाल्यावस्थेंत होती. कित्येक वर्तमानपत्रांचे एकेरी ताव छापून आठवड्यांतून दोनदां वांटीत. 'लंडन गॅझेट' हें त्या काळचें नामांकित पत्र आठवड्यांतून दोनदां निघे आणि त्याचीं दोन पृष्ठें असत. पार्लमेंटांतील वादविवाद किंवा एकाद्या खटल्याच्या चौकशीची हकीकतही प्रसिद्ध करण्याची त्या वेळीं परवानगी नसे. 'न्यूज लेटर' (News Letter) म्हणजे 'बातमीपत्र' म्हणून कित्येक कागदांचीं चिटोरीं आठवड्यांतून एकदां शहरांतून खेड्यांत पाठविलीं जात. त्यांत शहरांतल्या कॉफीगृहांत चाललेल्या गप्पा (chat) आणि शहरांतली आणखीं कसली तरी बातमी यांचा समावेश केलेला असे, आणि तीं लंडनमधील कोणीतरी इसम (Londoner) ठराविक वर्गणी घेऊन खेड्यांत नेऊन देत असे. हाच आधुनिक वर्तमानपत्रांच्या 'खास बातमीदारां'चा (Our own Correspondent) प्रपितामह होय !

थोर लोकांचीं संक्षिप्त चरित्रें.

(प्र=प्रकरण. प=परिच्छेद)

वुइल्यम शेक्सपीअर--हिंदुस्तानांत ज्याप्रमाणें मध्ययुगांत 'कालिदास' हा जगप्रसिद्ध कवि व नाटककार होऊन गेला, त्याप्रमाणेंच इंग्लंडांत इलिझाबेथ-युगांत शेक्सपीअर हा जगप्रसिद्ध नाटककार उदयास आला. त्याचा जन्म इ. स. १५६४ या वर्षीं 'स्ट्रॅटफर्ड' नांवाच्या गांवीं झाला. लहानपणीं त्याची फार गरिबी होती. आणि वयाचीं वीस बावीस वर्षें त्यानें आपल्या गांवींच काढलीं. पण पुढें त्याची प्रतिभा त्याला स्वस्थ बसूं देईना; त्यामुळें कांहीं अंशीं नांव कमाविण्याच्या हेतूनें, आणि पुष्कळ अंशीं पोट भरण्याचा कांहींतरी उपाय शोधावा म्हणून तो इ. स. १५८६ च्या सुमारास 'लंडन'ला आला. ही वेळ इलिझाबेथ राणीच्या अगदीं भरभराटीची होती. या वेळीं इंग्लंडमध्यें एकामागून एक ग्रंथकार उदयास येत होते. 'विद्येच्या पुनरुज्जीवनानें' उत्पन्न झालेल्या विचारस्वातंत्र्यांत नाना प्रकारच्या कल्पना उदयास येऊन जनतेचीं मनें जोरकस बनत होतीं. आणि हा काल एकंदरींत शांततेचा असल्यामुळें जिकडे तिकडे आनंद व उत्साह संचरल्यासारखा झाला होता.

शेक्सपीअर लंडनला आल्यावर त्यानें प्रथम एका नाटक कंपनींत नटाचें काम पत्करून पोटाची सोय करून घेतली. नंतर त्या पेशांत असतांनाच त्यानें कित्येक जुन्या नाटकांना नवीन रंगभूमीला शोभेल असा साज दिला. त्यानंतर जुनीं कथानकें घेऊन स्वतंत्र नाटकें लिहिण्याचें काम त्यानें हातीं घेतलें, आणि वीस वर्षांत सुमारें ३७ नाटकें लिहून काढलीं. त्याची प्रतिभा ऐतिहासिक आणि पौराणिक अशा दोन्ही प्रकारच्या नाटकांत सारखीच दिसून येत असे, आणि हास्य आणि करुण हे दोन रस श्रोत्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न करण्याच्या कामीं तर त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. मानवी जीवनाचीं विविध अंगें नाटकांतून यथातथ्य रीतीनें चित्रित करणारा त्याच्यासारखा नाटककार क्वचितच असेल. मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान आणि मानवी अंतःकरणाचें कोणत्याही काळीं व स्थळीं सारखेंच लागू पडेल असें वर्णन करण्याचें सामर्थ्य हीं त्याच्या अप्रतिम यशस्वितेचीं मुख्य कारणें होत. त्याच्या ऐतिहासिक नाटकांनीं कित्येक तरुणांच्या अंतःकरणांत देशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली असेल; त्याच्या हास्यरसोत्पादक नाटकांनीं कित्येक थकल्या भागलेल्या जीवांना क्षणभर

आपल्या स्थितीचा विसर पाडला असेल; आणि त्याच्या शोकरसप्रधान नाटकांनीं कित्येकांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहविले असतील. त्याचें शेवटचें नाटक ' टेंपेस्ट ' म्हणजे ' वादळ ' किंवा ' तुफान ' हें पहिल्या जेम्सची मुलगी इलिझाबेथ हिच्या लग्नाच्या वेळीं प्रथम रंगभूमीवर आलें.

नाटकांप्रमाणेंच त्यानें कित्येक स्फुट काव्येंही लिहिलीं आहेत, व तीं सर्व इंग्रजी वाङ्मयांत कायमचें स्थान पटकावून बसलीं आहेत. लहानपणीं त्याला दारिद्र्यांत दिवस काढावे लागले तरी लंडनला आल्यावर त्याला त्याच्या नाटकांनीं चांगला हात दिला. त्याचे अखेरचे दिवस सुखांत आणि समाधानांत गेले, आणि ते त्यानें आपल्या मातृभूमींत म्हणजे स्ट्रॅटफर्ड या गांवींच घालविले. तो १६१६ सालीं वयाच्या ५२ व्या वर्षीं मृत्यु पावला. तो इलिझाबेथ–युगांत उदयाला आला, तरी इलिझाबेथच्या मागून बऱ्याच वर्षांनीं मृत्यु पावल्यामुळें व त्याची परिपक्व प्रतिभा त्याच्या उतार वयांतच विशेष दृग्गोचर झाल्यामुळें त्याचें चरित्र आम्हीं या स्टुअर्ट काळच्या चारित्रमालिकेंत दिलें आहे.

सर वॉल्टर रॅले—हा इलिझाबेथ युगांतला एक प्रख्यात नाविक(Navigator) आणि ग्रंथकार होता. एकदां इलिझाबेथ राणी रस्त्यानें चालली असतां वाटेंत चिखल झाला होता, त्या चिखलावर यानें चटकन् आपल्या अंगावरचा झगा (cloak) टाकून आपलें स्त्रीदाक्षिण्य आणि राणीविषयींचा पूज्यभाव प्रदर्शित केला. त्यावरून राणीचें त्याच्याकडे लक्ष जाऊन त्याचा तिच्या दरबारांत प्रवेश झाला. पुढें इंग्रज लोकांना अमेरिकेंत जाऊन रहावेंसें वाटूं लागल्यावर त्यानें तिकडे जाऊन आपल्या राणीच्या नांवानें ' व्हर्जिनिआ ' (Virginia) म्हणजे ' कुमारी ' नांवाची वसाहत स्थापण्याचा प्रयत्न केला पण तो तितकासा साधला नाहीं.

इलिझाबेथ राणीच्या पश्चात् 'स्टुअर्ट' राजा जेम्स गादीवर आल्यावर त्याच्याविरुद्ध पहिल्यानें जे कट झाले, त्यांत रॅलेचें अंग असल्याचें आढळून आल्यावरून त्याला तेरा वर्षेपर्यंत कैदेची शिक्षा झाली. पुढें इ.स. १६१६ मध्यें दक्षिण अमेरिकेंत एक सोन्याची खाण आहे, आणि ती आपल्याला माहीत आहे असें सांगितल्यावरून ती दाखवून देण्याच्या अटीवर त्याची बंधमुक्तता करण्यांत आली. पण शेवटीं ती न सांपडल्यामुळें त्याला 'पूर्वार्जित' शिक्षेनुसार इ.स. १६१८मध्यें फांशीं देण्यांत आलें* (प्र. ४१प. ३). अमेरिकेंतून

* रॅलेच्या या वधाला जेम्सची स्पेनच्या राजाला खुष करण्याची इच्छा हेंच मुख्य कारण होतें असें कित्येकांचें मत आहे. कारण स्पेनच्या ' अजिंक्य आरमारा'चा पराभव करण्यांत रॅलेचें बरेंच अंग असून अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींनाही त्याच्या-

बटाटे आणि तंबाकू इंग्लंडमध्यें पहिल्यानें आणणारा इंग्रज रॅले हाच होय असें समजतात. त्याच्या मनःस्वास्थ्याची अशी गोष्ट सांगतात कीं, अगदीं फांसावर जाण्याच्या क्षणीं त्यानें मांगाची कुऱ्हाड आपल्या हातांत घेऊन तिची धार कशी काय आहे ती पाहिली, आणि तो म्हणाला "हें औषध जरा तीक्ष्ण आहे खरें, पण तें सगळे रोग बरे करून टाकील!"

बेकन—इंग्लंडमध्यें सतराव्या शतकांत जे नामांकित ग्रंथकार होऊन गेले, त्यांत लॉर्ड फ्रॅन्सिस बेकन (Lord Francis Bacon) या तत्त्वज्ञाची गणना होते. तो तत्त्ववेत्ता आणि ग्रंथकार असून मुत्सद्दीही (Statesman) होता. तो इ. स. १५६१ मध्यें जन्मला. केंब्रिज येथें विद्याभ्यास पुरा झाल्यावर तो इंग्लंडच्या फ्रान्समधील वकिलातींत नोकरीस राहिला. 'युरोपची स्थिति' (The State of Europe) हें आपलें पुस्तक त्यानें वयाच्या १९ व्या वर्षींच लिहिलें. इ. स. १५९२ मध्यें त्याचा पार्लमेंटमध्यें प्रवेश झाला. तो उत्कृष्ट कायदेपंडित असल्यामुळें वकिलीच्या धंद्यांतही त्याची झपाट्यानें प्रगति झाली. जेम्स राजाच्या कारकिर्दींत इ. स. १६१३ मध्यें 'अॅटर्नी जनरल' (Attorney General) आणि इ. स. १६१८ मध्यें 'लॉर्ड हाय चॅन्सेलर' (Lord High Chancellor) या जागा त्याला देण्यांत आल्या. पुढें लांच घेतल्याच्या आरोपावरून पार्लमेंटनें त्याला दंडाची शिक्षा केली (प्र.४२प.२०).* पण जेम्सची त्याच्यावर फार मर्जी असल्यामुळें राजानें हा दंड त्याला माफ केला. यानंतर त्यानें राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें, आणि तो इ. स. १६२६मध्यें मरण पावला. 'विद्येची प्रगति' (Advancement of Learning) हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ असून त्यानें निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले निबंधही इंग्रजी अभिजात वाङ्मयांत मोडतात.

पासून बराच उपसर्ग पोंचला होता. आणि या वेळीं जेम्सला स्पेनच्या बादशहाची मुलगी आपल्या मुलाला करून घेऊन स्पेनशीं सख्य जोडावयाचें होतें. तेव्हां स्पेनच्या बादशहानें रॅलेचा वध करण्याच्या बाबतींत जेम्सला आग्रह करणें आणि जेम्सनें तो मानणें अस्वाभाविक नाहीं.

* 'न्यायाधीश सिंहासारखे निर्भय असावे पण त्याबरोबरच त्यांनीं आपल्या सामर्थ्याचा सिंहासनाला आधार दिला पाहिजे,' या बेकनच्या तोंडच्या वाक्यावरून जेव्हां प्रजेला राजाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध दाद मागण्याचा प्रसंग येत असेल, तेव्हां त्याच्या हातून न्यायदानाचें काम कितपत निःपक्षपातीपणानें होत असेल हें सांगावयास नकोच.

ऑलिव्हर क्रॉमवेल-स्टुअर्ट राजवंशाच्या अमदानींत मध्येंच सुमारें १०।१२ वर्षें राजसत्ता अजिबात नाहींशी करून प्रजासत्ताक राज्याचा व राष्ट्राचा मुख्य चालक या नात्यानें 'राष्ट्रसूत्रधार' बनलेला हा पराक्रमी पुरुष 'हंटिंगडन' (Huntingdon) येथें इ. स. १५९९ सालीं जन्मला. त्याचा पहिला विद्याभ्यास केंब्रिज येथें झाला. व नंतर त्यानें कांहीं काल कायद्याचाही अभ्यास केला. इ. स. १६२८मध्यें हंटिंगडन परगण्यातर्फेंच त्याची पार्लमेंटमध्यें निवडणूक झाली. पण त्या वेळची पार्लमेंटची स्थिति 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' अशा स्वरूपाची असल्यामुळें **चार्लस** राजानें हें पार्लमेंट बरखास्त केल्यावर त्याला घरची वाट धरावी लागली (प्र. ४३, प. १३). तो इ. स. १६३६ मध्यें 'इलाय' बेटांत मिळालेल्या एका शेतांत जाऊन राहिला. त्या वेळीं राजाच्या जुलमी अंमलाला कसा प्रतिकार करावा याची चर्चा सर्वत्र चालू असे, त्यांत हा नेहमीं लोकांचे हक्क (Popular rights) सांभाळण्याच्या कामीं पुढें होत असे. इ. स. १६४०मध्यें सुप्रसिद्ध 'लाँग' पार्लमेंटची बैठक भरली (प्र. ४५, प. ११). त्यांत क्रॉमवेल केंब्रिज शहरातर्फें निवडून आला आणि त्या वेळेपासून तो जो एकदां 'देशभक्तां'च्या (Patriots) गोटांत समाविष्ट झाला तो शेवटपर्यंत तसाच राहिला.

इ. स. १६४३ मध्यें **चार्लस** राजाचें प्रजेबरोबरचें भांडण अगदीं हातघाईवर आलें, तेव्हां क्रॉमवेलनें केंब्रिज येथें एक घोडदळ उभारून त्याचें आधिपत्य पत्करलें आणि लवकरच 'लष्करी कौशल्या' (military skill) बद्दल त्याची जिकडे तिकडे वाहवा होऊं लागली (प्र. ४७, प. ६). या युद्धांत किंवा यादवींत प्रजापक्षीय सैन्याच्या राजपक्षीयांशीं ज्या लढाया झाल्या, त्यांत 'मार्स्टन मूर' (Marston Moor) आणि 'नेसबी' (Naseby) येथें क्रॉमवेलच्या 'लोहहृदयी' सैनिकांनीं (Ironsides) फार पराक्रम गाजविला.

चार्लसचा पराभव होऊन पार्लमेंटचें सैन्य विजयी झाल्यावर **क्रॉमवेलनें** 'स्वतंत्र' पक्षाचें (Independents) आधिपत्य आपल्याकडे घेतलें, आणि राजपक्षाकडे ओढा असलेल्या पार्लमेंटच्या सभासदांना पार्लमेंट सभेंतून घालवून देऊन आणि आपल्या कट्ट्या अनुयायांच्या मदतीनें **चार्लस** राजाला ताब्यांत घेऊन त्याची स्वयंनिर्मित न्यायासनापुढें चौकशी करविली, आणि या न्यायसभेनें राजावर प्रजाद्रोहाचा गुन्हा शाबीत होतो असा निकाल दिल्यावर त्याचा शिरच्छेद करून टाकला! (प्र. ४८, प. १ते १०)

यानंतरचीं कित्येक वर्षें **क्रॉमवेलला** राजद्रोहानें खवळलेल्या स्कॉटलंड व आयर्लंडा-



ऑलिव्हर क्रॉमवेल.

तील बंडखोरांशीं लढण्यांत घालवावीं लागलीं (प्र. ४९, प. ३ ते १२). पण त्यानें त्या सर्वांना लवकरच वठणीला आणलें, आणि त्याच्या मुठींतल्या पार्लमेंटनेंही त्याला 'इंग्लंडचा रक्षक' (Protector) हा हुद्दा देऊन सर्व अधिकार त्याच्या हवालीं केले (प्र. ४९ प. २८). या अधिकाराचा उपयोग त्यानें ट्यूडर राजांप्रमाणें अंतःस्थ शांतता आणि फ्रान्स–स्पेन–हॉलंडादि देशांत इंग्लडचें वर्चस्व स्थापण्याकडेच केला. आणि चार पांच वर्षें नांवानें 'राजा' नसला तरी अनियंत्रित राजसत्तेचा उपभोग घेऊन हा प्रसिद्ध पुरुष इ. स. १६५८ मध्यें मरण पावला.*

क्रॉमवेलची धर्मविषयक मतें 'प्यूरिटनी' ऊर्फ वीरसुधारकांच्या बाजूचीं होतीं. त्याची धर्मनिष्ठा उत्कट होती, आणि आपण करतों तें प्रत्येक कृत्य ईश्वराज्ञेनुसार करतों असें तो नेहमीं म्हणत असे. त्याच्या अंगच्या शौर्य, धैर्य, चिकाटी, आणि स्वाभिमान या गुणांमुळें इंग्लंडच्या 'प्रजासत्ताक काळां' तील (Commonwealth) थोड्याशा वर्षांतही इंग्लंडचा परराष्ट्रांवर चांगला दरारा बसला आणि समुद्रावरील त्याचें वर्चस्व कायमचें स्थापन झाल्यासारखें झालें(प्र.४९,प.३२). पण त्यानें राजसत्ता नाहींशी केल्यावर शासनसंस्थेच्या ज्या अनेक योजना एकामागून एक पुढें आणल्या, त्यांतली एकही टिकाऊ स्वरूप धारण करूं शकली नाहीं, आणि शेवटीं त्याला सैन्याच्या जोरावरच आपली सत्ता चालवावी लागली. स्टुअर्ट राजांचा अनियंत्रितपणा नाहींसा करण्यासाठीं म्हणून स्थापन झालेल्या 'सामुदायिक सत्तामंडळा'चें पर्यवसान अखेर लष्करशाहींत झालें, आणि या लष्करशाहीच्या कारकिर्दींत लोकांना जो त्रास भोगावा लागला, त्यामुळें त्यांना 'चुलींतून निघून वैलांत' गेल्यासारखेंच वाटलें. आणि शेवटीं शेवटीं तर क्रॉमवेलचा प्राण घेण्याचे कट होण्यापर्यंत पाळी आली. त्यामुळें त्याचे शेवटचे दिवस काळजींत व त्रासांत गेले (प्र.४९प.३५). पण क्रॉमवेलच्या अंगीं स्वतःच्या देशांत लोकशाहीचा प्रयोग यशस्वी करून दाखविण्याचा गुण दिसून न आला, तरी त्याच्या दृढनिश्चयी

* क्रॉमवेलचा हा मृत्युदिन त्यानें डनबार (Dunbar) आणि वुरसेस्टर (Worcester) येथें मिळविलेल्या विजयांचा स्मृतिदिन (Anniversary) असून तोच त्याचा जन्मदिवसही होता. या दिवसाला (सप्टेंबर ३) तो नेहमीं 'भाग्यवान दिवस' (fortunate day) असें म्हणत असे. त्याचे शेवटचे शब्द असे होतेः– "My work is done; yet God will be with his people."

आणि 'काळा'लाही न जुमानणाऱ्या निर्भय वृत्तीमुळें परराष्ट्रांना मात्र इंग्लंडची भीति व दरारा वाटूं लागला होता यांत संशय नाहीं. *

वेंटवर्थ ऊर्फ स्ट्रॅफर्ड–हा पहिल्या चार्लसचा प्रमुख हस्तक इ. स. १५९३ मध्यें जन्मला. 'वेंटवर्थ' हें त्याचें कुलनाम असून 'स्ट्रॅफर्ड' हें 'सरदारकी'-नंतरचें नांव होतें. चार्लसच्या कारकिर्दीतील राजा-प्रजांच्या भांडणाच्या वेळीं तो पहिल्यानें प्रजापक्षाचा प्रमुख होता. पण त्या वेळचा राजाचा मुख्य मंत्री बकिंगहॅम याचें व वेंटवर्थचें वांकडें असल्यामुळेंच तो प्रजापक्षाला मिळाला होता. वास्तविक त्याचीं मतें राजपक्षीय मंडळीच्या मतासारखींच होतीं. त्यामुळें बकिंगहॅमच्या मृत्यूनंतर (इ. स. १६२७) चार्लस राजानें त्याला सहज आपल्या बाजूला वळवून घेतलें, आणि त्यानंतर तो राजाचा एकनिष्ठ सेवक आणि प्रजापक्षाचा पक्का वैरी बनला (प्र. ४४ प. ३). आयर्लंडचा 'व्हाइसरॉय' असतांना त्यानें खड्या सैन्याच्या जोरावर तिकडे खराखुरा 'पूर्ण अनियंत्रित' अंमल (thorough despotism) गाजविला (प्र. ४४ प. ५) आणि तसाच अंमल इंग्लंडमध्येंही चालविण्याविषयीं चार्लस राजाला सांगितलें. चार्लसनें पार्लमेंटची सभा न बोलावतां जे नाना प्रकारचे बेकायदेशीर कर (illegal taxes) लोकांवर लादले (imposed), त्यांत या स्ट्रॅफर्डचेंच त्याला मुख्य सहाय्य असे. पुढें पार्लमेंटांतील प्रजापक्षीय मंडळीला त्याचा हा जुलूम असह्य होऊन त्यांनीं त्याची सरदारसभेपुढें चौकशी (impeachment) करविली, आणि तेवढ्यानेंही भागत नाहींसें पाहून 'बिल ऑफ अटेंडर'च्या मार्गानें त्याचा प्राण घेण्याची योजना

* "He gave England the strongest government she had had, since the days of Henry VIII and Elizabeth. He wrested Jamaica from Spain, crippled her fleet and army, and humbled her pride. He compelled the French Duke of Savoy to cease his persecution of the Vandois, and boldly informed the Pope that, if Protestants continued to be harassed through the machinations of the Roman See, the roar of English guns would speedily awaken the echoes of St. Peter's Cathedral."—Myres.

केली.* (प्र.४५ प. १३।१४) आणि राजानेंही अखेर त्याच्या मरणाला संमति देऊन इ. स. १६४१ च्या मे महिन्यांत मित्रघाताचें पाप जोडलें.

पिम—हा पहिल्या **चार्लस** राजाचा अगदीं हाडवैरी असून पार्लमेंटमध्यें पुढारी-पणा मिळविण्याची कला (Parliamentary Leader) त्याला चांगली साध्य झाली होती. तो इ. स. १५८४मध्यें जन्मला. कायद्याचा अभ्यास केल्या-वर त्यानें लवकरच आपली पार्लमेंटमध्यें निवडणूक करून घेतली, आणि **चार्लस** राजाचीं जुलमी कृत्यें चवाठ्यावर मांडून त्या कृत्यांबद्दल जबाबदार अशा त्याच्या मंत्र्यांना चौकशीसाठीं (impeachment) पार्लमेंटच्या सरदार-सभेपुढें खेंचण्याचा प्रयोग अनेक वेळां सिद्धीला नेला. इ. स. १६२६ मध्यें राज-मंत्री **बकिंगहॅम** आणि इ. स. १६४० मध्यें **स्ट्रॅफर्ड** आणि **लॉड** यांच्या विरुद्ध पार्लमेंटमध्यें देहांतशिक्षेचे ठराव 'संमत' करून घेणाऱ्यांमध्यें हाच प्रमुख होता. त्या वेळीं सगळ्या इंग्लंडमध्यें त्याचें एवढें वजन होतें कीं, लोक त्याचा 'राजा पिम' (King Pym) याच नांवानें उल्लेख करीत असत. तो इ. स. १६४३ या वर्षीं मरण पावला.

लॉड—पहिल्या **चार्लस** राजाला त्याच्या जुलमी राज्यकारभारांत (despotic rule) ज्यांनीं अंतःकरणपूर्वक मदत केली, किंबहुना ज्यांनीं आपल्या स्वतःच्या फाजील अधिकारलालसेनें त्याला जुलमी बनविलें, त्या 'दुकलीं' तील (Strafford and Land) **लॉड** हा एक होता. तो इ. स. १५७३ मध्यें 'रीडिंग' येथें जन्मला. 'ऑक्सफर्ड' येथें त्याचा विद्याभ्यास झाला, आणि पुढें तेथेंच त्याला कॉलेजच्या मुख्याध्यापकाची जागा मिळाली. पुढें इंग्लंडच्या देवस्थान खात्यांत शिरून तो प्रथम 'डीन' व मागाहून 'बिशप' झाला. इ. स.१६३३ मध्यें कँटरबरीच्या

* **वेंटवर्थ**च्या या चौकशीच्या वेळीं त्यानें राजद्रोह (Treason) केला कीं काय हा मुख्य मुद्दा होता. **वेंटवर्थ**चें म्हणणें आपल्या हातून हा गुन्हा झालेला नाहीं. पण त्यावर लोकसभेचा पुढारी **पिम** यानें उत्तर दिलें कीं, राजा हा राष्ट्राचा प्रति-निधि असल्यामुळें प्रत्यक्ष राजाचा द्रोह करणें आणि राष्ट्राचा द्रोह करणें या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. तेव्हां **वेंटवर्थ**नें 'राष्ट्रा'शीं द्रोह केला असें शाबीत झालें कीं त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप शाबीत झालाच. पण **पिम**ची ही विचारसरणी सरदारसभेला मान्य होण्यासारखी नसल्यामुळें नुसत्या 'इंपीचमेंटनें'नें साध्य न होणारें **वेंटवर्थ**ला 'मारण्या' चें कृत्य 'बिल ऑफ अटेंडर'नें पार पाडण्यांत आलें.

मुख्य आचार्यांची जागा त्याला देण्यांत आली. आणि त्या वेळेपासून तो चार्लस राजाचा धार्मिक बाबतींतला मुख्य सल्लागार बनला (प्र.४४ प.६१७). त्याचा कारभार (rule) चार्लससारखाच अरेरावीचा (high handed) आणि जुलमी (tyrannical) होता. 'स्टार चेंबर कोर्टा'च्या सहाय्यानें त्यानें इंग्लंडांतील 'वीर सुधारकांना' (Puritans) सळो कीं पळो करून सोडलें, आणि इंग्लंडचा राष्ट्रीय धर्म (Episcopacy) स्कॉटलंडच्या डोक्यावर लादण्याचा (to force) प्रयत्न केला. पण पुढें पार्लमेंटनें इ. स. १६४१ मध्यें त्याची त्याच्या दुसऱ्या जोडीदाराबरोबर (Strafford) किल्ल्यांत (The Tower) रवानगी केली. इ. स. १६४४ मध्यें बिल ऑफ अॅटेंडरचा (Bill of Attainder) आश्रय करून त्याला देशद्रोही ठरविलें, आणि इ. स. १६४५च्या जानेवारी महिन्यांत त्याचा शिरच्छेद केला.



जॉन हॅम्प्डेन.

जॉन हॅम्प्डेन—इंग्लंडच्या इतिहासांत प्रजेच्या स्वातंत्र्याचे रक्षक म्हणून ज्या पुरुषांचीं नांवें गाजलेलीं आहेत, त्यांत जॉन हॅम्प्डेन याचें नांव प्रमुख आहे. तो इ. स.

१५९४ मध्यें जन्मला. पहिल्या **चार्लस** राजानें पार्लमेंटला धाब्यावर बसवून आपल्याच अधिकारांत कर गोळा करण्याचा विचार करून 'शिप-मनी' ऊर्फ नौकाद्रव्य या नांवाचा कर सरसकट सर्व इंग्लिश प्रजेकडून वसूल करण्याचें ठरविलें. तेव्हां 'राजाचें हें कृत्य बेकायदेशीर आहे सबब मी हा कर देत नाहीं' असें त्यानेंच प्रथम ठांसून सांगितलें (प्र. ४४ प. १२). पुढें हा कर घेणें कायदेशीर आहे कीं काय याची न्यायकोर्टांत चर्चा झाली. पण त्या वेळचे न्यायाधीश **चार्लस**च्या हातांतील बाहुलीं बनलेले (Nominees of the Crown) असल्यामुळें त्यांनीं हा कर कायदेशीर आहे असा निकाल दिला. * पण हॅम्डेननें या वेळीं जें धीटपणाचें वर्तन केलें, त्यामुळें त्याची लोकप्रियता अतिशय वाढली, आणि पुढें प्रजेला राजाशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला तेव्हां हॅंप्डेनचें हें उदाहरण त्यांना चांगलें उपयोगीं पडलें. इ. स. १६४२ मध्यें **चार्लस** राजा पार्लमेंटसभेमध्यें येऊन ज्या 'पंचायतना'ला घेऊन जाणार होता त्यांत हॅंप्डेन हा एक होता (प्र.४६ प.१८). पुढें पार्लमेंटचें राजाशीं युद्ध जुंपल्यावर हॅंप्डेननें राजाविरुद्ध शस्त्र धारण केलें. पण चालग्रोव्ह (Chalgrove)-च्या लढाईंत त्याला जबर जखम होऊन तो प्राणास मुकला (इ. स. १६४३).

सर जॉन ईलिअट—पहिल्या **चार्लस** राजाच्या कारकिर्दींत ज्या लोकधुरीणांनीं धीटपणें पुढें होऊन राजाच्या जुलमी (despotic) सत्तेला विरोध केला, त्यांत 'ईलिअट' (Eliot) हा एक होता. **चार्लस** राजानें पार्लमेंट सभा भरवावी आणि ती आपल्या मताप्रमाणें वागत नाहीं असें दिसून आलें कीं बरखास्त करावी असा क्रम बरेच दिवस चालविला होता. त्याच्या कारकिर्दींतली पार्लमेंटची दुसरी सभा इ. स. १६२६ या वर्षीं भरली. त्यांत ईलिअट हा लोकपक्षाच्या बाजूनें राजाशीं भांडावयास प्रथम पुढें झाला. तिसऱ्या सभेच्या वेळीं 'पिटिशन ऑफ राइट' नांवाची एक सनदच पार्लमेंटनें राजाकडून मिळविली (प्र.४३ प.१०।११). ती तयार करण्यांत ईलिअट अग्रेसर होता. पुढें राजकीय बाबींप्रमाणेंच धार्मिक बाबतींतही (Ecclesiastical affairs) राजसत्तेवर नियंत्रण (Control) असलें पाहिजे असा पार्लमेंटनें आग्रह धरला तो ईलिअटच्या सूचनेवरूनच. पुढें राजानें ही सभा बरखास्त करून ईलिअटला व त्याच्याबरोबर दुसऱ्या ८ इसमांना कैदेंत टाकलें. या कैदेंत असतांनाच तो इ. स. १६३२ मध्यें मरण पावला.

* हॅंप्डेनच्या या खटल्यांत एकंदर बारा न्यायाधिशांपैकीं दोघांनीं हॅंप्डेनचें करणें बरोबर आहे असें मत दिलें होतें.

फॉकलंड—सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांतील प्रजेच्या राजाविरुद्ध चाललेल्या भांडणांत ज्यांनीं पहिल्यानें भाग घेतला, त्यांत फॉकलंड (Falkland) हा एक होता. पण तो जात्या शांततेचा भोक्ता व विद्वान असल्यामुळें राजा जरासा नरम येतांच प्रजापक्षानें यापुढें राजाबरोबर चाललेलें भांडण बंद करावें असें म्हणून तो राजपक्षाला जाऊन मिळाला (प्र. ४६ प. ९). त्याचें पहिलें आयुष्य एकांत विचारांत व विद्वानांच्या संगतींत गेलेलें असल्यामुळें त्याला युद्धकालीन राष्ट्रीय अरिष्टांबद्दल (National Calamities) फार वाईट वाटत असे. 'देवा ! शांतता राख, शांतता राख !' असे उद्गार तो एकटाच असला म्हणजे वारंवार त्याच्या तोंडून निघत. तो इ. स. १६४३ मध्यें 'नेसबी'च्या लढाईत मारला गेला.

फेअरफॅक्स—पहिल्या चार्लसच्या कारकिर्दींत राजाविरुद्ध प्रजेच्या भांडणांत प्रत्यक्ष युद्धाचा प्रसंग उपस्थित झाल्यावर पार्लमेंटच्या सैन्याचें आधिपत्य ज्यांच्याकडे होतें, त्यांत थॉमस फेअरफॅक्स (Thomas Fairfax) हा एक होता. त्याच्यापूर्वीं हें आधिपत्य ' इसेक्स ' नांवाच्या सेनापतीकडे होतें. पण इ. स. १६४५ मध्यें पार्लमेंटनें असा एक कायदा केला कीं, पार्लमेंटचे सभासद असलेल्या व्यक्तींकडे लष्करचा अधिकार असूं नये (प्र.४७ प.१०). त्यामुळें इसेक्सला हें सेनापतिपद सोडून द्यावें लागलें.

या वेळच्या यादवींत राजसैन्याच्या पार्लमेंटच्या सैन्याशीं ज्या झटापटी झाल्या. त्यांत नेसबीची लढाई राजसैन्याच्या पूर्ण पराभवाची आणि म्हणूनच पार्लमेंटच्या पूर्ण विजयाची म्हणून प्रसिद्ध आहे (प्र. ४७ प. १४). त्या लढाईंत पार्लमेंटच्या सैन्याचें मुख्य सेनापतिपद (commander-in-chief) फेअरफॅक्सकडे होतें. पुढें पार्लमेंटांतील क्रॉमवेलच्या 'आमूलाग्र सुधारक पक्षानें' (Root and Branch Men) चार्लस राजाची न्यायासनापुढें चौकशी करण्याचें ठरविलें, त्या वेळीं फेअरफॅक्सचें नांव न्यायाधिशांच्या यादींत घातलें होतें. पण त्याला ही गोष्ट नापसंत असल्यामुळें त्यानें त्या कामीं मुळींच भाग घेतला नाहीं (प्र. ४८ प. ८). पुढें चार्लस राजाचा शिरच्छेद होऊन क्रॉमवेलची लष्करशाही गाजून विराम पावल्यावर दुसरा चार्लस राजा पुन्हां गादीवर आला (The Restoration), तेव्हां फेअरफॅक्स राजघराण्याशीं असलेलें पूर्वीचें वैर विसरून चार्लसला मिळाला (made peace with Charles II) आणि कांहीं वर्षें चार्लसच्या सल्लागाराचें काम करून इ. स.१६७१ मध्यें मरण पावला.

मॉंट्रोज—हा स्टुअर्ट राजांचा स्कॉटलंडमधील एक प्रमुख सहाय्यकर्ता व सेनापति होता. त्याचें बालपण फ्रान्समध्यें गेलें व शिक्षणही तिकडेच झालें. पुढें स्कॉटलंडमध्यें आल्यावर त्यानें प्रथम 'कॅव्हेनंटरीं' चा म्हणजे स्कॉटलंडमधील स्टुअर्टराजविरोधी लोकांचा पक्ष धरला होता. पण पुढें ते लोक आपला अपमान करतात असें वाटल्यामुळें तो राजपक्षाला मिळाला. पहिल्या **चार्लस** राजाच्या तर्फेनें लढून त्यानें अनेक वेळां स्कॉटिश कॅव्हेनॅंटरांचा पराभव केला, पण पुढें जनरल **लेस्लीनें** त्याला पायबंद घातल्यावर तो युरोपांत निघून गेला. पहिल्या **चार्लसच्या** वधानंतर त्याचा मुलगा दुसरा **चार्लस** यानें सामुदायिक सत्तामंडळाच्या कारकिर्दींत पार्लमेंटाशीं युद्ध सुरू केलें, तेव्हां त्याच्या तर्फेनें **मॉंट्रोज** पुनः स्कॉटलंडच्या उत्तर भागीं येऊन दाखल झाला (इ. स. १६५०). पण या वेळीं त्याचें दैव उलटलेलें असल्यामुळें त्याला स्कॉटिश पार्लमेंटरी सैन्याच्या हातीं लागून **एडिंबरो** येथें फांसावर लटकावें लागलें ! (प्र. ४९ प. ७)

कोक—इंग्लंडांत आजपर्यंत जे नामांकित कायदेपंडित (Lawyers) होऊन गेले, त्यांत सतराव्या शतकांत होऊन गेलेला **एडवर्ड कोक** (Edward Coke) हा एक प्रमुख होता. 'पिटिशन ऑफ राइट' (Petition of Right) म्हणून प्रजेच्या स्वातंत्र्याचें दृढीकरण करणारा जो कायदा इ. स. १६२८मध्यें **चार्लस** राजाला मान्य करावा लागला, त्याच्या जनकांत **कोकचें** नांव प्रमुख होतें. त्याचा जन्म इ. स. १५५१ मध्यें झाला, आणि वयाच्या २७ व्या वर्षापासून त्यानें वकिलीच्या धंद्याला सुरवात केली (Called to the Bar). पहिल्या **जेम्स** राजाच्या वेळच्या राजा–प्रजांमधील भांडणांत तो प्रथम राजपक्षाच्या बाजूला असून इसेक्स, रॅले, वगैरे कित्येक पुढाऱ्यांविरुद्ध चाललेल्या खटल्यांत त्यानें आपलें कायद्याचें ज्ञान आणि खटला जिंकण्याचें कौशल्य (skill) चांगल्या रीतीनें प्रगट केलें. सुप्रसिद्ध 'गन् पॉवडर प्लॉट' (Gun Powder Plot) मधील कटवाल्यांविरुद्ध चाललेल्या खटल्यांत सरकारी वकील तोच होता. पुढें कांहीं वर्षांनीं तो इंग्लंडचा मुख्य न्यायाधीश (Chief Justice) झाला. या हुद्यावर असतांना त्यानें एकदां कुठल्याशा कामांत राजाचा विशिष्ट अधिकार (Prerogative) अमान्य केल्यामुळें त्याच्यावर राजाची अवकृपा झाली. पण त्याच्या या वेळच्या धीटपणानें (boldness) तो लोकप्रिय (popular) झाला. इ. स. १६१६ मध्यें **जेम्सनें** त्याला न्यायाधीश पदावरून काढून टाकलें. पुढें इ. स. १६२० मध्यें त्याची पार्लमेंटमध्यें निवडणूक झाली, आणि तेव्हांपासून मरेपर्यंत (इ. स. १६३३) त्यानें प्रजापक्षाची बाजू (popular side) सोडली नाहीं.

क्लॅरेंडन--**स्टुअर्ट** वंशाशीं मरेपर्यंत एकनिष्ठ राहणाऱ्या मंडळींत **अर्ल ऑफ क्लॅरेंडन** (Earl of Clarendon) याची गणना होते. तो इ. स. १६०८ मध्यें जन्मला. पहिल्या **चार्लस** (Charles I) राजाचें प्रजेशीं भांडण जुंपल्यावर राजाच्या बाजूनें राहून त्यानें अनेक बिकट प्रसंगीं राजाला सहाय्य केलें. पुढें **चार्लस** राजाचा शिरच्छेद होऊन **क्रॉमवेल**च्या ' सामुदायिक सत्तामंडळा'ची (The commonwealth) कारकीर्द इंग्लंडमध्यें सुरू झाली, तेव्हां **क्लॅरेंडन** हॉलंडमध्यें जाऊन राहिला (प्र. ५० प. २१). त्या ठिकाणींही त्यानें **चार्लस**च्या मुलाला (Charles II) शक्य तितकी मदत केली आणि पुढें तो गादीवर आल्यावर त्याच्याबरोबर **क्लॅरेंडन**ही इंग्लंडांत आला. इतिहासांत ज्याला ' **क्लॅरेंडन कोड** ' म्हणजे क्लॅरेंडनचे कायदे असें नांव दिलेलें आहे, ते कॉरपोरेशन (Corporation), युनिफॉर्मिटी (Uniformity), कन्व्हेंटिकल (Conventicle) आणि फाइव्ह माइल (Five Mile) हे चार कायदे **क्लॅरेंडन**च्याच सल्ल्यानें पार्लमेंटनें पास केले होते. पण पुढें त्याच्यावर पार्लमेंटची अवकृपा झाली तेव्हां त्यानें देशत्याग केला. त्यामुळें त्याच्यावर खटला होण्याचा प्रसंग टळला. या हद्दपारीच्या कालांतच त्यानें ' बंडाचा इतिहास ' (History of the Rebellion) हें उत्कृष्ट पुस्तक लिहिलें. त्यानें आपली मुलगी **चार्लस**चा भाऊ **जेम्स** (James II) यास देऊन राजघराण्याशीं शरीरसंबंधही जोडला होता. तो आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी फ्रान्समध्यें रुवें येथें मरण पावला (प्र. ५० प. २१).

मिल्टन--हा इंग्लंडचा प्रख्यात कवि **स्टुअर्ट** कालांतच होऊन गेला. तो इ. स. १६०८ मध्यें जन्मला. अभ्यास आणि प्रवास यांत वयाचीं पहिलीं कांहीं वर्षें घालविल्यावर त्यानें कविता करणें आणि शिकविणें हे दोन व्यवसाय पत्करले. पहिल्या **चार्लस**च्या अमदानींतील राजा-प्रजांच्या भांडणाच्या वेळीं त्यानें प्रजापक्षातर्फे अनेक ' लघुपत्रकें ' (Pamphlets) लिहून दिलीं. 'सामुदायिक सत्तामंडळा'-च्या काळांत त्यानें कांहीं काल परराष्ट्रीय चिटणिसाचें काम (Foreign Secretary to the Commonwealth) केलें. इ. स. १६५४ मध्यें त्याचे डोळे गेले. दुसरा **चार्लस** राजा गादीवर आल्यावर त्यानें बापाच्या वधाचा सूड उगविण्याचें सत्र आरंभलें, त्यांत **मिल्टन** सांपडावयाचा. पण त्याची मोठ्या प्रयासानें त्यांतून सुटका झाली (included in the Act of Indemnity). यानंतरचें त्याचें आयुष्य अप्रसिद्धावस्थेंतच (Obscurity) गेलें. पण त्यानें आपलीं दोन सुप्रसिद्ध

काव्यें ‘ स्वर्गहानि ’ (Paradise Lost) आणि ‘ स्वर्गलाभ ’ (Paradise Regained) हीं लिहिलीं तीं याच कालांत होय (अनुक्रमें इ. स. १६६७ आणि १६७१). तो इ. स. १६७४ मध्यें मरण पावला.

मंक—सतराव्या शतकांत **क्रॉमवेलनें** एकदां इंग्लंडच्या राजपदाचें आसन एकीकडे गुंडाळून ठेवून प्रजासत्ताक राज्य कसें असतें हें इंग्लिश लोकांना दाखवून दिलें (प्र. ४९ प. १६). पण इंग्रजांची मनःप्रवृत्ति निव्वळ प्रजासत्ताक राज्यपद्धतीला अनुकूल नव्हती म्हणून म्हणा कीं कालाचें प्रतिकूलत्व होतें म्हणून म्हणा, **क्रॉमवेलच्या** मृत्यूनंतर प्रजासत्ताक राज्याची योजना कोलमडून पडली आणि राजाचें आसन पुनः मूळच्या जागीं आलें. या आसनाची पुनः मूळच्या जागीं स्थापना करण्यांत (Restoration) ज्यांचे परिश्रम विशेष कारण झाले, त्यांत **जॉर्ज मंक** (George Monk) या लष्करी व आरमारी ‘ कमांडर ’ची गणना करतात. सतराव्या शतकांतील प्रसिद्ध राजा–प्रजायुद्धांत (Civil war) **मंक** हा पहिल्यानें **चार्लसच्या** बाजूनें लढत होता. पण पुढें तो शत्रूच्या हातीं लागल्यामुळें इ. स. १६४६ पर्यंत त्याला तुरुंगाची हवा खावी लागली. नंतर पार्लमेंटच्या सैन्याला येऊन मिळण्याच्या अटीवर त्याची सुटका करण्यांत आली, आणि सामुदायिक सत्तामंडळाच्या कारकिर्दींत त्यानें स्कॉटलंड आणि आयर्लंड या दोन्ही देशांत पार्लमेंटच्या वतीनें अनेक लढाया मारल्या.

इ. स. १६५८ मध्यें **ऑलिव्हर क्रॉमवेल** मृत्यू पावल्यावर त्याचा मुलगा **रिचर्ड क्रॉमवेल** हा ‘ इंग्लंडचा रक्षक ’ झाला. पण हें रक्षकपद त्याच्या शक्तीच्या बाहेरचें असल्यामुळें त्यानें इ. स. १६५९ मध्येंच तें सोडून दिलें (resigned). पुढल्या गोंधळांत पार्लमेंट सभेचें स्वातंत्र्य राखलें जावें म्हणून (for a free Parliament) **मंक** पांच हजार सैन्यानिशीं स्कॉटलंडमधून लंडनमध्यें आला आणि त्या वेळीं भरलेल्या पार्लमेंटनें अखेर **चार्लसच्या** मुलाला इंग्लंडची गादी देण्याचा ठराव करून त्याला फ्रान्समधून येण्याविषयीं निरोप पाठविला. अशा रीतीनें इंग्लंडमध्यें **स्टुअर्ट** राजवंशाची पुनः स्थापना करण्यांत **मंकचा** फार उपयोग झाला (प्र ४९ प ४१). सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडच्या हॉलंडशीं झालेल्या आरमारी युद्धांतही **मंकनें** मोठा पराक्रम गाजविला होता. तो इ. स. १६७० मध्यें वयाच्या ६२ व्या वर्षीं मरण पावला.

शॅफ्टस्बेरी—हा दुसऱ्या **चार्लस** राजाच्या कारकिर्दींतला एक मुत्सद्दी होता. तो इ. स. १६२१ सालीं जन्मला. वयाच्या २१ व्याच वर्षीं त्याचा पार्लमेंटमध्यें प्रवेश झाला, आणि त्या वेळच्या व्हिग व टोरी या दोन पक्षांपैकीं त्यानें ‘ टोरी ’

पक्षांत आपला समावेश करून घेतला. पण पुढें दोन तीन वर्षांनीं त्यानें तो पक्ष सोडून विरुद्ध पक्षांत आपलें नांव दाखल केलें. इ. स. १६५३ मधल्या 'बेअरबोन'-च्या पार्लमेंटमध्यें (Barebone's Parliament) तो होता. पण क्रॉमवेलच्या मृत्यूनंतर त्यानें स्टुअर्टवंशीय दुसऱ्या चार्ल्स राजाला गादीवर आणण्यासाठीं बरीच खटपट केली. त्याचें बक्षीस म्हणून दुसरा चार्ल्स गादीवर आल्यावर त्याला 'चॅन्सेलर ऑफ दि एक्सूचीकर'–(Chancellor of the Exchequer) चें पद मिळालें. 'केबल्' (Cabal) ऊर्फ 'कूट मंडळ' म्हणून नांव मिळालेल्या प्रधानमंडळापैकीं तो एक होता. पण राजाचा भाऊ जेम्स याशीं त्याचें वैमनस्य असल्यामुळें पुढें त्याची त्या प्रधानमंडळांतून हकालपट्टी करण्यांत आली.

नंतर तो पुनः विरोधी पक्षांत (The Opposition) सामील झाला. इ. स. १६७९ मध्यें त्याला पुनः प्रधानपद मिळालें. इंग्रज प्रजेच्या हक्कसंरक्षक कायद्यांत ज्याला बहुमानाचें स्थान आहे, त्या 'हेबिअस कॉर्पस' (Habeas Corpus Act) कायद्याचा मसुदा ज्यांनीं बनविला, त्यांत शॅफ्टस्बेरीचें बरेंच अंग होतें. त्याचें राजाचा भाऊ जेम्स याशीं असलेलें वितुष्ट मात्र कधींच न मिटल्यामुळें चार्लसच्या मागून जेम्सला गादी मिळूं न देण्याचे त्याचे प्रयत्न कधींच थांबले नाहींत. इ. स. १६८१ मध्यें त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप येऊन त्याची चौकशी झाली. पण त्यांत तो निर्दोषी म्हणून सुटला (acquitted). नंतर तो हॉलंडमध्यें पळून गेला आणि तिकडेच इ. स. १६८३ मध्यें मृत्यु पावला.

रसेल–दुसऱ्या चार्ल्स राजाच्या मागून इंग्लंडची गादी कोणाला द्यावी, याबद्दलचा वाद चालू असतांना ती पोपवादी जेम्सला मिळूं नये म्हणून ज्यानें जिवापाड खटपट केली, तो वुइल्यम रसेल (William Russell) हा सतराव्या शतकांतला 'सनदशीर स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करणारा वीर' (A martyr for constitutional freedom) म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. तो 'व्हिग' पक्षाचा असून चार्ल्स राजानें इ. स. १६७९ मध्यें त्याला 'प्रिव्हि कौन्सिलर'ची जागा दिली होती. इ. स. १६८१ मध्यें जेम्सला गादी न देण्याबद्दलचें 'जेम्स-विवर्जन' बिल (Exclusion Bill) लोकसभेनें पास केल्यावर तें सरदार सभेंत पास करून घेण्यासाठीं लोकसभेंतले दोनशें सभासद एकजुटीनें सरदारसभेंत गेले, तेव्हां रसेल हाच त्यांचा पुढारी होता. पुढें चार्लसच्या मरणानंतर 'मनमथ' नांवाच्या त्याच्या दासीपुत्राला इंग्लंडची गादी द्यावी, असा ज्या पुढाऱ्यांचा बेत होता त्यांत रसेल हाही एक होता. त्यांचा तो बेत फुकट गेल्यावर

चार्लस राजाचा खून करण्याचा एक कट (the Rye House Plot) झाला (प्र.५१ प.१५). त्यांत रसेलचें अंग होतें कीं काय हें निश्चित नाहीं. तथापि त्याच्यावर तसा आरोप ठेवून त्याला इ. स. १६८३ मध्यें देहांत प्रायश्चित्त देण्यांत आलें.

सर वुइल्यम टेंपल—हा दुसरा चार्लस आणि दुसरा जेम्स यांच्या कारकिर्दींतील एक बडा राजकारस्थानी पुरुष (diplomatist) होता. तो इ. स. १६२८ मध्यें जन्मला. इ. स. १६८८ मधला इंग्लंड, हॉलंड आणि स्वीडन या देशांमध्यें झालेला स्नेहसंधि (प्र.५०प.२३), जेम्सची मुलगी मेरी हिचें ऑरेंजच्या वुइल्यमशीं (William of Orange) झालेलें लग्न, वगैरे गोष्टी यानेंच घडवून आणल्या. वुइल्यम राजा इंग्लंडच्या गादीवर आल्यावर तोही महत्त्वाच्या कामीं टेंपलची सल्ला घेतल्याशिवाय राहात नसे. आपलीं शेवटलीं वर्षें त्यानें 'अभ्यास' (Study) आणि 'बागायत' (Gardening) यांत घालविलीं. तो इ. स. १६९९ मध्यें मरण पावला.

कार्डिनल रिचेल (Cardinal Richelieu)–हा सतराव्या शतकांतला फ्रान्समधला एक कट्टा पुराणमताभिमानी धर्माचार्य होता. इ. स. १६२२ मध्यें फ्रान्सचा बादशहा तेरावा लुई (Louis XIII) यानें त्याला आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें. आणि तेव्हांपासून पुढें वीस वर्षेंपर्यंत त्यानें नुसत्या फ्रान्सचींच नव्हे तर सगळ्या युरोप खंडाचीं राज्यसूत्रें आपल्या हातांत वागविलीं. इतका तो सव्यसाची आणि कार्यनिपुण होता.

जात्या आणि शिक्षणानें तो पुराणमताभिमानी असल्यामुळें फ्रान्समधले धर्मसुधारक (Huguenots) हे त्याला शत्रूसारखे वाटत. त्यामुळें कधीं निरनिराळ्या तऱ्हेचे राजकारणी डाव खेळून तर कधीं गुप्त कारस्थानें करून त्यानें त्यांचा अगदीं नायनाट करून टाकला. राजमंत्री या नात्यानें कधीं प्रत्यक्ष हातांत शस्त्र धारण करून तर कधीं धर्माचार्यांच्या नात्यानें आपल्या पादोदकानें पाखंड्यांना पुनीत करण्याचा विधि करून त्यानें सुधारकांचा जवळजवळ बींमोड करून टाकला. * या कामीं साधनांच्या

* At times, when it suited his purpose, he put on the helmet of the warrior, and led in person the armies of France; and then again he donned the red cap of the cardinal, and forced proud nobles to kneel before him, and at his feet seek pardon for acts which his own unbearable tyranny had provoked—Myres.

सूक्तासूक्ततेकडे तो बिलकूल लक्ष देत नसे. तो मुळीं म्हणेच कीं, " मला कोणी अडथळा करील, त्याला मी वाटेल तें करून पायांखालीं तुडवून टाकीन, आणि असें करतांना कांहीं चूक झालीच तर तिच्यावर माझी छाटी (scarlet robe) टाकून ती झांकून घेईन. ! "

पहिल्या चार्लस राजाच्या कारकिर्दींत फ्रान्समधले सुधारक 'रोशेल'-(La Rochelle) च्या किल्ल्यांत अडकून पडले असतां इंग्रजांनीं त्यांना थोडीबहुत मदत केली (प्र.४३ प. ९). पण रिचेलनें त्यांचें कांहीं एक चालूं न देतां इ. स. १६२८ मध्यें रोशेलचा किल्ला जमीनदोस्त करून त्याच्यावरून नांगर फिरविला ! पण अशा रीतीनें त्यानें आपलें सारें आयुष्य फ्रेंच सुधारकांचा नायनाट करण्यांत घालविलें, तरी फ्रान्सचें परराष्ट्रीय धोरण यशस्वी करून त्याला युरोपियन राष्ट्रांत पहिल्या दर्जाचा मान मिळवून देण्याच्या कामीं त्यानें केलेले परिश्रम फ्रान्सच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखे झाले आहेत. आणि म्हणूनच त्याला कित्येक इतिहासकारांनीं फ्रान्सचा 'वुल्से' हें नांव दिलें आहे.

चौदावा लुई (Louis XIV)—स्टुअर्ट राजे इंग्लंडमध्यें राज्य करीत असतां फ्रान्समध्यें कट्ट्या रोमन कॅथोलिकांचें वर्चस्व होतें. आणि मागें एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें रोमन कॅथोलिक आणि एकतंत्री कारभार यांचें साहचर्य असल्यामुळें फ्रान्समधले राजे या वेळीं सगळ्या युरोपांतल्या एकतंत्री राजांचे मुकुटमणि होऊन राहिले होते. त्यांतल्या त्यांत इ. स. १६४३ पासून इ. स. १७१५ पर्यंत गादीवर असलेला चौदावा लुई हा तर अनियंत्रित राजसत्तेचा मूर्तिमंत पुतळाच (representative of absolute monarchy) होता म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं 'ना विष्णुः पृथिवीपतिः' किंवा 'राजा करील ती पूर्व' ही म्हण अगदीं यथार्थपणें कोणाला लागू पडण्यासारखी असेल, तर ती या चवदाव्या लुईलाच होय.

चवदाव्या लुईच्या पूर्वी त्याचा बाप तेरावा लुई गादीवर असतांना फ्रान्सचा 'वुल्से' रिचेल यानें तेथल्या सुधारकांचा कसा बींमोड केला होता हें रिचेलच्या चरित्रांत सांगितलेंच आहे. रिचेल इ. स. १६४३ मध्यें मरण पावला. आणि त्यानंतर सहाच महिन्यांनीं तेरावा लुईही मरण पावला. त्या वेळीं चवदाव्या लुईचें वय अवघें पांच वर्षांचें होतें. त्यामुळें रिचेलनें संघटित व सामर्थ्यवान् केलेल्या फ्रान्सच्या

राज्याची धुरा वाहण्याचें काम लुईची आई ॲन (Anne of Austria) हिच्यावर पडलें, आणि तिनें तें कार्डिनल माझारिन (Cardinal Mazarin) या कार्डिनल रिचेलच्याच तोडीच्या मुत्सद्याच्या मदतीनें चांगल्या रीतीनें पार पाडलें. या कालांत फ्रान्सच्या प्रतिस्पर्धी ऑस्ट्रियाच्या घराण्याची युरोपांतील सत्ता नामशेष होऊन फ्रान्सचें हें बुर्बोन (Bourbon) घराणेंच युरोपियन राजकारणांत अग्रेसर होऊन बसलें.

कार्डिनल माझारिन इ. स. १६६१ मध्यें मरण पावला. त्या वेळीं चौदावा लुई तेवीस वर्षांचा झाला होता. त्यानें लगेच आपल्या सर्व मंत्र्यांना आणि खात्यांच्या सर्व कार्यवाहांना (secretaries) एकत्र बोलावून सांगितलें कीं, "आतांपर्यंत माझ्या राज्याचीं सूत्रें मीं कार्डिनल माझारिन याच्याकडे सोंपविलीं होतीं, पण आजपासून माझा मीच मुख्य प्रधान होणार आहें" (I shall be my own prime minister). यानंतर सुमारें ५० वर्षेंपर्यंत हा लुई फ्रान्समध्यें स्वतंत्र (absolute) व बेजबाबदार (irresponsible) या शब्दांच्या अगदीं खऱ्या अर्थाप्रमाणें राज्यकारभार चालवीत होता. फ्रान्स हा देश म्हणजे आपली खासगी इस्टेट (private estate) असून देवानेंच फ्रेंच प्रजेवर राज्य करण्याचें काम आपल्यावर सोंपविलें आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. फ्रेंच राष्ट्रांतील कायदा, त्याची बजावणी, आणि न्याय हीं तिन्ही स्वतःच्या व्यक्तींत समाविष्ट झालेलीं आहेत अशा अर्थानें 'फ्रान्स म्हणजे मीच' असे शब्द तो वारंवार उच्चारून दाखवीत असे. रिचेलच्या कारकिर्दींत तेरावा लुई हा युरोपमध्यें पहिल्या प्रतीचा मनुष्य समजला जाई, पण खुद्द फ्रान्समध्यें लोकांत त्याचा नंबर दुसरा गणला जाई. पण चौदावा लुई हा घरीं दारीं सर्वत्र पहिल्या नंबरालाच चमकत असे.+

लुईच्या कारकिर्दींतील पहिल्या दहा बारा वर्षांत कोल्बर्ट (Colbert) हा त्याचा मुख्य सल्लागार होता. तो शांततेचा भोक्ता असून फडणिशी कामांत (Finance) तरबेज होता. त्याच्या प्रयत्नानें फ्रान्समधील शेती, उद्योगधंदे, व्यापार, आणि न्याय, या खात्यांत उत्कृष्ट सुधारणा झाल्या. पण पुढें कोलबर्टचें शांततेचें

+ Richelieu made Louis XIII the first man in Europe but the second in his own kingdom; Louis XIV was the first man at home as well as abroad.

धोरण लुईला न आवडून त्यानें शेजारच्या राष्ट्रांवर आक्रमण करून सर्व जगभर स्वतःची प्रतिष्ठा व फ्रान्सचा मोठेपणा प्रस्थापित करण्याचें धोरण अवलंबिलें; आणि इ. स. १६६७ पासून इ. स. १७१४ पर्यंत चार मोठमोठीं युद्धें करून युरोपखंडांतल्या भूमातेला गोगलगाय करून सोडलें. नेदरलंडला फ्रान्सचा सुभा बनविण्यासाठीं हॉलंडचा प्रिन्स वुइल्यम याच्याशीं सहा सात वर्षें चाललेलें युद्ध, फ्रेंच प्रॉटेस्टंटांचा नायनाट करून जिकडे तिकडे कॅथोलिक पंथाची स्थापना करण्यासाठीं ह्यूजिनॉट लोकांचा अनन्वित छळ केल्यामुळें युरोपांतल्या प्रॉटेस्टंट संस्थानिकांनीं एकजूट करून (प्र.५४, प.११) लुईशीं केलेलें दशवार्षिक युद्ध, आणि स्पेनच्या वारशाचें युद्ध (प्र.५५ प. ३) हीं सर्व युद्धें लुईच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळेंच घडून आलीं. आणि या सर्व कालांत लुईची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पुरी झाली आणि फ्रान्सची इतर राष्ट्रांना वाटणारी दहशत कायम राहिली; तरी या सतत चालू असलेल्या युद्धांना लागणारा खर्च, बादशाही दरबार सांभाळण्यासाठीं लागणारा खर्च, मोठमोठे वाडे आणि सार्वजनिक इमारती यांच्यापायीं पाण्यासारखा ओतला जाणारा पैसा, या सर्व खर्चांच्या पायीं फ्रान्सचें दिवाळें वाजण्याचा प्रसंग आला. त्यामुळें अखेर इ. स. १७१५ च्या सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस जेव्हां लुईला अखेरचा श्वास लागला, तेव्हां सगळें राष्ट्र कर्ज, दारिद्र्य, आणि असंतोष यांनीं व्याप्त होऊन आपल्या वाड्याच्या दरवाजाशीं येऊन ओरडत आहे असें त्याच्या दृष्टीला दिसूं लागलें. मृत्युसमयीं त्यानें आपल्या मनाशीं आपल्या कारकिर्दीचा आढावा काढला, तेव्हां त्यालाही आपल्या महत्त्वाकांक्षेनें केवढा अनर्थ घडवून आणला याची जाणीव झालेली दिसून आली. कारण त्यानें आपल्या मुलाला—हा मुलगा या वेळीं ५ वर्षांचा होता—मृत्युशय्येवरून जो उपदेश केला त्यांत हे शब्द होतेः—" मुला, तूं आतां लवकरच माझ्यासारखा मोठा राजा (Great King) होशील. पण यापुढें इमारती बांधण्यांत किंवा युद्धें करण्यांत माझें अनुकरण करूं नको. शेजारच्या राष्ट्रांशीं शांततेची वर्तणूक ठेवण्याचा प्रयत्न कर. आणि आपल्या प्रजेवरील करांचा बोजाही हलका करण्याची शिकस्त कर. "

अर्वाचीन काळीं युरोपखंडांत जे राजे होऊन गेले त्यांत मान, वैभव, आणि दरबारी थाटमाट, यांत लुईची बरोबरी कोणी केली असेलसें वाटत नाहीं. लुईचे राहण्याचे वाडेच सहासात होते, आणि त्यांतल्या व्हर्सेलिसच्या एका वाड्यालाच दहा कोटि पौंड खर्च झाला होता. त्याच्या जनानखान्यांत फ्रान्सचें सगळें लावण्य येऊन उभें राहिलें होतें, आणि त्याच्या दरबारांत विनोद आणि विद्वत्ता यांची जोडी

सदैव हात जोडून उभी होती. राजवाड्यांतून कांहीं नाहीं तरी पंधरा हजारांची पंगत रोज उठत असे, आणि ही सगळी मंडळी राष्ट्राच्या पैशावर केवळ रिकामटेकड्या चैनींत दिवस काढीत असे (all living in costly and luxurious idleness at the expense of the people). मोठमोठे सरदार आणि दरकदार सकाळच्या वेळीं त्याच्या अंगावरचा पोषाख चढविण्यासाठीं सज्ज असत, आणि रात्रीं झोंपतांना तो उतरून ठेवण्यालाही तितक्याच लोकांची त्याला गरज लागे. अर्थात अशा दरबारांत साहाजिकपणेंच शिरणारीं सर्व प्रकारचीं व्यसनेंही या दरबारांत शिरलीं होतींच. मात्र त्यांच्यावर सुसंस्कृत चालींचा आणि दरबारी मान्यतेचा मुलामा चढलेला होता. अभिरुचि आणि शिष्टसंप्रदाय या बाबतींत फ्रान्सनें सांगावें आणि इतरांनीं ऐकावें अशीच त्या वेळीं स्थिति झाली होती.*

मात्र या काळ्या बाजूबरोबरच फ्रेंच वाङ्मयाच्या बाबतींत लुईच्या कारकिर्दींत झालेली फ्रान्सची प्रगति त्याच्या कारकिर्दीची पांढरी बाजू म्हणून लक्षांत ठेवण्यासारखी आहे. स्वतः लुई मोठासा पंडित होता असें नाहीं. तथापि त्यानें आपल्या दरबारांत विद्वानांना आश्रय दिल्यामुळें अनेक फ्रेंच ग्रंथकार त्या वेळीं उदयाला आले. कवि आणि नाटककारांनीं तर त्याचा दरबार नेहमींच भरलेला असे, आणि ' ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी ' हा न्याय त्यांनाही लागू असल्यामुळें ते आपल्या अनेक प्रकारच्या वाङ्मयनिर्मितीनें लुईचा बडेजाव आणि मोठेपणा गाऊन त्याची कीर्ति दिगंत पसरविण्याला मनोभावानें सहाय्य करीत असत. कॉरनेल (Corneille इ. स. १६०६–१६८४), रॅसिन (Racine इ. स. १६३९–१६९९) आणि मोलियर (Moliere इ. स. १६२२–१६७३) हे त्या वेळचे नामांकित नाटककार होत.

या लुईचा इंग्लंडच्या स्टुअर्ट राज्यकर्त्यांशीं फार प्रेमाचा संबंध होता. त्यानें दुसरा चार्लस आणि त्याचा भाऊ दुसरा जेम्स यांना आर्थिक मदत करून इंग्लंडच्या प्रजेबरोबर भांडण्याला फूस दिली आणि तद्द्वारा इंग्लंडला अंतःकलहांत गुंतवून ठेवून त्याला आपल्या युरोपांतील प्रॉटेस्टंट शत्रूंना मदत करण्यापासून दूर राखलें. इ. स. १६७० मध्यें त्यानें चार्लसबरोबर असा एक गुप्त करार केला होता कीं, चार्लसनें लुईला हॉलंडवर स्वारी करण्याला मदत करावी, आणि त्याचा मोबदला म्हणून बरीचशी

* In all matters of taste and fashion France gave laws to the Continent.

रकम लुईनें चार्लसला द्यावी, इतकेंच नव्हे तर या कृत्यानें इंग्लंडमध्यें रोमन कॅथोलिक पंथाची स्थापना होईल या भीतीनें इंग्रज प्रजा बेदिल झाली, तर लुईनें आपलें फ्रेंच सैन्यही इंग्लंडला पाठवावें. इ. स. १६७८ मधला ओएटसचा काल्पनिक कट आणि त्याच्या पायीं कित्येक रोमन कॅथोलिकांना भोगाव्या लागलेल्या शिक्षा (प्र. ५१ प. ३१४) या सर्व इंग्रज प्रजेच्या मनांत या गुप्त तहानें उत्पन्न झालेल्या संशयाच्या व भीतीच्या विकारांचेंच फळ होतें. चार्लसनंतर गादीवर आलेला जेम्स हा तर लुईचा एक पेन्शनरच बनला होता. त्यानें लुईच्या या पैशाच्या बळावर चार्लसच्या वेळचें दहा हजारांचें खडें सैन्य वीस हजारांपर्यंत वाढविलें आणि रोमन कॅथोलिक धर्माचा उघड पुरस्कार केला. पण त्याचा परिणाम लुईच्या अपेक्षेच्या अगदीं उलट होऊन स्वतः जेम्सलाच इंग्लंडची गादी सोडून लुईच्या दरबाराचा आश्रय करावा लागला (प्र. ५३ प. ९). आणि त्याचा युरोपांतला शत्रु हॉलंडचा वुइल्यम इंग्लंडच्या गादीवर येऊन त्यानें इंग्लंडला लुईच्या विरुद्ध युद्धाला उभें केलें.

जेम्सच्या मृत्यूनंतर त्याच्या 'तोतया' मुलालाही लुईनें पैशाची मदत केली होती. पण इंग्लिश लोकांनीं आतां कायद्यानेंच आपल्या राजाला प्रॉटेस्टंट पंथाला बांधून टाकलेला असल्यामुळें इंग्लंडला रोमन कॅथोलिक धर्माची दीक्षा देण्याचे लुईचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. उलट लुई जेम्सच्या मुलांना मदत करून 'अव्यापारेषु व्यापार' करतो म्हणून वुइल्यमच्या मृत्यूनंतरही इंग्रज राष्ट्र लुईशीं शत्रुभावानेंच वागलें आणि स्पेनच्या वारशाच्या युद्धांत त्यानें ऑस्ट्रिया व हॉलंड यांना मदत केली.

सर आयझॅक् न्यूटन—गुरुत्वाकर्षणाच्या नियमांचा शोध लावणारा (Discoveror of the Laws of Gravitation) हा प्रख्यात इंग्रज गणिती (mathematician) स्टुअर्ट कालांतच होऊन गेला. तो इ. स. १६४२ मध्यें जन्मला. केंब्रिज येथें विद्याभ्यास करीत असतांच भौतिक शास्त्रीय शोध लावण्याकडे त्याचें लक्ष असे. बी. ए. झाल्यावर लगेच त्यानें प्रकाश आणि रंग यांच्या संबंधाच्या आपल्या नव्या उपपत्तींचें विवरण करण्याला सुरवात केली. इ. स. १६६५ मध्यें लंडनमध्यें प्लेगचा कहर उसळला, त्या वेळीं तो आपल्या खेड्यांत रहावयास गेला. आणि त्याच ठिकाणीं एके दिवशीं आपल्या बागेंत बसला असतां झाडावरून एक फळ खालीं पडतांना पाहून त्याला पृथ्वीच्या अंगच्या आकर्षणशक्तीची कल्पना सुचली. 'प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका' (Principia Mathematica) हा गणितशास्त्रावरील आपला ग्रंथ त्यानें इ. स. १६८७ मध्यें प्रसिद्ध

केला. पुढें लवकरच त्याची केंब्रिजतर्फे पार्लमेंटमध्यें निवडणूक झाली आणि इ. स. १६९५ मध्यें त्याची इंग्लंडच्या टांकसाळ खात्यांत नेमणूक होऊन पुढें त्या खात्याचा तो मुख्य (Master of the Mint) झाला. धार्मिक बाबतींत तो भाविक ख्रिस्ती असून बायबलमध्यें वर्णिलेल्या भविष्यांचा एक आस्थेवाईक अभ्यासक होता (He made a careful study of the prophecies of the Bible). तो इ. स. १७२७ मध्यें मरण पावला.

तिसरा वुइल्यम—इंग्लंडच्या राज्यपद्धतीला हल्लीं जें 'सनदशीरपणा'चें (Constitutional) स्वरूप आहे तें तिला एकदम प्राप्त झालेलें नाहीं, किंवा तें सगळें एकाच कायद्यावर अधिष्ठित आहे असेंही नाहीं. निरनिराळ्या वेळीं अनेक देशभक्तांनीं व मुत्सद्यांनीं राजसत्तेवर नियंत्रण घालण्याच्या खटपटी केल्या. त्यांतल्या कांहीं यशस्वी झाल्या तर कांहीं फुकटही गेल्या. प्रजेच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करण्याचे व रक्तपाताचे प्रसंगही अनेक येऊन गेले. पण असा रक्तपात करावा न लागतां केवळ प्रसंग व परिस्थिति अनुकूल म्हणून राजसत्तेवर अधिकाधिक बंधनें पडल्याचे जे चार दोन प्रसंग इंग्लंडच्या इतिहासांत दिसून येतात, त्यांत दुसऱ्या जेम्सनें इंग्लंडांतून पाय काढल्यावर त्याचा जांवई इंग्लंडमध्यें तख्तनशीन झाल्याचा प्रसंग फार महत्त्वाचा मानतात. हा प्रसंग राज्यक्रांतीचा होता. पण त्या क्रांतीला रक्ताचें गालबोट न लागतां ती सहज लीलेनें व रक्ताचा एक थेंबही न सांडतां घडून आली. म्हणून तिला 'निरक्त राज्यक्रांति' (Bloodless Revolution) असें म्हणतात.

इ. स. १६८८ मध्यें दुसरा जेम्स राजा इंग्लंडमधून पळाला, तेव्हां त्याचा जांवई वुइल्यम हा युरोपखंडांतील महाबलाढ्य व महत्त्वाकांक्षी बादशहा चौदावा लुई याच्याशीं भांडणांत गुंतलेला होता. वुइल्यमला लुईशीं एकट्यानें टक्कर देणें शक्य नव्हतें; म्हणून तो युरोपांतील दुसऱ्या छोट्या मोठ्या संस्थानिकांचा व राजांचा संघ स्थापून त्या सगळ्यांच्या मदतीनें लुईचे पसरत जाणारे हातपाय तोडण्याची खटपट करीत असे. अशा वेळीं इंग्लंडची गादी रिकामी झालेली व इंग्लंडचे मुत्सद्दी आपल्याला प्रेमानें त्या गादीवर आरूढ होण्याचा आग्रह करीत असल्याचें त्याला आढळून आलें. तेव्हां ही गादी हस्तगत केल्यास राजपदापरी राजपद मिळून इंग्रजांसारखें एक प्रबल राष्ट्र आयतेंच फ्रान्सविरुद्ध उभें करतां येईल या हेतूनें त्यानें ती गादी स्वीकारली, आणि इंग्रज मुत्सद्यांना खुष करण्यासाठीं आपण होऊनच राजसत्तेवर नियंत्रणें घालून घेतलीं. त्याच्यापूर्वीं हॉलंडमध्यें असतांना युरोपांतील 'सत्तेचा समतोलपणा' (Balance

of Power) राखणारा एक धोरणी मुत्सद्दी म्हणून त्याची प्रसिद्धि होती, आणि इंग्लंडचें परराष्ट्रीय धोरणही या सत्तेच्या समतोलपणाला पोषक असेंच असल्यामुळें या वेळीं या दोन राष्ट्रांची एकी होण्याला विलंब लागला नाहीं. असो.

वुइल्यम गादीवर आला त्या वेळीं इंग्लंडमध्यें ' टोरी ' आणि ' व्हिग ' हे दोन राजकीय पक्ष कायमचे प्रस्थापित झाल्यासारखे झाले होते. पण वुइल्यमनें आपल्याला सर्व राष्ट्राचा पाठिंबा मिळावा म्हणून प्रथम आपले मंत्री दोन्ही पक्षांतून निवडून घेतले. पण पुढें या मंत्र्यांचें आपसांत व लोकसभेशीं पटेना म्हणून लोकसभेंत (House of Commons) ज्या पक्षाचें बहुमत असेल, त्या पक्षांतलेच मंत्री नेमण्याची वहिवाट त्यानें चालू केली (प्र. ५४ प. ३४). त्याचप्रमाणें धार्मिक बाबतींत निरनिराळ्या पंथोपपंथीयांना आपापल्या मताप्रमाणें आपल्या देवळांतून प्रार्थना करण्याची सवलत, न्यायाधिशांना राज्यकर्त्यांची भीडभाड न ठेवतां न्यायनिवाडा करण्याची मोकळीक, मुद्रणस्वातंत्र्य, प्रजेवर कराचा बोजा पडूं नये व युद्धासारख्या खर्चाच्या खात्याची तर सोय व्हावी म्हणून ' राष्ट्रीय कर्ज ' व सरकारी मदतीच्या बँकेची स्थापना, वगैरे गोष्टींनीं वुइल्यमची कारकीर्द इतिहासप्रसिद्ध होऊन राहिली आहे. त्याच्या कारकिर्दीत इंग्लंडला युरोपांतील राजकारणांत वारंवार पडावें लागलें आणि हा राजा इंग्लंडचा पैसा व फौज यांचा विनाकारण हॉलंडच्या हितार्थ उपयोग करतो असें म्हणून टोरी पक्षानें अनेक वेळां त्याला विरोधही केला. तथापि वुइल्यमनें आपल्या मनाची शांति ढळूं न देतां युक्तीनें फ्रान्सच्या राजाचें युरोपांतील वर्चस्व कमी करण्याचें आपलें जीवितकार्य सफल करून घेतलें. राजकीय दूरदृष्टि आणि व्यवहारकौशल्य हे त्याच्या अंगचे मुख्य गुण होते. सतराव्या शतकाच्या अखेरीला इंग्लंडमध्यें सनदशीर राज्यपद्धति आणि प्रॉटेस्टंट धर्म यांचें रक्षण करून त्यांना वाढीला लावल्याचें बरेंचसें श्रेय वुइल्यमकडे जातें. तो इ. स. १७०२ मध्यें मरण पावला (प्र. ५४ प. २९).

हॅलिफॅक्स—हा सतराव्या शतकांतील इंग्लंडचा एक प्रसिद्ध फडणीस (Finance Minister) होता. त्याचें मूळचें नांव **चार्लेस मॉंटेग्यू** (Charles Montague) असें असून हॅलिफॅक्स हें त्याचें सरदारकी मिळाल्यानंतरचें नांव होतें. तो इ. स. १६६१ मध्यें जन्मला. केंब्रिज येथें विद्याभ्यास करीत असतांच विनोद आणि शीघ्रकवित्व यांविषयीं त्याची प्रसिद्धि झाली होती. पार्लमेंटमध्यें प्रवेश झाल्यावर 'व्हिगां'चा उत्कृष्ट वक्ता (a whig orator) म्हणून तो सर्वांच्या पुढें आला, आणि प्रधानमंडळांत प्रवेश झाल्यावर उत्कृष्ट फडणीस म्हणून फार नांवाजला.

राष्ट्राच्या तारणावर राष्ट्रीय कर्ज उभारण्याच्या कल्पनेचा जनक (originator of the National Debt), इंग्लंडच्या बँकेचा प्रमुख पुरस्कर्ता, ' वातायन–कर ' (window tax) आणि दिवसाच्या दिवसाला व्याज मिळणाऱ्या सरकारी हुंड्यांचा (Exchequer bills) जनक, म्हणून त्याचें नांव प्रसिद्ध झालें. इ. स. १६९७ मध्यें तो इंग्लंडचा मुख्य खजिनदार (First Lord of the Treasury) झाला. पण पुढें त्याचा डौल आणि उद्धटपणा (vanity and arrogance) यांनीं त्याची लोकप्रियता ओसरली, आणि त्याला आपल्या जागेचा राजिनामा देऊन सरदारसभेंतील नीरस जीवन कंठावें लागलें. त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं म्हणजे टोरी पक्षानें त्याची सरदारसभेपुढें चौकशी (impeachment) करण्याचा दोनदां प्रयत्न केला, पण दोन्ही वेळां तो साधला नाहीं. जॉर्ज राजा (George I) गादीवर आल्यावर त्याला ' अर्ल ' (Earl) ही पदवी मिळून पुनः मुख्य प्रधानाची जागा देण्यांत आली (इ. स. १७१५). पण तो त्याच वर्षी मरण पावला.

मार्लबरो—हा स्टुअर्ट कालीन इंग्लंडचा एक विख्यात सेनापति आणि मुत्सद्दी होता. त्याचा जन्म इ. स. १६५० मध्यें झाला. त्याला लहानपणापासूनच लढाईची हौस असल्यामुळें तरुणपणीं त्यानें **मार्शल ट्युरेन** (Marshal Turenne) नांवाच्या सेनापतीच्या हाताखालीं राहून युरोपखंडांत चांगलें नांव मिळविलें, आणि **जेम्स** राजा गादीवर आल्यावर त्याची इमानें इतबारें नोकरी बजाविली (served James faithfully). पुढें **जेम्स** राज्यत्याग करून पळून गेल्यावर नवा आलेला राजा **वुइल्यम** याचीही त्याच्यावर प्रथम फार मर्जी होती. पण पुढें त्याच्या राजनिष्ठेबद्दल संशय येऊन **वुइल्यमनें** त्याला कांहीं दिवस तुरुंगांत ठेविलें होतें. इ. स. १७०२ मध्यें युरोपांत स्पेनच्या गादीविषयींचें युद्ध (War of the Spanish Succession) सुरू झाल्यावर त्याला तुरुंगवासांतून मुक्त करून ' दोस्तांच्या ' सैन्यांत ' कॅप्टन जनरल'च्या (Captain General) हुद्द्यावर नेमण्यांत आलें. आणि या वेळेपासून पुढें त्याला जे एकसारखे जय मिळत गेले, त्यांनीं त्याचें नांव ' सर्वजित् सेनापति ' म्हणून प्रसिद्ध झालें. इ. स. १७०४ पासून इ. स. १७०९ पर्यंतच्या पांच वर्षांत त्यानें चार मोठमोठ्या लढाया जिंकल्या, पार्लमेंटनें अनेक वेळां मुद्दाम ठराव करून त्याचे आभार मानले, आणि पैसा, मान, आणि पदव्या (riches, honours, and titles) यांचा त्याच्यावर वर्षावच झाल्यासारखा झाला.

ॲन राणीच्या दरबारांतही त्याचें फार वजन होतें. पण तें मुख्यतः त्याच्या बायकोच्या राणीशीं असलेल्या सलगीमुळेंच होतें. पुढें त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनीं मोठ्या युक्तीनें मिसेस् **मार्लबरो**विषयीं राणीचें मन कलुषित केलें, आणि तिचें दरबारांत जाणेंयेणें कमी झाल्याबरोबर **मार्लबरो**विषयींचें राणीचें मतही बदललें. त्याच्यावर सार्वजनिक पैशाचा खासगी कामाकडे उपयोग केल्याचा आरोप ठेवून त्याचे सर्व अधिकार काढून घेण्यांत आले (dismissed from all his offices). तेव्हां तो युरोपांत निघून गेला, आणि ॲन राणीच्या मृत्यूपर्यंत तिकडेच राहिला. ॲनच्या मागून जॉर्ज राजा गादीवर आल्यावर त्याला पुनः त्याच्या लष्करी हुद्यावर नेमण्यांत आलें (was restored to his military appointments). पण आतां त्याचें शरीर काम करण्याला असमर्थ झाल्यामुळें त्यानें सार्वजनिक कामांतून आपलें अंग काढून घेतलें (withdrew from public life) आणि इ. स. १७२२ मध्यें तो हा लोक सोडून गेला.

हार्ले—कित्येक माणसांच्या आयुष्यक्रमांत दैवाचे उलटे सुलटे खेळ पहावयास सांपडतात. ॲन (Anne) राणीच्या कारकिर्दींत 'टोरी' आणि 'व्हिग' या दोन पक्षांमध्यें भांडणें चाललीं, त्या वेळीं ज्यांचा आयुष्यक्रम अशा दैवाच्या खेळांनीं आकर्षक झाल्यासारखा दिसतो, त्यांत **रॉबर्ट हार्ले** (Robert Harley) या मुत्सद्याची गणना करतां येईल. तो इ. स. १६६१ मध्यें जन्मला. ॲन राणीच्या कारकिर्दींतील पहिल्याच पार्लमेंटमध्यें तो अध्यक्ष (Speaker) निवडला गेला. इ. स. १७०४ मध्यें त्याचा मंत्रिमंडळांत प्रवेश झाला. पण पुढें चार वर्षांनीं त्यानें मंत्रिपद सोडून विरोधी टोरी पक्षाचें पुढारीपण (Leader of the Tory Opposition) स्वीकारलें. इ. स. १७१० मध्यें टोरी पक्ष अधिकारारूढ झाल्यावर हार्ले हा मुख्य प्रधान झाला. युट्रेटच्या तहानंतर त्याला 'ऑक्सफर्डची सरदारकी' (Earl of Oxford) देण्यांत आली. इ. स. १७१४ मध्यें **बॉलिंगब्रोक**नें त्याला पदभ्रष्ट केलें (प्र. ५५ प. २०). त्याच्या पुढल्या वर्षीं 'तोतया'शीं कारस्थान (intrigue) केल्याच्या आरोपावरून त्याची तुरुंगांत रवानगी झाली. दोन वर्षें तुरुंगांत काढल्यावर त्याची सुटका झाली. पण नंतर त्यानें राजकारणांतून अंग काढून वानप्रस्थाश्रम स्वीकारला (retired into privacy) आणि इ.स.१७२४ मध्यें त्याला मृत्यूनें गांठलें. त्याला हस्तलिखित ग्रंथ जमा करण्याचा फार नाद होता. 'हार्लेचा हस्तलेख-संग्रह' (Harleian collection of manuscripts) इंग्लंडमध्यें फार प्रसिद्ध असून मौल्यवान् मानतात.

प्रस्तुत भागांत आलेल्या महत्त्वाच्या गोष्टी

'गन् पॉवडर प्लॉट'—हा जेम्स (पहिला) राजाच्या कारकिर्दींतला राजा आणि पार्लमेंट या दोघांवरही घाव घालणारा एक फार मोठा कट होता. या कटांत पार्लमेंटचें सभागृह बंदुकीच्या दारूनें उडवून देऊन राजा आणि पार्लमेंट या संस्थाच नामशेष करून टाकण्याचा डाव 'गाय फॉक्स' या नांवाच्या एका धाडशी माणसानें टाकला होता. आणि त्यांत **सर वॉल्टर** रॅलेसारख्या इलिशाबेथ–युगांतल्या नामांकित योध्याचें (warrior) अंग होतें. हा कट पुढें उघडकीस येऊन कटवाले फांसावर गेले (प्र. ४१ प. ८ ते १२). रॅलेला एकदम फांसावर न चढवितां बरींच वर्षें तुरुंगांतच ठेवलें होतें. पण पुढें स्पेनच्या राजाच्या आग्रहावरून इ. स. १६१८ मध्यें त्यालाही फांसावर चढविण्यांत आलें.

'ना विष्णुः पृथिवीपतिः' (Divine Right of Kings)—"राजा हा ईश्वरी अंश असून त्याची सत्ता अमान्य करणें हें प्रत्यक्ष परमेश्वरी सत्तेचाच उपमर्द करण्यासारखें आहे; परमेश्वर ज्याप्रमाणें सर्वशक्तिमान व 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' समर्थ आहे, त्याचप्रमाणें त्याचा भूतलावरील प्रतिनिधि जो राजा तोही समजला पाहिजे" असें मानणें याला इंग्रजींत 'डिव्हाइन राइट ऑफ किंग' म्हणजे 'ना विष्णुः पृथिवीपतिः'चें तत्त्व असें म्हणतात. जेम्स (पहिला) राजा म्हणत असे "As it is atheism and blasphemy to dispute what God can do, so it is high contempt in a subject to dispute what a King can do, or to say that the King cannot do this or that" म्हणजे "परमेश्वराला अमुक एक गोष्ट करतां येत नाहीं असें म्हणणें हें जसें नास्तिकपणाचें लक्षण आहे, त्याचप्रमाणें राजाला अमुक एक गोष्ट करतां येणार नाहीं असें म्हणणें हेंही राजद्रोहाचें लक्षण आहे."

राजाच्या परमेश्वराशीं जोडण्यांत आलेल्या या संबंधाला त्या वेळच्या एका भोळ्या समजुतीचीही फार मदत झाली होती. ती समजूत म्हणजे गंडमाळेचा रोग (Scrofula) झालेला मनुष्य राजाच्या हस्तस्पर्शानें बरा होतो ही होय. इंग्लंडच्या गादीवरचा जुना 'इंग्लिश' राजा 'एडवर्ड धि कनफेसर' याच्या वेळेपासून इंग्लंडच्या गादीवरील व्यक्तीला ही परमेश्वरी देणगी वंशपरंपरेनें प्राप्त झालेली आहे अशी त्या

वेळच्या भाविक लोकांची समजूत असून, पहिल्या चार्लस राजानें आपल्या कारकिर्दीत दहा हजार लोकांना आपल्या करस्पर्शानें रोगमुक्त केल्याची दंतकथा अद्यापिही सांगण्यांत येते. 'लेकी' (Lecky) हा इतिहासकार म्हणतोः—"सुशिक्षित लोकांना ही गोष्ट खोटी वाटो व ते तिची थट्टा करोत, पण राजाच्या हस्तस्पर्शाच्या गुणाविषयींची ही समजूत सामान्य गरीब लोकांच्या अंःकरणांत राजपुरुष हा इतर मानवी प्राण्यांपेक्षां फार वरच्या कोटींतला पुरुष आहे अशी भावना उत्पन्न करीत असे, आणि त्यामुळें त्यानें व्यवहारांत कशीही वर्तणूक केली तरी ती 'न देवचरितं चरेत्' या न्यायानें खपून जात असे." स्टुअर्ट राजांपैकीं जेम्स व चार्लस या राजांनीं राजाच्या या परमेश्वरदत्त हक्काचें (Divine Right of Kings) प्रस्थ कसें माजविलें व त्याचा परिणाम काय झाला हें मागील प्रकरणांतून आलेंच आहे (प्र. ४८ व ५३).

पिटिशन ऑफ राइटः—ही पहिल्या चार्लस राजाच्या कारकिर्दीतली पार्लमेंटनें राजाकडून कबूल करून घेतलेली एक महत्त्वाची सनद असून इंग्लंडच्या सनदशीर राज्यपद्धतीच्या इतिहासांत तिला 'मॅग्ना चार्टा' च्या खालचें पहिलें स्थान दिलेलें आहे. या सनदेनें प्रजेच्या कित्येक महत्त्वाच्या हक्कांना राजानें लेखी मान्यता दिली (प्र. ४३. पा० ११). हे हक्क पुढें स्वतः चार्लसनें आणि त्याच्या पुढील स्टुअर्ट राजांनीं अनेक वेळां गुंडाळून ठेवले हें खरें, पण या वेळीं ते एका कागदावर लखी नमूद होऊन राहिले या गोष्टींतच या सनदेचें महत्त्व आहे. कारण जुलमी राजे अनेक वेळां कायद्यांचा बुरखा किंवा झगा अंगावर चढवूनच (under the forms of law) जुलूम चालवितांना दिसतात. तेव्हां हे कायदे काय आहेत हें प्रजेच्या डोळ्यांसमोर स्पष्टपणें ठेवतां येण्याची सोय असली म्हणजे ते कायदे कसे मोडले जात आहेत हें त्यांना चटकन् कळतें.

बिल ऑफ राइट—ही वरच्या 'पिटिशन ऑफ राइट'चीच दुसरी आवृत्ति होय. दुसरा जेम्स राजा इंग्लंडांतून पळून गेल्यावर हॉलंडच्या वुइल्यमला इंग्लंडचें राजपद देतांना पार्लमेंटनें आपल्या हक्कासंबंधाचा एक ठरावच त्याच्याकडून कबूल करून घेतला. तोच या 'बिल ऑफ राइट' मध्यें नमूद आहे.

या 'बिला'नें राजांच्या जन्मसिद्ध हक्कांला कायमची मूठमाती मिळाली. कारण या कायद्यानें स्पष्टपणें असें ठरवून टाकलें कीं, यापुढें इंग्लंडच्या राजांना राजसत्ता प्राप्त व्हावयाची ती दैवायत्त राजकुलजन्मामुळें नसून लोकसभायत्त इच्छेमुळें होय. आणि पार्लमेंटला तशी इच्छाच झाली, तर तें वाटेल त्या राजाला काढून टाकून

आणि त्याच्या वारसांना झुगारून देऊन अगदीं नव्या वंशाची इंग्लंडच्या गादीवर स्थापना करूं शकेल * (प्र. ५३ प. १२).

हेबिअस कॉरपस ॲक्ट—इंग्रजांनीं आपलें व्यक्तिस्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं पार्लमेंट सभेमध्यें जे कायदे ' संमत ' करून ठेवले आहेत, त्यांत इ. स. १६७९ मधला हेबिअस कॉरपस ऊर्फ व्यक्ति-स्वातंत्र्य-रक्षक कायदा हा फार महत्त्वाचा आहे. हा कायदा दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकिर्दींत शॅफ्टसबेरी नांवाच्या ' व्हिग ' पुढाऱ्याच्या खटपटीनें पास झाला. या कायद्याच्या पूर्वीं एकाद्यावर खटला भरून त्याला तुरुंगांत पोंचविला म्हणजे त्याची न्यायासनासमोरील चौकशी केव्हां होईल तेव्हां होईल, तिला मुदतीची अट नसे. पूर्वीं स्कॉटलंडची राणी मेरी, सर वॉल्टर रॅले, लॉड वगैरेंवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना तुरुंगांत टाकल्यावर कितीतरी वर्षांनीं चौकशीस सुरवात झाली होती. त्यामुळें आरोप शाबीत होण्याच्या पूर्वींचा तुरुंगवासच नंतरच्या शिक्षेपेक्षां ज्यास्ती कष्टप्रद अशी स्थिति होत असे. पण कायद्यानें आतां असें ठरवून टाकण्यांत आलें कीं, इंग्लंडमधील कोणाही व्यक्तीला एकादा अपराध केल्याच्या आरोपावरून कैद करण्यांत आलें, तर त्याला विशिष्ट मुदतींत किंवा त्यानें तशी इच्छा प्रदर्शित करतांच न्यायाधिशासमोर नेऊन हजर केला पाहिजे; आणि न्यायाधिशानें त्याच्यावर कोणता आरोप आहे हें दाखल करण्याबद्दल तुरुंगावरच्या अधिकाऱ्याला हुकूम(writ) केला पाहिजे. तसेंच एकाद्या अपराधाबद्दल एकवार चौकशी होऊन आरोपीची दोषमुक्तता झाली असतां त्याच अपराधाबद्दल त्याला पुनः पकडतां येऊं नये, किंवा स्वदेशाच्या हद्दीबाहेर बंदींत ठेवतां येऊं नये अशीही तजवीज या कायद्यानें करण्यांत आली (प्र. ५१ प. ६).

क्लॅरेंडन कोडः—चार्लस (दुसरा) राजाच्या कारकिर्दींत क्लॅरेंडन नांवाचा एक ' प्रस्थापित धर्माभिमानी ' मुत्सद्दी राजाचा सल्लागार असतांना त्याच्या प्रेरणेनें इंग्लंडच्या खास अगर 'राष्ट्रीय धर्म' संस्थेला बळकटी आणण्यासाठीं चार कायदे कर-

---

* The Bill of Rights plainly asserted that the kings of England derive their right and title to rule not from the accident of birth, but from the will of the people, and declared that Parliament might depcse any king, and excluding from the throne his heirs, settle the crown anew in another family. (—Myres.)

ण्यांत आले. त्यांपैकीं एका कायद्यानें (Corporation Act) म्युनिसिपालि-ट्यांच्या सर्व सभासदांनीं इतर धर्ममतांचा निषेध करून या राष्ट्रीय धर्मालाच अनुसरण्याची व राजाविरुद्ध हत्यार न उचलण्याची शपथ घेतली पाहिजे असें ठरविण्यांत आलें. दुसऱ्या कायद्यानें (Act of Uniformity) इंग्लंडांतील सर्व धर्मगुरूंनीं (Bishops) इंग्लंडांतील सामान्य प्रार्थनापुस्तकच धर्ममंदिरांत वापरलें पाहिजे व त्यांतील मतें मान्य केलीं पाहिजेत असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें सरकारी अगर खासगी शाळामास्तर व युनिव्हर्सिटींतील अगर विद्यापीठांतील अधिकारी यांनीं पहिल्या कायद्यांत सांगितल्याप्रमाणें शपथ घेतली पाहिजे असेंही ठरविण्यांत आलें. हा कायदा ज्यांनीं मान्य करण्याचें नाकारलें त्यांना ' नॉन्–कन्फॉरमिस्ट ' (non-conformist) म्हणजे ' दुराराध्य ' असें नांव पडलें. या दुराराध्यांत मुख्य भरणा अर्थातच वीर सुधारकांचा होता. या वीर सुधारकांतही बॅप्टिस्ट (Baptist), प्रेस्बिटेरियन (Presbyterian), व इन्डिपेंडंट (Independent) असे तीन उपपक्ष होतेच. वरच्या कायद्यानें या वीर सुधारकांचा बीमोड करण्याचा क्लॅरेंडनचा उद्देश होता, पण तो सफल झाला नाहीं. या चारही पंथांचे अनुयायी आपापल्या मताप्रमाणें धर्मानुसरण व धर्मोपदेश करीतच राहिले, व कालांतरानें त्यांचे व्यवस्थित धर्मपंथही स्थापित झाले. या नॉन्–कन्फॉर्मिस्टांना ' डिसेंटर ' (Dissenter) म्हणजे ' नाकबुले ' असेंही दुसरें एक नांव पडलें होतें.

या पंथांच्या मंडळींना सार्वजनिक प्रार्थनामंदिरें बंद झाल्यामुळें ते खासगी जागीं जमून प्रार्थना चालवूं लागले. पण या खासगी मेळ्यांतून ते राजद्रोहाचा फैलाव करतात या सबबीवर क्लॅरेंडनच्या तिसऱ्या कायद्यानें (Conventical Act) कुटुंबांतील माणसांशिवाय पांच इसमांनीं असल्या प्रार्थनेला एकत्र जमूं नये असें ठरविण्यांत आलें. आणि शेवटीं एवढ्यानेंही निभेना, तेव्हां ' राजाविरुद्ध हत्यार उचलणें बेकायदेशीर आहे आणि इंग्लंडांत राजमान्य झालेला राष्ट्रीय धर्म व राज्य उलथून पाडण्याचा मी कधींही प्रयत्न करणार नाहीं ' अशी प्रथम शपथ घेतल्याशिवाय असल्या ' दुराराध्य ' धर्मोपदेशकांनीं कोणत्याही ' म्युनिसिपल ' गांवापासून पांच मैलांच्या आंत उपदेश करतां नये, व्याख्यानें देतां नये, किंवा शाळा घालतां कामा नये असें ठरविण्यांत आलें (Five Mile Act). या चारी कायद्यांना मिळून ' क्लॅरेंडनचें कोड ' असें म्हणतात (प्र. ५० प. ११।१२).

'पर्स' म्हणजे पैशाच्या पिशवीवरचा ताबा—जगांतले सगळे व्यवहार पैशाच्या जोरावर चालतात. अनियंत्रित राजसत्ता काय किंवा मर्यादित राजसत्ता अगर लोकसत्ता काय, व्यक्तीच्या संसाराप्रमाणेंच राज्यकारभार सुरळीत चालण्याला पैसा हा पाहिजेच. "धनानें अकुलीनाला कुलीनता प्राप्त होते, अपंडित पंडित बनतो, आपत्ति दूर होतात, आणि संसार सुखानें चालतो. धनासारखा दुसरा खरा 'बंधु' नाहीं" असें कित्येक कवींनीं धनाचें वर्णन केलें आहे. आणि उलट पक्षीं कित्येकांनीं "जनयन्त्यर्जने दुःखं तापयन्ति विपत्तिषु । मोहयन्ति च संपत्तौ कथमर्थाः सुखावहाः ॥" असें म्हणून 'अर्था'चें 'अनर्थत्व'ही वर्णन केलें आहे. पण कवींनीं केलेली ही निंदा-स्तुति एका बाजूला ठेवली असतां लोकव्यवहारांत ज्याच्याजवळ धनाचा भरपूर सांठा असेल, त्याला इतरांवर आपली बरी वाईट सत्ता गाजवितां येते हा अनुभव अनेक वेळां येतो. इंग्लंडच्या इतिहासांत ज्या ज्या वेळीं राजांनीं प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजवून त्यांना त्राहि भगवान् करून सोडलें, त्या त्या वेळीं त्यांच्या हातची तिजोरी भरलेली होती आणि ती जेव्हां रिकामी झाली तेव्हांच लोकांना आपले हक्क प्रस्थापित करून घेतां आले असें दिसून येतें. ट्यूडर राजांना अनियंत्रितपणें राज्य करतां आलें त्याचें एक कारण त्यांच्या हातची भरलेली तिजोरी हेंच होतें. स्टुअर्ट राजांनाही हातीं पैसा असेपर्यंत प्रजेवर जुलूम करतां आला. पण प्रजेनें राजाच्या जुलमाचें हें मर्म ओळखून तिजोरीची सत्ता आपल्या ताब्यांत घेतली, तेव्हांपासून राजांचा जुलूम कमी होऊं लागला. जेम्स राजाच्या पूर्वीं राजाचें मुख्य उत्पन्न त्याला खालील बाबींपासून मिळत असे.

(१) राजाच्या खास मालकीच्या जमिनी आणि टनेज आणि पौंडेज यांपासून मिळणारें उत्पन्न हें त्याचें नित्याचें उत्पन्न (ordinary revenue) होतें.

(२) देणग्या आणि कर्जे (gifts and benevolences) हें प्रसंगविशेषीं प्रजेंतील श्रीमंत वर्गाकडून खुषीनें किंवा सक्तीनें वसूल करण्यांत येणारें उत्पन्न असे.

(३) एकाद्या विशिष्ट जिन्नसाचा व्यापार करण्याचा परवाना किंवा तो जिन्नस दरबाराला पुरविण्याचा मक्ता देतांना (Monopolies) राजाला जो नजराणा द्यावा लागे त्यापासून मिळणारें उत्पन्न.

पैकीं 'टनेज' आणि 'पौंडेज'चा कर पार्लमेंटांत एकदां मंजूर झाला म्हणजे राजाला तो तहहयात वसूल करतां येत असे. पण दुसऱ्या जेम्सच्या कारकिर्दींत एकदां पार्लमेंटनें हा कर राजाच्या हयातीपर्यंत मंजूर न करतां

एक वर्षापुरताच मंजूर केला, आणि वुइल्यम–मेरीला गादी देतांना तर पार्लमेंटच्या संमतीशिवाय खजिन्यावरच्या अधिकाऱ्यांनीं खर्चाला पैसा देणें हा फौजदारी गुन्हा (Penal offence) ठरविला. या योगानें राष्ट्राच्या पैशाची पिशवी लोकसभेच्या हातीं आली (कारण पैशासंबंधाचें प्रत्येक 'बिल' प्रथम लोकसभेंत आलें पाहिजे असा नियम होता), आणि लोकसभा हेंच राज्यकारभाराचें खरें स्थान (actual seat of government) बनलें. कारण राजा कितीही जुलमी व एककल्ली निघाला तरी पार्लमेंटनें पैशाची मागणी मंजूर करीत नाहीं म्हटलें कीं त्याचा हात लुला पडलाच. शिवाय दरसालचा पैसा दरसाल मंजूर करून घेतला पाहिजे, या नियंत्रणामुळें राजावर पार्लमेंटची बैठक दरसाल भरविण्याची जबाबदारी आपोआपच येऊन पडली, आणि पार्लमेंट सभेवांचून राज्यकारभार हांकला जाण्याचा संभव कमी झाला (प्र. ५४ प. १).

व्यय व्यवस्था (Appropriation of Supplies)—तिसऱ्या वुइल्यम राजाला इंग्लंडची गादी अर्पण करतांना पार्लमेंटनें राजसत्तेवर निर्बंध घालणारे कित्येक करार त्याच्याकडून मान्य करून घेतले, त्यांत पार्लमेंटनें राज्यकारभाराच्या ज्या खात्यासाठीं एकादी रक्कम मंजूर केली असेल ती त्याच खात्यावर खर्च झाली पाहिजे, तिचा दुसऱ्या कामीं व्यय करण्याचा राजाला अधिकार नाहीं असें ठरवून घेतलें, आणि अशी व्यवस्था होते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं सरकारी जमाखर्चाचा हिशोब तपासणारे ' कमिशनर 'ही नेमले. ही जी ज्या त्या खात्याची रक्कम त्याच खातीं खर्च करण्याची व्यवस्था तिला इंग्रजींत ' ॲप्रोप्रिएशन ऑफ सप्लाइज ' म्हणजे ' पुरवठ्याची व्यवस्था ' असें नांव असून, ती ठरवून टाकण्याचें काम पैशाच्या पिशवीवर ताबा असलेल्या लोकसभेकडेच असल्यामुळें लोकसभेचा तो एक महत्त्वाचा व जबाबदारीचा अधिकार आहे असें समजतात.

व्हिग आणि टोरी–पार्लमेंट सभेंत राजपक्ष आणि प्रजापक्ष असे प्रथम भेद पडले ते पहिल्या **चार्लस** राजाच्या कारकिर्दीत. त्या वेळीं राजपक्षीय मंडळीला कॅव्हेलियर (Cavalier) ऊर्फ ' शिलेदार ' असें म्हणत असत. त्यांना हें नांव पडण्याचें कारण त्यांची पोषाखाच्या व चालचलणुकीच्या बाबतींतील ऐट व इष्कबाजी हें होय. याच्या उलट प्रजापक्षीय लोकांना ' राउंडहेड ' (Roundhead) ऊर्फ ' चक्रशीर्ष ' हें नांव पडण्याचें कारण त्या मंडळींत ज्या ' प्यूरिटन ' ऊर्फ ' वीर सुधारक ' लोकांचा मुख्य भरणा होता, ते लोक आपल्या डोक्यावर लांब केंस न राखतां ते

वारंवार कापून डोकें 'चक्राकार' ठेवीत असत हें होय. या दोन्ही पक्षांना पुढें दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकिर्दींत 'टोरी' व 'व्हिग' अशीं नावें प्रचारांत आलीं. तीं प्रथम उभयतांनीं एकमेकांची निंदा करण्यासाठींच उपयोगांत आणलीं होतीं. त्यांच्या निंदाव्यंजकत्वाचें किंवा तिरस्कारसूचकत्वाचें कारण पुढीलप्रमाणें होतें:—चार्लस राजाच्या मनांतून आपला भाऊ जेम्स याला आपल्या मागून गादीचा वारस नेमावयाचा होता. पण पार्लमेंटसभेंतील बहुमत जेम्सच्या विरुद्ध असल्यामुळें विरुद्ध पक्षानें जेम्सला गादी द्यावयाची नाहीं असा पार्लमेंटचा स्पष्ट ठरावच करून ठेवण्याचें योजलें. पण पार्लमेंट सभा बोलावण्याचा अधिकार पडला राजाच्या हातांत. तेव्हां तो हा कायदा पास होईल या भीतीनें पार्लमेंट सभेची बैठकच बोलावीना. याला तोड म्हणून शॅफ्टस्बरी नांवाच्या लोकपक्षाच्या पुढाऱ्यानें 'पार्लमेंट सभेची बैठक बोलवा' असे विनंतीअर्ज इंग्लंडमधील सर्व परगण्यांतून करविले. तेव्हां या राजाविरुद्ध अर्ज करणाऱ्या लोकांना प्रथम 'पिटिशनर्स' म्हणजे 'विरुद्ध अर्जवाले' हें नांव पडलें. याच्यापूर्वीं स्कॉटलंडमध्यें राजाच्या विरुद्ध असणाऱ्या लोकांना 'व्हिग' हें नांव पडलें होतें. तेव्हां हळू हळू हे राजाविरुद्ध अर्ज करणारे लोक स्कॉटलंडमधील 'व्हिगां'सारखेच राजद्रोहे आहेत असें ध्वनित करण्यासाठीं या अर्जवाल्यांना 'तुम्हीही त्यांच्यासारखेच व्हिग आहां' असें म्हणूं लागले. त्यावरून 'व्हिग' म्हणजे राजविरोधी हा अर्थ त्या नांवाला प्राप्त झाला.

याच्या उलट पार्लमेंटची सभा बोलावणें न बोलावणें ही गोष्ट राजाच्या मर्जींतली आहे, तींत आपण हात घालूं नये, असें म्हणणारे जे लोक होते ते वरच्या अर्जवाल्यांनीं केलेल्या अर्जांचा निषेध करीत, म्हणून त्यांना प्रथम 'निषेधवाले' (Abhorrers) असें म्हणत असत. याच्यापूर्वीं आयर्लंडमधील रोमनकॅथोलिक लोकांना 'टोरी' या नांवानें संबोधीत असत. चार्लसचा भाऊ जेम्स आतां पक्का रोमन कॅथोलिक बनलेला होता. तेव्हां त्याच्या बाजूचे ते सगळे रोमन कॅथोलिक म्हणजे 'टोरी' अशा अर्थानें राजपक्षीयांना खिजविण्यासाठीं म्हणून व्हिगांनीं विरुद्ध पक्षाला 'टोरी' हें नांव दिलें.

या शब्दांची दुसरी एक व्युत्पत्ति अशी आहे कीं, We hope in God या चार शब्दांच्या वाक्यांत अनुक्रमें w, h, i, g, हीं जीं चार अक्षरें येतात, तीं एकत्र केल्यानें whig हा शब्द बनतो, व तो तें वाक्य वारंवार उच्चारणाऱ्या व तें आपलें एक 'ब्रीदवाक्य' (motto) म्हणुन धारण करणाऱ्या स्कॉटिश लोकांना प्रथम लावूं लागले.

'टोरी' (Tory) या शब्दाचें मूळ Toree या आयरिश शब्दांत असून त्या शब्दाचा अर्थ ' मला दे ' किंवा 'टाक' असा आहे, व तो शब्द त्या वेळचे आयर्लंडांतले 'वाटमारे' उपयोगांत आणीत असल्यामुळें त्यांना लावीत असत. राजाचे करवसुलीसाठीं येणारे अधिकारी प्रजेला या वाटमाऱ्यांप्रमाणेंच वाटत असल्यामुळें पुढें तो शब्द सगळ्याच राजपक्षीयांना लावूं लागले (प्र. ५१ प. ७८).

अशा रीतीनें ' व्हिग ' या नांवाचा उगम स्कॉटलंडशीं व ' टोरी ' नांवाचा उगम आयर्लंडशीं आहे. पुढें राजावर टीका करून धर्मस्वातंत्र्याचा कैवार घेण्याचें काम मुख्यत्वें 'व्हिग'च करीत, व जुन्या संस्था व चाली यांचा कैवार घेऊन इंग्लंडांतल्या प्रस्थापित राष्ट्रीय धर्ममतांत बदल करूं न देण्याचें काम मुख्यत्वेंकरून ' टोरी ' करीत. म्हणून व्हिग म्हणजे 'राजविरोधी' व टोरी म्हणजे 'राजानुकूल' असे अर्थ या नांवांना प्राप्त झाले. आज त्याच अर्थानें पण त्यांतला राजावरील टीकेचा तेवढा संबंध सुटून 'लिबरल' म्हणजे जरूर तर जुन्यांत बदल घडवून आणणारे व 'कॉन्झरव्हेटिव्ह' म्हणजे होतां होईतों जुन्याला चिकटून राहणारे असे अर्थ या नांवांना प्राप्त झाले असून ' मजूर ' हा प्रथम लिबरल पक्षांतून निघालेला पण आतां एक स्वतंत्रच असा पक्ष तयार झाला आहे.

'हाय चर्च' आणि 'लो चर्च'—इंग्लंडचा राजा तिसरा वुइल्यम मृत्यु पावला (इ. स. १७०२), त्या सुमारास इंग्लंडमध्यें टोरी व व्हिग असे दोन राजकीय पक्ष कायमचे प्रस्थापित झाले होते. टोरी लोक सामान्यतः तक्ताधिपतीच्या बाजूचे, राजकुलांत जन्म होणें ही गोष्ट ईश्वरी इच्छेनुसार घडून येणारी म्हणून त्या इच्छेला मान देऊन, तक्तनशीन व्यक्तीचा वारशानें प्राप्त होणारा हक्क ईश्वरी नियमानुसारच त्याला मिळतो असें मानणारे, व धार्मिक बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्याचें फाजील स्तोम न माजवितां प्रस्थापित धर्माचीं बंधनें कडकपणें पाळलीं पाहिजेत असें म्हणणारे होते. या त्यांच्या धार्मिक मतांवरून त्यांना 'धर्माचें उच्च स्वरूप कायम ठेवणारे' अशा अर्थाचें ' हाय चर्च ' म्हणजे 'उच्च धर्मवादी' असें नांव मिळालें होतें. याच्या उलट व्हिग पक्षांतले अनेक लोक राजाच्या गादीवरील हक्कांत ईश्वरी नियमाचा कांहीं संबंध नसून जनता हीच या बाबतींतली अखेरची निर्णायक सत्ता आहे, व तिनें घालून दिलेल्या नियमांनुसारच गादीचा वारसा चालला पाहिजे असें म्हणणारे होते. त्यांचीं धार्मिक मतेंही ' हाय चर्च ' मंडळीपेक्षां ज्यास्त ' उदार ' असून धार्मिक बंधनें शक्य तितकीं कमी असावीं असें तें म्हणत असत. म्हणून त्यांना विरुद्ध पक्षाचे लोक 'ढिल्या

धर्माचे' किंवा 'नीच धर्मवादी' अशा अर्थाचें ' लो चर्च ' हें नांव देत असत. पण हीं नांवें ॲन राणीच्या पश्चात् फारशीं ऐकूं येईनाशीं झालीं.

इंग्लंड आणि स्कॉटलंड—ट्यूडर काल संपल्यावर म्हणजे इलिझाबेथ राणीच्या पश्चात् स्कॉटलंडचा राजा सहावा जेम्स हा इंग्लंडच्या गादीवर बसून इंग्लंड–स्कॉटलंडची एकी झाली हें पृ. ३७० वर सांगितलेंच आहे. पण ही एकी म्हणजे दोन राजघराण्यांची एकी होती. इंग्रज लोक आणि स्कॉट लोक यांची एकी व्हावयाला आणखी एक शतकाचा काल लोटावा लागला. दरम्यान इंग्लंडमध्यें राजा–प्रजांचें जें भांडण झालें, व ज्यांत एका राजाला फांशीं जावें लागून दुसऱ्याला हद्दपार व्हावें लागलें, त्या भांडणांत स्कॉट लोकांनीं म्हणजे स्कॉट लोकांतील सुधारक पंथीयांनीं आपल्या समानधर्मी इंग्रज सुधारकांना मदत केली. किंबहुना त्यांनीं अशी मदत केली नसती तर चार्लस राजाचा शिरच्छेद घडून न येतां कदाचित् इतिहासाचा ओघही बदलून गेला असता. पण तें कसेंही असलें तरी स्कॉट लोकांना आपण चार्लस राजाला क्रॉमवेलच्या लष्करशाहीच्या हवालीं केल्याबद्दल पुढें पश्चात्ताप झाला. आणि त्यांनीं त्याच्या वधानंतर त्याच्या मुलांना शक्य तितकी मदत करून या राजवधाच्या सांसर्गिक पातकाबद्दल जणूं काय प्रायश्चित्तच घेतलें. पण हें प्रायश्चित्त त्यांना फार महाग पडलें, आणि पुढल्या पन्नास पाउणशें वर्षांच्या इंग्लंड–स्कॉटलंडच्या या लढ्यांत हजारों स्कॉट लोक प्राणांस मुकले.

शिवाय इ. स. १६०३ मध्यें इंग्लंड-स्कॉटलंड या दोन्ही देशाच्या राजघराण्यांची एकी झाली तरी तेथल्या पार्लमेंट सभा स्वतंत्रच होत्या. अर्थात् ज्या ज्या वेळीं इंग्रज व स्कॉट यांच्या हितसंबंधांत विरोध येई, त्या त्या वेळीं या पार्लमेंट सभा आपापल्या देशाच्या लोकांची बाजूच उचलून धरीत. सतराव्या शतकाच्या सुरवातीपासून इंग्लंडचें व्यापार व वसाहती यांकडे विशेष लक्ष लागूं लागलें. स्कॉटलंडच्या लोकांचें या बाबींकडे लक्ष त्या मानानें फार उशीरां लागलें, आणि जेव्हां तें लागलें तेव्हां इंग्रज लोकांनीं बरीच आघाडी मारली होती. शिवाय स्वार्थ हा व्यक्तीला काय किंवा व्यक्तिसमूहांनीं बनलेल्या राष्ट्राला काय केव्हांही दुसऱ्याच्या उत्कर्षाच्या आड येण्याला कारण होत असतोच. त्यामुळें तिसऱ्या वुइल्यमच्या कारकिर्दींत इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनी-प्रमाणें आपणही एक कंपनी काढून व्यापार करावा असें जेव्हां कित्येक स्कॉट लोकांनीं ठरविलें, आणि त्याप्रमाणें स्कॉटिश पार्लमेंटकडून मदत घेऊन अमेरिकेच्या उत्तर व दक्षिण भागांच्या हद्दीवर असलेल्या ' डारियन ' संयोगीभूमीवर

आपली स्वतंत्र वसाहत स्थापली, तेव्हां इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या मालकांनीं डच लोकांचें सहाय्य घेऊन स्कॉट लोकांचा हा उद्योग हाणून पाडला (प्र.५४ प.३५). पण इंग्लिशांच्या या कृत्याचा स्कॉटिश पार्लमेंटला इतका राग आला कीं, त्यानें एक ठराव करून व्यापार व नौकानयन या बाबतींत स्कॉटिश लोकांना इंग्रजांच्या बरोबरीचे हक्क मिळाल्याखेरीज ॲन राणीच्या पश्चात इंग्लंडच्या गादीवर येणाऱ्या राजाचा अधिकार आपण मानावयाचा नाहीं असें ठरविलें, आणि हा ठराव अंमलांत आणण्यासाठीं आपलें कवायती सैन्य तयार करण्यालाही सुरवात केली.

पण इंग्रज लोक आतां आपसांतील यादवीला कंटाळले होते, आणि त्यांच्या बाहेरच्या व्यापाराचा व वसाहतींचा जम नुकताच बसूं लागला होता. तेव्हां हा जम या यादवीनें बिघडेल ही गोष्ट त्यांच्या वेळींच लक्षांत आल्यामुळें इंग्लिश मुत्सद्यांनीं इंग्लंड–स्कॉटलंडच्या शारिरिक म्हणजे भूविषयक ऐक्याप्रमाणेंच इंग्रज व स्कॉच यांचें हार्दिक म्हणजे अंतःकरणाचेंही ऐक्य घडवून आणण्याला काय उपाय योजावे याची चर्चा करण्यासाठीं उभयपक्षांची एक कमिटी नेमली. या कमिटीनें दोन्ही पार्लमेंट सभा एकांत एक मिसळून दोन्ही देशांचा एकजीव करण्याची शिफारस केली, आणि त्या शिफारशीप्रमाणें इ. स. १७०७ मध्यें इंग्लंड–स्कॉटलंडच्या अंतःकरणांचा मिलाफ करणारा कायदा दोन्ही पार्लमेंट सभांत पास करून घेण्यांत आला (प्र. ५५ प. ८).* या कायद्यानें उभयपक्षीं पुढील शर्ती मान्य करण्यांत आल्या:—

(१) इंग्लंड व स्कॉटलंड हे दोन पृथक् देश न मानतां दोन्ही देश मिळून एकच 'ग्रेट ब्रिटन' असा देश मानण्यांत यावा, आणि दोन्ही देशांना मिळून इंग्रज साधु 'जॉर्ज' याचा तांबडा क्रॉस आणि स्कॉट साधु 'अँड्र्यूज' याचा पांढरा क्रॉस यांचा मिलाफ केलेलें 'युनियन जॅक' नांवाचें ऐक्यदर्शक निशाण असावें.

(२) ॲन राणीच्या पश्चात् इंग्लंडच्या पार्लमेंटनें ठरविल्याप्रमाणें हॅनोव्हरची सोफिया व तिचे प्रॉटेस्टंट वंशज हेच ग्रेटब्रिटनच्या संयुक्त तख्ताचे अधिपति समजले जावे.

(३) खुष्कीवरील व दर्यावरील व्यापारांत उभय राष्ट्रांना समसमान हक्क असावे.

---

*इ. स. १५०३ मध्यें इंग्लिश व स्कॉटिश राजघराण्यांमध्यें विवाह घडून आला (प्र. २७ प. १३), इ. स. १६०३ मध्यें इंग्लंड–स्कॉटलंडच्या गाद्या एक झाल्या (प्र. ३७ प. १४) आणि आतां इ. स. १७०७ मध्यें दोन्ही पार्लमेंटसभा एक होऊन दोनशें वर्षांपूर्वीं आरंभ केलेल्या ऐक्याला पूर्णावस्था आली.

(४) स्कॉट लोकांच्या प्रेस्बिटेरियन धर्मपंथांत व त्यांच्या चालीरितींत व कायद्यांत पार्लमेंटनें ढवळाढवळ करूं नये. इंग्लिश वजनें, मापें, व नाणीं हीं मात्र स्कॉटलंडनें स्वीकारावीं.

(५) लंडनच्या पार्लमेंटमध्यें सरदारसभेंत बसण्यासाठीं १६ व लोकसभेंत बसण्यासाठीं ४५ सभासद स्कॉटलंडनें निवडून पाठवावे.

अशा रीतीनें इ. स. १७०७ मध्यें झालेली ही दोन्ही देशांची एकी उभय पक्षीं हितावह होऊन हें संयुक्त ब्रिटिश राष्ट्र बाहेर साम्राज्यसंपादनार्थ दुसऱ्या राष्ट्रांशीं एकदिलानें झगडण्याला तयार झालें * (प्र. ५५ प. ५११०).

इंग्लंड आणि आयर्लंड--यांचे संबंध मात्र **स्टुअर्ट** कालांत अधिकच चिरडीला गेलेले दिसतात. **ट्यूडर** काळांत इलिझाबेथ राणीच्या कारकिर्दीच्या अखे-

---

* इंग्लंड-स्कॉटलंडची ही एकी दोन्ही देशांना कशी उपकारक झाली हें **मायर्सनें** चांगल्या रीतीनें दाखवून दिलें आहे:—

" The Union was advantageous to both countries. For, it was a union not simply of hands, but of hearts. England's constant and costly watch through ten centuries of her northern frontiers against raid and invasion could now be intermitted. The thorn in her side, which the meddlesome hand of France was constantly pressing was now removed. A chief cause of weakness and annoyance was turned into an element of strength."

" Equally beneficial was the measure to Scotland. Her connection with the manufacturing and commercial enterprizes of England resulted in a wonderful expansion of her national energies and resources. Manufactories sprang up on every side, insignificant towns grew suddenly into great centres of trade and population, and agriculture was inproved, so that in less than half a century, the whole aspect of the country underwent an entire transformation. "

रीला तिकडे बंडाचा वणवा पेटला होता,* पण तो लवकरच विझला, आणि सगळ्या आयर्लंडवर इंग्लिश लोकांची सत्ता प्रस्थापित झाली. यानंतर स्टुअर्ट राजा पहिला जेम्स याच्या कारकिर्दीत पुष्कळ इंग्लिश आणि स्कॉटिश लोक आयर्लंडमध्यें जाऊन तिकडच्या मूळच्या अमीरउमरावांच्या जप्त केलेल्या जमिनींत वसाहती करूं लागले (प्र. ४२ प. ८). त्यामुळें आयरिश लोकांच्या मनांतला इंग्लिश-द्वेष अधिकच वाढला. हा द्वेष दंडुकेशाहीच्या जोरावर दडपून टाकण्यासाठीं जेम्सच्या मागून गादीवर बसलेल्या चार्लस राजानें आपल्या स्टॅफर्ड नामक आवडत्या सरदाराची तिकडे योजना केली. त्यानें खड्या सैन्याच्या जोरावर सहा सात वर्षेंपर्यंत (इ. स. १६३३-१६४०) आयर्लंडमध्यें अगदीं 'चोख' (thorough) व्यवस्था राखली (प्र. ४४ प. ५). पण तो तिकडून निघून आल्यावर आयरिशांच्या दबलेल्या असंतोषानें दुप्पट जोरानें उडी मारली, आणि इ. स. १६४१ पासून पुढें ११ वर्षेंपर्यंत सगळ्या आयर्लंडभर बंडाचा वणवा एकसारखा पेटत राहिला (प्र. ४६ प. ४). या मुदतींत खुद्द इंग्लंडमध्यें राजा व प्रजा यांच्यामध्यें झगडे चालू होते. पण इंग्लिश लोक सामान्यतः प्राटेस्टंट पंथी आणि आयरिश लोक सामान्यतः कॅथोलिक पंथी हा दोहोंमध्यें भेद असल्यामुळें प्रॉटेस्टंट इंग्लिश लोकांचें वर्चस्व असलेल्या इंग्लिश पार्लमेंटनें आयरिश कॅथोलिकांना कोणत्याही प्रकारची मदत न करतां उलट त्यांच्या धार्मिक सवलती काढून घेणारे कायदेच त्यांच्यावर लादले. त्यामुळें इंग्लिश राजांचें राज्य काय किंवा पार्लमेंटचें राज्य काय दोन्हीही आयरिश कॅथोलिकांना सारखींच अशी स्थिति झाली.

इ. स. १६४९ मध्यें क्रॉमवेलच्या लष्करशाहीनें चार्लस राजाचा प्राण घेतल्यावर इंग्लंडांत क्रॉमवेलचें 'प्रजासत्ताक' राज्य स्थापन झालें. पण त्या प्रजासत्ताकाच्या कारकिर्दीतही आयर्लंडला कोणतीच सवलत मिळाली नाहीं. क्रॉमवेलनें तिकडच्या बंडांचा निष्ठुरपणें मोड केला † आणि तेथील कॅथोलिक लोकांच्या छळाला सीमा न राहिल्या-

---

* या बंडाच्या पूर्वीच्या एका वर्षांत उपासमार (Starvation) आणि देशत्याग (Emigration) यांच्या पायीं आयर्लंडमधले २० लाख लोक कमी झाले होते.

† क्रॉमवेलनें या वेळीं आयर्लंडमध्यें गाजविलेल्या क्रौर्याचें वर्णन करतांना मायर्स म्हणतो, "Having taken by storm the town of Drogheda (1649) he massacred the entire garrison, consisting of three thousand men. About a thousand

मुळें अर्धें आयर्लंड उध्वस्त होऊन गेलें (प्र. ४९ प. ५). क्रॉमवेलनें या वेळीं तिकडे केलेल्या क्रूरपणाच्या कृत्यांनीं आयरिश लोकांच्या मनांत इंग्रजांविषयींचा तिटकारा इतका खोल रुतून गेला कीं, अजूनही तिकडे एकाद्याला दुसऱ्याचें अनिष्ट चिंतावयाचें असलें म्हणजे 'तुझ्या छातीवर क्रॉमवेलचें पिशाच्च बसो!' असे शब्द तो उच्चारतो.

पुढें इ. स. १६६० मध्यें इंग्लंडमध्यें स्टुअर्टवंशीय राजा पुनः गादीवर येऊन राजसत्ता प्रस्थापित झाली, तेव्हां आयरिश लोकांनाही थोडीशी स्वस्थता मिळाली, आणि त्यानंतरच्या कांहीं वर्षांत त्यांची व्यापाराच्या बाबतींत कांहींशी उन्नति झाली.

चार्लस व जेम्स स्टुअर्टच्या मागून आलेल्या वुइल्यमला आयर्लंडकडे लक्ष देण्याला फुरसत नव्हती. पण त्याच्याही कारकिर्दींत तेथल्या रोमन कॅथोलिक लोकांनीं जेम्सची बाजू उचलून वुइल्यमचा अंमल मानण्याचें नाकारलें. त्यामुळें लंडनडेरी व बॉइन येथील लढायांचे प्रसंग उद्भवले (प्र. ५४ प. ८१९). त्यानंतर ॲन राणीच्या कारकिर्दींत आयर्लंडांत विशेषशी गडबड झालेली दिसत नाहीं.

इंग्लंड व हॉलंड-सतराव्या शतकांतील इंग्लंडच्या परराष्ट्रांशीं झालेल्या युद्धांत त्याचा हॉलंडच्या डच लोकांशीं जो दोनदां सामना झाला, तो व्यापारी दृष्टीनें फार महत्त्वाचा होता. इ. स. १६४९ मध्यें इंग्रजांनीं चार्लस राजाचा वध केला, तेव्हां चार्लसचा जांवई वुइल्यम (प्रिन्स ऑफ ऑरेंज) हा हॉलंडच्या लोकसत्ताक राज्याचा मुख्य होता. त्याला व डच लोकांना इंग्लिशांचें हें करणें अर्थातच आवडण्यासारखें नव्हतें. त्यामुळें चार्लसच्या पक्षपाती मंडळीला पुष्कळ वर्षेंपर्यंत हॉलंड हें आश्रयस्थान होऊन राहिलें होतें. इ. स. १६५०मध्यें चार्लसचा जांवई मरण पावला, तरी इंग्लंड-हॉलंडचें वैमनस्य कायमच राहिलें. कारण आतां डच लोकांचा पूर्वेकडील व्यापार इंग्रजांच्या

---

who had sought asylum in a church were butchered there without mercy. The capture of other towns was accompanied by massacres little less terrible. The conqueror's march through the island was the devastating march of an Attila or a Zingis Khan."

स्वतः क्रॉमवेलनेंच या वेळच्या आपल्या पराक्रमाचें वर्णन केलें आहे तें असें:—

When they submitted, their officers were knocked on the head and every tenth man of the soldiers killed, and the rest shipped for Barbados.

डोळ्यांत सलूं लागला होता, व त्या व्यापाराचा फायदा आपल्यालाही मिळावा म्हणून त्यांचे प्रयत्न चालू होते. हॉलंडचें आरमारही या वेळीं फार प्रबल झालेलें होतें, व या आरमाराच्या बळावर नव्या जुन्या जगांतील सर्व पेठांचा माल जिकडे तिकडे डच गलबतांतून नेण्यांत येत होता.

डच लोकांची ही समुद्रावरील वाहतूक बंद पाडण्यासाठीं व स्वतःचें नाविक सामर्थ्य वाढविण्यासाठीं इंग्लिश पार्लमेंटनें इ. स. १६५१ मध्यें 'नॅव्हिगेशन ॲक्ट' म्हणजे नौका–निर्बंधाचा कायदा पास केला (प्र.४९ प.१९). त्यामुळें डच लोकांचें नुकसान होऊं लागलें, व पुढें या दोन देशांतली चुरस वाढत जाऊन दोन तीन वर्षें इंग्लिश खाडींत डच व इंग्रज नाविकांची झटापट चालू राहिली. शेवटीं इ. स. १६५४ मध्यें या उयभ राष्ट्रांमध्यें तह होऊन डचांनीं इंग्लिशांचें बहुतेक म्हणणें मान्य केलें व हा तंटा तात्पुरता मिटला (प्र. ४९ प. २१).

इ. स. १६६० मध्यें क्रॉमवेलच्या 'सामुदायिक सत्तामंडळा'ची इतिश्री झाली आणि माजी चार्लसचा मुलगा दुसरा चार्लस हा इंग्लंडच्या गादीवर आला. या वेळीं हॉलंडमध्येंही तेथल्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष माजी वुइल्यमचा मुलगा म्हणजे चार्लसचा भाचा वुइल्यम ऑफ ऑरेंज हाच होता. पण राष्ट्रां–राष्ट्रांतलि भांडणांत हीं नातीं फारशीं उपयोगी पडत नाहींत हा अनुभव त्या वेळींही आलाच. इंग्लंडचे हातपाय आतां वसाहतीच्या रूपानें वाढत चालले होते. तेव्हां इंग्लिश पार्लमेंटनें वसाहतींशीं व पूर्वेकडच्या हिंदुस्तान, चीन वगैरे देशांशीं चालणारा व्यापार आपल्या मुठींत राहावा म्हणून नौका–निर्बंधांचे नवीन कायदे केले, आणि साखर, तंबाकू, कापूस, वगैरे कित्येक पदार्थ प्रथम इंग्लंडमध्यें येऊन मग तेथून ते युरोपांतील देशांत रवाना व्हावे असें ठरविलें. त्यामुळें डचांचें फार नुकसान होऊं लागलें, आणि पुन्हां दोन्ही देशांमध्यें युद्धप्रसंग उद्भवला.

चार्लस राजाच्या रंगेल व बेफिकीर स्वभावामुळें या वेळीं इंग्लंडच्या राज्य-पद्धतींत बराच ढिलेपणा शिरला होता. आणि युद्धासाठीं मंजूर केलेला पैसा राजा चैनींत उडवून टाकीत असल्यामुळें इंग्लंडच्या आरमाराला पुष्कळ वेळां माशा मारीत बसण्याचा प्रसंग येत होता. डच आरमारानें या संधीचा फायदा घेऊन इंग्लिश खाडींत अप्रतिहत संचार चालू केला, आणि एकदां तर त्यानें टेम्स नदीच्या मुखांतून आंत शिरून तेथलीं दोन तीन इंग्लिश गलबतें जाळून टाकलीं (इ. स १६६७). पण या वेळीं इंग्लंडचें पार्लमेंट राजसत्तेवरचा दाब अधिक घट्ट कसा करावा याच काळजींत

असल्यामुळें त्याला हा अपमान मुकाट्यानें गिळून हॉलंडशीं तह करावा लागला (प्र. ५० प. १४). या तहानें अमेरिकेंतील इंग्लंड व हॉलंड यांच्या प्रदेशांची थोडी अदलाबदल करून इंग्लंडच्या अमेरिकेंतील वसाहती सलग करण्यांत आल्या, आणि इंग्लंडचे नौकानिर्बंधाचे कायदेही सौम्य होऊन इंग्लंड व हॉलंड यांपैकीं कोणावरही परराष्ट्रानें स्वारी केल्यास दोघांनीं एकमेकांना मदत करावी असें ठरलें.

यानंतर फ्रान्सच्या चौदाव्या लुईच्या महत्त्वाकांक्षेनें हॉलंडवर प्राणसंकट ओढवल्यासारखें झालें. त्या वेळीं चार्लस राजा विरुद्ध असतांही इंग्लंडच्या पार्लमेंटनें हॉलंडला यथाशक्ति मदत केली. आणि चार्लस राजाच्या पश्चात् दुसऱ्या जेम्सच्या कारकिर्दीत इंग्लंडांत राजा–प्रजांचें भांडण पुन्हां उपस्थित झालें, तेव्हां हॉलंडच्या डच लोकांनीं इंग्लिश पार्लमेंटचा पाठपुरावा केला. इतकेंच नव्हे, तर जेम्स राजाला पदच्युत करून इंग्लंडमध्यें रक्तपातरहित राज्यक्रांति घडवून आणण्याला हॉलंडच्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष वुइल्यम हाच कारण झाला (प्र. ५३ प. ८). पुढें हा वुइल्यम खुद्द इंग्लंडचाच राजा झाल्यानें तो जिवंत असेपर्यंत इंग्लंड–हॉलंडमध्यें युद्ध होण्याचा प्रसंग आला नाहीं. इतकेंच नव्हे तर हॉलंड व इंग्लंड यांनीं एकजूट करून फ्रान्सबरोबर यशस्वी रीतीनें टक्कर दिली (प्र. ५४ प. १८).

इंग्लिश वारशाचें युद्ध—इ. स. १६८९ पासून इ० स० १६९७ पर्यंत पहिल्यानें जेम्स स्टुअर्टची व त्याच्यामागून त्याच्या मुलाची बाजू घेऊन फ्रान्सच्या चौदाव्या लुईनें वुइल्यमला इंग्लंडच्या गादीवरून काढून टाकण्यासाठीं कधीं गुप्तपणें तर कधीं उघडपणें जें युद्ध चालू ठेवलें होतें, त्याला स्पेनच्या गादीच्या वारसा–युद्धाप्रमाणेंच 'इंग्लंडच्या गादीच्या वारशाचें युद्ध' (War of the English Succession) असें नांव इतिहासकारांनीं दिलें आहे. या युद्धांत स्कॉटलंड, आयर्लंड आणि नेदरलंड हीं भूपृष्ठावरील रणक्षेत्रें असून 'ला होग' नजीकचा समुद्रकिनारा हें समुद्रपृष्ठावरील रणक्षेत्र होतें. इ. स. १६९७ च्या 'रिस्विकच्या' तहानें हें युद्ध थांबलें (प्र. ५४ प. १९).

स्पॅनिश वारशाचें युद्ध—इ.स. च्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत युरोप खंडांतील फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रिया वगैरे कित्येक बलाढ्य देशांचे राजे व त्यांच्या ताब्यांतील छोट्या संस्थानांचे अधिपति एकमेकांशां घरगुती नात्यांनीं (Matrimonial alliances) संबद्ध झालेले दिसत असत. या शतकाच्या अखेरी अखेरीला स्पेनचा बादशहा दुसरा चार्लस हा मरावयास टेंकला, त्या वेळीं त्याला मूलबाळ

कांहीं नव्हतें. या वेळीं या बादशहाच्या ताब्यांत नुसतें स्पेनचें राज्यच नसून नेदरलंडचा कांहीं भाग, सिसिली, नेपल्स, सार्डिनिया वगैरे कित्येक प्रांत, आणि अमेरिकेंतील बऱ्याचशा वसाहती त्याच्या ताब्यांत होत्या. आणि त्याच्या मृत्यूनंतर स्पेनच्या ह्या विस्तृत साम्राज्यावर वारसा सांगण्याला फ्रान्स व ऑस्ट्रिया येथील राजे व बव्हेरियाचा राजपुत्र हे पुढें येणार होते.

चार्लस बादशहाशीं त्यांचा परस्पर संबंध कसा होता हें पुढील वंशावळींत दाखविलें आहे—

फिलिप (तिसरा)
- फिलिप (चौथा)
  - **चार्लस** (दुसरा)
  - **मेरिया थिरेसा** = फ्रान्सचा चौदावा लुई
    - युवराज लुई ऊर्फ डॉफिन
      - लुई
        - लुई (पंधरावा)
      - **फिलिप** (आंजूचा) (स्पेनचा ५ वा फिलिप)
  - मार्गारेट थिरेसा = लिओपोल्ड
    - इलेक्ट्रेस ऑफ बव्हेरिया
      - **जोसेफ प्रिन्स ऑफ बव्हेरिया**
- मेरिया = ऑस्ट्रियाचा बादशहा फर्डिनांड (तिसरा)
  - लिओपोल्ड = एलिओनार (दुसरी बायको)
    - जोसेफ (पहिला)
    - **चार्लस (आर्चड्यूक) ऑफ ऑस्ट्रिया**

वर सांगितलेल्या काळीं फ्रान्स व ऑस्ट्रिया हीं राष्ट्रें आधींच प्रबल झालेलीं असल्यामुळें त्यांच्यापैकीं कोणालाही स्पेनचें हें साम्राज्य जोडलें गेलें, तरी युरोपखंडांतील सत्तेच्या समतोलपणाला धक्का बसून युरोपांतल्या इतर राष्ट्रांवर मुठींत जीव घेऊन राहण्याची पाळी येणार होती. म्हणून वुइल्यमनें युरोपांतल्या राजांशीं गुप्तपणानें करारमदार करून **चार्लस** बादशहाच्या मृत्यूनंतर स्पेनच्या साम्राज्याची विभागणी कशी करावयाची याची एक

योजना तयार करून ठेवली (प्र.५४ प.२४). पण **चार्लस**ला ही बातमी समजल्यावर त्यानें आपल्या पश्चात् आपलें राज्य आपली बहीण **मेरिया थिरेसा** म्हणजे चवदाव्या लुईची बायको हिच्या नातवाला 'अविच्छिन्न'(without partition) मिळावें असें व्यवस्थापत्र करून ठेवलें, व तें चवदाव्यां लुईनें अर्थातच मान्य केलें. त्यामुळें **वुइल्यम**ला व युरोपांतल्या इतर छोट्या राजांना नको होती तीच गोष्ट घडून येण्याचा संभव दिसूं लागला. म्हणून **वुइल्यम**नें पुढें इंग्लंड, हॉलंड, व ऑस्ट्रिया या देशांचा एक बडा संघ (Grand Alliance) घडवून आणून फ्रान्सच्या बादशहाबरोबर युद्ध करण्याची तयारी केली (प्र.५४ प.२६). हें युद्ध इ.स.१७०२मध्यें सुरू होऊन इ.स.१७१३पर्यंत चाललें. दरम्यान **वुइल्यम** राजा मरण पावला, पण त्याच्यामागून इंग्लंडच्या गादीवर आलेल्या **अॅन** राणीनेंही हें युद्ध चालूच ठेवलें होतें. शेवटीं युट्रेटच्या तहानें या युद्धाची परिसमाप्ति झाली (प्र. ५५ प. ३१४) आणि स्पेनच्या साम्राज्याची पुढीलप्रमाणें विभागणी झाली.

(१) **फिलिप** (आंजूचा) यासः—खुद्द स्पेन व त्याच्या वसाहती मिळाल्या, पण फ्रान्सच्या गादीवर त्याचा हक्क नसावा असें ठरलें.

(२) **चार्लस** (आर्चड्यूक) यासः—इटली व नेदर्लंडमधील स्पेनच्या ताब्यांतील प्रदेश मिळाले.

(३) **इंग्लंडः**—नोव्हास्कोशिया, न्यू फाउंडलंड, जिब्राल्टर, मिनोर्का, हीं ठाणीं मिळून दक्षिण अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींशीं व्यापार करण्याची मोकळीक मिळाली.

(४) **हॉलंडः**—फ्रान्सनें नेदर्लंडमधील डच लोकांचे जे किल्ले जिंकून घेतले होते ते हॉलंडला परत देण्यांत आले.

स्टुअर्टकालीन पार्लमेंटसभा—या कालांतील कित्येक पार्लमेंटच्या सभांना विशिष्ट गुणदर्शक अशीं नांवें प्राप्त झालीं होतीं, त्यांतील कांहीं पुढें दिलीं आहेतः—

'अॅडल्ड पार्लमेंट'—इ. स. १६१४ मध्यें **जेम्स** राजानें आपल्या कारकिर्दीतील दुसरी पार्लमेंटसभा बोलावली. पण तिनें राजानें बेकायदेशीर कर बसविणार नाहीं असें वचन दिल्याशिवाय तो मागत असलेल्या पैशाला मंजुरी देण्याचें नाकारलें. तेव्हां **जेम्स**नें ही सभा तावडतोब बरखास्त केली. ही सभा एकही ठराव किंवा बिल पास न होतांच बरखास्त झाल्यामुळें तिला इंग्लंडच्या इतिहासांत **अॅडल्ड पार्लमेंट** (Addled Parliament) म्हणजे 'वांझ' पार्लमेंट असें नांव मिळालें आहे (प्र. ४२ प. १३).

‘शॉर्ट पार्लमेंट’—पहिल्या **चार्लस** राजानें गादीवर आल्यानंतर पार्लमेंट सभा बोलावण्याचे व त्या आपल्याला विरोध करतात असें दिसून येतांच त्यांचें विसर्जन करण्याचे डाव पुष्कळ वेळां टाकले. त्यांत इ. स. १६४० च्या एप्रिल महिन्यांत भरलेली पार्लमेंट सभा अवघ्या तीन आठवड्यांच्या आंतच विसर्जन केली गेली. म्हणून या सभेला ‘ शॉर्ट ’ किंवा ‘ अल्पजीवी ’ पार्लमेंट असें नांव पडलें (प्र. ४५ प. ९).

‘लॉंग पार्लमेंट’—वर सांगितल्याप्रमाणें पहिल्या **चार्लस** राजानें पार्लमेंट सभा बोलवावयाची व ती त्याचें म्हणणें कबूल करीत नाहीं असें दिसून येतांच बरखास्त करावयाची असा प्रकार अनेक वेळां झाला. शेवटीं इ. स. १६४०मध्यें त्यानें पांचव्या खेपेला जी सभा बोलाविली, तिनें राजानें हुकूम केला तरी आपलें विसर्जन करावयाचें नाहीं असा ठराव केला. त्यामुळें तिचें आयुष्य वीस वर्षांपर्यंत लांबलें (इ.स.१६६०).या तिच्या दीर्घकालीन आयुष्यावरून तिला ‘लॉंग’ पार्लमेंट असें नांव पडलें (प्र.४५प.१२).

‘रंप पार्लमेंट’—सतराव्या शतकांत इंग्लंडमध्यें राजा **चार्लस** व प्रजाप्रतिनिधींची लोकसभा यांच्यामध्यें उघड युद्ध जुंपल्यावर **चार्लस** राजाचा पराभव होऊन तो पार्लमेंटच्या लष्करच्या हातीं लागला. या लष्करला इंग्लंडमधून राजा ही संस्थाच नामशेष करून टाकावयाची होती. पण पार्लमेंट सभा लष्करच्या या बेताला संमति देईना. तेव्हां **क्रॉमवेलनें** आपल्या ‘ प्राइड ’ नांवाच्या हस्तकामार्फत लष्करला विरोध करणाऱ्या लोकसभेंतील सभासदांना जबरदस्तीनें हांकून लाविलें (प्र.४८ प.५). त्यामुळें शेवटीं त्या सभेंत **क्रॉमवेलला** अनुकूल असे सुमारें ५०।५५ सभासदच काय ते शिल्लक राहिले. अर्थात् ही सभा नुसती नांवाचीच लोकसभा राहिली. तिला सर्व राष्ट्राचें प्रतिनिधित्व मिरविण्याचा हक्क राहिला नाहीं. तेव्हां राजपक्षीय लोक तिचा उल्लेख ‘ लांडी पार्लमेंट ’ किंवा ‘रंप पार्लमेंट’ या नांवानें करूं लागले. इ.स. १६४० मध्यें भरलेल्या ‘ लॉंग पार्लमेंट’चाच हा एक अवशेष होता, म्हणून तिला ‘ पुच्छ पार्लमेंट ’ असेंही कित्येकांनीं म्हटलें आहे.

‘बेअरबोनचें पार्लमेंट’—**क्रॉमवेलच्या** ‘ सामुदायिक सत्तामंडळा’च्या कारकिर्दींत त्यानें पार्लमेंटच्या ज्या चार दोन सभा भरविल्या, त्यांपैकीं इ. स. १६५३ मधल्या केवळ त्याच्या हस्तकांनींच बनलेल्या एका छोट्या सोंवळ्या पार्लमेंट सभेला (Parliament composed of honest men i. e. men of religion) ‘ बेअरबोनचें पार्लमेंट ’ असें म्हणत असत. कारण या पार्लमेंटमध्यें **प्रेजगॉड बेअरबोन** (Praisegod Barebone) या नांवाचा एक चांभार

(leather-merchant) सभासद बायबलचा नित्य पाठ करणारा आणि आपला बराच वेळ प्रार्थनेंत घालविणारा असून तो लोकांच्या विशेष डोळ्यांत भरत असे.

'कन्व्हेन्शन पार्लमेंट'—पार्लमेंट सभेच्या सभासदांची निवडणूक करवून तिची रीतसर बैठक भरविण्याचा अधिकार राजाकडे असतो. पहिल्या **चार्लस** राजाच्या वधानंतर राज्यांत राजाच नाहींसा झाला, त्यामुळें इ.स. १६६०मध्यें त्याचा मुलगा दुसरा **चार्लस** याला इंग्लंडची गादी देतांना जी पार्लमेंट सभा अस्तित्वांत आली होती, ती राजनिमंत्रित नसून स्वयंनिमंत्रितच होती (प्र.४९ प. ४२). अर्थात कायदेशीर रीत्या तिचे अवश्य ते विधि झालेले नव्हते. म्हणून तिला क. पार्लमेंट म्हणजे 'संस्कारहीन' पार्लमेंट असें नांव दिलेलें आहे. **जेम्स** (दुसरा) राजाच्या पलायनानंतर **ऑरेंजच्या वुइल्यमनें** राजपद स्वीकारण्यापूर्वी पार्लमेंटची जी बैठक भरविली होती, तीहि अशीच राजनिमंत्रित नसल्यामुळें तिचाही उल्लेख क. पार्लमेंट याच नांवानें करतात (प्र.५३ प.१०).

'कॅव्हेलिअर ऊर्फ राजनिष्ठ पार्लमेंट'—दुसरा **चार्लस** राजा गादीवर आल्यावर इ. स. १६६१ मध्यें जी पहिलीच पार्लमेंट सभा भरली, तिच्यांतले बहुतेक सभासद 'कॅव्हेलिअर' म्हणजे शिलेदारी थाटाचे आणि राजपक्षपाती असून त्यांच्या राजनिष्ठेला अगदीं ऊत आल्यासारखा झाला होता. म्हणून त्या सभेला हें नांव पडलें होतें.

संस्मरणीय सन.

इ. स.

१६०३ जेम्स राजाविरुद्ध मुख्य व दुय्यम (Main and Bye) कट.

१६०४ हॅम्प्टन कोर्ट येथील धर्मपरिषद.

१६०५ पार्लमेंटवरील गंडांतर (Gunpowder Plot).

१६०७ अमेरिकेंतील व्हर्जिनिआ वसाहत.

१६११ सार्थ बायबलची इंग्रजी आवृत्ति.

१६१२ इंग्रजांनीं हिंदुस्तानांत सुरत येथें वखार स्थापन केली.

१६१४ वांझ (addled) पार्लमेंट.

१६१८ सर वॉल्टर रॅलेचा शिरच्छेद.

१६२० इंग्रज सुधारकांचा (The Pilgrim Fathers) देशत्याग.

१६२५ पहिल्या जेम्सचा मृत्यु व पहिल्या चार्लसचें राज्यारोहण.

१६२५ चार्लसचें पार्लमेंटशीं पहिलें भांडण. (The First Parliament of Charles. I).

१६२६ बेकनचा अंत.

१६२६ चार्लसचें पार्लमेंटशीं दुसरें भांडण (The Second Parliament of Charles I.).

१६२८ चार्लसचें पार्लमेंटशीं तिसरें भांडण (The Third Parliament of Charles I). 'पिटिशन ऑफ राइट'.

१६३४ 'नौकाद्रव्या'चा जुलूम.

१६३७ स्कॉटलंडमध्यें प्रार्थना पुस्तकाची सक्ति.

१६३८ स्कॉटलंडच्या 'नॅशनल कॉव्हिनेंट'ची स्थापना.

१६३९ चार्लसचें पार्लमेंटशीं चौथें व पांचवें भांडण; लॉँग पार्लमेंटचा आरंभ.

१६४१ 'वेंटवर्थ' ची चौकशी (impeachment). आयर्लंडमधील बंड. ग्रँड रिमॉन्स्ट्रन्स.

१६४२ लोकसभेच्या 'पंचायतना'वरील संकट (Impeachment of Five Members).

१६४४ क्रॉमवेलचा उदय.

१६४५ नेसबीची लढाई व चार्लसचें पलायन.

१६४८ प्राइडचा 'रेचक.'

१६४९ चार्लस राजाचा शिरच्छेद.

१६५१ नॅव्हिगेशन कायदा.

१६५५ जमैका बेट इंग्लंडच्या ताब्यांत आलें.

१६५८ क्रॉमवेलचा मृत्यु.

१६६० दुसऱ्या चार्लसचा राज्याभिषेक.
१६६५ लंडनचा प्लेग.
१६६६ लंडनची आग.
१६६८ हिंदुस्थानांतील मुंबई बेट इंग्रजांना मिळालें.
१६७७ मेरी-वुइल्यम विवाह.
१६७९ एक्स्क्ल्यूजन बिल. हेबिअस कॉरपस ॲक्ट.
१६८३ राय हाउस प्लॉट.
१६८५ दुसऱ्या चार्लसचा मृत्यु व दुसऱ्या जेम्सचें राज्यारोहण.
१६८७ डिक्लेरेशन ऑफ इंडल्जन्स.
१६८८ सप्तऋषींची (The Seven Bishops) चौकशी व सुटका.
१६८८ दुसऱ्या जेम्सचें पलायन; राज्यक्रांति.
१६८९ तिसरा वुइल्यम व मेरी यांचें राज्यारोहण; बिल ऑफ राइट.
१६९२ ग्लेंकोची कत्तल.
१६९३ राष्ट्रीय कर्जाचा आरंभ.
१६९५ 'बँक ऑफ इंग्लंड'ची स्थापना, एकपक्षीय प्रधानमंडळ; मेरी राणीचा मृत्यु.
१७०१ ॲक्ट ऑफ सेटलमेंट.
१७०७ इंग्लिश-स्कॉटिश-पार्लमेंटांचें एकीकरण.
१७१३ युट्रेटचा तह.
१७१४ ॲन राणीचा मृत्यू व जॉर्ज राजाचें राज्यारोहण.

इंग्लंडांतील राजवंशमालिका.

इ. स. १६०३ मध्यें इलिझाबेथ राणीच्या मृत्यूनें ट्यूडर राजवंशाचा शेवट झाला आणि स्कॉटलंडचा राजा सहावा जेम्स (James VI) हा इंग्लंडच्या गादीवर येऊन ' ग्रेट ब्रिटन व आयर्लंडचा राजा पहिला जेम्स' (James I) या नांवानें राज्य करूं लागला. त्याचा बाप ' स्टुअर्ट ' घराण्यांतील असल्यामुळें जेम्स व त्याचे पुढील वंशज यांना ' स्टुअर्ट ' राजे असें नांव पडलें. त्यांचा वंशवेल येणेंप्रमाणें:—

(८) स्टुअर्ट राजवंश.

जेम्स (पहिला)
(इ. स. १६०३)

चार्लस (पहिला)
(इ. स. १६२५)

चार्लस (दुसरा) (इ. स. १६६०)

जेम्स (दुसरा) (इ. स. १६८५)

मेरी=प्रिन्स ऑफ ऑरेंज

ॲन (इ. स. १७०२)

मेरी =वुइल्यम (ऑफ् ऑरेंज) (इ. स. १६८९)

पहिला **चार्लस** राजा इ. स. १६२५ मध्यें गादीवर आला; पण पुढें त्याचें व पार्लमेंटचें भांडण होऊन इ. स. १६४९ मध्यें त्याला फांशीं जावें लागलें. त्यानंतर इ. स. १६४९ पासून इ. स. १६६० पर्यंत इंग्लंडमध्यें ‘ राजा ’ असा कोणीच नव्हता. सगळी सत्ता ‘ कॉमनवेल्थ ’ ऊर्फ ‘ सामुदायिक सत्तामंडळा ’च्या हातांत होती. म्हणजे या अकरा वर्षांत इंग्लंडमध्यें एक प्रकारचें प्रजासत्ताक राज्यच (Republic) चालू होतें. **ऑलिव्हर क्रॉमवेल** हा या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष (Lord Protector) किंवा पालक होता. तो. इ. स. १६६० मध्यें मरण पावल्यावर त्याचा मुलगा **रिचर्ड क्रॉमवेल** हा या पालकपदावर आला. पण तो **ऑलिव्हर**सारखा कर्तबगार नसल्यामुळें त्यानें पुढें आपण होऊनच आपलें पालकपद सोडून दिलें, आणि पार्लमेंटनें पहिल्या **चार्लस** राजाचा मुलगा दुसरा **चार्लस** याला इंग्लंडची गादी देऊन मध्यें तुटलेली सांखळी जोडून टाकली. या दुसऱ्या **चार्लस**ला मुलगा नव्हता म्हणून त्याच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ दुसरा **जेम्स** हा गादीवर आला. या दुसऱ्या **जेम्स**च्या कारकिर्दींत पुनः राजा–प्रजांचें भांडण होऊन **जेम्स** गादी सोडून पळून गेला. त्यालाही कायदेशीर वारस असा मुलगा नव्हता. आणि शिवाय त्यानें रोमन कॅथोलिक पंथाची दीक्षा घेतलेली असल्यामुळें पार्लमेंटच्या सभासदांना

त्याच्याकडे अगर त्याच्या वंशाकडेही इंग्लंडची गादी ठेवावयाची नव्हती. म्हणून पार्लमेंटनें पुढें त्याची मुलगी मेरी व मेरीचा नवरा 'वुइल्यम ऑफ ऑरेंज' यांना संयुक्तपणें गादीचें अधिकारपद दिलें. मेरी इ. स. १६९४ मध्यें मरण पावली तेव्हां हें अधिकारपद एकट्या वुइल्यमकडेच आलें. मेरी व वुइल्यमला संयुक्तपणें राजपद देतांना पार्लमेंटनें त्यांच्याकडून एक 'राजपद व्यवस्थापत्रक' (Bill of Right) मान्य करून घेतलें होतें. या व्यवस्थेप्रमाणें इंग्लंडची गादी मेरी व वुइल्यमच्या पश्चात् मेरीच्या मुलांकडे आणि तिला मुलें नसल्यास तिची बहीण ॲन आणि तिचीं मुलें यांच्याकडे जावयाची होती. पण दरम्यान ॲनचीं सगळींच मुलें मरण पावल्यामुळें पार्लमेंटनें पुनः एक व्यवस्थापत्र करून इंग्लंडची गादी वुइल्यमच्या मागून ॲनला व तिच्या मागून पहिल्या जेम्सची नात म्हणजे मुलीची मुलगी सोफिया (Princess Sophia) म्हणून होती तिला व तिच्या पुढील वंशजांना द्यावी असें ठरविलें (Second Act of Settlement). अशी व्यवस्था करण्याचा मुख्य उद्देश इंग्लंडची गादी कॅथोलिक पंथाच्या माणसाकडे जाऊं द्यावयाची नाहीं हाच होता. 'सोफिया' चें लग्न जर्मनींतील 'हॅनोव्हर'-(Hanover) च्या संस्थानिकाशीं (Elector) झालेलें होतें व तो धर्मानें सुधारक म्हणजे प्रॉटेस्टंट पंथाचा होता. ॲनच्या मृत्युसमयीं (इ. स. १७१४) सोफिया जिवंत नसून तिचा मुलगा 'जॉर्ज' हा हॅनोव्हरच्या गादीवर आला होता. तेव्हां वर सांगितलेल्या व्यवस्थापत्राप्रमाणें पार्लमेंटनें त्याला इंग्लंडमध्यें बोलावून गादीवर बसविलें. अशा रीतीनें ॲनच्या पश्चात् इंग्लंडच्या गादीचा स्टुअर्ट घराण्याशीं असलेला संबंध तुटला आणि तो 'हॅनोव्हर' घराण्याशीं जोडला गेला. हॅनोव्हरच्या संस्थानिकांचें हें घराणें 'ब्रन्सविक (Brunswick) या नांवानेंही प्रसिद्ध असून वर सांगितलेला राजा 'पहिला जॉर्ज' व त्याचे वंशज यांना 'ब्रन्सविक' घराण्याचे राजे असेंहि म्हणण्याचा प्रघात आहे.

प्रश्न.

(१) सतराव्या शतकाच्या आरंभीं 'पोपवादी', 'वीरसुधारक' व 'आंग्लवादी' यांच्यांत मतभिन्नता कोणत्या बाबतींत होती ? पहिल्या जेम्स राजानें या पक्षांपैकीं कोणता पक्ष उचलून धरला होता व तो कां ?

(२) पुढील गोष्टींवर संक्षिप्त टीपा द्या.

(१) गन पॉवडर प्लॉट.	(२) हॅम्टन कोर्ट कॉनफरन्स
(३) मे-फ्लॉवर	(४) शिप–मनी
(५) आयर्नसाइड्स्	(६) कॉमनवेल्थ.
(७) ग्रँड रिमॉन्स्ट्रन्स	(८) राय हाउस प्लॉट.
(९) नॅशनल डेट	(१०) ग्रँड अलायन्स.

(३) 'डिव्हाइन राइट ऑफ किंग्' म्हणजे काय ? हें तत्त्व प्रथम कोणीं पुढें केलें, व त्या तत्त्वाला विरोध कोणीं व कसा केला ?

(४) 'धि रंप', 'कन्व्हेन्शन पार्लमेंट', 'प्राइडस् पर्ज', 'मिलिशिया बिल', 'टेस्ट ॲक्ट' आणि 'ॲक्ट ऑफ् सेटलमेंट' यांच्याविषयीं तुम्हांला काय माहिती आहे ?

(५) 'इंपीचमेंट' व 'बिल ऑफ अटेंडर' यांत फरक काय ? स्टुअर्ट कालांत त्यांचा कोणीं कसकसा उपयोग केला ?

(६) स्टुअर्ट घराण्याच्या अमदानींत राजा व प्रजा यांच्यामध्यें जे कलह झाले, त्यांचीं कारणें सांगून इ. स. १६८८ मधील राज्यक्रांतीचें विशेष वर्णन करा.

(७) क्रॉमवेलनें इंग्लंडमध्यें लोकसत्ताक राज्यपद्धती स्थापन करण्याचे जे प्रयत्न केले त्यांचें वर्णन करा. हे प्रयत्न यशस्वी कां झाले नाहींत तेंही सांगा.

(८) (अ) बेकन, बकिंगहॅम, स्ट्रॅफर्ड, हॅम्प्डेन, क्रॉमवेल, मार्लबरो व रसेल यांचीं संक्षिप्त चरित्रें लिहा.

(आ) 'क्लॅरेंडन कोड', 'केबल', 'डिक्लेरेशन ऑफ् इंडल्जन्स', 'बिल ऑफ राइट' आणि 'ट्रिपल अलायन्स' यांच्यावर संक्षिप्त टीपा द्या.

(९) स्टुअर्ट कालीन 'रेस्टोरेशन' आणि 'रेव्होल्यूशन' या शब्दांनीं कोणत्या गोष्टींचा बोध होतो, तें सांगून इ. स. १६४९ व इ. स. १६८८ या दोन वेळच्या क्रांतींत फरक काय होता व तो कशानें पडला तें सांगा.

(१०) पहिल्या चार्लसचा एकतंत्री अंमल आणि क्रॉमवेलचा लष्करी अंमल यांची तुलना करा.

(११) आयर्लंडमध्यें 'रोजर ओनील'च्या बंडाला काय कारणें झालीं होतीं व त्या वेळीं आयरिश लोकांची मनःस्थिति कशा प्रकारची होती ?

(१२) व्हिग व टोरी हे पक्ष कसे उत्पन्न झाले, तें सांगून या नांवांच्या अर्थाबद्दल तुम्हांला काय माहिती आहे तीही सांगा.

(१३) लंडनच्या नागरिकांनीं पहिल्या चार्लसच्या कारकिर्दींत राजाला विरोध करणाऱ्या मंडळीला कशा प्रकारची मदत केली तें सांगून, 'पिटिशन ऑफ राइट'

व ‘ हेबिअस् कॉरपस ’ या कायद्यांत राजविरोधकांचें संरक्षण होण्यासारखीं कोणतीं कलमें घालण्यांत आलीं होतीं तीं सांगा.

(१४) क्रॉमवेलच्या सैनिकांबद्दल तुम्हांला काय माहिती आहे ? ‘ डनबार ’ (१६५०) व ‘ नेसबी ’ येथील लढायांचें वर्णन करा.

(१५) ‘पहिल्या चार्लस’च्या ‘चौकशी’ ची हकीकत सांगून तिच्या ‘कायदेशीर-पणाची’ चर्चा करा. या चार्लसच्या गुणावगुणांचीही थोडक्यांत माहिती सांगा.

(१६) क्रॉमवेल, दुसरा जेम्स, व वुइल्यम यांच्या कारकिर्दीत इंग्लंडचीं आयरिश लोकांशीं जीं युद्धें झालीं त्यांचें थोडक्यांत वर्णन करा.

(१७) दुसऱ्या चार्लसनें इंग्लंडची गादी मिळविण्यासाठीं जी खटपट केली तिचें थोडक्यांत वर्णन करून त्याच्या यशापयशाला कोणत्या गोष्टी कारण झाल्या त्या सांगा.

(१८) दुसऱ्या जेम्सनें इंग्लंडमध्यें रोमन कॅथोलिक पंथाचें पुनरुज्जीवन करण्या-साठीं कसकसे प्रयत्न केले तें सांगून त्यांचा परिणाम काय झाला तो सांगा.

(१९) (अ) डिक्लेरेशन ऑफ राइट
(आ) पिटिशन ,, ,,
(इ) बिल ,, ,,
} यांत फरक काय होता ? इंग्लंडमधील ‘ सनदशीर राज्यपद्धतीचे श्रुतिग्रंथ ’ हें नांव कोणत्या कायद्यांना दिलेलें आहे व तें कां ?

(२०) ‘ जॅकोबिट ’ या शब्दाचा अर्थ काय ? ‘ पार्टी गव्हर्नमेंट ’ कशाला म्हणतात ? ‘जेफ्रेज’ला ‘ नरराक्षस ’ असें म्हटलें आहे तें कां ?

(२१) (अ) ‘ टिटस ओएटस’च्या कारस्थानाची थोडक्यांत हकीकत द्या.
(आ) ‘ ग्लेंकोची कत्तल ’ आणि ‘ सप्तबिशपांचा खटला ’ यांविषयीं तुम्हांला काय माहिती आहे ?

(२२) तिसऱ्या वुइल्यमनें इंग्लंडचें राजपद स्वीकारलें, त्यांत त्याचा मुख्य उद्देश काय होता व तो कितपत सिद्धीला गेला ?

(२३) फ्रान्सच्या चौदाव्या लुईचें संक्षिप्त चरित्र लिहून त्याची इंग्लंडच्या स्टुअर्ट राजांना कोणत्या प्रकाराची मदत होती व ती कां तें सांगा.

(२४) युट्रेटच्या तहाचीं कलमें लिहा. या तहानें इंग्लंडला काय मिळालें ?

(२५) तिसरा वुइल्यम आणि ॲन राणी यांच्या कारकिर्दीत पार्लमेंटच्या सत्तेची वाढ झाली तिचीं कारणें काय ? ॲनच्या कारकिर्दीतील सरदारसभा व लोक-सभा यांच्यामध्यें जो झगडा झाला त्याचें थोडक्यांत वर्णन करा.

(२६) दुसरा चार्लस व दुसरा जेम्स हे कितपत 'धर्मसहिष्णु' होते ? त्यांना या बाबतींत पार्लमेंटनें कितपत पाठिंबा दिला होता ?

(२७) स्टुअर्टकालीन इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाविषयीं तुम्हांला काय माहिती आहे ? या कालांत इंग्लंडचीं हॉलंड व फ्रान्सबरोबर जीं युद्धें झालीं, त्यांचें कारण काय होतें ?

(२८) स्कॉटिश लोकांच्या 'डारियन' वसाहतीचें थोडक्यांत वर्णन करा.

(२९) इंग्लिश व स्कॉटिश पार्लमेंटचें ऐक्य होण्याला तात्कालिक कारण कोणतें घडलें तें सांगून, त्या ऐक्याचा उभय राष्ट्रांवर काय परिणाम घडून आला तो सांगा.

(३०) स्पॅनिश वारशाच्या युद्धाचीं कारणें काय होतीं ? त्या युद्धांत इंग्लंडनें कोणता भाग घेतला होता व तो कशा रीतीनें पार पाडला ?

(३१) सतराव्या शतकांत व्यापार, वसाहती, व समुद्रावरील सत्ता यांच्या वृद्धी-साठीं इंग्लंडनें कसकसे प्रयत्न केले, व त्यांत त्यांना कोणत्या राष्ट्रांकडून कसकशा अडचणी आल्या तें सांगा.

(३२) ट्यूडर व स्टुअर्ट कालांत इंग्लंडच्या राज्यघटनेची उत्क्रांति कसकशी होत गेली तें सांगून, ॲन राणीच्या कारकिर्दीच्या अखेरच्या तिच्या स्वरूपाचें थोड-क्यांत वर्णन करा.

(३३) 'सॉलेम लीग व कव्हिनँट' याबद्दल तुम्हांला काय माहिती आहे ? पहिल्या चार्लस राजाच्या कारकिर्दीत या कव्हिनॅंटनें कोणती कामगिरी बजाविली ?

(३४) इ. स. १६४० व इ. स. १६६० या सुमाराच्या इंग्लंडमधील राजसत्तेच्या स्वरूपांत काय फरक दिसून येतो ?

(३५) दुसरा चार्लस व दुसरा जेम्स यांच्या स्वभावांचें वर्णन करून दुसऱ्या चार्लसपेक्षां दुसऱ्या जेम्सला खऱ्याखोट्याची चाड अधिक होती असें म्हणतां येईल कीं काय तें सांगा.

(३६) इ. स. १५८८ व इ. स. १६८८ या सालांतील इंग्लंडच्या समुद्रा-वरील सत्तेचें वर्णन करून, त्या सत्तेमुळें त्या देशाच्या इतिहासावर काय परिणाम झाला तोही सांगा.

(३७) सॅचेव्हेरेलच्या खटल्याची थोडक्यांत माहिती द्या. या खटल्यानें कोणीं काय साधलें तें सांगून मुद्रणस्वातंत्र्याला त्याची कितपत मदत झाली तें सांगा.

जगांतील समकालीन घडामोडी.

इ. स. चें सतरावें शतक.

(पूर्वार्ध)

ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड.

इ. स. चें सतरावें शतक हें ग्रेट ब्रिटनमध्यें राज्यकारभाराच्या बाबतींत राजा श्रेष्ठ कीं प्रजा श्रेष्ठ या प्रश्नाचा निकाल लावून घेण्यासाठीं राजपक्षीय मंडळी आणि पार्लमेंटसभा म्हणजे प्रजापक्षीय मंडळी यांच्या भांडणांत गेलें. पैकीं इ. स. १६५० पर्यंतच्या पहिल्या अर्थात एका बाजूनें जेम्स व चार्लस हे दोन राजे आणि दुसऱ्या बाजूनें हॅम्प्डेन, पिम, क्रॉमवेल वगैरे पार्लमेंटचे पुढारी, या उभयपक्षांकडून प्रथम सामदामभेदादि त्रयीचा अवलंब करण्यांत आला, आणि शेवटीं प्रकरण अगदीं निकरावर आलें, तेव्हां उभयपक्षीं सशस्त्र युद्ध होऊन प्रजापक्षाच्या हातीं लागलेल्या राजाला देहांत प्रायश्चित्त देण्यांत आलें. इंग्लंडमधील प्रजापक्षांत राजकीय बाबतींतील मतभेदांवरून पडलेले पहिले तट म्हणजे 'टोरी' व 'व्हिग' या नांवांचे पक्ष हे प्रथम याच कालांत सुस्पष्ट झाले. इंग्लंड व स्कॉटलंड यांची या कालांत एकी झाली, पण ती एकी नुसती राजघराण्यांची होती. त्या दोन्ही देशांतील—किंवा प्रांतांतील म्हणा—लोकांच्या अंतःकरणांचा मिलाफ होण्याला अद्यापि अवकाश होता. आणि आयर्लंड तर इंग्लिश अधिकाऱ्यांच्या जुलमानें इतकें वैतागून गेलें होतें कीं, इ. स. १६४१ मध्यें संधि सांपडली तेव्हां आयरिश बंडखोरांनीं इंग्रज स्त्री–पुरुषांची वय किंवा गुन्हा न पाहतां सरसकत्तल करण्याचाच सपाटा चालविला. पण याचा परिणामही पुढें विपरीत होऊन कांहीं वर्षांनीं क्रॉमवेलच्या सैनिकांनीं त्यांचा सूड घेतला, तेव्हां हजारों आयरिश लोक देशोधडीला लागले.

क्रॉमवेल, पिम, हॅम्पडेन, वगैरे प्रजेच्या स्वातंत्र्याचे कैवारी या कालांत धीटपणानें राजाच्या जुलमी कृत्यांना विरोध करतांना आणि राजेही तितक्याच निश्चयानें आपले राजेपणाचे अधिकार कायम ठेवण्याची शिकस्त करतांना दृष्टीस पडतात. पण राजकीय अधिकाराच्या या रस्सीखेंचींत दोघांनाही तुटेपर्यंत ताणून न धरण्याचें अवधान न राहिल्यामुळें प्रथम राजाचे कित्येक सल्लागार व मागाहून खुद्द चार्लस राजा यांची

प्रजेच्या असंतोषरूपी दावानलांत आहुति पडली, आणि त्यानंतर राजाच्या जागीं आलेल्या लष्करशाहीनें राजापेक्षांही ज्यास्तच अरेरावी गाजविल्यामुळें सामान्य लोकांना ' भीक नको पण कुत्रा आंवर ' असें म्हणण्याची पाळी आली.

युरोप खंड

या कालांतील युरोपखडांतलें प्रसिद्ध 'त्रिशत्वार्षिक युद्ध' (Thirty years war) इ. स. १६१८ पासून १६४८ पर्यंत चाललें होतें. या युद्धाला प्रथम सुरवात झाली ती जर्मनींतील प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक संस्थानिकांमधील चुरशीमुळें. पण पुढें स्वीडनचा राजा गस्टाव्हस अॅडॉल्फस (Gustsvus Adolphus)व फ्रान्सचा बादशहा लुई हे त्यांत पडल्यावर या युद्धाला सार्वदेशिक स्वरूप आलें. या युद्धांत फ्रान्स, स्पेन वगैरे देशांतील कॅथोलिक पंथाचे राजे कॅथोलिक संस्थानिकांना आणि डेन्मार्क, स्वीडन आणि मधून मधून इंग्लंड येथील राजे प्रॉटेस्टंट संस्थानिकांना मदत करीत. तथापि या लढाईचा सगळा भार जर्मन संस्थानिकांवरच असल्यामुळें या तीस वर्षांच्या कालांतील जर्मन लोकांची एक सबंध पिढी युद्धमूलक आपत्तींत बुडून गेली होती. आणि शेवटीं इ. स. १६४८ मध्यें 'वेस्टफालिया' (Westphalia) येथें तह झाला, त्यांत स्विट्झरलंड आणि हॉलंड–बेल्जम हे देश स्वतंत्र झाले, अल्साक (Alsac) आणि लोरेन (Lorraine) हे प्रांत फ्रान्सला मिळाले, आणि उत्तर जर्मनींतला बराचसा प्रदेश स्वीडनच्या अंमलाखालीं गेला. जर्मन संस्थानांना पूर्वी 'पवित्र रोमन साम्राज्या'च्या नांवाचें जें एक प्रकारचें भूषण होतें, तें आतां नाहींसें होऊन प्रत्येक जर्मन संस्थानिक स्वतंत्र सत्ताधीश बनला.

या युद्धसमाप्तीच्या वेळची जर्मन राष्ट्राची स्थिति एका ठिकाणीं वर्णिली आहे ती अशीः—" युद्धारंभीं या देशाची लोकसंख्या तीन कोटी होती, ती युद्धसमाप्तीच्या वेळीं एक कोटी वीस लक्ष राहिली. बर्लिनमध्यें या वेळीं जेमतेम दोनशें ते तीनशें लोक अंगावर रकटीं घेऊन (ill clad) वावरतांना दिसत. ' वुरटेन–बर्ग ' (Wurten-burg) या प्रसिद्ध शहरांतल्या पांच लाख लोकवस्तीपैकीं जेमतेम पन्नास हजार वस्ती शिल्लक राहिली असेल. जिकडे पहावें तिकडे सरदारांचे वाडे आणि शेतकऱ्यांच्या झोंपड्या उध्वस्त होऊन गेलेल्या, कित्येक मैलांचा प्रदेश ओसाड पडलेला, व्यापाराची उलाढाल बंद झालेली, आणि कित्येक उद्योग तर समूळ नाहींसे झालेले (swept out of existence) अशी स्थिति झाली होती."

"जी स्थिति भौतिक बाबतींत तीच बौद्धिक व नैतिक बाबतींत. एक पिढीची पिढी सर्व काल लढाईंत गुंतून राहिल्यामुळें पुढल्या पिढीचीं मुलें निवळ 'टोणपीं' बनल्यास नवल काय? चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, सगळ्या धुळीस मिळाल्या होत्या. नैतिक बंधनें कोणीकडच्या कोणीकडे गेलीं होतीं. जिकडे तिकडे व्यभिचार आणि बदफैलीपणा यांचें साम्राज्य माजलें होतें. देवधर्म, आणि पूजाअर्चा हे गतकालचे विषय (A tradition) होऊन बसले होते. तात्पर्य, शील (character), बुद्धिमत्ता (intelligence) आणि नीति (morality) या बाबतींत जर्मन राष्ट्र दोन शतकांनीं मागें खेंचल्यासारखें झालें होतें. आणि या सगळ्यांपेक्षां अधिक अनिष्ट वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे तीस वर्षें एकामागून एक संकटांचे आणि दुर्दैवाचे प्रसंग ओढवत गेल्यामुळें पुढल्या पिढीच्या जर्मन लोकांचा स्वाभिमान आणि स्वदेशाभिमान नाहींसा होऊन त्यांच्यांत भावी कालाविषयीं अत्यंत औदासीन्य पसरलें होतें" (Every sentiment of pride and hope in race and country seemed to have become extinct).

जर्मन राष्ट्राच्या त्या वेळच्या स्थितीचें हें वर्णन येथें देण्याचें कारण एवढेंच कीं, पुढल्या शंभर दीडशें वर्षांच्या अवधींत त्यानें अगदीं मूळापासून सुधारणेला आरंभ करून युरोपियन राष्ट्रांच्या शर्यतींत केवढी अघाडी मारली हें वाचकांच्या चटकन् ध्यानांत यावें. असो.

फ्रान्समधील सुधारक-दुर्धारकांमधील झगड्यांत रिचेल या प्रख्यात दुर्धारकानें सुधारकांचा (Huguenots) नायनाट करण्याचे प्रयत्न केले ते याच कालांत. इ. स. १६४० मध्यें पोर्तुगाल देश स्पेनच्या अंमलाखालून निसटून स्वतंत्र झाला आणि त्या ठिकाणीं 'ब्रागांझा' (Braganza) नामक राजघराण्याची स्थापना झाली. त्याच वर्षीं फ्रेडरिक वुइल्यम (Frederick-William) हा जर्मनींतील ब्रॅडेनबर्ग (Bradenburg) संस्थानच्या गादीवर आला, आणि पुढें तो 'प्रशिया' या प्रमुख संस्थानचा वंशपरंपरा ड्यूक (Hereditary Duke) झाला. ग्यालिलिओ हा युरोपांतला प्रख्यात ज्योतिषी इ. स. १६४२ मध्यें मरण पावला, आणि तो मृत्यु पावला त्याच दिवशीं पुढें पृथ्वीच्या अंगच्या आकर्षणशक्तीचा शोध लावणारा न्यूटन जन्माला आला.

हिंदुस्थान आणि आशियाखंड

हिंदुस्तानांतील मोंगल बादशहा अकबर हा इ. स. १६०५ मध्यें मरण पावला. त्याच्या मागून जहांगीर (इ. स. १६०५-१६२७) व शहाजहान (इ. स. १६२७-

१६५८) हे बादशहा या कालांत होऊन गेले. इ. स. १६०८ मध्यें वुइल्यम हॉकिन्स हा इंग्लंडचा वकील दिल्लीच्या बादशहाकडे व्यापाराच्या सवलती मागण्याकरतां आला, आणि इ. स. १६१२ मध्यें मुंबईच्या उत्तरेस १६५ मैलांवर तापी नदीच्या कांठीं सुरत येथें इंग्रजांनीं आपली पहिली वखार (factory) स्थापन केली. सुरतेच्या या वखारीचा अल्पारंभ (humble beginning) हाच इंग्लंडच्या आजच्या पूर्वेकडील अवाढव्य साम्राज्याचा (gigantic empire) पाया होय. यानंतर सहाच वर्षांनीं दिल्लीपति औरंगजेब बादशहाचा जन्म झाला (इ. स. १६१८).

महाराष्ट्रांत मराठ्यांच्या साम्राज्याचा पाया घालणारे श्रीशिवाजीमहाराज इ. स. १६३० मध्यें जन्मले आणि त्यांनीं वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच विजापुरच्या बादशाहीशीं भांडण्याला सुरवात केली. त्यांचे वडील शहाजी राजे भोंसले हे या कालचे महाराष्ट्रांतील नामांकित सेनापति आणि मुत्सद्दी होत. तुकाराम (इ. स. १६०७), रामदास (इ. स. १६०८) आणि मुक्तेश्वर (१६०९) या महाराष्ट्राच्या संत-कवींचा जन्म सतराव्या शतकाच्या उदयाबरोबरच झाला होता. तसेंच प्रसिद्ध पंडित जगन्नाथराय (१६२०) आणि भट्टोजी दीक्षित (१६२५) हेही त्यांच्यामागून लवकरच जन्माला आलेले दिसतात. मद्रास इलाख्यांतील हल्लींच्या मद्रास शहराची स्थापना इ. स. १६४० मध्यें झालेली आहे. आग्रा येथील प्रसिद्ध ताजमहाल याच कालांत (१६३१–१६४३) बांधला गेला.

इ. स. १६३८ मध्यें बगदाद शहर तुर्की अंमलाखालीं आलें. इ. स. १६४४ मध्यें मांचुरियांतील तार्तर लोकांनीं चीनचें सिंहासन बळकावलें.

आफ्रिका–अमेरिका

इ. स. १६०८ मध्यें अमेरिका खंडाच्या उत्तर भागीं कॅनडा (Canada) प्रांतांत पहिली युरोपियन वसाहत 'क्विबेक' (Quebec) फ्रेंच लोकांनीं स्थापन केली. इ. स. १६२० मध्यें इंग्लडांतून अमेरिकेंत गेलेल्या सुधारक इंग्रजांनीं 'न्यू इंग्लंड' ही वसाहत स्थापिली. हाच आजच्या अमेरिकन संयुक्त संस्थानांचा (United States of America) पाया होय. 'वेस्ट इंडीज' बेटांत इंग्रजांनीं आपली पहिली वसाहत स्थापन केली तीहि याच कालांत (इ स. १६४०).

(उत्तरार्ध)

ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड.

इंग्लंडच्या चार्लस राजाचा वध झाल्यानंतर कांहीं काल तेथें ' सामुदायिक सत्तामंडळ ' (The Commonwealth) या नांवाची एक प्रकारची प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू झाली, पण तिचीं मुळें खोल जाऊं न शकल्यामुळें लवकरच हें रोपटें जागच्या जागीं सुकून गेलें, आणि राजसत्तेचा उन्मळून पडलेला वृक्ष पुनः मूळच्या जागीं स्थापन झाला. मात्र या ' सामुदायिक सत्तामंडळा'च्या अल्प कालांतसुद्धां इंग्लंडच्या बाहेर देशींचा लौकिक व दरारा वाढतच गेला, आणि इंग्रजांचें व्यापारी बस्तान चांगलें बसत चाललें. लंडनच्या नागरिकांवर प्लेग व आग या दोन मोठ्या आपत्ति या कालांत एकदां एकामागून एक अशा ओढवल्या.

दुसऱ्या चार्लस राजाचा रंगेलपणा 'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें प्रथम त्याच्या दरबारांत आणि मागाहून समाजाच्या खालच्या थरांत कांहीं काल पसरत चालला होता. पण पुढें दुसऱ्या जेम्सच्या कारकिर्दींत अनियंत्रित राजसत्तेचें भूत पुनः इंग्लंडमध्यें थैमान घालूं लागलें, तेव्हां लोकांचें लक्ष या भूताला गाडून टाकण्याकडे लागूं लागल्यामुळें हा रंगेलपणा बराच ओसरला. इ. स. १६८८–८९ या सालांत इंग्लंडमध्यें पुनः राज्यक्रांति झाली. पण ती शस्त्रास्त्रांचा खणखणाट न होतांच झाली. कारण या वेळच्या राजानें रागरंग पाहून आपण होऊनच इंग्लंडांतून पलायन केलें. पण या वेळीं इंग्लंडमध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन न होतां माजी राजाचा जांवई इंग्लंडच्या गादीवर येऊन बसला. मात्र आतां प्रजापक्षीय पुढाऱ्यांनीं सावध होऊन राजसत्ता कायदेशीर बंधनें घालून मर्यादित केली आणि तिच्या अंगावरचीं ' ईश्वरदत्त हक्कांचीं ' लेणीं काढून टाकलीं. स्कॉटलंड व आयर्लंड येथील लोकांना या कालांत इंग्रजांच्या ' वज्रमुष्टी'चा दोन तीनदां अनुभव घ्यावा लागला. पण त्याची प्रतिक्रियाही तितक्याच जोराची झाली. मात्र या कालाच्या शेवटीं इंग्रज मुत्सद्यांना जगांतल्या इतर राष्ट्रांत आपलें वर्चस्व स्थापावयाचें, तर आपसांतील भांडणें आधीं मिटविलीं पाहिजेत याची जाणीव अधिकाधिक होऊं लागलेली दिसते. इंग्लिश व स्कॉटिश पार्लमेंट सभांचें पुढें घडून आलेलें ऐक्य हें या जाणिवेचेंच निदर्शक आहे.

युरोप खंड.

या कालांत प्रशियाचा राजा फ्रेडरिक वुइल्यम यानें प्रशियाचें स्वातंत्र्य जाहीर केलें (इ. स. १६५७). स्वीडननें डेन्मार्क देश आपल्या राज्याला जोडला(इ. स. १६६०). हॉलंड देशांत इ. स. १६६७ पासून इ. स. १६७२ पर्यंत बरीच बंडाळी माजली होती. पण इ. स. १६७२ मध्यें 'ऑरेंजचा तरुण राजपुत्र वुइल्यम' (William, the Young Prince of Orange) हॉलंडच्या लोकसभेचा धुरीण (Stadt holder) झाल्यावर ही बंडाळी शमली. त्याच वर्षी फ्रान्सच्या चौदाव्या लुईनें हॉलंडवर हल्ला केला. पण वुइल्यमनें ऑस्ट्रिया, प्रशिया, स्पेन, स्वीडन, वगैरे देशांचा फ्रान्सविरुद्ध एक संघ बनवून लुईशीं पांच सहा वर्षें टक्कर दिली. इ. स. १६७८ मध्यें निमेग्वेन-(Nimeguen) च्या तहानें हें भांडण मिटलें. पण लुईनें इ. स. १६८१ मध्यें जिकडे तिकडे सामसूम असतांही अल्सॅक (Alsac) प्रांत बळकावलाच.

इ. स. १६८३ मध्यें तुर्क लोकांनीं हंगेरीवर स्वारी करून व्हिएन्ना (Vienna) शहराला वेढा दिला. या कामीं त्यांना फ्रान्सच्या चवदाव्या लुईची फूस होती. पण त्यांना अखेर हंगेरी सोडून जावें लागलें. ग्रीसमधूनही त्यांची लवकरच हकालपट्टी झाली, आणि इ. स. १६९८–९९ च्या सुमारास तर तुर्की साम्राज्य अगदीं खिळखिळें होऊन ऑस्ट्रिया, रशिया, पोलंड, वगैरे युरोपियन राष्ट्रांनीं त्याच्या पडक्या घराचे वांसे वांटून घेतले. रशियाचा बादशहा पिटर धि ग्रेट हा या सुमारास आपले हातपाय लांबवूं लागला. रशियाला आतांपर्यंत चांगलें बंदर नव्हतें. तें इ. स. १६९५ मध्यें डॉन (Don) नदीच्या कांठचें अझोव्ह (Azov) शहर तुर्कांकडून घेऊन त्यानें संपादन केलें, आणि ' काळ्या समुद्रा ' कडचा आपला मार्ग मोकळा केला (gained access to the Black Sea).

इ. स. १६८५मध्यें लुईच्या कडव्या धार्मिक धोरणामुळें फ्रान्समधले पुष्कळ सुधारक देशत्याग करून इंग्लंड, स्वित्झरलंड आणि प्रशिया येथें राहावयास गेले, आणि तेथें त्यांनीं त्या त्या देशांतील विद्याकलांचा व उद्योगधंद्यांचा उत्कर्ष घडवून आणला.

इ. स. १७०० मध्यें स्पेनचा राजा दुसरा चार्लस हा मरण पावला. त्याच्या मुलुखाच्या वांटणीच्या पायीं पुढें ' स्पॅनिश वारशाचें युद्ध ' (War of the Spanish Succession) जुंपलें.

हिंदुस्थान आणि आशियाखंड.

उत्तर हिंदुस्थानांत या वेळीं मोंगलसत्ताच प्रबल होती. औरंगजेबाचा बाप शहाजहान हा इ. स. १६५८ पर्यंत दिल्लीचा बादशहा होता. पण त्याच्या वृद्धापकाळीं त्याच्या मुलांमध्यें तंटे लागून स्वतः त्यालाही आपले अखेरचे दिवस कैदेंतच काढावे लागले. तो इ. स. १६६६ मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा सुप्रसिद्ध औरंगजेब बादशहा (इ. स. १६५८–१७०७) हा त्याच्यानंतरचा दिल्लीचा बादशहा होय. तो मुसलमानी धर्माचा कट्टा अभिमानी असून त्याला सगळें कुराण तोंडपाठ येत असे, आणि कुराणांत सांगितलेले आचार निष्ठेनें पाळण्यांत तो अत्यंत दक्ष असे. पण त्याची ही कडवी धर्मनिष्ठा मोंगली साम्राज्यसंवर्धनाला उपकारक न होतां अपकारकच झाली, आणि अकबरानें वाढवून ठेवलेलें मोंगली साम्राज्य औरंगजेबाच्या हयातीपर्यंत जीव धरून राहिलें तरी त्याच्यापश्चात् तें फार काल टिकूं शकलें नाहीं.



औरंगजेब बादशहा.

या कालांत महाराष्ट्रांतील मराठ्यांची सत्ता वाढीला लागून शिवाजी महाराजांनीं इ. स. १६७४ मध्यें स्वतःला राज्याभिषेक करवून घेऊन आपल्या नांवाचें नाणेंही पाडलें. पण या राजसत्तेचा उपभोग घेण्याला ते फार दिवस जगले नाहींत. इ. स. १६८० मध्येंच त्यांना मृत्यूनें गांठलें. त्यानंतर दिल्लीपति औरंगजेबाची दक्षिणेवर मोहीम होऊन शिवाजीचा मुलगा संभाजी त्याचे हातीं सांप-



श्रीशिवाजी महाराज.

डला, आणि मराठ्यांचें राज्य धुळीला मिळतें कीं काय अशी भीति वाटूं लागली (इ. स. १६८९). पण **संभाजीचा** सावत्र भाऊ **राजाराम** आणि त्याच्या पदरचे **धनाजी–संताजी**सारखे गनिमी काव्यांत निष्णात असलेले शूर मावळे वीर यांनीं अनेक आपत्तींना तोंड देऊन हें राज्य बुडूं दिलें नाहीं. **राजाराम** इ. स. १७०० मध्यें मरण पावला. तरी त्याच्या-पश्चात् त्याची बायको **ताराबाई** हिनें **औरंगजेबाशीं** युद्ध चालू ठेवलेंच होतें.

उत्तर हिंदुस्थानांतील शिखांचा गुरु **गोविंदसिंग** हा इ. स. १६६० मध्यें जन्मला. महाराष्ट्रांत या शतकाच्या पूर्वार्धांत जन्मलेले बहुतेक संत-कवी या उत्तरार्धांत दिवंगत झालेले दिसतात. **तुकाराम** (१६५२), **मुक्तेश्वर** (१६५३), **जगन्नाथराय** (१६७४), हे एकामागून एक निजधामास गेले. **रामदासस्वामींनींही शिवाजी** महाराजांच्या पश्चात् दोनच वर्षांनीं (१६८२) देह ठेविला.

बुंदेलखंडामध्यें राजा **छत्रसाल** हा इ. स. १६६४ मध्यें गादीवर आला. त्याचा व **शिवाजी** महाराजांचा चांगला स्नेह होता. इ. स. १६६८ मध्यें मुंबई बेट ई. इं. कंपनीला मिळालें, आणि तेव्हांपासून त्याचें स्वरूप पालटण्याला सुरवात झाली. फ्रेंचांच्या हिंदुस्तानांतील पाँदिचरी या ठाण्याची स्थापना इ. स. १६७४ मधली आहे. या कालांत पोर्च्युगीझ व डच लोकांचें हिंदुस्तानांतील व्यापारासाठीं मोठें चुरशीचें भांडण चालू होतें, आणि फ्रेंच व इंग्रज या भांडणांत पडण्याची जोराची तयारी करीत होते.

आफ्रिका–अमेरिका.

इ. स. १६६० मध्यें पोर्च्युगीझ लोकांनीं दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल (Brazil) देशांतून डच लोकांना हांकून लावलें, आणि तेथें आपली कायमची वसाहत केली. इ. स. १६८२ मध्यें **वुइल्यम पेन** (William Penn) नामक गृहस्थानें 'पेनसिल्व्हानिया' (Pennsylvania) ही वसाहत स्थापन केली. हा **पेन** 'मित्र मंडळ' (Society of Friends) नामक संस्थेचा सभासद असून अमेरिकेंतील 'इंडियन' लोकांचा मोठा मित्र होता असें म्हणतात.